सत्कार्योत्तेजक सभा—धुळें

Dhananjayarao Gadgil Library
GIPE-PUNE-194474

श्री

# ज्ञानेश्वरी

## द्वितीय खंड

( अध्याय ११—१८ )

आतां हृदय हें आपुलें । चौफळूनि भलें ।
वरि बैसऊं पाउलें । श्रीगुरूचीं ॥ १ ॥
ऐक्यभावाची आंजुळि । सर्वेंद्रियकुड्मळीं ।
भरोनि पुष्पांजळि । अर्घ्यु देऊं ॥ २ ॥

ज्ञानेश्वरी, अध्याय १५.

संपादकः—विश्वनाथ काशीनाथ राजवाडे

धुळें:—आत्माराम छापखान्यांत छापिला.

( सर्व हक्क राखून ठेविले आहेत. )

ज्येष्ठ शुद्ध १२ शके १८३१

# लोकमान्य केसरीकारांचा
# अभिप्राय

हा अपूर्व व अमूल्य ग्रंथ धुळें येथील 'सत्कार्योत्तेजक सभे'नें प्रसिद्ध केला आहे. या ग्रंथास 'अपूर्व व अमूल्य' ह्मणण्याचीं कारणें अनेक आहेत. सांप्रत ज्ञानेश्वरीच्या ज्या ज्या आवृत्त्या छापून निघाल्या आहेत, त्या त्या सर्व एकनाथांनीं शके १५०६ मध्यें शोधिलेल्या ज्ञानेश्वरीच्याच प्रती आहेत. प्रस्तुतची ज्ञानेश्वरी एकनाथी ज्ञानेश्वरीच्या पूर्वींची आहे. ज्ञानदेवाचा समकालीन मुकुंदराज कवी याची स्वतःची जी ज्ञानेश्वरीची प्रत होती, ती त्यानें आपला शिष्य 'विद्याधर' यांस दिली; त्याजपासून ती 'विश्वनाथु कोनेर घोलरदेवनुरकर' यास मिळाली; व या पुरुषापासून परंपरेनें ती जात जात बालेघाटीं बीड शहरांत पाटांगण नांवाचे देवस्थानांत आली! या संस्थानचे सांप्रतचे मठाधिपती मथुरानाथ गोसावी यांनीं ही प्रत प्रसिद्ध संशोधक रा. विश्वनाथ काशीनाथ राजवाडे यांस पांच वर्षांपूर्वीं दिली; व सांप्रतचा ग्रन्थही त्यांनींच संपादित केलेला आहे. प्रस्तुतची ज्ञानेश्वरी ह्मणजे खुद्द ज्ञानेश्वरांनीं नेवाशास भाषेच्या ज्या स्वरूपांत ती सांगितली, त्याच स्वरूपांत तंतोतंत छापलेला हा महाराष्ट्र वाङ्मयांतील बहुमोल ग्रंथ होय. आधींच एकनाथी ज्ञानेश्वरीनें ज्या महाराष्ट्रीय समाजास आज अनेक शतकें आपल्या गुणांनीं मोहित करून सोडलें आहे, त्यांस खुद्द ज्ञानेश्वरांच्या तोंडची ज्ञानेश्वरी मिळणें ह्मणजे अपूर्व लाभ होय यांत शंका नाहीं. भगवद्गीतेवरील उत्कृष्ट मराठी टीका, वारकरी पंथाची जननी, मनोहर उपमादृष्टांतांनीं गजबजलेलें उत्तम काव्य, आणि

सहाशें वर्षांपूर्वींच्या नागर मराठीचा नमुना व मराठींत कागदावर लिहिलेला सर्वांत जुना उपलब्ध लेख, या सर्व दृष्टींनीं ज्ञानेश्वरांच्याच अस्सल भाषेंत छापलेला हा ग्रंथ महाराष्ट्रीयांच्या आदरास कौतुकास व आश्रयास पात्र होईल यांत संदेह नाहीं. ज्ञानेश्वरीच्या या प्रतीच्या एका पानाचें चित्रही या ग्रंथास जोडलें असून अखेर कठीण शब्दांचा कोश दिला आहे. अशा प्रकारच्या अपूर्व ग्रन्थाचा लाभ महाराष्ट्रीयांस करून दिल्याबद्दल रा. राजवाडे व सत्कार्योत्तेजक सभा यांचे आभार मानावे तितके थोडेच आहेत.

(केसरी ता. २५।८।०८)

| | | | |
|---|---|---|---|
| २ | १७ | ईभ | ईभ- |
| ३ | ३१ | सज्ञानाचें | सज्ञनाचें |
| ३ | ३३ | काव्या | काव्यां |
| ४ | ४० | आपुल्यापरी | आपुलिया परी |
| ४ | ४० | मुखाडले | मुखाडले |
| ४ | ४४ | घनीभृत | घनीभूत |
| ४ | ४६ | धरूनि | धरूनि |
| ५ | ५१ | शब्द ब्रह्माब्धी | शब्दब्रह्माब्धी |
| ५ | ५८ | आर्धी | आर्दी |
| ६ | ६६ | तों | तो |
| १५ | १६० | ह्मणोनि | ह्मणौनि |
| २० | ४ | ता | तो |
| २० | ७ | आववे | आघवे |
| २२ | २७ | ऐस | ऐसें |
| २७ | ६७ | गह्विर | गह्विरु |
| २७ | ६७ | खाला | खालां |
| २७ | ७१ | धनुष्यबाण | धनुष्यबाण |
| २७ | ७२ | वैकुंठनाथ | वैकुंठनाथु |
| २७ | ७२ | पार्थ | पार्थु |
| २७ | ७२ | परमार्थ | परमार्थु |
| २९ | ९ | आवो | आहो |
| २९ | १६ | आधिकां | आथिकां |
| ३० | २८ | ह | हें |
| ३० | २९ | परी | परीं |
| ३१ | ३६ | येथ | जें येथ |
| ३१ | ३६ | जे याचा | जेयाचां |
| ३२ | ४१ | ही | हें |
| ३२ | ४८ | नवनव | नव |
| ३३ | ५६ | तिमिरावरुद्ध | तिमिरानिरुद्ध |
| ३७ | ९६ | एक | एकु |

| | | | |
|---|---|---|---|
| ३७ | ९६ | होति | होंति |
| ३७ | १०० | जात | जांत |
| ३७ | १०२ | विवेकियें | विवेकिये |
| ३७ | १०२ | होति | होंति |
| ३७ | १०४ | इये | इयें |
| ३७ | १०४ | वेगली | वेगळीं |
| ३८ | १०६ | कवण | कवणें |
| ३८ | १११ | नेणावया | नेणावेया |
| ३८ | १११ | भ्रमें | भ्रमे |
| ३९ | १२२ | अव्हेरी | अव्हेरीं |
| ४३ | १६० | होति | हांति |
| ४४ | १६४ | अमूर्ते | अमूर्तें |
| ४४ | १६५ | नव्हति | न्हवति |
| ४४ | १७१ | आचरिति | आचरति |
| ४५ | १८० | अह्मइं | आह्मइं |
| ४५ | १८१ | भलतैं | भलेतें |
| ४५ | १८२ | त्याजु | त्याज्यु |
| ४५ | १८६ | कव्हणा | कव्हणीं |
| ४७ | २०१ | होसील | होंसील |
| ४७ | २०२ | जाणते न | जाणतेन |
| ४७ | २०२ | सांघपां | सांघ पां |
| ४८ | २१९ | ते व्हलि | तेव्हलि |
| ६२ | ३६२ | पावलें | पावलें |
| ६९ | ५६ | प्राणपानगती | प्राणापानगती |
| ७१ | ७८ | आचार | आचर |
| ७२ | ९५ | देति | देंति |
| ७५ | १२५ | आजे | आर्जे |
| ७६ | १३९ | स्वघर्मरूपु | स्वधर्मरूपु |
| ७६ | १४२ | गला | गलां |

| | | | |
|---|---|---|---|
| ७९ | १७० | जेवी | जेवी |
| ८१ | १८९ | श्रद्धासूं | श्रद्धासिं |
| ८३ | २०९ | ग्राणातें | प्राणातें |
| ८५ | २३२ | तेयाते | तेयातें |
| ८६ | २४९ | चिव्हारीं | जिव्हारीं |
| ९२ | ३३ | एकार्धें | एकावें |
| ९९ | १०७ | आशां शाकु खंडी | आशांसीं कुरवंडी |
| १०४ | १६२ | आपणां पें | आपणापें |
| १०५ | १६८ | आपणपेंन | आपणपेन |
| १०८ | २१२ | अनुभवांवी | अनुभवावी |
| १११ | १० | खेलावया | खेलावेया |
| १२६ | १७४ | परियसें | परियसैं |
| १२७ | २ | चिये | चि ये |
| १२९ | २६ | आधवी | आघवी |
| १३२ | ६४ | च | चि |
| १३४ | ८२ | किडालाचां | किडालाचा |
| १४० | १५५ | ते हीं | तेहीं |
| १४८ | २६१ | धैयाची | धैर्याची |
| १४८ | २६५ | परवाली | पखाली |
| १५१ | ३०१ | नांव | नावं |
| १५२ | ३०५ | परत्मलिंगा | परमात्मलिंगा |
| १५२ | ३१३ | प्राखा | प्राणा |
| १५२ | ३१७ | चैं | जैं |
| १६१ | ४०५ | होथि | होंथि |
| १६३ | ४२७ | दीह्या | दी ह्या |
| १६४ | ४३२ | तव | तवं |
| १६४ | ४३२ | एसा | ऐसा |
| १६४ | ४३९ | तसा | तैसा |
| १६६ | ४५१ | नैयतां | नैयंतां |
| १६६ | ४६१ | चदनाचें | चंदनाचें |

| | | | |
|---|---|---|---|
| १७२ | २४ | नाणयांसि | नाणेयांसि |
| १७४ | ४८ | माक्ष | मोक्ष |
| १७६ | ६८ | चडतकालकलांचेनि | चडत कालकलांचेनि |
| १८० | ११२ | तीं | तो |
| १८० | ११५ | पलीकडिली | पैलीकडिली |
| १८४ | १५१ | उंचावते न | उंचावतेन |
| १८५ | १६७ | ससाणे | सणाणे |
| १८६ | १७० | २७० | १७० |
| १९१ | ९ | होयजे | होइजे |
| १९२ | १८ | जेतया | जे तेया |
| १९२ | २० | ब्रह्माडाचे | ब्रह्मांडाचे |
| १९२ | २२ | ०जातेयां | ०जांतेयां |
| १९३ | ३६ | ग्रामीं | ग्रामीं |
| १९५ | ५८ | सांघिलें | सांधितलें |
| १९५ | ५८ | तया | तेया |
| १९५ | ६५ | उव्रातेन | उवांतेन |
| १९६ | ७६ | आतु | आंतु |
| २०० | ११९ | अनुधाडु | अनुवाडु |
| २०२ | १३८ | तापत्रयाग्नि चि | तापत्रयाग्निचि |
| २०४ | १५४ | तै | तैं |
| २०४ | १५७ | डोला | डोलां |
| २०५ | १७५ | नाशवंत | नाशवंतें |
| २०६ | १७७ | ऐसे | ऐसें |
| २०६ | १७७ | जे | जें |
| २०६ | १८० | जे | जें |
| २०६ | १८१ | वाहाति | वाहांति |
| २०६ | १८६ | तया | तिया |
| २०८ | २०६ | पातलेंयां | पातलेयां |
| २०९ | २१८ | अग्निज्योतिचा | अग्निर्ज्योतिच्या |

# शुद्धिपत्र.

## प्रस्तावना.

| पृष्ठ | पंक्ति | अशुध्द | शुध्द |
|---|---|---|---|
| ९ | २२ | Linguis be | Linguistic |
| १० | ५ | प्राकृतोद्भव | प्राकृतिकोद्भव |
| १० | ७ | प्राकृतोद्भव | प्राकृतिकोद्भव |
| १० | ११ | प्राकृतोद्भव | प्राकृतिकोद्भव |
| १० | १८ | प्राकृतोद्भव | प्राकृतिकोद्भव |
| १० | २२ | प्राकृतोद्भव | प्राकृतिकोद्भव |
| १० | २४ | संकृत | संस्कृत |
| १० | २५ | भषांकडे | भाषांकडे |
| १५ | १३ | Md. | Ind. |
| १९ | ७ | संकृतापेक्षां | संस्कृतापेक्षां |
| १९ | १५ | संकृत | संस्कृत |
| २१ | ७ | पाळी | पाळी. |
| २१ | १२ | जन्म भाषा | जन्मभाषा. |
| २१ | १२ | भाषाबौद्धांचें | भाषा. बौद्धांचे |
| २१ | २२ | इतकेंच | इतकेंच. |
| २२ | १८।१९ | मराठीवगैरे प्राकृतिक भाषा | अपभ्रंश, मराठी वगैरे प्राकृतिक व प्राकृतिकोद्भव भाषा |
| २२ | २८ | संकृत | संस्कृत |
| २३ | २ | संकृत | संस्कृत |
| २४ | ९ | वेद भाषेशीं | वेदभाषेशीं |

| | | | |
|---|---|---|---|
| २५ | ९ | कृतिम | कृत्रिम |
| २९ | २३ | असंकृत | असंस्कृत |
| ३० | ५ | पोटभेद | पोटभेद. |
| ३१ | कंस ३ | मराठीचें | महाराष्ट्रीचें |
| ३८ | कंस | वार्णिककार | वार्तिककार |
| ३८ | १६ | राजधानी | राजधानी. |
| ३८ | २८ | शेप | शेषं |
| ३९ | १३ | ८०० | ८० |
| ३९ | १६ | वय्याकरण | वैय्याकरण |
| ३९ | २७ | वाररुचे काव्यं | वाररुचं काव्यं |
| ४० | ३ | अपराना | अपरान्त |
| ४१ | ७ | ; | ; व |
| ४१ | २४ | अंत. | अंतः |
| ४२ | १९ | एकच | एकाच |
| ४३ | कंस | जिवंत व महाराष्ट्री मेलेली संस्कृत भाषा | जिवंत महाराष्ट्री व मेलेली संस्कृत भाषा |
| ४५ | ३ | भग्निमित्र | आग्निमित्र |
| ४८ | २४ | सक्तिअ | सत्तिअ |
| ५० | २१ | षोड्त्रपैनि | षोड्त्रपैति |
| ५४ | २२ | संकृत | संस्कृत |
| ५५ | २५ | Pisehel's | Pischel's |
| ५७ | १० | ५०० | १५०० |
| ५७ | ११ | ५०० | १५०० |
| १०६ | ६ | ज्ञानेश्वरीतामु | ज्ञानेश्वरी तामु |

## ज्ञानेश्वरी.

| पृष्ट | ओवी | अशुद्ध | शुद्ध |
|---|---|---|---|
| १ | ५ | तिये | तियें |
| २ | १५ | दरा-नु | दरानु |

| | | | |
|---|---|---|---|
| २१० | २२३ | अर्चिरमार्गु | अर्चिरामार्गु |
| २११ | २३७ | जे | जें |
| २१२ | २५१ | हां गा | हांगा |
| २१३ | २५७ | भागातें | भोगातें |
| २१५ | ३ | जे | जें |
| २१७ | २७ | अभप्राउ | अभिप्राउ |
| २२३ | ७५ | वेढि तेयाचिया | वेढितेयाचिया |
| २२३ | ८० | भवंती | भवंती |
| २२४ | ९० | सोरसें | सौरसें |
| २३१ | १५८ | सेजें | सेजे |
| २३३ | १८२ | जे | जें |
| २३३ | १८२ | अगास्तिगौवण | अंगास्तिगौवण |
| २३४ | १८६ | आइकें | आइकैं |
| २३६ | २१४ | विकारांची | विकारांचीं |
| २३६ | २१४ | बोहिली | बोहिलीं |
| २४१ | २८० | उमेयां | उगेयां |
| २४८ | ३५७ | जि | चि |
| २६९ | ५३ | लांघिजैल | सांघिजैल |
| २७० | ६५ | नेदेखे | नेदखे |
| २७१ | ७८ | सर्पी | सर्पीं |
| २७४ | १०७ | चंद्रेमेयांसि | चंद्रमेयांसि |
| २७४ | १०७ | पांडें | पाडें |
| २७४ | ११२ | कथितेनें | कथितेन |
| २७४ | ११२ | कथू | कथूं |
| २७५ | ११५ | टांइंचिं | टांइंचि |
| २७५ | ११८ | आपलेया | आपुलेया |
| २७५ | ११९ | पोरवीतु | पोखीतु |
| २७५ | १२० | पोरवकें | पोखकें |
| २६६ | १२४ | बोलिं या | बोलिया |
| २७८ | १५० | आघवेनिं | आघवेनि |

| | | | |
|---|---|---|---|
| २७८ | १५४ | जैंव्हालि | जेव्हालि |
| २७९ | १६२ | हां गा | हांगा |
| २८०. | १६८ | ( तिसरा चरण ) | हें असो मज प्रति। |
| २८१ | १८१ | हारपोनि | हारपौनि |
| २८२ | १९३ | सांधितसों | सांघतसों |
| २८६ | २२७ | प्रह्लादु | प्रऱ्हादु |
| २८६ | २३२ | त्रेंती | त्रेतीं |
| २८६ | २३३ | ह्मणतयां | ह्मणतेयां |
| २८७ | २४४ | पटी | पटीं |
| २८८ | २४५ | एसेया | ऐसेया |
| २८८ | २४९ | तैसें पां | तैसेयां |
| २८८ | २५० | समासा | समासां |
| २८८ | २५२ | एसा | ऐसा |
| २८८ | २५२ | ती | तो |
| २८९ | २५७ | एसें | ऐसें |
| २८९ | २५९ | आया | आगा |
| २९१ | २८४ | तैसिं | तैसें |
| २९३ | ३०१ | तव | तवं |
| २९३ | ३०४ | देवं | दैव |
| २९४ | ३०७ | देवांगला | दैवांगला |
| २९७ | २४ | मान्हवे | मा न्हवे |
| २९९ | ४२ | घावलें | घातलें |
| ३०१ | ७३ | माहात्म | माहात्म्य |
| ३०२ | ८५ | गाति | गांति |
| ३०६ | ११७ | आहेसें | आहे सें- |
| ३११ | १७१ | भोगावया | भोगावेया |
| ३१४ | २०७ | विश्ववरूपाचीं | विश्वरूपाची |
| ३१४ | २०८ | मी | मीं |
| ३१४ | २१२ | जेयाचेयानि | जेयांचेया |

| | | | |
|---|---|---|---|
| ३१६ | २३५ | देशकु | देशकु |
| ३१९ | २६१ | चिरत्रचना | चित्ररचना |
| ३२० | २७४ | वयासा | वयसा |
| ३२२ | २९८ | ० चक्षूसि | ० चक्षूंसि |
| ३२३ | ३०८ | उभड्ड | उभड |
| ३२५ | ३३० | पाहांता | पाहांतां |
| ३२५ | ३३३ | उदैले | उदैलें |
| ३२५ | ३३५ | एसें | ऐसें |
| ३२९ | ३७१ | प्रसय० | प्रलय० |
| ३३१ | ३८७ | कोरव० | कौरव० |
| ३३१ | ३९० | पदर्तींचे | पदार्तींचे |
| ३३२ | ४०२ | फेडावया | फेडावेया |
| ३३३ | ४०६ | जैवि | जेवि |
| ३३५ | ४३४ | नेण | नेणें |
| ३३६ | ४३६ | अंतक | अंतकु |
| ३३८ | ४६२ | उलथौगि | उलथौनि |
| ३३८ | ४६३ | हाइ | होइं |
| ३४४ | ५२३ | ननम | नमन |
| ३४४ | ५२४ | पाठिमोरयासि | पाठिमोरेयासि |
| ३४७ | ५५२ | कैसें व | कैसेनि |
| ३४९ | ५७६ | घरड हुलि | घरडहुलि |
| ३५० | ५८२ | ८५ | ८२ |
| ३५० | ५८५ | ओलाडावें | आलोडावें |
| ३५१ | ५९६ | होताति | होंताति |
| ३५३ | ६०८ | सोरसु | सौरसु |
| ३६१ | ६९६ | आलो चुकरूनि | आलोचु करूनि |

| | | | |
|---|---|---|---|
| ३६३ | १२ | होंदे | हों दे |
| ३६३ | १६ | होंदेइं | हों देइं |
| ३६७ | ६२ | जूंझावें | जूझावें |
| ३६८ | ७५ | तयांची | तेयांची |
| ३६९ | ८७ | जन्मृत्युचां | जन्ममृत्युचां |
| ३७६ | १७१ | पूर्ण तेजाला | पूर्णते जाला |
| ३७७ | १८३ | निरंधनि | निरंधनिं |
| ३८२ | २३९ | शरणगतां | शरणागतां |

श्री.

# प्रस्तावना.

१ विवक्षित लोक विवक्षित भाषा विवक्षित स्थलीं व विवक्षित कालीं कोणत्या पद्धतीनें बोलतात व (लिहिणें माहित असल्यास) लिहितात, हें ज्या नियमसरणीनें ह्मणजे शास्त्रानें स्पष्ट केलेलें असतें त्यास त्या भाषेचें तत्स्थलीन, तत्कालीन व तल्लोकीय व्याकरण ह्मणतात. ह्या वाक्यांत व्याकरण ह्या शब्दाला स्थल, काल व लोक या उपाधींनीं मुद्दाम विशिष्ट केलें आहे. कां कीं, ह्या तीन उपाधींचा स्पर्श जिला नाहीं अशी भाषा मागें झाली नाहीं व पुढें होणार नाहीं.

**व्याकरणाची व्याख्या.**

**प्रांतकृत भाषाभेद.**

प्रस्तुतकालची ह्मणजे शक १८२९ तली मराठी भाषा घेतली, तर असें आढळून येईल कीं, प्रांतपरत्वें ही भाषा किंचित् किंचित् बदलत जात जात सरहद्दींवर इतर भाषांशीं मिसळून जात आहे. ह्मणजे निव्वळ प्रांतपरत्वें मराठी भाषेचे पाचपंचवीस पोटभेद होत आहेत. तसेंच, प्रांतपरत्वाप्रमाणेंच जातिपरत्वानें हि भाषा बदलत असते, ह्याचा हि अनुभव सर्वत्र आहे. ब्राह्मणाची मराठी भाषा कुणब्याच्या मराठी भाषेहून किंचित् भिन्न असते, हें स्पष्ट आहे. त्याप्रमाणेंच, पारशाची गुजराथी अमदावादी वाण्याच्या गुजराथीहून निराळी आहे, हें एखादा सामान्य मनुष्य हि ओळखूं शकेल. कोकणांतील कोळ्याची मराठी कोकणांतील भंडाऱ्याच्या किंवा पाताण्या प्रभूच्या मराठीहून भिन्न असते इतकेंच नव्हे, तर बंदरी कोळ्याची मराठी भाषा डोंगरी कोळ्याच्या मराठी भाषेहून भिन्न असते. मराठींत हा भाषाभेद स्थल व जाति या दोन उपाधींनींच तेवढा अवच्छिन्न झाला आहे, असें समजूं नये. स्त्रीपुरुषभेद हि मराठींत भाषाभेदाला कारण होतो.

**जातिकृत भाषाभेद.**

**लिंगकृत भाषाभेद.**

हा भेद स्थल किंवा जाती ह्यांनीं केलेल्या भेदांइतका उत्कट नसतो. तत्रापि, असा भेद इंग्रजी, कानडी वगैरे भाषांत नाहीं व मराठींत आहे, ही बाब केवळ क्षुल्लकच समजतां येत नाहीं. स्थल, जाती, लिंग ह्यांच्याप्रमाणेंच कालानें हि भाषेंत फेरफार

होतो. उदाहरणार्थ, १८२९ तील वर्तनान मराठी, १५२९ तील एकनाथ मराठी, १२१२ तील ज्ञानेश्वरी मराठी व ६५८ तील धनगरी मराठी, पर

**कालकृत भाषाभेद.** स्परांहून भिन्नावस्थ आहेत, हें जुनीं वाडें वाचणारा मनुष्य सहज सांगू शकतो. त्यांत पुन्हां हें ध्यानांत ठेविले पाहिजे कीं, शक १२१२ त ज्ञानेश्वराच्या वेळीं, देवगिरी, नागपूर मावळ, कोंकण व कारवार या ठिकाणीं बोलली जाणारी मराठी भिन्न होती. शक १२१२ त चोखामेळ्याचें मराठी ज्ञानोबाच्या मराठीहून भिन्न होतें, हें हि विसरतां कामा नये. तात्पर्य, स्थल, काल व जाति मराठी भाषा अवछिन्न व भिन्नावस्थ झालेली आहे. लिंगभेद वि नसल्यामुळें जमेस न धरणें सोयस्कर पडतें इतकेंच. नाहीं तर, ते धरणें जरूर होतें, कारण, मराठी भाषा बोलणाऱ्या कित्येक जातीत स्त्रि पुल्लिंगी प्रयोग करतात; आणि ह्या जाती प्रायः कानडी मुलखाच्या जवळील मिरज, कोल्हापूर सोलापूर वगैरे प्रांतांत आढळतात. पुल्लिंगी प्रयोग करणाऱ्या महाराष्ट्रांतील ह्या जाती पूर्वी भाषावंशानें मराठ्या नसाव्या, असा सिद्धान्त बिनहरकत बांधावा.

२ कोणत्या हि भाषेचे प्रांतपरत्वें जे भेद होतात त्यांना प्रांतिक पोट

**प्रांतिक भाषा** भेद अथवा पोटभाषा ह्मणतात. ह्या प्रांतिक पोटभाषा त्या त्या प्रांतांतील ब्राह्मणादि सर्व जाती बोलतात. शुद्धाशुद्ध किंवा भ्रष्टाभ्रष्ट हीं विशेषणें ह्या प्रांतिक पोटभाषांना लावतां येत नाहींत. कारण, नमुनेवजा जी मुख्य भाषा तिच्या इतकीच थोर परंपरा ह्या प्रांतिक भाषांची बहुतेक असते. इतकेंच कीं, ह्या प्रांतिक भाषांना नमुनेवजा मुख्य भाषेचें सर्वराष्ट्रमान्यत्व नसतें. उदाहरणार्थ, ज्ञानेश्वरानें खानदेशी मराठींत कांहीं अभंग रचलेले आहेत. ते तत्कालीन देवगिरी येथील मराठी भाषेहून भिन्न असून विनोदार्थ रचलेले आहेत. कोणत्या हि पोटभाषेचा विनोदा जेथें उपयोग झाला, तेथें त्या पोटभाषेचें गौणत्व प्रस्थापित झालें, हें उघड आहे. परंतु, ह्या गौणत्वावरून खानदेशी मराठी भाषेला अपभ्रष्ट किंवा अशुद्ध ह्मणून चालावयाचें नाहीं. अपभ्रंश हा प्रकार निराळाच आहे; तो नमुनेवजा मुख्य भाषेतल्याप्रमाणें प्रांतिक पोटभाषांत हि सांपडतो. प्राय जातिपरत्वें भाषेचे जे पोटभेद होतात त्यांना मुख्यभाषेचे अपभ्रंश ह्मणतात

कोणत्या हि समाजांत भाषेचा अपभ्रंश बालांच्या ठायीं सहज संभवतो. तद-नंतर, अशिक्षित स्त्रिया, शूद्र वगैरे लोक अपभ्रष्ट उच्चार व प्रयोग करतांना फार आढळतात. सर्वांत अत्यंत अपभ्रंश

**अपभ्रंश.**

हिंदूसमाजांत येऊन राहिलेले दैत्य, असुर, शक, पल्हव, यवन, मुसलमान, यहुदी, वगैरे जातिबाह्य लोक ह्यांच्या हातून पराकाष्ठेचा होतो उच्चार, प्रत्यय, प्रयोग, लिंग, वचन, ह्या सर्वांचा हे म्लेच्छ लोक दुरुपयोग करतात. पारशी, अपहुदी, अरब, इंग्रज, फ्रेंच, मोगल, जपानी, वगैरे म्लेच्छ लोक संस्कृत, अपभ्रंशी मराठी वगैरे भाषांचा उच्चार व प्रयोग किती अशुद्ध व अपभ्रष्ट करतात, तें पाहिलें ह्मणजे अपभ्रंशोत्पत्तीचें खरें कारण ध्यानांत येऊं लागतें. ह्या लोकांच्या उच्चार करण्याच्या नाड्या च तिरके उच्चार करण्याला लायक अशा जन्मसिद्ध असतात. 'अ' चा 'ॲ', 'ए' चा 'ॲ', 'त' चा 'ट' वगैरे उच्चार म्लेच्छ लोकांच्या बोलण्यांत फार येतात. असले तोंड वाकडें वासून झालेले उच्चार शूद्रादि वर्गांच्या अपभ्रंशांत आढळत नाहींत. जोडाक्षरांची द्वित्त व्यंजनें व कठोर व्यंजनांची मृदु व्यंजनें करण्याकडे बाल-शूद्रादींची प्रवृत्ति विशेष असते. बालशूद्रादिकृत अपभ्रंश लोकमान्य नस-ल्यामुळें भिन्नभाषात्वाला कारण समजला जाणें सर्वथा अयुक्त होय. हाच नियम म्लेच्छादिकृत अपभ्रंशाला लागू करणें सशास्त्र आहे. अपभ्रंशोत्पत्ति कशी होते, हें नीट ध्यानांत न आल्यामुळें, Linguistic survey of India, Vol VII मध्यें, मराठी भाषेसंबंधानें लिहितांना, ग्रीय-रसन्‌ने अपभ्रंशाची प्रांतिक पोटभाषांशीं भेसळ केलेली आहे. गोव्याच्या किरिस्तावांची मराठी भाषा किंवा ठाण्याच्या किरिस्तांव कोळ्यांची मराठी भाषा निव्वळ कोकणांतील प्रांतिक मराठी पोटभाषेचे अपभ्रंश होत. ह्या

**किरिस्तानी अपभ्रंश.**

अपभ्रष्ट भाषेत पोर्तुगीज मिशनऱ्यांनीं बायबलपुराण लिहिलें आहे. तेवढ्यानें अपभ्रष्टत्व जाऊन, स्वतंत्र प्रांतिकभाषेच्या प्रौढ पदवीस ती येते, असें वाटत नाहीं. कोकणांतील किरि-स्तावांच्या अपभ्रंशांत दहा पांच चोपडीं फार तर छापलेलीं आढळतील. परंतु, महाराष्ट्रांत मानभाव ह्मणून जे लोक आहेत, त्यांनीं अतिशूद्रांच्या मराठी अपभ्रंशांत पाचचारशे ग्रंथ लिहिलेले आहेत. त्यांचा ग्रीयरसन्‌ला पत्ता सुद्धा नाहीं. केवळ ग्रंथवत्त्वामुळें मानभावी अपभ्रंश ज्याप्र-

माणें पोटभाषेच्या योग्यतेला येत नाहीं, त्याप्रमाणेंच गोमांतक किंवा साष्टी येथील किरिस्तावांचा क्षुद्र अपभ्रंशहि पोटभाषेच्या पदवीला पोहोचत नाहीं. यद्यपि अपभ्रंश स्वतंत्र भाषाभेद उत्पन्न करीत नाहीं, तत्रापि पोटभाषेंत निरनिराळे प्रकार उत्पन्न करतो, हें उघड आहे. पोटभाषेंतील ह्या उपभेदांत कोणत्याहि कारणानें जर ग्रंथसंपत्ति निर्माण झाली, तर तो उपभे

**मानभावी अपभ्रंश.**

स्वतंत्र पोटभाषेच्या मानाला पात्र होण्याची चिन्हें दाखवि गोव्यांतील किरिस्तावी भाषेचा व देशावरील मानभावी षेचा असाच मासला उडालेला आहे. इतर जबरदस्त णांच्यापुढें त्यांच्या ह्या महत्वाकांक्षेची डाळ शिजली नाहीं, ही बाब अलाहिदा. पोर्तुगीज भाषेच्या जुलमापुढें किरीस्तावी मराठी अपभ्रंश फिका पडला; आणि नागर मराठीखालीं मानभावी अपभ्रंश चिरडून गेला. कालांतरानें हे दोन्ही अपभ्रंश नष्ट होऊन नागर मराठी त्या त्या प्रांतांत व जातींत प्रचलित होईल, हें सांगावयाला नकोच.

**कालकृत भाषेचीं अवस्थान्तरें.**

३ जातिपरत्वानें भाषेंत अपभ्रंश उत्पन्न होतो आणि प्रांतपरत्वानें प्रांतिक भाषाभेद झालेले असतात. परंतु कालाचा भाषेवर जो संस्कार किंवा विकार होतो त्यानें अपभ्रंश किंवा भाषाभेद यांतून एकहि कार्य होत नाहीं. कालपरत्वें भाषेला वृद्धत्व, तारुण्य, बाल्य अशा भिन्न अवस्था येतात; परंतु तिचें स्वत्व कांहीं नाहींसें होत नाहीं. भाषा तीच; अवस्थान्तरें, मात्र, निरनिराळीं. शक ९०५ तील चामुंडरायाची मराठी भाषा, शक १०५१ तील सोमेश्वराची मराठी भाषा, शक ११२८ तील चंगदेवाची मराठी भाषा, शक १२१२ तील ज्ञानदेवाची मराठी भाषा, शक १५०० तील एकनाथाची मराठी भाषा किंवा शक १८०० तील विष्णुशास्त्र्याची भाषा पा असतां भाषा मराठीच आहे हें अशिक्षित मनुष्यहि ओळखूं शकतो; इत कीं, कांहीं रूपें बरींच जुनीं आहेत, असें त्याच्या दृष्ट्युत्पत्तीस येतें. व्य तीच; वस्त्रें तेवढीं निराळीं. पुरुष एकच, बाल्यतारुण्यवार्द्धक्यादि अवस्था मात्र, अनेक. मुख्य नागर भाषेप्रमाणेंच, हीं अवस्थान्तरें प्रांतिकभाष ठायीं दृश्यमान होतात; परंतु, अपभ्रंशाच्या ठायीं होत नाहींत. कारण, पभ्रंश हा अवस्थान्तरांच्या वरचा तात्पुरता मल उर्फ विकार होय. तो भा

कोणत्या हि अवस्थेंत जातिधर्माप्रमाणें विशिष्टनियमानुसार भासमान होतो. मुख्य किंवा प्रांतिक भाषेच्या विशिष्ट अवस्थेचा कनिष्ठ जातींत अपभ्रंश होतो. त्या अपभ्रंशाची प्रगती शतकेंच्या शतकें प्राय: चालत नाहीं. चाललीच, तर, कालान्तरानें मूळभाषेहून अत्यंत विलक्षण असें रूप धारण करते. इंग्रजी, लातीन, जर्मन, रशियन, पोलिश वगैरे भाषा मूळ आर्यभाषेचे परंपरित अपभ्रंश होत. ह्या अपभ्रंशाशीं सध्यां आपल्याला कर्तव्य नाहीं. कालानें भाषेचीं अवस्थान्तरें होतात, हा मुख्य मुद्दा आहे. हीं अवस्थान्तरें व त्यांचें ज्ञान वर्तमान नागर मराठी भाषेच्या व्युत्पत्तीला वैशद्य आणण्यास अत्यंत उपयुक्त आहेत.

**नागर अथवा शिष्ट मराठी.**

४ प्रांतिक पोटभाषा, अपभ्रंश, अवस्थान्तरें, वगैरे शब्द ज्या मुख्य मराठी भाषेच्या अपेक्षेनें योजिले तिला नागर अथवा शिष्ट मराठी अशी संज्ञा आहे. अपभ्रष्ट किंवा प्रांतिक जी नव्हे ती नागर किंवा शिष्ट मराठी समजावी. नागर अथवा शिष्ट मराठी वर्तमानकालीं पुणें प्रांतांतील ब्राह्मण व उच्च मराठे बोलतात. तीनशें वर्षांपूर्वीं नागर मराठी पैटणचे ब्राह्मण बोलत व लिहीत. आणि सातशें वर्षांपूर्वीं नागर मराठी देवगिरीच्या भोवतालील प्रांतांत ब्राह्मणादि उच्च वर्ण वापरीत. ह्मणजे प्राय: सर्वमान्य ग्रंथकर्ते व पुढारी राज्यकर्ते जी भाषा वापरतात ती भाषा नागर ह्मणजे शिष्ट मराठी भाषा होय. मग, स्वत: ग्रंथकर्ता प्रसंगवशें पुणे प्रांतांत राहो किंवा नागपूर प्रांतांत राहो. येथें एक मोटा चमत्कार लक्षांत घेण्यासारखा आहे. ग्रंथकर्ता गोव्यांतला असो, कोल्हापूरचा असो, पुण्यांतला असो, पैटणचा असो किंवा नागपूरचा असो, त्याची लिहिण्याची भाषा एकसारखी असते. गोव्यांतला ग्रंथकर्ता घरीं गेंगाणें बोलेल परंतु ग्रंथांत एकनाथी, रामदासी किंवा चिपळोणकरीच मराठी लिहील. हीच ग्रंथाची भाषा, नियमानें दरबारची भाषा असते. इंदूरास धनगराचें राज्य आहे व तंजावरास तामिल भाषा आहे; तत्रापि दरबारीं लिहिण्याची व बोलण्याची भाषा ग्रंथकारांची मराठीच असते. ह्मणजे अंत:संमतीनें ज्ञानेश्वर चिपळोणकरादि प्रासादिक ग्रंथकारांची मराठी भाषा महाराष्ट्रानें नागर ठरविलेली आहे. ह्या नागर अथवा ग्रांथिक मराठी भाषेचें ऐतिहासिक व्याकरण देण्याचें प्रस्तुत स्थलीं योजिलें आहे. कोंकणी,

प्रांतिक भाषांत वाङ्मयाभाव

कोल्हापुरी, गंगेरी, खानदेशी, वऱ्हाडी वगैरे प्रांतिक पोटभाषांचेंहि ऐतिहासिक व्याकरण देतां येतें तर उत्तम होतें. परंतु, त्या भाषांत ग्रंथरचना ह्मणण्यासारखी अथवा बहुतेक बिलकुल न झाल्यामुळें व गोमांतकी अपभ्रंशांत जी थोडीशी झाली आहे ती अलीकडील दोन अडीचशे वर्षांतील असल्यामुळें, त्या पोटभाषांचा पूर्वेतिहास अज्ञात राहिला आहे. अर्थात् त्यांचें ऐतिहासिक व्याकरण रचण्याचीं साधनें अस्तित्वांत नाहींत. असतीं तर, नागर मराठीच्या ऐतिहासिक व्याकरणरचनेला कांहींसें साहाय्य होण्याचा संभव होता. मानभावी अपभ्रंशांत जुना ग्रंथसंग्रह निदान पांचशें वर्षांचा तरी आहे. परंतु, त्या लोकांच्या हेकटपणामुळें त्यांचे अत्यंत जुने मराठी गद्यपद्य ग्रंथ अद्याप अप्रसिद्ध राहिले आहेत. तेव्हां त्यांचाहि नागर मराठीच्या ऐतिहासिक व्याकरणाला फारसा उपयोग होण्याचा संभव नाहीं. मानभावांचे दहा वीस गद्यपद्य ग्रंथ यद्यपि छापलेले आहेत, तत्रापि ते सर्व अलीकडील तीनशें वर्षांतील आहेत—अर्थात्, मानभावी अपभ्रंशाचें पूर्वचरित्र कांहीं काल अज्ञात राहणार, असा रंग दिसतो.

शिष्ट व अशिष्ट मराठी

५ नागर ऊर्फ ग्रांथिक ऊर्फ संस्कृत मराठी प्रांतिक ऊर्फ लौकिक ऊर्फ प्राकृत मराठीहून भिन्न असते. तर्खडकर, गोडबोले व जोशी यांनीं जीं व्याकरणें रचिलीं आहेत तीं नागर ऊर्फ संस्कृत ऊर्फ शिष्ट मराठीचीं आहेत; प्रांतिक, लौकिक, प्राकृत, किंवा अपभ्रष्ट मराठीचीं नाहींत. तसेंच हीं तिन्हीं व्याकरणें वर्तमान शिष्ट मराठीचीं आहेत; दोनशें, तीनशें, पांचशें, सातशें किंवा हजार वर्षांपलीकडील शिष्ट मराठीचीं नाहींत. विद्यमानकालीं शिष्ट मराठीचें रूप काय आहे, तें तर्खडकरादि वैय्याकरणांच्या ग्रंथांवरून कळतें; शिष्ट मराठीच्या विद्यमान रूपाची आदिपासून आतांपर्यंतची परंपरा कळत नाहीं. ती कळण्याचा राजमार्ग झटला ह्मणजे शिष्ट मराठीचें ऐतिहासिक व्याकरण होय.

शिष्ट मराठी कृत्रिम नाहीं, सहज आहे.

६ नागर अथवा ग्रांथिक अथवा संस्कृत अथवा शिष्ट मराठी मुद्दाम कोणी बनविली, अशांतला प्रकार नाहीं, हें सर्वांना माहीतच आहे. ती आपोआप बनत आली आहे व शिष्ट ग्रंथकारांच्या ग्रंथांत व उच्च ब्राह्मणादि जातींच्या मुखांत सांप्रत तिचें वास्तव्य आहे. प्रांतिक, प्राकृत किंवा अपभ्रष्ट मराठी अशिक्षित, गांवढळ, व विद्याहीन लोक बोलत असतात, हें

आपण पहातों आणि शिष्टांचें ग्रांथिक बोलणें त्यांना सहज अथवा विशेष श्रम न पडतां कळतें, ही हि रोजच्या अनुभवाची गोष्ट आहे. ग्रांथिक मराठींत कोणत्याहि सकर्मक धातूचीं कर्मीत कर्मीत सुमारें १५०० रूपें होतात व तीं ग्रंथांत शुद्ध ह्मणून योजण्यास कोणतीच हरकत नाहीं. परंतु, ह्या १५०० रूपांपैकीं फारच थोडीं रूपें प्राकृत लोक योजतात. तेवढ्यावरून हीं १५०० रूपें व्याकरणकारांनीं कृत्रिम तऱ्हेनें बनविलीं, असें ह्मणणें वेड-गळपणाचें होईल. हीं सर्व १५०० रूपें भाषेंत शिष्टमान्य आहेत. व ग्रंथांत आढळण्याचा संभव असतो. हीं कशीं बनतात, त्याचे विशिष्ट नियम व्याकरणकार शोधून काढून बसवितात. त्यामुळें, शंकाखोर व अशास्त्रज्ञ तिऱ्हाइतांना तीं कृत्रिम असावीं, असें अज्ञलीलेनें ह्मणावेंसें वाटतें. वैय्या-करणांच्या स्तुत्य व दीर्घ उद्योगाचें अवडंबर पाहून, हे शंकाखोर लोक गांगरून जातात व अवडंबराचें ठायीं कृत्रिमत्वाचा आरोप करण्याचें धाष्टर्य करतात. हा प्रकार इतर शास्त्रांसंबंधानें असाच आढळण्यांत येतो. वनस्पति-शास्त्रांत तांदुळाच्या २००० जाति सांगितलेल्या पाहिल्या, ह्मणजे अतज्ञ इसम आश्चर्यानें गांगरून जाऊन, त्या भयंकर आंकड्यावर विश्वास ठेवीत नाहीं. ही गांवढळ अतज्ञता कित्येक यूरोपियन विद्वानांच्या ठायीं आढळण्यांत आली आहे. यूरोपियन लोक वनस्पतिशास्त्र जितक्या बारकाईनें रचतात, तितक्याच बारकाइनें हिंदू लोकांनीं व्याकरणशास्त्राची रचना केलेली आहे. त्यामुळें पृथक्करणान्तीं त्यांना जे अत्यंत व सूक्ष्म भेद सहज दिसतात ते यूरोपियनांच्या अश्रद्धेचे विषय होतात. बाब अज्ञानोज्रृंभित हेकाडपणाची असल्यामुळें, लक्ष्य देण्यासारखी नसून, नितांत तिरस्करणीय आहे.

**शिष्ट मराठीची ऐतिहासिक [illegible]**

७ शिष्ट मराठीचेंच तेवढें ऐतिहासिक व्याकरण शक्य आहे. कारण असें कीं, गेल्या सातशें वर्षांत प्रौढ व ललित ग्रंथरचना जेवढी ह्मणून झाली तेवढी सर्व शिष्ट मराठींत झाली आहे. गोमांतकी अपभ्रंशांत कांहीं किरिस्तावी धर्मपुस्तकें व पांच चार व्याकरणें झालीं आहेत. परंतु त्यांत एक विचित्रपणा आहे. व्याकरणें ह्मणून जेवढीं झालीं आहेत तेवढीं सारीं पोर्तुगीज [illegible]ा इंग्लिश भाषेंत आहेत आणि इतर पुस्तकांची लिपि [illegible] त्यामुळें संभावितपणा येण्याला जी बद्धमूलता लागते

ती या अपभ्रंशाला मिळाली नाहीं. शिवाय, ह्या अपभ्रंशांत झालेली शुद्ध ग्रंथरचना अगदीं अलीकडली आहे. तशांत, हा अपभ्रंश बोलणारे बाट्ये दहा हजारांहून जास्त नसून, त्यांनीं आक्रमिलेला प्रांत अर्ध्या पाऊण तालुक्याएवढाहि नाहीं. क्याथोलिक मिशनऱ्यांच्या उपद्यापानें हा अपभ्रंश लिपिनिविष्ट आणि तोहि रोमनलिपिनिविष्ट झाला इतकेंच. ह्याहून ह्याला जास्त किंमत नाहीं. कोंकणी पोटभाषेचा हा किरिस्तावी अपभ्रंश आहे. ह्यांतील धर्मपुस्तकें कोंकणांतील हिंदूंच्या वाचण्यांत येत नाहींत, हें सांगावयाला नकोच. त्यामुळें कोंकणांतील पोटभाषेवर किंवा शिष्ट मराठीवर ह्या अपभ्रंशाचा कांहींच परिणाम झालेला नाहीं. पोर्तुगीज राज्य हिंदुस्थानांतून नष्ट झालें तर ह्या अपभ्रंशाचा मागमूसहि रहाणार नाहीं.

**शिष्ट मराठीची सर्वलोकप्रियता.**

८ शिष्ट मराठींत सातआठशें वर्षांपासूनची ग्रंथरचना असून, ती महाराष्ट्रांतील सर्व प्रांतांतल्या व बडोदे, इंदूर, ग्वालेर, बुंदेलखंड तंजावर, गुत्ती, बल्लारी वगैरे सर्व संस्थानांतल्या मराठी लोकांना आदरणीय झालेली आहे. ज्या भाषेंत मुकुंदराज, ज्ञानेश्वर सूर्यज्योतिषी, एकनाथ, रामदास, तुकाराम, मोरोपंत, चिपळो णकर वगैरे प्रासादिक ग्रंथकारांनीं ग्रंथरचना केली ती शिष्ट ? षा महाराष्ट्रांतील सर्व प्रांतांतील व जातींतील लोकांस सारखीच मान्य व्ह [illegible]वी, ह्यांत कांहीं आश्चर्य नाहीं. प्रांतिक बोलणें प्रांतापुरतें व जा[illegible]क बोलणें जातीपुरतें; परंतु ग्रांथिक बोलणें व [illegible] सर्व महाराष्ट्राकरतां आहे. प्रांतिक पोटभाषांच्या लहानसहान लकबा आणि जातिक भाषणांतले बालिश अपभ्रंश ग्रांथिक राजभाषेच्या शिष्ट दरबारांत लुप्त होतात व एकच एक निर्मळ अशी मराठ्यांची मायभाषा देशांतील सर्व लोकांच्या अभिमानाचा, कौतुकाचा व सहज प्रेमाचा विषय होते. मराठ्यांना स्वभाषेचा इतका अभिमान जो वाटतो तो उगाच फुकाचा नाहीं. मराठी भाषेंतल्या शब्दप्राचुर्याची बरोबरी पृथ्वीवरील इतर कोणत्याहि भाषेला करतां यावयाची नाहीं. तसेंच, कोणताहि गूढ किंवा सूक्ष्म अर्थ नाना तऱ्हांनीं यथेष्ट व्यक्त क[illegible] ण्याची तिची शक्ति अप्रतिम आहे. शिवाय अनेक थोर प्रासादिक [illegible] रांनीं तिला आपल्या उदात्त, गंभीर, ललित व रम्य विचारांचें [illegible] असल्यामुळें, तिच्यावरील महाराष्ट्रीयांची भक्ति शुक्लेंदुवत् [illegible] स्थितींत आहे.

**वर्तमान शिष्ट मराठीचें साधें व्याकरण**

९ शिष्ट मराठीच्या सद्यःकालीन रूपाचें वैशद्य करणारी जी नियमसरणी तिला शिष्ट मराठीचें **साधें व्याकरण** ह्मणतात. साध्या व्याकरणाचा शुद्ध मासला झटला ह्मणजे दादोबा पांडुरंग तर्खडकर यांचें मराठी व्याकरण होय. गोडबोल्यांच्या मराठी व्याकरणांत क्वचित् मराठी भाषेचा महाराष्ट्री भाषेशीं व संस्कृत भाषेशीं संबंध दाखविण्याचा स्थूल प्रयत्न केला आहे. रामचंद्र भिकाजी जोशी यांचें Higher Marathi Grammar इंग्रजींत असल्यामुळें व केवळ शालोपयोगी असल्यामुळें, त्याचा नामनिर्देश न केला तरी चालण्यासारखा आहे. जोशी यांच्या व्याकरणांत व्युत्पत्तीचा पूर्ण अभाव आहे. अनेक संस्कृतोत्पन्न व महाराष्ट्र्युत्पन्न शब्दांना ते देश्य समजतात, इतकेंच नव्हे तर, कित्येक अरबी व फारसी शब्दांना हि ते ह्याच मालिकेंत गोंवतात. इतकें अज्ञान ज्या ग्रथांत आढळतें त्या ग्रंथाला विशेष मान देण्याचें कारण दिसत नाहीं. जोश्यांच्या व्याकरणांत मराठी भाषेच्या इतिहासासंबंधानें प्रास्ताविक जो छोटा भाग आहे त्याचें सर्व श्रेय भांडारकरांच्या विल्सन लेक्चरांना आहे. भांडारकरांच्या विल्सन लेक्चरांत जीं व्यंगें आहेत तीं जोश्यांच्या प्रास्ताविक भागांत उतरलीं आहेत, हें सांगावयाला नकोच.

**पोट भाषांचें अथवा बोलींचें तौलनिक व्याकरण**

१० प्रांतिक पोटभाषा व अपभ्रंश ( वर्तमान व भूत ) ह्यांच्या व्याकरणाशीं शिष्ट मराठी भाषेच्या व्याकरणाची तुलना केली असतां, मराठ्यांच्या **पोटभाषांचें अथवा बोलींचें तौलनिक व्याकरण** सिद्ध होतें. असलें औपभाषिक तौलनिक व्याकरण मराठी भाषेंत नाहीं. इंग्रजींत १९०५ पर्यंत नव्हतें. Linguis be survey of India, नामक ग्रंथमालेच्या सातव्या खंडांत असलें व्याकरण रचण्याचीं साधनें मिस्टर ग्रीयरसन् यांनीं नॉर्वेंतील डाक्टर स्टेन् कोनौ यांच्या हस्तें १९०५ त Specimens of the Marathi Language ह्या नांवाखालीं सरकारच्या खर्चानें प्रसिद्ध केलीं आहेत. प्रांतिक पोटभाषा, जातिक पोटभाषा ऊर्फ बोली व अपभ्रंश, असे तीन भाग करून, मासले दिले असते, ह्मणजे ह्या ग्रंथाला जास्त वैशद्य आलें असतें. हें च ह्या ग्रंथाचें मुख्य व्यंग आहे. दर बारा कोसांवर व प्रत्येक जातींत बोली बदलते. ह्या बोलींत कित्येक रूपें व

शब्द इतके पुरातन व चमत्कारिक असण्याचा संभव असतो कीं त्यांच्या साहाय्यानें मुख्य मराठी भाषेतील कित्येक रूपांची व शब्दांची परंपरा ओळखतां येते.

**आधुनिक सगोत्र समकालीन भाषांचें तौलनिक व्याकरण.**

११ बंगाली, हिंदी, आवंढी, पंजाबी, सिंधी, गुजराथी वगैरे आधुनिक सगोत्र प्राकृतोद्भव शिष्ट भाषांच्या व्याकरणांशीं शिष्ट मराठी भाषेच्या व्याकरणाची तुलना केली असतां, **आधुनिक प्राकृतोद्भव समकालीन भाषांचें तौलनिक व्याकरण** सिद्ध होतें. प्रत्येक भाषेतील गूढें इतर सगोत्र भाषांच्या तुलनेनें सहज उकलतात, हा तौलनिक व्याकरणापासून पहिला फायदा आहे. शिवाय, आर्यभाषा कोणत्या, अनार्य कोणत्या, हें वर्गीकरण तौलनिक व्याकरणानें सुलभ होतें. आधुनिक प्राकृतोद्भव भाषांचें तौलनिक व्याकरण मराठी भाषेत अद्याप रचलें गेलें नाहीं. इंग्रजींत असलीं दोन व्याकरणें आहेत:—(१) Beams' Comparative Grammar of the Modern Aryan Languages of India (1872–1879); आणि (२) Hoernle's Grammar of the Gaudian Languages (1880). दोन्हीं व्याकरणें व्युत्पत्तीच्या कामांत ऐतिहासिक बाजूनें लंगडीं आहेत. कां कीं, इ. स. १८८० पर्यंत आधुनिक प्राकृतोद्भव [मराठी वगैरे] भाषांतील जुना ग्रंथसंग्रह व्हावा तितका प्रसिद्ध झाला नव्हता व जो झाला होता तो यथास्थित समजण्याची ऐपत दोघांची हि नव्हती. ह्याप्रमाणेंच, १८८० पुढील पंचवीस वर्षांत प्राकृत भाषांची [महाराष्ट्री, मागधी वगैरे] जी बारीक छान व पृथक्कृति जर्मनींत झाली ती बीम्स व होर्न्ले यांच्या कालीं झाली नसल्यामुळें आधुनिक प्राकृतोद्भव भाषांचें वर्गीकरण करण्यांत दोघे हि तोंडघशीं पडलेले आहेत. शिवाय, बीम्सला संस्कृत व प्राकृत भाषांचें व्याकरण यथातथाच माहीत होतें, असें दिसतें. होर्न्लेचा बहुतेक सगळा भर पुरभई भाषेवर असून, इतर भाषांकडे तो ओझरतें लक्ष देतो. बीम्सच्या ग्रंथांत दूसरा एक अपूर्व व अक्षम्य अथवा गांवढळ दोष आहे. तो हा कीं, ठाईं ठाईं रागद्वेषादि विकारांचें अप्रस्तुत प्रदर्शन हा ग्राम्य ग्रंथकार करतो. मराठे लोक व मराठी भाषा यांच्यावर त्याचा कटाक्ष विशेष आहे. एक मासलेवाईक उतारा ह्या ग्रंथ-

काराचें मनोगत कळण्यास पुरें आहे. आपल्या व्याकरणाच्या पहिल्या खंडाच्या ११० व्या पृष्ठावर हा ग्रंथकार येणें प्रमाणें लिहितोः—

"Even after seventy years of British rule, the country ( Orissa ) still bears the traces of the rapacity and oppression of the Marathas. the Oriyas had to learn the language of their conquerors and a few Marathi words have passed into their language. The Bhosla's tanks, roads, bridges, and dykes are still in existence and are constructed on a princely scale, as they were not hampered with any scruples about paying their workpeople. This *little* point should be remembered by those who reproach the English for the inferiority of their public works. Whatever we (English) do is *paid for*.

भोसल्यांच्या वेळीं आंवळ्यातले लोक पोटें बांधून कामें करीत होते !!! ह्या दोन ग्रंथकारांखेरीज, भागवती बोलीवर वेबर, सिंधी भाषेवर ट्रंप, वगैरेनीं कांहीं निबंध लिहिलेले आहेत.

**शिष्ट मराठी भाषेचें ऐतिहासिक व्याकरण.**

१२ शिष्ट मराठी भाषेतील स्वर, वर्ण, शब्द, प्रत्यय, व अव्ययें ह्यांचीं आदिपासून ह्मणजे मराठी भाषेच्या उत्पत्तीपासून आतांपर्यंत रूपें कसकशीं होत गेलीं आहेत, ह्याचें उद्घाटन शिष्ट मराठीच्या ऐतिहासिक व्याकरणांत केलेलें असतें. ह्या व्याकरणालाच मराठी भाषेची व्युत्पत्ति, शब्दसिद्धि, निरुक्ति वगैरे नामान्तरें आहेत. कोणत्या हि भाषेचें ऐतिहासिक व्याकरण तयार व्हावयाला, त्या भाषेतील आदिपासून आतांपर्यंत बराच, निदान कामापुरता तरी, ग्रंथसमूह किंवा लेखसोपान सांपडला पाहिजे. त्याच्या अभावीं व्युत्पत्तीचें काम केवळ कल्पनेवर चालेल. तसेंच, नुसती लेखपरंपरा सांपडून ह्मणण्यासारखें कार्य होत नाहीं; तर, ती लेखपरंपरा त्या त्या कालची अस्सल पाहिजे. अशी लेखपरंपरा व ग्रंथसंपत्ति ज्या भाषेची उपलब्ध होते,

तिची निरुक्ति, किंवा व्युत्पत्ति किंवा ऐतिहासिक व्याकृति सुकर व निश्चित होते. बीम्स व होर्न्ले ह्यांनी आधुनिक प्राकृतिकोद्भव भाषांचें तौलनिक व्याकरण लिहितांना ऐतिहासिक व्याकरणाच्या प्रांतांत हि अतिक्रम करण्याचा आव घातलेला आहे. ह्मणजे ह्या दोघां वैय्याकरणांनीं रचलेलीं व्याकरणें तौलनिक व ऐतिहासिक अशीं मिश्र आहेत. तौलनिक व्याकरण व ऐतिहासिक व्याकरण असा दिक्कालावच्छिन्न द्विधा भेद त्यांच्या ध्यानांत आलेला नाहीं, हें खरें आहे. परंतु त्यांच्या हातून असा मिश्र प्रकार झालेला आहे, हें सहज ओळखतां येतें. बीम्स व होर्न्ले ह्यांचा मुख्य गुरु जो बॉप्प त्यानें हि आपल्या व्याकरणाला तौलनिक ह्मटलें आहे. कालदृष्ट्या अर्वाचीन व प्राचीन आणि दिग्दृष्ट्या राष्ट्रीय, प्रांतिक व अपभ्रष्ट अशा सर्व भाषांचा परामर्श घेण्याचा बॉप्प्चा मनोदय होता. ह्मणजे समकालीन व भिन्नकालीन भाषांची तुलना करण्याचा त्याचा विचार होता. मराठी, बंगाली, हिंदी, आंबडी, पंजाबी, सिंधी, गुजराथी वगैरे भाषांतील पुराण ग्रंथसंग्रह त्यांच्याकालीं अनुपलब्ध असल्यामुळें, बीम्स व होर्न्ले ह्यांचा व्युत्पत्तीचा भाग बराच अपुरा व काल्पनिक राहिलेला आहे. आधुनिक प्राकृतिकोद्भव भाषांचें मूळ ज्या प्राकृत भाषा त्यांची भेट मंडुकप्लुतीनें घेण्याशिवाय दुसरें गत्यंतर ह्या दोन्ही वैय्याकरणांना राहिलें नाहीं. मराठीतील एखाद्या आधुनिक शब्दाची किंवा प्रत्ययाची पूर्वपरंपरा पहाण्याची इच्छा झाल्यास, त्यांना एकदम प्राकृताच्या घाटावर जावें लागतें, मध्यें विसावा घेण्यास जागा सांपडत नाहीं. ह्मणजे महाराष्ट्री, शौरसेनी, मागधी, अपभ्रंश वगैरे प्राकृत भाषा व मराठी, बंगाली वगैरे प्राकृतिकोद्भव भाषा ह्यांची वस्तुतः ते तुलना करीत असतात. प्राकृत भाषांचा अंत व सध्यांचा काळ ह्या दोहोंमधील हजारबाराशें वर्षांत रूपांची कशी घडामोड झाली, हें त्यांना माहीत नसतें. त्यामुळें, संशयस्थानीं अशी व्युत्पत्ति असेल किंवा असावी, असें संशयित समाधान करून घेण्याशिवाय त्यांना दुसरी तोड राहिली नाहीं.

कृष्णशास्त्री गोडबोले यांनीं रचलेल्या मराठीच्या साध्या व्याकरणांत मराठीच्या रूपांचा महाराष्ट्रीच्या रूपांशीं संबंध दाखविण्याचा अल्पस्वल्प प्रयत्न केलेला आहे; आणि बीम्स व होर्न्ले यांच्या प्रमाणेंच त्यांचा प्रयत्न प्राचीन ग्रंथसंग्रहाच्या अभावीं लंगडा पडलेला आहे. डाक्टर भांडारकर यांनीं विल्सन लेक्चरांत आधुनिक प्राकृतिकोद्भव भाषा व प्राकृत भाषा ह्यांच्या संबंधासंबंधानें कांहीं विवेचन केले आहे. त्यांत बीम्स वगैरे सारख्यांच्या कांहीं

कृत्या नानी सोडल्या आहेत. डाक्टरांनीं स्वतंत्र ऐतिहासिक व्याकरण रचण्याचा आव घातलेला नसल्यामुळें, त्यांचीं विद्वत्ताप्रचुर व्याख्यानें प्रस्तुत स्थलीं टीकेचा विषय होऊं शकत नाहींत. तात्पर्य, सांगण्याचा मुद्दा एवढाच कीं, मराठी भाषेचें ऐतिहासिक व्याकरण अद्याप रचावयाचें आहे. कोणत्या हि युरोपियन भाषेंत किंवा आधुनिक प्राकृतिकोद्भव भाषेंत तें अद्याप रचलेलें नाहीं. त्या रचनेच्या साहाय्यार्थ ज्ञानेश्वरीची प्रस्तुत आवृत्ति काढिली आहे.

**मराठी भाषेचा इतिहास**

१३ गेल्या पंचवीस वर्षांत आणि विशेषतः गेल्या दहा वर्षांत मराठी भाषेतील पुरातन वाङ्मयाचा व सारस्वताचा संग्रह व प्रकाश इतका विलक्षण झाला, कीं **शिष्ट मराठी भाषेचा इतिहास** व **शिष्ट मराठी सारस्वताचा इतिहास** रचतां येणें सध्यां बरेंच सुगम झालें आहे. त्यांत विशेष महत्वाची बाब ही कीं शक ४०० पासून शक १८०० पर्यंतचें मराठी ताम्रपट व शिलालेख सांपडून प्रसिद्ध झालेले आहेत. ताम्रपट व शिलालेख . . प्रमाणेंच जुन्या अस्सल हस्तलिखित पोथ्या हि शेंकडोंनीं सांपडल्या आहेत. त्यामुळें मराठी ग्रंथकारांची कालनिर्णीति व पूर्वापरता ठर ण्याचें काम बरेंच सुकर झालें असून, मराठी सारस्वताचें स्वरूप यथास्थित कळण्यास हि उत्तम मार्ग झाला आहे. मरा० भाषेचे व प्रयोगांचे गद्यपद्य रूप आदिपासून आतां पर्यंत कसकसें होतें त्याचा परंपरित प्रपंच **मराठी भाषेच्या इतिहासांत** केलेला असतो.

**मराठी सारस्वताचा इतिहास.**

आणि मराठी भाषेतील आद्य ग्रंथापासून आधुनिक ग्रंथापर्यंतच्या ग्रंथसंग्रहाच्या आंतर व बाह्य स्वरूपाचें कालानुक्रमिक व विषयानुक्रमिक जें विवेचन व वर्णन त्याला **मराठी सारस्वताचा इतिहास** म्हणतात. मराठी **भाषेच्या** इतिहासाला

**मराठी वाङ्मयाचा इतिहास.**

मराठी **वाङ्मयाचा** इतिहास म्हटलें असतां हि अंशतः शोभण्यासारखें आहे. कारण, **भाषेंत** जें जें म्हणून बोललें जातें किंवा लिहिलें जातें तें तें सर्व **वाङ्मय** होय. वाङ्मयांत सारस्वताचा समावेश होतो. बरी वाईट ही छान वाङ्मयांत

**सारस्वत.**

नसते. ती निवड **सारस्वत** करतें. उदार, ललित, अभिजात व नागर गद्यपद्य बंध जो निर्माण होतो त्याला **सारस्वत** अशी अनन्यसामान्य संज्ञा आहे. गणित, ज्योतिष, रसायन, वानस्पत्य,

**शास्त्रीय व कलात्मक ग्रंथ समूह.** प्राणिजात, तर्क, न्याय, वेदान्त, कृषि, शिल्प वगैरे शास्त्रांवर व कलांवर जो ग्रंथसमूह निर्माण होतो, त्याला **सारस्वत** ही संज्ञा नाहीं. त्याला त्या त्या विषयावरील शास्त्रीय किंवा कलात्मक **ग्रंथसमूह** म्हणून सार्थच नांव देतात. गद्य-

**साहित्य** पद्य सारस्वतप्रबंध ज्यांच्या साहाय्यानें तयार होतात त्या छंद, अलंकार, व्याकरण, कोश वगैरे ग्रंथांना **साहित्य** असें नामाभिधान आहे. साहित्य हें सारस्वत नव्हे; सारस्वताचें तें उपकरण आहे.

**पद्धतिग्रंथ** शास्त्रग्रंथांशीं तर्कादिपद्धतिग्रंथांचा जो संबंध तोच सारस्वताशीं साहित्याचा आहे. साहित्य सारस्वताची पद्धति होय.

गोडबोले (१८६६), बीम्स (१८७२), हॉर्न्ले (१८८०), ग्रियर्सन (१९०५) वगैरे मराठी भाषेचे मराठी व इंग्रजी वैय्याकरण गेल्या दहा वर्षांत झालेल्या शोधांमुळें इतके मागें पडले आहेत कीं मराठी भाषेच्या उत्पत्तीसंबंधानें, ग्रंथसंग्रहासंबंधानें वृद्धिसंबंधानें व स्वभावासंबंधानें त्यांचीं मतें तज्ज्ञांना फारच मागसलेलीं वाटण्याची निश्चिति आहे. ह्याचा तपशील पुढें त्या त्या स्थळीं दिला आहे.

**मराठी सारस्वताच्या** शोधामुळें, **मराठी सारस्वताचा इतिहास** तर सुकर झालाच; परंतु त्याबरोबर **मराठी भाषेचा इतिहास** व **मराठी भाषेचें ऐतिहासिक व्याकरण** हीं सहजासहजीं सुकर झालीं. तिन्हीं प्रांत अन्योन्याश्रयी असल्यामुळें, एकाच्या शोधाबरोबर इतरांचाहि इतिहास व स्वरूप कळणें अपरिहार्य होतें.

**मराठी सारस्वताचा** जसा जारीनें शोध झाला तसा **मराठी वाङ्मयाचा** अद्याप मुळींच झाला नाहीं. प्रांतिक, जातिक, अपभ्रष्ट अशा लोककथा, दंतकथा, गाणीं, पवाडे, लावण्या, म्हणी, वगैरे वाङ्मय असल रूपानें शोधून काढावयाचें अद्याप राहिलेंच आहे.

**शिष्ट मराठीच्या ऐतिहासिक व्याकरणाच्या रचनेची सामग्री**

१४ मराठी भाषेचें सारस्वत व विशेषतः ताम्रपटीय व शिलालेखीय वाङ्मय अलीकडे जसजसें सांपडूं लागलें तसतशी मराठीच्या ऐतिहासिक व्याकरणाची शक्यता उत्तरोत्तर संभाव्य होऊं लागली. आजपर्यंत ऐतिहासिक व्याकरणाला उपयुक्त असे जेवढे जुने लेख उपलब्ध व प्रकाशित झाले आहेत त्या सर्वांची याद खालीं देतों:—

( १ ) शक ४१०.तील मंगळवेढें येथील मराठी ताम्रपट [ प्रभात, धुळें. ]

( २ ) शक ६५८ तील चिकुर्डे येथील मराठी ताम्रपट [ विश्ववृत्त, कोल्हापुर ]

( ३ ) शक ६०२ पासून शक १२०० पर्यंतच्या महाराष्ट्रांतील व कोंकणांतील ताम्रपट व शिलालेख यांतील मराठी शब्द [ इंडियन, आंटिक्करी, एपिग्राफिया इंडिका, एपिग्राफिया कर्नाटिका, वगैरे]

( ४ ) शक ९०५ तील चामुंडरायाचा मराठी शिलालेख [ विश्ववृत्त.]

( ५ ) शक १०५१ तील अभिलषितार्थचिंतामणींतील मराठी पदें [ अभिलषितार्थचिंतामणीच्या दोन पोथ्या डेक्कन कालेजांतील संग्रहांत आहेत; व एक पोथी तंजावरातील सरस्वतीमहालांत आ॑. विश्ववृत्त. ]

( ६ ) शक १०३७–१०४० तील लेख [ Epi. Md. Vol I. pp 343 and f.]

( ७ ) शक ११०९ तील परळ येथील मराठी शिलालेख [ इंग्रज सरकारी बंगल्यांतील ]

( ८ ) शक ११२८ तील पाटण येथील मराठी शिलालेख [ प्रभात ]

[ ८अ] शक ११३०–११५० चंदकृत पृथिराजरासउ [ ब्रज, नागरीप्रचारणी सभेची छापील प्रत अविश्वसनीय ]

( ९ ) शक ११९५–९८ तील पंढरपूर येथील चान्यायशीचा मराठी शिलालेख [ ग्रंथमाला ]

११८२ तील कालिदासाच्या रघुवंशावरील हेमाद्रीच्या टी-

( १० ) शके ११८२ ची शब्द [ नंदर्गीकरांचा रघुवंश ]

केत आलेले मराठी [ मजजवळील प्रस्तुत पोथी मुकुंद-

( ११ ) शक १२१२ तील ज्ञा...

राजाची आहे. ] ...शांतील मराठी उतारा [ मरा-

( १२ ) शक १२७८ तील परशुरा... ८, प्रस्तावना ].

ठ्यांच्या इतिहासाचीं साधनें

( १३ ) शक १३११ तील वेंगुर्ल्याजवळील मठ येथील मराठी शिला-लेख ( म. इ. सा. खं. ८. प्र. )

( १४ ) शक १२३३ तील पंढरपूर येथील चोखामेळ्याचा शिलालेख ( ग्रंथमाला )

( १५ ) शक १२८९ तील नागांवें येथील मराठी शिलालेख ( ग्रंथ-माला )

( १६ ) शक [ सुमारें ] १३०० मधील पंचतंत्र [ महाराष्ट्रकवि ]

( १७ ) शक १३०० मधील मराठी कोकशास्त्र [ प्रभात ]

( १७ अ ) शक १३१६ तील मुग्धावबोधमौक्तिक [ गुजराथी ] ध्रुव-संपादित.

( १८ ) शक १४११ तील मिरजेच्या किल्याचा मराठी मोडी ताम्रपट [ ग्रंथमाला ]

( १९ ) शक १४५२ व शक १४६३ तील वाइ येथील दोन मराठी मोडी ताम्रपट [ विश्ववृत्त ]

( २० ) शक १४९४ तील मंगळवेढें येथील मराठी शिलालेख ( ग्रंथ-माला )

( २१ ) शक १५२५ तील [ सुमारें ] दासोपंतांचीं पदें व गीता ( महाराष्ट्रसारस्वत व महाराष्ट्रकवि )

( २२ ) शक १४९७ तील खानदेशांतील सोनगीरच्या किल्यावरील शिलालेख [ ग्रंथमाला ]

( २३ ) मराठीतील अनुनासिकाची पूर्वपरंपरा [ निबं-

( २४ ) मराठीतील ' ल ' प्रत्यय [ निबंध - ... दालेखीव

वळतशी मरा-

( २५ ) मराठी छंद [ निबंध, सर शक्यता उत्तरोत्तर सं-

( २६ ) शक १३१६ तील ऐतिहासिक व्याकरणाला

उपलब्ध व प्रकाशित झाले

[ सरस्वतीमंदिर झाली देतों:—

( २७ ) मराठी शब्दांची

( २८ ) स्टेफेन्स कृत इ. स. १६४९ तील कोंकणीअपभ्रंशांत उच्चारलेलें व रोमनलिपींत लिहिलेलें [ छापलेलें नव्हे ] ख्रिस्त पुराण [ मंगलोर येथें इ. स. १९०७ त रोमन लिपींत छापलेलें ]

( २९ ) इ. स. १५७२ तील मराठी–फारशी ( म. इ. सा. खं १ लेखांक १ ) लेख.

( ३० ) शक १४६३ व १४७९ तील लिंब येथील दोन मराठी पत्रें ( म. इ. सा. खं. ८, प्रस्तावना )

गेल्या पांच वर्षांत इतके जुने मराठी लेख उदयास आलेले आहेत. त्यांत अपभ्रष्ट मराठी, कोंकणी मराठी, खानदेशी मराठी व शिष्ट मराठी, ह्या चारींचे लहान मोठे मासले आलेले आहेत. शिवाय, दुर्गादेवीच्या दुष्काळाच्या फर्मानांत मुसलमानी -मराठी अपभ्रंश अथवा मराठी--पिशाच भाषा इचा मासला पहावयास सांपडतो. स्टेफेन्सच्या ख्रिस्तपुराणांत कोंकणी—पिशाची चा मासला आढळतो. स्टेफेन्सनें दासोपंत व जनार्दन यांचे प्रौढ शब्द गोव्याच्या कोंकणी–पिशाचींत गोंविले आहेत. इ. स. १६४९ तील स्टेफेन्स इ. स. १५०० तील किंवा त्याहून हि जुनी भाषा लिहितो. असें होणें साहजिक होतें. ज्ञानेश्वर, मुकुंदराज, नामदेव, दासोपंत, गंगाधरसरस्वती, वगैरे शिष्ट ग्रंथकारांचे ग्रंथ वांचून, स्टेफेन्स शिष्ट मराठी शिकला व तिच्यांत कोंकणी–पिशाचीची भेसळ करून त्यानें आपलें पुराण निर्मिलें. अर्थात्, इ. स. १५०० तील ग्रांथिक शिष्ट मराठी भाषा त्याच्या आंगवळणी पडली. परभाषेसंबंधानें असा चमत्कार होणें अप-

आहे. ह्या फर्क. स. १८८० तील कुंटे इ. स. १७४० तील पोपची

व्हायें आहे. काव्यांत वापरतो; आणि १७२० तील आडि-

( १० ) शकचा श्री विष्णु पूळूणकर १८८० त ज्ञानप्रकाशांत लिहितो.

केत आलेले मराठी ग्रंथावरून शिकावी लागते; आणि ज्या

( ११ ) शक १२१२ तील ज्ञाने कालची शिष्ट भाषा तो सहज नक्क-

राजाची आहे. ]

( १२ ) शक १२७८ तील परशुरामोपदे

त्यांच्या इतिहासाचीं साधनें, खंड

**मराठी भाषेचा मूलारंभ: शक सुमारें ४००**

१५ वरील सर्व लेखांत अत्यंत जुना मराठी लेख शक ४१० तील आहे. अर्थात्, शक ४१० त मराठी भाषा बनून कांहीं काल गेला होता. आजपर्यंत इ. स. १३००, इ. स. १०००, इ. स. ९००, इ. स. ७०० वगैरे सन मराठीच्या मूळारंभाचे यूरोपियन लोक देत असत. परंतु, ते मराठीला इतकी अलीकडे ओढण्यांत मोठी भयंकर चूक करीत हें आतां सिद्ध आहे. हिंदुस्थानांतील प्रत्येक वस्तु वस्तुत: असेल त्याहून बरीच अर्वाचीन भासविण्याची खोड बहुतेक सर्व यूरोपियनांना सारखी च आहे. खोडीचें कारण उघड आहे. हिंदुस्थानांतील अनेक वस्तूंचा इतिहास, परं-

**यूरोपियनांचें मात्सर्य व करंटलक्षण.**

परा, पुरातन निर्देश यांची माहिती ह्या लोकांना प्राय: तुटपुंजी व बरबर असते. शिवाय, यूरोपीयन वस्तूपेक्षां एखादी प्राचीन भारतीय वस्तू अर्वाचीन आहे, असें ठरवितां आलें तर स्वपितरांना पाहिल्याचा आनंद ह्या लोकांना होतो. निदान, भारतीय वस्तू यूरोपियन वस्तूहून फार प्राचीन नाहीं, इतकें तरी ह्मटल्या शिवाय त्यांना समाधान वाटत नाहीं. ह्या मात्सर्याला काय ह्मणावें ! यूरोपांतील तीन चारशें वर्षांतल्या उपटसुंभ राष्ट्रांना भारतवर्षाच्या थोर, पौढ व संभावित पुरातनत्वाचा हेवा वाटतो, हें त्यांच्या लघु मनाचें द्योतक आहे. बकाल करंट्यांना गर्भश्रीमंताचा हेवा वाटावा, ह्यांत कांहीं नवल नाहीं ! शास्त्रीय शोधांत मात्सर्याचा आवेश आणणें मायावी असुरांना हि लज्जास्पद होय. भांडारकर, तेलंग व नाना पावगी ह्यांचें हि मत एतत्प्रकरणीं माझ्यासारखें च आहे.

**बीम्स्**

बीम्सनें हिंदी गुजराथी व पंजाबी यांचा प्रारंभ ...व, ग्रंथमाला ]
...व्या शतकांत, मराठीचा प्रारंभ १३ ..., ...वृत्त ]
प्रारंभ चौदाव्या शतकांत व बंग... ...तीमंदिर हैं मासिक पुस्तक ]
अठराव्या शतकांत घातला आहे! शक ...देवीच्या दुष्काळाचा मराठी फर्मान
तार्थचिंतामणींत, हिंदी, लाटी, बंगा...
त्तांत मीं छापिलीं आहेत.

...व्युत्पत्ती [ ग्रंथमाला व सरस्वतीमंदिर ]

**मराठी भाषेची गर्भावस्था शक१५०--शक ४०० पर्यंतचें अराजक.**

१६ सुमारें शक १५० पासून शक ४०० पर्यंत महाराष्ट्रांत भयंकर अराजक माजलें [ Bhandarkar's Dekkan, Section IX] ह्या अराजकाच्या अमदानींत शिष्ट महाराष्ट्री भाषा लोपत जाऊन, शक ४०० च्या सुमारास मराठी भाषा बनली गेली. शातवाहन राजांच्या तीनशें वर्षांच्या राजवटींत [ शकपूर्व १५० -शक १५० ] महाराष्ट्री भाषेंत विपुल सारस्वत झालें. शातवाहन राजांना संस्कृतापेक्षां महाराष्ट्री प्राकृत जास्त परिचित होती. "मोदकैः परिताडय मां" वगैरे कोट्या शातवाहनांच्या संबंधानें प्रसिद्ध आहेत. शातवाहनांच्या अमलांत शिलालेखांची भाषाहि प्राकृत च असे. शातवाहनांच्या राज्यितीनंतर तीनशें वर्षें जें अराजक माजलें त्यांत महाराष्ट्रीचा लोप झाला; ह्मणजे महाराष्ट्री भाषेचा पुरस्कर्ता असा कोणी सम्राट् राहिला नाहीं. शक ४००च्या सुमाराला मराठी भाषा देशांत प्रचलित होऊं लागली. परंतु, महाराष्ट्रीची मान्यता मराठीला, अर्थात् च, नावीन्यामुळें मिळाली नाहीं. त्यामुळें, शिलालेख व ताम्रलेख बहुतेक सर्व संस्कृत भाषेंत होऊं लागले. अशोकाच्या कालापासून शातवाहनांच्या अंतापर्यंत [ शकपूर्व ३००–शक १५० ] महाराष्ट्री, पाली, वगैरे प्राकृतांत लेख लिहिले जात ते शक ४०० नंतर संस्कृतांत लिहिले जाऊं लागले [ Bhandarkar's Dekkan, Section IX ] अशी टीका डा. भांडारकरांनीं केलेली आहे. ह्या फरकाचें कारण, मात्र, त्यांनीं दिलेलें नाहीं. जुनी महाराष्ट्री बुडा-
रिहायें आहे. मराठी शिष्ट गणली जात नव्हती; सबब, संस्कृताचा उप-
इंग्रजी भाषा ऋषिनामक ...स्त होऊं लागला. मराठीचा अगदींच उपयोग
सनचें इंग्रजी विष्णु शास्त्री चि... उपयोग होत होता, हें शक ४१०तील मरा-
कोणती हि शिष्ट भाषा परदेशस्थाल... ना संस्कृत समजे त्यांच्याकरितां संस्कृत
कालचे ग्रंथ त्याच्या हातांत पडतील त... कालीन लौकिक भाषा जी मराठी ती
लण्याचा प्रयत्न करतो.

३

१७ शक १५८ पासून तत्पूर्वी १५०० वर्षं प्राकृत भाषा [पाली-महाराष्ट्री-शौरसेनी-मागधी-पैशाची] आर्यावर्तांत प्रथम (B. C. 1500-700) अशिक्षित लोकांत व नंतर (B. C. 700-A. D. 200) शिष्ट लोकांत चालू होत्या असें दिसतें. कारण, शकापूर्वी एक हजार वर्षांचे प्राकृत किंवा पाली लेख नुकते च सांपडलेले आहेत. सर्वांत आपल्याला माहीत असलेली अशी अत्यंत जुनी प्राकृत भाषा म्हटली म्हणजे जीस पालि, पाळि किंवा पाली, पाळी म्हणतात ती होय. पालि प्राकृत भाषा आहे, असें सार्वत्रिक मत आहे. उदाहरणार्थ, मोशे व्हिक्टोर Henry आंत्री आपल्या पाली व्याकरणांत असें च मत प्रतिपादितो. (Le Pali est une langue pracritique Grammaire Palie, p. 2, 1904 A. D.)

पाली वगैरे प्राकृत भाषा शकपूर्व १५०० पासून शकोत्तर १५० पर्यंत चालल्या.

पाली ह्या शब्दाची व्युत्पत्ति अनिश्चित आहे, असें व्हिक्टोर आंत्री म्हणतो (Grammaire Palie, p. I,) ड व ल ह्यांच्या अभेदासंबंधानें लिहितांना, आपल्या व्याकरणाच्या ५६ व्या कलमांत पठ्, वाचणें, या धातूपासून पालि शब्द निघाला असल्यास, पठित=पढिअ=पडिअ=पलिअ=पालिअ=पालि अशा परंपरेनें तो निष्पन्न व्हावा, अशी सूचना आंत्री करतो. ह्या परंपरेंत प चा पा कसा झाला व अंत्य अ चा लोप काय कारणानें झाला, तें सांगणें दुरापास्त आहे. ह्याच व्याकरणाच्या १७४ व्या पृष्ठावर, पालि म्हणजे लिहिण्याची ओळ, पंक्ति, पाठ असा अर्थ तो देतो व त्यावरून भाषेला पालि हें नांव पडलें असावें, असें सुचवितो. परंतु, एकंदरींत पालि या विशिष्ट भाषार्थक शब्दाची व्युत्पत्ति आपल्याला निःसंदेह माहीत नाहीं, असें हा वैय्याकरण प्रांजलपणें नमूद करतो. हिब्रू भाषेला बायबल भाषा असें नांव देणें जितपत योग्य आहे तितपतच बौद्धांच्या पवित्र ग्रंथांच्या भाषेला पालि भाषा हें नांव देणें योग्य आहे, अशी हि टीका ह्या वैय्याकरणानें केली आहे. (Dire "le pali", c'est donc exactement comme si l'on disait "la Bible" pour "l'hébreu". Grammaire Palie, page I.) सारांश, पालि शब्दाची खात्रीलायक व्युत्पत्ति आपल्याला माहीत नाहीं, असें आंत्री म्हणतो. मोशे आंत्रीचा विशेष उल्लेख करण्याचें कारण असें कीं,

ह्या फ्रेंच वैय्याकरणानें आपलें पालि भाषेचें व्याकरण इ. स. १९०४ त लिहिलें आहे. ह्मणजे १९०४ पर्यंत पालि या शब्दाची व्युत्पत्ति यूरोपांत माहीत नाहीं, हें उघड आहे. माझ्या मतें,

पाली शब्दाची युत्पत्ति

पाली शब्दाची व्युत्पति येणें प्रमाणें:—

प्रकट=पाअड=पाअल=पाल.

पाल शब्दाचें स्त्रीलिंग पाली अथवा पाळी प्रकट अथवा पाली भाषा ह्मणजे ती कीं जी सामान्य लोकांत प्रचलित असते. डलयोरभेद= । आडविकं=आलविकं, आळविकं.

पाली तीच पालि; जसें मती-मति इ. इ. इ.

एवंच, पाली, पालि, पाळी किंवा पाळि भासा ह्मणजे सहज ये॰ किंवा प्रकट भाषा होय. प्रकट भाषा ह्मणजे मूळ जन्म भाषाबौद्धांचें ग्रे ज्या मूळ भाषेंत लिहिले तिला सिंव्हलद्वीपांतील लोक पाली भाषा किंवा मूळ भाषा ह्मणूं लागले. ह्याहून ह्या शब्दांत जास्त गूढ नाहीं. बुद्ध जी भाषा बोलला त्या भाषेला सिंहली लोक भक्तीनें व अभिमानानें पाली अथवा मूळ भाषा ह्मणतात— परंतु, पाली ही मूळ भाषा नसून, ती जिच्यापासून निघाली अशी तिच्याहून हि जुनी भाषा दाखवून देतां येते. ब्राह्मणांतील जी संस्कृत भाषा ती हीं भाषा होय. हिला च डा. भांडारकर Middle Sanskrit किंवा पाणिनीय संस्कृत भाषा ह्मणतात:— Weber, Victor Henry वगैरे लोक हिलाच " ancetre inconnu " ह्मणजे " अज्ञात पूर्वज " ह्मणतात. डा. भांडारकर जिला Classic संस्कृत ह्मणतात तिला Weber वगैरे यूरोपियन लोक पाणिनीय संस्कृत चुकीनें समजतात, इतकेंच पाली भाषा Classic संस्कृताची ह्मणजे शिष्ट संस्कृताची पुत्री नसून भगिनी आहे, असें हे लोक वस्तुत: ह्मणतात; परंतु, पाली Middle संस्कृताची ह्मणजे पाणिनीय संस्कृताची छाया व Vedic संस्कृताची ह्मणजे आर्ष संस्कृताची स्नुषा आहे, हें [ १ ] आर्ष भाषा, [ २ ] पाणिनीय भाषा, व [ ३ ] संस्कृत भाषा अशा तीन पायाऱ्या त्यांच्या लक्षांत आणून दिल्या ह्मणजे, त्यांना तेव्हां च पटेल, असें वाटतें. पालीची परंपरा अशी आहे:—

| | ग्रंथकार वै व्याकरण इ. इ. | भाषा | छाया | |
|---|---|---|---|---|
| शकपूर्व ६०००--३००० | मंत्रद्रष्टे | आर्ष भाषा ऊर्फ old Sanskrit | तुरळक अपभ्रष्ट उच्चार | |
| शकपूर्व ३०००--१५०० | पाणिनि | पाणिनीय भाषा ऊर्फ Middle Sanskrit | पाली भासा उर्फ प्राकृती भाषा ऊर्फ प्रकृटी भाषा | शकपूर्व १५०० –६०० |
| शकपूर्व १५००-५०० | कात्यायन | संस्कृत भाषा ऊर्फ Classic Sanskrit | महाराष्ट्री, वगैरे प्राकृत भाषा | शकपूर्व ६०० शकोत्तर १५० |
| शकपूर्व ५०० शकोत्तर १८२९ | शेकडों ग्रंथकार | कृत्रिम संस्कृत | मराठी वगैरे प्राकृतिक भाषा | शकोत्तर ४०० शकोत्तर १८२९ |

**पाली भासा पाणिनीय भाषेची छाया आहे; आणि महाराष्ट्री भाषा संस्कृत भाषेची छाया आहे.**

वरील वृक्षावरून डा. भांडारकरांचें ह्मणणें स्पष्ट व्हावेंसें वाटतें. युरोपीयन लोक daughter, grand-daughter, mother, sister, वगैरे शब्द योजून व्यर्थ घोटाळ्यांत पडतात व अभिमानाला किंवा दुरभिमानाला पेटतात. ते जर " छाया " हा शब्द योजतील तर पुष्कळ गैरसमज दूर होईल. पाणिनीय भाषेची पाली भासा ही छाया आहे आणि संकृत भाषेची महाराष्ट्री भाषा छाया आहे, असें भांडारकरांचें ह्मणणें आहे. आणि तें अगदीं बरोबर

आहे. पाणिनीय भाषा शिष्ट लोक बोलत आणि पाली भासा शिष्टेतर लोक बोलत. त्याप्रमाणेंच संस्कृत भाषा शिष्ट बोलत आणि महाराष्ट्री भाषा शिष्टेतर लोक बोलत.

कालान्तरानें पाली भासा एका धर्माची पूज्य भाषा झाली. तो शाक्यमुनीनें काढलेला बौद्धधर्म होय. बुद्धाचा धार्मिक अवतार कीकट देशांत झाला, असें भागवत पुराणांत ह्मटलें आहे (१–३–२४); आणि टीकाकारानें कीकट ह्मणजे गयाप्रदेश असा खुलासा केला आहे. ह्मणजे पाली भासा बुद्धाच्या वेळीं गयाप्रदेशांत शिष्टेतर लोक शेंकडों वर्षें बोलत असत. चातुर्वर्ण्याचा व कर्ममार्गाचा आश्रय करणारे जे ब्राह्मण त्यांची भाषा पाणिनीय संस्कृत असे; आणि एकजातीचा व यानमार्गाचा आश्रय करणारा जो गौतमबुद्ध त्याची भाषा प्राकृतजनांची पाली असे.

ततः कलौ संप्रवृत्ते संमोहाय सुरद्विषां ।
बुद्धो नामांजनसुतः कीकटेशु भविष्यति ॥
(भावगत पुराण १–३–२४)

टीका:—कीकटे मध्ये गयाप्रदेशे.

ऋग्वेदांत हि ह्या कीकट देशाचा उल्लेख आला आहे:—
किं ते क्रिण्वंति कीकटेषु गावो.

यास्कः– कीकटो नाम देशो अनार्य निवासः । निरुक्त, ६—३२॥

**पालीचा मूळदेश** ऋग्वेद कालीं कीकट देशांत अनार्य रहात असत. सध्यां आपण ज्यांना कैकाडी ह्मणतो व यूरोपियन लोक ज्यांना Gypsy ह्मणतात त्यांचा हा मूळदेश असावा. ह्या प्रांतांत आर्यांनीं वसाहत केल्यावर कैकाडी लोकांचे अपभ्रष्ट उच्चार आर्यांच्या कनिष्ट जातींत व शिष्टेतर लोकांत शिरले आणि प्रकटी ऊर्फ पाअडी ऊर्फ पाअली ऊर्फ पाली उर्फ पाळी उर्फ पालि ऊर्फ पाळि भासा प्रचलित झाली. भाषा अशिष्ट लोकांच्या तोंडीं जाऊन जो अपभ्रंश झाला, त्या अपभ्रंशालाच प्राकृत भाषा ह्मणतात, असें जें डा. भांडारकर म्हणतात, तें वरील हकीकती वरून खरें आहे, असें दिसतें. डाक्टरांचें विधान प्राकृत भाषासंबंधानें आहे व वरील हकीकत पाली भाषेसंबंधानें आहे. परंतु, तेवढ्यानें डाक्टरांचा सिद्धान्त

कांहीं कमज़ोर होत नाहीं; उलट शिरजोरच होतो. कारण पाली भासा ह्या शब्दांचा अर्थ प्राकृत भाषा असाच आहे.

पाणिनीचा काल डा. भांडारकर सुमारें शक पूर्व ८०० धरतात. परंतु ब्राम्हणांचा अगदीं शेवटला काल शक पूर्व १५०० जर त्यांना मान्य असेल तर, पाणिनीचा हि काल त्यांनी तोच धरल्यास, त्यांच्या उपपत्तीला ज्यास्त सामर्थ्य येईल.

**पाणिनीय भाषा व पाली भासा यांच्या संबंधासंबंधानें यूरोपियन विद्वानांचा गैरसमज.**

पाणिनीय भाषेची ह्मणजे ब्राह्मणकालीन शिष्ट भाषेची छाया ज्याअर्थी पाली भासा आहे, त्याअर्थी ती पाणिनीय भाषेइतकीच वेद भाषेशीं संबद्ध आहे. इतकेंच कीं ब्राह्मणकालीन भाषा पाणिन्यादि शिष्ट वैय्याकरणांच्या उपदेशानें नियमबद्ध होत आहे; आणि शिष्टेत्तर लोकांची जी पाली भासा ती होत नाहीं. त्यामुळें वेदभाषेंतील कांहीं आर्षरूपें व लकबा पाली भासेंत सांपडाव्या, हें साहजिक आहे. (१) ळ, ळ्ह हे उच्चार; (२) ऱ्हस्व दीर्घाकडे दुर्लक्ष्य, जसें छंदस्सुखार्थ, रमती, चेत्वा; (३) वैकल्पिक स्वरसंधित्व; (४) तृतीयेचा वैदिक प्रत्यय एभिः अथवा येभिः; (५) विशेषणविशेष्यांपैकीं एखाद्यालाच विभक्ति प्रत्यय लावण्यांत धरसोड; (६) कर्मणि प्रयोगापेक्षां कर्तरि प्रयोगाचें बाहुल्य; (७) धातुसाधिताच्या वैदिक त्वान प्रत्ययाचें आधिक्य; ह्या सात लकबांवरून यूरोपीयन लोकांनीं असें ठरविलें आहे कीं पाणिनीय भाषेहून पालि भासा जुनी आहे. पालि भासेहून पाणनीय भाषा जास्त शिष्ट, नियमबद्ध व सुधारलेली आहे, असें जर हे लोक ह्मणतील, तर त्यांना पाली व पाणिनीय भाषा यांच्यामधील भेद उत्तम कळला असें ह्मणतां येईल. कोणत्याहि भाषेच्या बाल्यावस्थेंत कर्मणि प्रयोगापेक्षां कर्तरि प्रयोगाचा उपयोग जास्त होतो. शिष्ट व सुधारलेल्या लोकांना कर्मणि प्रयोग पेलण्याचें सामर्थ्य येतें. तें सामर्थ्य गांवढ्याना नसतें. पाणिनीय भाषेंत शब्दांच्या आंत स्वरसंधि अगदीं नियमानें होतोच. हा नियम शिष्ट लोक पाळूं शकतात; शिष्टेतरांना इतकी नियमनशक्ति नसते. येभिः= एभिः= एहिः= ऐः अशा परंपरेनें शिष्टांनीं तृतीयेचें अनेकवचन ऐः प्रत्यानें करण्याचा कित्येक स्थलीं प्रघात पाडला. शिष्टेतर जुना येभिः च प्रत्यय

घेऊन बसले. शिष्टेतर ऱ्हस्व दीर्घांकडे दुर्लक्ष्य करतात; असलें दुर्लक्ष्य शिष्टांना व सभ्यांना खपत नाहीं. करोती, रमती, चराति असलीं रूपें अशिष्ट पालींत व वैदिक भाषेंत सांपडतात; परंतु पाणिनीय शिष्ट व सभ्य भाषेंत ही धरसोड अजीबात बंद केलेली आहे. पाली भाषेच्या ह्या सात हि लकबा आधुनिक अशिष्ट मराठींत आढळतात. छंद:सौकर्यार्थ ऱ्हस्व दीर्घांकडे कुकवींच्या मराठींत हमेश दुर्लक्ष्य होतें. शिष्टेतर मराठी वक्ते कर्मणि प्रयोगाचा कर्तरिपेक्षां कमी उपयोग करतात. ळ, ळ्हचा उच्चार अशिष्ट मराठींत फार आहे. सारांश, ह्या सात हि लकबा अशिष्टत्वाच्या द्योतक आहेत; श्रेष्ठत्वाच्या द्योतक नाहींत. त्यांना मिठी मारून, पाणिनीय भाषेला अर्वाचीन व कृत्रिम ठरविण्याच्या वृथा खटपटींत यूरोपीयन लोक पडले आहेत, ह्यांत बिलकुल संशय नाहीं.

**अशिष्ट पालीचा दुतोंडेपणा.**

अशिष्ट लोक शिष्ट भाषेचा अपभ्रंश करण्यांत जितके चपल असतात, तितकेच जुन्यापुराण्या आर्ष शब्दांना व प्रत्ययांना चिकटून बसण्यांत पटाईत असतात. अशिष्ट लोकांचे हे परस्पर विरूद्ध चाळे आजपर्यंत अनेक यूरोपीयन लोकांना फसवीत आले आहेत. त्यांच्या भाषेंत ज्या अर्थी ... त जुनेपुराणें शब्द सांपडतात, त्याअर्थी त्यांची भाषा तत्कालीन शिष्ट भाषेहून जुनी असावी, असें जों क्षणभर मानावें, तों वर्तमान शिष्ट भाषेचे अपभ्रंश करण्यांत हे लोक गुंतलेले पाहून, नवी भाषा बनविण्याच्या खटपटींत हे आहेत, असें दृष्युत्पत्तीस येते. ' कत्वान ' शब्दांत वैदिक ' त्वान ' प्रत्यय पाहून पाली भाषा वैदिक भाषेच्या जोडीला नेऊन जों बसवावी, तों दत्तवत् शब्दाचा दिन्नवा अपभ्रंश पाहून पाणिनीय संस्कृतापासून ही पतित होत चालली आहे, असें ह्मणणें भाग पडतें. मराठींत हि हाच चमत्कार दृष्टीस पडतो. " जात्याती " हें जुनें रूप अशिष्ट लोकांच्या तोंडीं जों ऐकावें, तों " घराय " हें अपभ्रष्ट रूप त्याच वाक्यांत आढळून येतें.

यान्त: असन्ति=जाँत आहाति=जाँताहाति=जाँत्याति=जाँत्याती; अशी ...त्याती व जाँत्याती ह्या जुन्या रूपांची परंपरा आहे. ' जात्याती ' बद्दल ...धुनिक शिष्ट लोक " जातात " असें रूप योजतात,

जाताहाति=जातांति=जातात.

परंतु, अशिष्ट लोक जॉत्याती किंवा जात्याती हें जुनें अपभ्रष्ट रूप च धरून बसले आहेत. पण एवढ्यानें ते जुनी भाषा बोलतात, असें ह्मणण्यांत अर्थ नाहीं. कारण,

घरापासौनियां=घरापासौनि=घरापासौन=घरापास=घराप

ह्या परंपरेनें अशिष्ट लोकांनीं घराप हें अपभ्रष्ट रूप बनविलेलें पाहून, ते नवी भाषा तयार करीत आहेत, असा सिद्धान्त बसवावा लागतो. तात्पर्य, अशिष्ट लोकांच्या ठायीं जुन्याला चिकटण्याचा व नव्याला धरण्याचा परस्परविरोधी दुतोंडी गुण असतो, हा सिद्धान्त आहे. ह्या दुतोंडी गुणाच्या कोणत्या हि एकाच तोंडाला पाहून, पालीसारख्या अशिष्ट भाषांचे गुणधर्म व जातगोत ठरवूं जाणें अशास्त्र आहे.

**सारस्वतामुळें पाली आज आहे असें समजतें**

गौतमबुद्ध जर न जन्मता आणि पाली भासेंत न बोलता व लिहिता, तर पाली भासेची आठवण आज न रहाती. पाली ऊर्फ प्राकृत गौतम बुद्धाच्या पूर्वी हजार वर्षे होती. परंतु, तींत सारस्वत किंवा वाङ्मय नसल्यामुळें, तिची माहिती हि कोणास नाहीं. बुद्धानंतर तींत धार्मिक सारस्वत होऊं लागलें वै बौद्ध लोकांची ती धार्मिक भाषा बनली. त्यामुळें, ती आज उपलब्ध व माहीत होत आहे.

**यूरोपियन लोकांचें पालीवरील प्रेम सहेतुक आहे.**

यूरोपियन लोकांना पालीची जी इतकी बेसुमार गोडी लागलेली दिसत आहे, तिला कारण आहे. पाली भासा ज्या बौद्ध लोकांची धर्मभाषा आहे ते लोक यूरोपीयन लोकांप्रमाणेंच चातुवर्ण्यविहिन व आचारहीन आहेत. ह्या समानधर्मा शिवाय, पाली ग्रंथांवर यूरोपीयन विद्वानांचा इतका भर असण्याचें दुसरें असें कारण आहे कीं, खिस्ती धर्माचा एकोनएक स्वभाव बौद्ध धर्मांत सांपडतो. व खिस्ती धर्म बौद्ध धर्माची नक्कल आहे, अशी खात्री होते. अशी ज्या अर्थी वस्तुस्थिती आहे, त्या अर्थी पाली भासा संस्कृत भाषेहून, पाणिनीय भाषेहून व वैदिक भाषेहून ही पुरातन आहे, अतएव ब्राम्हणांच्या वेदभाषेहून श्रेष्ठ आहे, अशी सिद्धि करण्याकडे युरोपियनांच्या मनाचा फार ओढा असतो. ब्राम्हणांपासून किंवा ब्राम्हणांच्या वडलांपासून ऋ सनें घेतल्याची लाज ह्या लोकांना फार वाटते, इतकी कीं, ज्यांच्याशीं के:

धर्माच्या नकलेचा बादरायण संबंध, त्या बौद्ध लोकांच्या पालीला हि पाणिनीय भाषेची नक्कल ह्मटलेलें ह्यांना खपत नाहीं. इतकेंच नव्हे, तर, पाली भासा वैदिक भाषेहून हि पुरातन आहे, असे निराधार मत प्रस्थापिल्याशिवाय त्यांना समाधान वाटत नाहीं.

पाली भासा वैदिक भाषेच्या बराबरची नाहीं, हें ठरविण्याला तोडगा आहे. पालीचे छायारूप भाषान्तर युरोपीयन लोक पाणिनीय भाषेंत देतात, वैदिक भाषेंत किंवा संस्कृत भाषेंत देत नाहींत. ह्याचा अर्थ इतका च कीं पाली भासेची छाया पाणिनीय भाषेंत साधर्म्यामुळें देणें जितकें सोयीचें आहे, तितकें वैदिक किंवा संस्कृत भाषेंत देणें सोयीचें नाहीं.

**पाली भासा पाणिनीय भाषेची छाया आहे हें ठरविण्यास तोडगा**

पाणिनीय भाषेची छाया जशी पाली ऊर्फ प्रकटी ऊर्फ प्राकृत भाषा तशी वैदिक आर्ष भाषेची छाया असलेली उपलब्ध नाहीं. कारण, आर्षकालीं अनार्य लोकांवर आर्षभाषा लादण्याचा प्रसंग उद्भवण्यास ह्मणण्यासारखें कारण झालें नाहीं. तत्रापि, असुर्या देशांतील असुर लोकांशीं संबंध आला असतां, दुष्ट उच्चार आर्यांच्या कानावर येऊं लागले, असें ह्मणण्यास आधार आहे. " तेऽसुरा ' हेऽलयो हेलय ' इति कुर्वंतः पराबभूवुः । तस्मात् ब्राह्मणेन न म्लेच्छितवै नापभाषितवै । म्लेच्छो ह वा एष यदपशब्दः । तस्मान्न ब्राह्मणो म्लेच्छेत् । " अशी शतपथश्रुति आहे. ही श्रुति ब्राह्मणकालीं रचलेली आहे, हें तिच्या भाषेवरून उघड दिसत आहे. परंतु, हींत पुरातन कालीं अपभ्रष्ट उच्चार करणाऱ्या असुरांचा पराभव झाला, असें वर्णन आहे. ह्मणजे आर्षकालीं आर्ष शब्दांचा असुर लोक अपोच्चार अथवा अपभ्रंश करीत. हे असुर ह्मणजे असूर्या किंवा असुर्या देशांतील लोक. असुर्या देश इराणच्या पश्चिमेस यूफ्रेटीस व टैग्रीस या नद्यांच्या भोंवती आहे. असुर्या देशांत असुरांनीं मोठी पातशाहत इसवीसनापूर्वी ६००० पासून २००० पर्यंत केली. अर्थात् आर्ष ' अरयः ' शब्दाचा ' अलयः ' असा अपभ्रंश असुरांच्या तोंडून इसवीपूर्वी ३००० वर्षांच्या सुमारास झाला असला पा-

**वेदांत अपभ्रष्ट उच्चार**

**असुर लोक इसवीपूर्वी ६०००—२०००**

हिजे. " पिक, " " नेम, " " तामरस " वगैरे शब्द असुर भाषेतून आर्यभाषेंत जे आले ह्मणून शबरस्वामी ह्मणतो, ते ह्या च कालांत आले. बायबलांत Molochians ह्मणून एका लोकांचे नांव येते तेच हे म्लेच्छ असावेत आणि म्लेंच्छ हे असुरांपैकीं होते, हें वरील श्रुतीवरून सिद्ध होतच आहे. अव्यक्त उच्चार करणें हा असुरांचा मुख्य उच्चारदोष होता. म्लेच्छ अव्यक्ते शब्दे । धातुपाठ २०५।.

**प्रांतिक, जातिक किंवा गोत्रीय आर्ष भाषा**

ज्या अर्थी आर्य शब्दांचा असुर लोक अपभ्रंश करीत, त्या अर्थी आर्य भाषेचा अपभ्रंश होता, असें ह्मणावें लागतें. अपभ्रंशाखेरीज, आर्यभाषेच्या प्रांतिक किंवा गोत्रीय विभाषा हि असाव्या, असें दिसतें. कारण, देवाः, देवासः, देवैः, देवेभिः, त्वानं, त्वीनं, त्वाः अशीं अनेक रूपें एकाच विभक्तीचीं व वचनाचीं ज्या भाषेंत सांपडतात त्या भाषेंत प्रांतिक किंवा गोत्रीय किंवा जातिक पोटभेद असले पाहिजेत, ह्यांत संशय नाहीं. तसेंच कृत बद्दल कुट, कर्त बद्दल काट, गृह बद्दल गेह वगैरे कठिण व सोपे उच्चार ज्या भाषेंत एका च वेळीं आढळतात त्या भाषेंत पोटभेद असले पाहिजेत, असें मानिल्यावाचून गत्यंतर नाहीं, तात्पर्य, ग्रांथिक भाषा, प्रांतिक भाषा, जातिक किंवा गोत्रिक भाषा, व अपभ्रंश, असा चतुर्विध भाषाभेद वैदिक कालीं होता. पैकीं, म्लेछ व असुर लोकांनीं केलेला अपभ्रंश वैदिक आर्यांना बिलकुल खपत नसे व तो त्यांच्या तिरस्काराचा विषय होत असे. प्रांतिक व गोत्रिक भाषाविकार किंवा भेद प्रबल व सर्वमान्य झाल्यास शिष्ट व ग्रांथिक भाषेंत समावेशिला जाई, आणि दुर्बळ झाल्यास लुप्त होई. प्रांतिक किंवा गोत्रिक पोटभाषा बोलणारे आर्य पडल्यामुळें तिरस्काराचें कारण नसे.

**यूरोपियन विद्वान विरुद्ध डा. भांडारकर**

ह्या ज्या प्रांतिक किंवा जातिक किंवा गोत्रिक वेदकालीन पोटभाषा त्यांच्यापैकीं एकीपासून किंवा सर्वांपासून पाली भाषा उद्भवली, असें युरोपियनांचे ह्मणणे आहे. पाली पाणिनीय ऊर्फ ब्राह्मण भाषेची प्राकृत छाया आहे, असें डा. भांडारकरांचे मत आहे. पैकीं खरें कोणतें, ह्याचा निर्णय मागें झाला च आहे, पालीचा अक्षरशः व रूपशः तर्जुमा किंवा विपरिणाम

जसा पाणिनीय भाषेंत तंतोतंत होतो तसा वैदिक भाषेंत किंवा वैदिक भाषेच्या कोणत्या हि पोटभेदांत [ माहीत असल्यास ] होत नाहीं. त्या अर्थी पाली भाषा वेदकालीन भाषेच्या कोणत्याहि पोटभेदांपासून निघाली नसून, पाणिनीय भाषेची छाया ऊर्फ प्राकृत प्रतिकृति आहे. पाणिन्यादि शिष्टांच्या भाषणांतून व ग्रथांतून लुप्त झालेलीं कांहीं वैदिक रूपें व शब्द अशिष्टांच्या प्राकृत, प्रकट, उर्फ पाली भासेंत सांपडतात इतकेंच. तेवढ्यानें युरोपीयनांचा सिद्धान्त स्थापित होणें अवघड आहे.

**अनार्यांच्या नुसत्या संसर्गानें झालेला अपभ्रंश.**

कीकटनामक गयाप्रदेशांत ब्राह्मणेतर आर्यांना अनार्य कीकटांच्या संसर्गानें अपभ्रष्ट उच्चार करण्याचा वाण लागला आणि कालान्तरानें हा वाण बळावून, पाली, ऊर्फ प्रकट ऊर्फ प्राकृत भासा जन्मास आली. अनार्यांच्या संसर्गानें ब्राह्मणांना देखील अपोचार व अपभाषण करण्याची संवय लागण्याची भीति होती. एतदर्थ, ब्राह्मणानें अनार्य म्लेच्छासारखे अपभ्रष्ट उच्चार करूं नये, असा इशारा त्याकालीं उच्छृंखल ब्राह्मणांना तत्कालीन शिष्टांनीं दिला-सारांश, शिष्ट भाषेचा अपभ्रंश अनार्यांच्या संसर्गानें हि होणें शक्य असतो.

**अनार्यांनीं केलेला आंतर अपभ्रंश.**

आर्यभाषा अनार्य उच्चारूं व योजूं लागले असतां जो अपभ्रंश होतो, तो उच्चारापुरताच थांबत नाहीं. तर, लिंग, वचन, प्रत्यय, वगैरे भाषेच्या आंतर रचनेंत हि त्या त्या अनार्यांच्या भाषेच्या स्वभावानुरूप फेरफार करतो. असला आंतर अपभ्रंश होऊन, पाली भासा बनलेली नाहीं. फक्त संसर्गाचा अथवा सांसर्गिक अपभ्रंश होऊन पाली भाषा पाणिनीय भाषेची छाया बनली. संसर्गानें श्यापर्ण इत्यादि कित्येक ब्राह्मणजाति अपूत ह्मणजे असंकृत भाषा बोलत, असें विसृत वर्णन ऐतरेय ब्राम्हणाच्या प्रथम खंडाच्या ३५व्या अध्यायांत आलें आहे. तीच ही पाली असावी. *

---

* वैदिक भाषा (शकपूर्व ६०००–३०००) आणि ब्राह्मणभाषा ऊर्फ पाणिनीय भाषा (शकपूर्व ३०००–१५००) ह्यांच्या वेळीं अपभ्रष्ट भाषा होती, हें वरील मुद्यांवरून स्पष्ट आहे युरोपीयनांच्या एतत्संबंधानें कल्पना अद्याप फार अस्पष्ट आहेत. इ. स. १९०४त राप्सन येणेंप्रमाणें लिहितो:—These Pra-

पुढें चालू.

**मगध–सुरसेन पिसाचपुर.**

१८ पाली भासा गोतमबुद्धाच्या पुढें पन्नासशंभर वर्षे चालून, नंतर तिचें प्रयाण सिंहलद्वीपांत झालें. सिंव्हलद्वीपांत गेल्यापासून, ती बौद्ध लोकांची धार्मिक भाषा बनली व मृतभाषेची स्थिर कळा तिला आली. पाली भासा ह्मणजे मगधांतील किंवा कोसलांतील प्राकृत भाषेचा बुद्धाच्या वेळचा पोटभेद तो पोटभेद बौद्धधर्मीयांनीं यद्यपि स्थिर व मृत बनविला, तत्रापि मगध देशांतील मागधी प्राकृत तत्कालीन संस्कृताची मगधदेशांतील छाया ह्मणून नांदत होतीच. मथुरादेशांत जी संस्कृताची छाया होती तिला शौरसेनी असें नांव पडलें. आणि पिशाच लोक जी छायारूप संस्कृत बोलत तिला पैशाची असें अभिधान होतें. मागधी, सौरसेनी व पैसाची हीं विशेषणें व विशेष्यें मगध, सूरसेन व पैसाच ह्या देशवाचक शब्दांवरून पडलीं आहेत. वर्तमान बहार ह्मणजे मगध; मथुरेभोंवतालील जो प्रांत तो सुरसेन; आणि प्रस्तुतच्या पिसावर प्रांताच्या उत्तरेकडील जो प्रांत तो पिसाच. मगधदेश कोणता ह्यासंबंधानें वाद नाहीं. सूरसेनदेशाचा उल्लेख मनुस्मृतींत येणें प्रमाणें आला आहे.

कुरुक्षेत्रं च मत्स्याश्च पंचालाःशूरसेनकाः ॥

[ मनु. अ. २, श्लो. १९ ]

ह्या शब्द भारत व हरिवंश ह्यांत येतो.

पेशावर=पिसावर=पिसाउर=पिसाचपुर, अशा परंपरेनें आधुनिक पेशावर शब्द साधला असल्यानें, पेशावरच्या उत्तरे कडील काफरिस्थान, कोहिस्तान, चित्रळ व अंशतः काश्मीर वगैरे प्रांतांतील पुराण भाषा पिसाचांची होय, ह्यांत संशय नाहीं. अलीकडे [ इ. स. १९०४, journal R. A. S. pp. 725–731] ग्रियरसन्चें हि मत असेंच झालेलें आहे.

---

मागील पृष्ठावरून पुढें चालू

krits cannot be traced back to Vedik Sanskrit, or to the period of the Brahmanas or even to the date of the earliest Sanskrit of the Epics! (In what degree was संकृत a spoken Language? A. D. 1904, j. R. A. S.)
राइस्न पाणिनीला शकपूर्व २००ला आणून ठेवतो! कालाचा असा गोंधळ केल्यामुळें, युरोपियनांच्या संस्कृत प्राकृतभाषाविषयक बहुतेक सर्व कल्पना हि विचित्र व असंभाव्य होतात; मग सिद्धान्त तर होतीलच!!!

पौण्ड्रकाश्चौड्रद्रविडाः कांबोजा यवनाः शकाः ।
पारदा पल्हवाश्चीनाः किराता दरदाः खशाः ॥
[ मनु, अ. १०, श्लोक ४४ ].

ह्या श्लोकांत उल्लेखिलेले जे दरद तेच Dard होत. त्यांची भाषा पैसाची वर्गांतील होय, असें वरील भाषागणकाचें मत आहे.

अपक्रामंतु भूतानि पिशाचाःसर्वतो दिशं ।

संध्येतील ह्या श्लोकार्धांत ह्या पिसाचांचा निर्देश आहे. तैत्तिरीय संहितेंत देखील यांचें नांव येतें. पैशाच विवाहाचा उल्लेख स्मृतिकारांनीं केलेला प्रसिद्ध आहे. मुळीं, हे लोक अनार्य होते व आर्यांचे शत्रू होते. ह्यांच्या संसर्गानें कित्येक आर्य क्षत्रिय क्रियालोपानें आर्यत्वापासून च्युत होऊन दरद झाले; व मूळ आर्यभाषा अपभ्रष्ट उच्चारानें बोलूं लागले.

शनकै स्तु क्रियालोपादिमाः क्षत्रियजातयः ।
वृषलत्वं गतालोके ब्राह्मणादर्शनेन च ॥
( मनु, अ. १०; श्लोक ४३ )

**ऐतिहासिक दृष्ट्या अथवा कालावच्छेदानें मराठीचें अर्वाचीनत्व. पहिली प्राकृत—सौरसेनी**

१९ सूरसेन, मगध व पिसाउर ह्या प्रांतांत पाणिनीय भाषेच्या प्रांतपरत्वें तीन निरनिराळ्या छाया झाल्या. त्यांतल्या त्यांत पहिली छाया सूरसेनदेशांत झाली. कारण आर्यांचें भरतखंडांतील पहिलें नागर वसतिस्थान झटलें ह्मणजे सरस्वती व दृषद्वती या दोन पवित्र नद्यांमधील जो ब्रह्मावर्त प्रांत तो होय.

सरस्वतीदृषद्वत्यो देवनद्यो र्यदन्तरम् ।
तं देवनिर्मितं देशं ब्रम्हावर्त्तं प्रचक्षते ॥
[ मनु, अ. २, श्लोक १७ ]

**देव कोण?**

सरस्वती व दृषद्वती या दोन नद्यांमधील प्रदेश देवांनीं प्रथम वसाहत करून तयार केला आणि त्याला ब्रह्मावर्त्त असें नांव पडलें, असा ह्या श्लोकाचा अर्थ आहे. देव ह्मणजे आपणा हिंदुस्थानांतील आर्यांचे मूळ पूर्वज. देव ह्मणजे ईश्वर gods नव्हे. असुराशीं ह्मणजे

इंग्रज लोक ज्या देशाला Assyria ह्मणतात त्या देशांतील पुरातन रहिवाश्यांशीं ज्यांचें हाडवैर असलेलें वेदांत वर्णिलें आहे ते हे देव होत. हे देव कोण तें नीट न उलगड्यामुळें रा. रा. ऱ्हीस डेव्हिस ह्या श्लोकावर अशी अज्ञ व पोरकट टीका करतो:—

"That, according to the ब्राह्मण, is the land created by the gods-as if, other lands were not. (Here), the priestly authors of that famous manual ( मनुस्मृति ) have thrown off all disguise."

(journal R. A. Society for 1904, p. 93)

देव ह्या शब्दाचा नीट अर्थ उलगडला असता, ह्मणजे ब्राह्मण सत्य व इतिहास सिद्ध जें होतें तें च लिहीत आहेत, असें ऱ्हीस डेव्हिस्च्या लक्ष्यांत आलें असतें. असो. ब्रह्मावर्त्ताशेजारील जो मथुराप्रांत त्या प्रांतांत आर्यांची कालान्तरानें वसाहत पसरून भाषेंत प्रथम अपभ्रंश सुरू झाला. त्याला च प्रौढदशेंत सौरसेनी असें नांव पडलें.

कुरुक्षेत्रं च मत्स्याश्च पंचालाः शूरसेनकाः ।
एष ब्रह्मर्षिदेशो वै ब्रह्मावर्त्तादनन्तरः ॥

[ मनु, अध्याय २, श्लोक २० ]

**दुसऱ्या प्राकृत मागधी व पैसाची**

कुरुक्षेत्र, मत्स्यदेश, पंचाल व सूरसेन ह्या देशांत आर्यांचा प्रसार झाल्यानंतर, त्यांच्या वसाहती पूर्वेस मगध व पश्चिमेस पिसाउर प्रांतांत कायम झाल्या किंवा त्या प्रांतांना स्पर्श करूं लागल्या अशा स्थितींत मागधी व पैसाची ह्या दोन प्राकृतभाषा तत्तद्देशस्थ मूळ लोकांच्या संसर्गानें उच्चारापभ्रंश होऊन अस्तित्वांत आल्या. पूर्वेस व पश्चिमेस वसाहती झाल्या नंतर आर्यांची दृष्टि दक्षणादिशेकडे वळली आणि दंडकारण्यांत त्यांनीं प्रवेश केला. दंडकारण्यांत वसाहत व कायमची वसती झाल्यावर, महाराष्ट्री

**तिसरी प्राकृत महाराष्ट्री**

नावांची प्राकृत भाषा तेथें जन्मास आली. दंडकारण्यांत जे आर्य वसाहत करण्यास गेले त्यांनीं आपल्या वसाहतीस महाराष्ट्रदेश, आपल्यास महाराष्ट्रीय लोक व आपल्या भाषेस महाराष्ट्री भाषा अशी अभिमानाची नांवें दिलीं.

ऋग्वेद, ब्राह्मण, रामायण, भारत, ह्या ग्रंथांतील उल्लेखांवरून आर्यांच्या वसाहतींचें पूर्वापरत्व व ऐतिहासिक क्रम ठरलेले प्रसिद्ध आहेत. सबब, त्यांचा येथें तपशिल देत नाहीं.

२० ऐतिहासिकदृष्ट्या ह्मणजे कालदृष्ट्या (१) सौरसेनी—(२) मागधी व पैसाची—(३) महाराष्ट्री, असा क्रम लागतो. उच्चारदृष्ट्या हि हाच क्रम असलेला आढळून येतो. उदाहरणार्थ, एक पाणिनीय क्रियापद घेतों:—

| | | |
|---|---|---|
| १ | पाणिनीय भाषा:— | वर्तते |
| २ | पाली:— | वट्टति |
| ३ | सौरसेनी:— | वट्टदि |
| | मागधी:— | वट्टडि |
| | पैसाची:— | वट्टति |
| ४ | महाराष्ट्री:— | वट्टइ |

पाणिनीय भाषेंत वृत् धातूचें वर्तमानकालीं तृतीयपुरुषीं एकवचनीं आत्मनेपदीं-वर्तते असें रूप होतें. प्राकृतांत प्रायः परस्मैपद सार्वत्रिक आहे.

**महाराष्ट्रीचें उच्चार दृष्टया अर्वाचीनत्व**

'र्त' चा ट्ट सर्व प्राकृतांत सामान्य आहे. 'ति'ची 'दि' सौरसेनीत होते. पैसाचींत मृदु व्यंजनें नसल्याकारणानें 'ति' ची 'ति' च कायम रहाते. मागधींत सौरसेनी 'दि' ची 'डि' होते. महाराष्ट्रींत 'ति' ची "इ" होते. 'ति' ची 'दि' होणें जितकें सजातीय व सुलभ आहे तितकें 'इ' होणें सजातीय व सुलभ नाहीं. 'ति' ची 'दि' पहिल्या पायरीचा अपभ्रंश झालेला दिसतो. 'ति' ची 'इ' व्हावयाची म्हणजे ति, दि, डि, ढि, हि, इ अशा परंपरेनें होईल. म्हणजे इ होणें पहिल्या पायरीचा अपभ्रंश नसून, पहिल्या अपभ्रंशाच्या अपभ्रंशाचा अपभ्रंश आहे. अर्थात्, उच्चारदृष्टया पाणिनीय भाषेपासून सौरसेनीहून महाराष्ट्री दूरतर आहे.

दुसरें उदाहरण भूतकालवाचक धातुसाधित विशेषणाचें घेतों:—

| | | |
|---|---|---|
| १ | पाणिनीय भाषा:— | कृत |
| २ | पाली:— | कत |
| ३ | सौरसेनी:— | कद |
| | मागधी:— | कड |
| | पैसाची:— | कत |
| ४ | महाराष्ट्री:— | कअ |

येथें पाली व पैसाची पाणिनीय भाषेच्या जवळ, नंतर सौरसेनी, नंतर मागधी व नंतर महाराष्ट्री असा उच्चारापभ्रंश दिसतो. तस्मात्, उच्चारदृष्ट्या हि महाराष्ट्री भाषा सौरसेनी, मागधी, पैसाची, व पाली ह्यांच्या अलीकडची ठरते.

२१ इतिहासदृष्ट्या व उच्चारदृष्ट्या महाराष्ट्री जर पाली, सौरसेनी, मागधी व पैसाची ह्या चार भाषांहून अर्वाचीन ठरते, तर वररुची सारख्या वैय्याकरणानें "शेषं महाराष्ट्रीवत्" हें सूत्र उच्चारून सौरसेनी, मागधी व पैसाची ह्या भाषांना गौणत्व कां दिलें, असा प्रश्न उद्भवतो. ह्या प्रश्नाला उत्तर असें आहे कीं, वररुचीनें जेव्हां आपलें व्याकरण रचलें तेव्हां ह्या तिन्ही भाषांतल्या पेक्षां महाराष्ट्रींत उत्कृष्ट सारस्वत निर्माण झालें होतें व ती राजभाषा या नात्यानें नांदत होती. उत्कृष्ट सारस्वत मिळाल्यानें व दरबारी प्रवेश झाल्यानें महाराष्ट्रीला नागरत्व, राजमान्यत्व व शिष्टमान्यत्व येऊन, ती विद्वानांच्या व रसिकांच्या आदराचें पात्र झाली. ह्याच बलवत्तर कारणाच्या जोरावर दंडीनें आपल्या काव्यादर्शात महाराष्ट्रीला सर्व प्राकृत भाषांत उत्कृष्ट ठरविलें.

**व्याकरणदृष्ट्या महाराष्ट्रीचें अग्रमान्यत्व.**

महाराष्ट्राश्रयां भाषां प्रकृष्टं प्राकृतं विदुः ॥

ह्याच शिष्टगुणसंपन्नत्वामुळें ती वैय्याकरणाच्या निरीक्षणाचा विषय झाली व व्याकरणदृष्ट्या तिच्याहून प्राचीन परंतु सारस्वताभावामुळें तिच्याहून हीन अशा इतर भाषांना उपमान झाली. शिष्ट महाराष्ट्रीचें व्याकरण रचलें ह्मणजे इतर प्राकृत भाषांचें व्याकरण बव्हंशानें त्यांत आलेंच, असा सिद्धान्त झाला. इतर प्राकृत भाषांच्या ठोकळ ठोकळ दहा पांच लकबा दाखवून दिल्या, ह्मणजे झालें. महाराष्ट्रीच्या हवाल्यावर सर्व काम भागलें. अशा दृष्टीनें, ह्मणजे वैय्याकरणांच्या दृष्टीनें महाराष्ट्री भाषेला अग्रमान्यत्व

आलेलें आहे. बाकी, कालदृष्ट्या, इतिहासदृष्ट्या, जन्मदृष्ट्या, व उच्चारदृष्ट्या महाराष्ट्री भाषा ह्या तिन्ही भाषांहून अर्वाचीन आहे.

पालींत बौद्ध लोकांचें फक्त धार्मिक वाङ्मय आहे. आख्यायिका नांवाच्या कहाण्या आहेत; परंतु त्यांना कादंबरीच्या तोडीला आणून बसवितां येत नाहीं. सौरसेनींत व अर्धमागधींत जैनाचें धार्मिक वाङ्मय—स्तोत्रें वगैरे आहे. पैसाचींत एकटी बृहत्कथा तेवढी झालेली प्रसिद्ध आहे. परंतु, ती लुप्त होऊन, आतां त्या भाषेंतील एखाद दुसरें वाक्य नाटकांतून जेवढें सांपडतें तेवढेंच. इतर भाषांतील सारस्वताची अशी दुर्दशा असल्यामुळें, महाराष्ट्रींतील विविध सारस्वताचें तेज सापेक्षतेनें फारच चमकूं लागलें व तिच्या पाठीमागून व्याकरण प्रदेशांत दास्यवृत्तीनें जाणें त्यांच्या कपाळीं आलें.

**पाली-मागधी-सौरसेनी-पैसाची यांचा जन्मकाल.**

२२ मथुरा अथवा सौरसेन[नंतरचें नांव]प्रांतांत वसाहत झाली, तेव्हां सौरसेनी प्राकृत उत्पन्न झाली; मगध देशांत वसाहत झाली, तेव्हां मागधी झाली; पिसाउरांत पैसाची निघाली; आणि महाराष्ट्रांत वसाहत झाल्यावर महाराष्ट्री प्राकृत अवतीर्ण झाली. मागधी प्राकृताचें पूर्व रूप जी पाली ती शकपूर्व १५०० च्या सुमारास मगधांत सुरू झाली. त्यांच्या हि पूर्वी सौरसेनीचा प्रारंभ झाला असावा; कारण तो प्रांत ब्रह्मावर्ताच्या जवळ आहे. परंतु, सौरसेनींत सारस्वत नसल्यामुळें तिचा आदि व मध्य स्पष्टपणें निर्देशितां येत नाहींत. पाली व सौरसेनी ह्यांच्यानंतर पैसाची पिसाउरांत उदयास आली असावी. बृहत्कथेखेरीज हींत सारस्वत असल्याचें प्रसिद्ध नसल्यामुळें व खुद्द बृहत्कथा लुप्त झाल्यामुळें, ह्या हि प्राकृताचा आदिमध्य नक्की ठरवितां येत नाहीं. शहाबाजगढी ऊर्फ कपूर्दगिरी येथील अशोकाच्या शिलालेखांत पैसाची भाषेचा एक पोटभेद दृष्टीस पडतो. तसेंच नाटकांत कोठें एखादें दुसरें वाक्य पैसाचींत येतें. कृष्णयजुर्वेद संहितेवर पैसाची भाषेंत [ आधुनिक पैसाची ? ] टीका आहे, परंतु, ती हि अद्याप प्रसिद्ध झालेली नाहीं. ह्या पलीकडे पैसाचीच्या ज्ञाताज्ञात सारस्वताची जास्त माहिती उपलब्ध नाहीं.

२३ महाराष्ट्रभाषेची गोष्ट ह्या दोन्ही तिन्ही भाषांहून निराळी आहे. तिचा जन्मकाल बराच नक्की ठरवितां येण्यासारखा आहे. कारण, दक्षिणा-

रण्यांत आर्यांची वसाहत केव्हां झाली व सारस्वताचा उदय महाराष्ट्रांत कितपत झाला, ह्यांची हकीकत इतर भाषांच्यापेक्षां महाराष्ट्री भाषेसंबंधानें जास्त खुलासेवार व विश्वसनीय मिळण्याची शक्यता आहे.

पाणिनीच्या वेळीं [ शकपूर्व १५०० ] महाराष्ट्रदेश नव्हता व महाराष्ट्री भाषा नव्हती; दंडकारण्य होतें.

२४ पाणिनी आपल्या व्याकरणांत प्राकृत भाषांचा उल्लेख बिलकुल करीत नाहीं. त्या अर्थी प्राकृत भाषा ब्राह्मण भाषेपासून विलग होऊन स्पष्टपणें भिन्न भासण्याच्या पूर्वी पाणिनी झाला असला पाहिजे हें उघड आहे. मागें १७ व्या रकान्यांत पाणिनीचा काल सुमारें शकपूर्व १५०० असावा असें ह्मटलें आहे. आणि, एकंदर गोळा बेरीज पहातां, हाच काल प्रायः बरोबर असावा असें वाटतें. आतां, पाणिनि शाल्व, पांचाल, कंबोज वगैरे देशांचीं नावें देतो. परंतु दक्षिणेंतील पांड्य, चोल इत्यादि देशांचीं नावें देत नाहीं. त्या अर्थी, तीं त्याला व त्याच्या समाजाला माहीत नव्हतीं. माहीत असतीं तर तो तीं द्यावयाला चुकताना. कारण तो अत्यंत आस्थेवाईक वैय्याकरण होता. पाणिनि विंध्यपर्वताच्या उत्तरबाजूचे कुमुद्वत्, नड्वत् व वेतस्वत् ह्या तीन देशांचा उल्लेख करतो; परंतु, विंध्यपर्वताच्या दक्षिणबाजूच्या प्रांतांचें नांव सुद्धां काढीत नाहीं. पाणिनि ज्याला वेतस्वत् ह्मणतो त्याच देशांतील मोठ्या नदीला पुढें संस्कृत भाषेंत वेत्रवती [ वेतस्=वेत्र ] ह्मणूं लागले. वेत्रवतीलाच सध्यां बेटवा ह्मणतात आणि ह्या नदीवरील मुख्य शहराला भिलसा, भेळसा, भेळसें [वेतस्=वेडस=वेळस=बेळसें=भेळसें] असें अभिधान आहे. ह्मणजे विंध्यपर्वताच्या उत्तरबाजूचे जे देश ते पाणिनीला माहीत होते, दक्षिणेकडील नव्हते, ही सिद्ध गोष्ट आहे. विंध्यपर्वताच्या दक्षिणेस घोर अरण्य आहे, हें त्याला माहीत होतें. परंतु, तेथें लोकवस्ति झालेली त्याला माहीत नव्हती. असती तर, तेथील लोकांच्या व देशांच्या नावांत कांहीं वैय्याकरणिक विशेष असलेला तो अवश्य सांगता. ज्या अर्थी सांगत नाहीं, त्या अर्थी पाणिनीच्या कालीं ह्मणजे शकपूर्व १५०० च्या सुमारास दंडकारण्यांत विंध्याच्या दक्षिणेस आर्यांची वस्ती झाली नव्हती, अथवा, होत असल्यास, ती इतक्या मुग्धावस्थेंत

होती कीं तिच्यावरून देश व प्रांत व तत्रस्थ लोक यांना विशिष्ट नावें पडलीं नव्हतीं.

**आर्य पश्चिमेकडून कोंकणांत उतरले व तेथून घाटांनीं दंडकारण्यांत शिरले. शक पूर्व १५००–१०००**

२५ पाणिनीच्या कालीं पश्चिमेस सध्यांच्या गुजराथेंतून व पूर्वेस कलिंगातून दक्षिणेकडे जाण्याचा आर्यांचा उपक्रम चालला होता. एक दोन शतकांत पूर्वपश्चिम किनारा व बहुतेक सर्व द्रविडदेश त्यांनीं आक्रमण केला. ह्मणजे दंडकारण्याला चाऱ्ही दिशांनीं गराडा घातला. नंतर, दंडकारण्यावर हल्ला करण्यास सुरवात केली. भाषेवरून जर ग्रंथांचा कालानुक्रम लाविला तर असें दिसतें कीं भारताचा कांहीं भाग ब्राह्मणकालाच्या ह्मणजे पाणिनीय कालाच्या अगदीं शेवटल्या पादांतील आहे आणि बराच भाग पाणिनीय कालाच्या नंतरचा आहे. भारतीय सभापर्वाची भाषा ह्या दुसऱ्या भागापैकीं दिसते तेव्हां त्यांतील मजकूर पाणिनीच्या नंतरच्या कालाला अनुलक्षून असावा, हें साहजिक आहे. सहदेवानें पश्चिम किनाऱ्याचे जे देश जिंकले त्यांत शूर्पारक, दंडक आणि करहाटक ह्या तीन देशांची नावें आहेत. पैकीं शूर्पारक ह्मणजे सध्यांचे सुपारें असून, प्राचीन कालीं उत्तर कोंकणाचा बराच भाग त्यांत समाविष्ट होत असे. दंडक ह्मणजे दंडकारण्य नव्हे; तर शूर्पारकाच्या दक्षणेचें जे कोंकण तें. हा शब्द सध्यां डंडाराजापुरी किंवा दंडाराजापुरी ह्या शब्दांत राहिलेला आहे. दंडक या संस्कृत शब्दाचें दंडअ हें महाराष्ट्री प्राकृत असून डंडअ हें सौरसेनी प्राकृत आहे. आणि ह्या दोहोंची डंडा व दंडा अशी गुजराथी व मराठी रूपें सध्यां विद्यमान आहेत. दंडा किंवा डंडा हा शब्द कोंकणांतील व सह्यपर्वतांतील मूळच्या लोकांचा असून त्याचा अर्थ डोंगरांचा उतरता लांब फांटा असा आहे. दांड, डांड डांग, डंग, डुंग, डोंगर, डोंगरी, वगैरे शब्द सह्याद्रीतील कोळी लोकांत अद्याप हि प्रचलित आहेत. हे कोळ उर्फ कोल लोक सह्यपर्वतावरील मुळचे रहिवासी असावे. दंडाराजापूर प्रांतांतून घाटानें वर चढलें ह्मणजे करहाटक प्रांत लागतो. ह्मणजे दंडकारण्यावर पश्चिमेकडून हल्ला आर्यांनीं समुद्र किनाऱ्यावरील घाटांनीं केला, हें स्पष्ट आहे. आणि हाच मार्ग सोपा, सुगमणाचा होता, आर्य पश्चिमेकडून दक्षिणेंत कसे उतरले

त्याचा हा तपशील येथें मुद्दाम दिला आहे. कारण, कोकणांतील भाषेवर ह्या उत्तरणाचा परिणाम घडलेला आहे. कऱ्हाडाकडून कृष्णेच्याखोऱ्यांतून; नाशकाकडून गोदावरीच्या खोऱ्यांतून आणि विदर्भाकडून पाइनगंगेच्या खोऱ्यांतून, थोड्याच शतकांत आर्यांच्या दंडकारण्यांत कायमच्या व भरभराटीच्या वसाहती झाल्या आणि शकपूर्व १००० च्या सुमारास दंडकारण्याचें दंडकारण्यत्व स्नानमंत्रविधींत तेवढें राहिलें.

बुद्धाच्या पूर्वी कांहीं शतकें व त्याच्यावेळीं दंडकारण्य कृष्णा व [गोदा]वरी ह्यांच्या खोऱ्यांनीं लोकांनीं अगदीं गजबजून गेलें होतें, अशीं वर्णनें बौद्ध जातकांतून आहेत. [Foulkes, in Indian antiquary Vol XVI] तीं स्थूळ मानानें विश्वसनीय मानण्याला कांहीं हरकत दिसत नाहीं. महरट्ट, महाराष्ट्र हें नांवसुद्धां त्याकालीं सिद्ध झालेलें असावें, असा संशय येतो. शकपूर्व सहाशेंच्या सुमारास कात्यायननामक वैय्याकरण झाला. त्यानें विंध्यपर्वताच्या दक्षिणेकडील महिष्मत् प्रदेशाचा व नाशिक शहराचा उल्लेख केला आहे. ह्यशींची उत्पत्ति पुष्कळ ज्या देशांत होते तो देश महिष्मत्. महिष्मती ही त्या देशाची राजधानी अर्वाचीन कालीं, महू, महेश्वर, वगैरे नांवांत ह्या देशाचें नांव ओळखूं येण्याजोगें आहे. सध्यां ह्या प्राचीन महिष्मत् प्रांताला नेमाड अशी संज्ञा असून अद्याप हि ह्या प्रांताची उत्तम ह्यशींबद्दल व हल्यांबद्दल ख्याती आहे. इतकी कीं दहापांच हजार जनावर ह्या प्रांतांतून दरवर्षी बाहेरदेशांत रवाना होतें.

**वार्तीककार कात्यायन १०००–६०० शकपूर्व**

बौद्ध जातकें व कात्या[यन] [वै]य्याकरण ह्यांच्या नंतर दंडकारण्यांतील आर्यलोकांचा व अर्थात् त्यांच्या वसाहतींचा, प्रांतांचा, व स्थलांचा उल्लेख मगध देशाचा व आर्यावर्ताचा चक्रवर्ती राजा जो अशोक मौर्य त्याच्या शिलाशासनांत झाला आहे [ शकपूर्व ३५० ]. त्यानंतर थोड्याच अवधीनें [ शकपूर्व ३०० ] वररुचिनामक प्राकृत वैय्याकरण झाला. ह्यानें महाराष्ट्रीभाषेचें व्याकरण लिहून तिच्या नावांचा उल्लेख हि केला आहे [ शेष महाराष्ट्रीवत् ]. अर्थात् [महा]राष्ट्रदेश त्या[काळीं प्र]सिद्ध होता हें उघड आहे [ शकपूर्व :

**अशोक शकपूर्व ३५०**

चीचें गोत्र यद्यपि कात्यायन होतें तत्रापि तेवढ्यावरून तो व वार्तिककार कात्यायन एकच होते, असें ह्मणतां येत नाहीं. कारण, अशोकाच्या शिलालेखांत निरनिराळ्या दिशांकडील ज्या पांच चार प्रकारच्या प्राकृत भाषा येतात त्या वररुचीच्या व्याकरणांतील पैसाची वगैरे भाषांहून किंचित् जुन्या भासतात. अर्थात् वररुचीच्या व्याकरणांतील प्राकृत भाषांच्या रूपांहून ज्या अर्थी अशोकाच्या शिलालेखांतील प्राकृत भाषा पुरातन आहेत, त्या अर्थी वार्तिककार कात्यायन जर वररुचि असतां तर त्याच्या प्राकृत व्याकरणांतील भाषांचें रूप अशोकाच्या शिलालेखांतील प्राकृत भाषांच्या रूपाहून जुनें निदान त्यांच्या सारखें तरी, असलें पाहिजे होतें. तसा ज्या अर्थी प्रकार नाहीं त्या अर्थी प्राकृत भाषांचा वैय्याकरण जो वररुचि तो कात्यायन वार्तिककाराहून निराळा असून अशोकानंतरचा असावा, असें ह्मणणें भाग पडतें. बुद्धाच्या निर्वाणानंतर ३०० शें वर्षांनीं पालीवैय्याकरण जो **कच्चायनो** तो झाला, असें व्हानसंग ह्मणतो. बुद्ध शकपूर्व ५६१ त ८०० व्या वर्षी वारला व ६०५ त निर्वाणांत त्यानें आपल्या वयाच्या ३६ व्या वर्षी प्रवेश केला. ह्मणजे पालीवैय्याकरण जो **कच्चायनो** तो शकपूर्व ३०५ च्या सुमारास हयात होता. पालीवय्याकरण व प्राकृतवैय्याकरण जर एकच व्यक्ति असेल, तर **महाराष्ट्र्यादि** प्राकृत भाषांचें व्याकरण रचणारा **वररुचि कात्यायन** किंवा **कच्चायनो** शकपूर्व ३०० त होता व तो अशोकानंतर ( शकपूर्व ३५० ) झाला. **वार्तिककार कात्यायना** (शकपूर्व ६००) ला विंध्य पर्वताजवळील **महिष्मत** देशाच्या व नाशिक शहराच्या पलीकडे दक्षिणापथांतील देशांची माहिती नव्हती. **वार्तिककार कात्यायन** जर अशोकानंतर झाला असता

**वररुची कात्यायन शकपूर्व ३००**

तर दक्षिणेंतील पांड्य वगैरे देश त्यानें उल्लेखिले असते; कारण अशोकानें तें उल्लेखिले आहेत. तेव्हां **वार्तिककार कात्यायन** ( शकपूर्व ६००–७००) व पाली व इतर प्राकृत भाषांचा वैय्याकरण जो **वररुचिकात्यायन** किंवा **कच्चायनो** (शकपूर्व ३००) तो, हे दोन भिन्न व्यक्ति भिन्न काळीं झाले, हें उघड आहे. पतंजलि "वाररुचे काव्यं" ह्मणून जो उल्लेख करतो तो ह्या प्राकृत वैय्याकरणाच्या नांवाचा करतो किंवा वार्तिककार कात्यायनाचा करतो, तें स्पष्ट करण्यास सध्यां साधन नाहीं.

बौद्धधर्माभिमानी अशोक (शक पूर्व ३५०) व प्राकृतवैय्याकरण वररुचि कात्यायन [ शकपूर्व ३०० ], ह्यांच्यानंतर भाष्यकार पतंजलि [ शकपूर्व २२५ ] झाला. ह्यानें विदर्भ, अपराना, आंध्र, पांड्य, केरल, वगैरे दक्षिणेतील अनेक प्रांतांची व लोकांची नांवें निर्देशिलीं आहेत. ह्याचा काल लक्ष्यांत घेतां, असा निर्देश होणें अपरिहार्य होतें. परंतु, त्याच्या ग्रंथांत महाराष्ट्राचा नामनिर्देश आलेला आढळला नाहीं. तत्रापि, तत्पूर्व जो वररुचि त्यानें आपल्या प्राकृत व्याकरणांत महाराष्ट्री भाषेचा उल्लेख केला असल्यामुळें, महाराष्ट्रदेशाचा उल्लेख त्या शब्दांत गर्भित आहे. **अशोकानें रास्टिक** किंवा रट्टक असा उल्लेख रट्टांचा, पेटेनिक असा उल्लेख पैठणच्या लोकांचा, अपरान्त असा उल्लेख उत्तर कोंकणांतील लोकांचा, भोज असा उल्लेख अर्वाचीन वैदर्भांतील लोकांचा, व सतिय असा उल्लेख कृष्णातीरीय लोकांचा केला आहे.

**पंतजलि शक पूर्व २२५.**

२६ येणेंप्रमाणें वररुचि कात्यायनाच्या वेळेपासून [ शकपूर्व ३०० ] महाराष्ट्री भाषेचा उल्लेख नामनिर्देशानें झालेला साधार सांपडतो. वररुचीनें महाराष्ट्री भाषेचें व्याकरण रचलें, ह्मणजे ती भाषा त्याच्यापूर्वीं व्याकरणरचनेच्या योग्य होण्यास दोन चार शतकांचा तरी अवधि पाहिजे. ह्मणजे शकपूर्व ७०० च्या सुमारास, अथवा साक्यमुनि बुद्धाच्या वेळेपर्यंत आपण येऊन ठेपलों. त्या सुमारास महाराष्ट्री भाषेचा प्रारंभ झाला असावा. भाषेच्या नावांत देशाच्या व लोकांच्या नावांचा समावेश प्रायः होतोच होतो. दंडकारण्यांत आर्यांनीं शकपूर्व १५०० पासून १००० पर्यंत वसाहत केली आणि वसाहत करतांना व नंतर स्वास्थ्य मिळाल्यावर शकपूर्व ७०० च्या सुमारास महाराष्ट्री भाषा विशिष्ट रूपानें भासूं लागली. पुढें शकपूर्व ३०० च्या सुमारास तिला वररुचि हा व्याकरणकार मिळाला. येथपासून ह्मणजे शकपूर्व ३०० पासून शकोत्तर २०० पर्यंत ह्मणजे ५०० वर्षें महाराष्ट्रीची अत्यंत भरभराटीचीं गेलीं. त्यांचा तपशिल खालीं देतों.

**महाराष्ट्री भाषेचा प्रारंभ शकपूर्व १०००-७००**

२१ चंद्रगुप्तमौर्याचा किंवा अशोकमौर्याचा वंश शकपूर्व २५० च्या

मौर्य ४००--२५०.
शुंग व काण्वायन
२५०-१५०.

सुमारास समाप्त झाला. तदनंतर, शुंगांचें राज्य सुरू झालें. त्यांना एकीकडे सारून काण्वायन नामक ब्राह्मण राजांनीं साम्राज्याची पेशवाई केली (शकपूर्व :२०० ). ह्या काण्वायनांचा पराभव सिमुख शातवाहनानें केला [शकपूर्व १५०]; साम्राज्य चालविण्याचा आव घातला. ह्या सुमारास कलिंगांनीं कलिंगांत व शकांनीं पंजाबांत राज्यें स्थापिलीं. कालान्तरानें शकांनीं आपल्या राज्याचा विस्तार माळव्यांत उज्जनी पर्यंत नेऊन, सर्व आर्यावर्त शकमय करण्याचा प्रसंग आणिला. तेव्हां, शकपूर्व १३५ च्या सुमारास उज्जनीस विक्रमादित्य नामेकरून एक अलौकिक वीरराजा उत्पन्न झाला आणि त्यानें शकांचा मोटा पराभव केला. तेव्हांपासून विक्रमसंवत् सुरू झाला. शकांचीं उचलबांगडी यद्यपि माळव्यांतून झाली, तत्रापि अपरान्तांत ( नास्ति परः अंते. प्रांतः यस्मात्=ज्याच्यापलीकडे प्रांत नाहीं, समुद्र आहे तो देश ) व अपरान्ताजवळील जुन्नर वगैरे घाटावरील प्रांतांत त्यांची चिकाटी कांहीं काल [ सुमारें पन्नास वर्षें ] होती. ती चिकाटी विक्रमसंवत् १३५ त व इ. स. ७८ त एका शातवाहन राजानें शकांचा पूर्ण पराभव करून कायमची सोडविली. ह्या वेळेपासून शातवाहनसंवत् सुरू झाला. शकांचा प्रचंड व प्राणघेण्या पराभव करणाऱ्या ह्या दोन्ही पराक्रमी वीरराजांचा गाथासप्तशतींत उल्लेख आला आहे. तो असा:—

विक्रमादित्य
शकपूर्व १३५

शातवाहन
उर्फ
शालिवाहन
शक ०

[ महाराष्ट्री ]

संवाहणसुहरसतोसिएण देन्तेण तुह करे लक्खम् ।
चलणेण विक्कमाइत्तचरिअँ अणुसिक्खिअं तिस्सा ॥ ६४ ॥

गाथा सप्तशती—शतक ५.

---

१ सेतुबंध, उच्छ्वासक ७, श्लोक ४२, रामदासकृत टीकाः—"अंन्तः प्रान्तेऽन्तिके नाशे स्वरूपे च मनोहरे॥"

[ संस्कृत ]
संवाहनसुखरसतोषितेन ददता तव करे लाक्षाम् ( अथवा ) लक्ष्म्।
चरणेन ( अथवा चलनेन ) विक्रमादित्यचरितं अनुशिक्षितं तस्याः ॥

( महाराष्ट्री )
आवण्णाइँ कुलाइं दो व्विअ जाणन्ति उण्णइं णेउम् ।
गोरीअ हिअअदइओ अहवा सालाहण णरिन्दो ॥ ६७ ॥
गाथासप्तशती—शतक ५.

( संस्कृत )
आपन्नानि ( किंवा आपर्णानि ) कुलानि द्वावेव जानीत उन्नतिं नेतुम्।
गौर्या हृदयदयितोऽथवा शातवाहननरेन्द्रः ॥ ६७ ॥

गाथासप्तशती ऊर्फ ७०० गाथांचा संग्रह हालसातवाहनानें केला, असें सप्तशतीच्या पहिल्या शतकाच्या तिसऱ्या गाथेंत हाल स्वतःच लिहितो. अर्थात्, हाल सातवाहनाच्या पूर्वी झालेले हे विक्रमादित्य व सातवाहननरेंद्र असले पाहिजेत. पैकीं, शकपूर्व १३५ व्या वर्षी शकादि म्लेच्छांचा ज्यानें कोरुर येथें पराभव केला आणि ज्याच्या नांवानें विक्रमसंवत् नर्मदेच्या उत्तरेस प्रचालित झाला, तोच हा विक्रमादित्य असावा. आणि शकयवनपल्हवादि म्लेछांचा पराभव करून गोब्राम्हणांचा प्रतिपाल करणाऱ्या अशा कोण्या तरी शातवाहनकुलोत्पन्न राजाचा उल्लेख सातवाहननरेंद्र या नावानें गाथेंत केलेला असावा. शातवाहन आणि शातकर्णि हे दोन शब्द एकच अर्थाचे वाचक असल्यामुळें, वायुपुराणांत तिसरें ज्याचें नांव येतें तो शातकर्णि हा सातवाहननरेंद्र असेल. नाणेघाटांत ह्याचें चित्र दिलेलें आहे. ह्मणजे शक० नंतर हाल झाला व त्याच्या-पूर्वीच्या विक्रमादित्य व शातवाहन ह्या दोन पराक्रमी वीरपुरुषांचा उल्लेख त्यानें संग्रह केलेल्या गाथांतून येतो. हा हाल प्राकृत भाषांचा मोठा भोक्ता होता. पिटर्सननें बुंदीहून आणिलेल्या गाथासप्तशतीच्या प्रतीची समाप्ति येणें प्रमाणें दिली आहे (Peterson's 3rd Report):—

" राएण विरइआए कुन्तलजणवअइणेण हालेण ।
सत्तसई अ समत्तं सत्तममज्झासअं एअम् ॥

इति सप्तम शतकम् । इति श्रीमत्कुन्तलजनपदेश्वर प्रतिष्ठानपत्तनाधीश शातकर्णोपनामक द्वीपिकर्णात्मज मलयवतीप्राणप्रिय कालापप्रवर्तकशर्ववर्मधीसख मलय-

वस्तुपदेशपाण्डितभूत त्यक्तभाषात्रयस्त्रीकृतपैशाचिकपण्डितराजगुणाढ्यनिर्मित-भस्मीभवद्बृहत्कथावशिष्टसप्तमांशावलोकनप्राकृतादिवाक्यंचकप्रीत कविवत्सल हालाद्युपनामक श्रीसातवाहननरेंद्रनिर्मिता विविधान्योक्तिमयप्राकृतगीर्गुंफिता शुचिरसप्रधाना काव्योत्तमा सप्तशत्यवसानमगात् ॥ ''

ह्या समाप्तीतील हकीकत पूर्वपरंपरागत ( कथासरित्सागरसदृश ) आलेली असून विश्वसनीय दिसते. हींत महाराष्ट्री, मागधी, शौरसेनी, पैशाची व अपभ्रंश अशा पांच भाषांवर प्रेम ठेवणारा हाल राजा होता, असें ह्मटलें आहे. कातंत्र्याकरणाचा प्रवर्तक **शर्ववर्म** व बृहत्कथा पैशाचींत लिहिणारा **गुणाढय** ह्याच्या पदरीं होते असें हि ह्मटलें आहे. परंतु, ह्या बाहेरच्या शिफारसी झाल्या. खुद्द गाथासप्तशतींत प्राकृत भाषांवरचें आपलें प्रेम हालानें येणें प्रमाणें कटाक्षानें व्यक्त केलें आहे:—

[ महाराष्ट्री ]

अमिअं पाअउकव्वं पढिउं सोउं अ जे ण आणन्ति ।
कामस्स तत्ततन्तिं कुणन्ति ते कहँ ण लज्जन्ति ॥ २ ॥

गाथासप्तशती—शतक १

( संस्कृत )

अमृतं प्राकृतकाव्यं पठितुं श्रोतुं च ये न जानन्ति ।
कामस्य तत्वचिंतां कुर्वंति ते कथं न लज्जन्ते ॥

**जिवंत व महाराष्ट्री मेलेली संस्कृत भाषा.** ह्या गाथेंत प्राकृतकाव्याला हाल अमृत ह्मणजे जिवंत ह्मणतो. अर्थात्, संस्कृतकाव्याला तो मृत किंवा मेलेलें समजतो हें उघड आहे.

महाराष्ट्रींत कोट्यवधि गाथा आमच्यापूर्वी झाल्या होत्या असें हि हा राजा नमूद करतो:—

( महाराष्ट्री )

सत्त सताइं कइवच्छलेण कोडीअ मज्झआरम्मि ।
हालेण विरइआइं सालंकाराणँ गाहाणम् ॥ ३ ॥

गाथासप्तशती–शतक १

**( संस्कृत )**

सप्तशतानि कविवत्सलेन कोटे मध्ये ।
हालेन विरचितानि सालंकाराणं गाथानाम् ॥

ह्मणजे शकपूर्व ७०० पासून शक ० पर्यंत महाराष्ट्रींत विस्तृत सारस्वत निर्माण झालें होतें, असें हाल ह्मणतो. गाथासप्तशतींत **( निर्णयसागरी )** दिलेल्या कवींची यादी पाहिली ह्मणजे हालाचें विधान अतिशयोक्तीचें नसून निव्वळ यथार्थ होतें, असें दिसून येतें.

गाथासप्तशतींत हालानें स्वतःच्या बऱ्याच गाथा व **विक्रमराजाची** एक गाथा ( २।३४ ) दिली आहे. हा विक्रमराजा बहुश: प्रसिद्ध विक्रमादित्य असावा. ह्या च सुमाराला "सेतुबंध" नामक सर्वोत्कृष्ट प्राकृत काव्याचा कर्ता जो **कालिदास** तो झाला. प्रवरसेन राजानें काव्य रचलें व कालिदासानें तें सुधारलें, असें ह्या काव्याच्या पहिल्या उच्छ्वासकाच्या नवव्या गाथेंत ह्मटलें आहे.

**( महाराष्ट्री )**

अभिणवराआरद्धा चुक्कक्खलिएसु विहडिअपरिट्ठविआ ।
मेत्ति व्व पमुहरसिआ णिव्वोढुं होइ दुक्करं कव्वकहा ॥ ९ ॥

**[ संस्कृत ]**

अभिनवराजारब्धा च्युतस्खलितेषु विघटितपरिस्थापिता ।
मैत्रीव प्रमुखरसिका निर्वोढुं भवति दुष्करं काव्यकथा ॥

राजतरंगिणींत लिहिल्याप्रमाणें प्रवरसेन कलिवर्ष ३१५९ त राज्यावर आला. त्यावेळीं तो अभिनवराजा ह्मणजे गादीवर नवीन आलेला राजा असतांना, त्यानें सेतुबंधनामक प्राकृतकाव्य आरंभिलें आणि कालिदासाकडे सुधारण्यास दिलें. असलें श्रीमंतांचें काव्य सुधारून आद्यन्त सारख्या योग्यतेचें करणें जन्मापासून मरेपर्यंत मित्रत्व अबाधित ठेवण्याप्रमाणेंच अवघड आहे, अशी कालिदासानें उत्कृष्ट उपमा योजिली आहे. कलिवर्ष ३१५९ ह्मणजे विक्रमसंवत् ११५ येतो.

**पहिला कालिदास संवत् २०— संवत् ११५**

**तत्कृत ग्रंथ.**

१ अभिज्ञानशाकुंतल, २ विक्रमोर्वशी व ३ मालविकाग्निमित्र, हीं तीन संस्कृतप्राकृत नाटकें ह्या कालिदासाचीं होत. पैकीं, भेळशाचा राजा अग्निमित्र आणि मालविका ह्यांचें ऐतिहासिक वृत्त ह्या कालिदासाला समीपतर असून, तें त्याच्या नाट्यकलेचा विषय होण्याजोगें होतें. विक्रमोर्वशीतील राजा विक्रम ऐतिहासिक विक्रमादित्याचें काव्यरूपक असण्याचा संभव आहे. अभिज्ञानशाकुंतलहि ह्याच कालिदासाचें असावें, असें त्यांतील शुद्ध सौरसेनीवरून वाटतें. मेघदूत जर ह्याचेंच असेल तर एतत्समकालीन जो अश्वघोष त्यानें त्याची नकल केली असेल. मग, एवढें मात्र कबूल करावें लागेल कीं,

दिङ्नागानां पथि परिहरन् स्थूल हस्तावलेपान्।

ह्या ओळींतील दिङ्नाग शब्द बुद्धधर्मानुयायी पांचव्या शतकांतला जो दिङ्नाग त्याचा वाचक नसून, इतर शब्दांप्रमाणें सहज तेथें पडला आहे आणि दिङ्नाग बौद्धाशीं त्या शब्दाचा संबंध जोडण्यांत टीकाकारांनीं केवळ पदरची मखलाशी केलेली आहे. परंतु, मल्लिनाथाची माहिती इतिहाससमर्थित आहे असें मानलें तर, हें मेघदूत काव्य दिङ्नागाचा समकालीन जो दुसरा कालिदास त्याच्या पदरीं बांधावें लागेल व अश्वघोषाचा नकल्या त्याला ठरवावा लागेल. कनिष्कानें जमविलेल्या बुद्धमंडळांत असणारा हा अश्वघोष कनिष्काच्या [ संवत ०(Fleet) पासून संवत् ३४० (भांडारकर) ] कोणत्याहि काळांत असला, तत्रापि ह्या पहिल्या कालिदासाच्या काळाला अवरोध होत नाहीं.

**गाथाशप्तशतींत कालिदासाचा उल्लेख**

गाथासप्तशतींत [ १–२१, १–६८ ह्या दोन गाथा कालिराअ व कालइव ह्या प्राकृत नावांवर आहेत. त्या कालिदासाच्या असाव्या, असा बळकट संशय येतो. इतकेंच कीं कालिदास असें नांव नाहीं. परंतु, 'ज्ञानदेव' बद्दल 'ज्ञानराज' असा पर्याय योजण्याची चाल फार पुरातन आहे, हें लक्ष्यांत घेतलें असतां, कालिराज ह्मणजे कालिदास असण्याचा संभव आहे.

**काश्मीरचा प्रवरसेन विक्रम संवत् ११५–१४५**

कालिदासाचा आश्रयदाता जो प्रवरसेन त्याच्या हि कांहीं गाथा सप्तशतींत दिल्या आहेत.

इतर अनेक कवींचा उद्धार गाथासप्तशतींत झालेला मागें सांगितलाच आहे.

२८ शकपूर्व १५० पासून शकोत्तर १५० पर्यंत ३०० वर्षें राज्य करणाऱ्या ह्या शातवाहनांच्या अमदानींत महाराष्ट्री भाषेचा अत्यंत उत्कर्ष झाला. उत्कर्षाचें कारण शातवाहनांचा पराक्रम व राज्यविस्तार होय. पराक्रमाचें चिन्ह शातवाहनांनीं स्थापिलेला शाकसंवत्सर असून, राज्यविस्ताराचें स्मारक महाराष्ट्री भाषेचा उपयोग इतर भाषांना मागें सारून सर्व भारतवर्षांत ग्रथलेखनांत होऊं लागला, हें होय. शाकसंवत्सर शक नांवाच्या म्लेच्छ लोकांनीं स्थापिला, असा भांडारकरादि विद्वानांचा समज आहे. परंतु, तो निराधार आहे, असें खात्रीनें ह्मणतां येण्यास प्रमाणें आहेत.

**शकसंवत् शक, यवन, पारद, खश, खरोष्ट वगैरे म्लेछांनीं स्थापलेला नाहीं.**

(१) प्रथम, धर्मकृत्यांत म्लेछांनीं स्थापिलेला काल भारतवर्षांत कधींहि मान्य झाला नाहीं व होणार नाहीं. फसली, अरबी, हिजरी, जलाली, इसवी वगैरे अनेक सन येथें आगंतुकांनीं सुरू केले, परंतु, धर्मकृत्यांत त्यापैकीं एकाचाहि प्रवेश झाला नाहीं. शाकसंवत्सराचा ज्याअर्थीं धर्मकृत्यांत प्रवेश झालेला आहे, त्याअर्थीं हा संवत्सर म्लेछांनीं सुरू केलेला नसला पाहिजे, हा निश्चय. (२) शककालाचा Vonones मूलोत्पादक धरला असतां, कनिष्काला इसवी २८३-३०६ त ढकलावा लागतो. कनिष्काला इसवी ३०० त आणिला ह्मणजे इसवीच्या पहिल्या शतकांतील अश्वघोषाला इसवी ३०० त ओढावा लागतो. परंतु, ह्वानसंग, चिनी संयुक्तरत्नाकार, Record of Indian patriarchs, वगैरे चिनी ग्रंथांत कनिष्काचें अश्वघोषाशीं समकालीनत्व प्रख्यापिलेलें आहे (Takakusu on वसुबंधु in J. R. A. S. for 1906). तेव्हां, कनिष्काला इसवीच्या प्रारंभाच्या जवळ नेणें जरूर आहे. अर्थात्, व्होनोनिस शककालोत्पादक होऊं शकत नाहीं. (३) Maues व Gondophares हे समकालीन होते. पैकीं, Maues शक होता व Gondophares पारद (Parthian) होता. ह्या दोघांनीं कालगणना शककालानें केली, असें भांडारकरांचें ह्मणणें आहे. येथें असा विरोध येतो कीं, पारद शकांचा नायनाट

करणारा असून शकांचाच काल कसा चालवील? आपला काल सुरू करील. तेव्हां, Maues व Gondophares ज्या कालानें गणना करतात, तो भारतवासी तिसऱ्याच कोणातरी चक्रवर्ती व पराक्रमी राजाचा असला पाहिजे. तो बहुश: विक्रमसंवत् असावा (Fleet, J. R. A. S. for 1906) (४) शकसंवत् नर्मदेच्या दक्षिणेस प्रचलित आहे व उत्तरेस विक्रमसंवत् आहे. असें असून उत्तर हिंदुस्थानांत मथुरा, साकेत वगैरे स्थलीं राज्य करणारे म्लेछ शकसंवताचा उपयोग करीत, असें ह्मणणें वस्तुस्थितिविरोधक होतें. प्राय: म्लेछ लोक ज्या प्रांतांत जात त्यां प्रांतांत प्रचलित असलेला काल प्रथम योजित. जसें, इंग्रज तीसचाळीस वर्षांपूर्वी फसली किंवा हिजरी सनानें हिंदुस्थानांत कालगणना करीत. शक, पारद, यवन, वगैरेंचीं राज्यें हिंदुस्थानांत फार वर्षें न टिकल्यामुळें, त्यांना आपले सन (असलेच तर) इकडे प्रचलित करण्याला प्राय: अवधि व स्वास्थ्य सांपडलें नाहीं. म्लेछ लोकांनीं शक काल स्थापिला नसावा, असें ह्मणण्यास ही इतकीं विरोधी कारणें आहेत. आतां शककाल शातवाहनराजांनीं नर्मदेच्या दक्षणेस स्थापिला, ह्या विधानाला पोषक अशीं कारणें देतों:—

**शकसंवत् धर्म कृत्यांत योजतात, तस्मात् तो म्लेछ नाहीं.**

(१) अत्यंत बलवत्तर कारण हें कीं, म्लेछांनीं सुरू केलेला कोणताहि काल हिंदू लोकांच्या धर्मकृत्यांत ग्राह्य धरला जाणें केवळ अशक्य आहे. अर्थात्, शककाल ज्याअर्थी धर्मकृत्यांत ग्राह्य धरला जातो, त्या अर्थी तो कोणा तरी हिंदू राजानें स्थापिलेला काल आहे.

**शक शब्दाचे दोन अर्थ.**

[२] युरोपियन व आशियाटिक विद्वान लोक शक ह्या द्व्यर्थी शब्दानें चकलेले आहेत. शक ह्मणजे म्लेछ असा एक अर्थ सर्वत्र मान्य आहे परंतु शक या शब्दाच्या दुसऱ्या अर्थाकडे बहुतेकांनीं कानाडोळा केला आहे. दुसरा अर्थ हा. शक ह्मणजे शातवाहन अथवा शालवाहन राजे, अथवा त्या राजांपैकीं कोणी तरी एक प्रख्यात शककर्ती किंवा कालकर्ती व्यक्ति. नाणेघांटांतील पांडवलेण्यांत जी सहा सनाम चित्रें कोरलेलीं आहेत त्यांत "कुमारो हकु सिरि" हें एका राजपुत्राचें नांव आहे. हा हकु शब्द सकु शब्दाचेंच [स चा ह होऊन] दुसरें रूप आहे. असा स

ची ह आंध्रभृत्यांच्या दुसऱ्या एका नांवात झालेला आहे. वायुपुराणांतल्या यादींतील सातवें नांव " हाला " चें आहे. हें नांव ' साल ' असें हि प्रसिद्ध आहे ह्या " साला'चें च संस्कृत " शाल " होऊन, " शालो हालनृपेपिच," असें त्रिकांडशेषांत रूप आलेलें आहे. देशीनाममालेंत " साला-हणम्मि हलो " असें सादि रूप येतें. तात्पर्य, स व ह या उच्चारांचीं अदलाबद्दल आंध्रभृत्यांच्या लेखांत होतें. हा सकु किंवा हकु राजपुत्र मोटा पराक्रमी असल्यामुळें, त्याची मूर्ति इतर पराक्रमी स्त्री पुरुषांबरोबर नाणेघाटांत कोरलेली आहे. ह्या सातकर्णिपुत्र सकु राजपुत्रावरून सकुसंवत्सर सुरू झाला. सकु हें रूप १ शक १०४९ तील शिलारांचें ताम्रपट ( Jbbras for 1904 ), २ शक ११९५ तील पंढरपुरच्या चौऱ्याशीच्या शिलालेखांत सहासातदां [ग्रंथमाला], ३ शत १२३३ तलि चोख्यामेळ्याच्या शिलालेखांत ( ग्रंथमाला ), ४ शक १२८९ तील नागांव येथील शिलालेखांत [ग्रंथमाला], शक १३१९ तील मठ येथील शिलालेखांत [ म. इ. सा. खंड ८, प्रस्तावना, पृष्ठ ३३ ], व इतर अनेक स्थलीं आलेला आहे.

**सात=साक** ( ३ ) अशोकाच्या वेळीं दक्षिणेंत रट्ट, सत्त, आंध्र व भोज असें पश्चिम, दक्षिण, पूर्व व उत्तर दिशेस क्षत्रिय वसाहत करून व अनार्य लोकांना जिंकून होते. त्या पैकीं, सतिय किंवा सत्त किंवा सतिय ह्मणून जे क्षत्रिय होते त्यांचेच नांव सातवाहन या शब्दांतील ' सात ' या अवयवांत दृष्टीस पडते. ह्या सात शब्दाचीं दोन रूपें असत; एक साल व दुसरें साक. साक ( किंवा सक ) रूप मढरीपुत सकसेन ( संस्कृत शकसेन ) ह्या नावांत गोचर होतें. नाणेघाटांतील सहा चित्रांत एका चित्राचें नांव " महारठी " आहे. ह्या रठी किंवा रट्टाची मदत घेऊन सत्त किंवा सात किंवा साल किंवा साक यांनीं म्लेछांचा पराभव केलेला आहे. हा सत्तिअ शब्द शक्तिक, सक्तिअ अशा परंपरेनें उद्भवलेला आहे.

(१) शक्त=सत्त=सात=शाल ( संस्कृत शाल, संस्कृत अपभ्रंश शालि )

(२) शक्त = सक्क = साक { संस्कृत शाक, शाक हें विशेषण समजून त्याचें मूळ प्रकृति शक, अशीं अज्ञ संस्कृतज्ञांची व्युत्पत्ति. }

मुक्त = मुक, मुत्त
रक्त = रत्त, रग्ग

वगैरे क्त ची त्त किंवा क्क अशा अंताचीं दुहेरीं रूपें महाराष्ट्रींत व महाराष्ट्रीच्या अपभ्रंशांत होतात.

[४] साल [ वृक्षविशेष ] वृक्षाला महाराष्ट्रांत साक, साग ह्मणण्याचा परिपाठ पुरातन आहे. डोंगरावरील लोक तर साक असाच उच्चार करतात ह्मणजे ल चा क महाराष्ट्रींत व मराठींत होतो. शातपर्ण किंवा सप्तपर्ण=सातवण्ण किंवा सत्तवण्ण=सातवाण=साअवाण=साकवाण=सागवाण.

[५] पुराणांत हि परंपरा अशीच सांगितली आहे. शातवाहन राज्याच्या जन्मापासून शालिवाहनशककाल सुरूं झाला अशी पौराणिक परंपरित माहिती आहे. ज्योतिषांची हि परंपरित माहिती अशीच आहे. मुहूर्तमार्तंडाच्या शेवटीं:—

त्र्यंकेंद्रपरिमिते वर्षे शालिवाहनजन्मतः ॥

असा उल्लेख आहे. अच्युतरायाच्या हरिहर येथील शक १४६० तील शिलालेखांत " शालिवाहनानिर्णितशकवरुषक्रमागते " असे शब्द आहेत. " शालिवाहनापासून ह्मणजे शालिवाहन राजाच्या जन्मापासून निघणाऱ्या " असा " शालिवाहननिर्णीत " ह्या समस्तपदाचा अर्थ आहे. मजजवळ शक ४१० तील ताम्रपटांत " साळीवान सक " असे शब्द आहेत. गुर्जरराजा दुसरा दड्ड याच्या लेखांत ३८० ही शकसंवत्सरानेंच गणना केलेली आहे. तात्पर्य, शक हें हिंदुराजाचें नांव आहे, अशी भावना व स्पष्ट माहिती परंपरेनें ह्या देशांत आहे ज्याच्या जन्मापासून ही कालगणना सुरूं झाली, तो बहुशः कुमार हकु अथवा सकु सातवाहन असावा. सातवाहनसकवरुस ह्मणजे शातवाहनवंशांतील शक अथवा सक अथवा सकु अथवा हकु राजपुत्राच्या किंवा राजाच्या जन्मापासून धरलेलें वर्ष.

२९ शककाल, शाककाल, शकनृपकाल, शातवाहनशककाल, शालिवाहन शक, सकु, सके, शाके साळिवान सके अशा नाना रूपांनीं हा काल उल्लेखिलेला सांपडतो व हीं सर्व रूपें शक ह्या मूळ शब्दाचे अपभ्रंश

आहेत. दक्षिणेकडील लोक कृष्णेंत किंवा गोदेंत स्नान करतांना परम श्रद्धेनें " शालिवाहनशका " चा जो उच्चार करतात, तो पवित्र व अम्लेछ आहे, अशा समजुतीनें करतात. सोंवळ्यांत व धर्मकृत्यांत म्लेच्छ शब्द उच्चारण्याची किळस हिंदुलोकांना फार प्राचीन काळापासूनची आहे [ तस्मात् ब्राह्मणेन न म्लेछितवै ] ती चाल शकनामक म्लेछांच्या क्षणिक अमदानींत त्यांनीं सोडली असेल, हें कालत्रयी हि संभवत नाहीं. शककाल म्लेछस्थापित नाहीं, हिंदुस्थापित आहे, एवढें गृहीत धरून पुढें चालण्यास, हें एकच कारण बस आहे.परंतु, आर्यांचा व म्लेछांचा बेटी व्यवहार होत असे, आर्य धर्मकृत्यांत म्लेछकाल योजीत, वगैरे बाटेगिरीच्या कल्पना पसरविण्यांत भूषण मानणाऱ्या शोधकांना असले विपरीत अपसिद्धान्त फारच गोड वाटतात, असें दिसतें. अपसिद्धांताना पोषक असा दुसरा एक असाच शब्द आहे. तो शब्द

**क्षत्रप शब्द फारसी नाहीं.**

"क्षत्रप" हा होय. डा. भांडारकर हा शब्द Persian [?] 'Satrap' शब्दापासून संस्कृतांत 'क्षत्रप' या रूपानें आला, असें स्वच्छ सांगतात. [History of Dekkan, Section V]. Persian ह्मणजे Modern Persian तर नव्हेच. तेव्हां, Persian ह्मणजे Old-Persian असा डाक्टरांचा गर्भितार्थ असावा. Modern Persian इसवीच्या १० व्या शतकापासून आतांपर्यंतची समजण्याची चाल आहे; व Old Persian चवथ्या शतकापासून दहाव्या शतकापर्यंतची फारसी भाषा, असा संकेत आहे. त्यापूर्वीं पाल्हवी, आवेस्ती वगैरे भाषा होत्या. त्यांत

**क्षत्रपतिशब्द ब्राह्मणांत व संहितेंत येतो.**

हा शब्द "घोइत्रपैनि" अशा रूपानें येतो. परंतु, हा शब्द तैत्तिरीय संहितेंत व ब्राह्मणांत [ तैत्तिरीय संहिता, प्रथमकांड, अष्टमप्रपाठक, अनुवाक १४ व तैत्तिरीय ब्राह्मण प्रथमकांड, षष्ठःप्रपाठकः ] " क्षत्राणां क्षत्रपति रसि, " " क्षत्राणां क्षत्रपतिरसीत्याह । क्षत्राणामेवैनं क्षत्रपतिं करोति । " वगैरे स्थलीं आवेस्त्याच्या पूर्वीपासून येत आहे. तेव्हां हा शब्द फारशीतून किंवा आवेस्तीतून उसना घेतलेला नाहीं; मूळ संस्कृतांतला च आहे. संस्कृतांतून आवेस्तींत उसना घेतला असण्याचा संभव मात्र जास्त आहे. क्षत्रपति शब्द पंजाब व अफगाणिस्थान ह्या प्रांतांत बोलल्या जाणाऱ्या पैसाची उच्चारांत सत्रप, सत्रपति, असा होऊन

"क्षत्रप" अशा रूपानें ग्रीक, पल्हव वगैरे लोकांत प्रचलित झाला. क्षत्रप व महाक्षत्रप या शब्दांची अशी परंपरा असल्यामुळें, एखाद्या शातवाहनाची बायको एखाद्या हिंदू क्षत्रपाची किंवा महाक्षत्रपाची मुलगी असून, म्लेच्छ नसूं शकेल. क्षत्रप, महाक्षत्रप, ह्या हिंदुस्थानांत, विशेषतः पश्चिम हिंदुस्थानांत त्या कालीं प्रचलित असलेल्या पदव्या म्लेच्छ उडाणटप्पूंनीं घेतलेल्या आहेत. क्षत्रपति ह्याचा अपभ्रंश होउन छत्रपति असा शब्द पश्चिम हिंदुस्थानांत हजारो वर्षें प्रचलित होता व तो तीनशें वर्षांमागें शिवाजीच्या विरुदावलींत प्रविष्ट होऊन, अद्याप हि अजरामर आहे. ह्या क्षत्रपति, छत्रपति शब्दाचा उल्लेख सी-यू-कींत ( Beals' Translation ) आला आहे.

**क्षत्रपति शब्द सी-यू-कीं त येतो.**

नरपति, हयपति, गजपति व क्षत्रपति, असे चार प्रकारचे राजे हिंदुस्थानांत असून, पश्चिम हिंदुस्थानांतील राजांना क्षत्रपति, छत्रपति, ही पदवी लावतात, असें सी-यू-कींत ( A. D. 600 ) ह्मटलें आहे. शिवाजी पश्चिम हिंदुस्थानांत झाला, तेव्हां त्याला क्षत्रपति-छत्रपति ही पदवी इतिहासोक्त, शास्त्रोक्त व रुढियुक्त मिळाली, ह्यांत बिलकुल संशय नाहीं. व्युत्पत्तीची चूक झाल्यामुळें, डाक्टरांनीं म्लेछांचीं आर्याशीं लग्नें लावून दिलीं आहेत!

**क्षत्रपति-छत्रपति ही पश्चिम हिंदुस्थानचा राजा जो शिवाजी त्याची पदवी होते.**

३० विद्वज्जनचकोरचंद्र अशा ह्या महाराष्ट्री प्राकृत भाषेला शिरसा प्रणाम करणाऱ्या शातवाहनांची ऊर्फ शाकराजांची रियासत शक १५० पर्यंत चालली. शकपूर्व १५० त सीमुख शातवाहनानें सुंग व काण्वायन वंशांचा नाश करून मगधाचें सिंव्हासन स्वतःच बळकाविलें. तेव्हां पासून शकोत्तर १५० पर्यंत शातवाहनांची छाप उत्तर व दक्षिण हिंदुस्थानांत चांगली बसलेली होती. ती इतकी कीं, त्यांच्या राज्याला तीन समुद्रांचा—पूर्व, पश्चिम, दक्षिण—स्पर्श होतो, अशी ह्मणच पडून गेली. ह्या राजकीय छापीबरोबर त्यांच्या भाषेची ह्मणजे महाराष्ट्रीची हि छाप भारतवर्षांत सर्वत्र बसली. कालिदास माळव्यांत व काश्मीरांत राहत असे, परंतु त्याच्या नाटकांतील प्राकृत भाषा

**सातवाहनांच्या साम्राज्याबरोबर महाराष्ट्रीचें साम्राज्य.**

अंशतः महाराष्ट्री आहे. गाथासप्तशतींत दिलेली विक्रमराजाची गाथा किंवा काश्मीरच्या प्रवरसेनाची गाथा किंवा काश्मीरस्थ प्रवरसेन–विरचित सेतुबंधाची भाषा महाराष्ट्रीच आहे. राजकीय साम्राज्याबरोबर व वजनाबरोबर भाषेचें हि साम्राज्य व वजन वाढतें. इसवीच्या १७ व्या व १८ व्या शतकांत यूरोपांत सर्वत्र फ्रेंच भाषेचें जसें साम्राज्य झालें किंवा एकोणिसाव्या व विसाव्या शतकांत हिंदुस्थानांत जसें परक्या इंग्रेजीचें साम्राज्य झालेलें आहे, तोच प्रकार शक पूर्व १५० पासून शकोत्तर १५० पर्यंत व पुढें हि कांहीं काल महाराष्ट्रीचा झाला. पेशव्यांच्या अमदानींत खुद्द दिल्लीचे पातशाहा मराठी लिहूं व बोलूं लागले आणि कायथ लोक व रजपूत राजे मराठी मायने घोकूं लागले किंवा म्हैसूरचे कानडीअप्पा मराठींत हिसाब ठेवूं लागले. हा सर्व प्रभाव राजकीय साम्राज्याचा व सामर्थ्याचा होय.

**शातवाहनांच्या साम्राज्याची धूळधाण–तत्समवेत महाराष्ट्री भाषेचा पडित काळ.**

३१ शक १५० नंतर शातवाहनांचें साम्राज्य नष्ट झालें. विशिष्ट कारण काय तें माहित नाहीं. नित्याप्रमाणें अंतस्थ दौर्बल्य व बहिःस्थ अनार्यांचें प्राबल्य हीच कारणें असावीं. शातवाहनांच्या आपूर्वपश्चिमसमुद्र राज्यांत लहान मोठे संस्थानिक होते. त्या पैकीं महाराष्ट्राच्या उत्तरेस व पश्चिमेस कांहीं राष्ट्रकूट होते त्यांनीं बंड केलें. चेदिदेशांत कलचूरींनीं आपला शक सुरू केला (शक १७०). दक्षिणेंत कदंबांनीं व म्लेंछ पल्लवांनीं आपापलीं स्वतंत्र संस्थानें स्थापिलीं. अभीर, पिंडार, पुलिंद, शक, वगैरेंनीं हि दंगे माजवले. अशी शातवाहनांच्या राज्याची शोचनीय वाताहत झाली. त्याबरोबर महाराष्ट्री भाषेला हि पडितकळा लागली. शक १५० पासून शक ४५० पर्यंत सुमारें तीनशें वर्षें महाराष्ट्रांत कोणी चक्रवर्ती राजा नव्हता; लहान लहान संस्थानें व मवास होते. नर्मदेच्या उत्तरेस शक २५० च्या सुमारास गुप्तांचें साम्राज्य सुरू झालें. समुद्रगुप्ताच्या जयस्तंभांत ( शक २४६—२९६ ) दक्षिणेतील कांहीं संस्थानिकांचीं नांवें येणेंप्रमाणें दृष्टीस पडतात ( Fleets गुप्त inscriptions ).

**शक १५०–४५० पर्यंचे महाराष्ट्रांतील कित्येक संस्थानिक.**

| | राजा | देश |
|---|---|---|
| १ | महेंद्र | कोसल ( रायपूर–संबळपूर ) |
| २ | व्याघ्रराज | महाकांतार ( विंध्याद्रीच्या आसपासचा डोंगराळ मुलूख ) |
| ३ | मंटराज | केरल ( मलबार ) |
| ४ | महेंद्र | पिष्टपुर ( पिठापूर–मद्रास ) |
| ५ | स्वामिदत्त | कोट्टूर ( नाशिक, कोटरे ) |
| ६ | दमन | एरण्डपल्ल ( एरंडोल–खानदेश ) |
| ७ | विष्णुगोप | कांची ( कांचीवरम् ) |
| ८ | नीलराज | अवमुक्त [ अनभिज्ञात ] |
| ९ | हस्तिवर्म | वेंगी [ वारंगल–मछलीपट्टम् ] |
| १० | उग्रसेन | पालक्क [ अनभिज्ञात ] |
| ११ | कुबेर | देवराष्ट्र [ कऱ्हाड–सातारा जिल्हा, सध्याचें देवराष्ट्रें, येथें जुने अवशेष फार आहेत. ] |
| १२ | धनंजय | कुस्थलपुर [ कोठलूर ] |

पैकीं व्याघ्रराज, स्वामिदत्त, दमन व कुबेर हे संस्थानिक विंध्याद्रि,

**महाराष्ट्रीचा ऱ्हास व अंत.**

नाशिक, खानदेश, व कऱ्हाड या प्रांतांभोवतीं शक २५०–३०० च्या सुमारास राज्य करीत होते, आणि गुप्तांना कदाचित् करभार देत होते. ह्या संस्थानिकांची वजनदारी बेताचीच पडल्यामुळें, महाराष्ट्री भाषेचा बोज रहावा तसा राहिला नाहीं व ती भाषा उत्तरोत्तर मागसत चालली. शातवाहनांच्या कारकीर्दीत पैठण हें प्राकृत विद्वानांचें व सरस्वतीभक्तांचे माहेरघर बनलें होतें. तें ह्या तीनशें वर्षांत मोडून, शक ४५० च्या सुमारास महाराष्ट्री भाषा व सारस्वत ह्यांचा अंत झाला.

**अपभ्रंश.**

३२ शक १५० पासून शक ४५० पर्यंतच्या अवधींत महाराष्ट्री भाषा अपभ्रष्ट झाली. नागर महाराष्ट्रीचे पुरस्कर्ते जे शातवाहन राजे आणि तदाश्रित विद्वान व प्रतिभासंपन्न ग्रंथकार त्यांचे नियमन नाहींसें झाल्याबरोबर महाराष्ट्री भाषा सर्वस्वीं अनागर लोकांच्या हातांत गेली

आणि अपभ्रष्ट झाली. नागर महाराष्ट्री ऐन रंगांत असतां, अनागर अपभ्रंश केवळ खालच्या प्रतीच्या अनागर लोकांत होता. ह्या अपभ्रंशाची परंपरा फार पुरातन आहे. म्लेच्छो ह वा एष यदपशब्दः, तस्मान्नब्राह्मणो म्लेच्छेत्, वगैरे इशारे शतपथश्रुतींतून सांपडतात. ह्मणजे ब्राह्मणकालीं संस्कृत उच्चारांचे अपभ्रष्ट उच्चार म्लेच्छादि अनार्य लोक व त्यांच्या संसर्गानें खालच्या प्रतीचे आर्य लोक करूं लागले होते, असा अर्थ होतो. हा म्लेच्छकृत व अनागरार्यकृत अपभ्रंश स्वतंत्र भाषेच्या योग्यतेला ब्राह्मणकालीं आला नव्हता. परंतु कालान्तरानें त्याची व्याप्ति समाजांत अतोनात होऊन, ती प्रकट–पअड पअल–पाल–पाली [ स्त्रीलिंग ] भाषेच्या रूपानें प्रसिद्ध झाली. ह्याच सुमारास सौरसेनी, मागधी, पैशाची व महाराष्ट्री, ह्या हि प्रकट ऊर्फ अपभ्रष्ट भाषा निरनिराळ्या प्रांतांत सुरू झाल्या. ह्या प्रकट भाषा बहुजन मान्य झाल्यावर त्यांना अपभ्रंशाच्या वर्गांतून काढून स्वतंत्र भाषांच्या मान्य वर्गात घालणें वैय्यकरणांना इष्ट दिसलें, व त्यांना प्राकृत भाषा असें अभिधान प्राप्त झालें. संस्कृत व प्राकृत असे आर्यभाषेचे दोन मान्य पोटभेद झाले; आणि ह्यांच्या खेरीज जें अपभाषण त्याला अपभ्रंश ह्मणूं लागले. सारांश, अपभ्रंश व्याप्तिमान् झाला ह्मणजे त्याला स्वतंत्र भाषा ह्मणावयाचें व त्या नव्या झालेल्या स्वतंत्र भाषेचा जो दुसरा अपभ्रंश त्याला अपभ्रंश ह्मणावयाचें, असा वैय्याकरणी प्रघात प्रचलित झाला.

प्राकृतं संस्कृत चैतदपभ्रंश इति त्रिधा ॥

३३ कांहीं काल संस्कृत, आणि मागधी, शौरसेनी, पैशाची व महाराष्ट्री ह्या पांच मुख्य भाषा असून, अपभ्रंश हा स्वतंत्र भाषाभेद ह्मणून गणला जात नव्हता. परंतु कालान्तरानें संकृत व ह्या चारी प्राकृत मागसत जाऊन, अपभ्रंशांचे व प्राकृत पोटभाषांचे राज्य सुरू झालें. मागधी–अपभ्रंश, शौरसेनी–अपभ्रंश, पैशाची–अपभ्रंश व महाराष्ट्री–अपभ्रंश, असे चार मुख्य अपभ्रंश प्रचलित झाले. शक १५० च्या सुमारास शालिवाहनांचें महाराष्ट्रांतील साम्राज्य नष्ट झाल्यापासून शक ४५० त चालुक्यांचे साम्राज्य सुरू होईतोंपर्यंत महाराष्ट्री–अपभ्रंश महाराष्ट्रांत प्रचलित होता. नर्मदेच्या उत्तरेस मौर्यांचें साम्राज्य शकसंवतापूर्वी सुमारें दीडशें वर्षांच्या सुमारास नष्ट झालें. तेव्हांपासून शक २०० च्या सुमारास गुप्तांचें सा-

म्राज्य सुरूं होईतोंपर्यंत मागधी-अपभ्रंश, शौरसेनी-अपभ्रंश व पैशाची-अपभ्रंश नर्मदेच्या उत्तरेस प्रचलित झाले. अपभ्रंशाचे हे चार भाषापरत्वें भेद झाले; प्रांतपरत्वें व जातिपरत्वें जे भेद झाले त्यापैकीं कित्येकांचीं नांवें येणें प्रमाणें:—१ शाकारी, २ ढक्की, ३ दाक्षिणात्य ४ चूलिकापैशाची, ५ चांडाली, ६ आभीरी, ७ अवंतिजा, ८ प्राच्या, ९ पांचाली, १० मालवी, ११ गोडी, १२ ओड्री, १४ कालिंगी, १५ कार्नाटकी, १६ द्राविडी, १७ गुर्जरी, १८ अर्धमागधी. शक, यवन, किरात, दर्द, खश, पल्लव, वगैरे पिशाच लोक शकपूर्व १५० पासून सुमारें शक ४५० पर्यंत भरतखंडांतील निरनिराळ्या भागांत राज्यकर्ते या नात्यानें पसरले होते. तत्संबंधानें पैशाची भाषेचे ११ भेद प्राकृत वैय्याकरणांनीं उल्लेखिलेले आहेत.

**मागधी-अपभ्रंश, शौरसेनी-अपभ्रंश, पैशाची—अपभ्रंश, व महाराष्ट्री-अपभ्रंश.**

कांचीदेशीयपांडये च पांचालगौडमागधम् ।
व्राचडं दाक्षिणात्यं च शौरसेनं च कैकयम् ।
शाबरं द्राविडं चैव एकादश पिशाचकाः ।

सारांश सुमारें शक ४५० पर्यंत पांचपंचवीस अपभ्रंश भरतखंडांत उत्पन्न झाले. पैकीं, अवंतिज अपभ्रंशासंबंधानें एक बाब येथें नमूद करतों. प्रो· परशुरामपंत पाटणकर, बनारस, यांनीं गेल्या वर्षी उज्जनी प्रांतांतील रांगडी बोलीच्या व्युत्पत्तीवर एक लहानसा निबंध लिहून, त्यांत असें दाखविण्याचा प्रयत्न केला आहे कीं, मराठी व रांगडी ह्यांचा कांहीं तरी संबंध आहे. कोणता विशिष्टसंबंध आहे तें, मात्र, त्यांनीं नीट उलगडून दाखविलें नाहीं. अवंतिजा भाषेची नात सध्याची रांगडी भाषा आहे. त्या अवंतिजा भाषेची उत्पत्ति येणेंप्रमाणें:—

आवंती स्यान्माहाराष्ट्री-शौरसेन्यास्तु संकरात् ॥
(मार्कंडेय in pischel's Grammatik)

तेव्हां, महाराष्ट्रीचे कांहीं गुण रांगडींत दिसावे, हें रास्तच आहे.

३४ ह्या पाचपंचवीस अपभ्रंशांतून महाराष्ट्री-अपभ्रंशाशीं प्रस्तुत स्थळीं विशेष कर्तव्य आहे. हा अपभ्रंश शातवाहनसाम्राज्याच्या अंतापासून ह्मणजे सुमारें शक १५० पासून चालुक्यांच्या साम्राज्याच्या प्रारंभापर्यंतच्या ह्मणजे शक ४५० च्या पर्यंतच्या काळामध्यें उदयास आला. ह्याचें स्वरूप

कसें होतें, तें मुख्यत: हेमचंद्राच्या सिद्धहेमचंद्रम् नांवाच्या व्याकरणाच्या ३२९ पासून ४४६ पर्यंतच्या सूत्रांवरून कळतें. हेमचंद्राची हयात शक १०१० पासून शक १०९४ पर्यंत होती. ह्या वेळीं महाराष्ट्री-अपभ्रंश महाराष्ट्रीतील लोक बोलत असत कीं काय? ह्या प्रश्नाला, नाहीं, असें स्वच्छ उत्तर देतां येण्याला साधनें आहेत. तीं हीं:—शक १०५१ तील अभिलषितार्थचिंतामणींतील पदें जिला मराठी भाषा ह्मणतात व जी ज्ञानेश्वर बोलत व लिहित असे तींत आहेत. शक ९०५ तील चामुंडरायाचा शिलालेख हि मराठी भाषेंतच आहे. शक ६५८ तील चिकुर्डे येथील लेखाची भाषा हि मराठी आहे. इतकेंच नव्हे तर, शक ४१० तील मंगळवेढें येथील ताम्रपट हि मराठी भाषेंतला आहे. ह्मणजे मराठी भाषा ह्मणून ज्या भाषेला आपण ह्मणतों, तिच्यांतील अत्यंत जुना लेख शक ४१० पर्यंत गेलेला आहे. आतां, इतकें उघड आहे कीं, शक १०५१ तल्या मराठी भाषेच्या रूपाहून तत्तत्पूर्वीच्या लेखांची भाषा उत्तरोत्तर जास्त जास्त जुनाट आहे. परंतु ह्या सर्व लेखांतील भाषा मराठी आहे, अपभ्रंश नाहीं. ह्याचा अर्थ काय होतो? ह्याचा अर्थ असा होतो कीं, महाराष्ट्री–अपभ्रंश शक ४०० च्या सुमारास संपून, मराठी भाषेला प्रारंभ झाला व हेमचंद्रानें ज्या अपभ्रंशाचें व्याकरण रचिलें तो अपभ्रंश त्याच्या कालीं मृत होता.

**महाराष्ट्री—अपभ्रंश शक ४०० च्या सुमारास मृत झाला.**

मराठी भाषा शक ६०२ पासून शक ११२८ पर्यंत महाराष्ट्रांत चालू होती, ह्या बाबीला दुसरा हि अवांतर पुरावा आहे. ह्या अवधींतील चालुक्य, राष्ट्रकूट, शिलार, यादव वगैरे महाराष्ट्रांतील राजांचे जे संस्कृत ताम्रपट आहेत त्यांतून स्थळोस्थळीं अस्सल मराठी शब्द सांपडतात. शक ६०२ तील विक्रमादित्य सत्याश्रयाच्या ताम्रपटांत "पन्नास" हा शब्द आलेला आहे. हा शब्द महाराष्ट्रीप्राकृतांतील किंवा महाराष्ट्री-अपभ्रंशांतील नाहीं. महाराष्ट्रींत व अपभ्रंशांत पण्णासं, पण्णासा, पन्ना, अशीं रूपें येतात. शक ६०२ पासून शक ११२८ पर्यंत ताम्रपटांतून आलेल्या अस्सल मराठी शब्दांची यादी प्रभातमासिकांतील पाटण येथील शक ११२८ तील शिलालेखांत दिली आहे. तात्पर्य, मराठी शक ४०० च्या सुमारास सुरू झाली, हें अस्सल पुराव्यानें

सिद्ध आहे व हेमचंद्रानें ज्या अपभ्रंशाचें व्याकरण रचलें तो अपभ्रंश शक ४८० च्या सुमारास मृत झाला होता, असें ह्मटल्यावांचून गत्यन्तर नाहीं.

३५ मराठी भाषा शक ४०० च्या सुमारास सुरू होईतावत्कालपर्यंत भाषांची परंपरा माझ्या मतें येणेंप्रमाणें दिसतेः—

| | |
|---|---|
| संस्कृत. | ऋषिः—वैदिक भाषाः—शकपूर्व १०,००० पासून शकपूर्व ३०००. |
| | पाणिनिः—ब्राह्मण भाषाः—शकपूर्व ३००० पासून शकपूर्व १५००. |
| | पतंजलिः—संस्कृत भाषाः—शकपूर्व १५०० पासून शकपूर्व २००. |
| प्राकृत. | पाली भाषाः—शकपूर्व १५०० पासून शकपूर्व ४०० |
| | सौरसेनी भाषाः—शकपूर्व १५०० पासून शकोत्तर १५० |
| | मागधी भाषाः—शकपूर्व ५०० पासून शकोत्तर १५० |
| | पैशाची भाषाः—शकपूर्व ५०० पासून शकोत्तर १५० |
| | महाराष्ट्री भाषाः—शकपूर्व १००० पासून शकोत्तर १५० |

| | | | |
|---|---|---|---|
| प्राकृतिक. | सौरसेनी—अपभ्रंश<br>मागधी—अपभ्रंश<br>पैशाची— ,,<br>महाराष्ट्री— ,, | वगैरे | शक ० पासून शकोत्तर ४५० पर्यंत |
| प्राकृतिकोद्भव. | व्रज<br>मैथिल<br>बंगाली<br>ओढी<br>काश्मिरी<br>नेपाली<br>पंजाबी<br>सिंधी<br>गुजराथी<br>रांगडी<br>मराठी | वगैरे | शक ४०० पासून आतांपर्यंत ह्मणजे शक १८३० पर्यंत. |

कालाचे आंकडे कित्येक स्थलीं शंभर दोनशें वर्षे अलीकडे पलीकडे होऊं शकतील, हें सांगावयास नको. एक बाब, मात्र, पूर्णपणें निश्चित आहे. ती ही कीं, मराठी भाषा शक ४०० च्या सुमारास सुरू झाली. येथें एक गोष्ट लक्ष्यांत घेतली पाहिजे. पूर्वभाषा प्रचलित असतांनाच उत्तरभाषा अपभ्रंश ह्या नात्यानें सुरू झाल्या होत्या. ह्मणजे ब्राह्मण–संस्कृत प्रचलित असतांना पाली भाषा अपभ्रंश ह्मणून सुरू झाली व ब्राह्मण–संस्कृत प्रचारांतून गेल्यावर तत्स्थानीं अधिष्ठापित झाली. पालीभाषा प्रचलित असतांना, मागधीभाषा अपभ्रंशरूपानें सुरू झाली व पालीभाषा आटोपल्यावर तत्स्थानापन्न झाली. तसेंच, महाराष्ट्री भाषा चालू असतांच महाराष्ट्री—अपभ्रंश सुरू झाला व महाराष्ट्री नष्ट झाल्यावर तिची जागा त्यानें पटकाविली महाराष्ट्री–अपभ्रंश चालू असतांच मराठी सुरू झाली व तो मेल्यावर त्याची जागा मराठीनें व्यापिली.

**पूर्व भाषा असतांनाच उत्तर भाषा अपभ्रंश ह्मणून सुरू होते.**

एका भाषेच्या स्थलीं दुसरी भाषा येत असतांना, आणीक एक चमत्कार दृष्टयुत्पत्तीस येतो. नवी अपभ्रष्ट भाषा आस्ते आस्ते लोकमान्य होत असतांना, जुनी मुमूर्षु भाषा कांहीं काल प्रतिष्ठित ग्रंथकार व लोक लिहित व बोलत असतात. पाली, शौरसेनी, महाराष्ट्री वगैरे प्राकृत भाषा लोकमान्य होत असतांना, ब्राह्मण–संस्कृत व पातंजल–संस्कृत प्रतिष्ठित लोकांत प्रचलित होतेंच. अपभ्रंश सुरू होत असतां, महाराष्ट्री-प्राकृत प्रतिष्ठित ग्रंथकार लिहीतच असत. आणि मराठी उदयास येत असतांना शतक-दोन शतक अपभ्रंशाला प्रतिष्ठित ग्रंथकार विसरले नव्हते. संस्कृत, प्राकृत व अपभ्रंश, ह्यांचा लोप झाला असतां हि, शक ४०० च्या नंतरचे नाटककार ह्या तिन्ही भाषा प्रतिष्ठित ह्मणून आपल्या नाटकांत योजीत असत, व अप्रतिष्ठित ज्या मराठी वगैरे भाषा त्यांचें नांव ही काढीत नसत. प्रतिष्ठित ग्रंथकार जुन्या मेलेल्या भाषांना चिकटून राहतात, ह्या विधानाला पोषक अशीं दोन प्रमाणें देतों. प्रथमः पतंजलीचें जें संस्कृत तेंच भवभूति, हर्ष,

**उत्तर भाषा लोकमान्य होत असतांना, पूर्वभाषा कांही काल टिकाव धरून रहाते.**

हेमाद्रि, वगैरेंचें संस्कृत आहे. तसेंच कालीदासाचें जें प्राकृत तेंच हेमचंद्राचें प्राकृत आहे. ह्मणजे हे प्रतिष्ठित उत्तरकालीन ग्रंथकार मेलेल्या भाषा योजीत आहेत, हें स्पष्ट आहे. द्वितीयः शूद्रक, विशाखदत्त, बाण, श्रीहर्ष, नारायणभट्ट,जयदेव, भवभूति, इत्यादि नाटककार, महाराष्ट्र, माळवा, काश्मीर, ओढिया, प्रयाग, इत्यादि निरनिराळ्या प्रांतांत रहाणारे असून, सर्वच महाराष्ट्री, शौरसेनी, अपभ्रंश, वगैरे भाषा योजतात. शिवाय; प्राकृतांत काव्य रचतांनां महाराष्ट्रीचा उपयोग करावा व गद्य बोलतांनां शौरसेनी वापरावी, वगैरे नियम साहित्यग्रंथकार देतात; मग नाटककार कोणत्या हि प्रांतांतला असो व श्रोतृवर्ग वाटेल त्या प्रदेशांतला असो. ह्याचा अर्थ काय? उदाहरणार्थ, मथुराप्रांतांतील लोक श्रीहर्षाच्या वेळीं काय दोन भाषा बोलत होते, काव्याकरितां महाराष्ट्री व गद्याकरितां शौरसेनी? तसेंच, नाटकांवरून असें दिसतें कीं, नायक संस्कृत बोलतो, नायिका महाराष्ट्रींत गाते व शौरसेनींत बोलते, सेवक मागधींत विनंती करतो, मेव्हणा शाकारींत वकतो, चोर ढक्की बोलतात व चांडाल चांडाली वापरतात, आणि ह्या सर्व भाषा एकाच घरांत चालतात. तेव्हां, हा प्रकार काय आहे? शकसंवताच्या प्रारंभीं होऊन गेलेला कालीदास एकाच पात्राच्या तोंडून महाराष्ट्री व शौरसेनी अशा दोन भाषा वदवतो, हें देखील जरा चमत्कारिकच आहे. परंतु, त्या कालीं महाराष्ट्री भाषा उन्नत व नागर स्थितीप्रत पावून शातवाहनराजांच्या पाठिंब्यामुळें भरतखंडांत सर्वत्र मान्य व ग्राह्य झालेली होती. तेव्हां, महाराष्ट्रबाह्य प्रांतांत हि तिचा प्रचार स्त्रीपुरुषांत अव्याहत होता, असें समजून चालतां येईल. परंतु शकाच्या पांचव्या शतकाच्या पुढें झालेले जे बाण, श्रीहर्ष, इत्यादि नाटककार ते हि महाराष्ट्री, शौरसेनी वगैरे एकाहून जास्त भाषा एकाच पात्राच्या तोंडीं घालतात, हा चमत्कार कोठला? शकाच्या पांचव्या शतकाच्या सुमारास महाराष्ट्री भाषा मरून दोनतीनशें वर्षें झालीं होतीं व अपभ्रंश मुमूर्षुदशेंत होता, हें तर शक ४१० तील मराठी शिलालेखावरून स्पष्ट आहे. तेव्हां बाण, श्रीहर्ष वगैरे कवी गतानुगतिकन्यायानें मृतसंस्कृताप्रमाणेंच, मृत महाराष्ट्री, मृत शौरसेनी व मुमूर्षु अपभ्रंश योजित होते, यांत संशय नाहीं. जयदेवाच्या कालीं महाराष्ट्री मेली होती, अपभ्रंश मेला होता व मराठी भाषा चांगली नावारूपाला येत चालली होती; तसेंच, शौरसेनी मरून तिच्या जागीं जुनी व्रज भाषा आलेली होती. तत्रापि, प्रसन्नराघवांत महाराष्ट्री व शौरसेनी—

कालिदासाची व वररुचीची महाराष्ट्री व शौरसेनी जयदेव योजतो. त्यांत दुसरी एक नकलेची गोष्ट अशी कीं जयदेव रहाणारा ओढिया प्रांतांतला. जुन्या ओढियेचा मागधीकडे संबंध. असें असून, ओढीयां, किंवा तत्पूर्व-कालीन मागधी भाषा न योजतां, जयदेव ज्याअर्थी महाराष्ट्री व शौरसेनी भाषा योजतो, त्या अर्थी तो साहित्यशास्त्रकारांच्या उपदेशाला अनुसरून गतानुगतिक न्यायानें मृत व मुमूर्षु भाषांत लिहीत आहे, हें उघड आहे. हा अचरटपणा कृष्णाजीपंत शेषे वगैरे नुकत्या तीनशें वर्षांपलीकडील नाटक-कारांनीं हि केलेला आहे. असो, गतानुगतिकास्तव व पुराणप्रियतेस्तव मृत व मुमूर्ष भाषांत नाटकें लिहिण्याच्या ह्या लकबीनें कित्येक यूरोपियन टीका-कारांना चकविलें आहे. कालदृष्ट्या पहावें तर लोकांत एक भाषा प्रचलित आहे असें दिसतें व नाटककारांच्या ग्रंथांत पहावें तर मृत व मुमूर्ष भाषा योजलेल्या दृष्टीस पडतात. त्यावरून ह्या टीकाकारांना अशी शंका आली कीं, संस्कृत, प्राकृत व प्राकृतिक अपभ्रंश, ह्या कृत्रिम भाषा तर नसाव्या? कित्येक उतावळे व दुष्टबुद्धि टीकाकार, तर, इतक्या हि थराला गेले कीं, ही सर्व ब्राह्मणांची फसवेगिरी असावी! ह्या दुसऱ्या बालिश टीकाकारांकडे लक्ष देण्यांत हांशील नाहीं. कृत्रिमभाषावाद्यांची शंका, मात्र, सकारण होती. तिचा परिहार वर झाला च आहे. जैनमहाराष्ट्री, जैनशौरसेनी वगैरे भाषांचा हि प्रकार वरच्याप्रमाणें च आहे. जुनी मृत महाराष्ट्री भाषा आपली धर्मग्रंथभाषा ह्मणून जैन ग्रंथकार समजत. आपले धर्मशास्त्रग्रंथ जसे मृत संस्कृतांत अद्याप हि रचले जातात, तोच प्रकार जैनधर्मग्रंथांचा आहे. तात्पर्य, भरतखंडांतील ग्रंथकारांचा मृतभाषांत लिहिण्याचा ओढा विशेष असतो, हें उघड आहे.

"A Peep into the early history of India" ( J. B. B. R. A. S. 1901 vol XX) ह्या चटकदार निबंधांत डाक्टर भांडा-रकर यांनीं खालील विधानें केलीं आहेत. (1) Another peculiarity of this period (from about the beginning of the second century before Christ to about the end of the fourth century after) was the use of the Pali or the current Prakrit language in Inscriptions. (2) But now (from about the end of the fourth century after Christ) we

find that sanskrit rose in importance and the vernaculars were driven out of the field. ख्रिस्तपूर्व २०० पासून ख्रिस्तनंतर ४०० पर्यंत प्राकृतांचें साम्राज्य होतें; परंतु ४०० नंतर प्राकृतांना गचांडी मिळून संस्कृत तत्स्थानापन्न कां झाली, ह्याचें कारण, डाक्टरांनीं असें दिलें आहे कीं, Brahmanism चा उदय झाला, त्यामुळें प्राकृत मागें पडल्या व संस्कृत पुन: उदयास आली. ह्या चमत्काराचें खरें कारण मी जें वर दिलें आहे तें आहे. महाराष्ट्री वगैरे प्राकृत भाषा शक २०० च्या सुमारास मेल्या. पुढें दोनअडीचशें वर्षें अपभ्रंश प्रचलित होता. तो हि शक ४०० च्या सुमारास मरून, आधुनिक मराठी वगैरे प्राकृतिकोद्भव भाषा जन्मास आल्या. परंतु, त्यांना विद्वन्मान्यता नसल्यामुळें, त्यांचा उपयोग ह्मणावा तसा होत नसे. डाक्टर भांडारकरांनीं वृत्तनिरूपण बराबर केलेलें आहे; परंतु वृत्ताचें कारण, मात्र, जें द्यावें तें दिलें नाहीं. संस्कृत भाषेचा पुनरुदय व Brahmanism चा पुनरुदय हीं एकाच कारणाचीं कार्यें आहेत. बौद्धधर्म व प्राकृत भाषा मेल्यामुळें संस्कृत भाषा व Brahmanism उदयास आलीं. बौद्धधर्माचा अस्त व प्राकृत भाषांचा मृत्यु हीं कारणें असून, Brahmanism व संस्कृत भाषा यांचा उदय हीं सोदर कार्यें आहेत. संस्कृत भाषेच्या पुनरुदयाचें Brahmanism हें कारण नाहीं, प्राकृत भाषांचा मृत्यु हें कारण आहे.

३६ शक ४०० च्या सुमारास मराठी भाषा सुरू झाली, तेव्हां, अपभ्रंश नष्ट होत चालला होता व महाराष्ट्रीभाषा मृत झाली होती, ह्याला दुसरें एक प्रमाण आहे. शक ४५० च्या सुमारास महाराष्ट्रांत चालुक्यांचें राज्य सुरू झालें. चालुक्यांच्या अमदानींत जे ताम्रपट व शिलालेख खोदले गेले ते प्राय: सर्व संस्कृत भाषेंत आहेत, शातवाहनांच्या कारकीर्दींतल्या प्रमाणें प्राकृतांत किंवा अपभ्रंशात नाहींत. ह्याचा अर्थ असा होतो कीं, महाराष्ट्री व अपभ्रंश मृत व मुमूर्ष स्थितींत चालुक्यांच्या वेळीं होते. तेव्हां, सहजच त्यांनीं त्या मृत व मुमूर्ष भाषांचा उपयोग केला नाहीं. मराठीचा उपयोग करावा ह्मटलें तर ती भाषा राजमान्य झाली नव्हती, नुकतीच उदयास येत चालली होती. तत्रापि, शक ४१० तील मंगळवेढच्या ताम्रपटावरून व शक ६५८ तील चिक्कुड्यांच्या ताम्रपटावरून असें दिसतें कीं,

सामान्य लोकांचें सर्व लिखाण मराठी भाषेंतच चाललें होतें. शिवाय हा हि एक प्रश्न उभा रहातो कीं, चालुक्यराजांचें दफ्तर, राज्याचे हिशेब वगैरे, कोणत्या भाषेंत लिहिलें जात असे ? संस्कृत भाषा दफ्तरांतील कारकुनांस येत असेल हें संभवत नाहीं. तसेंच, सामान्य लोकांस ह्मणजे पाटीलकुळकर्ण्यांस उद्देशून जीं सरकारी आज्ञापत्रें जात असतील तीं संस्कृतांत लिहिलीं जात असत, हें हि विधान असंभाव्य च दिसतें. तेव्हां, असें ह्मणणें प्राप्त होतें कीं, चालुक्यराजे राज्यांतील सामान्य व्यवहार तत्कालीन देशभाषेंत च करीत असले पाहिजेत. असामान्य व्यवहार ह्मणजे विशिष्ट देणग्या वगैरे संबंधींचें आज्ञालेख किंवा दानलेख विद्वान व शिष्ट ब्राह्मणांना उद्देशून लिहिल्यामुळें, ते तेवढे संस्कृतभाषेंत कोरले जात. इतर सर्व व्यवहार त्या त्या देशभाषेंत च होत होते. चालुक्यांच्या साम्राज्यांत मुख्यतः दोन भाषा सामान्य लोकांत प्रचलित असतः– १ मराठी व २ कानडी. ह्या दोन भाषांत सामान्य लिखाण होत असे. पैकीं मराठी भाषेला देश्य, देशी अशी संज्ञा असे. ज्ञानेश्वर मराठीला देशी ह्मणतो. हेमचंद्राच्या देशीनाममालेंतील देशी शब्द प्रायः तत्कालीन मराठीच आहेत. इतकेंच कीं, वृत्तसुखार्थ व संस्कृतभाषासाम्यार्थ बहुतेक देशी शब्दांना त्यानें संस्कृत पेहराव थोडा बहुत दिला आहे.

**मराठी उर्फ देशी.**

३७ आतांपर्यंत जे जुने मराठी लेख उपलब्ध झाले आहेत त्यांत अत्यंत जुना लेख ह्मटला ह्मणजे शक ४१० तील मंगळवेढें येथील ताम्रपट होय. हा लेख व ह्याच्यानंतरचे जुने मराठी लेख ह्यांची समग्र यादी मागें चवदाव्या प्रकरण्यांत दिली आहे. त्यावरून पहातां, असें दिसतें कीं, शक ४०० पासून शक ९०० पर्यंत मराठी भाषा केवळ बोलण्यांत येत होती, तिच्यांत सारस्वत उत्पन्न झालें नव्हतें. अभंग, पदें, भूपाळ्या, कहाण्या, वगैरे वाङ्मय ह्या हि काळीं उत्पन्न झालें असण्याचा पूर्ण संभव आहे. परंतु शक ९०० पर्यंतचें हें वाङ्मय अद्याप उपलब्ध नाहीं. तेव्हां, सध्यांपुरतें तरी असेंच ह्मणणें भाग आहे कीं, शक ९०० पर्यंत मराठींत सारस्वत नव्हतें.

**शक ९०० पर्यंत मराठींत सारस्वताभाव.**

**शक ९०० नंतर नागर मराठी.**

३८ शक ९०० पासून पुढें मराठी सारस्वताला प्रारंभ झाला. सारस्वताचें अगदीं पहिलें उदाहरण म्हटलें म्हणजे अभिलषितार्थचिंतामणींतिल पदांचें होय. तदनंतर निवृत्ति, ज्ञानेश्वर, वगैरे नागर ग्रंथकार उदयास आले व त्यांनीं मराठीला नागर केली. हेमाडपंताच्या वेळीं दरबारचें सर्व लिखाण मोडी मराठींत होत असे.

**मराठीला फारशीचा संसर्ग शक १२००–१५००.**

३९ ज्ञानेश्वरानंतर मुसलमानांचें राज्य महाराष्ट्रांत झालें. त्यामुळें मराठीला फारसी व अरबी भाषांचा संसर्ग घडला. ह्या संबंधीं विवेचन **मराठ्यांच्या इतिहासाच्या साधनांच्या आठव्या** खंडाच्या प्रस्तावनेंत साद्यन्त केलेलें आहे. सबब, त्या तपशिलांत येथें पडत नाहीं. मुसलमानी रियासतींत जनार्दन, दासोपंत, एकनाथ वगैरे नामांकित ग्रंथकार मराठींत झाले.

**स्वराज्य शक १५०० पासून शक १७३९ पर्यंत.**

४० नंतर, स्वराज्याचा काळ आला. त्यांत रामदास—मोरोपंतादि ग्रंथकार व सभासदादि बखरकार झाले.

**इंग्रजाचा संसर्ग शक १७३९–१८३०.**

४१ शक १७३९ नंतर मराठीला इंग्रजीचा संसर्ग झाला. तो सध्यां आपण पहातच आहों.

४२ मराठी भाषेच्या स्थित्यंतरांचें स्थूल टिपण हें असें आहे. आजपर्यंत मिळालेल्या लेखांवरून १ मराठी भाषेचा इतिहास, २ मराठी भाषेचें ऐतिहासिक व्याकरण, ३ मराठी भाषेचें निरुक्त व, ४ मराठी भाषेतील-सारस्वताचा इतिहास, अशीं चार प्रकरणें नामी रीतीनें सजवतां येण्यासारखीं आहेत. ह्या एकेक विषयाला एकएक स्वतंत्र ग्रंथ च अर्पण केला पाहिजे.

४३ शक १८१८ त मराठी भाषेतील जुने लेख व ग्रंथ शोधण्यास मी प्रारंभ केला. तेव्हांपासूनच्या बारा वर्षांत जी महत्वाची लेखप्राप्ति झाली तिच्यावरून ही त्रोटक हकीकत येथपर्यंत दिली. आतां, प्रस्तुत छापलेल्या ज्ञानेश्वरी-संबंधानें तपशील देऊन, ही प्रस्तावना संपवितों.

४४ बालेघाटीं बीडशहरीं पाटांगण नांवाचें एक देवस्थान आहे. तेथें शके १८२५ त ही ज्ञानेश्वरीची प्रत सांपडली.

**पोथीचें मूलस्थान.**

इतर दहावीस ज्ञानेश्वऱ्या तेथें पडल्या होत्या त्यांत ही प्रत एका कोनाड्यांत पोथ्यांच्या ढिगांत लोळत पडली होती. मठाधिपति जे मथुरानाथगोसावी त्यांनीं मला ही प्रत नजर केली व हिचा योग्य उपयोग करण्यास कळकळीनें सांगितलें.

४५ ही प्रत सर्वंध शाबूत आहे. पानें ३२२ असून, पाठपोट मिळून

**पोथीचें रूप.**

पृष्ठें, अर्थात्, ६४४ आहेत. पानाची लांबी ९ इंच व रुंदी ४$\frac{3}{4}$ इंच आहे. दर पृष्ठास बारापासून चौदापर्यंत ओळी आहेत. अक्षर उत्कृष्ट वळणदार असून, येथूनतेथून एकहातचें आहे. प्रायः प्रत्येक पान कागदाची दुहेरी घडी गोंदानें चिकटवून एकजीव केलेलें आहे. ह्मणजे गोंद काढून पान उघडलें असतां, आंत पोट कोरें आहे आणि पाठीवरील क्षेत्रफळाची दोन पृष्ठें करून वर लिहिलेलें आहे. तात्पर्य कागद आंतून गोंदानें चिकटवून दुहेरी जाड केलेला आहे. शाई लाखी असून, अद्याप अक्षरें पूर्ण शाबूत आहेत. अक्षराचें वळण तत्कालीन मराठी आहे. सोबत जोडलेल्या फोटोवरून पानाचें व अक्षराचें स्वरूप ध्यानांत येईल. प्रत्येक पानाचे चारी कोपरें मुद्दाम वाटोळे केलेले आहेत. कागद तुरटीच्या पाण्यानें धुतला असल्यामुळें, तो जलनिर्भय झाला आहे. विरामाच्या उभ्या रेघा व ओव्यांचे अंक तांबड्या शाईनें लिहिले आहेत; आणि संस्कृत श्लोकावर तांबडी काव फासली आहे. लांकडाच्या फळीवर सुतळी बांधून, ती आंखणी कागदावर दाबून रेघा पाडलेल्या आहेत. अक्षर वेळूच्या लेखणीनें लिहिलें आहे. पहिल्यापासून अखेरच्या पानापर्यंत अक्षरांची लांबीरुंदी एकसारखी आहे. ह्मणजे एकाच टोकाच्या पांच पन्नास लेखण्या लेखकानें जवळ तयार करून ठेविल्या असल्या पाहिजेत. लेखक लिहिण्याचा धंदा जन्मभर करणारा असून स्वकर्मकुशल होता, असें दिसतें.

४६ लेखनशुद्धीकडे पहातां, ती प्रायः केवळ निर्दोष आहे. क्वचित् एखादें अक्षर गळालेलें आढळतें. परंतु अशीं स्थलें सबंद

**लेखनशुद्धि.**

पोथींत फारच थोडीं सांपडतात. गळलेलीं अक्षरें, गळल्या ठिकाणीं काकपद ^ देऊन, समासांत दाखविलीं आहेत. ह्मणजे पोथी संपल्यावर मूळाशीं कसोटीनें ताडून तपासलेली आहे.

४७ पोथी वाचणाऱ्या मालक विद्वानानें कोठें कोठें समासावर शोध घातलेले आढळतात. मालकाचें अक्षर लेखकाच्या अक्षराहून भिन्न आहे.

**विद्वच्छुद्धि.**

४८ व्याकरणदृष्ट्या पोथींतील रूपें अत्यन्त शुद्ध लिहिलेलीं आहेत. म्हणजे ज्ञानेश्वराच्या वेळीं नागर मराठी भाषेचें जें रूप होतें तें अक्षरद्वारा जसेचेंतसें ह्या पोथींत दाखविलेलें आहे. ऱ्हस्व, दीर्घ, अनुस्वार, अनुनासिक, कान्हा, मात्रा, उकार, इकार, येथूनतेथून सबंद पोथींत, प्रायः, तत्कालीनव्याकरणदृष्ट्या शुद्ध लिहिलेले आहेत. ज्या शब्दाचा व रूपाचा जो उच्चार तो तशाचा तसाच अक्षरांनीं वठवलेला आहे. अगदीं एक सुद्धां अपवाद नाहीं. इतकी शुद्ध पोथी संस्कृतांत हि सांपडणें कठिण. प्राकृतांत, तर, ती केवळ अनुपमेय आहे. ह्या पोथीचें मराठी भाषाशास्त्राला व निरुक्ताला फारच साहाय्य होईल.

**भाषाशुद्धि.**

४९ ही पोथी कोण्या विद्वन्मंन्यानें पुनः एकदां शुद्ध केलेली आहे. ज्ञानेश्वरकालीन रूपें एकनाथाच्या किंचित् पूर्वी बदलून आधुनिक होत होतीं. अशा काळीं, ही पोथी कोणा गृहस्थाच्या हातीं पडून, त्यानें हजारों स्थलीं गंधाचा व गेरूचा उपयोग करून मूळपाठ बुजवून टाकिले आहेत. गंध व गेरु हलक्या हातानें खरडून काढून मूळपाठ मी प्रस्तुत छापील प्रतींत दिले आहेत. गंध व गेरू ह्यांच्या लेपाखालील मूळपाठ ज्ञानेश्वरकालीन व्याकरणदृष्ट्या शुद्ध होते, ते ह्या गृहस्थाला अशुद्ध वाटून, त्यानें ही मखलाशी केली आहे. परंतु, ती मखलाशी हि फारच काळजीनें व सफाईनें केली आहे. सारांश, ही पोथी, लेखक, मालक, व मखलाशीकार, ह्या तिन्ही उत्कृष्ट लोकांच्या हातून जातजात मथुरानाथ गोसाव्यांच्या द्वारा माझ्या हातांत आली. ती जशीची तशी महाराष्ट्रांतील विद्वानांच्या सेवेस छापून सादर केली आहे.

**विद्वन्मंन्यशुद्धि किंवा अशुद्धि.**

५० श्रीमहागणपतयेनमः ॥, असा पोथीचा प्रारंभ आहे. पोथीची समाप्ति येणें प्रमाणें:—

पोथीचे आद्यन्त.

ऐसें युगीं वरि कली । आणि महाराष्ट्रमंडलीं ।
श्री गोदावरिचां कुलीं । दक्षिणिलीं ॥ ८४ ॥
तेथ भुवनैकपवित्र । अनादिपंचक्रोशक्षेत्र ।
जगाचें जीवनसूत्र । जेथ श्रीमहाल्ला ॥ ८५ ॥
तेथ इंदुवंशविलासु । जो सकलकलां निवासु ।
न्यायातें पोखीत क्षितीशु । श्रीरामचंद्रु ॥ ८६ ॥
तें माहेशान्वयसंभूतें । श्रीनिवृत्तिनाथसुतें ।
केलें ज्ञानदेवें गीते । देशीकार लेणें ॥ ८७ ॥
ऐवं भारताचां गावीं । भीष्मनार्मी प्रसिद्धपर्वी ।
श्रीकृष्णांजुर्नी बरवी । जे गोष्टि केली ॥ ८८ ॥
जें उपनिषदाचें सार । सर्वशास्त्राचें माहिएर ।
परमहंसीं सरोवर । सेविजे जें ॥ ८९ ॥
तिथे गीतेचा कलशु । संपूर्ण हा अष्टादशु ।
ह्मणे निवृत्तिदासु । ज्ञानदेवो ॥ ९० ॥
पुढुतीं पुढुतीं पुढुतीं । इया ग्रंथा पुण्यसंपत्ती ।
सर्वसुखीं सर्वभूतीं । संपूर्ण होइजो ॥ ९१ ॥

ॐ तत्सदितिश्रीमद्भगवद्गीतासूपनिषत्सु ब्रह्मविद्यायां योगशास्त्रे श्रीकृष्णार्जुनसंवादे मोक्षयोगो नाम अष्टादशोध्यायः ॥ हिरण्य । श्रीकृष्णार्पणमस्तु ॥ १८ ॥ लेखनं श्रीकृष्णार्पणमस्तु । श्री ++++ साम्राज्यलक्ष्मीस्वरूपीश्वरा गुरुकृपालु नारायण पातु मां ॥

येथें ज्ञानेश्वरीचा अखेर झाला. ९० व्या ओवीच्या "दासु ॥ ज्ञानदेवो" पासून " पातु मां " पर्यंतच्या सर्व ओळी आळित्याच्या तांबड्या शाईनें मूळलेखकानें लिहिल्या होत्या. त्यापैकीं ९१ वा अभंग संपेतोंपर्यंतचीं तांबडीं अक्षरें एका गृहस्थानें काळ्या शाईनें गिरविलीं आहेत. आंतून तांबडी शाई दिसते व वरून काळ्या शाईचीं ओबडधोबड गिरवणी डोळ्यांत सलते. ह्या गृहस्थानें ८४ व्या ओवीपासून ९१ व्या ओवीपर्यंतचीं काळी व तांबडी अशीं सर्वच अक्षरें काळ्या शाईनें गिरविलीं आहेत. कारण, ह्या गृहस्थाच्या हातांत ही पोथी आली, तेव्हां पोथीच्या ह्या शेवटल्या पृष्ठावरचीं अक्षरें घासटून अगदीं पुसटून गेलीं होतीं. तेव्हां स्पष्टतेकरतां तीं काळ्या शाईनें

गिरवणें त्याला भाग पडलें. परंतु, गिरवणाऱ्याला मूळलेखका इतकें सुंदर लिहितां येत नसल्यामुळें वळवलेलें प्रत्येक अक्षर बेढब बनलें आहे. मूळ अक्षराची सफाई, ह्या गिरवणाऱ्याच्या धसाड्या हातानें, अगदीं निघून गेली आहे. आतां इतकें खरें आहे कीं गिरविणाऱ्यानें जर घासटून पुसटत जात चाललेलीं अक्षरें गिरवून शाबूत राखिलीं नसतीं, तर ह्या पोथीच्या समाप्तीचीं हीं अक्षरें व ओव्या आपणांस पहावयास न सांपडत्या. ह्या दृष्टीनें पाहिलें ह्मणजे, ह्या गृहस्थानें अक्षरें गिरवून बचावण्यांत जगावर मोठा उपकार केला आहे, त्यांत संशय नाहीं. ह्या शेवटल्या पानाचे दोन्ही बाजूचे समास व समासांच्या मधील बोट अर्धबोट जागा फाटून गेली होती ती हि ह्या मनुष्यानें स्वकालीन कागदाच्या तुकड्यांनीं डागडूज केली आहे. मूळलेखकानें लिहिलेल्या ज्ञानेश्वरीच्या पोथिच्या समाप्तीच्या ओव्यांचा व अक्षरांचा हा तपशील झाला. समाप्तीच्या शेवटल्या ओळीवरून असें दिसतें कीं, लेखकाला संस्कृत भाषा येत नव्हती.

" पातुमां " नंतर दुसऱ्या एका मनुष्यानें लिहिलेली व निराळेंच वळण असलेली एक ओवी येणेंप्रमाणें आहे:—

( १ ) शके बारा शतें बारोत्तरें । तैं टीका केली ज्ञानेश्वरें ।
सच्चिदानंद बाबा आदरें । लेखक जाला ॥ ९२ ॥

ह्या ओवीच्या अक्षरांचें वळण उपरिनिर्दिष्ट गृहस्थाच्या वळणासारखें नाहीं. शिवाय अक्षरांची शाई उपरिनिर्दिष्ट गृहस्थाच्या शाईहून जुनी आहे. ह्मणजे ही ओवी उपरिनिर्दिष्ट गृहस्थाच्या आधीं कोणी तरी लिहिलेली आहे, व तिच्यावर ९२ चा आंकडा टाकिला आहे.

ह्या ९२ व्या ओवीच्या खालीं एक संस्कृत श्लोक ९२ व्या ओंवीच्या वळणाहून निराळ्या वळणांत लिहिलेला आहे. त्याची शाई ९२ व्या ओंवीच्या शाईहून निराळी व जुनी दिसते. हा श्लोक येणेंप्रमाणें:—

( २ ) श्रीसद्गुरुमुकुंदेन दत्ता ज्ञानेश्वरी शुभा ॥
विद्याधराय शिष्याय स्वीए स्वत्वं न शोभते ॥ १ ॥ ९ ॥

९२ वी ओवी व हा श्लोक ह्यांच्या मध्यें खालील खरडेलेली ह्मणजे प्रथम लिहून नंतर लेखणीनें खरडून व पुसून टाकिलेली एक ओळ आहे.

हें अक्षर वरल्या तिन्ही अक्षरांहून अगदीं निराळें व किरटें आहे. ओळ येणेंप्रमाणें:—

( २ ) हें पुस्तक विश्वनाथु कोनेर घोलर देवनुरकर

ह्या तीन लेखांपैकीं तिसरा लेख कालदृष्ट्या सर्वांच्या आधींचा, पहिला लेख तदनंतरचा आणि दुसरा लेख शेवटचा आहे.

**पोथीचा काळ निर्णय.**

५१ समाप्तीच्या ह्या तीन लेखांवरून खालील निगमनें प्राप्त होतात. [१] मूळलेखकानें ज्या प्रतीवरून आपली प्रत उतरून घेतली त्या प्रतींत व अर्थात् उताऱ्यांत " शके बारां शते " इत्यादि ओवी नव्हती. [२] ती ओवी ज्ञानदेवानंतर कोणी तरी रचिलेली आहे. ती ओवी सच्चिदानंदबावानें हि रचिलेली नाहीं. कारण, ज्ञानदेव व सच्चिदानंदबावा यांच्या कालीं बावा असें रूप प्रचलित नसून बाबा असें रूप प्रचलित होतें. वप्ता=बप्पा=बापा=बाबा=बावा, अशी उच्चारपरंपरा आहे. सच्चिदानंदबावानें ही ओंवी लिहिली असती, तर बाबा असा पाठ आला असता. मजजवळ ज्ञानेश्वरीच्या इतर सुमारें पन्नास पोथ्या आहेत. त्यापैकीं एकींत हि बावा असा पाठ नाहीं, बाबा असाच पाठ आहे. ह्मणजे सच्चिदानंदबावा वारल्यावर त्याच्या कोण्या चाहत्यानें तत्स्मरणार्थ ही ओंवी रचिलेली आहे. अर्थात्, प्रस्तुत छापिली गेलेली प्रत ज्या मूळ प्रतीवरून केली, ती मूळ प्रत सच्चिदानंदबावाच्या मृत्यूच्या आधीं लिहिलेली होती. [३] ही मूळ प्रत सद्गुरु मुकुंदानें विद्याधर नामक शिष्याला दिली. सच्चिदानंदबावाच्या मृत्यूच्या अगोदर असणारा हा मुकुंद मुकुंदराज ज्याला ह्मणतात तो च होय. दुसरा कोणी मुकुंद शक १२१२ पासून शक १२४० पर्यंत हयात नव्हता. मुकुंदराजाची हयात शक ११५८ पासून शक १२५८ पर्यंत होती, ( ग्रंथमाला, मुकुंदराज ). तात्पर्य मुकुंदराजानें आपला शिष्य जो विद्याधर त्याला आपल्याजवळील ज्ञानेश्वरीची प्रत बक्षीस दिली. तीच ही मजजवळ असलेली प्रत होय. ही प्रत सच्चिदानंदबावाच्या मृत्यूच्या अगोदर ह्मणजे शक १२४० च्या अगोदर व शक १२१२ च्या नंतर केव्हां तरी लिहिलेली आहे. ह्या प्रतीचा उत्तम मजबूत, तलम व कमावलेला कागद; उत्तमोत्तम शाई; कसलेल्या लेखन-कुशल लेखकाचें येथूनतेथून एकवळणी अक्षर. पाहिलें ह्मणजे असें कबूल

करणें भाग पडतें कीं, ही प्रत तयार करण्यास पुष्कळ द्रव्य लागलें असावें व ज्या धन्याकरितां ही प्रत तयार केली तो धनी श्रीमान असावा. मुकुंदराज होयसळवंशीय जयंतपाळाचा गुरु होता, व त्याला अर्थात् उत्तम द्रव्य व उत्तम राजदरबारी लेखक मिळण्यासारखे होते. दरिद्र्याच्या हातून अशी प्रत तयार होणें अशक्य आहे. ही प्रत लिहून काढण्यास, इतक्या काळजीनें, सुबकपणानें व सफाईनें उतरून घेण्यास व मुळाबरहुकूम तपासण्यास वर्ष दोन वर्षे लागलीं असावीं. ह्मणजे सुमारें हजारपांचशें रुपयांच्या खालीं ह्या प्रतीला खर्च पडला नसावा. तेव्हां, असली ही द्रव्यसाध्य प्रत तयार करविणारा राजगुरु मुकुंदराज च असला पाहिजे. सारांश, ही प्रत मुकुंदराजाची आहे व ही शक १२१२ पासून शक १२४० पर्यंतच्या काळांत केव्हां तरी लिहिलेली आहे. एकाच शब्दानें सांगावयाचें ह्मटलें, तर असें ह्मणणें प्राप्त होतें कीं, महाराष्ट्रग्रंथसंग्रहांत ही ज्ञानेदेवीची प्रत केवळ " अमूल्य " आहे

**पोथीचें स्थलान्तर.**

५२. मुकुंदराजाचा शिष्य जो विद्याधर—आपल्याला ही देणगी शोभत नाहीं, आपण हिचे मालक होण्यास योग्य नाहीं, असें उद्गार काढणारा जो विद्याधर—त्याच्या हातून ही पोथी विश्वनाथु कोनेर धोलर देवनुरकर याच्या ताब्यांत गेली. व त्याच्या द्वारा परंपरेनें बीड येथील पाटांगणांत येऊन दाखल झाली.

५३. तलम कागदाची मजबुती, बारीक पण ठोसदार अक्षराची एकवळणी सफाई, मालकाची द्रव्यसंपन्नता, वगैरे पोथीच्या गुणांचें अनुवादन केलें. परंतु, ह्या सामान्य गुणांहून दुसरा एक असामान्य गुण ह्या पोथींत आहे. तो हा. ह्या पोथींतील भाषा—जी ज्ञानेश्वर बोलला, जी ज्ञानेश्वरानें नेवाशांतील शिलेवर लिहिली, व जी शक १२१२ त नागर मराठे बोलत—ती च साक्षात् आहे. कागद भिकार असतां, अक्षर गिचमीड असतें, व मालक शतदरिद्री असता, आणि भाषा जर ह्या पोथींतल्याप्रमाणें साक्षात् शक १२१२ तील नागर मराठी असती, तरी देखील, ह्या एकाच असामान्य गुणाच्या बळावर, अशा पोथीचा सकौतुक आदर करणें भाग पडलें असतें. ज्ञानेश्वरांच्या पुण्याईनें व मुकुंदराजांच्या श्रीमंतीनें उत्तम कागद व उत्तम अक्षर ह्यांच्या

**पोथीतील शक १२१२ तली निर्भेळ नागर मराठी भाषा.**

जोडीला शक १२१२ तील निर्मळ नागर मराठी भाषा आपल्याला उपलब्ध झाली आहे. तेव्हां, ह्या प्रतीचें कौतुक करावें तेवढें थोडेंच आहे, पंढरपूर येथील शक ११९५ तील शिलालेखांतल्यासारखी किंवा पाटण येथील शक ११२८ तील शिलालेखांतल्यासारखी भाषा ह्या पोथीची आहे. तेव्हां, मुकुंदराजाचा उल्लेख ज्यांत केला आहे असा श्लोक यद्यपि ह्या पोथीच्या समाप्तीस नसतां, तत्रापि देखील निव्वळ भाषेच्या स्वरूपावरून ही पोथी थेट ज्ञानेश्वराच्या वेळची आहे, असें तज्ज्ञांना सहज ताडतां आलें असतें. प्रथम मीं जेव्हां ही पोथी पाटांगणांत अधूनमधून वाचून पाहिली, तेव्हां भाषेवरून प्रथमदर्शनींच लक्ष्यांत आलें कीं, ही प्रत एखाद्या ज्ञानेश्वरकालीन प्रतीची नक्कल आहे. पुढें अक्षराच्या वळणाचा जेव्हां विचार करूं लागलों, तेव्हां असें हि दृष्ट्युत्पत्तीस आलें कीं, ह्या पोथींतील अक्षरें पंढरपूर येथील शक ११९५ तील शिलालेखांतल्या अक्षरांसारखीं आहेत. आणि समाप्तीतील मुकुंदराजाच्या श्लोकाचें जेव्हां मनन केलें, तेव्हां तर अशी पक्की खात्री झाली कीं, ही पोथी खुद्द मुकुंदराजाची आहे. व ती त्यानें आपला नम्र व श्रद्धाळू शिष्य जो विद्याधर त्याला बक्षीस दिली होती. शेवटीं, सच्चिदानंदबावा संबंधीची ओवी मूळप्रतींत नाहीं, हें जेव्हां पाहिलें, तेव्हां शक १२४० च्या पूर्वीची ह्मणजे सच्चिदानंदबावाच्या मृत्यूच्या पूर्वीची ही पोथी आहे, असें ठाम मत झालें, आणि मराठी भाषेच्या व्युत्पत्तीला व व्याकृतीला व इतिहासाला ही प्रत अत्यंत उपयोगी पडेल असा भरंवसा वाटला. पंढरपूर येथें पोलीस चावडींत व पंढरपूर जिल्ह्यांत जेवढे ह्मणून यादवकालीन शिलालेख आहेत तेवढ्यांतील अक्षरांचें वळण या पोथींतील अक्षरांच्या वळणासारखें आहे. ही पोथी ह्मणजे मराठी भाषेतील कागदावर लिहिलेला अत्यंत जुना असा पहिला लेख होय. सुदैव कीं हा लेख पाठपोट ६४४ पृष्ठें आहे व सबंध शाबूत आहे. कागदावर लिहिलेला इतका जुना लेख किंवा इतकी जुनी पोथी डेक्कन कालेजांतील संग्रहांत किंवा आनंदाश्रमांतील संग्रहांत नाहीं. अर्थात्, ह्या पोथीवरून हें हि सिद्ध होतें कीं ज्ञानेश्वरकालीं कागद हा पदार्थ प्रचारांत होता. डेक्कन कालेजांत एक कागदाची पोथी शक १२०० च्या पूर्वीची आहे, ह्मणून तेथील संग्रहालयाच्या लायब्ररीयनच्या सांगण्यांत आलें. परंतु, ती पोथी साक्षात् पाहिल्याशिवाय व तिला

कसास लावल्याशिवाय तिच्यासंबंधानें निश्चयानें कोणतेंच विधान ग्राह्य करतां येत नाहीं.

**तंजावर येथें असलेली भारद्वाजी प्रत शक १५१५.**

५४ एकनाथानें शुद्ध केलेल्या प्रतींत तद्विषयक उल्लेखाच्या कांहीं एकनाथी ओंव्या येत असतात. ज्ञानेश्वरीच्या शोधाची लेखनकामाठी एकनाथानें शक १५०६ तारणसंवत्सरीं संपूर्ण केली. त्या ओव्या अर्थात्च प्रस्तुत छापल्या गेलेल्या मुकुंदराजाच्या प्रतींत नाहींत. ह्मणजे, ह्या पोथीवर शुद्धाशुद्धाची जी मखलाशी केली आहे ती हि एकनाथाच्या पूर्वींची आहे; नंतरची असती तर एकनाथी ओव्यांचा समावेश मखलाशीकारानें अवश्यमेव केला असता. कारण, शुद्धाशुद्ध करणारा मखलाशीकार मोटा साक्षेपी गृहस्थ दिसतो. एकनाथानें आपली शुद्ध प्रत शक १५०६ तारणांत तयार केली. त्याच्या पुढें ९ वर्षांनीं शक १५१५ तील एक पोथी तंजावरांतील ग्रंथसंग्रहांत माझ्या पहाण्यांत आली. हिची समाप्ति अशी:—

" शके पंधरा शतें सावोत्तरिं । तारणनाम संवत्सरिं ।
एका जनार्दनें अत्यादारिं । गीता–ज्ञानेश्वरी–प्रती शुद्ध केली ॥ १ ॥
ग्रंथु पूर्वीं च अतिशुद्ध । परि पाठांतरें शुद्धाबद्ध ।
ते शोधुनियां येवंविध । प्रति शुद्ध सिद्धज्ञानेश्वरी ॥ २ ॥
नमो ज्ञानेश्वरा निष्कळंका । ज्याचे गीतेची वाचितां टीका ।
ज्ञान होय लोकां । अतिभाविका ग्रंथार्थियां ॥ ३ ॥

श्रीशके पंधरा शतें पंधरा , विजयसंवत्सर, उत्तरायणें, फाल्गुनमासे, शुक्लपक्षे, सप्तमी, रविवासरे, गीता संपूर्ण । श्रीकृष्णार्पणमस्तु । गोदादक्षिण भागे राजधानि अहमदानगरस्थाने परशरामात्मज–नृसिंह–भारद्वाजगोत्रोत्पन्नेन । ग्रंथो लिखितः संपूर्णमस्तु ॥. "

शके १५१५ च्या फाल्गुन शुक्ल सप्तमीला रविवार येतो, तेव्हां, ही प्रत शक १५१५ तील आहे, ह्यांत संशय नाहीं. एकनाथानें शुद्ध केलेल्या प्रतीवरून ही प्रत उतरून घेतलेली आहे. अर्थात् एकनाथी प्रत कशी असेल तें हिच्यावरून ताडतां येतें. पैटणापासून जवळ असलेल्या अहमदनगर

शहरीं परशरामात्मज नृसिंह भारद्वाज यानें ही प्रत उतरली. भारद्वाज ह्मणजे भारदे. नगर येथील ज्या भारद्यांनीं ऊर्फ भारद्वाजानें कांहीं वर्षांपूर्वीं एकाचे दोनचार ज्ञानेश्वर केले होते त्यांचाच कोणी पूर्वज हा नृसिंह भारद्वाज असावा. यावरून असें दिसतें कीं, ज्ञानेश्वरीचें पठण ह्या भारद्यांच्या कुळांत वंशपरंपरेनें आहे. ह्या प्रतींत ( १ ) भाद्रपदमास कपिलाषष्टी, इत्यादि व ( २ ) या ज्ञानेश्वरी पाठीं, इत्यादि, दोन ओंव्या नाहींत. तंजावर येथील प्रतीतील अध्यायवार ओंवी संख्या येणेंप्रमाणें आहे.

| अध्याय | ओंव्या | अध्याय | ओंव्या |
|---|---|---|---|
| १ | ... ... २७५ | २ | ... ... ३७२ |
| ३ | ... ... २७६ | ४ | ... ... २२५ |
| ५ | ... ... १८० | ६ | ... ... ५०८ |
| ७ | ... ... २१० | ८ | ... ... २७१ |
| ९ | ... ... ५३६ | १० | ... ... ३३६ |
| ११ | ... ... ७१२ | १२ | ... ... २४७ |
| १३ | ... ...११६९ | १४ | ... ... ४१५ |
| १५ | ... ... ५९९ | १६ | ... ... ४७३ |
| १७ | ... ... ४३३ | १८ | ... ...१८१० |

९०४७

**कुंट्यांची प्रत.** कुंटे आपल्या प्रतीला एकनाथी प्रत ह्मणतात. कुंट्यांच्या प्रतींत ९०३७ ओंव्या आहेत. त्यापेक्षां ह्या तंजावरी प्रतींत १० ओंव्या जास्त आहेत.

**मुकुंदराजाच्या प्रतींतील ओंवी संख्या.** ५५ तंजावरांतील भारद्वाजी प्रत व कुंट्यांची एकनाथी ह्मणून छाटलेली प्रत ह्यांत प्रत्येकीं ९०४७ व ९०३७ ओंव्या आहेत. प्रस्तुत छापलेल्या मुकुंदराजाच्या प्रतींत अध्यायवार ओंवीसंख्या अशी आहे:—

| अध्याय | ओंव्या | अध्याय | ओंव्या |
|---|---|---|---|
| १ | ... ... २७३ | २ | ... ... ३७८ |

| | | | |
|---|---|---|---|
| ३ ... | ... २७१ | ४ ... | ... २२२ |
| ५ ... | ... १७८ | ६ ... | ... ४९४ |
| ७ ... | ... २०५ | ८ ... | ... २६९ |
| ९ ... | ... ५३० | १० ... | ... ३१० |
| ११ ... | ... ६९८ | १२ ... | ... २४४ |
| १३ ... | ...११६३ | १४ ... | ... ३७१ |
| १५ ... | ... ५९६ | १६ ... | ... ४७२ |
| १७ ... | ... ४३१ | १८ ... | ...१७९१ |

८८९२

सोनारी प्रतींतील ओंवी-संख्या.

५६. वाईस एका सोनाराच्या येथें सांपडलेली ज्ञानेश्वरीची एक प्रत आहे तींत ओंव्या अध्यायवार येणेंप्रमाणें आहेत:—

| अध्याय | ओंव्या | अध्याय | ओंव्या |
|---|---|---|---|
| १ ... | ... २९९ | २ ... | ... ४३६ |
| ३ ... | ... ३५१ | ४ ... | ... २५४ |
| ५ .... | .... २२० | ६ .... | .... ५३९ |
| ७ .... | .... २३६ | ८ ... | .... २९३ |
| ९ .... | .... ६१७ | १० .... | .... ४७१ |
| ११ .... | .... ७५९ | १२ .... | .... २७२ |
| १३ .... | ....११८६ | १४ .... | .... ४६४ |
| १५ .... | .... ६१४ | १६ .... | .... ५२९ |
| १७ .... | ... ४६८ | १८ .... | ....१८६३ |

९८५१

भराड्याच्या प्रतींतील ओंवीसंख्या.

५७ अकळूज येथील एका भराड्यापाशीं एक ज्ञानेश्वरीची पोथी होती तींत ओंवीसंख्या येणेंप्रमाणें होती:—

| अध्याय | ओंव्या | अध्याय | ओंव्या |
|---|---|---|---|
| १ .... | .... ३२२ | २ .... | .... ४८८ |
| ३ .... | .... ३१८ | ४ .... | .... २६७ |
| ५ .... | .... २०९ | ६ .... | .... ५४४ |
| ७ .... | .... २३९ | ८ .... | .... २९८ |
| ९ .... | .... ५६९ | १० .... | .... ३७९ |
| ११ .... | .... ७६२ | १२ .... | .... २१६ |
| १३ ... | ... १२०५ | १४ ... | ... ४१३ |
| १५ ... | ... ६२० | १६ ... | ... ४१७ |
| १७ ... | ... ४६१ | १८ ... | ... १८८७ |

९७३४

५७ वाई येथें उद्बोधनाथसंप्रदायी खेडकर हरिदास आहेत त्यांच्या-जवळील प्रतीकांच्या पोथींत ज्ञानेश्वरीच्या ओंव्यांची संख्या ९०३४ आहे. ही प्रत संप्रदायपरंपरेनें आलेली आहे, असें हरिदास ह्मणतात.

**उद्बोधनाथी प्रतींतील ओंवीसंख्या.**

५८ रा. रा. माडगांवकर यांनीं एक पाठान्तरें देऊन ज्ञानेश्वरी छापिली आहे; परंतु जशी प्रसिद्ध करावी तशी जाहीर-रीतीनें प्रसिद्ध केली नाहीं. तिची एक प्रत के॰ काशिनाथपंत परब यांनीं मला दिली. ही प्रत तयार करतांना माडगांवकर यांनीं क, ख, ग, घ, च, छ, ज, झ, ट, ठ, ड, अशा एकदर ११ निरनिराळ्या प्रती पाठान्तरांकरितां जमविल्या होत्या. पैकीं नव्याजुन्या किती, वगैरेचा तपशील त्यांनीं दिला नाहीं. त्यांनीं आपल्या प्रतीला उपोध्दात वगैरे कांहींच माहिती दिली नाहीं. त्यामुळें अकरा हि प्रतींत सारख्याच ओंव्या होत्या किंवा प्रत्येक प्रतींतील ओंवीसंख्या निरनिराळी होती, या संबंधानें कांहींच सांगतां येत नाहीं. प्रायः ओंवीसंख्या निरनिराळ्या पोथ्यांत भिन्न-भिन्न असलीच पाहिजे, असें मजजवळील पन्नास पोथ्यांवरून मी खात्रीनें सांगूं शकतों. माडगांवकरांनीं हा प्रपंच केला नसल्यामुळें त्यांनीं छापिलेल्या प्रतींतील च तेवढ्या ओंव्यांची संख्या येथें देतों.

**माडगांवकरी छापील प्रतींतील ओंवी-संख्या**

| अध्याय | ओंव्या | अध्याय | ओंव्या |
|---|---|---|---|
| १ ... | ... २७५ | २ ... | ... ३७५ |
| ३ ... | ... २७६ | ४ ... | ... २२५ |
| ५ ... | ... १८० | ६ ... | ... ४९७ |
| ७ ... | ... २१० | ८ ... | ... २७१ |
| ९ ... | ... ५३५ | १० ... | ... ३३५ |
| ११ ... | ... ७०८ | १२ ... | ... २४७ |
| १३ ... | ... ११७० | १४ ... | ... ४१५ |
| १५ ... | ... ५९८ | १६ ... | ... ४७३ |
| १७ ... | ... ४३३ | १८ ... | ...१८११ |

———————

९०३४

५९ निळोबाच्या गाथेतील ज्ञानेश्वरीच्या ओंव्यांची संख्या दहा हजार आहे.

**निळोबाच्या मतें ओंवीसंख्या.**

तया स्थळीं केला भगद्गीताअर्थ ।
दहासहस्र ग्रंथ पूर्ण झाला ॥ ९७ ॥
ज्ञानेश्वरचरित्र, निळोबाकृत ॥

६० चिध्दनस्वामी भक्तकथामृतसारांत

**चिघ्दनमतें ओंवीसंख्या.**

करी नवसहस्र पन्नास ( ९०५० ) ।
ओंवी गीतार्थ ज्ञानेश्वरी ॥ १४६,
अध्याय ९ (भिंगारकर).

**भारद्यांच्या प्रतींतील ओंवीसंख्या.**

६१ भारद्यांच्या पोथीतील ओंवीसंख्या ९००९ आहे.

६२ येणेंप्रमाणें निळोबाच्या १०००० पासून मुकुंदराजाच्या ८८९२ पर्यंत निरनिराळ्या पोथ्यांत ओंवीसंख्या आहे. पैकीं, मुकुंद-

**क्षेपक.** राजाच्या पोथीतील ८८९२ चा आंकडा मूळ धरणें काल-दृष्टया व भाषादृष्टया प्रशस्तच नव्हे, तर अवश्यक आहे. ह्या ८८९२ हून जेवढ्या ओंव्या जास्त सांपडतील तेवढ्या सर्व क्षेपक होत. परीक्षेकरितां प्रस्तुत प्रतींतील पहिला अध्याय घेतों व सोनारी प्रतींतील पहिला अध्याय घेतों, आणि, सोनारी प्रतींतील क्षेपक ओंव्या संस्कृत श्लोकांच्या व मराठी ओंव्यांच्या अनुक्रमानें देतों. निळोबाची दहाहजार ओंव्यांची प्रत मला उपलब्ध झाली नाहीं. सबब, तिच्या खालोखाल ओंव्यांची संख्या मजजवळील सोनारी प्रतींत असल्याकारणानें तुलनेकरितां सोनारी प्रतच घेतली आहे.

| मुकुंदराजाच्या प्रतींतील कोणत्या ओंवी नंतर | सोनारी प्रतींतील क्षेपक ओंवी किंवा ओंव्या आंकड्यासह. |
|---|---|
| | क्षेपकः— |
| २८ व्या ओंवी नंतर | (१) कीं ज्ञानामृताची सरीता ।<br>मुमुक्षसाधकां तृषितां ।<br>अज्ञानदारिद्रें पीडतां ।<br>कामधेनु हे ॥ २९ ॥ |
| १०० ” ” | (२) जो विक्रमें महामेरु ।<br>तेजस्वी प्रतापें भास्करु ।<br>जयाचीया बळा नेणवे पारु ।<br>ऐसा वीर ॥ १०२ ॥ |
| १४८ ” ” | (३) आधीं च बळाचा महामेरु ।<br>वरि अवलंबीला अवसरु ।<br>येणें काळासीं ही हीमज्वरु ।<br>प्रगटों पाहे ॥ १५० ॥ |

( ४ ) जैसे सागर हेलावती ।
१५० ,, ,, तैसे नादावरि नाद उठती ।
दोहीं दळीं आंदोळती ।
सींहनाद ॥ १५३ ॥

( ५ ) ऐसा घोषु अचाट प्रगटला ।
१५५ ,, ,, आकाशीं पाताळीं व्यापला ।
तेणें महाभूतांचा राहिला ।
व्यापारु आघवा ॥ १५९ ॥

( ६ ) पवन प्राणें कोंडला ।
१५६ ,, ,, तोय सर्वत्र शोखीनला ।
तेज तरी लोपला ।
सैन्यरजें ॥ १६१ ॥

( ७ ) योध्ये सबळ भारी टणक ।
१७० ,, ,, शस्त्रास्त्रीं पूर्ण साधक ।
युध्य करुं आले सकळीक ।
भूपती जे जे ॥ १७५ ॥

( ८ ) कैसा कृष्णार्जुनें रथ मिरवत ।
१७४ ,, ,, ध्वजास्तंभीं तो हणुमंत ।
मूर्त्तित्रय अत्यद्भुत ।
देखती डोळां ॥ १७९ ॥

( ९ ) तंव कृष्णु ह्मणे पार्थाप्रती ।
१७५ ,, ,, येथें समस्त राये आले असती ।
कौरवांतें ही निगुती ।
पाहे पां बरवें ॥ १८० ॥

(१०) परस्परें कोण्हा न गणिति ।
१८४ ,, ,, दोहिं दळीं वीर हाकारिति ।
आजी फावलि रे आह्मां ह्मणति ।
संग्रामगंगा ॥ १९० ॥

[११] ह्मणोनी येथें स्वजनु देखीला ।
कृपेनें अत्यंत मोहीनला ।
१८८ ,, ,, तये वीरवृत्तीसी केला ।
अनादरु ॥ १९४ ॥
[१२] नीमीत्यें वीपरीत दीसती ।
न चोजवे श्रेयसंपत्ति ।
२०६ ,, ,, वृथाची दुराग्रहो श्रीपती ।
संग्रामी यये ॥ ११३
[१३] कैसा संग्राम हा दुर्धरु ।
वोडवला पापाचा सागरु ।
,, ,, ,, येथें निस्तरावया धीरु ।
कवण आथी ॥ ११४ ॥
[१४] कैसें हें नसावरत चि आलें ।
अदृष्ट दुःख कोसळलें ।
२२१ ,, ,, नेणों काय आर्जाविलें ।
प्राकृत पूर्वी ॥ २२९ ॥
[१५] जयांचें करुं पूजन ।
हृदयीं भावें भजन ।
२२४ ,, ,, नीरंतर दरुषण ।
वाहों पोटीं ॥ २३२ ॥
[१६] यांचिया कृपेचें मज जीवन ।
तेणें मी जालों अर्जुन ।
,, ,, ,, तो आतां काय जुझोन ।
मारुं यांसी ॥ २३३ ॥
[१७] कां पंचमु सभेमाजी एतां ।
न थरे श्रोत्रीयु सर्वथा ।
२३१ ,, ,, नां तरि खळाची प्रसन्नता ।
साधु न वांछी ॥ २४० ॥

[१८] जरि अनंत जन्मीचे सुकृत ।
तेणें तुं जोडलासि अच्युत ।
२३१ ,, ,, ऐसें देखोनि विपत्तित ।
राहे कोण्हीं ॥ २४१ ॥

[१९] तैसा हा दोषाचा महापूरु ।
कुळघात मी च संव्हारु ।
२४० ,, ,, येथें वाहवलियां पारु ।
न सांपडे चि ॥ २५० ॥

[२०] ऐसें पार्थु तीये अवसरीं ।
ह्मणे देवा अवधारीं ।
२४१ ,, ,, ययां कल्मषांची थोरी ।
जाणसी तुं ॥ २५२ ॥

[२१] ऐसा वर्णसंकरां तयां ।
अशेखां कुळघातीयां ।
२५० ,, ,, नरकभोगा वांचुनीयां ।
नाहीं आन ॥२६२॥

[२२] मग तयांचे धर्म नासती ।
कुळ जाये अधोगती ।
२५८ ,, ,, ऐसी करिजैल ख्याति ।
पापीं यीहीं ॥ २७० ॥

[२३] ऐसें वीचारुनी सकळ ।
अवलोकुनीयां कुळ ।
२६५ ,, ,, मग ह्मणे राज्य तें केवळ ।
नीरयभोगु ॥ २७८ ॥

[२४] जेणें अर्जुनाचा मोहो नाशे ।
सम्यक्–ज्ञान हृदयीं प्रकाशे ।
२७३ ,, ,, ऐसीं प्रबोध उत्तरें विश्वेशें ।
बोलिजति ॥ २८६ ॥

(२५) जे उत्तरमीमांसा उपनिषदें ।
तीयें मथुनीयां मुकुंदें ।
२७३ ,, ,, निरुपिजैल आनंदें ।
पार्थु जेणें उमजे ॥ २८७ ॥

(२६) वेदीं त्रिकांडनिरोपण ।
कर्म उपासना ज्ञान ।
,, ,, ,, तें स्वयें ची कृष्ण आपण ।
बोधिति पार्थासी ॥ २८८ ॥

माडगांवकरांच्या प्रतींत खालील दोन ओंव्या क्षेपक आहेत.

ऐसें पार्थ तिये अवसरीं ।
ह्मणे देवा अवधारीं ।
२४१ ,, ,, या कल्मषाची थेरी ।
सांगैन तुज ॥ २४२ ॥

ऐसें देखोनि सकळ ।
अर्जुनें आपुलें कुळ ।
२६५ ,, ,, मग ह्मणे राज्य तें केवळ ।
निरयभोग ॥ २६७ ॥

सोनारी प्रतींतल्या शेवटल्या तीन ओंव्या कुंट्यांनीं पहिल्या अध्यायांत क्षेपक ह्मणून नमूद केल्या आहेत.

माडगांवकरांच्या प्रतीच्या पहिल्या अध्यायांतल्या दोन्हीं क्षेपक ओंव्या सोनारी प्रतींत पाठभेदानें आल्या आहेत.

**एकनाथाला ज्ञानेश्वरीची अस्सल प्रत मिळाली नव्हती.**

मजजवळील इतर सर्व पोथ्यांच्या पहिल्या अध्यायांतील क्षेपक सोनारी प्रतींतील क्षेपकांत आले आहेत. ज्याअर्थी सोनारी प्रतींत ओवीसंख्या ९८५१ आहे व निळोबाच्या प्रतींत १०००० ओंव्या होत्या, त्याअर्थी निळोबाच्या प्रतींत सोनारी प्रतींतल्याहून १४९ क्षेपक जास्त होते, हें उघड आहे. तंजावरी प्रतींत ओंव्या ९०४७ आहेत, तेव्हां तींत १५५ क्षेपक मुकुंदराजाच्या प्रतीहून जास्त आहेत. तंजावरची

प्रत एकनाथाच्या प्रतीनंतर ९ वर्षांनीं ह्मणजे शक १५१५ त तयार केली असल्यामुळें, एकनाथाच्या प्रतींत सुमारें ९०४७ ओंव्या असाव्या, असें ह्मणण्यास हरकत नाहीं. भारद्वांच्या प्रतीप्रमाणें एकनाथी प्रतींत ९००९ ओंव्या होत्या असें जरि धरलें, तरी हि एकनाथाच्या प्रतींत ११७ क्षेपक राहिले च होते, असें ह्मणावें लागतें. ह्मणजे एकनाथाला ज्ञानेश्वरीची अस्सल प्रत मिळाली नव्हती, ह्यांत बिलकुल संशय नाहीं. क्षेपक असलेल्या पोथ्या एकनाथाच्या हातांत पडल्या, व भाषा, औचित्य, पुनरुक्ति, असंभव, वगैरे प्रमाणांनीं त्यानें आपली प्रत आपल्या समजुतीप्रमाणें शुद्ध करून घेतली. परंतु, इतकें हि करून आपल्या शुद्ध केलेल्या प्रतींत क्षेपक राहिले नसतील च, अशी खात्री त्याची त्याला च पटली नाहीं. सबब, उद्विग्न होऊन त्यानें खालील शापोक्ति प्रकट केली:—

या ज्ञानेश्वरीपाठीं । जो टीका करील मऱ्हाटी ।
तेणें रत्नखचिताच्या ताटीं । जाण नरोटी ठेविली! ॥ १ ॥

पाठीं ह्मणजे नंतर, असा अर्थ कित्येक अप्रबुद्ध करतात! पाठीं ह्मणजे पाठांत, ओंव्यांत. ज्ञानेश्वरीच्या मूळ ओंव्यांत जो कोणी आपल्या टीकारूप ओंव्या करून समासावर लिहून ठेवील, त्यानें रत्नखचित ताटाच्या भोंवतीं नरोट्या ठेविल्यासारखें होईल, असा एकनाथाचा शाप आहे. आणि हा शाप अक्षरशः खरा होता. ज्ञानेश्वरीनंतर कोणी ओंव्या करूं नये, असा नाथांचा आशय नाहीं. तर, ज्ञानेश्वरीच्या पोथीच्या पानांच्या समासांवर ज्ञानेश्वरी वांचतांना तल्लीन होऊन कित्येक लोक ज्यास्त विशदीकरणार्थ स्फूर्तीनें टीकारूप ओंव्या भाविकपणानें व प्रेमानें लिहून ठेवीत. ह्या ओंव्या नकल करणारे लेखकलोक मूळांत अज्ञानानें घुसडून देत. त्यामुळें, मूळ कोणतें व प्रक्षिप्त कोणतें, तें हि कळण्याची मारामारी क्वचित् प्रसंगीं पडे. ह्या घोंटाळ्याला अनुलक्षून नाथांनीं ही शापोक्ति प्रगट केली आहे. मजजवळील ज्ञानेश्वरीच्या पोथ्यांवरून प्रक्षेपांचा समावेश निरनिराळ्या प्रतींत कसा झाला, तें उत्तम कळतें. एका पोथीच्या समासावर टीका ह्मणून जी ओंवी लिहिली असते, तीच दुसऱ्या एखाद्या तत्पश्चात्क पोथींत मूळांत प्रविष्ट केलेली आढळते. तद्यांत, हुबेहुब ज्ञानेश्वराच्या धर्तीवर जर ओंवी बनली गेली असेल, तर ती मूळ ओंव्यांतून निवडून काढण्यास पंचाईत पडते. मुतिङंतरूपें,

शब्द, औचित्य, वगैरे साधनांनीं प्रक्षेप निवडून काढितां येतील. परंतु, हीं साधनें शोधक संपादकाच्या हातीं समग्र असलीं पाहिजेत. अशीं साधनें एकनाथाच्या कालीं उपलब्ध नव्हतीं, हें तर काय, परंतु, तीं सध्यां हि असावीं तशीं उपलब्ध नाहींत. आतां इतकें खरें आहे कीं, ज्ञानेश्वराच्या पूर्वीचे व वेळचे मराठी शिलालेख व ताम्रपत्रें सध्यां उपलब्ध झालीं आहेत. त्यांवरून ज्ञानेश्वरीची भाषा कशी असली पाहिजे, हें सूक्ष्म रीतीनें सांगता येईल. परंतु, ज्ञानेश्वरकालीन शब्दकोश अद्याप मराठींत तयार व्हावयाचा आहे. त्यामुळें, अमूक शब्द ज्ञानेश्वरींत येऊं शकेल किंवा शकणार नाहीं, हें सांगण्यास साधन नाहीं. तसेंच, धर्मकोश, दृष्टान्तकोश, इतिहासकोश, वगैरे कोशांचा आपल्याकडे अभाव असल्यामुळें, ज्ञानेश्वरोत्तरकालीन पोथ्यांतील प्रक्षेप निवडून काढणें सध्यां देखील प्रायः दुर्घट आहे. एकनाथाच्या वेळीं, तर, सर्वस्वींच दुर्घट होतें. तशांत, फक्त १००।१५० च क्षेपक त्यानें आपल्या प्रतींत येऊं दिलें ही कांहीं लहानसहान गोष्ट नाहीं. साक्षात्, मुकुंदराजाची पोथी मला न मिळती, तर भाषा, शब्द, औचित्य, पुनरुक्ति वगैरेंच्या जोरावर एकनाथाच्या इतकी हि शुद्ध प्रत मला तयार करतां आली नसती. आली असती किं नसती, ह्या शंकेची केवळ कल्पना च करावयाला नको.

**केवळ बिनअस्सल म्हणजे नकल पोथ्या ताडून ग्रंथांचें मूळ निर्भेळ स्वरूप सिद्ध होत नाहीं.**

मूळ अस्सल प्रत उपलब्ध नसतां, अकरा पोथ्यांची तुलना करून, माडगांवकरांनीं जी ओंवीसंख्या दिली आहे, तींत १४२ क्षेपक राहिलेच आहेत. मूळ अस्सल प्रत किंवा प्रतीची प्रत उपलब्ध नसतां, कोणत्या हि ग्रंथाचा मूळ मजकूर नक्की अमुक होता, हें अगदीं बिनचुक ठरवितां येणें केवळ, अशक्य आहे. जुन्या ग्रंथकारांच्या Varorium Editions यूरोपियन विद्वान लोक काढतात, त्यांच्या शुद्धाशुद्धतेची परीक्षा ह्या न्यायानेंच केली पाहिजे. भारतासारख्या ग्रंथांनां हि हाच दंडक लागू आहे. अस्सल प्रतीच्या अभावीं, वाटेल त्यानें वाटेल तो भाग प्रक्षिप्त समजावा व त्याच्या मरतुकड्या बलावर वाटतील तीं अनुमानें काढावीं. शास्त्रदृष्ट्या दोहोंची हि किंमत शून्य आहे. स्यात्पक्ष सदा डळमळितच असतो.

**नकलकारांनीं मूळ ज्ञानेश्वरीची छाटाछाट केलेली नाहीं; प्रक्षेपानीं भरती केली आहे.**

६३ सच्चिदानन्दबावानें लिहिलेल्या ज्ञानेश्वरीच्या मूळ प्रतींत क्षेपकांची उत्तरोत्तर जास्त भरती झाली; परंतु मूळ ओव्या काढून टाकून कमती मात्र कोणत्या हि पोथींत झालेली दिसत नाहीं. चुकून एखाददुसरी मूळ ओंवी लेखकानें गाळलेली पोथ्यांतून आढळते. पण, जाणूनबुजून ज्ञानेश्वरी ओंवी मूळ ग्रंथांतून काढून टाकण्याचें धाष्टर्य कोण्याहि लेखकानें केलेलें आढळत नाहीं. कारण, भक्तिमार्गी लोक ज्ञानेश्वराच्या शब्दाला केवळ ईश्वरीवचन समजत आणि विद्वान जे असत त्यांना मुळाची सहृदयता असे. त्यामुळें, मूळ ज्ञानेश्वरीच्या ओंव्यांत कटाई झालेली नाहीं. झालें काय? तर, टीकाकारांच्या समासावर लिहिण्याच्या खोडीनें, मूळग्रंथांत क्षेपकांची खोगीरभरती मात्र जास्त झाली. ओंव्यांचा अनुक्रम एखाद्या पोथींत बदलेला आढळतो. ह्मणजे मागची पुढें व पुढची मागें, असा व्युत्क्रम दृष्टीस पडतो. परंतु, सबंद ओंवी किंवा ओंव्या गाळलेल्या कोणत्या हि सबंद पोथींत आढळत नाहींत.

ज्ञानेश्वरीच्या पाठांत क्षेपक ओंव्या कोणी नवीन करून घालूं नये, असा निर्बंध ज्यानें केला त्या एकनाथानें स्वत:क्षेपक ओव्या रचून ज्ञानेश्वरींत घातल्या नाहींत, हें उघडच आहे. परंतु, कित्येकांचें असें ह्मणणें आहे कीं, “ एकनाथानें ज्ञानेश्वरीच्या बऱ्याच ओंव्यांतील चरणांची फिरवाफिरव केली आहे ” ( भिंगारकर, ज्ञानेश्वरमहाराज यांचा कालनिर्णय, पृष्ठ ७२-७३ ). भिंगारकरांनीं अशा चरणांची फिरवाफिरव केलेल्या ह्मणून चार ओंव्या दिलेल्या आहेत. त्या चाऱ्ही मुकुंदराजी प्रतींत नाहींत व त्यांची त्या त्या स्थलीं अवश्यकता हि नाहीं. पांचव्या अध्यायांतील “ बुद्धिनिश्चयें आत्मज्ञान ” इत्यादिक ओंवी संबंधानें भिंगारकर असा प्रश्न करतात कीं, ही ओंवी प्रक्षित समजली तर श्लोकाच्या टीकेची ज्ञानेश्वरकृत मूळ ओवी कोणती ती दाखवून दिल्याशिवाय ही ओंवी नवी किंवा जुनी याचा नीटसा खुलासा होणार नाहीं ( भिंगारकर, पृष्ठ ७२।७३ ). परंतु, मुकुंदराजी प्रतीवरून पहातां, प्रत्येक श्लोकांतील प्रत्येक पदाची टीका ज्ञानेश्वर हटकून करतो च, असें ह्मणतां येत नाहीं. उदाहरणार्थ, दुसऱ्या अध्यायांतील १८ व २० या श्लोकांवरील ज्ञानेश्वरी टीका पहा. १८ व्या श्लोकांतील अनाशिन: व

अप्रमेयस्य ह्या दोन पदांचें भाषान्तर ज्ञानेश्वरानें दिलें नाहीं. २० व्या श्लोकांतील एका हि पदाचें भाषान्तर ज्ञानेश्वरी टीकेंत नाहीं. २१ व्या श्लोकाची हि हीच दशा आहे. ह्मणजे, जेथें विशेष कांहीं भानगड नाहीं, प्रायः पुनरुक्ति व गौरव आहे तेथें ज्ञानेश्वर द्रुति करतो. तोच प्रकार पांचव्या अध्यायातील तद्बुद्धयः इत्यादि श्लोकाचा झाला आहे. मूळ श्लोकांतील प्रत्येक पदाचा अर्थ ज्ञानेश्वरानें दिला नाहीं. सर्व टीका दृष्टान्तांनीं च भरून काढिली आहे. प्रत्येक श्लोकांतील प्रत्येक पदाचें भाषांतर ज्ञानेश्वर नियमानें देतोंच, अशी जर गोष्ट असती, तर भिंगारकरांचें ह्मणणें सयुक्तिक दिसलें असतें. तशी गोष्ट नाहीं, त्याअर्थी ही "बुद्धिनिश्चयें आत्मज्ञान" इत्यादिक ओंवी प्रक्षिप्त आहे व ती एकनाथांनीं केली आहे, असें हि ह्मणवत नाहीं. मजजवळ कोंकणांतील मालवण शहरीं सांपडलेली एक पोथी आहे, तींत ह्या प्रक्षिप्त ओवीचा पाठ असा आहेः—

बुद्धिनिश्चये आत्मज्ञान। ब्रह्मरूप भावि आपणाआपण।
ब्रह्मनिष्ठा राखे पुर्ण। अहिर्णिशि ॥ ८८ ॥

तत्परायण हें पद ह्या पाठांत नाहीं. तेव्हां, ह्या अशा पाठाच्या ओंवीवर एकनाथित्व हि आरोपितां येत नाहीं.

माहित असलेले सर्व क्षेपक मूळांत घालण्याचा सोनारी प्रतीचा तर बाणाच आहे. त्या प्रतींत ही ओंवी नाहीं. हिच्या ऐवजीं,

अनुभवें बुद्धि भरुनी। भोगवीती मना करुनी।
मग तें चि इंद्रियभुवनीं। वर्षाव करीती ॥ ११६ ॥

अशी ओंवी आहे. सोनारी प्रत एकनाथाच्या नंतरची आहे. तिच्यांत ज्या अर्थी "बुद्धिनिश्चये" ही ओंवी नाहीं त्याअर्थी ही ओंवी एकनाथाची तर नव्हेच, परंतु, एकनाथकालीन हि नाहीं. कोणी नंतर रचिलेली आहे. ह्या ओंवीचा पाठ दोन तऱ्हांचा सांपडतो. एकनाथी चार चरणांचा व चार यमकांचा एक पाठ; आणि साडेतीन चरणांचा दुसरा पाठ. तस्मात्, एकनाथानें हा प्रक्षेप घातलेला नाहीं, ह्याविषयीं शंका नको. इतकेंच नव्हे, तर एकनाथानें ज्ञानेश्वरींत एक हि प्रक्षेप घातलेला नाहीं, हा नियम समजावा.

६४ अस्सल प्रतीच्या अभावीं, निव्वळ दहा पांच पोथ्या घेऊन प्रक्षिप्ताप्रक्षिप्त निवडण्यांत जसें फारसें ह्मणण्याजोगें यश येत नाहीं, तसेंच ह्या

पद्धतीनें मूळप्रतींची मूळ अस्सल भाषा हि नक्की ठरविणें दुरापास्त होतें. माडगांवकरांनीं अकरा निरनिराळ्या प्रती घेऊन जे पाठ ठरविले आहेत, ते मुकुंदराजाच्या प्रतींतील मूळपाठांशीं ताडून पाहिले असतां, वरील विधानाची सत्यता प्रतीत होईल. सबब, कांहीं पाठ दोन्ही प्रतींतील घेऊन तुलना करतों.

| अध्याय पहिला ओवी | मुकुंदराज | माडगांवकर | माडगांवकरांच्या टिपांतील पाठान्तरें | |
|---|---|---|---|---|
| ४ | रेखा | देखा | देखां | [१] |
| ४ | टेव | ठेव | ० | [२] |
| ५ | तिये | तें | तियें—तीं | [३] |
| ६ | पद्यबंध | पदबंध | ० | [४] |
| ७ | तिया | त्या | ० | [५] |
| ९ | व्यासादिकांचिया | व्यासादिकांची | व्यासादिकांचिया | [६] |
| ९ | तिया | ते | ० | [७] |
| १० | विसंवादें | विसंवाद | विसंवादें | [८] |
| १३ | सत्तर्कवादु | सत्कारवादु | ० | [८अ] |
| २४ | जालेयां | जालियां | जालेयां | [९] |
| २५ | कृतकार्या | कृतकार्या | कृतकार्य | [१०] |
| २८ | कलाकौतुकां | सकळां कौतुकां | सकळ कौतुकां | [११] |
| ३० | वसैठ | वसौठ | विशिष्ट | [१२] |
| ३२ | आविष्करौनि | आविष्करोनि | आदिकरूनि | [१३] |
| ३३ | महाकाव्या राऊ | हा काव्यां रावो | शास्त्रां | [१४] |
| ३५ | सिहाणें | शाहणें | ० | [१५] |
| ३५ | प्रेम | प्रमेय | ० | [१६] |
| ४० | सुखाडलें | सुरवाडलें | ० | [१७] |
| ४१ | नागरां | नागरा | नागरां | [१८] |
| ४२ | आगली | आगळी | ० | [१९] |
| ६२ | देआवें | द्यावें | परिसणेया | [२०] |
| १०९ | काज | कां जें | ० | [२१] |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| ११३ | जूझती | जुंझती | ० | (२१) |
| ११५ | तेया | तया | ० | (२३) |
| ११९ | उन्इचिलें | वरचिलेनि | ० | (२४) |
| १२५ | रायाचेयाबोला | राजयाचिया बोला | राजाचेया | (२५) |
| १५६ | रासौभा | सडा | ० | (२६) |
| १६६ | बाणवारि | बाणवरि | ० | (२७) |
| १७० | सकलै | सकळ | ० | (२८) |
| १७१ | आपणपेयां | आपणयां | आपणयांतें | (२९) |

२६४ आतां इया वेन्हि जें जिआवें। तेयापासौनि हें बरवें। जें शस्त्रें संडौनु साहावे। बाण एयांचे ॥ २६४ ॥

आतां यावरी जें ज्यावें। जिआवें तयापासौनि हें बरवें। जें शस्त्रें सांडूनि साहावे। बाण यांचे ॥ २६५ ॥ (३०)

स्पष्टीकरणः—

(१) माडगांवकर, कुंटे, साखरे, वगैरेंच्या प्रतींत देखा, देखां असा पाठ आहे. ह्या पाठानें बराबर अर्थ लागत नाहीं. अंगिकभाव हें नाम आहे. तें अवयव किंवा स्मृति या शब्दांशीं जोडतां येत नाहीं. व्याकरण आड येतें. साखऱ्यांच्या प्रतींत कांहीं तरी गडबडगुंडा केला आहे. २ ऱ्या ओंवी पासून १९ व्या ओंवीपर्यंत रूपक आहे. त्यांत,

| | | |
|---|---|---|
| १ देव = गणेश | १२ पदें = रत्नें | |
| २ शब्दब्रह्म = गणेशमूर्ति | १३ मती = पल्लवसडका | |
| ३ वर्ण = वपु | १४ षड्दर्शनें = साहाभुजा | |
| ४ स्मृति = अवयव | १५ तर्क = परशु ( १ भुजा ) | |
| ५ रेखा = अंगिकभाव | १६ न्याय = अंकुश | ( २ भुजा ) |
| ६ अर्थशोभा=लावण्याची टेव | १७ वेदान्त = मोदक | ( ३ ,, ) |
| ७ पुराणें = मणिभूषणें | १८ भग्नदंत = बौद्धमतसंकेतु | ( ४ ,, ) |
| ८ पदपद्धति = खेवणें | १९ वरदहस्त = सत्तर्कवाद | ( ५ ,, ) |
| ९ पद्यबंध = अंबर | २० अभयहस्त = धर्मप्रतिष्टा | ( ६ ,, ) |
| १० साहित्य = वाणें | २१ शुंडादंड = विवेक | |
| ११ काव्यनाटकें = क्षुद्रघंटिका | २२ समग्रदंत = संवाद | |

| | |
|---|---|
| २३ सूक्ष्मेक्षणु = उन्मेष | २७ उपनिषदें = कुसुमें |
| २४ दोन्ही--मिमांसा = दोनी कान | २८ अकार = चरणयुगुल |
| २५ मुनि = अलि | २९ उकार = उदर |
| २६ द्वैताद्वैत = दोनीं गंडस्थलें | ३० मकार = मस्तक |

असें हें गणेशदेवाचें रूपक आहे. त्यांत इतर उपमानांना जशीं उपमेयें आहेत, तसें, देखा हा पाठ ३ ऱ्या ओंवींत घेतला असतां, अंगिकभाव ह्या-उपमानाला उपमेय उपलब्ध होत नाहीं. तेव्हां, रेखा हाच मुकुंदराजाच्या प्रतींतील पाठ प्रशस्त आहे. रेखा ह्मणजे काव्यरचना. अंगिक ह्मणजे इंद्रियां-संबंधीं, अवयवांसंबंधी. भाव ह्मणजे अवयवांच्या द्वारा विकारांचें प्रदर्शन. हा रेखा शब्द चवथ्या अध्यायाच्या २१५ व्या ओवींत व सहाव्या अध्यायाच्या १८ व्या ओवींत आला आहे.

जें साहित्य आणि शांती। हे रेखा दिसे बोलती ॥ अध्याय ५, ओवी २१५॥

नवल बोलतिये रेखेची वाहाणी । अध्याय ६, ओवी १८ ॥

ह्या दोन्ही स्थलीं रेखा ह्या शब्दाचा अर्थ काव्यरचना असा आहे. रेखा हा पाठ घेऊन, पहिल्या अध्यायांतील ह्या चौथ्या ओवीच्या प्रथमार्धाचा अर्थ असा:—

गणेशा! स्मृती ह्या तुझे अवयव आहेत व काव्यरचना ही तुझ्या मनांतील विकारांची व विचारांची अवयवद्वारा प्रदर्शक आहे.

माडगांवकरांच्या टीपांत हि हा पाठ नाहीं. मजजवळील सोनारी प्रतींत रेखा असाचपाठ आहे.

( २ ) माडगांवकरादि प्रतींत टेव असा पाठ आहे. तो पाठ घेऊन अर्थ असा होतो. तेथ ह्मणजे अवयवरूप ज्या स्मृती त्यांच्या ठायीं, अर्थशोभा ही लावण्याचा साठा आहे. स्मृतींचा जो अर्थ तो लावण्याचा साठा कसा समजावयाचा ? आतां मुकुंदराजाच्या प्रतींतील टेव पाट घेऊन काय अर्थ होतो तो पहा. टेव ह्मणजे नखरा. तेथ ह्मणजे आंगिकभावरूप जी काव्यरचना तिच्या ठायीं, अर्थशोभा ही सौंदर्याच्या नखऱ्याप्रमाणें आहे. काव्य ह्मणजे प्रतिभोत्पादित ग्रंथरचना.

( ३ ) माडगांवकरांच्या तें हा पाठ व्याकरणदृष्ट्या दुष्ट आहे. 'त' ह्या सर्वनामाचें नपुंसकलिंगीं प्रथमेचें एकवचन तें. 'तें' हें 'मणिभूषणें' ह्या नपूं-

सकलिंगी प्रथमेच्या अनेकवचनाचें विशेषण होऊं शकणार नाहीं. 'त' ह्या सर्वनामाचें नपुंसकलिंगीं प्रथमेचें अनेकवचन ज्ञानेश्वरकालीं 'तियें' असें होत असे. तेव्हां 'तियें' हा पाठ शुद्ध आहे व तो च मुकुंदराजाच्या प्रतींत आहे. माडगांवकरांनीं टीपेंत पाठभेदांत 'तियें' हा शुद्ध पाठ दिला आहे व 'तें' हा अशुद्ध पाठ मूळांत स्वीकारला आहे.

(४) पद्यबंध व गद्यबंध असे दोन प्रकारचे बंध साहित्यशास्त्रांत सांगितले आहेत. पैकीं पद्यबंधांना रंगीत छताची उपमा ज्ञानेश्वरांनीं दिली आहे. पदबंध ह्या सामासिक शब्दाला कांहीं अर्थच नाहीं. पदबंध हा जर एकप्रकारचा बंध ह्मणजे प्रबंध समजला, तर दुसऱ्या प्रकारचा बंध कोणता? प्रत्ययबंधाचा! तात्पर्य, पदबंध हा अपपाठ आहे. माडगांवकरांच्या टिपांत हि हा किंवा इतर कोणता हि पाठभेद दिलेला नाहीं.

(५) 'त' ह्या सर्वनामाचें स्त्रिलिंगी प्रथमेच्या अनेकवचनाचें रूप 'तिया' असें ज्ञानेश्वरकालीं होत असे. सबब, 'त्या' हा अपपाठ आहे, कारण व्याकरण दुष्ट आहे.

(६) व्यासादिकांच ह्या विशेषणाचीं प्रथमेचीं रुपें अशीं होतः—

पु. प्र. ए. व्यासादिकांचा
न. प्र. ए. व्यासादिकांचें
स्त्री. प्र. ए. व्यासादिकांची
पु. प्र. अ. व्यासादिकांचे
न. प्र. अ. व्यासादिकांचीं
स्त्री. प्र. अ. व्यासादिकांचिया

मती ह्या अनेकवचनी रुपाचें विशेषण व्यासादिकांचिया हें अनेकवचनी रुप आहे. "व्यासादिकांची" हें एकवचनी रूप व्याकरणदुष्ट आहे. माडगांवकरांच्या प्रतींत ही सबंद ओंवी वाकडी तिकडी व अशुद्ध छापिली आहे.

[७] 'तिया' हें पल्लवसडका या अनेकवचनी स्त्रीलिंगी शब्दाचें विशेषण आहे. सबब ते हें रूप दुष्ट.

[८] तृतीया एकवचन हवें. हात विसंवाद धरीत नाहींत, तर विसंवादानें शास्त्रें धरतात. विसंवादें ह्मणजे एकमेकाच्या विरुद्ध. षड्दर्शनांपैकीं

प्रत्येक दर्शन इतर दर्शनाच्या विसंवादी ह्मणजे विरुद्ध आहे, असा ज्ञानेश्वरांचा आशय.

(८अ) सत्कारवाद कोणता? विसंवादी तर्क वर उल्लेखिलाच आहे. येथें सत्तर्काचें मंडण आहे.

(९) जालियां हें रूप व्याकरणदुष्ट आहे. जालेयां हें रूप येथें शुद्ध आहे.

(१०) कृतकार्यवान्=कृतकार्यां. कृतकार्या हें रूप व्याकरणदुष्ट वान् प्रत्यान्त सर्व संस्कृतरूपें ज्ञानेश्वरींत प्रथमेच्या एकवचनी पुल्लिंगी आँकारान्त होतात.

(११) मुकुंदराजी पाठ स्पष्ट व चांगला आहे, हें दिसतें च आहे.

(१२) वसति+स्थ=वसइ+ठ=वसैठ (विशेषण), वसैठा–ठी–ठें–वसैठा असें पुल्लिंगी रूप ह्याच अध्यायाच्या २२८ व्या ओंवींत आलें आहे. वसौठ हें रूप व्युत्पत्तिदुष्ट आहे.

(१३) करउन–नि–नियां–नु अशीं अपभ्रंशांतील रूपें. त्याचीं करुन–नि–नियां–नु, अथवा करौन–नि–नियां–नु अशीं रूपें ज्ञानेश्वरकालीं होत. करोन–नि–नियां– ही ओयुक्त रूपें ज्ञानेश्वरकालीं अस्थानक होत. ओयुक्त रूपें पुढें तीनशें वर्षांनीं प्रचारांत आलीं.

(१४) मुकुंदराजी पाठ प्रशस्त आहे, हें उघड आहे.

(१५) जीव्=जीवाण (वर्तमानकालवाचक धातुसाधित)
शिक्ष्=शिखाण=सिहाण, णा–णी–णें.
शहाणें हें रूप ज्ञानेश्वरोत्तरकालीन आहे, ज्ञानेश्वरकालीन नाहीं.

(१६) मुकुंदराजी पाठ प्रशस्त दिसतो च आहे.

(१७) मुखाडलें हा पाठ मुकुंदराजी असून, मजजवळील ज्ञानेश्वरीच्या प्राचीन कोशांत आहे. ख मधील र आणि व हीं दोन अक्षरें निराळीं करून मुरवाडलें असा अपपाठ बनला आहे. मुख पासून क्रियापद मुखाडणें.

(१८) नगरवान्=नागरवां=नागरां.

(१९) अग्र=अग्ग=आग+ल (स्वार्थक), ला, ली, लें लचा ळ हा उच्चार ज्ञानेश्वरोत्तरकालीन आहे. मुकुंदराजाच्या सबंद पोथींत ळ हा उच्चार विलकुल नाहीं.

१२

(२०) द्यावें हें रूप व्युत्पत्तिदुष्ट आहे.

घेयावें, देआवें, नेआवें, अशीं रूपें ज्ञानेश्वरकालीं होत.

२१ काज हे प्रश्नार्थकसर्वनाम ज्ञानेश्वरकालीं होतें. त्याच्या दोन्ही अक्षरांचा विभाग करून कां जें असा अपपाठ बनला. अर्थात्, अर्थ हि अनर्थावह झाला.

२२ युद्ध = जुज्झ = जूझ. जू वर अनुनासिक किंवा अनुस्वार ज्ञानेश्वरकालीं नव्हता.

२३ तया हें रूप ज्ञानेश्वरकालीन व्याकरणाच्या दृष्टीनें दुष्ट आहे. तेहाचा, तेआचा, तेयाचा, हीं रूपें ज्ञानेश्वरकालीं व चांगदेवकालीं प्रचलित होतीं.

(२४) अव+ईषत्=ओइच ओइच+इल्ल=ओइचिल्ल = ओइचिल, ला–ली–लें. ओइचिलें म्हणजे अत्यंत थोडें.

ओइचिलें ह्या शब्दाचा अर्थ न कळल्यामुळें वरिचिलें हा पाठ ज्ञानेश्वरोत्तरकालीं आला.

(२५) रायाचा ( पु. ) = रायाचेया ( पु. च. ए. ) बोला (पु. च. ए.) रायाची ( स्त्री ) = रायाचिया ( स्त्री. सप्तमी एकवचन )

तेव्हां बोला ह्या पुल्लिंगी चतुर्थीच्या एकवचनी रूपा पाठीमागें स्त्रीलिंगी रायाचिआ हें विशेषणरूप येणें व्याकरणदृष्ट्या दुष्ट आहे.

(२६) राशि –उद्भ्रम = रासि–उब्भवं = रास+उब्भां = रासौभां = रासौभा. रास मोडून वाऱ्यानें पखलण जी होते तिला रासौभा म्हणतात. रासौभा हा शब्द कळतनासा होऊन समासावर सडा असा जो त्या शब्दाचा अर्थ दिला होता, तो च मूळांत लेखकांनीं प्रविष्ट केला.

(२७) बाणरूप पाण्याचा पाऊस पाडूं लागले, तेव्हां, बाणवारि हा पाठ योग्य आहे. बाणवरि हा पाठ सर्वथा अशुद्ध आहे.

(२८) सवैं, सकलै, दावै, अशीं रूपें ज्ञानेश्वरकालीं होतीं.

(२९) आपण ह्याचें भाववाचक नाम आपणपें, त्याचें चतुर्थीचें एकवचन आपणपेंयां.

आपण ह्याचें चतुर्थीचें नपुंसकलिंगी एकवचन आपणआं, आपणयां पैकीं मुकुंदराजी पाठ आपणपेंयां हा अर्थाला उचित आहे.

[३०] माडगांवकरांची ही सबंद ओंवी व्याकरणदुष्ट आहे व अशा व्याकरणदुष्ट ओंव्या त्यांच्या प्रतींत शेकडों आहेत.

येणेंप्रमाणें माडगांवकरांच्या तौलनिक प्रतींत हजारों अपपाठ आहेत.

**तौलनिक पद्धतीनें मूळाचा थांग नक्की लागतोच असें नाहीं.**

इतकेंच नव्हे, तर व्याकरणदृष्ट्या एथून तेथून सर्व प्रत दुष्ट आहे. कुंटे, साखरे, वगैरेंच्या प्रतींसंबंधानें, तर बोलावयाला च नको. जसा एखादा पारशी किंवा युरोपीयन मराठी भाषा लिंग, वचन, विभक्ति वगैरेंचा चुथडा करून बोलतो, त्याच धर्तीवर, कुंटे, साखरे, माडगांवकर वगैरेंच्या आधुनिक प्रतींत अपभ्रष्ट मराठी भाषा योजिलेली आहे. हें ज्ञानेश्वरकालीन व्याकरण, ज्याला समजलें त्याच्या प्रतीतीस सहज येईल. ती प्रतीती यावी व ज्ञानेश्वरकालीन शुद्ध मराठी भाषा कशी होती, हें कळावें, एतदर्थ ही मुकुंदराजी प्रत छापिली आहे.

मूळ प्रत उपलब्ध नसतां, इतर किती हि प्रतींची तुलना करून मूळ पाठ ठरविण्याचा प्रयत्न केला, तत्रापि मूळपाठ अमुकच असेल, हें निश्चयानें सांगतां येत नाहीं, हें वरील यादीवरून स्पष्ट आहे. प्राय: असें हि होऊं शकतें कीं, मूळपाठ टिपांत रहातो व अपपाठ मुख्य ग्रंथांत विराजमान होतो. Varorium Edition काढण्यांत हा चमत्कार अपरिहार्य असतो. कालिदासादि संस्कृतप्राकृत नाटककारांच्या नाटकांच्या अनिश्चितकालीन दहा पांच पोथ्या घेऊन तौलनिक प्रती बनविल्या असतां, मूळग्रंथकाराच्या मूळप्रतीपासून त्या किती अपभ्रष्ट असूं शकतील तें माडगांवकरांच्या ज्ञानेश्वरीच्या प्रतीवरून चांगलें ध्यानांत येतें.

६५ सारांश, आजपर्यंत जेवढ्या म्हणून ज्ञानेश्वरीच्या प्रती छापिल्या

**ज्ञानेश्वरीचें अपभ्रष्ट पाठ व त्या पाठांचीं भ्रामक भाषान्तरें**

गेल्या आहेत, त्या सर्व अशुद्ध व अविश्वसनीय आहेत. तत्रापि, त्या लोकांत प्रचलित आहेत. सध्यां भक्तिमार्गी लोक इतके गचाळ झाले आहेत कीं व्याकरण, व्युत्पत्ति इतिहास, शास्त्र यांची त्यांना बिलकुल पर्वा राहिलेली नाहीं. वाटेल तें चिताड त्यांच्या हातीं दिलें व तें ज्ञानेश्वराचें, नामदेवाचें किंवा तुकारामाचें आहे असें सांगितलें म्हणजे तें त्यांना शिरसामान्य

होतें. खरें, खोटें विश्वास्य अविश्वास्य, हा भेदभाव ते करीत नाहींत. त्यामुळें झालें आहे काय कीं, त्यांना ज्ञानेश्वरीचा खरा अर्थ हि कळतनासा झाला आहे. कोल्हापूरचे भावे, पनवेलचे आठल्ये, व पुण्याचे भिडे ह्यांनीं ज्ञानेश्वरीचा अर्थ करण्याचा प्रयत्न केला आहे. परंतु स्पष्टपणें सांगावयास कांहीं हरकत दिसत नाहीं कीं, हे सर्व व्याख्याते अथ पासून इतिपर्यंत अपव्याख्यान करीत गेलेले आहेत. पैकीं आठल्यांचें भाषान्तर अगदीं कुचकामाचें व कवडीमोल आहे. त्यापेक्षां भावे यांचें भाषान्तर किंचित् बरें ह्मणतां येईल. आणि साखरेबावांच्या तोंडचें ह्मणून ज्यास रा. भिडे नामाभिधान देतात तें ह्या दोहींपेक्षां शुद्ध आहे. परंतु, तिन्ही भाषान्तरासंबंधानें असें ह्मणावें लागतें कीं, ह्या तिन्ही गृहस्थांना घेतलेली कामगिरी बिनचुक बजावण्याचा अधिकार आलेला नव्हता. ह्या विधानाची सत्यता भासमान होण्याकरितां, ज्ञानेश्वरीची अगदी पहिली ओंवी घेतों, तिचा ह्यांनीं काय अर्थ केला आहे तो देतों व ह्यांच्या चुका कोठें झालेल्या आहेत तें दाखवितों. भावे यांचें भाषान्तर आतां मागसलें असल्यामुळें, त्याची परीक्षा येथें करीत नाहीं.

**आठल्यांचें भाषान्तरः**—हे मूळ, अनादि, वेदप्रतिपादित, ओंकाररूप परमेश्वरा! तुला नमस्कार असो. हे आपल्या आपण जाणणाऱ्या आत्मस्वरूपा! तुझा जयजयकार असो.

**भिड्यांचें भाषान्तरः**—हे निर्गुणब्रह्म आत्मरूपा, तूं सर्वांचा आदिअसून तुझें वेदानीं वर्णन केलेलें आहे व तुझ्या स्वरूपास जाणणारा तूं स्वतःच आहेस. तुला माझा नमस्कार असो; आणि तुझा जयजयकार होवो.

पैकीं, आठल्ये यांच्या भाषान्तरांतील प्रत्येक शब्द चुकलेला आहे.

**आठल्यांचें भाषान्तर**

(१) प्रथम, ते नामरूपरहित जें परब्रह्म त्याला परमेश्वर ह्या नांवानें संबोधतात. (२) दुसरें, परब्रह्माला ते अनादि ह्मणतात. (३) तिसरें, तें वेदांनीं प्रतिपादित आहे, असा भ्रम त्यांनीं करून घेतला आहे. आणि (४) चौथें, परब्रह्म आपल्याआपण जाणणारें आहे, असा दुर्ग्रह त्यांच्या ठायीं झालेला आहे. आतां, ह्या, चारी

विधानांपैकीं एक हि विधान सशास्त्र नाहीं. ( १ ) परमेश्वर ही कोटी परब्रह्माहून निराळी, खालच्या दर्जाची व तत्पश्चात्क आहे, हें सर्वश्रुतच आहे. ह्या ओंवींत परमेश्वराचें नांव नाहीं, इतकेंच नव्हें, तर परब्रह्माचें हि नांव नाहीं. कारण, परब्रह्माचें जर नांव घ्यावें तर तें सगुण म्हणजे नामरूपसहित होतें. सबब, ज्ञानेश्वरांनीं ह्या सबंद ओंवींत त्याचा नामनिर्देश केला नाहीं. एवढेंच नव्हे, तर तत् ह्या सर्वनामानें हि त्याचा उल्लेख केला नाहीं. ज्ञानेश्वरांचीं हीं सर्व धोरणें आठल्यांनीं झुगारून दिलीं आहेत व आपलें गाढ अज्ञान प्रकट केलेलें आहे. ( २ ) प्रपंच, माया, परमेश्वर, ह्या कोटींना अनादि हें विशेषण लावतात. कारण प्रपंच हा अनादि व अनंत असून, केवळ व्यक्तमध्य आहे. तत् ही वस्तु सर्वत्र व सर्वदा आद्य च असणार. तिला अनादि हें विशेषण लावणें अयुक्त आहे. ( ३ ) ही निर्गुण वस्तु आजपर्यंत कोणाला हि संपूर्ण कळलेली नाहीं. कळण्याचा प्रयत्न पुष्कळांनीं केलेला आहे. त्यां प्रयत्न करणाऱ्यां पैकींच वेद होत. त्यांना हि ती आकळलेली नाहीं. सबब, ज्ञानेश्वरांनीं वेदप्रतिपाद्य असा शब्द योजलेला आहे. वेदप्रतिपादित असा शब्द मुद्दाम योजला नाहीं. परब्रह्म जर वेदांनीं प्रतिपादित केलें असेल, तर तें वेदांहून गौण ठरूं लागेल. वेदांनीं एवढेंच केलें आहे कीं, परब्रह्माचें प्रतिपादन करण्याचा प्रयत्न केलेला आहे. ह्या पलीकडे त्यांनीं कांहीं केलेलें नाहीं. एवढ्याच करितां, ज्ञानेश्वरांनीं प्रतिपादित हा शब्द टाळलेला आहे. तो दुष्ट शब्द आठल्यांनीं अंधदृष्टीनें मुद्दाम कवटाळला आहे. सद्वस्तूचें आकलन करतां करतां वेद टेंकीस आले, असे उद्गार ज्ञानेश्वरींत व अमृतानुभवांत अनेक स्थलीं आहेत. ( ४ ) स्वसंवेद्या या पदाचा तर शब्दार्थ हि आठल्यांस झाला नाहीं. स्वसंवेद्या ह्मणजे आपल्याआपण जाणणाऱ्या, असा अनर्थ आठल्ये च करूं जाणोत. सत् चित् च आहे. त्याला आपलें संवेदन आपण च करण्याची कोणती अपेक्षा आहे? काय त्याचें संवेदन कधीं लोप पावलें होतें कीं तें पुनरपि करून घेण्याचें त्याला कारण पडावें? काय साखर कधीं कडू झाली होती कीं तिनें आपली गोडी आपणच चाखून पहाण्याचें मनांत आणावें? तर, असें विपरीत कदापि होणें नाहीं. संवेद्य कोणाला? इतरांना, स्वतःला नव्हे. स्व ह्मणजे जीवात्मा, त्याला संवेदन होण्याचा विषय. तें संवेदन हि संपूर्ण होईलच असा भाग नाहीं. ज्याचें संवेदन, ज्या सद्वस्तूचें संवेदन करून

घेण्याचा प्रयत्न जीवात्म्यानें करणें संभाव्य आहे, अशा तद्वस्तूला. अशा स्वसंवेद्या, ह्या पदाचा अर्थ आहे. चित् संबंधानें नाना कोट्या ज्ञानेश्वरांनीं अमृतानुभवांत केलेल्या आहेत. त्यांचा जर परिचय आठल्यांनीं करून घेतला असता, तर ते असे बरळते ना. स्व आणि पर असे दोन प्रकारचे आत्मे कल्पिलेले आहेत. ह्यांना च जीवात्मा व परामात्मा अशा संज्ञा आहेत. संवित् ही दोघांना सामान्य आहे. ह्या संविद्द्वारा जीवात्म्याला परमात्म्याशीं ऐक्य होण्याचा संभव असतो. संवित्प्रतीति न झाली, तर ऐक्य होण्याचा ह्मणजे परमात्मसंवेदन होण्याचा मार्ग खुंटतो. हें सर्व लक्ष्यांत घेऊन ज्ञानेश्वरांनीं स्वसंवेद्य हें पद योजिलेलें आहे; आणि त्याला पोषक ह्मणून आत्मरूपा असें पद घातलें आहे. जीवात्म्यानें संवेद्य कां, तर जीवात्मा व परमात्मा हे दोन्ही हि आत्मरूप ह्मणजे आत्मा च आहेत. आत्मा एव आत्मरूपः । जीवात्मा व परमात्मा हा भेद भ्रांतिमूलक आहे. ती भ्रांति उडून गेली ह्मणजे दोन्ही एक च आहेत, अशी प्रतीति होते. सारांश, ह्या ओवींत एक कारणपरंपरा गोविली आहे. सद्वस्तु आद्य आहे; कारण, अनादि जे वेद त्यांनीं तिची प्रतिपत्ति करण्याचा प्रयत्न केला आहे; परंतु, तो प्रयत्न सफल झालेला नाहीं. कां कीं ही सद्वस्तु जीवात्म्यालाच संवेद्य आहे, इतरांना नाहीं. कां तर, जीवात्मा व परमात्मा आत्मरूप आहेत.

**भिड्यांचें भाषान्तर**

आठल्यांच्या इतका घोटाळा भिड्यांनीं केलेला नाहीं. त्याला कारण सद्गुरुमुख. नानाबोवा साखरे यांच्यासारख्यांच्या व्याख्यानाच्या श्रवणानें भिडे किंचित् ताळ्यावर राहिलेले दिसतात मात्र. परंतु, अनधिकारित्वास्तव ते हि ह्या ओंवीचा अर्थ करतांना भ्रांत झालेले आहेत. "तुझें वेदानीं वर्णन केलेलें आहे," असें संपूर्ण—क्रिया—द्योतक वाक्य भिड्यांनीं योजिलें असून, "तुझ्या स्वरूपास जाणणारा तूं स्वतःच आहेस" असें हि वाक्य योजून स्वमुखदर्शनदोष ते आठल्यांच्या प्रमाणेंच करतात. आठल्यांच्याप्रमाणें अनादि, परमेश्वर, वगैरे वाष्कळ शब्द मात्र ते योजीत नाहींत. हा सद्गुरुसंगतीच्या सातत्याचा परिणाम. ह्या ओंवींत कारणपरंपरा आहे, ह्याची प्रतीति भिड्यांना हि झालेली दिसत नाहीं.

वेदान्तशास्त्रानभिज्ञतेच्या मुळें ओंवीचा अर्थ भाषान्तरकारांना कसा लागला नाहीं, त्याचा हा तपशिल झाला.

**व्याकरणदृष्ट्या भाषान्तरांची दुष्टता.**

आतां व्याकरणानभिज्ञतेस्तव त्यांच्या चुक्या कशा झाल्या आहेत तें दाखवितों.

ॐ नमो आद्या । वेदप्रतिपाद्या ।
जय स्वसंवेद्या । आत्मरूपा ॥ १ ॥

अशी ओवी आहे. अन्वयः—आद्या वेदप्रति पाद्या नमो; स्वसंवेद्या आत्मरूपा जय. येथें नमो व जय हीं रूपें आज्ञार्थी द्वितीयपुरुषाचीं अनेकवचनाचीं आहेत.

| संस्कृत | प्राकृत | अपभ्रंश | मराठी |
|---|---|---|---|
| नमत | नमह | नमहु | नमूँ, नमो |
| जयत | जयह | जयहु | जयूँ, जयो, जय |

नम् व जी ह्या धातूंचीं रूपें ग्रंथारंभीं नांदींत आणण्याचा परिपाठ प्राकृत व संस्कृत ग्रंथांत अनेक स्थलीं आढळतो. गाथासप्तशतींत, सेतुबंधांत व कर्पूरमंजरींत नांदींत नमह व जअह हीं रूपें आलीं आहेत. नमह—नमहु—नमो म्हणजे तुम्ही नमस्कार करा. जय ह्या धातूचा अर्थ मराठींत "कोणासाठीं तरी जयशब्द उच्चारणें" असा झाला आहे. उदाहरणार्थ, जय शंकरा ( शंकराचा जयकार करा ). तेव्हां, पहिल्या ओवीचा व्याकरणदृष्ट्या अर्थ असा:—

आद्या वेदप्रतिपाद्या नमस्कार करा; स्वसंवेद्या आत्मरूपाचा जयकार करा; ज्ञानेश्वर श्रोत्यांना स्वहितार्थ आद्याला नमस्कार व प्रमाण करावयाला सांगतात व त्याचा जयकार करावयास सांगतात. नांदींत श्रोत्यांना इष्टदेवतेला नमस्कार करण्यास सांगण्याची चाल संस्कृत व प्राकृत नाटकांत व काव्यांत आहे. तीच परंपरागत चाल ज्ञानेश्वरांनीं उचललेली आहे. ज्ञानेश्वरांनीं ज्ञानेश्वरी श्रोत्यांना उद्देशून मुद्दाम लिहिलेली आहे; स्वतःला उद्देशून लिहिलेली नाहीं. एतद्विषयक उल्लेख ज्ञानेश्वरींत अनेक आहेत; बहुतेक प्रत्येक अध्यायांत आहेत. तेव्हां, ह्या ओंवीतील क्रियापदें द्वितीयपुरुषीं अनेकवचनीं आज्ञार्थी आहेत, हें ठीकच आहे.

आठल्ये व भिडे परब्रह्माला सांगतात कीं, तुझा जयजयकार असो! परब्रह्माचा जयजयकार नव्हता कधीं, कीं तुझा जयजयकार असो, असा आशीर्वाद कवीनें त्यास देण्याचें धाष्टर्य व औद्धत्य करावें. " तुला नमस्कार असो ( आठल्ये ), " तुला माझा नमस्कार असो " ( भिडे ), ह्या हि भाषान्तराला हाच दोष लागतो. शिवाय ग्रंथकर्त्यानें आपण एकट्यानेंच नमस्कार करण्यापेक्षां, श्रोत्यांसह नमस्कार करणें जास्त सौजन्याचें आहे. ज्ञानेश्वर, तर, सौजन्याचें केवळ पुतळेच होते. तेव्हां, त्यांच्या तोंडून, तुला माझा नमस्कार असो, अशी उद्धत वाणी कदापि हि निघावयाची नाहीं.

६६ वेदान्तशास्त्रदृष्ट्या व व्याकरणदृष्ट्या आठल्ये, भिडे, कुंटे व माडगांवकर ह्यांच्या प्रतींत असे हजारो दोष आहेत. मासल्याकरितां, एकाच ओंवींतील दोष दाखविले. जास्त दाखविण्यास प्रकृत स्थली अवकाश नाहीं. शिवाय, हे दोष दाखविण्याचें काम हरिभक्तिपरायण भिंगारकरबुवा याणीं केसरींत अनेकवेळां केलेलें आहे. भारदे उर्फ भारद्वाज ह्यांच्या चर्पटपंजरीचा, तर, त्यांनीं " ज्ञानेश्वरमहाराज यांचा कालनिर्णय व संक्षिप्त चरित्र " या टीकाप्रबंधांत चांगला च धुव्वा उडविला आहे. आठल्यांच्या चुक्या हि त्यांनीं अन्यत्र चांगल्या दाखविलेल्या आहेत. ह्या गृहस्थांनीं जर ज्ञानेश्वरीच्या अर्थाचें पुस्तक छापलें, तर, ज्ञानेश्वरीच्या नावावर चिताड व गचाळ बाडें भक्तिमार्गी लोकांत जो खोट्या वेदान्ताचा व भोळेपणाचा प्रसार करतात त्याला कांहीं तरी आळा पडून ऐतिहासिक व प्रागतिक मार्गाला भक्तिमार्गी लोक लागतील.

६६ प्रस्तुत मुकुंदराजी प्रतींत प्रत्येक श्लोक त्या श्लोकावरील ओंव्यांच्या मध्यें कोठें तरी लिहिला आहे. आधुनिक प्रतींत मूळ संस्कृत श्लोक प्रथम देऊन, नंतर त्याच्यावरील टीकाओंव्या देण्याचा जो प्रघात दिसतो, तो मूळचा ज्ञानेश्वराचा नाहीं. ज्ञानेश्वरांनीं ओंवीबंधांत ज्ञानेश्वरी अशी रचिली कीं मूळ संकृत श्लोक मुळींच न दिला, तत्रापि व्याख्यानाच्या ओघाला तुटकपणा येऊं नये. अलीकडील कित्येक पोथ्यांत दर प्रतीकाच्या व पदाच्या नंतर ज्ञानेश्वरी टीका ओंव्यांचे तुकडे पाडून सुद्धां दिलेली असते. हा हि प्रकार मूळ ज्ञानेश्वराचा नव्हे. हे सर्व चोचले आधुनिक आहेत.

६७ प्रस्तुत प्रतींत मूळ संस्कृत श्लोकांचे पाठ प्रचलित गीतेच्या पाठांहून कोठें कोठें भिन्न सांपडतात, त्यांची याद खालीं देतों:--

| अध्याय | श्लोक | प्रचलित पाठ | मुकुंदराजी किंवा ज्ञानेश्वरी पाठ |
|---|---|---|---|
| * १ | ५ | काशीराजः | काशिराजः |
| १ | १९ | धार्तराष्ट्राणां | धार्त्तराष्ट्राणां |
| १ | २० | धार्तराष्ट्रान् | धार्त्तराष्ट्रान् |
| १ | २३ | धार्तराष्ट्रस्य | धार्त्तराष्ट्रस्य |
| * १ | ३० | गांडीवं | गांजीवं |
| १ | ३२ | किं नो | किन्नो |
| १ | ३५ | किं नु | किन्नु |
| १ | ३६ | धार्तराष्ट्रान् | धार्त्तराष्ट्रान् |
| १ | ३७ | ,, | ,, |
| १ | ३९ | जनार्दन | जनार्द्दन |
| २ | १ | अश्रुपूर्णा | अश्रपूर्णा |
| २ | २ | अकीर्तिकरं | अकीर्त्तिकरं |
| २ | ६ | धार्तराष्ट्राः | धार्त्तराष्ट्राः |
| २ | ८ | यच्छोकमुच्छोषणं | यछोकमुछोषणं |
| * २ | ९ | गुडाकेशः | गुडाकेषः |
| २ | १३ | धीरः | द्धीरः |
| २ | १८ | युध्यस्व | युद्ध्यस्व |
| * २ | २८ | परिदेवना | परिवेदना |
| २ | ३१ | युद्धाच्छ्रेयः | युद्धाछ्रेयः |
| २ | ३२ | यदृच्छया | यदृछया |
| * २ | ३३ | अथ चेत्त्वमिमं धर्म्यं | अथचेत्त्वंधर्म्योमिमं |
| २ | ३४ | अकीर्तिं | अकीर्त्ति |
| २ | ३४ | अकीर्तिः | अकीर्त्तिः |
| * २ | ३५ | येषां | एषां |
| २ | ४४ | भोगैश्वर्य | भोगैष्वर्य |
| २ | ४९ | योगाद्धनंजय | योगात्धनंजय |
| २ | ४९ | अन्विच्छ | अन्विछ |
| २ | ५० | दुष्कृते | दुःष्कृते |

| | | | |
|---|---|---|---|
| २ | ६२ | पुंसः | पूंसः |
| २ | ६९ | जागर्ति | जागर्त्ति |
| २ | ७१ | गच्छति | गछति |
| २ | ७२ | ऋच्छाति | ऋछति |
| २ | ७२ | स्थितिः | स्थिती |
| ३ | १ | जनार्दन | जनार्द्दन |
| ३ | ४ | अधिगच्छति | अधिगछति |
| ३ | ५ | अकर्मकृत् | अकर्म्मकृत् |
| ३ | १२ | तैर्दत्तान् | तैर्द्दत्तान् |
| ३ | १३ | किल्बिषैः | किल्विषैः |
| ३ | २० | कर्तुं | कर्त्तुं |
| ३ | २१ | अनुवर्तते | अनुवर्त्तते |
| ३ | २२ | वर्ते | वर्त्ते |
| ३ | २३ | वर्तेयं | वर्त्तेयं |
| ३ | २३ | अनुवर्तते | अनुवर्त्तते |
| ३ | २४ | कर्ता | कर्त्ता |
| ३ | २७ | कर्ता | कर्त्ता |
| ३ | २८ | वर्तते | वर्त्तते |
| ३ | ३० | युद्धयस्व | युध्यस्व |
| ३ | ३४ | आगच्छेत् | आगछेत् |
| ३ | ३६ | अनिच्छन् | अनिछन् |
| ३ | ३९ | दुष्पूरेण | दुःपूरेण |
| ३ | ४३ | बुद्धवा | बुध्वा |
| ४ | ७ | सृजामि | स्रजामि |
| ४ | ८ | धर्म | धर्म्म |
| ४ | ११ | अनुवर्तते | अनुवर्त्तते |
| ४ | १३ | सृष्टं | स्रष्टं |
| ४ | १३ | विद्धय | विध्य |
| ४ | १३ | कर्तारं | कर्त्तारं |
| ४ | १३ | ज्ञात्वामोक्ष्यसेशुभात् | ज्ञात्वामृतमश्नुते |
| ४ | १८ | कर्मकृत् | कर्म्मकृत् |
| ४ | २२ | यदृच्छा | यदृछा |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| * | ४ | २३ | ० चेतसः | ० चेतसा |
| | ४ | २९ | रुद्ध्वा | रुध्वा |
| | ४ | ३४ | तत्त्व | तत्व |
| | ४ | ३९ | अधिगच्छति | अधिगछति |
| | ५ | १ | यच्छ्रेय | यछ्रेय |
| | ५ | ६ | अधिगच्छति | अधिगछति |
| | ५ | ८ | तत्त्ववित् | तत्ववित |
| | ५ | ८ | पश्यन् | पश्यन् |
| | ५ | ८ | स्पृशन् | स्पृशन् |
| | ५ | ८ | गच्छन् | गछन् |
| | ५ | ८ | स्वपन् | स्वपन् |
| | ५ | ९ | वर्तते | वर्त्तते |
| | ५ | ११ | बुद्धया | बुध्या |
| | ५ | १२ | निबद्धयते | निबध्यते |
| | ५ | १४ | प्रवर्तते | प्रवर्त्तते |
| | ५ | १७ | गच्छंति | गछंति |
| * | ५ | १९ | येषां | एषां |
| | ५ | २४ | अधिगच्छति | अधिगछति |
| | ५ | २६ | वर्तते | वर्त्तते |
| | ५ | २८ | विगतेच्छा | विगतेछा |
| * | ५ | २८ | मुक्त | युक्त |
| | ५ | २९ | ऋच्छति | ऋछति |
| | ६ | ६ | वर्तेत | वर्त्तेते |
| | ६ | ६ | शत्रुवत् | शतृवत् |
| | ६ | १३ | धारयन्नचलं | धारयंनचलं |
| | ६ | १५ | अधिगच्छति | अधिगछति |
| * | ६ | २० (द्वितीयार्ध) | यत्र | तत्र |
| | ६ | २१ | वेत्ति | वैत्ति |
| | ६ | २१ | तत्त्वतः | तत्वतः |
| | ६ | २२ | यस्मिँस्थितो | यस्मिन्स्थितो |
| | ६ | २२ | गुरुणा | गुरूणा |
| | ६ | ३१ | वर्तमानो | वर्त्तमानो |

| | | | |
|---|---|---|---|
| ६ | ३१ | वर्तते | वर्त्तते |
| ६ | ३७ | गच्छति | गछति |
| ६ | ३८ | विभ्रष्टश् | विभ्रष्टः |
| ६ | ३९ | च्छेत्तुं | छेत्तुं |
| ६ | ३९ | च्छेत्ता | छेत्ता |
| ६ | ४० | कृताँल्लोकान् | कृताँल्लोकान् |
| ६ | ४४ | अतिवर्तते | अतिवर्त्तते |
| ७ | १ | तच्छृणु | तछृणु |
| ७ | ३ | तत्त्वतः | तत्वतः |
| ७ | ७ | इव | इवँ |
| ७ | १३ | एभिःसर्वं | एभिसर्वं |
| ७ | २१ | भक्तःश्रद्धया | भक्तश्रद्धया |
| ७ | २१ | इच्छति | इछति |
| ७ | २६ | वर्तमानानि | वर्त्तमानानि |
| ७ | २७ | इच्छा | इछा |
| * ७ | २८ | अंतगतं | अंतर्गतं |
| ७ | २९ | कर्म | कर्म्म |
| ८ | ७ | युद्धय | युध्य |
| ८ | ११ | इच्छंतो | इछंतो |
| ८ | १२ | निरुध्य | निरुद्धय |
| * ८ | १६ | ब्रह्मभुवनात् | ब्रह्मभवनात् |
| ८ | २१ | निवर्तते | निवर्त्तते |
| ८ | २४ | गच्छंति | गछंति |
| ८ | २५ | निवर्तते | निवर्त्तते |
| ८ | २६ | आवर्तते | आवर्त्तते |
| ९ | २ | कर्तुं | कर्त्तुं |
| ९ | ३ | निवर्तते | निवर्त्तते |
| ९ | ४ | मूर्तिना | मूर्त्तिना |
| ९ | १० | विपरिवर्तते | विपरिवर्त्तते |
| * ९ | १३ | आश्रिताः | आस्थिताः |
| ९ | १४ | कीर्तयंतो | कीर्त्तयंतो |
| ९ | १८ | भर्ता | भर्त्ता |

| | | | |
|---|---|---|---|
| * ९ | २४ | च्यवंति | चवंति |
| ९ | २६ | प्रयच्छाति | प्रयछति |
| ९ | ३१ | शश्वच्छांतिं | शश्वछांतिं |
| ९ | ३१ | निगच्छति | निगछति |
| १० | २ | प्रभवं न | प्रभवन्न |
| १० | ७ | तत्त्वतः | तत्वतः |
| १० | ८ | प्रवर्तते | प्रवर्त्तते |
| १० | १८ | जनार्दन | जनार्द्दन |
| १० | २१ | ०र्मरुतां | ०र्म्मरुतां . |
| * १० | ०० | २३ वा श्लोक | २२ वा आहे. |
| * १० | ०० | २२ वा श्लोक | २३ वा आहे. |
| ,, | २७ | उच्चैःश्रवसं | उच्चैश्रवसं |
| ,, | २९ | यमःसंयमतां | यमसंयमतां |
| ,, | ३४ | कीर्तिः | कीर्त्तिः |
| ,, | ३४ | ० र्मेधा | ० र्म्मेधा |
| ,, | ३६ | सत्त्ववतां | सत्ववतां |
| ,, | ४१ | सत्त्वं | सत्वं |
| ,, | ४१ | अवगच्छ | अवगछ |
| ११ | २ | श्रुतौ | शृतौ |
| ,, | ३ | इच्छामि | इछामि |
| ,, | ४ | तच्छक्यं | तछक्यं |
| ,, | १७ | नलार्क | नलार्क्क |
| * ,, | २० | रूपमिदं तवोग्रं | रूपमुग्रं तवेदं |
| * ,, | २२ | त्वा | त्वां |
| ,, | ३१ | इच्छामि | इछामि |
| ,, | ३२ | समाहर्तुं | समाहर्त्तुं |
| ,, | ,, | ऋते | रुते |
| ,, | ,, | प्रत्यनीकेषु | प्रत्यनिकेषु |
| ,, | ३४ | युद्धयस्व | युध्यस्व |
| ,, | ३५ | एतच्छ्रुत्वा | एतछृत्वा |
| * ,, | ४२ | यच्चावहासार्थं | यच्चापिहासार्थं |
| * ,, | ४३ | पूज्यश्च | पूज्यस |

| | | | |
|---|---|---|---|
| * ११ | ४३ | अप्रतिमप्रभाव | अप्रतिमप्रभावः |
| ,, | ४६ | इच्छामि | इछामि |
| ,, | ,, | विश्वमूर्ते | विश्वमूर्त्ते |
| * ,, | ५० | सौम्यवपुः | सौम्यवपूः |
| ,, | ५२ | जनार्दन | जनार्द्दन |
| ,, | ५४ | तत्त्वेन | तत्वेन |
| ,, | ५५ | कर्मकृत् | कर्म्मकृत् |
| १२ | २ | अनिर्देश्यं | अनिर्द्देश्यं |
| ,, | ,, | ध्रुवं | धृवं |
| ,, | ७ | समुद्धर्ता | समुद्धर्त्ता |
| ,, | ९ | इच्छ | इछ |
| ,, | १० | कर्माणि | कर्म्माणि |
| ,, | ,, | कुर्वन्सिद्धिं | कुर्वांसिद्धिं |
| * ,, | ११ | अशक्तोसि | असक्तोसि |
| ,, | १२ | त्यागाच्छांतिः | त्यागाछांतिः |
| * ,, | १३ | समदुःखसुखः क्षमी | समदुःखसुखक्षमी |
| ,, | १५ | मे | में |

ज्यांच्या पाठीमागें नक्षत्राचें चिन्ह काढलें आहे त्यांखेरीज बाकीचे सर्व पाठभेद उच्चाराचे आहेत. सनक्षत्र पाठभेदांपैकीं हि बरे च पाठभेद उच्चाराचे च पाठभेद असावे, असें ह्मणतां येईल. उदाहरणार्थ, शी बद्दल शि, ये बद्दल ए, च्य बद्दल च. काशिराजः, एषां, चवंति, हे पाठभेद उच्याराचे पाठभेद न समजले, तर ते स्वतंत्र पाठभेदांत गणले जातील. लेखकाला उच्चार करण्याची जी स्वभावसिद्ध व देशसिद्ध सवंय होती तिच्या अनुरोधानें त्यानें हे उच्चारपाठ दिले आहेत. ह्या उच्चारपाठांचें वर्गीकरण येणेंप्रमाणें करतां येतें.

[१] ऋ बद्दल रु. जसें, ऋते बद्दल रुते

[२] ए बद्दल ऐं. जसें, वेत्ति बद्दल वैत्ति

[३] निरनुनासिकाबद्दल सानुनासिक. जसें, इव बद्दल इवँ आणि मे बद्दल में

[४] स, श व क्ष ह्यांच्या पूर्वी विसर्गलोप. जसें, एभि-सर्वं, भक्त श्रद्धया, उच्चैश्रवस,

[५] रेफानंतर द्वित्त. जसें, कीर्त्ति, धर्म्म, कर्म्म, तैर्द्दत्तान्.
[६] च्य बद्दल च. जसें, चवंति
[७] च्छ बद्दल छ जसें, गछति
[८] द्ध बद्दल त्ध. जसें, योगात्धनंजय
[९] द्ध्य बद्दल ध्य. जसें, युध्य
[१०] ध्य बद्दल द्ध्य. जसें, युद्ध्यस्व
[११] ब बद्दल व. जसें, किल्विषं
[१२] श बद्दल ष. जसें, गुडाकेष:
[१३] श बद्दल स. जसें, अशक्त: बद्दल असक्त:
[१४] रु बद्दल ऋ. जसें, अशृ
[१५] ष बद्दल :. जसें दु:पूर
[१६] स बद्दल श. जसें, सृष्टं बद्दल शृष्टं
[१७] त्त्व बद्दल त्व. जसें, तत्त्व बद्दल तत्व
[१८] श्च बद्दल स्य. जसें, पूज्यश्च बद्दल पूज्यस्य

हे पाठभेद किंवा उच्चारभेद लेखकानें चुकून केले आहेत, असें नाहीं. त्याच्या वेळची व प्रांतातली सामान्य मंडळी जे उच्चार करीत, ते ह्या लेखकानें नमूद केले आहेत. मुकुंदराजी ज्ञानेश्वरींतील संस्कृत श्लोकांतल्या अक्षरांचे जे उच्चार वर नमूद केले आहेत, त्यावरून संस्कृत उच्चारांचा अपभ्रंश गोदावरीतीरीं शक १२०० च्या सुमारास कसा होत असे, तें कळण्याचें एक उत्कृष्ट साधन उपलब्ध झालें आहे.

**ज्ञानेश्वरींत फारसी शद्ब नाहींत**

६८ मुकुंदराजी ज्ञानेश्वरींत ह्मणजे कोणत्या हि ज्ञानेश्वरीच्या विश्वसनीय व अप्रक्षिप्त प्रतींत फारसी शब्द आढळत नाहींत. ज्ञानेश्वरी शक १२१२ त रचली गेली व त्यानंतर मुसलमानांचा महाराष्ट्राला स्पर्श झाला. तत्पूर्वी यद्यपि शंभर वर्षें ह्मणजे शक ११०० पासून नर्मदेपलीकडे मुसुलमानांचें राज्य सुरू झालें होतें, तत्रापि महाराष्ट्राला व मराठी भाषेला मुसुलमानी व फारसी शब्दांचा स्पर्श झाला नाहीं. तो शक १२०० नंतर पांच पन्नास वर्षांनीं मुसुलमानी अंमल जारी झाल्यावर

झाला. अर्थात्, ज्ञानेश्वरींत फारसी शब्द साहजिक च आढळत नाहींत. इंग्रजी भाषेच्या स्पर्शासंबंधानें असा च प्रकार झालेला आढळतो. बंगाल, मद्रास वगैरे देशांत यद्यपि इंग्रजांचा अंमल बसून पन्नास शंभर वर्षे लोटलीं, तत्रापि इंग्रजी शब्द मराठींत शक १७३९ नंतर येऊं लागले. तत्पूर्वी गोलंदाज, कडाबीन, पलटण, वगैरे कांहीं डच, फ्रेंच, पोर्तुगीज वगैरे लष्करी शब्द मराठींत आले, परंतु इंग्रजी शब्द आले नाहींत. कारण उघड आहे. मराठ्यांच्या लष्करांत ज्या खालच्या प्रतीच्या यूरोपियन शिपायांचा संबंध आला ते प्रथम प्रथम प्रायः पोर्तुगीज, डच, फ्रेंच वगैरे असत, इंग्रज नसत. शक १२०० पूर्वी मुसुलमानी शिपायांचा प्रवेश कल्याणी येथील चालुक्यांच्या व देवगिरीच्या यादवांच्या सैन्यांत झाला असावा, असें ह्मणण्यास पुरावा आहे. शक १०५१ त लिहिलेल्या **अभिलषितार्थचिंतामणींत** आठ प्रकारचें सैन्य वर्णिलेलें आहे; त्यांत म्लेच्छ सैन्याचा उल्लेख आहे. म्लेच्छ ह्मणजे मुसुलमान. अर्थात्, कदाचित् कांहीं लष्करी शब्द मराठी भाषेंत शक १०५१ च्या मुमारास आले असण्याचा संभव आहे. खुद्द **अभिलषितार्थचिंतामणींत** च तेजी (घोडा) हा फारसी शब्द आला आहे. हिंगु, पोतास वगैरे यावनी शब्द ह्याच्या हि पूर्वी हिंदुस्थानांतील प्राकृत व अर्थात् संस्कृत भाषांत व्यापारसंबंधानें प्रचलित झाले होते. हा पोतास शब्द यावनी आहे, फारशी नाहीं; व हा फार प्राचीन कालापासून संस्कृत भाषेंत प्रविष्ट झाला आहे. तेव्हां हा पोतास शब्द ज्ञानेश्वरींत सांपडला असतां, तो फारसी ह्मणून गणण्यांत हाशील नाहीं. निशाण, दादर, वखार, मोहरें, हेवा वगैरे शब्द भिंगारकर यवनी ह्मणजे फारसी समजतात. परंतु, ते अस्सल मराठी आहेत. संस्कृत निःसाण ह्मणजे नगारा. ह्याचा मराठी अपभ्रंश निसाण, निशाण. हा पटहार्थक निशाण शब्द फारशी निशान (ध्वजपताका) शब्दासारखाच उच्चारांत आहे. परंतु, ह्या दोहोंत अर्थभेद आहे. मराठी निशाण ह्मणजे नगारा व फारसी निशान [ण] ह्मणजे ध्वजपताका. संस्कृत दरदर=प्राकृत दादर. दर=विवर. संस्कृत वर्षागृह=प्राकृत वखाअर=मराठी वखार. संस्कृत मुखहर=प्राकृत मुहअर=मराठी मोहर (रा, री, रें). संस्कृत ह्वन्=हिअवा=मराठी हेवा. हेवा=मनींची उत्कट ओढ. सारांश, ज्ञानेश्वरींत फारशी किंवा अरबी शब्द नाहींत.

६९ ज्याअर्थी मुकुंदराजी ज्ञानेश्वरींत फारसी शब्द नाहींत त्याअर्थी ज्ञानेश्वरकालीन ह्मणून नांवाजलेल्या कोणत्या हि अस्सल लेखांत प्राय: फारसी शब्द येणें दुर्मीळ आहे. तस्मांत, फारसी उभयान्वयी अव्ययें ज्या ज्ञानेश्वरकालीन ह्मणविणाऱ्या लेखांत येतील तो लेख अर्वाचीन ह्मणजे मुसुलमानी रियासतीतला बिनधोक समजावा. उदाहरणार्थ, भिंगारकरकृत "श्रीज्ञानेश्वरमहाराज यांचा कालनिर्णय व चरित्र" ह्या निबंधाच्या ६० व ६१ यां पृष्ठांवर दिलेलीं शक ११२९ व शक ११३५ सालचीं दोन्हीं पत्रें अस्सल नसून बनावट आहेत. कारण त्या दोन्हीं लेखांत फारसी कीं हे उभयान्वयी अव्यय आलें आहे. फारसींत के असें उभयान्वयी अव्यय आहे त्याचे मराठी की, कीं हें कीं अव्यय रामदास व शिवाजी यांच्यानंतर मराठींत रूढ झालें. ज्ञानेश्वरकालीं व ज्ञानेश्वराच्या पूर्वी फारसी कीं किंवा इंग्रजी that या उभयान्वयी अव्ययाच्याबदला जे, जें असें उभयान्वयी अव्यय नियमानें योजीत. ह्या कीं खेरीज, भिंगारकरांच्या ह्या दोन्ही पत्रांत इतर आणीक अशीं शेकडों रूपें आहेत कीं त्यांच्यावरून ह्या पत्रांचा बनावटपणा स्पष्ट करून दाखवितां येईल. भिंगारकरच्या पत्रांतील हीं शेकडों रूपें आधुनिक व बनावट कां, हें नीट लक्ष्यांत येण्यास, मराठी भाषेचें ऐतिहासिक व्याकरण अथवा नुसतें ज्ञानेश्वरीचें व्याकरण चिकित्सक वाचकांपुढें मांडलें पाहिजे. मराठी भाषेचें हें ऐतिहासिक व्याकरण येथें च द्यावयाचें. परंतु, मराठी भाषेच्या स्थित्यंतरांची त्रोटक हकीकत व मुकुंदराजी पोथीचा तपशील देतां देतां च फार विस्तार झाला. सबब, ऐतिहासिक व्याकरण पुढील भागावर टाकणें अपरिहार्य आहे. तोंपर्यंत सरस्वतीमंदिरादिमासिकपुस्तकांतील मराठीच्या ऐतिहासिक व्याकरणावरील माझे निबंध जिज्ञासूंनां एतत्प्रकरणीं बरेच उपयोगाचे होतील असें वाटतें.

७० ज्ञानेश्वरींत एकंदर जी ओवीसंख्या आहे तिचा सरासरीनें निम्मा भाग पहिल्या बारा अध्यायांत येतो; आणि बाकीचा निम्मा भाग राहिलेल्या सहा अध्यायांत येतो. प्रस्तुत पहिला खंड ह्या पहिल्या बारा अध्यायांचा आहे. ह्या खंडाला दुर्बोध शब्दांच्या अर्थाची याद दिली आहे.

७१ ज्ञानेश्वराचें चारित्र, नाथपंथाची हकीकत, ज्ञानेश्वराचा वेदान्त, भक्तिमार्गाच्या अनादिसिद्ध व ऐतिहासिक परंपरेचें वर्णन, वगैरे अनेक विषयांवर बहुत विवेचन करण्यासारखें आहे. तें, ज्ञानेश्वरांचे इतर अस्सल जुने ग्रंथ मिळून छापण्याचा योग आल्यास, यथावकाश करतां येईल.

॥ नटकृततांडवविकटाः पंडितटीकाः स्फुरंति गीतायां ॥

॥ रंभालास्यविलासा जयति ज्ञानेश्वरीतासु ॥

समाप्त.

# ज्ञानेश्वरी

श्रीमहागणपतये नमः ॥ ॐ नमो आद्या । वेदप्रतिपाद्या ।
जय स्वसंवेद्या । आत्मरूपा ॥ १ ॥
देवा तूं चि गणेशु । सकलार्थप्रकाशु ।
ह्मणे निवृत्तिदासु । अवधारिजो ॥ २ ॥
हें शब्दब्रह्म अशेष । ते चि मूर्ति सुरेख ।
जेथें वर्णवपु निर्दोष । मिरवत असे ॥ ३ ॥
स्मृति ते चि अवयव । देखा अंगिकभाव ।
तेथ लावण्याची ठेव । अर्थशोभा ॥ ४ ॥
अष्टादश पुराणें । तिये चि मणिभूषणें ।
पदपद्धति खेवणें । प्रमेयरत्नांचीं ॥ ५ ॥
पद्यबंध नागर । तें चि । रंगाथिलें अंबर ।
जेथ साहित्य वाणें सपुर । उजळाचें ॥ ६ ॥
देखां काव्यनाटका । जि निर्द्धारितां सकौतुका ।
तिया चि रुणुझुणिति क्षुद्रघंटिका । अर्थध्वनि ॥ ७ ॥
नाना प्रमेयाची परि । निपुणपणें पाहतां कुसरि ।
दीसति उचित पदें माझारि । रत्नें भलीं ॥ ८ ॥
तेथ व्यासादिकांचिया मती । चोखडेपणें झळकती ।
तिया मेखळे मिरवती । पल्लवसडका ॥ ९ ॥
देखां षड्दर्शनें ह्मणिपति । ते चि भुजांची आकृति ।
ह्मणूनि विसंवादें धरिति । आयुधानें ॥ १० ॥

तरि तर्कु तो चि परशु । नीति भेदुअंकुशु ।
वेदांत महारसु । मोदकु मिरवे ॥ ११ ॥
एकी हातीं दंतु । जो स्वभावता खंडितु ।
तो बौधमतसंकेतु । वार्त्तिकांचा ॥ १२ ॥
मग साहाजें सत्तर्कवादु । तो पद्मकरु वरदु ।
धर्मप्रतिष्टा तो सिद्धु । अभयहस्तु ॥ १३ ॥
देखां विवेकवंतु विमलु । तो चि शुंडादंडु सरलु ।
जेथ परमानंदु केवलु । महासुखाचा ॥ १४ ॥
तरि संवादु तो चि दशनु । समताशुभ्रवर्णु ।
देवो उन्मेखुसूक्ष्मेक्षणु । विघ्नराजु ॥ १५ ॥
मज अवगमलिया दोन्हीं । मीमांसा श्रवणस्थानीं ।
बोधमदामृत मुनी । अलि सेविति ॥ १६ ॥
प्रमेयप्रवालसुप्रभ । द्वैताद्वैतनिकुंभ ।
सरिसे एकवटति इभ । मस्तकावरि ॥ १७ ॥
उपरि दशोपनिषदें । जियें उदारें ज्ञानमकरंदें ।
तियें मुकुटीं कुसुमें सुगंधें । शोभते भलीं ॥ १८ ॥
अकार चरणयुगुल । उकार उदर विशाल ।
मकारु महामंडल । मस्तकाकारें ॥ १९ ॥
हे तिन्ही एकवटले । तेथ शब्दब्रह्म कवळलें ।
तें मियां गुरुकृपा नमिलें । आदिबीज ॥ २० ॥
आतां. अभिनववाग्विलासिनी । जि चातुर्यकलाकामिनी ।
ते शारदा विश्वमोहिनी । नमिली मियां ॥ २१ ॥
मज हृदइं सद्गुरु । तेणें तारिलों संसारपुरु ।
ह्मणौनि विशेषें मती आदरु । विवेकावरि ॥ २२ ॥
जैसें डोळियां अंजन भेटे । तेव्हलि दृष्टीसि पाटा फुटे ।
मग वाटे पाहिजे तेथ प्रकटे । महानिधि ॥ २३ ॥

कां चिंतामणि जालेयां हातीं । सदा विजयेंपण मनोरथीं ।
तैसा पूर्णकाम निवृत्ती । ज्ञानदेउ ह्मणे ॥ २४ ॥
जाणतेन गुरू भजिजे । जेणें कृतकार्या होईजे ।
जैसें मूळसिंचनि साहाजें । निगति शाखापल्लव ॥ २५ ॥
कां तीर्थे जियें त्रिभुवनीं । तियें वडति समुद्रावगाहनीं ।
ना तरि अमृतरसास्वादनीं । रस सकळ ॥ २६ ॥
तैसा पुडुतीं पुडुतीं तो चि । मिया वंदिला श्रीगुरु चि ।
जो अभिलाषित मनोरथु चि । पुरविता ॥ २७ ॥
आतां अवधारा कथा गहन । जें कलाकौतुकां जन्मस्थान ।
किं अभिनव उद्यानवन । विवेकतरुचें ॥ २८ ॥
ना तरि सर्वसुखाची आदि । जे प्रमेयमहानिधि ।
नाना नवरससुधाब्धी । परिपूर्णु हा ॥ २९ ॥
किं परमधाम प्रकट । हें विद्यांचें मूळपीठ ।
शास्त्रजातां वसैठ । अशेषांचा ॥ ३० ॥
ना तरि सकळ धर्मांचें माहेर । सज्जनाचें जिव्हार ।
लावण्यरत्नभांडार । शारदेचें ॥ ३१ ॥
नाना कथारूपें भारती । प्रकटली असे त्रिजगतीं ।
आविष्करौनि महामती । व्यासाचिये ॥ ३२ ॥
ह्मणौनि महाकाव्याराउ । ग्रंथुगरुवतिचा ठाउ ।
एथौनि रसां जाला आहो । रसाळपणांचा ॥ ३३ ॥
तेवि चि आइकां आणिक ही एक । एथौनि शब्दश्री भली शास्त्रिक ।
आणिक महाबोधीं कोवळिक । दुणावली ॥ ३४ ॥
एथ चातुर्य सिहाणें जालें । प्रेम रुचीसि आलें ।
आणि सौभाग्य पोखलें । सुखाचें एथ ॥ ३५ ॥
माधुर्या मधुरता । शृंगारि सुरेखता ।
रूढपण उचिता । दीसे भलें ॥ ३६ ॥

एथ कलाविदपण कळां । पुण्यासि प्रतापु आगळा ।
ह्मणौनि जन्मेजयाचे अवलीळा । दोष गेले ॥ ३७ ॥
आणि पांतां नाविक । रंगीं सुरंगतेची आगळिक ।
गुणा सगुणपणाचें बीक । बहुवस एथें ॥ ३८ ॥
भानुचेनि तेजें ढवळलें । जैसें त्रैलोक्य दीसे उजळलें ।
तैसें व्यासमती कवळलें । सकळ मिरवे ॥ ३९ ॥
कां सुक्षेत्रीं बीज घातलें । तें आपुल्यापरी विस्तारलें ।
तैसें भारतीं सुरवाडलें । अर्थजात ॥ ४० ॥
ना तरि नगरांतरीं वसिजे । तरि नागरां चि होईजे ।
तैसें व्यासोक्तितेजें । ढवळलें सकळ ॥ ४१ ॥
किं प्रथमवयसाकाळीं । लावण्याची नव्हाळी ।
प्रकटे जैसी आगळी । अंगनाअंगीं ॥ ४२ ॥
ना तरि उद्यानीं माधवी घडे । तें वनशोभेची खाणि उघडे ।
आदिलापासौनि अपाडें । जिया परीं ॥ ४३ ॥
नाना घनीभूत सुवर्ण । जैसें निहाळितां साधारण ।
मग अलंकारीं बरवेपण । निवाडु दावी ॥ ४४ ॥
तैसें व्यासोक्ति अलंकरलें । आवडतें बरवेपण पातलें ।
तें जाणौनि चि काइ आश्रइलें । इतिहासीं ॥ ४५ ॥
नाना पुरतिये प्रतिष्ठेलागि । सानीव घरूनि आंगीं ।
पुराणें आख्यानरूपें जगीं । भारता आलीं ॥ ४६ ॥
ह्मणौनि भारतीं नाहीं । तें न्हवे चि लोकीं तिहीं ।
एणें कारणें ह्मणिपे पाहीं । व्यासोच्छिष्ट जगत्रय ॥ ४७ ॥
ऐसी सुरस जगीं कथा । जे जन्मभूमि परमार्था ।
मुनि सांगे नृपनाथा । जन्मेजया ॥ ४८ ॥
जे अद्वितीय उत्तम । पवित्रैक निरूपम ॥
परममंगळ धाम । अवधारिजो ॥ ४९ ॥

आतां भारतकमलपरागु । गीताख्यु प्रसंगु ।
जो संवादला श्रीरंगु । अर्जुनेंसीं ॥ ५० ॥
ना तरी शब्द ब्रह्माब्धी । मथिलें व्यासबुद्धी ।
निवडलें निरवधी । नवनीत हें ॥ ५१ ॥
मग ज्ञानाग्निसंपर्कें । कडसिलें विवेकें ।
पद आलें परिपाकें । आमोदासीं ॥ ५२ ॥
जें अपेक्षिजे विरक्तीं । अनुभविजे संतीं ।
सोहंभावें पारंगतीं । रमिजे जेथ ॥ ५३ ॥
जें आकर्णिजे भक्ति । आदिवंद्य त्रिजगती ।
ते भीष्मपर्वीं संगति । सांघिजैल ॥ ५४ ॥
जे भगवद्गीता ह्मणिजे । जे ब्रह्मेशानीं प्रसंसिजे ।
जे सनकादिकीं सेविजे । आदरेंसीं ॥ ५५ ॥
जैसें शारदियेचिये चंद्रकळे । माझि अमृतकण कोवळे ।
ते वेंचिति मनें मोआळें । चकोरतळगे ॥ ५६ ॥
तेयापरीं श्रोतां । अनुभवावी हे कथा ।
अति हळुवारपण चित्ता । आणूनियां ॥ ५७ ॥
हें शब्देंविण संवादिजे । इंद्रियां नेणतां भोगिजे ।
बोला आधीं झोंबिजे । प्रमेयासि ॥ ५८ ॥
जैसें भ्रमर परागु नेति । परि कमळदळें नेणति ।
तैसी परि आहे सेविती । ग्रंथीं इये ॥ ५९ ॥
कां आपुला ठाउ न संडितां । आलंगिजे चंद्रु प्रकटतां ।
हा अनुरागु भोगितां । कुमुदिनी जाणे ॥ ६० ॥
ऐसेनि गंभीरपणें । थिरावलेनि अंतःकरणें ।
आथिला तो जाणे । मातु इये ॥ ६१ ॥
आहो अर्जुनाचिया पांती । जे परिसणेयां योग्य होंति ।
तिहिं कृपा करूनि संतीं । अवधान देयावें ॥ ६२ ॥

हें सलगी मियां ह्मणितलें । चरणा लागौनि विनविलें ।
प्रभू सखोल हृदय आपुलें । ह्मणौनियां ॥ ६३ ॥
जैंसा स्वभावो मायेबापांचा । अपत्य बोले जऱ्हीं बोबडिया वाचा ।
तऱ्हीं अधिकाधिक तेयांचा । संतोखु चि आथि ॥ ६४ ॥
तैसा तुह्मीं मी अंगिकारिलां । सज्जनीं आपुला ह्मणितलां ।
तरि उणावो साहाजें उपसाहला । प्रार्थु काइ ॥ ६५ ॥
परि अपराधु तो आणिकु आहे । जें मीं गीतार्थु करूं पाहें ।
तें अवधारां विनउं लाहें । ह्मणौनियां ॥ ६६ ॥
हें अनावरत विचारितां । वायां चि धिंवसा उपनला चित्ता ।
यऱ्हवीं काइ भानुतेजीं खद्योता । शोभा आथि ॥ ६७ ॥
कां टिटिभु चांचुवेऱ्हीं । माप सुये सागरीं ।
मीं नेणतु तिया परीं । प्रवर्ते एथ ॥ ६८ ॥
आइकां आकाश गवसावें । तरि आणिक तैसें चि होआवें ।
ह्मणौनि अपाडु हें आघवें । निर्धारितां ॥ ६९ ॥
एया गीताशास्त्राची थोरी । स्वयें शंभु विवरी ।
जेथ भवानी प्रश्नु करी । चमत्कारौनि ॥ ७० ॥
तेथ हरु ह्मणे जेवि नेणिजे । देवी जैसें कां स्वरूप तूझें ।
हें नित्यनूतन देखिजे । गीतातत्त्व ॥ ७१ ॥
हा वेदार्थुसागरु । जेया निद्रिताचा घोरु ।
तो स्वयें सर्वेश्वरु । अनुवादला ॥ ७२ ॥
ऐसें जें अगाध । जेथ वेडावति वेद ।
तेथ अल्प मीं अतिमंद । काइ होयें ॥ ७३ ॥
हें अपार कैसें कवलावें । महातेज कवणें ढवलावें ।
गगन मुठी सुआवें । मशकें केवि ॥ ७४ ॥
परि एथ असे एकु आधारु । तेणें चि बोलें मीं सधरु ।
जें सानुकूल श्रीगुरु । ज्ञानदेउ ह्मणे ॥ ७५ ॥

यऱ्हवीं तऱ्हि मीं मूर्खु । जऱ्हीं जाला असें अविवेकु ।
तऱ्हीं संतकृपादीपकु । सोज्वळु असे ॥ ७६ ॥
लोहाचें कनक होये । हें परिसीं सामर्थ्य आहे ।
कां मृत ही जीवित लाहे । अमृतसिद्धी ॥ ७७ ॥
जरि प्रकटे सिद्धसरस्वती । तरि मुकेयां आथि भारती ।
एथ वस्तुसामर्थ्यशक्ती । नवल काइ ॥ ७८ ॥
जेयातें कामधेनु ऐसी माये । तयासि अप्राप्य काहीं आहे ।
ह्मणौनि मीं प्रवर्तों लाहें । ग्रंथीं इये ॥ ७९ ॥
तऱ्हीं न्यून तें पुरतें । अधिक ही सरतें ।
करूनि घेयावें हें तुमतें । विनविलें मियां ॥ ८० ॥
आतां देइजे अवधान । तुह्मीं बोलविलां मीं बोलेन ।
जैसें चेष्टे सूत्राधीन । दारुयंत्र ॥ ८१ ॥
तैसा मी अनुगृहीतु । साधूचा निरोपितु ।
तीं आपुला अलंकारितु । भलतैसा ॥ ८२ ॥
तवं गुरु ह्मणति राहीं । हें तुज बोलावें न लगे काहीं ।
आतां ग्रंथा चित्त देइं । झडकरि गा ॥ ८३ ॥
एया बोला निवृत्तिदासु । पावौनि परम उल्हासु ।
ह्मणे परियसां मना अवकाशु । देउनियां ॥ ८४ ॥

## ॥ धृतराष्ट्र उवाच ॥

**धर्मक्षेत्रे कुरुक्षेत्रे समवेता युयुत्सवः ।**
**मामकाः पाण्डवाश्चैव किमकुर्वत संजय ॥ १ ॥**

पुत्रस्नेहें मोहितु । धृतराष्ट्र असे पूसतु ।
सांगें संजया मातु । कुरुक्षेत्रिंचीं ॥ ८५ ॥
जें धर्मालय ह्मणिजे । तेथ पांडव आणि माझे ।
गेले असति व्याजें । झुझाचेनि ॥ ८६ ॥

तरि ते चि येतुलां अवसरीं । काय कीजतसे येरएरीं ।
हें झडकरि कथन करीं । मजप्रति ॥ ८७ ॥

॥ सञ्जय उवाच ॥

**दृष्ट्वा तु पाण्डवानीकं व्यूढं दुर्योधनस्तदा ।**
**आचार्यमुपसंगम्य राजा वचनमब्रवीत् ॥ २ ॥**

तेव्हां संजयो बोले । ह्मणे पांडवसैन्य उचललें ।
जैसें महाप्रलयीं पसरलें । कृतांतमुख ॥ ८८ ॥
तैसें तें घनदाट । उठावलें एकवाट ।
जैसें उलंडलें कालकूट । धरी कवण ॥ ८९ ॥
ना तरि वडवानलु सादुकला । प्रलयवातें पोखला ।
सागरु शोषूनि उधवला । अंबरासि ॥ ९० ॥
तैसें दल दुर्धर । नाना व्यूहीं परिकर ।
आवरलें भयासुर । तिये काळीं ॥ ९१ ॥
तें देखिलेयां दुर्योधनें । अव्हेरिलें कवणे मानें ।
जैसें न गणिजे पंचाननें । गजघटांतें ॥ ९२ ॥

**पश्यैतां पाण्डुपुत्राणामाचार्य महतीं चमूम् ।**
**व्यूढां द्रुपदपुत्रेण तव शिष्येण धीमता ॥ ३ ॥**

मग द्रोणापासीं आला । तेयातें ह्मणे हा देखिला ।
कैसा दलभारु उचलला । पांडवांचा ॥ ९३ ॥
गिरिदुर्ग जैसें चालतें । तैसे विविध व्यूह भवंते ।
हे रचिले आहाति बुद्धिमंतें । द्रुपदकुमरें ॥ ९४ ॥
जो कां तुह्मीं सिक्षापिला । विद्यासिद्धसेठा केला ।
तेणें हा सैन्य सिंधु पाखरिला । देख देख ॥ ९५ ॥

**अत्र शूरा महेष्वासा भीमार्जुनसमा युधि ।**
**युयुधानो विराटश्च द्रुपदश्च महारथः ॥ ४ ॥**

आणिक ही एथ असाधारण । जे शस्त्रास्त्रीं भले प्रवीण ।
ते क्षात्रधर्मीं निपुण । वीर आहाति ॥ ९६ ॥
बळें प्रौढी पौरुषें । जे भीमार्जुनासारिखे ।
ते सांघेन कवतिकें । प्रसंगें चि ॥ ९७ ॥
एथ युयुधानु सुभटु । आला असे विराटु ।
महारथी श्रेष्ठु । द्रुपदु वीरु ॥ ९८ ॥

**धृष्टकेतुश्चेकितानः काशिराजश्च वीर्यवान् ।**
**पुरुजित्कुन्तिभोजश्च शैब्यश्च नरपुङ्गवः ॥ ५ ॥**

चेकितानु धृष्टकेतु । काशीश्वरु विक्रांतु ।
उत्तमौजा नृपनाथु । शैब्यु देख ॥ ९९ ॥
हा कुंतिभोजु पाहे । एथ युधामन्यु आला आहे ।
आणि पुरुजितादि राये । सकळै जाणैं ॥ १०० ॥

**युधामन्युश्च विक्रान्त उत्तमौजाश्च वीर्यवान् ।**
**सौभद्रो द्रौपदेयाश्च सर्व एव महारथाः ॥ ६ ॥**

हा सुभद्राहृदयनंदनु । जो अपरु नवा अर्जुनु ।
तो अभिमन्यु ह्मणे दुर्योधनु । देखैं द्रोणां ॥ १ ॥
आणिकही द्रौपदिकुमर । जे सकळही महारथी वीर ।
मीति नेणिजे अपार । मीनले असति ॥ २ ॥

**अस्माकं तु विशिष्टा ये तान्निबोध द्विजोत्तम ॥**
**नायका मम सैन्यस्य संज्ञार्थं तान्ब्रवीमि ते ॥ ७ ॥**

आतां आमचां दळीं नायक । जे रूढ वीर सैनिक ।

ते प्रसंगें आइक । सांगैन मी ॥ ३ ॥
उद्देशें एक दोनि । जाइजति बोलोनि ।
तुह्मीं आदिकरूनि । मुख्य जे जे ॥ ४ ॥

**भवान्भीष्मश्च कर्णश्च कृपश्च समितिंजयः ।**
**अश्वत्थामा विकर्णश्च सौमदत्तिस्तथैव च ॥ ८ ॥**

हा भीष्म गंगानंदनु । जो प्रतापतेजस्वी भानु ।
रिपुगजपंचाननु । कर्ण वीरु ॥ ५ ॥
एकैकाचेनि मनोव्यापारें । हें विश्व होये संहरे ।
हा कृपाचार्यु न पुरे । एकलाचि ॥ ६ ॥
एथ विकर्ण वीरु आहे । हा अश्वत्थामा पैलु पाहे ।
जेयाचा आडदरु सदा वाहे । कृतांतु मनीं ॥ ७ ॥
समितिंजयो सौमदत्ति । ऐसे आणिकही बहुत असति ।
जेयांचेया बलाची मीती । धाता नेणें ॥ ८ ॥

**अन्ये च बहवः शूरा मदर्थे त्यक्तजीविताः ।**
**नानाशस्त्रप्रहरणाः सर्वे युद्धविशारदाः ॥ ९ ॥**

जे शास्त्रविद्यापारंगत । मंत्रावतार मूर्त्त ।
हो काज अस्त्रजात । एथौनि रूढि ॥ ९ ॥
हे अप्रतिमल्ल जगीं । पुरता प्रतापु आंगीं ।
परि सर्वप्राणें मज चि लागि । आराइले ॥ ११० ॥
पतिव्रतेचें हृदय जैसें । पतीवांचौनि न स्पर्शे ।
मी सर्वस्व ययां तैसें । सूभटांसि ॥ ११ ॥
आमचेया काजाचेनि पाडें । देखति आपुलें जीवित थोडें ।
ऐसे निरवधि चोखडे । स्वामिभक्ती ॥ १२ ॥
जूझती कुळकेणी जाणति । कळे कीर्त्तिसिं जीति ।

हें बहू असो क्षात्रवृत्ती । एथोनियां ॥ १३ ॥
ऐसे सर्वै परीं पुरते । वीर दळिं आमतें ।
आतां काइ गणूं ययांतें । अपार हे ॥ १४ ॥

**अपर्याप्तं तदस्माकं बलं भीष्माभिरक्षितम् ।**
**पर्याप्तं त्विदमेतेषां बलं भीमाभिरक्षितम् ॥ १० ॥**

वरि क्षेत्रियांमाजि श्रेष्ठु । जो जगजेठी जगीं सूभटु ।
तेया दळवैपणाचा पाटु । भीष्मासि पैं ॥ १५ ॥
आतां ययाचेनि बळें गवसलें । हें दुर्ग जैसें पंन्नासिलें ।
एणें मानें थेंकुलें । लोकत्रय ॥ १६ ॥
आदि चि समुद्र काइ । तेथ दुवाडपण कवणा नाहीं ।
मग वडवानलु तैसेयाही । विरजा जैसा ॥ १७ ॥
ना तरि प्रळयवन्हि महावातु । एयां दोवां जैसा सांघातु ।
तैसा हा गंगासूतु । सेनापति ॥ १८ ॥
आतां येणेंसीं कवण भीडे । हें पांडवसैन्य कीरु थोकडें ।
ऊइचिलें अपाडें । दीसतसे ॥ १९ ॥
वरि भीमसेनु बेंधु । तो जालासे सेनानाथु ।
ऐसें बोलौनि मातु । सांडिली तेणें ॥ १२० ॥

**अयनेषु च सर्वेषु यथाभागमवस्थिताः ।**
**भीष्ममेवाभिरक्षन्तु भवन्तः सर्व एव हि ॥ ११ ॥**

मग पुनरपि काई बोले । सकलां सैनिकांतें ह्मणितलें ।
आतां दळभार आपुलाले । सरिसे करा ॥ २१ ॥
जेयां जिया अक्षौहिणी । तेणें तिया आरणीं ।
वरगण कवणा कवणी । महारथीयां ॥ २२ ॥
तेणें तें आवरिजे । भीष्मातळिं राहिजे ।

ह्मणे द्रोणातें परिसिजे । तुह्मीं सकळीं ॥ २३ ॥

हा चि येकु रक्षावा । मी तैसा देखावा ।
एणें दळभारु आघवा । साचु आमचा ॥ २४ ॥

तस्य संजनयन्हर्षं कुरुवृद्धः पितामहः ।
सिंहनादं विनद्योच्चैः शंखं दध्मौ प्रतापवान् ॥ १२ ॥

एया रायाचेया बोला । सेनापति संतोखला ।
मग तेणें केला । सिंहनादु ॥ २५ ॥
तो गाजतसे अद्भुतु । तिहिं लोकां आंतु ।
प्रतिध्वनि न समातु । उपजतसे ॥ २६ ॥
तेया चि तुळिगासवें । वीरवृत्तिचेनि थावें ।
दिव्य शंखु भीष्मदेवें । आस्फुरिला ॥ २७ ॥
ते दोन्ही नाद मीनले । तेथ त्रैलोक्य बधिर जालें ।
जैसें आकाश कां पडिलें । तूटोनियां ॥ २८ ॥
घडघडीत अंबर । उचंबळत सागर ।
क्षोभलें चराचर । कांपत असे ॥ २९ ॥
तेणें महाघोषगजरें । दुमुदुमिति गिरिदरें ।
तवं दळामाझि रणतुरें । आस्फाळिलीं ॥ १३० ॥

ततः शंखाश्च भेर्यश्च पणवानकगोमुखाः ।
सहसैवाभ्यहन्यन्त स शब्दस्तुमुलोऽभवत् ॥ १३ ॥

उद्दंडें सैघ वाजते । भयानकें खाखातें ।
महाप्रलयो जेयें । धाकडांसि ॥ ३१ ॥
तेथ भेडांची कवणि मातु । काचेयां केरु फीटतु ।
जेणें दचकला कृतांतु । आंग नेघे ॥ ३२ ॥
भेरी निशाण मादळ । शंख टीविळा भोंगळ ।

आणि भासुर रणकोल्हाळ । सुभटांचे ॥ ३३ ॥
आवेसें भुजा आत्राटिति । विसगैले हाका देंति ।
जेथ महामद भद्रजाति । धरति ना ॥ ३४ ॥
एकां उभेयां चि प्राण गेले । चांगाचे दांत बैसले ।
विरिदांचे दादुले जाले । हीवां ऐसे ॥ ३५ ॥
ऐसा अद्भुतु तुरबंबाळु । आइकौनि ब्रह्मा व्याकुळु ।
देव ह्मणति प्रलयकाळु । होईल हा ॥ ३६ ॥
ऐसी स्वर्गी मातु । देखौनि तो आकांतु ।
तवं पांडवदळा आंतु । काइ जालें ॥ ३७ ॥

ततः श्वेतैर्हयैर्युक्ते महति स्यन्दने स्थितौ ।
माधवः पाण्डवश्चैव दिव्यौ शंखौ प्रदध्मतुः ॥ १४ ॥

हों काज सार विजयाचें । कि तें भांडार महातेजाचें ।
जेथ गरुडाचिये जावळिचे । कांतले च्यान्ही ॥ ३८ ॥
कि पाखांचा मेरु जैसा । रहवरु मिरवत तैसा ।
तेजें कोंधाटलिया दिशा । जेयाचेनि ॥ ३९ ॥
जेथ अश्ववाहकु आपण । वैकुंठीचा राणा जाण ।
तेया रथाचे गुण । काइ वर्णूं ॥ ४० ॥
ध्वजेवरि वानरु । तो मूर्त्तिमंतु शंकरु ।
सारथ्यीं शार्ङ्गधरु । अर्जुनेंसीं ॥ ४१ ॥
देखां नवल तेया प्रभूचें । अद्भुत प्रेम भक्ताचें ।
जें सारथ्य पार्थाचें । करितु असे ॥ ४२ ॥

पाञ्चजन्यं हृषीकेशो देवदत्तं धनंजयः ।
पौण्ड्रं दध्मौ महाशंखं भीमकर्मा वृकोदरः ॥ १५ ॥

पाइकु पाठिंसि घातला । आपण पुढां राहिला ।

तेणें पांचजन्यु आस्फुरिला । अवलीला चि ॥ ४३ ॥
परि तो महाघोषु थोरु । गाजतसे गहीरु ।
जैसा उदैला दिनकरु । लोपी नक्षत्रांतें ॥ ४४ ॥
तैसे तुरबंबाळ भवंते । जे कौरवदळीं गाजत होते ।
ते हारपौनि नेणों केउते । गेले तेथ ॥ ४५ ॥
तैसा चि देखैं एरें । निनादें अति गहिरें ।
देवदत्तु धनुर्धरें । आस्फुरिला ॥ ४६ ॥

अनन्तविजयं राजा कुन्तीपुत्रो युधिष्ठिरः ।
नकुलः सहदेवश्च सुघोषमणिपुष्पकौ ॥ १६ ॥

ते दोन्हीं शब्द अचाट । मीनले एकावट ।
तेथ ब्रह्मकटाहो शतकूट । हो पांत असे ॥ ४७ ॥
तवं भीमसेनु विसाणैला । जैसा महाकाळु खवळला ।
तेणें पौंड्रु आवाटिला । महाशंखु ॥ ४८ ॥
तो महाप्रळइं जळधरु । तैसा घडघडिला गहिरु ।
तवं अनंतविजयो युधिष्ठिरु । आपूरिता जाला ॥ ४९ ॥
नकुळें सुघोषु । सहदेवें मणिपुष्पकु ।
तेणें नादें अंतकु । गजबजला ॥ १५० ॥

काश्यश्च परमेष्वासः शिखण्डी च महारथः ।
धृष्टद्युम्नो विराटश्च सात्यकिश्चापराजितः ॥ १७ ॥

तेथ भूपति होते आणिक । द्रुपदद्रौपदादिक ।
हा काशीपति देख । महाबाहु ॥ ५१ ॥

द्रुपदो द्रौपदेयाश्च सर्वशः पृथिवीपते ।
सौभद्रश्च महाबाहुः शंखान्दध्मुः पृथक्पृथक् ॥ १८ ॥

एथ अर्जुनाचा सूतु । सात्यकी अपराजितु ।
धृष्टद्युम्नु नृपनाथु । शिखंडी हान ॥ ५२ ॥
विराटादिक नृपवर । जे सैनीक मुख्य वीर ।
तिहीं नाना शंख निरंतर । आस्फुरिले ॥ ५३ ॥

**स घोषो धार्त्तराष्ट्राणां हृदयानि व्यदारयत् ।**
**नभश्च पृथिवीं चैव तुमुलो व्यनुनादयन् ॥ १९ ॥**

तेणें महाघोषनिर्घातें । शेषकूर्म अवचितें ।
गजबजौनि भारातें । सांडूं पाति ॥ ५४ ॥
तेथ तीन्ही लोक डंडलित । मेरुमंदार आंदोलत ।
समुद्रजळ उसलत । आकाशवेन्हीं ॥ ५५ ॥
पृथिवीतळ उलंडों पांत । आकाश असे अडदरत ।
तेथ रासौभा होंत । नक्षत्रांचा ॥ ५६ ॥
गेली रे सृष्टि गेली । देवां मोकळवांदि जाली ।
ऐसी एकताळी पीटली । सत्यलोकिं ॥ ५७ ॥
दिहा चि दीनु थोंकला । जैसा प्रळयदीपु माल्हवला ।
तेंथ हाहाकारु उठिला । तिहीं लोकिं ॥ ५८ ॥
तवं आदिपुरुखु विस्मितु । ह्मणे झनें होये अंतु ।
मग लोपिला अद्भुतु । संभ्रमु तो ॥ ५९ ॥
ह्मणोनि विश्व संवरलें । यन्हवि युगांत होतें उपडवलें ।
जेथ महाशंख आपूरिले । कृष्णादिकीं ॥ १६० ॥
तो घोषु तरि उपसंहरला । परि पडिसादा होउनि राहिला ।
तेणें दळभारु विध्वंसिला । कौरवांचा ॥ ६१ ॥
जैसा सींहु गजघंटा अंतु । संचरे लीला विदारतु ।
तैसा हृदयातें भेदितु । वीरांचेयां ॥ ६२ ॥
तो गाजत जवं आइकति । तवं उभेयां चि हियें घालिति ।

एक एकातें ह्मगति । सावत्र रे ॥ ६३ ॥
तेथ बळें प्रौढी पुरते । जे महारथी वीर होते ।
तिहिं पुनरपि दळातें । आवरिलें ॥ ६४ ॥
मग सरिसेपणें उठावले । दुणावटोनि उचलले ।
तेया दंडी क्षोभलें । लोकत्रय ॥ ६५ ॥
तेथ बाणवारि धनुर्धर । वरिषताति निरंतर ।
जैसे प्रलयांतीं जळधर । अनिवार कां ॥ ६६ ॥

**अथ व्यवस्थितान्दृष्ट्वा धार्त्तराष्ट्रान्कपि ध्वजः ।**
**प्रवृत्ते शस्त्रसंपाते धनुरुद्यम्य पाण्डवः ॥ २० ॥**

तें देखिलेयां अर्जुनें । संतोखु घेउनि मनें ।
मग संभ्रमें सैन्यें । अवलोकित असे ॥ ६७ ॥
तवं संग्रामीं सज्ज जाले । सकळ कौरव देखिले ।
मग लीला धनुष उचलिलें । पांडुकुमरें ॥ ६८ ॥

**हृषीकेशं तदा वाक्यमिदमाह महीपते ।**
**सेनयोरुभयोर्मध्ये रथं स्थापय मेऽच्युत ॥ २१ ॥**

तेव्हलिं ह्मणतसे देवा । आतां झडकरि रथु पेलावा ।
नेउनि मध्यें घालावा । दोहीं दळां ॥ ६९ ॥

**यावदेतान्निरीक्ष्येऽहं योद्धुकामानवस्थितान् ।**
**कैर्मया सह योद्धव्यमस्मिन्रणसमुद्यमे ॥ २२ ॥**

जवं मीं नावेक । हे सकळ वीर सैनिक ।
निहाळीन अशेख । झुझते जे ॥ १७० ॥
एथ आले असति आवर्वे । परि मियां कवणेंसीं झुझावें ।
हें रणीं लागे पहावें । ह्मणौनियां ॥ ७१ ॥

**योत्स्यमानानवेक्ष्येऽहं य एतेऽत्र समागताः ।**
**धार्त्तराष्ट्रस्य दुर्बुद्धेर्युद्धे प्रियचिकीर्षवः ॥ २३ ॥**

बहुत करुनि कौरव । हे आतुर दुःस्वभाव ।
वाढिवांविण हांवे । बांधति जुझीं ॥ ७२ ॥
जुझाची आवडि धरति । परि संग्रामीं थीर न्हवति ।
हें सांघौनि रायाप्रति । काइ संजयो ह्मणे ॥ ७३ ॥

## संजय उवाच

**एवमुक्तो हृषीकेशो गुडाकेशेन भारत ।**
**सेनयोरुभयोर्मध्ये स्थापयित्वा रथोत्तमम् ॥ २४ ॥**

आइका अर्जुनु इतुकें बोलिला । तवं कृष्णें रथु पेलिला ।
दोहों सैन्यामाझि केला । उभा तेणें ॥ ७४ ॥

**भीष्मद्रोणप्रमुखतः सर्वेषां च महीक्षिताम् ।**
**उवाच पार्थ पश्यैतान्समवेतान्कुरूनिति ॥ २५ ॥**

जेथ भीष्मद्रोणादिक । जवळिकेचि संमुख ।
पृथिवीपति आणिक । बहुत आहाति ॥ ७५ ॥
तेथ थीरु करुनि रथु । अर्जुनु असे पांतु ।
तो दळभारु समस्तु । संभ्रमेंसीं ॥ ७६ ॥
मग ह्मणे देख देख । हे गोत्रगुरु अशेष ।
तवं कृष्णा मनीं नावेक । विस्मो जाला ॥ ७७ ॥
तो आपणपेंयां आपण ह्मणे । एथ काइ कंवण जाणे ।
हें मनीं धरिलें एणें । परि कांहीं असे ॥ ७८ ॥
ऐसी पुढील से घेतु । तो साहाजें जाणे हृदयस्थु ।
परि उगाचि असे निवातु । तिये वेळे ॥ ७९ ॥

**तत्रापश्यत्स्थितान्पार्थः पितॄनथ पितामहान् ।**
**आचार्यान्मातुलान्भ्रातॄन्पुत्रान्पौत्रान्सखींस्तथा ॥ २६ ॥**

तवं तेथ पार्थु सकळ । पितृ पितामह केवळ ।
गुरु बंधु मातुळ । देखता जाला ॥ १८० ॥
इष्ट मित्र आपुले । कुमर हान देखिले ।
शालक असति आले । तेयामाझि ॥ ८१ ॥

**श्वशुरान्सुहृदश्चैव सेनयोरुभयोरपि ।**
**तान्समीक्ष्य स कौन्तेयः सर्वान्बन्धूनवस्थितान् ॥ २७ ॥**

सुहृद हान ससुरे । आणिक ही सखे सोयरे ।
कुमर पौत्र धनुर्धरें । देखिले तेथ ॥ ८२ ॥
जेयां उपकार होंते केले । जे आपदीं होंते रक्षिले ।
हें असो वडिल धाकुले । आदि करुनि ॥ ८३ ॥
ऐसें गोत्र चि दोहीं दळीं । उद्यत जालें असे कळी ।
तें अर्जुनें तिये काळीं । अवलोकिलें ॥ ८४ ॥

**कृपया परयाविष्टो विषीदन्निदमब्रवीत् ।**

**अर्जुन उवाच ॥**

**दृष्ट्वेमं स्वजनं कृष्ण युयुत्सुं समुपस्थितम् ॥ २८ ॥**

एथ मनीं गजबज जाली । आपैसी कृपा आली ।
तेणें अपमानें निगाली । वीरवृत्ति ॥ ८५ ॥
जिये उत्तमे कुळिचिया होंति । आणि गुणलावण्यें आथि ।
तिया आणिकीतें न साहाति । सुतेजपणें ॥ ८६ ॥
नविये आवडिचेनि भरें । कामिकु निज वनिता विसरे ।
मग पाडेंविण अनुसरे । भ्रमला जैसा ॥ ८७ ॥

कां तपोबळें रिद्धि । पातलेयां भ्रंशु बुद्धी ।
मग विरगतां सिद्धि ! आठवेना ॥ ८८ ॥
तैसें अर्जुना तेथ जालें । जें असतें पौरुष धाडिलें ।
जें अंतष्करण दीन्हलें । कारुण्यासि ॥ ८९ ॥
देखां मंत्रज्ञु बरलु जाये । तेथ कां जैसा संचारु होये ।
तैसा तो धनुर्धरु महामोहें । आकळिला ॥ १९० ॥
ह्मणौनि असता धीरु गेला । हृदयासि द्राउ आला ।
जैसा चंद्रकळा सीतला । सोमकांतु ॥ ९१ ॥
तिया परीं पार्थु । अति स्नेहें मोहितु ।
मग सखेदु असे बोलतु । अच्युतेंसीं ॥ ९२ ॥
तो ह्मणे अवधारीं देवा । मियां पाहिला हा मेळावा ।
तवं गोत्रवर्गु आघवा । देखिला एथ ॥ ९३ ॥
हे संग्रामीं अति उदित । जाले असति कौरु समस्त ।
परि आपणयां उचित । केवि होये ॥ ९४ ॥
येणें नावें चि नेणों काइ । मज आपणपें सर्वथा नाहीं ।
मनो बुद्धि ठांइं । धीरु न्हवे ॥ ९५ ॥

**सीदन्ति मम गात्राणि मुखं च परिशुष्यति ।**
**वेपथुश्च शरीरे मे रोमहर्षश्च जायते ॥ २९ ॥**

देखैं देह कांपत । तोंड असे कोरडें होंत ।
विकळता उपजत । गात्रांसि ॥ ९६ ॥
सर्वांगा कांटाळा आला । अति संतापु उपनला ।
तेणें विव्हळु हातु गेला । गांडिवाचा ॥ ९७ ॥

**गाण्डीवं स्रंसते हस्तात्त्वक्चैव परिदह्यते ।**
**न च शक्नोम्यवस्थातुं भ्रमतीव च मे मनः ॥ ३० ॥**

ते न धरत निसुटलें । परि नेणे चि हातौनि पडिलें ।
ऐसें हृदय असें व्यापलें । मोहें तेणें ॥ १९८ ॥
जें वज्रापासौनि कठिन । दुर्धर अति दारुण ।
तेयाहीहूनि असाधारण । हें स्नेहनवल ॥ १९९ ॥
जेणें शंकरु रणीं जींतिला । कृतांतु आंकणा घातला ।
तो अर्जुनु मोहें कवळिला । क्षणामाझि ॥ २०० ॥
जैसें भ्रमरु तरि भेदी कोडें । भलेतैसें काष्ट कोरडें ।
परि कळिकेमाझि सांपडे । कोवळिये ॥ १ ॥
तेंथ उत्तीर्ण होये प्राणें । परि तें कमलदल चीरूं नेणे ।
ऐसें कठिन कोवळेपणें । स्नेह देखां ॥ २ ॥
हे आदिपुरुषाची माया । ब्रह्मेयाहीं नेये चि आया ।
ह्मणौनि भुलविला आइकैं राया । संजयो ह्मणे ॥ ३ ॥
अवधारीं मग तो अर्जुनु । देखौनि सकळु स्वजनु ।
विसरला अभिमानु । संग्रामिचा ॥ ४ ॥
कैसी नेणों सदयता । उपनली असे चित्ता ।
मग ह्मणे कृष्णा आतां । नसिजे एथ ॥ ५ ॥
माझें अतिशयें मन व्याकुळ । होंतसे वाचा बरळ ।
जें वधावे हे सकळ । एणें नावें ॥ ६ ॥

**निमित्तानि च पश्यामि विपरीतानि केशव ।**
**न च श्रेयोनुपश्यामि हत्वा स्वजनमाहवे ॥ ३१ ॥**

एयां कौरवां वधिावें । तरि युधिष्ठिरादिक कां नेघावे ।
हे येरयेरैं आवघे । गोत्र आमुचें ॥ ७ ॥
ह्मणौनि जळो हें जूझ । प्रत्यया नेये मज ।
एणें काइ काज । महापापें ॥ ८ ॥
देवा बहुतीं परीं पांतां । एथ अवघटें होईल जूझतां ।
वर काहीं एक चुकवितां । लाभु आथि ॥ ९ ॥

**न काङ्क्षे विजयं कृष्ण न च राज्यं सुखानि च ।**
**किं नो राज्येन गोविंद किं भोगैर्जीवितेन वा ॥ ३२ ॥**

तिया विजयवृत्ती काहीं । मज सर्वथा काज नाहीं ।
एथ राज्य तरि काइ । हें पाउनियां ॥ २१० ॥

**येषामर्थे काङ्क्षितं नो राज्यं भोगाः सुखानि च ।**
**त इमेऽवस्थिता युद्धे प्राणांस्त्यक्त्वा धनानि च ॥ ३३ ॥**

एयां सकळांतें वधावें । मग जे भोग भोगावे ।
जळतु ते आघवे । पार्थु ह्मणे ॥ ११ ॥
तेणें सुखेंविण जें होइल । तें भलेतें वर साहिजैल ।
वरि जीवित ही शेवीं जाइल । एथ देवा ॥ १२ ॥
परि यांसि घातु कीजे । मग आपण राज्य भोगिजे ।
हें स्वप्नीं ही मन माझें । करूं न शके ॥ १३ ॥
तरि आह्मीं कां जन्मावें । कवणालागि जियावें ।
जें वडिलां येयां चिंतावें । विरु मनीं ॥ १४ ॥
पुत्रातें इछी कुळ । तेयाचें काइ हें चि फळ ।
जें निर्दळिजे केवळ । गोत्र आपुलें ॥ १५ ॥
हें मनीं चि केवि धरिजे । आपण वज्राचेंयां बोलिजे ।
वर घडे तरि कीजे । भलें एयां ॥ १६ ॥
आह्मीं जें जें जोडावें । तें समस्तीं इहीं भोगावें ।
हें जिवित ही उपकरावें । काजीं यांचां ॥ १७ ॥
आह्मीं दिगंतिचे भूपाळ । विभांडूनि सकळ ।
संतोपविजे कुळ । आपुलें जें ॥ १८ ॥
ते चि हे समस्त । परि कैसें कर्म विपरीत ।
जें जाले असती उद्यत । जुझावेया ॥ १९ ॥
आंतोरिया कुमरें । सांडूनियां भांडारें ।

शस्त्रास्त्रीं जिव्हारें । आरोपुनि ॥ २२० ॥
ऐसेयांतें कैसेनि मारूं । कवणावरि शस्त्र धरूं ।
निज हृदया करूं । भेदु केवि ॥ २१ ॥

**आचार्याः पितरः पुत्रास्तथैव च पितामहाः ।**
**मातुलाः श्वशुराः पौत्राः श्यालाः संबन्धिनस्तथा ॥ ३४ ॥**

हे नेणसि तूं कवण । तरि पैल पैं भीष्मद्रोण ।
जेयांचे उपकार असाधारण । आह्मां बहुत ॥ २२ ॥
एथ शालक ससुरे मातुळ । आणि बंधु किर हे सकळ ।
पुत्र नातू केवळ । इष्ट असति ॥ २३ ॥
अवधारीं अति जवळिकेचे । हे सकळ ही सोइरे आमचे ।
ह्मणौनि दोषु आथि वाचे । एणें नावें ॥ २४ ॥

**एतान्न हन्तुमिच्छामि घ्नतोऽपि मधुसूदन ।**
**अपि त्रैलोक्यराज्यस्य हेतोः किं नु महीकृते ॥ ३५ ॥**

हे वर भलेतें करितु । आतां चि एथ मारितु ।
परि आपण मनें घातु । न चिंतावा ॥ २५ ॥
त्रैलोकिचें अनकळित । जऱ्हीं राज्य जोडैल एथ ।
तऱ्हीं हें अनुचित । नाचरें मी ॥ २६ ॥

**निहत्य धार्तराष्ट्रान्नः का प्रीतिः स्याज्जनार्दन ।**
**पापमेवाश्रयेदस्मान्हत्वैतानाततायिनः ॥ ३६ ॥**

जरि आजि एथ ऐसें कीजे । तरि कवणाचां मनीं उरिजे ।
सांवें मुख केवि पाहिजे । तुझें कृष्णा ॥ २७ ॥
जरि वधु करुनु गोत्राचा । तरि वसैठा होइन दोखांचा ।
मग जोडलासि तूं हातिचा । दूरि होसी ॥ २८ ॥

कुळहरणी पातकें । तियें आंगीं जडति अशेषें ।
तेव्हळि तूं कवणें कें । देखावासि ॥ २९ ॥
जैसा उद्यानामाझि अनळु । संचरला देखौनि प्रबळु ।
क्षणु एकु कोकिळु । स्थिर न्हवे ॥ १३० ॥
कां सकर्दमु सरोवरू । अवलोकुनिया चकोरु ।
न सेवितु अव्हेरु । करुनि निगे ॥ ३१ ॥
तिया परीं तूं देवा । मग झांकउं नेयेसि मावा ।
जरि पुण्याचा ओलावा । नाशिजैल ॥ ३२ ॥

**तस्मान्नार्हा वयं हंतुं धार्त्तराष्ट्रान्सबांधवान् ।**
**स्वजनं हि कथं हत्वा सुखिनः स्याम माधव ॥ ३७ ॥**

ह्मणौनि मीं हें न करीं । इये संग्रामीं शस्त्र न धरीं ।
हें कीडाळ बहुती परीं । दीसतसे ॥ ३३ ॥
तुजसिं अंतराओ होइल । मग सांधैं आमचें काइ उरैल ।
तेणें दुःखें चि हियें फूटैल । तुआंविण ॥ ३४ ॥
ह्मणौनि कौरव हे वधिजति । मग आह्मीं भोग भोगिजति ।
हे असो मातु अघडती । अर्जुनु ह्मणे ॥ ३५ ॥

**यद्यप्येते न पश्यंति लोभोपहतचेतसः ।**
**कुलक्षयकृतं दोषं मित्रद्रोहेच पातकम् ॥ ३८ ॥**

हे अभिमानमदें भूलले । जऱ्हीं पा संग्रामा आले ।
तऱ्हीं आह्मीं हित आपुलें । जाणावें लागे ॥ ३६ ॥
मार्गें चि चालतां । पुढां सिंहु दीसे अवचिता ।
तो चूके तवंरि चुकवितां । वांचिजे कीं ॥ ३७ ॥

**कथं न ज्ञेयमस्माभिः पापादस्मान्निवर्त्तितुं ।**
**कुलक्षयकृतं दोषं प्रपश्यद्भिर्जनार्दन ॥ ३९ ॥**

हें ऐसें कैसें करावें । जें आपुले आपण मारावे ।
जाणतां केवि सेवावें । कालकूट ॥ ३८ ॥
आतां असता प्रकाशु सांडावा । मग अंधकूपु आश्रावा ।
तरि तेथें कवणु देवा । लाभु सांधैं ॥ ३९ ॥
कां समोर आगि देखौनि । जरि न वचिजे चि ऽसंडुनि ।
तरि क्षणा येका कवलुनि । जाळूं शके ॥ २४० ॥
तैसे दोख हे मूर्त्त । आंगिं वाजों असति पांत ।
हें जाणतां केवि एथ । प्रवर्त्तावें ॥ ४१ ॥

**कुलक्षये प्रणश्यंति कुलधर्माः सनातनाः ।**
**धर्मे नष्टे कुलं कृत्स्नमधर्मोऽभिभवत्युत ॥ ४० ॥**

जैसें काष्टें काष्ट मथिंजे । तेथ वन्हि एकु उपजे ।
तेणें काष्टजात जालिजे । प्रज्वललेनि ॥ ४२ ॥
तैसें गोत्रिं चि परस्परें । जरि वधु घडे मत्सरें ।
तरि तेणें दोषें महाघोरें । कुल चि नशे ॥ ४३ ॥
ह्मणौनु एणें पापें । वंशजधर्म लोपे ।
मग अधर्म चि आरोपे । कुलामाजि ॥ ४४ ॥

**अधर्माभिभवात्कृष्ण प्रदुष्यंति कुलस्त्रियः ।**
**स्त्रीषु दुष्टासु वार्ष्णेय जायते वर्णसंकरः ॥ ४१ ॥**

तेथ सारासार न विचारावें । कव्हणें काइ आचरावें ।
जेणें विधिनिषेध आघवे । पारुखति ॥ ४५ ॥
असता दीपु धवडिजे । मग अंधकारिं राहाटिजे ।
तरि उजू चि आडलिजे । जेया परी ॥ ४६ ॥
तैसा कुलीं क्षयो होये । तेव्हालिं आदिधर्मु जाए ।
मग आन काहीं आहे । पापावांचौनि ॥ ४७ ॥

जैं यमनियम टकति । तैं इंद्रियें सैरा विचरति ।
ह्मणौनि व्यभिचार घडति । कुलस्त्रियां ॥ २४८ ॥
उत्तम अधमीं संचरति । वर्णावर्ण मिसळति ।
तेथ समूळ उपडति । जातिधर्म ॥ ४९ ॥
जैसें चोहटांचेया बळी । पांवति सैरा काउळीं ।
तैसीं महापापें कुळीं । प्रविशति ॥ २५० ॥

**संकरो नरकायैव कुलघ्नानां कुलस्यच ।**
**पतंति पितरो ह्येषां लुप्तपिंडोदकक्रियाः ॥ ४२ ॥**

मग कुळा तेया अशेखा । आणिक कुळघातकां ।
एरएरां नरका । जाणें आथि ॥ ५१ ॥
देखैं वंशवृद्धि समस्त । इया परी होए पतित ।
मग उ्वंडति स्वर्गस्थ । पूर्वपुरुष ॥ ५२ ॥
जेथ नित्यादि क्रिया टके । नैमित्तिक कर्म पारुखे ।
तेथ कव्हणा तिळोदकें । कवण अर्पी ॥ ५३ ॥
तरि पितर काइ करिति । कैसेनि स्वर्गीं वसति ।
ह्मणौनि ते हीं येंति । कुळापासिं ॥ ५४ ॥
जैसा नखाग्रि व्याळु लागे । तो शिखांत पावे वेगें ।
तेवि आब्रह्म कुळ आवर्वे । आप्लविजे ॥ ५५ ॥

**दोषैरेतैः कुलघ्नानां वर्णसंकरकारकैः ।**
**उत्साद्यंते जातिधर्माः कुलधर्माश्च शाश्वताः ॥ ४३ ॥**
**उत्सन्नकुलधर्माणां मनुष्याणां जनार्दन ।**
**नरके नियतं वासो भवतीत्यनुशुश्रुम ॥ ४४ ॥**
**अहो बत महत्पापं कर्तुं व्यवसिता वयं ।**
**यद्राज्यसुखलोभेन हंतुं स्वजनमुद्यताः ॥ ४५ ॥**

देवा अवधारीं आणिक एक । एथ घडे महापातक ।

जें संगदोषें हें लौकिक । भ्रंश पावे ॥ ५६ ॥
जैसा घरिं आपुलां । वानिवसें वन्हि लागला ।
तो आणिकां हीं पाजलला । जाळौनि घर्ली ॥ ५७ ॥
तैसिया तिया कुळसंगती । जे जे लोक प्रवर्त्तति ।
ते हिं बाधा पावति । निमित्तें एणें ॥ ५८ ॥
तैसें नाना दोषीं संकुळ । अर्जुनु ह्मणे तें कुळ ।
महाघोर केवळ । निरय भोगी ॥ ५९ ॥
पडलेयां तिये ठांइ । कल्पांतीं हीं उगंडु नाहिं ।
एसणें पतन कुळक्षयिं । अर्जुनु ह्मणे ॥ २३० ॥
देवा हें विविध आइकिजे । परि अझुइंवरि त्रास नुपजे ।
हियें वज्राचें हें काइ कीजे । अवधारीं पां ॥ ६१ ॥
अपेक्षिजे राज्यसुख । जेयालागिं तें तवं क्षणिक ।
ऐसें जाणतां हीं दोख । अव्हेरुं ना ॥ ६२ ॥
जें हे वडिल सकळ आपुले । वधावेयां दीठि सूदले ।
सांवें पां काइ थेकुलें । वडलें आह्मां ॥ ६३ ॥

**यदिमामप्रतीकारमशस्त्रं शस्त्रपाणयः ।**
**धार्त्तराष्ट्रा रणे हन्यु स्तन्मे क्षेमतरं भवेत् ॥ ४६ ॥**

आतां इयावेन्हि जें जिआवें । तेयापासौनि हें बरवें ।
जें शस्त्रें संडौनु साहावें । घाण एयांचे ॥ ६४ ॥
इयावेन्हि होए जेतुकें । तें मरण हीं वर नीकें ।
परि एणें कल्मषें । चाड नाहीं ॥ ६५ ॥

**सञ्जय उवाच ॥**

**एवमुक्त्वार्जुनः संख्ये रथोपस्थ उपाविशत् ।**
**विसृज्य सशरं चापं शोकसंविग्नमानसः ॥ ४७ ॥**

ऐसें तिये अवसरीं । अर्जुनु बोलिला समरीं ।
संजयो ह्मणे अवधारीं । धृतराष्ट्रातें ॥ ६६ ॥
मग अत्यंत उद्वेगला । नधरे गहिवर आला ।
तेथ उडी घातली खाला । रथौनियां ॥ ६७ ॥
जैसा राजकुमरु पदच्युतु । सर्वथा होये उपहतु ।
कां रवि राहुग्रस्तु । प्रभाहीनु ॥ ६८ ॥
ना तरि महासिद्धिसंभ्रमें । जींतला तापसु भ्रमें ।
मग आकळूनि कामें । दीनु कीजे ॥ ६९ ॥
तैसा तो धनुर्द्धरु । अत्यंत दुःखें जर्जरु ।
दीसे तेथ राहवरु । त्यजिला तेणें ॥ २७० ॥
मग धनुष्यबाण सांडिले । नधरत अश्रुपात आले ।
ऐसें आइकैं तेथ वर्त्तलें । संजयो ह्मणे ॥ ७१ ॥
आतां यावरि वैकुंठनाथ । देखौनि सखेदु पार्थ ।
कवणी परी परमार्थ । निरोपील ॥ ७२ ॥
ते सविस्तर पुढां कथा । अति सकौतुक आइकतां ।
जें ज्ञानदेओ ह्मणेल आतां । निवृत्तिदासु ॥ २७३ ॥

ॐतत्सदिति श्रीमद्भगवद्गीतासूपनिषत्सु ब्रह्मविद्यायां योगशास्त्रे श्रीकृष्णार्जुनसंवादे अर्जुनविषादो नाम प्रथमोध्यायः ॥

॥ श्रीकृष्णार्पणमस्तु ॥

॥ व्याख्यानमिदं ॥

# ज्ञानेश्वरी

## अध्याय दुसरा

**सञ्जय उवाच ॥**

**तं तथा कृपयाविष्टमश्रुपूर्णाकुलेक्षणं ।**
**विषीदंतमिदं वाक्यमुवाच मधुसूदनः ॥ १ ॥**

मग संजयो ह्मणे रायातें । आइकैं तो पार्थु तेथें ।
शोकाकुलित रुदनातें । करीतु असे ॥ १ ॥
तें कुळ देखौनि समस्त । स्नेह उपनलें अद्भुत ।
तेणें द्रवलें असे चित्त । कवणी परी ॥ २ ॥
जैसें लवण जळें झळंबलें । ना तरि अभ्र वातें हालें ।
तैसें सधिर परि विरालें । हृदय तेयाचें ॥ ३ ॥
ह्मणुनि कृपा आकळिला । दीसतसे अति कोमाइला ।
जैसा कर्दमीं रूतला । राजहंसु ॥ ४ ॥
तिया परी तो पांडुकुमरु । महामोहें निर्भरु ।
तें देखौनि सारंगधरु । काये बोले ॥ ५ ॥

**श्रीभगवानुवाच ॥**

**कुतस्त्वा कश्मलमिदं विषमे समुपस्थितं ।**
**अनार्यजुष्टमस्वर्ग्यमकीर्तिकरमर्जुन ॥ २ ॥**

म्हणे अर्जुना आदिं पाहिं । तुज उचित काय इयें ठांइं ।
तूं कवणु हें काइ । करीतु आहासि ॥ ६ ॥
तुज सांवें काय जालें । कवण उणें आलें ।
करितां काइ ठेलें । खेदु काइसा ॥ ७ ॥
तूं अनुचिता चित्त नेंदिसी । धीरु कहिं न संडिसि ।
तूझेनि नावें आपेसिं । दिशा लंघी ॥ ८ ॥
तूं शूरवृत्तिचा ठाउ । क्षत्रियांमाझि राउ ।
तूझेया लाठेपणाचा आवो । तिहिं लोकिं ॥ ९ ॥
तुवां संग्रामीं हरु जींतला । निवातकवचाचा ठावो फेडिला ।
पवाडा तुवां केला । गंधर्वासिं ॥ १० ॥
हें पांतां तूझेनि पाडें । दीसे त्रैलोक्य ही थोकडें ।
ऐसें पौरुष चोखडें । पार्था तूझें ॥ ११ ॥
तो तूं किं आजि येथें । सांडूनियां वीरवृत्तितें ।
अधोमुख रुदनातें । करीतु आहासि ॥ १२ ॥
विचारीं तूं अर्जुनु । किं कारुण्यें कीजतासि दीनु ।
सांघ पां अंधकारें भानु । ग्रसिला आथि ॥ १३ ॥
नातरि पवनु मेघासि बिहे । किं अमृतासि मरण आहे ।
पाहे पां इन्धन चि गीळूनि जाये । पावकातें ॥ १४ ॥
किं लवणें चि जल विरे । संसर्गें कालकूट मरे ।
सांवें महाफणि दर्दुरें । गीळिजे कायि ॥ १५ ॥
सिंहासि झोंबे कोल्हा । ऐसा अपाडु आथिकां जाला ।
परि तुवां साचु केला । आजि येथें ॥ १६ ॥
म्हणुनि आझुइं अर्जुना । झनें चित्त देंसि यया हीना ।
वेगीं धीरु करुनि मना । सावधु होइं ॥ १७ ॥
सांडीं हें मूर्खपण । उठिं घेइं धनुष्यबाण ।
संग्रामिं हें कवण । कारुण्य तूझें ॥ १८ ॥

हां गा तूं जाणता । तरि न विचारीसि कां आतां ।
सांघें जूझावेळे सदयता । उचित काई ॥ १९ ॥
हें असतिये कीर्ती नाशु । आणि पारत्रिकासि भ्रंशु ।
ह्मणे जगन्निवासु । अर्जुनातें ॥ २० ॥

**क्लैब्यं मा स्म गमः पार्थ नैतत्त्वय्युपपद्यते ।**
**क्षुद्रं हृदयदौर्बल्यं त्यक्त्वोत्तिष्ठ परंतप ॥ ३ ॥**

ह्मणुनि शोक न करीं । हा पुरुता धीरु धरीं ।
हे शोच्यता अव्हेरीं । पांडुकुमरा ॥ २१ ॥
तुज नव्हे हें उचित । येणें नाशेल जोडलें बहुत ।
तूं अझुइं हित । विचारि पां ॥ २२ ॥
येणें संग्रामाचेनि अवसरें । येथ कृपालुपण नुपकरे ।
हे आतां चि काइ सोइरे । जाले तुज ॥ २३ ॥
तूं आदीं चि काइ नेणसि । कि हें गोत्र नोळखसि ।
वायां चि काइ करिसी । अतिशो एथ ॥ २४ ॥
आजिचें हें जूझ । काये जन्मा नवल तूज ।
हें परस्परें तुह्मा व्याज । सदा चि आथि ॥ २५ ॥
तरि आतां चि काइ जालें । काइसें स्नेह उपनलें ।
हें नेणिजे परि कुडें केलें । अर्जुना तुवां ॥ २६ ॥
मोहो धरिलेयां ऐसें होइल । जें असती प्रतिष्ठा जाइल ।
आणि परलोक अंतरेल । इहिकेंसीं ॥ २७ ॥
हृदयाचें ढीलेपण । येथ नीकेयासि नव्हे कारण ।
ह संग्रामिं पतन जाण । क्षत्रियांसि ॥ २८ ॥
ऐसेनि तो कृपावंतु । नानापरी असे सिकवितु ।
तें आइकौनि पांडुसुतु । काये बोले ॥ २९ ॥

## अर्जुन उवाच ॥

**कथं भीष्ममहं संख्ये द्रोणं च मधुसूदन ।**
**इषुभिः प्रतियोत्स्यामि पूजार्हावरिसूदन ॥ ४ ॥**

देवा हें इतुलेवेन्हीं । बोलावें नलगे अवधारीं ।
आदीं तूं चि चित्तिं विचारीं । संग्रामु हा ॥ ३० ॥
हें झुंझ नव्हे प्रमादु । येथ प्रवर्तलेयां दीसतसे बाधु ।
हा उघड लिंगभेदु । वोडवला आह्मा ॥ ३१ ॥
देखें मातापितरें अर्चिजति । तियें सर्वस्वें तोषु पावविजति ।
तियें पाठीं केवि वधिजति । आपुलां हातीं ॥ ३२ ॥
देवा संतवृंद नमस्कारिजे । कां घडे तरि पूजिजे ।
हें वांचूनि केवि निंदिजे । स्वयें वाचा ॥ ३३ ॥
तैसे गोत्रगुरु आमचे । हे पूज्य आह्मां नियमाचे ।
मज बहूत भीष्मद्रोणाचें । वर्ततसे ॥ ३४ ॥
जयांलागि मनें वीरुं । आह्मी स्वप्नीं हिं न धरुं ।
तेयां प्रत्यक्ष केवि करुं । घातु देवा ॥ ३५ ॥
वर जळो हें जियालें । येथ आववेयांसि हें चि जालें ।
जे याचा वधि अभ्यासिलें । मिरविजे आह्मीं ॥ ३६ ॥
मी पार्थु द्रोणाचा केला । येणें धनुर्वेदु मज दीन्हला ।
तेणें उपकारें काइ आभारेलां । वधि ययातें ॥ ३७ ॥
जेथिंचिया कृपा लाभे वरु । तेथ चि मनें व्यभिचारु ।
तरि काइ मी भस्मासुरु । अर्जुनु ह्मणे ॥ ३८ ॥
देवा समुद्र हा भरितु आइकिजे । वर तो ही आहाचु देखिजे
परि क्षोभु मनीं नेणिजे । द्रोणाचिये ॥ ३९ ॥
हें अपार जें गगन । वरि तेया ही होईल मान ।
परि अगाध भलें गहन । हृदय ययाचें ॥ ४० ॥

वरि अमृत ही वीटे । कां कालवसें वज्र फूटे ।
परि मनोधर्मु न लोटे । विकरविला हा ॥ ४१ ॥
स्नेहालागि माये । ह्मणिपे तें कीरु होये ।
परि कृपा ते मूर्त आहे । इये द्रोणीं ॥ ४२ ॥
हा कारुण्याची आदि । सकल गुणाचा निधि ।
विद्यासिंधु निरवधी । अर्जुनु ह्मणे ॥ ४३ ॥
हा येणें मानें महंतु । वरि आह्मांलागि कृपावंतु ।
आतां सांग पां काइ घातु । येथ चिंतु येइल ॥ ४४ ॥

**गुरूनहत्वा हि महानुभावाञ्श्रेयो भोक्तुं भैक्ष्यमपीह लोके ।**
**हत्वार्थकामांस्तु गुरूनिहैव भुंजीय भोगान्रुधिरप्रदिग्धान् ॥५॥**

हे ऐसे रणिं वधावे । मग आपण राज्यसुख भोगावें ।
हें मना नेये आघवें । जीवितेंसिं ॥ ४५ ॥
हे येणें मानें दुर्भर । जें यया ही होनि भोग सपुर ।
ते असतु एथ भिक्षा वर । मागतां भली ॥ ४६ ॥
नातरि देशत्यागें जाइजे । कां गिरिकंदर सेविजे ।
परि शस्त्र आतां न धरिजे । ययांवरि ॥ ४७ ॥
देवा नव नवनिसितिं सरीं । वावरुनि येयांचां जिव्हारीं ।
भोग गिंवसावे रुधिरीं । बुडाले जे ॥ ४८ ॥
ते काढुनि काये कीजति । विलिप्त केवि सेविजति ।
मज नेये हें उपपत्ती । इया चि लागि ॥ ४९ ॥

**न चैतद्विद्मः कतरन्नो गरीयो यद्वा जयेम यदि वा नो जयेयुः ।**
**यानेव हत्वा न जिजीविषामस्तेऽवस्थिताः प्रमुखे धार्तराष्ट्राः ॥ ६ ॥**

ऐसें अर्जुनु तियें अवसरीं । ह्मणे कृष्णा अवधारीं ।
परि तें मना नेये चि मुरारी । आइकोनियां ॥ ५० ॥

हें जाणौनि पार्थु भियाला । मग पुनरपि बोलों लागला ।
देॐ चित्त कां या बोला । देति चि ना ॥ ५१ ॥
यऱ्हविं माझां चित्तिं जें होतें । मीं विचारूनि बोलिलां येथें ।
परि नीकें काय यया परौतें । तें तुह्मीं चि जाणा ॥ ५२ ॥
पैं वीरुं जेयांसि आइकिजे । आणि इं बोलिं चि प्राणु सांडिजे ।
ते हे येथ संग्रामुव्याजें । उभे आहाति ॥ ५३ ॥
आतां ऐसेयांतें हीं परि वधावें । किं अव्हेरुनि वेगिं निगावें ।
एया दोहिं माजि काय करावें । तें नेणों आह्मीं ॥ ५४ ॥

**कार्पण्यदोषोपहतस्वभावः।**
**पृच्छामि त्वां धर्मसंमूढचेताः ।**
**यच्छ्रेयः स्यान्निश्चितं ब्रूहि तन्मे ।**
**शिष्यस्तेऽहं शाधि मां त्वां प्रपन्नं ॥ ७ ॥**

आह्मां काय उचित । तें पव्हातां न स्फुरे येथ ।
जें मोहें येणें चित्त । व्याकुळ माझें ॥ ५५ ॥
तिमिरावरुद्ध जैसें । दृष्टिचें तेज भ्रंशे ।
मग पासिं असत न दिसे । वस्तुजात ॥ ५६ ॥
देवा तैसें मज जालें । जें मन हें भ्रांती ग्रसिलें ।
आतां हित काये आपुलें । तें हिं नेणें ॥ ५७ ॥
तरि कृष्णा तुवां जाणावें । नीकें तें आह्मां सांगावें ।
जें सखा सर्वस्व आघवें । आह्मासि तूं ॥ ५८ ॥
तुं गुरु बंधु पिता । तूं आमची इष्टदेवता ।
तूं चि सदा रक्षिता । आपदीं आमतें ॥ ५९ ॥
जैसें शिष्यातें गुरु । सर्वथा नैये अव्हेरुं ।
कां सरितांतें सागरु । त्यजी केवि ॥ ६० ॥
नातरि अपत्यातें माये । ऊसंडूनि जरि जाये ।

तरि तें कैसेनि जिये । आइकें कृष्णा ॥ ६१ ॥
तैसा सर्वी परीं आह्मासि । देवा तूं चि येकु आहासि ।
आणि बोलिलें जरि न मनिसि । मागील माझें ॥ ६२ ॥

**न हि प्रपश्यामि ममापनुद्याद्यच्छोकमुच्छोषणमिंद्रियाणां ।**
**अवाप्य भूमावसपत्नमृद्धं राज्यं सुराणामपि चाधिपत्यं ॥ ८ ॥**

तरि उचित काइ आह्मां । जें व्यभिचरे ना धर्मा ।
तें झडकरि पुरुषोत्तमा । सांघें आतां ॥ ६३ ॥
हें सकल कुल देखौनि । जो शोकु उपनला असे मनीं ।
तो तूझें वाक्य वांचूनि । न जींपें आणिकें ॥ ६४ ॥
एथ पृथ्वीतल आपुलें होइल । महेंद्रपद ही पाविजैल ।
परि दुःख हें न जिपैल । मानसिचें ॥ ६५ ॥
जैसीं सर्वथा बीजें आहललीं । सुक्षेत्रि जऱ्हीं पेरिलीं ।
तऱ्हीं न विरुढती चि सिंचिलिं । भलेतैसीं ॥ ६६ ॥
नातरि आयुष्य पुरलें आहे । तरि ओखदिं हिं काहिं नव्हे ।
तेथ येक चि उपेगा जाये । परमामृत ॥ ६७ ॥
तैसें राज्यभोगसमृद्धी । उज्जीवन नव्हे इये बुद्धी ।
येथ जीवाला कृपानिधी । कारुण्य तूझें ॥ ६८ ॥
ऐसें अर्जुनु तेथ बोलिला । जवं क्षणु येकु भ्रांती सांडिला ।
पुनरपि व्यापिला । ऊर्मि तेणें ॥ ६९ ॥
मज पांतां ऊर्मि नोहे । हें अनारिसें गमत आहे ।
तो ग्रसिला महामोहें । कालसर्पें ॥ ७० ॥
सुवर्महृदयकल्हारीं । कारुण्यवेलेचां भरीं ।
लागला ह्मणौनि लाहरी । भांजे चि ना ॥ ७१ ॥
हें जाणौनि जैसा प्रौढी । जो दृष्टीसवें चि विष फेडी ।
तो धांवेया हरिगारुडी । पातला कां ॥ ७२ ॥

तैसिया पांडुकुमरा व्याकुला । मिरवत असे कृष्णु जवला ।
जो कृपावसें अवलीला । रक्षैल आतां ॥ ७३ ॥
ह्मणौनि तो पार्थु । मोहफणिग्रसितु ।
मियां ह्मणितला हा हेतु । जाणौनियां ॥ ७४ ॥
मग देखां तेथ फाल्गुनु । घेतला असे भ्रांती कवलुनु ।
जैसा घनपटलीं भानु । आच्छादिजे ॥ ७५ ॥
तिया परीं धनुर्द्धरु । जाला असे दुःखें जर्जरु ।
जैसा ग्रीष्मकालीं गिरिवरु । वणवला कां ॥ ७६ ॥
ह्मणौनि साहाजें सुनीलु । येरु कृपामृतें सजलु ।
तो बोलला असे गोपालु । महामेघु ॥ ७७ ॥
तेथ सुदर्शनाची दीप्ति । ते चि विद्युत् जैसी झलकती ।
गंभीर वाचा ते आइती । गर्जनेची ॥ ७८ ॥
आतां तो उदारु कैसा वरिषैल । जेणें अर्जुनाचलु निवैल ।
मग नवी विरुढि फूटैल । उन्मेषाची ॥ ७९ ॥
ते चि कथा आइकां । मनाचिया आराणुका ।
ज्ञानदेउ ह्मणे देखां । निवृत्तिदासु ॥ ८० ॥

**संजय उवाच ॥**

**एवमुक्त्वा हृषीकेशं गुडाकेशः परंतप ।**
**न योत्स्य इति गोविंदमुक्त्वा तूष्णीं बभूव ह ॥ ९ ॥**

ऐसें संजयो असे सांघतु । ह्मणे राया तो पार्थु ।
पुनरपि शोकाकुलितु । काये बोले ॥ ८१ ॥
आइकैं सखेदु ह्मणे कृष्णातें । आतां नालवावें तुह्मीं मातें ।
मीं सर्वथा न जुझें एथें । भरवसेनि ॥ ८२ ॥
ऐसें एकी हेला बोलिला । मग मौन करुनु राहिला ।
तेथ कृष्णु विस्मो पातला । देखौनि तेयातें ॥ ८३ ॥

**तमुवाच हृषीकेशः प्रहसन्निव भारत ।**
**सेनयोरुभयोर्मध्ये विषीदंतमिदं वचः ॥ १० ॥**

मग आपुलां चित्तिं ह्मणे । एथ हें आदरिलें काय येणें ।
अर्जुनु सर्वथा काहिं नेणें । काय कीजे ॥ ८४ ॥
हा उमजे आतां कवणी परी । कैसेनि धीरु स्वीकरी ।
जैसें ग्राहातें पांचाखरी । अनुमानी कां ॥ ८५ ॥
नातरि असाध्य देखौनि व्याधि । वैद्य सूची निरवधी ।
अमृतासारिखी ओषधी । निर्वाणिची ॥ ८६ ॥
तैसें विवरीतु असे अनंतु । तेयां दोन्हीं सैन्यां आंतु ।
जेया परीं पार्थु । भ्रांति सांडी ॥ ८७ ॥
तें कारण मनीं धरिलें । मग सरोख बोलों आदरिलें ।
जैसें मातेचां कोपीं थोकलें । स्नेह आथि ॥ ८८ ॥
कां ओषधाचां कडवटपणीं । जैसी अमृताची पुरवणी ।
ते आहाच न दिसे परगुणीं । प्रकट होये ॥ ८९ ॥
तैसीं वरि पांतां उदासें । आंतु तरि अति सुरसें ।
तियें वाक्यें हृषीकेशें । बोलों आदरिलिं ॥ ९० ॥

## श्रीभगवानुवाच ॥

**अशोच्यानन्वशोचस्त्वं प्रज्ञावादांश्च भाषसे ।**
**गतासूनगतासूंश्च नानुशोचंति पंडिताः ॥ ११ ॥**

मग अर्जुनातें ह्मणितलें । आह्मीं आजि हें नवल देखिलें ।
जें तुआं एथ आदरिलें । माझारि चि ॥ ९१ ॥
तूं जाणता जरि ह्मणिपसी । तरि नेणिवेतें न सांडिसी ।
आणि सिखौं ह्मणों तरि बोलसी । तूं चि बहुत ॥ ९२ ॥
जात्यंधा लागें पिसें । मग ते सैरा धांवें जैसें ।
तूझें सिहाणेपणं तैसें । दीसतसे ॥ ९३ ॥

तूं आपणपें तरि नेणसि । परि यां कौरवांतें शोचुं पाहासि ।
हा बहुत विस्मयो आह्मांसि । पुढुतीं पुढुतीं ॥ ९४ ॥
तरि सांघ पां अर्जुना । तुजपासौनि स्थिति त्रिभुवना ।
हे आदि विश्वरचना । तें लटिकें काइ ॥ ९५ ॥
एथ समर्थु एक आथि । तेयापासौनि भूतें होति ।
तरि हें वायां चि काइ बोलति । जगामाझि ॥ ९६ ॥
हो काज सांप्रतें जालें । जें हें जन्मे तुआं श्रुजिलें ।
आणि नाशु यावें नाशिलें । विचारि पां ॥ ९७ ॥
तूं भ्रमलेपणें अहंकृती । ययां घातु न धरिसि चित्तिं ।
तरि सांघै काइ हे होंती । चिरंतन ॥ ९८ ॥
किं तूं एकु वधिता । आणि सकल लोकु हा मरता ।
ऐसी भ्रांति झनें चित्ता । येयों देंसी ॥ ९९ ॥
हें अनादिसिद्ध आघवें । होंत जात स्वभावें ।
तरि तुवां कां शोचावें । सांघै मज ॥ १०० ॥
परि मूर्खपणें नेणसि । न चिंतावें तें चिंतिसि ।
आणि तूं चि नीति सांघसि । आह्माप्रति ॥ १ ॥
देखैं विवेकियें जे होति । ते दोहींतें हीं न शोचिति ।
जें होये जाये हे भ्रांति । ह्मणौनिया ॥ २ ॥

**न त्वेवाहं जातु नासं न त्वं नेमे जनाधिपाः ।**
**न चैव न भविष्यामः सर्वे वयमतः परम् ॥ १२ ॥**

अर्जुना सांघैन आइक । एथ आह्मीं तुह्मीं देख ।
आणि हे भूपति अशेष । आदिकरुनि ॥ ३ ॥
नित्यता ऐसे चि असौनि । कां निश्चित क्षया जाउनि ।
इये भ्रांती वेगली करूनि । दोन्ही नाहीं ॥ ४ ॥
हें उपजे आणि नाशे । तें मायामय दीसें ।

यन्हवि तत्वता वस्तु असे । अविनाश चि ॥ ५ ॥
जैसें पवनें तोय हालवलें । आणि तरंगाकार जालें ।
तरि कवण कें जन्मलें । ह्मणों तेथ ॥ ६ ॥
तें चि वायुचें स्फुरण ठेलें । आणि उदक साहाजें सपाटलें ।
तरि काइ आतां निमालें । विचारि पां ॥ ७ ॥

**देहिनोऽस्मिन्यथा देहे कौमारं यौवनं जरा ।**
**तथा देहान्तरप्राप्तिर्धीरस्तत्र न मुह्यति ॥ १३ ॥**

आइकें शरीर तरि एक । परि वयसा भेद अनेक ।
हें प्रत्यक्ष चि देख । प्रमाण तूं ॥ ८ ॥
एथ कौमारत्व दीसे । मग तारुण्यें तें भ्रंशे ।
परि देह चि न नशे । एकासवें ॥ ९ ॥
तैसि चैतन्याचां ठांइं । इयें शरीरांतरें पाइं ।
ऐसें जाणे तेया नाहीं । व्यामोहदुःख ॥ ११० ॥

**मात्रास्पर्शास्तु कौंतेय शीतोष्णसुखदुःखदाः ।**
**आगमापायिनोऽनित्यास्तांस्तितिक्षस्व भारत ॥ १४ ॥**

येथ नेणावया हें चि कारण । जें इंद्रियां अधीनपण ।
तिहिं आकलिजे अंतष्करण । ह्मणौनि भ्रमें ॥ ११ ॥
इंद्रियें विषय सेविति । तेथ हर्ष शोक हे उपजति ।
ते आंतर आप्लविति । संगें एणें ॥ १२ ॥
जें ययां विषयांचां ठांइं । एकनिष्ठता नाहीं ।
एथ दुःख आणि काहीं । सुख ही दीसे ॥ १३ ॥
देखैं हे शब्दाची व्याप्ति । जें निंदा आणि स्तुति ।
तेथ द्वेषाद्वेष उपजति । श्रवणद्वारें ॥ १४ ॥
मृदु आणि कठिन । हे स्पर्शाचे दोन्हीं गुण ।
जे वपुचेनि संगें कारण । संतोखखेदा ॥ १५ ॥

भयासुर आणि सुवेख । हें रूपाचें स्वरूप देख ।
जें उपजवी सुखदुःख । नेत्रद्वारें ॥ ११६ ॥
सुगंधु आणि दुर्गंधु । हा परिमळाचा भेदु ।
जो घ्राणसंगें विषादु । तोषु देता ॥ ११७ ॥
तैसाचि द्विविधु रसु । उपजवी प्रीति त्रासु ।
ह्मणौनि हा अपभ्रंशु । विषयसंगु ॥ ११८ ॥
देखैं इंद्रियां आधीन होइजे । तरि शीतोष्णातें पाविजे ।
आणि सुखदुःखीं आकळिजे । आपणपें ॥ ११९ ॥
एयां विषयांवांचूनि काहीं । आणिक सर्वथा रम्य नाहीं ।
ऐसा स्वभाउ चि पाहीं । इंद्रियांचा ॥ १२० ॥
हे विषय तरि कैसे । रोहिणीचें जळ जैसें ।
कां स्वप्निचा आभासे । भद्रजाति ॥ २१ ॥
देखैं अनित्य तिया परीं । ह्मणौनि तूं अव्हेरीं ।
हा सर्वथा संगु न करीं । धनुर्धरा ॥ २२ ॥

**यं हि न व्यथयंत्येते पुरुषं पुरुषर्षभ ।**
**समदुःखसुखं धीरं सोऽमृतत्वाय कल्पते ॥ १५ ॥**

हे विषय जेया नाकळीति । तेया सुखदुःखें न पवति. ।
आणि गर्भवाससंगति । नाहिं तेया ॥ २३ ॥
तो नित्यरूपु पार्था । उळखावा सर्वथा ।
जो यां इंद्रियार्थां । नाकळे चि ॥ २४ ॥

**नासतो विद्यते भावो नाभावो विद्यते सतः ।**
**उभयोरपि दृष्टोऽतस्त्वनयोस्तत्त्वदर्शिभिः ॥ १६ ॥**

आतां अर्जुना आणिक एक । सांवैन मी आइक ।
जें विचारपर लोक । उळखति ॥ २५ ॥

एया उपाधिमाझि गुप्त । चैतन्य असे सर्वगत ।
तें तत्वज्ञ संत । स्वीकरीति ॥ २६ ॥
सलीलीं पय जैसें । एक होउनि मिनलें असे ।
परि निवडूनि राजहंसें । वेगळें कीजे ॥ २७ ॥
कां अग्निमुखें कीडाळ । तोडूनियां चोखाळ ।
निवडीति केवळ । बुद्धिमंत ॥ २८ ॥
ना तरि जाणिवेचिया आयणी । करितां दधिकडसणी ।
मग नवनीत निर्वाणीं । दीसे जैसें ॥ २९ ॥
कां भूस बीज एकावट । उपणितां राहे घणवट ।
तेथ उडे तें फलकट । जाणों आलें ॥ १३० ॥
तैसें विचारिती निरसलें । तें प्रपंचूनि साहजें सांडलें ।
मग तत्वता तत्व उरलें । ज्ञानियासि ॥ ३१ ॥
ह्मणौनि अनित्याचां ठांइं । तेया आस्तिकिबुद्धि नाहीं ।
जें निष्कर्षु दोहीं । देखिला असे ॥ ३२ ॥

**अविनाशि तु तद्विद्धि येन सर्वमिदं ततम् ।**
**विनाशमव्ययस्यास्य न कश्चित्कर्तुमर्हति ॥ १७ ॥**

देखैं सारासार विचारितां । भ्रांति ते नाहीं असारता ।
तरि सार तें स्वभावता । नित्य जाणें ॥ ३३ ॥
हा लोकत्रयाकारु । तो जेयाचा विस्तारु ।
जेथ नामवर्णुआकारु । चिन्ह नाहिं ॥ ३४ ॥
जो सर्वदा सर्वगतु । जन्मक्षयां अतीतु ।
तेया केलेयां हीं घातु । कदा न्हवे ॥ ३५ ॥

**अंतवंत इमे देहा नित्यस्योक्ताः शरीरिणः ।**
**अनाशिनोऽप्रमेयस्य तस्माद्युध्यस्व भारत ॥ १८ ॥**

आणि शरीरजात आघवें । नाशवंत स्वभावें ।
ह्मणौनि तुवां जुझावें । पांडुकुमरा ॥ ३६ ॥

**य एनं वेत्ति हंतारं यश्चैनं मन्यते हतम् ।**
**उभौ तौ न विजानीतो नायं हंति न हन्यते ॥ १९ ॥**

तूं धरूनि देहाभिमानातें । आणि दीठि सूनि एया शरीरातें ।
मी वधिता हे मरते । ह्मणतु आहासि ॥ ३७ ॥
अर्जुना हें नेणसि । जरि तत्वता विचारिसि ।
तरि वधिता तूं न्हवसि । हे वध्य न्हवति ॥ ३८ ॥
जैसें स्वप्नामाझि देखिजे । तें स्वप्नीं चि साच आपजे ।
मग चेउनियां पाहिजे । तवं काहीं च नाहिं ॥ ३९ ॥

**न जायते म्रियते वा कदाचिन्**
**नायं भूत्वा भविता वा न भूयः ।**
**अजो नित्यः शाश्वतोऽयं पुराणो**
**न हन्यते हन्यमाने शरीरे ॥ २० ॥**

तैसी हे माया । तूं भ्रमतु आहासि वायां ।
शस्त्रें हाणितलेयां छाया । आंगीं न रुपे ॥ १४० ॥
कां पूर्णु कुंभु उलंडला । तेथ बिंबाकारु चि भ्रंशला ।
परि भानु नाहीं नाशला । तेयासवें ॥ ४१ ॥
ना तरि मठीं आकाश जैसें । मठाकृती आवरलें असे ।
तो चि भंगलेयां आपैसें । स्वरूप चि ॥ ४२ ॥

**वेदाविनाशिनं नित्यं य एनमजमव्ययम् ।**
**कथं स पुरुषः पार्थ कं घातयति हंति कम् ॥ २१ ॥**

तैसें शरीराचां लोपीं । सर्वथा नाशु नाहीं स्वरूपीं ।
ह्मणौनि तुं हें नारोपीं । भ्रांति बापा ॥ ४३ ॥

**वासांसि जीर्णानि यथा विहाय नवानि गृह्णाति नरोऽपराणि ।**
**तथा शरीराणि विहाय जीर्णान्यन्यानि संयाति नवानि देही ॥२२॥**

जैसीं जीर्णें वस्त्रें सांडिजे । मग नूतनें आणिकें वेढिजे ।
तैसें देहांतरातें स्वीकारिजे । चैतन्यनाथें ॥ ४४ ॥

**नैनं छिंदंति शस्त्राणि नैनं दहति पावकः ।**
**न चैनं क्लेदयन्त्यापो न शोषयति मारुतः ॥ २३ ॥**

हा अनादि नित्य सिद्धु । निरुपाधि विशुद्धु ।
ह्मणौनि शस्त्रादिकिं छेदु । न घडे एया ॥ ४५ ॥
हा प्रलयोदकें नाप्लवे । अग्निदाहो न संभवे ।
एथ महाशोषु न प्रभवे । मारुताचा ॥ ४६ ॥
हा तर्काचिये दृष्टी । गोचरु नव्हे किरीटी ।
ध्यान येयाचिये भेटी । उत्कंठा वाहे ॥ ४७ ॥
हा सदा दुर्लभु मना । आपु नव्हे साधना ।
निःसीमु हा अर्जुना । पुरुषोत्तमु ॥ ४८ ॥

**अच्छेद्योऽयमदाह्योऽयमक्लेद्योऽशोष्य एव च ।**
**नित्यः सर्वगतः स्थाणुरचलोऽयं सनातनः ॥ २४ ॥**

हा गुणत्रयरहितु । व्यक्तीसि अतीतु ।
अनादि अविकृतु । सर्वरूपु ॥ ४९ ॥
अर्जुना हा नित्यु । अचलु हा शाश्वतु ।
सर्वत्र सदोदितु । परिपूर्णु हा ॥ १५० ॥

**अव्यक्तोऽयमचिंत्योऽयमविकार्योऽयमुच्यते ।**
**तस्मादेवं विदित्वैनं नानुशोचितुमर्हसि ॥ २५ ॥**

अर्जुना ऐसा जाणावा । हा सकळात्मकु देखावा ।
मग साहाजें शोकु आघवा । हरेल तुझा ॥ ५१ ॥

**अथ चैनं नित्यजातं नित्यं वा मन्यसे मृतम् ।**
**तथापि त्वं महाबाहो नैनं शोचितुमर्हसि ॥ २६ ॥**

अथवा ऐसा नेणसी । तूं अंतवंत चि हें मानिसि ।
तऱ्हीं शोचूं न पवसि । पांडुकुमरा ॥ ५२ ॥

जें आदि स्थिति अंतु । हा निरंतर असे नित्यु ।
जैसा प्रवाहो अनस्यूतु । गंगाजळाचा ॥ ५३ ॥
तें आदि नाहीं खंडलें । समुद्रिं तरि असे मीनलें ।
आणि जात चि मध्यें उरलें । दीसे जैसें ॥ ५४ ॥
इयें तीन्हीं तियापरीं । सरिसिं चि सदा अवधारीं ।
भूतांसि कव्हणी अवसरीं । टाकनि ना ॥ ५५ ॥
ह्मणौनि हें आघवें । एथ नलगे तुज शोचावें ।
जे स्थिति चि हे स्वभावें । अनादि ऐसी ॥ ५६ ॥
ना तरि हें अर्जुना । नये चि तूझेया मना ।
जें देखौनि लोकु अधिना । जन्मक्षयां ॥ ५७ ॥
तऱ्है एथ काहीं । तुज शोकासि कारण नाहीं ।
जें जन्म मृत्यु हे पाहीं । अपरिहर ॥ ५८ ॥

**जातस्य हि ध्रुवो मृत्युः ध्रुवं जन्म मृतस्य च ।**
**तस्मादपरिहार्येऽर्थे न त्वं शोचितुमर्हसि ॥ २७ ॥**

उपजे तें नाशे । नाशलें पुनरपि दीसे ।
हें घटिकायंत्र तैसें । परिभ्रमे ॥ ५९ ॥
ना तरि उदो अस्तु आपैसे । अखंडित होति जैसे ।
हें जन्ममरण तैसें । अनिवार जगीं ॥ १६० ॥
महाप्रलयअवसरें । हें त्रैलोक्य ही संहरे ।
ह्मणौनि हा न परिहरे । आदिअंतु ॥ ६१ ॥
तूं जरि हें ऐसें मानिसि । तरि खेदु कां करिसि ।
काइ जाणतू चि नेणसि । धनुर्धरा ॥ ६२ ॥

**अव्यक्तादीनि भूतानि व्यक्तमध्यानि भारत ।**
**अव्यक्तनिधनान्येव तत्र का परिदेवना ॥ २८ ॥**

एथ आणिक ही एक पार्था । तुज बहुतीं परीं पव्हांतीं ।
दुःख करावेया सर्वथा । विषो नाहीं ॥ ६३ ॥

जें समस्तें इयें भूतें । जन्मा आदीं अमूर्तें ।
मग पातलीं व्यक्तितें । जन्मलेयां ॥ ६४ ॥
तियें क्षया जेथ जांति । तेथ निभ्रांत आनें नव्हति ।
देखें पूर्वस्थिति चि एंति । आपुलिये ॥ ६५ ॥
परि मध्यें जें प्रतिभासे । तें निद्रिता स्वप्न जैसें ।
तैसा आकारु हा मायावशें । स्वस्वरूपीं ॥ ६६ ॥
ना तरि पवनें स्पर्शिलें नीर । पडिहासे तरंगाकार ।
कां परापेक्षा अलंकार । व्यक्तिकनकिं ॥ ६७ ॥
तैसें सकळ हें मूर्त । जाण पां मायाकारित ।
जैसें आकाशीं विंबत । अभ्रपटळ ॥ ६८ ॥
ऐसें आदी चि जें नाहीं । तेयालागि रुदसी काइ ।
तूं अचीट हें पाहीं । चैतन्य येक ॥ ६९ ॥

**आश्चर्यवत् पश्यति कश्चिदेनमाश्चर्यवद्वदति तथैव चान्यः ।**
**आश्चर्यवच्चैनमन्यः शृणोति श्रुत्वाप्येनं वेद न चैव कश्चित् ॥२९॥**

जेयाची आर्त्ती चि भोगित । विषइं त्यजिले संत ।
जेयालागि विरक्त । वनवासिये ॥ १७० ॥
दृष्टि सूनि जेयातें । ब्रह्मचर्यादि व्रतें ।
मुनीश्वर तपातें । आचारिति ॥ ७१ ॥
एकां गुणानुवादु करितां । उपरति होउनि चित्ता ।
निरवधी तल्लीनता । निरंतर ॥ ७२ ॥
एक आंतरीं निश्चळ । जे निहाळीति केवळ ।
विसरले सकळ । संसारजात ॥ ७३ ॥
एक आइकतां चि निवाले । ते देहभावीं सांडिले ।
एक अनुभवें पातले । तद्रूपता ॥ ७४ ॥
जैसे सरिता ओघ समस्त । समुद्रामाझि मिळत ।
परि मावोतें न समात । परतले नाहीं ॥ ७५ ॥

तसिया योगीश्वरांचिया मती । मिळणीसमें दुणावटती ।
परि जें विचारूनि पुनरावृत्ती । भजती चि ना ॥ ७६ ॥

**देही नित्यमवध्योऽयं देहे सर्वस्य भारत ।**
**तस्मात्सर्वाणि भूतानि न त्वं शोचितुमर्हसि ॥ ३० ॥**

तें सर्वत्र सर्वदेहीं । जेया करितां हीं घातु नाहीं ।
तें विश्वात्मकु तूं पाहीं । चैतन्य एक ॥ ७७ ॥
ययाचेनि चि स्वभावें । हें होत जांत आघवें ।
तरि सांगैं काइ शोचावें । एथ तुवां ॥ ७८ ॥
यऱ्हवि तऱ्हीं पार्था । तुज कां नेणों न गमे चित्ता ।
परि कीडाळ हें शोचितां । बहुतीं परीं ॥ ७९ ॥

**स्वधर्ममपि चावेक्ष्य न विकंपितुमर्हसि ।**
**धर्म्याद्धि युद्धाच्छ्रेयोऽन्यत्क्षत्रियस्य न विद्यते ॥ ३१ ॥**

तूं अझुइं कां न विचारिसि । काइ हें चिंतितु आहासि ।
स्वधर्मु तो विसरलासि । तरावें जेणें ॥ १८० ॥
एयां कौरवां भलतें जालें । अथवा तुज चि काहीं पातलें ।
कां युग चि हें बुडालें । जऱ्हैं एथ ॥ ८१ ॥
तऱ्हीं स्वधर्मु एकु आहे । तो सर्वथा त्याज्यु नव्हे ।
मग तरिजेल काइ पाहे । कृपाळुपणें ॥ ८२ ॥
अर्जुना तुझें चित्त । जऱ्हीं जालें द्रविभूत ।
तऱ्हीं हें अनुचित । संग्रामसमइं ॥ ८३ ॥
गोक्षीर जऱ्हीं जालें । तऱ्हीं पथ्यासि नाहीं बोलिलें ।
ऐसेनि हि विष नोहे सूदलें । देइजे ज्वरिं ॥ ८४ ॥
तैसें आनो आन करितां । नाशु होईल हिता ।
ह्मणौनि तूं आतां । सावधु होइं ॥ ८५ ॥
वाया चि व्याकुळ काइ । आपुला निजधर्मु तूं पाहीं ।
जो आचरितां बाधु नाहीं । कव्हणा काळीं ॥ ८६ ॥

जैसें मार्गें चि चालतां । अपावो न पवे सर्वथा ।
कां दीपाधारें वर्त्ततां । नाडळिजे ॥ ८७ ॥
तिया परीं पार्था । स्वधर्में राहटतां ।
सकल कामपूर्णता । सहजें होये ॥ ८८ ॥
ह्मणौनि तुं पाहीं । क्षत्रियां आणिक काहीं ।
संग्रामु वांचूनि नाहीं । उचित जाणें ॥ ८९ ॥
निष्कपटां होआवें । उशिना घाइ जूझावें ।
हें असो काइ सांगावें । प्रत्यक्षावरि ॥ १९० ॥

**यदृच्छया चोपपन्नं स्वर्गद्वारमपावृतम् ।**
**सुखिनः क्षत्रियाः पार्थ लभंते युद्धमीदृशम् ॥ ३२ ॥**

अर्जुना देखें जूझ आतांचें । हें हो काज दैव तुमचें ।
किं निधान सकल धर्माचें । प्रकटलें असे ॥ ९१ ॥
हा संग्रामु काइ ह्मणिपे । कीं स्वर्गु चि येणें रूपें ।
मूर्तु कां प्रतापें । उदो केला ॥ ९२ ॥
ना तरि गुणाचेनि परिकरें । आर्त्तिचेनि पडिभरें ।
हे कीर्ति चि स्वयंवरें । आली तुज ॥ ९३ ॥
क्षत्रि बहुत पुण्य कीजे । तैं जूझ ऐसें लाहिजे ।
जैसें मार्गें जातां आडळिजे । चिंतामणी ॥ ९४ ॥
ना तरि जांभैया पसरे मुख । तेथ अवचटें पडे पीयूख ।
तैसा हा संग्रामु देख । पातला असे ॥ ९५ ॥

**अथ चेत्त्वमिमं धर्म्यं संग्रामं न करिष्यसि ।**
**ततः स्वधर्मं कीर्तिंच हित्वा पापमवाप्स्यसि ॥ ३३ ॥**

आतां ऐसा अव्हेरिजे । मग नाथिलें शोचूं बैसिजे ।
तरि आपण आहाणां नेहिजे । आपणपेयां ॥ ९६ ॥
पूर्वजांचें जोडिलें । आपण चि होये धाडिलें ।
जरि आजि शस्त्र सांडिलें । रणीं इये ॥ ९७ ॥

असति कीर्ति जाइल । जग चि अभिशाप देइल ।
आणि गिवसीत पावतील । महादोष ॥ ९८ ॥
जैसी भातारेंहीन वनिता । उपहति पावे सर्वथा ।
मग तैसी दशा जीविता । स्वधर्मेंविण ॥ ९९ ॥
ना तरि अरण्यीं शव सांडिजे । तें चौंहींरि गिधिं विदारिजे ।
तैसें स्वधर्मेंहीन अभिभविजे । महादोषीं ॥ २०० ॥
ह्मणौनि हा सांडिसील । तरि पापा वरपडा होसील ।
आणि अपयश तें न वचेल । कल्पान्तुवेर्‍हीं ॥ १ ॥

**अकीर्तिं चापि भूतानि कथयिष्यंति तेऽव्ययाम् ।**
**संभावितस्य चाकीर्तिर्मरणादतिरिच्यते ॥ ३४ ॥**

जाणते न तवं चि जियावें । जवं अपकीर्ति आंग न पवे ।
आणि सांघपां कैवि निघावें । ऐथौनियां ॥ २ ॥
तूं निर्मछरु सदयता । एथ निघसी किर मागौता ।
परि तें गती समस्तां । नेए येया ॥ ३ ॥
हे चहूंकडूनि कवलितील । बाण वरि घेतील ।
एथ पार्था न सुटिजेल । कृपालुपणें ॥ ४ ॥
ऐसेन हीं प्राणसंकटें । जरि विपायें निगणें घटे ।
तरि तें जियालें हीं उफराटें । मरणाहूनि ॥ ५ ॥

**भयाद्रणादुपरतं मंस्यंते त्वां महारथाः ।**
**येषां च त्वं बहुमतो भूत्वा यास्यसि लाघवम् ॥ ३५ ॥**

तूं आणिक एक न विचारिसि । एथ संभ्रमें जूझों आलासि ।
आणि सकणवपणें निघालासि । मागौता जरि ॥ ६ ॥
तरि तूझें तें अर्जुना । एयां वैरियां दुर्जनां ।
कां प्रत्यया येईल मना । सांघें मज ॥ ७ ॥
हे ह्मणती गेला रे गेला । अर्जुनु आह्मांसि भियाला ।
हा सांघें बोलु उरला । नीका काइ ॥ ८ ॥

लोक सायासें करूनि बहुतें । कां वेचीति आपुलिं जीवितें ।
परि वाढवीति कीर्तितें । धनुर्धरा ॥ ९ ॥
ते तुज अनायासें । अनकळीत जोडली असे ।
हें अद्वितीय जैसें । गगन होये ॥ २१० ॥
तैसी कीर्ति निःसीम । तूझां ठाइं निरूपम ।
तूझे गुण उत्तम । तिहिं लोकिं ॥ ११ ॥
दिगंतींचे भूपति । भाट होउनि वाखाणिति ।
जे आयकिलेया दचकति । कृतांतादिक ॥ १२ ॥
ऐसी महिमा घणवट । गंगा तैसी चोखट ।
जिया देखी जगीं सुभट । जाणते जाले ॥ १३ ॥
तें पौरुष तूझें अद्भुत । आइकोनिया हे समस्त ।
जाले आथि विरक्त । जीवितेंसीं ॥ १४ ॥
जैसे सिंहाचिया हाका । युगांत होये मदमुखा ।
तैसा कौरवां एयां अशेषां । धाकु तूझा ॥ १५ ॥
जैसें पर्वत वज्रातें । ना नरि सर्प गरुडातें ।
तैसे अर्जुना हे तूतें । मानिति सदा ॥ १६ ॥
तें अगाधपण जाइल । मग हीणाउ आंगा येईल ।
जरि माघौता निघसील । न झुझतू चि ॥ १७ ॥

**अवाच्यवादांश्च बहून्वदिष्यंति तवाहिताः ।**
**निंदंतस्तव सामर्थ्यं ततो दुःखतरं नु किम् ॥ ३६ ॥**

आणि हे पळतां पळों नेदिति । धरूनि अवकळा करीति ।
न गणीत कुटि बोलति । आइकतां तुज ॥ १८ ॥
मग ते व्हालि हियें फुटावें । तें आतां लाठपणें का न झुझावें ।
हे जींतले तरि भोगावें । पृथ्वीतळ ॥ १९ ॥

**हतो वा प्राप्स्यसि स्वर्गं जित्वा वा भोक्ष्यसे महीम् ।**
**तस्मादुत्तिष्ठ कौंतेय युद्धाय कृतनिश्चयः ॥ ३७ ॥**

ना तरि रणीं एथ । जूझतां वेचलें जीवीत ।
तरि स्वर्गसुख अनकलित । पावसील ॥ २२० ॥
ह्मणौनि इये गोठी । विचारु न कीजे किरीटी ।
आतां धनुष्य घेउनि उठीं । जूझें वेगां ॥ २१ ॥

**सुखदुःखे समे कृत्वा लाभालाभौ जयाजयौ ।**
**ततो युद्धाय युज्यस्व नैवं पापमवाप्स्यसि ॥ ३८ ॥**

देखें स्वधर्मु आचरतां । दोषु नाशे असता ।
तुज हे भ्रांति कवणि चित्ता । एथ पातकाची ॥ २२ ॥
सांघें प्लवें चि काइ बुडिजे । किं मार्गे जांतां आडळिजे ।
परि विपायें चालों नेणिजे । तरि तें हीं घडे ॥ २३ ॥
अमृतें चि मरिजे । जरि विषेंसिं सेविजे ।
तसा स्वधर्में दोषु पाविजे । हेतुकपणें ॥ २४ ॥
ह्मणौनि तुज पार्था । हेतु सांडूनि सर्वथा ।
क्षात्रवृत्ती जूझतां । पाप नाहीं ॥ २५ ॥
सुखिं संतोषा नयावें । दुःखिं विषादा न भजावें ।
आणि लाभालाभ न धरावे । मनामाझि ॥ २६ ॥
एथ विजयपण होईल । कां सर्वथा देह जाईल ।
हें आदिं चि काहिं पुढें । चिंतावें ना ॥ २७ ॥
आपण येंया उचिता । स्वधर्मातें चि राहटतां ।
जें पावे तें निवांता । साउनि जावें ॥ २८ ॥
ऐसेया मनें होआवें । तरि दोषु न घडे स्वभावें ।
ह्मणौनि आतां जूझावें । निभ्रांत तुवां ॥ २९ ॥

**एषा तेऽभिहिता सांख्ये बुद्धिर्योगे त्विमां शृणु ।**
**बुद्ध्या युक्तो यया पार्थ कर्मबंधं प्रहास्यसि ॥ ३९ ॥**

हे सांख्यस्थिति मुकुळित । सांगितली तुज येथ ।
आतां बुद्धि योगिं विस्तृत । अवधारिं पां ॥ २३० ॥

जिया बुद्धि युक्तां । जालेयां पार्था ।
कर्मबंधु सर्वथा । बाधुं न पवे ॥ ३१ ॥

**नेहाभिक्रमनाशोऽस्ति प्रत्यवायो न विद्यते ।**
**स्वल्पमप्यस्य धर्मस्य त्रायते महतो भयात् ॥ ४० ॥**

जैसें वज्रकवच लेइजे । मग शस्त्राचा वरिषाउ साहिजे ।
परि जैतेंसि उरिजे । अचुंबितां ॥ ३२ ॥
तैसें इहिक तरि न नशे । आणि मोक्षु तो उरला असे ।
जेथ पूर्वानुक्रम दीसे । चोखाळत ॥ ३३ ॥
कर्माधारें तरि राहाटिजे । परि कर्मफळ न भोगिजे ।
जैसा मांत्रज्ञु न बाधिजे । भूतबाधा ॥ ३४ ॥
तिया परीं जे बुद्धि । आपु जालेयां निरवधी ।
हा असता चि उपाधि । कळूं न शके ॥ ३५ ॥
जेथ न संचरे पाप । जें सूक्ष्म अति निष्कंप ।
गुणत्रयादि लेप । जेथ नाहीं ॥ ३६ ॥
अर्जुना जें पुण्यवशें । जरि अल्प चि हृदइं प्रकाशे ।
तरि अशेष हें नाशे । संसारभय ॥ ३७ ॥

**व्यवसायात्मिका बुद्धिरेकेह कुरुनंदन ।**
**बहुशाखा ह्यनंताश्च बुद्धयोऽव्यवसायिनाम् ॥ ४१ ॥**

जैसी दीपकळिका धाकुटी । परि बहुता तेजातें प्रकटी ।
तसी सद्बुद्धि हे थेंकुटी । ह्मणों नये ॥ ३८ ॥
पार्था बहुतीं परीं । अपेक्षिजे सदा मुरीं ।
जे दुर्लभ चराचरीं । सद्वासना ॥ ३९ ॥
जैसा न जोडे परिसु । आणिकासारिखा बहुवसु ।
कां अमृताचा लेसु । देवें पाविजे ॥ २४० ॥
तसी दुर्लभ हे बुद्धि । जिये परमात्मा चि अवधि ।
जैसा गंगेसि कां उदधि । निरंतर ॥ ४१ ॥

तैसा ईश्वरु वांचूनि काहीं । जिये आणिकि लाणि नाहिं ।
तेथ एकी चि बुद्धि पाहीं । अर्जुना जगीं ॥ ४२ ॥

**यामिमां पुष्पितां वाचं प्रवदन्त्यविपश्चितः ।**
**वेदवादरताः पार्थ नान्यदस्तीति वादिनः ॥ ४२ ॥**

एरि ते दुर्मति । जे बहुधा असे विकरति ।
जेथ निरंतर रमति । अविवेकिये ॥ ४३ ॥
ह्मणौनि तेयां पार्था । स्वर्गसंसारीं आस्था ।
आत्मसुख सर्वथा । दृष्ट नाहीं ॥ ४४ ॥
वेदाधारें बोलति । केवल कर्म प्रतिष्टिति ।
परि कर्मफलीं आसक्ति । दाउनियां ॥ ४५ ॥

**कामात्मानः स्वर्गपरा जन्मकर्मफलप्रदाम् ।**
**क्रियाविशेषबहुलां भोगैश्वर्यगतिं प्रति ॥ ४३ ॥**

ह्मणति संसारीं जन्मिजे । यज्ञादि यजन कीजे ।
मग स्वर्गसुख भोगिजे । मनोहर ॥ ४६ ॥
एथ हें वांचूनि काहीं । आणिक सर्वथा सुलभ नाहीं ।
ऐसें अर्जुना बोलति पाहीं । दुर्बुद्धि ते ॥ ४७ ॥
देखैं मना अभिभूत । होउनि कर्म आचरत ।
केवल भोगीं चित्त । देउनिया ॥ ४८ ॥
क्रियाविशेषें बहुतें । न लोपीति विधितें ।
निपुण होउनि धर्मातें । अनुष्टिति ॥ ४९ ॥
परि एक चि कूड करीति । जे स्वर्गकामु मनीं धरिति ।
यज्ञपुरुष चूकति । भोक्ता जो ॥ २५० ॥
जैसा कापुराचा राशि कीजे । मग अग्नि लाउनि जालिजे ।
कां मिष्टान्नीं संचरिजे । कालकूट ॥ ५१ ॥
देखैं अमृतकुंभु जोडला । तो पायें ह्मणौनि उलंडिला ।
तैसा नाशीति धर्मु निफनला । हेतुकपणें ॥ ५२ ॥

**भोगैश्वर्यप्रसक्तानां तयापहृतचेतसाम् ।**
**व्यवसायात्मिका बुद्धिः समाधौ न विधीयते ॥ ४४ ॥**

सायासें पुण्य आर्जिजे । मग संसारु कां अपेक्षिजे ।
परि नेणति ते काइ कीजे । अप्राप्त देखें ॥ ५३ ॥
जैसी रांधवणि रसोय नीकी । करूनियां मोले वीकी ।
तैसा भोगासाठीं अविवेकी । धाडिति धर्मु ॥ ५४ ॥
ह्मणौनि हे पार्था । दुर्बुद्धि देख सर्वथा ।
तेयां वेदवादरतां । मनीं वसे ॥ ५५ ॥

**त्रैगुण्यविषया वेदा निस्त्रैगुण्यो भवार्जुन ।**
**निर्द्वंद्वो नित्यसत्वस्थो निर्योगक्षेम आत्मवान् ॥ ४५ ॥**

तिहिं गुणीं आवृत । हे वेद जाणें निभ्रांत ।
ह्मणौनि उपनिषदादि समस्त । सात्विक ते ॥ ५६ ॥
एर रजतमात्मक । जेथ निरूपिजे कर्मादिक ।
जें केवळ स्वर्गसूचक । धनुर्द्धरा ॥ ५७ ॥
ह्मणौनि तूं हें जाण । हें सुखदुःखासी चि कारण ।
एथ झनें अंतष्करण । रिगों देंसि ॥ ५८ ॥
तूं गुणत्रयातें अव्हेरीं । मीं माझें हें न करीं ।
एक आत्मसुख आंतरीं । विसंभ ना ॥ ५९ ॥

**यावानर्थ उदपाने सर्वतः संप्लुतोदके ।**
**तावान् सर्वेषु वेदेषु ब्राह्मणस्य विजानतः ॥ ४६ ॥**

जऱ्हीं वेदें बहुत बोलिलें । विविध भेद सूचिले ।
तऱ्हीं आपण हित आपुलें । तें चि घेपे ॥ २६० ॥
जैसें प्रकटलेयां गभस्ती । अशेष ही मार्ग दीसति ।
तरि तेतुके ही काइ चालिजति । सांगैं मज ॥ ६१ ॥
कां उदकमय सकळ । जऱ्हीं जालें असे महीतळ ।
तऱ्हीं आपण घेपे केवळ । आर्त्ति चि जोगें ॥ ६२ ॥

तैसें ज्ञानिये जे होंति । ते वेदार्थातें विचारिति ।
मग अपेक्षीत स्वीकरीति । ससार जें ॥ ६३ ॥

**कर्मण्येवाधिकारस्ते मा फलेषु कदाचन ।**
**मा कर्मफलहेतुर्भूर्मा ते संगोऽस्त्वकर्मणि ॥ ४७ ॥**

ह्मणौनि आईकें पार्था । इया चि परीं पल्हातां ।
तुज उचित होये आतां । स्वकर्म हें ॥ ६४ ॥
आह्मीं समस्त ही विचारिलें । तंव ऐसें चि हें मना आलें ।
जें न संडिजे तुआं आपुलें । विहित कर्म ॥ ६५ ॥
परि कर्मफळीं आश न करावी । आणि कुकर्मी संगति न व्हावी ।
हे सत्क्रिया चि आचरावी । हेतूविण ॥ ६६ ॥

**योगस्थः कुरुकर्माणि संगं त्यक्त्वा धनंजय ।**
**सिद्ध्यसिद्ध्योः समो भूत्वा समत्वं योग उच्यते ॥४८॥**

तूं योगयुक्त होउनि । फळाचा संगु सांडुनि ।
मग अर्जुना चित्त देउनि । करि कर्मे ॥ ६७ ॥
परि आदरिलें कर्म दैवें । जऱ्हीं समाप्तितें न पवे ।
तऱ्हीं विशेषें तेथ न तोपावें । हें इं नको ॥ ६८ ॥
कां निमित्तें कारणें एकें । तें सिद्धी न वचत ठाके ।
तऱ्हीं तेथिंचेनि अपरितोषें । क्षोभावें ना ॥ ६९ ॥
आचरतां सिद्धी गेलें । तरि काजा चि कीर आलें ।
परि ठेलेया हीं सगुण जालें । ऐसें चि मानीं ॥ २७० ॥
देखें जेतुलालें कर्म निफजे । तेतुलालें आदिपुरुषीं जरि अर्पिजे ।
तरि परिपूर्ण तें साहाजें । जालें जाणें ॥ ७१ ॥
आगा संतासंतीं कर्मीं । जें सरिसेपण मनोधर्मीं ।
हे चि योगस्थिति उत्तमीं । प्रसंसिजे ॥ ७२ ॥

**दूरेण ह्यवरं कर्म बुद्धियोगाद्धनंजय ।**
**बुद्धौ शरणमन्विच्छ कृपणाः फलहेतवः ॥ ४९ ॥**

अर्जुना समत्व चित्ताचें । तें चि सार जाण योगाचें ।
जेथ मना आणि बुद्धिचें । ऐक्य आथि ॥ ७३ ॥

**बुद्धियुक्तो जहातीह उभे सुकृतदुष्कृते ।**
**तस्माद्योगाय युज्यस्व योगः कर्मसु कौशलं ॥ ५० ॥**

तो बुद्धियोगु विवरितां । बहुवें पाडें पार्था ।
दीसे हा आरौता । कर्मभागु ॥ ७४ ॥
परि तें चि कर्म आचरिजे । तरी चि हा योगु पाविजे ।
जें कर्मशेष साहाजें । योगस्थिति ॥ ७५ ॥
ह्मणौनि बुद्धियोगु सधरु । तेथ अर्जुना होइं थीरु ।
मनें करीं अव्हेरु । फलें हेतुचा ॥ ७६ ॥

**कर्मजं बुद्धियुक्ता हि फलं त्यक्त्वा मनीषिणः ।**
**जन्मबंधविनिर्मुक्ताः पदं गच्छंत्यनामयं ॥ ५१ ॥**

ह्मणौनि जे बुद्धियोगें ओजले । ते चि पारंगत जाले ।
एहीं उभयबंधीं सांडिलें । पापपुण्यीं ॥ ७७ ॥
ते कर्मी तरि वर्तति । परि कर्मबंधा नाकलति ।
आणि यातायात लोपति । अर्जुना तेयां ॥ ७८ ॥
मग निरामयभरित । पावति पद अच्युत ।
ते बुद्धियोगयुक्त । धनुर्द्धरा ॥ ७९ ॥

**यदा ते मोहकलिलं बुद्धिर्व्यतितरिष्यति ।**
**तदा गंतासि निर्वेदं श्रोतव्यस्य श्रुतस्यच ॥ ५२ ॥**

तूं ऐसा तैं होसी । जैं मोहाते येया सांडिसी ।
आणि वैराग्य मानसीं । संचरैल ॥ २८० ॥
मग निष्कलंक गहन । उपजैल देखैं ज्ञान ।
तेणें निचाड होईल मन । आपैसें तूझें ॥ ८१ ॥
तेथ आणिक काहीं जाणावें । कां मागिलातें स्मरावें ।
हें अर्जुना आघवें । पारुखैल ॥ ८२ ॥

**श्रुतिविप्रतिपन्ना ते यदा स्थास्यति निश्चला ।**
**समाधावचला बुद्धिस्तदा योगमवाप्स्यसि ॥ ५३ ॥**

इंद्रियांचिया संगती । जो प्रसरु होंतुसे मती ।
ते स्थिर होईल मावोती । आत्मरूपीं ॥ ८३ ॥
समाधिसुखीं केवळ । जें बुद्धि होईल निश्चळ ।
तें पावसी तूं सकळ । योगस्थिति ॥ ८४ ॥

## अर्जुन उवाच ॥

**स्थितप्रज्ञस्य का भाषा समाधिस्थस्य केशव ।**
**स्थितधीः किम्प्रभाषेत किमासीत व्रजेत किम् ॥ ५४ ॥**

तेथ अर्जुनु ह्मणे देवा । हा चि अभिप्राउ आघवा ।
मी पूसेन आतां सांघावा । कृपानिधि ॥ ८५ ॥
मग अच्युतु ह्मणे सुखें । जें किरीटी तुज नीकें ।
तें पूस पां उन्मेखें । मनाचेनि ॥ ८६ ॥
एयां बोला पार्थें । ह्मणितलें सांघा कृष्णातें ।
काइ ह्मणिजे स्थितप्रज्ञातें । उ‍ळखों केवि ॥ ८७ ॥
आणि स्थिरबुद्धि ह्मणिजे । तो कैसां चिन्हिं जाणिजे ।
जो समाधिसुख भुंजे । अखंडितु ॥ ८८ ॥
तो कवणी स्थिती असे । कैसेनि रूपीं विलसे ।
देवा सांघावें हें ऐसें । लक्ष्मीपती ॥ ८९ ॥

## श्रीभगवानुवाच ॥

**प्रजहाति यदा कामान्सर्वान्पार्थ मनोगतान् ।**
**आत्मन्येवात्मना तुष्टः स्थितप्रज्ञस्तदोच्यते ॥ ५५ ॥**

तवं परब्रह्मअवतरणु । षड्गुणाधिकरणु ।
तो काइ तेथ नारायणु । बोलत असे ॥ २९० ॥
ह्मणे अर्जुना तरि परियसें । हा अभिलाषु प्रौढु मानसीं ।
जो अंतराउ स्वसुखेंसीं । करीत असे ॥ ९१ ॥

सर्वदा नित्यतृप्त । तें तरि अंतष्करण भरित ।
परि विषयांमाझि पतीत । जेणें संगें कांजे ॥ ९२ ॥
तो कामु सर्वथा जाये । आत्मतोषीं मनें राहे ।
तो चि स्थितप्रज्ञ होये । पुरुषु जाणें ॥ ९३ ॥

**दुःखेष्वनुद्विग्नमनाः सुखेषु विगतस्पृहः ।**
**वीतरागभयक्रोधःस्थितधीर्मुनिरुच्यते ॥ ५६ ॥**

नाना दुःखीं प्राप्तीं । जेया उद्वेगु नाहिं चित्तिं ।
आणि सुखाचिया आर्त्ती । अडचिजेना ॥ ९४ ॥
अर्जुनां तयांचां ठांइं । कामक्रोध साहाजें नाहिं ।
आणि भयातें नेणें कहीं । परिपूर्णु तो ॥ ९५ ॥
ऐसा जो निरवधी । तो जाण पां स्थिरबुद्धि ।
तो मुनि उपाधि- । भेदहीनु ॥ ९६ ॥

**यः सर्वत्रानभिस्नेहस्तत्तत्प्राप्य शुभाशुभम् ।**
**नाभिनंदति न द्वेष्टि तस्य प्रज्ञा प्रतिष्ठिता ॥ ५७ ॥**

जो सर्वत्र सदा सरिसा । परिपूर्णु कां चंद्रु जैसा ।
अधमोत्तमप्रकाशा । माझि न ह्मणे ॥ ९७ ॥
ऐसी अविछिन्न समता । भूतमात्रीं सदयता ।
आणि पालटु नाहीं चित्ता । कव्हणी काळीं ॥ ९८ ॥
गोमटें काहिं पावे । तरि संतोषें तेणें नाभिभवे ।
जो अव्खटेनि नांगवे । विषादासि ॥ ९९ ॥
ऐसा हर्षशोकरहितु । जो आत्मबोधें भरितु ।
तो जाण पां प्रज्ञायुक्तु । धनुर्द्धरा ॥ ३०० ॥

**यदा संहरते चायं कूर्मोंगानीव सर्वशः ।**
**इंद्रियाणींद्रियार्थेभ्यस्तस्य प्रज्ञा प्रतिष्ठिता ॥ ५८ ॥**

आतां अर्जुना आणिक हि एक । सांघेन आइकें कवतीक ।
जें विषयांतें साधक । त्यजीति नियमें ॥ १ ॥

देखें कूर्माचिया परी । उवाइला अवयव पसरी ।
ना तरि इच्छावसें आवरी । आपणपां चि ॥ २ ॥
तैसिं इंद्रियें आपैतीं होंति । जेयाचें ह्मणियें कारिति ।
तेयाची प्रज्ञा जाणें स्थिति । पातली असे ॥ ३ ॥

**विषया विनिवर्त्तंते निराहारस्य देहिनः ।**
**रसवर्ज्जं रसोप्यस्य परं दृष्ट्वा निवर्त्तते ॥ ५९ ॥**

श्रोत्रादि इंद्रियें धरिति । परि रसनेसि नियमु न करीति ।
तेथ सहस्रधा कवळिजति । विषइं इहीं ॥ ४ ॥
जैसी वरिवरि पाळवी खुडिजे । आणि मूळीं उदक घाळिजे ।
तरि कैसेनि नाशु निफजे । वृक्षा तेया ॥ ५ ॥
तो उदकाचेन बळें अधिकें । जैसा आडवेन आंगें फांके ।
तैसा मानसीं विषो पोखे । रसद्वारें ॥ ६ ॥
एरा इंद्रियां विखो तुटे । तैसा नियमू नैये रसु हटें ।
जें जीवित हें न वटे । एणेंविण ॥ ७ ॥
मग अर्जुना स्वभावें । हा ही नियमातें पावे ।
जें परब्रह्म अनुभवें । होउनि जाइजे ॥ ८ ॥
तैं शरीरभाव नाशति । इंद्रियें विषय विसरती ।
जैं सोहंभावप्रतीती । प्रकट होये ॥ ९ ॥
यऱ्हवि तऱ्हें अर्ज्जुना । हें आया नैये साधना ।
जे राहटताति जतना । निरंतर ॥ ३१० ॥

**यततोह्यपि कौंतेय पुरुषस्य विपश्चितः ।**
**इंद्रियाणि प्रमाथीनि हरंति प्रसभं मनः ॥ ६० ॥**

जे हाते अभ्यासाची धरटी । यमनियमाची ताटी ।
जे मनातें यया मुठी । धरुनि असति ॥ ११ ॥
तेही कीजति कासाविसी । एया इंद्रियांची प्रौढि ऐसी ।
जैसी मंत्रज्ञातें विवंसी । भूळवी कां ॥ १२ ॥

देखें विषय हे तैसे । पावति ऋद्धिचेनि मीसें ।
मग आकळिति स्पर्शें । इंद्रियांचेन ॥ १३ ॥
तिये संधीं मन जाये । मग अभ्यासीं ठोंठावला ठाये ।
ऐसें बळिकटपण आहे । इंद्रियांचें ॥ १४ ॥

**तानि सर्वाणि संयम्य युक्त आसीत मत्परः ।**
**वशे हि यस्येंद्रियाणि तस्य प्रज्ञा प्रतिष्ठिता ॥ ६१ ॥**

ह्मणौनि आइकें पार्था । एयातें निर्दळी जो सर्वथा ।
सर्व विषइं आस्था । सांडूनियां ॥ १५ ॥
तो चि तूं जाण । योगनिष्ठेसि कारण ।
जेयाचें विषयें सुखें अंतष्करण । झांकवे चि ना ॥ १६ ॥
तो आत्मबोधयुक्तु । होउनि असे संततु ।
जो मातें हृदया आंतु । विसंभे ना ॥ १७ ॥
यऱ्हवि बाह्यें विषय तरि नाहीं । परि मानसीं होईल जरि काहीं ।
तरि साद्यंतू चि हा पाहीं । संसारु असे ॥ १८ ॥
जैसा कां विषाचा लेसु । घेतलेया होये बहुवसु ।
मग निभ्रांतु करी नाशु । जीवितासि ॥ १९ ॥
तैसी एयां विषयांची शंका । मनीं वाहाती देखां ।
घातु करी अशेषां । विवेकजातां ॥ २२० ॥

**ध्यायतो विषयान्पुंसः संगस्तेषूपजायते ।**
**संगात्संजायते कामः कामात्क्रोधोभिजायते ॥ ६२ ॥**

जरि हृदइं विषयस्मृति । तरि निःसंगा ही आपजे संगति ।
संगीं प्रकटे मूर्त्ति । अभिलाषाची ॥ २१ ॥
जेथ कामु उपनला । तेथ क्रोधु आदिं चि आला ।
क्रोधीं असे ठेवला । संमोहो जाणें ॥ २२ ॥

**क्रोधाद्भवति संमोहः संमोहात्स्मृतिविभ्रमः ।**
**स्मृतिभ्रंशाद्बुद्धिनाशो बुद्धिनाशात्प्रणश्यति ॥ ६३ ॥**

संमोहा जाली व्यक्ति । तरि नाशु पावे स्मृती ।
चंड वातें ज्योति । आहत जैसी ॥ २३ ॥
मग अज्ञानांध केवळ । तेणें आप्लविजे सकळ ।
तेथ बुद्धि होये व्याकुळ । हृदयामाझि ॥ २४ ॥
कां अस्तमानीं निशि । जैसी सूर्यतेजातें ग्रसी ।
तैसी दशा स्मृतिभ्रंशीं । प्राणियांसि ॥ २५ ॥
जैसी जात्यंधा पळणि पावे । मग तें काकुळती सैरा धांवे ।
तैसे बुद्धीसि होंति भवे । धनुर्द्धरा ॥ २६ ॥
ऐसा स्मृतिभ्रंशु घडे । मग सर्वथा बुद्धि अवघडे ।
तेथ समूळ हें उपडे । ज्ञानजात ॥ २७ ॥
चैतन्याचां भ्रंशीं । शरीरा दशा जैसी ।
तैसें पुरुषा बुद्धिनाशीं । होये देखें ॥ २८ ॥
ह्मणौनि आइकें अर्जुना । जैसा विस्फुलिंगु लागे इंधना ।
मग तो प्रौढ जाला त्रिभुवना । पुरों शके ॥ २९ ॥
तैसें विषयांचें ध्यान । जरि विपायें वाहे मन ।
तरि एसणें हें पतन । गिवसीत पावें ॥ २३० ॥

**रागद्वेषवियुक्तैस्तु विषयानिंद्रियैश्चरन् ।**
**आत्मवश्यैर्विधेयात्मा प्रसादमधिगच्छति ॥ ६४ ॥**

ह्मणौनि विषय आघवे । सर्वथा मनौनि सांडावे ।
मग रागद्वेष स्वभावें । नाशती ॥ ३१ ॥
पार्था आणिक ही एक । जरि नाशले हे रागद्वेष ।
तरि इंद्रियां विषइं बाधक । रमतां नाहीं ॥ ३२ ॥
जैसा सूर्यु आकाशगतु । रश्मिकरीं जगातें स्पर्शतु ।
तरि संगदोषें काइ लिंपतु । तेथिचेनि ॥ ३३ ॥
तैसा इंद्रियार्थी उदासीनु । आत्मरसें चि निर्भिन्नु ।
जो कामक्रोधविहीनु । होउनि असे ॥ ३४ ॥

तेया विधि आणिक काहीं । एक आपणपें वांचूनि नाहीं ।
तरि विषय कवण काइ । बाधिति तेया ॥ ३५ ॥
जरि उदकें उदकीं बुडीजे । कां अग्नी आगि पोळिजे ।
तरि विषयसंगीं आकळिजे । परिपूर्णु तो ॥ ३६ ॥
ऐसा आपण चि केवळ । होउनि असे निश्चळ ।
तेयाची प्रज्ञा अचळ । निभ्रांत मानीं ॥ ३७ ॥

**प्रसादे सर्वदुःखानां हानिरस्योपजायते ।**
**प्रसन्नचेतसोह्याशु बुद्धिःपर्यवतिष्ठते ॥ ६४ ॥**

देखैं अखंडित प्रसन्नता । आथि जेथ चित्ता ।
तेथ रिगणें नाहीं समस्तां । संसारदुःखां ॥ ३८ ॥
जैसा अमृताचा निर्झरु । प्रसवे जेयाचा जठरु ।
तेया क्षुधेतृषेचा अडदरु । कहिं चि नाहिं ॥ ३९ ॥
तैसें हृदय प्रसन्न होये । तरि दुःख कैंचें कें आहे ।
तेथ आपैसी बुद्धि राहे । परमात्मरूपीं ॥ ४० ॥
जैसा निर्वातिचा दीपु । सर्वथा नेणे कंपु ।
तैसा स्थिरबुद्धि स्वस्वरूपु । योगयुक्ती ॥ ४१ ॥

**नास्ति बुद्धिरयुक्तस्य न चायुक्तस्य भावना ।**
**न चाभावयतः शांतिरशांतस्य कुतः सुखम् ॥ ६६ ॥**

इये युक्तिची कडसणी । नाहिं जेयाचां अंतष्करणीं ।
तो आकळिला जाण गुणीं । विषयादिकिं ॥ ४२ ॥
तेया स्थिर बुद्धि पार्था । कहिं चि नाहिं सर्वथा ।
आणि स्थैर्याची आस्था । ते ही नुपजे ॥ ४३ ॥
निश्चळत्वाची भावना । जरि नव्हे चि देखैं मना ॥
तरि शांति केवि अर्ज्जुना । आपु होये ॥ ४४ ॥
आणि जेथ शांतिचा जीवाला नाहीं । तेथ सुख न रिगे चि कहीं ।
जैसा पापियांचां ठांइं । मोक्षु न वसे ॥ ४५ ॥

देखैं अग्नीमाझि घापति । तियें बीजें जरि विरुढति ।
तरि अशांता सुखप्राप्ति । घडों शके ॥ ४६ ॥

**इंद्रियाणां हि चरतां यन्मनोनुविधीयते ।**
**तदस्य हरति प्रज्ञां वायुर्नावमिवांभसि ॥ ६७ ॥**

ह्मणौनि अयुक्तपण मनाचें । तें चि सर्वस्व दुःखाचें ।
एया कारणें इंद्रियांचें । दमन नीकें ॥ ४७ ॥
इयें इंद्रियें जें जें ह्मणति । तें तें चि जे पुरुष करिति ।
ते तरले चि न तरति । विषयसिंधु ॥ ४८ ॥
जैसी नाव थडी टाकितां । वरिपडी होये दुर्वाता ।
तरि चूकला ही माघौता । अपाऊ पावे ॥ ३४९ ॥
तैसीं प्राप्तें हीं पुरुषें । इंद्रियें लालिलिं कवतिकें ।
तरि आक्रमिला देख दुःखें । संसारिकें ॥ ३५० ॥

**तस्माद्यस्य महाबाहो निगृहीतानि सर्वशः ।**
**इंद्रियाणींद्रियार्थेभ्यस्तस्य प्रज्ञा प्रतिष्ठिता ॥ ६८ ॥**

ह्मणौनि आपुलीं आपणपेया । जरि इंद्रियें येंति आया ।
तरि आणिक ही काहीं धनंजया । सार्थक असे ॥ ५१ ॥
ऐसीं इंद्रियें आपैतीं होंति । जेयाचें ह्मणितलें ह्मणियें करिति ।
तेयाची प्रज्ञा जाणैं स्थिती । पातली असे ॥ ५२ ॥

**या निशा सर्वभूतानां तस्यां जागर्त्ति संयमी ।**
**यस्यां जाग्रति भूतानि सा निशा पश्यतो मुनेः ॥ ६९ ॥**

आतां आणिक ही एक गहन । पूर्णाचें चिन्ह ।
अर्ज्जुना तुज सांघैन । परियस पां ॥ ५३ ॥
देखैं भूतजात निदेलें । जेथ तें चि जेया पाहालें ।
आणि जीव जेथ चेइले । तेथ निद्रितु जो ॥ ५४ ॥
तो चि तो निरुपाधि । अर्ज्जुना स्थिरबुद्धि ।
तो चि जाणैं निरवधि । मुनीश्वरु ॥ ५५ ॥

**आपूर्यमाणमचलप्रतिष्ठं समुद्रमापः प्रविशंति यद्वत् ।**
**तद्वत्कामा यं प्रविशंति सर्वे स शांतिमाप्नोति न कामकामी ॥७०॥**

पार्थ आणिकि ही परीं । तो जाणों ये अवधारीं ।
जैसी अक्षोभता सागरीं । अखंडीत ॥ ५६ ॥
जन्हीं सरिता ओघ समस्त । परिपूर्ण होउनि मिळत ।
तन्हीं अधिकु नव्हे इपत् । मर्यादा न संडी ॥ ५७ ॥
ना तरि ग्रीष्मकाळीं सरिता । शोषोनि जांति सर्वथा ।
परि न्यून नव्हे पार्था । समुद्र जैसा ॥ ५८ ॥
तैसा प्राप्ति ऋद्धिसिद्धिं । तेया क्षोभु नाहीं बुद्धी ।
आणि न पवतां न वाधी । अधृति तेयातें ॥ ५९ ॥
काइ सूर्याचां घरीं । प्रकाशु वातिवेन्हीं ।
किं न लविजे चि तरि आंधारीं । कोंडैल तो ॥ ३६० ॥
देखैं रिद्धी चि तेया परीं । आली गेली से न करी ।
तो विगुंतला असे आंतरीं । महासुखें ॥ ६१ ॥
जो आपुलेनि नागरपणें । इंद्रभवना पाबलें ह्मणे ।
तो रंजे केवि पालिवणें । भिल्लांचेनि ॥ ६२ ॥
जो अमृतासि ठी ठेवी । तो कांजी जैसा न सेवी ।
तैसा स्वसुखानुभवीं । न भोगी रुद्धी ॥ ६३ ॥
पार्था हें नवल पाहीं । जेथ स्वर्गसुख लेखणिये नाहीं ।
तेथ रिद्धिसिद्धी इया काइ । प्राकृता होंति ॥ ६४ ॥

**विहाय कामान्यः सर्वान्पुमांश्चरति निस्पृहः ।**
**निर्ममो निरहंकारः स शांतिमधिगच्छति ॥ ७१ ॥**

ऐसा आत्मबोधें तोषला । जो परमानंदें पोखला ।
तो चि स्थिरप्रज्ञु भला । वोळख तूं ॥ ६६ ॥
तो अहंकारातें जिणौनि । सकळ कामना सांडूनि ।
विचरे विश्व होउनि । विश्वामाझि ॥ ६६ ॥

एषा ब्राह्मी स्थितिः पार्थ नैनां प्राप्य विमुह्यति ।
स्थित्वास्यामंतकालेपि ब्रह्मनिर्वाणमृच्छति ॥ ७२ ॥

हे ब्रह्मस्थिति निःसीम । जे अनुभवितां निष्काम ।
पातले परब्रह्म । अनायासें ॥ ६७ ॥
चिद्रूपिं मिळतां । देहांतिची व्याकुळता ।
आड ठाको न शके चित्ता । आज्ञा जिया ॥ ६८ ॥
ते चि हे स्थिति । स्वमुखें श्रीपति ।
सांघतसे अर्ज्जुनाप्रति । संजयो ह्मणे ॥
ऐसें कृष्णवाक्य आइकिलें । तेथ अर्ज्जुनें मनीं ह्मणितलें ।
आतां आमचेया चि काना आलें । उपपत्ती इया ॥ ३७० ॥
जें कर्मजात आघवें । एथ निराकरिलें देवें ।
तरि पाउखलें मियां जूझावें । ह्मणौनिया ॥ ७१ ॥
ऐसा अच्युताचेया बोला । चित्ति धनुर्द्धरु उवाइला ।
आतां प्रश्नु करील भला । शंकुनिया ॥ ७२ ॥
तो प्रसंगु असे नागरु । जो सकळ धर्मासि आगरु ।
किं विवेकामृतसागरु । प्रांतहीनु ॥ ७३ ॥
जो आपण सर्वज्ञ नाथु । निरूपिता होइल अनंतु ।
ते ज्ञानदेउ सांघेल मातु । निवृत्तिदासु ॥ ३७४ ॥

ॐ तत्सदिति श्रीमद्भगवद्गीतासूपनिषत्सु ब्रह्मविद्यायां योगशास्त्रे
श्रीकृष्णार्जुनसंवादे सांख्ययोगो नाम द्वितीयोध्यायः ॥

॥ श्रीकृष्णार्पणमस्तु ॥

# ज्ञानेश्वरी

## अध्याय तिसरा

**अर्जुन उवाच ॥**

**ज्यायसी चेत्कर्मणस्ते मता बुद्धिर्जनार्दन ।**
**तत्किं कर्मणि घोरे मां नियोजयसि केशव ॥ १ ॥**

मग अर्जुनें ह्मणितलें । देवा तुह्मीं वाक्य बोलिलें ।
तें मियां परिसिलें । कमळापती ॥ १ ॥
तेथ कर्म आणि कर्ता । उरे चि ना पहातां ।
ऐसें मत तूझें अनंता । निश्चित जरि ॥ २ ॥
तरि मातें केवि हरी । ह्मणसि संग्रामु करीं ।
इये लाजसि ना घोरीं । कर्मीं सूतां ॥ ३ ॥
हां गा तूं चि कर्म अशेष । निराकरिसि निःशेष ।
आणि मजकरवीं हिंसक । करवीसि कां ॥ ४ ॥
तरि हें विचारीं हृषीकेशा । तूं मानु नेदसि कर्मलेशा ।
आणि एसणी हे हिंसा । करवीतासि ॥ ५ ॥

**व्यामिश्रेणैव वाक्येन बुद्धिं मोहयसीव मे ।**
**तदेकं वद निश्चित्य येन श्रेयोहमाप्नुयाम् ॥ २ ॥**

देवा तुवां चि ऐसें बोलावें । तरि नेणतां आह्मीं काइ करावें ।
आतां सरलें ह्मणों आववें । विवेकाचें ॥ ६ ॥

हां गा उपदेशु जरि ऐसा । तरि अपभ्रंशु तो कैसा ।
आतां पुरला पां धिंवसा । आत्मबोधाचा ॥ ७ ॥
वैद्यु पथ्य वारूनि जाये । मग विष आपण चि सुये ।
तरि रोगिया कैसेनि जिये । सांगें मज ॥ ८ ॥
जैसें आंधलेया अव्हांटा । कां माजवणदान मर्कटा ।
तैसा उपदेशु हा गोमटा । वोडवला आह्मां ॥ ९ ॥
मीं आदीं चि कांहीं नेणें । वरि कवलिलों मोहें एणें ।
कृष्णा विवेकु एया कारणें । पूसिला तूतें ॥ १० ॥
तवं तूझी एकएकि नवाई । एथ उपदेशामाझि गावाई ।
तरि अनुसरलेया काई । ऐसें कीजे ॥ ११ ॥
आह्मि तनुमनुजीवें । तूतेंचा बोला वोटंगावें ।
आणि तुवां चि ऐसें बोलावें । तरि सरलें ह्मणें ॥ १२ ॥
आतां ऐसिया परी बोधिसी । तरि नीकें आह्मां करिसी ।
एथ ज्ञानाची आश काइसी । अर्जुनु ह्मणे ॥ १३ ॥
तियें जाणिवेचें कीरु सरलें । परि आणिक एक असें जालें ।
जें थीतें हें डहुळलें । हृदय माझें ॥ १४ ॥
तवि चि कृष्णा तूझें । हें चरित्र कांहीं नेणिजे ।
जरि चित्त पाहांसि माझें । एणें मिसें ॥ १५ ॥
ना तरि झांकवीतु आहासि मातें । कीं तत्व चि कथिलें ध्वनितें ।
हें अवगमितां निरुतें । जाणवे ना ॥ १६ ॥
ह्मणोनि आइकें देवा । हा भावार्थु आतां न बोलावा ।
मज विवेकु तो सांगावा । मऱ्हाटा जी ॥ १७ ॥
मीं अत्यंतु जडु असें । परि ऐसा ही नीकें परिहसें ।
कृष्णा बोलावें तुवां तैसें । एकनिष्ट ॥ १८ ॥
देखें रोगातें जीणावें । औषध तरि घेयावें ।
परि तें रुचिकर होआवें । मधुर जैसें ॥ १९ ॥

तैसें सकलार्थभरित । तत्व सांघावें उचित ।
परि बोधे माझें चित्त । जिया परीं ॥ २० ॥
देवा तुज ऐसा निजगुरु । आजि आर्तिची धणि कां न करूं ।
एथ भीड कवणाची धरूं । तूं माये आमची ॥ २१ ॥
हां गा कामधेनूचें दुभतें । आणि दैवें जालें आपैतें ।
तरि कामनेची कां तेथें । वाणि कीजे ॥ २२ ॥
जरि चिंतामणि हाता चडे । तरि वांसनेचें कवण सांकडें ।
कां आपुलेनि सुरवाडें । इछावें ना ॥ २३ ॥
देखें अमृतसिंधुतें टाकावें । मग ताहाना जरि फुटावें ।
तरि सायास कां करावे । मागील ते ॥ २४ ॥
तैसां जन्मांतरीं बहुतीं । उपासितां लक्ष्मीपती ।
तूं दैवें आजि हातीं । जालासि जरि ॥ २५ ॥
तरि आपुलालिया सावेसा । कां न मगावासि परेशा ।
देवा सुकाळु हा मानसा । पाहला असे ॥ २६ ॥
देखें सकलार्त्तिचें जियालें । आणि पुण्य यशासि आलें ।
हे मनोरथ जाले । विजई माझे ॥ २७ ॥
जि परममंगलधामा । देवदेवोत्तमा ।
तूं स्वाधीनु जी आह्मां । ह्मणौनियां ॥ २८ ॥
देखें मातेचां ठांइं । अपस्या अनवसरु नाहीं ।
स्तन्यासि लागौनि पाइं । जिया परीं ॥ २९ ॥
तैसें देवा तूतें । पुसिजत असे आवडतें ।
आपुलेनि आर्त्तें । कृपानिधी ॥ ३० ॥
तरि पारत्रिकीं हित । आणि आचरतां उचित ।
तें सांघें एक निश्चित । पार्थु ह्मणे ॥ ३१ ॥

श्रीभगवानुवाच ॥

**लोकेऽस्मिन्द्विविधा निष्ठा पुरा प्रोक्ता मयानघ ।**
**ज्ञानयोगेन सांख्यानां कर्मयोगेन योगिनाम् ॥ ३ ॥**

तवं येया बोला अच्युतु । सांघैन ह्मणे विस्मितु ।
अर्जुना परिसैं हा ध्वनितु । अभिप्राऊ ॥ ३२ ॥
जें बुद्धियोगु सांगतां । सांख्यमतसंस्था ।
प्रकटिली स्वभावता । प्रसंगें आह्मीं ॥ ३३ ॥
तो उद्देशु तूं नेणसी चि । ह्मणौनि क्षोभलासि वायां चि ।
तरि जाणैं आतां मियां चि । उक्ता दोन्हीं ॥ ३४ ॥
अवधारीं वीरश्रेष्ठा । इये लोकीं इया दोन्हीं निष्ठा ।
मज चि पासौनि प्रकटा । अनादिसिद्धा ॥ ३५ ॥
एक ज्ञानयोगु ह्मणिजे । तो सांख्यिं अनुष्ठिजे ।
जेथ वोळखीसवें पाविजे । तद्रूपता ॥ ३६ ॥
एरु कर्मयोगु जाण । जेथ साधकजन निपुण ।
होउनियां निर्वाण । पावति वेळे ॥ ३७ ॥
हे मार्ग तरि दोन्हीं । परि एकावटति निदानीं ।
जैसी सिद्धसाध्यभोजनीं । तृप्ति एकि ॥ ३८ ॥
कां पूर्वापर सरिता । भिन्ना दीसति पल्हातां ।
मग सिंधुमिळणीं ऐक्यता । पावति शेखीं ॥ ३९ ॥
तैसीं दोन्हीं इयें मतें । सूचीति एका चि कारणातें ।
परि उपास्ति ते योग्यते । अधीन असे ॥ ४० ॥
देखें उत्पवनासरिसा । पक्षिया फळासि झोंबे जैसा ।
सांगें नरु केवि तैसा । पावे वेगें ॥ ४१ ॥
तो हळहळू ढाळें । केतुकेनि एकें वेळें ।
मार्गाचेनि बळें । निश्चित ठाकी ॥ ४२ ॥

तेसें विहंगममतें । अधिष्ठूनि ज्ञानातें ।
सांख्य सद्य मोक्षातें । आकळिति ॥ ४३ ॥
एर योगिये कर्माधारें । विहितें चि निजाचारें ।
पूर्णता अवसरें । पावते होंति ॥ ४४ ॥

**नकर्मणामनारंभान्नैष्कर्म्यं पुरुषोऽश्नुते ।**
**न च संन्यासनादेव सिद्धिं समधिगच्छति ॥ ४ ॥**

वांचूनि कर्मारंभ उचित । न करितां सिद्धवत ।
कर्महीना निश्चित । होइजे ना ॥ ४५ ॥
कां प्राप्त कर्म सांडिजे । एतुलेनि नैष्कर्म्यी होइजे ।
हें अर्जुना वायां चि बोलिजे । मूर्खपणें ॥ ४६ ॥
सांगें पैल तीरा जावें । ऐसें व्यसन जेथ पावे ।
तेथ नावेतें त्यजावें । घडे केवि ॥ ४७ ॥
ना तरि तृप्ति इच्छिजे । तरि कैसेनि पाकु न कीजे ।
कां सिद्ध ही न सेविजे । केवि सांगें ॥ ४८ ॥

**न हि कश्चित्क्षणमपि जातु तिष्ठत्यकर्मकृत् ।**
**कार्यते ह्यवशः कर्म सर्वः प्रकृतिजैर्गुणैः ॥ ५ ॥**

जवं निरार्त्तता नाहीं । तवं व्यापारु असे पाइं ।
मग संतुष्टिचां ठांइं । कुंटे साहाजें ॥ ४९ ॥
ह्मणौनि आइकें पार्था । जेया नैष्कर्म्यपदीं आस्था ।
तेया उचित कर्म सर्वथा । त्याज्य नोहे ॥ ५० ॥
आणिक आपुलिये चाडे । ना आपादिलें हें मांडे ।
किं त्यजिलें कर्म सांडे । ऐसें आहे ॥ ५१ ॥
हें वायां चि सैरा बोलिजे । उकलु तरि देखों पाहिजे ।
परि त्यजितां कर्म न त्यजे । निभ्रान्त मानीं ॥ ५२ ॥
जवं प्रकृतिचें अधिष्टान । तवं सांडि मांडि हें अज्ञान ।
जे चेष्टा ते गुणाधीन । आपैसी असे ॥ ५३ ॥

देखें विहित कर्म जेतुलें । तें सकळ जऱ्हें उपसंडिलें ।
तरि स्वभाव काइ निमाले । इंद्रियांचे ॥ ५४ ॥
सांघें श्रवणें आइकों ठेलें । किं नेत्रांचें तेज गेलें ।
हें नासारंध्र बुजालें । परिमळु नेघे ॥ ५५ ॥
कां प्राणपानगती । खळन जालें इये मती ।
किं क्षुधातृषादि आर्त्ती । खुंटलिया ॥ ५६ ॥
हे स्वप्नावबोध ठेले । किं चरण चालों विसरले ।
हें असो काइ निमाले । जन्ममृत्यू ॥ ५७ ॥
हें न टके चि जरि पाइं । तरि सांडिलें एथ काई ।
ह्मणौनि कर्मासि त्यागु नाहीं । प्रकृतिमंतां ॥ ५८ ॥
कर्म पराधीनपणें । निफजतसे प्रकृतिगुणें ।
एरि धरी मेकली अंतःकरणें । वाहिजे वायां ॥ ५९ ॥
देखें रथीं आरूढां होइजे । मग जऱ्हें निश्चळां बैसिजे ।
तऱ्हें चळां होटनि हींडिजे । परतंत्रता ॥ ६० ॥
कां उचललें वायुवेगें । शुष्क पत्र जैसें ।
निश्चेष्ट आकाशें । परिभ्रमे ॥ ६१ ॥
तैसें प्रकृति आधारें । कर्मेंद्रियें विकारें ।
नैष्कर्म्य हीं व्यापारें । निरंतर ॥ ६२ ॥
ह्मणौनि संगु जवं प्रकृतिचा । तवं त्यागु न घडे कर्माचा ।
एथ करूं ह्मणति तेयांचा । आग्रहो चि उरे ॥ ६३ ॥

**कर्मेंद्रियाणि संयम्य य आस्ते मनसा स्मरन् ।**
**इंद्रियार्थान्विमूढात्मा मिथ्याचारः स उच्यते ॥ ६ ॥**

जे उचित कर्म सांडिति । मग नैष्कर्म्य हों पाहांति ।
परि कर्मेंद्रियप्रवृत्ति । निरूंधुनि ॥ ६४ ॥
तेयां कर्मत्यागु न घडे । जें कर्त्तव्य मनीं मांघडे ।
वरि नटनि ते कुडें । दरिद्र जाण ॥ ६५ ॥

ऐसे ते पार्था । विषयासक्त सर्वथा ।
ओळखावे अन्यथा । भ्रांति नाहीं ॥ ६६ ॥

**यस्त्विंद्रियाणि मनसा नियम्यारभतेऽर्जुन ।**
**कर्मेंद्रियैः कर्मयोगमसक्तः स विशिष्यते ॥ ७ ॥**

आतां देइं अवधान । प्रसंगें तुज सांगेन ।
एया निराशाचें चिन्ह । धनुर्धरा ॥ ६७ ॥
जो आंतरीं दृढु । परमात्मरूपीं गूढु ।
बाह्य तरि रूढु । लौकिकु जैसा ॥ ६८ ॥
जो इंद्रियां आज्ञा करी । विषयांचें भय न धरी ।
प्राप्त कर्म नव्हेरी । उचित जें जें ॥ ६९ ॥
कर्मेंद्रियें कर्मीं । राहटतां तरि नियमीं ।
परि तेथिचिया उर्मी । झांकोळे ना ॥ ७० ॥
जो कामनामात्रें न घेपे । मोहमळें न लिंपे ।
जैसें जळीं जळें न सिंपे । पद्मपत्र ॥ ७१ ॥
तैसा संसर्गामाजि असे । सकळांसारिखा दीसे ।
जैसें तोयसंगें आभासे । भानुबिंब ॥ ७२ ॥
तैसा सामान्यत्वें पाहिजे । तरि साधारणू चि देखिजे ।
यऱ्हवीं निर्धारितां नेणिजे । सोय जेयाची ॥ ७३ ॥
ऐसा चिन्हि चिन्हतु । देखसी तो चि मुगतु ॥
आशापाशरहितु । ओळख पां ॥ ७४ ॥
अर्जुना तो चि गा योगी । विशेषिजे जगीं ।
ह्मणौनि ऐसा होयें ययालागि । ह्मणिपें तूतें ॥ ७५ ॥

**नियतं कुरु कर्म त्वं कर्म ज्यायो ह्यकर्मणः ।**
**शरीरयात्रापि च ते न प्रसिद्ध्येदकर्मणः ॥ ८ ॥**

तूं मानसासि नियमु करीं । निश्चळु होउनि आंतरीं ।
मग कर्मेंद्रियें व्यापारीं । वर्त्ततु सुखें ॥ ७६ ॥

ह्मणसि निष्कर्मा जरि होवावें । तरि येथ तें न संभवे ।
आणि निषिद्ध केविं राहाटावें । विचारि पां ॥ ७७ ॥
ह्मणौनि जें जें उचित । आणि अवसरें करूनि प्राप्त ।
तें कर्म हेतुरहित । आचार तूं ॥ ७८ ॥
पार्था आणिक ही एक । नेणसि तूं कवतिक ।
जैसें कर्म चि मोचक । आपैसें असे ॥ ७९ ॥
देखें अनुक्रमाधारें । धर्मु जो आचरे ।
तो मोक्षु तेणें व्यापारें । निश्चित पावे ॥ ८० ॥

**यज्ञार्थात्कर्मणोऽन्यत्र लोकोऽयं कर्मबंधनः ।**
**तदर्थं कर्म कौंतेय मुक्तसंगः समाचर ॥ ९ ॥**

स्वधर्मु जो बापा । तो नित्ययज्ञु जाण पां ।
ह्मणौनि वर्ततां तेथ पापा । संचारु नाहीं ॥ ८१ ॥
हा निजधर्मु जैं सांडे । कुकर्मीं रति वडे ।
तैं चि बंधु पडे । संसारिकु ॥ ८२ ॥
ह्मणौनि स्वधर्मानुष्ठान । तें अखंड तुज यजन ।
जो करी तेया बंधन । कहीं नाहीं ॥ ८३ ॥
हा लोकु कर्में बांधला । जो परतंत्र असे भूतला ।
तो नित्ययज्ञातें असे चूकला । ह्मणौनियां ॥ ८४ ॥

**सहायज्ञाः प्रजाः सृष्ट्वा पुरोवाच प्रजापतिः ।**
**अनेन प्रसविष्यध्वमेष वोऽस्त्विष्टकामधुक् ॥ १० ॥**

आतां इये चि विखैं पार्था । तुज मी सांघेन एकि कथा ।
जैं श्रिष्टि आदि संस्था । ब्रह्मेनि केली ॥ ८५ ॥
तैं नित्ययागसहितें । सृजिलीं भूतें समस्तें ।
परि नेणति चि तियें यज्ञातें । सूक्ष्मु ह्मणौनि ॥ ८६ ॥
तेव्हांळि प्रजीं विनविला ब्रह्मा । देवा आश्रो काइ एथ आह्मां ।
तवं तो ह्मणे कमळजन्मा । भूतां प्रति ॥ ८७ ॥

तुह्मां वर्णविशेषवसें । आह्मीं यज्ञु स्वधर्मु विहिला असे ।
एयातें उपासा मग आपैसें । काम पुरती ॥ ८८ ॥
तुह्मीं व्रतनियम न करावे । शरीरातें न पीडावें ।
दुरिकें हीं न वचावें । तीर्थासि गा ॥ ८९ ॥
योगादिकें साधनें । साकांक्षें आराधनें ।
मंत्रयंत्रविधानें । झनें करा ॥ ९० ॥
देवतांतरा भजावें । हें सर्वथा न करावें ।
स्वधर्मयज्ञ यजावें । अनायासें ॥ ९१ ॥
अहेतुकेनि चित्तें । अनुष्ठा पां एयातें ।
पतिव्रता पतितें । जेया परीं ॥ ९२ ॥
तैसा स्वधर्मुरुपु मखु । हा चि सेव्यु तुह्मां येकु ।
ऐसें सत्यलोकनायकु । बोलता जाला ॥ ९३ ॥
देखां स्वधर्मातें भजाल । तरि कामधेनु हा होईल ।
यऱ्हवि प्रजा हा चि नाडील । तुमतें सदा ॥ ९४ ॥

**देवान्भावयतानेन ते देवा भावयंतु वः ।**
**परस्परं भावयंतः श्रेयः परमवाप्स्यथ ॥ ११ ॥**

एणेंकरूनि समस्तां । परितोखु होईल देवतां ।
मग ते तुह्मां इछितां । अर्थातें देति ॥ ९५ ॥
एया स्वधर्मुपूज्य पूजितां । देवगणां समस्तां ।
योगक्षेमु निश्चिता । करिति तुमचा ॥ ९६ ॥
तुह्मीं देवां जेया भजाल । ते देव तुह्मां तुष्टतील ।
ऐसी परस्परें घडेल । प्रीति जेथ ॥ ९७ ॥
तेथ तुह्मीं जें करूं ह्मणाल । तें आपैसें सिद्धी जाईल ।
वांछित ही पुरेल । मानासिचें ॥ ९८ ॥
वाचासिद्धि पावाल । आज्ञापक होआल ।
ह्मणियें तुमतें मागतील । महासिद्धि ॥ ९९ ॥

जैसें रितुपतिचें द्वार । वनश्री निरंतर ।
उ॰लगे फळभार । लावण्येंसीं ॥ १०० ॥

**इष्टान्भोगान्हि वो देवा दास्यंते यज्ञभाविताः ।**
**तैर्दत्तानप्रदायैभ्यो यो भुङ्क्ते स्तेन एव सः ॥ १२ ॥**

तैसें सर्वसुखें सहित । दैव चि मूर्तिमंत ।
एईल देखां काढत । तुह्मां पाठीं ॥ १ ॥
ऐसे समस्तभोगभरित । होआल तुह्मीं अनार्त्त ।
जरि स्वधर्मैकनिरत । वर्ताल बापा ॥ २ ॥
कां जालिया सकल संपदा । जो अनुसरैल इंद्रियमदा ।
लुब्ध होउनि आस्वादा । विषयांचेया ॥ ३ ॥
तिहीं यज्ञभावितीं सुरीं । जे हे संपत्ति दिधली पुरी ।
तिया स्वमार्गें सर्वेश्वरीं । न भजैल जो ॥ ४ ॥
अग्निमुखीं हावन । न करील देवतापूजन ।
प्राप्तें वेळे भजन । ब्राह्मणाचें ॥ ५ ॥
विमुख होईल गुरुभक्ती । आदरु न करिल आतिथि ।
संतोषु नेदील ज्ञातीं । आपुलिए ॥ ६ ॥
ऐसा स्वधर्मक्रियारहितु । आथिलेपणें माजतु ।
केवळ भोगासक्तु । होईल जो ॥ ७ ॥
तयातें मग अपाउ थोरु होए । जेणें तें हातिचें सकळ जाए ।
देखां प्राप्त हीं न लाहे । भोग भोगुं ॥ ८ ॥
जैसें गतायुषें शरीरीं । चैतन्य वासु न करी ।
कां निर्देवांचां मंदिरीं । न न्हाय लक्ष्मी ॥ ९ ॥
तैसा स्वधर्मु जरि लोपला । तरि सर्व सुखाचा थारा मोडला ।
जैसा दीपासवें हारतला । प्रकाशु जाए ॥ ११० ॥
तैसी निजवृत्ति जेथ सांडे । तेथ स्वतंत्रते वस्ति न घडे ।
आइका प्रजा हो हें फुडें । विरिंचि ह्मणे ॥ ११ ॥

ह्मणौनि स्वधर्मु जो सांडील । तेयातें कालु दंडील ।
चोरु ह्मणौनु हरिल । सर्वस्व तेयाचें ॥ १२ ॥
मग सकळ दोष भवंते । गिंवसूनि वेंति तेयातें ।
रात्रीसमैं स्मशानातें । भूतें जैसीं ॥ १३ ॥
तैसीं त्रिभुवनिचीं दुःखें । आणिक नानाविधें पातकें ।
दैन्यजात तेतुकें । तेथ चि वसे ॥ १४ ॥
ऐसें होए तेया उन्मत्ता । मग न सुटे बापा रुदतां ।
परि कल्पांति हि सर्वथा । प्राणिगण हो ॥ १५ ॥
ह्मणौनि निजवृत्ति हे न संडावीं । इंद्रियें बरळों नेदावीं ।
ऐसें प्रजांतें सिकवी । चतुराननु ॥ १६ ॥
जैसें जळचरां जळ सांडे । आणि तत्क्षणीं मरण वडे ।
हा स्वधर्मु हीं तेणें पाडे । विसंभों नए ॥ १७ ॥
ह्मणौनि तुह्मीं समस्तीं । आपुलाला कर्मीं उचितीं ।
निरतां होआवें हें पुढुतीं पुढुतीं । ह्मणित असे ॥ १८ ॥

**यज्ञशिष्टाशिनः संतो मुच्यंते सर्व किल्बिषैः ।**
**भुंजते तेत्वघं पापा ये पचंत्यात्मकारणात् ॥ १३ ॥**

देखैं विहितक्रियाविधी । निर्हेतुका बुद्धी ।
जो असतिये समृद्धी । विनियोगु करी ॥ १९ ॥
गुरु गो अग्नि पूजी । अवसरें भजे द्विजीं ।
निमित्तादिकीं यजी । पितरोद्देशें ॥ १२० ॥
इया यज्ञक्रिया उचिता । यज्ञेंसीं हवन करितां ।
हुतशेष स्वभावता । उरे जें जें ॥ २१ ॥
तें सुखें आपुलां घरीं । कुटुंबेंसीं भोजन करी ।
कि भोग्य चि ते निवारी । कल्मषातें ॥ २२ ॥
तें यज्ञावशिष्ट भोगी । ह्मणौनि सांडिजे गा तो अघीं ।
जिया परीं महारोगी । अमृतसिद्धि ॥ २३ ॥

कां तत्त्वनिष्ठु जैसा । ना गवे भ्रांतिलेशा ।
तो शेष भोगी तैसा । ना कळे दोषां ॥ २४ ॥
ह्मणौनि स्वधर्मे जें जें आजे । तें स्वधर्मे चि विनियोगिजे ।
मग उरे तें भोगिजे । संतोषेंसीं ॥ २५ ॥
हें वांचूनि पार्था । राहाटों न ये अन्यथा ।
ऐसी आद्य हे कथा । मुरारि सांगे ॥ २६ ॥
जे देह चि आपणपें मानिति । आणि विषयांतें भोग्य ह्मणति ।
यया परौते न स्मरति । आणिक कांहीं ॥ २७ ॥
हें यज्ञोपकरण सकळ । नेणत सांते बरळ ।
अहंबुद्धी केवळ । भोगूं पाहांति ॥ २८ ॥
इंद्रियरुची सारिखे । करवीति पाक नीके ।
ते पापिये पातकें । सेविति जाणें ॥ २९ ॥
जें संपत्तिजात आघवें । हें हवनद्रव्य मानावें ।
मग स्वधर्मयज्ञें अर्पावें । आदिपुरुषीं ॥ १३० ॥
हें सांडूनियां मूर्ख । आपणपेया लागि देख ।
निफजवीति पाक । नानाविध ॥ ३१ ॥
जिहिं यज्ञु सिद्धी जाये । परेशा संतोषु होये ।
तें हें सामान्य अन्न नोहे । ह्मणौनियां ॥ ३२ ॥

**अन्नाद्भवंति भूतानि पर्जन्यादन्नसंभवः ।**
**यज्ञाद्भवति पर्जन्यो यज्ञःकर्मसमुद्भवः ॥ १४ ॥**

हें न ह्मणावें साधारण । अन्न ब्रह्मरूप जाण ।
तें जीवनहेतु जाण । विश्वा एया ॥ ३३ ॥
अन्ना तव भूतें । प्ररोहो पावति समस्तें ।
मग वर्षु एया अन्नातें । सर्वत्र प्रसवे ॥ ३४ ॥
तेया पर्जन्या यज्ञीं जन्म । यज्ञातें प्रकटी कर्म ।
ह्मणौनि कर्मासि आदि ब्रह्म । वेदरूप ॥ ३५ ॥

**कर्म ब्रह्मोद्भवं विद्धि ब्रह्माक्षरसमुद्भवं ।**
**तस्मात्सर्वगतं ब्रह्म नित्यं यज्ञे प्रतिष्ठितम् ॥ १५ ॥**

मग वेदांतें परापर । प्रसवतसे अक्षर ।
ह्मणौनि हें चराचर । ब्रह्मबंध ॥ ३६ ॥
परि कर्माचिया मूर्ती । यज्ञीं अधिवासु श्रुती ।
आइकें सुभद्रापती । अखंड गा ॥ ३७ ॥

**एवं प्रवर्तितं चक्रं नानुवर्त्तयतीह यः ।**
**अघायुरिंद्रियारामो मोघं पार्थ स जीवति ॥ १६ ॥**

हे ऐसी आदिपरंपरा । संक्षेपें तुज धनुर्द्धरा ।
सांघितली एया अध्वरा । लागौनियां ॥ ३८ ॥
ह्मणौनि समूलु हा उचितु । स्वधर्मरूपु क्रतु ।
ननुष्ठी जो मत्तु । लोकीं इये ॥ ३९ ॥
तो पातकांचा रासि । जाण भार भूमीसि ।
जो कुकर्में इंद्रियांसि । उपेगा गेला ॥ १४० ॥
तें जन्मकर्म सकळ । अर्जुना अतिनिष्फळ ।
जैसें कां अभ्रपटळ । अकाळिचें ॥ ४१ ॥
कां गळा स्तन अजेचे । तैसें जियालें देख तेयाचें ।
जेया अनुष्ठान स्वधर्माचें । घडे चि ना ॥ ४२ ॥
ह्मणौनि आइकें पांडवा । स्वधर्मु कव्हणीं न संडावा ।
सर्वभावें भजावा । हा चि येकु ॥ ४३ ॥
हां गा शरीर जरि जालें । तरि कर्तव्य हें ओघें आलें ।
मग उचित कां आपुलें । उपसंडावें ॥ १४४ ॥

**यस्त्वात्मरतिरेवस्यादात्मतृप्तश्च मानवः ।**
**आत्मन्येव च संतुष्टः तस्य कार्यं न विद्यते ॥ १७ ॥**

देखें असतेनि देहधर्में । एथ तो एकु न लिंपे कर्में ।
जो अखंडित रमे । आपणपां ॥ ४५ ॥

जें तो आत्मबोधें तोषला । तरि कृतकार्यु देखैं जाला ।
म्हणौनि सहजें सांडला । कर्मसंगु ॥ ४६ ॥
तृप्ति जालेयां जैसीं । साधनें सरति आपैसीं ।
देखैं आत्मतुष्टी तैसीं । कर्म नाहीं ॥ ४७ ॥

**नैव तस्य कृतेनार्थो नाकृतेनेह कश्चन ।**
**न चास्य सर्वभूतेषु कश्चिदर्थव्यपाश्रयः ॥ १८ ॥**

जवं वेरि अर्जुना । तो बोधु न भेटे मना ।
तवं चि येया साधना । भजावें लागे ॥ ४८ ॥

**तस्मादसक्तः सततं कार्यं कर्म समाचर ।**
**असक्तो ह्याचरन्कर्म परमाप्नोति पूरुषः ॥ १९ ॥**

म्हणौनि तूं नियतु । सकळ कामरहितु ।
होउनियां उचितु । धर्मु राहाट ॥ ४९ ॥
जे स्वकर्मी निष्कामता । अनुसरले गा पार्था ।
ते कैवल्य परम तत्वता । पातले जगीं ॥ १५० ॥

**कर्मणैव हि संसिद्धिमास्थिता जनकादयः ।**
**लोकसंग्रहमेवापि संपश्यन्कर्तुमर्हसि ॥ २० ॥**

देख पां जनकादिक । कर्मजात अशेष ।
न संडितां चि मोक्षसुख । पावते जाले ॥ ५१ ॥
एया कारणें पार्था । होआवी कर्मी आस्था ।
हें आणिका ही एका अर्था । उपकारैल ॥ ५२ ॥

**यद्यदाचरति श्रेष्ठस्तत्तदेवेतरो जनः ।**
**स यत्प्रमाणं कुरुते लोकस्तदनुवर्तते ॥ २१ ॥**

जें आचरतां आपणेया । देखि लागैल लोका येया ।
तरि चूकैल हा अपाया । प्रसंगें चि ॥ ५३ ॥
देखैं प्राप्तार्थ जाले । जे निष्कामता पातले ।
तेयां हीं कर्तृत्व असें उरलें । लोकांलागि ॥ ५४ ॥

मार्गी अंधासरिसा । पुढां देखणा हीं चाले जैसा ।
अज्ञा प्रकटावा धर्मु तैसा । जाणतेन ॥ ५५ ॥
हां गा जरि ऐसें न कीजे । तरि अज्ञाना काइ वोजे ।
तेहिं कवणी परीं जाणिजे । मार्गातें ॥ ५६ ॥
एथ वडिल जें जें करिति । तेया नावं धर्मु ठेविति ।
तो चि एर अनुष्ठिति । सामान्य सकळ ॥ ५७ ॥
हें ऐसें असे स्वभावें । ह्मणौनि कर्म न संडावें ।
विशेषें आचरावें । लागे संतीं ॥ ५८ ॥

**न मे पार्थास्ति कर्तव्यं त्रिषु लोकेषु किंचन ।**
**नानवाप्तमवाप्तव्यं वर्त्त एवच कर्माणि ॥ २२ ॥**

आतां आणिकाचिया गोठी । तुज सांवों काइ किरीटी ।
देखैं मीं चि कीं इये राहाटीं । बर्त्तत असे ॥ ५९ ॥
काइ सांकडें काहीं मातें । कि कव्हणें येकें आर्त्तें ।
अनुचरें मीं कर्मातें । ह्मणसि जरि ॥ ६० ॥
तरि पुरतेपणालागि । आणिकु दुसरा नाहिं जगिं ।
ऐसी सामग्री माझां आंगीं । जाणसी तूं ॥ ६१ ॥
परि स्वधर्मिं वर्त्तें कैसा । साकांक्षु कां होये जैसा ।
तेया चि एका उद्देशा । लागौनियां ॥ ६२ ॥

**यदि ह्यहं न वर्त्तेयं जातु कर्मण्यतंद्रितः ।**
**मम वर्त्मानुवर्त्तंते मनुष्याः पार्थ सर्वशः ॥ २३ ॥**

जें भूतजात सकळ । असे आह्मां चि अधीन केवळ ।
तरि न व्हावें हे बरळ । ह्मणौनियां ॥ ६३ ॥
आह्मि पूर्णकाम होउनि । जरि आत्मस्थिती राहुनि ।
तरि प्रजा हे कैसेनि । निस्तरैल ॥ ६४ ॥

**उत्सीदेयुरिमे लोका न कुर्यां कर्म चेदहम् ।**
**संकरस्यच कर्त्ता स्यामुपहन्यामिमाः प्रजाः ॥ २४ ॥**

इया आमची वास पावी । मग वर्त्तती परी जाणावी ।
ते लौकिकस्थिति आघवी । नाशली होईल ॥ ६५ ॥

**सक्ताः कर्मण्यविद्वांसो यथा कुर्वंति भारत ।**
**कुर्याद्विद्वांस्तथासक्तश्चिकीर्षुर्लोकसंग्रहम् ॥ २५ ॥**

ह्मणौनि समर्थु जो एथें । आणि लाणि सर्वज्ञते ।
तेणें सविशेष कर्मातें । त्यजावें ना ॥ ६६ ॥
देखैं फळाचिया आशा । आचरे कां मूर्खु जैसा ।
कर्मि भरु होआवा तैसा । निराशा ही ॥ ६७ ॥
जें पुडुतीं पुडुतीं पार्था । हे सकळलोकसंस्था ।
रक्षणीय गा सर्वथा । ह्मणौनियां ॥ ६८ ॥
मार्गाधारें वर्तावें । विश्व हें मोहरे लावावें ।
अलौकिकां नोहावें । लोकाप्रति ॥ ६९ ॥
जें सायासें स्तन्य सेवी । तें पक्वान्नें केवि जेवी ।
ह्मणौनि बाळका जैसीं नेंदावी । धनुर्द्धरा ॥ १७० ॥

**न बुद्धिभेदं जनयेदज्ञानां कर्मसंगिनाम् ।**
**जोषयेत्सर्वकर्माणि विद्वान्युक्तःसमाचरन् ॥ २६ ॥**

तैसी कर्मि जेया योग्यता । तेया प्रति नैष्कर्म्यता ।
न प्रकटावी खेळतां । आदिकरुनि ॥ ७१ ॥
तेथ सत्क्रिया चि लावावी । ते चि एकि प्रशंसावी ।
नैष्कर्मी हीं दावावी । आचरौनि ॥ ७२ ॥
तेया लोकसंग्रहालागि । वर्त्ततां कर्मसंगीं ।
तो कर्मबंधु आंगीं । वाजेल ना ॥ ७३ ॥

**प्रकृतेः क्रियमाणानि गुणैः कर्माणि सर्वशः ।**
**अहंकारविमूढात्मा कर्त्ताहमिति मन्यते ॥ २७ ॥**

देखैं पुढिलाचें ओझें । जरि आपुलां माथां घेइजे ।
तरि सांवैं कां न दटिजे । धनुर्द्धरा ॥ ७४ ॥

तैसीं शुभाशुभ कर्मे । निफजती प्रकृतिधर्मे ।
तियें मूर्ख मतिभ्रमें । मी कर्त्ता ह्मणे ॥ ७५ ॥
ऐसा अहंकारारूढ । एकदेशी मूढ ।
तेया परमार्थ गूढ । प्रकटावा ना ॥ ७६ ॥
जें तत्वज्ञाचां ठांइं । तो प्रकृतिभावो नाहिं ।
जेथ कर्मजात पाईं । निफजत असे ॥ ७७ ॥
तो देहाभिमानु सांडूनि । गुणकर्म उल्लखोनि ।
साक्षिभूत होउनि । वर्त्ते देहीं ॥ ७८ ॥

**तत्ववित्तु महाबाहो गुणकर्मविभागयोः ।**
**गुणागुणेषु वर्त्तते इति मत्त्वा न सज्जते ॥ २८ ॥**

ह्मणौनि शरीरिं जऱ्हें होंति । तऱ्हीं कर्मबंधें बाधति ।
जैसा भूतचेष्टा गभस्ती । घेपवे ना ॥ ७९ ॥
एथ कर्में तो चि लिंपे । जो गुणसंभ्रमें घेपे ।
प्रकृतिचेनि आटोपें । वर्त्तत असे ॥ १८० ॥
इंद्रियें गुणाधारें । राहाटति निजव्यापारें ।
तें परकर्म बलात्कारें । आपादि जो ॥ ८१ ॥

**प्रकृतेर्गुणसंमूढाः सज्जंते गुणकर्मसु ।**
**तानकृत्स्नविदो मंदान्कृत्स्नविन्न विचालयेत् ॥ २९ ॥**
**मयि सर्वाणि कर्माणि संन्यस्याध्यात्मचेतसा ।**
**निराशीर्निर्ममो भूत्वा युध्यस्व विगतज्वरः ॥ ३० ॥**

हें असो आतां प्रस्तुत । सांगिजैल तुज हित ।
तें अर्जुना देउनि चित्त । अवधारिं पां ॥ ८२ ॥
तरि उचितें कर्में आघवीं । तुवां आचरोनि मज अर्पावीं ।
परि चित्तवृत्ति हे न्यसावी । आत्मरूपीं ॥ ८३ ॥
हें कर्म मी कर्त्ता । आचरेन मी येया अर्था ।
ऐसा अभिमान झणें चित्ता । रिगों देसी ॥ ८४ ॥

तुवां शरीरपरां नोहावें । कामनाजात सांडावें ।
मग अवसरोचित भोगावें । भोग सकळ ॥ ८५ ॥
आतां कोदंड घेउनि हातीं । आरूढ पां इये रथीं ।
देइं आलिंगन वीरवृत्ती । समाधानें ॥ ८६ ॥
जगीं कीर्त्ति रूढवीं । स्वधर्माचा मानु वाढवीं ।
येया भारापासोनि सोडवीं । मेदिनी हे ॥ ८७ ॥
आतां पार्था निःशंकु होइं । एया संग्रामा चित्त देइं ।
एथ हें वांचूनि काहीं । कल्हू नेए ॥ ८८ ॥

**ये मे मदमिदं नित्यमनुतिष्ठंति मानवाः ।**

**श्रद्धावंतो न सूयंते मुच्यंते तेऽपि कर्मभिः ॥ ३१ ॥**

ऐसें अनुपरोध मत माझें । जिहिं परमादरें स्वीकारिजे ।
श्रद्धासूं अनुष्ठिजे । धनुर्द्धरा ॥ ८९ ॥
ते हीं सकळ कर्मी वर्त्तत । जाण पां कर्मरहित ।
ह्मणौनि हें निश्चित । करणीय गा ॥ १९० ॥

**ये त्वेतदभ्यसूयंतो नानुतिष्ठंति मे मतम् ।**

**सर्वज्ञानविमूढांस्तान्विद्धि नष्टानचेतसः ॥ ३२ ॥**

नां तरि प्रकृतिमंत होउनि । इंद्रियां लळा देउनि ।
जे हें मत माझें अव्हेरुनि । उपेक्षिति ॥ ९१ ॥
जे सामान्यत्वें विशेषिति । अवज्ञा करूनि देखति ।
कां हा अर्थवादु ह्मणति । वाचाळपणें ॥ ९२ ॥
ते मोहमदिरा भ्रमले । विषयविखें घारले ।
अज्ञानपंकीं बुडाले । निभ्रांत जाणें ॥ ९३ ॥
देखें शवाचां हातिं दीधलें । जैसें रत्न कां वायां गेलें ।
नातरि जात्यंधा पाहालें । प्रमाण नोहे ॥ ९४ ॥
कां चंद्राचा उदयो जैसा । उपेगा न वचे चि वायसां ।
मूर्खा विवेकु हा तैसा । रुचेल ना ॥ ९५ ॥

ह्मणौनि ते न मनिति । आणिक निंदा ही करूं लाहाती ।
सांघैं पतंग काइ साहांति । प्रकाशातें ॥ ९६ ॥
तैसे ते पार्था । जे विमुख एया अर्था ।
तिहिंसिं संभाषण सर्वथा । करावें ना ॥ ९७ ॥

**सदृशं चेष्टते स्वस्याः प्रकृतेर्ज्ञानवानपि ।**
**प्रकृतिं यांति भूतानि निग्रहः किं करिष्यति ॥ ३३ ॥**

ह्मणौनि इंद्रियें इयें एकें । जाणतेन हीं पुरुषें ।
लालावीं ना कवतिकें । आदिकरुनि ॥ ९८ ॥
हां गा सर्पेंसीं खेलों एईल । किं व्याघ्रसंगु सिद्धी जाईल ।
सांघैं हलाहल जिरैल । सेविलें काइ ॥ ९९ ॥
देखैं खेलतां अग्नि लाविला । मग तो न संवरे जैसा उधलला ।
तैसा प्रकृती मानु दीधला । भला नोहे ॥ २०० ॥

**इंद्रियस्येंद्रियस्यार्थे रागद्वेषौ व्यवस्थितौ ।**
**तयोर्न वशमागच्छेत्तौ ह्यस्य परिपंथिनौ ॥ ३४ ॥**

यऱ्हवीं तऱ्हि अर्जुना । एया शरीरा पराधीना ।
कां नाना भोगरचना । मेलवावी ॥ १ ॥
आपण सायासें करुनि बहुतें । सकलें समृद्धिजातें ।
मग उदो अस्तु येयातें । प्रतिपालावें ॥ २ ॥
मग हें तवं पांच मेलावा । शेषीं अनुसरैल निजस्वभावा ।
तेव्हलि लोकें गिविसावा । सीणु आपुला ॥ ३ ॥
ह्मणौनि केवल देहभरण । ते उघड जाणैं नागवण ।
एयालागि एथें अंतष्करण । देयावें ना ॥ ४ ॥
यऱ्हवीं इंद्रियांचिया आर्ता- । सारिसा विखो वोपितां ।
संतोखु किर चित्ता । आपजैल ॥ ५ ॥
परि तो सवंचोराचा सांघातु । जैसा नावं चि येक स्वस्थु ।
जवं नगराचा प्रांतु । सांडिजैना ॥ ६ ॥

बापा विखाचिया मधुरता । ह्मनें आवडि उपजे चित्ता ।
तो परिणामु न विचारितां । सेवावें ना ॥ ७ ॥
देखें इंद्रियीं कामु असे । तो लावी सुख दुरासे ।
जैसा जळीं मीनु आमिसें । भूलविजे ॥ ८ ॥
परि तेया माझारि गळु आहे । तो प्राणातें घेउनि जाये ।
तो जैसा ताउवा नोहे । झांकवलपणें ॥ ९ ॥
तैसें अभिलाषें एणें कीजेल । जरि विषयांची आश धरिजैल ।
तरि वरपडेयां होइजैल । क्रोधानला ॥ २१० ॥
जैसा कवळूनियां पारधी । घातेचिये संधी ।
आणि मृगातें बुद्धी । साधावेया ॥ ११ ॥
एथ तैसी चि परि आहे । ह्मणौनि तुज हा संसर्गु नोहे ।
पार्था दोन्हीं कामक्रोध हे । घातक जाणैं ॥ १२ ॥
ह्मणौनि आश्रो हा न करावा । मनीं हीं आठौ न धरावा ।
एकु निजवृत्तिचा उ्ल्हावा । नाशों नेदीं ॥ १३ ॥

**श्रेयान्स्वधर्मो विगुणः परधर्मात्स्वनुष्ठितात् ।**
**स्वधर्मे निधनं श्रेयः परधर्मो भयावहः ॥ ३५ ॥**

आगा स्वधर्मु हा आपुला । जऱ्हें कां कठिणु जाला ।
तऱ्हें हा चि अनुष्ठिला । भला देखें ॥ १४ ॥
एरु आचारु जो परावा । तो देखतां किर बरवा ।
परि आचरतेनि आचरावा । आपुला चि ॥ १५ ॥
सांवैं शूद्रगृहीं आघवीं । जऱ्हें पक्वान्नें आथि बरवीं ।
तियें द्विजें केवि सेवावीं । दुबळा जऱ्हें ॥ १६ ॥
हें अनुचित कैसेनि कीजे । अप्राप्य केवि इछिजे ।
अथवा इछिलें हीं पाविजे । विचारि पां ॥ १७ ॥
तरि लोकाचीं धवळारें । देखौनियां मनोहरें ।
असतीं तणहारें । मांडावीं केवि ॥ १८ ॥

हें असो वनिता आपुली । कुरूप जऱ्हें जाली ।
तऱ्हें भोगितां ते चि भली । जिया परीं ॥ १९ ॥
तेवि आवडेतैसा सांकडु । आचरतां जऱ्हीं दुवाडु ।
तऱ्हीं स्वधर्मे चि सुरवाडु । पारत्रिकिं ॥ २२० ॥
हा गा शर्करा आणि दूध । हें गौल्य किर होये प्रसिद्ध ।
परि कृमिदोषीं विरुद्ध । घेपे केवि ॥ २१ ॥
ऐसेनि हिं जरि सेविजैल । तरि ते अलुकी चि आगा उरैल ।
जें तें परिणामीं पथ्य नव्हेल । धनुर्द्धरा ॥ २२ ॥
ह्मणौनि आणिकांसि जें विहित । आणिक आपणेया अनुचित ।
तें नाचरावें जरि हित । विचारिजे ॥ २३ ॥
एया स्वधर्मातें अनुष्टितां । जरि वेचु होईल जीविता ।
तो ही नीका वर उभयता । दीसतसे ॥ २४ ॥

## अर्जुन उवाच ॥

**अथ केन प्रयुक्तोऽयं पापं चरति पूरुषः ।**
**अनिच्छन्नपि वार्ष्णेय बलादिव नियोजितः ॥ ३६ ॥**

ऐसें समस्तसुरशिरोमणी । बोलिले जेथ शारंगपाणी ।
तेथ अर्ज्जुनु ह्मणे विनवणी । आथि देवा ॥ २५ ॥
हें जें जें तुह्मीं सांवितलें । तें सकळ किर मियां परिसिलें ।
परि आतां पूसेन काहीं आपुलें । अपेक्षित ॥ २६ ॥
तरि देवा हें कैसें । जें ज्ञानियां हीं स्थिति भ्रंशे ।
मार्गु सांडूनि अनारिसें । चालत देखों ॥ २७ ॥
सर्वज्ञ जे ही होंति । हेय उपादेय जाणति ।
ते ही परधर्मी व्यभिचरति । कवणें गुणें ॥ २८ ॥
बीजा आणिक भूसा । अंधु निवाडु नेणे कां जैसा ।
नाव येक देखणा हीं तैसा । बरळे कां पां ॥ २९ ॥

जे असता संगु सांडिति । ते चि संसर्गु करितां न धांति ।
वनवासी ही सेविति । जनपदातें ॥ २३० ॥
आपण तरि पळति । सर्वस्वें पाप चुकविति ।
परि बळिवंडें सूइजति । तेया चि माझि ॥ ३१ ॥
जेयाची घेंति विवसी । तें जडौनि ठाके जीवेंसीं ।
चुकविति ते गिंवसी । तेयाते चि ॥ ३२ ॥
ऐसा बळात्कारु एकु दीसे । तो कोणाचा एथ असे ।
हें बोलावें हृषीकेशें । पार्थु ह्मणे ॥ ३३ ॥

**श्रीभगवानुवाच ॥**

**काम एष क्रोध एष रजोगुणसमुद्भवः ।**
**महाशनो महापाप्मा विद्ध्येनमिह वैरिणम् ॥ ३७ ॥**

तवं हृदयकमळरामु । जो योगियांचा कामु ।
तो ह्मणतु असे पुरुषोत्तमु । सांघेनि आइकें ॥ ३४ ।
तरि हे कामक्रोध पाईं । जेयांतें कृपेचा सांटोवा नाहीं ।
हे कृतांताचां ठांइं । मानिजति ॥ ३५ ॥
हे ज्ञाननिधींचे भूवंग । हे विषयरानिचे वाघ ।
भजनमार्गिंचे मातंग । मारक हे ॥ ३६ ॥
हे देहदुर्गिचे डोंड । इंद्रियग्रामिचे कोंढ ।
एयांचे व्यामोहादिक धवड । जगावरि ॥ ३७ ॥
हे रजोगुणा मानेयाचे । समूळ ऐसे आग्वळिचे ।
धायेपण येयांचें । अविद्या केलें ॥ ३८ ॥
हे रजाचे किर जाले । परि तमासि पढियंते भले ।
तेणें निजपद एयांसि दीधले । प्रमादजात ॥ ३९ ॥
हे मृत्युचां हान घरीं । मानिजति निकिया परीं ।
जें जीविताचे वैरी । ह्मणौनियां ॥ २४० ॥

जियां भूकेलियां आंविसा । हें विश्व न पुरे चि घांसा ।
तिया कुळवाडि एया चि आशा । चालिजत असे ॥ ४१ ॥
कवतिकें कवलितां मुष्टि । जिये चौदा ही भुवनें थेंकुटीं ।
ते भ्रांति तियेची धाकुटी । ह्मणौनि सरे । ४२ ॥
जे लोकत्रयाचें भातुकें । फार करीति खाये कवातिकें ।
ते दासिपणाचेनि विकें । तृष्णा जिए ॥ ४३ ॥
हें असो मोहें मानिजे । एयांतें अहंकारें घेपेदीजे ।
जेणें जग आपुलि भोंजें । नाचविजत असे ॥ ४४ ॥
नेणसि सत्याचा भोकसा काढिला । मग अकृत्य तणकुटा भरिला ।
तो दंभु नव्हे रूढविला । लोकीं इहीं ॥ ४५ ॥
साध्वी शांति नागविली । माया मांगि श्रिंघारिली ।
तियेकरवि विटाळविली । इहीं साधुवृंदें ॥ ४६ ॥
एहीं विवेकाची त्राये फेडिली । वैराग्याची खाल काढिली ।
जीतेया मान मोडिली । उपशमाची ॥ ४७ ॥
इहीं संतोखवन खांडिलें । धैर्यदुर्ग पाडिलें ।
आनंदरोप सांडिलें । उपडूनियां ॥ ४८ ॥
इहीं बोधाची चोपि छ्रसिली । सुखाची लीपि पूसिली ।
चिव्हारीं आगि सूदली । तापत्रयां ॥ ४९ ॥
हे आंगा तरि घडलें । जीवीं चि आथि जडले ।
परि नांतुडति गिविसिले । ब्रह्मादिकां ॥ २५० ॥
हे चैतन्याचां सेजारीं । वसति ज्ञानाचां एकहारीं ।
ह्मणौनि प्रवर्त्तले मारीं । संवरति ना ॥ ५१ ॥
हे जळेंविण बुडलिति । आगीविण जालिति ।
न बोलत कवलिति । प्राणियांतें ॥ ५२ ॥
हे शस्त्रेंविण साधिति । दोरेंविण बांधिती ।
ज्ञानियां तरि वधीति । पैज्ञ घेउनि ॥ ५३ ॥

हे चिखलेंविण रोविति । पासिकेंविण गोंविति ।
हे कोण्हा हीं जोगे नव्हती । आंतुवटपणें ॥ ५४ ॥

**धूमेनाव्रियते वन्हिर्यथादर्शो मलेन च ।**
**यथोल्बेनावृतो गर्भस्तथा तेनेदमावृत्तम् ॥ ३८ ॥**

जैसी चंदनाची मूळी । गिंवसूनि घेपे व्याळीं ।
ना तरि उल्बाची खोळी । गर्भस्थासी ॥ ५५ ॥
कां प्रभाविण भानु । धूमेंविण हुताशनु ।
जैसा दर्पणु मळहीनु । कहीं चि नसे ॥ ५६ ॥
तैसें एहींविण एकलें । आह्मीं ज्ञान नाहीं देखिलें ।
जैसें कोंडेनियां गुंतलें । बीज निफजे ॥ ५७ ॥

**आवृतं ज्ञानमेतेन ज्ञानिनो नित्यवैरिणा ।**
**कामरूपेण कौंतेय दुःपूरेणानलेन च ॥ ३९ ॥**

तैसें ज्ञान तरि विशुद्ध । परि एहिं दीसे प्रबद्ध ।
ह्मणौनि तें अगाध । होउनि ठेलें ॥ ५८ ॥
आदिं एयातें जीणावें । मग तें ज्ञान पावावें ।
तवं एयां काहीं न प्रभवे । रागद्वेषां ॥ ५९ ॥
एयांतें साधावेया लागि । जें बळ बाणिजे आंगीं ।
तें इंधन जैसें आगी । सावाऊ होये ॥ २६० ॥

**इंद्रियाणि मनो बुद्धिरस्याधिष्ठानमुच्यते ।**
**एतैर्विमोहयत्येष ज्ञानमावृत्य देहिनम् ॥ ४० ॥**

तैसे उपाये कीजति जे जे । ते येयांसी चि होंति विरजे ।
ह्मणौनि हटियांतें जींणिजे । ईहीं चि जगीं ॥ ६१ ॥
ऐसेया ही सांकडा बोला । एकु उपाऊ असे भला ।
तो करि पां जरि आंगवला । सांघेन तुज ॥ ६२ ॥

**तस्मात्त्वमिंद्रियाण्यादौ नियम्य भरतर्षभ ।**
**पाप्मानं प्रजहि ह्येनं ज्ञानविज्ञाननाशनम् ॥ ४१ ॥**

तरि एयांचा पहिला कुरुठा इंद्रियें । जेथौनि प्रवृत्ति कर्मातें विये ।
आदीं निर्दळूनि घालीं तियें । सर्वथैव ॥ ६३ ॥
मग मनाची धावं पारुखेल । आणिक बुद्धी सोडवण होईल ।
एतुलेनि तागा एयां मोडैल । पापियांचा ॥ ६४ ॥
हे आंतरौनि जरि फीटले । तरि निभ्रांत जाण निवटले ।
जैसें रश्मीविण उरलें । मृगजळ नाहीं ॥ ६५ ॥
तैसे रागद्वेष जरि निमाले । तरि ब्रह्मिचें स्वाराज्य आलें ।
मग भोगी सुख आपुलें । आपण चि ॥ ६६ ॥

**इंद्रियाणि पराण्याहुरिंद्रियेभ्यः परं मनः ।**
**मनसस्तु परा बुद्धिर्यो बुद्धेः परतस्तु सः ॥ ४२ ॥**
**एवं बुद्धेः परं बुद्ध्वा संस्तभ्यात्मानमात्मना ।**
**जहि शत्रुं महाबाहो कामरूपं दुरासदम् ॥ ४३ ॥**

जे गुरुशिष्याची गोठी । पदपिंडाची गाठी ।
तेथ स्थिर होउनि नुठी । कव्हणी काळीं ॥ ६७ ॥
ऐसें सकल सिद्धांचा राउ । देवी लक्ष्मीयेचा नाहो ।
राया आइकें देवदेउ । बोलता जाला ॥ ६८ ॥
आतां पुनरपि तो अनंतु । आद्य एकि मातु ।
सांघेल तेथ पांडुसुतु । प्रश्नु करिल ॥ ६९ ॥
तेया बोलाचा हान पाडु । कां रसवृत्तिचा निवाडु ।
जेणें श्रोतेयां होईल सुरवाडु । श्रवणसुखाचा ॥ २७० ॥
ज्ञानदेउ ह्मणे निवृत्तिचा । चांगु उवाउ धरूनु उन्मेषाचा ।
मग हा संवादु हरिपार्थाचा । भोगां बापा ॥ २७१ ॥

ॐ तत्सदिति श्रीमद्भगवद्गीतासूपनिषत्सु ब्रह्मविद्यायां
योगशास्त्रे श्रीकृष्णार्जुनसंवादे **कर्मयोगो**
नाम तृतीयोध्यायः ॥

॥ श्रीकृष्णार्पणमस्तु ॥

# ज्ञानेश्वरी

## अध्याय चौथा.

आजि श्रवणेंद्रिया पीकलें । जेणें हें गीतानिधान देखिलें ।
आतां स्वप्न चि हें तूकलें । साचा सरिसें ॥ १ ॥
आदी चि विवेकाची गोठी । वरि प्रतिपदी कृष्णु जगजेठी ।
आणि भक्तराजु किरीटी । परिसतसे ॥ २ ॥
जैसा पंचमालापु सुगंधु । कि परिमलु आणि सुस्वादु ।
भला जाला विनोदु । कथेचा इये ॥ ३ ॥
कैसी आगळीक दैवांची । जें गंगा जोडली अमृताची ।
हो काज तपें श्रोतेयांचीं । फळा आलीं ॥ ४ ॥
आतां इंद्रियजात आघवें । तेणें श्रवणाचें घर रिगावें ।
मग संवादसुख भोगावें । गीताख्य हें ॥ ५ ॥
हा अतिशयो अतिप्रसंगें । सांडूनि कथा चि ते सांघें ।
जें कृष्णार्जुन दोघे । बोलत होते ॥ ६ ॥
तेव्हळि संजयो रायातें ह्मणे । अर्जुनु अधिष्ठिला दैवगुणें ।
जें अतिप्रीती नारायणें । बोलिजत असे ॥ ७ ॥
देवी लक्ष्मी यतुली जवळिक । परि तेही यया प्रेमाचें नेदखे चि सुख ।
आजि कृष्णस्नेहाचें पीक । ययातें चि आथि ॥ ८ ॥
सनकादिकांचिया दुरासा । वाढिनलेया किर बहुवसा ।
परि तियाही येणें मानें एसा । येती चि ना ॥ ९ ॥

यया जगदीश्वराचें प्रेम । येथ दीसतसे निरूपम ।
कैसें पार्थें येणें सर्वोत्तम । पुण्य केलें ॥ १० ॥
हो काज येयाचेया प्रीती । हा अमूर्तु आला व्यक्ती ।
मज येकवंकिचिया स्थिती । आवडतसे ॥ ११ ॥
यऱ्हवीं योगियां नाडले । वेदार्थासि नाकळे ।
जेथ ध्यानाचे डोळे । पावतिना ॥ १२ ॥
तें हा स्वरूप । जें अनादि निष्कंप ।
परि कवणें मानें सकृप । जाला असे ॥ १३ ॥
हा त्रैलोक्यपटाची घडी । आकाराची पैल थडी ।
आइकैं कैसा ययाचिया आवडी । आवरला असे ॥ १४ ॥

**श्रीभगवानुवाच ॥**

**इमं विवस्वते योगं प्रोक्तवानहमव्ययम् ।**
**विवस्वान् मनवे प्राह मनुरिक्ष्वाकवेऽब्रवीत् ॥ १ ॥**

मग ह्मणे पांडुसुता । हा चि योगु आह्मीं विवस्वता ।
कथिला परि ते वार्त्ता । बहुतां दिसांची ॥ १५ ॥
मग तेणें विवस्वतें रवी । हे चि योगस्थिति आघवी ।
निरोपिली बरवी । मनूप्रति ॥ १६ ॥
मनू आपण अनुष्ठिली । मग इक्ष्वाकुसि उपदेशिली ।
ऐसी परंपरा विस्तारली । आद्य हे ॥ १७ ॥

**एवं परंपराप्राप्तमिमं राजर्षयो विदुः ।**
**सकालेनेह महता योगो नष्टः परंतप ॥ २ ॥**

मग आणिक हीं या योगातें । राजर्षी जाले जाणते ।
परि तेथौनि आतां सांप्रतें । नेणिजे हा ॥ १८ ॥
जें प्राणियां कामीं भरु । देहा चि वरि आदरु ।
बहुत करूनि विसरु । आत्महिताचा ॥ १९ ॥
अविट नाथिली आस्थाबुद्धि । विषयसुख चि परमावधी ।

जीउ तैसा उपाधि । आवडे लोकां ॥ २० ॥
यऱ्हविं तऱ्ही खवणेयाचां गावीं । पाटाउवें काइ करावीं ।
सांघैं जात्यंधा रवि । काजा आथि ॥ २१ ॥
कां बहिरांचिये आस्थानीं । कऱ्हणं गीतातें हानमानी ।
कीं कोल्हेयां चंदनीं । आवडि उपजे ॥ २२ ॥
पैं चंद्रोदया आरौते । जेयांचे डोले फूटति असते ।
ते काउले केवि चंद्रातें । उळखति ॥ २३ ॥
तैसी वैराग्याची सीवं नेदखति । जे विवेकाची भाष नेणति ।
ते मूर्ख केवि पावती । ईश्वरातें ॥ २४ ॥
कैसा नेणों मोहो वाढीनला । तेणें बहुते येकु वेलु गेला ।
ह्मणौनि योगु हा लोपला । लोकीं इये ॥ २५ ॥

स एवायं मया तेऽद्य योगः प्रोक्तः पुरातनः ।
भक्तोऽसि मे सखा चेति रहस्यं ह्येतदुत्तमम् ॥ ३ ॥

तो चि हा आजि आतां । तुजप्रती कुंतीसुता ।
सांघितला आह्मीं तत्वता । भ्रांति न करीं ॥ २६ ॥
हें जीविचें गा गुज । परि न ऱ्हाइजे चि तूज ।
जें पढियंसि तूं मज । ह्मणौनियां ॥ २७ ॥
तूं प्रेमाचा पूतला । भक्तिचा जीवाला ।
मैत्रियेची कला । धनुर्द्धरा ॥ २८ ॥
तूं अनुसंगाचा ठाउ । आतां तुज काइ राहों ।
जऱ्हीं संग्रामारूढ आहों । जालों आह्मीं ॥ २९ ॥
तऱ्हीं नावेक हें साहावें । गाजावज्य ही धरावें ।
परि तूझें अज्ञानतत्व हरावें । लागे आह्मीं ॥ ३० ॥

**अर्जुन उवाच ॥**

अपरं भवतो जन्म परं जन्म विवस्वतः ।
कथमेतद्विजानीयां त्वमादौ प्रोक्तवानिति ॥ ४ ॥

तवं अर्जुनु ह्मणे हरी । माये आपुलेयाचा स्नेहो करी ।
एथ विस्मयो काइ अवधारीं । कृपानिधी ॥ ३१ ॥
तूं सर्वसारश्रांताची साउली । अनाथांची माउली ।
आमतें किर प्रसवली । तूझी चि कृपा ॥ ३२ ॥
देवा पांगूळ एकाधें वीजे । तरि जन्मौनि जोजारु साहिजे ।
हें बोलों काइ तूझें । तुज चि पुढां ॥ ३३ ॥
आतां पूसेन जें मीं काहीं । तेथ नीकें चित्त देईं ।
तेवि चि देवें कोपावें नाहीं । बोला एका ॥ ३४ ॥
तरि मागीलकी जे वार्त्ता । तुवां सांघितली होती अनंता ।
ते नावेक मज चित्ता । येचिना ॥ ३५ ॥
जें तो विवस्वतु ह्मणिजे काइ । ऐसें हें वडिलां हीं ठाउवें नाहीं ।
तरि तुवां चि केवि पाईं । उपदेशिला ॥ ३६ ॥
तो आइकिजे बहुतां कालांचा । आणि तूं तवं कृष्णा सांपेचा ।
ह्मणौनि गा इये मातूचा । विसंवादु ॥ ३७ ॥
तेवि चि चरित्र देवा तूझें । आपण काहीं नेणिजे ।
हें लटिकें केवि ह्मणिजे । येकी हेलां ॥ ३८ ॥
परि हे चि मातु आवघी । मी परिसें तैसी सांघावी ।
जें तुवां चि तेया रवी । उपदेशु केला ॥ ३९ ॥

**श्रीभगवानुवाच ॥**

> **बहूनि मे व्यतीतानि जन्मानि तव चार्जुन ।**
> **तान्यहं वेद सर्वाणि न त्वं वेत्थ परंतप ॥ ५ ॥**

तवं कृष्णु ह्मणे पांडुसुता । तो वैवस्वतु जैं होता ।
तें आह्मी नसों ऐसी चिंता । प्रतीति तुज ॥ ४० ॥
तरि तूं गा हें नेणसी । पैं जन्में आह्मां तुझांसि ।
बहूतें गेलीं परि न स्मरसी । आपुलीं तूं ॥ ४१ ॥

मी जेणें जेणें अवसरें । जें जें होउनि अवतरें ।
तें समस्त हीं स्मरें । धनुर्द्धरा ॥ ४२ ॥
ह्मणौनि हें आघवें । मागील मज आठवे ।
मी अजुही परि संभवें । प्रकृतियोगें ॥ ४३ ॥

**अजोऽपि सन्नव्ययात्मा भूतानामीश्वरोऽपि सन् ।**
**प्रकृतिं स्वामधिष्ठाय संभवाम्यात्ममायया ॥ ६ ॥**

माझें अव्यक्तत्व न नशे । परि होणें जाणें एक दीसे ।
तें प्रतिबिंबे मायावशें । स्वस्वरूपीं ॥ ४४ ॥
माझी स्वतंत्रता न मोडे । परि कर्माधीनु ऐसा आवडे ।
तें हीं भ्रांतिबुद्धी तरि घडे । यन्हविं नाहिं ॥ ४५ ॥
जें येक चि दीसे दुसरें । तें दर्पणाचेनि आधारें ।
यन्हविं काइ वस्तुविचारें । दूजें आहे ॥ ४६ ॥
तैसा अमूर्तु चि मीं किरीटी । परि प्रकृतितें जैं अधिष्ठीं ।
तैं साकारपण नटीं । काजा येया ॥ ४७ ॥

**यदा यदा हि धर्मस्य ग्लानिर्भवति भारत ।**
**अभ्युत्थानमधर्मस्य तदात्मानं सृजाम्यहम् ॥ ७ ॥**

जें धर्मजात आघवें । युगीं युगीं मियां चि रक्षावें ।
ऐसा ओघु हा स्वभावें । आद्यु असे ॥ ४८ ॥
ह्मणौनि अजत्व परौतें ठेवीं । मीं अव्यक्तपण हीं नाठवीं ।
जेव्हलि धर्मातें अभिभवी । अधर्मु हा ॥ ४९ ॥
तेव्हलि आपुलेयाचेनि कैवारें । मी साकारु होउनि अवतरें ।
मग अज्ञानाचें आंधारें । गीळूनि घाली ॥ ५० ॥

**परित्राणाय साधूनां विनाशाय च दुष्कृताम् ।**
**धर्मसंस्थापनार्थाय संभवामि युगेयुगे ॥ ८ ॥**

अधर्माची अवधि तोडीं । दोषांचें लिहिलें फेडीं ।
सज्जनाकरवि गुढी । उभवीं मीं ॥ ५१ ॥

दैत्यांचीं कुळें नाशीं । साधूचा मानु गिवसीं ।
धर्मासि नीतीसीं । सेस भरीं ॥ ५२ ॥
मी अविवेकाची काजळी । फेडूनि विवेकुदीपु उजळीं ।
तैं योगियां पाहे दिवाळी । निरंतर ॥ ५३ ॥
स्वसुखें विश्व कोंदे । धर्माचें जगीं नांदे ।
भक्तांसि होंति दोंदें । सात्विकाचीं ॥ ५४ ॥
तैं पापाचा अचळु फीटे । पुण्याची पाहाट फूटे ।
जैं मूर्त्ति माझी प्रकटे । पांडुकुमरा ॥ ५५ ॥
येयां ऐसेयां काजालागि । अवतरिजें गा युगीं युगीं ।
परि हें चि वोळखे जो जगीं । तो विवेकिया ॥ ५६ ॥

**जन्मकर्मच मे दिव्यमेवं यो वेत्ति तत्वतः ।**
**त्यक्त्वा देहं पुनर्जन्म नैति मामेति सोऽर्जुन ॥ ९ ॥**

माझें अजत्व जन्मणें । अक्रियता चि करणें ।
अविकार जो जाणे । तो मुक्त मानीं ॥ ५७ ॥
तो चालिला संगें न चळे । देहिचा देहा नाकळे ।
मग पंचत्वीं तत्वं मिळे । माझां चि रूपीं ॥ ५८ ॥

**वीतरागभयक्रोधाः मन्मया मामुपाश्रिताः ।**
**बहवो ज्ञानतपसा पूता मद्भावमागताः ॥ १० ॥**

यऱ्हवीं तऱ्हीं परापर न शोचिति । जे कामनाशून्य होंती ।
वाटा केऱ्हांहि न वचति । क्रोधाचिये ॥ ५९ ॥
जे मियां सदा आथिले । माझियाचि सेवा जियाले ।
कां आत्मबोधें तोखले । वीतराग ॥ ६० ॥
जे तपोतेजाचे राशी । कां येकायतन ज्ञानासी ।
जे पवित्रता तीर्थासि । तीर्थरूप ॥ ६१ ॥
ते मद्भावा साहाजें आले । मी ते चि होऊनि ठेले ।
जें मज तेयां उरलें । पदर नाहीं ॥ ६२ ॥

सांधें पितळेची गंधिकाळिक । फीटली होये निःशेष ।
तैं सुवर्णवाइ आणिक । जोडूं जाइजे ॥ ६३ ॥
तैसे यमनियमीं कडसले । जे तपोज्ञानीं चोखाळले ।
ते मी ते चि जाले । एथ संशयो काइसा ॥ ६४ ॥

**ये यथा मां प्रपद्यंते तांस्तथैव भजाम्यहं ।**
**मम वर्त्माऽनुवर्तंते मनुष्याः पार्थ सर्वशः ॥ ११ ॥**

यऱ्हवीं तऱ्हीं पाहीं । जे जैसे माझां ठांईं ।
भजति तेयां मीं हीं । तैसाचि भजें ॥ ६५ ॥
देखैं मनुष्यजात सकळ । हें स्वभावता चि भजनशील ।
जालें असे केवळ । माझां ठांईं ॥ ६६ ॥

**कांक्षंतः कर्मणां सिद्धिं यजंत इह देवताः ।**
**क्षिप्रं हि मानुषे लोके सिद्धिर्भवति कर्मजा ॥ १२ ॥**

परि ज्ञानेंविण नाशलें । जें बुद्धिभेदासि आलें ।
तेणें एकीं कल्पलें । अनेकत्व ॥ ६७ ॥
ह्मणोनि अभेदा भेदु देखति । अनामा नामें ठेविति ।
देवो देवी ह्मणती । अवाच्यातें ॥ ६८ ॥
जें सर्वत्र सदा सम । तेथ विभाग अधमोत्तम ।
मतिवसें संभ्रम । विवंचिती ॥ ६९ ॥
मग नाना हेतूप्रकारें । यथोचितें उपचारें ।
मानलीं देवतांतरें । उपासिति ॥ ७० ॥
तेथ जें जें काहीं अपेक्षित । तें तैसेंचि पावती समस्त ।
परि तें कर्मसिद्ध निश्चित । ओळख तूं ॥ ७१ ॥
वांचूनि देतें घेतें आणिक । निभ्रांत नाहीं सम्यक ।
येथ कर्म चि फळसूचक । मनुष्यलोकीं ॥ ७२ ॥
जैसें क्षेत्रीं जें पेरिजे । तें वाचोनि आन न निफजे ।
कां पाहिजे तें चि देखिजे । दर्पणाधारें ॥ ७३ ॥

ना तरि कडेयासि तळवटीं । जैसा आपुला चि बोलु किरीटी ।
पडिसादा होउनि उठी । निमित्तयोगें ॥ ७४ ॥
तैसा समस्तां यां भजनां । मी साक्षिभूतु अर्जुना ।
येथ प्रतिफळे ते भावना । आपुलाली ॥ ७५ ॥

**चातुर्वर्ण्यं मया सृष्टं गुणकर्मविभागशः ।**
**तस्य कर्तारमपि मां विद्ध्यकर्तारमव्ययम् ॥ १३ ॥**

आतां ययाचि परीं जाण । हे च्यारही वर्ण ।
सृजिले मियां गुण– । कर्मविभागें ॥ ७६ ॥

**न मां कर्माणि लिंपंति न मे कर्मफले स्पृहा ।**
**इति मां योऽभिजानाति कर्मभिर्न स बध्यते ॥ १४ ॥**

हें मज चि तव जालें । परि मियां नाहीं केलें ।
ऐसें साचें जेणें देखिलें । तो सूटला गा ॥ ७७ ॥

**एवं ज्ञात्वा कृतं कर्म पूर्वैरपि मुमुक्षुभिः ।**
**कुरु कर्मैव तस्मात्त्वं पूर्वैः पूर्वतरं कृतम् ॥ १५ ॥**

जें प्रकृतिचेनि आधारें । गुणाचेनि व्यभिचारें ।
कर्में तदनुसारें । विवंचलिं ॥ ७८ ॥
येथ येक चि हें धनुष्पाणी । परि जालें गा चहूवर्णी ।
ऐसी गुणकर्मि कडसणी । केली साहाजें ॥ ७९ ॥
ह्मणौनि आइकें पार्था । हे वर्णभेद संस्था ।
मी करिता नोहें सर्वथा । तें यया चि हेतू ॥ ८० ॥
मागील मुमुक्ष जे होते । तिहीं ऐसें चि जाणोनियां मातें ।
कर्में केलीं समस्तें । धनुर्द्धरा ॥ ८१ ॥
परि तियें बीजें जैसीं दग्धलीं । कां नुगवती चि पेरिलीं ।
तैसिं कर्में चि तेयां जालीं । मोक्षहेतू ॥ ८२ ॥

**किं कर्म किमकर्मेति कवयोऽप्यत्र मोहिताः ।**
**तत्ते कर्म प्रवक्ष्यामि यज्ज्ञात्वा मोक्ष्यसेऽशुभात् ॥ १६ ॥**

येथ आणिक ही एक अर्जुना । हे कर्माकर्मविवंचना ।
आपुलिये चाडे सज्ञाना । योग्य नव्हे ॥ ८३ ॥
कर्म ह्मणिजे तें कवण । अथवा अकर्मा काय लक्षण ।
ऐसें विचारितां विचक्षण । गुंपौनि ठेले ॥ ८४ ॥
जैसें कां कुडें नाणें । खरेयाचेनि सारिखेपणें ।
डोळेयांचें हीं पाहाणें । संशइं घाली ॥ ८५ ॥
तैसें नैष्कर्म्यतेचेन भ्रमें । गिवंसिजत आहाति कर्मे ।
जिहीं दूजी श्रृष्टी मनोधर्मे । करूं शकती ॥ ८६ ॥
वांचूनि मूर्खांची गोठि काइसी । एथ मोहल्ले गा क्रांतदर्शी ।
ह्मणौनि तेंचि आतां परिहसैं । सांघैन तुज ॥ ८७ ॥

**कर्मणोह्यपि बोद्धव्यं बोद्धव्यं च विकर्मणः ।**
**अकर्मणश्च बोद्धव्यं गहना कर्मणो गतिः ॥ १७ ॥**

तरि हें कर्म ह्मणिजे स्वभावें । जेणें हा विश्वाकारु संभवे ।
तें साविव आदीं जाणावें । लागे एथ ॥ ८८ ॥
मग वर्णाश्रमासि उचित । जें विशेष कर्म विहित ।
तें ही ओलखावें निश्चित । उपेगेंसीं ॥ ८९ ॥
पाठिं जें निषिद्ध ह्मणिपे । तें ही बुझावें स्वरूपें ।
येतुलेनि येथ काहीं न गूंपे । आपैसें चि ॥ ९० ॥
यऱ्हवि जग हें कर्माधीन । ऐसी व्याप्ति याची गहन ।
परि तें असो आइकें चिन्ह । प्राप्ताचें ॥ ९१ ॥

**कर्मण्यकर्म यः पश्येदकर्मणि च कर्म यः ।**
**स बुद्धिमान् मनुष्येषु स युक्तः कृत्स्नकर्मकृत् ॥ १८ ॥**

जो सकळ कर्मि वर्त्ततां । देखे निष्कर्मता ।
कर्मसंगें निरासता । फळाचिया ॥ ९२ ॥
आणि कर्तव्यते लागि । जेया दूसरें नाहिं जगिं ।
ऐसी नैष्कर्म्यता तरि चांगी । बोधला असे ॥ ९३ ॥

**यस्य सर्वे समारंभाः कामसंकल्पवर्जिताः ।**
**ज्ञानाग्निदग्धकर्माणं तमाहुः पंडितं बुधाः ॥ १९ ॥**

पारि क्रियाकलापु आघवा । आचरतु दीसे बरवा ।
तारि तो इहीं चिन्हीं जाणावा । ज्ञानियां गा ॥ ९४ ॥
जैसा जो जळापासिं उभा ठाके । तो जऱ्हीं आपणपें जळामाजि देखे ।
तऱ्हीं निभ्रांत ओळखे । ह्मणे मीं वेगळा आहें ॥ ९५ ॥
अथवा नावे हान रिगे । तो थडियेचे रुखजात देखे वेगें ।
साचोकारें पाहों लागे । तवं रुख ह्मणे अचळ ॥ ९६ ॥
तैसें सकळ कर्मीं असणें । तें फुडें मानूनिया वायाणें ।
मग आपणपां जो जाणे । नैष्कर्म्यता ॥ ९७ ॥
आणि उदोअस्तूचेनि प्रमाणें । जैसें न चळतां सूर्या चाळणें ।
तैसें नैष्कर्म्यत्वीं जाणे । कर्म जो गा ॥ ९८ ॥
तो मनुष्यासारिखा आवडे । परि मनुष्यत्व तेयासि न घडे ।
जैसें जळाधारें न बुडे । भानुबिंब ॥ ९९ ॥
तेणें न पांतां विश्व देखिलें । न कारितां सर्व केलें ।
न भोगितां भोगिलें । भोग्यजात ॥ १०० ॥
येके ठांइं बैसला । परि सर्वत्र तो चि गेला ।
हें असो विश्व जाला । देहें चि तो ॥ १ ॥
जेया पुरुषाचां ठांइं । कर्माचा तारि खेदु नाहीं ।
पारि फळापेक्षा काहीं । संचरेना ॥ २ ॥
आणि हें कर्म मी करीन । अथवा आदरिलें सिद्धी नेईन ।
येणें संकल्पें हीं जेयाचें मन । विटाळे ना ॥ ३ ॥
ज्ञानाग्नीचेनि मुखें । जेणें जाळिलीं कर्मे अशेषें ।
तो ब्रह्मचि मनुष्यवेखें । ओळख तूं ॥ ४ ॥

**त्यक्त्वा कर्मफलासंगं नित्यतृप्तो निराश्रयः ।**
**कर्मण्यभिप्रवृत्तोऽपि नैव किंचित् करोति सः ॥ २० ॥**

जो शरीरीं उदासु । फलाभोगीं निरासु ।
नित्यता उल्हासु । होउनि असे ॥ ५ ॥
जो संतोषाचा गाभारां । आत्मबोधाचेया अगरा ।
पुरे न ह्मणे चि धनुर्द्धरा । आरोगितां ॥ ६ ॥
कैसा अधिकाधीक आवडी । घेंत महासुखाची गोडी ।
सांडौनि आशां सींकु खंडी । अहंभावाची ॥ ७ ॥

**निराशीर्यतचित्तात्मा त्यक्तसर्वपरिग्रहः ।**
**शारीरं केवलं कर्म कुर्वन्नाप्नोति किल्बिषम् ॥ २१ ॥**

ह्मणौनि अवसरें जें जें पावे । तेणें चि तो सुखावे ।
जेया आपुलें आणि परावें । दोन्ही नाहीं ॥ ८ ॥
तो दीठी जें पाहे । तें आपण चि होउनि जाये ।
आइके तें आहे । तो चि जाला ॥ ९ ॥
चरणीं हान चाले । कां मुखें जें जें बोले ।
ऐसें चेष्टाजात तेतुलें । आपण चि जो ॥ ११० ॥

**यदृच्छा लाभसंतुष्टो द्वंद्वातीतो विमत्सरः ।**
**समः सिद्धावसिद्धौ च कृत्वापि न निबद्ध्यते ॥ २२ ॥**

हें असो विश्वें पाइं । जेया आपणपें वांचूनि नाहीं ।
कर्म तें कवण काइ । बाधी तेयातें ॥ ११ ॥
आणि हा मत्सरु जेथ उपजे । तें नुरे चि तेया दूजें ।
तो निर्मत्सरु काइ ह्मणिजे । बोलवरी ॥ १२ ॥

**गतसंगस्य मुक्तस्य ज्ञानावस्थितचेतसा ।**
**यज्ञायाचरतः कर्म समग्रं प्रविलीयते ॥ २३ ॥**

ह्मणौनि सर्वा परीं जो मुक्तु । तो सकर्मु चि कर्मरहितु ।
सगुणु परि गुणातीतु । येथ भ्रांति नाहीं ॥ १३ ॥
तो देहसंगें तरि असे । परि चैतन्या सारिखा दीसे ।
पाहांतां परब्रह्माचेनि कसें । चोखालु भला ॥ १४ ॥

ऐसा ही तो कवतिकें । जरि कर्म करी यज्ञादिकें ।
तरि तियें लया जांति अशेषें । तेयाचां चि ठांइं ॥ १५ ॥
अकाळिचीं अभ्रें जैसीं । ऊर्मीवीण आकाशीं ।
हारपति आपैसीं । उदेलीं सांतीं ॥ १६ ॥
तेसिं विधिविधानरहितें । जन्हीं आचरला तो समस्तें ।
तन्हीं तियें ऐक्यभावें ऐक्यातें । पावतील ॥ १७ ॥
जें हें हवन मी होता । कां इये यज्ञीं हा भोक्ता ।
ऐसी बुद्धीसि नाहीं भिन्नता । ह्मणौनियां ॥ १८ ॥
जें यष्टा यज्ञ यजावें । ते हविमंत्रादीक आघवें ।
तो देखे अविनाभावें । आत्मबुद्धी ॥ १९ ॥

**ब्रह्मार्पणं ब्रह्म हविर्ब्रह्माग्नौ ब्रह्मणा हुतं ।**
**ब्रह्मैव तेन गंतव्यं ब्रह्मकर्मसमाधिना ॥ २४ ॥**

ह्मणौनि ब्रह्म तें चि कर्म । ऐसें बोधा आलें जेया सम ।
तेया कर्तव्य तें नैष्कर्म्य । धनुर्द्धरा ॥ १२० ॥
आतां अविवेककुमारत्वा मूकलें । जेयां विरक्तीचें पाणिग्रहण जालें ।
मग उपासन जिहिं आणिलें । योगाग्नीचें ॥ २१ ॥
जे यजनशील अहर्निशीं । जिहीं अविद्या हवीली मनेंसीं ।
गुरुवाक्य हुताशीं । हवन केलें ॥ २२ ॥
तिहीं योगाग्नींकिं यजिजे । तो दैवयज्ञु बोजे ।
तेथ आत्मसुख कामिजे । पांडुकुमरा ॥ २३ ॥

**दैवमेवापरे यज्ञं योगिनः पर्युपासते ।**
**ब्रह्माग्नावपरे यज्ञं यज्ञेनैवोपजुव्हति ॥ २५ ॥**

आतां अवधारीं सांवैन आणिक । जे ब्रह्माग्निक साग्निक ।
तेयांतें यज्ञें चि यज्ञु देख । उपासिजे ॥ २४ ॥
एक संयमाग्नी होत्रीं । ते युक्तित्रयाचां मंत्रीं ।
यजन करिति पवित्रीं । इंद्रियद्रव्यीं ॥ २५ ॥

**श्रोत्रादीनींद्रियाण्यन्ये संयमाग्निषु जुव्हति ।**
**शब्दादीन् विषयानन्ये इंद्रियाग्निषु जुव्हति ॥ २६ ॥**

एकां वैराग्यरवी विवळलें । तवं संयती विहार केले ।
तेथ अपावृत जाले । इंद्रियानळ ॥ २६ ॥
तिहिं विरक्तिची ज्वाला घेतली । तवं विकारांचीं इंधनें पळिपलीं ।
तेथ आशाधूमें सांडिलीं । पांचै कुंडें ॥ २७ ॥
मग वाक्यविधीचिया निरिविडी । विषयाहुती उदंडीं ।
हवन केलें कुंडीं । इंद्रियाग्नीचां ॥ २८ ॥

**सर्वाणींद्रियकर्माणि प्राणकर्माणि चापरे ।**
**आत्मसंयमयोगाग्नौ जुव्हति ज्ञानदीपिते ॥ २७ ॥**

येकिं यियाचि परीं पार्था । दोप क्षपिले सर्वथा ।
आणिकीं हृदयारणीं मंथा । विवेकु केला ॥ २९ ॥
तो उपशमीं निहिटिला । धैर्यें वरी दाटिला ।
गुरुवाक्यें काढिला । बळिकटपणें ॥ १३० ॥
ऐसें समरसें मथन केलें । तेथ झडकरी काजा आलें ।
जें उर्जीवन जालें । ज्ञानाग्नीचें ॥ ३१ ॥
पहिला रिद्धीसिद्धीचा संभ्रमु । तो निवर्त्तोनि गेला धूमु ।
मग प्रकटला सूक्ष्मु । विस्फुलिंगु ॥ ३२ ॥
तेया मनाचें मोकळें । पेटवण घातलें ।
जें यमनियमीं हळुवारलें । आइतें होतें ॥ ३३ ॥
तेणें सांधुक्षणें ज्वाला समृद्धा । तेथ वासनांतराचिया समिधा ।
स्नेहेंसि विविधा । जालीलीया ॥ ३४ ॥
मग सोहंमंत्रीं दीक्षितिं । इंद्रियकर्माचिया आहुती ।
तिये ज्ञानानळीं प्रदीप्तीं । दीधलिया ॥ ३५ ॥
पाठिं प्राणक्रियेचेन स्रुवेनसीं । पूर्णाहुति पडिली हुताशीं ।
तेथ अवभृथ समरसीं । साहाजें जालें ॥ ३६ ॥

मग आत्मबोधिचें सुख । तें जैसें संयमाग्नीचें शेष ।
तो चि पुरोडाशु देख । घेतला तिहिं ॥ ३७ ॥
येक ऐसां यजनीं । मुक्त जाले गा त्रिभुवनीं ।
इया यज्ञक्रिया तारं आनानीं । परि प्राप्य तें एक ॥ ३८ ॥

**द्रव्ययज्ञास्तपोयज्ञा योगयज्ञास्तथापरे ।**
**स्वाध्यायज्ञानयज्ञाश्च यतयः संशितव्रताः ॥ २८ ॥**

येक द्रव्ययज्ञ ह्मणपती । एक तपसामग्रिया निफजति ।
येक योगयाग ही आहाती । जे सांवीतले ॥ ३९ ॥
येकिं शद्वीं शद्व चि यजिजे । तो वाग्यज्ञु ह्मणिजे ।
ज्ञानें ज्ञेय गमिजे । तो ज्ञानयज्ञु ॥ १४० ॥
हें अर्जुना सकळ कुवाडें । जें अनुष्ठितां अति सांकडें ।
पारे जितेंद्रियांसी चि वडे । योग्यतावसें ॥ ४१ ॥
ते प्रवीण येथ भले । योगसमृद्धी आथिले ।
ह्मणौनि आपणपां तिहीं केलें । आत्महवन ॥ ४२ ॥

**अपाने जुव्हति प्राणं प्राणेऽपानं तथापरे ।**
**प्राणापानगती रुद्ध्वा प्राणायामपरायणाः ॥ २९ ॥**

एक अपानाग्नीचां मुखीं । प्राणद्रव्यें देखैं ।
हवन केलें एकीं । अभ्यासयोगें ॥ ४३ ॥
एक अपानु प्राणीं अर्पिती । एक दोहींतें ही निरुंधिती ।
ते प्राणायामी ह्मणिपती । पांडुकुमरा ॥ ४४ ॥

**अपरे नियताहाराः प्राणान्प्राणेषु जुव्हति ।**
**सर्वेऽप्येते यज्ञविदो यज्ञक्षपितकल्मषाः ॥ ३० ॥**

येक वज्रयोगक्रमें । सर्वाहारसंयमें ।
प्राणीं प्राणु संभ्रमें । हवन करिती ॥ ४५ ॥
ऐसे मोक्षकाम सकळ । समस्त हे यजनशीळ ।
जिहीं यज्ञद्वारीं मळ । क्षाळन केले ॥ ४६ ॥

**यज्ञशिष्टामृतभुजो यान्ति ब्रह्मसनातनम् ।**
**नायं लोकोऽस्त्ययज्ञस्य कुतोऽन्यः कुरुसत्तम ॥ ३१ ॥**

जेयां अविद्याजात आकलितां । जें उरलें निज स्वभावता ।
तेथ अग्नि आणि होता । उरोचिना ॥ ४७ ॥
जेथ यजितेयाचा कामु पुरे । यज्ञीचें विधान सरे ।
माघौतें जेथौनि ओसरे । क्रियाजात ॥ ४८ ॥
विचार जेथ न रिगे । हेतु जेथ नेघे ।
जें द्वैतदोषसंगें । सिंपे चि ना ॥ ४९ ॥
ऐसें अनादिसिद्ध चोखट । जें ज्ञानयज्ञांत्रशिष्ट ।
तें ते सेविति ब्रह्मनिष्ट । ब्रह्माहमंत्रें ॥ १५० ॥
ऐसे सेखामृतें धाले । कीं अमृतभावासि आले ।
ह्मणौनि ब्रह्म ते जाले । अनायासें ॥ ५१ ॥
एरां विरक्ती माल न घली चि । जेयां संयमाग्नीची सेवा न घडे चि ।
जे योगयागु ही न कारिती चि । जन्मले सांते ॥ ५२ ॥
एयां ऐहिक ही एक धड नाहीं । मग परत्रीक सांघिजैल काइ ।
ह्मणौनि असो हे गोठि पाइं । पांडुकुमरा ॥ ५३ ॥

**एवं बहुविधा यज्ञा वितता ब्रह्मणो मुखे ।**
**कर्मजान्विद्धि तान्सर्वानेवं ज्ञात्वा विमोक्ष्यसे ॥ ३२ ॥**

ऐसे बहुतीं परीं अनेग । जे सांवितले कां याग ।
ते विस्तारूनि वेदें चांग । ह्मणितले आहाति ॥ ५४ ॥
परि तेणें विस्तारें काइ करावें । हे कर्मसिद्ध जाणावें ।
एतुलेनि कर्मबंधु स्वभावें । पावैल ना ॥ ५५ ॥
अर्जुना वेदु जेहाचें मूल । जें क्रियाविशेषें स्थूल ।
जेयां नव्हालियेचें फल । स्वर्गसुख ॥ ५६ ॥

**श्रेयान्द्रव्यमयाद्यज्ञाज्ज्ञानयज्ञः परंतप ।**
**सर्वं कर्माखिलं पार्थ ज्ञाने परिसमाप्यते ॥ ३३ ॥**

ते द्रव्ययाग किर होंती । परि ज्ञानयज्ञाची सरी न पवती ।
जेवि तारातेज संपती । दिनकरेंसीं ॥ ५७ ॥
देखें परमात्मसुखनिधान । साधावेया योगीजन ।
जें न विसंभति अंजन । उन्मेखनेत्रीं ॥ ५८ ॥
जें धावंतेया कर्माची लाणि । नैष्कर्म्य बोधाची खाणि ।
जें भूकेलेयां धणि । साधनाची ॥ ५९ ॥
जेथ प्रवृत्ति पांगुळ जाली । तर्कांचि दृष्टि गेली ।
जेणें इंद्रियें विसरलीं । विषयसंगू ॥ १६० ॥
मनाचें मनपण गेलें । जेथ बोलांचें बोलणें ठेलें ।
जेयामाजि सांपडलें । ज्ञेय दीसे ॥ ६१ ॥
जेथ वैराग्याचा पांगु फीटे । विवेकाचा ही सोसु तूटे ।
जें न पांतां साहाजें भेटे । आपणां पैं ॥ ६२ ॥

**तद्विद्धि प्रणिपातेन परिप्रश्नेन सेवया ।**
**उपदेक्ष्यंति ते ज्ञानं ज्ञानिनस्तत्वदर्शिनः ॥ ३४ ॥**

तें ज्ञान पैं गा बरवें । जैं मनीं आथि जाणावें ।
तैं संतां ययां भजावें । सर्वस्वेंसीं ॥ ६३ ॥
जेयांचा ज्ञानकुरुठा । तेथ साधुसेवा हो दारवठा ।
तो स्वाधीनु करीं सूभटा । उल्लगौनि ॥ ६४ ॥
जारि तनुमनुजीवें । विचारासि लागावें ।
आणि अगर्वता करावें । दास्य सकळ ॥ ६५ ॥

**यज्ज्ञात्वा न पुनर्मोहमेवं यास्यसि पांडव ।**
**येन भूतान्यशेषेण द्रक्ष्यस्यात्मन्यथो मयि ॥ ३५ ॥**

मग अपेक्षित जें आपुलें । तें ही सांगतील पूसिलें ।
जेणें अंतःकरण बोधलें । संकल्पा नेये ॥ ६६ ॥
जेहाचेनि उजीवडें । जालें चित्त निभ्रडें ।
ब्रह्माचेनि पाडें । निशंक होईल ॥ ६७ ॥

तेव्हलि आपणपेंन सहितें । यें अशेषें हीं भूतें ।
माझां स्वरूपीं अखंडितें । देखसी तूं ॥ ६८ ॥
ऐसें ज्ञानप्रकाशें पाहिल । तैं मोहांधकारु जाइल ।
जैं गुरुकृपा होइल । पार्था गा ॥ ६९ ॥

**अपि चेदसि पापेभ्यः सर्वेभ्यः पापकृत्तमः ।**
**सर्वं ज्ञानप्लवेनैव वृजिनं संतरिष्यसि ॥ ३६ ॥**

जर्‍हीं कल्मषांचा आगरु । तूं भ्रांतिचा सागरु ।
व्यामोहाचा डोंगरु । होउनि आहासि ॥ १७० ॥
तर्‍हीं ज्ञानशक्तीचेन पाडें । हें आघवेंचि गा थोकडें ।
ऐसें सामर्थ्य जेयाचें चोखडें । ज्ञानीं इये ॥ ७१ ॥
देखें विश्वसंभ्रमा ऐसा । जो अमूर्तीचा कडवसा ।
तो जेयाचेया प्रकाशा । पुरे चि ना ॥ ७२ ॥
तेया काइसे मनोमल । हें बोलतां चि अति कीडाल ।
नाहिं येणें पाडें दिसाल । दूजें जगीं ॥ ७३ ॥

**यथैधांसि समिद्धोऽग्निर्भस्मसात्कुरुतेऽर्जुन ।**
**ज्ञानाग्निः सर्वकर्माणि भस्मसात्कुरुते तथा ॥ ३७ ॥**

सांवें भूतत्रयाची काजली । जे गगनामाजि उचली ।
तिये प्रलइचिये वाहुंटलीं । काइ अभ्र पुरे ॥ ७४ ॥
किं पवनाचेनि कोपें । पाणियें चि जो पलिपे ।
तो प्रलयानलु काइ दडपे । तृणें नावें ॥ ७५ ॥

**नहि ज्ञानेन सदृशं पवित्रमिह विद्यते ।**
**तत्स्वयं योगसंसिद्धः कालेनात्मनि विंदति ॥ ३८ ॥**

ह्मणौनि असो हें न घडे । जें विचारितां चि असंघडे ।
पुढुतीं ज्ञानाचेनि पाडें । पवित्र न दिसे ॥ ७६ ॥
एक ज्ञान हीं उत्तम होये । आणिक हीं येथ तैसें चि आहे ।
तरि सांवें चैतन्य कां नोहे । दूसरें गा ॥ ७७ ॥

ना तरि महातेजाचेनि कसें । चोखाळ प्रतिबिंब दीसे ।
कां गवसलें गवसे । आकाश हें ॥ ७८ ॥
ना तरि पृथ्वीचेनि पाडें । कांटाळें जरि जोडे ।
तरि ज्ञानासि उपमा घडे । पांडुकुमरा ॥ ७९ ॥
ह्मणौनि बहुतीं परी पाहातां । पुडुतीं पुडुतीं निर्द्धारितां ।
हे ज्ञानिची पवित्रता । ज्ञानीं चि आथि ॥ १८० ॥
जैसी अमृताची चवि निवडिजे । तरि अमृता चि सारिखी ह्मणिजे ।
तैसें ज्ञान हें उपमिजे । ज्ञानेंसीं चि ॥ ८१ ॥
आतां ययावरि बोलणें । वायां चि वेळु फेडणें ।
तवं साच जी हें पार्थु ह्मणे । बोलिजत असां ॥ ८२ ॥
परि तेंचि ज्ञान केवि जाणावें । ऐसें जव अर्जुनें पूसावें ।
तव तें मनोगत देवें । जाणीतलें ॥ ८३ ॥

**श्रद्धावांल्लभते ज्ञानं तत्परः संयतेंद्रियः ।**
**ज्ञानं लब्ध्वा परां शांतिमचिरेणाधिगच्छति ॥ ३९ ॥**

मग ह्मणतसे किरीटी । आतां चित्त देइं इये गोठी ।
सांघेन ज्ञानाचिये भेटी । उपावो तुज ॥ ८४ ॥
तरि आत्मसुखाचिया गोडिया । विटला जो विषयां ।
जेयाचां ठांइं इंद्रियां । मानु नाहीं ॥ ८५ ॥
जो मनासि चाड न संवे । जेयां प्रकृतिचें केलें ने वे ।
जो श्रद्धेचेनि संभोगें । सुखिया जाला ॥ ८६ ॥
तेयातें चि गिवसित । हें ज्ञान पावे निश्चित ।
जेयामाजि अचुंबित । शांति असे ॥ ८७ ॥
तें ज्ञान हृदयीं प्रतिष्टे । आणि शांतिचा अंकुर फूटे ।
मग विस्तारु बहुत प्रकटे । ततक्षणीं ॥ ८८ ॥
तेंव्हां जेउति वास पाहिजे । तेउती शांती चि एकि देखिजे ।
तेथ पारावार नेणिजे । निर्द्धारितां ॥ ८९ ॥

ऐसा हा उत्तरोत्तरु । ज्ञानबीजाचा विस्तारु ।
हा सांगतां असे अपारु । परि असो आतां ॥ १९० ॥

**अज्ञश्चाश्रद्दधानश्च संशयात्मा विनश्यति ।**
**नायं लोकोऽस्ति न परो न सुखं संशयात्मनः ॥ ४० ॥**

आइकें जेया प्राणियांचां ठांइं । यया ज्ञानाचें पाहिलें नाहिं ।
तेयाचें जियालें ह्मणों काइ । वरि मेलें चांग ॥ ९१ ॥
शून्य जैसें गृह । कां चैतन्येंवीण देह ।
तैसें जीवीत तें संमोह । ज्ञानहीन ॥ ९२ ॥
अथवा ज्ञान कीर आपु नोहे । परि तें चाड येकि जन्हीं वाहे ।
तेथ जीवाला काहीं आहे । प्राप्तिचा ॥ ९३ ॥
वांचूनि ज्ञानाची गोठि काइसी । परि ते आस्था ही न धरी जो मानसीं ।
तो संशयरूप हुताशीं । पडिला जाण ॥ ९४ ॥
जें अमृत ही परि नावडे । ऐसें संवियां चि अरोचक जैं पडे ।
तैं मरण आलें असें फुडें । हें जाणों ये कीं ॥ ९५ ॥
तैसा विषयसुखरजें । जो ज्ञानेंसीं चि माजे ।
तो संशइं अंगिकरिजे । एथ भ्रांति नाहीं ॥ ९६ ॥
मग संशइं जरि पडिला । तरि निभ्रांत जाणैं नाशला ।
तो अहिकाही परि मूकला । सुखासि गा ॥ ९७ ॥
जेया कालज्वरु आंगीं वाणे । तो शीतोष्णें जैसीं नेणे ।
आगि आणि चांदिणें । सारिसें चि मानीं ॥ ९८ ॥
तैसें साच आणि लटिकें । वींरू अथवा नीकें ।
संशइं तो नोळखे । हिताहितें ॥ ९९ ॥
हा रातिदिवसु पाहिं । जैसा जात्यंधा ठाउवा नाहिं ।
तैसें संशया सत्य काहीं । मना नें ये ॥ २०० ॥
ह्मणौनि संशयाहूनि थोर । आणिक पाप नाहिं घोर ।
हा विनाशाची वागुर । प्राणियांसि ॥ १ ॥

**योगसंन्यस्तकर्माणं ज्ञानसंछिन्नसंशयम् ।**
**आत्मवंतं न कर्माणि निबध्नंति धनंजय ॥ ४१ ॥**

ह्मणौनि हा त्यजावा । हाचि येकु जीणावा ।
॥ जो ज्ञानाचिया अभावा- । माजि असे ॥ २ ॥
जें अज्ञानाचें गडदे पडे । तें हा बहुवसु मनीं वाढे ।
ह्मणौनि सर्वथा मार्गु मोडे । विश्वासाचा ॥ ३ ॥

**तस्मादज्ञानसंभूतं हृत्स्थं ज्ञानासिनात्मनः ।**
**छित्त्वैनं संशयं योगमातिष्ठोत्तिष्ठ भारत ॥ ४२ ॥**

हृदइं हाचि न समाए । आणि बुद्धितें गवसूनि ठाए ।
तेथ संशयात्मक होए । लोकत्रय ॥ ४ ॥
ऐसा हा जर्‍हीं थोरावे । तर्‍हीं उपायें येकें आंगवे ।
जरि हातीं होये बरवें । ज्ञानखड्ग ॥ ५ ॥
तरि तेणें ज्ञानशस्त्रें तीखटें । निखलु हा निवटे ।
मग निःशेष स्वता फिटे । मानसिचा ॥ ६ ॥
या कारणें पार्था । उठीं वेगी वरौता ।
नाशु करूनि हृदयस्था । संशयासि ॥ ७ ॥
ऐसें सर्वज्ञाचा बापु । जो कृष्णु ज्ञानदीपु ।
तो ह्मणतसे सकृपु । आइकें राया ॥ ८ ॥
तवं एया पूर्वापर बोलाचा । विचारूनि कुमरु पांडुचा ।
कैसा प्रश्नु हान अवसरिचा । करिता होईल ॥ ९ ॥
जेयाचां बरवेपणीं । कीजे आठां रसांची ओलावणी ।
जो सज्जनाचिये आणी । विसावां जगीं ॥ २१० ॥
तो शांतू चि अभिनवेल । ते परियसां मर्‍हाटे बोल ।
जे समुद्रा ही हूनि खोल । अर्थभरित ॥ ११ ॥
जैसें बिंब तरि बचकेयेवडे । परि प्रकाशा त्रैलोक्य थोकडें ।
शद्बाची व्याप्ति तेणें पाडें । अनुभवांवी ॥ १२ ॥

ना तरि कामितेयाचिया इछा । फळे कल्पवृक्षु जैसा ।
बोलु व्यापकु होये तैसा । तरि अवधान देयावें ॥ १३ ॥
हें असो काये ह्मणावें । सर्वज्ञ जाणती स्वभावें ।
तन्हीं नीकेनि चित्त देयावें । हे विनती माझी ॥ १४ ॥
जें साहित्य आणि शांती । हे रेखा दिसे बोलती ।
जैसी लावण्यगुणयुवती । आणि पतिव्रता ॥ १५ ॥
आदिं चि साखर आवडे । आणि ते चि जरि ओखधा जोडे ।
तरि न सेवावी कां कोडें । नावां नावां ॥ २१६ ॥
साहाजें मळयानीळु मंदु । तेया हीं होये अमृताचा स्वादु ।
आणि तेथ चि जोडे नादु । दैवंगत्या ॥ १७ ॥
तरि स्पर्शे सर्वांग जीववी । स्वादें जीभेतें नाचवी ।
तेविं चि कानाकरवि ह्मणवी । बापु माझा ॥ १८ ॥
तैसें कथेचें इये आइकणें । एक श्रवणासि होये पारणें ।
आणि संसारदुःखा मोकळवणें । विक्रुतीविण ॥ १९ ॥
जरि मैत्रें चि वैरी मरे । तरि वायां कां बांधावे कटारे ।
रोगु जाये दूधें ओंगरें । तरि नींवु कां पियावा ॥ २२० ॥
तैसा मनाचा मारु न करितां । इंद्रियां दुःख नेंदितां ।
एथ मोक्षु असे आइकतां । श्रवणांमाझि ॥ २१ ॥
ह्मणौनि आथिलिया आराणुका । गीतार्थु हा नीका ।
ज्ञानदेओ ह्मणे आइकां । निवृत्तिदासु ॥ २२२ ॥

ॐ तत्सदिति श्रीमद्भगवद्गीतासूपनिषत्सु ब्रह्मविद्यायां योगशास्त्रे श्रीकृष्णार्जुनसंवादे **ज्ञानयोगो** नाम चतुर्थोध्यायः ॥

॥ श्रीसर्वात्मकरामकृष्णार्पणमस्तु ॥

# ज्ञानेश्वरी

## अध्याय पांचवा.

अर्जुन उवाच ॥

संन्यासं कर्मणां कृष्ण पुनर्योगं च शंससि ।
यच्छ्रेय एतयोरेकं तन्मे ब्रूहि सुनिश्चितम् ॥ १ ॥

मग पार्थु कृष्णातें ह्मणे । हां हो हें कैसें तुमचें बोलणें ।
एक होये तरि अंतष्करणें । विचारु ए ॥ १ ॥

मागां सकल कर्मांचा संन्यासु । तुह्मीं चि निरोपिला होंता बहुवसु ।
तरि कर्मयोगीं केवि अतिरसु । पोखित असा ॥ २ ॥

हें ऐसें द्वैतार्थ बोलतां । आह्मां नेणतेयांचेया चित्ता ।
आपुलिये चाडे अनंता । उमजु नोहे ॥ ३ ॥

आइकें एकसरां तें बोधिजे । तरि एकनिष्ठ चि बोलिजे ।
हें आणिकें काये सांगिजे । तुह्माप्रति ॥ ४ ॥

तऱ्हीं येया चि लागौनि तुमतें । मियां माहोरासि एक विनविलें होंतें ।
जें हा परमार्थु ध्वनितें । न बोलावा ॥ ५ ॥

परि तें मागील असो देवा । आतां प्रस्तुतीं उकलु देखावा ।
सांघें दोहोंमाझि बरवा । मार्गु कवणु ॥ ६ ॥

जो परिणामीचा निर्वाला । अचुंबित ये फला ।
आणि अनुष्ठितां प्रांजला । मवियां चि ॥ ७ ॥

जैसें निद्रेचें सुख न मोडे । आणि मार्गु तरि बहू सांडे ।
तैसें सोंखासना सांवडे । सोहपें होये ॥ ८ ॥

श्रीभगवानुवाच ॥

**संन्यासः कर्मयोगश्च निःश्रेयसकरावुभौ ।**
**तयोस्तु कर्मसंन्यासात्कर्मयोगो विशिष्यते ॥ २ ॥**

एणें अर्जुनाचेनि बोलें । देवो मनीं रिझले ।
मग होईल आइकें ह्मणितलें । संतोखोनियां ॥ ९ ॥
देखां कामधेनु ऐसी माये । सदैवां जेया होये ।
तो चंद्रु चि परि लाहे । खेळावया ॥ १० ॥
पाहा पां शंभूची प्रसन्नता । तेया उपमन्युचिया आर्त्ता ।
काये क्षीराब्धि दूधभाता । देई चि ना ॥ ११ ॥
तैसा औदार्याचा कुरुठा । कृष्णु आपु जालेयां सुभटा ।
कां सर्व सुखाचा वसैठा । तो चि नोहावा ॥ १२ ॥
एथ चमत्कारु काइसा । गोसांवि लक्ष्मीकांता ऐसा ।
आतां आपुलालिया सावेसा । मागाचा किं ॥ १३ ॥
ह्मणौनि अर्जुनें ह्मणितलें । तें हांसौनि येरें दीधलें ।
तें चि सांघेन बोलिलें । काइ कृष्णें ॥ १४ ॥
तो ह्मणे गा कुंतीसुता । हे संन्यासयोग विचारितां ।
मोक्षकर तत्त्वता । दोन्हीं होति ॥ १५ ॥
तऱ्हीं जाणां नेणां सकळां । हा कर्मयोग किर पांजला ।
जैसी नाव स्त्रियां बाळां । तोयतरणी ॥ १६ ॥
तैसें सारासार पाहिजे । तरि सोहोपा हा चि देखिजे ।
एणें संन्यासफळ लाहिजे । अनायासें ॥ १७ ॥

**ज्ञेयः स नित्यसंन्यासी यो न द्वेष्टि न कांक्षति ।**
**निर्द्वंद्वो हि महाबाहो सुखं बंधात्प्रमुच्यते ॥ ३ ॥**

आतां येया चि लागि सांवेन । तुज संन्यासियाचें चिन्ह ।
मग साहाजें हें अभिन्न । जाणसी तूं ॥ १८ ॥
तरि गेलेयाची से न करी । न पवतां चाड न धरी ।
जो सुनिश्चलु आंतरीं । मेरु तैसा ॥ १९ ॥
आणि मी माझें हे आठवण । विसरलें जेयाचें अंतःकरण ।
तो पार्था संन्यासी जाण । निरंतर ॥ २० ॥
जो मनें ऐसा जाला । संगि तो चि सांडिला ।
ह्मणौनि सुखें सुख पातला । अखंडीत ॥ २१ ॥
आतां गृहादीक आववें । तें काहीं च नलगे त्यजावें ।
जें वेंतें जालें स्वभावें । निःसंगु ह्मणुनि ॥ २२ ॥
देखैं अग्नि विझौनि जाये । मग जैं राखौंडी केवळ होये ।
तैं ते कापुसें हीं गवसूं ये । जिया परीं ॥ २३ ॥
तैसा असतेन उपाधी । नाकळिजे तो कर्मबंधीं ।
जेयाचिये बुद्धी । संकल्पु नाहीं ॥ २४ ॥
ह्मणुनि कल्पना जैं सांडे । तैं चि गा संन्यासु घडे ।
येया कारणें दोन्हीं सांवडे । संन्यासयोग ॥ २५ ॥

**सांख्ययोगौ पृथग्बालाः प्रवदंति न पंडिताः ।**
**एकमप्यास्थितः सम्यगुभयोर्विंदते फलम् ॥ ४ ॥**

यन्हवि तन्हीं पार्था । जे मूर्ख होंति सर्वथा ।
ते सांख्यकर्मसंस्था । जाणति केवि ॥ २६ ॥
साहाजें ते अज्ञान । ह्मणौनि ह्मणति हें भिन्न ।
यन्हवि दीप प्रति काइ आनान । प्रकाश आहाति ॥ २७ ॥
पैं सम्यक् एकानुभवें । जेहिं देखिलें तत्त्व आववें ।
दोहोंतें हीं एकभावें । मानिति गा ॥ २८ ॥

**यत्सांख्यैः प्राप्यते स्थानं तद्योगैरपि गम्यते ।**
**एकं सांख्यं च योगं च यः पश्यति स पश्यति ॥ ५ ॥**

आणि सांख्यीं जें पाविजे । तें चि योगीं गमिजे ।
ह्मणौनि ऐक्य दोहीं साहाजें । इया ही परी ॥ २९ ॥
देखैं आकाशा आणि अवकाशा । भेदु कां नाहिं जैसा ।
तैसें ऐक्य योगसंन्यासा । वोळखे जो ॥ ३० ॥
तेया चि जगीं पाहलें । आपणपें तेणें चि देखिलें ।
जेया सांख्ययोग जाणवले । भेदेंविण ॥ ३१ ॥

**संन्यासस्तु महाबाहो दुःखमाप्तुमयोगतः ।**
**योगयुक्तो मुनिर्ब्रह्म न चिरेणाधिगच्छति ॥ ६ ॥**

जो युक्तिपंथें पार्था । चडे मोक्षपर्वता ।
तो महासुखाचा निमथा । वहिला पावे ॥ ३२ ॥
ऐसी योगस्थिति जेया सांडे । तो वायां चि हव्यासीं पडे ।
परि प्राप्ति कहीं न घडे । संन्यासाची ॥ ३३ ॥

**योगयुक्तो विशुद्धात्मा विजितात्मा जितेंद्रियः ।**
**सर्वभूतात्मभूतात्मा कुर्वन्नपि न लिप्यते ॥ ७ ॥**

जेणें भ्रांतीपासौनि हीतलें । गुरुवाक्यें मन धूतलें ।
मग आत्मस्वरूपीं घातलें । हरौनियां ॥ ३४ ॥
जैसें समुद्रीं लवण न पडे । तवं वेगळें अल्प आवडे ।
मग होये सिंधू चि एवडें । मिळे तेव्हां ॥ ३५ ॥
तैसें संकल्पौनि काढलें । जेयाचें मन चैतन्य जाले ।
तेणें एकदेशिये परि व्यापिलें । लोकत्रय ॥ ३६ ॥
आतां कर्त्ता कर्म करावें । हें कुठलें तेया आघवें ।
आणि करी तऱ्हीं स्वभावें । अकर्त्ता तो ॥ ३७ ॥

**नैव किंचित्करोमीति युक्तो मन्येत तत्त्ववित् ।**
**पश्यञ्शृण्वन्स्पृशञ्जिघ्रन्नश्नन्गच्छन्स्वपञ्श्वसन् ॥ ८ ॥**

जें पार्था तेया देहीं । मीं ऐसा आठौ नाहीं ।
तरि कर्तृत्व कैचें काइ । उरे सांघें ॥ ३८ ॥

ऐसें तनुत्यागेंविण । अमूर्त्तिचे गुण ।
दीसति संपूर्ण । योगयुक्ता ॥ ३९ ॥
यऱ्हविं आणिकाचिया परी । तो ही येकु शरीरी ।
अशेषीं हीं व्यापारीं । वर्त्ततु असे ॥ ४० ॥
तो ही नेत्रीं पाहे । श्रवणीं आइकतु आहे ।
परि तेथिचा सर्वथा नोहे । हें नवल देखैं ॥ ४१ ॥
स्पर्शासि तरि जाणे । परिमळु सेवी घ्राणें ।
अवसरोचित बोलणें । तेया ही आथि ॥ ४२ ॥
आहारातें स्वीकरी । त्याज्य तें परिहरी ।
निद्रेचा अवसरीं । निदिजे सुखें ॥ ४३ ॥
आपुलेनि इछावसें । तो ही गा चालतु दीसे ।
पैं सकळ कर्म ऐसें । राहाटे किर ॥ ४४ ॥

**प्रलपन्विसृजन्गृण्हन्नुन्मिषन्निमिषन्नपि ।**
**इंद्रियाणींद्रियार्थेषु वर्त्तंत इति धारयन् ॥ ९ ॥**

हें सांगों काइ एकैक । देखैं श्वासोश्वासादिक ।
आणि निमेषानिमेष । आदिकरुनि ॥ ४५ ॥
पार्था तेयाचां ठांइं । हें आघवें चि आथि पाइं ।
परि तो कारिता नोहे काहीं । प्रतीतिबळें ॥ ४६ ॥
जैं भ्रांतिसेजे सूतला । तैं स्वप्नसुखें भूतला ।
मग तो ज्ञानोदयीं चेइला । ह्मणौनियां ॥ ४७ ॥
आतां अधिष्ठानसंगति । अशेषा ही इंद्रियवृत्ती ।
आपुलालां अर्थीं । वर्त्तत आथीं ॥ ४८ ॥

**ब्रह्मण्याधाय कर्माणि संगं त्यक्त्वा करोति यः ।**
**लिप्यते न स पापेन पद्मपत्रमिवांभसा ॥ १० ॥**

दीपाचेनि प्रकाशें । गृहिंचे व्यापार जैसे ।
देहीं कर्मजात तैसें । योगयुक्त ॥ ४९ ॥

तो कर्मे करी सकळें । परि कर्मबंधा नाकळे ।
जैसें न सिंपे जळिं जळें । पद्मपत्र ॥ ५० ॥

**कायेन मनसा बुद्ध्या केवलैरिंद्रियैरपि ।**
**योगिनः कर्म कुर्वंति संगं त्यक्त्वात्मशुद्धये ॥ ११ ॥**

देखें बुद्धीचो भाष नेणिजे । मनाचा अंकुरु नुदैजे ।
ऐसा व्यापारु तो बोलिजे । शारीर गा ॥ ५१ ॥
हें चि मऱ्हाटें परिहसैं । तरि बाळकाची चेष्टा जैसी ।
योगिये करिति कर्मे तैसीं । केवळा तनू ॥ ५२ ॥
मग पांचभूतिक सांचलें । जेव्हां शरीर असे निदैलें ।
तेथ मन चि राहाटे एकलें । स्वप्नीं जैसें ॥ ५३ ॥
नवल आइकें धनुर्द्धरा । कैसा वासनेचा सवंसारा ।
देहा हों नेदी उजगरा । परि सुखदुःखें भोगी ॥ ५४ ॥
दाहिं इंद्रियांचां गांवि नेणिजे । ऐसा व्यापारु जो निफजे ।
तो केवळु गा ह्मणिजे । मानसाचा ॥ ५५ ॥
योगिये तो ही करिति । परि अकर्मी तैसें बुझति ।
जे सांडिली आहे संगती । अहंभावाची ॥ ५६ ॥
आतां जालेयां भ्रमहत । जैसें पिशाचाचें चित ।
मग इंद्रियांचें चेष्टित । विकळ दीसे ॥ ५७ ॥
स्वरूप तरि देखे । आळविलें आइके ।
शब्दु बोले मुखें । परि ज्ञान नाहीं ॥ ५८ ॥
हें असो काजेंविण । जें जें काहीं करण ।
तें केवळ कर्म जाण । इंद्रियांचें ॥ ५९ ॥
मग सर्वत्र जें जाणतें । तें बुद्धीचें कर्म निरुतें ।
बोलख अर्जुनातें । ह्मणे हरी ॥ ६० ॥
ते बुद्धि धूर करूनि । कर्मे करी चित देउनि ।
परि नैष्कर्म्यापासोनि । मुक्त दीसति ॥ ६१ ॥

जे बुद्धिचिये ठाउनि देहीं । तेयां अहंकाराची शंका नाहीं ।
ह्मणोनि कर्मे चि करित पाहीं । चोखाळले ॥ ६२ ॥
आगा करितेन विण कर्म । तें चि तें नैष्कर्म्य ।
हें जाणति गुरुगम्य । सुवर्म जे ॥ ६३ ॥
आतां शांतरसाचें भरितें । सांडित आहे पात्रांतें ।
जें बोलणें बोला परौतें । बोलवलें ॥ ६४ ॥
एथ इंद्रियांचा पांगु । जेयां फीटला आहे चांगु ।
तेयांसी चि आथि लागु । परिसावेया ॥ ६५ ॥
हा असो अतिप्रसंगु । न संडि पां कथालागु ।
होईल श्लोकसंगती भंगु । ह्मणौनियां ॥ ६६ ॥
जें मना कळितां कुवाडें । घांवबसितां बुद्धी नातुडे ।
तें दैवाचेन सुरवाडें । सांघवलें तुज ॥ ६७ ॥
जें शद्बातीत स्वभावें । तें बोलीं चि जरि फावे ।
तरि आंणिकें काइ करावें । सांघें कथा ॥ ६८ ॥
हा आर्त्तिविशेषु श्रोतेयांचा । जाणोनि दासु निवृत्तिचा ।
ह्मणे संवादु तेयां दोघांचा । परियसां तरि ॥ ६९ ॥
मग कृष्णु ह्मणे पार्थातें । आतां प्राप्ताचें चिन्ह पुरतें ।
सांघैन तुज निरुतें । चित्त देईं ॥ ७० ॥

युक्तः कर्मफलं त्यक्त्वा शांतिमाप्नोति नैष्ठिकीम् ।
अयुक्तः कामकारेण फले सक्तो निबध्यते ॥ १२ ॥

तरि आत्मयोगें आथिला । जो कर्मफळासि वीटला ।
तो घर रिगोनि वरिला । शांती जगीं ॥ ७१ ॥
एरु कर्मबंधें किरीटी । अभिलाषाचिया गांठी ।
काळासला खुंटी । फळभोगाचां ॥ ७२ ॥
फळाचिये आधवे । ऐसें कर्म करी आघवें ।
मग न कीजे येणें भावें । उपेक्षि जो ॥ ७३ ॥

**सर्वकर्माणि मनसा संन्यस्याऽऽस्ते सुखं वशी ।**
**नवद्वारे पुरे देही नैव कुर्वन्नकारयन् ॥ १३ ॥**

तो जियाकडे वास पाहे । तेउती सुखाची सृष्टि होये ।
तो ह्मणे तेथ राहे । महाबोधु ॥ ७४ ॥
नवद्वारें देहीं । तो असे परि नाहीं ।
करितू चि न करी काहीं । फलत्यागी ॥ ७५ ॥

**न कर्तृत्वं न कर्माणि लोकस्य सृजति प्रभुः ।**
**न कर्मफलसंयोगं स्वभावस्तु प्रवर्त्तते ॥ १४ ॥**

जैसा कां सर्वेश्वरु । पाहिजे तरं निर्व्यापारु ।
परि तो चि रची विस्तारु । त्रिभुवनाचा ॥ ७६ ॥
आणि करिता ऐसें ह्मणिपे । तरि कर्मि कव्हणिं न सिंपे ।
जें हातुपाऊ न लिंपे । उदासवृत्तिचा ॥ ७७ ॥
योगनिद्रा तरि न मोडे । अकर्त्तेपणा सांचलु न पडे ।
परि महाभूतांचें दलवाडें । उभारी भलें ॥ ७८ ॥
जगाचां जिविं आहे । परि कव्हणांचा कांहिं नोहे ।
जग चि होये जाये । तो शुद्धि ही नेणे ॥ ७९ ॥

**नादत्ते कस्यचित्पापं न चैव सुकृतं विभुः ।**
**अज्ञानेनावृतं ज्ञानं तेन मुह्यंति जंतवः ॥ १५ ॥**

पापपुण्यें अशेषें । तो पासिं चि असतु न देखे ।
आणि साक्षि ही दोहों न ठके । एरि गोठि काइसी ॥ ८० ॥
पैं मूर्त्तिचेनि मेलें । तो मूर्त्तु चि होउनि खेले ।
परि अमूर्तपण न मैले । दादुलेयाचें ॥ ८१ ॥
तो सृजी पाली संहारी । ऐसें बोलति जे चराचरीं ।
ते अज्ञान गा अवधारीं । पांडुकुमरा ॥ ८२ ॥

**ज्ञानेन तु तदज्ञानं येषां नाशितमात्मनः ।**
**तेषामादित्यवज्ज्ञानं प्रकाशयति तत्परम् ॥ १६ ॥**

तें चि अज्ञान जैं समूळ तुटे । तैं भ्रांतिचें मसैरें फीटे ।
मग अकर्तृत्व हें प्रकटे । ईश्वराचें ॥ ८३ ॥
एथ ईश्वरु एकु अकर्ता । ऐसें मानलें जरि चित्ता ।
तो चि मी हें स्वभावता । आदि चि आहे ॥ ८४ ॥
ऐसेनि विवेकें उदो चित्तिं । तेयांसि भेदु कैंचा त्रीजगती ।
देखैं आपुलिया प्रतीती । जग चि मुक्त ॥ ८५ ॥
जैसी पूर्व दिशेचां राउळीं । उदयाची सूर्यें होये दिवाळी ।
किं एर्‍हीं हीं दिशां तिये चि काळीं । काळिमा नाहिं ॥ ८६ ॥
ऐसें व्यापक ज्ञांन भलें । जेयांचेया हृदया गिवसत आलें ।
तेयांची समतादृष्टि बोलें । विशेषूं काई ॥ ८७ ॥

**तद्बुद्धयस्तदात्मानस्तन्निष्ठास्तत्परायणाः ।**
**गच्छंत्यपुनरावृत्तिं ज्ञाननिर्धूतकल्मषाः ॥ १७ ॥**

एक आपणयां चि जैसें । ते देखति विश्व तैसें ।
हें बोलणें काइ ऐसें । नवल एथ ॥ ८८ ॥
परि दैव जैसें कवतिकें । कहिं चि सरोनि दैन्य न देखे ।
कां विवेकु हा नोळखे । भ्रांतितें ॥ ८९ ॥
ना तरि अंधकाराची वानी । जैसा सूर्यु नेणें स्वप्नीं ।
अमृत नाइके आपुले कानीं । मृत्युकथा ॥ ९० ॥
हें असो संतापु कैसा । हणोनि चंद्रु कां न स्मरे जैसा ।
भूतिं भेदु नेणति तैसा । ज्ञानिये ते ॥ ९१ ॥

**विद्याविनयसंपन्ने ब्राह्मणे गवि हस्तिनि ।**
**शुनि चैव श्वपाके च पंडिताः समदर्शिनः ॥ १८ ॥**

मग मशकु हा गजु । कां श्वपचु हा द्विजु ।
पैल इतरु हा आत्मजु । हें उरैल कें ॥ ९२ ॥
ना तरि धेनु हे श्वान । एक उरयें एक हीन ।
हें असो कैंचें स्वप्न । जागतेया ॥ ९३ ॥

एथ भेदु तरि देखावा । जरि अहंभाओ उरला होआवा ।
तो आदीं चि नाहिं आघवा । आतां विषम काइ ॥ ९४ ॥
ह्मणौनि सर्वत्र सदा सम । तें आपण चि अद्वय ब्रह्म ।
हें संपूर्णता जाणैं वर्म । समदृष्टयांचें ॥ ९५ ॥

**इहैव तैर्जितः सर्गो येषां साम्ये स्थितं मनः ।**
**निर्दोषं हि समं ब्रह्म तस्माद्ब्रह्मणि ते स्थिताः ॥ १९ ॥**

जिहिं विषयसंगु न संडितां । इंद्रियांतें न दंडितां ।
भोगिली निःसंगता । कामेंविण ॥ ९६ ॥
जिहिं लोकाचेन आधारें । लौकिकें चि व्यापारें ।
सांडिलें निदसुरें । लौकीक हें ॥ ९७ ॥
जैसा जनामाजि खेचरु । असतू चि जना नव्हे गोचरु ।
तैसे शरीरीं ते परि संसारु । नोळखे तेयां ॥ ९८ ॥
हें असो पवनाचेनि मेळें । जैसें जळिं जळ चि लोळे ।
आणिकें ह्मणति वेगळे । कल्लोळ हे ॥ ९९ ॥
तैसें नामरूप तेयाचें । यऱ्हविं ब्रह्म चि ब्रह्मिचें ।
मन साम्या आलें जेयाचें । सर्वत्र गा ॥ १०० ॥

**न प्रहृष्येत्प्रियं प्राप्य नोद्विजेत्प्राप्य चाप्रियम् ।**
**स्थिरबुद्धिरसंमूढो ब्रह्मविद्ब्रह्मणि स्थितः ॥ २० ॥**

ऐसेन समदृष्टी जो होये । तेया पुरुषा लक्षण हीं आहे ।
अर्जुना संक्षेपें सांघेन पाहे । अच्युतु ह्मणे ॥ १ ॥
तरि मृगजळाचेनि पूरें । जैसें न लोटिजे कां गिरिवरें ।
तैसा शुभाशुभीं न विकरे । पातलां जो ॥ २ ॥
तो चि तो निरुता । समदृष्टी तत्वता ।
हरि ह्मणे पांडुसुता । तो चि ब्रह्म ॥ ३ ॥

**बाह्यस्पर्शेष्वसक्तात्मा विंदत्यात्मनि यत्सुखम् ।**
**स ब्रह्मयोगयुक्तात्मा सुखमक्षय्यमश्नुते ॥ २१ ॥**

जेया आपणपें सांडूनि कहीं । इंद्रियग्रामुवरि एणें नाहीं ।
तो विषय न सेवी हें काइ । चित्र एथ ॥ ४ ॥
साहाजें स्वसुखिचेन अपारें । मुरवाडे आंतरें ।
रचला ह्मणौनि बाहिरें । पाउल न घली ॥ ५ ॥
सांघें कुमुददलाचेनि ताटें । जेविला चंद्रकिरणें चोखटें ।
तो चकोरु वाळुवंटें । चुंबितु आहे ॥ ६ ॥
तैसें आत्मसुख उपाइलें । जेयासि आपणपां चि फावलें ।
तेयां विषय साहाजें सांडले । सांवों काइ ॥ ७ ॥

ये हि संस्पर्शजा भोगा दुःखयोनय एव ते ।
आद्यंतवंतः कौंतेय न तेषु रमते बुधः ॥ २२ ॥

यऱ्हवि तऱ्हीं कवतिकें । विचारूनि पाहे पां नीकें ।
एयां विषयांचेन सुखें । झांकवति कवण ॥ ८ ॥
जिहिं आपणपें नाहिं देखिलें । ते चि हीं इंद्रियार्थी रंजले ।
जैसें कां आलुकैलें । तुपान्न सेवी ॥ ९ ॥
ना तरि मृगें तृषापीडितें । संभ्रमें विसरौनि जळातें ।
मग तोयबुद्धि बरडीतें । टाकूनि एंति ॥ ११० ॥
तैसें आपणपें नाहिं दीठें । जेहांतें स्वसुखाचे सदा खरांटे ।
तेयांसी चि विषय हे गोमटे । आवडति ॥ ११ ॥
यऱ्हवि विषैं काइ सुख आहे । हें बोलणें चि सारिखें नोहे ।
तरि विद्युत्स्फुरणें कां न पाहे । जगामाझि ॥ १२ ॥
सांघें वातातापु हा धरे । ऐसें अभ्रछाया चि सरे ।
तरि त्रिमाळिकें धवळारें । करावीं कां ॥ १३ ॥
ह्मणौनि विषयसुख जें बोलिजे । तें नेणतां गा वायां जल्पिजे ।
जैसें महुरें हान कां ह्मणिजे । विषकंदातें ॥ १४ ॥
ना तरि भौमा नावें मंगळु । रोहिणीतें ह्मणिजे जळु ।
तैसा सुखप्रवादु बरळु । विषइकु हा ॥ १५ ॥

हे असो आघवी बोली । सांघ पां सर्पफणिची साउली ।
ते शीतल होईल केतुली । मूखकांसि ॥ १६ ॥
जैसा आमीषकवलु पांडवा । मीनु न सेवी तवं चि बरवा ।
तैसा विषयसंगु आघवा । निभ्रांत जाणैं ॥ १७ ॥
हें चि विरक्तिचिया दृष्टी । जैं निहालिजे किरीटी ।
तैं पांडुरोगाचिये पुष्टी । सारिखें दीसे ॥ १८ ॥
ह्मणौनि विषयभोगीं जें सुख । तें साद्यंत चि जाण दुःख ।
पारि काइ करीतु मूर्ख । तें न सेवितां न सरे ॥ १९ ॥
ते आंतर नेणती चि बापुडे । ह्मणौनि अगत्या सेवणें घडे ।
सांघें पूयपंकिचे कीडे । काइ चिलिसि घेंती ॥ १२० ॥
तेयां दुःखियां दुःख चि जिव्हार । ते विषयकर्दमिचे दर्दूर ।
तें चिं जलातें जलचर । सांडितु केवि ॥ २१ ॥
आणि दुःखयोनी जिया आहाति । तिया निरर्थका तारि नव्हति ।
जारि विषयांवरि विरक्ति । धरीति जीव ॥ २२ ॥

**शक्नोतीहैव यः सोढुं प्राक्शरीरविमोक्षणात् ।**
**कामक्रोधोद्भवं वेगं स युक्तः स सुखी नरः ॥ २३ ॥**

ना तारि गर्भवासादि संकट । कां जन्ममरणींचे कष्ट ।
हे विसांवेनिविण वाट । वाहवी कवण ॥ २३ ॥
जरि विषइं विषयो सांडिजैल । तरि महादोषिं कें वसिजैल ।
आणि हा संसारशब्दु नव्हैल । लटका जगीं ॥ २४ ॥
ह्मणौनि अविद्याजात नाथिलें । तें तिहिं चि साच दाविलें ।
जिहिं सुखबुद्धी घेतलें । विषयदुःख ॥ २५ ॥
एया कारणें गा सूभटा । हा विचारितां विखो ओखटा ।
तूं झनें कहीं इया वाटा । विसरौनि जासी ॥ २६ ॥
पैं ययातें विरक्त पुरुष । त्यजीति कां जैसें विष ।
निराशां तेयां दुःख । दाविलें नावडे ॥ २७ ॥

ज्ञानियांचां ठांइं । एयाची मातु ही किर नाहिं ।
देहीं देहभाव जिहीं । स्ववश केले ॥ २८ ॥
जेयातें बाह्याची भाष । नेणिजे चि निःशेष ।
आंतर चि सुख । एक आथि ॥ २९ ॥
परि ते वेगलेपणें कां भोगिजे । जैसें पक्षियें फल चुंबिजे ।
जैसें नव्हे तेथ विसरिजे । भोगितेपण ॥ १३० ॥
भोगिं अवस्था एकि उठि । ते अहंकाराचलु लोटी ।
मग सुखेंसीं घे आंटी । गाढेपणें ॥ ३१ ॥
तिये आलिंगनमेलीं । होये आपेंआपु कवली ।
तेथ जल जैसें जलीं । वेगलें न दिसे ॥ ३२ ॥
कां आकाशीं वायु हारपे । तेथ दोनि हा भाऊ लोपे ।
तैसें सुख चि उरे स्वरूपें । सुरतिं तिये ॥ ३३ ॥
ऐसी द्वैताची भाष जाये । मग ह्मणों जरि येक चि होये ।
तरि तेथ साक्षि कवण आहे । जाणतें जें ॥ ३४ ॥
ह्मणौनि असो हें आववें । एथ न बोलणें काइ बोलावें ।
ते खुण चि पावैल स्वभावें । आत्मारामीं ॥ ३५ ॥
जे ऐसेन सुखें मातले । आपणपां चि आपण गुंतले ।
ते मी जाण निखल ओतले । समरसाचे ॥ ३६ ॥
ते आनंदाचे अनुकार । सुखाचे अंकुर ।
किं महाबोधें विकार । केले जैसे ॥ ३७ ॥
ते विवेकाचे गावं । किं परब्रह्मिचे स्वभाव ।
ना तरि अलंकरले अवयव । ब्रह्मविद्येचे ॥ ३८ ॥
ते सत्वाचे सात्विक । किं चैतन्याचे आंगिक ।
हें बहु असो एकैक । वानिसि काइ ॥ ३९ ॥
तूं संतस्तवनीं रचसी । तरि कथेची से न करिसि ।
किर निरालीं बोल देखसी । सनागर ॥ १४० ॥

पारें तो रसातिशयो मुकुलीं । मग ग्रंथार्थुदीप उजळिं ।
करीं साधुहृदयराउळीं । मंगळउखा ॥ ४१ ॥
ऐसा गुरूचा उबाइला । निवृत्तिदासासि पातला ।
मग तो ह्मणे कृष्णु काइ बोलिला । तें चि आइका ॥ ४२ ॥

**योऽतःसुखोऽतरारामस्तथांतर्ज्योतिरेव यः ।**
**स योगी ब्रह्म निर्वाणं ब्रह्मभूतोऽधिगच्छति ॥ २४ ॥**

अर्जुना अंतःसुखाचां डोहीं । येकसरा तळु घेतला जिहीं ।
मग थिरावौनि ते हीं । ते चि जाले ॥ ४३ ॥
अथवा आत्मप्रकाशें चोखें । जो आपणपां चि विश्व देखे ।
तो देहें चि ब्रह्मसुखें । मानूं येइल ॥ ४४ ॥

**लभंते ब्रह्म निर्वाणमृषयः क्षीणकल्मषाः ।**
**छिन्नद्वैधा यतात्मानः सर्वभूतहिते रताः ॥ २५ ॥**

जें साचोकारें परम । नातःपर निःसीम ।
जिये गाविंचे निष्काम । अधिकारिये ॥ ४५ ॥
जें महर्षी वांटलें । विरक्तां भागा फीटलें ।
जें निःसंशैयां पीकलें । निरंतर ॥ ४६ ॥

**कामक्रोधवियुक्तानां यतीनां यतचेतसाम् ।**
**अभितो ब्रह्म निर्वाणं वर्तते विदितात्मनाम् ॥ २६ ॥**

जिहिं विषयांपासौनि हीतलें । चित्त आपुलें आपण जींतलें ।
ते निश्चित जेथ सूतले । चेति चि ना ॥ ४७ ॥
तें परब्रह्मनिर्वाण । जें आत्मविदांचें कारण ।
तें चि ते पुरुष जाण । पांडुकुमरा ॥ ४८ ॥
ते ऐसे कैसेन जाले । जें देहें चि ब्रह्मत्वा आले ।
हें हीं पूससि तरि भलें । संक्षेपें सांवों ॥ ४९ ॥

**स्पर्शान्कृत्वा बहिर्बाह्यांश्चक्षुश्चैवांतरे भ्रुवोः ।**
**प्राणापानौ समौ कृत्वा नासाभ्यंतरचारिणौ ॥ २७ ॥**

तारि वैराग्याचेन आधारें । तिहिं विषय दवडूनि बाहिरे ।
शरीरीं एकंदरें । केलें मना ॥ १५० ॥
साहाजें तिहिं संधिसिं भेटी । जेथ भ्रूपल्लवां पडे गांठि ।
तेथ पाठिमोरी दीठी । पाउखौनियां ॥ ५१ ॥
सांडूनि दक्षिण वाम । प्राणापानसम ।
चित्तेंसिं व्योम । गामिये कारीति ॥ ५२ ॥

**यतेंद्रियमनोबुद्धिर्मुनिर्मोक्षपरायणः ।**
**विगतेच्छाभयक्रोधो यः सदा मुक्त एव सः ॥ २८ ॥**

तेथ जैसीं रथ्योदकें सकलें । घेउनि गंगा समुद्रीं मिळे ।
मग एकैक वेगळें । काढूं नैये ॥ ५३ ॥
तैसी वासनांतरांची विवंचना । मग आपैसी पाउखे अर्जुना ।
जेव्हलि गगनीं लो मना । पवनें कीजे ॥ ५४ ॥
जेथ हें संसारचित्र उमटे । तो मनोरूपु पट फाटे ।
जैसा सरोवरु आटे । मग प्रतिभा नाहीं ॥ ५५ ॥
तैसें मनपण मुदल जाये । मग अहंभावादिक कें आहे ।
ह्मणौनि शरीरें चि गगनं होये । अनुभवी तो ॥ ५६ ॥
आह्मि मागा मत सांघितलें । जें देहीं चि ब्रह्मत्व पातले ।
ते एणें मार्गें आले । ह्मणौनियां ॥ ५७ ॥
यमनियमाचे डोंगर । अभ्यासांचे सागर ।
क्रमूनि हें पार । पातले ते ॥ ५८ ॥
तिहिं आपणपें करुनि निर्लेप । प्रपंचा घेतलें माप ।
मग साचाचें चि रूप । होउनि ठेले ॥ ५९ ॥
ऐसा योगयुक्तिचा उद्देशु । जेथ बोलिला हृषीकेशु ।
तेथ अर्जुनु सुडंसु । चमत्कारला ॥ १६० ॥
तें देखिलेयां कृष्णें जाणितलें । मग हांसौनि पार्थां ह्मणितलें ।
हें काइ पां चित्त उवाइलें । इयें बोलीं तूझें ॥ ६१ ॥

तवं अर्जुनु ह्मणे देऊ । परचित्तलक्षणाचा राऊ ।
भला जाणितला जी भाऊ । मानसु माझा ॥ ६२ ॥
मियां जें विवरूनि काहीं पूसावें । तें आदिं च कळिलें देवें ।
तरि बोलिलें तें चि सांघावें । विवळ करुनि ॥ ६३ ॥
यन्हविं तन्हैं अवधारां । जो दाखविला तुह्मीं अनुसारा ।
तो पव्हणेयांहूनि पायेउतारा । सोहोपा जैसा ॥ ६४ ॥
तैसा सांख्याहूनि षाहा प्रांजला । परि आह्मांसारिखेयां जी अभोलां।
एथ आथि काहिं प्रकाला । तो साहों ए वर ॥ ६५ ॥
ह्मणौनि एकु वेल देवा । तो चि पडिताला घेयावा ।
विस्तरैल तन्हैं सांघावा । साचंतु चि ॥ ६६ ॥
तवं कृष्ण ह्मणति हो कां । तुज हा मार्गु गमला नीका ।
तरि काइ जालें ऐकिजो कां । सुखें बोलों ॥ ६७ ॥
अर्जुना तूं परियससी । परियसौनियां अनुष्ठिसि ।
तरि आह्मासि वाणि काइसी । सांघैं बांपां ॥ ६८ ॥
आदिं चि चित्त मायेचें । वरि मीस जालें पढियंतेयाचें ।
आतां तें अद्भुतपण स्नेहाचें । कवण जाणे ॥ ६९ ॥
ते ह्मणो कारुण्यरसाची वृष्टि । किं नवेया स्नेहाची सृष्टी ।
हें असो नेणिजे दिठी । हरिचि वानुं ॥ १७० ॥
जे अमृताची जाणों ओतली । किं प्रेम चि पेउनि मातली ।
ह्मणौनि कां अर्जुनमोहें गुंतली । निगों नेणे ॥ ७१ ॥
हें बहू जें जें जल्पिजैल । तेणें कथेसी चि फांकु होईल ।
परि तें स्नेहरूप नै येइल । बोलवरि ॥ ७२ ॥

**भोक्तारं यज्ञतपसां सर्वलोकमहेश्वरम् ।**
**सुहृदं सर्वभूतानां ज्ञात्वा मां शांतिमृच्छति ॥ २९ ॥**

ह्मणौनि विसुरा काः येणें । तो ईश्वरु कवळावा कोणें ।
जो आपुलें मान नेणे' आपण चि ॥ ७३ ॥

तर्‍हीं मागिला ध्वनी आंतु । मज गमला साविया चि मोहितु ।
जें बलात्कारें असे ह्मणतु । परियसें परिस ॥ ७४ ॥
अर्जुना जेणें जेणें भेदें । तूझें कां चित्त बोधे ।
तैसें तैसें विनोदें । निरूपिजैल ॥ ७५ ॥
तो काइसेया नावं योगु । तेयाचा कवण उपयोगु ।
अथवा अधिकारप्रसंगु । कवणां एथ ॥ ७६ ॥
ऐसें जें जें काहीं । उक्त असे इये ठांई ।
तें आघवें चि पाहीं । सांघैन आतां ॥ ७७ ॥
तूं चित्त देउनि अवधारीं । ऐसें ह्मणौनियां हरी ।
बोलिजैल ते पुढारी । कथा आहे ॥ १७८ ॥

ॐ तत्सदिति श्रीमद्भगवद्गीतासूपनिषत्सु ब्रह्मविद्यायां योगशास्त्रे श्रीकृष्णार्जुनसंवादे संन्यासयोगो नाम पंचमोध्यायः ॥

॥ श्रीकृष्णार्पणमस्तु ॥

# ज्ञानेश्वरी

## अध्याय साहावा

श्रीगणेशायनमः

रायातें ह्मणे संजयो । तो चि अभिप्राउ अवधारिजो ।
कृष्णु सांघति आतां जो । योगरूपु ॥ १ ॥
साहाजें ब्रह्मरसाचें परगुणें । केलें अर्जुनालागि नारायणें ।
किं तिया चि अवसरीं पाहुणे । पातलों आह्मीं ॥ २ ॥
कैसी दैवाची थोरी नेणिजे । जैसें तान्हैलेयां तोय सेविजे ।
किं तें चिये विकरुनु पाहिजे । तवं अमृत आहे ॥ ३ ॥
तैसें आह्मांतुह्मां जालें । जें आठमुठी तत्व फावलें ।
तवं धृतराष्ट्रें ह्मणितलें । हें न पुसों तूतें ॥ ४ ॥
तेया संजया येणें बोलें । रायाचें हृदय चोजवलें ।
जें अवसरीं आहे घेतलें । कुमारांचिया ॥ ५ ॥
हें जाणौनि मनीं हांसिला । ह्मणे ह्मातारा मोहें नासिला ।
यऱ्हवि बोलु तरि भला जाला । अवसरिचा ॥ ६ ॥
परि तें तैसें कैसेन होईल । जात्यंधा कैंचें पाहील ।
तेवि च एरु सें घेईल । ह्मणौनि भिए ॥ ७ ॥
परि आपण चित्तिं आपुला । निकिया परीं संतोषला ।
जें तो संवादु कां फावला । कृष्णार्जुनाचा ॥ ८ ॥

तेणें आनंदाचेनि धालेपणें । साभिप्रायें अंतष्करणें ।
आतां आदरेंसीं बोलणें । घडैल तेया ॥ ९ ॥
तो गीतेमाजि षष्ठिचा । प्रसंगु असे आणिचा ।
जैसा क्षीरार्णविं अमृताचा । निवाडु जाला ॥ १० ॥
तैसें गीतार्थाचें सार । जें विवेकसिंधुचें पार ।
नाना योगविभवभांडार । उघडलें कां ॥ ११ ॥
जें आदिप्रकृतिचें विसंवणें । जें शब्दब्रह्मासि न बोलणें ।
जेथौनि गीतावल्लिचें ठाणें । प्ररोहो पावे ॥ १२ ॥
तो अध्याउ हा साहावा । वरि साहित्याचिया बरवा ।
सांघिजैल ह्मणौनि परियसावा । चित्त देउनि ॥ १३ ॥
माझा मन्हाटा चि बोलु कवतिकें । परि अमृतातें हीं पैजेंसीं जींके ।
ऐसीं अक्षरें चि रसिकें । मेळवीन ॥ १४ ॥
जिये कोवलिकेचेनि पाडें । दीसति नादिचे तरंग थोकडे ।
वेधें परिमळाचें बीक मोडे । जेयाचेनि ॥ १५ ॥
आइकां रसाळपणाचेया लोभा । किं श्रवणिं चि होथि जीभा ।
बोलें इंद्रियां लागे कलभा । येकमेकां ॥ १६ ॥
साहाजें शब्दु तरि विषो श्रवणाचा ।
परि रसना ह्मणे कां रसु चि हा आमचा ।
घ्राणासि भावो जये परिमळाचा ।
हा तो चि कां होईल ॥ १७ ॥
नवल बोलतिये रेखेची वाहाणी । दावितां डोळेयां हीं पुरों लागे आणि ।
ते ह्मणति उघडिली कां खाणि । रूपांची हे ॥ १८ ॥
जैथ संपूर्ण पद उभारे । तेथ मन चि धांवे बाहिरें ।
बोलभुजांहीं आशे भरे । आलिंगावेया ॥ १९ ॥
ऐसां इंद्रियें आपुलालां भाविं । झोंबतां परि तो सारिसेपणें चि बुझावी ।
जैसा एकला जग चेववी । सहस्रकरु ॥ २० ॥

तैसें शब्दाचें व्यापकपण । देखिजे असाधारण ।
पाठेयां भावज्ञां फावति गुण । चिंतामणिचे ॥ २१ ॥
हें असो तेयां बोलाचीं ताटें भलीं । वरि कैवल्यरसें ओगरलीं ।
हे प्रतिपत्ति मियां केली । निष्कामासि ॥ २२ ॥
आतां आत्मप्रभा नीचनवी । ते चि करूनि ठाणा दिवी ।
जो इंद्रियांतें चोरुनु जेवी । तेयासी च फावे ॥ २३ ॥
एथ श्रवणाचेनि पांगें । विण श्रोतेयां होआवें लागे ।
हें मनाचेनी चि आंगें । भोगिजे गा ॥ २४ ॥
आहाच बोलाची वालीप फेडिजे । आणि ब्रह्माचेया चि आंगा घडिजे ।
मग सुखेंसीं सुरवाडिजे । तेयामाझि ॥ २५ ॥
ऐसें हळुवारपण जरि येईल । तरि चि हें उपेगा जाइल ।
यऱ्हवीं आधवी गोठि होईल । मूकां बोलेतेयाची ॥ २६ ॥
परि तें असो आतां आघवें । न लगे श्रोतेयां कडसावें ।
जें एथ अधिकारियें स्वभावें । पूर्णकाम ॥ २७ ॥
जेहीं आत्मबोधाचिया आवडी । केली स्वर्गसंसाराची कुरवंडी ।
ते वांचौनु एथिची गोडी । नेणति आणिक ॥ २८ ॥
जैसा वायसीं चंद्रु नोळखिजे । तैसा प्राकृतीं ग्रंथु हा नेणिजे ।
आणि तो हिमांशु जेविं खाजें । चकोरांचें ॥ २९ ॥
तैसा सज्ञानांसि तरि हा ठाउ । आणि अज्ञानांसि आन गाउ ।
ह्मणौनि बोलावेया विपो पाहा हो । विशेषें नाहिं ॥ ३० ॥
परि अनुवादलों मी प्रसंगें । तें सज्जनीं उपसाहावें लागे ।
आतां सांघेन काइ श्रीरंगें । निरूपिलें जें ॥ ३१ ॥
तें बुद्धी हीं कवलितां सांकडें । ह्मणौनि बोलीं विपायीं सांपडे ।
परि निवृत्तिकृपाउजियेडें । देखेन मी ॥ ३२ ॥
जें दिठी हीं न पविजे । तें दिठीविण देखिजे ।
जऱ्हें अतींद्रिय लाहिजे । ज्ञानबळें ॥ ३३ ॥

ना तरि जें धातुवादिया हीं न जोडे । तें लोहीं चि पन्हरें सांपडे ।
जरि दैवयोगें चडे । परिसु हाता ॥ ३४ ॥
तैसी सद्गुरुकृपा होए । तरि करितां काइ आपु नोहे ।
ह्मणौनि अपार मातें आहे । ज्ञानदेउ ह्मणे ॥ ३५ ॥
तेणें कारणें मीं बोलेन । बोलीं अरूपाचें रूप दावीन ।
अतींद्रिय परि भोगवीन । इंद्रियांकरवि ॥ ३६ ॥

**श्रीभगवानुवाच ॥**

**अनाश्रितः कर्मफलं कार्यं कर्म करोति यः ॥**
**स संन्यासी च योगी च न निरग्निर्न चाक्रियः ॥ १ ॥**

आइकां यशश्रीऔदार्य । ज्ञानवैराग्यऐश्वर्य ।
हे साही गुणवर्य । वसति जेथ ॥ ३७ ॥
तेथ तो भगवंतु । जो निःसंगाचा सांगातु ।
ह्मणे पार्था दत्तचित्तु । होईं आतां ॥ ३८ ॥
आइकें योगी आणि संन्यासी जनीं । हे एक चि सिनाने झनें मानीं ।
यऱ्हवीं विचारिजति जवं दोन्हीं । तवं एकु चि ते ॥ ३९ ॥
सांडिजे दुजेया नामाचा आभासु । तरि योगु तो चि संन्यासु ।
पांतां ब्रह्मीं नाहिं अवकाशु । दोहींमाझि ॥ ४० ॥
जैसें नावांचेनि अनारिसेपणें । एका पुरुषातें आळवणें ।
कां दोहीं मार्गीं जाणें । एका चि ठाया ॥ ४१ ॥
ना तरि एक चि उदक साहाजें । परि सिनानां घटीं भरिजे ।
तैसें भिन्नत्व हें जाणिजे । योगसन्यासांचें ॥ ४२ ॥
आइकें सकळसंमतें जगीं । पांहे तो चि योगी ।
जो कर्मे करौनि रागीं । नव्हे चि फळीं ॥ ४३ ॥
जैसी मही हे उद्भिजें । जनी अहंबुद्धिविण साहाजें ।
तेथिचीं तियें बीजें । अपेक्षीना ॥ ४४ ॥

तैसें आम्नायाचेनि आधारें । जातीचेनि अनुकारें ।
जे जैं अवसरें । करणें पावे ॥ ४५ ॥
तें तैसें चि उचित करी । परि साटोप नाहिं शरीरीं ।
बुद्धि हीं करौनु फलवेन्ही । जाये चि ना ॥ ४६ ॥
ऐसा तो चि गा संन्यासी । पार्था परियसि ।
तो चि भरवंसेंसीं । योगीश्वर ॥ ४७ ॥
वांचूनि उचित कर्म प्रासंगिक । तेयातें ह्मणे हें सांडीन बद्धक ।
तरि टाकटाकीं आणिक एक । मांडी चि तो ॥ ४८ ॥
जैसा झालौनियां लेपु एकु । सवें चि लाविजे आणिकु ।
तैसा आग्रहाचा पाइकु । विचंबे वायां ॥ ४९ ॥
गृहस्थाश्रमाचें ओझें । कपाळीं आदिं चि आहे साहाजें ।
किं तें चि संन्यासु सवा टेविजे । सरिसें पुडुती ॥ ५० ॥
ह्मणौनि अग्निसेवा न संडितां । कर्मरेखा नोलंडिता ।
आथि योगसुख स्वभावता । आपणपां चि ॥ ५१ ॥
आइकें संन्यासी तो चि योगी । ऐसी एकवाक्यतेची जगिं ।
गुढी उभिली अनेकीं । शास्त्रांतरीं ॥ ५२ ॥

**यं संन्यासमिति प्राहुर्योगं तं विद्धि पांडव ॥**
**न ह्यसंन्यस्तसंकल्पो योगी भवति कश्चन ॥ २ ॥**
**आरुरुक्षोर्मुनेर्योगं कर्म कारणमुच्यते ।**
**योगारूढस्य तस्यैव शमः कारणमुच्यते ॥ ३ ॥**

जेथ संन्यासिला संकल्पु तुटे । तेथ चि योगाचें सर्वस्व भेटे ।
ऐसें हें अनुभवाचेनि धटे । साच तेया ॥ ५३ ॥
आतां योगाचलाचा निमथा । जरि टाकावा आथि पार्था ।
तरि सोपाना या कर्मपंथा । चूकासि झनें ॥ ५४ ॥
एणें यमनियमाचेनि तळवटें । रिगें आसनाचिये पाउलवाटे ।
एइं प्राणायामाचेनि आडकंठें । वरौता गा ॥ ५५ ॥

मग प्रत्याहाराचा आधाडा । जो बुद्धिचेयां हीं पायां निसरडा ।
जेथ हटिये सांडित होडा । कडेलग ॥ ५६ ॥
तन्हि अभ्यासाचेनि वळें । तिये प्रत्याहारीं निराळे ।
नाखि लागैल घेइं डाळें । वैराग्याचीं ॥ ५७ ॥
ऐसा पवनाचेनि पाठारें । एतां धारणेचें पेयारें ।
क्रमिध्या नावं चवरें । सांडे तवं ॥ ५८ ॥
मग तेया मार्गाची धावं । पुरैल प्रवृत्तिची हांवं ।
जेथ साध्यसाधना खेवं । समरसें होइल ॥ ५९ ॥
जेथ पुढैल पैसु पारुखे । मागील स्मरावें तें ठाके ।
ऐसिये सरिसिये भूमिके । समाधि राहे ॥ ६० ॥
येणें उपायें योगारूढु । जो निरवधी जाला प्रौढु ।
तेयाचेया चिन्हामाजि निवाडु । तें सांवैन आइक ॥ ६१ ॥

**यदा हि नेंद्रियार्थेषु न कर्मस्वनुषज्जते ॥**
**सर्वसंकल्पसंन्यासी योगारूढस्तदोच्यते ॥ ४ ॥**

तरि जेयाचेया इंद्रियांचेया घरा । नाहिं विषयांचिया एरझारा ।
जो आत्मबोधाचेया ओवरां । पवडला असे ॥ ६२ ॥
जेयाचें सुखदुःखाचेनि आंगें । झगटलें मानस चेओ नेघे ।
विखो पासीं हीं आलेयां आशे न रिगे । हें काइ ह्मणौनि ॥६३॥
इंद्रियें कर्माचां च ठांइं । वाढिनलीं पारि कहीं ।
फलहेतुची राळ नाहीं । अंतष्करणीं ॥ ६४ ॥
असतेनि देहें येतुला । जो चेनू चि देखसी निदेला ।
तो चि योगारूढु भला । वोळख तूं ॥ ६५ ॥
तेथ अर्जुनु ह्मणे अनंता । हें मज विस्मो बहू आइकतां ।
सांवैं तेया ऐसी योग्यता । कवणें दीजे ॥ ६६ ॥

**उद्धरेदात्मनात्मानं नात्मानमवसादयेत् ।**
**आत्मैव ह्यात्मनो बंधुरात्मैव रिपुरात्मनः ॥ ५ ॥**

तंव हासोनि कृष्णु ह्मणे । तुझें नवल ना हें बोलणें ।
कवणासि काइ दीजैल कवणें । एथ अद्वैतीं इये ॥ ६७ ॥
पैं व्यामोहाचिये सेजे । वळियां अविद्या निद्रितां रिगिजे ।
तेव्हलि हा दुःस्वप्नु भोगिजे । जन्ममृत्युचा ॥ ६८ ॥
पाठिं अवसांत ये चेउ । तैं ते आवघें चि होये वावो ।
ऐसा उपजे नित्य सद्भावो । तो ही आपणपां चि ॥ ६९ ॥
ह्मणौनि आपण चि आपणपेया । घातु कीजतसे धनंजया ।
चित्त देउनि येया नाथिलेया । देहाभिमाना ॥ ७० ॥

**बंधुरात्मात्मनस्तस्य येनात्मैवात्मना जितः ॥**
**अनात्मनस्तु शत्रुत्वे वर्तेतात्मैव शत्रुवत् ॥ ६ ॥**

हा विचारूनि सांडिजे । मग असती चि वस्तु होइजे ।
तरि आपुली शास्ति साहाजें । आपण केली ॥ ७१ ॥
यऱ्हविं कोसेकीटकिएचिया परीं । तो आपणपेया आपण वैरी ।
जो आत्मबुद्धि शरीरीं । चारुस्थला ॥ ७२ ॥
कैसा प्राप्तिचिये वेळे । निदैवां आंधळेपणाचे डोळे ।
किं असते आपुले डोळे । आपण बांधे ॥ ७३ ॥
कां कव्हणी येकु भ्रमलेपणें । मी तो नोहें गा चोरलां ह्मणे ।
ऐसा नाथिला संदु अंतष्करणें । घेउनि ठाके ॥ ७४ ॥
यऱ्हविं होय तें चि तो आहे । परि काइ कीजे बुद्धि तैसी नोहे ।
देखां स्वप्निचेनि घायें । किं मरे साचे ॥ ७५ ॥
जैसी तेया शुकाचेनि आंगभारें । नळिका भविनली एरी मोहरे ।
तरि तेणें नुडावें कां परि न पुरे । मनाशंके ॥ ७६ ॥
वायां चि मान पीळी । आंठूइ हियें आवळी ।
टिटियांतु नळी । धरूनि ठाके ॥ ७७ ॥
ह्मणे बांधला मी फुडा । ऐसिये भावनेचिये पडे खोडां ।
किं मोकळेयां पायांचा चवडा । गुंफी अविकें ॥ ७८ ॥

ऐसा काजेंविण आंतुडला । तो सांवै पां काइ आणिकें बांधला ।
मग नोंसंडी जन्हें नेला । तोडौनु आशा ॥ ७९ ॥
ह्मणौनि आपणपेंयां आपण चि रिपु । जेणें वाढविला हा संकल्पु ।
एरु स्वयें ह्मणां बन्धुबापु । जो नाथिलें नेघे ॥ ८० ॥

**जितात्मनः प्रशांतस्य परमात्मा समाहितः ॥**
**शीतोष्णसुखदुःखेषु तथा मानापमानयोः ॥ ७ ॥**

तेया स्वांतष्करणजिता । सकलकामोपशांता ।
परमात्मा परौता । दूरि नाहीं ॥ ८१ ॥
जैसा किडालाचा दोखु जाये । तरि पन्हेरें तें चि होये ।
तैसें जीवा ब्रह्मत्व आहे । संकल्पलोपीं ॥ ८२ ॥
घटाकाशु हा जैसा । निमालेयां तेया अवकाशा ।
न लगे मिळों जाणें आकाशा । आना ठाया ॥ ८३ ॥
तैसा देहीं अहंकारु नाथिला । समूळ जेयाचा नासला ।
तो चि परमात्मा सांचला । आदि चि आथि ॥ ८४ ॥
आतां शीतोष्णांचिया वाहणी । तेथ कें सुखदुःखाची कडसणी ।
इयें न समाति गा बोलणीं । मानापमानांचिया ॥ ८५ ॥
जिया जिया वाटा सूर्यु जाये । तेउतें तेजाचें चि विश्व होये ।
तैसें तेया पावें तें आहे । तो चि ह्मणौनि ॥ ८६ ॥
देखें मेघौनि सूटति धारा । तिया न रूपति जैसिया अंबरा ।
तैसीं शुभाशुभें योगेश्वरा । नव्हंति आनें ॥ ८७ ॥

**ज्ञानविज्ञानतृप्तात्मा कूटस्थो विजितेंद्रियः ॥**
**युक्त इत्युच्यते योगी समलोष्टाश्मकांचनः ॥ ८ ॥**

जो हा विज्ञानात्मकु भावो । तेया विवरितां जाला वावो ।
मग लागला जवं पाहों । तवं ज्ञान तें तो चि ॥ ८८ ॥
आतां व्यापकु किं एकदेशी । हे उहीपुही जे ऐसी ।
ते करावे ठेली आपैसी । दुजेन विण ॥ ८९ ॥

ऐसा शरीरिं च परि कवतिकें । ब्रह्माचेनि पाडें तुके ।
जेणें जिंतिलीं इयें एकें । इंद्रियें गा ॥ ९० ॥
तो जितेंद्रियु साहाजें । योगयुक्तु चि ह्मणिजे ।
जेयातें सानें थोर नेणिजे । कव्हणिये काळिं ॥ ९१ ॥
देखैं सोनेयाचें निखळ । मेरु एसणें ढिसाळ ।
आणि मातियेचें डिखळ । सरिसें चि मानी ॥ ९२ ॥
पातां पृथ्वियेचें मोल थोकडें । ऐसें अनर्घ्य रत्न चोखडें ।
देखे दगडाचेनि पाडे । निचाड ऐसा ॥ ९३ ॥

**सुहृन्मित्रार्युदासीनमध्यस्थद्वेष्यबंधुषु ॥**
**साधुष्वपि च पापेषु समबुद्धि विशिष्यते ॥ ९ ॥**

आतां सुहृदु आणि शत्रु । कां उदासु आणि मित्रु ।
हा भावभेदु विचित्रु । संकल्पु कैंचा ॥ ९४ ॥
तेया बंधु काइ कासेयाचा । द्वेषिया कव्हणु केंहाचा ।
मीं च विश्व ऐसा जेयाचा । बोधु जाला ॥ ९५ ॥
मग तेयाचिये दृष्टी । अधमोत्तम किरीटी ।
काइ परिसाचिये कसवटी । वानिया जाणें ॥ ९६ ॥
तो जेविं निर्वाणवर्णु चि करी । तैसी तेयाची बुद्धि चराचरीं ।
होए साम्याची उजरी । निरंतर ॥ ९७ ॥
ते विश्वालंकाराचेनि विसुरें । जन्हि आहाति आनान आकारें ।
तन्हि घडलें एकें चि भांगारें । परब्रह्में ॥ ९८ ॥
ऐसें जाणणें जें बरवें । तेया फावलें तें आवघें ।
ह्मणौनि आहाचवाहाच न झकवे । एणें आकारचित्रें ॥ ९९ ॥
घापे पटामाजि दीठी । दीसे तंतुचीं संघ सिटी ।
परि तो एका वांचौनि गोठी । करूं चि नेये ॥ १०० ॥
ऐसी प्रतीति हे जेथ गवसे । अनुभव हिं जेया असे ।
तो चि समबुद्धि अनारिसें । नव्हे जाणें ॥ १ ॥

**योगी युंजीत सततमात्मानं रहसि स्थितः ॥**
**एकाकी यतचित्तात्मा निराशीरपरिग्रहः ॥ १० ॥**

जेयाचें नावं गा तीर्थराउ । दर्शनें प्रातिचा चि ठाउ ।
जेयाचेनि संगें ब्रह्मभाउ । भ्रांतांसी गा ॥ २ ॥
जेयाचेनि बोलें धर्मु जिए । दीठि महासिद्धितें विये ।
देखें स्वर्गसुखादि इएं । खेलु जेयाचा ॥ ३ ॥
विपायें जरि आठवला चित्ता । तरि दे आपुली योग्यता ।
हें असो तेहातें प्रसंसितां । लाभु आथि ॥ ४ ॥
पुढुती अस्तवेना ऐसें । जेया पाहलें अद्वैतदिवसें ।
मग आपणपां चि आपण असे । अखंडीत ॥ ५ ॥
ऐसिया द्रिष्टि जो विवेकी । पार्था तो एकाकी ।
साहाजें अपरिग्रही जें तिहिं लोकीं । तो चि ह्मणौनि ॥ ६ ॥
ऐसिं इयें असाधारणें । निष्पन्नाचीं लक्षणें ।
आपुलेन बौहसपणें । बोले कृष्णु ॥ ७ ॥
जो ज्ञानियांचा बापु । देखणेयांचिये दीठी दीपु ।
जेया दादुलेयाचा संकल्पु । विश्व रची ॥ ८ ॥
प्रणवाचिये पेंठे । जालें शब्दब्रह्म मांजिठें ।
तें जेयाचेया यशा धाकुटें । वेढूं न पुरे ॥ ९ ॥
जेहाचेनि अंगिकें तेजें । आउ रविशशिचिये वणिजे ।
ह्मणौनि जग हें वेसजें । पोसे तेयां ॥ ११० ॥
हां गा नावं चि येक जेहाचें । पातां गगन हीं दीसे टांचें ।
गुण येकेक काइ तेहाचे । कलिसील तूं ॥ ११ ॥
ह्मणौनि असो हें वानणें । सांघें नेणों कवणाचीं लक्षणें ।
दावावीं मीसें एणें । बोलिलां तों ॥ १२ ॥
आइकां द्वैताचा ठाउ चि फेडी । ते ब्रह्मविद्या कीजैल उघडी ।
तरि अर्जुनु पढिये हे गोडी । नासैल हान ॥ १३ ॥

ह्मणौनि तें तैसें बोलणें । नव्हे सतताळ आड लावणें ।
केलें मेळु चि वेगळेपणें । भोगावेया ॥ १४ ॥
जै सोहंभाओ हा ढंकु । मोक्षसुखा लागौनि रंकु ।
तेयाचिये दीठिचा ज्ञनें कलंकु । लागे प्रेमा ॥ १५ ॥
विपायें अहंभाओ येयाचा जाइल। मिं तें चि जरि हा होईल ।
तरि काइ कीजैल । एकलेयां ॥ १६ ॥
दीठी चि पाहातां निविजे । कां तोंड भरुनु बोलिजे ।
दाटूनु खेवं देइजे । ऐसें कवण आहे ॥ १७ ॥
आपुलेया मना बरवी । जे असमाई गोठि जीवीं ।
ते कवणेंसिं मग चावळावी। जरि ऐक्य जालें ॥ १८ ॥
इया काकुळती जनार्दनें । अन्योपदेशाचेनि हातासनें ।
बोलामाझिं मन मनें । आलिंगुं सरलें ॥ १९ ॥
हें परिसतां जरि कानडें । तरि जाण पां पार्थु उघडें ।
श्रीकृष्णसूत्राचें चि रूपडें । ओतलें आहे ॥ १२० ॥
हें असो वयसेचिये सेवटीं । जैसें येक चि विये वांझौटी ।
मग ते मोहाची तुगुटी । नाचों लागे ॥ २१ ॥
तैसें जालें अनंता । ऐसें तरि मीं न ह्मणतां ।
जरि तेथ न देखतां । अतिशयो एथ ॥ २२ ॥
पाहा पां नवळ कैसें चोज । कें उपदेशु कें जूझ ।
पारि पुढें वाळभाचें चि भोज । नाचतसे ॥ २३ ॥
आवडि ह्मणौनि न लजवी । व्यसन जैसें न सीणवी ।
पीसें आणि न भुळवी । तरि तें चि काइसें ॥ २४ ॥
ह्मणौनि भावार्थु हा ऐसा । अर्जुनु मैत्रिएचा कुवांसा ।
कि सुखें शृंगारलेया मानसा । दर्पणु तो ॥ २५ ॥
बापु पुण्य पवित्र । जगीं भक्तिबीजासि क्षेत्र ।
तो कृष्णकृपे पात्र । एया चि लागि ॥ २६ ॥

हो काज आत्मनिवेदनातळिची । जे पीठिका आहे सख्याची ।
पार्थु अधिष्ठात्री तेथिची । मातृका गा ॥ २७ ॥
पासिं चि गोसांविं वर न वनिजे । मग पाइकाचा गुणु घेइजे ।
ऐसा अर्जुनु तो साहाजें । पढिए हरी ॥ २८ ॥
पाहे पां अनुरागें भजे । जे प्रियोत्तमें मानिजे ।
ते पती ही इतु काइ न वनिजे । पतिव्रता ॥ २९ ॥
तैसा अर्जुनु विशेषें स्तवावा । ऐसें आवडलें मज जीवा ।
जें तो त्रिभुवनीचेया दैवां । आयतन जाला ॥ १३० ॥
जेयाचिये आवडीचेन पांगें । अमुर्त्तु ही मूर्त्ति आंवगे ।
पूर्णा पारि लागे । अवस्था जेयाची ॥ ३१ ॥
तवं श्रोते ह्मणति दैवं । कैसी बोलाची हवाव ।
काइ नादातें हान वरिवं । जीणौनि आले ॥ ३२ ॥
हां हो नवल नोहे देशी । मऱ्हाटी बोलिजे तरि ऐसी ।
वाणें उमटत आहे मा आकाशीं । साहित्या रंगाचें ॥ ३३ ॥
कैसें उन्मेखचांदिणें तार । आणि भावार्था पडतसे गार ।
हें चि श्लोकार्थ कुमुदिं तरि फार । सेवितां होंतें ॥ ३४ ॥
ऱ्हाड चि निचाडां करी । ऐसी मनोरथीं इए थोरी ।
तेणें विवळलें जेथ आंतरीं । तेथ डोलु आला ॥ ३५ ॥
तें निवृत्तिदासें जाणीतलें । मग अवधान देआं ह्मणितलें ।
नवल पांडवकुळीं पाहलें । कृष्णादिवसें ॥ ३६ ॥
देवकिया उदरीं वाहिला । यशोदा सायासें पाहिला ।
किं शेषीं आइता उपेगा गेला । पांडवांसी ॥ ३७ ॥
ह्मणौनि बहुत दीवसु ओळगावा । कां अवसरु पाहोनि विनवावा ।
हा ही सोसु तेया सदैवां । पडे चि ना ॥ ३८ ॥
हें असोनु कथा सांवें वेगीं । मग अर्जुनु ह्मणे सलगी ।
देवा इये संतचिन्हें हान आंगीं । न ठांति माझां ॥ ३९ ॥

यऱ्हविं ययां लक्षणाचेया सारा । मी अपाडें किर अपुरा ।
परि तुमचेनि बोलें अवधारां । थोरावें जरि ॥ १४० ॥
जी तुह्मीं चित्त देआल । तरि ब्रह्म माझें होइल ।
काइ जाले अभ्यासिजैल । सांघाल तें ॥ ४१ ॥
हां हो नेणों कोणाची काहाणी । श्लाघिजत असे अंतष्करणीं ।
ऐसी जालेपणाची स्रियाणी । काइसी तऱ्हैं ॥ ४२ ॥
तें आंगें चि मियां होइजो कां । एतुलें गोसांविंपणें आपुलें कीजो कां ।
तवं हांसौनि कृष्णु हो कां । करूं ह्मणथी ॥ ४३ ॥
देखां संतोखु एकु न जोडे । तवं सुखाचें सैघ सांकडें ।
मग जोडलेयां काहीं कवणीकडें । अपुरें असे ॥ ४४ ॥
तैसा सर्वेश्वरु चि बलिया सोंके । ह्मणौनि ब्रह्म होये कवतुकें ।
परि कैसा भारें आतला पां पीके । दैवांचेनि ॥ ४५ ॥
जो जन्मसहस्रांचिया साटीं । इंद्रादिकां महागु भेटी ।
तो आधीनु केतुला किरीटी । जें बोलु ही न साहे ॥ ४६ ॥
मग आइकां जें पांडवें । ह्मणितलें ब्रह्म मियां चि होआवें ।
तें अशेष ही देवें । निर्द्धारिलें ॥ ४७ ॥
तेथ ऐसें चि एक विचारिलें । जें यया ब्रह्मत्वाचे डोहोले ।
परि उदरा वैराग्य आहे आलें । बुद्धिचेया ॥ ४८ ॥
यऱ्हविं दिवस तरी येया अपुरे । परि तें वैराग्यवसंताचेनि भारें ।
जें सोहंभावमहुरें । मोडौनि आलें ॥ ४९ ॥
ह्मणौनि प्राप्तिफलीं फलतां । एयासि वेलु न लगैल आतां ।
होये विरगतु ऐसा अनंता । भरवसा जाला ॥ १५० ॥
ह्मणे जें जें हा अधिष्ठील । तें आतां आरंभीं चि एआ फावैल ।
ह्मणौनि सांघितला न वचैल । अभ्यासु वायां ॥ ५१ ॥
ऐसें विवरौनियां श्रीहरी । ह्मणितलें तेया अवस्वरीं ।
अर्जुना हा अवधारीं । पंथराजु ॥ ५२ ॥

जेथ प्रवृत्तितरूचां बुडिं । दीसती निवृत्तिफळांचिया कोडी ।
जिये मार्गिचा कापडी । महेशु आझुइ ॥ ५३ ॥
पैं योगिवृंदें वहिलीं । आड चि आकाशें निगाली ।
किं तेथ अनुभवाचां पाउलीं । धोरणु पडिला ॥ ५४ ॥
ते हीं आत्मबोधाचेनि उजुकारें । धांवे घेतली एकसरें ।
एर सकल मार्ग निदुसुरे । सांडूनियां ॥ ५५ ॥
पाठिं महर्षी एणें आले । साधकांचे सिद्ध जाले ।
आत्मविद थोरावले । एणें चि पंथें ॥ ५६ ॥
हा मार्गु जैं देखिजे । तैं ताहन भूक विसरिजे ।
रात्रि दिवसु नेणिजे । वाटे इये ॥ ५७ ॥
चालतां पाउल जेथ पडे । तेथ अपवर्गाची खाणि उघडे ।
अव्हांटलेयां जोडे । स्वर्गसुख ॥ ५८ ॥
निगिजे पूर्विली मोहोरा । किं येइजे पश्चिमाचेया घरा ।
निश्चलपण धनुर्द्धरा । चालणें एथिचें ॥ ५९ ॥
एणें मार्गें जेया जाइजे । तो गाऊं आपण होइजे ।
हें सांघों काइ साहाजें । जाणसी तूं ॥ १६० ॥
तेथ पार्थें ह्मणितले देवा । तरि तें चि मग केव्हां ।
कां आर्त्तिसमुद्रौनि न कढावा । बुडतु जी मी ॥ ६१ ॥

**शुचौ देशे प्रतिष्ठाप्य स्थिरमासनमात्मनः ॥**
**नात्युच्छ्रितं नातिनीचं चैलाजिनकुशोत्तरम् ॥ ११ ॥**

तवं कृष्णु ह्मणति ऐसें । उत्सुक बोलणें काइसें ।
आह्मि सांघत असों आपैसें । वरि पूसिलें तुवां ॥ ६२ ॥
तरि विशेषें आतां चि बोलिजैल । परि तें अनुभवें उपेगा जाइल ।
ह्मणौनि तैसें एक लागैल । स्थान पाहावें ॥ ६३ ॥
जेथ आराणुकेचेनि कोडें । बैठलेयां उठूं नावडे ।
वैराग्यासि दूण चडे । देखिलेयां जें ॥ ६४ ॥

जो वसविला ठाउ । संतोषासि साव्हाउ ।
मना होये साव्हाउ । धैर्याचा ॥ ६५ ॥
अभ्यासू चि आपणेयांतें करी । हृदयातें अनुभउ चि विवरी ।
ऐसी रम्यपणाची थोरी । अखंड जेथें ॥ ६६ ॥
जेया आड जातां पार्थी । तपश्चर्येचेयां मनोरथां ।
पाखांडियाची ही आस्था । मूळ होये ॥ ६७ ॥
सभावें वाटा येतां । जारि वरिपडा जाला अवचिता ।
तरि सकामु हीं परि माघौता । निगों विसरे ॥ ६८ ॥
ऐसें न व्हातेआतें राहावी । भ्रमातुकातें बैसवी ।
थापटूनि चेववी । विरगतितें ॥ ६९ ॥
हें राज्य वर सांडिजे । मग निवातां एथ चि असिजे ।
ऐसें श्रिंगारिआंहीं उपजे । देखत खेउ ॥ १७० ॥
जें एणें मानें बरवंट । तैसें चि अति चोखट ।
जेथ अधिष्ठान प्रकट । डोळां दीसे ॥ ७१ ॥
आणिक येक पावें । जें साधकिं वसतें होआवें ।
आणि जनाचेनि पाएरवें । मैळे चि ना ॥ ७२ ॥
जेथ अमृताचेनि पाडें । मुळां हीं सकट गोडें ।
जोडति दाटें झाडें । सदा फळतिं ॥ ७३ ॥
पाउलां पाउलां उदकें । परि वरिषाकाळिं हिं चोखें ।
निर्झरें कां अशेषें । सुलभें जेथ ॥ ७४ ॥
हो अतपु ही आळुमाळु । जाणिजे तऱ्हीं सीतळु ।
पवनु अति निर्वळु । मंदु झुळुका ॥ ७५ ॥
बहुतकरूनि निःशब्द । दाट न रिगे स्वापद ।
शुक हान षट्पद । तेयांचे नाहीं ॥ ७६ ॥
पाणिलगें हंसें । दोनि च्यारि सारसें ।
कव्हणी एकीं वेळीं बैसे । तरि कोकिळु ही होए ॥ ७७ ॥

निरंतर नाहीं । तऱ्हीं आलां गेलां कहीं ।
होंतु कां मयूरें हीं । तें आम्हीं न म्हणों ॥ ७८ ॥
परि आवसिक पांडवा । ऐसा ठाओ जोडावा ।
तेथ निर्गुडु मठु होआवा । कां शिवालया ॥ ७९ ॥
दोहींमाजि आवडतें । जें मानलें होये चित्तें ।
बहुतकरूनि एकांतें । बैसिजे गा ॥ १८० ॥
ह्मणौनि तैसें तें जाणावें । मन राहातें पावें ।
राहील तेथ रचावें । आसन हें ॥ ८१ ॥
वरि चोखट मृगसेवडी । माझि वस्त्राची घडी ।
तलवटीं अमोडी । कुशांकुर ॥ ८२ ॥
सकोमल सरिसे । सुवद्ध राहांति आपैसे ।
एकें पाडें तैसें । ओजा घालीं ॥ ८३ ॥
परि सांव्हिआं चि उंच होईल । तरि आंग हान डोलैल ।
नीचा तरि पावैल । भूमिदोखु ॥ ८४ ॥
म्हणौनि तैसें न करावें । सामधेनिआ एं धरावें ।
हें बहू असो होआवें । आसन ऐसें ॥ ८५ ॥

**तत्रैकाग्रं मनःकृत्वा यतचित्तेंद्रियक्रियः ॥**
**उपविश्यासने युंज्याद्योगमात्मविशुद्धये ॥ १२ ॥**

मग तेथ आपण । एकाग्र अंतष्करण ।
करूनि गुरुस्मरण । अनुभविजे ॥ ८६ ॥
जैसेनि स्मरतेनि आदरें । सबाह्य सात्विकें भरे ।
जवं कठिनपण कां विरे । अहंभावाचें ॥ ८७ ॥
विषयांचा विसरु पडे । इंद्रियांची कसमस मोडे ।
मनाची घडी घडे । हृदयामाझि ॥ ८८ ॥
ऐसें ऐक्य हें साहाजें । फावे तवं राहिजे ।
मग तेणें चि बोधें बैसिजे । आसनावरि ॥ ८९ ॥

आतां आंगातें आंग करी । पवनातें पवनु चि धरी ।
ऐसी अनुभवाची उजिरी । हों चि लागे ॥ १९० ॥
प्रवृत्ति मागौति मोहरे । समाधि ऐलाडि उत्तरे ।
आघवें अभ्यासु सरे । बैसत खेवो ॥ ९१ ॥

**समं कायशिरोग्रीवं धारयन्नचलं स्थिरम् ॥**
**संप्रेक्ष्य नासिकाग्रं स्वं दिशश्चानवलोकयन् ॥ १३ ॥**

मुद्रेची प्रौढि ऐसी । ते चि सांविजैल आतां परिहसें ।
तरि ऊरू इया जघनेंसीं । जडूनि घाली ॥ ९२ ॥
चरणतळें देव्हडीं । आधारद्रुमाचां बुडीं ।
सुघटितें गाढीं । संचरि पां ॥ ९३ ॥
सव्य तें तळीं ठेविजे । तेणें सीवणिमध्यु पीडिजे ।
वरि बैसे तो साहाजें । वामचरणु ॥ ९४ ॥
गुदमेंढ्रा आंतौतीं । च्यारि चि आंगुळें निरुतीं ।
तेथ सार्द्ध सार्द्ध प्रांतीं । सांडूनियां ॥ ९५ ॥
माझि अंगुळ एक नीगे । तेथ टांकेचेन उत्तरभागें ।
निहटिजे वरि आंगें । पेल्लेनि ॥ ९६ ॥
उचललें कां नेणिजे । तैसें पृष्ठांत उचलिजे ।
गुल्फद्वय धरिजे । तेणें चि मानें ॥ ९७ ॥
मग शरीरसंचु पार्था । हा अशेषु ही सर्वथा ।
पार्ष्णिचा माथां । स्वयंभु होये ॥ ९८ ॥
अर्जुना हें जाण । मूळबंधाचें लक्षण ।
वज्रासन गौण । नाम एयासि ॥ ९९ ॥
ऐसी आधारीं मुद्रा पडे । आणि अधिचा मार्गु मोडे ।
तेथ अपानु आंतुलीकडे । उन्हटों लागे ॥ २०० ॥
तवं करपुट आपैसें । वाम चरणीं बैसे ।
बाहुमूळीं दीसे । थोरी आली ॥ १ ॥

माझि उभारलेनि दंडें । शिरकमल होये गाढें ।
नेत्रद्वारिचीं कवाडें । लागों पांति ॥ २ ॥
वरिचिलें पातिं न ढलति । तालिचिं तलिं पुंजालति ।
ते अर्द्धोन्मीलनस्थिति । उपजे तेयां ॥ ३ ॥
दीठि राहुनु आंतुलीकडे । बाहिरें पाउल घाली कोडें ।
तें ठायें ठाउ पडे । नासाग्रपीठीं ॥ ४ ॥
ऐसें अढंचें आंतु चि रचे । बाहिरील मावौते न वचे ।
ह्मणौनि राहाणें आधिं ए दीठिचें । तेथ चि होये ॥ ५ ॥
आतां दिशांची भेटि घेयावी । कां रुपाची वाट पाहावी ।
हे चाड सरे आघवी । आपेसेया ॥ ६ ॥
मग कंठनाल आटे । हणौटी हडौती दाटे ।
ते गाढी होउनि निहटे । वक्षस्थलीं ॥ ७ ॥
माझि घंटिका लोपे । वरि बंधु जो आरोपे ।
सो जालंधरु ह्मणिपे । पांडुकुमरा ॥ ८ ॥
नाभी वरि पोखे । उदर हें थोंके ।
आंतरीं फांके । हृदयकोश ॥ ९ ॥
स्वाधिष्ठानावरिली कांठीं । नाभिस्थानातलवटीं ।
बंधु पडे किरीटी । उडियाणु तो ॥ २१० ॥

**प्रशांतात्मा विगतभीर्ब्रह्मचारिव्रते स्थितः ॥**
**मनः संयम्य मच्चित्तो युक्त आसीत मत्परः ॥ १४ ॥**

ऐसी शरीराबाहिरिलीकडे । अभ्यासाची पाखर पडे ।
सवें आंतु त्राये मोडे । मनोधर्माची ॥ ११ ॥
कल्पना निमे । प्रवृत्ति समे ।
आंगें मन विरमे । साव्हिआं चि ॥ १२ ॥
क्षुधा काइ जाली । निद्रा केउती गेली ।
हे आठवण हीं हीरतली । न दिसे वेगां ॥ १३ ॥

जो मूलबंधें अडला । अपानु माघौता मुरडला ।
तो सवें चि वरि सांकडला । फांकु धरी ॥ १४ ॥
क्षोभलेपणें माजे । उवाइला ठाइं गाजे ।
मणिपुलेंसीं झुंझे । राहूनियां ॥ १५ ॥
मग थावली ते वाहुंटली । सैग घेउनि घर डहुली ।
बालपणिचिं कोठली । बाहिरि घाली ॥ १६ ॥
भीतरि बलि न धरे । कोठेआं माझि संचरे ।
कफपित्ताचे थारे । उरों नेदी ॥ १७ ॥
धातुचे समुद्र उलंडी । मेदाचे पर्वत फेडी ।
आटली मज्जा काढी । अस्तिगत ॥ १८ ॥
नाडितें सोडवी । गात्रातें विघडवी ।
साधकातें भेडसवी । परि बिहावें नां ॥ १९ ॥
व्याधितें दावी । सवें चि हारवी ।
आप पृथ्वी कालवी । एकावट ॥ २२० ॥
तवं एरीकडे धनुर्द्धरा । आसनाचा उबारा ।
शक्ति करी उजगरा । कुंडलिणिए ॥ २१ ॥
नागाचें पिलें । कुंकुमें न्हालें ।
वलण देउनि आलें । सेजे जैसें ॥ २२ ॥
तैसी ते कुंडलिणी । मोटकां औठे वलणीं ।
अधोमुख सर्पिणी । निदेली असे ॥ २३ ॥
विद्युल्लतेची विडी । वन्हिज्वालांची घडी ।
पन्हेरयाची चोखडी । खोटि जैसी ॥ २४ ॥
तैसी सुबद्ध आडली । पुटीं होती दाटली ।
ते वज्रासनें चिमूटली । सावध होये ॥ २५ ॥
तेथ नक्षत्र जैसें उलंडलें । कां सूर्याचें आसन मोडलें ।
तेजाचें बीज विरुढलें । अंकुरेंसीं ॥ २६ ॥

तैसी वेढेयांतें सोडिती । कवतिकें आंग मोडिती ।
कंदावरि शकति । उठिली दीसे ॥ २७ ॥
साहाजें बहुवां दिआंची भूक । वरि चेवविली तें होये मीख ।
मग आवेसें पसरी मुख । ऊर्ध्वाउजू ॥ २८ ॥
तेथ हृदयाकाशातळवटीं । जो पवनु भरे किरीटी ।
तेया सगळेयाची मीठी । देउनि घाली ॥ २९ ॥
मुखिचां जाळीं । तळीं वरि कवळी ।
मांसाचिया वडवाळीं । आरोगुं लागे ॥ २३० ॥
जे जे ठाये समांस । तेथ आहाच जोडे घाउस ।
पाठीं एकदोनि घांस । ते ही भरी ॥ ३१ ॥
मग तळवे तळहाथ शोधी । ऊर्ध्विचें खंड भेदी ।
झाडा घे संधी । प्रत्यंगींचां ॥ ३२ ॥
आधार तरि न संडी । परि नखिचें हीं सत्व काढी ।
त्वचा धूनि जडी । पांजरेंसीं ॥ ३३ ॥
अस्थिचे नळे निरपे । शिरांचे हीर उरपे ।
तवं बाहिरि विरुढि करपे । रोमबीजाची ॥ ३४ ॥
मग सप्तधातुचां सागरीं । तान्हैली घोंटु भरी ।
आणि सवें चि उन्हाळा करी । खडखडितु ॥ ३५ ॥
नासापुटौनि वारा । जो जांतु असे अंगुळें बारा ।
तो गचि धरुनि माघारा । आंतु घाली ॥ ३६ ॥
तेथ अध वरौतें आकुंचे । ऊर्ध तळहौतें खांचे ।
तेआ खेवांमाझि चक्रांचें । पदर उरे ॥ ३७ ॥
एऱ्हविं तेव्हां चि दोन्हीं मीळतीं । परि कुंडलिणी नावेक दुचित्ती ।
जे तेयांतें ह्मणे पऱ्हौतीं । तुह्मीं काइसीं ॥ ३८ ॥
आइकें पार्थिव धातु. आघवी । आरोगितां काहीं नुरवी ।
आणि आपातें तवं ठेवी । पूसूनियां ॥ ३९ ॥

ऐसीं दोन्हीं भूतें खाये । तेव्हलि संपूर्ण धाये ।
मग सौम्य होउनि राहे । सुषुम्नेपासीं ॥ २४० ॥
तेथ तृप्तिचेनि संतोषें । गरळ जे वमी मुखें ।
तेणें तियेचेनि विषें । प्राणु जिये ॥ ४१ ॥
तो आगी आंतौनि निगे । परि सबाह्य निववूं चि लागे ।
तेथ कसु बांधति आंगें । सांडिला पुडुतीं ॥ ४२ ॥
मार्ग मोडथि नाडींचे । नवविधपण वायुचें ।
जाये ह्मणौनि शरीरिचे । धर्म नाहीं ॥ ४३ ॥
इडा पिंगला एकवटथि । गांठी तीन्हीं सूटति ।
साही पदर फूटथि । चक्रांचे हे ॥ ४४ ॥
मग शशि आणि भानु । ऐसा कल्पी जो अनुमानु ।
तो वातिवरी मनु । गिवसितां न दिसे ॥ ४५ ॥
बुद्धिची पुलिक विरे । परिमळु घ्राणीं उरे ।
तो ही सकतीसवें संचरे । मध्यमेमाझि ॥ ४६ ॥
तवं वरिलीकडौनि ढाळें । चंद्रामृताचें तळें ।
कानवडौनि मिळे । शकतिमुखीं ॥ ४७ ॥
तेणें नातकें रसु भरे । तो सर्वांगामाझि धरे ।
जेथिचा तेथ मुरे । प्राणपवनें ॥ ४८
तातलिये मूसे । मेण निगौनि जाये जैसें ।
मग कोंदलां ठाये रसें । ओतलेनि ॥ ४९ ॥
तैसी पिंडाचेनि आकारें । ते कळा चि का अवतरे ।
वरि त्वचेचेनि पदरें । पांगुतर्लासे ॥ २५० ॥
जैसी अभ्रालिची बूंथि । करूनि राहे गभस्ति ।
मग फीटलेयां दीप्ति । धरूं नेए ॥ ५१ ॥
तैसा आहाचुवरि कोरडा । त्वचेचा असे पातवडा ।
तो झडौनि जाये कोंडा । जैसा होये ॥ ५२ ॥

मग काश्मिराचें स्वयंभ । कां रत्नबीजा निगाले कोंभ ।
अवेवकांतिची भांभ । तैसी दीसे ॥ ५३ ॥
ना तरि संध्यारागिचे रंग । काढूनि वलिलें तें आंग ।
किं अंतर्ज्योतिचें लिंग । निर्वालिलें ॥ ५४ ॥
कुंकुआचें भरिवं । सिद्ध रसाचें ओतिवं ।
मज पाहांतां सावेव । शांती चि तें ॥ ५५ ॥
तें आनंदचित्रिचें लेप । ना तरि महासुखाचें रूप ।
किं संतोषतरुचें रोप । थावलें जैसें ॥ ५६ ॥
तो कनकचंपकाचा कला । किं अमृताचा पूतला ।
नाना सासिनला मला । कोवलिकेचा ॥ ५७ ॥
हों काज शारदियेचेनि ओलें । चंद्रबिंब पाल्हैलें ।
कां तेज चि मूर्त बैठलें । आसनावरि ॥ ५८ ॥
तैसें शरीर होये । जेव्हांलि कुंडलिणी चांद्र पिए ।
मग देहाकृती बिहे । कृदांतु गा ॥ ५९ ॥
वृद्धाप्य तर्‍हीं बाहुडे । तारुण्याची गांठि विघडे ।
लोपली उघडे । बालदशा ॥ २६० ॥
वयसा तरि येतुली वेर्‍हीं । जें बलाचा बालार्थु करी ।
धैर्याची थोरी । निरूपम ॥ ६१ ॥
कनकद्रुमाचां पालवीं । रत्नकलिकांची नवी ।
वानी तैसी बरवीं । नाखें निगति ॥ ६२ ॥
दांत ही आन होंती । परि अपाडे सानेजांती ।
जैसी दोंवाहीं बैसे पांती । हीरेयांची ॥ ६३ ॥
माणिकुलेयांचिया कणियां । सावियां चि अणुमाणियां ।
तैसिया सर्वांगीं उथवति अणियां । रोमेंचिया ॥ ६४ ॥
करचरणतलें । जैसीं कां रातोत्पलें ।
परवाली होथि डोले । काइ सांगों ॥ ६५ ॥

निडाराचेनि कोंभाटें । मोतियें नावरति संपुटें ।
मग सिवणि जैसी उतटे । शुक्तिपल्लवांची ॥ ६६ ॥
तैसी पातेचिये कवलिये न समाए । दीठि जाकळुनि निगों पाए ।
आधिली चि परि होये । गगनखलिचें ॥ ६७ ॥
आइकें देह होये सोनेयाचें । परि लाघव ये वायुचें ।
जें आपा आणि पृथ्विचे । अंश नाहीं ॥ ६८ ॥
मग समुद्रा पैलाडी देखे । स्वर्गिचा आलोचु आइके ।
मनोगत ओलखे । मुंगियेचें ॥ ६९ ॥
पवनाचां वारिकां वलघे । चाले तरि उदकीं पाऊ न लगे ।
एणें बहु काइ प्रसंगें । होति सिद्धि ॥ २७० ॥
आइकें प्राणाचा हातु धरुनि । गगनाची पाउटी करुन ।
मध्यमेमाझिचेनि दादरेंहुनि । हृदया आली ॥ ७१ ॥
जे कुंडलिणी जगदंबा । जे चैतन्यचक्रवर्त्तिची शोभा ।
जिया विश्वबीजाचेया कोंभा । साउली केली ॥ ७२ ॥
जे शून्यलिंगाची पिंडी । जे परमात्मशिवाची करंडी ।
जे प्राणाची उघडी । जन्मभूमीं ॥ ७३ ॥
हें असो ते कुंडली । हृदया आंतु आली ।
तवं अनाहताचां बोलीं । चावले ते ॥ ७४ ॥
शक्तिचेया आंगा लागलें । बुद्धिचें चैतन्य होतें जालें ।
तेणें तें आइकिलें । आलुमालु ॥ ७५ ॥
घोषाचां कुंडीं । नादचित्रांचीं रूपडीं ।
प्रणवाचिया मोडी । रेखिली जैसी ॥ ७६ ॥
हें चि कल्पवे तरि जाणिजे । परि आतां कल्पितें कैंचें आणिजे ।
तऱ्हें नेणों काइ वाजे । तिये ठाइं ॥ ७७ ॥
विसरोनि गेलों अर्जुना । जवं नाशु नाहीं पवनां ।
तवं वाचा आथि गगना । ह्मणोनि बोलें ॥ ७८ ॥

तेया अनाहताचेनि मेघें । मग आकाश दुमुदुमूं लागे ।
तवं ब्रह्मस्थानिचें बेगें । फीटे साहाजें ॥ ७९ ॥
आइकें कमलगर्भाकारें । जें महदाकाश दूसरें ।
जेथ चैतन्य आथुधुरे । करुनि असिजे ॥ २८० ॥
तेया हृदयाचां परिवरीं । कुंडलिया परमेश्वरी ।
तेजाची सिधौरी । विनियोगिली ॥ ८१ ॥
बुद्धिचेनि शाकें । हातबोने नीकें ।
द्वैत जेथ नेदखे । तेथ केलें ॥ ८२ ॥
ऐसी निजकांति हारविली । मग प्राणाची केवल जाली ।
तेव्हलि कैसी गमली । ह्मणावी पां ॥ ८३ ॥
हो कां जे पवनाची पूतली । पांगुतली होंती सोनेसली ।
तियें काढूनियां वेगली । ठेविलीं तिआ ॥ ८४ ॥
ना तरि वारेआचेनि आंगें झगटली । दीपाची दीठि निमुटली ।
कां लखुलखूनि हारतली । विजु गगनीं ॥ ८५ ॥
तैसी हृदयकमळवेन्हीं । दीसे सोनेयांची जैसी सरी ।
ना तरि प्रकाशजलाची झरी । वाहांति आली ॥ ८६ ॥
मग तिये हृदयभूमी पोकळे । जिराली कां येकें वेळें ।
ऐसें शक्तीचें रूप मावळे । शक्तीमाझि ॥ ८७ ॥
तेव्हां तऱ्हीं शक्ती चि मग ह्मणिजे । एऱ्हवीं तो प्राणु केवळु जाणिजे ।
आतां नादबिंदु नेणिजे । कळाज्योति ॥ ८८ ॥
मनाचा हान मारु । कां पवनाचा धरु ।
ध्यानाचा आदरु । नाना परीं ॥ ८९ ॥
हे कल्पना घे सांडी । तें नाहिं इये परिवडी ।
हे महाभूतांची फुडी । आटणी देखां ॥ २९० ॥
पिंडें पिंडाचा ग्रासु । तो हा नाथसंकेतिचा डंसु ।
परि दाउनु गेला उद्देशु । माहाविष्णु ॥ ९१ ॥

तेया ध्वनिताचें केणें सोडुनि । यथार्थाची घडी झाडुनि ।
उपलविली मियां जाणौनि । ग्राहिक श्रोते ॥ ९२ ॥
आइकां शक्तिचें तेज लोपे । तेथ देहिचें रूप हारपे ।
मग तें डोलेयां चि माझि लपे । जगाचेयां ॥ ९३ ॥
यऱ्हविं आदिला चि ऐसें । सावयव तरि असे ।
परि वायुचें जैसें । वलिलें आहो ॥ ९४ ॥
ना तरि कदलिचा गाभा । बुंथि सांडुनु उभा ।
कां अवेवु चि नभा । निवडला तो ॥ ९५ ॥
तैसें होये शरीर । तैं तें ह्मणिजे खेचर ।
हें पद होतां चमत्कार । पिंडुजनीं ॥ ९६ ॥
देखैं साधकु निगौनि जाये । मागां पाउलाची ओलि राहे ।
तेथ ठांइं चि होए । अणिमादिक ॥ ९७ ॥
परि तेणें काइ आपणपेया । अवधारीं ऐसा धनंजया ।
लोपु आथि भूतत्रया । देहिचा देहीं ॥ ९८ ॥
पृथ्वीतें आप विरवी । आपातें तेज जिरवी ।
तेजातें पवनु हारवी । ऱ्हुदयामाझि ॥ ९९ ॥
पाठिं येकला आपण उरे । परि शरीराचेनि अनुकारें ।
मग तो ही निगे आंतरें । गगना मिलों ॥ ३०० ॥
तेऱ्हलि कुंडलिणी हे भाक जाये । मग मारुती ऐसें नांव लाहे ।
परि शकतिपण तें आहे । जवं मिलैल शिविं ॥ १ ॥
मग जालंधर सांडी । ककारांत फोडी ।
गगनाचिये पाडी । पैठी होए ॥ २ ॥
तेथ ॐकाराचिये पाटीं । पाये देत उठाउठी ।
पश्यंतियेची पाउटी । मागां घाली ॥ ३ ॥
पुढां तन्मात्रार्द्धवेऱ्हीं । आकाशाचां आंतरीं ।
भरति गमे सागरीं । सरिता जैसी ॥ ४ ॥

मग ब्रह्मरंध्रीं थिरावौनि । अहंभावाचिया बाह्या पसरुनि ।
परत्मलिंगा धावौनि । आंगा घडे ॥ ५ ॥
तवं महां भूतांची जवनीक फीटे । मग दोहोंसीं ही होय झटे ।
तेथ गगनासकट आटे । समरसिं तिए ॥ ६ ॥
पैं मेघाचेनि मुखें निवडला । समुद्र कां उ॰घिं पडिला ।
तो माघौता जैसा आला । आपणपेंआ ॥ ७ ॥
पिंडाचेनि मींसें । पदीं पद प्रवेशे ।
तें येकत्व होये तेंसें । पांडुकुमरा ॥ ८ ॥
आतां दुजें हान होतें । किं एक चि हें आइतें ।
ऐसिये विवंचनेपुरतें । उरे चि ना ॥ ९ ॥
गगनीं गगन लया जाये । ऐसां जे कांहीं आहे ।
तें अनुभवें जो होये । तो होउनि ठाके ॥ ३१० ॥
ह्मणौनि तेथ चि मातु । न चडे चि बोलाचा हातु ।
जेणें संवादाचेआ गांवां आंतु । पैठी कीजे ॥ ११ ॥
अर्जुना यऱ्हविं तऱ्हें । एआ अभिप्रायाचा जे गर्भु घरी ।
ते पाये पां वैखरी । दूरि ठेली ॥ १२ ॥
भ्रूलतां मागिलीकडे । तेथ मकाराचें चि आंग नडे ।
सडेआ॰ग्राखा सांकडें । गगना एंतां ॥ १३ ॥
पाठीं तेथ चि तो भांसलला । तवं शब्दाचा दिउ॰ मावळला ।
मग तेया ही वरि आटु भविनला । आकाशाचा ॥ १४ ॥
आतां महाशून्याचां डोहीं । गगनासी चि थाउ नाहीं ।
तेथ तागा लागेल काइ । बोलाचा एआ ॥ १५ ॥
ह्मणौनि आखरांमाझि सांपडे । कां कानवरि जोडे ।
हें तैसें न्हवे फुडें । विशुद्धी मा ॥ १६ ॥
चैं कहीं दैवें । अनुभविलें फाकवें ।
तैं आपण चि हें ठाकावें । होउनिआं ॥ १७ ॥

पुडुतीं जाणणें तें नाहीं चि । ह्मणौनि असो केतीं हें चि ।
बोलावें आतां वायां चि । धनुर्द्धरा ॥ १८ ॥
ऐसें शब्दजात माघौतें फिरे । तेथ संकल्पाचें आयुष्य पुरें ।
वारा ही जेथ सिरे । विचाराचा ॥ १९ ॥
जें उन्मनियेचें लावण्य । जें तुरियेचें तारुण्य ।
अनादि जें अगण्य । परमतत्व ॥ ३२० ॥
जें आकाराचा प्रांतु । जें मोक्षाचा एकांतु ।
जेथ आदि आणि अंतु । विरौनि गेलीं ॥ २१ ॥
जें विश्वाचें येया मूळ । जें योगद्रुमाचें फळ ।
जें आनंदाचें केवळ । चैतन्य गा ॥ २२ ॥
जें महाभूताचें बीज । जें महातेजाचें तेज ।
पार्था जें निज । स्वरूप माझें ॥ २३ ॥
हे चतुर्भुज कोंभैली । जेयाची शोभा चि रूपा आली ।
देखौनि नास्तिकीं नोंकिलीं । भक्तवृंदें ॥ २४ ॥
तें अनिर्वाच्य महासुख । पैं आपण चि जाले पुरुष ।
जेहांचें कां निष्कर्ष । प्राप्तिवेन्हीं ॥ २५ ॥

**युंजन्नेवं सदात्मानं योगी नियतमानसः ॥**
**शांतिं निर्वाणपरमां मत्संस्थामधिगच्छति ॥ १५ ॥**

आह्मिं साधन जें हें सांघितलें । तें चि शरीरीं जेहीं केलें ।
ते अमचेन चि पाडें आले । निर्वालेया ॥ २६ ॥
परब्रह्माचेनि रसें । देहाकृतिचिये मूसे ।
ओतिवं जाले तैसे । दीसथि आंगें ॥ २७ ॥
ना तरि प्रतीति हान आंतरिं फांके । तरि विश्व चि हे आघवें झांके ।
तवं अर्जुनु ह्मणे नीकें । साच जी हें ॥ २८ ॥
कां जें आपण आतां देओ । हा बोलिजे जो उपाओ ।
तो प्राप्तिचा चि ठाओ । ह्मणौनि घडे ॥ २९ ॥

इये अभ्यासीं दृढ जे होंथि । ते भरवसेनि ब्रह्मत्वा एंथि ।
हे सांघतियां चि रीती । कळलें मज ॥ ३३० ॥
देवा गोठि चि हे आइकतां । बोधु उपजत असे चित्ता ।
मां अनुभवें तल्लीनता । नव्हेल केवि ॥ ३१ ॥
ह्मणौनि एथ काहीं । अनारिसें नाहीं ।
पारि नांभारि चित्त देईं । बोला एका ॥ ३२ ॥
आतां कृष्णा सांघितला योगु । तो मना तारि आला चांगु ।
पारि न सके करूं पांगु । योग्यतेचा ॥ ३३ ॥
साहांजें आंगिक जेतुलें आहे । तेतुलिया चि जारि सिद्धी जाये ।
तारि हा चि मार्गु सुखोपायें । अभ्यासीन ॥ ३४ ॥
नातारि देउ जैसी सांघतील । तैसी आपणपां जारि निदिसैल ।
तारि योग्यताविण होइल । तें चि पूसों ॥ ३५ ॥
जीविची ऐसी धारण । ह्मणौनि पूसावेया जालें कारण ।
मग ह्मणे तरि आपण । चित्त देइजो ॥ ३६ ॥
हां हो जी अवधारिलें । जें हें साधन तुम्हीं निरूपिलें ।
तें आवडतेया ही अभ्यासिलें । फांवों सके ॥ ३७ ॥
किं योग्यतेविण नाहीं । ऐसें हान असें कांहीं ।
तेथ कृष्ण म्हणथि तारि काई । धनुर्द्धरा ॥ ३८ ॥
हें काज किर निर्वाण । पारि अनिक ही कांहीं जें साधारण ।
तें अधिकाराचेनि उंडवळेन विण । कायि सिद्धी जाये ॥ ३९ ॥
पैं योग्यता जे म्हणिजे । ते प्राप्ती चि आधीन जाणिजे ।
कां जें योग्यां होनि कीजे । तें आरंभीं चि फळे ॥ ३४० ॥
तैंन्ह तैसी एथ काहीं । साव्हियां चि कोणि नाहीं ।
आणि योग्यांची काई । खाणि आहे ॥ ४१ ॥
नाव एक विरक्तु । जाला देहधर्मिं जारि नियतु ।
तारि तो चि नव्हे व्यवस्थितु । अधिकारिया ॥ ४२ ॥

एतुलालिए आणिमाझिवडें । योग्यपण तूतें हीं जोडें ।
ऐसें प्रसंगें सांकडें । फेडिलें तेयाचें ॥ ४३ ॥
मग म्हणे पार्था । हे ते ऐसी चि व्यवस्था ।
अनियतासि सर्वथा । योग्यता नाहीं ॥ ४४ ॥

**नात्यश्नतस्तु योगोऽस्ति न चैकान्तमनश्नतः ।**
**न चातिस्वप्नशीलस्य जाग्रतो नैव चार्जुन ॥ १६ ॥**

जो रसनेंद्रियांचा आंकला । कां निद्रेसि जीवें वीकला ।
तो नाहीं एथ म्हणितला । अधिकारिया ॥ ४५ ॥
अथवा आग्रयाचिये बांधौडी । क्षुधातृषा इये कोंडी ।
आहारातें तोडी । मारुनियां ॥ ४६ ॥
निद्रेचिया वाटा न वचे । ऐसा दंडीचेनि अवतरणें नाचे ।
तें शरीर चि नव्हे तेयाचें । मग योगु कवणां ॥ ४७ ॥

**युक्ताहारविहारस्य युक्तचेष्टस्य कर्मसु ।**
**युक्तस्वप्नावबोधस्य योगो भवति दुःखहा ॥ १७ ॥**

म्हणौनि अतिशयें विषयसेवा । तैसा बोलु न व्हावा ।
कां सर्वनिरोधु करावा । तें हीं नको ॥ ४८ ॥
आहारु तरि सेविजे । परि युगुतिचेनि मापें मविजे ।
क्रियाजात आचरिजे । तिया चि स्थिती ॥ ४९ ॥
मितलां बोलीं बोलिजे । मवलां पाउलीं चालिजे ।
निद्रे ही मानु दीजे । अवसरें येकें ॥ ३५० ॥
जागणें जन्हें जालें । तन्हें तें ही होआवें मितलें ।
एतुलेनि धातुसाम्य सांचलें । असेल सुखें ॥ ५१ ॥
ऐसें युगुतिचेनि हाथें । जें इंद्रियां ओपे भातें ।
तें संतोषासि वाढतें । मनु चि करी ॥ ५२ ॥
बाहिरि युगुतीची मुद्रा पडे । तवं आंतु सुख वाढे ।
येथ साहाज चि योगु घडे । नाभ्यासितां ॥ ५३ ॥

भाग्याचिये भडसे । उद्यमाचेनि मीसें ।
समृद्धिजात जैसें । घर रिगो ये ॥ ५४ ॥
तैसा युगुतिमंत कवतिकें । अभ्यासाचिये मोहरे ठाके ।
आणि आत्मसिद्धि चि पीके । अनुभौ तेयाचा ॥ ५५ ॥

**यदा विनियतं चित्तमात्मन्येवावतिष्ठते ।**
**निस्पृहः सर्वकामेभ्यो युक्त इत्युच्यते तदा ॥ १८ ॥**

म्हणौनि युक्ति हे पांडवा । घडे जेया सदैवां ।
तो अपवर्गिचिया राणिवा । अलंकरेजे ॥ ५६ ॥
युक्तियोगाचें आंग पावे । ऐसें प्रयाग होये बरवें ।
तेथ क्षेत्रसंन्यासें थिरावे । मानस जेहाचें ॥ ५७ ॥

**यथा दीपो निवातस्थो नेंगते सोपमा स्मृता ।**
**योगिनो यतचित्तस्य युंजतो योगमात्मनः ॥ १९ ॥**

तेयांतें योगयुगुतु ह्मण । प्रसंगें हें हीं जाण ।
तेया दीपाचें उपलक्षण । निर्वातिचेया ॥ ५८ ॥
आतां तूझे मनोगत जाणौनि । कांहिं येक आम्हि म्हणौनि ।
तें नीकें चित्त देउनि । परियसावें ॥ ५९ ॥
तूं प्राप्तिची चाड वाहांसी । परि अभ्यासिं दक्षु नोहोसि ।
तें सांघ पां काइ बिहसी । दुवाडपणां ॥ ३६० ॥
तरि पार्था हें झनें । सायास घेंसि हो मनें ।
वायां बागुलु इयें दुर्जनें । इंद्रियें करिति ॥ ६१ ॥
पाये पां आयुष्याचा आडलु करीं । जें सरतें परिणामु वेन्हीं ।
तेया औषधातें काइ वैरी । जिव्हा न ह्मणे ॥ ६२ ॥
ऐसें हितासि जें जें नीकें । तें सदा चि एआं दुःखें ।
यन्हवि सोहोपें योगासारिखें । कांहिं आहे ॥ ६३ ॥

ह्मणौनि अवसानाचिया गाढिका ।
जो आह्मीं अभ्यासु सांघितला नीका ।
तेणें होईल तरि हो कां ।
निरोधु एआं ॥ ६४ ॥

**यत्रोपरमते चित्तं निरुद्धं योगसेवया ।**
**तत्र चैवात्मनात्मानं पश्यन्नात्मनि तुष्यति ॥ २० ॥**

यन्हावें तन्हें योगें । जैं इंद्रिआं विंदाण लागे ।
तैं चि चित्त भेटों निगे । आपणपेया ॥ ६५ ॥
परतौनि पाठिमोरें ठाके । आणि आपणपेयांतें आपण देखे ।
देखतखेंओ ओळखे । ह्मणे तत्व हें मीं ॥ ६६ ॥
तिये ओळखी चि सरिसें । सुखाचां साम्राज्यीं वैसे ।
एथ चित्तपण समरसें । विरौनि जाये ॥ ६७ ॥

**सुखमात्यंतिकं यत्तद्बुद्धिग्राह्यमतींद्रियं ।**
**वेत्ति यत्र न चैवायं स्थितश्चलति तत्वतः ॥ २१ ॥**

मग मेरूपासौनि थोरें । देहदुःखाचेनि डोंगरें ।
दाटिजो पां परिभारें । चित्त न दटे ॥ ६८ ॥
कां शस्त्रवारि तोडिलेआं । देह आगीमाजि पडिलेआं ।
चित्त महासुखीं पवढलेआं । चेउ नेए ॥ ६९ ॥
ऐसें आपणपां रिगौनि ठाये । मग देहाची वास न पाये ।
आणि तें सुख चि होउनि जाए । ह्मणौनि विसरे ॥ १७० ॥

**यं लब्ध्वा चापरं लाभं मन्यते नाधिकं ततः ।**
**यस्मिन्स्थितो न दुःखेन गुरुणापि विचाल्यते ॥ २२ ॥**

जेआ सुखाचिआ जोडी । मन आर्त्तिची से चि सांडी ।
सारासाराचें तोडी । गुंतलें जें ॥ ७१ ॥
जें योगाची बरव । संतोषाची राणिव ।
ज्ञानाची जाणिव । जेयालागीं ॥ ७२ ॥

तें अभ्यासिलेनि योगें । सावेव देखावें लागे ।
देखिलें तरि आंगें । होइजैल गा ॥ ७३ ॥

**तं विद्याद्दुःखसंयोगवियोगं योगसंज्ञितम् ।**
**स निश्चयेन योक्तव्यो योगोऽनिर्विण्णचेतसा ॥ २३ ॥**

परि तो चि योगु बापा । एकी परी आहे सोहोपा ।
जरि पुत्रशोकु संकल्पा । दाखविजे ॥ ७४ ॥
हा विषयांतें निमालेयां आइके । इंद्रियें नियमाचां धारणीं देखे ।
तरि हियें घालूनि मूंके । जीवितासि ॥ ७५ ॥

**संकल्पप्रभावान्कामांस्त्यक्त्वा सर्वानशेषतः ।**
**मनसैवेंद्रियग्रामं विनियम्य समंततः ॥ २४ ॥**

ऐसें वैराग्य हें करी । तरि संकल्पाची सरे वारी ।
सुखें धृतिचां धवलारीं । बुद्धि नांदे ॥ ७६ ॥
बुद्धी धैर्या होये वसैठा । तरि मनातें अनुभवाचिया वाटा ।
आणूनि करी प्रतिष्ठा । आत्मभुवनीं ॥ ७७ ॥
इया हि एकी परी । प्राप्ति आहे विचारीं ।
न टके तरि सोपारी । आणिकि ही आइक ॥ ७८ ॥

**शनैःशनैरुपरमेद्बुद्ध्या धृतिगृहीतया ।**
**आत्मसंस्थं मनः कृत्वा न किंचिदपि चिंतयेत् ॥ २५ ॥**

आतां नियमू चि हा येकला । जीवें करावा आपुला ।
जैसा कृतनिश्चयाचेया बोला । बाहिरा नोहे ॥ ७९ ॥
जरि एतुलेन चि चित थिरावे । तरि काजा आलें स्वभावें ।
न ऱ्हाये तरि घालावें । मोकलुनि ॥ ३८० ॥
मग मोकलें जेथजेथ जाइल । तेथौनि नियमू चि घेउनि येईल ।
ऐसें चि स्थैर्याचा होईल । सवे एआ ॥ ८१ ॥

**यतो यतो निश्चलति मनश्चंचलमस्थिरम् ।**
**ततस्ततो नियम्यैतदात्मन्येव वशं नयेत् ॥ २६ ॥**

पाठिं केतुलेनि एकें वेळें । तेआ स्थैर्याचेनि मेळें ।
आत्मरूपा जवळें । एईल साहाजें ।। ८२ ।।
तेहातें देखौनि आंगा घडैल । तेथ अद्वैतीं द्वैत बुडैल ।
आणि ऐक्यतेजें उजिवडैल । त्रैलोक्य हें ।। ८३ ।।
आकाशीं दीसे दुसरें । तें अभ्र जैं विरे ।
तैं गगनें चि कां भरे । विश्व जैसें ।। ८४ ।।
तैसें चित्त लया जाये । आणि चैतन्य चि आवघें होये ।
ऐसी प्राप्ति सुखोपायें । आहे एणें ।। ८५ ।।
इया सोहोपियाचिया योगस्थिती । उकलु देखिला गा बहुतीं ।
संकल्पाचिये संपत्ती । रूसौनियां ।। ८६ ।।

**प्रशांतमनसं ह्येनं योगिनं सुखमुत्तमम् ।**
**उपैति शांतरजसं ब्रह्मभूतमकल्मषम् ।। २७ ।।**

तेया सुखाचेनि सांघातें । आले परब्रह्म आंतौतें ।
तेथ लवण जैसें जळातें । सांडूं नेणें ।। ८७ ।।
तैसें होये तिये मेळीं । मग सामरस्याचां राउळीं ।
माहासुखाची दिवाळी । जगासिं दीसे ।। ८८ ।।
ऐसें आपुलें पाएवरी । चालिजे आपुलिए पाठीवरी ।
हें पार्था नांगवे तरि । आन कीजे ।। ८९ ।।

**युंजेन्नेवं सदात्मानं योगी विगतकल्मषः ।**
**सुखेन ब्रह्मसंस्पर्शमत्यंतं सुखमश्नुते ।। २८ ।।**

मीं तवं सकळ देहीं । असे एथ विवडु नाहीं ।
आणि तैसें चि माझां ठांइं । सकळ असे ।। ३९० ।।
हें ऐसें चि सांचलें । परस्परें मिसळलें ।
बुद्धि वेपें एतुलें । होआवें गा ।। ९१ ।।

**सर्वभूतस्थमात्मानं सर्वभूतानि चात्मनि ।**
**ईक्षते योगयुक्तात्मा सर्वत्र समदर्शनः ।। २९ ।।**

एऱ्हवीं तऱ्हीं अर्जुना । जो एकावटलिआ भावना ।
सर्व भूतीं अभिन्ना । मातें भजे ॥ ९२ ॥
भूतांचेनि अनेकपणें । अनेकु नोहे अंतष्करणें ।
केवळ एकत्व चि माझें जाणे । सर्वत्र जो ॥ ९३ ॥

**यो मां पश्यति सर्वत्र सर्वं च मयि पश्यति ।**
**तस्याहं न प्रणश्यामि स च मे न प्रणश्यति ॥ ३० ॥**

मग तो एकु हे माया । बोलतां दीसतसे वायां ।
यऱ्हवीं न बोलिजे तरि धनंजया । तो मीं आहें ॥ ९४ ॥
तऱ्हें दीपा आणि प्रकाशा । एकवंकियेचा पाडु जैसा ।
तो माझां ठांइं तैसा । मी तेयामाझि ॥ ९५ ॥
जैसा उदकाचेनि आयुष्यें रसु । कां गगनाचेनि मानें अवकाशु ।
तैसा माझेनि रूपें रूपसु । पुरुषु गा तो ॥ ९६ ॥

**सर्वभूतस्थितं यो मां भजत्येकत्वमास्थितः ।**
**सर्वथा वर्तमानोऽपि स योगी मयि वर्तते ॥ ३१ ॥**

जेणें ऐक्याचिया दीठी । सर्वत्र मातें चि किरीटी ।
देखिलें जैसा पटीं । तंतु एकु ॥ ९७ ॥
कां सरूपें तरि बहुतें आथि । परि तैसि सोनें बहुतें नोहोंति ।
ऐसी ऐक्याचळाची बुंथी । केली जेणें ॥ ९८ ॥
ना तरि वृक्षाचिं पानें जेतुलीं । तेतुलीं रोपें नाहिं लाविलीं ।
ऐसी अद्वैतदिवसें पाहाली । रात्रि जेआं ॥ ९९ ॥
तो पंचात्मिकीं सांकडे । मग सांव पां कैसेनि अडे ।
जो प्रतीतिचेनि पाडें । मासि तूके ॥ ४०० ॥
माझें व्यापकपण आघवें । गवसलें तेयाचेनि अनुभवें ।
तरि न ह्मणतां स्वभावें । व्यापकु जाला ॥ १ ॥

**आत्मौपम्येन सर्वत्र समं पश्यति योऽर्जुन ।**
**सुखं वा यदि वा दुःखं स योगी परमो मतः ॥ ३२ ॥**

आतां शरीर तरि आहे । परि शरीरिंचा तो नोहे ।
ऐसें बोलवरि होये । करूं काये ॥ २ ॥
ह्मणौनि असो तें विशेषें । अथवा आपणपेया सारिखें ।
चराचर जो देखे । अखंडित ॥ ३ ॥
सुखदुःखादि वर्में । कां शुभाशुभें कर्मे ।
दोनि ऐसीं मनोधर्में । नेणे चि जो ॥ ४ ॥
हे समविषम भाव । अनिक हीं वैचित्र्य जें सर्व ।
तें मानी जैसे अवेव । आपुले होथि ॥ ५ ॥
हें एकेक काइ सांघावें । जेआ त्रैलोक्य चि आघवें ।
मीं ऐसें सभावें । बोधा आलें ॥ ६ ॥
तेआ ही देह एक किर आथि । अणिकें लौकिकु ही तेहातें ह्मणथि ।
परि आह्मां ऐसी चि प्रतिति । जें परब्रह्म हा ॥ ७ ॥
ह्मणौनि आपण पां विश्व देखिजे । आणि विश्वां आपण होइजे ।
ऐसें साम्य चि एक उपासिजे । पांडवा गा ॥ ८ ॥
हें तुह्मतें बहुतीं प्रसंगीं । आह्मिं ह्मणों तें येया चि लागीं ।
जे साम्या परौति जगीं । प्राप्ति नाहीं ॥ ९ ॥

**अर्जुन उवाच ॥**

**योयं योगस्त्वया प्रोक्तः साम्येन मधुसूदन ।**
**एतस्याहं न पश्यामि चंचलत्वात्स्थितिं स्थिरां ॥ ३३ ॥**

तवं अर्जुनु ह्मणे देवा । तुह्मीं सांघा किर आमचिआ कणवा ।
परि न पुरों जी स्वभावा । मनाचेआ ॥ ४१० ॥
हें मन कैसें केवडें । ऐसें ह्मणों पाऊं तरि न संपडे ।
यऱ्हवि राहाटावया तोकडें । त्रैलोक्य येया ॥ ११ ॥

**चंचलं हि मनः कृष्ण प्रमाथि बलवद्दढं ।**
**तस्याहं निग्रहं मन्ये वायोरिव सुदुष्करं ॥ ३४ ॥**

ह्मणौनि ऐसें कैं घडेल । जें मर्कटा समाधि एईल ।
कां राहे ह्मणितला राहिल । महावातु ॥ १२ ॥
जी बुद्धितें सळी । निश्चयातें ढाळी ।
स्थैर्येंसीं हाता फळी । मेळौनि जाये ॥ १३ ॥
जें विवेकातें भूलवी । संतोषासि चाड लावी ।
बैसिजे तन्हीं हींडवी । चहूं दिशीं ॥ १४ ॥
जें निरुंधिलें घे वाउ । जेआ संयमू चि होये सावाओ ।
तें मन आपुला स्वभाउ । सांडील काइ ॥ १५ ॥
ह्मणौनि मन येक निश्चळ राहील । मग आह्मासि साम्य येईल ।
हें विस ही विश्वे न घडेल । तें एआ लागि ॥ १६ ॥

**श्रीभगवानुवाच ॥**

**असंशयं महाबाहो मनो दुर्निग्रहं चलं ।**
**अभ्यासेन तु कौंतेय वैराग्येण च गृह्यते ॥ ३५ ॥**

तवं कृष्णु ह्मणथि साच चि । बोलतु आहासि तें तैसें चि ।
एआ मना किर चपळ चि । स्वभाओ गा ॥ १७ ॥
परि वैराग्याचेनि आधारें । लाविलें अभ्यासाचिए मोहरे ।
तरि केतुलेनि एकें अवसरें । थिरावैल ॥ १८ ॥
कां यया मनाचें एक नीकें । जें हें देखिलेंआ ठाया सोंके ।
ह्मणौनि स्वानुभवसुखा चि कवतिकें । दाखवितां जाइजे ॥ १९ ॥

**असंयतात्मना योगो दुष्प्राप इति मे मतिः ॥**
**वश्यात्मना तु यतता शक्योऽवाप्तुमुपायतः ॥ ३६ ॥**

यन्हवि विरक्ति जेयां नाहिं । जे अभ्यासिं निरिगती चि कहीं ।
तैयां नाकळे हें आह्मीं हीं । न मनूं काइ ॥ ४२० ॥
परि यमनियमाचिया वाटा न वचिजे ।
सात्रिया वैराग्याची से न करिजे ।

केवल विषयजळीं ठाकिजे ।
बुडी देउनि ॥ २१ ॥
एआ जालेआ मानसा कहीं । युगुतिची कांबि लागली नाहीं ।
तरि निश्चल होईल काई । केसेन सांघें ॥ २२ ॥
म्हणौनि मनाचा निग्रहो होए । ऐसा उपाओ जो आहे ।
तो आरंभीं मग नोहे । कैसा पाउं ॥ २३ ॥
तरि योगसाधन जेतुकें । तें आघवें चि काइ लटिकें ।
परि आपणपेयां अभ्यासु न टके । हें चि म्हणें ॥ २४ ॥
आजि योगाचें होये बळ । तरि मन केतुलें चपळ ।
काइ महदादि हें सकळ । आपुलें नो होए ॥ २५ ॥

**अर्जुन उवाच ॥**

**अयतिः श्रद्धयोपेतो योगाच्चलितमानसः ।**
**अप्राप्य योगसंसिद्धिं कां गतिं कृष्ण गच्छति ॥ ३७ ॥**

तेथ अर्जुनु म्हणे नीकें । देओ बोलताति तें न चुके ।
साच योगबळेंसीं न तुके । मनोबळ ॥ २६ ॥
परि तो चि योगु कैसा केवि जाणों ।
आह्मीं येतुले दीइया मातु ही नेणों ।
म्हणौनि मनातें जी म्हणों ।
अनावर हें ॥ २७ ॥
हा आतां आघवेआ जन्मां । तूझेनि प्रसादें पुरुषोत्तमा ।
योगपरिचयो आह्मां । जाला आजि ॥ २८ ॥
परि आणिक येकु गोसाविआं । मज संशयो आहे साविआं ।
तो तुज वांचूनि फेडावया । समर्थु नाहीं ॥ २९ ॥
म्हणौनि सांघें गोविंदा । कव्हणी येकु मोक्षपदा ।
झोंबतु होता श्रद्धा । उपायें विण ॥ ४३० ॥

इंद्रियग्रामौनि निगाला । आस्थेचिये वाटे लागला ।
आत्मसिद्धिचेआ पुढैला । नगरा एआवेआ ॥ ३१ ॥

**कच्चिन्नोभयविभ्रष्टश्छिन्नाभ्रमिव नश्यति ।**
**अप्रतिष्ठो महाबाहो विमूढो ब्रह्मणः पथि ॥ ३८ ॥**

तवं आत्मसिद्धि न टके चि । आणि माघौतेआं हीं नैयवे चि ।
एसां अस्तु गेला माझारि चि । आयुष्यभानु ॥ ३२ ॥
जैसें अवकाळीं आभाळ । अलुमाळु सपतळ ।
विपायें आलें केवळ । वसे ना वरिषे ॥ ३३ ॥
तैसीं दोन्हीं इयें दुरावळीं । जे प्राप्ति तवं अलग ठेली ।
आणि अप्राप्ति ही सांडविली । श्रद्धा तिआ ॥ ३४ ॥

**एतन्मे संशयं कृष्ण छेत्तुमर्हस्यशेषतः ।**
**त्वदन्यः संशयस्यास्य छेत्ता न ह्युपपद्यते ॥ ३९ ॥**

ऐसा ओळांतरला काजीं । जो श्रद्धेचां चि समाजीं ।
बुडाला तेआ हो जी । कवण गति ॥ ३५ ॥

**श्रीभगवानुवाच ॥**

**पार्थ नैवेह नामुत्र विनाशस्तस्य विद्यते ॥**
**नहि कल्याणकृत्कश्चिद्दुर्गतिं तात गच्छति ॥ ४० ॥**

तवं कृष्ण ह्मणथि पार्था । जेया नैष्कर्म्यसुखीं आस्था ।
तेया मोक्ष वांचूनि अन्यथा । गति आहे गा ॥ ३६ ॥
परि येतुलें चि येक घडे । जें माझारि विसावें पडे ।
त हीं ऐसेनि सुरवाडें । जो देवां नाहीं ॥ ३७ ॥
यन्हावि अभ्यासाचां उचळतां । पाइं जरि चालतां ।
तरि दिवसा आधिं टाकिता । सोहंसिद्धितें ॥ ३८ ॥
परि तेतुला वेगु तो नोहे चि । ह्मणौनि विसांवा तन्हें नीका चि ।
पाठिं मोक्षु तव तसा चि । ठेवला आहे ॥ ३९ ॥

**प्राप्य पुण्यकृतांल्लोकानुषित्वा शाश्वतीः समाः ।**
**शुचीनां श्रीमतां गेहे योगभ्रष्टोऽभिजायते ॥ ४१ ॥**

आइकैं कवतिक हों कैसें । जें शतमखा लोक सायासें ।
तें तो पावे अनायासें । कैवल्यकामु ॥ ४४० ॥
मग तेथिचे जे अमोघ । अलौकिक भोग ।
ते भोगी जवं चांग । कवतिक पुरे ॥ ४१ ॥
पाठिं जन्मे संसारीं । परि सकळ धर्माचां माहेरीं ।
लांबा उगवे आगरीं । विभवश्रियेचां ॥ ४२ ॥
जेहांतें नीतिपंथें चालिजे । सत्यसंभूतें बोलिजे ।
देखावें तें देखिजे । शास्त्रदृष्टी ॥ ४३ ॥
वेदु तो जागेश्वरु । जेआ वेवसाओ निजु आचारु ।
सारासारविचारु । मंत्रु जेहातें ॥ ४४ ॥
जेहाचा कुळीं चिंता । जाली ईश्वराची कांता ।
जेहांतें गृहदेवता । आदिरिद्धि ॥ ४५ ॥
ऐसी निजपुण्याचिया जोडी । वाढिनली सर्व सुखांची कुळवाडी ।
तिए जन्मे तो सुरवाडीं । योगच्युतु ॥ ४६ ॥

**अथवा योगिनामेव कुले भवति धीमताम् ।**
**एतद्धि दुर्लभतरं लोके जन्म यदीदृशम् ॥ ४२ ॥**

अथवा ज्ञानाग्निहोत्री । जे परब्रह्मण श्रोत्री ।
माहासुखक्षेत्री । आदिवंत ॥ ४७ ॥
जे सिद्धांचां सिंहासनीं । राज्य कारिताति त्रिभुवनीं ।
जे कूजते कोकिळ वनीं । संतोषाचां ॥ ४८ ॥
जे विवेकग्रामिचे मुळी । जे वेठळे आहाति फळीं ।
तेआं योगियांचां चि कुळीं । जन्म पावे ॥ ४९ ॥

**तत्र तं बुद्धिसंयोगं लभते पौर्वदेहिकम् ।**
**यतते च ततो भूयः संसिद्धौ कुरुनंदन ॥ ४३ ॥**

मोटकी देहाकृति उमटे । आणि उन्मेखा पाहाट फूटे ।
सूर्या पुढां प्रकटे । प्रकाशु जैसा ॥ ४५० ॥
तैसी दशेची वाट न पांतां । वयसेचिया गात्रां नैयतां ।
बालपणीं चि सर्वज्ञता । वरी तेयातें ॥ ५१ ॥
तिए सिद्धप्रज्ञेचेनि लाभें । मन चि सारस्वतें दुभे ।
मग सकल शास्त्रें स्वयंभें । निगति वाचें ॥ ५२ ॥
ऐसें जें जन्म । जेयालागि देव सकाम ।
स्वर्गीं ठेले जपहोम । करिथि सदा ॥ ५३ ॥
अमरीं भाटां होइजे । मग मृत्युलोकातें वानिजे ।
एसें जन्म गा पार्था जें । तें तो पावे ॥ ५४ ॥

**पूर्वाभ्यासेन तेनैव ह्रियते ह्यवशोऽपि सः ।**
**जिज्ञासुरपि योगस्य शब्दब्रह्मातिवर्तते ॥ ४४ ॥**

आदिं मागील जे सद्बुद्धि । जेथ जीविता नेली होंती अवधी ।
मग ते चि पुडुतीं निरवधी । नवी लाहे ॥ ५५ ॥
तेथ सदैवां आणि पायला । वरि दिव्यांजन हीं होये डोलां ।
मग देखे जैसीं अवलीला । पातालधनें ॥ ५६ ॥
तैसे दुर्भेद्य जे जे अभिप्राये । कां गुरुगम्य ज्ञान ठाये ।
तेथ सौरसें विण जाये । बुद्धि तेहाची ॥ ५७ ॥
बलियें इंद्रियें एंथि मना । मन एकवटे पवनां ।
पवनु साहाजें गगना । मीलों चि लागे ॥ ५८ ॥
ऐसें नेणें चि काइ आपैसें । तेहातें चि कीजे अभ्यासें ।
समाधि घर पूसे । मानसाचें ॥ ५९ ॥
जाणिजे योगपीठिचा भैरवु । काइ हा आरंभरंभेचा गौरवु ।
कीं वैराग्यसिद्धिचा अनुभवु । रुपा आला ॥ ४६० ॥
हा संसारु उमाणिनें माप । किं अष्टांगसामग्रियेचें दीप ।
जैसें परिमलें चि धारेलें रूप । चंदनाचें ॥ ६१ ॥

तैसा संतोषाचा काइ घडिला । कां सिद्धभांडारौनि हान काढिला ।
दीसे तेणें मानें रूढला । साधकदशे ॥ ६२ ॥
जे वरिखशताचां कोडीं । जन्मसहस्रांचिआ आडी ।
लंघितां पातला थडी । आत्मसिद्धिची ॥ ६३ ॥
ह्मणौनि साधनजात आघवें । अनुसरे तेआ स्वभावें ।
मग आइतियें बसे राणिवे । विवेकाचिये ॥ ६४ ॥
पाठिं विचारितेया वेगा । तो विवेकु ही ठाके मागां ।
मग अविचार ये आंगा । घडौनि जाए ॥ ६५ ॥
तेथ मनाचें मेघौडें विरे । पवनाचें पवनपण सरे ।
आपणपां आपण मुरे । आकाश ही ॥ ६६ ॥
प्रणवाचा माथा बुडे । एतुलेंनि अनिर्वाच्य सुख जोडे ।
ह्मणौनि आदिंचि बोलु बाहुडे । तो येया चि लागि ॥ ६७ ॥
ऐसी परब्रह्मिची स्थिती । जे सकलां गतींसि गति ।
तेया अमूर्त्ताची मूर्त्ति । होउनि ठाके ॥ ६८ ॥

**प्रयत्नाद्यतमानस्तु योगी संशुद्धकिल्बिषः ॥**
**अनेकजन्मसंसिद्धस्ततो याति परां गतिम् ॥ ४५ ॥**

तेणें बहुतीं जन्मीं मागिलीं । विक्षेपाचीं पाणिवलें झाडिलीं ।
ह्मणौनि उपजतखेवों बुडाली । लगिनघटिका ॥ ६९ ॥
आणि तद्रूपतासीं चि लग्न । लागौनि ठेलें अभिन्न ।
जैसें लोपलें अभ्र गगन । होउनि ठाके ॥ ४७० ॥
तैसें विश्व जेथें होये । मावौनि लया जाये ।
तें विद्यमानें चि देहें । जाला तो गा ॥ ७१ ॥
जेया लाभाचिआ आशा । करूनि धैर्यबाहूंचा भरवसा ।
घालित षट्कर्माचां धारसां । कर्मनिष्ठ ॥ ७२ ॥
कां जिये येकी वस्तूलागि । बाणूनि ज्ञानाची वज्रांगी ।
जूझत प्रपंचेंसीं समरंगीं । ज्ञानिये गा ॥ ७३ ॥

अथवा निर्लोगे निसरडां । तपोदुर्गाचां आडकडा ।
झोंबति तपिये चाडा । जेयाचिया ॥ ७४ ॥
जें भजतेयांसि भज्य । याज्ञिकांचें याज्य ।
येवं जें पूज्य । सकळां सदा ॥ ७५ ॥
तें चि तो आपण । स्वयें जाला निर्वाण ।
जें साधकांचें कारण । सिद्ध तत्व गा ॥ ७६ ॥

**तपस्विभ्योऽधिको योगी ज्ञानिभ्योऽपि मतोऽधिकः ।**
**कर्मिभ्यश्चाधिको योगी तस्माद्योगी भवार्जुन ॥ ४६ ॥**

ह्मणौनि कर्मनिष्ठां वंद्यु । तो ज्ञानियांसि वेद्यु ।
तापसांचा आद्यु । तपोनाथु ॥ ७७ ॥
पैं जीवपरमात्मसंगमां । जेयाचेया एणेंजाणें मनोधर्मा ।
तो शरीरें चि परि महिमा । ऐसी पावे ॥ ७८ ॥
ह्मणौनि एआ कारणें । तूतें मीं सदा ह्मणे ।
योगी होयें अंतष्करणें । पांडुकुमरा ॥ ७९ ॥

**योगिनामपि सर्वेषां मद्गतेनांतरात्मना ।**
**श्रद्धावान्भजते यो मां स मे युक्ततमो मतः ॥ ४७ ॥**

आगा योगी जो ह्मणिजे । तो देवांचा देओ जाणिजे ।
आणि सुखसर्वस्व माझें । चैतन्य तो ॥ ४८० ॥
जेया भजता भजन भजावें । हें भगतिसाधन जें आघवें ।
तें मी चि जालों अनुभवें । अखंडीत ॥ ८१ ॥
तेया एकवटलेया प्रेमा । जरि पाडें पाइजे उपमा ।
तरि मी देह तो आत्मा । हें चि होये ॥ ८२ ॥
ऐसें भक्तचकोरचंद्रें । जेथ त्रिभुवनैकनरेंद्रें ।
बोलिलें गुणसमुद्रें । संजयो ह्मणे ॥ ८३ ॥
तेथ आदित्यापासौनि पार्था । आइकिजे ऐसी चि आस्था ।
दुणावली हे यदुनाथा । पावों सरलें ॥ ८४ ॥

किं सावियां चि मनीं तोषला । जें बोलं आरिसा जोडला ।
तेणें हरिषें आतां उपलवला । निरूपील ॥ ८५ ॥
जो प्रसंगु असे पुढां । जेथ शांतु दीसैल उघडा ।
तो पालूविला मुडा । प्रमेयबीजाचा ॥ ८६ ॥
जें सात्विकाचेनि वडपें । गेलें अध्यात्मिक खरपें ।
साहाजें निरोलले वापे । चतुर चित्ताचे ॥ ८७ ॥
वरि अवधानाचा वापसा । लाधला सोनेआं ऐसा ।
ह्मणौनि पेरावेआ धिवंसा । निवृत्तिसी ॥ ८८ ॥
ज्ञानदेओ ह्मणे मी चाडें । सद्गुरु केलां कोडें ।
माथां हातु ठेविला तें फुडें । विं चि वाइलें ॥ ८९ ॥
ह्मणौनि येणें मुखें जें निगे । तें संतांचां हृदइं लागे ।
हें असो सांवैं श्रीरंगें । बोलिलें जें ॥ ४९० ॥
परि तें मनाचां कानीं आइकावें । बोलु बुद्धिचां डोलां देखावें ।
हें साटोवाटीं घेआवें । चित्ताचिआ ॥ ९१ ॥
अवधानाचेनि हातें । नेया पां हृदया आंतौतें ।
हें रिझवितील आणितें । जाणांचिए ॥ ९२ ॥
हे हितातें निववितीं । परिणामातें जिववितिं ।
सुखाची लावितीं । लाखौली जीवा ॥ ९३ ॥
जें अर्जुनेंसीं मुकुंदें । नागर बोलिलें विनोदें ।
तें वोवियेचेनि बंधें । सांगैन मीं ॥ ४९४ ॥

ॐ तत्सदिति श्रीमद्भगवद्गीतासूपनिषत्सु ब्रह्मविद्यायां योगशास्त्रे श्रीकृष्णार्जुनसंवादे अभ्यासयोगो नाम षष्ठमोध्यायः ॥

॥ श्रीकृष्णार्पणमस्तु ॥

# ज्ञानेश्वरी

## अध्याय सातवा

श्रीकृष्णाय नमः ॥

तरि आइकां मग तो अनंतु । पार्थातें असे ह्मणतु ।
पैं गा तूं योगयुक्तु । जाला सांता ॥ १ ॥
मज समग्रातें जाणसी ऐसें । आपुलिये तळहातिचें रत्न जैसें ।
तुज ज्ञान सांघैन तैसें । विज्ञानेंसीं ॥ २ ॥

**श्रीभगवानुवाच ॥**

**मय्यासक्तमनाः पार्थ योगं युंजन्मदाश्रयः ।**
**असंशयं समग्रं मां यथा ज्ञास्यसि तच्छृणु ॥ १ ॥**

**ज्ञानं तेऽहं सविज्ञानमिदं वक्ष्याम्यशेषतः ।**
**यज्ज्ञात्वा नेह भूयोऽन्यज्ज्ञातव्यमवशिष्यते ॥ २ ॥**

येथ विज्ञानें काइ करावें । ऐसें घेंसि जरि मनोभावें ।
तरि पैं आदि जाणावें । तें चि लागे ॥ ३ ॥
मग ज्ञानाचिये वेळे । झांकति जाणिवेचे डोळे ।
जैसी तीरीं नाव न ढळे । टेंकली सांती ॥ ४ ॥
तैसी जाणीव जेथ न रिगे । विचारु माघौता वाउलीं निगे ।
तर्कु आणि ने घे । आंगीं जेयाचां ॥ ५ ॥

अर्जुना तेया नावं ज्ञान । येरु प्रपंचु हें विज्ञान ।
येथ सत्यबुद्धि तें अज्ञान । तीन्ही जाण ॥ ६ ॥
आतां अज्ञान आघवें हारपे । विज्ञान निःशेष करपे ।
आणि ज्ञान तें स्वरूपें । होउनि जाइजे ॥ ७ ॥
ऐसें वर्म जें गूढ । तें कीजैल वाक्यारूढ ।
जेणें थोडेनि पुरे कोड । बहुत मनिचें ॥ ८ ॥
जेणें सांगतेया बोलावें कुंठे । आइकतेयाचें वेसन तूटे ।
हें जाणणें सानें मोठें । नव्हे आइकें ॥ ९ ॥

**मनुष्याणां सहस्रेषु कश्चिद्यतति सिद्धये ।**
**यततामपि सिद्धानां कश्चिन्मां वेत्ति तत्त्वतः ॥ ३ ॥**

पैं गा मनुष्यांचेया सहस्रां । माझि विपाइलेयां चि एथ धिवंसा ।
तैसेयां धिवंसेकरां बहुवसां । माझि विरला जाणें ॥ १० ॥
जैसें भरलेया त्रिभुवना । आंतु येकु येकु चांगु अर्जुना ।
निवडूनि कीजे सेना । लक्षवरि ॥ ११ ॥
किं तेयां ही माझि सेवटीं । जेव्हलिं लोहमासातें घाटी ।
तेव्हलिं विजेश्रियेचां पाटीं । एकु चि वैसे ॥ १२ ॥
तैसे आस्थेचां महापुरीं । रिगताति कोडिवेन्हीं ।
परि प्राप्तिचां पैलीं तीरीं । विरला निगे ॥ १३ ॥
ह्मणौनि सामान्य गा नोहे । हे सांगतां वडिलि गोठि आहे ।
परि ते बोलों येईल पाहें । आतां प्रस्तुत आइक ॥ १४ ॥
तरि अवधारि धनंजया । हे महदादिक माझी माया ।
जैसी प्रतिबिंबे छाया । निजांगाची ॥ १५ ॥

**भूमिरापोऽनलो वायुः खं मनो बुद्धिरेव च ।**
**अहंकार इतीयं मे भिन्ना प्रकृतिरष्टधा ॥ ४ ॥**

आणि इयेतें प्रकृति ह्मणिजे । हे अष्टधा भिन्न जाणिजे ।
लोकत्रय निफजे । इयेनव ॥ १६ ॥

हे अष्टधा भिन्न कैसी । ऐसा ध्वनि धरिसी जरि मानसीं ।
तरि ते चि आतां परिसें । विवंचना ॥ १७ ॥

**अपरेयमितस्त्वन्यां प्रकृतिं विद्धि मे परां ।**
**जीवभूतां महाबाहो ययेदं धार्यते जगत् ॥ ५ ॥**

आप तेज गगन । मही मारुतु मन ।
बुद्धि अहंकारु हे भिन्न । आठै भाग ॥ १८ ॥
आणि एयां आठांची जे साम्यावस्था। ते माझी परम प्रकृति पार्था ।
तिये नावं व्यवस्था । जीउ ऐसी ॥ १९ ॥
जे जडातें जीववी । चेतनेतें चेववी ।
मनातें मानवी । शोक मोह ॥ २० ॥
पैं बुद्धिचां आंगीं जाणणें । तें जियेचिये जवळिकेचें करणें ।
जिया अहंकाराचेनि विंदाणें । जग चि धरिजे ॥ २१ ॥

**एतद्योनीनि भूतानि सर्वाणीत्युपधारय ।**
**अहं कृत्स्नस्य जगतः प्रभवः प्रलयस्तथा ॥ ६ ॥**

ते सूक्ष्म प्रकृति कोडें । जैं स्थूलेचेपा आंगा घडे ।
तैं भूतसृष्टिची पडे । टांकसाळ ॥ २२ ॥
चतुर्विधु ठसा । उमटों लागे आपैसा ।
मोला तरि सरिसा । परि थर चि आनान ॥ २३ ॥
होंति चौरासी लक्ष थरा । एरा मीति नेणिजे भांडारा ।
भरे आदिशून्याचा गाभारा । नाणेयांसिं ॥ २४ ॥
ऐसें एकतूकें पांचभौतिक । पडति बौहस टांक ।
मग तिये समृद्धिचें लेख । प्रकृती चि धरी ॥ २५ ॥
जे आंकूनि नाणें विस्तारी । पाठिं तेयाची चि आटणी करी ।
माझि कर्माकर्माचां व्यवहारीं । प्रवर्त्तु दावी ॥ २६ ॥
हें रूपक परि असो । सांघां उघड जैसें परियसों ।
तरि गा नामरूपाचा अतिसो । हा प्रकृती चि कीजे ॥ २७ ॥

आणि प्रकृति तवं माझां ठांइं । त्रिवे एथ आन नाहीं ।
ह्मणौनि आदिनिधन पाइं । जगासि मीं ॥ २८ ॥

**मत्तः परतरं नान्यत्किंचिदस्ति धनंजय ।**
**मयि सर्वमिदं प्रोक्तं सूत्रे मणिगणा इव ॥ ७ ॥**

हें रोहिणीचें जळ । तेयाचें पांतां जैं मूळ ।
तैं रश्मि हीं नव्हति केवळ । होये तें भानु ॥ २९ ॥
तिया चि परीं किरीटी । इये प्रकृती जालिये सृष्टी ।
जैं उपसंहारौनि कीजैल गोठि । तैं मी चि आहें ॥ ३० ॥

**रसोऽहमप्सु कौंतेय प्रभास्मि शशिसूर्ययोः ।**
**प्रणवः सर्ववेदेषु शब्दः खे पौरुषं नृषु ॥ ८ ॥**

ऐसें होये दीसे न दिसे । हें मज चि माझिवडें असे ।
मियां चि विश्व धरिजे । जैसें सूत्रें मणि ॥ ३१ ॥
ह्मणौनि उदकीं हान रसु । कां पवनीं जो स्पर्शु ।
शशिसूर्यी जो प्रकाशु । तो मी चि जाण ॥ ३२ ॥
तैसा चि नैसर्गिकु शुद्धु । पृथ्वीचां ठाइं गंधु ।
गगनीं मीं शब्दु । वेदीं प्रणवु ॥ ३३ ॥
नराचां ठांइं नरत्व । जें अहंभावियें सत्व ।
तें पौरुष मी हें तत्व । बोलिजत असे ॥ ३४ ॥

**पुण्यो गंधः पृथिव्यां च तेजश्चास्मि विभावसौ ।**
**जीवनं सर्वभूतेषु तपश्चास्मि तपस्विषु ॥ ९ ॥**

अग्नी ऐसें आहाच । तेजीं नावांचें आहे कवच ।
तें परतें केलेयां साच । तेज तें मीं ॥ ३५ ॥
आणि नानाविधि योनि । जन्मौनि भूतें त्रिभुवनीं ।
वर्ततें आहाति जीवनीं । आपुलालां ॥ ३६ ॥
पैं एकें पवनू चि पीथि । एकें तृणेंतव जीथि ।
एकें अन्नाधारें आहाति । जळें एकें ॥ ३७ ॥

ऐसें भूतप्रति आनन । जें प्रकृतिवशें दीसे जीवन ।
तें आघवां ठाइं अभिन्न । मी चि एक ॥ ३८ ॥

**बीजं मां सर्वभूतानां विद्धि पार्थ सनातनम्**
**बुद्धिर्बुद्धिमतामस्मि तेजस्तेजस्विनामहम्** ॥ १० ॥

पैं आदिचेनि अवसरें । विरुढे गगनाचेनि अंकुरें ।
जें अंतीं गीळी आखरें । प्रणवा पटिचीं ॥ ३९ ॥
जवं हा विश्वाकारु असे । तवं जें विश्वा चि सारिखें दीसे ।
मग महाप्रळयदशे । कैसें हीं नव्हे ॥ ४० ॥
ऐसें अनादि जें सहज । तें गा मीं विश्वबीज ।
हें हाता तळीं तुज । देइजतसे ॥ ४१ ॥
मग उघड करूनि पांडवा । जैं हें आणिसी सांख्याचेया गावां ।
तैं येयाचा उपेगु बरवा । देखसील ॥ ४२ ॥
परि हें अप्रसंगालाप । आतां असतु न बोलों साक्षेप ।
जाणैं तपियांचां ठांइं तप । तें रूप माझें ॥ ४३ ॥
बळियां माझि बळ । तें मीं जाण अढळ ।
बुद्धिमतीं केवळ । बुद्धि ते मीं ॥ ४४ ॥

**बलं बलवतां चाहं कामरागविवर्जितम्** ।
**धर्माविरुद्धो भूतेषु कामोऽस्मि भरतर्षभ** ॥ ११ ॥

भूतांचां ठांइं कामु । तो मीं ह्मणे रामु ।
जेणें अर्थातव धर्मु । थोरु दीसे ॥ ४५ ॥
एऱ्हवीं विकाराचेनि पैसें । करी किर इंद्रियांचेया चि ऐसें ।
परि धर्मासि वेखासें । जाओं नेदी ॥ ४६ ॥
जे अप्रवृत्तिचा अव्हांटा । सांडूनि विधिचिया चि नीगे वाटा ।
तेवीं चि नियमाचा दीवटा । सवें चाले ॥ ४७ ॥
कामु ऐसिया ओजा प्रवर्त्ते । ह्मणौनि धर्मासि होये पुरतें ।
मग मोक्षतीर्थिचें मुगुतें । संसारु भोगी ॥ ४८ ॥

जो श्रुतिगौरवाचा मांडवीं । कामुसृष्टिचा वेलु वाढवी ।
जवं कर्मफळेंसीं पाल्वी । अपवर्गीं टेंके ॥ ४९ ॥
ऐसां नियतु कां कंदर्पु । जो भूतां एयां बीजरूपु ।
तो मी ह्मणे बापु । योगियांचा ॥ ५० ॥
हें येकेक केती सांघावें । आतां वस्तुजात चि आवघें ।
मज पासौनि जाणावें । विकरलें असे ॥ ५१ ॥

**ये चैव सात्विका भावा राजसास्तामसाश्च ये ॥**
**मत्त एवेति तान्विद्धि न त्वहं तेषु ते मयि ॥ १२ ॥**

जे सात्विक ह्मन भाव । कां रजतमादि सर्व ।
ते ममरूपसंभव । ओळख तूं ॥ ५२ ॥
हे जाले तरि माझां ठांइं । परि येया माझि मी नाहीं ।
जैसी स्वप्निचां डोहीं । जाग्रति न बुडे ॥ ५३ ॥
ना तरि रसाची चि सुवट । जैसी बीजकणिका तरि घनवट ।
परि तियेतव होये जें काष्ट । अंकुरद्वारें ॥ ५४ ॥
मग तेया काष्टाचां ठांइं । सांघ पां बीजपण आहे काहीं ।
ह्मणौनि विज्ञानीं मीं नाहीं । जऱ्हीं हें माझें ॥ ५५ ॥
पैं गा गगनीं उपजे आभाळ । परि तेथ गगन नाहिं केवळ ।
अथवा अभाळीं होये सलील । तेथ अभ्र नाहिं ॥ ५६ ॥
मग तेया उदकाचेनि चि आवेसें । जालें तेज जें ळखळखीत दीसे ।
तेयां विजू माझि काइ असे । सलील तें ॥ ५७ ॥
सांघैं अग्नीतव धूमु होये । तिए धूमीं काये अग्नि आहे ।
तेसा विकारु हा मी नोहें । जऱ्हीं विकरलां असें ॥ ५८ ॥

**त्रिभिर्गुणमयैर्भावैरेभिः सर्वमिदं जगत् ।**
**मोहितं नाभिजानाति मामेभ्यः परमव्ययम् ॥ १३ ॥**

परि उदकीं जाली बावुळी । उदकातें चि जैसी झांकोळी ।
कां वायांचिया आभाळीं । आकाश लोपे ॥ ५९ ॥

हो गा स्वप्न हें लटिकें नोहे । परि निद्रावशें जैं बाणलें होये ।
तैं आठउ काइ देत आहे । आपणपें ॥ ६० ॥
हें असो नेणों कैंचें । जें डोळां चि पटल रचे ।
तेणें देखणेपण डोळेयांचें । न गीलिजे काइ ॥ ६१ ॥
तैसी माझी चि हे बिंबली । गुणात्मक साउली ।
किं मज चि आड ठेली । जवनीक जैसी ॥ ६२ ॥
ह्मणौनि भूतें मातें नेणती । माझीं चि परि मीं नव्हति ।
जैसीं जळा जळें न विरति । मुक्ताफळें ॥ ६३ ॥
पैं पृथ्वीचा घटु कीजे । सवें चि पृथ्वीसि मिळे जरि मेळविजे ।
तो चि अग्निसंगें सिंविजे । तरि मांगळ होये ॥ ६४ ॥
तैसें भूतजात सर्व । हे माझे चि कीर अवयव ।
परि मायायोगें जीव— । दशे आले ॥ ६५ ॥

**दैवी ह्येषा गुणमयी मम माया दुरत्यया ॥**
**मामेव ये प्रपद्यंते मायामेतां तरंति ते ॥ १४ ॥**

आतां महानदी हे माया । उतरौनियां धनंजया ।
मी होइजे हें आया । कैसेनि ये ॥ ६६ ॥
जिये ब्रह्माचळाचां आधाडां । पहिलेया संकल्पजळाचेया उभडा ।
सवें चि महाभूतांचा बुडडा । साना आला ॥ ६७ ॥
जे शृष्टिसंचाराचेनि ओवें । चडतकाळकळांचेनि वेघें ।
प्रवृत्तिनिवृत्तिचीं तुंगें । तटें सांडी ॥ ६८ ॥
जे गुणघनाचेनि वृष्टिभरें । भरली मोहाचेनि महापूरें ।
घेउनि जांत नगरें । यमनियमांचीं ॥ ६९ ॥
जे द्वेषाचां आवर्त्ती दाटत । तेथ मत्सराचे हकरे पडत ।
माझि प्रमादादि तळपु अंत । माहामीन ॥ ७० ॥
जेथ प्रपंचाचीं वळणें । कर्मा अकर्माचीं ओभाणें ।
वरि तराति ओसाणें । सुखदुःखांचीं ॥ ७१ ॥

रतिचेया बेटा । आदळति कामाचिया लाटा ।
तेथ जीवफेन संघाटां । सीव दीसे ॥ ७२ ॥
अहंकाराचिया चळियां । वरि मदत्रयाचिया उकळिया ।
जेथ विषयोर्मीचे कळिया । उल्हाळु घेंति ॥ ७३ ॥
उदोअस्तूंचे लोंढे । पाडित जन्ममृत्युचे चोंढे ।
जेथ पांचभौतिक बुडबुडे । होंत जांत ॥ ७४ ॥
संमोह—भ्रम—मासे । गीळित धैर्याचीं आविसें ।
जेथ देवढे भवंत वळसे । अज्ञानाचे ॥ ७५ ॥
भ्रांतिचेनि खडुळें । रेवले आस्थेचे अवगाळे ।
रजोगुणाचेनि खळाळें । स्वर्गु गाजे ॥ ७६ ॥
तमाचे धारसे काढ । सत्वाचें थीरपणें जाड ।
किंबहुना हे दुवाड । मायानदी ॥ ७७ ॥
पैं पुनरावृत्तिचेनि उभडें । झळंबताति सत्यलोकिचे हुडे ।
घायें गडबडीत ढोंढे । ब्रह्मगोळकांचे ॥ ७८ ॥
ते पाणियांचेन वहिलेपणें । आझूं न धरिती चि ओभाणें ।
ऐसा मायापुरु हा कवणें । तारिजैल गा ॥ ७९ ॥
एक स्वयंबुद्धिचां वाहीं । रिगाले तेयांची शुद्धि नाहीं ।
एक जाणिवेचां डोहीं । गर्वें गीळिले ॥ ८० ॥
एकिं वियेचिया सांगडी । घेतलिया अहंभावाचिया डौंडी ।
ते मदमीनाचां तोंडीं । सगळे चि गेले ॥ ८१ ॥
एकिं वयसेचें जाड बांधलें । मग मन्मथाचिये कासे लागले ।
ते विषयमगरीं सांडिले । चघळूनियां ॥ ८२ ॥
आतां वृद्धाप्याचेया तरंगा । माझि मतिभ्रमाचा जरंगा ।
तेणें कवळिजताति पैं गा । चहूंकडे ॥ ८३ ॥
आणि शोकाचां कडां उपटत । रोगाचां आवर्ती दाटत ।
आपदागिधिं चुंबिजत । उथळां ठाइं ॥ ८४ ॥

मग दुःखाचेनि बरटेनि बोंबले । पाठिं मरणाचिया रेवा रेवले ।
ऐसे कामाचिये कासे लागले । गेले वायां ॥ ८५ ॥
एकें यजनक्रियेचीं पेटीं । घातलीं बांधौनि पोटीं ।
ते स्वर्गसुखाचां कपाटीं । भरौनि ठेले ॥ ८६ ॥
एकिं मोक्षिं लागावेयाचिया आशा । केला कर्मबाह्याचा भर्वसा ।
परि ते पडिले गा करूनि वळसां । विधिबोधाचा ॥ ८७ ॥
जेथ वैराग्याची नाव न रिगे । विवेकाचा तागा न लगे ।
वरि काहिं काहिं तरों ये योगें । परि विपायें तो ॥ ८८ ॥
ऐसें जीवाचिये आंगवणे । इये मायानदीचें उतरणें ।
हें काइसेयासारखें बोलणें । ह्मणावें पां ॥ ८९ ॥
जरि अपथ्यशीला व्याधी । कळे साधू दुर्जनाची बुद्धि ।
कां रागी सांडी रिद्धि । आली सांती ॥ ९० ॥
जरि चोरा सभा दाटे । अथवा मीना गळु घोंटे ।
ना तरि भेडा उल्हाटे । विवसी जरि ॥ ९१ ॥
पाडसा वागूर करांडी । जरि मुंगी मेरु ओलांडी ।
तरि मोहाचि पैली थडी । देखति जीव ॥ ९२ ॥
ह्मणौनि गा पांडुसुता । जैसी सकामा न जिणवे चि वनिता ।
तैसी मायामय हे सरिता । न टके जीवां ॥ ९३ ॥
एथ एक चि लीला तरले । जिहिं भजौनि मातें वरिलें ।
तेया ऐली चि थडिये सरलें । मायाजळ ॥ ९४ ॥
जे अहंभावाचें ओझें सांडुनि । विकारांचिया झुळुआ चूकौनि ।
अनुरागाचा नीरु ताउनि । पाणिढाळु ॥ ९५ ॥
जेया ऐक्याचिये उतारां । बोधाचा जोडला तारा ।
मग निवृत्तिचेया पैलातीरा । झेंपावले जे ॥ ९६ ॥
जेयां सद्गुरू तारू पुढें । जे अनुभवाचिये कासे गाढे ।
जेयां आत्मनिवेदन तरांडें । आकळले ॥ ९७ ॥

ते उपरतिच्यां वाविं सेळत । सोहंभावाचेनि थावें पेलत ।
मग निगाले अनकळित । निवृत्तितटीं ॥ ९८ ॥
एणें उपायें मज भजले । ते हे माझी माया तरले ।
परि ऐसे भक्त विपाइले । बहुवस नाहिं ॥ ९९ ॥

**न मां दुष्कृतिनो मूढाः प्रपद्यन्ते नराधमाः ॥**
**माययापहृतज्ञाना आसुरं भावमाश्रिताः ॥ १५ ॥**

जें बहुतां एकां आवांतरु । अहंकाराचा भूतसंचारु ।
जाला ह्मणौनि विसरु । आपणपां तेयां ॥ १०० ॥
तेव्हां नियमाचें वस्त्र नाठवे । पुढेली अधोगतिची लाज नेणवे ।
आणि करिताति जें न करावें । वेदु ह्मणे ॥ १ ॥
पाहे पां शरीराचेया गावां । जेयालागि आले पांडवा ।
तो कार्यार्थु आथवा । सांडूनियां ॥ २ ॥
इंद्रियांचां राजवीदीं । अहंमतिचां जल्पवादिं ।
विकारांतराची मांदी । मेळविताति ॥ ३ ॥
आणि दुःखशोकाचां घाइं । मारिलेयाची सें चि नाहिं ।
हें सांघावेया कारण काइ । ग्रसिले माया ॥ ४ ॥

**चतुर्विधा भजन्ते मां जनाः सुकृतिनोऽर्जुन ।**
**आर्तो जिज्ञासुरर्थार्थी ज्ञानी च भरतर्षभ ॥ १६ ॥**

ह्मणौनि मातें चूकले । ऐसां चतुर्विध मज भजले ।
जिहिं आत्महिता केलें । वाढतें गा ॥ ५ ॥
तो पहिला आर्त्तु ह्मणिजे । दुसरा जिज्ञासु बोलिजे ।
तीजा अर्थार्थी जाणिजे । ज्ञानियां चौथा ॥ ६ ॥
तेथ आर्त्तु तो आर्तिचेन व्याजें ।
जिज्ञासु तो जाणावेया चि लागि भजे ।
तीजेनि तेणें अर्थिजे ।
अर्थसिद्धी ॥ ७ ॥

**तेषां ज्ञानी नित्ययुक्त एकभक्तिर्विशिष्यते ।**
**प्रियो हि ज्ञानिनोऽत्यर्थमहं स च मम प्रियः ॥ १७ ॥**

मग चौथेयाचा ठांइं । काहिं चि करणें नाहीं ।
ह्मणौनि भक्तु येकु पाइं । ज्ञानियां जो ॥ ८ ॥
जे तेया ज्ञानाचेनि प्रकाशें । फीटलें भेदांचें कडवसें ।
मग मी चि जाला समरसें । आणि भक्तु तेविं चि ॥ ९ ॥
परि आणिकाचिये दीठी नावेक । जैसा फटिकु चि आवडे उदक ।
तैसा ज्ञानी नव्हे कवतीक । सांवतां तें ॥ ११० ॥
जैसा वारा कां गगनीं वीरे । मग वारेपण वेगळें नुरे ।
तेवि भक्तु हे पैज न सरे । जरि ऐक्या आला ॥ ११ ॥
परि पवनु हालौनि पाहिजे । तरि गगना हिं वेगला देखिजे ।
एऱ्हविं गगन तों हें साहाजें । असे जैसें ॥ १२ ॥
तैसें शरीरें हान कर्मं । तो भजतसे ऐसा गमे ।
परि आंतरें प्रतीतिधर्में । मी चि जाला ॥ १३ ॥
आणि ज्ञानाचेनि उजियडलेपणें । मी आत्मा ऐसें तो जाणे ।
ह्मणौनि मी हीं तैसें चि ह्मणें । उचंबळला सांता ॥ १४ ॥
हां गा जीवापलीकडिली खूणे । जो पावौनि वावरों हीं जाणे ।
तो देहाचेनि वेगलेपणें । काइ वेगला होये ॥ १५ ॥

**उदाराः सर्व एवैते ज्ञानी त्वात्मैव मे मतम् ।**
**आस्थितः स हि युक्तात्मा मामेवानुत्तमां गतिम् ॥ १८ ॥**

ह्मणौनि आपुलालेया हिताचेनि लोभें ।
मज आवडे तो हीं भगतु शोभे ।
परि मीं चि करीं वाल्भें ।
ऐसा ज्ञानियां येकु ॥ १६ ॥
पाहे पां दुभतेयाचिया आशा । जग चि धेनू करित आहे फांसा ।
परि दोरेंविण कैसा । वत्साचा वर्ली ॥ १७ ॥

कां जें तनुमनुप्राणें । तें आणिक कांहीं चि नेणे ।
देखे तेयातें ह्मणे । हे माये चि कीं ॥ ११८ ॥
तें एणें मानें अनन्यगति । ह्मणौनि धेनू हीं तैसी चि प्रीति ।
एयालागि लक्ष्मीपति । बोलिले साच ॥ ११९ ॥
हें असो मग ह्मणितलें । जे कां गा तुज सांवितले ।
तेही भक्त भले । पढियंति आह्मां ॥ १२० ॥
परि जाणौनियां मातें । जो पाहों विसरला माघौतें ।
जैसें सागरा एउनि सरिते । मुरडावें ठेलें ॥ २१ ॥
तैसी अंतष्करणकुहरीं उपनली । जेयाची प्रतीतिगंगा मज मीनली ।
तो मीं हे काइ बोली । फार करूं ॥ २२ ॥
तरि ज्ञानियां जो ह्मणिजे । तो चैतन्य चि केवल माझें ।
हें न ह्मणावें परि काइ कीजे । न बोलों नैये ॥ २३ ॥
जें तो विषयांचिये मांट झाडीं । माझि कामक्रोधाची पाझडीं ।
चूकौनि आला पाडीं । सद्वासनेचिये ॥ २४ ॥
मग साधुसंगें सूभटा । उजू सत्क्रियेचिया वाटा ।
अप्रवृत्तिचा अव्हांटा । डावा केलो ॥ २५ ॥

**बहूनां जन्मनामन्ते ज्ञानवान्मां प्रपद्यते ॥**
**वासुदेवः सर्वमिति स महात्मा सुदुर्लभः ॥ १९ ॥**

आणि जन्मशताचां वाहातवणां ।
तेविं चि आशेचिया न लें चि वाहाणां ।
तेथ फलहेतुचा उगाणां ।
कवण चाली ॥ २६ ॥
ऐसा शरीरसंयोगाचिये गतीं । माझि धावंत नडिया आइती ।
तवं कर्मक्षयाची पाहुंती । मोये जाली ॥ २७ ॥
तैसीं चि गुरुकृपा उखा उजलली । मग ज्ञानाची ओतपली पडिली ।
तेथ साम्याची सिद्धि उपनली । तेयाचिये दृष्टी ॥ २८ ॥

तेऱ्हवि जियाकडे वांस पाहे। तेउता मीं चि येकु तेया आहे।
अथवा निवांतु जऱ्हीं राहे। तऱ्हीं मीं चि आथि ॥ २९ ॥
हें असो आणिक काहीं। तेया सर्वत्र मीवांचूनि नाहीं।
जैसें सबाह्य जळ डोहीं। बुडालेया घटा ॥ १३० ॥
तैसा तो मज भीतरि। मी तेया आंतु बाहिरि।
हें सांघिजे बोलवरि। तैसें नोहे ॥ ३१ ॥
ह्मणौनि असो हें इयापरीं। तो देखे ज्ञानाची वाखारी।
तेणें सर्वंतारेनि करी। आपु विश्व ॥ ३२ ॥
हें समस्त ही श्रीवासुदेऊ। ऐसेया प्रतीतिरसाचा उते भाऊ।
ह्मणौनि भक्तांमाझि राओ। ज्ञानियां तो ॥ ३३ ॥
जेयाचिये प्रतीतीचां वाखोरां। पवाडु होये चराचरां।
तो महात्मा धनुर्धरा। दुर्लभु अति ॥ ३४ ॥

**कामैस्तैस्तैर्हृतज्ञानाः प्रपद्यंतेऽन्यदेवताः।**
**तं तं नियममास्थाय प्रकृत्या नियताः स्वया॥ २० ॥**

येर बहू जोडति किरीटी। जेयांचीं भजनें भोगासाठीं।
जे आशातिमिरें दीठी। मंद झाले ॥ ३५ ॥
आणि फळाचिया हांवां। हृदयीं कामा जाला रिगावां।
कीं तेयाचिया घसणी दीवा। ज्ञानाचा गेला ॥ ३६ ॥
ऐसें उभयथा आंधारें पडिलें। ह्मणौनि पासिं चि मातें चूकले।
मग सर्वभावें अनुसरले। देवतांतरां ॥ ३७ ॥
आदिंचे प्रकृतिचे पाइक। वरि भोगालागौनि तवं रंक।
मग तेणें लोल्यें कवतीक। कैसें भजतें ॥ ३८ ॥
कवणी तिया नियमबुद्धी। कैसिया हान उपचारसमृद्धी।
कां अर्पण यथाविधी। विहित करणें ॥ ३९ ॥

**यो यो यां यां तनुं भक्तः श्रद्धयार्चितुमिच्छति।**
**तस्य तस्याचलां श्रद्धां तामेव विदधाम्यहम्॥ २१ ॥**

पैं जो जो जिये जिये देवतांतरीं । भजावेया चाड धरी ।
तेयाते ते चाड पूरीं । पुरविता मीं ॥ १४० ॥
मग तिया श्रद्धायुक्त । तेथिचें आराधन जें उचित ।
तें सिद्धिवेन्हीं समस्त । वर्त्तों लागे ॥ ४१ ॥

**स तया श्रद्धया युक्तस्तस्याराधनमीहते ॥**
**लभते च ततः कामान्मयैव विहितान्हितान् ॥ २२ ॥**

ऐसें जेणें जें भाविजे । तें फल तेणें पाविजे ।
परि तें हीं सकल निफजे । मज चि तव ॥ ४२ ॥
परि ते भक्त मातें नेणति । जे कल्पने बाहिरे न निगति ।
म्हणौनि कल्पित फल पावति । अंतवंत ॥ ४३ ॥

**अंतवत्तु फलं तेषां तद्भवत्यल्पमेधसाम् ।**
**देवान्देवयजो यांति मद्भक्ता यांति मामपि ॥ २३ ॥**

किम्हुना ऐसें भजन । तें संसाराचें चि साधन ।
येरु फलभोगु तें स्वप्न । नांवेंभरि दीसे ॥ ४४ ॥
हें असो पऱ्हौतें । पाठिं हो कां आवडतें ।
परि यजीं जो देवतांतें । तो देवत्वासि ये ॥ ४५ ॥
येर तनुमनुप्राणीं । जे निरंतर माझिया चि वाहाणी ।
ते देहाचां निर्वाणीं । मी चि होंति ॥ ४६ ॥
परि तैसें न करीति प्राणिये । वायां आपुलां चि सुखिं वाणिये ।
पऱ्हंताति पाणियें । तल्हातिचेनि ॥ ४७ ॥
नाना अमृताचां सागरीं वुडिजे । मग तोंडासि काइ वज्र पाडिजे ।
आणि मनीं तरि आठविजे । थीलरातें ॥ ४८ ॥
हें ऐसें काइसेया करावें । जें अमृति हिं रिगौनि मरावें ।
सुखें अमृत होउनि कां नसावें । अमृतामाझि ॥ ४९ ॥
तैसा फलहेतुचा पांजरा । सांडूनियां धनुर्द्धरा ।
कां प्रतीतिपाखिं अंबरीं । गोमाविंयां नोहावें ॥ १५० ॥

**अव्यक्तं व्यक्तिमापन्नं मन्यन्ते मामबुद्धयः।**
**परं भावमजानंतो ममाव्ययमनुत्तमम्॥ २४॥**

जेथ उंचावते न पवाडें। मुखाचा पैसारु जोडे।
आपुलेनि मुरवाडें। उडों ये ऐसा॥ ५१॥
तेया उमपा माप कां सुआवें। मज अव्यक्तातें व्यक्ता कां मानावें।
सिद्ध असतां कां निमावें। साधनवरि॥ ५२॥

**नाहं प्रकाशः सर्वस्य योगमायासमावृतः।**
**मूढोऽयं नाभिजानाति लोको मामजमव्ययम्॥ २५॥**

परि हा बोलु आघवा। जरि विचारिजत असे पांडवा।
तरि विशेष एयां जीवां। नलगे किर॥ ५३॥
कां जें योगमायापटलें। हे जाले आथि आंधलें।
म्हणौनि प्रकाशाचेन हीं दिहवलें। न देखती चि मातें॥५४॥
यऱ्हवि मीं नव्हें ऐसें। कांहिं वस्तुजात असे।
पाहे पां कवण जल रसें। रहित आहे॥ ५५॥
पवनु कवणातें न सिवे चि। आकाश कें न समाये चि।
हें असो येकु मीं चि। विश्वि असें॥ ५६॥

**वेदाहं समतीतानि वर्तमानानि चार्जुन।**
**भविष्याणि च भूतानि मां तु वेद न कश्चन॥ २६॥**

एथ भूतें जियें अत्यंतलिं। तियें मीं चि होउनि ठेलीं।
आणि वर्त्ततें आथि जालीं। तें हीं मीं चि॥ ५७॥
कां भविष्यमाणें ज्ये हीं। तें हिं मज वेगलीं नाहीं।
हा बोलु चि यऱ्हवि कांहीं। होये ना जाए॥ ५८॥
ऐसा मीं पांडुसुता। अनस्यूतु सदा असता।
एयां संसारु जो भूतां। तो आनें बोलों॥ ५९॥

**इच्छाद्वेषसमुत्थेन द्वंद्वमोहेन भारत।**
**सर्वभुतानि संमोहं सर्गे यांति परंतप॥ २७॥**

तरि तेही आतां थोडी ऐसी । गोठि सांविजैल परियसैं ।
जैं अहंकारा तनूसीं । वालभ पडिलें ॥ १६० ॥

तैं इछा हे कुमारी जाली । मग ते कामाचेया तारुण्या आली ।
तेथ द्वेषेंसीं मांडिली । कुलवाडि तिये ॥ ६१ ॥

तेयां दोघां तव जन्मला । ऐसा द्वंदमोहो पडिला ।
मग तो आजेन वाढविला । अहंकारें ॥ ६२ ॥

तो धृतिसीं सदा प्रतिकूलु । नियमा हीं ना गवे मूलु ।
आशारसें दोंदिलु । जाला सांता ॥ ६३ ॥

असंतुष्टिचिया मदिरा । मत्तु होउनि धनुर्द्धरा ।
विषयाचां वोवरा । विकृतिसिं असे ॥ ६४ ॥

तेणें भावशुद्धिचिये वाटे । विखुरिले विकल्पाचे कांटे ।
मग चौरिले अव्हांटे । अप्रवृत्तिचे ॥ ६५ ॥

तिहिं भूतें भांभावलिं । झगांनि संसाराचेया अडवींमाझि पडिलीं ।
मग जेथ महादुःखाचे घेतलीं । दांडेवरि ॥ ६६ ॥

**येषां त्वंतगतं पापं जनानां पुण्यकर्मणाम् ।**
**ते द्वंद्वमोहविनिर्मुक्ता भजंते मां दृढव्रताः ॥ २८ ॥**

ऐसां विकल्पांचें वायाणें । कांटे देखौनि ससाणे ।
जे मतिभ्रमाचे पासवणे । घेंति चि ना ॥ ६७ ॥

उजू एकनिष्ठतेचां पाउलीं । रगडूनि विकल्पाचिया भाली ।
पातकांची सांडिलीं । अटवी जीहीं ॥ ६८ ॥

मग पुण्याचें धांवं घेतलें । आणि माझी जवलीक पातले ।
किंबहुना ते चूकले । वाटवधेया ॥ ६९ ॥

**जरामरणमोक्षाय मामाश्रित्य यतंति ये ।**
**ते ब्रह्म तद्विदुः कृत्स्नमध्यात्मं कर्म चाखिलम् ॥ २९ ॥**

यन्हवि तन्हि पार्था । जरामरणाची नीमे कथा ।
ऐसेया प्रयत्नातें आस्था । विये जेयांची ॥ २७० ॥
तेयां तो प्रयत्नू चि येकें वेळें । मग समग्रें परब्रह्में फळें ।
जेया पीकलेया रसु गळे । पूर्णतेचा ॥ ७१ ॥
तेव्हळि कृतकृत्यें जग भरे । तेथ अध्यात्माचें नवलपण पूरे ।
कर्माचें काम सरे । वीरे मन ॥ ७२ ॥
ऐसा आत्मलाभु तेयां । होये गा धनंजया ।
भांडवल जेया । उद्यमीं मी ॥ ७३ ॥
तेयांतें साम्याचिया वाढी । मग ऐक्याची चि सांधे कुळवाडि ।
तेथ भेदाचीं सांकडीं । नेणिजति ॥ ७४ ॥

**साधिभूताधिदैवं मां साधियज्ञं च ये विदुः॥**
**प्रयाणकालेऽपि च मां ते विदुर्युक्तचेतसः ॥ ३० ॥**

जिहिं साधिभूतां मातें । प्रतीतीचेनि हातें ।
धरूनि अधिदैवातें । सीतळे गा ॥ ७५ ॥
जेयां जाणिवेचिये उगें । मीं अधियज्ञु रिगें ।
ते तनुचेनि हिं वियोगें । विरहिये नव्हति ॥ ७६ ॥
एऱ्हवीं आयुष्याचें सूत्र विघडतां । भूतांचीं उमेठें षडाडितां ।
काइ न मरतेया ही चित्ता । युगांत नोहे ॥ ७७ ॥
परि नेगें कैसें पैं गा । जे दडउनि गेळे माझेया आंगा ।
ते प्रयाणिचिया ही लगवगा । न संडीति मातें ॥ ७८ ॥
यऱ्हवीं तऱ्हीं जाण । ऐसे जे निपुण ।
ते चि अंतष्करण– । युक्त योगी ॥ ७९ ॥
तवं इये शब्दकूपिकेतळिं । नोडवे चि अवधानांची आंजुळी ।
जें अर्जुनु नावेक तेव्हळीं । मागां चि आहे ॥ १८० ॥

जेथ तद्ब्रह्मादिवाक्यफळें । जिये नानार्थरसरसाळें ।
वाहाकातें आहाति परिमळें । भावांचेनि ॥ ८१ ॥
सहजकृपामंदानीळें । कृष्णद्रुमु डोलति तिये वेळे ।
अर्जुनु श्रवणाचिये खोळे । अवसात पडिलीं ॥ ८२ ॥
तिये प्रमेयाचीं चि हों काज वळिलीं ।
किं रसाचां सागरीं चुबुकुलिलीं ।
मग तैसां चि कां घोळिलीं ।
परमानंदें ॥ ८३ ॥
तेणें बरवेपणें निर्मळें । अर्जुनोन्मेषाचे डोळे ।
घेताति गळाळे । विस्मयामृताचे ॥ ८४ ॥
तिया सुखसंपत्ती जोडलिया । मन स्वर्गा वांत वाकुलिया ।
हृदयाचां जीवीं गुतकुलिया । होंती आथि ॥ ८५ ॥
ऐसें वरचिलि चि बरवा । सुख जावों लागे फावा ।
तवं रसास्वादाचिया हावा । लाहा केला ॥ ८६ ॥
झाकरि अनुमानाचेनि करतळें । घेउनि तियें वाक्यफळें ।
प्रतीतिमुखिं एकें वेळें । घाळूं पाहिलीं ॥ ८७ ॥
तवं विचाराचिया रसना न दटति ।
परि हेतुचां दशनी ही न फुटाति ।
ऐसें जाणौनि सुभद्रापति ।
चुंबी चि ना ॥ ८८ ॥
मग चमत्करला ह्मणे । इयें जळिचिं मा तारागण ।
कैसा झांपकलों आसलगपणें । अक्षरांचेनि ॥ ८९ ॥
इयें पदें नव्हति फुडिया । गगनाचिया चि मां घडिया ।
एथ आमाचिये मती बुडिया । थाउं न निगे ॥ १९० ॥

वांचूनि जाणावेयाचिया कें गोठी । ऐसें जीवीं चि कल्पूनि किरीटी ।
तियें पुनरपि केलीं दीठी । यादवेंद्रा ॥ ९१ ॥
मग विनविलें सूभटें । हां हो जी इयें एकावटें ।
सात ही पदें अगुमुटें । नवलें असति ॥ ९२ ॥
एऱ्हवीं अवधानाचेनि वहिलेपणें । नाना प्रमेयांचे उगाणे ।
काइ श्रवणाचेनि आंगणें । ब्रोलों लाहांति ॥ ९३ ॥
परि तैसें नव्हे हें देवा । देखिला अखरांचा चि मेलावा ।
आणि विस्मयाचेया ही जीवा । विस्मयो जाला ॥ ९४ ॥
कानाचेनि गवाक्षद्वारें । बोलाचें रश्मि आधंतरें ।
पडेना तवं चमत्कारें । अवधान ठकलें ॥ ९५ ॥
तेविं चि मज आर्ता अर्थाची चाड आहे । तेया सांवतां हीं वेलु न साहे ।
ह्मणौनि निरूपण लवलाहें । कीजो देवा ॥ ९६ ॥
ऐसा मागील्ठु पडिताला घेउनि । पुढां अभिप्राया दीठि सूनि ।
तेविं चि माझी सूनि । आर्ति आपुली ॥ ९७ ॥
कैसी पूसती पांहे जाणिव । भीडेची तरि लंघो नेदी सीवं ।
यऱ्हवीं कृष्णहृदयासि खेवं । देऊं सरलें ॥ ९८ ॥
आगा गुरूतें जैं पूसावें । तैं एणें मानें सावधान होआवें ।
हें एकु जाणें आघवें । सव्यसाची ॥ ९९ ॥
आतां तेयाचें तें प्रश्न करणें । वरि सर्वज्ञा श्रीहरिचें बोलणें ।
हें संजयो आवडलेपणें । सांघेल कैसें ॥ २०० ।
तियें गा अवधान देयां गोठी । बोलिजैल नीट मऱ्हाटी ।
जैसी काना आदिं दीठि । उरेगा जाये ॥ १ ॥
बुद्धिचिया जीभा । बोलाचा न चखतां गाभा ।
आखरांचिया चि भांभा । इंद्रियें जीति ॥ २ ॥
पाहा पां मालतीचे कले । घ्राणासि वांटले कीर परिमलें ।
परि वरिचिली वरवा काइ डोले । श्रावली नोहोंति ॥ ३ ॥

तैसें देशिचिया हवात्रा । इंद्रियें कारिति राणिवा ।
मग प्रमेयांचिया गावां । लेसां जाइजो ॥ ४ ॥
ऐसेनि नागरपणें । बोलु निमे तें बोलणें ।
आइका ज्ञानदेओ ह्मणें । निवृत्तिचा ॥ ५ ॥

ॐतत्सदिति श्रीमद्भगवद्गीतासूपनिषत्सु ब्रह्मविद्यायां योगशास्त्रे श्रीकृष्णार्जुनसंवादे परमहंसयोगो नाम सप्तमोऽध्यायः ॥

॥ श्रीकृष्णार्पणमस्तु ॥

# ज्ञानेश्वरी

## अध्याय आठवा

श्रीकृष्णाय नमः ॥

**अर्जुन उवाच ।**

**किं तद्ब्रह्म किमध्यात्मं किं कर्म पुरुषोत्तम ।**
**अधिभूतं च किं प्रोक्तमधिदैवं किमुच्यते ॥ १ ॥**

मग अर्जुनें ह्मणितलें । अहो जी अवधारिलें ।
जें मियां पूसिलें । तें निरोपिजो ॥ १ ॥
सांघां कवण तें ब्रह्म । काइसेया नावं कर्म ।
अथवा अध्यात्म । काइ ह्मणिपे ॥ २ ॥
अधिभूत तें कैसें । एथ अधिदैव कवण असे ।
हें उघड मीं परियसें । तैसें बोलां ॥ ३ ॥

**अधियज्ञः कथं कोऽत्र देहेऽस्मिन्मधुसूदन ।**
**प्रयाणकाले च कथं ज्ञेयोऽसि नियतात्मभिः ॥ २ ॥**

देवा अधियज्ञु तो काइ । कवणु पां इये देहीं ।
हें अनुमानासि काहीं । दीठि न भरे ॥ ४ ॥
आणि जीं नियता अंतःकरणीं । तूं जाणिजसि प्रयाणीं ।
तें कैसें शार्ङ्गपाणी । परिसवां मातें ॥ ५ ॥

देखां धवलारीं चिंतामणिचां । जरि पवडला होये दैवांचा ।
ओसणतां हीं बोलु तेयाचा । परि सोपु न वचे ॥ ६ ॥
तैसें अर्जुनाचेया शब्दा चि सवें । आलें तें चि ह्मणितलें देवें ।
पार्था परियसैं गा बरवें । पूसिलें तुवां ॥ ७ ॥
किरीटीकामधेनूचा पाडा । वरि कल्पतरूचा आहे मांदोडा ।
ह्मणौनि मनोसिद्धिचेया घडा । तो नवलु नोहे ॥ ८ ॥
जैं कृष्णाचेयां होयजे आपण । कृष्णु होये आपुलें अंतष्करण ।
तैं संकल्पाचें आंगण । उल्गति सिद्धी ॥ ९ ॥
तरि ऐसें जें प्रेम । तें अर्जुनीं चि आथि निःसीम ।
ह्मणौनि तेयाचें काम । सदाफळ ॥ १० ॥
एया कारणें अनंतें । मनोगत तेयाचें पूसतें ।
होईल जाणौनि आइतें । ओगरूनि ठेविलें ॥ ११ ॥
जें अपत्य थानैानि निगे । तेयाची भूक ते मायेसी चि लागे ।
वांचूनि शब्दें काइ सांघे । मग स्तन्य दे एरि ॥ १२ ॥
ह्मणौनि कृपाळुवा गुरुचां ठांइं । हें नवल नोहे कांहीं ।
परि तें असो आइकां काई । बोलता जाला ॥ १३ ॥

**श्रीभगवानुवाच ॥**

> अक्षरं ब्रह्म परमं स्वभावोऽध्यात्ममुच्यते ।
> भूतभावोद्भवकरो विसर्गः कर्मसंज्ञितः ॥ ३ ॥

मग ह्मणितलें सर्वेश्वरें । जें आकारिं इये खोंकरे ।
कोंदलें असति न सिरे । कव्हणी काळीं ॥ १४ ॥
एऱ्हविं सपूरपण तेयाचें पावें । तरि शून्य चि नव्हे तें स्वभावें ।
वरि गगनाचेनि पालवें । गाळूनि घेतलें ॥ १५ ॥
जें ऐसें हीं परि विरुळें । इये विज्ञानाचिये खोळे ।
हालवलें हीं न गळे । तें परब्रह्म ॥ १६ ॥

आणि आकाराचेनि जालेपणें । जन्मकर्मातें नेणे ।
आकारलोपीं नीमणें । नाहीं काहीं ॥ १७ ॥
ऐसी आपुलिया चि सहजस्थिती । जेतया ब्रह्माची नित्यता असती ।
तेया नाव सुभद्रापती । अध्यात्म गा ॥ १८ ॥
मग गगनीं जेवि निर्मळे । नेणों कैंचीं येकें वेळें ।
उठीति घनपटळें । नानावर्णें ॥ १९ ॥
तैसिं अमूर्ती तियें विशुद्धे । महदादिभूतभेदें ।
ब्रह्माडाचे बांधे । हों चि लागति ॥ २० ॥
पैं निर्विकल्पाचिये बरडी । किं फूटे आदिसंकल्पाची विरुढि ।
आणि ते सर्व चि मोडौनि ये ढोंढी । ब्रह्मगोलकांचा ॥ २१ ॥
तेयां एकेकाचा भीतरु पाहिजे । तव बीजां चि भरला देखिजे ।
माझि होंतेयांजातेयां नेणिजे । लेख जीवां ॥ २२ ॥
मग तेयां गोलकांचे अंशांश । प्रसवति आदिसंकल्प असम साहास ।
हें असो ऐसी बहुवस । श्रृष्टि वाढे ॥ २३ ॥
परि दूजेन विण एकलां । परब्रह्मीं चि सांचलां ।
अनेकत्वाचा आला । पूरु जैसा ॥ २४ ॥
तैसें समविषमतें नेणों कैंचें । वायां चि चराचरपण एक रचे ।
पातां प्रसवतियां योनीचे । लक्ष ही दीसति ॥ २५ ॥
एरी जीवभावांचिये पालवियें । काहिं मर्यादा चि करुं नैये ।
पाहिजे कवण हें आघवें चि विये । तरि मूळ तें शून्य ॥ २६ ॥
ह्मणौनि कारिता मुदलु न दिसे । आणि शेपीं कारण हीं काहीं नसे ।
माझि कार्य चि आपैसें । वाढों लागे ॥ २७ ॥
ऐसा करितेन विण अगोचरु । अव्यक्तीं हा आकारु ।
निफजवी जो व्यापारु । तेया नाव कर्म ॥ २८ ॥

अधिभूतं क्षरो भावः पुरुषश्चाधिदैवतम् ।
अधियज्ञोऽहमेवात्र देहे देहभृतां वर ॥ ४ ॥

आतां अधिभूत जें ह्मणिपे । तें हीं सांघों संक्षेपें ।
तरि होय आणि हारपे । अभ्र जैसें ॥ २९ ॥
तैसें असतेपण आहाच । जेया नाहिं होइजे हें साच ।
जेयातें रूपा आणीति पांच पांच । मिळौनियां ॥ ३० ॥
भूतांतें अधिकरूनि असे । आणि भूतसंयोगें तरि दीसे ।
जें वियोगावेगळें भ्रंशे । नामरूपादिक ॥ ३१ ॥
तेयातें अधिभूत ह्मणिजे । मग अधिदैव पुरुष जाणिजे ।
जेणें प्रकृतिचें भोगिजे । उपार्जलें ॥ ३२ ॥
जो चेतनाचा चक्षु । इंद्रियदेशिचा अध्यक्षु ।
जो देहास्तमानी वृक्षु । संकल्पविहंगा ॥ ३३ ॥
जो परमात्मा चि परि दूसरा । जो अहंकारनिद्रा निदसुरा ।
ह्मणौनि स्वप्निचिया अखरा । संतोषें सीणे ॥ ३४ ॥
जीउ येणें नावें । जेयातें आलविजे स्वभावें ।
तें अधिदैव जाणावें । पंचायतनिचें ॥ ३५ ॥
आतां इये शरीरग्रामी । जो शरीरभावांतें उपशमी ।
तो अधियज्ञु गा मी । पांडुकुमरा ॥ ३६ ॥
एर अधिदैवाधिभूत । तें हीं मीं चि कीर समस्त ।
परि पन्हेरें कीडासि मिळत । काइ सकें नव्हे ॥ ३७ ॥
तऱ्हीं तें पन्हेरपण न मैळे । आणि कीडाचिया अंशा ही मिळे ।
परि असे जवं तेयाचेनि मेळें । तवं साकें चि ह्मणिजे ॥ ३८ ॥
तैसें अधिभूतादि आघवें । हें अविद्येचेनि पाळवें ।
झांकलें तवं मानवें । वेगळें ऐसें ॥ ३९ ॥
ते चि अविद्येची जवनीक फीटे ।
आणि भेदभावाची अवधि तूटे ।
मग ह्मणों जारि येक होउनि आटे ।
तरि दोनि काय होतिं ॥ ४० ॥

पैं केशाचां गुंडालां । वरि ठेविली स्फटिकाची शीला ।
ते वरि पाहिली डोलां । तवं भेदली गमेली ॥ ४१ ॥
पाठिं केश परौते नेले । आणि भेदलेपण काय नेणों जालें ।
तरि डांक देउनि सांधिलें । शिलेतें कांइ ॥ ४२ ॥
ना ते एकखंड चि आइती । परि संगें भिन्न गमली होंती ।
तो चि नेलेया माघौती । जैसी का तैसी ॥ ४३ ॥
तेवि चि अहंभाओ हा जाये । तरि ऐक्य तें आदिं चि आहे ।
हें चि साचें जेथ होये । तें अधियज्ञु मीं ॥ ४४ ॥
पैं गा आह्मी तुज । सकल यज्ञ कर्मज ।
सांघितलें कां जें काज । मनीं धरूनि ॥ ४५ ॥
तो हा क्रियाजाताचा विसांवां । नैष्कर्म्यसुखाचा ठेवा ।
परि उघड करूनि पांडवा । दाविजतसे ॥ ४६ ॥
पहिलें वैराग्यइंधनपरिपूर्ती । इंद्रियानलीं प्रदीप्तीं ।
विषयद्रव्याचिया आहुती । देउनियां ॥ ४७ ॥
मग वज्रासन ते उर्वी । शोधूनि आधारीं मुद्रा बरवी ।
वेदी रचे मांडवीं । शरीराचां ॥ ४८ ॥
तेथ संयमाग्नीचीं कुंडें । इंद्रियद्रव्याचेनि पवाडें ।
पूजिजति उदंडें । युक्तिघोषें ॥ ४९ ॥
मग मनप्राणु आणि संयमु । हा चि हवनसंपदेचा संभ्रमु ।
तेणें तोषविजे निर्द्धूमू । ज्ञानानळु ॥ ५० ॥
ऐसेनि सकल हें ज्ञानिं अर्पे । मग ज्ञान तें ज्ञेयीं हारपे ।
पाठिं ज्ञेयाचीं स्वरूपें । निखल उरे ॥ ५१ ॥
तिया नावं गा अधियज्ञु । ऐसें बोलिला जवं सर्वज्ञु ।
तवं अर्जुनु अतिप्राज्ञु । तेया पातलें तें ॥ ५२ ॥
हें जाणौनि ह्मणितलें देवें । परिहसतु आहासि बरवें ।
एया कृष्णाचेया संतोषासवें । एरु सुखाचा जाला ॥ ५३ ॥

देखां बोलाचिया धणी धाइजे । कां शिष्याचेनि जालेपणें होइजे ।
हें सद्गुरू चि एकलेनि जाणिजे । कां प्रसवतिया ॥ ५४ ॥
ह्मणौनि सात्विकां भावांची मांदी । कृष्णा आंगिची अर्जुना आदिं ।
न समातसे परि बुद्धी । संवरुनि देवें ॥ ५५ ॥
मग पीकलेया सुखाचा परिमळु । कां निवालेया अमृताचा कल्लोळु ।
तैसा कोवळा आणि रसाळु । बोलु बोलिला ॥ ५६ ॥

**अंतकाले च मामेव स्मरन्मुक्त्वा कलेवरम् ।**
**यः प्रयाति स मद्भावं याति नास्त्यत्र संशयः ॥ ५ ॥**

ह्मणितलें परिसणेयांचेया राया । आइकैं बा धनंजया ।
ऐसी जळों सरलेयां माया । जालितें हीं जळें ॥ ५७ ॥
जें आतां चि सांगितलें होतें । अगा अधियज्ञु ह्मणितलें जयातें ।
जे आदि चि तया मातें । जाणौनि अंतीं ॥ ५८ ॥
तें देह झोलु ऐसें मानूनि । ठेलें आपणपें होउनि ।
जैसा मठु गगना भरौनि । गगनीं चि आथि ॥ ५९ ॥
इये प्रतीतीचां माझि घरीं । तेयां निश्चयाची ओहिरी ।
आली ह्मणौनि बाहिरी । नव्हे चि से ॥ ६० ॥
ऐसें सबाह्य ऐक्यें सांचले । मीं चि होउनि असतां रचले ।
बाहिरि भूतांचीं पांचै ही खवलें । नेणति चि पडिलीं ॥ ६१ ॥
उभेयां उभेपण नाहिं जेयाचें । पडिलेयां गहन कवण तेयाचें ।
ह्मणौनि प्रतीतिचिये पोटिचें । पाणी ना हाले ॥ ६२ ॥
ते ऐक्याची आहे उतली । कां नित्यतेचां हृदयीं घातली ।
जैसी समरससमुद्रीं धूतली । तैसी मळै चि ना ॥ ६३ ॥
पैं अथर्वि घडा बुडाला । तो आंतु बाहिरि उदका भरला ।
पाठिं दैवगत्या जरि फूटला । तरि उदक काय फूटे ॥ ६४ ॥
नां तरि सर्पे कवच सांडिलें । कां उबातेनि वस्त्र फेडिलें ।
तरि सांग पां काय मोडलें । अवयवां माझि ॥ ६५ ॥

तैसा आकारु हा आहाचु भ्रंशे । वांचूनु वस्तु ते सांचली चि असे ।
ते चि बुद्धि जालेयां विसकुसे । कैसेनि आतां ॥ ६६ ॥
ह्मणौनि इया परीं मातें । अंतकाळीं जाणत सांते ।
जे मेकलीति देहातें । ते मी चि होंति ॥ ६७ ॥

**यं यं वापि स्मरन्भावं त्यजत्यंते कलेवरम् ।**
**तं तमेवैति कौंतेय सदा तद्भावभावितः ॥ ६ ॥**

यऱ्हवीं तऱ्हीं साधारण । ऊरीं आदळलेयां मरण ।
जो आठउ धरी अंतष्करण । तें चि होइजे ॥ ६८ ॥
जैसें कऱ्हणां येका काकुलती । पळतां पवनगती ।
दुपाउली अवचितीं । कुहां पडिली ॥ ६९ ॥
आतां तेया पडणेयां अरौतें । पडण चूकवावेया पुरतें ।
नाहिं ह्मणौनि तेथें । पडावें चि पडे ॥ ७० ॥
तेविं मृत्युचेनि अवसरें येकें । जें एउनिं जीवा सामोर ठाके ।
तें होणें मग न चुके । भलेतिया परीं ॥ ७१ ॥
आणि जागतां जवं असिजे । तवं जेणें ध्यानें भावना भीजे ।
डोळा लागत खेओ देखिजे । तें चि जेविं ॥ ७२ ॥
तारि जीतेन अवसरें । जें आवडौनि जीविं उरे ।
तें चि मरणाचियें मेरे । फार हों लागे ॥ ७३ ॥

**तस्मात्सर्वेषु कालेषु मामनुस्मर युध्य च ।**
**मय्यर्पितमनोबुद्धिर्मामेवैष्यस्यसंशयम् ॥ ७ ॥**

आणि मरणीं जेया जें आठवे । तो तिये चि गतितें तवं पावे ।
ह्मणौनि सदा स्मरावें । मातें तुवां ॥ ७४ ॥
डोळां जें पाहावें । कानीं हान आइकावें ।
मनीं जें भावांवें । बोलावें जें ॥ ७५ ॥
तें आंतु बाहिरि आघवें । मी चि करुनि घालावें ।
मग सर्वी कालीं स्वभावें । मी चि आहें ॥ ७६ ॥

आगा ऐसियां जरि जालेयां । तरि न मरिजे देह गेलेयां ।
ह्मणौनि उठिं वरौता आलेया । संग्रामु करीं ॥ ७७ ॥
तूं मन बुद्धि साचेंसीं । जरि माझां स्वरूपीं अर्पिसी ।
तरि मातें चि गा पावसी । हे भाख माझी ॥ ७८ ॥

**अभ्यासयोगयुक्तेन चेतसा नान्यगामिना ।**
**परमं पुरुषं दिव्यं याति पार्थानुचिंतयन् ॥ ८ ॥**

हें चि काइसें वरि होये । ऐसा संदेहो जरि वर्ततु आहे ।
तरि अभ्यासूनि आदीं पाहे । मग नव्हे तरि कोप ॥ ७९ ॥
येणें चि अभ्यासेंसिं योगु । चित्तासि करि पां चांगु ।
आगा उपायबळें पांगु । पाडि टाकी ॥ ८० ॥
तेविं साभ्यास निरंतर । चित्तासि परमपुरुषाची मोहोर ।
लावि मग शरीर । असो आंडें जाऊ ॥ ८१ ॥
जें नाना गती पावतें । तें चित्त वरील आत्मेयातें ।
मग कवण आठवी देहातें । तें गेलें कि आहे ॥ ८२ ॥
पैं सरिताचेनि वोघे । सिंधु जळाचे मीनले घोघे ।
ते काइ वर्त्तत आहे मागें । ह्मणौनि पाहों एंथि ॥ ८३ ॥
ना ते समुद्र चि होउनि ठेले । तेविं चित्ताचें चैतन्य जालें ।
जेथ यातायात निमाले । घनानंद जे ॥ ८४ ॥

**कविं पुराणमनुशासितारमणोरणीयांसमनुस्मरेद्यः ।**
**सर्वस्य धातारमचिंत्यरूपमादित्यवर्णं तमसः परस्तात् ॥९॥**

जें गगनाहूनि जूनें । जें परमाणूहूनि सानें ।
जेयाचेनि सन्निधानें । विश्व चळे ॥ ८५ ॥
जेयाचें आकारेंविण असणें । जेथ जन्म ना नीमणें ।
जें आघवें चि आघवेपणें । देखत असे ॥ ८६ ॥
जें सर्वातें येया विये । सर्व जेणें जिये ।
हेतु जेयासि भिये । आचिंत्य जें ॥ ८७ ॥

देखैं वोलिंबा इंगळ न चरे । तेजिं तिमिर जेविं न सिरे ।
जें दिहा चि आंधारें । चर्मचक्षूसी ॥ ८८ ॥
सुसडा सूर्यकणाचा राशि । जो नित्योदयो ज्ञानियांसि ।
अस्तमानाचें जेयासि । अडिनावं हीं नाहीं ॥ ८९ ॥
तेया आवेंगवाणेया ब्रह्मातें । प्रयाणकाळें प्रातें ।
जो थिरावलेनि चित्तें । जाणौनि स्मरे ॥ ९० ॥

**प्रयाणकाले मनसाचलेन भक्त्या युक्तो योगबलेन चैव ।**
**भ्रुवोर्मध्ये प्राणमावेश्य सम्यक्स तं परं पुरुषमुपैति दिव्यम् ॥१०॥**

बाहिरि पद्मासन रचूनि । उत्तराभिमुख बैसौनि ।
जीवीं सुख सूनि । कर्मयोगाचां ॥ ९१ ॥
आंतु मीनलेनि मनोधर्मे । सूर्यप्राप्तिचेनि प्रेमें ।
आपीं आपु संभ्रमे । मिळावेया ॥ ९२ ॥
आकळलेनि योगें । मध्यमा मध्यमार्गें ।
अग्निस्थानौनि निगे । ब्रह्मरंध्रा ॥ ९३ ॥
तेथ अचेतन चित्ताचा सांघातु । आहाचवाणा दीसे मांडतु ।
जेथ प्राणु गगना आंतु । सज्जु होंउनि ॥ ९४ ॥
तो जडाजडातें विरिचितु । भ्रूलतां माझि संचरतु ।
जैसा घंटानादु लयस्थु । घंटे चि होये ॥ ९५ ॥
झांकलिये घटिचा दीवा । नेणिजे काइ जाला केव्हां ।
यया रीती पांडवा । जो देह ठेवी ॥ ९६ ॥
तो केवळ परब्रह्म । जेया परमपुरुषु ऐसें नाम ।
तें माझें निजधाम । होउनि ठाके ॥ ९७ ॥

**यदक्षरं वेदविदो वदंति विशंति यद्यतयो वीतरागाः ।**
**यदिच्छंतो ब्रह्मचर्यं चरंति तत्ते पदं संग्रहेण प्रवक्ष्ये ॥११॥**

सकळा जाणणेयांसि लाणि । तिये जाणिवेची जे खाणि ।
तेयां ज्ञानियांची आणि । जेयातें अक्षर ह्मणिपे ॥ ९८ ॥

चंडवातें हीं न मोडे । तें गगन चि किं फुडें ।
वांचूनि होईल जरि मेहुडें । तरि उरैल कैचें ॥ ९९ ॥
तेवि जाणणेयां जें आकळलें । तें जाणवलेपण चि उमाणलें ।
मग नेणवे चि तेयातें ह्मणितलें । अक्षर सहाजें ॥ १०० ॥
ह्मणौनि वेदविद नर । जेयातें ह्मणति अक्षर ।
जें प्रकृतीसि पर । परमात्मस्वरूप ॥ १ ॥
आणि विषयांचें विष उलंडुनि । जे सर्वेंद्रियां प्रायश्चित्त देउनि ।
आहाति देहाचेया बैसौनि । झाडातळीं ॥ २ ॥
ते इया परीं विरक्त । जेयाची निरंतर वाट पाहांत ।
निष्कामासि अभिप्रेत । सर्वदा जें ॥ ३ ॥
जेयाचिया आवडी । नगणित ब्रह्मचर्याची सांकडीं ।
निष्ठुर होउनि बापुडीं । इंद्रियें करिति ॥ ४ ॥
ऐसें जें पद । दुर्लभ आणि अगाध ।
जेयाचिये थडिये चि वेद । बुचुकळले ॥ ५ ॥
तें ते पुरुष होंति । जे इया परीं लया जांति ।
तरि पार्था हे चि स्थिति । येकोल सांघों ॥ ६ ॥
तेथ अर्जुनें ह्मणितलें स्वामीं । हें चि ह्मणावेया होंतां पां मी ।
तवं साहाजें कृपा केली तुह्मीं । तरि बोलिजो कां जी ॥ ७ ॥
परि बोलावें तें अति सोहपें । येथ ह्मणितलें त्रिभुवनदीपें ।
तुज काइ तेणें संक्षेपें । सांघौनि आइक ॥ ८ ॥

**सर्वद्वाराणि संयम्य मनो हृदि निरुध्य च ।**
**मूर्ध्न्याधायात्मनः प्राणमास्थितो योगधारणाम् ॥ १२ ॥**

तरि मना येया बाहिरिली कडे ।
येयावेयाचि सवे चि सावियां मोडे ।
हें हृदयाचां डोहीं बुडे ।
तसें कीजे ॥ ९ ॥

पारिं हें तरी चि घडे । जरि संयमांचीं अखंडें ।
सर्व द्वारीं कवाडें । कळासति ॥ ११० ॥
तरि साहाजें मन कोंडलें । हृदयीं चि असैल उगुलें ।
जैसें करचरण मोडलें । परिवरु न संडी ॥ ११ ॥
तैसें चित्त राहलेयां पांडवा । प्राणाचा प्रणवु चि करावा ।
मग तो अनुवृत्तिपंथें आणावा । मूर्ध्निवेन्हीं ॥ १२ ॥
तेथ आकाशीं मीळे न मीळे । तैसा धरावा साधनबळें ।
जवं मैत्रियाचें मावळे । अर्धबिंब ॥ १३ ॥

**ओमित्येकाक्षरं ब्रह्म व्याहरन्मामनुस्मरन् ।**
**यः प्रयाति त्यजन्देहं स याति परमां गतिम् ॥ १३ ॥**

तवं वेरि तो समिरु । निराळीं कीजे स्थिरु ।
मग लग्नीं जेवि ॐकारु । बिंबिं विळसे ॥ १४ ॥
तैसें ॐ हें स्मरों सरे । आणि तेथ चि प्राणु पूरे ।
मग प्रणवातीत उरे । पूर्ण घन जें ॥ १५ ॥
ह्मणौनि प्रणवैकनाम । हें एकाक्षर ब्रह्म ।
जो माझें स्वरूप परम । स्मरतु सांता ॥ १६ ॥
इया परीं त्यजी देहातें । तो त्रिशुद्धी पावे मातें ।
जेया पावणेयां परौतें । आणिक नाहीं ॥ १७ ॥

**अनन्यचेताः सततं यो मां स्मरति नित्यशः ।**
**तस्याहं सुलभः पार्थ नित्ययुक्तस्य योगिनः ॥ १४ ॥**

येथ अर्जुना जरि विपायें । तूझां जीवीं ऐसें हान जाये ।
ना हें स्मरण मग होये । काइसेया वरि अंतीं ॥ १८ ॥
इंद्रियां अनुधाडु पडिलेयां । जीविताचें सुख बुडालेयां ।
आंतु बाहिरि उवडलेयां । मृत्युचिन्हें ॥ १९ ॥
तेन्हाळि वैसावें चि कवणें । मग कवण निरुंधी करणें ।
तेथ काहाचेनि अंतष्करणें । प्रणवु स्मरावा ॥ १२० ॥

तरि आगा येया ध्वनी । झनें थारा देंसि हो मनीं ।
पैं सेविला मीं चि निदानीं । सेवकु होयें ॥ २१ ॥
जे विषयांसि तिलांजुली देउनि । प्रवृत्ति वरि निगदु वाउनि ।
मातें हृदयीं सूनि । भोगिताति ॥ २२ ॥
पारि भोगितिया नाराणुका । भेटणें नाहीं क्षुधादिकां ।
तेथ चक्षुरादि रांकां— । चा कवणु पाडु ॥ २३ ॥
ऐसे निरंतर येकावटले । अंतष्करणें मज लिगटले ।
मी चि होउनि आटले । उपासिति ॥ २४ ॥
तेया देहावसान जैं पावे । तैं तिहिं मातें स्मरावें ।
मग मियां जारि पावावें । तरि उपास्ति ते काइसी ॥ २५ ॥
पैं रंक येक अडलेपणें । काकुलती धावां गा धावां झणे ।
तरि तेयाचि ग्लानीं धावणें । न घडे काइ ॥ २६ ॥
आणि भक्तां ही तैसी चि दशा । तरि भक्तिचा ही सोसु काइसा ।
ह्मणौनि हा ध्वनि ऐसा । वाखाणावा ॥ २७ ॥
तिहिं जेव्हलिं मीं स्मरावा । तेव्हलिं स्मरला किं गा पांडवा ।
तो आभारु जीवा । साहावे ना ॥ २८ ॥
तें रिणियेपण देखौनि आंगीं । मी आपुलेया उत्तीर्णत्वा लागि ।
भक्तांची तनुत्यागीं । परिचर्या करीं ॥ २९ ॥
येया देहवैकल्याचा वारा । झणें लागैळ येग्रा सकुमारां ।
ह्मणौनि आत्मभावांचां पांजरां । सुयें तेयांतें ॥ १३० ॥
वरि आपुलेया स्मरणाची उपाइली । हींव्र ऐसी करीं साउली ।
ऐसेन नित्य बुद्धि सांचली । मि त्यासि आणी ॥ ३१ ॥
ह्मणौनि देहांतिचें जें सांकडें । तें माझेयां एक ही न पडे ।
मीं आपुलेयांतें आपुलिये कडे । सुखें चि आणीं ॥ ३२ ॥

वरिचील देहाची गवसणी फेडूनि ।
आहाच अहंकाराचें रज झाडूनि ।
शुद्ध वासना चि निवडूनि ।
आपणपां मेळवीं ॥ ३३ ॥
आणि तेयांतें तन्हें देहीं । विशेष येकवंकैयेचा ठाओ नाहीं ।
ह्मणौनु अव्हेरुनु करितां काहीं । वियोगु ऐसें नावडे ॥ ३४ ॥
ना तरि देहांतीं चि मियां यावें । मग आपणपें तेयां नेयावें ।
हें इं नाहीं जे स्वभावें । ते आदीं चि मीनले ॥ ३५ ॥
येरि शरीराचां सलीलीं । असतेपण ते साउली ।
वांचूनि चंद्रिका ते ठेली । चंद्रीं चि आहे ॥ ३६ ॥
ऐसेनि जे नित्ययुक्त । तेयांसि सूलभू मी सतंत ।
ह्मणौनि विदेह निश्चित । मी चि होंति ॥ ३७ ॥

**मामुपेत्य पुनर्जन्म दुःखालयमशाश्वतं ॥**
**नाप्नुवंति महात्मानः संसिद्धिं परमां गताः ॥ १५ ॥**

मग क्लेशतरूची वाडी । तापत्रयाग्नि चि सेगडी ।
जें हें मृत्युकागासि कुरौंडी । सांडिली आहे ॥ ३८ ॥
जें दैन्याचें दूभतें । जें महाभयाचें वाढतें ।
जें सकल दुःखाचें पुरतें । भांडवल गा ॥ ३९ ॥
जें दुर्मतिचें मूल । जें कुकर्माचें फल ।
जें व्यामोहाचें केवल । स्वरूप चि ॥ ४० ॥
जें संसाराचें बैसणें । जें विकाराचें उदाणें ।
जें सकल रोगांसि भाणें । वाढलें आहे ॥ ४१ ॥
जें कालाचें खीचु उसिटा । जें आसेचा आंगवटा ।
जन्ममरणाचा ऒलिवटा । स्वभावें जें ॥ ४२ ॥
जें भूलिचें भरिवं । जें विकल्पाचें ऒतिवं ।
किंबहुना जें पेंवं । विंचुवांचें ॥ ४३ ॥

जें व्याघ्राचें छत्र । जें पण्यांगनेचें मैत्र ।
जें विषयविज्ञानयंत्र । सपूजित ॥ ४४ ॥
जें ळावेचा कळवळा । निवालेया विषोदकाचा गळाला ।
जे विश्वासु आंगवळा । सवंचोराचा ॥ ४५ ॥
जें कोढियाचें खेवं । जें काळसर्पाचें मार्दवं ।
गोरिचें स्वभाव । गायन जें ॥ ४६ ॥
जें वैरियांचा पाहुणरु । जें दुर्जनाचा आदरु ।
हें असो जें सागरु । अनर्थाचा ॥ ४७ ॥
जें स्वप्नें देखिलें स्वप्न । जें मृगजळें सांसिनलें वन ।
जें धूम्ररजाचें गगन । ओळलें आहे ॥ ४८ ॥
ऐसें जें हें शरीर । तें ते पुडुतीं न पवती चि नर ।
जे होउनि ठेले अपार । स्वरूप माझें ॥ ४९ ॥

**आब्रह्मभुवनाल्लोकाः पुनरावर्त्तिनोऽर्जुन ।**
**मामुपेत्य तु कौंतेय पुनर्जन्म न विद्यते ॥ १६ ॥**

यऱ्हविं ब्रह्मपणाचिये ही भडसे । न चुकती चि पुनरावृत्तिचे वळसे ।
परि निवटिलेयाचें जैसें । पोट न दूखे ॥ ५० ॥
ना तरि चेइलेया नंतरें । न बुडिजे स्वप्निचेनि मग पुरें ।
तेवि मातें पातले संसारें । सिंपती चि ना ॥ ५१ ॥

**सहस्रयुगपर्यंतमहर्यद्ब्रह्मणोविदुः ।**
**रात्रिं युगसहस्रांतां तेऽहोरात्रविदो जनाः १७ ॥**

यऱ्हावें जगदक्षराचें सिरें । जें चिरस्थाइयांचिये धूरे ।
ब्रह्मभुवन गा चवरें । लोकाचलाचें ॥ ५२ ॥
जिये गाविंचा पाहारु दियां वेऱ्हीं ।
येका अमरेंद्राचें आयुष्य न धरी ।
विळौनि पांति उठी येकसरी ।
चौदा जणाची ॥ ५३ ॥

जैं चौकडिया सहस्रु जाये । तै ठायें ठाउ वीलु होये ।
आणि तैसेनि सहस्रें भरियें पाहे । राति जेथ ॥ ५४ ॥
येवढें अहोरात्र जेथिचें । तें न लोटती चि जे भाग्याचे ।
देखति ते स्वर्गिचे । चिरंजीवी ॥ ५५ ॥
येरां सुरगणांची नवाई । विशेष सांघावी एथ काई ।
मुदलां इंद्राची चि दशा पाइं । जें देहाचे चौदा ॥ ५६ ॥

**अव्यक्ताद्व्यक्तयः सर्वाः प्रभवंत्यहरागमे ।**
**राज्यागमे प्रलीयंते तत्रैवाव्यक्तसंज्ञके ॥ १८ ॥**

पारि ब्रह्मयाचिया ही पाहारातें । आपुलां डोळा देखतें ।
आहाति गा तेयांतें । अहोरात्रविद ह्मणिपे ॥ ५७ ॥
तियें ब्रह्मभवनीं जेव्हलिं पाहे । तेव्हलिं गणना कांहिं न माये ।
ऐसें अव्यक्ताचें होये । व्यक्त विश्व ॥ ५८ ॥
पुडुतीं देहाची चौपाहारी फीटे । आणि हा आकारसमुद्र आटे ।
पाठिं तैसा चि मग पाहाटे । भरों लागे ॥ ५९ ॥

**भूतग्रामः स एवायं भूत्वा भूत्वा प्रलीयते ।**
**राज्यागमेऽवशः पार्थ प्रभवत्यहरागमे ॥ १९ ॥**

शारदियेचां प्रवेशीं । अभ्रें जिरति आकाशीं ।
मग ग्रीष्मांतीं जैसीं । निगति पुडुतीं ॥ १६० ॥
तैसी ब्रह्मदिनांचिये आदिं । इये भूतसृष्टिची मांदी ।
मिळे जवं सहस्रावधी । निमति युगें ॥ ६१ ॥
पाठिं रात्रिचा अवसरु होये । आणि विश्व हें अव्यक्तीं लया जाये ।
तो ही युगसहस्रु मोटका पाहे । आणि तैसें चि रचे ॥ ६२ ॥

**परस्तस्मात्तु भावोऽन्योऽव्यक्तो व्यक्तात्सनातनः ।**
**यः स सर्वेषु भूतेषु नश्यत्सु न विनश्यति ॥ २० ॥**

हें सांघावेया काये उपपत्ती । जें जगाचा प्रळयो संभूति ।
इयें ब्रह्मभुवनिचिया होंति । अहोरात्रां माझि ॥ ६३ ॥

कैसें पोरिंचें मान पाहे पां । तें सृष्टिबीजांचा होये किं सांटपा ।
परि पुनरावृत्तिचेया मापा । सीग जाले ॥ ६४ ॥
यऱ्हवीं त्रैलोक्य हें धनुर्द्धरा । तिये गावींचा गा पसारा ।
नव्हे दीनोदयीं एकसरा । मांडतसे ॥ ६५ ॥
पाठिं रात्रिचा समो पावे । आणि आपैसेया चि सांटवे ।
ह्मणिपे जेथिचें तेथ स्वभावें । साम्यासि ये ॥ ६६ ॥
जैसें वृक्षपण बीजासि आलें । कां मेघ हे गगनीं जाले ।
तैसें अनेकत्व जेथ सामावलें । तें साम्य ह्मणिपे ॥ ६७ ॥
तेथें समविषम न दिसे काहीं । ह्मणुनि भूतें हे भाष नाहिं ।
जेवि दूध चि जालेयां दहीं । नामरूप जाये ॥ ६८ ॥
तेवि आकारलोपा सरिसें । जगाचें जगपण भ्रंशे ।
परि जेथ जालें तें जैसें । तैसें चि उरे ॥ ६९ ॥
तें तेया नावें सहजें अव्यक्त । आणि आकारेले तें चि होये व्यक्त ।
हें येकातव एक सूचत । येऱ्हवि तरि नाहीं ॥ ७० ॥
जैसीं आटलेयां स्वरूपें । आटलेपणातें खोटि ह्मणिपे ।
पुडुतीं तो घनाकारु हारपे । जेन्हालें अलंकार होंति ॥ ७१ ॥
इयें दोन्हीं जैसीं होणीं । एकी साक्षिभूतें सुवर्णीं ।
तैसी व्यक्ताव्यक्ताची कडसणी । वस्तु चि ठाइं ॥ ७२ ॥
तें तरि व्यक्त ना अव्यक्त । निंत्य ना नाशवंत ।
येयां दोहीं भावां अतीत । अनादिसिद्ध ॥ ७३ ॥
जें हें विश्व चि होउनि असे । परि विश्वपणें नाशलेनि न नाशे ।
आखरें पूसिलेयां न पूसे । अर्थु जैसा ॥ ७४ ॥
पाहे पां तरंग तरि होंत जांते । परि तेथें उदक तें अखंड असतें ।
तेवि भूतमात्रीं नाशवंत । अविनाश जें ॥ ७५ ॥
ना तरि आटतिये अलंकारीं । नाटतें कनक आहे जिया परीं ।
तेवि मरतिये जीवाकारीं । अमर जें आहे ॥ ७६ ॥

अव्यक्तोऽक्षर इत्युक्तस्तमाहुः परमां गतिम् ।
यं प्राप्य न निवर्तंते तद्धाम परंम मम ॥ २१ ॥

जेयातें अव्यक्त ह्मणों ये कोडें । ह्मणतां स्तुति हें ऐसे नावडे ।
जे मना बुद्धी न संपडे । ह्मणौनियां ॥ ७७ ॥
आणि आकारा आलेयां जेयाचें । निराकारपण न वचे ।
आकारलोपीं न विसंचे । नित्यता गा ॥ ७८ ॥
ह्मणौनि अक्षर जें ह्मणिजे । तेविं चि ह्मणतां बोधु ही उपजे ।
तेया परौता पैसु न देखिजे । येया लागि परमगति जें ॥७९॥

पुरुषः स परः पार्थ भक्त्या लभ्यस्त्वनन्यया ।
यस्यांतःस्थानि भूतानि येन सर्वमिदं ततम् ॥ २२ ॥

पैं आघवां इहीं देहपूरीं । आहे निदैलेयाचिया परीं ।
जे व्यापारु करवी ना करी । ह्मणौनियां ॥ ८० ॥
यऱ्हवि शरीरीं चेष्ठां । माशि येकि ही न ठके गा सूभटा ।
दाहीं इंद्रियांचिया वाटा । वाहाति चि आथि ॥ ८१ ॥
उकलु विषयांचिया पेंठा । होंत मनाचां चौहटां ।
तो सुखदुःखाचा राजवंटा । भितरा ही पावे ॥ ८२ ॥
परि तें राऊ पौढलेयां सुखें । जैसा देशिचा व्यापारु न ठके ।
प्रजा आपुलेनि अभिलाखें । करित चि असे ॥ ८३ ॥
तैसें बुद्धिचें ह्मन जाणणें । कां मनाचें घेणें देणें ।
इंद्रियांचें करणें । स्फुरण वायुचें ॥ ८४ ॥
हे देहक्रिया आघवी । न करवितां होये बरवी ।
जैसा नचलतेनि रवी । लोकु चले ॥ ८५ ॥
अर्जुना तया परीं । सूतला आहे शरीरीं ।
ह्मणौनि पुरुषु गा अवधारीं । ह्मणिपे जेयातें ॥ ८६ ॥
आणि प्रकृती पतिव्रते । पडिला येकपत्निव्रतें ।
येणें हीं कारणें जेयातें । पुरुषु ह्मणों ये ॥ ८७ ॥

पैं येया वेदांचे बौहसपण । देखे चि ना जेयाचें आंगण ।
हें गगनाचें पांगुरण । होये देखों ॥ ८८ ॥
ऐसें जाणौनि योगीश्वर । जयातें ह्मणति परात्पर ।
जें अनन्य गतिचें घर । गिवसित ये ॥ ८९ ॥
जें तनुवाचाचित्तें । नाइकति दूजेयाचिये गोठितें ।
तेयां येकनिष्ठांचें पीक तें । सुक्षेत्र जें ॥ १९० ॥
हें त्रैलोक्य चि पुरुषोत्तमु । ऐसा साचु जेयांचा मनोधर्मु ।
तेयां आस्तिकां जें आश्रमु । पांडवा गा ॥ ९१ ॥
जें निगर्वाचें गोरव । निर्गुणाची जाणिव ।
सुखाची रांणिव । निराशांसि ॥ ९२ ॥
जें संतोषियां वाढलें ताट । जें अचिंतें अनाथांचें पोट ।
भक्ति उजू वाट । जेया गावां ॥ ९३ ॥
हें येकैक सांघौनि वायां । काइ फार करुं धनंजया ।
पैं गेलेयां जेया ठाया । ठाउ चि होइजे ॥ ९४ ॥
हिंवांचिया झुळुका । जैसें हिंवं चि पडे उष्णोदका ।
कां समोर जालेयां अर्का । तम प्रकाशु होये ॥ ९५ ॥
तैसा संसारु जेया गावां । गेला सांता पांडवा ।
होउनि ठाके आघवा । मोक्षाचा चि ॥ ९६ ॥
मग अग्नी माझि आलें । जैसें इंधन चि अग्नि जालें ।
पाठिं न निवडे चि काहीं केलें काष्ठापण ॥ ९७ ॥
ना तरि साखरेचा मावौता । बुद्धिमंतपणें हीं करितां ।
पारि ऊंसु नव्हे व्हि पांडुसुता । जिया परीं ॥ ९८ ॥
लोहाचें कनक जालें । हें येकें चि परिसें केलें ।
आतां आणिकु कैंचा जो गेलें । लोहत्व आणी ॥ ९९ ॥
ह्मणौनि तूप होउनि मावौतें । जेवि दूधपणां नैये चि निरुतें ।
तेवि पावौनियां जेयातें । पुनरावृत्ति नाहीं ॥ २०० ॥

तें गा माझें परम । साचोकारें निजधाम ।
हें आंतुवट तुज वर्म । दाविजत असे ॥ १ ॥

**यत्र काले त्वनावृत्तिमावृत्तिं चैव योगिनः ।**
**प्रयाता यांति तं कालं वक्ष्यामि भरतर्षभ ॥ २३ ॥**

तेविं चि आणिकें प्रकारें । हें जाणतां आहे सोपारें ।
तरि देह सांडितेनि अवसरें । जेथ मिळति योगी ॥ २ ॥
अथवा अवचटें ऐसें ही घडे । अनवसरें देह सांडे ।
तैं माघौतें येणें पडे । देहासि चि ॥ ३ ॥
ह्मणौनि कालशुद्धी जरि ठेविति । तरि ठेविता खेऊ ब्रह्म चि होति ।
यऱ्हविं अकाळें तरि येति । संसारा पुढुतीं ॥ ४ ॥
ऐसें सायुज्य आणि पुनरावृत्ति । इयें दोन्हीं अवसरा अधीनें आहाति ।
तो चि अवसरु तुज प्रति । प्रसंगें सांघों ॥ ५ ॥

**अग्निर्ज्योतिरहः शुक्लः षण्मासा उत्तरायणम् ।**
**तत्र प्रयाता गच्छंति ब्रह्म ब्रह्मविदो जनाः ॥ २४ ॥**

तरि आइकें गा सुभटा । पातलेयां मरणाचा साठा ।
पांच ही आपुलालिया वाटा । निगति आंर्सी ॥ ६ ॥
ऐसां वरिपडिलां प्रयाणकाळीं । बुद्धितें कां भ्रमुनि गीळी ।
स्मृति नोहे आंधळी । न मरे मन ॥ ७ ॥
हा चेतनावर्गू चि आघवा । मरणीं असे टवटवा ।
परि अनुभवलेया ब्रह्मभावा । गवसणी होउनि ॥ ८ ॥
ऐसा सावधु हा समवाऊ । आणि निर्वाणवेऱ्हीं निर्वाहो ।
हें तरी चि घडे जरि सावाऊ । अग्निचा आथि ॥ ९ ॥
पाहे पां वारेनि कां उदकें । जैं दीवियाचें दीवेपण झांके ।
तैं असती चि काइ देखे । दीठि आपुली ॥ २१० ॥
तैसें देहांतिचेनि विषमवातें । देह आंतुबाहिरि श्लेष्मु आते ।
तेणें विझौनि जाये उदितें । अग्निचें जेव्हां ॥ ११ ॥

तेन्हलि प्राणासि प्राणु नाहीं । तेथ बुद्धि असौनि करील काइ ।
ह्मणौनि अग्नि विण देहीं । चेतना न थरे ॥ १२ ॥
आगा देहिचा अग्नि जरि गेला । तरि तें देह नोहे तो चि खलु वोला।
वायां आयुष्य वेलु आपुला । आंधारां गिवसी ॥ १३ ॥
आणि मागील स्मरण आघवें ।
तें तेणें अवसरें सरिसें सांभालावें ।
मग देह तेजूनि मिलावें ।
स्वरूपीं किं ॥ १४ ॥
तवं तेया श्लेष्माचां चिखलीं । चेतना चि बुडौनि गेली ।
येथ मागिल पुढैलि ठेली । आठवण सहाजें ॥ १५ ॥
ह्मणौनि आदिं चि जो अभ्यासु केला ।
तो मरण नैयंतां निमौनि गेला ।
जैसें ठेवणें नेदखतां माल्हवला ।
दीपु हातिचा ॥ १६ ॥
आतां असो हें सकल । जाण पां ज्ञानासि अग्नि मूल ।
तेया अग्निचें प्रयाणीं वल । संपूर्ण आथि ॥ १७ ॥
आंतु अग्निर्ज्योतिचा प्रकाशु । बाहिरि शुक्लपक्षु परि दिवसु ।
आणि सां मासां माझि मासु । उत्तरायणां ॥ १८ ॥
ऐसेया समा योगाची निरुती । लाहुनि जे देह ठेवितिति ।
ते ब्रह्मविद होंति । परब्रह्म ॥ १९ ॥
अवधारिं गा धनुर्द्धरा । येथ थोर सामर्थ्य येया अवसरा ।
तेथिं चि हा उजू मार्गु स्वपुरा । येयावेया ॥ २२० ॥
येथ अग्नि हें पहिलें पैयारें । ज्योतिर्मय हें दुसरें ।
दिवसा जाणें तिसरें । चौथा शुक्लपक्षु ॥ २१ ॥
आणि सामास उत्तरायण । तें वरिचिल गा सोपान ।
येणें सायुज्यसिद्धिसदन । पावति योगी ॥ २२ ॥

हा उत्तमु कालु जाणिजे । येयातें चि अर्चिरमार्गु ह्मणिजे ।
आतां अकालु तो ही साहाजें । सांघौनि आइकें ॥ २३ ॥

**धूमो रात्रिस्तथा कृष्णः षण्मासा दक्षिणायनम् ।**
**तत्र चांद्रमसं ज्योतिर्योगी प्राप्य निवर्तते ॥ २५ ॥**

तरि प्रयाणाचेनि अवसरें । वात श्लेष्मु सुभरें ।
तेणें अंतष्करणें आंधारें । कोंदौनि ठाके ॥ २४ ॥
सर्वेंद्रियां लांकुड पडे । स्मृति भ्रमा माझि बुडे ।
मन होये वेडें । कोंडे प्राणु ॥ २५ ॥
अग्निचें अग्निपण जाये । मग तो धूमिचा आवघा होये ।
तेणें चेतना गवली ठाये । शरीरिंची ॥ २६ ॥
जैसें चंद्रा आड आभाळ । सदट दाटे सजल ।
मग गडद नां उजल । ऐसें झावळें होये ॥ २७ ॥
कां मरे ना सावध । ऐसें जीविता पडे स्तब्ध ।
आयुष्यमरणाची मर्याद— । मेळें टाकी ॥ २८ ॥
ऐसी मनीं बुद्धि करणीं । सुभति धूमाकुळाचीं कोंडणीं ।
जेथ जन्में जोडिलिये वाहाणीं । युग चि बुडे ॥ २९ ॥
हां गा हातिचें जेव्हलिं जाये ।
तेव्हलि आणिका लाभाची गोठि कें आहे ।
ह्मणौनि प्रयाणीं तवं होये ।
येतुली दशा ॥ २३० ॥
आणि देहांतु ऐसी स्थिति । बाहिरि कृष्णपक्षु वरि राति ।
आणि सा मास ते ही वोडवति । दक्षिणायन ॥ ३१ ॥
इयें पुनरावृत्तिचीं घराणीं । आघवीं येकावटति जेयाचां प्रयाणीं ।
तो स्वरूपसिद्धिची काहाणी । कैसेनि आइके ॥ ३२ ॥
ऐसां जेयाचें देह पडे । योगी ह्मणौनि चंद्रु वेन्हीं जाणें घडे ।
मग तेथौनु मावौता वहुडे । संसारा ये ॥ ३३ ॥

आह्मिं अकाळु जो पांडवा । ह्मणितला तो हा जाणावा ।
आणि हा चि धूम्रमार्गु गावां । पुनरावृत्तिचेया ॥ ३४ ॥
येरु अर्चिरामार्गु । तो वसता आणि आसलगु ।
सावियां स्वस्थु चांगु । निवृत्ति वेन्हीं ॥ ३५ ॥

**शुक्लकृष्णे गती ह्येते जगतः शाश्वते मते ।**
**एकया यात्यनावृत्तिमन्ययावर्तते पुनः ॥ २६ ॥**

ऐसिया अनादि इया दोन्हीं वाटा । येकि उजू येकि अव्हांटा ।
ह्मणौनि बुद्धिपूर्वक सूभटा । दाविलिया तुज ॥ ३६ ॥
कां जे मार्ग अमार्ग देखावे । साच लटकें ओळखावें ।
हिताहित जाणावें । हिता चि लागि ॥ ३७ ॥
पाहे पां नाव देखतां बरवी । कोण्हें आड घाली काइ अथावीं ।
कां सुपंथु जाणौनि अडवीं । रिगत असे ॥ ३८ ॥
जो विष अमृतें ओळखे । तो अमृत काइ सांडूं शके ।
तेवि उजू वाट देखे । तो अव्हाटेनि न वचे ॥ ३९ ॥
ह्मणौनि गा फुडे । पारिखावें खरें कुडें ।
पारिखिलें तरि न पडे । अखरें कहीं ॥ २४० ॥
येन्हविं देहांतीं थोर विषम । येयां मार्गाचें आहे संभ्रम ।
जन्में अभ्यसिलेयाचें हें काम । जाईल वायां ॥ ४१ ॥
जरि अर्चिरामार्गु चूकलेयां । अवचटें धूम्रपथिं च पडिलेयां ।
तरि संसारपांती जूंतलेयां । भवंतां चि असावें ॥ ४२ ॥
हे सायास देखां मोटे । आतां कैसेनि पां येकोळ फीटे ।
ह्मणौनि योगीं मार्ग गोमटे । शोधिले दोन्हीं ॥ ४३ ॥
तवं एकें ब्रह्मत्वा जाइजे । आणि एकें पुनरावृत्ती येइजे ।
परि दैवगत्या जो लाहिजे । देहांतीं जेणें ॥ ४४ ॥

**नैते सृती पार्थ जानन्योगी मुह्यति कश्चन ।**
**तस्मात्सर्वेषु कालेषु योगयुक्तो भवार्जुन ॥ २७ ॥**

तेव्हळिं ह्मणितलें हें नव्हे । वायां अव्हचटें काइ पावे ।
देह जाउनु वस्तु होआवें । मार्गे किं ॥ ४५ ॥
तरि आतां देह असो अथवा जाओ । आह्मीं तंव वस्तू चि केवळ आहों।
कां दोरी सर्पत्व वाओ । दोराचिया कडौनि ॥ ४६ ॥
मज तरंगपण असे कां नसे । ऐसें उदकासि काहीं प्रतिभासे ।
तें भले तेव्हां जैसें तैसें । उदक चि किं ॥ ४७ ॥
तरंगाकारें न जन्मे चि । ना तरंगलोपे नाशे चि ।
तेवि विदेह जे देहें चि । वस्तु जाले ॥ ४८ ॥
आतां शरीराचें जेयाचां ठांइं । अडिनावें हीं उरलें नाहीं ।
तरि कोणें काळें काइ । निमे तें पाहे पां ॥ ४९ ॥
मग मार्ग ते कांइसेया शोधावे । कवणें कोठूनि कें जावें ।
जरि देशकाळादि आघवें । आपणपां चि असिजे ॥ २५० ॥
आणिक हां गा घटु जेव्हळिं फूटे ।
तेव्हां तेथिचें आकाश लागे काइ येकी वाटे ।
मग वाटा लागे तरि गगना भेटे ।
येऱ्हविं चूके ॥ ५१ ॥
पाहे पां ऐसें हान आहे । किं तो आकारु चि ह्मणौं जाये ।
येर गगन तें गगनीं चि आहे । घटत्वा ही आदीं ॥ ५२ ॥
ऐसेया बोधाचेनि सुरवाडें । मार्गामार्गीचें सांकडें ।
तेयां सोहंसिद्धां न पडे । येगियांसि ॥ ५३ ॥
येया कारणें पांडुसुता । तुवां होआवें गा योगयुक्ता ।
येतुलेनि सर्वकाळीं साम्यता । आपणपां येईल ॥ ५४ ॥
मग भलें तेथ भलें तेथवां। देहबंधु असो अथवा जावा ।
परि अबंधा नित्यभावा । विवडु नाहीं ॥ ५५ ॥
तो कल्पादि जन्मां नांगवे । आणि कल्पांतीं मरणा नाप्तवे ।
माझि स्वर्गसंसाराचेनि लाघवें । झांकवेना ॥ ५६ ॥

येणें बोधें जो योगिया होये। तेयासि यया बोधाचें नीटपण आहे।
कां जें भागातें पेलुनि पाएं। निजरूपा ये ॥ ५७ ॥
पैं गा इंद्रादिकां देवां। जियां सर्वस्वें गाजति राणिवा।
तें सांडणें मानुनि पांडवा। डावली जो ॥ ५८ ॥

**वेदेषु यज्ञेषु तपस्सु चैव दानेषु यत्पुण्यफलं प्रदिष्टम्।**
**अत्येति तत्सर्वमिदं विदित्वा योगी परं स्थानमुपैति चाद्यम् ॥२८॥**

जन्हीं वेदाध्ययनाचें जालें। अथवा यज्ञाचें सेत चि पीकलें।
कां तपोदानाचें जोडलें। सर्वस्व हान जें ॥ ५९ ॥
तेयां आववेयां चि पुण्यांचा मेला।
भार आतौनि जेया ये फला।
जें परब्रह्म निर्मला।
साठिं सरे ॥ २६० ॥
जें वीटे ना सरे। भोगितेयाचेनि पवाडें पूरे।
पुडुतीं महासुखाचें सोइरें। भाऊंड चि पां ॥ २६१ ॥
जें नित्यानंदाचेनि मानें। उपमेचा काटाला न दिसे सानें।
पाहे पां वेदयज्ञादिसाधनें जेया सुखा ॥ ६२ ॥
ऐसें दृष्ट चि सुखपणें। जेयासि अदृष्टाचे बैसणें।
जें शतमखीं हीं आंवगणें। नव्हे चि येकां ॥ ६३ ॥
तेयातें योगीश्वर अलौकिकें। दीठिचेनि हाततुकें।
अनुमानिति कवतिकें। तवं हलुवट आवडे ॥ ६४ ॥
मग तेया चि सुखाची किरीटी। करूनियां गा पाउटी।
परब्रह्माचिये पाटीं आरूढति ॥ ६५ ॥
ऐसें चराचरैक्यभाग्य। जें ब्रह्मेशां आराधनायोग्य।
जें योगियांचें भोग्य। भोगधन जो ॥ ६६ ॥
जो सकलकलांची कला। जो परमानंदाचा पूतला।
जो जीवांचा जीवाला। विश्वाचेया ॥ ६७

जो सर्वज्ञतेचा ओलावा । जो यादवकुळिचा कुळैवा ।
तो कृष्णु जी पांडवा । प्रतिबोलिला ॥ ६८ ॥
ऐसा कुरुक्षेत्रिचा वृत्तांतु । संजयो रायासि असे सांघतु ।
ते परियसां पुढां मातु । ह्मणे ज्ञानदेॐ निवृत्तिचा ॥ २६९ ॥

ॐतत्सदिति श्रीमद्भगवद्गीतासूपनिषत्सु ब्रह्मविद्यायां
योगशास्त्रे श्रीकृष्णार्जुनसंवादे परब्रह्मयोगो नाम
अष्टमोऽध्यायः ॥

॥ श्रीसर्वात्मकहरिगुरुशिवार्पणमस्तु ॥

# ज्ञानेश्वरी

## अध्याय नववा

श्रीगणेशायनमः ॥

तरि अवधान एकलें देइजे । मग सर्वसुखांसि पात्र घेइजे ।
हें प्रतिज्ञोत्तर माझें । उघड आइकां ॥ १ ॥
परि प्रौढि न बोलें हो जी । तुह्मां सर्वज्ञाचां समाजीं ।
देयां अवधान ह्मणे हे माझी । विनवणी सलगी ॥ २ ॥
कां जे ललेयाचे लळे सरति । मनोरथाचे मनोरे पुरति ।
जरि माहेरें श्रीमंतें होंति । तुह्मा ऐसीं ॥ ३ ॥
तुमचेया दीठिवेयाचिये खोले । सांसिनले प्रसन्नतेचें मळे ।
ते साउली देखौनि लोले । श्रांतु जी मी ॥ ४ ॥
तुह्मीं सुखामृताचे डोहो । ह्मणौनि आपुलिया सवें वोल्हावों लाहों ।
आणि एथ ही सलगि करूं जरि बीहों । तरि निवों केंपां ॥ ५ ॥
आणि वालक बोबडां बोलीं । कां वांकुडां विचुकीं पाउलीं ।
चोज करूनि माउली । रिझवी । जेवि ॥ ३ ॥
तेवि तुह्मां संतांचा पढियो । कैसेनि तऱ्हीं आह्मावरि हो ।
इया बहुवा अलुकी जी आहों । सलगि करित ॥ ७ ॥
घांचूनि माझिये बोलतिये योग्यते । सर्वज्ञ भवादृश श्रोते ।
काइ धडेयावरि सारस्वतें । पढों सिकिजे ॥ ८ ॥

अवधारां आवडे तेसणा धुंधुरु । परि महातेजीं न मिरवे काइ करुं ।
अमृताचां ताटीं वोगरुं । ऐसि रसोयें कैंचीं ॥ ९ ॥
हां हो हिमकरा वीजणे । किं नादापुढां आइकवणें ।
लेणेयांसि हें लेणें । केहीं आहे ॥ १० ॥
सांघां परिमळें काइ तुरंबावें । सागरें कवणी ठांइं नाहावें ।
हें गगन चि अडे आववें । ऐसा पवाडु कैंचा ॥ ११ ॥
तैसें तुमचें अवधान धाए । आणि ह्मणो हें देखों होये ।
ऐसें वक्तृत्व कवणातें आहे । विचारिजो ॥ १२ ॥
तऱ्हीं विश्व प्रकाटितेया गभस्ती । हाथिवेनि किजे काइ आरति ।
कीं चूळोदकें अपांपती । अर्घ्यु न दीजे ॥ १३ ॥
प्रभू तुह्मी महेशाचिया मूर्ती । आणि मीं दुबळा अर्चितसें भक्ति ।
ह्मणौनि बोलु जऱ्हीं गंगावती । तऱ्हीं स्वीकराल ॥ १४ ॥
बाळ बापाचां ताटीं रिगे ।
रिघौनि बापातें चि जेवउं लागे ।
किं तो संतोषाचेनि वेगें ।
मुख ओडवी ॥ १५ ॥
तैसा मीं जऱ्हीं तुह्माप्रति । चावटे करितसें बाळमती ।
तऱ्हीं तुह्मीं संतोषिजे ऐसी चि जाति । स्नेहाचि एया ॥ १६ ॥
आणि तेणें आपुलेपणाचेनि मोहें ।
तुह्मीं संत घेतले आहा बांहें ।
ह्मणौनि केलिये सलगिचा नोहे ।
भारु तुह्मां ॥ १७ ॥
आहो तान्हेयांची लागे झटे ।
तरि तेणें अधिकें चि पान्हा फूटे ।
रोसें प्रेम दूणावटे ।
पाढियंतेयाचेनि ॥ १८ ॥

ह्मणौनि मज लेंकुरुवाचेनि बोलें । तुमचें कृपाळुपण निदैलें ।
चेइलें हें जी जाणावलें । एया लागि बोलिलां ॥ १९ ॥
यऱ्हविं चांदिणें पिकविजत आहे काइ चेंपणीं ।
किं वारेया घापत आहाति वाणीं ।
हां हो गगना गवसणी ।
गुंफिजतसे ॥ २० ॥
आइकां पाणीं बोथिजवावें न लगे ।
नवनीतीं माथुला न लगे ।
लाजिलों वाखाणुं न निगे ।
देखौनि जेयातें ॥ २१ ॥
हें असो शब्दब्रह्म जिये बाजे । शब्दु मावललेयां निवांत निदिजे ।
तो गीतार्थु मऱ्हाटिया बोलिजे । हा पाडु काइ ॥ २२ ॥
परि ऐसा ही मज धिंवसा । तो पुडुतीं एया चि एकी आशा ।
जें धीटीवं करूनि भवादृशां । पढियंतेयां होआवें ॥ २३ ॥
तरि आतां चंद्रापासौनि निववितें । जें अमृता ही हूनि जिवविते ।
तेणें अवधानें कीजो वाढतें । मनोरथां माझेया ॥ २४
कां जें दीठिवा तुमचा वर्षे । तैं सकलार्थसिद्धी मति पीके ।
एऱ्हविं कोंभैला उन्मेखु सुके । जरि उदास तुह्मीं ॥ २५ ॥
साहाजें तऱ्हीं अवधारा । वक्तृत्वा अवधानाचा होये चारा ।
तैं दोंदें पेलति अक्षरां । प्रमेयाचिं ॥ २६ ॥
अर्थु बोलाची वाट न पाहे । तेथ अभप्राऊ चि अभिप्रायातें विये ।
भावांचा फुलौरा होंतु जाये । मती वरि ॥ २७ ॥
ह्मणौनि संवादाचा सुवाऊ ढले । तरि हृदयाकाश सारस्वतें ऊले ।
श्रोता दुचिता तरि वितुले । मांडला रसु ॥ २८ ॥
आहो चंद्रकांतु द्रवता किरु होये । परि ते हातवटी चंद्रिं कीं आहे ।
ह्मणौनि वक्ता चि वक्ता न्हवे । श्रोतेनि विण ॥ २९ ॥

परि आतां आमुतें गोडां करावें ।
ऐसें तांदुळिं काइसेयां विनवावें ।
साईखेडेनि कां प्रार्थावें ।
सूत्रधारातें ॥ ३० ॥

तो काइ बाउलेयांचां काजा नाचवी ।
किं आपुलिये जाणिवेची कळा वाढवी ।
ह्मणौनि आह्मां येया ठेवाठेवी ।
काइ काज ॥ ३१ ॥

तवं गुरु ह्मणति काइ जालें । हें समस्त ही आह्मां पातलें ।
परि आतां सांघैं जें बोलिलें । नारायणें ॥ ३२ ॥

**श्रीभगवानुवाच ॥**

**इदं तु ते गुह्यतमं प्रवक्ष्याम्यनसूयवे ।**
**ज्ञानं विज्ञानसहितं यज्ज्ञात्वा मोक्ष्यसेऽशुभात् ॥ १ ॥**

एथ संतोखेंसीं निवृत्तिदासें । जी ह्मणौनि उल्हासें
अवधारां कृष्णु ऐसें । बोलते जाले ॥ ३३ ॥

अर्जुना हें चि बीज । पुडुतीं सांघिजैल तूज ।
जें अंतष्करणिचें गुज । जिवाचिये ॥ ३४ ॥

एणें मानें जिवाचें हियें फोडावें ।
मग गुज कां पां मज सांघावें ।
ऐसें काहीं स्वभावें ।
कल्पिसि जरि ॥ ३५ ॥

तरि परियसैं प्राज्ञा । तूं आस्थेची संज्ञा ।
बोलिलिये गोठी अवज्ञा । नेणसि करुं ॥ ३६ ॥

ह्मणौनि गूढपण आपुलें मोडो । वरि बोलणें हीं बोलावें घडो ।
परि आमचिये जीविचें पडो । तूझां जीवीं ॥ ३७ ॥

आगा थानीं कीर दूध गूढ ।
परि थानासी चि न्हवे किं गोड ।
ह्मणौनि सरो कां सेवितेयाची चाड ।
जरि अनन्यु मिळे ॥ ३८ ॥
मूडांहूनि बिं काढिलें । मग निरोलिलिये भुइं पाखिरिलें ।
तरि तें सांडीविखुरी गेलें । ह्मणों ये काइ ॥ ३९ ॥
एया लागि सुमनु आणि शुद्धमति ।
जो अनिंदकु आणि अनन्यगति ।
पैं गोप्य परि तेया प्रति ।
चावळिजे ॥ ४० ॥
तरि प्रस्तुत आतां गुणीं इहीं । तुज वांचूनि आनु नाहीं ।
ह्मणौनि गुज तऱ्हीं तुझां ठांइं । लपौं नैए ॥ ४१ ॥
आतां केती नावां नावां गूज ।
ह्मणतां कानडें ह्मन आवडैळ तुज ।
तरि सांघौनि ज्ञान सहज ।
विज्ञानेंसीं ॥ ४२ ॥
परि तें चि ऐसेनि निवाडें । जैसें भांसळलें खरें कुडें ।
मग काढिजति फाडे । वरि पारिखौनियां ॥ ४३ ॥
कां चांचोडाचेनि सांडसें । खांडिजे पयपाणी राजहंसें ।
तुज ज्ञानविज्ञान तैसें । वांटूनि देऊं ॥ ४४ ॥
मग वारेयाचां धारसां । पडिला कोंडा नुरे चि जैसा ।
आणि अवकणाचा आपैसा । राशि जोडे ॥ ४५ ॥
तैसी जे विवंचना जाणितलेया चि साठिं ।
संसारू चि संसाराचिया गांठी ।
लाउनि बैसवी पाटिं ।
मोक्षश्रियेचां ॥ ४६ ॥

जेयां जाणणेया विद्यांचां गावीं । गुरुत्वाची आचार्यपदवी ।
जें सकळ गुह्यां गोसांविं । पवित्रां राउळ ॥ ४७ ॥
आणि धर्माचें निजधाम । तेविं चि उत्तमाचें उत्तम ।
जेया येतां नाहीं काम । जन्मांतराचें ॥ ४८ ॥
मोटकें गुरुमुखिं उदैजत दीसे ।
आणि हृदयीं स्वयंभ चि असे जैसें ।
प्रत्यक्ष फावों लागे तैसें ।
आपैसेया ॥ ४९ ॥
तेविं चि पैं गा सुखाचां पाउटीं । चडतां येइजे एया भेटी ।
मग भेटलेयां कीर मीठी । भोगणेयां हीं पडे ॥ ५० ॥
परि भोगाचिये अइली कडे मेरे ।
चित्त उभें ठेलें चि सुखा भरे ।
ऐसें सुलभ आणि सोपारें ।
वरि परब्रह्म ॥ ५१ ॥

**राजविद्या राजगुह्यं पवित्रमिदमुत्तमम् ।**
**प्रत्यक्षावगमं धर्म्यं सुसुखं कर्तुमव्ययम् ॥ २ ॥**

तेविं चि पैं गा आणिक ही एक येयाचें ।
जें हातां आलें तरि न वचे ।
आणि अनुभवितां कहीं न वेचे ।
वरि वीटे ही नां ॥ ५२ ॥
एथ जरि तार्किका । ऐसी हान घेंसी शंका ।
नां येवढी वस्तु हे लोका । उरली केवि पां ॥ ५३ ॥
तरि पवित्र होये आणि रम्य ।
तेविं चि सुखोपायें चि अवगम्य ।
आणि स्वयं सुख परि धर्म्य ।
वरि आपणपां जोडे ॥ ५४ ॥

ऐसा आघवा चि सुखाडु आहे । तरि जना केवि पां उरो लाहे ।
हा शंकेचा ठाउ किर होये । परि ते न करावी आइकैं ॥ ५५ ॥

अश्रद्दधानाः पुरुषा धर्मस्यास्य परंतप ।
अप्राप्य मां निवर्तंते मृत्युसंसारवर्त्मनि ॥ ३ ॥

पाहे पां दूध पवित्र आणि गोड ।
पासिं चि त्वचेचिया पदरासि आड ।
परि ते अव्हेरूनि ते मूड ।
अशुद्ध काइ नेघति ॥ ५६ ॥
कां कमळकंदा आणि दर्दुरीं । नांदणुक तरि येका चि घरीं ।
परि पराग सेविजे भ्रमरीं । एरीं चिखल्ह चि उरे ॥ ५७ ॥
ना तरि निदेवांचां परिवरीं । लोही रुतलिया आहाति सहस्रवेरी ।
परि ते तेथें असौनि उपवास चि करी अथवा दरिद्रें जिये ॥ ५८ ॥
तैसा हृदयीं आंतु मीं धर्मु । असतां सर्व सुखांचा आरामु ।
किं भ्रांतांसि कामु । विषयां वरि ॥ ५९ ॥
बहू मृगजळ देखौनि डोळां । थूंकिला अमृताचा गोळितां गळाला ।
तोडिला परिसु बांधला गळां । शुक्तिलाभें ॥ ६० ॥
तैसीं अहंममतेचिया लंहिदवडी । मातें न पवति चि बापुडीं ।
म्हणौनि जन्ममरणाची दूथडी । डहुळतें ठेलीं ॥ ६१ ॥

मया ततमिदं सर्वं जगदव्यक्तमूर्तिना ।
मत्स्थानि सर्वभूतानि न चाऽहं तेष्ववस्थितः ॥ ४ ॥

यऱ्हवि मी तरि कैसा । मुख प्रति भानु कां जैसा ।
केहिं न दिसें नसें ऐसा । वाणिचा नोहे ॥ ६२ ॥
माझेया विस्तारपणें नावें । हें जग चि नव्हे आघवें ।
जैसें दूध मुरालें स्वभावें । तरि तें चि दधि ॥ ६३ ॥
कां बीज चि जालें तरु । अथवा भांगार तें अलंकारु ।
तैसा मज एकाचा विस्तारु । तें हें जग ॥ ६४ ॥

हें असो अव्यक्तपण थिजलें ।
मग तें चि विश्वाकारें उथिजलें ।
तैसें अमूर्त्त मूर्त्त मियां विस्तारलें ।
त्रैलोक्य जाणें ॥ ६५ ॥
महदादि देहांतें । इयें अशेषें हीं भूतें ।
पैं माझां ठांइं बिंबतें । जैसे जळिं फेन ॥ ६६ ॥
परि तेया फेना आंतु पांतां । जेवि जळ न दिसे पांडुसुता ।
ना तरि स्वप्निची अनेकता । चेइलेयां नोहिजे ॥ ६७ ॥
तैसीं जियें भूतें माझां ठांइं । बिंब तें तेया माझि मीं नाहिं ।
इया चि उपपत्ती तुज पाइं । सांवितलिया मागां ॥ ६८ ॥

**न च मत्स्थानि भूतानि पश्य मे योगमैश्वरम् ।**
**भूतभृन्न च भूतस्थो ममात्मा भूतभावनः ॥ ५ ॥**

ह्मणौनि बोलिलिया बोलाचा अतिशो ।
न कीजे येया लागि हें असो ।
तऱ्हीं मज आंतु पैसो ।
दीठि तूझी ॥ ६९ ॥
आमचा प्रकृती पैलीकडीलु भाउ ।
जरि कल्पना विण लागसी पाउ ।
तरि मज माझि भूतें हें ही वाउ ।
जें सर्व मी ह्मणौनि ॥ ७० ॥
यऱ्हवि तऱ्हीं संकल्पाचिये सांजवेळे ।
नविक तिमिरैजति बुद्धिचे डोळे ।
ह्मणौनि अखंडित चि परि झांवळे ।
भूत भिन्न ऐसें देखे ॥ ७१ ॥

ते चि संकल्पाची सांज जैं वीपे ।
तैं अखंडित चि आहे स्वरूपें ।
जैसी शंका जात खेओ लोपे ।
सर्पपण मालेचें ॥ ७२ ॥
यऱ्हवीं तऱ्हीं भुइं आंतौनि स्वयंभ ।
काइ घडेगाडुआंचे निगताति कोंभ ।
पुडुतीं ते कुल्लालमतिचे गर्भ ।
उमटले किं ॥ ७३ ॥
ना तरि सागराचां पाणीं ।
काइ तरंगाचिया आहाति खाणी ।
ते अवांतर करणी ।
वारेयाची नव्हे ॥ ७४ ॥
पाहे पां कापुसाचां पोटीं । कापडाची होंति काये पेटी ।
तो वेढि तेयाचिया दीठी । कापड जाला किं ॥ ७५ ॥
जरि सोनें लेणें होउनि घडे । तऱ्हीं तेयाचें सोनेपण न मोडे ।
एरु अलंकारु तो वरिचिली कडे । लेंतेयाचेनि भावें ॥ ७६ ॥
सांघैं पडिसादेयाचीं प्रत्युत्तरें ।
कां आरिसां हान जें आविष्करे ।
तें आपुलें कीं साचोकारें ।
तेथिंचें होंतें ॥ ७७ ॥
तैसिये निर्मले माझां स्वरूपीं । जो भूतभावना आरोपी ।
तेयासि तेयाचां चि संकल्पीं । भूताभासु आहे ॥ ७८ ॥
ते चि कल्पिति प्रवृत्ति पुरे । आणि भूताभासु आदिं च सरे ।
मग स्वरूप उरे एकसरें । निखल माझें ॥ ७९ ॥
हें असो आंगीं भरलियां भवंडी । जैसिंयां भवंती दीसति आडि ।
तैसिंया आपुलिया कल्पना अखंडीं । गमति भूतें ॥ ८० ॥

ते चि कल्पना सांडूनि पाइं । तरि मीं भूतीं भूतें माझां ठाइं ।
हें स्वप्नि हिं परि नाहिं । कल्पावेया जोगें ॥ ८१ ॥
आतां मी एकु भूतांतें धरिता । अथवा भूतां माझि असता ।
इया संकल्पसन्निपाता । आंतुली बोलिया ॥ ८२ ॥
ह्मणौनि परियसैं गा प्रियोत्तमा । मीं विश्वेंसीं विश्वात्मा ।
जो एया लटकेया भूतग्रामां । भाव्यु सदा ॥ ८३ ॥
रश्मिचेनि आधारें जैसें । नाहिं तें चि मृगजल असे ।
माझां ठांइं भूतजात तैसें । आणि मातें भावी ॥ ८४ ॥
मी इये परिचा भूतभावनु । पारि सर्व भूतेंसीं अभिन्नु ।
जैसें प्रभा आणि भानु । एक चि तें ॥ ८५ ॥
हा ऐश्वर्यु आमचा योगु । तुवां देखिला कि चांगु ।
आतां सांघैं एथ काहीं लागु । भूतभेदाचा असे ॥ ८६ ॥
एया लागि मजपासौनि भूतें । आनें न्हवंति हें निरुतें ।
आणि भूतां वेगलेयां मातें । कहीं चि न मनीं हो ॥ ८७ ॥

**यथाकाशस्थितो नित्यं वायुः सर्वत्रगो महान् ।**
**तथा सर्वाणि भूतानि मत्स्थानीत्युपधारय ॥ ६ ॥**

पैं गगन जेव्हडें जैसें । पवनु हि तेवडा चि असे ।
हा साहाजें हालवलेयां वेगला दीसे । यऱ्हविं गगन तें तो ॥ ८८ ॥
तैसें भूतजात माझां ठांइ । कल्पिजे तारि आभासे काहीं ।
निर्विकल्पीं मग नाहिं । तेथ मीं आघवें ॥ ८९ ॥
ह्मणौनि नाहिं आणि असे । हें कल्पनेचेनि सोरसें ।
जें कल्पनालोपीं भ्रंशे । आणि कल्पने सवें होये ॥ ९० ॥
तें चि कल्पितें मुदल जाये । तैं कें असे नाहिं हें आहे ।
ह्मणौनि पुडुतीं तूं पाहे । हा ऐश्वर्ययोगु ॥ ९१ ॥
ऐसिया प्रतीतिबोधसागरीं । तूं आपणपेयांतें कल्लोळु एकु करीं ।
मग एऱ्हविं पाहंसि तवं चराचरीं । तूं चि असासि ॥ ९२ ॥

एया जाणणेयांचा चेऊ । तूज आला नां ह्मणति देओ ।
तरि आतां द्वैतस्वप्न वाओ । जालें किं ना ॥ ९३ ॥

तर्‍हीं पुडुतीं जरि विपायें । बुद्धी कल्पनेची झोंप ही नैये ।
तरि अभेदबोधु जाए । जें स्वप्नीं पाडिजे ॥ ९४ ॥

ह्मणौनि इये नीदेची वाट मोडे ।
निखल उद्बोधाचें चि आपणपें घडे ।
ऐसें सुवर्म जें आहे फुडे ।
तें दाउनि पाइं ॥ ९५ ॥

**सर्वभूतानि कौंतेय प्रकृतिं यांति मामिकाम् ।**
**कल्पक्षये पुनस्तानि कल्पादौ विसृजाम्यहम् ॥ ७ ॥**

तरि धनुर्द्धरा धौरेया । नीकें अवधान देयीं धनंजया ।
पैं सर्वभूतांतें माया । करी हरी ॥ ९६ ॥

जियें नावं कां प्रकृति ।
जे द्विविधा सांघितली तुजप्रति ।
येकि अष्टभेदव्यक्ति ।
आणि जीवरूपा ॥ ९७ ॥

हा प्रकृतिविषो आघवा ।
तुवां मागां परिसिला असे पांडवा ।
ह्मणौनि असो काये सांघावा ।
तर्‍हीं प्रकृति ते हे ॥ ९८ ॥

तरि इये माझिये प्रकृती । महाकल्पांचां अंतीं ।
सर्वभूतव्यक्ती । ऐक्यासि येंति ॥ ९९ ॥

ग्रीष्मांचां अतिरसीं । सबीजें तृणें जैसीं ।
माघौतीं भूमीसी । सुलीनें होंति ॥ १०० ॥

कीं वार्षिये ढेंढें फीटे ।
जेव्हां शारदियेचा अनुघाडु फुटे ।
तैं घनजात आटे ।
गगनिचां गगनीं ॥ १ ॥

ना तरि आकाशाचिये खोंपे । वायु निवांतू चि लोपे ।
आणि तरंगता हारपे । जळिं जेवि ॥ २ ॥
अथवा जागिनलेये वेळे । स्वप्न मनिचें मनीं चि मावळे ।
तैसें प्राकृत प्रकृती मिळे । कल्पक्षयीं ॥ ३ ॥
मग कल्पादि पुढुतीं । मीं चि सृजीं ऐसी वदंती ।
तरि तिये विषिं निरुती । उपपत्ति आइकें ॥ ४ ॥

**प्रकृतिं स्वामवष्टभ्य विसृजामि पुनः पुनः ।**
**भूतग्राममिमं कृत्स्नमवशं प्रकृतेर्वशात् ॥ ८ ॥**

तरि हे चि प्रकृति किरीटी । मीं स्वकीय साहजें अधिष्ठीं ।
तेथ तंतुसमवायें पटीं । जेवि विणावणि दीसे ॥ ५ ॥
मग तिये विणावणिचेनि आधारें ।
लाहाना चौकडियां पटत्व भरे ।
तैसीं पंचात्मकें आकारें ।
प्रकृति चि होए ॥ ६ ॥
जैसें विरजेयाचेनि संगें । दूध आटलिजों लागे ।
तैसी प्रकृति आंगा रिगे । सृष्टिपणाचिया ॥ ७ ॥
बीज जळाची जवळीक लाहे ।
आणि तें चि शाखोपशाखा होये ।
तैसें मज करणें आहे ।
भूतांचें हेंट ॥ ८ ॥

आणा हे नगर रायें केलें ।
एया ह्मणणेया किर साचपण आले ।
परि निरुतें पांतां काइ सिणले ।
रायाचे हात ॥ ९ ॥
आणि मीं प्रकृति अधिष्टीं तें कैसें । जैसा स्वप्नीं जो असे ।
मग तो चि प्रवेशे । जाग्रदवस्थे ॥ ११० ॥
तरि स्वप्नौनि जाग्रति येतां । काये पाये दूखति पांडुसुता ।
कीं जाग्रते माझि असतां । प्रवासु होए ॥ ११ ॥
एया आघवेयाचा अभिप्राउ काइ ।
जें हें भूतसृष्टिचें कांहीं ।
मज एक ही करणें नाहीं ।
ऐसा अर्थु ॥ १२ ॥
जैसी रायें अधिष्टिली प्रजा । व्यापारें आपुलालेया काजा ।
तैसा प्रकृतिसंगु माझा । एर करणें तें इयेचें ॥ १३ ॥
पाहे पां पूर्णचंद्राचिया भेटी । समुद्रिं भरतें अपार दाटी ।
तेथ चंद्रासि काइ किरीटी । उपखा पडिला ॥ १४ ॥
जडपण जवलिका । लोह चाले तरि चालो कां ।
कोणु सीणु भ्रामका । सन्निधानाचा ॥ १५ ॥
किंबहुना इया परीं । मीं निजप्रकृतितें अंगिकरीं ।
आणि भूतसृष्टि एकसरी । प्रसरों चि लागे ॥ १६ ॥
जें हा भूतग्रामु आघवा । असे प्रकृती अधीनु पांडवा ।
जैसी बीजाचेया वेला पालवा । समर्थ भूमि ॥ १७ ॥
नां तरि बाल्यादिकां वयसां । गोसांवि देहसंयोगु जैसा ।
अथवा घनावली आकाशा । वार्षियें जेवि ॥ १८ ॥
का स्वप्नासि कारण निद्रा । तैसी प्रकृति हे नरेंद्रा ।
एया अशेषा ही भूतसमुद्रा । गोसांविणि गा ॥ १९ ॥

स्थावरां जंगमां । स्थूलां अथवा सूक्ष्मां ।
हें बहु असो भूतग्रामां । प्रकृती चि मूळ ॥ १२० ॥

**न च मां तानि कर्माणि निबध्नंति धनंजय ।**
**उदासीनवदासीनमसक्तं तेषु कर्मसु ॥ ९ ॥**

ह्मणौनि भूतें हान सृजावीं । कां सृजिलीं प्रतिपाळावीं ।
इयें करणीं नैयंति आघवीं । आमचेया आंगा ॥ २१ ॥
जळीं चंद्रिकेचिया पसरति वेली ।
ते वाडि चंद्रें नाहिं जेवि केली ।
तेवि मावें पाउनि ठेलीं ।
दूरि कर्में ॥ २२ ॥
आणि सूटलेयां सिंधुजळाचा लोटु ।
न शके धरुं सैंधवाचा घोंटु ।
तेवि सकळ कर्मा.मी चि सेवटु ।
काइ बांधीति मातें ॥ २३ ॥
धूमरजाची पिंजरी । वाजतेया वायुतें होंकरी जरि ।
कां सूर्यबिंबा माझारि । आंधारें रिगे ॥ २४ ॥
हें असो पर्वतांचिये हृदइचें । पर्जन्यधारीं ने विखोंचे ।
तेवि कर्मजात प्रकृतिचें । न लगे मज ॥ २५ ॥
यन्हवि इये प्रकृतिविकारीं । येकु मीं चि असे अवधारीं ।
उदासीनाचिया परीं । करी ना करवीं ॥ २६ ॥
दीपु ठेविला परि वरीं । कवणातें नियमी ना निवारी ।
आणि कवण कवणी परी । राहाटे तें असे नेणे ॥ २७ ॥
तो जैसा कां साक्षिभूतु । गृहव्यापारप्रवृत्तिरहितु ।
तैसा भूतकर्मिं अनासक्तु । मीं भूतीं असें ॥ २८ ॥

**मयाऽध्यक्षेण प्रकृतिः सूयते सचराचरम् ।**
**हेतुनाऽनेन कौंतेय जगद्विपरिवर्तते ॥ १० ॥**

एथ एकू चि अभिप्राउ पुढुतीं । काइ सांग्रों यया उपपत्ती ।
तरि एकी हेळा सुभद्रापती । एतुलें जाण ॥ २९ ॥
जैसा लोकचेष्टां समस्तां । हा निमित्तमात्र कां सविता ।
तैसा जगप्रभवीं मी पांडुसुता । हेतु होइं ॥ ३० ॥
कां जें मियां अधिष्ठिलेयां प्रकृती ।
होंताति चराचराचिया संभूती ।
ह्मणौनि मीं हे उपपत्ती ।
घडे इया ॥ ३१ ॥
आतां येणें चि उजियडें निरुतें । निहाळिं पां एया योगातें ।
जें माझां ठाइं भूतें । परि मीं भूतीं नसें ॥ ३२ ॥
अथवा भूतें माझां ठाइं । आणि मीं भूतां माझि नाहीं ।
इया खुणा आंतु काहीं । चूकें ना किं ॥ ३३ ॥
हें सर्व आमचें गूढ । दाविलें मियां तुज उघड ।
तरि इंद्रियां देउनि कवाड । हृदयीं भोगीं ॥ ३४ ॥
हा ईमु जंव नये हाता । तंव माझें साचोकारण पार्था ।
न संपडे गा सर्वथा । जेवि भुर्सि कणु ॥ ३५ ॥
यऱ्हवि अनुमानाचेनि पैसें । आवडे किरु कळलें ऐसें ।
परि मृगजळाचेनि उल्हासें । काइ भूमि तीमे ॥ ३६ ॥
जें जाळ जळीं पांगिलें । तेथ प्रतिबिंब दीसे कीरु आंतुडलें ।
मग थडिये काढूनि झाडिलें । तेव्हळिं बिंब कें सांचें ॥ ३७ ॥
तैसें बोलवरि वाचावळें ।
वायां चि झांकवीति प्रतीतीचे डोळे ।
मग साचोकारे यया बोधा वेळे ।
आथि ना होइजे ॥ ३८ ॥

**अवजानंति मां मूढा मानुषीं तनुमाश्रितम् ।**
**परं भावमजानंतो मम भूतमहेश्वरम् ॥ ११ ॥**

किंबहुना भत्रा भिया । आणि साचें चाड जरि मियां ।
तरि तुह्मी गा उपपत्ती इयां । जतन करां ॥ ३९ ॥
यऱ्हविं वेधली दीठि कवले । ते चांदिणेंयांतें ह्मणे पीवलें ।
तेवि माझां स्वरूपीं निर्मलें । देखति दोषु ॥ १४० ॥
ना तरि जेरें विटाललें मुख । मग दूधातें ह्मणति विख ।
तेवि अमानुषा मानुष । मानीति मातें ॥ ४१ ॥
ह्मणौनि पुढुतीं धनंजया । झनें विसरसी यया अभिप्राया ।
जें एरी स्थूलदृष्टी वायां । जाईल गा ॥ ४२ ॥
पैं स्थूलदृष्टी देखिजे मातें । तें नेदखणें जाणति निरुतें ।
जैसें स्वप्निचेनि अमृतें । अमरां न्हविजे ॥ ४३ ॥
यऱ्हविं स्थूलदृष्टी मूढ । मातें जाणति कीरु दृढ ।
पारि तें जाणणें चि जाणणेयां आड । रिगौनि ठाके ॥ ४४ ॥
जैसें नक्षत्राचेया आभासा । साठिं घातु जाला तेया हंसा ।
माझि रत्नबुद्धिचिया आशा । ह्मणौनियां ॥ ४५ ॥
सांघैं गा मृगजल टाकूनि गेलेयाचें कवण फल ।
काइ सुरतरु ह्मणौनि बाबुल । सेविलें करी ॥ ४६ ॥
हा निलेयाचा दुसरा । यया बुद्धी हातु घालिजे विखारा ।
कां रत्नें ह्मणौनि गारा । वेंचिजति पैं ॥ ४७ ॥
अथवा निधान हें प्रकटलें । ह्मणौनि खदिरांगार खोले भरिले ।
कां साउली न पांतां घातलें । कुहां सिंहें ॥ ४८ ॥
तेवि मीं ह्मणौनि प्रपंचीं ।
जिहीं बुडी दिधली कृतनिश्चयाची ।
तिहीं चंद्रासाठिं जलिची ।
प्रतिमा धरिली ॥ ४९ ॥
तैसा कृतनिश्चयो वायां गेला । जैसा कोणिह येकु कांजी पियाला।
मग परिणामु पाहों लागला । अमृताचा ॥ १५० ॥

तैसें स्थूलाकारीं नाशवंते । भरवसा बांधोनि चित्तें ।
पाहांति मज अविनाशातें । तरि कैसेनि दीसें ॥ ५१ ॥
आगा पश्चिमसमुद्रिचिया तटा । निगिजत आहे पूर्वेची वाटा ।
किं कोंडा कांडितां सूभटा । कणु आंतुडे ॥ ५२ ॥
तैसें विकरलें हें स्थूल । जाणितलेयां मीं जाणावें केवल ।
काये फेणु पींतां जल । सेविलें होये ॥ ५३ ॥
ह्मणौनि मोहबलें मनोधर्मे । हें चि मानूनि संभ्रमें ।
येथिचीं जियें जन्मकर्मे । तियें मज चि ह्मणति ॥ ५४ ॥
एतुलेनि अनामा नाम । मज अक्रियासि कर्म ।
विदेहा देहधर्म । आरोपिति ॥ ५५ ॥
मज आकारशून्या आकारु । निरुपाधिका उपचारु ।
विधिविवर्जिता व्यवहारु । आचारादिकु ॥ ५६ ॥
मज वर्णहीना वर्णु । गुणातीतासि गुणु ।
मज अचरणा चरणु । अपाणी पाणि ॥ ५७ ॥
मज अमेया मान । सर्वगतासि स्थान ।
जैसें सेजें चि माझि वन । निदेला देखे ॥ ५८ ॥
तैसें अश्रवणा श्रोत्र । मज अचक्षुका नेत्र ।
अगोत्रा गोत्र । अरूपा रूप ॥ ५९ ॥
मज अव्यक्ता व्यक्ति । अनार्त्तासि आर्त्ति ।
स्वयंतृप्ता तृप्ति । भाविति गा ॥ १६० ॥
मज अनावरणा आवरण । अभूषणा भूषण ।
मज सकलकारणासि कारण । मानीति ते ॥ ६१ ॥
मज सहजातें करिति । स्वयंभातें प्रतिष्ठिति ।
निरंतरातें आवांहांति । विसर्जिति पैं ॥ ६२ ॥
मीं सर्वदा स्वतःसिद्धु । मीं बालु तरुणु वृद्धु ।
मज एकरूपा समंधु । जाणति ऐसें ॥ ६३ ॥

मज अद्वैतासि दूजें । मज अक्रियासि काजें ।
मीं अभोक्ता किं भुंजें । ऐसें ह्मणति ॥ ६४ ॥
मज अकुळाचें कुळ वानिति । मज नित्याचेनि निधनें सीणति ।
मज सर्वत्रातें कल्पिति अरिमित्र गा ॥ ६५ ॥
मीं स्वानंदाभिरामु । तेया मज आणि सुखाचा कामु ।
मीं आघवा चि असें समु । किं ह्मणति एकदेशी ॥ ६६ ॥
मीं आत्मा एकु चराचरीं । किं ह्मणति एकाचा आडळु करी ।
आणि कापौनि एकां मारीं । हें चि रूढवीति ॥ ६७ ॥
किंबहुना ऐसे समस्त । जे हे मनुष्यधर्म प्राकृत ।
तेया चि नावं ऐसें विपरीत । ज्ञान तेयांचें ॥ ६८ ॥
जवं आकारु येंकु देखति । तवं हा देवो ऐसें ह्मणति ।
मग तो चि विघडलेयां ठकति । नाहिं ह्मणौनियां ॥ ६९ ॥
मातें एणें एणें प्रकारें । जाणति मनुष्य ऐसेनि आकारें ।
ह्मणौनि ज्ञान तें चि आंधारें । ज्ञानासि कारिति ॥ ७० ॥

**मोघाशा मोघकर्माणो मोघज्ञाना विचेतसः ।**
**राक्षसीमासुरीं चैव प्रकृतिं मोहिनीं श्रिताः ॥ १२ ॥**

एया लागि जन्मले ते मोघ । जैसे वार्षी विण मेघ ।
ना तरि मृगजळिचे तरंग । दुरौनि पाहावे ॥ ७१ ॥
अथवा कोल्हैरिचे असिवार । ना तरि वोडंबरिचे अलंकार ॥
किं गंधर्वनगरिचे आवार । आभासति ॥ ७२ ॥
सावेरी वाढिनलेया सरळा । वरि फळ नाहिं आंतु पोकळा ।
कां स्तन जाले गळां । सेळिये जैसे ॥ ७३ ॥
तैसें मूर्खांचें तेयां जियालें ।
आणि धिगि कर्म हीं तेयांचें निफनलें ।
जैसें सोवेरी फळ आलें ।
घेपे ना दीजे ॥ ७४ ॥

मग जें काहिं ते पढिनले । तें माकडें नारियल तोडिलें ।
कां आंधलेया हातीं पाडिलें । मोतीं जैसें ॥ ७५ ॥
किंबहुना तेयां शास्त्रें । जैसिं कुमारीहातीं बांधलीं शस्त्रें ।
कां अशौची मंत्रें । बीजें कथिलीं ॥ ७६ ॥
तैसें ज्ञानजात तेयां । आणि काहिं आचरले गा धनंजया ।
तें आघवें चि गेलें वायां । जे चित्तहीन ॥ ७७ ॥
पैं तमोगुणिची राक्षसी । जे सद्बुद्धितें ग्रसी ।
मनाचा ठाउ चि पूसी । निशाचरि जे ॥ ७८ ॥
तिये प्रकृती वरिपडे जाले । ह्मणौनि चित्ताचेनि कपोलें गेले ।
वरि तामसियेचां पडिले । मुखा माजि ॥ ७९ ॥
जेथ आशेचिये लाले । आंतु हिंसा जीभ लोले ।
तेविं चि संतोखाचे चाकले । अखंड चवली ॥ १८० ॥
जेथ अनार्त्तांचे कानवेऱ्हीं ।
आवालुएं चाटिति निगे बाहिरि ।
जे प्रमादपर्वतिची दरी ।
सदा चि मातली ॥ ८१ ॥
जेथ द्वेषाचिया दाढा । कसासां ज्ञानाचा करिती रगडा ।
जे अगस्तिगौवण मूढां । स्थूलबुद्धि ॥ ८२ ॥
ऐसे आसुरिये प्रकृतिचां तोंडीं । ते जाले गा भूतौंडी ।
जे बुडौनि गेले कुंडीं । व्यामोहाचां ॥ ८३ ॥
एवं तमाचिये पडिले गर्त्ते ।
न पवती चि विचाराचेनि हातें ।
हें असो ते गेले जेथें ।
ते शुद्धि ही नाहिं ॥ ८४ ॥
ह्मणौनि असतु इयें वायाणीं । काइसीं तेयां मूर्खांचीं बोलणीं ।
वायां वाढवितां काहाणी । सिणैल ह्यान ॥ ८५ ॥

ऐसें बोलिलें देवें । तेथ जी ह्मणितलें पांडवें ।
आइकें वाचा जेथ विसंवे । ते साधुकथा ॥ ८६ ॥

**महात्मानस्तु मां पार्थ दैवीं प्रकृतिमाश्रिताः ।**
**भजंत्यनन्यमनसो ज्ञात्वा भूतादिमव्ययम् ॥ १३ ॥**

तरि जेयांचिये चोखटे मानसीं । मीं होउनि असे क्षेत्रसंन्यासी ।
जेयां निदैलेयांतें उपासी । वैराग्य गा ॥ ८७ ॥
जेयांचिया आस्थेचिया सद्भावा । आंतु धर्मु करी राणिवा ।
जेयांचिये मती ओलावा । विवेकाचा ॥ ८८ ॥
जे ज्ञानगंगे न्हाले । जे पूर्णता जेउनि धाले ।
जे शांतीसि जाले । पालव नवे ॥ ८९ ॥
जे परिणामा निघाले कोंभ । जे धैर्यमंडपाचे खांभ ।
जे आनंदसमुद्रीं कुंभ । चुभळूनि भरिले ॥ १९० ॥
जेयां भक्तिची येतुली प्रीति । जे कैवल्यातें प॒न्हां सर ह्मणति ।
जियांचिये लीळे माझि नीति । जियाली दीसे ॥ ९१ ॥
जे आघवां चि करणीं । लेइले संयतिचीं लेणीं ।
जेयांचें चित्त गवसणी । व्यापका मज ॥ ९२ ॥
ऐसे जे महानुभाव । जे दैविये प्रकृतिचे दैवं ।
जे जाणौनियां सर्व । स्वरूप माझें ॥ ९३ ॥
मग वाढतेनि प्रेमें । मातें भजताति जे महात्मे ।
परि दूजेपण मनोधर्मे । सीतले नाहिं ॥ ९४ ॥
ऐसे मीं चि होउनि पांडवा । करीत माझी सेवा ।
परि नवलाओ तो सांगावा । असे आइकें ॥ ९५ ॥

**सततं कीर्तयंतो मां यतंतश्च दृढव्रताः ।**
**नमस्यंतश्च मां भक्त्या नित्ययुक्ता उपासते ॥ १४ ॥**

तरि कीर्त्तनाचेनि नडनाचें । नाशिले व्यवसाय प्रायश्चिताचे ।
जें नावं चि नाहिं पापाचें । ऐसें केलें ॥ ९६ ॥

यमदमा अवकळा आणिली । तीर्थे ठायावरौनि उठविलीं ।
यमलोकिंचीं ठाकविली । राहाटि आघवी ॥ ९७ ॥
यमु ह्मणे काइ यमावें । दमु ह्मणे कोणातें शोषावें ।
तीर्थें ह्मणति काइ खावें । दोखु ऽऽषधा नाहिं ॥ ९८ ॥
ऐसेनि माझेनि नामघोषें । नाहिं करित विश्वाचीं दु:खें ।
आघवें जग चि महासुखें । दुमुदुमीत भरलें ॥ ९९ ॥
ते पाहाटेविण पांहाटवित । अमृतेंविण जिववित ।
योगेंविण दावित । कैवल्य डोळां ॥ २०० ॥
पारि राया रंका पाडु धरुं । नेणति सानेया थोरा कडसणी करुं ।
एकरसें आनंदाचें आवारुं । होत जगा ॥ १ ॥
कहिं येकाधेन वैकुंठा जावें । तेंतिहिं वैकुंठ चि केलें हे आघवें ।
ऐसें नामघोषगौरवें । धवळें विश्व ॥ २ ॥
तेजें सूर्यु तैसे उजळ । पारि तो अस्तवे हें कीडाळ ।
चंद्र संपूर्ण एकाधी वेळ । ते सदा पुरते ॥ ३ ॥
मेघु उदारु पारि ओसरे । ह्मणौनि उपमेसि नुपकरे ।
ते नि:शंकपणें सपांखरे । पंचानन ॥ ४ ॥
तेयांचिये वाचेपुढां भोजें । नाम नाचे माझें ।
जें जन्मशतीं ऽऽळगिजे । एकोळ यावेया ॥ ५ ॥
पैं वैकुंठीं मीं गा नसें । वेळु एकु ही भानुबिंबिं हिं न दिसें ।
वर योगियांचीं हीं मानसें । सांडूनि जायें ॥ ६ ॥
परि तेयांपासिं पांडवा । मीं हारतला गिवसावां ।
जेथ नामघोषु बरवा । करिति ते माझा ॥ ७ ॥
कैसे माझां गुणीं भरले । देशकाळातें विसरले ।
कीर्त्तिनसुख जाले । आपणपां चि ॥ ८ ॥
कृष्णविष्णुगोविंद । एयां नामाचे निखिळ प्रबंध ।
माझि आत्मचर्चा विशद । उदंड गाति ॥ ९ ॥

हें बहु असो इया परीं । कीर्त्तितमातें अवधारीं ।
एक विचरति चराचरीं । पांडुकुमरा ॥ २१० ॥
मग आणिक ते अर्जुना । सावियां चि बहुवा जतना ।
पंचप्राणमना । पाढाउ घेति ॥ ११ ॥
बाहिरि यमनियमाची कांटि लाविली ।
आंतु वज्रासनाची पौळि पानासिली ।
वरि प्राणायामाची मांडिलीं ।
वांहांती यंत्रें ॥ १२ ॥
तेथ उल्हाटशक्तिचेनि उजियेडें । मनपवनाचेनि सुरवाडें ।
सतरावियेचेनि पानियेडें । बलियावीले ॥ १३ ॥
तेव्हां प्रत्याहारें ख्याति केली । विकारांची सपिलें बोहिली ।
इंद्रियें बांधौनि आणिलीं । हृदया आंतु ॥ १४ ॥
तवं धारणावारू दाटिले । महाभूतांतें येकिं आटिलें ।
मग चतुरंग निवटिलें । संकल्पाचें ॥ १५ ॥
तेयावरि जैत रे जैत । ह्मणौनि ध्यानाचें निसाण वाजत ।
दीसे तन्मयतेचें झळकत । एकछत्र ॥ १६ ॥
पाठिं समाधिश्रियेचेया अशेषा । आत्मानुभवु—राज्यसुखा ।
पट्टाभिषेकु देखां । समरसें जाला ॥ १७ ॥
ऐसें हें गहन । अर्जुना माझें भजन ।
आतां आइक सांघों आन । जें करिति येक ॥ १८ ॥
तरि दोन्हीं पालववेन्हीं । जैसा एकु तंतु अंबरीं ।
तैसा मी वांचूनि चराचरीं । जाणति नां ॥ १९ ॥
आदिब्रह्मा करुनि । सेवटीं मशकु धरुनि ।
माझि समस्त हें जाणौनि । स्वरूप माझें ॥ २२० ॥
मग वाड धाकुटें न ह्मणति । साजीव निर्जीव नेणति ।
देखिलिये वस्तू लुंठति । मी चि ह्मणौनि ॥ २१ ॥

आपुलें उत्तमत्व नाठवे । पुढील योग्यायोग्य ही नेणवे ।
एकसरें व्यक्तिमात्रेचेनि नावें । नमूं चि आवडे ॥ २२ ॥
जैसें ऊंचीं उदक पडिलें । तरि तळवटुवरि ये उगेलें ।
तैसें नमिजे भूत देखिलें । ऐसा स्वभाओ तेयांचा ॥ २३ ॥
कां फळलेया तरुची शाखा । साहाजें भूमीसि उतरली देखां ।
तैसें जीवमात्रा अशेषा । खालतिले ॥ २४ ॥
अखंड अगर्वता होउनि असति। तेयांते विनयो हे चि संपत्ति ।
ते जयजपमंत्रें अर्पिति । माझां ठांइ ॥ २५ ॥
नमितां मानाभिमान गळले । ह्मणौनि अवचिते मीं चि जाले ।
ऐसे निरंतर मिसळले । उपासिति ॥ २६ ॥

**ज्ञानयज्ञेन चाप्यन्ये यजंतो मामुपासते ।**
**एकत्वेन पृथक्त्वेन बहुधा विश्वतोमुखम् ॥ १५ ॥**

अर्जुना हे गरुइ भक्ति । सांधितली तुज प्रति ।
आतां ज्ञानयज्ञें यजिति । ते भक्त आइकें ॥ २७ ॥
परि भजन करिती हातवटी । तूं जाणतु आहासि किरीटी ।
जें मागां इया गोठी । केलिया आह्मीं ॥ २८ ॥
तवं आथि जी अर्जुनु ह्मणे । तें देविकिया प्रसादाचें किं करणें ।
तऱ्हीं अमृताचिये आरोगणे । काइ पुरे ह्मणवे ॥ २९ ॥
एया बोला आंतु अनंतें । लागणेयां देखिलें तेयातें ।
किं सुखावलेनि चित्तें । डोलतसे ॥ ३० ॥
ह्मणे भलें केलें पार्था । यऱ्हवि हा अनवसरु सर्वथा ।
परि बोलवीतसे आस्था । तूझी आमते ॥ ३१ ॥
तवं अर्जुनु ह्मणे हें काइ । चकोरें विण चांदणें चि नाहिं ।
जग निववीजे हा तेयाचां ठांइ । स्वभाओ चि कीं जी ॥ ३२ ॥
एरें चकोरें तियें आपुलिये चाडे । चांचू करिति चंद्राचिये कडे ।
तेवि आह्मीं विनउं तें थोडें । देओ कृपासिंधु ॥ ३३ ॥

जें मेघु आपुलिया प्रौढी । जगाची आर्त्ति किं दवडी ।
वांचूनि चातकाची तान्ह केवढी । तो वर्षाओ पाहुनि ॥ ३४ ॥
परि चूळा हीं येकाचिये चाडे । जेवि गंगेतें चि टाकावें पडे ।
तेवि आर्त्त बहू कां थोडें । तन्हीं सांघावें देवा ॥ ३५ ॥
तेथ देवें ह्मणितलें राहे । जो संतोषु आह्मा जाला आहे ।
तेयावारि स्तुति साहे । ऐसें उरलें नाहिं ॥ ३६ ॥
पैं परियसु तुं आह्मासिं निकियापरी ।
ते चिं वक्तृत्वा वन्हाडिक करीं ।
ऐसें पोखुनु तेयातें हरी ।
आदरिलें बोलों ॥ ३७ ॥
तरि ज्ञानयज्ञु तो एवंरूपु । तेथ आदिसंकल्प हा यूपु ।
महाभूतें तो मंडपु । भेदु तो पशु ॥ ३८ ॥
मग पांचांचे जे विशेष गुण । अथवा इंद्रियें आणि प्राण ।
हें चि यज्ञोपचारभरण । अज्ञानघृत ॥ ३९ ॥
तेथ मनबुद्धि एयां कुडां । आंतु ज्ञान हा अग्नि फुडा ।
साम्य ते सुहाडा । वेदी जाणें ॥ २४० ॥
सविवेकमतिपाटव । तें चि विद्यागौरव ।
संयति चि सृक्सृव । जीउ यज्वा ॥ ४१ ॥
तो प्रतीतीचेनि पात्रें । विवेकें महामंत्रें ।
ज्ञानाग्निहोत्रें । भेदु नाशी ॥ ४२ ॥
तेथ अज्ञान सरौनि जाये । आणि यजिता यजन हे ठाये ।
आत्मसमरसें न्हाये । अवभृत जेन्हां ॥ ४३ ॥
तेन्हां भूतें विषय करणें । हें वेगळालें काहीं न ह्मणे ।
आघवें एक चि ऐसें जाणे । आत्मबुद्धी ॥ ४४ ॥
जैसा चेइला तो अर्जुना । ह्मणे स्वप्निची हे सेना ।
मी चि जाला होंतां ना । निद्रावशें ॥ ४५ ॥

आतां सेना ते सेना नोहे । हें मीं चि एकु आघवें ।
ऐसें एकत्वें मानवे । विश्व तेया ॥ ४६ ॥
मग तो जीउ हे भाष सरे । आब्रह्म परमात्मबोधें भरे ।
ऐसे भजति ज्ञानाध्वरें । एकत्वें एणें ॥ ४७ ॥
अथवा अनादि हें अनेक । जें असारिखें येकायेक ।
आणि नामरूपादिक । तें हीं विषम ॥ ४८ ॥
ह्मणौनि विश्व भिन्न । परि न भेदे तेयाचें ज्ञान ।
जैसे अवयव तरि आनान । पारि एकि चि देहिंचे ॥ ४९ ॥
कां शाखा सानिया थोरा । परि आहाति येका चि तरुवरा ।
बहू रश्मि पारि दिनकरा । एकाचे जेवि ॥ २५० ॥
तेवि नाना विधा व्यक्ती । आनानें नावें आनानी वृत्ती ।
ऐसें जाणति भेदलां भूतीं । अभेदा मातें ॥ ५१ ॥
एणें वेगळालेपणें पांडवा । करिति ज्ञानयज्ञु बरवा ।
जें न भेदति या जाणिवा । जाणति ह्मणौनि ॥ ५२ ॥
ना तरि जेधवां जिये ठांइं । देखति जें काहीं ।
तें मीं वांचूनि नाहीं । ऐसा चि बोधु ॥ ५३ ॥
पाहे पां बुडडा जेउता जाये । तेउतें जळ एक तेया आहे ।
मग वीरे अथवा रांहे । तऱ्हीं जळ चि माझि ॥ ५४ ॥
कां पवनें परमाणु उचलले । ते पृथ्वीचे हें नाहीं गेलें ।
आणि मावौते जऱ्हीं पडिले । तऱ्हीं पृथ्वी चि वरि ॥ ५५ ॥
तैसें भले तेथ भलेतणें भावें । भले तें हीं हो अथवा नोहावें ।
परि तें मीं चि आघवें । होउनि ठेलें ॥ ५६ ॥
आगा हे जेवढी माझी व्याप्ति । तेव्हडी चि तेयांची प्रतीती ।
ऐसे बहुधाकारीं वर्त्तति । बहू चि होउनि ॥ ५७ ॥
हें भानुबिंब आवडे तेया । सदमुख जैसें धनंजया ।
तैसे ते विश्वा येयां । समोर सदा ॥ ५८ ॥

आगा तेयांचेया ज्ञाना । पाठि नाहिं पैं अर्जुना ।
वायु जैसा गगना । सर्वांगीं असे ॥ ५९ ॥
तैसा मी जेतुला आघवा । तें चि तूक तेयांचेया सद्भावा ।
तारि न करितां पांडवा । भजन जालें ॥ ६० ॥
यऱ्हविं तऱ्हीं सकळ मीं चि आहें । तारि कोणें कैं उपासिलां नोहें ।
एथ एकें जाणणेनि विण किं ठायें । अप्राप्तां ॥ ६१ ॥
परि तें असो एणें उचितें । ज्ञानयज्ञें यजित सांते ।
जे उपासित मातें । ते सांचितले ॥ ६२ ॥

**अहं क्रतुरहं यज्ञः स्वधाहमहमौषधम् ।**
**मंत्रोऽहमहमेवाज्यमहमग्निरहं हुतम् ॥ १६ ॥**

अखंड सकल हें सकलीं मुखीं । साहाजें अर्पतसे मज एकीं ।
किं नेणणेया साठीं मूर्खीं । न पविजे चि मातें ॥ ६३ ॥
तो चि जाणिवेचा उदो जारि होये । तारि मुदलु वेदु तो मीं चि आहें ।
आणि तो विधानातें जिया विये । तो क्रतु ही मीं ॥ ६४ ॥
मग तेया कर्मापासौनि बरवा । जो सांगोपांगु आघवा ।
यज्ञु प्रकटे पांडवा । तो ही मीं गा ॥ ६५ ॥
स्वाहा मीं स्वधा । सोमादि ओषधी विविधा ।
आज्य मी समिधा । मंत्रु मीं हवि ॥ ६६ ॥
होता मी हवन कीजे । जेथ तो अग्निरूप माझें ।
आणि हुत वस्तु कां जे जे । ते ही मीं चि ॥ ६७ ॥

**पितामहस्य जगतो माता धाता पितामहः ।**
**वेद्यं पवित्रमोंकार ऋक् साम यजुरेव च ॥ १७ ॥**

पैं जेयाचेनि अंगसंगें । इये प्रकृतीतव अष्टांगें ।
जन्म पाविजतसे जगें । तो पिता मीं गा ॥ ६८ ॥
अर्धनारीनटेश्वरीं । जो पुरुष तो चि नारी ।
तेवि मीं चराचरीं । माता ही होयें ॥ ६९ ॥

आणि जालें जग जेथ राहे । जेणें जींत वाढत आहे ।
तें मिं वांचूनि नोहें । आना निरुतें ॥ ७० ॥
इयें प्रकृतिपुरुषु दोन्हीं । उपनलीं जेयाचां मनीं ।
तो पितामहो त्रिभुवनीं । विश्वाचा मीं ॥ ७१ ॥
आणि आघवेया जाणणेयांचिया वाटा । जेया गावां येंति सूभटा ।
जें वेदांचा चौहटा । वेद्य ह्मणिजे ॥ ७२ ॥
जेथ नाना मतां बुझावणी जाली ।
येकमेका शास्त्रांचीं अनोलखि फीटली ।
चूकलीं ज्ञानें जेथ मिळों आलीं ।
जें पवित्र ह्मणिजे ॥ ७३ ॥
पैं ब्रह्मबीजाचा जाला अंकुरु । घोषध्वनि नादाकारु ।
तयाचे गा भवन जें ॐकारु । तें हीं मीं चि गा ॥ ७४ ॥
जेया ॐकाराचिये कुंसीं । आखरें होंति अकारां ऐसीं ।
जियें उपजत वेदेंसीं । उठिलीं तीन्हीं ॥ ७५ ॥
ह्मणौनि ऋग्यजुसामु । हे तीन्हीं ह्मणे मी रामु ।
एवं मीं चि कुळाक्रमु । शब्दब्रह्माचा ॥ ७६ ॥

**गतिर्भर्ता प्रभुः साक्षी निवासः शरणं सुहृत् ।**
**प्रभवः प्रलयः स्थानं निधानं बीजमव्ययम् ॥ १८ ॥**

हें चराचर आघवें । जिये प्रकृतीं आंतु सांटवे ।
ते सिणली जेथ विसंवे । ते परम गति मीं ॥ ७७ ॥
आणि जेयाचेनि प्रकृति जिये । जेणें अधिष्टिली विश्व विये ।
जो एऊनि प्रकृतीं इयें । गुणातें भोगी ॥ ७८ ॥
तो विश्वश्रियेचा भर्त्ता । मीं चि गा पांडुसुता ।
मीं गोसांवि समस्ता । त्रैलोक्याचा ॥ ७९ ॥
आकाशें सर्वत्र वसावें । वायू नांभरि उमेयां नसावें ।
पावकें दाहावें । वर्षावें जळें ॥ २८० ॥

पर्वतीं बैसक न संडावी । समुद्रीं रेघ नोलंडावी ।
पृथ्विया भूतें वाहावीं । हे आज्ञा माझी ॥ ८१ ॥
मियां बोलविला वेदु बोले । मियां चालविला सूर्यु चाले ।
मियां हालविला प्राणु हाले । जो जगा चालिता ॥ ८२ ॥
मियां चि नियमिला सांता । कालु ग्रासु करितसे भूतां ।
इयें ह्मणियागतें पांडुसुता । सकलें जेयाचीं ॥ ८३ ॥
ऐसा जो समर्थु । तो मीं जगाचा नाथु ।
आणि गगन ऐसा साक्षिभूतु । तो ही मीं चि ॥ ८४ ॥
इहीं नामरूपीं आघवां । जो भरला असे पांडवा ।
आणि नामरूपां ही ओलावा । आपण चि जो ॥ ८५ ॥
जैसे जलाचे कल्लोल । आणि कल्लोलीं आथि जल ।
ऐसेनि वसवीतु असे सकल । तो निवासु मीं ॥ ८६ ॥
मीं एकु अनेकपणें । वेगलालेनि प्रकृतिगुणें ।
जींतु जगाचेनि प्राणें । वर्त्ततु असें ॥ ८७ ॥
जैसा समुद्रु थिल्लर न ह्मणतां । भले तेथ बिंबे सविता ।
तैसा ब्रह्मादि सर्वां हीं भूतां । सुहृदु तो मीं ॥ ८८ ॥
मीं चि गा पांडवा । एया त्रिभुवनासि ओलावा ।
सृष्टिक्षयप्रभवा । मूल तें मीं ॥ ८९ ॥
बीज शाखांतें प्रसवे । मग तें रूखपण बीजीं चि सामावे ।
तैसें संकल्पें होये आघवें । पाठिं संकल्पीं मिले ॥ २९० ।
ऐसा जगाचें बीज संकल्पु । अव्यक्तु वासनारूपु ।
तेयासि कल्पांतीं जेथ निक्षेपु । होये तें मीं ॥ ९१ ॥
इयें नामरूपें लोटती । वर्णव्यक्ती आटती ।
जातींचे भेद फीटती । जैं आकाश नाहीं ॥ ९२ ॥
तैं सकलवासनासंस्कार । मावौते रचावेया आकार ॥
जेथ राहूनि असति अमर । तें निधान मीं ॥ ९३ ॥

**तपाम्यहमहं वर्षं निगृण्हाम्युत्सृजामि च ।**
**अमृतं चैव मृत्युश्च सदसच्चाहमर्जुन ॥ १९ ॥**

मीं सूर्याचेनि वेखें । तपें तैं हें शोषे ।
पाठिं इंद्रु होउनि वर्षें । तैं पुडुतीं भरे ॥ ९४ ॥
आगा मृत्युचां भागीं जें जें । तें हिं पैं रूप माझें ।
आणि न मरतें तवं साहाजें । अविनाश मीं ॥ ९५ ॥
आतां बहू बोलौनि सांघावें । तें एक हेला घे पां आघवें ।
तरि संतासंत ही जाणावें । मीं चि हें गा ॥ ९६ ॥
ह्मणौनि अर्जुना मी नसें । ऐसा कोण्हीं ठाउ॰ असे ।
पारि प्राणियांचें दैवं कैसें । जें नेदखति मातें ॥ ९७ ॥
हें आंतु बाहिरि मियां कोंदलें ।
जग निखिळ माझें चि ओतलें ।
किं कैसें कर्म तेयां आलें ।
जें मीं चि नाहिं ॥ ९८ ॥
तरंग पाणियें विण सूकति । रश्मि वाती उणें नेदखति ।
तैसे मीं चि ते मीं न्हवति । विस्मयो देखैं ॥ ९९ ॥
पारि अमृतीं कुहा पाहिजे । कां आपणेयांतें चि गिवसूं जाइजे ।
ऐसें आथि हें काइ कीजे । अप्राप्तां ॥ ३०० ॥
प्रासा येका अन्नासाठिं । अंधु धांवंतां पायें किरीटी ।
आडळला चिंतामणि लोटी । आंधळेपणें ॥ १ ॥
तैसें ज्ञान जैं सांडुनि जाए । तैं ऐसी हे दशा आहे ।
ह्मणौनि कीजे तें केलें नोहे । ज्ञानें विण ॥ २ ॥
आंधळेया गरुडाचे पांख आहाति । ते कोण्हा हिं उपेगा जांति ।
तैसे सत्कर्माचे उपखे ठांति । अज्ञानां तेवी ॥ ३ ॥

**त्रैविद्या मां सोमपाः पूतपापा यज्ञैरिष्ट्वा स्वर्गतिं पार्थयंते ।**
**ते पुण्यमासाद्य सुरेंद्रलोकमश्नंति दिव्यान्दिवि देवभोगान् ॥ २० ॥**

देख पां किरीटी । आश्रमधर्मांचिया राहाटी ।
विधिमार्गा कसवटी । जे आपण चि होंत ॥ ४ ॥
यजन करितां कवतिकें । तिहिं वेदांचा माथा तूकें ।
क्रिया फळेंसीं उभी ठाके । पुढां जेयां ॥ ५ ॥
ऐसे दीक्षित जे सोमप । जे आपण चि यज्ञाचें रूप ।
तिहिं तेया पुण्याचेनि नावें पाप । जोडिलें देखैं ॥ ६ ॥
जे श्रुतित्रयीतें जाणौनि । शतवेर्‍हीं यज्ञां करूनि ।
यजिलेया ही मातें चुकउनि । स्वर्गु वरांति ॥ ७ ॥
जैसें कल्पतरू तळवटीं । बैसौनि झोळिये पाडी गांठी ।
मग निर्दैउ निगे किरीटी । दैन्य करुं ॥ ८ ॥
तैसें शतक्रतूं यजिलें मातें । किं इछिताति स्वर्गादिसुखातें ।
आतां हें पुण्य किं निरुतें । पाप नोहे ॥ ९ ॥
ह्मणौनि मज वीण पाविजे स्वर्गु । तो अज्ञानांचा गा पुण्यमार्गु ।
ज्ञानिये तेयातें उपसर्गु । हाणि ह्मणति ॥ १० ॥
एर्‍हवीं तर्‍हीं नरकिचें दुःख । पाहूनि स्वर्गा नावं किं सुख ।
वांचूनि नित्यानंद निर्दोष । तें स्वरूप माझें ॥ ११ ॥
मज यैतां पैं सूभटा । हा द्विविधु गा अव्हांटा ।
स्वर्ग नरक इया वाटा । चोरांचिया ॥ १२ ॥
स्वर्गा पुण्यात्मकें येइजे । पापें चि पापात्मकें नरका जाइजे ।
मग मातें चि जेणें पाविजे । तें शुद्ध पुण्य ॥ १३ ॥
आणि मज चि माझि असतां ।
जेणें मीं दूरि होये पांडुसुता ।
तें पुण्य ऐसें ह्मणतां ।
जभि न झडे ॥ १४ ॥
परि हें असो आतां प्रस्तुत । आइकैं यया परि ते दीक्षित ।
यजूनि मातें याचित । स्वर्गभोग ॥ १५ ॥

मग मीं न पविजे ऐसें । जें पापरूप पुण्य असे ।
तेणें लाधलेनि सौरसें । स्वर्गा येंती ॥ १६ ॥
जेथ अमरत्व हें चि सीहांसन । ऐरावता सारिखें वाहान ।
राजधानीभवन । अमरावती ॥ १७ ॥
जेथ महासिद्धिचीं भांडारें । अमृताचीं कोठारें ।
जिये गावीं क्षीरारें । कामधेनुचीं ॥ १८ ॥
जेथ उालिगे देवां पाइकां । सैघ चिंतामणिचेया भूमिका ।
विनोदवनवाटिका । सुरतरूचिया ॥ १९ ॥
गंधर्व–गान–गाणी । जेथ रंभे ऐसिया नाचणी ।
उर्वशी मुख्य विलासिनी । आंतौरिया ॥ ३२० ॥
मदनु ओलगे सेजारें । जेथ चंद्रु सिंपे साबरें ।
पवना ऐसे ह्मणियारे । धावणे जेथ ॥ २१ ॥
पैं बृहस्पति मुख्य आपण । स्वस्तिश्रियेचे ब्राह्मण ।
भाटियेचे सुरगण । विकर जेथें ॥ २२ ॥
लोकपाल रागेचे । राउत जिये पदिचे ।
उच्चैश्रवा खांचे । मागिलीकडे ॥ २३ ॥
हें बहू असो जे ऐसे । भोग ब्रह्मसुखा सरिसे ।
ते भोगीत जवं असे । पुण्यलेशु ॥ २४ ॥

**ते तं भुक्त्वा स्वर्गलोकं विशालं क्षीणे पुण्ये मर्त्यलोकं विशंति । एवं त्रयीधर्ममनुप्रपन्ना गतागतं कामकामा लभंते ॥ २१ ॥**

मग तेया पुण्याची पाहूती सरे ।
सवें चि इंद्रपणाची ऊठि उतरे ।
आणि येओं लागति मावारे ।
मृत्य लोका ॥ २५ ॥

जैसा भाडिचा कवडा वेचे ।
मग दार ही चेंपूं नैये तेयाचें ।
ऐसें लाजिरवाणें दीक्षिताचें ।
काइ सांगों ॥ २६ ॥
एवं तिथेया मातें चूकले । जिहिं पुण्यें स्वर्ग कामिले ।
तेयां अमरपण तें वाऊ जालें । आतां मृत्युलोकु ॥ २७ ॥
आगा स्वप्नीं निधान फावे । परि ते चेइलेयां राहांत पावें ।
तैसें स्वर्गसुख जाणावें । वेदज्ञाचें ॥ २८ ॥
अर्जुना वेदु जऱ्हीं जाला । तऱ्हीं मीं नेणतां वायां गेला ।
कणु सांडौनि उपणिला । कोंडा जैसा ॥ २९ ॥
ह्मणौनि मज एकें विण । हें त्रयीधर्म अकारण ।
मातें जाणौनि काहीं चि नेण । तूं सुखिया होंसी ॥ ३३० ॥

**अनन्याश्चिंतयंतो मां ये जनाः पर्युपासते ।**
**तेषां नित्याभियुक्तानां योगक्षेमं वहाम्यहम् ॥२२॥**

पैं सर्वभावेंसिं उखितें । जे ऊपले माझिये चित्तें ।
जैसा गर्भगोलु उद्यमातें । कोण्हा हीं नेणे ॥ ३१ ॥
तैसें मीं वांचूनि काहीं । आणिक गोमटें चि नाहीं ।
मज चि नावें पाइं । जीणें ठेविलें ॥ ३२ ॥
ऐसे अनन्यगतिकें चित्तें । चिंतीत सांते मातें ।
जे उपासीति तेयांतें । मी चि सेविं ॥ ३३ ॥
ते एकवटूनि जिये क्षणीं । अनुसरले गा माझिया वाहाणीं ।
तेव्हां चि तेयां चिंतवणी । फीटली आपुली ॥ ३४ ॥
मग तिहिं जें जें करावें । तें मज चि पडिलें आवघें ।
जैसें अजातपक्षाचेनि जीवें । पक्षिणी जिये ॥ ३५ ॥
कां आपुली तान्हभूक नेणे । तेयां नीकें तें तायेसी चि करणें ।
तैसें अनुसरले मज प्राणें । तेयांचें मिं काइसेनि न लजें ॥३६॥

तेयां माझेया सायुज्याची चाड । तरि तें चि पुरविं कोड ।
कां सेवा ह्मणति आड । प्रेम सुएं ॥ ३७ ॥
ऐसा मनीं धरिति जो भाओ । तो पुढपुढां लागें तेयां देऊं ।
आणि दिधलेयाचा निर्वाहो । तो ही मीं चि करीं ॥ ३८ ॥
हा योगक्षेमु आघवा । तेयांचा मज चि गा पांडवा ।
जेयांचेया सर्वभावां । आश्रयो मीं ॥ ३९ ॥

**येऽप्यन्यदेवताभक्ता यजंते श्रद्धयान्विताः ।**
**तेऽपि मामेव कौंतेय यजंत्यविधिपूर्वकम् ॥ २३ ॥**

आतां आणीक संप्रदायें । परि मातें नेणति समवाएं ।
जे अग्नये इंद्राय अर्यमणे सोमाय । ह्मणौनि भजिति ॥ ३४० ॥
तें हिं किर मातें चि होये । कां जें हें आघवें मीं चि आहें ।
परि ते भजती उजिरी नोहे । विखम पडे ॥ ४१ ॥
पाहे पां शाखापल्लव वृक्षाचे । हे न्हवति येका चि बीजाचे ।
परि पाणी घेणें मुळांचें । तें मुळीं चि घापे ॥ ४२ ॥
कां दाही इंद्रियें आथि । इयें जन्हीं एकी चि देहिचिं होंति ।
आणि इहीं सेविले विखय जांति । एका चि ठाया ॥ ४३ ॥
तन्हीं करुनि रसोये बरवी । कानिं केवि भरावी ।
फुलें आणुनु बांधावीं । डोलां केवि ॥ ४४ ॥
तेथ रसु तो मुखें चि सेवावा । परिमलु तो घ्राणें चि घेयावा ।
तैसा मीं तो यजावां । मी चि ह्मणौनि ॥ ४५ ॥
येर मातें नेणौनि भजन । तें वायां चि गा आनीआन ।
ह्मणौनि कर्माचे डोले ज्ञान । तें निर्दोष होआवें ॥ ४६ ॥

**अहं हि सर्वयज्ञानां भोक्ता च प्रभुरेव च ।**
**न तु मामभिजानंति तत्त्वेनातश्च्यवंति ते ॥ २४ ॥**

एन्हविं पाहे पां पांडुसुता । एयां यज्ञोपचारां समस्तां ।
मीं वांचूनि भोक्ता । कवणु आहे ॥ ४७ ॥

मी सकळ यज्ञाची आदि । आणि यजना या मीं चि अवधि ।
किं मातें चूकौनि दुर्बुद्धी । देवां भजले ॥ ४८ ॥
गंगेचे उदक गंगे जैसें । अर्पिजे देवपितरोद्देशें ।
माझें मज देंति तैसें । परी आनानी भावीं ॥ ४९ ॥
ह्मणौनि ते पार्था । मातें न पवती चि सर्वथा ।
मग मनीं जे वाहिली आस्था । तेथ आले ॥ ३५० ॥

**यांति देवव्रता देवान् पितॄन्यांति पितृव्रताः ।**
**भूतानि यांति भूतेज्या यांति मद्याजिनोऽपि माम् ॥२५॥**

मनें वाचा करणीं । जेयांचीं भजनें देवांचिया वाह्णी ।
ते शरीर जांत क्षणीं । देव चि जाले ॥ ५१ ॥
अथवा पितरांचीं ह्यान व्रतें । वाहांति जेयांचीं चित्तें ।
जीवित सरतां तेयांतें । पितृत्व चि वरि ॥ ५२ ॥
कां क्षुद्र देवतादि भूतें । तियें चि जेयांचीं परमदेवतें ।
जिहिं अभिचारुकिं तेयांतें । उपासिलें ॥ ५३ ॥
तेया देहाची जवनीक फीटली । आणि भूतत्वाची प्राप्ति जाली ।
एवं संकल्पवशें फळलीं । कर्मे तेयां ॥ ५४ ॥
मग मीं चि डोळां देखिलां । जिहिं कानिं मीं चि आइकिलां ।
मनीं मीं भाविलां । वानिलां वाचा ॥ ५५ ॥
सर्वांगें सर्वे ठांइं । नमस्कारिलां मी चि जिहीं ।
दानपुण्यादि जें काहीं । तें माझिया मोहरा ॥ ५६ ॥
जिहिं मातें अध्ययन केलें । जे आंतु बाहिरि मियां जि धाले ।
जेयांतें जीवित जोडलें । मज चि लागि ॥ ५७ ॥
जे अहंकारु वाहांत आंगीं । आह्मि हरिचे हें भूषावेया लागि ।
जे लोभिण्ये एक चि जगीं । माझेनि लोभें ॥ ५८ ॥
जे माझेनि कामें सकाम । जे माझेनि प्रेमें सप्रेम ।
जे माझिये भूली सभ्रम । नेणति लोकु ॥ ५९ ॥

जेयांचीं मातें चि जाणति शास्त्रें । मी जोडें जेयाचेनि मंत्रें ।
ऐसेनि चेष्टामात्रें । भजले मज ॥ ६० ॥
ते मरणा ऐलीकडे । मज मीळौनि गेले फुडे ।
मग मरणीं आनीकडे । जांतील केवि ॥ ६१ ॥
ह्मणौनि मद्याजी जाले । ते सायुज्या माझेया आले ।
जिहीं उपचारामिसें दीधलें । आपणपें मज ॥ ६२ ॥
पैं अर्जुना माझां ठांइं । आपणपेंनि विण सौरसु नाहीं ।
मी उपचारीं कव्हणी हीं । ना कळें गा ॥ ६३ ॥
एथ जाणीव करी तें चि नेणे । आथिलेपण मिरवी तें चि उणें ।
आह्मीं जालों ऐसें ह्मणे । तें कहीं चि नोहे ॥ ६४ ॥
अथवा यज्ञदानादि किरीटी । कां तपें हान जें हुटहुटी ।
तें तृणा एका साठीं । न सरे एथ ॥ ६५ ॥
पाहे पां जाणिवेचेनि बळें । कोण्हीं वेदापासूनि असे आगळें ।
किं शेषाहूनि तोंडागळें । बोलिकें आथि ६६ ॥
तो ही आंथुरणा खालि दडे । येरु नेति ह्मणौनि बाहुडे ।
एथ सनकादिक वेडे । पिसे जाले ॥ ६७ ॥
कारितां तापसांसि कडसणीं । कवणु जवळा ठेविजैल शूळपाणी ।
तो ही अभिमानु सांडूनि पायेवणी । माथां वाहे ॥ ६८ ॥
नां तरि आथिलेपणें सरिसी । कोण्हीं आहे लक्ष्मियां ऐसी ।
श्रिये सरिखिया दासी । घरीं जियेतें ॥ ६९ ॥
तिया खेळतां कारिति घरकुलीं ।
तेया नावें अमरपुरें जरि ठेविलीं ।
तरि नव्हों नेयंति बाउलीं ।
इंद्र तियांचें ॥ ३७० ॥
जे नावडौनि जेव्हां मोडिति । तेव्हां महेंद्राचे ही रंक होति ।
तियां झाडा एउतें जेयां पाहांति । ते कल्पवृक्ष ॥ ७१ ॥

ऐसीं जियेचिया जवळिका । सदर्थें घारिचेयां पाइकां ।
ते लक्ष्मी मुख्य नायका । नमने चि एथ ॥ ७२ ॥
मग सर्वस्वें करी सेवा । मानु सांडूनि पांडवा ।
ते पाये धुआवेयाचेया दैवां । पात्र जाली ॥ ७३ ॥
ह्मणौनि थोरपण पऱ्हां सांडिजे ।
एथ वित्पत्ति अवघी चि विसरिजे ।
जैं जगा धाकुटेयां होइजे ।
तैं जवळीक माझी ॥ ७४ ॥
अगा सहस्रकराचिये दीठी । पुढां चंद्रु ही लोपे किरीटी ।
तेथ खद्योतु कां हुटहुटी । आपुलेनि तेजें ॥ ७५ ॥
तैसें लक्ष्मीयेचें थोरपण सरे । जेथ शंभूचें हीं तप नुपकरे ।
तेथ येर प्राकृत हेंदारें । जाऊं काइ लाहे ॥ ७६ ॥
एया लागि शरीर—सांडोवा कीजे ।
सकल गुणांचे लोण उतरिजे ।
संपत्तिमदु सांडिजे ।
कुरोंडी करूनि ॥ ७७ ॥

**पत्रं पुष्पं फलं तोयं यो मे भक्त्या प्रयच्छति ।**
**तदहं भक्त्युपहृतमश्नामि प्रयतात्मनः ॥ २६ ॥**

मग निःसीमु भाऊ उल्हासें । मज अर्पावेयाचेनि मीसें ।
फळ एक आवडे तैसें । भले तेयाचें ॥ ७८ ॥
मग भक्तु माझेयाकडे अळुमाळु दाखवी ।
आणि मीं दोन्हीं हात ऊडवीं ।
मग देंठु न संडितां सेवीं ।
आदरेंसीं ॥ ७९ ॥
पैं गा भक्तीचेनि नावें । फूल मज येक देयावें ।
तें लेखें तरि मियां तुरंवावें । परि मुखीं चि घालीं ॥ ३८० ॥

हें असो काइसीं फुलें । पान चि एक आवडतें जालें ।
तें साजुक ही न्हवे सूकलें । भलें तैसें ॥ ८१ ॥
परि सर्व भावें भरलें देखें । आणि भूकेला ऐसा अमृतें तोखे ।
तें पत्र चि परि तेणें सुखें । आरोगुं लागें ॥ ८२ ॥
अथवा ऐसें हीं एक घडे । जें पाला ही पारे न जोडे ।
तरि उदकाचें सांकडें । नन्हैल कीं ॥ ८३ ॥
तें भलें तेथ निमोलें । न जोडितां असे जोडलें ।
तें चि सर्वस्व करूनि अर्पिलें । जेणें मज ॥ ८४ ॥
तेणें वैकुंठापासौनि विशालें । मज लागि केलीं राउलें ।
कौस्तुभाहूनि निर्म्मलें । लेणीं दीधलीं ॥ ८५ ॥
दूधाचीं सेजारें । क्षीराब्धी ऐसीं मनोहरें ।
मज लागि अपारें । सृजिलीं तेणें । ८६ ॥
कर्पुरु चंदनु अगरु । ऐसेया सुगंधांचा मनोहरु ।
मज हातीं लाविला दिनकरु । दीपमाळे ॥ ८७ ॥
गरुडा सारिखीं वाहनें । सुरतरूचीं उद्यानें ।
कामधेनूचीं गोधनें । अर्पिलीं तेणें ॥ ८८ ॥
मज अमृताहूनि सुरसें । वोनीं वोगरिलीं बहुवसें ।
ऐसा भक्ताचेनि उदकलेशें । परितोषें गा ॥ ८९ ॥
हें सांघावें काइ किरीटी । तुह्मीं देखिलें आपुलिया' दीठी ।
मीं सुदामेयांचिया सोडीं गांठी । पहुयेयां लागि ॥ ३९० ॥
पैं गा भक्ति एकि मीं जाणें । तेथ सानें थोर न ह्मणें ।
आह्मीं भावांचे पाहुणे । भलेतेया ॥ ९१ ॥
एर पत्र पुष्प फळ । तें भजावेया मीस केवळ ।
आमचा लागु निखळ । भक्तितत्त्व ॥ ९२ ॥

**यत्करोषि यदश्नासि यज्जुहोषि ददासि यत् ।**
**यत्तपस्यसि कौंतेय तत्कुरुष्व मदर्पणम् ॥ २७ ॥**

म्हणौनि अर्जुना अवधारीं । तूं बुद्धि एकि सोपारी ।
तरि साहाजें आपुलां मंदिरीं । अवसरोचित ॥ ९३ ॥
जे जे काहीं व्यापार करिसी । कां भोग हान जे भोगिसि ।
अथवा यज्ञीं यजिसी । नाना विधीं ॥ ९४ ॥
ना तरि पात्रविशेषें दानें । कां सेवकांसि जीवणें ।
तपादि साधनें । व्रतें करिसी ॥ ९५ ॥
तें क्रियाजात आघवें । जें जैसें निफजैल स्वभावें ।
तें भावना करूनि करावें । माझेया मोहरा ॥ ९६ ॥
पारि सर्वथा आपुलां जिवीं । केलेयाची से काहीं नुरावी ।
ऐसीं धूनि कर्में देयावीं । माझां हातीं ॥ ९७ ॥

**शुभाशुभफलैरेवं मोक्ष्यसे कर्मबंधनैः ।**
**संन्यासयोगमुक्तात्मा विमुक्तो मामुपैष्यसि ॥ २८ ॥**

मग अग्निकुंडीं बीजें घातलीं । तियें अंकुरदशे जेवि मूकलीं ।
तेवि न फलती चि मज अर्पिलीं । शुभाशुभें ॥ ९८ ॥
आगा कर्मि जैं उरावें । तैं तिहीं सुखदुःखीं फलावें ।
आणि तेयातें भोगावेया यावें । देहा एका ॥ ९९ ॥
तें उगणिलें मज कर्म । तेव्हां चि पूसलें जन्म ।
जन्मासवें श्रम । वरिचिल ही गेले ॥ ४०० ॥
म्हणौनि अर्जुना एया परीं । पाहिचा वेलु नव्हैल भारी ।
हे सन्यासयुक्ति सोपारी । दीधली तुज ॥ १ ॥
ऐया देहाचिये बांधवडी न पडिजे ।
सुखदुःखाचां सागरीं न बुडिजे ।
सुखें सुखरूपां घडिजे ।
माझेया चि आंगा ॥ २ ॥

**समोऽहं सर्वभूतेषु न मे द्वेष्योऽस्ति न प्रियः ।**
**ये भजंति तु मां भक्त्या मयि ते तेषु चाप्यहम् ॥ २९ ॥**

तो मीं पूससी कैसा । तरि जो सर्वभूतीं कां सरिसा ।
जेथ आप परु ऐसा । विभागु नाहीं ॥ ३ ॥
जें एया मातें जाणौनि । अहंकाराचा कुरुठा मोडूनि ।
जीवें कर्मे करूनि । भजत मातें ॥ ४ ॥
ते वर्त्तत ही असति देहीं । परि देहीं ना ते माझां ठांइं ।
आणि मीं तेयांचां हृदयीं । समग्रु असें ॥ ५ ॥
सविस्तर वटत्व जैसें । बीज कणिके माझि असे ।
आणि बीजकणु वसे । वटीं जेवि ॥ ६ ॥
तेवि आह्मा तेयां परस्परें । बाहीरि नावांची चि अंतरें ।
वांचूनि आंतुवटे वस्तुविचारें । मीं ते चि ते ॥ ७ ॥
आतां जाइंयांचें जैसें लेणें । आंगावरि आहाच वाणें ।
तैसें देहधरणें । उदास तेयांचें ॥ ८ ॥
परिमलु निगालेयां पवनापाठीं । मागां उरस फूल देंठीं ।
तैसें आयुष्याचिये मुठी । केवल देह ॥ ९ ॥
एरु अवष्टंभु जो आघवा । तो आरूढौनि मद्भावा ।
मज चि आंतु पांडवा । पैठा जाला ॥ ४१० ॥

अपि चेत्सुदुराचारो भजते मामनन्यभाक् ।
साधुरेव स मंतव्यः सम्यग्व्यवसितो हि सः ॥ ३० ॥

ऐसेनि भजतेनि प्रेमभावें । जेया शरीर ही पाठिं न पवे ।
तेणें भलेतिये होआवें । जातिचेयां ॥ ११ ॥
आणि आचरण पांतां सूभटा । तो दुष्कृतांचा चि कीरु सेलवांटा ।
परि जीवित वेंचिलें चौहटां । भक्तिचां किं ॥ १२ ॥
आगा अंतिचीया मती । साचपण पुढिली गती ।
ह्मणौनि जीवित जेणें भक्ती । दीन्हलें शेषीं १३ ॥
तो आदीं जऱ्हीं अनाचारी । तऱ्हीं सर्वोत्तमू चि अवधारीं ।
जैसा बुडाला महापुरीं । नमरतु निगाला ॥ १४ ॥

तेयांचें जीवित ऐली थडिये आलें ।
ह्मणौनि बुडालेंपण वायां जेवि गेलें ।
तेवि नुरे चि पाप केलें ।
सेवटिंचिये भक्ती ॥ १५ ॥
एया लागि दुष्कृती जर्‍हीं जाला । तर्‍हीं अनुतापतीर्थीं न्हाला ।
न्हाउनियां मज आंतु आला । सर्वभावें ॥ १६ ॥
तरि आतां पवित्र तेयाचें कुल । अभिजात्य तें चि निर्मल ।
जन्मलेयाचें फल । तेयाचेया चि जालें ॥ १७ ॥
तो चि सकल पढिनला । तपें तो चि तपिनला ।
अष्टांगु अभ्यासिला । योगु तेणें ॥ १८ ॥
हें बहुत असो पार्थी । तो उतरला कर्मे सर्वथा ।
जेयाची अखंड आस्था । मज चि लागि ॥ १९ ॥
अवघेया चि मनोबुद्धिचिया राहाटी ।
भरौनि एकनिष्ठतेची पेटी ।
मज माझि किरीटी ।
निक्षेपिली जेणें ॥ ४२० ॥

**क्षिप्रं भवति धर्मात्मा शश्वच्छांतिं निगच्छति ।**
**कौंतेय प्रतिजानीहि न मे भक्तः प्रणश्यति ॥ ३१ ॥**

तो आतां अवसरें मजसारिखा होईल ।
ऐसा हान भाऊ तूज जाईल ।
हां गा अमृतांतु राहिल ।
मरण केवि ॥ २१ ॥
पैं सूर्यु जो वेलु नुदैजे ।
तेया वेला चि नावं रात्रि किं ह्मणिजे ।
तेवि माझेये भक्तीविण कीजे ।
तें महापाप न्हवे ॥ २२ ॥

ह्मणौनि तेयाचेया चित्ता । माझी जवळीक जाली पांडुसुता ।
तेन्हां चि तो तत्वता । माझें रूप ॥ २३ ॥
जैसा दीपें दीपु लाविजे । तेथ चि आदिलु कोणु हें नेणिजे ।
तैसा सर्वस्वें मज भजे । तो मीं चि होउनि ठाके ॥ २४ ॥
मग माझी नित्य शांति । तेया ते दशा ते चि कांति ।
किंबहुना माझे जींति । माझेनि जींवें ॥ २५ ॥
एथ पार्था पुडुतीं पुडुतीं । तें चि तें सांघों केती ।
तऱ्हीं मियां चाड तरि भक्ती । नविसंभिजे ॥ २६ ॥
आगा कुलाचेया चोखटपणा नलगा ।
आभिजात्यें ह्मनें श्लाघा ।
व्युत्पत्तीचा ही वाउगा ।
सोसु कां वाहा ॥ २७ ॥
कां रूपें वयसा माजा । आथिलेपणें काह्या गाजा ।
एकु भाउ नाहिं माझा । तरि पालाल तें ॥ २८ ॥
कणें विण सोपटें । कणिसें लागलीं आथि एक दाटें ।
काइ कराल गोमटें । वोस नगर ॥ २९
नां तरि सरोवर आटलें । रानीं दुःखिया दुःखियें भेटलें ।
कां वांझां फूलीं फूललें । झाड जैसें ॥ ४३० ॥
तैसें सकल तें विभव । अथवा कुलज्ञानगौरव ।
जैसें शरीर आहे सावयव । परि सीस चि नाहिं ॥ ३१ ॥
तैसें माझेया भक्तीविण । जलो तें जियालेपण ।
आगा पृथ्वीवरि पाखाण । नसति काइ ॥ ३२ ॥
पैं हींवरांची दाट साउली । सज्जनीं जैसी वाळिली ।
तैसिं पुण्यें डावलूनि गेलीं । अभक्तांतें ॥ ३३ ॥
नींबु नींबोलीं मोडौनि आला । तरि काउलेयांसि सुकालु जाला ।
तैसा भक्तिहीनु वाढिनला । दोषां चि लागि ॥ ३४ ॥

कां खंडरसीं खापरीं वाढिलें। वाढूनि राति चौहटां सांडिलें।
तेथ सुणेयांचां ऐसें जालें। जेया परीं ॥ ३५ ॥
तैसें भक्तिहीनाचें जीणें। कां संपत्ति ही न सुकृत जाणणें।
तें सवंसारदु:खासि अवंतणें। उगरिलें गा ॥ ३६ ॥
ह्मणौनि कुल उत्तम नोहावें। जाती अंत्यां हीं होआवें।
वरि देहाचेनि नावें। पशु ही लाभो ॥ ३७ ॥

**मां हि पार्थ व्यपाश्रित्य येऽपि स्युः पापयोनयः।**
**स्त्रियो वैश्यास्तथा शूद्रास्तेऽपि यांति परां गतिम्॥३२॥**

पाहें पां सावजें हातिरु धरिलें।
तेणें तिया काकुलती मातें स्मरिलें।
किं तियाचें पशुत्व वावो जालें।
पातलें मातें ॥ ३८ ॥
आगा नावं घेतां ओखटी। जे आवविया अधमाचां सेवटीं।
तिये पापयोनीं हीं किरीटी। जन्मले जे ॥ ३९ ॥
ते पापयोनि मूढ। मूर्ख जैसे दगड।
परि माझां ठांइं दृढ। सर्वभावें ॥ ४४० ॥
जेयांचिये वाचे माझे आलाप। दीठि भोगी माझें चि रूप।
जेयांचें मनसंकल्प। माझे चि वाहे ॥ ४१ ॥
माझेया कीर्त्तीविण। जेयांचे रीते नाहीं श्रवण।
जेयां सर्वांगा भूषण। माझी सेवा ॥ ४२ ॥
जेयांचें ज्ञान विषो नेणे। जाणिवा मज चि एकातें जाणे।
जेयांसि ऐसें लाभें तरि जीणें। यन्हवीं मरण ॥४३ ॥
ऐसां आववां चि परीं पांडवा। जिहीं आपुलेयां सर्वभावां।
जियावेया लागि ओलावा। मीं चि केला। ४४ ॥
ते पापयोनी हीं होंतु कां। ते श्रुताधीत न्हवतु कां।
परि मासीं तूकितां तूका। तूटि नाहीं ॥ ४५ ॥

पाहे पां भक्तिचेनि आथिलेपणें । दैत्यें देवां आणिलें उणें ।
माझें नृसिंहत्व लेणें । जेयाचिये महिमे ॥ ४६ ॥
तो प्रन्हादु गा मजसाटीं । घेतां बोहें सदा किरीटी ।
कां जें मियां देयावें तें गोटी । तेयाचिया जोडे ॥ ४७ ॥
येऱ्हवि दैत्यकुल साचोकारें । परि इंद्रु ही सरि न लाहे उपरें ।
ह्मणौनि भक्ति गा एथ सरे । जाति अप्रमाण ॥ ४८ ॥
राजाज्ञेचीं अक्षरें आथि । तियें चर्मा एका जेया पडति ।
तेया चर्म्मा साटीं जोडति । सकळा ही वस्तू ॥ ४९ ॥
वांचूनि सोनें रूपें प्रमाण नोहे । एथ राजाज्ञा समर्थ आहे ।
तें चर्म चि एक जें लाहे । तेणें वीकिति आघवीं ॥ ४५० ॥
तेसें उत्तमत्व तें तरे । तें चि सर्वज्ञता सरे ।
जैं मनोबुद्धि भरे । माझेनि प्रेमें ॥ ५१ ॥
ह्मणौनि कुळें जाती वर्ण । हें आघवें चि गा अकारण ।
एथ अर्जुना माझेपण । सार्थक एक ॥ ५२ ॥
तें चि भलेतेणें भावें । मना मज आंतु एणें होआवें ।
आलें तरि आघवें । मागील तें वाओ ॥ ५३ ॥
तेसें तवं चि वाहळा वोहळ । जवं न पवति गंगाजळ ।
मग होउनि टाकति केवळ । गंगारूप ॥ ५४ ॥
कां खैरचंदन काष्टें । हे विवंचना तवं चि घटे ।
जवं नेवपति येकावटें । अग्नी माझि ॥ ५५ ॥
तेसें क्षत्री वैश्य स्त्रिया । कां शूद्र अंत्यादि इया ।
जाती तवं चि वेगळालिया । जवं न भजति मातें ५६ ॥
मग जाती व्यक्ती पडे बिंदुलें । जेन्हां भाव होंति मज मीनले ।
जैसे लवणकण घातले । सागरावरि ॥ ५७ ॥
तवं चि नदानदींचीं नावें । तवं चि पूर्वपश्चिमें तेयां धावे ।
जवं नयेति आघवे । समुद्रापासिं ॥ ५८ ॥

हें चि कऱ्हणें येकें मिसें । चित्त माझां ठांइं प्रवेशे ।
एतुलें हो मग आपैसें । मी होणें असे ॥ ५९ ॥
आगा वर फोडावेया चि लागि ।
लोह मीलो कां परिसाचां आंगीं ।
कां जें मिळैल इये प्रसंगीं ।
सोनें होईल ॥ ४६० ॥
पाहे पां बालभाचेनि व्याजें । तियां वज्रांगनाचिं नीजें ।
मज मीनलेयां काइ माझें । स्वरूप नो होंती चि ॥६१ ॥
ना तरि भियाचेनि मीसें । मातें न पविजे चि काइ कंसें ।
किं अखंडें वैरावेशें । चेद्यादिकिं ॥ ६२ ॥
आगा सोइरेपणें चि पांडवा । माझें सायुज्य एयां यादवां ।
पैं ममत्वें वसुदेवा— । दिकां सकळां ॥ ६३ ॥
नारदा ध्रुवा अक्रूरा । शुका हान सनत्कुमारा ।
ऐयां भक्ती मीं धनुर्द्धरा । प्राप्यु जैसा ॥ ६४ ॥
तैसा चि गोपींसीं सकामें । तेया कंसा भयसंभ्रमें ।
एरां घातकें मनोधर्में । शिशुपाळां ॥ ६५ ॥
आगा मी एकु लाणिचें खागें । मज एऊ ये भलेतेणें मागें ।
भक्तीं कां विषयवैरागें । अथवा वैरें ॥ ६६ ॥
ह्मणौनि पाइं । प्रवेशावेया माझां ठांइं ।
उपायांची नाहिं । केणि एथें ॥ ६७ ॥
आणि भलेतिये जाती जन्मावें । मग भजिजो अथवा विरोधावें ।
परि भक्तां कां वैरियां होआवें । माझेयां चि ॥ ६८ ॥
आगा कऱ्हणें येकें बोलें । माझेपण जरि जालें ।
तरि मीं होणें आलें । हाता निरुतें ॥ ६९ ॥
एया लागि पापयोनी अर्जुना । कां वैश्य शुद्र अंगना ।
येणें मातें भजतां सद्ना । माझेयां येंति ॥ ४७० ॥

**किं पुनर्ब्राह्मणाः पुण्या भक्ता राजर्षयस्तथा ।**
**अनित्यमसुखं लोकमिमं प्राप्य भजस्व माम् ॥ ३३ ॥**

मग वर्णां माझि छत्रचामर । स्वर्गु जेयाचें अग्रहार ।
मंत्रविद्येसि माहेर । ब्राह्मण जे ॥ ७१ ॥
जे पृथ्वीतळिचे देव । जे तपावतार सावयव ।
सकळ तीर्थांसि दैव । उदैलें जे ॥ ७२ ॥
जेथ अखंड वसिजे यागीं । वेदांची जे वज्रांगी ।
जेयांचिये दीठिचां उत्संगीं । मंगळ वाढे ॥ ७३ ॥
जेयांचिये आस्थेचेनि वोलें । सत्कर्म्म पाहालिं गेलें ।
संकल्पें सत्य जियालें । जेयांचेनि ॥ ७४ ॥
जेयांचेनि गा बोलें । आगिसि आयुष्य जालें ।
ह्मणौनि समुद्रें पाणी आपुलें । दीधलें प्रीती ॥ ७५ ॥
मियां लक्ष्मी हीं केली परौति ।
फेडूनि कौस्तुभु घेतला हातीं ।
मग वोडवली वक्षस्थळाची वाखती ।
चरणरजा जेयाचेया ॥ ७६ ॥
आझूं पाउलांची मुद्रा । मीं उरीं वाहें जे सुभद्रा ।
आपुलेया दैवं समुद्रा । जतने लागि ॥ ७७ ॥
जेयांचा कोपु सूभटा । काळाग्निरुद्राचा वसैठा ।
जेयांचां प्रसादीं फूकटा । जोडति सिद्धी ॥ ७८ ॥
ऐसे पुण्यपुंज ब्राह्मण । आणि माझां ठांइं अतिनिपुण्ण ।
आतां मातें पावति कवण । समर्थणें ॥ ७९ ॥
पाहे पां चंदनाचेनि अंगानीलें । सीतळें निंब होंते जे जवळे ।
तिहिं निर्जीवीं हीं देवांचिं निडळें । बैसणीं केलीं ॥ ४८० ॥
मग तो चंदनु तेथ न पवे । एसें मनीं चि कैसेनि धरावें ।
अथवा पातला हें समर्थावें । तेव्हां काइ साच ॥ ८१ ॥

तेथ निववील ऐसिया आशा । हरें चंद्रमा आधा ऐसा ।
वाहिजत असे शिरसा । निरंतर ॥ ८२ ॥
तेथ निवविता आणि सगला । परिमलें चंद्राहूनि आगला ।
तो चंदनु काइ स्वलीला । सर्वांगिं न बैसे ॥ ८३ ॥
कां रथ्योदकें जिये जिये कासे ।
लागलेयां समुद्रु जालीं अनायासें ।
तियें गंगेसि काहीं अनारिसें ।
गत्यंतर असे ॥ ८४ ॥
ह्मणौनि राजर्षी हान ब्राह्मण । जेयां गती मती मीं चि शरण ।
तेयां विशुद्धी मीं चि निर्वाण । स्थिति ही मीं ॥ ८५ ॥
एया लागि शतजर्जरे नावे । रिगौनि निश्चिंता होआवें ।
कैसेनि उघडलेयां असावें । शस्त्रवर्षि ॥ ८६ ॥
आगा वरिपडतां पाषाण । न सुवावें केवि ओडण ।
रोगिं दाटिला आणि उदासपण । ओषधेंसीं ॥ ८७ ॥
जेथ चहूंकडे जलतसे वणवा ।
तेथौनि कैसेनि न निगिजे पांडवा ।
तेवि लोका एउनि एया सोपद्रवा ।
केविं न भजिजे मातें ॥ ८८ ॥
आगा मातें न भजावेया लागि । कवण बल पां आपुले आंगिं ।
काइ घरि किं भोगिं । निश्चिंत केलें ॥ ८९ ॥
ना तरि विद्या किं वयसा । एया प्राणियांसि हा ऐसा ।
मज न भजतां भर्वसा । सुखाचा जाला ॥ ४९० ॥
तरि भोग्यजात जितुलें । तें एका चि देहाचेया नीके लागलें ।
आणि एथ देह तवं असे पडिलें । कालाचां तोंडीं ॥ ९१ ॥
बापा दुःखाचें केणें सूटलें । जेथ मरणांचें भरें लोटलें ।
तिये मृत्युलोकिचिये असे घडलें । हाटवेले एणें ॥ ९२ ॥

आतां सुखेंसिं जीविता । कैसी ग्राहकै कीजैल पांडुसुता ।
काइ राखोंडिया फुंकितां । दीपु लागे ॥ ९३ ॥
आगा विषाचे कांदे वाटूनि । गोरसु वेइजे पीळूनि ।
तेया नावं अमृत ठेउनि । जैसें अमरां होणें ॥ ९४ ॥
कां सीस खांडूनि आपुलें । पायांचां खतीं बांधलें ।
तैसें मृत्युलोकिचें भलें । आहे आघवें ॥ ९५ ॥
ह्मणौनि मृत्युलोकिं सुखाची काहाणी ।
आइकैजैल कवणाचां श्रवणीं ।
कैंची सुखनिद्रा आंथुरणीं ।
इंगलांचां ॥ ९६ ॥
जिये लोकिंचा चंद्रु क्षयरोगी ।
जेथ उदो होये अस्तवावेया चि लागि ।
दुःख लेउनि सुखाची आंगी ।
सलित जगातें ॥ ९७ ॥
जेथ मंगलाचां अंकुरीं । सवें चि अमंगलांची आहे पोहोरी ।
मृत्यु उदयाचां परिवरीं । गर्भ गिवसी ॥ ९८ ॥
जीतें नाहिं तेयाचें चिंतवी । तवं तें चि नेइजे गंधर्वीं ।
गेलेयाची कव्हणी गावीं । शुद्धि न लभे ॥ ९९ ॥
आगा गिवसितां आघवां वाटीं ।
परतलें पाउल चि नाहिं किरीटी ।
सेंघ निमालेयांचिया गोठी ।
तियें पुराणें जेथिचीं ॥ ५०० ॥
जेथिचिये अनित्यतेची थोरी । करितेया ब्रह्मेयाचें आयुष्य वेऱ्हीं ।
कैसें होणें नाहिं अवधारीं । निपटूनियां ॥ १ ॥
ऐसी लोकिची इये नांदणुक । तेथ जन्मले आहाति जे लोक ।
तेयांचिये निश्चंतैयेचे कें कवतिक । दीसतसे ॥ २ ॥

पैं दृष्टादृष्टिचिये जोडी । भांडवला न सुटे कवडी ।
जेथ सर्वस्वें हाणि तेथ कोडी । वेचितील ॥ ३ ॥
जो बहू इयें विषयविलासीं गूंपे ।
तो ह्मणे उवाई पडिला सांपें ।
जो अभिलाषाभारें दडपे ।
तेयातें सज्ञानु ह्मणति ॥ ४ ॥
जेयाचें आयुष्य धाकुटें होए । बल प्रज्ञा जिरौनि जाए ।
तेयाचे नमस्कारिजति पाए । वडील ह्मणौनि ॥ ५ ॥
जवं जवं श्वान बलिया वाढे । तवं तवं भोजें नाचति कोडें ।
आयुष्य निमालें आंतुलीकडे । ते ग्लानि नाहिं ॥ ६ ॥
जन्मलेया दिहें दिवसें । हों लागे कालाचेया ऐसें ।
किं वाढतीं कारिति उल्हासें । उभिति गुढिया ॥ ७ ॥
भगा मर हा बोलु न सांहांति । आणि मेलेयां तरि रडति ।
परि असतें जांत न गणिति । गैसासें पैं ॥ ८ ॥
दर्दुरु सापें गीलिजतु उभा । तो मासिया वेंटाली जीभा ।
तैसे प्राणिये कवणा लोभा । वाढविति तृष्णा ॥ ९ ॥
आहा कटा उ्ग्खटें । हें मृत्युलोकिचें उपराटें ।
एथ अर्जुना जऱ्हैं अवचटें । जन्मलासि ॥ ५१० ॥
तऱ्हैं झडझडौनि वहिला निग । इये भक्तीचिये वाटे लाग ।
जीया पावसी अव्यंग । निजद्धाम माझें ॥ ११ ॥

**मन्मना भव मद्भक्तो मद्याजी मां नमस्कुरु ।**
**मामेवैष्यासि युक्त्वैवमात्मानं मत्परायणः ॥ ३४ ॥**

तूं मन हें मीं चि करीं । माझां भजनीं प्रेम धरीं ।
सर्वत्र नमस्करीं । मज एकातें ॥ १२ ॥
माझेनि अनुसंधानें देख । संकल्प जालणें अशेख ।
मद्याजी ह्मणिपे चोख । तें यया नावं ॥ १३ ॥

ऐसा मियां आथिला होंसी । तेथ माझिया चि स्वरूपा येंसी ।
हें अंतष्करणिचें तुसीं । बोलिजत असे ॥ १४ ॥
आगा आघवेया चोरिया आपुलें ।
जें सर्वस्व आह्मि असे ठेविलें ।
तें पावौनि सुख सांचलें ।
होउनि ठांसी ॥ १५ ॥
ऐसेनि सावलेनि परब्रह्में । तेणें भक्तकामकल्पद्रुमें ।
बोलिलें आत्मारामें । संजयो ह्मणे ॥ १६ ॥
अहो आइकत असा अवधारा ।
तवं एया बोला निवातु ह्मांतारा ।
जैसी ह्मसी नुठी कां पुरा ।
तैसा उगला चि असे ॥ १७ ॥
तेथें संजयें माथा तूकिला । आहा अमृताचा पाउसु वरिषला ।
हा एथ चि असतु गेला । सेजेया गावां ॥ १८ ॥
तऱ्हीं दातारु हा आमचा । ह्मणौनि ऐसें बोलतां मेलेल वाचा ।
काइ जालें एयाचा । भोगू चि ऐसा ॥ १९ ॥
परि बापु भाग्य माझें । जें वृत्त सांघावेयाचेनि व्याजें ।
कैसा रक्षिला मुनिराजें । व्यासदेवें ॥ ५२० ॥
एतुलें हें वाडें सायासें । जवं बोलतसे दढें मानसें ।
तवं मन धरे चि आपुलेया ऐसें । सात्विकिं केलें ॥ २१ ॥
चित्त चावेठलें आटौ घेत । वाचा पांगुलेली जेथिची तेथ ।
आपादकंचुकित । रोमांचीं जालें ॥ २२ ॥
अर्धोन्मीलित डोले । वरिषताति आनंदजलें ।
आंतुला सुखोर्मीचेनि बलें । बाहिरि कांपे ॥ २३ ॥
पैं आघवां चि रोममूलीं । आलां स्वेदकणीं निर्मलीं ।
लेइला मोतियांची कडियाली । आवडे तैसा ॥ २४ ॥

ऐसा महासुखाचेनि अतिरसें । जेथ आटणी होईल जीवदशे ।
तेथ निरोविलें व्यासें । तें नेंदी चि हों ॥ २५ ॥
आणि कृष्णार्जुनांचें बोलणें । घोकारि आलें श्रवणें ।
किं देहस्मृतिचा तेणें । वापसा केला ॥ २६ ॥
तेव्हां नेत्रिचें जल विसर्जी । मग सर्वांगिचा स्वेदु परिमार्जी ।
तेवि च ह्मणे अवधारा हो जी । धृतराष्ट्रातें ॥ २७ ॥
आतां कृष्णवाक्यबीजा निवाडु । आणि संजयो सात्विकाचा बिवडु ।
ह्मणौनि सवयां चि होइल सुरवाडु । प्रमेयपिकाचा ॥ २८ ॥
अहो अलुमालु अवधान देआवें । इतुलेनि आनंदरासिवरि बैसावें ।
बापु श्रवणेंद्रियांचेनि दैवें । घातली माल ॥ २९ ॥
ह्मणौनि विभूतिंचा ठाओ । अर्जुना दावील सिद्धांचा राओ ।
तो आइकां ह्मणे ज्ञानदेओ । निवृत्तिचा ॥ ५३० ॥

ॐतत्सदिति श्रीमद्भगवद्गीतासूपनिषत्सु ब्रह्मविद्यायां
योगशास्त्रे श्रीकृष्णार्जुनसंवादे **राजविद्यावर्णनं**
नाम नवमोऽध्यायः ॥

॥ श्रीकृष्णार्पणमस्तु ॥

# ज्ञानेश्वरी

## अध्याय दहावा

ॐ नमो भगवते गणेशाय ॥

ॐ नमो विशदबोधविदग्धा । विद्यारविंदप्रबोधा ।
परापरमप्रमदा । विलासिया ॥ १ ॥
नमो संसारतमसूर्या । अप्रमिता परमवीर्या ।
तरुणतमतूर्या । ललनलीला ॥ २ ॥
नमो जगदखीलपालणा । मंगलमणीनिधाना ।
सज्जनवनचंदना । आराध्यलिंगा ॥ ३ ॥
नमो चतुरचकोरचंद्रा । स्वानुभावनरेन्द्रा ।
श्रुतिसागरसमुद्रा । मन्मथमन्मथा ॥ ४ ॥
नमो सुभावभजनभाजना । भवेभकुंभभंजना ।
विश्वोद्भवभुवना । गुरुराया ॥ ५ ॥
तुमचा अनुग्रहो गणेशु । जैंसा आपुला दे सौरसु ।
तैं सारस्वतीं प्रवेशु । बालका आथि ॥ ६ ॥
जी दैविकी उदारा वाचा । जैं राजादेशु दे नाभिकाराचा ।
तरि नवरसदीपिचा । पाउडु लाभे ॥ ७ ॥
आपुलें स्नेह ते चि वागीश्वरी । जेया मुकेयातें अंगिकरी ।
तो वाचस्पतिसीं करी । प्रबंधहोडा ॥ ८ ॥

हे असो दीठि जेयावरि झळके । हा पद्मकर जिये माथां पारुखे ।
तो जीउ चि पारि तूके । महेशेंसीं ॥ ९ ॥
एवडें जिये महिमेचें. करणें । तें वाचाबळें वानावें कवणें ।
काइ सूर्याचेया आंगा उटणें । लागतसे ॥ १० ॥
केउता कल्पतरूवरि फुलौरा । काइसेनि पाहुणोरु क्षीरसागरा ।
कवणें इछावें कापुरा । वासु देऊं ॥ ११ ॥
चंदनातें काइसेनि चर्चावें । अमृत केउतें रांधावें ।
गगनावरि उभावें । घडे केवि ॥ १२ ॥
तैसें श्रीगुरूचें महिमान । अकळतें कें असे साधन ।
हें जाणौनियां नमन । निवांतां चि केलें ॥ १३ ॥
तऱ्हैं प्रज्ञेचेनि आथिलेपणें । गुरुसामर्थ्या रूप करुं ह्मणें ।
तरि मोतियां भिंग देणें । तैसें होइल ॥ १४ ॥
आतां असतु इयें बोलणीं । साडपंधरेया आणि कसवटणी ।
उगेयां चि माथा ठेविजे चरणीं । हें चि भलें ॥ १५ ॥
मग ह्मणितलें स्वामीं । भलेनि ममत्वें देखिलां तुह्मीं ।
ह्मणौनि कृष्णार्जुनसंगमीं । प्रयागवटु जालां ॥ १६ ॥
दूध मागितलेया साटीं । उपमन्यूपुढां धूर्जटी ।
क्षीरसागराची चि वाटी । करूनि ठेविली ॥ १७ ॥
ना तरि वैकुंठपीठनायकें । रुसला ध्रुवु कवतिकें ।
बुझाविला देउनि भातुकें । ध्रुवपदाचें ॥ १८ ॥
तैसी जो ब्रह्मविद्यां राऊ । जो सकळशास्त्रां विसंवता ठाओ ।
ते भगवद्गीता वोविं गाऊं । ऐसें केलें ॥ १९ ॥
जें बोलणेयांचां रानीं हींडतां । नाइकिजे फळलेया अक्षराची वार्त्ता ।
ते वाचा केली कल्पलता । विवेकावरि ॥ २० ॥
होती देहबुद्धि एकसरी । आनंदभांडारा केली वोवरी ।
मन गीतार्थुसागरीं । जळशयनु जालें ॥ २१ ॥

आतां आपुलेन प्रसादें । भगवद्गीता वोवीप्रबंधें ।
पूर्वकांड विनोदें । वाखाणिलें ॥ २२ ॥
प्रथमिं अर्जुनाचा विषादु । दूजा ह्मणितला योग विशदु ।
जें सांख्यबुद्धि भेदु । दाउनियां ॥ २३ ॥
तीजां केवल कर्म प्रतिष्ठिलें । तें चि चौथां ज्ञानेंसीं प्रकटिलें ।
मग पंचमी गंव्हरिलें योगतत्व ॥ २४ ॥
तें चि षष्टमामाझि स्पष्ट । आसना लागौनि प्रकट ।
जीवपरमात्माभाव एकवट । होंति जेयापरीं ॥ २५ ॥
तैसी जे योगस्थिति । आणि योगभ्रष्टासि जे गति ।
ते आघवी चि उपपत्ती । दाखविली ॥ २६ ॥
मग यावरि सप्तमीं । प्रकृतिपरिहारु उपक्रमीं ।
करुनि भजति जे पुरुषोत्तमीं । ते ह्मणितले च्यान्ही ॥ २७ ॥
पाठिं सप्तप्रश्नसिद्धि । बोलौनि प्रयाणसमयबुद्धि ।
एवं सकलवाक्यअवधि । अष्टमाध्याइं ॥ २८ ॥
मग शद्बब्रह्मीं असंख्याकें । जेतुला काहीं अभिप्राउ पीके ।
तेतुला महाभारतीं एकें । लक्षें जोडे ॥ २९ ॥
तिये आघविये चि महाभारतीं । तें लाभे कृष्णवचोक्तीं ।
आणि गीतार्थु सातेंसतीं । तें येकलां नवमीं ॥ ३० ॥
ह्मणौनि नवमीचेया अभिप्राया । सहसा मुद्रा लावावेया ।
भियाला मां वायां । गरुवती बोलों ॥ ३१ ॥
हां हो गूल साखरे मालेयाचे । वांधे एका चि रसाचे ।
पारि पाहतां गोडियेचे । विशेष नाहिं ॥ ३२ ॥
एक जाणौनि बोलति । एक ठायें ठाउ जाणति ।
एक जाणौनियां हारपति । सिहाणेपणें पैं ॥ ३३ ॥
तैसे अध्याय हे गीतेचे । परि अनिर्वाच्य नवमांचें ।
तऱ्हीं वाखाणिलें एतुलें तुमचें । सामर्थ्य प्रभू ॥ ३४ ॥

हां हो एकांची षाठी चि तपनली । एकिं शृष्टिवरि शृष्टि केली ।
एकिं पाखाणि वाउनि उहरविलिं । समुद्रीं कटकें ॥ ३५ ॥
एकिं आकाशीं सूर्यातें धरिलें । एकिं चूळीं चि समुद्रा शोखिलें ।
तैसें तुह्मीं मजकरवि बोलविलें । अवधारि जो ॥ ३६ ॥
परि असो हें एथ ऐसें । रामु रावणु जूझिनले कैसे ।
ना रामु रावणु जैसे । मीनले समरीं ॥ ३७ ॥
तैसें नवमींचें श्रीकृष्णाचें बोलणें ।
आणि नवमीचेया चि ऐसें मी ना ह्मणे ।
यया निवाडु तत्वज्ञु जाणे ।
जेया गीतार्थु आथि ॥ ३८ ॥
एवं नवै अध्याय पहिले । मियां मतीसारिखे बोलिले ।
आतां उत्तरखंड आदरिलें । ग्रंथिचें आइकां ॥ ३९ ॥
तेथ विभूति प्रतिविभूति । प्रस्तुत अर्जुनां सांघिजती ।
ते विदग्धा रसवृत्ती । ह्मणिपैल कथा ॥ ४० ॥
देशियेचेनि नागरपणें । शांतु शृंगारातें जीणे ।
वोविया कीं होंति लेणें । साहित्यासि ॥ ४१ ॥
मूळग्रंथिचेया संस्कृता । सवें नीट मऱ्हाटी पढतां ।
अभिप्रायें मानलेया उचिता । कवणि भूमिका ते नेणवे ॥४२॥
जैसें आंगिचेनि सौंदर्यपणें । लेणेयांसि आंग चि होये लेणें ।
तेथ अलंकरलें कवण कवणें । हें निवर्चेना ॥ ४३ ॥
ऐसी देशी आणि संस्कृत वाणी । एकां भावाचां सुखासनीं ।
शोभती ते आणि । चोखटा आइकां ॥ ४४ ॥
उदेलेयां भावा रूप । करितां लागे रसवृत्तिचें वडप ।
चातुर्य ह्मणे हें पडप । जोडलें आह्मां ॥ ४५ ॥
तैसें देशियेचें लावण्य । हरौनि रसां आणिजैल तारुण्य ।
मग ह्मणिपैल अगण्य । गीतातत्व ॥ ४६ ॥

श्रीभगवानुवाच ॥

भूय एव महाबाहो श्रृणु मे परमं वचः ।
यत्तेऽहं प्रीयमाणाय वक्ष्यामि हितकाम्यया ॥ १ ॥

तें चि चराचरपरमगुरु । चतुरचित्तचमत्कारु ।
तो आइकां यादवेश्वरु । काइ बोलता जाला ॥ ४७ ॥
ज्ञानदेउ निवृत्तिचा ह्मणे । ऐसें बोलिलें हरी तेणें ।
आइकें अर्जुना अंतष्करणें । नीकेया परीं ॥ ४८ ॥
आह्मिं मागां जें निरूपण केलें । अवधान चि गा तूझें तूकलें ।
परि टांचें न्हवे भलें । पुरतें आहे ॥ ४९ ॥
घटिं थोडें ऐसें द्रव घालीजे । न गळिजे तरि मागुता भरिजे ।
तैसा पाहिलासि तवं परिसाविजे । ऐसें होंतसे ॥ ५० ॥
पहिलें अवचितेयावरि सर्वस्व सांडिजे ।
मग चोखु तरि भांडारी कीजे ।
तैसा आतां किरीटी माझें ।
निजधाम पैं गा ॥ ५१ ॥
ऐसें अर्जुना एउतें सर्वेश्वरें । पाहूनि बोलिलें आदरें ।
गिरि देखोनि सुभरें । मेघु जैसा ॥ ५२ ॥
तैसा कृपाळुवांचा राओ । ह्मणे आइकें गा महाबाहो ।
सांवितला चि अभिप्राउ । दांविजैल पुडुतीं ॥ ५३ ॥
प्रतिवरिषिं क्षेत्र पेरिजे । जवं जवं पीकाची वाढि देखिजे ।
यालागि नुभगिजे । वाहो करितां ॥ ५४ ॥
पुडुतीं पुडुतीं पुटें । भांगारा देतां ऊटे ।
तरि तें उपखटें । ह्मणों नये किं ॥ ५५ ॥
तैसा एथ पार्था । तुज आभारु नाहिं सर्वथा ।
आह्मि आपुलेया चि स्वार्था । बोलोंनु पुडुतीं ॥ ५६ ॥
आंगिं बाळक लेवविजे लेणें । तें श्रिंगारातें काइ जाणे ।

ते सुखाचे सोहळे करणें । आपुलिये दीठी ॥ ५७ ॥
ऐसें तूझें हीं सांगावें । जवं जवं तुज फावे ।
तवं तवं आमचें दुणावे । प्रेम देखैं ॥ ५८ ॥
आतां अर्जुना असो हे विकडी । मज तूझी चि आवडि ।
ह्मणौनि तृतिची सेवडी । बोलतां न पवे ॥ ५९ ॥
आह्मां येतुलेया कारणें । तें चि तें बोलणें ।
हें असो अंतष्करणें । अवधारिजो ॥ ६० ॥
आइकैं सुवर्म । माझें वाक्य परम ।
जियें अक्षरें लेउनि परब्रह्म । तुज खेवां एतसे ॥ ६१ ॥

**न मे विदुःसुरगणाः प्रभवं न महर्षयः ।**
**अहमादिर्हि देवानां महर्षीणां च सर्वशः ॥ २ ॥**

परि किरीटी मातें । तूं नेणसि ना निरुतें ।
तरि तो चि मीं जेथें । विश्व हें स्वप्न ॥ ६२ ॥
जेथ वेद मूके जाले । मन पवन पांगुळेले ।
रात्रीवीण मावळले । रविशशि जेथें ॥ ६३ ॥
उदरिचा गर्भु जैसा । न देखे आपुलिये मातेची वयसा ।
मी आघवेयां देवां तैसा । नेणवें चि गा ॥ ६४ ॥
आणि जळचरां उदधीचें मान । मशका नोलांडवे चि गगन ।
तेवि महारिखीचें ज्ञान । ने देखे चि मातें ॥ ६५ ॥
मी कवणु केतुला । कवणाचा कैं जन्मला ।
हे निरुति करितां बोला । कल्प गेले ॥ ६६ ॥
कां रिखि आणि देवां । येरां भूतजातां सर्वां ।
मीं चि आदि गा पांडवा । ह्मणौनि जाणतां अवघडु ॥ ६७ ॥
उतरलें उदक पर्वतु वळघे । तरि झाड सेंडाहूनि मुळासि लागे ।
तरि मियां जालेनि जगें । जाणिजे मातें ॥ ६८ ॥
गाभे वर्ने वडु झांकवे । नां तरि तरंगीं सागरु सांमावे ।

कां परमाणूमाझि सांटवे । भूगोलु हा ॥ ६९ ॥
तरि मियां जालेया जीवां । रिखीं अथवा देवां ।
मातें जाणावेया होआवा । अवकाशु गा ॥ ७० ॥
ऐसेनि जरि विषाएं । सांडूनि पुढील पाये ।
सर्वइंद्रियेंसिं होये । पाठिमोरा जो ॥ ७१ ॥
प्रवर्त्तलाही वेगीं वहुडे । झडकरि देह घालूनि मागिलीकडे ।
महाभूतांचेया चढे । माथेयावरि ॥ ७२ ॥

**यो मामजमनादिं च वेत्ति लोकमहेश्वरम् ।**
**असंमूढः स मर्त्येषु सर्वपापैः प्रमुच्यते ॥ ३ ॥**

जेथ राहौनि ठाके विवेकें । स्वयंप्रकाशें चोखें ।
अजत्व माझें देखे । आपुला डोलां ॥ ७३ ॥
तो पाखाणामाझि परिसु । जैसा रसाआंतु सिद्धरसु ।
मनुष्याआंतु अंशु । माझा जाणें ॥ ७४ ॥
तें चालतें ज्ञानाचें बिंब । तेयाचे अवेव ते सुखाचे कोंभ ।
परि माणूसपणाची भांभ । लौकिका भागु ॥ ७५ ॥
अवचटें कापुरा । माझि सांपडे हीरा ।
तर्‍हीं उदकीं पडलेयां नीरा । नांगवे तो ॥ ७६ ॥
तैसा मनुष्य लौकिकाआंतु । जर्‍हीं जाला प्राकृतु ।
तर्‍हीं प्रकृतिदोखांची मातु । नेणिजे तेथ ॥ ७७ ॥
तो आपभयें चि सांडिजे पापीं । जैसा चंदनु जलतां सर्पीं ।
तेवि मातें जाणे तो संकल्पीं । वर्जुनि घाली ॥ ७८ ॥
तें चि कैसें मातें जाणिजे । ऐसें कल्पी जरि चित्त तूझें ।
तरि मी ऐसा जे माझे । भाव आइक ॥ ७९ ॥
जें वेगलालां भूतीं । सारिखें होउनि प्रकृती ।
विकरलें असे त्रिजगतीं । आघवियें पैं ॥ ८० ॥

**बुद्धिर्ज्ञानमसंमोहः क्षमा सत्यं दमः शमः ।**
**सुखं दुःखं भवो भावो भयं चाभयमेव च ॥ ४ ॥**

प्रथम जाण बुद्धि । मग ज्ञान जें निरवधी ।
असंमोहो सहजसिद्धी । क्षमा सत्य ॥ ८१ ॥
मग शम दम दोन्हीं । सुखदुःख वर्ते जें जनीं ।
जन्मविनाशु मानीं । भावांमाझि ॥ ८२ ॥

**अहिंसा समता तुष्टिस्तपो दानं यशोऽयशः ।**
**भवंति भावा भूतानां मत्त एव पृथग्विधाः ॥ ५ ॥**

पैं भय आणि निर्भयता । अहिंसा हान समता ।
तुष्टि तप पांडुसुता । दान जें गा ॥ ८३ ॥
आगा येश कां अपकीर्त्ति । हे भाव जे वर्त्तति ।
ते मज चि पासाव होंति । भूतांचां ठाईं ॥ ८४ ॥
जैसीं भूतें आहाति सिनानीं । तैसें हें वेगळालें मानीं ।
एक उपजत माझां ज्ञानीं एक नेणति मातें ॥ ८५ ॥
प्रकाशु आणि कडवसें । हें सूर्या चि पासौनि जैसें ।
प्रकाशु उदयीं दीसे । तम अस्तुसवें ॥ ८६ ॥
आणि मातें जाणणें नेणणें । तें भूतांचेया दैवांचें करणें ।
ह्मणौनि भूतें भावांचें होणें । विषम पडे ॥ ८७ ॥
इयापरीं माझां भावीं । हे जीवसृष्टि आघवी ।
गुंतली असे जाणावी पांडुकुमरा ॥ ८८ ॥
आणि इये सृष्टिचे पालक । जेयां आधीन वर्त्तति लोक ।
ते अकरा भाव आणिक । सांघेन आइक ॥ ८९ ॥

**महर्षयः सप्त पूर्वे चत्वारो मनवस्तथा ।**
**मद्भावा मानसा जाता येषां लोक इमाः प्रजाः ॥ ६ ॥**

तरि आघवेयांसि वृद्ध । महर्षीमाझि प्रबुद्ध ।
कश्यपादि प्रसिद्ध । सतारिपि ॥ ९० ॥

आणिक ही सांगिजतील । चौदाआंतु मुदल ।
स्वयंभु मुख्य वडिल । च्यारि मनु ॥ ९१ ॥
ऐसे हे अकरा । माझां मनीं झाले धनुर्धरा ।
सृष्टिचेया व्यापारा । लागोनियां ॥ ९२ ॥
जैं लोकाचें व्यवस्थे न पडे । अहंभावाचा पैकु न मोडे ।
जैं महाभूताचें दळवाडें । अचुंबित आहे ॥ ९३ ॥
तैं चि हे आले । मग इहीं लोक केले ।
तेथ अक्षय होउनि ठेले । तेयांचे जन ॥ ९४ ॥
ह्मणौनि अकरा हीं राजां । एर जग यांचिया प्रजा ।
एवं विश्वविस्तारु माझा । ऐसा जाण ॥ ९५ ॥
पाहे पां आरंभीं बीज एकलें । तें चि विरुढलेयां बूढ जालें ।
बुढीं कोंभ फूटले । खांदियांचे ॥ ९६ ॥
खांदियांपासौनि देखां । फूटलिया शाखा ।
शाखातव देखां । पलुव पानें ॥ ९७ ॥
पालवीं फूल फळ । ऐसा वृक्षु होये सकळ ।
तें निर्द्धारिजे जवं केवळ । तवं बीज चि आघवें ॥ ९८ ॥
तैसें मी पहिलें । मग माझें मन तें वियालें ।
तेथ सतरिखी जाले । आणि च्यान्ही मनू ॥ ९९ ॥
तिहिं विविध लोक सृजिले । लोकीं लोकपाल वेगळाले ।
लोकपाळिं उपजविलें । प्रजाजात ॥ १०० ॥
ऐसेंनि विश्व हें एथें । मीं विस्तारलों हें निरुतें ।
भावांचेनि हातें । मानसाचेया ॥ १ ॥

**एतां विभूतिं योगं च मम यो वेत्ति तत्त्वतः ।**
**सोऽविकंपेन योगेन युज्यते नात्र संशयः ॥ ७ ॥**

यालागि पैं सुभद्रापती । हे भाव माझिया विभूती ।
आणि येया व्याप्ती । व्यापलें जग ॥ २ ॥

ह्मणौनि गा यापरीं । मज लागौनि पिपीलिकावेर्‍हीं ।
मीवांचूनि दूसरी । गोठि नाहिं ॥ ३ ॥
ऐसें जाणे जो साचें । तेया चेइरें जालें ज्ञानाचें ।
ह्मणौनि उत्तमाधमभेदाचें। स्वप्न हिं न देखे ॥ ४ ॥
मी माझिया विभूती । आणि विभूती अधिष्ठिलिया व्यक्ती ।
हें आववें योगप्रतीती । इयेची मानी ॥ ५ ॥
ह्मणौनि निःशंकें योगें । मज मीनला मनाचेनि आंगें ।
तेथ संशयो करणें न लगे । त्रिशुद्धी जाण ॥ ६ ॥

**अहं सर्वस्य प्रभवो मत्तः सर्वं प्रवर्तते ।**
**इति मत्वा भजंते मां बुधा भावसमन्विताः ॥ ८ ॥**

जैसें सूर्यें सूर्यातें वोवाळिलें । कां चंद्रें चंद्रेमेयांसि खेंव दीधलें ।
ना तरि सरिसेन पांडें मीनले । दोन्हीं वोव ॥ ७ ॥
तैसें प्रयाग होंत सामरस्याचें। वरि उपसाण तरंगत आहे सात्विकाचें ।
ते संवादचतुःपथिचे । गणेश जाले ॥ ८ ॥

**मच्चिता मद्गतप्राणा बोधयंतः परस्परम् ।**
**कथयंतश्च मां नित्यं तुष्यंति च रमंति च ॥ ९ ॥**

तेर्‍हां तेया महासुखाचेनि भरें । धाउनि निगति बोधें बाहिरें ।
मिया धाले तेणें उद्गारें। लागति गर्जों ॥ ९ ॥
पैं गुरुशिष्यसंबंधु येकांतीं । जेया अक्षरा एकाचीं वदंती ।
ते मेघाचेयापरीं त्रीजगतीं । गर्जत असे ॥ ११० ॥
जैसी कमलकलिका जालेपणें । हृदयींचेया मकरंदातें राहौं नेणें ।
ते राया रंका करी पारणें । आमोदाचें ॥ ११ ॥
तैसें मातें विश्विं कथित । कथितेनें तोखें कथू विसरत ।
मग तेया विसरलेयामाझि विरत । आंगें जीवें ॥ १२ ॥
ऐसें प्रेमाचेनि बौहवसपणें । नाहिं रात्रि दियो जाणणें ।
केलें माझें चि सुख आवडगें। आपणपेयांसि जिहिं ॥ १३ ॥

**तेषां सततयुक्तानां भजतां प्रीतिपूर्वकम् ।**
**ददामि बुद्धियोगं तं येन मामुपयांति ते ॥ १० ॥**

तेयां मग आह्मीं काहीं । अर्जुना देयावें पाइं ।
तें ठांइंचें चि तिहिं । सेळ घेतली ॥ १४ ॥
कां ते जिया वाटा । निगाले गा सूभटा ।
ते सोये पां येउनि अव्हांटा । स्वर्गापवर्ग ॥ १५ ॥
ह्मणौनि तिहिं प्रेम धरिलें । तें चि देणें येयां उपाइलें ।
परि यां देआवें तें इहीं चि केलें । आपणपें चि पैं ॥ १६ ॥
एयावरि एतुलें घडे । जें तें चि प्रेम आगळें वाढे ।
आणि काळाची दीठि न पडे । हें साम्य करणें ॥ १७ ॥
ल्लेयाचिया बाळका किरीटी ।
गवसणी घाढ्नु आपलेया स्नेहाची दीठी ।
जैसी खेळतां पाठोवाटी ।
माता निहाळी ॥ १८ ॥
तें जो जो खेळु दावी । तो तो सोनेयाचा करूनि ठेवी ।
तैसी उपास्तीची पदवी । मी पोखीतु जायें ॥ १९ ॥
जियें पदवियेचेनि पोखकें । ते मातें पावति सुखें ।
हे पाळति मज विशेषें । करुं आवडे ॥ १२० ॥
आगा या विश्वासि मी माझें कोड ।
मज तेयां अनन्यगतींची चाड ।
कां जें प्रेमळांचें सांकड ।
आमचां घरीं ॥ २१ ॥
पाहे पां स्वर्ग मोक्ष उपाइले ।
दोन्हीं मार्ग तेयाचिया चि वाहाणी आहाति ठेविले ।
आह्मीं आंग शेषा वेचिलें ।
लक्ष्मीयेसिं ॥ २२ ॥

परि आपणपें जें एक । तें सवियां वरवें साजूक ।
प्रेमलांलागि देख । ठेविलें जतनें ॥ २३ ॥
हा ठावो वेन्हीं किरिटी । आह्नि प्रेमळ वेओं आपणपेयांसाठीं ।
इया बोलिं या बोलिजति गोठी । तैसिया न्हवति ॥ २४ ॥

**तेषामेवानुकंपार्थमहमज्ञानजं तमः ।**
**नाशयाम्यात्मभावस्थो ज्ञानदीपेन भास्वता ॥ ११ ॥**

ह्मणौनि मज आत्मेयांचा भाउ । जिहिं जियाविया केला ठाउ ।
एकु मींवांचूनि एरु वाउ । केलें जिहीं ॥ २५ ॥
तेया तत्वज्ञाना चोखटा । दिवी पोतासाची सूभटा ।
मग मी चि होउनि दीवटा । पुढां चालें ॥ २६ ॥
अज्ञानाचिये रातीं । माजि तमाची मेहुडीं दाटती ।
तियें नाशौनि घालीं परौती । ऐसा उदो करीं ॥ २७ ॥
ऐसें प्रेमलांचेनि प्रियोत्तमें । बोलिलें पुरुषोत्तमें ।
तेथ अर्जुनु मनोधर्मे । निवालां ह्मणे ॥ २८ ॥

**अर्जुन उवाच ।**

**परं ब्रह्म परं धाम पवित्रं परमं भवान् ।**
**पुरुषं शाश्वतं दिव्यमादिदेवमजं विभुम् ॥ १२ ॥**

अहो जी अवधारां । भला केरु फीटला सवंसारा ।
जालां जननीजठरा । वेगला मी ॥ २९ ॥
जी जन्मलेपण आपुलें । आजि मिया डोलां देखिलें ।
आतां जी जीवित हातु चढलें । आवडे तैसें ॥ १३० ॥
आजि मुविये मुवण जाली । माझेया दैवांसि दशा उदैली ।
जें वाक्यकृपा लाधली । देविकेनि मुखें ॥ ३१ ॥
ऐणें वचनतेजकरें । फिटलें आंतु बाहीरील आंधारें ।
ह्मणौनि देखतसें साचोकारें । स्वरूप तूझें ॥ ३२ ॥
तरि होसि गा तूं परब्रह्म । जेयां महाभूतांसि विश्राम ।

तें निजद्धाम पवित्र परम । जगन्नाथा ॥ ३३ ॥
तूं परमदैवत तीहीं देवां । तूं पुरुषु जी पंचविसांवां ।
दिव्य तूं प्रकृतिभावां । पैलीकडीलु ॥ ३४ ॥
अनादि सिद्ध तूं स्वामी । नाकळिजसि जन्मकर्मी ।
तो तूं हें अजि आह्मीं । जाणीतलासी ॥ ३५ ॥
तूं काळयंत्रा सूत्री । तूं इये जीवकळे अधिष्टात्री ।
तूं ब्रह्मकटाहधात्री । हें कळलें फुडें ॥ ३६ ॥

**आहुस्त्वामृषयः सर्वे देवर्षिर्नारदस्तथा ।**
**असितो देवलो व्यासः स्वयं चैव ब्रवीषि मे ॥ १३ ॥**

पैं आणिकि ही एकीपरी । इयाची प्रतीति एतसे थोरी ।
जें मागां ऐसें चि रिषीश्वरीं । सांगितलें तूतें ॥ ३७ ॥
तें सांगितलेयाचें साचपण । हें देखत असे अंतष्करण ।
जें कृपा केली आपण । ह्मणौनियां ॥ ३८ ॥
यऱ्हवीं नारदु अखंड जवळा आहे ।
तो ऐसीं चि वचनें गाये ।
परि अर्थु न बुझों टाये ।
गीत चि आइकों ॥ ३९ ॥
जी आंधळेयाचां गावीं । जऱ्हीं आपणपें प्रकटलें रवी ।
तऱ्हि वोतपली चि तेयां होआवी । वांचूनि प्रकाशु नाहीं ॥ १४० ॥
यऱ्हवीं देवरिषि अध्यात्म गातां । आहाच रागेंसिं डमटतां ।
तें चि परिसवे येर चित्ता । नेये काहीं ॥ ४१ ॥
पैं असिता देवलाचेनि मुखें । मीं येंवविं तूतें आइकें ।
परि तैं बुद्धि विषयविषें । घारली होती ॥ ४२ ॥
आतां आणिकाचें नावं काइ घेयावें । आपण एउनि व्यासदेवें ।
तूझें स्वरूप आघवें । सर्वत्र सांगिजे ॥ ४३ ॥
देवा आंधारीं चिंतामणि देखिला । जेवि न्हवे ह्मणौनि उपेक्षिला ।

पाठिं दीनउदो मोटका जाला । मग होये ह्मणे ॥ ४४ ॥
तैसिं व्यासादिकांचीं बोलणीं । तिया मजपासीं रत्नाचिया खाणीं ।
परि उपेखया जांति वायाणी । तुजवीण देवा ॥ ४५ ॥
आतां वाक्यसूर्यकर फांकलें । आणि रिखिं मार्ग होंति जे कथिले ।
तेयां आघवेयांचें फीटलें अनोलखपण ॥ ४६ ॥
जीवनाचें बीं जेयांचे बोल । परि माझियेठांइं पडिले खोल ।
तें इये कृपेची जाली वोल । ह्मणौनि संवादफलेंसिं उठिलें ॥ ४७ ॥
कृष्णसंवादें । फूलीं आलें मकरंदें ।
तें फूल विनोदें । दीन्हलें मज ॥ ४८ ॥
आहो नारदादिकां संतां । तेयांचिया युतीस्वरूप सरिता ।
मीं महोदधि जालां अनंता । संवादसुखाचा ॥ ४९ ॥
प्रभू आघवेनिं जन्में । जियें पुण्यें केलीं मियां उत्तमें ।
तेयां न टकती चि कामें । सद्गुरू तुवां ॥ १५० ॥
एन्हविं वडिलांचेनि मुखें ।
एवंविधु तूतें आइकें ।
परि कृपा न कीजे चि तुवां एकें ।
तवं नेणिजे चि काहीं ॥ ५१ ॥
ह्मणौनि भाग्य जैसें सानुकुल । जालेयां जैसे उद्यम सफल ।
तैसें श्रुतादि सकल । गुरुकृपा साच ॥ ५२ ॥
जी बनकर झाडांसाठीं । पाहूनि जन्में काढी आटी ।
परि फलेंसीं तैं भेटी । जैं वसंतु पावे ॥ ५३ ॥
आहा जैं विषयां वोहटु पडे । जैं माधूर्य आवडे ।
रसायनें तेव्हांलि होंति गोडें । जैंव्हांलि आरोग्यता होये ॥ ५४ ॥
कां इन्द्रियें वाचा प्राण । यांचें जालेयां सार्थकपण ।
जैं चैतन्य एउनि आपण । संचरे माझि ॥ ५५ ॥
ऐसें शब्दजात आलोडिलें । अथवा योगादिक अभ्यासिलें ।

तें तैं चि ह्मणों ये आपुलें । जैं आज्ञा देति गुरु ॥ ५६ ॥

**सर्वमेतदृतं मन्ये यन्मां वदसि केशव ।**
**नहि ते भगवन्व्यक्तिं विदुर्देवा न दानवाः॥ १४ ॥**

ऐसिये जालिये प्रतीतीचेनि माजें । अर्जुनु निश्चयाचिं नाचतु भोजें ।
तेविं चि ह्मणे देवा तूझें । वाक्य मज मानलें ॥ ५७ ॥
तरि साच चि गा कैवल्यपती । मज त्रिशुद्धी आलें प्रतीती ।
जें तूं देवांदानवांचिया युक्ती । जो गा न्हवसि ॥ ५८ ॥
तूझीं वाक्यें न लगति देवा । जैसें आपुलेया जाणिजासि जाणिवा ।
तें काहिं नाहिं हें सद्भावा । भर्वसोनि आलें ॥ ५९ ॥

**स्वयमेवात्मनात्मानं वेत्थ त्वं पुरुषोत्तम ।**
**भूतभावन भूतेश देवदेव जगत्पते ॥ १५ ॥**

एथ आपुलें वाडपण जैसें । आपण चि जाणिजे आकाशें ।
मीं येतुली घनवट ऐसें । पृथ्वी नेणे ॥ ६० ॥
तैसा आपुलियां सर्वशक्ती । तूं जाणसि लक्ष्मीपती ।
एर वेदादिक मती । मिरवती प्रज्ञा वायां ॥ ६१ ॥
हां गा मनातें मागें सांडावें । पवनातें वावीं मवावें ।
आदिशून्य तें उतरोनि जावें । केउतें बाहीं ॥ ६२ ॥
तैसें तुझें जाणणें आहे । ह्मणोनि कोण्हा हीं टाकतें नोहे ।
आतां तूझें ज्ञान होये । तुज चि जोगें ॥ ६३ ॥
जी आपणेयातें तूं चि जाणासि । आणि सांवावेया समर्थु होंसि ।
तरि एकु वेळु घामु पूसीं । आर्त निडळिचा ॥ ६४ ॥
हें आइकिलेया किं भूतभावना । त्रिभुवनपंचानना ।
सकळदेवदेवतार्चना । जगन्नाथा ॥ ६५ ॥
जरि थोरा तूझी पांत आहे । तरि पासि उभे टाकोंवेया योग्यु नोहें ।
इया शोच्यता जरि भियें । तरि उपाऊ नाहीं आनु ॥ ६६ ॥

**वक्तुमर्हस्यशेषेण दिव्या ह्यात्मविभूतयः ।**
**याभिर्विभूतिभिर्लोकानिमांस्त्वं व्याप्य तिष्ठसि ॥ १६ ॥**

भरले सरिता समुद्र चहूंकडें । परि बापियांसि गा कोरडे ।
जैं मेघौनि थेंबटा पडे । तैं पारणें तेया ॥ ६७ ॥

तैसे गुरु सर्वत्र असति । परि कृष्णा तूं चि आह्मासि गति ।
विभूती सांवैं ॥ ६८ ॥

जी तूझिया चि विभूती । तिया चि परिव्यक्ती ।
दिव्या जिया आहाति । तिया दावि मातें ॥ ६९ ॥

जिहिं विभूतिं समस्तां । लोकांतें व्यापूनि असासि अनंता ।
तिया ब्रह्मनामांकिता । प्रकटा करीं ॥ १७० ॥

**कथं विद्यामहं योगिंस्त्वां सदा परिचिंतयन् ।**
**केषु केषु च भावेषु चिन्त्योऽसि भगवन्मया ॥ १६ ॥**

जी मियां कैसें तूतें जाणावें । काइ ह्मणौनि सदा चिंतावें ।
जरि चिंतूं ह्मणों आववें । तरि चिंतणें न घडे ॥ ७१ ॥

तरि मागां भाव जैसे । सांवितले तुवां उद्देशें ।
आतां विस्तारूनि तैसें । येकु वेळु सांवैं ॥ ७२ ॥

जेयां भावांचां ठांइं । तूतें चिंतितां मज सायास नाहिं ।
तो विवंचूनि देइं । योगु आपुला ॥ ७३ ॥

**विस्तरेणात्मनो योगं विभूतिं च जनार्दन ।**
**भूयः कथय तृप्तिर्हि शृण्वतो नास्ति मेऽमृतम् ॥ १८ ॥**

आणिक आपुलिया जिया विभूती ।
तिया ही बोलाविया भूतप्रती ।
एथ ह्मणसी पुडुतीं पुडुतीं ।
काइ सांवों ॥ ७४ ॥

तरि हा भावो मना । झनें हो देसि जनार्द्दना ।

जैसें करितां अमृतपाना । न ह्मणवे पुरे ॥ ७५ ॥
जें काळकुटाचें सहोदर । मरणाभेण पियाले अमर ।
तऱ्हीं देहाचे पुरंदर । चौदा जांति ॥ ७६ ॥
ऐसा एकु क्षीराब्धिचा वासु । जेयासि अमृतपणांचा आऱ्हासु ।
तेयाचा हा ठावोवेरि विश्वासु । जें पुरे ह्मणों नेंदी ॥ ७७ ॥
जें मंदराचल न ढळितां । क्षीरसागरु न डहुळितां ।
अनादि स्वभावता । आइतें चि आहे ॥ ७८ ॥
जें द्रवित नां बद्ध । जेथ नेणिजति रसभेद ।
भलेतेया ही सिद्ध । आठवलें चि फावे ॥ ७९ ॥
जेयाची गोडी आवडत खेओ । आघवाचि संसारु होये वाउ ।
बळियां नित्यता लागे एउ । आपणपेयां ॥ १८० ॥
जन्ममृत्यूची भाष । हारपोनि जाये निःशेष ।
आंतु बाहिरि महासुख । वाढों चि लागे ॥ ८१ ॥
मग दैवंगत्या जरि सेविजे ।
तरि तें आपण चि घेउनि टाकिजे ।
तुज ही देतां चित्त माझें ।
पुरे ह्मणों न शके ॥ ८२ ॥
तरि तूझें नाव चि जी आह्मां आवडे ।
वरि भेटि होये आणि जवळीक जोडे ।
पाठिं गोठि सांघसी मुरवाडें ।
सुखाचेनि ॥ ८३ ॥
आतां हें सुख काइसेया सारिखें । काहिं निर्वचेनां परितोखें ।
परि येतुलें होये जें येणें सुखें । पुनरावृत्ति नाहीं ॥ ८४ ॥
आगा सूर्यु कीं सीळा । चंद्रु ह्मणों पांतां आंकुचला ।
नीच वाहांतां गंगाजळा । काइ पारिसेपण आहे ॥ ८५ ॥

ययावरि तुह्मीं बोलिलें । हें आह्मीं नादासि किं रूप देखिलें ।
आजि चंदनतरूचीं फूलें । तुरंबिलीं आह्मीं ॥ ८६ ॥

**श्रीभगवानुवाच ।**

**हंत ते कथयिष्यामि दिव्या ह्यात्मविभूतयः ।**
**प्राधान्यतः कुरुश्रेष्ठ नास्त्यंतो विस्तरस्य मे ॥ १९ ॥**

एया पार्थाचेया बोला । सर्वांगिं कृष्णु डोलला ।
ह्मणे भक्तिज्ञानासि जाला । आधारु हा ॥ ८७ ॥
ऐसेया प्रीतिकराचेया तोषा आंतु । प्रेमाचा वेगु उपजतु ।
तो सायासें सावरितु अनंतु । काइ बोले ॥ ८८ ॥
जिया जाणितलेया चि साठीं । आघवें जाणितलें होये किरिटी ।
जें बीज आलेयां मुठी । तरु आला चि आहे ॥ ८९ ॥
कां उद्यानें हातिं पडिलें । तरि आपैसेया चि सांपडलीं फुलें ।
तेवि देखिलेयां जें देखवलें । विश्व सकळ ॥ १९० ॥
मी पितामहाचा पिता । आठविजां नाठवें चित्ता ।
किं ह्मणतसे पांडुसुता । भलें केलें ॥ ९१ ॥
अर्जुनातें ह्मणे येथ काहीं । आह्मा विस्मो करावेया कारण नाहिं ।
तो आंगें लेंकुरुं काइ । न्हवे चि नंदाचें ॥ ९२ ॥
परि प्रस्तुत हें असो । ऐसें करवी आवडिचा अतिसो ।
मग ह्मणे आइकें गा सांवितसों । धर्नुधरा ॥ ९३ ॥
तरि तुवां पूसिलिया जिया विभूति । तेयांचें अपारपण सुभद्रापती ।
जें माझिया चि माझिये मती । आकळति ना ॥ ९४ ॥
ह्मणौनि कैसा आहें मीं केवढा ।
पाहातां आपणपेया न्हवे चि फुडा ।
एयालागि प्रधान जिया मुख्य ।
तिया विभूति आइकें ॥ ९५ ॥

यऱ्हवीं साच चि गा धनुर्द्धरा । नाहीं अंतु माझेया विस्तारा ।
पैं गगना ऐसिया अपारा । मज चि माझि असणें ॥ ९६ ॥

**अहमात्मा गुडाकेश सर्वभूताशयस्थितः ।**
**अहमादिश्च मध्यं च भूतानामंत एव च ॥ २० ॥**

आइकें कुटिलालकमस्तका । धनुर्वेद त्र्यंबका ।
मी आत्मा असें एकैका । भूतमात्राचां ठांइं ॥ ९७ ॥
आंतुलीकडे मी चि आहे अंतष्करणीं ।
बाहीरि माझी चि गवसणीं ।
आदि मीं निर्वाणीं ।
मध्यें हीं मीं ॥ ९८ ॥
जैसें मेघांसि तळिवरि । एक आकाश चि आंतु बाहिरि ।
आणि आकाश चि जालें अवधारिं । असणेयासि ॥ ९९ ॥
पाठिं लया जेऱ्हलि जांति । तेऱ्हलि आकाश चि होउनि ठांति ।
तेवि आदिस्थितिगति । भूतांसि मीं ॥ २०० ॥
ऐसें व्हुवस व्यापकपण । माझे विभूतियोगें जाण ।
तरि जीवाचे करूनि श्रवण । सर्व ही आइक ॥ १ ॥
हें बोलोनि तो कृपावंतु । ह्मणे विष्णु मी आदित्या आंतु ।
रवि मियां रश्मिवंतु । सुप्रभा जो ॥ २ ॥

**आदित्यानामहं विष्णुर्ज्योतिषां रविरंशुमान् ।**
**मरीचिर्मरुतामस्मि नक्षत्राणामहं शशी ॥ २१ ॥**

मरुद्गणाचां भागिं । मरीचि ह्मणे मी शार्ङ्गि ।
चंद्रु मी गगन रंगीं । तारांमाझि ॥ ३ ॥

**रुद्राणां शंकरश्चास्मि वित्तेशो यक्षरक्षसाम् ।**
**वसूनां पावकश्चास्मि मेरुः शिखरिणामहम् ॥ २२ ॥**

अशेषां हिं रुद्रगणांमाझारि । शंकरु जो मी मदनारि ।
तो मीं गा एथ न करीं । भ्रांति काहीं ॥ ४ ॥

यक्षरक्षगणांआंतु । शंभूचा जो धनवंतु ।
तो कुबेरु मी अनंतु । ह्मणता जाला ॥ ५ ॥
आठां वसूंमाझारि । पावकु तो मीं अवधारीं ।
शिखराथिलेयां सर्वां उपरि । मेरु तो मीं ॥ ६ ॥

**वेदानां सामवेदोऽस्मि देवानामस्मि वासवः ।**
**इंद्रियाणां मनश्चास्मि भूतानामस्मि चेतना ॥ २३ ॥**

वेदांमाझि सामवेदु । तो मी ह्मणे गोविंदु ।
देवांमाझि प्रसिद्धु । महेंद्रु तो मीं । ॥ ७ ॥
इंद्रियांमाझि अकरावें । मन तें मीं जाणावें ।
भूतांमाझि स्वभावें । चेतना ते मीं ॥ ८ ॥

**पुरोधसां च मुख्यं मां विद्धि पार्थ बृहस्पतिम् ।**
**सेनानीनामहं स्कंदः सरसामस्मि सागरः ॥ २४ ॥**

जो स्वर्गसिंहासना साहो । सर्वज्ञते आदिचा ठाओ ।
पुरोहितांमाझि राओ । बृहस्पति मीं ॥ ९ ॥
त्रिभुवनिचेया सेनापती । आंतु स्कंदु तो मी महामती ।
जो हरवीर्यें अग्निसंगति । कृत्तिकां आंतु जाला ॥ २१० ॥
सकळां सरोवरां माझारि जाणसि । समुद्रु तो मीं जळराशि ।
महारिखीं माझि तपोराशि । भृगु तो मीं ॥ ११ ॥

**महर्षीणां भृगुरहं गिरामस्म्येकमक्षरम् ।**
**यज्ञानां जपयज्ञोऽस्मि स्थावराणां हिमालयः ॥ २५ ॥**

अशेषां हीं वाचां । आंतु नडनाचु जेथ सत्याचा ।
तें अक्षर मी वैकुंठिचा । वेल्हालु ह्मणे ॥ १२ ॥
समस्तां हिं यज्ञाचां पैकिं । जपयज्ञु तो मीं इये लोकिं ।
जो कर्मत्यागी कर्म्मादिकीं । निफजविजे ॥ १३ ॥
स्थावरां गिरिं आंतु । पुण्यपूंज्यु जो हिमवंतु ।
तो मीं ह्मणे कांतु । लक्ष्मीयेचा ॥ १४ ॥

**अश्वत्थः सर्ववृक्षाणां देवर्षीणां च नारदः ।**
**गंधर्वाणां चित्ररथः सिद्धानां कपिलो मुनिः ॥ २६ ॥**

कल्पद्रुमु हान पारिजातु । गुणें चंदनु पैं विख्यातु ।
तऱ्हीं वृक्षजातां आंतु । अश्वत्थु तो मीं ॥ १५ ॥
देवऋषीं आंतु पांडवा । नारदु तो मी जाणावां ।
चित्ररथु तो मीं गंधर्वी । सकळां माझि ॥ १६ ॥
अशेषां हीं सिद्धां । माझि कपिलाचार्यु प्रबुद्धा ।
तुरंगमां प्रसिद्धां । माझि उच्चैश्रवा तो मीं ॥ १७ ॥

**उच्चैःश्रवसमश्वानां विद्धि माममृतोद्भवम् ।**
**ऐरावतं गजेंद्राणां नराणां च नराधिपम् ॥ २७ ॥**

राज्यभूषणगजा आंतु । अर्जुना मीं गा ऐरावतु ।
पयोराशि सुमथितु । वियाला जेयातें ॥ १८ ॥
येयां नरा माझि राजा । तो विभूतिविशेषु माझा ।
जेयातें सकललोक प्रजा । होउनि सेविति ॥ १९ ॥

**आयुधानामहं वज्रं धेनूनामस्मि कामधुक् ।**
**प्रजनश्चास्मि कंदर्पः सर्पाणामस्मि वासुकिः ॥ २८ ॥**

पैं अशेषां हिं हातियरां । माझि वज्र तें मिं धनुर्द्धरा ।
जें शतमखोत्तीर्णकरा । हातीं असे ॥ २२० ॥
धेनू मध्यें कामधेनु । ते मीं ह्मणे विश्वेशानु ।
जन्मवितेयां आंतु मदनु । तो मीं चि जाण ॥ २१ ॥
सर्पकुला आंतु अधिष्ठाता । वासुकी तो मीं कुंतीसुता ।
नागां माझि समस्तां । अनंतु तो मीं ॥ २२ ॥

**अनंतश्चास्मि नागानां वरुणो यादसामहम् ।**
**पितॄणामर्यमा चास्मि यमः संयमतामहम् ॥ २९ ॥**

आगा यादसां आंतु । जो पश्चिमदिशेचा कांतु ।
तो मी ह्मणे अनंतु । वरुणु तो मीं ॥ २३ ॥

आगा पितृगणां समस्तां । अर्यमा जो पितृदेवता ।
तो मीं हें तत्वता । पांडुकुमरा ॥ २४ ॥
आगा जगाचीं शुभाशुभें लिहिति । प्राणांचा उगणां घेंति ।
मग केलेया अनुरूप देंती । स्वर्गमोक्षु जे ॥ २५ ॥
तेयां नियामितेयांतु यमु । जो कर्मसाक्षि धर्मु ।
तो मीं ह्मणे रामु । अर्जुनातें ॥ २६ ॥

**प्रऱ्हादश्चास्मि दैत्यानां कालः कलयतामहम् ।**
**मृगाणां च मृगेंद्रोऽहं वैनतेयश्च पक्षिणाम् ॥ ३० ॥**

आगा दैत्यांचां कुळीं । प्रह्लादु तो मी निहाळीं ।
ह्मणौनि द्वेष्यभावादिमळीं । लींपे चि ना ॥ २७ ॥
पैं कळितेयां माझि महाकाळु । तो मीं ह्मणे गोपाळु ।
स्वापदां आंतु शार्दूळु । तो माझें चि रूप ॥ २८ ॥
आगा पक्षजातीं माझारिं । गरुडु तो मीं अवधारिं ।
ह्मणौनि निभियाचिये पाठीवरी । वाहवें मीं ॥ २९ ॥

**पवनः पवतामास्मि रामः शस्त्रभृतामहम् ।**
**झषाणां मकरश्चास्मि स्रोतसामास्मि जान्हवी ॥ ३१ ॥**

पृथ्वीचेया पैसारा । माझि टाकितेया धर्नुद्धरा ।
येकें चि उडाणें स्वर्गांतरा । करिति जें कां ॥ २३० ॥
तेयां वहिलेयां आणि गतिमंतां ।
आंतु पवनु तो मीं पांडुसुता ।
शस्त्रधरां समस्तां ।
माझि रामु तो मी ॥ ३१ ॥
सांकडलेया धर्माचेनि कैवारें । आपणपेयां धनुप करुनि दुसरें ।
विजयलक्ष्मी एक मोहरें । केलें त्रेती ॥ ३२ ॥
पृष्टिं उभें ठाकौनि मुवेलीं । प्रतापें लंकेश्वराचां सिसाळीं ।
गगनीं उदो ह्मणतयां बलि । दीधली भूतां ॥ ३३ ॥

जेणें देवांचा मानु साधिला । धर्मासि जीर्णोद्धारु केला ।
सूर्यवंशीं उदैला । सूर्यो जो कां ॥ २४ ॥
तो हातियेरप्राजितेयां आंतु । रामचंद्रु जानकीयेचा कांतु ।
आणि मकरु मीं + त्तिवंतु । जळचरां माझि ॥ २५ ॥
पैं समस्तां वोघां । आंतु भागीरथी गंगा ।
ते जेन्हां गीळिली मग जांघा । फाडूनि दीन्हली ॥ २६ ॥
जे त्रिभुवनैकसरिता । जान्हवी मीं पांडुसुता ।
जळप्रवाहां समस्तां । माझि जाण ॥ २७ ॥

**सर्गाणामादिरंतश्च मध्यं चैवाहमर्जुन ।**
**अध्यात्मविद्या विद्यानां वादः प्रवदतामहम् ॥ ३२ ॥**

ऐसां वेगळालां सृष्टि पैंकिं । विभूति नाम स्तुतिं एकैकिं ।
सगळेनि जन्मसहस्त्रीं अवलोकीं । परि आर्धिया न्हवति गा ॥ २८ ॥
आगा आघवीं चि नक्षत्रें वेंचावीं ।
ऐसी चाड उपजे जीवीं ।
तैं गगनाची बांधावी ।
लोथ जेवि ॥ २९ ॥
कां पृथ्वीचेयां परमाणू उगाणा घेयावा । भूगोलु काखे सुआवा ।
तैसा हा विस्तारु माझा । तरि जाणावें मातें ॥ २४० ॥
जैं शाखा फूल फळ । घेऊं पाहिजे सकळ ।
तैं उपडूनु मूळ । हातिं घेपे ॥ ४१ ॥
तेवि माझे विभूतिविशेष । जाणों पाइजेति अशेष ।
तरि स्वरूप हें निर्दोष । जाणावें माझें ॥ ४२ ॥
यऱ्हवि वेगळालां विभूतीं । काइएक परियससी केती ।
ह्मणौनि एकहिला महामती । सर्व मीं जाण ॥ ४३ ॥
मी आघवेया सृष्टी । आदिमध्यअंतीं किरीटी ।
ओतप्रोत पटीं । तंतु जैसा ॥ ४४ ॥

एसेया व्यापका मातें जाणावें । तरि विभूतिभेदीं काइ करावें ।
परि हें तुज योग्य न्हवे । ह्मणौनि असो ॥ ४५ ॥
कां जें तूं माझेया विभूती । ह्मणौनि तिया आइकैं सुभद्रापती ।
तरि विद्यां माझि प्रस्तुतीं । अध्यात्मविद्या मीं ॥ ४६ ॥
आगा बोलतेयाचां ठाइं । वादु तो मी पाहीं ।
सकळें शास्त्रसमेत काहीं । सरेचिना ॥ ४७ ॥
जो निर्वचु करितां वाढे । आइकिलेयां उत्प्रेक्षे सळ चढे ।
जेयावरि बोलतेयांचीं गोडें । बोलणीं होंति ॥ ४८ ॥
तैसें पां प्रतिपादितेयां माझि वादु । तो मीं ह्मणे मुकुंदु ।
अक्षरां माझि विशदु । अकारु तो मीं ॥ ४९ ॥

**अक्षराणामकारोऽस्मि द्वंद्वः सामासिकस्य च ।**
**अहमेवाक्षयः कालो धाताहं विश्वतोमुखः ॥ ३३ ॥**

समासा माझारि । द्वंद्वु तो मीं अवधारीं ।
जो मशका लागौनि ब्रह्मावेन्हीं । ग्रासी तो मीं ॥ २५० ॥
जो प्रळयतेजा देतां मीठी । सगळेया पवनातें गीळीं किरीटी ।
आकाश जेयाचां पोटीं । सामावलें ॥ ५१ ॥
एसा अपारु जो कां काळु । तो मी ह्मणे लक्ष्मीलीळु ।
एया वरि सृष्टिचा मेळु । स्रजीं तो मीं ॥ ५२ ॥

**मृत्युः सर्वहरश्चाहमुद्भवश्च भविष्यताम् ।**
**कीर्तिः श्रीर्वाक्च नारीणां स्मृतिर्मेधा धृति क्षमा ॥ ३४ ॥**

आणि स्रजिलेयां भूतातें मीं चि धरीं ।
सकळां ही जीवन मी चि अवधारीं ।
शेवटीं सकळातें संहारीं ।
तेव्हळि मृत्यु ही मीं चि ॥ ५३ ॥
आतां स्त्रीगणाचां पैकीं । माझिया विभूति सात येकि ।
तेतीं आइक कवतिकीं । सांघिजति ॥ ५४ ॥

तरि सदा नवी जे कीर्त्ति । ते अर्जुना माझी मूर्त्ति ।
आणि औदार्याची संपति । ते ही मी चि जाण ॥ ५५ ॥
पैं स्थैर्यताअनुजिनी । मेधा ते मीं ये जनीं ।
धृति मी त्रिभुवनीं । क्षमा ते मीं ॥ ५६ ॥
एवं नारी माझारिं । इया सात शक्ती मीं अवधारीं ।
एसें संसारगजकेसरी । ह्मणता जाला ॥ ५७ ॥

**बृहत्साम तथा साम्नां गायत्री छंदसामहम् ।**
**मासानां मार्गशीर्षोऽहमृतूनां कुसुमाकरः ॥ ३५ ॥**

वेदराशिचेया सामां । आंतु बृहत्साम प्रियोत्तमा ।
तो मीं ह्मणे रमा— । प्राणेश्वरु ॥ ५८ ॥
आया गायत्रीछंद जें ह्मणिजे । सकळ छंदांमाझि जें ।
तें स्वरूप माझें । जाण निभ्रांत ॥ ५९ ॥
मासां आंतु मार्गशिरु । तो मीं ह्मणे सारंगधरु ।
रुतूं आंतु कुसुमाकरु । वसंतु तो मीं ॥ २६० ॥

**द्यूतं छलयतामस्मि तेजतेजस्विनामहम् ।**
**जयोऽस्मि व्यवसायोऽस्मि सत्त्वं सत्त्ववतामहम् ॥३६॥**

यां खेळतयां विंदाणां । माझि द्यूत मीं विचक्षणा ।
ह्मणौनि चोहटां चोवारा कवणां । वारुं नेये ॥ ६१ ॥
आगा सकळां हिं तेजसां । माझि तेज तें मीं भर्वसा ।
मीं कार्य उद्देशां । सकळां माझि ॥ ६२ ॥
जेणें चोखाळुती सन्याओ । तो व्यवसाया आंतु व्यवसाओ ।
माझें रूप हें ह्मणे राओ । सुरवरांचा ॥ ६३ ॥
सत्वाथिळेयां आंतु । सत्व तें मीं ह्मणे अनंतु ।
यां यादवां आंतु श्रीमंतु । तो मीं जाण पैं ॥ ६४ ॥

**वृष्णीनां वासुदेवोऽस्मि पांडवानां धनंजयः ।**
**मुनीनामप्यहं व्यासः कवीनामुशना कवि ः ॥ ३७ ॥**

जो देवकिये वसुदेवातव जाला । कुमारीसाठिं गोकुला नेला ।
प्राणु सकटुनि आटिला । पूतनेचा ॥ ६५ ॥
नुमटतां बालपणाची फूली । जेणें मियां अदानवी सृष्टि केली ।
करिं गिरिवरु धरुनि उमाणिली । महेंद्रमहिमा ॥ ६६ ॥
कालिंदियेचें हृदयशल्यु फेडिलें ।
जेणें मियां जलतें गोकुल राखिलें ।
वांसुरुवां साठिं लाविलें ।
विरिंची पिसें ॥ ६७ ॥
प्रथमदशेचिये अटाटे । माझि कंसा ऐसीं अचाटें ।
महा ढेंढीं अवचटें । लीला चि नाशिलीं ॥ ६८ ॥
हें काइ एक केतीं सांगावें । तुवां हिं देखिलें आइकिलें आघवें ।
तरि यादवां माझि जाणावें । हें चि रूप माझें ॥ ६९ ॥
आणि सोमवंसिचेयां पांडवां । माझि अर्जुनु तो मीं जाणावा ।
ह्मणौनि येकमेकाचेयां प्रेमभावां । सल चडतसे ॥ २७० ॥
मुनी आंतु व्यासु देउ । तो ह्मणे मीं यादवराउ ।
कविं आंतु धैर्या ठाउ । उशना कवि तो मीं ॥ ७१ ॥

**दंडो दमयतामस्मि नीतिरस्मि जिगीषताम् ।**
**मौनं चैवास्मि गुह्यानां ज्ञानं ज्ञानवतामहम् ॥ ३८ ॥**

आगा नियमितेयां माझारि । दंडु मीं अवधारिं ।
जो मुंगिये लागौनि ब्रह्मावेर्‍हीं । नीयमीतु असे ॥ ७२ ॥
पैं सारासार निर्द्धारितेयां । धर्मज्ञतेचा पक्षु धरीतेयां ।
सकलां शास्त्रां माझि येयां । नीतिशास्त्र तें मीं ॥ ७३ ॥
आघवेयां गूढां । माझि मौन मीं मुहाडा ।
ह्मणौनि बोलतेया पुढां । स्रष्टा ही नेणु होये ॥ ७४ ॥
आगा ज्ञानियांचां ठांइं । ज्ञान तें मीं पाहीं ।
आतां असो हें काहीं । पार नेदखों ॥ ७५ ॥

**यच्चापि सर्वभूतानां बीजं तदहमर्जुन ।**
**न तदस्ति विना यत्स्यान्मया भूतं चराचरम् ॥ ३९ ॥**

पाहिं पर्जन्याचिया धारां । लेख होईल धनुर्द्धरा ।
कां पृथ्वीचेया तृणांकुरां । होईल ठी ॥ ७६ ॥
नां तरि महोदधिचेयां तरंगां । व्यवस्था जेवि करुं नैये पैं गा ।
तेवि माझेयां वेखां गा । लेख नाहिं ॥ ७७ ॥
ऐसिया पांचसात प्रधाना । विभूती सांघितलिया अर्जुना ।
तो उद्देशु गा मना । आहाचु गमला ॥ ७८ ॥

**नांतोऽस्ति मम दिव्यानां विभूतीनां परंतप ।**
**एष तूद्देशतः प्रोक्तो विभूतेर्विस्तरो मया ॥ ४० ॥**

एऱ्हवि विभूति-विस्तारा काहिं । एथ सर्वथा लेख नाहिं ।
ह्मणौनि तूं परियससी काई । आह्मीं सांघों केती ॥ ७९ ॥
एया लागि येकी हेला तुज । दाऊं आतां वर्म निज ।
तरि सर्व भूतांकुरें बीज । विरूढतसे तें मीं ॥ २८० ॥
ह्मणौनि सानें थोर न ह्मणावें । उंच नीच भार सांडावे ।
एकु मी चि ऐसें जाणावें । वस्तुजात तें ॥ ८१ ॥

**यद्यद्विभूतिमत्सत्वं श्रीमदूर्जितमेव वा ।**
**तत्तदेवावगच्छ त्वं मम तेजोंऽशसंभवम् ॥ ४१ ॥**

आतां एया ही वरि साधारण ।
आइक पां आणिकि ही एक खूण ।
तरि अर्जुना तें जाण ।
विभूति माझी ॥ ८२ ॥
जेथ संपत्ति आणि दया । दोन्हीं आलि असति एका चि ठाया ।
ते ते जाण धनंजया । अंश माझे ॥ ८३ ॥
अथवा एकलें बिंब गगनीं । परि प्रभा फांके जेवि त्रिभुवनीं ।
तेसिं मज येकाचि सकल जनीं । आज्ञा पालिजे ॥ ८४ ॥

तेयातें एकलें हें झनें ह्मणा । तो निर्द्वंदु या भाषा नेणां ।
काइ कामधेनू सवें उगाणा । चालतसे ॥ ८५ ॥
तियेतें जेधवां जें जो मागे । तें ते एकसरें प्रसवों लागे ।
तेवि विभव तेया आंगें । होउनि आलें ॥ ८६ ॥
तेयातें ओळखावेयाची संज्ञा । जे नमस्कारिजेति आज्ञा ।
ऐसे ते आहाति प्राज्ञा । अवतार आमचे ॥ ८७ ॥
आणि एक सामान्य विशेष । हें जें जाणणें सदोष ।
जें मीं चि येकु अशेष । विश्व हें ह्मणौनि ॥ ८८ ॥
तरि आतां साधारणु आणि चांगु ।
ऐसा कैसा कल्पावा पां विभागु ।
वायां चि आपुलिये दीठी वंगु ।
भेदाचा लावावा ॥ ८९ ॥
एऱ्हविं तऱ्हीं तूप काइसेया गुसळावें ।
अमृत कां गाळुनु आधें करावें ।
हां गा पाउसीं काइ डावें ।
जेवणें आंग होये ॥ ९० ॥
पैं सूर्यबिंबासि पोटपाठि । देखतां नाशे आपुली दृष्टि ।
तेवि माझां स्वरूपिं गोठि । सामान्यविशेष चि ॥ ९१ ॥

**अथवा बहुनैतेन किं ज्ञातेन तवार्जुन ।**
**विष्टभ्याहमिदं कृत्स्नमेकांशेन स्थितो जगत् ॥ ४२ ॥**

आणि सिनानां विभूतीं । मज अपारातें मविसी केती ।
ह्मणौनि सुभद्रापती । असो हें जाणणें ॥ ९२ ॥
आतां पैं माझेनि येकें अंशें । जें हें जग चि व्यापलें असे ।
एया लागि भेदु सांडी सरिसें । साम्यें भज ॥ ९३ ॥
ऐसें बुधवनवसंतें । तेणें विरक्तांचेन कांतें ।
बोलिलें श्रीमंतें । कृष्णदेवें ॥ ९४ ॥

तेथ अर्जुनु ह्मणे स्वामी । येतुलें रहस्यें बोलिलें तुह्मीं ।
जें भेदु येकु आणिकु आह्मि । सांडावा तरि ॥ ९५ ॥
आहो सूर्यु ह्मणे जगातें । हें आंधारें दवडा कां परौतें ।
तेवि धसालु ह्मणे देवातें । तरि अधिकु जी बोलु ॥ ९६ ॥
तूझें नाम चि कोण्ही वेळे । जेयांचेया मुखाकानासि मिळे ।
तेयांचेया हृदयातें सांडूनि पवळे । भेदु जी हा ॥ ९७ ॥
चंद्रबिंबाचां गाभारां । रिगालेयां जरि उबारा ।
तैसें राभस्यें सारंगधरा । बोला तुह्मीं ॥ ९८ ॥
तेथ सवियां चि परि तोखौनि देवें ।
अर्जुनातें आलिंगिलें जीवें ।
मग ह्मणे तुवां न कोपावें ।
आमचेया बोला ॥ ९९ ॥
आह्मीं तुज भेदाचिया वाहाणीं ।
सांघीतली जे विभूतीची काहाणी ।
ते अभेदें अंतष्करणीं ।
मानली कीं न मने ॥ २०० ॥
हें चि पाहावेया लागि । बोलिलों बाहिर सवडिया भंगीं ।
तव विभूति तुज चांगी । आली बोधा ॥ १ ॥
तेथ अर्जुनु ह्मणे देवें । हें आपुलें आपण जाणावें ।
परि देखतसे आघवें । तुवां आरंभलें ॥ २ ॥
पैं राया तो पांडुसुतु । ऐसिये प्रतीतीचा जाला वरैतु ।
एया संजयाचेया बोला निवातु । धृतराष्ट्रु राहे ॥ ३ ॥
किं संजयो दुखवलेनि अंतष्करणें । ह्मणे नवल ना हें देवें दवडणें ।
हा आंतु मीं धडसा ह्मणे । तवं आंतु ही आंधळा ॥ ४ ॥
परि हें असो आतां तो अर्जुनु । अद्वैताचा वाढवीतसे मानु ।
किं तेया वरि आनु । विवंसा मांडला ॥ ५ ॥

म्हणे हे चि हृदया आंतुली प्रतीती ।
बाहिरि अवतरो कां डोळेया प्रति ।
यया चित्ताचां पाउलीं मती ।
उठिती जाली ॥ ६ ॥
मियां इहीं चि दोहीं डोळां । झोंबावें विश्वरूपा सकळा ।
येवढी हाव देवांगला । म्हणौनि करी ॥ ७ ॥
आजि तो कल्पतरूची शाखा । म्हणौनि वांझौळें न लागति देखां ।
जें जें येईल तेयाचेया मुखा । तें साच करितसे एरु ॥ ८ ॥
जो प्रल्हादाचेया बोला । विषयो ही सकळ आपण जाला ।
तो सद्गुरु असे जोडला । किरीटी तेया ॥ ९ ॥
म्हणौनि विश्वरूप पूसावेया लागि ।
पार्थु रिगता होईल कवणी भंगीं ।
तें सांधिजैल पुढिलिये कथाप्रसंगीं ।
म्हणे ज्ञानदेॐ निवृत्तिचा दासु ॥ ३१० ॥

ॐ ॥ तत्सदिति श्रीमद्भगवद्गीतासूपनिषत्सु ब्रह्मविद्यायां
योगशास्त्रे श्रीकृष्णार्जुनसंवादे **विभूतियोगो**
नाम दशमोऽध्यायः ॥

॥ श्रीकृष्णार्पणमस्तु ॥

# ज्ञानेश्वरी

## अध्याय अकरावा

श्रीगणेशायनमः ॥

आतां एयावरि एकादशीं । कथा आहे दोहीं रसीं ।
जेथ पार्था विश्वरूपेंसीं । भेटि होइल ॥ १ ॥
जेथ शांताचेया घरा । अद्भुतु आला आहे पाहुणोरा ।
आणि येरां हिं रसां पांतिकरां । जाला मानु ॥ २ ॥
वधुवरांचिये मीळणीं । जैसिं वन्हाडियां हिं लुगडीं लेणीं ।
तैसे देशिचिये सुखासनीं । मिरवले रस ॥ ३ ॥
परि शांताद्भुत बरवें । जेथ डोळेयांचा अंजुलिं घेयावें ।
जैसे हरिहर प्रेमभावें । आले खेवां ॥ ४ ॥
नातरि अवंसेचां दिसीं । भेटलीं दोन्हीं बिंबें जैसीं ।
तेवि येकवळा रसीं । केला जेथ ॥ ५ ॥
मीनले गंगेयमुनेचे ओघ । तैसें यां रसांचें जालें प्रयाग ।
ह्मणौनि सुस्नात होंत जग । आघवें एथ ॥ ६ ॥
मध्यें गीतासरस्वती गुपित । आणि दोन्हीं रस वोघ मूर्त्त ।
या लागि त्रिवेणी होये उचित । फावली बापा ॥ ७ ॥
एथ श्रवणाचेनि द्वारें । तीर्थि रिगतां सोपारें ।
ज्ञानदेओ ह्मणे दातारें । माझेनि केलें ॥ ८ ॥

तरि संस्कृताचीं गहनें । तोडूनि मऱ्हाटिया केलीं शब्दसोपानें ।
रचिलीं धर्मनिधानें । निवृत्तिदेवें ॥ ९ ॥
ह्मणौनि भलेतेणें एथ न्हावें । प्रयागीं माधवीं विश्वरूपातें पाहावें ।
एतुलेनि संसारा देयावें । तिळोदक ॥ १० ॥
हें असो ऐसें सावेव । जेथ सांसिनले आथि रसभाव ।
जेथ श्रवणसुखाची राणिव । जोडली जगा ॥ ११ ॥
जेथ शांताद्भुत रोकडे । आणि एरां रसां पडप जोडे ।
हें अल्प चि परि उघडें । कैवल्य जेथ ॥ १२ ॥
तो हा अकरावां अध्याउ । देवांचें आपणपें ठेविता ठाउ ।
परि कैसा सदैवांचा राउ । जें एथ हि पातला ॥ १३ ॥
आदिं अर्जुनु चि काइ ह्मणों पातला ।
आजि हा आवडतेया हि सुकाळु जाला ।
जें गीतार्थु हा आला ।
मऱ्हाटिया ॥ १४ ॥
एया चि लागि आतां माझें । विनविलें तें आइकिजे ।
तरि अवधान आतां दीजे । सज्जनीं तुह्मीं ॥ १५ ॥
आहो तेवि चि तुह्मां संतांचिये सभे ।
ऐसी सलगि करूं न लभे ।
परि मानावें जी लोभें ।
अपत्या मातें ॥ १६ ॥
आहो पूंसा आपण चि पढविजे ।
मग बोले तवं तवं माथा तूकिजे ।
कां करविलेनि चोजें न रिझे ।
बालका माए ॥ १७ ॥
तेवि मी जें जें बोलें । तें प्रभू तुमचें चि केलें ।
ह्मणौनि अवधारिजो आपुलें । आपण देवा ॥ १८ ॥

हें सारस्वताचें गोड । तुह्मीं चि लाविलें जी झाड ।
तरि अवधानामृतें वाड । सिंपौनि कीजो ॥ १९ ॥
मग हें रसभावफूलीं फुलैल । नाना फलभारें भरैल ।
तुमचेनि प्रसादें होइल । उपयोगु जगा ॥ २० ॥
येया बोला संत रिझले । ह्मणति तोखलों गा भलें केलें ।
आतां सांघैं जें बोलिलें । अर्जुनें तेथ ॥ २१ ॥
तवं निवृत्तिदासु ह्मणे । कृष्णा अर्जुनाचें बोलणें ।
मीं प्राकृतु काइ सांघों जाणें । परि बोलवाल तुह्मीं ॥ २२ ॥
आहो रानिचेयां पालेखाइरां । नेत्राणें करविलें लंकेश्वरा ।
एकला अर्जुनु परि अकरा । न जीणे क्षौणी ॥ २३ ॥
ह्मणौनि समर्थु होये साहाकारी । मान्हवे कैसें सचराचारीं ।
तुह्मीं संत तियापरीं । बोलवां मातें ॥ २४ ॥
तरि आतां बोलतसें आइकां । हा गीताअभिप्राउ नीका ।
जो वैकुंठनायका । मुखौनि निगाला ॥ २५ ॥
बापु ग्रंथु गीता । जो वेदीं प्रतिपाद्य देवता ।
तो श्रीकृष्णु वक्ता । जिये ग्रंथीं ॥ २६ ॥
तेथिचें गौरव कैसें वानावें । जें शंभूचिये मतीसि नांगवे ।
तें आतां नमस्कारिजे जीवें । हें चि भलें ॥ २७ ॥

**अर्जुन उवाच ।**

**मदनुग्रहाय परमं गुह्यमध्यात्मसंज्ञितम् ।**
**यत्त्वयोक्तं वचस्तेन मोहोयं विगतो मम ॥ १ ॥**

मग आइकां तो किरीटी । घालूनि विश्वरूपीं दीठि ।
पहिली कैसी गोठि । करिता जाला ॥ २८ ॥
हें सर्व ही सर्वेश्वरु । ऐसा प्रतीतिगतु जो पतिकरु ।
तो बाहिरि होआवा गोचरु । लोचनांसि ॥ २९ ॥

हे जीवाआंतुली चाड । परि देवा सांगतां सांकड ।
जें विश्वरूप गूढ । कैसेनि पूसावें ॥ ३० ॥
ह्मणे मागां कव्हणें काहीं । जें पढियंतेन पूसिलें नाहिं ।
तें सहसा कैसें पाहिं । सांघा ह्मणों ॥ ३१ ॥
मीं जऱ्हीं सलगीचा चांगु । तऱ्हीं काइ आयिसांहूनि अंतरंगु ।
परि तियें हीं हा प्रसंगु । पूसों भियालीं ॥ ३२ ॥
मजासिं स्नेहें कारिति बोली । परि नाहिं गरुडाचेया येतुली ।
तो ही सकट हे बोली । करुं न शके ॥ ३३ ॥
मी काये सनकादिकांहूनि आगला ।
पारि ते ही न करिती चि हा चाला ।
आणि आवडैन काइ प्रेमला ।
गोकुलिचेयांहूनि ॥ ३४ ॥
तेयांतें लेंकुरुपणें झांकविलें । एकांचे गर्भवास साहिले ।
पारि विश्वरूप हें राहविलें । दावि चि ना ॥ ३५ ॥
हा ठावावेऱ्हीं गुज । याचिये अंतरिचें निज ।
केवि उराउरीं मज । पूसों येईल ॥ ३६ ॥
आणि न पुसों जरि ह्मणें । तरि सुख न्हवैल अंतष्करणें ।
मग काइ करावें जीणें । जीउनि आह्मीं ॥ ३७ ॥
ह्मणौनि पूसों आतां अलुमालु ऐसें । मग करुं देवां ठाके तैसें ।
एणें प्रर्वत्तला साध्वसें । पार्थु बोलों ॥ ३८ ॥
परि तें चि ऐसेनि भावें । जैं येकां दों उत्तरांसवें ।
दावी विश्वरूप आघवें । झाडा देउनि ॥ ३९ ॥
जैसें वांसरुं देखिलेयां दीठी । धेनु खडपडौनि मोहें उठी ।
मग स्तनामुखाचिये भेटी । काइ पान्हा धरे ॥ ४० ॥
तैसा पांडवाचेनि नावें । जो कृष्णु रानीं येका धांवे ।
तेयातें जवं अर्जुनें पूसावें । तवं साहील काई ॥ ४१ ॥

तो साहाजें स्नेहाचें अवतरण । आणि येरु स्नेहा घातलें माजवण ।
ऐसियें मिळणी वेगळेपण । उरे हें चि बहु ॥ ४२ ॥
ह्मणौनि अर्जुनाचेया बोला सारिसा ।
देउ विश्वरूप होईल आपैसा ।
तो चि पहिला प्रसंगु कैसा ।
आइकिजो तरि ॥ ४३ ॥
मग पार्थु देवातें ह्मणे । जें तुह्मीं मजकारणें ।
वाच्य केलें बोलणें । कृपानिधी ॥ ४४ ॥
जें महाभूतें ब्रह्मीं आटति । जीव महदादिचे ठायें फीटति ।
तैं देउ होउनि जें ठांति । तें विसंवणें शेषिचें ॥ ४५ ॥
होंतें हृदयाचां परीवरीं । रोविलें कृपणाचिया परीं ।
शब्दब्रह्मासीं चोरी । जेयाची केली ॥ ४६ ॥
तें तुह्मीं जी आपुलें । मज पुढां हियें फोडिलें ।
जें अध्यात्म वोवालिलें । ऐश्वर्य हरें ॥ ४७ ॥
ते वस्तु मज स्वामीं । एकोहेळा दीधली तुह्मीं ।
हें बोलों ह्मणतों तरि आह्मीं । तूं पाहूनि कैंचें ॥ ४८ ॥
परि साच चि मोहाचां महापुरीं । बुडालेयां देखौनि सीसवेन्हीं ।
तूं आपणपें घातलें हरी । मग काढिलें मातें ॥ ४९ ॥
एकु तूंवांचूनि काहिं । विश्विं दूजेयाची भाष नाहिं ।
किं आमचें कर्म पाहीं । जें आहि आथि ह्मणों ॥ ५० ॥
मीं जगीं येकु अर्जुनु । ऐसा देहिं बांधें अभिमानु ।
आणि कौरवांतें यां स्वजनु । आपुला ह्मणें ॥ ५१ ॥
या ही वरि यांतें मीं मारीन । तेणें पापें कांइ करीन ।
ऐसें देखतु होंतां दुस्वप्न । तो चेवविलां तुह्मीं ॥ ५२ ॥
देवा गंधर्वनगरां वसती । टाकुनु गेलेयां लक्ष्मीपती ।
होंतां उदकाचिया आर्त्ती । रोहिणी पींतु ॥ ५३ ॥

जी कीडरं तरि कापडाचें । परि लाहरी येंत होती साचें ।
ऐसेनि वायां मरतेया जीविताचें । श्रेय तुवां घेतलें ॥ ५४ ॥
आपुलें बिंब नेदखतां । सिंहु कुहां घालील देखों आतां ।
ऐसा धरिजे तेवि अनंता । राखिलें मातें ॥ ५५ ॥
यऱ्हवीं तरि माझा एतुले वेऱ्हीं । येथ निश्चयो होता अवधारीं ।
जें आतां चि सातैं सागरीं । एकवाट मिळिजो ॥ ५६ ॥
हें युग चि आघवें बुडावें । वरि आकाश ही तूटौनि पडावें ।
परि जूझणें मज नोहावें । गोत्रेंसिं पैं ॥ ५७ ॥
ऐसिया अहंकाराचिया वाढी । मियां आग्रहजळिं दिधली बुडी ।
चांग चि जवळा तूं यऱ्हवीं काढी । कोण मातें ॥ ५८ ॥
नाथिलें आपणपें येक मानिलें ।
आणि ऱ्हवतेया नावं गोत्र ठेविलें ।
थोर पिसें होतें लागलें ।
परि राक्षिलां तुह्मीं ॥ ५९ ॥
मागां जळत काढिलों जौहरीं ।
तैं तें देहासी चि भय अवधारीं ।
आतां हे जौहरवाहर दुसरी ।
चैतन्या सकट ॥ ६० ॥
दुराग्रहें हिरण्याक्षें । माझि बुद्धि सूदली कक्षे ।
मग मोहार्णवगवाक्षें । रिगौनि ठेला ॥ ६१ ॥
एथ तूझेनि गोसांविंपणें । येकोल बुद्धीचेया ठाया येणें ।
हें दुसरें वराहो होणें । पडिलें तुज ॥ ६२ ॥
ऐसें ऐसें अपार तूझें केलें । एकी वाचा मीं काइ बोलें ।
परि जें पांचै पाळव मोकलिले । मजप्रति ॥ ६३ ॥
तें काहीं न वचे चि वायां । भलें यश फावलें देवराया ।
जें साचंतां माया । निरसिली आजी ॥ ६४ ॥

जी आनंदसरोवरिचीं कमळें । तैसे हे तूझे डोळे ।
आपुलेया प्रसादाचीं राउळें । जेया लागि करिति ॥ ६५ ॥
हां हो तेया ही आणि मोहाची भेटी ।
हे काइसी जी पावली गोठी ।
केउति मृगजळें वृष्टि ।
वडवानळेंसीं ॥ ६६ ॥
आणि मी तवं दातारा । इये कृपेचां रिघौनि गाभारां ।
घेंतसें चारा । ब्रह्मरसाचा ॥ ६७ ॥
तेणें माझा जी मोहो जाए । एथ विस्मो काइ आहे ।
परि उद्धरलां तूझे पाए । सितळे आथि ॥ ६८ ॥

**भवाप्ययौ हि भूतानां श्रुतौ विस्तरशो मया ।**
**त्वत्तः कमलपत्राक्ष माहात्म्यमपि चाव्ययम् ॥ २ ॥**

पैं कमळायतन डोळसा । सूर्यकोटितेजसा ।
मियां तुज पासौनि महेशा । परिसिलें आजि ॥ ६९ ॥
इयें भूतें जेया परीं होंति । अथवा ल्या हान जांति ।
ते मज पुढें प्रकृति । विवंचिली देवें ॥ ७० ॥
आणि प्रकृती कीरु उगाणा दीन्हला ।
परि पुरुषाचा ही ठाउ फेडिला ।
जेयाचा महिमा पांगुरौनि जाला ।
धडौता वेदु ॥ ७१ ॥
कां शब्दराशि वाढे जिये । कां धर्मा ऐसेयां रत्नातें विये ।
तें तेथिचिये प्रमेचे पाए । उलगे ह्मणौनि ॥ ७२ ॥
ऐसें अगाध माहात्म । जें सकळ मार्गा एकगम्य ।
जें स्वयं आत्मानुभवरम्य । तें इयापरीं दाविलें ॥ ७३ ॥
जैसा केरु फीटलेयां अभाळीं । दीठि रिगे सूर्यमंडळीं ।
कां हातें सारुनि वाबुळी । जळ देखिजे ॥ ७४ ॥

नां तरि उकलतेयां सापांचा वेढे । जैसें चंदना खेवं देणें घडे ।
अथवा विवसी पळे मग चडे । निधान हाता ॥ ७५ ॥
तैसी प्रकृति हे आड होंती । ते देवें चि सारुनि केली परौती ।
मग परतत्व माझिये मती । सेजार केलें ॥ ७६ ॥
ह्मणौनि इयें विखिंचा मज देवा । प्रत्यो घडला माझेया जीवा ।
परि आणिकु येकु हेवा । उपजतु असे ॥ ७७ ॥
तो भिडा जरि ह्मणों राहों । तरि आणिक कवणा सांघों जाऊं ।
काइ तुज वांचूनि ठाऊं । आणिकु असे ॥ ७८ ॥
जळचर जळाचा आभारु धरी ।
बाळक स्तनपानीं उपरोधी करी ।
तरि तेयासि जियावेया हरी ।
उपाऊ आणिकु असे ॥ ७९ ॥
ह्मणौनि भिड सांकडि न धरवे । आवडे ते तुज पुढां बोलावें ।
तवं राहे ह्मणितलें देवें । चाड सांघें ॥ ८० ॥

**एवमेतद्यथात्थ त्वमात्मानं परमेश्वर ।**
**द्रष्टुमिच्छामि ते रूपमैश्वरं पुरुषोत्तम ॥ ३ ॥**

मग बोलिला तो किरीटी । ह्मणे तुह्मीं जे केली गोठि ।
तिये प्रतीति दिठी । निवाली माझी ॥ ८१ ॥
आतां जेयाचेनि संकल्पें । हे लोकपरंपरा आरोपे ।
जेया ठायातें आपणपें । मीं गा ह्मणसी ॥ ८२ ॥
जें मूळस्वरूप तूझें । जेथौनि इयें द्विभुजें चतुर्भुजें ।
सोआंगें सुरकार्याचेनि व्याजें । घेऊं घेऊं येंसि ॥ ८३ ॥
जळसेनाचिया गवसणियां । मछ कूर्मु इया मिरवणियां ।
खेळु सरलेयां तुं गुणियां । सांटविसि जेथें ॥ ८४ ॥
उपनिषदें जें गाति । योगिये हृदइं रिगौनि पांति ।
जेयातें सनकादिक आहाति । पोटाळूनियां ॥ ८५ ॥

ऐसें अगाध जें तूझें । विश्वरूप कानीं आइकिजे ।
तें देखावेया चित्त माझें । उताविळ देवा ॥ ८६ ॥
देवें फेडूनियां सांकड । लोभें पूसिली जरि चाड ।
तरि हें चि एक वाड । आर्त्त जी मज ॥ ८७ ॥
तूझें विश्वरूप आघवें । माझिये दीठीसि गोचर होआवें ।
ऐसी थोर आश जीवें । घेतली असे ॥ ८८ ॥

**मन्यसे यदि तच्छक्यं मया द्रष्टुमिति प्रभो ।**
**योगेश्वर ततो मे त्वं दर्शयात्मानमव्ययम् ॥ ४ ॥**

पण एथ आणिक एक शारंगी ।
तुज विश्वरूपातें देखावेया लागि ।
योग्यता माझां आंगीं ।
असे किं नाहिं ॥ ८९ ॥
हें आपुलें आपण मीं नेणें । तें कां नेणासि जरि देउ॰ ह्मणे ।
तरि सरोगु काइ जाणे । निदान रोगाचें ॥ ९० ॥
आणि आर्त्तिचेंनि पडिभरें । आर्त्तु आपुली टाकि पां विसरे ।
जैसा तान्हेला ह्मणे न पुरे । समुद्र हा मज ॥ ९१ ॥
ऐसी सचाडपणाचिया भूलीं ।
न संभाली सवियां समस्या आपुली ।
यया लागि योग्यता माउली ।
बाळाची जाणे ॥ ९२ ॥
तेया परि जनार्दना । विचारिजो माझी संभावना ।
मग विश्वरूपदर्शना । उपक्रमु किजो ॥ ९३ ॥
तरि तैसी ते कृपा करा । एऱ्हवीं न्हवे ह्मणां अवधारां ।
वायां चि पंचमालापें बविरा । मुख केरतें देणें ॥ ९४ ॥

एऱ्हवीं एकलेया बापेयाचिये तृषे ।
मेघु जगा पुरतें काइ न वरिखे ।
परि ते ही वृष्टि उपखे ।
जरि खडकां वरि होए ॥ ९५ ॥
चकोरां चंद्रामृत फावलें । एरां आणवाउनि काइ वारिलें ।
परि डोलां विण पाहालें । वायां चि जाए ॥ ९६ ॥
ह्मणौनु विश्वरूप तूं सहसा । दाविसी किरु भरवसा ।
जें कां कडाडां आणि गर्हिसासा । नीच नवा तूं किं ॥ ९७ ॥
तूझें औदार्य जाणों स्वतंत्र । देंतां न ह्मणसि पात्रापात्र ।
न्हवे कैवल्य ऐसें पवित्र । वैरियां दीन्हलें ॥ ९८ ॥
मोक्षु दुराराध्यु किरु होये । परि तो ही आराधी तूझे पाये ।
ह्मणौनि धाडिसी तेथ जाये । पाइकु जैसा ॥ ९९ ॥
तुवां सनकादिकांचेनि मानें । सायुजीं सौरसु केला पूतने ।
जें विषाचेनि स्तनपानें । रुसली तुज ॥ १०० ॥
हां गा राजसूयाचां सभासदीं । देखतां त्रिभुवनिची मांदी ।
कैसा शतधा दुर्वादीं । निस्तेजिलासि ॥ १ ॥
किं तुवां तेया शिशुपाला । आपणपां ठाउ दीधला गोपाळा ।
आणि उत्तानचरणाचेया बाळा । काइ ध्रुवपदें चाड ॥ २ ॥
तो वना आला या चि लागीं । जें बैसावें पितेयाचां उत्संगीं ।
किं सूर्यादिकां लागीं । परि लिंगु जाला ॥ ३ ॥
ऐसा वनवासियां वश्यु जाला । देतां कवतिकिं तूं चि वेल्हाला ।
पुत्र पाहातां अजमीळा । परत्वानेसी मां ॥ ४ ॥
जेणें उरीं हालासि पांपरा । तेयाचे विनट वाहासि दातारा ।
अझुनि वैरियाचिया कलेवरा । विसंवसि ना ॥ ५ ॥
ऐसा अपकारियां तूझा उपकारु । तूं अपात्रीं हीं उदारु ।
दे दान ह्मणौनि दारवठेकारु । जालासि बळिचा ॥ ६ ॥

तूतें आराधितां नाइकें । होंती राउवें बोलाविति कवतिकें ।
तिये वैकुंठीं तुवां गणिके । सुरवाडु केला ॥ ७ ॥
ऐसा पाहों पाहों वायाणी मीसें ।
लागसि आपणपें देऊं वानिवसें ।
तो तूं कां अनारिसें ।
मज लागीं करिसी ॥ ८ ॥
हां गा दुभतेयाचेनि पवाडें । जे जगाचे फेडी सांकडें ।
तिये कामधेनूचे पाडे । भूखेले ठाति ॥ ९ ॥
ह्मणोनि विनविलें मियां काहीं ।
तें देऊं न दखविति हें किरु नाहिं ।
परि देखावेया पाहीं ।
पात्रता मज ॥ ११० ॥
तूझें विश्वरूप आकलें । ऐसें करावें गोपालें ।
तरी चि आर्त्तिचे डोहोले । पुरती देवा ॥ ११ ॥
ऐसी ठायेंठाऊं विनती । जवं करुं सरेली सुभद्रापती ।
तवं तेया षड्गुणचक्रवर्त्ती । साहवे चि ना ॥ १२ ॥

श्रीभगवानुवाच ।

**पश्य मे पार्थ रूपाणि शतशोऽथ सहस्रशः ।**
**नानाविधानि दिव्यानि नानावर्णाकृतीनि च ॥ ५ ॥**

तो कृपापीयूष सजलु । आणि येरु जवला आला वरिषाकालु ।
नाना कृष्णु तो कोकिलु । अर्जुनु वसंतु होए ॥ १३ ॥
ह्मणोनि चंद्रबिंब वाटुलें । देखोनि क्षीरसागरु उचंबलें ।
तैसा दुणे ही वरि प्रेमबलें । उल्हासितु जाला ॥ १४ ॥
मग तिये प्रसन्नतेचेनि आटोपें । गाजोनि ह्मणितलें सक्षेपें ।
पार्था देख उमपें । रूपें माझीं ॥ १५ ॥

एक चि विश्वरूप देखावें । ऐसा मनोरथु केला पांडवें ।
किं विश्वरूपमय आघवें । करूनि घातलें ॥ १६ ॥
बापु उदारु देउ अपरिमितु । याचक सवे सदोदितु ।
आहेंसें सहस्र वरि देंतु । सर्वस्व आपुलें ॥ १७ ॥
आहो शेषाचे डोळे चोरिले । वेद जेया लागिं झांकविले ।
लक्ष्मीये ही परि राहिलें । जिव्हार जें ॥ १८ ॥
तें आतां प्रकटूनियां अनेकधा । करीत विश्वरूपदर्शनांचा धोंधा।
बापु भाग्या अगाधा । पार्थाचेया ॥ १९ ॥
जो जागतां स्वप्नावस्थे जाए । तो जेवि स्वप्निचें आघवें चि होए ।
तें चि अनंत ब्रह्मकटाहो आहे । जें आपण जाला ॥ १२० ॥
ते चि सहसा मुद्रा सोडिली ।
आणि हे स्थूल दृष्टिची जवनीक फेडिली ।
किंबहुना उघडिली ।
योगनिधि ॥ २१ ॥
परि हा देखैल किं नाहिं । ऐसा से चि न करी काहिं ।
एकसरा ह्मणतसे पाहीं । स्नेहातुरु ॥ २२ ॥
अर्जुना तुवां एक दावा ह्मणितलें ।
आणि तें चि दाउं तरि काइ दाविलें ।
आतां देखैं आघवें भरलें ।
माझां चि रूपीं ॥ २३ ॥
एकें कृशें एकें स्थूलें । एकें ह्रस्वें एकें विशालें ।
एकें खुजीं एकें सरलें । अप्रांतें एकें ॥ २४ ॥
एकें अनावरें प्रांजलें । सव्यापारें येकें निश्चलें ।
उदासिनें स्नेहालें । तीव्रें एकें ॥ २५ ॥
एकें घूर्णितें सावधें । आसलगें एकें अगाधें ।
उदारें अतिबद्धें । क्रुद्धें येकें ॥ २६ ॥

एकें शांतें सदमदें । स्तब्धें एकें सानंदें ।
गर्जतें एकें निःशब्दें । सौम्यें एकें ॥ २७ ॥
एकें साभिलाषें विरक्तें । उन्निद्रें एकें निद्रितें ।
परि तुष्टें आर्त्तें । प्रसन्नें एकें ॥ २८ ॥
एकें सुपूजितें सशास्त्रें । संगाथिलीं स्वतंत्रें ।
रौद्रें अति मैत्रें । लयस्थें एकें ॥ २९ ॥
एकें जनलीलाविलासें । एकें पालनशीलें लालसें ।
एकें संहारकें सावेशें । साक्षिभूतें ॥ १३० ॥
एवं नानाविधें परि बहुवसें । आणि दिव्यतेजप्रकाशें ।
तेवीं चि येक येका ऐसें । वर्णि हिं नव्हे ॥ ३१ ॥
एकें तातलें साडपन्हरें । तैसीं कपिलवर्णें अपारें ।
एकें सरागें जैसीं सेंदुरें । डवरलें नभ ॥ ३२ ॥
एकें सवियां चि चुलकीं ।
जैसें ब्रह्मकटाह खेवणिलें माणिकीं ।
एकें अरुणोदया सारखीं ।
कुंकुमवर्णें ॥ ३३ ॥
एकें शुद्ध स्फटिकें सहोजलें । एकें इंद्रनीलसुनीलें ।
एकें अंजनवर्ण सकाळें । कृष्णवर्णें एकें ॥ ३४ ॥
ल्हासत कांचन पीवळें । एकें नवजलदश्यामळें ।
एकें चापेगोरें केवळें । हरितें एकें ॥ ३५ ॥
एकें तप्ततांम्रतांबडीं । एकें श्वेतचंद्रचोखडीं ।
ऐसीं नाना वर्णें रूपडीं । देख माझि ॥ ३६ ॥
हे जैसे कां नाना वर्ण । तैसें प्रकृतीं अनारिसेंपण ।
लाजा कंदर्पु रिगाला शरण । तैसिं सुंदरें रूपें ॥ ३७ ॥
एकें आयें लावण्यसाकारें । एकें देख अति मनोहरें ।
श्रिंगारश्रियेचीं भांडारें । उघडिलीं जैसीं ॥ ३८ ॥

एकें पीनावयव मांसलें । एकें सुघोरें अति करालें ।
एके दीर्घे कांतिविमलें । विकटें एकें ॥ ३९ ॥
एवं नाना विधा आकृती । या पांहातां पार नाहिं सुभद्रापती ।
यांचां एकीं आंगप्रांतीं । देख पां जग ॥ १४० ॥

**पश्यादित्यान्वसून्रुद्रानश्विनौ मरुतस्तथा ।**
**बहून्यदृष्टपूर्वाणि पश्याश्चर्याणि भारत ॥ ६ ॥**

जेथ उन्मीलन होंतसे दीठी । तेथ पसरत आदित्यांचिया सृष्टी ।
पुडुतीं निमिळिणी मीठी । देंत आहाति ॥ ४१ ॥
वदनाचिये वाफे सवें । होंत ज्वालामय आघवें ।
तेथ पावकादिक पावे । समूह वस्तूचें ॥ ४२ ॥
आणि भ्रूलतांचे सेवट । कोपें मीळों पांत येकवट ।
तेथ रुद्रगणाचे संघाट । अवतरत देखां ॥ ४३ ॥
पैं सौम्यतेचा वोलावा । मीति नेणिजे अश्विनौ देवां ।
श्रोत्रिं होंत पांडवा । अनेक वायु ॥ ४४ ॥
या परीं एकैकाचिये लीले । जन्मतें सुरसिद्धांचिं कुळें ।
ऐसिं अपारें आणि विशाळें । रूपें यें पाहे ॥ ४५ ॥
जेयातें सांघावेया वेद बोवडे । पाहावेया काळाचें आयुष्य तोकडें ।
धात्रेया ही परि न संपडे । ठावो जेयांचा ॥ ४६ ॥
जेयातें देवत्रयी कहिं नाइके । तियें इयें देख अनेकें ।
भोगिं आश्चर्याची कवतिकें । महासिद्धी ॥ ४७ ॥

**इहैकस्थं जगत्कृत्स्नं पश्याद्य सचराचरम् ।**
**मम देहे गुडाकेश यच्चान्यद्द्रष्टुमिच्छसि ॥ ७ ॥**

इयां मूर्त्तिचां किरीटी । रोममूळीं देख पां श्रृष्टि ।
पर्वतिं तरुतलवटीं । तृणांकुर जैसे ॥ ४८ ॥
आणि वातायनीं आकाशें । उडत परमाणु दीसति जैसे ।
भ्रमत ब्रह्मकटाह तैसे । अवेवसंधी ॥ ४९ ॥

एथ एकी चि प्रदेशीं । विश्व देख पां विस्तरेंसिं ।
आणि विश्वा परौतें मानासिं । देखावें वर्त्ते ॥ १५० ॥
परि ते ही विपिचें काहिं । एथ सर्वथा सांकडें नाहिं ।
सुखें आवडे तें माझां देहीं । देखसील तूं ॥ ५१ ॥
ऐसें विश्वमूर्त्ती तेणें । बोलिलें कारुण्यपूर्णें ।
तवं देखतु आहें कां न ह्मणे । निवांतू चि एरु ॥ ५२ ॥
एथ तें काइ पां हा उगला । ऐसा कृष्णें येवि पाहिला ।
तवं आर्त्तिचें लेणें लेइला । तैसा चि आहे ॥ ५३ ॥

**न तु मां शक्यसे द्रष्टुमनेनैव स्वचक्षुषा ।**
**दिव्यं ददामि ते चक्षुः पश्य मे योगमैश्वरम् ॥ ८ ॥**

मग ह्मणे उत्कंठें उ॒न्हटु न पडे ।
आझूइं सुखाचि सोय न संपडे ।
परि दाविलें तें फुडें ।
नाकळे चि येया ॥ ५४ ॥
ऐसें बोलौनि देउ॒ हांसिले । कां गा देखणेयां ह्मणितलें ।
आह्मीं विश्वरूप तरि दाखविलें । परि नेदखसि तूं ॥ ५५ ॥
यया बोला एरें विचक्षणें । ह्मणितलें हां जी तें कवणासि उणें ।
तुह्मीं बकाकरवि चांदिणें । । चरौं पाहा ॥ ५६ ॥
हां हो उटूनिया आरिसा । आंधलेया पुढें दाखउं बैसा ।
ना बहिरीसि हृषीकेशा । गाणें केउतें ॥ ५७ ॥
मकरंदकणाचा चारा । घालुं जांतां दर्दूरा ।
वायां धाडा मग सारंगधरा । कोपा कवणां ॥ ५८ ॥
जें अतींद्रिय ह्मणौनि व्यवस्थलें । केवळ ज्ञानें दिष्टिचेया भागा फीटलें ।
ते तुह्मीं चर्मचक्षू पुढां मूदलें । मग केसेनि देखों ॥ ५९ ॥
परि तें तुमचें उणें न बोलावें । मीं चि साहें तें बरवें ।
एथ आथि ह्मणितलें देवें । मानूं बापा ॥ १६० ॥

साच चि विश्वरूप आह्मीं दावावें ।
तरि आधिं देखावेया सामर्थ्य देयावें ।
परि तुज बोबांतां हिं प्रेमभावें ।
घसाळ गेलों ॥ ६१ ॥
काइ जालें न व्हातां भूमि पेरिजे ।
तरि तो वेलु किर सिकिलेयां जाइजे ।
आतां माझें निज देखिजें ।
ते दृष्टि देऊं ॥ ६२ ॥
मग तेया दृष्टी पांडवा । आमचा ऐश्वर्ययोगु आघवा ।
देखौनियां अनुभवा । माझिवडा करीं ॥ ६३ ॥
ऐसें वेदांतवेद्यें । सकळलोकआद्यें ।
बोलिलें आराध्यें । जगाचेनि ॥ ६४ ॥

संजय उवाच ॥

**एवमुक्त्वा ततो राजन् महायोगेश्वरो हरिः ।**
**दर्शयामास पार्थाय परमं रूपमैश्वरम् ॥ ९ ॥**

पैं कौरवकुळचक्रवर्त्ती । मज हा चि विस्मो पुडुतीं पुडुतीं ।
जें श्रियेहूनि त्रिजगतीं । सदैवं असे कवण ॥ ६५ ॥
ना तरि श्रुणेचें वानावेया लागि ।
श्रुती वांचूनि दावा पां जगीं ।
ना तरि सेवकपण आंगीं ।
शेषाचां असे ॥ ६६ ॥
हां हो याचेनि हिं सोसें । सीणति आठे पाहार योगिये जैसें ।
अनुसरलें गरुडा ऐसें । कोण्हीं आहे ॥ ६७ ॥
परि तें आघवें चि एकीकडे ठेलें । सांपें कृष्णसुखा एकंदरें जालें ।
जियें देउनि कां जन्मले । पांडव हे ॥ ६८ ॥

परि पांचां हिं आंतु अर्जुनां। कृष्णु सवियां चि जाला अधीना।
कामिकु जैसा अंगना। आपैता कीजे ॥ ६९ ॥
पढविलें पांखिरुं ऐसें न वोले।
या परीं क्रीडामृगु हि संदें न चळे।
कैसें दैवं एथ मुरवाडलें।
तें जाणवेना ॥ १७० ॥
आजि परब्रह्म हें सावलें। भोगावया सदैवाचे डोळे।
कां वाचेचे हान ळ्छे। पाळित कैसें ॥ ७१ ॥
हा कोपे तरि निवांतु साहे। हा रुसे तरि बुझावितु जाये।
नवल पीसें लागलें आहे। पार्थाचें कृष्णां ॥ ७२ ॥
येन्हवीं विषो जीणौनि जन्मले। जे शुकदेवादिक दादुले।
ते विषो चि वाणिते जाले। भाट येयाचे ॥ ७३ ॥
हा योगियांचें समाधिधन। किं होउनि ठेला पार्थाधीन।
यया लागि विस्मो माझें मन। करितसें राया ॥ ७४ ॥
तेवीं चि संजयो ह्मणे काइसा। विस्मो एथ कौरवेशा।
कृष्णें स्वीकरिजे तेया आपैसा। भाग्यउदो होए ॥ ७५ ॥
मग ह्मणे देवांचा राउ। आतां पार्था तुज ते दृष्टि देउं।
जिया विश्वरूपाचा ठाउ। देखसी तूं ॥ ७६ ॥
ऐसिं श्रीमुखौनि अक्षरें। निगति ना जवं एकसरें।
तवं अविद्येचें आंधारें। निगौनि गेलें ॥ ७७ ॥
मग दिव्य चक्षु प्रकटला। तैं ज्ञानदृष्टीं पाटा फूटला।
या परीं दाखविता जाला। ऐश्वर्य आपुलें ॥ ७८ ॥
हे अवतार जे सकळ। ते जियें समुद्रिचे कां कल्लोळ।
विश्व हें मृगजळ। जेयां रश्मीतव दीसे ॥ ७९ ॥
जियें अनादि भूमिके नीटे। चराचर हें चित्र उमटे।
तेणें आपणपें वैकुंठें। दाविलें तेया ॥ १८० ॥

मागां बाळपणें एणें श्रीपती । जे वेळु एकु खादली माती ।
तें कोपोनियां हातीं । यशोदा धरिला ॥ ८१ ॥
मग भेण भेण जैसें । मुखींचा झाडा देयावेयाचेनि मीसें ।
चौदा ही भुवनें अवकाशें । दाविलीं तियें ॥ ८२ ॥
नां तरि मधुवनीं ध्रुवासि केलें । जैसें कपोल शंखें सितलें ।
आणि वेदांचिये ही मती ठेलें । तें लागला बोलों ॥ ८३ ॥
तैसा अनुग्रहो पैं राया । श्रीहरी केला धनंजया ।
आतां कवणा कडे माया । ऐसी भाप नेणे तो ॥ ८४ ॥
एकसरें ऐश्वर्यतेजें पाहलें । तेया चमत्कारातव एकार्णव जालें ।
चित्त समजीं बुडालें । विस्मयाचां ॥ ८५ ॥
जैसा आब्रह्मपूर्णोदकिं । पव्हे मार्कडेयो एकाएकी ।
तैसा विश्वरूपीं कवतिकीं । पार्थु लोले ॥ ८६ ॥
ह्मणे केवढें गगन एथें होतें । तें कवणें नेलें पां परौतें ।
तियें चराचरें महाभूतें । काइ पां जालीं ॥ ८७ ॥
दिशांचे ठाये हारपले । अधोर्ध्व काइ नेणों जालें ।
चेइलेयां स्वप्न गेलें । लोकाकार ॥ ८८ ॥
नाना सूर्यतेजप्रतापें । चंद्रु तारांगण जैसिं लोपे ।
तैसिं गीळिलीं विश्वरूपें । प्रपंचांनि ॥ ८९ ॥
तेव्हलि मनासि मनपण न स्फुरे । बुद्धिसि आपणपें न संवरे ।
इंद्रियांचे रश्मि माघारे । हृदय वेव्हीं भरले ॥ १९० ॥
तेथ तटस्था तटस्थ पडिलें । ठकासि ठक मांडलें ।
जैसें मोहनास्त्र घातलें । विचारजातां ॥ ९१ ॥
तैसा विस्मितु पाहे कोडें । तंव पुढां चतुर्भुज होतें रूपडें ।
तें चि नानारूप चौहीं कडे । मांडोनि ठेलें ॥ ९२ ॥

अनेकवक्त्रनयनमनेकाद्भुतदर्शनम् ।
अनेकदिव्याभरणं दिव्यानेकोद्यतायुधम् ॥ १० ॥

जैसें वरिखाकालिचें मेहुडें । कां महाप्रलइचें तेज जेंव्हडें ।
तैसें आपणेनि विण कव्हणी कडे । नेदी चि उरों ॥ ९३ ॥
मग देखे तेथ सैंघ वदनें । जैसिं रमणिकाचीं राजभुवनें ।
नाना प्रकटलीं निधानें । लावण्यांचीं ॥ ९४ ॥
किं आनंदाचिं वनें सांसिनलीं । जैसी सौंदर्या राणीव जोडली ।
तैसिं मनोहरें देखिलीं । हरिवक्त्रें तेणें ॥ ९५ ॥
तेया हि माजि एकेकें । सवियां चि भयानकें ।
कालरात्रीचीं कटकें । उठावलीं जैसीं ॥ ९६ ॥
किं तियें मरणासीं चि मुखें जालीं ।
नां तरि भयाचिं दुर्गें पानासिलीं ।
महाकुंडें उघडिलीं ।
प्रलयानलाचीं ॥ ९७ ॥
तैसिं अद्भुतें भयासुरें । तेथ वदनें देखिलीं वीरें ।
आणिकें हीं साधारणें साकारें । सौम्यें हिं बहुतें ॥ ९८ ॥
पैं ज्ञानदृष्टीचेनि अवलोकें । परि वदनाचा सेवटु न टके ।
मग लोचन ते कवतिकें । लागला पाहों ॥ ९९ ॥
तवं नानावर्णें कमलवनें । विकाशलिं तैसिं अर्जुनें ।
डोलां देखिलीं पालिंगणें । आदित्यांचिं जैसिं ॥ २०० ॥
तेथ कृष्णमेघांचिया झांटी । माझि कल्पांतविजूंचिया फूटी ।
तैसिया वन्हीं पिंगला दीठी । भ्रुवां तलीं ॥ १ ॥
एकेक आश्चर्य पाहतां । तिये येकी चि रूपिं पांडुसुता ।
दर्शनाची अनेकता । प्रतिस्फालिली ॥ २ ॥
मग ह्मणे चरण ते कवणी कडे । केउते मुकुट दोर्दंडें ।
ऐसिं वाढविताहे कोडें । चाडा देखावेया ॥ ३ ॥
तेथ भाग्यनिधी पार्था । कां विफल होईल मनोरथा ।
काइ पिनाकपाणिचां भातां । वायकांडें आथि ॥ ४ ॥

ना तरि चतुराननाचिये वाचे । आहाति लटकेयां अक्षरांचे सांचे ।
ह्मणौनि सायंतपण अपाराचें । देखिलें तेणें ॥ ५ ॥
जेयाची सोये वेदां न कळे । तेयाचे अवयव एकें वेळें ।
अर्जुनाचे दोन्ही डोळे । भोगिते जाले ॥ ६ ॥
चरणौनि मुगुटु वेऱ्हीं । देखतु विश्वरूपाची थोरी ।
जे नाना रत्न अलंकारीं । मिरवतसे ॥ ७ ॥
परब्रह्म आपुलेनि आंगें ।
लेयाविया आपण चि जाला जियें अनेगें ।
तियें लेणीं मी सांवें ।
काइसेया सारिखिं ॥ ८ ॥
जिये प्रभेचिया झलाला । उजालु चंद्रा आदित्यमंडला ।
जें महातेजाचा जिवाला । जेणें विश्व प्रकटे ॥ ९ ॥
तें दिव्य तेज श्रिंगारु । तो कवणाचिये मती होईल गोचरु ।
देउ आपणपें लेइला तें वीरु । देखतसे ॥ २१० ॥
मग तो चि विज्ञानाचां डोळां । घाली करपल्लवां जवं सरलां ।
तवं तोडिति कल्पांतिचिया ज्वाला । तैसिं शस्त्रें देखिलीं ॥ ११ ॥
जेयाचेयानि किरणाचेनि खरेपणें । नक्षत्रांचे होंति फुटाणे ।
तेजें खिरडला वन्हि ह्मणे । समुद्रिं रिगों ॥ १२ ॥
कालकूटकल्लोलीं कवलिलें । नाना महा अविद्यांचें दांग उमटलें ।
तैसे अपार कर देखिले । उद्यतायुधीं ॥ १३ ॥

**दिव्यमाल्यांबरधरं दिव्यगंधानुलेपनम् ।**
**सर्वाश्चर्यमयं देवमनंतं विश्वतोमुखम् ॥ ११ ॥**

कि मेणें तेथौनि काढिली दीठी । मग कंठमुगुट पांतसे किरीटी ।
तवं सुरतरूंचिया सृष्टी । जेया पासौनि जालिया ॥ १४ ॥
जियें महासिद्धिचीं मूळपीठें । सीणली कमला जेथ वावेटे ।
तियें कुसुमें अति चोखटें । तुरंबिलीं देखिलीं ॥ १५ ॥

मुकुटां वरि स्तवक । ठांइं ठांइं पूजाबंध अनेक ।
कंठिं रूळताति अलौलिक । माळादंड ॥ १६ ॥
स्वर्गे सूर्यतेज वेढिलें । जैसें पन्हरेनि मेरुतें मढिलें ।
तैसें तें वरि गाढिलें । पीतांबर झळके ॥ १७ ॥
श्रीमहादेउ॰ कर्पुरें उटिला । कां कैलासु पारजें उवरिला ।
नाना क्षीराब्धि पांगुरविला । क्षीरोदकें ॥ १८ ॥
कां तरि चंद्र मेघाची घडी उकल्ली ।
मग गगना करवि त्रूंथि घेवविली ।
तैसी चंदनपिंजरी देखिली ।
सर्वांगीं तेणें ॥ १९ ॥
जेणें प्रकाशा कांति चढे । ब्रह्मानंदाचा दाघु मोडे ।
जें ब्रह्माचेनि जीवन सौरभ्यें जोडे । वेधवतिये ॥ २२० ॥
जेयांचें निर्लेपु अनुलेपन करी । जे निर्लेपु ही सर्वांगिं धरी ।
तेया सुगंधाची थोरी । कवण पां वानीं ॥ २१ ॥
ऐसी एकैक श्रिंगारशोभा । पाहातां अर्जुनु जांतसे क्षोभा ।
तेविं चि देउ॰ बैसला कीं उभा । शयानु हें नेणे ॥ २२ ॥
बाहिरि दीठि उघडूनि पाहे ।
तवं आघवें मूर्त्तिमय देखतु आहे ।
आणि न पाहों ह्मणौनि उगा चि राहे ।
तरि आंतु ही तैसें चि ॥ २३ ॥
विशाळ रूपें समोर देखे । तेया भेण पाठिमोरा जवं ठाकें ।
तवं तिकडें हीं श्रीमुखें । कर चरण तैसे चि ॥ २४ ॥
आहो पांतां किर प्रतिभासे । येथ नवळ सांघो पां कांइ असे ।
परि न पांतां हिं दीसे । चोज आइका ॥ २५ ॥
कैसें अनुग्रहाचें करणें । पार्थाचें पाहणें आणि न पाहणें ।
तेया ही मकट नारायणें । व्यापूनि घातलें ॥ २६ ॥

ह्मणौनि आश्चर्याचां पुरीं एकीं । पडिला ठायें ठाउ थडी टाकी ।
तवं चमत्काराचां आणिकिं । महार्णविं पडे ॥ २७ ॥
ऐसा अर्जुनु असाधारणें । आपुलेया दर्शनाचेनि विंदाणें ।
कवळौनि घेतला तेणें । अनंत रूपें ॥ २८ ॥
तो विश्वतोमुख स्वभावें । आणि तें चि दाखवावेया पांडवें ।
प्रार्थिला आतां आघवें । होउनि ठेला ॥ २९ ॥
आणि दीपें कां सूर्यें प्रकटे । अथवा निमुटिलेयां देखावें कुंठे ।
तैसी दीठि नव्हे जे वैकुंठें । दीधली आहे ॥ २३० ॥
ह्मणौनि किरीटीसि दोहिं परीं । देखावें पडतसे अवधारीं ।
हें संजयो हस्तिनापुरीं । सांघतसे राया ॥ ३१ ॥
ह्मणे किंबहुना अवधारिलें । पार्थें विश्वरूप देखिलें ।
नाना आभरणीं भरलें । विश्वतोमुख ॥ ३२ ॥

**दिवि सूर्यसहस्रस्य भवेद्युगपदुत्थिता ।**
**यदि भाः सदृशे सा स्याद्भासस्तस्य महात्मनः ॥ १२ ॥**

तिये अंगप्रभेचा हेवा । नवलाउ काइसेया सारिखा सांघावा ।
कल्पांतिं येकु चि मेळावा । द्वादशादित्यांचा ॥ ३३ ॥
तैसे ते दिवि सूर्य सहस्र वेन्हीं ।
जरि उदैजते कां येकिं अवसारें ।
तरि तेया तेजाची थोरी ।
उपमूं येंती ॥ ३४ ॥
आववेयां विजूंचा मेळावा कीजे ।
आणि प्रळयाग्नीची सर्व सांघणी सांधिजे ।
तेवि चि हेशकु ही मेळविजे ।
महातेजाचा ॥ ३५ ॥
तऱ्हीं तिये अंगप्रभेचेनि पाडें । हें तेजादि पैं थोडें ।
आणिक तेया ऐसें चोखडें । आन नाहिं ॥ ३६ ॥

ऐसें माहात्मेयां हरिचें साहाज । फांकत असे सर्वांगिचें तेज ।
तें मुनिकृपा जी मज । दृष्ट जालें ॥ ३७ ॥

**तत्रैकस्थं जगत्कृत्स्नं प्रविभक्तमनेकधा ।**
**अपश्यद्देवदेवस्य शरीरे पांडवस्तदा ॥ १३ ॥**

आणि तिये विश्वरूपिं येकि कडे । जग आवघें आपुलेनि पवाडें ।
जैसे समुद्रा माझि बुडडे । साने दीसति ॥ ३८ ॥
कां आकाशीं गंधर्वनगर । भूतलिं पिपीलिका बांधलें घर ।
नातरि मेरूवरि सपूर । परमाणु बैसले ॥ ३९ ॥
विश्व आघवें चि तिया परीं । तेया देवचक्रवर्तिचां शरीरीं ।
अर्जुनु तिये अवसरीं । देखता जाला ॥ २४० ॥

**ततः स विस्मया विष्टो हृष्टरोमा धनंजयः ।**
**प्रणम्य शिरसा देवं कृतांजलिरभाषत ॥ १४ ॥**

तेथ विश्वा एक आपण । ऐसें अलुमालु होंतें दूजेपण ।
तें आटौनि गेलें अंतष्करण । विरालें सहसा ॥ ४१ ॥
आंतु महानंदा चेइरें जालें ।
बाहीरि गात्रांचें बल हारपौनि गेलें ।
आपाद पां गुंतलें ।
पुलकांचलें ॥ ४२ ॥
वारिषियेचिये प्रथम दशे । वोहललेया शैलाचें सर्वांग जैसें ।
विरुढे कोवलां अंकुरीं तैसे । रोमांच आले ॥ ४३ ॥
सितला चंद्रकरीं । जैसा सोमकांतु पाल्हालु धरी ।
तैसिया स्वेदकणिका शरीरीं । दाटती असति ॥ ४४ ॥
माझि सांपडलेनि अलिउलें । जला वरि कलिका जेवि आंदोले ।
ते विश्वासोर्मीचेनि बलें । कांपतसे ॥ ४५ ॥
कर्पूरकदलिचीं गर्भपूटें । उकलति कर्पुराचेनि कोंधाटें ।
पुलिका गलति तेवि थेंबेंटे । नेत्रांनि पडति ॥ ४६ ॥

ऐसा सात्विका आठां हिं भावां । परस्परें वर्त्ततसे हेवा ।
तेथ ब्रह्मानंदाची जीवा । राणीव फावली ॥ ४७ ॥
उदैलेनि सुधाकरें । जैसा भरला चि समुद्रु भरे ।
तैसा वेळवेळां उर्मीभारें । उचंबळतसे ॥ ४८ ॥
तैसा तेया सुखानुभवा पाठिं । केला द्वैताचा सांभाळु दीठी ।
मग उससौनि किरीटी । वास पाहिली ॥ ४९ ॥
तेथ बैसला होंता जेया सवा ।
तेया चि कडें मस्तक खालविलें देवा ।
जोडुनु करसंपुटु बरवां ।
उत्तरीं बोलें ॥ २५० ॥

अर्जुन उवाच ।

**पश्यामि देवांस्तव देव देहे सर्वांस्तथा भूतविशेषसंघान् ।**
**ब्रह्माणमीशं कमलासनस्थं ऋषींश्चसर्वानुरगांश्च दिव्यान् ॥१५॥**

मग ह्मणे जय जय स्वामीं । नवल कृपा केली तुह्मीं ।
जें विश्वरूप आह्मीं । प्राकृतें देखों ॥ ५१ ॥
परि साच भलें केलें स्वामियां । मज परितोखु जाला गा सांवियां ।
जो देखिलासि मियां । इये सृष्टीसि आश्रो ॥ ५२ ॥
देवा मंदराचलाचेनि आंगलगें । ठांइं ठांइं स्वापदाचे थोगे ।
तैसिं तूझां देहीं अनेगें । देखतसें भुवनें ॥ ५३ ॥
आहो आकाशाचिये खोलें । दीसति ग्रहगणाचिं कुळें ।
कां महावृक्षांवरि आंविसाळें । पक्षजातींचीं ॥ ५४ ॥
तिया परीं श्रीहरी । तूझां विश्वात्मके इये शरीरीं ।
स्वर्ग देखतसे अवधारीं । सुरगणेंसिं ॥ ५५ ॥
प्रभूतांचें पंचक । एथ देखतसें मीं अनेक ।
वोत असे भूतग्रामक । भूतसृष्टीचें ॥ ५६ ॥

जी सत्यलोकु तुज माजि आहे । देखिला चतुराननु हा नोहे ।
आणि एक जवं पाहे । तवं कविलासु एथ आहे ॥ ५७ ॥
श्रीमहादेउ भवानि ऐसीं । तूझां देखत असे एकीं अंशीं ।
आणि तूतें गा रिखीकेशी । तुच माजि देखें ॥ ५८ ॥
पैं कश्यपादि ऋषिकुळें । यें तूझां स्वरूपीं सकळें ।
देखत असें पाताळें । पन्नगेंसिं ॥ ५९ ॥
किंवहुना कैवल्यपती । तूझेया अवयवा एकाचिये भींती ।
इयें चतुर्दश भुवनें तिये असती । आश्राइलीं जाणै ॥ ६० ॥
आणि तेथिचे जे जे लोक । ते चित्रचना अनेक ।
ऐसें देखतसें अलौकिक । गांर्भीर्य तूझें ॥ ६१ ॥

**अनेकबाहूदरवक्त्रनेत्रं पश्यामि त्वां सर्वतोऽनंतरूपम् ।**
**नांतं न मध्यं न पुनस्तवादिं पश्यामि विश्वेश्वर विश्वरूपम् ॥ १६ ॥**

यां दिव्यचक्षूचेनि पैसें । चौहींकडे जवं पाहांत असे ।
तवं दोर्दंडीं जैसें । आकाश कोंभैलें ॥ ६२ ॥
तसें एक निरंतर । देखतसें तूझे कर ।
करीति आवत्रे चि व्यापार । येकी काळीं ॥ ६३ ॥
मग महामुखाचेनि पैसारें । उतरलीं ब्रह्मकटाहाचिं भांडारें ।
तसिं देखतसें अपारें । उदरें तूझीं ॥ ६४ ॥
जी सहस्र-शीर्ष याचे डाखळे । कोडिवरि होंताति येकें वेळें ।
कां परब्रह्म चि वदनफळें । मोडौनि आलें ॥ ६५ ॥
तसिं वक्त्रें ज्येहुतीं तेउतीं । तूझीं देखतसें विश्वमूर्ती ।
आणि तेया चि परी नेत्रपंक्ती । अनेका सेव ॥ ६६ ॥
हें असो स्वर्गपाताळ । कां भूमि दिशा अंतराळ ।
हे विवक्षा टेली सकळ । मूर्त्तिमय देखतसें ॥ ६७ ॥
तुवां विण कोण्हीं दाडे । परमाणु हिं एतुला कोडें ।
अवकाशु पाहांत असे परी न संपडे । व्यापिलें ऐसें तुवां ॥ ६८ ॥

इयें नाना अपरिमितें । सांटविलीं होतीं महाभूतें ।
तेतुला ही पवाडु तुवां अनंतें । कोंदला देखें ॥ ६९ ॥
ऐसा कवणीं ठाउनि तूं आलासि ।
येथ बेठा कां उभा आहासि ।
आणि तूं कवणाचां पोटीं होंतासि ।
तूझें ठाण केवढें ॥ २७० ॥
तूझें रूप अवयव कैसे । तुज पैलीकडे काइ असे ।
तूं काइसेयावरि आहासि ऐसें । जवं पाहिलें मियां ॥ ७१ ॥
तवं देवा तूं चि । जाला असासि आवघें चि ।
तूं कोण्हाचा ही न्हवसि ! अनादिसिद्धु ॥ ७२ ॥
तूं उभा ना बैठा । दीर्घु ना खुजटा ।
तुज तलीवरि वैकुंठा । तूं चि आहासि ॥ ७३ ॥
तूं रूपें आपणपेयां आपणेयां चि ऐसा ।
देवा तूं चि तूझी वयासा ।
पाठि पोट परेशा ।
तूझें चि तूं ॥ ७४ ॥
किंवहुना आतां । तुज तूं चि अनंता ।
हें पुडुतीं पुडुतीं पाहांतां । देखिलें मियां ॥ ७५ ॥
परि तूझेया रूपा आंतु । जी उणीव एकि असे देखतु ।
जें आदि मध्य अंतु । यें तीन्हीं नाहिं ॥ ७६ ॥
येन्हविं गिवसलेयां आघवां चि ठांइं ।
परि सोय नेदखें चि केहीं ।
ह्मणौनि त्रिशुद्धी हें नाहिं ।
तीन्हीं एथ ॥ ७७ ॥
एवं आदिमध्यांतरहिता । विश्वेश्वर अपरिमिता ।
तूं देखिलासि जी तत्वता । विश्वरूपा ॥ ७८ ॥

तुज महामूर्त्तिचां आंगीं । उमटलिया मूर्त्ती अनेगी ।
लेइलासि वाणे परिची आंगीं । ऐसा आवडतु आहासि ॥७९॥
हो काज महोदधी तूं देवा । जालासि तरंगमूर्त्ती हेलावा ।
किं तूं वृक्षु येकु बरवा । मूर्त्तिफळीं फळलासि ॥ २८० ॥
जी भूतळ भूरहीं मांडलें । जैसें नक्षत्रीं गगन गूढलें ।
तैसें मूर्त्तिमय भरलें । तूझें देखतसें रूप ॥ ८१ ॥
जी येकेकाचां आंगप्रांतीं । हों जाऊं पुरतसे त्रिजगतीं ।
एवाडिया तूझां आंगीं मूर्त्ती । रोमा जालिया ॥ ८२ ॥
ऐसा पवाडु मोडौनि विश्वाचा । तूं कोणु पां एथ कैंचा ।
ऐसें पाहे तवं आमचा । सारथी तो तूं ॥ ८३ ॥
तरि मज पांतां मुकुंदा । तूं ऐसा चि व्यापकु सर्वदा ।
मग भक्तानुग्रहें तेयां मुग्धां । रूपातें धरीसि ॥ ८४ ॥
केसें चौ भुजांचें सावळें । पाहातां वोल्हावति मनडोळे ।
खेऊं देऊं जाइजे तरि आकळे । दों चि भुजीं ॥ ८५ ॥
ऐसा कोडिसवाणा तूं बापा । होंसि पैं विश्वरूपा ।
किं आमचेया दीठी स्वल्पा । जें तुतेयां धाकुटें देखों ॥ ८६ ॥
तरि आतां दीठिचा विटाळु गेला ।
तुवां साहाजें दिव्य ज्ञानीं सौरसु केला ।
ह्मणौनि महिमा देखता जालां ।
रूपांचा तूझा ॥ ८७ ॥
परि मकरतोंडा मागिलीकडे । होंतासि तो तूं चि येवडें ।
रूप जालासि हें फुडें । ऊलखिलें मियां ॥ ८८ ॥

**किरीटिनं गदिनं चक्रिणं च तेजोराशिं सर्वतो दीप्तिमंतम् ।**
**पश्यामि त्वां दुर्निरीक्ष्यं समंताद्दीप्तानलार्कद्युतिमप्रमेयम् ॥ १७ ॥**

नोहे तो चि हा शिरीं । मुकुटु लेइलासि हरी ।
पुणु आतां चि तेज आणि थोरी । नवल किर वहुवेंस ॥ ८९ ॥

तें चि हें वरिलीं हातीं । चक्र परिजितेया आइतीं ।
संवरितासि विश्वमूर्त्ती । ते न मोडे खुण ॥ २९० ॥
एरीकडे ते चि हे न्हवे गदा ।
आणि तळिली दोन्हीं भुजा निरायुधा ।
वागोरे संसारात्रेया गोविंदा ।
सवंसारिलिया ॥ ९१ ॥
आणि तेणें चि वेगें सहसा । माझेया मनोरथा सरिसा ।
जालासि विश्वरूप विश्वेशा । ह्मणोनि जाणें ॥ ९२ ॥
परि काइसें बापा हें चोज । विस्मो करावेया मज ।
चित्त होउनि जात निर्बूज । आश्चयपणें ॥ ९३ ॥
एथ आथि कां नाहिं । ऐसें विवंरू नेये पाहिं ।
नवळ अंगप्रभेची नवळाई । कोंदली सेव ॥ ९४ ॥
एथ अग्निची दीठि करपत । सूर्य कोडि एक हारपत ।
एसणें तीव्रपण अद्भूत । तेजाचें येया ॥ ९५ ॥
हों काज प्रकाशाचां महार्णवीं । बुडोनि गेली सृष्टि आघवी ।
किं युगांतविद्यूचां पालवीं । झाकोळलें गगन ॥ ९६ ॥
नाना संहारतेजाचिया ज्वाला । तोडूनि मांचु बांधला अंतराळा ।
आतां दिव्य ज्ञानाचां हिं डोळां । पाहावे ना ॥ ९७ ॥
उजाळु अधिका अधिकु बहुवसु । धडाडितु असे अतिदासु ।
पडतु दिव्य चक्षूसि त्रासु । निहाळितां ॥ ९८ ॥
नातरि महातेजाचा भडाडु । होंता काळाग्निरुद्राचां ठाइं गूढु ।
तो तृतीय नेत्राचा मढु । फूटला जेसा ॥ ९९ ॥
तेसें पसरलेनि प्रकाशें । पांचवनेया ज्वाळांचे वेळसे ।
पडतां ब्रह्मकटाह कोळिसे । होंत दीसति ॥ ३०० ॥
ऐसा अद्भुतु तेजोराशि । जन्मा नवलु मियां देखिलासि ।
नेणवे व्याप्ति जी केसी । पार तूझें ॥ १ ॥

त्वमक्षरं परमं वेदितव्यं त्वमस्य विश्वस्य परं निधानम् ।
त्वमव्ययः शाश्वतधर्मगोप्ता सनातनस्त्वं पुरुषो मतो मे ॥ १८ ॥

देवा तूं अक्षर । आउठाविये मात्रेसि पर ।
श्रुती जयाचे घर । गिवसिती आहाति ॥ २ ॥
जें आकाराचें आयतन । जें विश्वनिक्षेपैकनिधान ।
तें अव्यक्त तूं गहन । अविनाश जी ॥ ३ ॥
तूं धर्माचा वोलावा । अनादिसिद्ध तूं नीच नवा ।
मीं जाणें सततीसावां । पुरुषुविशेषु पुडा ॥ ४ ॥

अनादिमध्यांतमनंतवीर्यमनंतबाहुं शशिसूर्यनेत्रम् ।
पश्यामि त्वां दीप्तहुताशवक्त्रं स्वतेजसा विश्वमिदं तपंतम् ॥१९॥

तूं आदिमध्यरहितु । स्वसामर्थ्यें तूं अनंतु ।
विश्वबाहु अपरिमितु । विश्वचरणु ॥ ५ ॥
पैं चंद्रचंडांशु डोळां । दावितासि कोपप्रसादलीला ।
एका रुससि गोपाला । एकें पाळीसि तूकें ॥ ६ ॥
जी एवंविधु तूतें । मीं देखतसे हें निरुतें ।
पेटलें प्रलयाग्निचें उजितें । तैसें वक्त्र हें तुझें ॥ ७ ॥
निहेटले पर्वत । कवळूनि ज्वाळाचे उभडु ऊठित ।
तैसे चाटित दाढ दांत । जीभ लळे ॥ ८ ॥
इये वदनिचिया उवा । आणि सर्वां आंगकांतिचिया प्रभा ।
विश्व तातलें अतिक्षोभा । जांत असे ॥ ९ ॥

द्यावापृथिव्योरिदमंतरं हि व्याप्तं त्वयैकेन दिशश्च सर्वाः ।
दृष्ट्वाद्भुतं रूपमुग्रं तवेदं लोकत्रयं प्रव्यथितं महात्मन् ॥ २० ॥

जें कां द्यौर्लोकपाताळ । पृथिवी हान अंतराळ ।
अथवा दिशा विदिशा समाकुळ । दिशाचक्र ॥ ३१० ॥
हें आघवें चि तुवां एकें । भरलें देखतुसें कवतुकें ।
परि गगन हीं सकट भयानकें । आप्लविजे जेवि ॥ ११ ॥

नातरि अद्भुतरसाचां कल्लोळीं । जाली चौदा भुवनासि कडियाली ।
तैसें आश्चर्य हें कळीं । कैसेनि मीं ॥ १२ ॥
जी नावरे व्याप्ति असाधारण । न साहे तेजाचें उग्रपण ।
सुख दूरि गेलें परि प्राण । विपायें धरी जग ॥ १३ ॥

**अमी हि त्वा सुरसंघा विशंति**
**केचिद्भीताः प्रांजलयो गृणंति ।**
**स्वस्तीत्युक्त्वा महर्षिसिद्धसंघाः**
**स्तुवंति त्वां स्तुतिभिः पुष्कलाभिः ॥ २१ ॥**

देवा देखोनिया तूतें । नेणों कैसें भयासि आलें भारितें ।
आतां दुःखकल्लोळीं झळंवतें । तीन्हीं भुवनें ॥ १४ ॥
यऱ्हवीं तुज महात्मेयांचें देखणें ।
तरि भयदुःखा होआवें मेल्हावणें ।
परि हें नव्हैल जेणें गुणें ।
तें जाणवलें मज ॥ १५ ॥
जवं तूझें रूप नोहे दीठें ।
तवं जगा संसारिक गोमटें ।
मग आतां देखिलासि तरि विषय—विटें ।
उपनला त्रासु ॥ १६ ॥
तेवीं चि तूतें देखिलेयां साठीं । काइ सहसा देऊं येईल मीठी ।
आणि नेदीं तरि संकटीं । राहों केवि ॥ १७ ॥
ह्मणौनि मागां तवं सवंसारु । काढत येंतसे अनिवारु ।
आणि पुढां तवं अपारु । नेयेसि घेऊं ॥ १८ ॥
ऐसा माझारिलीं सांकडां । सांपडलेयां त्रैलोक्याचा होंतु हुरडा ।
हा वन्हि जी फुडा । चोजवला मज ॥ १९ ॥
जैसा आरंवळला आगी । समुद्रासि ये निवावेया लागि ।
तवं पाणियांचां तरंगीं । अधिका भिये ॥ ३२० ॥

तैसें जगासि जी जाळें । तूतें देखौनि तळमळीत ठेलें ।
यां माझि पैल भलें । हे ज्ञानियांचे मेळावे ॥ २१ ॥
हे तूझेनि चि अंगिकें तेजें । जाळूनु सकळ कर्म्मांचीं बीजें ।
मिळति तुज आंतु नीजें । सद्भावेंसि ॥ २२ ॥
आणि हें सवियां चि भयभीर । सर्वस्वें धरूनि तूझी मोहर ।
पार्थिताति कर । जोडूनियां ॥ २३ ॥
देवा थोरी मोहार्णवीं पडिलों । विषयवागुरें आंतुडलों ।
स्वर्गसंसाराचां सांपडलों । दोहिं आंगिं ॥ २४ ॥
ऐसें आमचें सोडवणें । तुज वांचौनि कीजैल कवणें ।
तुज शरण आलों सर्वप्राणें । ह्मणत देवा ॥ २५ ॥
आणि महारिखी अथवा सिद्ध । कां विद्याधरसमूह विविध ।
हे तुज बोलस्वस्तिवाद । करिताति स्तुती ॥ २६ ॥

**रुद्रादित्या वसवो ये च साध्या विश्वेऽश्विनौ मरुतश्चोष्मपाश्च ।**
**गंधर्वयक्षासुरसिद्धसंघा वीक्षंते त्वां विस्मिताश्चैव सर्वे ॥ २२ ॥**

हे रुद्रादित्यांचे मेळावे । वसु हान साध्ये विश्वे ।
अश्विनौ देव आघवे । वायु हे जी ॥ २७ ॥
अवधारां अग्नि हान गंधर्व । पैल रक्षोगण सर्व ।
जी महेंद्र–मुख्य देव । कां सिद्धादिक ॥ २८ ॥
हे आघवे चि आपुलाळां लोकीं । सौम्यांगि अवलोकीं ।
महामूर्त्ति दैविकी । पाहांत असति ॥ २९ ॥
ऐसें पाहांत पाहांता तूतें प्रतिक्षणीं ।
विस्मित होंत अंतष्करणीं ।
करिति निज मुगुटीं वोवाळणीं ।
प्रभू तुज ॥ ३३० ॥
तेथ जयजयघोषकळरवें । स्वर्ग गाजताति आघवे ।
टेवित ललाटांवरि बरवे । करसंपुट ॥ ३१ ॥

तिये विनयद्रुमांचिये आरवीं । सुरवाडली सात्विकां माधवी ।
ह्मणौनि करसंपुष्टपाल्वी । तूं होंतासि फळ ॥ ३२ ॥
जी लोचनभाग्य उदैले । जीवीं सुखाचें सुयाण पाहलें ।
जें अगाध तूझें देखिलें । विश्वरूप इहीं ॥ ३३ ॥
हें लोकव्यापक रूपडें । पाहांतां देवां हिं चवक पडे ।
एयाचें सदमुखपण जोडे । भलेतेया कडौनि ॥ ३४ ॥

**रूपं महत्ते बहुवक्त्रनेत्रं महाबाहो बहुबाहूरुपादम् ।**
**बहूदरं बहुदंष्ट्राकरालं दष्ट्वा लोकाः प्रव्यथितास्तथाहम् ॥२३॥**

एसें एक चि परि विचित्रें । आणि भयानकें तें चि बहुवक्त्रें ।
बहूलोचन तियें शस्त्रें । अनंतभुजा ॥ ३५ ॥
हे अनंत चरण । बहूदरें आणि नाना वर्ण ।
कैसें प्रतिवदनीं मातलेपण । आवेशाचें ॥ ३६ ॥
हों काज महाकल्पांचां अंतीं ।
मुखें पसरलीं आहाति जेउततेउतीं ।
आगियलावरि उजितीं ।
आवुथिलीं जैसीं ॥ ३७ ॥
नातरि संहारत्रिपुरेचिं यंत्रें । किं प्रलयभैरवांचिं क्षेत्रें ।
नाना युगांतचक्रिं पात्रें । भूतपिचां वोडविलीं ॥ ३८ ॥
तैसीं जीउतीतिउतीं कडे । तूझीं वक्त्रें जी प्रचंडें ।
उफाडति दरिये माझि सिंहाडे । तैसे दांत दीसति रागीठ ॥३९॥
जैसें काळरात्रिचें आंधारें । उसपतां निगति संहारखेचरें ।
तैसिया वदनीं प्रळयरुधिरें । काटलिया दाढा ॥ ३४० ॥
हें असो काळें आवतिलें रण । कां सर्वसंहारें मातलें मरण ।
तैसें अति भिंगुळवाणेपण । वदनाचें तूझें ॥ ४१ ॥
हे बापुडी भूतसृष्टी । मोटके येवि करीं पाहिले दीठी ।
आणि दुःखकालिंदीचां तटीं । झाड होउनि ठेली ॥ ४२ ॥

तुज महामृत्युचां सागरीं । आतां हें त्रैलोक्य अवधारीं ।
शोकदु:खल्हरीं । आंदोलत असे ॥ ४३ ॥
एथ कोपोनि जरि वैकुंठें । ऐसें हान ह्मणिपैल अवचटें ।
जें तुज काइ लोकाचें वाटे । तूं ध्यानीं चि भोगीं ॥ ४४ ॥
तरि लोकांचे किर साधारण । वायां आपण करितसें वोडण ।
केवि सहसा ह्मणों प्राण । माझे चि कांपताति ॥ ४५ ॥
आणि रुद्रु जेया वासिपे । मज भेण मृत्यु लपे ।
तो मीं एथ थरथरां कांपें । ऐसें केहिं नाहिं ॥ ४६ ॥

**नभःस्पृशं दीप्तमनेकवर्णं**
**व्यात्ताननं दीप्तविशालनेत्रं ।**
**दृष्ट्वा हि त्वां प्रव्यथितांतरात्मा**
**धृतिं न विंदामि शमं च विष्णो ॥ २४ ॥**

परि नवल हे महामारि । एया विश्वरूपाची परि ।
जें भयासुरपण हरी । आणितसे ॥ ४७ ॥
करुनि महाकालेंसि तठें । तैसिं तोंडें जालीं रागिठें ।
तीं वाढौनियां धाकुटें । स्वर्ग केलें ॥ ४८ ॥
हें गगनाचेनि वाडपणें नाकळे ।
त्रिभुवनिचेया ही वारेया न वेंटाळे ।
ययाचिये वाफेचिया आगी जळे ।
सचराचर हें ॥ ४९ ॥
तेवि चि येकसारिखें नोहे । एथ वर्णांचा वानिभेदु आहे ।
हों काज सवाऊ प्रळयीं लाहे । वन्हि याचा ॥ ३५० ॥

**दंष्ट्राकरालानि च ते मुखानि दृष्ट्वैव कालानलसन्निभानि ।**
**दिशो न जाने न लभे च शर्म प्रसीद देवेश जगन्निवास ॥ २५ ॥**

जेयाचिये आगिचीं दीप्ति एवढी । हें त्रैलोक्य करी राखौंडी ।
कि तेया ही तोंडें परि तोंडीं । आणि दांतदाढा ॥ ५१ ॥

कैसे वोरेयासि वायु चवला । समुद्रासि किं महापूरु आला ।
नातरि विश्वाग्नीसि प्रवर्त्तला । वडवानलु ॥ ५२ ॥
हलाहल आगी पियालें । किं मरणासि मरण पेटलें ।
तैसें संहारतेज जालें । वदनीं देखां ॥ ५३ ॥
परि कोणें मानें विशाल । जैसें तुटलें होये अंतराल ।
नांतरि आकाशासि कव्हाल । पडौनि ठेलें ॥ ५४ ॥
कां काखे सूनि वसुंधरी । जैं हिरण्याक्षु रिगाला विवरीं ।
तैं उघडलें हटकेश्वरु वेन्हीं । जेवि पातालकुहर ॥ ५५ ॥
तैसा वक्त्राचा या विकाशु । माझि जीभे वेगला चि आवेशु ।
विश्व न पुरे ह्मणौनि घांसु । न भरी आवडे ॥ ५६ ॥
आणि पातालव्यालांचां फुत्कारीं । गरलजाला लागति अंबरीं ।
तैसी पसरलिये वदनदरी । माझि जिव्हा दीसे ॥ ५७ ॥
काढूनि प्रलयविजूचीं जुंवाडें । मग पानासिले गगनाचे हुडे ।
तैसे आवालुवां वरि आंकुडे । दीसति दाढांचे ॥ ५८ ॥
आणि ललाटपटाचिये खोले । कैसे भयातें भेडविति डोले ।
नातरि महामृत्यूंचे उमाले । कडवसां राहिले ॥ ५९ ॥
ऐसें दाउनियां महाभयाभोज । एथ काइ निफजउं पांतासि काज ।
तें नेणों परि भद्र मज । रोकडें आलें ॥ ३६० ॥
देवा विश्वरूप पाहावेयाचे डोहले ।
केले तियें पातलों गा प्रतिफलें ।
जी देखिलासि आतां डोले ।
निवाले योगे ॥ ६१ ॥
आहो देह पार्थिव किर जाए ।
आणि याची काकुलति कोण्हां आहे ।
परि आतां चैतन्य माझें विपायें ।
वांचे एथ ॥ ६२ ॥

थऱ्हवि भयातव आंग कांपे । नावेक आगळें तरि मन तापे ।
अथवा बुद्धि वासिपे । अभिमानु विसरिजे ॥ ६३ ॥
परि येतुलेया वेगळा । जो केवळ आनंदैककळा ।
तेया अंतरात्मेयां निश्चळा । सेयारी आली ॥ ६४ ॥
बापु साक्षात्कारें वेधु । कैसा देशधडी केला बोधु ।
हा गुरुशिष्यसंबंधु । विपायें नांदे ॥ ६५ ॥
देवा तूझां इये दर्शनीं । जें वैकल्य उपनलें आहे अंतष्करणीं ।
तें संवरावेया गिवसणी । करीतसें धैर्याची ॥ ६६ ॥
तव माझेनि नावें धैर्य चि हारपलें ।
किं तेया विश्वरूपदर्शन तेणें जालें ।
हें असो परि भलें ।
आंतुडलें उपदेशा ॥ ६७ ॥
जीउ विसंवावेयाचिया चाडा । सैघ धांवांधांवि कारितसे बापुडा ।
परि सोये किं कव्हणी कडां । आथि हो कां ॥ ६८ ॥
ऐसें विश्वरूपाचिया महामारी । तरासिं गेलें आहे चराचरीं ।
जी न बोलें तरि काये करीं । महाविष्णू ॥ ६९ ॥
पैं अखंड डोळेयां पुढें । फूटलें जैसें महाभयाचें भांडें ।
तैसिं तूझि मुखें वितंडें । पसरलिं देखें ॥ ३७० ॥
असो दाढादातांचिया दाटी । न पांगुरवे दोहीं वोंठिं ।
सैघ प्रसयशस्त्रांची कांटी । लागली जैसी ॥ ७१ ॥
जैसें तक्षका विष भरलें । कां काळरात्री मुख पसरलें ।
किं अग्न्यस्त्र परजिलें । वज्राग्नी जेवि ॥ ७२ ॥
तैसिं तूझीं वक्त्रें प्रचंडें । वरि आवेशु वाहि बोसंडे ।
आले मरणरसाचे लोंढे । आह्मावरि ॥ ७३ ॥
संहारसमैंचा चंडानीलु । आणि महाकल्पांतीं प्रळयानलु ।
यां दोहिं होये जैं मेलु । तैं काय एक न जळे ॥ ७४ ॥

तेसिं संहारें तूझीं मुखें । देखौनि धीरु के आह्मां पारुखे ।
आतां भुललां दिशा मीं नेदखें । आपणपें जी ॥ ७५ ॥
मोटकें विश्वरूप डोळां देखिलें । आणि सुख तें हातौनि पडिलें ।
आतां जांपाणिजांपाणीं आपुलें । अस्तोव्यस्तं हें ॥ ७६ ॥
एथ ऐसें करिसी ह्मणौनि जरि जाणें ।
तरि हो गोठी चि कां करणें ।
आतां येकोळ वांचिजे प्राणें ।
ऐसें जालें ॥ ७७ ॥
जरि गोसांवि माझा अनंता ।
तरि मुइं वोडण माझिया जीविता ।
सांटविं पसारा मागौता ।
महामारिचा ये ॥ ७८ ॥
आइकें सकळ देवांचिये देवते । तूझेनि चैतन्यें गा विश्व वसतें ।
तें विसरलासि हें उपरतें । मांडिलें एथ ॥ ७९ ॥
ह्मणौनि प्रसन्न होइं वेगीं राया । संहारीं आपुली माया ।
काढीं मातें महाभया । पासौनियां ॥ ३८० ॥
हा ठावोवेन्हीं पुडुतीपुडुतीं । तूतें ह्मणिजे वहुवा काकुळती ।
ऐसा मी विश्वमूर्ती । भेडु कां जी ॥ ८१ ॥
जैं अमरावतिये आला धाडा । तैं मिया येकलेनि केला उवेढा ।
जो मीं काळाचेया ही तोंडा । वासिपु न धरीं ॥ ८२ ॥

**अमी च त्वां धृतराष्ट्रस्य पुत्राः**
**सर्वे सहैवावनिपालसंघैः ।**
**भीष्मो द्रोणः सूतपुत्रस्तथासौ**
**सहास्मदीयैरपि योधमुख्यैः ॥ २६ ॥**

परि तेया वांतुळ हे न्हवे देवा । एथ मृत्यु हो करूनि चढावा ।
तुवां आतां चि घोटु भरावा । ऐसी सूचना ॥ ८३ ॥

कैसा न्हवता प्रळयाचा वेळु । गोखां तूं चि मांडला काळु ।
बापुडा हा त्रिभुवनगोळु । अल्पायु जाला ॥ ८४ ॥
आहा भाग्या विपरीता । विघ्न उठिलें शांति करितां ।
कटा विश्व गेलें आतां । तूं लागलासि ग्रासूं ॥ ८५ ॥
हें नव्हे मां रोकडें । सैघ पसरूनियां तोंडें ।
कवळितासि चौहींकडे । सैन्यें इयें ॥ ८६ ॥
नव्हे कौरवकुळीचे अंकुर । आंधळेया धृतराष्ट्राचे कुमर ।
हे गीळिले सपरिवार । वदनीं इहीं ॥ ८७ ॥
आणि जे जे यांचेनि साह्ये ।
आले असति देशोदेशिचे राये ।
तेयांचे सांगावेया जावो न लाहे ।
ऐसें सरकटितु आहासि ॥ ८८ ॥
मदमुखांचिया घटा । घेंतु आहासि घटघटां ।
आरणीं हान थाटां । देंतासि मिठि गा ॥ ८९ ॥
जंत्रांवरि चि मार । पदतींचे मोगर ।
मुखा आंतु भार । हारपति मां ॥ ३९० ॥
क्रिदांताचे जावळीं । जें एकैक विश्वातें गीळी ।
तियें कोडिवरि सगळीं । घेताति शस्त्रें ॥ ९१ ॥
चातुरंगपरिवारा । सजोडियां राहंवरां ।
दांत न लवीसि परमेश्वरा । कैसा तुष्टलासि ॥ ९२ ॥
हां गा भीष्मा ऐसा ब्राह्मणु । सत्यें शौर्यें आहे निपुणु ।
तो ही गीळिला आणि द्रोणु । ग्रासिला सकटा ॥ ९३ ॥
आगा सहस्त्रकराचा कुमरु । एथ गेला गेला कर्णवीरु ।
आणि आमचेयां आवघेयांचा केरु । फेडिला देखों ॥ ९४ ॥
कटाकटा धात्रेया । कैसें जालें अनुग्रहा या ।
मियां मागौनि जगा बापुडेया । आणिलें कर्म्म ॥ ९५ ॥

मार्गें थोडिया बहुवा उपपत्ती ।
येणें सांघितलेया निकेयानि विभूती ।
तैसा नसें चि मा पुडुतीं पुडुतीं ।
वैसलां मरों ॥ ९६ ॥
ह्मणौनि भोग्य तें त्रिशुद्धी न चुके ।
आणि बुद्धि होणियेरा सारिखी ठाके ।
माझां कपाळिं पीटावें लोकें ।
तें लोपैल काइसेया ॥ ९७ ॥
पूर्वीं अमृत ही हाता आलें । परि देव नसती चि उगले ।
मग काळकूट उठिलें । जिया परीं ॥ ९८ ॥
परि तें येक बग थोडें । केलेयां प्रतिकारा माझिवडें ।
आणि तिये अवसरिचें सांकडें । निस्तरला शंभु ॥ ९९ ॥
आतां हा जळतु वारा वेंटाळे । कवणां विखा भरलें गगन गिळे ।
महाकाळेंसिं फळें । कवण करी ॥ ४०० ॥
ऐसा दुःखें अर्जुनु सीणतु । शोचीतु असे जीवा आंतु ।
परि नेदखे तो प्रस्तुतु । अभिप्राउ देवाचा ॥ १ ॥
जें मीं मारिता कौरव मरते । ऐसेनि वेंटाळिला असे भ्रांतें ।
तें फेडावया चि लागि अनंतें । दाविलें निज ॥ २ ॥
अरे कोण्ही कव्हणातें न मरी । एथ मीं चि हो सर्वसंहारीं ।
तें विश्वरूप व्याजें श्रीहरी । प्रकटितसे ॥ ३ ॥
ऐसेया देवाचेया मनोगता । तें न चोजवे चि पांडुसुता ।
मग आहा कंपु नव्हता । वाढवितसे ॥ ४ ॥

**वक्त्राणि ते त्वरमाणा विशंति दंष्ट्राकरालानि भयानकानि ।**
**केचिद्विलग्ना दशनांतरेषु संदृश्यंते चूर्णितैरुत्तमांगैः ॥ २७ ॥**

तेथ ह्मणे हा एकें वेळें । असकी गवसीं दोन्हीं दळें ।
वदनिं रिघालें । गगनीं जैसिं ॥ ५ ॥

कां महाकल्पाचां सेवटीं । जैं कृदांतु कोपला होये सृष्टी ।
तैं एकविसां स्वर्गां ही मीठी । पाताळासि दे जैवि ॥ ६ ॥
नातरि उदासीनें दैवें । संचकाचीं विभवें ।
जेथिचा तेथ स्वभावें । वायां जांति ॥ ७ ॥
तैसिं सांचलीं सैन्यें एकावटें । इये मुखिं जालिं प्रविष्टें ।
परि एक ही तोंडा न सुटे । कैसें कर्म्म देखां ॥ ८ ॥
अशोकाचे आगसे । चवलिले कऱ्हेनि जैसे ।
लोकवक्त्रा माझि तैसे । वायां चि गेले ॥ ९ ॥
परि सिसाळें मुगुटेंसिं । पडिलिं दाढाचां सांडसिं ।
पीठ होंतां कैसीं । दीसताति ॥ ४१० ॥
तियें रत्नें दांतांचा व्याडिं । कूट लागलें जीभे बूडी ।
काहिं काहिं आगरडीं । दंष्ट्राचीं माखलीं ॥ ११ ॥
हों काज विश्वरूपें काळें । ग्रासिलिं लोकाचिं बाळें ।
परि गिवसीत देहिंचि सिसाळें । पैसें इयें राखिलीं ॥ १२ ॥
तैसीं शरीरा माझि चोखडीं । होंतीं उत्तमांगिं रोकडीं ।
ह्मणौनि महाकाळाचां तोंडीं । परि उरलें शेपीं ॥ १३ ॥
मग ह्मणे जी हें काइ । जन्मलेयानि मोहर नाहिं ।
जग आपैसें चि वदनडोहीं । संचरतसे मां ॥ १४ ॥
इया आघविया चि सृष्टी ।
लागलिया आहाति वदनाचां वाटिं ।
आणि हा जेथिचा तेथ मीठी ।
देंत असे उगा ॥ १५ ॥
ब्रह्मादिक समस्त । ऊंचा मुखा माजि धावंत ।
येर सामान्य हे भरत । ऐली वदनीं ॥ १६ ॥
आणिक ही भूतजात । तें उपनलां चि ठांई ग्रासित ।
परि याचेया मुखा निभ्रांत । न सुटे चि काहिं ॥ १७ ॥

**यथा नदीनां बहवोंबुवेगाः**
**समुद्रमेवाभिमुखा द्रवंति ॥**
**तथा तवामी नरलोकवीरा**
**विशंति वक्राण्यभिविज्वलंति ॥ २८ ॥**

जैसे महानदीचे ओघ । वेल्हे टाकीति समुद्राचें आंग ।
तैसें आघवां चि कडौनि जग । प्रवेशे एथ ॥ १८ ॥
आयुष्यपंथें प्राणिगणीं । करूनि अहोरात्रांची सुअणीं ।
वेगें वक्त्रमिळणीं । साधिजत आहाति ॥ १९ ॥

**यथा प्रदीप्तज्वलनं पतंगा**
**विशंति नाशाय समृद्धवेगाः ॥**
**तथैव नाशाय विशंति लोका**
**स्तवापि वक्राणि समृद्धवेगाः ॥ २९ ॥**

जळतेया गिरिचेया आंगवखां ।
माझि घालिति पतंगाचिया झांका ।
तैसे लोक देखां ।
इये वदनीं पडत ॥ ४२० ॥
परि जेतुलें एथ प्रवेशळें । तें जाणां लोहें पाणि गीळिलें ।
आणि वहिवटीं पूसलें । नावं तेयाचें ॥ २१ ॥

**लेलिह्यसे ग्रसमानाः समंता**
**ल्लोकान्समग्रान्वदनैर्ज्वलद्भिः ॥**
**तेजोभिरापूर्य जगत्समग्रं**
**भासस्तवोग्राः प्रतपंति विष्णो ॥ ३० ॥**

आणि येतुली हे आरोगण । करितां भूखे नाहिं उणेपण ।
कैसें दीपन असाधारण । उदैलें एथ ॥ २२ ॥
जैसा रोगिया ज्वराहूनि उठिला । कां भगणा दुकाळु पाहला ।
तैसा जीभेचा नवलाऊ देखिला । आवाळुवें चाटितां ॥ २३ ॥

जैसें आहाराचेनि नावें काहीं ।
तोंडाचिया वाटा न वचे चि नाहिं ।
कैसी शमशमिते पाहा नवाई ।
भूखेलेपणांची ॥ २४ ॥
काइ सागराचा घोंटु भरावा । किं पर्वताचा घांसु करावा ।
ब्रह्मकटाहो घालावा । असका दाढे ॥ २५ ॥
दिशा सगलिया गिलाविया । चांदणियां चाटूनु घेयाविया ।
ऐसें वर्त्ततसे नां सवियां । लोलुपता बा तुज ॥ २६ ॥
जैसा भोगें कामु वाढे । इंधनें आगीसि बल चढे ।
तैसिं खांतखांतां तोंडें । खांखांतें ठेलीं ॥ २७ ॥
कैसें एक चि केवढें पसरलें । त्रिभुवन जिन्हाग्रीं टेंकलें ।
जैसें कविठ घातलें । वडवानलीं ॥ २८ ॥
तैसिं अपारें वदनें । आतां एतुलीं कैचिं त्रिभुवनें ।
कां आहारु न मेलवितां एणें मानें । वाढविलिं असतिं ॥ २९ ॥
आगा लोकु हा वापुडा । जाला वदनज्वालां वरिपडा ।
जैसिं वणवेयाचां वेढां । सांपडलीं मृगें ॥ ४३० ॥
आहा तैसें या विश्वा जालें । देउ न्हवे हें कर्म्म आलें ।
किं जग जलचरीं पांगिलें । जालकालें पैं ॥ ३१ ॥
आतां इये अंगप्रभेचिये वागुरे ।
कोणीकडौनि निगिजैल चराचरें ।
वक्रें न्हवति जैसीं जौहरें ।
वोडवलिं जगा ॥ ३२ ॥
आगि आपुलेनि दाहकपणें । न पोले चि ह्मणौनि तो नेणे ।
परि जेया लागे तेयां प्राणें । सूटिका नाहिं ॥ ३३ ॥
माझेनि तिखटपणें । कैसें निवटे हें शस्त्र काइ जाणें ।
कां आपुलेया मारातें नेण । विख जैसें ॥ ३४ ॥

आख्याहि मे को भवानुग्ररूपो
नमोऽस्तु ते देववर प्रसीद ।
विज्ञातुमिच्छामि भवंतमाद्यं
न हि प्रजानामि तव प्रवृत्तिम् ॥ ३१ ॥

तैसी तुज काहिं । आपुलेया उग्रपणाची सें चि नाहिं ।
पारि अइलीकडे खाई । सरली जगाची ॥ ३५ ॥
आगा आत्मा तूं चि एकु । सकलविश्वव्यापकु ।
तारि आह्मांसि कां अंतुक । वोडवलासि ॥ ३६ ॥
तारि भिया सांडिली जीविताची चाड ।
आणि तुवां हिं न धरावी भीड ।
मनीं आहे तें उघड ।
बोल पां सुखें ॥ ३७ ॥
केती त्राय कारिसी या उग्ररूपा ।
आंगिचें भगवंतपण आठवीं बापा ।
नाहिं तऱ्हि कृपा ।
मज पुरती पाहीं ॥ ३८ ॥
तारि एकु वेलु वेदवेद्या । त्रिभुवनाचेया आद्या ।
विनवणी विश्ववंद्या । आइक माझी ॥ ३९ ॥
ऐसें बोलौनियां वीरें । चरण नमस्कारिलें शिरें ।
मग ह्मणे जीं सर्वेश्वरें । अवधारिजो ॥ ४४० ॥
मिया होआवेया समाधान । पूसिलें विश्वरूप ध्यान ।
तवं येकें चि वेलें त्रिभुवन । गीलितू चि उठिलासि ॥ ४१ ॥
तरि तूं कोणु काये येतुलीं । इयें भयानकें मेलविलीं ।
आववां चि कारिं घेतलीं । शस्त्रें काह्या ॥ ४२ ॥
तुवां देवें रागिऽपगें । वाढौनि गगन केलें ठेंगणें ।
डोले करूनि भिगुऊवाणे । भेडवितु आहासि ॥ ४३ ॥

एथ कृदांतासि देवा । काइसेया कीजतसे हेवा ।
हा आपुला तुवां सांघावा । अभिप्राउ मज ॥ ४४ ॥

श्रीभगवानुवाच ।

कालोऽस्मि लोकक्षयकृत्प्रवृद्धो
लोकान्समाहर्तुमिह प्रवृत्तः ।
ऋतेऽपि त्वां न भविष्यंति सर्वे
येऽवस्थिताः प्रत्यनीकेषु योधाः ॥ ३२ ॥

या बोला ह्मणतसे अनंतु । मीं कोणु हें अससि पूसतु ।
आणि काइसेया लागि असें वाढतु । हे चलवल काइसी ॥४५॥
तरि मीं कालु गा हें फुडें । लोकु संहारावेया वाढें ।
सैघ पसरिलीं असति तोंडें । तरि ग्रासूं आघवां ॥ ४६ ॥
तेथ अर्जुनु ह्मणे कटा । उभगला मागिलां संकटां ।
आलविला तवं वोखटा । उधाइला हा ॥ ४७ ॥
तेविं चि कठिनें बोलें आशतूटि । अर्जुनु होईल हिंपुटी ।
ह्मणोनि सवें चि ह्मणे किरीटी । परि आन एक असे ॥ ४८ ॥
जें आतां चि इये संहारवाहारे । तुह्मीं पांडव बाहिरे ।
तेथ जांत जांत धनुर्द्धरें । संवरिले प्राण ॥ ४९ ॥
होंता मरणमहामारी गेला । तो मावौता सावदु जाला ।
मग चित्त देउं लागला । बोला तेया ॥ ४५० ॥
तवं ऐसें ह्मणितलें देवें । तुह्मीं माझे जाणावें ।
एर मज आघवे । सरलें ग्रासुं ॥ ५१ ॥
वडवानलीं प्रचंडीं । जैसी टाकूनि घापे कुरौंडी ।
तसें जग माझां तोंडीं । तुवां देखिलें जें जें ॥ ५२ ॥
परि तेया माझारि काहीं । भरवसेनि उणें नाहिं ।
इयें वायां चि सैन्यें पाहिं । बरवतें आहाति ॥ ५३ ॥

जे हे मेळोनियां मेले । फुगत वीरवृत्तीचेनि बळें ।
जमावारें जगदळें । वाखाणिताति ॥ ५४ ॥
ह्मणति सृष्टिवरि सृष्टि करुं । आण वाउनि मृत्युतें धरुं ।
जगाचा भरुं । घोंटु आतां ॥ ५५ ॥
पृथिवी सगळी चि गीळूं । पारि हें आकाश वरिचा वरि जाळुं ।
काइ बाणवरिं खीळूं । वारियातें ॥ ५६ ॥
चतुरंगाचिया संपदा । करिति महाकाळेंसिं स्पर्धा ।
वांठिवेंचिया मदा । वळवळे जे ॥ ५७ ॥
बोल हातीयेरांहुनि तीखट । दीसति आगीपासौनि दासट ।
मारकपणें काळकूट । महुर ह्मणति ॥ ५८ ॥
ते हे लेपाचे गमले । जाण पोकळिचे उमाळे ।
आगा चांदांचीं फळें । वीर हे देखें ॥ ५९ ॥
जैसा मृगजळाचा पूरु आला । दळ नव्हे कापडाचा सांपु केला।
इया श्रिंगारुनि खाला । मांडिलिया पैं ॥ ४६० ॥
येर चेष्टवितें जें बळ । तें मियां मागां चि ग्रासिलें सकळ ।
आतां कोल्हैरिचे वेताळ । तैसे निर्जीव हे ॥ ६१ ॥
हालविती दोरी तूटली । तारे तियें खांबावरिलें बाउलीं ।
आवडेतेणें लोटिलीं । उलथौनि पडति ॥ ६२ ॥

**तस्मात्त्वमुत्तिष्ठ यशो लभस्व ।**
**जित्वा शत्रून्भुंक्ष्व राज्यं समृद्धम् ।**
**मयैवैते निहताः पूर्वमेव ।**
**निमित्तमात्रं भव सव्यसाचिन् ॥ ३३ ॥**

तैसा सैन्याचा एया वगा । मोडता वेळु न लगे पैं गा ।
ह्मणौनि उठिं उठिं वेगां । सिहाणा होइं ॥ ६३ ॥
तुवां चि गोग्रहणींचेनि अवसरें । घातलें मोहनास्त्र एकसरें ।
मग वैराचेनि बापें उत्तरें । आसुडूनि वस्त्रें नेलें ॥ ६४ ॥

आतां हे तेयां निपेटारे जाले । निवटि वहिला रणिं सांपडलें ।
घेइं यश रिपु जींतले । एकलेनि पैं ॥ ६५ ॥
आणि कोरडें यश गा नोहे । समग्र राज्य हाता येंत आहे ।
तूं निमित्तमात्र होए । सव्यसाची ॥ ६६ ॥

**द्रोणं च भीष्मं च जयद्रथं च ।**
**कर्णं तथान्यानपि योधवीरान् ।**
**मया हतांस्त्वं जहि मा व्यथिष्ठा ।**
**युद्ध्यस्व जेतासि रणे सपत्नान् ॥ ३४ ॥**

द्रोणाचा पाडु न करीं । भीष्माचें भय न धरीं ।
कैसेनि कर्णावरि । परजूं हें न ह्मण ॥ ६७ ॥
कवणु उपाउ जयद्रथा कीजे । हें तुवां चित्तिं न धरिजे ।
आणिक ही आथि जे जे । नावणिगे ॥ ६८
ते हे येकें येकु आघवे । चित्रिचे सिंहाडे मानावे ।
वोलेनि हातें घेयावे । पूसूनियां ॥ ६९ ॥
एयां वरि पांडवा । काइसा जूझाचा मेळावा ।
हा आभासु गा आघवा । येर आकर्षिलें मियां ॥ ४७० ॥
जेव्हांलि तुवां देखिले । माझां वदनीं पडिले ।
तेव्हां चि एयांचें सरलें । आतां रिति सोपें ॥ ७१ ॥
ह्मणौनि वहिला उठीं । मि गां आहाले तूं निवटीं ।
न रिग शोकसंकटीं । नाथिलिये ॥ ७२ ॥
आपण चि आडखला कीजे । कवतिकें जैसा विंधिजे ।
तैसें देखैं तूझें । निमित्त आहे ॥ ७३ ॥
आगा उभटें जें उदेलें । तें तवं परतें गेलें ।
आतां राज्येंसिं संचलें । यश तूं भोगिं ॥ ७४ ॥
जेव्हांलि उतत होंते दायाद । आणि वलिये जगिं दुर्म्मद ।
ते वधिले रिपु विशाद । शौर्य यांचें ॥ ७५ ॥

ऐसिया इया गोठी । विश्वाचां वाक्पटिं ।
लिहुनि घालीं किरीटी । विजया होइं ॥ ७६ ॥

संजय उवाच ॥

एतच्छ्रुत्वा वचनं केशवस्य
कृतांजलिर्वेपमानः किरीटी ।
नमस्कृत्वा भूय एवाह कृष्णं
सगद्गदं भीतभीतः प्रणम्य ॥ ३५ ॥

ऐसी अवघी चि हे कथा । तेया पूर्ण मनोरथा ।
संजयो सांघे कौरवनाथा । ज्ञानदेउ ह्मणे ॥ ७७ ॥
मग स्वर्गलोकौनि गंगाजळ । सूटलेयां वाजति खळाळ ।
तैसी वाचा विशाळ । बोलतां तेया ॥ ७८ ॥
नातरि महामेघांचे उमाळे । घडघडीत एकें वेळें ।
कां घुमघुमी मंदराचळें । क्षीराब्धि जैसा ॥ ७९ ॥
तैसें गंभीरें महानादें । हें वाक्य विश्वकंदें ।
बोलिलें अगाधें । अनंतरूपें ॥ ८० ॥
तें अर्जुनें मोटकें आइकिलें । आणि सुख कि भय चि दुणावलें ।
हें नेणों परि कांपिनलें । सर्वांग तेयाचें ॥ ८१ ॥
सकरुणपणें वळला मोट । मग जोडिले करसंपुट ।
वेळवेळां ललाट । चरणीं ठेवी ॥ ८२ ॥
तेविं चि कांहिं बोलों जाए । तरि गळा बुजाला ठाए ।
सुख कि भय होये । तें विचारा तुह्मीं ॥ ८३ ॥
परि तेव्हलि देवाचेनि बोलें । अर्जुना ऐसें हें जालें ।
भियां पदांवरि देखिलें । श्लोकिंचेयां ॥ ८४ ॥
मग तैसा चि भेणभेण । पुढुतीं जुहारी चरण ।
ह्मणे जी आपण । ऐसें बोलिलें ॥ ८५ ॥

अर्जुन उवाच ।

> स्थाने हृषीकेश तव प्रकीर्त्या
>   जगत्प्रहृष्यत्यनुरज्यते च ॥
> रक्षांसि भीतानि दिशो द्रवंति
>   सर्वे नमस्यंति च सिद्धसंघाः ॥ ३६ ॥

नां अर्जुनां मीं काळु । आणि विश्व ग्रासिं तो माझा खेळु ।
हा बोलु किरु अढळु । मानुं आह्मीं ॥ ८६ ॥
परि जी तुवां काळें । आजि स्थितिचिये वेळे ।
ग्रासिजे हें न मिळे । विचारासि ॥ ८७ ॥
कैसेनि आंगिचें तारुण्य मोडावें । कैंचें वृद्धाप्य काढावें ।
ह्मणौनि करुं ह्मणसि तें न्हवे । बहुत करुनि ॥ ८८ ॥
आगा चौपाहारी न भरतां । कहिं चि देखैं अनंता ।
मध्यान्हीं चि सविता । माळवत नाहीं ॥ ८९ ॥
पैं तुज अखंडिता काळा । तीनि आहाति वेळा ।
या तीन्ही परि सबळा । आपुलालां समैं ॥ ४९० ॥
जेव्हळि हों लागे उत्पत्ति । तेव्हळि स्थितिप्रळयो हारपति।
स्थितिकाळीं न मिरवति । उत्पत्तिप्रळयो ॥ ९१ ॥
पाठिं प्रळयाचिये वेळे । उत्पत्तिस्थिति मावळे ।
हें काइसेनि हिं न ढळे । अनादि ऐसें ॥ ९२ ॥
ह्मणौनि आजि भरें भोगें । स्थिती वर्त्तिजत आहे जगें ।
येथ ग्रासिसि हें न लगे । माझां जीवीं ॥ ९३ ॥
तवं संकेतें देओ बोले । आगा या सैन्या भरण पूरलें ।
तें प्रत्यक्ष तुज दाविलें । येरां यथाकाळें जाण ॥ ९४ ॥
हा संकेतु जवं अनंता । वेळु लागला बोलतां ।
तवं अर्जुनें लोकु मागौता । स्थिती देखिला ॥ ९५ ॥

मग अर्जुनु ह्मणे देवा । तूं सूत्री विश्वलाघवा ।
जगु आला जी आघवा । स्थिती पुढुतीं ॥ ९६ ॥
पारि पडिलेयां दुःखसागरीं । तूं काढिसि कां जिया परीं ।
ते कीर्त्ति तूझी हरी । आठवीतसें ॥ ९७ ॥
आठवितां वेलोवेलां । भोगिजत महासुखाचा सोहला ।
तेथ हर्षामृतकल्लोलां । वरि लोलत असें ॥ ९८ ॥
देवा जियालेपणें जगु । धरिति तूझां ठांइं अनुरागु ।
आणि दृष्टांतेयां भंगु । अधिका अधिकु ॥ ९९ ॥
पैं त्रिभुवनिचेयां राक्षसां । महाभय तूं हृषीकेशा ।
पलताति यां दिशां । पैलीकडे ॥ ५०० ॥
येर सुरसिद्धकिन्नर । किंबहुना चराचर ।
तूतें हर्षनिर्भर । नमित असे ॥ १ ॥

**कस्माच्च ते न नमेरन्महात्मन् ।**
**गरीयसे ब्रह्मणोऽप्यादिकर्त्रे ।**
**अनंत देवेश जगन्निवास ।**
**त्वमक्षरं सदसत्तत्परं यत् ॥ ३७ ॥**

एथ हां गा कवणा कारणां । राक्षस होंत नारायणां ।
न लगती चि चरणा । पलते जाले ॥ २ ॥
आणि तूतें हें काइ पूसावें । एतुलें आह्मासि पैं जाणवें ।
हां गा सूर्योदयीं राहावें । कैसेनि तमें ॥ ३ ॥
तूं स्वयंप्रकाशाचा आगरु । आजि जाला असासि गोचरु ।
ह्मणौनि येयां केरु । फीटला सहजें ॥ ४ ॥
हें एतुले दिवस आह्मां । काहिं नेणवे चिं श्रीरामां ।
आतां देखतसे महिमा । गंभीर तूझी ॥ ५ ॥
जेथौनि नाना सृष्टीचिया वोलीं । पसरति भूतग्रामांचिया वेली ।
तेया ब्रह्मातें व्याली । दैविकी इछा ॥ ६ ॥

देवा निःसीमगुण अनंतु । देवा निःसीमतत्व सदोदितु ।
देवा निःसीमसाम्य सतंतु । चौ हि वांचा ॥ ७ ॥
जी तूं त्रिजगती ओलावा । अक्षर तूं सदाशिवा ।
तूं संतासंत देवा । तेयां ही अतीत तें तूं ॥ ८ ॥

**त्वमादिदेवः पुरुषः पुराण**
**स्त्वमस्य विश्वस्य परं निधानम् ।**
**वेत्तासि वेद्यं च परं च धाम**
**त्वया ततं विश्वमनंतरूपम् ॥ ३८ ॥**

तूं प्रकृतिपुरुषांची आदि । जी महातत्वांची अवधी ।
स्वयें तूं अनादि । पुरातनु ॥ ९ ॥
सकल विश्वासि जीवन । जीवांसि तूं निधान ।
भूतभव्याचें ज्ञान । तूझां चि हातिं ॥ ५१० ॥
जी श्रुतींचेया लोचना । स्वरूपसुख तूं अभिन्ना ।
तूं त्रिभुवनिचिया आयतना । आयतन तूं ॥ ११ ॥
ह्मणौनि जी परम । तूंतें ह्मणिजे महाधाम ।
कल्पांती महद्ब्रह्म । तूझां अंकीं रिगे ॥ १२ ॥
किंबहुना देवें । विश्व विस्तारलें आघवें ।
आतां अनंतरूप वानावें । कवणें तूझें ॥ १३ ॥
जी काइ एक तूं न्हवसि । तूं कवणी ठाइं गा नससि ।
हें असो जैसा आहासि । तैसेया नमो ॥ १४ ॥

**वायुर्यमोऽग्निर्वरुणः शशांकः**
**प्रजापतिस्त्वं प्रपितामहश्च ।**
**नमो नमस्तेऽस्तु सहस्रकृत्वा**
**पुनश्च भूयोऽपि नमो नमस्ते ॥ ३९ ॥**

वायु तूं अनंता । यमू तूं नियामिता ।
प्राणिगणीं वसता । अग्नि जी तूं ॥ १५ ॥

वरुणु तूं सोमु । स्रष्टा तूं ब्रह्मु ।
पितामहाचा परमु । आदिजनकु तूं ॥ १६ ॥
आणिक ही जें जें काहिं । रूप अथवा नाहिं ।
तेया नमो तुज पाहीं । जगन्नाथा ॥ १७ ॥
ऐसें सानुरागें चित्तें । स्तवन केलें पांडुसुतें ।
मग पुडुतीं ह्मणे नमस्ते । नमो प्रभू ॥ १८ ॥
पाठिं तिये साद्यंते । निहाळी मूर्त्तितें ।
पुडुतीं ह्मणे नमस्ते । नमो प्रभू ॥ १९ ॥
इयें चराचरीं समस्तें । अखंडित देखें तेयांतें ।
आणि पुडुतीं ह्मणे नमस्ते । नमो प्रभू ॥ ५२० ॥
ऐसिं देखौनि अद्भुतें । आश्चर्य होतसे मातें ।
तवं तवं ह्मणे नमस्ते । नमो प्रभू ॥ २१ ॥

**नमः पुरस्तादथ पृष्ठतस्ते**
**नमोस्तु ते सर्वत एव सर्व ॥**
**अनंतवीर्यामितविक्रमस्त्वं**
**सर्वं समाप्नोषि ततोसि सर्वः ॥ ४० ॥**

आणिकि स्तुति नाठवे । आणि निवांत हिं न ऱ्हा
नेणों कैसा प्रेमभावें । गाजों चि लागे ॥ २२ ॥
किंबहुना इया परीं । ननम केलें सहस्र वेऱ्हीं ।
पुडुतीं ह्मणे श्रीहरी । तुज सन्मुखा नमो ॥ २३ ॥
देवासि पाठि आथि कां नाहिं । येणें आह्मां उपेगु काइ ।
तरि तुज पाठिमोरयासि हीं । नमो स्वामी ॥ २४ ॥
आतां वेगळालेयां हिं अवेवां । नेणें रूप करूं देवा ।
ह्मणौनि नमो तुज सर्वा । सर्वव्यापका ॥ २५ ॥
जी अनंतबळसंभ्रमा । तुज नमो अनंतविक्रमा ।
सकळकाळिं समा । सर्वदेशा ॥ २६ ॥

आघवां अवकाशिं जैसें । अवकाशु होउनि आकाश असे ।
तूं सर्वपणें तैसें ॥ पातलासि सर्व ॥ २७ ॥
किंबहुना केवळ । सर्व हें तूं चि निखळ ।
आगा क्षीरार्णवीं कल्लोळ । पयाचे जैसे ॥ २८ ॥
ह्मणौनियां देवा । तूं वेगळा न्हवसि सर्वां ।
हें आलें मज सद्भावां । आतां तूं चि सर्व ॥ २९ ॥

**सखेति मत्वा प्रसभं यदुक्तं**
**हे कृष्ण हे यादव हे सखेति ।**
**अजानता महिमानं तवेदं**
**मया प्रमादात्प्रणयेन वापि ॥ ४१ ॥**

परि ऐसेया तूतें स्वामीं । कांहीं नेणों चि जी आह्मीं ।
ह्मणौनि सबंधधर्मीं । राहाटलों तुसीं ॥ ३० ॥
आहा थोर वाउर जालें । अमृतें संमार्जन केलें ।
वृषभु घेउनि दीधलें । कामधेनूतें ॥ ३१ ॥
परिसु हाता आला । तो नेणौनि गा डौरां घातला ।
कल्पतरूचा केला । कूंपु सेता ॥ ३२ ॥
चिंतामणिची खाणि देखिली ।
पारि नोळखे चि ह्मणौनि अव्हेरिली ।
तैसी तूझी जवळीक धाडिली ।
सांघातीपणें ॥ ३३ ॥
हें आजिचें चि पाहे पां रोकडें । कवण जूझ हें केवडें ।
एथ परब्रह्म तूं उघडें । सारथी केलासि ॥ ३४ ॥
एयां कौरवांचेया घरा । शिष्टाइये धाडिलासि दातारा ।
ऐसा वणेसाठिं जगेश्वरा । वीकिलासि जी ॥ ३५ ॥
तूं योगियांचें समाधिसुख । कैसें जाणों चि ना मूर्ख ।
उरोधु तुसीं सदमुख । करूं देवा ॥ ३६ ॥

यच्चापि हासार्थमसत्कृतोऽसि
विहारशय्यासनभोजनेषु ॥
एकोऽथवाप्यच्युत तत्समक्षं
तत्क्षामये त्वामहमप्रमेयम् ॥ ४२ ॥

तुज ऐसेयाचां आदिं । बैसिजे उभयबंधीं ।
तेथ सोयारेकी करुनि आधीं । रळीं बोलों ॥ ३७ ॥
विपायें राउला एउं । तारि तूझेनि आंगें मानु पाहों ।
न मनीसि तारि जाउं । रुसौनियां ॥ ३८ ॥
पायां लागौनि बुझावणी । तूझां ठाइं सारंगपाणी ।
आणिकें हीं करणीं । बहुतें असति ॥ ३९ ॥
स्वजनपणाचिया वाटा । पाहों लागलों उपराठा ।
ऐसेया परीं वैकुंठा । चूकलों आह्मीं ॥ ५४० ॥
देवा तुजसि आह्मि कोलु धरुं । अखंड लोंबीझोंबी करुं ।
ऐसा सरिपाडु धरुं असकरुं । निकरें तंडों ॥ ४१ ॥
चांग तें उराउरीं मागों । आणि तुज चि किं बुद्धि सांगों ।
तेविं चि ह्मणों काइ लागों । तूझें आह्मीं ॥ ४२ ॥
ऐसा अपराधु एतुला आहे । जो त्रिभुवनीं पारि न समाए ।
जी नेणों चि आह्मीं पाए । स्वीकरिले तूझे ॥ ४३ ॥
देउं भोजनाचां अवसरीं । लोभें किर आठवण करी ।
पैं माझी निसुगै अवधारीं । किं उगा चि बैसें ॥ ४४ ॥
देवाचां भोगायतनीं । खेळतां शंका न धरीं मनीं ।
आणि रिगौनियां शयनीं । सरिसा पहुडें ॥ ४५ ॥
कृष्णा ह्मणौनि हाकारिजे । यादवपणें तूतें लेखिजे ।
आपुली आण वाइजे । जातां तुज ॥ ४६ ॥
मज एकासनीं बैसणें । कां तूझा बोलु न मनणें ।
हें प्रीतिचेनि दाटपणें । बहुत घडलें ॥ ४७ ॥

ह्मणौनि काइ एक आतां । केती निवेदिजैल अनंता ।
मी राशि आहे समस्ता । अपराधांचा ॥ ४८ ॥
एया लागि पुढां अथवा पाठिं । जियें राहटलां विरुद्धें गोमटीं ।
तियें मायेचिया परी पोटीं । सामावी प्रभू ॥ ४९ ॥
जी कव्हणी एके वेळे । सरिता घेउनि येति खडुळें ।
तियें सामाविजति समुद्रें जळें । किं वोसांडिजे सांघें ॥ ५५० ॥
तैसें प्रीती कां प्रमादें । देवेंसिं वोलिलां विरुद्धें ।
तियें मज मुकुंदें । उपसहावीं ॥ ५१ ॥
आणि देवाचेनि क्षमत्वें क्षमा । आधारु जाली आहे भूतग्रामां ।
ह्मणौनि ते पुरुषोत्तमा । कैसें व ह्मणों ॥ ५२ ॥
परि तन्हीं अप्रमेया । मज शरणागता आपुलेया ।
क्षमा कीजो यया । अपराधांसि ॥ ५३ ॥

**पितासि लोकस्य चराचरस्य ।**
**त्वमस्य पूज्यस्य गुरुर्गरीयान् ॥**
**न त्वत्समोऽस्त्यभ्यधिकः कुतोऽन्यो**
**लोकत्रयेऽप्यप्रतिमप्रभावः ॥ ४३ ॥**

जी जाणितलें मियां साचें । महिमान आतां देवाचें ।
देवो होये चराचराचें । जन्मस्थान ॥ ५४ ॥
हरिहरादि समस्तां । देवा तूं परदेवता ।
वेदातें हिं पढविता । आदिगुरु तूं ॥ ५५ ॥
गंभीरु तूं श्रीरामा । नानाभूतैकधामा ।
सकळगुणीं प्रतिमा । अद्वितीया ॥ ५६ ॥
तुजासिं नाहिं सरिसें । हें प्रतिपादन काइसें ।
तुवां जाळेनि आकाशें । आण वाइली ॥ ५७ ॥
तेया तूझेनि पाडें दूजें । ऐसें बोलतां चि जी लाजिजे ।
तेथ अधिकाची कीजे । गोठि केवि ॥ ५८ ॥

ह्मणौनि त्रिभुवनीं तूं एकु । तुज सारिसा ना अधिकु ।
तूझा महिमा अलोलिकु । नेणिजे वानुं ॥ ५९ ॥

तस्मात्प्रणम्य प्रणिधाय कायं
प्रसादये त्वामहमीशमीड्यम् ।
पितेव पुत्रस्य सखेव सख्युः
प्रियः प्रियायार्हसि देव सोढुम् ॥ ४४ ॥

ऐसें अर्जुनें ह्मणितलें । मग पुडुतीं दंडवत घातलें ।
तेथ सात्विकाचें आलें । भारितें तेया ॥ ५६० ॥
ह्मणतां प्रसीद प्रसीद । वाचा होंतसे सद्गद ।
काढीं जी अपराध- । समुद्रौनियां ॥ ६१ ॥
तुज विश्वसुहृदातें कहीं । सोइरेपणें न मनूं चि पाहीं ।
तुज ईश्वरेश्वराचां ठांइं । ऐश्वर्य केलें ॥ ६२ ॥
तूं वर्णनीयु पारि लोभें । मातें वानितां सभे ।
तें मियां साहिजे खोबे । निवातां चि ॥ ६३ ॥
आतां ऐसेसेयां अपराधां । मर्यादा नाहिं मुकुंदा ।
ह्मणौनि रक्ष प्रमादा । पसाऊ ह्मणत्रीं ॥ ६४ ॥
जी हें चि विनवावेया लागि । कैची योग्यता माझां आंगीं ।
पारि अपत्य जैसें सलगी । बापेंसिं बोले ॥ ६५ ॥
नातारि प्राणाचें सोयरें भेटे । मग जिवें जिये भूतलिं संकटें ।
तियें निवेदितां न वटे । संकोचु कांहीं ॥ ६६ ॥
कां उखितें आंगें जीवें । आपणपें दीधलें जिया आघवें ।
तिये कांतु मीनलेयां न न्हावें । हृदय जेवि ॥ ६७ ॥
तिया परीं जी मियां । तुमतें विनविलें गोसावियां ।
परि आणिक ही एक ह्मणावेया । कारण असे ॥ ६८ ॥

अदृष्टपूर्वं हृषितोऽस्मि दृष्ट्वा
भयेन च प्रव्यथितं मनो मे ।
तदेव मे दर्शय देव रूपं
प्रसीद देवेश जगन्निवास ॥ ४५ ॥

तरि देवेंसिं सलगि केली । जे विश्वरूपाची आलि घेतली ।
ते मायेबापें पुरविली । स्नेहालपणें ॥ ६९ ॥
सुरतरूचिं झाडें । आंगणिं लाविसि कोडें ।
देसि कामधेनूचे पाडे । खेलावेया ॥ ५७० ॥
मियां नक्षत्रीं डाऊ पाडावा ।
मग चंद्रु चेंडुवा लागि मागावा ।
हा संदु सिद्धी नेला आघवा ।
माउलिया तुवां ॥ ७१ ॥
जेया अमृतलेसा लागि सायास ।
तेयाचा पाउसाला केला च्यान्ही मास ।
पृथिविये लेउनियां तास ।
चिंतामणि पेरिले ॥ ७२ ॥
ऐसा कृतकृत्यु केलां स्वामीं । बहू लळां लालिलां तुह्मीं ।
दाविलें जें हरब्रह्मीं । नाइकिजे कानीं ॥ ७३ ॥
मज देखावेयाची केउती गोठि ।
जेयाची उपनिषदां नाहिं भेटि ।
ते जिन्हारिची गांठि ।
मज लागिं सोडिली ॥ ७४ ॥
जी कल्पादि लागौनि । आजिची घडी धरूनि ।
माझिं जेतुलीं होउनि । गेलीं जन्में ॥ ७५ ॥
तेया आघवेया आंतु । घरड डुलि घेउनि असें पांतु ।
परि देखिजे आइकिजे हे मातु । आंतुडे चि ना ॥ ७६ ॥

बुद्धिचें जाणणें । काहिं चि न वचे जेयाचेनि आंगणें ।
साद हि अंतष्करणें । करवे चि ना ॥ ७७ ॥
तेथ डोळेयां देखि होआवी । हे गोठि काइसेया करावी ।
किंबहुना पूर्वी । दृष्ट ना श्रुत ॥ ७८ ॥
तें हें विश्वरूप आपुलें । तुम्हीं मज जी दाविलें ।
तरि माझें मन जालें । हृष्ट देवा ॥ ७९ ॥
परि आतां ऐसी चाड जीवि । जे तुजसिं गोठि करावी ।
जवळिक हे भोगावी । आलिंगुनि तूतें ॥ ५८० ॥
तें इये चि रूपिं करूं म्हणिजे ।
तरि कवणें एकें मुखेंसि चावळिजे ।
आणि कोणा खेवं देइजे ।
तुज लेख नाहिं ॥ ८१ ॥
म्हणौनि वारेया सवें धावणें । न घडे गगना खेवं देणें ।
जळक्रीडि खेळणें । समुद्रीं केउती ॥ ८२ ॥
एया लागि देवा । येथ भय उपजतसे जीवा ।
म्हणौनि येतुला ठला पालावा । तरि पुरे हें आतां ॥ ८३ ॥
पैं चराचर विनोदें पाहिजे । मग तेणें सुखें घरीं राहिजे ।
तैसें चतुर्भुजरूप तूझें । तो विसांवां आह्मां ॥ ८४ ॥
आह्मीं योगजात अभ्यासावें । तेणें यया चि अनुभवा यावें ।
शास्त्रातें ओलाडावें । परि सिद्धांतु तो हा चि ॥ ८५ ॥
आह्मि यजनें कीजतु सकळें । परि तिये फळावि येणें चि फळें ।
तीर्थें होतु केवळें । यया चि लागि ॥ ८६ ॥
आणिक ही काहिं जे जे । दानपुण्य आह्मीं कीजे ।
तेया फळरूप तूझें । चतुर्भुजां चि होआवें ॥ ८७ ॥
ऐसी तेथिची जी आवडी । तें देखावेया वावडी ।
वर्तत असे सांकडी । फेडीं वेगां ॥ ८८ ॥

आगा जीविचें जाणतेया । सकल विश्व वसवितेया ।
प्रसन्न होई पूजितेया । देवांचिया देवा ॥ ८९ ॥

**किरीटिनं गदिनं चक्रहस्त**
**मिच्छामि त्वां द्रष्टुमहं तथैव ।**
**तेनैव रूपेण चतुर्भुजेन**
**सहस्रबाहो भव विश्वमूर्ते ॥ ४६ ॥**

कैसीं नीळोत्पलातें रावित । आकाशा रंगु लावित ।
तेजाची वोज दावित । इंद्रनीळ ॥ ५९० ॥
जैसा परिमळु जाला मरगजा ।
कां आनंदासि निगालिया दोनि भुजा ।
एणें आघवेनि मकरध्वजा ।
जोडली बरव ॥ ९१ ॥
मस्ताकें मुकुटा ठेविलें । किं मस्तक मुगुटु जालें ।
श्रिंगारें लेणें लाधलें । आंगाचें जेया ॥ ९२ ॥
इंद्रधनुखाचिये आडणी । माझि मेघ गगनरंगणी ।
तैसें आवरलें सारंगपाणी । वैजयंतिया ॥ ९३ ॥
कवणि ते उदार गदा । करी असुरां कैवल्याचा धोंदा ।
कैसें चक्र हान गोविंदा । सौम्य तें ॥ ९४ ॥
किंबहुना स्वामी । तें देखावेया उत्कंठ मी ।
ह्मणौनि झडकरूनि तुह्मीं । तैसें चि होआवें ॥ ९५ ॥
हे विश्वरूपाचे सोहळे । भोगूनियां निवाले डोळे ।
आतां होताति आंधळे । कृष्णालागि ॥ ९६ ॥
तें साकार कृष्णरूपडें । वांचूनि पाहों आन नावडे ।
तें नेदखतां थोडें । मानिताति हे ॥ ९७ ॥
आह्मां भोग मोक्षाचां ठांइ । ते श्रीमूर्त्ति वांचूनि नाहिं ।
ह्मणौनि तैसा चि साकारु होई । हें संहारीं आतां ॥ ९८ ॥

श्रीभगवानुवाच ।

मया प्रसन्नेन तवार्जुनेदं
रूपं परं दर्शितमात्मयोगात् ।
तेजोमयं विश्वमनंतमाद्यं
यन्मे त्वदन्येन न दृष्टपूर्वम् ॥ ४७ ॥

एया अर्जुनाचेया बोला । विश्वरूपा विस्मो जाला ।
ह्मणे ऐसा नाहिं देखिला । धसाळ कोण्ही ॥ ९९ ॥
कोणि हे वस्तु लाधलासि ।
तेया लाभाचा तोषु नेघसि ।
मां भेणें काइ बोलसि ।
हेंकाडु ऐसा ॥ ६०० ॥
आह्मीं सवियां चि जैं प्रसन्न होणें ।
तैं आंग चि वरि ह्मणे देणें ।
वांचूनि जीउ असे वेचणें ।
कव्हणा लागि ॥ १ ॥
तें हें तूझिये चाडे । आजि जीवाचें चि दळवाडें ।
कालौनियां एवडें । रचिलें ध्यान ॥ २ ॥
ऐसी पैं तूझिया आवडी । जाली प्रसन्नता आमची एवडी ।
ह्मणौनि गौप्याची ही गुढी । उभिली जगीं ॥ ३ ॥
तें हें देख अपार । स्वरूप माझें पर ।
एथौनि ते अवतार । कृष्णादिकांचे ॥ ४ ॥
हें ज्ञानतेजाचें निखळ । विश्वात्मक केवळ ।
अनंत हें अढळ । आद्य हें ॥ ५ ॥
आणि हें तुज वांचूनि अर्जुनां । पूर्वी दृढ नाहिं आना ।
जें न्हवे जोगें साधना । ह्मणौनियां ॥ ६ ॥

**न वेदयज्ञाध्ययनैर्न दानै**
**र्न च क्रियाभिर्न तपोभिरुग्रैः ।**
**एवंरूपः शक्य अहं नृलोके ।**
**द्रष्टुं त्वदन्येन कुरुप्रवीर ॥ ४८ ॥**

एयाची सोय पातले । आणि वेदीं मौन चि घेतलें ।
यज्ञ किर माघौते आले । स्वर्गौनि चि ॥ ७ ॥
साधकिं देखिला आयासु । म्हणौनि निर्वाळिला योगाभ्यासु ।
आणि अध्ययनासि सोरसु । नाहिं एथ ॥ ८ ॥
सिवेंचिं सत्कर्में । धाविनलीं संभ्रमें ।
तिहिं बहुतें एकें श्रमें । सत्यलोकु टाकिला ॥ ९ ॥
तिहिं स्वर्ग देखिलें । आणि उग्रपणें उगेयां चि सांडिलें ।
एवं साधना जें ठेलें । अपटांतरिं ॥ ६१० ॥
हें तुवां अनायासें । विश्वरूप देखिलें जैसें ।
इये मनुष्यलोकिं तैसें । न फवे चि कोण्हां ॥ ११ ॥
आजि ध्यानसंपती लागि । तूं चि एकु आथि जगीं ।
हें भाग्य देखैं आंगीं । विरिंची ही नाहिं ॥ १२ ॥

**मा ते व्यथा मा च विमूढभावो**
**दृष्ट्वा रूपं घोरमीदृङ्ममेदम् ।**
**व्यपेतभीः प्रीतमनाः पुनस्त्वं ।**
**तदेव मे रूपमिदं प्रपश्य ॥ ४९ ॥**

म्हणौनि विश्वरूपिं श्लाघ । एथिचें भय नेघ ।
हें वांचूनि चांग । न मनी काहिं ॥ १३ ॥
समुद्र अमृता भरला । आणि अवसांत वरिपडा जाला ।
मग कव्हणीं आथि वोसंडिला । बुडिजैल म्हणौनि ॥ १४ ॥
नातरि सोनेयाचा डोंगरु । काइ करावा हा थोरु ।
ऐसें म्हणौनि अव्हेरु । करी कोण्हीं ॥ १५ ॥

देवें चिंतामणि लेइजे । किं तेयातें वोझें ह्मणौनि उ॰संडिजे ।
ना तरि कामधेनु दवडिजे । न पोसवे ह्मणौनि ॥ १६ ॥
हां गा चंद्रमा आलेयां घरा ।
तेयातें ह्मणिजे निगैं न करिं उबारा ।
पडिसाई पाडितासि दिनकरा ।
परता सरैं ॥ १७ ॥
तैसें ऐश्वर्य हें महातेज । दृष्ट जालें गा तुज ।
परि वायां चि गजबज । करितासि कां ॥ १८ ॥
परि नेणसि गा धनंजया । काइ कोपों गावंढेया ।
आंग सांडूनि छाया । आलंगिसी कां ॥ १९ ॥
हें नव्हे जो मी साचें । ऐसें मन करिसी हो काचें ।
प्रेम धरूनि आवगणिचें । निहालिसी कां ॥ ६२० ॥
तरि आझूं वेन्हीं पार्था । सांडिं थाया हो आतां ।
इये विधि आस्था । चोरिसि झनें ॥ २१ ॥
हें रूप जन्हीं घोर । विकृत आणि थोर ।
तन्हीं कृतनिश्चयासि घर । हें चि करीं ॥ २२ ॥
कृपणाची चित्तवृत्ति जैसी । राउनि घातली ठेवेया पासिं ।
मग नमुधेनि देहेंसिं । आपणपां असे ॥ २३ ॥
कां अजातपक्षा जवला । जीउ बैसौनि तिया आविंसाला ।
पक्षिणी अंतराला । उडौनि जाये ॥ २४ ॥
ना गाय चरे डोंगरीं । परि चित्त बांधलें वत्सें घरीं ।
तैसें प्रेम येथ करीं । पार्था तूं ॥ २५ ॥
एरें उवाइलेनि चित्तें । बाह्य सख्य यया सुखा पुरतें ।
भोगि जो कां तिये श्रीमूर्त्तितें । चतुर्भुजे इये ॥ २६ ॥
परि पुडुतीं पुडुतीं पांडवा । हा येकु बोलु न विसरावा ।
जें इये रूपौनि सद्भावा । नेदावें निगों ॥ २७ ॥

हें कांहिं चि नव्हतें देखिलें । ह्मणौनि तुज भय उपनलें ।
तें सांडिं एथ संचलें । असों दे प्रेम ॥ ६२८ ॥
आतां करूं तूझेया सारिखें । ह्मणितलें विश्वतोमुखें ।
तरि मागील रूप सुखें । दाउं तुज ॥ २९ ॥
ऐसें वाक्य बोलत खेउ । मागुता मनुष्य जाला देउ ।
ऐसा देखां नवलाउ । आवडिचा तिये ॥ ६३० ॥
कृष्णु कैवल्य उघडें । वरि सर्वस्व विश्वरूपा येवडें ।
हातिं दीधलें किं नावडे । अर्जुनासि ॥ ३१ ॥
वारुकां वारुणु वारिजे । जैसें रत्नासि दूषण ठेविजे ।
ना तरि कन्या पाहुनु ह्मणिजे । मना नेये ॥ ३२ ॥
तेया विश्वरूपा येवडी दशा । करितां प्रीतिचा वाढु कैसा ।
सेल दीधली असे उपदेशा । किरीटीसि देवें ॥ ३३ ॥
मोडूनि भांगाराचा रवा । लेणीं घडिजति आपुलेया सवा ।
मना नावडे जरि जीवा । तरि आटिजे पुडुतीं ॥ ३४ ॥
तैसें शिष्याचिये प्रतीती जालें । कृष्णत्व होतें तें विश्वरूप केलें।
तें मना नये चि तेव्हलिं आणिलें । कृष्णपण मागुतें ॥ ३५ ॥

**संजय उवाच ॥**

> **इत्यर्जुनं वासुदेवस्तथोक्त्वा**
> **स्वकं रूपं दर्शयामास भूयः ।**
> **आश्वासयामास च भीतमेनं**
> **भूत्वा पुनः सौम्यवपुर्महात्मा ॥ ५० ॥**

हा ठावो वेन्हीं शिष्याची निसि ।
साहाते गुरु काइ आहाति देशीं ।
परि नेणिजे आवडि कैसी ।
संजयो ह्मणे ॥ ३६ ॥

मग विश्व व्यापूनि भवंतें । जें योगतेज प्रकटलें होंतें ।
तें हारतलें आइतें । रूपिं तिये ॥ ३७ ॥
जैसें त्वंपद हें आघवें । तत्पदार्थीं सामावे ।
अथवा द्रुमाकारु सांटवे । बीजकणिके ॥ ३८ ॥
ना तरि स्वप्नसंभ्रमु जैसा । गिळी चेइली जीवदशा ।
श्रीकृष्णें योगु तैसा । संहारिला तो ॥ ३९ ॥
जैसी हारतली प्रभा बिंबिं । कां जळदसंपति नभीं ।
भरितें सिंधुगर्भीं । रिगालें राया ॥ ६४० ॥
हों काज कृष्णाकृतिचिया मोडी । होती विश्वरूपाची घडी ।
ते अर्जुनाचिया आवडी । उपलविली देवें ॥ ४१ ॥
तवं प्रमाण आणि रंगु । देखिला सवियां चांगु ।
तेथ ग्राहकैये जाला लागु । म्हणौनि केली पुढुतीं ॥ ४२ ॥
तैसें वाढिचेनि बहुवसपणें । रूपें विश्व जिंतलें जेणें ।
तें सौम्य कोडिसवाणें । साकार जालें ॥ ४३ ॥
किंबहुना अनंतें । धाकुटेपण धरलें मागौतें ।
परि आश्वासिलें पार्थातें । भियालेयातें ॥ ४४ ॥
तेथ स्वप्नीं स्वर्गां गेला । तो अवसांत जैसा चेइला ।
तैसा विस्मयो जाला । किरीटीसी ॥ ४५ ॥
नातरि गुरुकृपे सवें । उम्सरलें प्रपंचजात आघवें ।
स्फुरे तत्व तेवि पांडवें । मूर्त्ति देखिली ॥ ४६ ॥
तेया पांडवा ऐसें चित्तीं । आड विश्वरूपाची जवनीक होती ।
ते फिटौनि गेली परौती । हें भलें जालें ॥ ४७ ॥
काइ काळातें जीणौनि आला ।
किं मियां महावातु मागां सांडिला ।
नातरि आपुलां बाहिं उतरला ।
सिंधु साते ॥ ४८ ॥

ऐसा संतोषु बहु चित्तें । घेइजत असे पांडुसुतें ।
विश्वरूपा पाठिं कृष्णातें । देखोनियां ॥ ४९ ॥
मग सूर्याचां अस्तमानीं । माघुतिया तारा उघडती गगनीं ।
तैसा देखों लागला वयनीं । दोन्हीं सैन्यें ॥ ६५० ॥
पाहे तवं तें चि कुरुक्षेत्र । आणि दों भागीं जालें असे गोत्र ।
वरि वरिषताति शस्त्र । संघाट वेन्हीं ॥ ५१ ॥
तेया बाणाचेया मांडवा आंतु । तैसा चि रथु आहे निवांतु ।
धुरे बैसला लक्ष्मीकांतु । आपणपें तळीं ॥ ५२ ॥
तवं मागील जैसें तैसें । तेणें देखिले वीर विलासे ।
मग ह्मणे जी आतां मानसें । साच घेतलें ॥ ५३ ॥
बुद्धितें सांडूनि ज्ञान । भेण वळवळे रान ।
अहंकारेंसिं मन । कां देशीक जालें ॥ ५४ ॥
इंद्रियें प्रकृति भूललीं । वाचा प्राणासि चूकली ।
ऐसी अपांपारि होती जाली । शरीरग्रामिं ॥ ५५ ॥
तियें आववीं चि मावोतीं । जीवें भेटलीं प्रकृती ।
आतां जीतांणें श्रीमूर्ती । जालें इया ॥ ५६ ॥

**अर्जुन उवाच ।**

> **दृष्ट्वेदं मानुषं रूपं तव सौम्यं जनार्दन ।**
> **इदानीमस्मि संवृत्तः सचेताः प्रकृतिं गतः ॥ ५१ ॥**

ऐसें सुख जीवीं घेतलें । मग कृष्णातें जी ह्मणितलें ।
मियां तुमचें रूप देखिलें । मानुष हें ॥ ५७ ॥
हें रूप दाखवणें राया । किं अपत्या मज चूकलेया ।
बुझाउनि तुवां माया । स्तन्य दीधलें ॥ ५८ ॥
जी विश्वरूपाचां सागरीं । होंतां तरंग मर्वातु वांव वेन्हीं ।
तो इये मूर्तीचां तीरीं । निगाला आतां ॥ ५९ ॥

आइकैं द्वारकापुरसुहडा । मज सुकतेया जी झाडा ।
हे भेटि नव्हे हुडा । मेघांचा जाला ॥ ६० ॥
सावियां तृषा फूटला । तेया मज अमृतसिंधु भेटला ।
आतां भरवंसा जाला । जाणेयांचा ॥ ६१ ॥
माझां हृदयरंगणीं । होंतसे हरिषलतांची लावणी ।
सुखेंसिं बुझावणी । जाली मज ॥ ६२ ॥

**श्रीभगवानुवाच ।**

**सुदुर्दर्शमिदं रूपं दृष्टवानसि यन्मम ।**
**देवा अप्यस्य रूपस्य नित्यं दर्शनकांक्षिणः ॥ ५२ ॥**

या पार्थाचेया बोला सवें । हें काइ गा ह्मणितलें देवें ।
तुवां प्रेम ठेउनि यावें । विश्वरूपीं किं ॥ ६३ ॥
मग इये श्रीमूर्त्ती । भेटावे सडिया आइती ।
हें सिखवणें सुभद्रापती । विसरलासि पैं ॥ ६४ ॥
पैं लाधलेयां अर्जुना । मेरु ही आवडे साना ।
ऐसा आथि मना । दुःस्वप्नभावो ॥ ६५ ॥
तें हें विश्वात्मक रूपडें । जें दाविलें गा तुजपुढें ।
तें शंभू ही न जोडे । तप करितां ॥ ६६ ॥
अष्टांगादि संकटीं । योगी सीणताति किरीटी ।
परि अवसरु नाहिं भेटी । जेयाचिये ॥ ६७ ॥
तें विश्वरूप एकधा वेलु । देखौनि काये अलुमालु ।
ऐसें करितां कालु । जांतसे देवां ॥ ६८ ॥
आशेचिया आंजुली । ठेउनि हृदयाचां निडलीं ।
चातक निरालीं । लागलें जैसें ॥ ६९ ॥
तैसे उत्कंठानिर्भर । होउनियां सुरवर ।
घोकित आठ पाहार । भेटि जेयाची ॥ ६७० ॥

पैं विश्वरूपा सारिखें । स्वप्नीं हिं कव्हणीं नेदखे ।
जें प्रत्यक्ष तुवां सुखें । देखिलें हें ॥ ७१ ॥

**नाहं वेदैर्न तपसा न दानेन न चेज्यया ।**
**शक्य एवंविधो द्रष्टुं दृष्टवानसि मां यथा ॥ ५३ ॥**

पैं उपायांसि वाटा । नव्हति एथ सूभटा ।
सावाइं वोहटा । वाहिला वेदें ॥ ७२ ॥
मज विश्वरूपाचिया मोहरा । चालावेया धनुर्द्धरा ।
तपांचिया ही सर्वभारा । न्हवे चि लाहु ॥ ७३ ॥
आणि दान किर हें कानडें । मीं यज्ञीं हीं तैसा न संपडे ।
जैसेनि कां सुरवाडें । देखिलें तुवां ॥ ७४ ॥

**भक्त्या त्वनन्यया शक्य अहमेवंविधोऽर्जुन ।**
**ज्ञातुं द्रष्टुं च तत्वेन प्रवेष्टुं च परंतप ॥ ५४ ॥**

तैसा मी एकी चि परी । आंतुडें गा अवधारिं ।
जरि भक्ति एउनु वरी । चित्त माझें ॥ ७५ ॥
ते चि भक्ति ऐसी । पर्जन्याची सूटिका जैसी ।
धारा वांचूनि अनारिसी । गोठि नेणे ॥ ७६ ॥
कां सकळ जळसंपत्ती । घेउनि समुद्रातें गिवसिती ।
गंगा जैसी अनन्यगती । मीनली चि मिळे ॥ ७७ ॥
तैसें गा सर्वभावभारें । न धरत प्रेम एकसरें ।
मज माझि संचरे । मी चि होउनि ॥ ७८ ॥
आणि तेविं चि मीं ऐसा । थडिये माझारी सारिसा ।
क्षीराब्धि कां जैसा । क्षीराचा चि ॥ ७९ ॥
तैसें मज लागूनि मुंगी वेव्हीं । किंबहुना चराचरीं ।
भजनासि गा दुसरी । भ्रांति पैं नाहिं ॥ ६८० ॥
तैं तेया चि क्षणा सवें । येवंविधु मीं जाणवें ।
जाणितलां तरि स्वभावें । द्रिष्टु होये ॥ ८१ ॥

मग इंधनिं आगि उदिपे । आणि इंधन हें भाष हारपे ।
तैं अग्नी चि होउनि आरोपे । मूर्त्त जेवि ॥ ८२ ॥
कां उदो न करिजे तेजकरें ।
तवं गगन चि होउनि असे आंधारें ।
मग उदैलेयां एकसरें ।
प्रकाशु होए ॥ ८३ ॥
तैसें माझां साक्षात्कारीं । सरे अहंकाराची वारी ।
अहंकारलोपीं अवधारीं । द्वैत जाए ॥ ८४ ॥
मग मीं तो हें आघवें । एकु मीं चि आथि स्वभावें ।
किंबहुना सामावे । समरसें तो ॥ ८५ ॥

**मत्कर्मकृन्मत्परमो मद्भक्तः संगवर्जितः ।**
**निर्वैरः सर्वभूतेषु यः स मामेति पांडव ॥ ५५ ॥**

जो मज चि एका लागि । कर्में वाहांतसे आंगीं ।
जेया मज वांचूनि जगीं । गोमटें नाहिं ॥ ८६ ॥
दृष्टादृष्ट सकळ । जेयासि मीं चि केवळ ।
जेणें जियावेयाचें फळ । मज चि नावें ठेविलें ॥ ८७ ॥
भूतें हें भाष विसरला । जें दीठी मी चि आहें बांधला ।
ह्मणौनि निर्वैर जाला । सर्वत्र भजे ॥ ८८ ॥
ऐसा जो भक्तु होये । तेयाचें त्रैधातुक जें आहे ।
तें मीं चि होउनि ठायें । पांडवा गा ॥ ८९ ॥
ऐसें जगदुदरदोंदिलें । तेणें करुणारसकल्लोळें ।
संजयो ह्मणे बोलिलें । कृष्णदेवें ॥ ६९० ॥
आतां यावरि तो पांडुकुमरु । जाला असे आनंदसंपदा थोरु ।
आणि कृष्णचरणचतुरु । एकु चि तो जगीं ॥ ९१ ॥
तेणें देवाचिया दोन्हीं मूर्त्तीं । नीकिया निहाळिलिया चित्तीं ।
तवं विश्वरूपा पाहूनि कृष्णमूर्त्ती । देखिला लाभु ॥ ९२ ॥

परि तेयाचिये जाणिवे । मानु न करिजे चि देवें ।
जें व्यापक पाहूनि न्हवे । एकदेशिय ॥ ९३ ॥
आणि हें चि सामर्थावेया लागि । येकि दोनि चांगी ।
उपपत्ती शारंगी । दाविता जाला ॥ ९४ ॥
तिया आइकौनि सुभद्राकांतु । चित्तिं असे ह्मणतु ।
पारि होये जे दोन्ही आंतु । तें पुडुतीं पुसों ॥ ९५ ॥
ऐसा आलो चुकरूनि जीवीं । आतां पूसती वोज बरवी ।
आदरील ते परिसावी । पुढील कथा ॥ ६९६ ॥
प्रांजल वोवीप्रबंधें । गोठि सांविजैल विनोदें ।
निवृत्तिपादप्रसादें । ज्ञानदेॐ ह्मणे ॥ ९७ ॥
भरूनि सद्भावाचिया आंजुली । मियां वोवीफुलें मोकलीं ।
अर्पिलीं अंघ्रियुगुलीं । विश्वरूपाचां ॥ ६९८ ॥

ॐ ॥ तत्सदिति श्रीमद्भगवद्गीतासूपनिषत्सु ब्रह्मविद्यायां योगशास्त्रे श्रीकृष्णार्जुनसंवादे **विश्वरूपदर्शन-योगो** नाम एकादशोऽध्यायः ॥११॥

॥ श्रीकृष्णार्पणमस्तु ॥

# ज्ञानेश्वरी

## अध्याय बारावा

॥ श्रीगणेशायनमः ॥

जय जय सिद्धे । उदारे प्रसिद्धे ।
अनव्रत आनंदे । वर्त्ततिये ॥ १ ॥
विषयव्यालें मीठी । दीधलेयां उठणें नाहिं ताठि ।
तूझेनि वो गुरुद्रिष्टी । होये माए ॥ २ ॥
तरि ताप कोणातें पोली । कैसेनि सोसु जाली ।
जरि प्रसादरसकल्लोळीं । पूरें येसि तूं ॥ ३ ॥
योगसुखाचे सोहले । सेवकां दावीसि स्नेहाले ।
सोहंसिद्धीचे लले । पालीसि तूं ॥ ४ ॥
आधारशक्तीचां अंकिं । वाढविसि तूं कौतुकिं ।
हृदयकोशपालकीं । हालवीसि पैं ॥ ५ ॥
प्रत्यग्ज्योतीची वोवाळणी । करिसि मनपवनाचिं खेळणिं ।
रिद्धीसिद्धीचिं बाललेणीं । लेववीसि माये ॥ ६ ॥
सतरावियेचें स्तन्य देसी । अनाहताचा हल्लरु गासी ।
समाधिबोधें निजविसी । बुझाउनि ॥ ७ ॥
म्हणौनि साधकां तूं माउली । । पीके सारस्वत तूझां पाउलीं ।
या कारणें साउली । न संडीं तूझी ॥ ८ ॥
आवो सद्गुरुचिये दीठी । तूझें कारुण्य जेयातें आधिष्टी ।
तो सकलविद्याचिये सृष्टी । धात्रा होए ॥ ९ ॥

म्हणौनि अंबे श्रीमंते । निजजनकल्पलते ।
आज्ञा दे पां मातें । निरूपणीं ॥ १० ॥
नवरसां भरवि सागर । करविं उचितरत्नाचे आगर ।
भावार्थाचे गिरिवर । निफजविं माये ॥ ११ ॥
साहित्यसोनेयांचिया खाणी । उघडविं देशीचिया अक्षोणी ।
विवेका वेलीची लावणी । होंदे सैघ ॥ १२ ॥
संवादफलनिधानें । प्रमेयाचिं उद्यानें ।
लावीं म्हणे गहनें । निरंतर ॥ १३ ॥
पाखांडाचे दरकुटे । मोडीं वाग्वाद अव्हांटे ।
कुतर्कांचिं दुष्टें । सावजें दवडीं ॥ १४ ॥
श्रीकृष्णचरणिं मातें । सर्वत्र करिं वसतें ।
राणिवे बैसवीं श्रोते । श्रवणाचिये ॥ १५ ॥
मऱ्हाटियेचां नगरीं । ब्रह्मविद्येचा सुकालु करीं ।
घेणें देणें सुखचि वेऱ्हीं । जगा होंदेइं ॥ १६ ॥
तूं आपुलेनि स्नेहपल्लवें । मातें पांगुरवीसि सदैवें ।
तरि आतां चि हें आववें । निर्मीन मीं ॥ १७ ॥
इये विनवणिये साठिं । अवलोकिलें गुरुद्रिष्टी ।
ह्मणे गीतार्थैसिं उठीं । न बोल बहू ॥ १८ ॥
येथ जी जी महाप्रसादु । ह्मणौनि सवियां जाला आनंदु ।
आतां निरोपिजैल प्रबंधु । अवधान दीजो ॥ १९ ॥

**अर्जुन उवाच ।**

**एवं सततयुक्ता ये भक्तास्त्वां पर्युपासते ।**
**ये चाप्यक्षरमव्यक्तं तेषां के योगवित्तमाः ॥ १ ॥**

तरि सकलवीराविराजु । तो सोमवंशु विजयध्वजु ।
बोलता जाला आत्मजु । पांडुनृपाचा ॥ २० ॥

कृष्णातें ह्मणे अवधारिलें । आपण विश्वरूप मज दाविलें ।
तवं नवल ह्मणौनि भ्यालें । चित्त माझें ॥ २१ ॥
आणि ये कृष्णमूर्त्तीची सवे । ह्मणौनि सोये धरिली जीवें ।
तवं नको ह्मणौनि देवें । वारिलें मातें ॥ २२ ॥
तरि व्यक्त आणि अव्यक्त । तूंचि येक निभ्रांत ।
भक्ती पाविजे व्यक्त । अव्यक्त योगें ॥ २३ ॥
या दोनी चि जी वाटा । तूंतें ठाकावेया वैकुंठा ।
व्यक्तअव्यक्ताचां दारवठां । रिगिजे येथ ॥ २४ ॥
पैं जे वानी श्येया तूकां । ते चि वेगळी वाला येका ।
ह्मणौनि येकदेशी व्यापका । पाडु नेदखें ॥ २५ ॥
अमृताचां सागरिं । जे लाभे सामर्थ्याची थोरी ।
ते चि दे अमृतलहरी । चुळिं घेतलेयां ॥ २६ ॥
हे किर माझां चित्तीं । प्रतीति आथि जी निरुती ।
परी पूसणें योगपती । याचिलागि ॥ २७ ॥
जें देवा तूह्मीं नावेक । अंगिकारिलें व्यापक ।
तें साच किं कवतिक । हें जाणावेया ॥ २८ ॥
तरि तुजलागि सवर्म । तूं जेयांचें परम ।
भक्तीसि मनोधर्म । विकूनि घातले ॥ २९ ॥
इत्यादि सर्वै परीं । जे भक्त तूंतें हरी ।
वांधौनियां जिव्हारीं । उपासिती ॥ ३० ॥
आणि प्रणवापैलीकडे । वैखरीसि जें कांनडें ।
काइसेया ही सांवडें । नव्हे जे वस्तु ॥ ३१ ॥
तें अक्षर जी अव्यक्त । निर्देशदेशरहित ।
सोहंभावें उपासित । योगिये जे ॥ ३२ ॥
तेयां आणि जी भक्तां । येयां येरयेरां अनंता ।
कवणें योगें तत्त्वता । जाणीतला सांवें ॥ ३३ ॥

श्रीभगवानुवाच ।

**मय्यावेश्य मनो ये मां नित्ययुक्ता उपासते ।**
**श्रद्धया परयोपेतास्ते मे युक्ततमा मताः ॥ २ ॥**

या किरीटिचिया बोला । तो विश्वव्यापकु संतोखला ।
म्हणे प्रश्नु पैं भला । केला तुवां ॥ ३४ ॥
तरि अस्तगिरिचां उपकंठीं । रिगालेया रविबिंबापाठीं ।
रश्मि जैसे किरीटी । संचरति गा ॥ ३५ ॥
तैसे सर्व इंद्रियें सहित । मजमाझि सूनि चित्त ।
रातिदीनु न म्हणत । उपासिति जे ॥ ३६ ॥
परि टाकिलेयांहिं सागरु । जैसा मागील यावा अनिवारु ।
तिये गंगेचिया ऐसा पडिभरु । प्रेमभावां ॥ ३७ ॥
वरुषाकालिं सरिता । जैसी चढों लागे पांडुसुता ।
तैसी दूणे वरि भजतां । श्रद्धा दीसे ॥ ३८ ॥
येयापरि जे भक्त । आपणपें मज देत ।
ते मी योगयुक्त । परम मानीं ॥ ३९ ॥

**ये त्वक्षरमनिर्देश्यमव्यक्तं पर्युपासते ।**
**सर्वगमचिन्त्यं च कूटस्थमचलं ध्रुवम् ॥३॥**

आणि येर ते पांडवा । जे आरुढौनि सोहंभावा ।
झोंबति निरयवां । अक्षरासि ॥ ४० ॥
जेथ मनाची नाखि न लगे । तेथ बुद्धीची ही दीठि न रिगे ।
इंद्रियां किर जोगें । होईल कायि ॥ ४१ ॥
परि ध्याना हि कुवाडें । ह्मणौनि येके ठांइ न संपडे ।
व्यक्तीसि माझिवडें । होईल कायि ॥ ४२ ॥
जेया सर्वत्र सर्वपणें । सर्विहिं कालिं असणें ।
जें पाहूनि चिंतणें । हिंपुटी जालें ॥ ४३ ॥

जें होये ना नव्हे । जें नाहिं ना आहे ।
जें पाहुनु उपाये । उपजति ना ॥ ४४ ॥
जें चळे ना ढळे । सरे ना मैळे ।
तें आपुलेनि बळें । आंगविलें ॥ ४५ ॥

**सन्नियम्येंद्रियग्रामं सर्वत्र समबुद्धयः ।**
**ते प्राप्नुवंति मामेव सर्वभूतहिते रताः ॥ ४ ॥**

वैराग्यमहापावकें । जाळूनि विषयांचि कटकें ।
आधपलिपिं तवकें । इंद्रियें धरिलीं ॥ ४६ ॥
मग संयमाची धाटी । सूनु मुरडिलिं याळवटीं ।
कोंडियलीं कपाटीं । हृदयाचां ॥ ४७ ॥
अपानाचिया कवाडा । लाउनि आसनमुद्रा सुहाडा ।
मूळबंधाचा हुडा । पानासिला ॥ ४८ ॥
आसेचे लाग तोडिले । धैर्याचे कडे झाडिले ।
निद्रेचें शोषिलें । काळवंखें पैं ॥ ४९ ॥
वज्राग्नीचां ज्वाळीं । करुनु अपारां धातूंची होळी ।
व्याधिचां सीसाळीं । पूजिलीं यंत्रें ॥ ५० ॥
मग कुंडलणियेचा टेंभा । आंधारीं करुनि उभा ।
तिया चोजविलिया प्रभा । निमथावेन्हीं ॥ ५१ ॥
नवद्वाराचां चौकीं । वाणूनि संयतेचां आडवंकी ।
उघडिली खिडकी । ककारांतीची ॥ ५२ ॥
प्राणशक्ती चामुंडे । प्रहारुनि संकल्पमेंढे ।
मनोमैंषाचेनि मुंडें । बळि दीन्हली ॥ ५३ ॥
मग चंद्रसूर्या बुझावणी । करुनि अनाहताची मुडावणी ।
सत्रावियेचें पाणीं । जितलें वेगां ॥ ५४ ॥
मग मध्यमामध्यविवरें । तेणें कोरिवें दादरें ।
टाकिलें चवरें । ब्रह्मरंध्रिचें ॥ ५५ ॥

वारे मकारांत सोपान । तें सांडूनियां गहन ।
काखे सूनि गगन । भरले ब्रह्मीं ॥ ५६ ॥
ऐसेनि जे समबुद्धी । गिळावेया सोहंसिद्धी ।
आंगिवीति निरवधी । योगदुर्गें ॥ ५७ ॥
आपुलिया साटोवाटी । घेंति शून्य उठाउठी ।
तेही मातें किरीटी । पावति गा ॥ ५८ ॥

**क्लेशोऽधिकतरस्तेषामव्यक्तासक्तचेतसाम् ।**
**अव्यक्ता हि गतिर्दुःखं देहवद्भिरवाप्यते ॥ ५ ॥**

वांचूनि योगाचेनि बळें । अधिक काहिं मिळे ।
ऐसें नाहिं आगळे । कष्टचि तेयां ॥ ५९ ॥
जिहिं सकळभूताचां हितिं । निराळंब अव्यक्तीं ।
पसरिलिया मती । भक्तीवीण ॥ ६० ॥
तेया महेंद्रादिपदें । करीति वाटवंधें ।
रिद्धीसिद्धीसिं द्वंद्वें । पाडौनि ठांति ॥ ६१ ॥
कामक्रोधांचे विलग । उठावती अनेग ।
आणि शून्येंसिं आंग । जूंझावें किं ॥ ६२ ॥
ताहाना ताहान चि पियावी । भूकैलेयां भूक चि खावी ।
अहोरात्रि वार्वि । मवावा वारा ॥ ६३ ॥
उनींदेयाचें पहुडणें । निरोधाचें वेल्हावणें ।
झाडेंसिं साजणें । चाळावें गा ॥ ६४ ॥
सीत वेढावें । उष्ण पांघुरावें ।
वृष्टीचेया असावें । घरा आंतु ॥ ६५ ॥
किंबहुना पांडवा । हा अग्निप्रवेशु नीच नवा ।
भातारेंविण करावा । तो हा योगु ॥ ६६ ॥
स्वामिचें काज । ना बापिकें व्याज ।
परि यमेंसिं जूझ । नीच नवें ॥ ६७ ॥

ऐसें मृत्यूहूनि तिख । कां घोंटे जळतें विख ।
डोंगर गीळितां मुख । न फटे काई ॥ ६८ ॥
ह्मणौनि योगाचिया वाटा । जे निगाले गा सूभटा ।
त्यांसि दुःखाचा वाटा । भागासि आला ॥ ६९ ॥
पाहे पां लोहाचे चणे । बोचरां पडती खाणें ।
तें पोट भरणें कीं प्राणें । शुद्धि ह्मणों ॥ ७० ॥
ह्मणौनि समुद्र बाहीं । तरणें आथि केहीं ।
गगनामाजि पाईं । खोलिजत असे ॥ ७१ ॥
वळघलेयां थाटी । आंगिं न भरतां काठी ।
सूर्याची पाउटी । होववे काइ गा ॥ ७२ ॥
यालागि पांगुळां हेवा । नव्हे वायूसिं पांडवा ।
तेवि देहवंतां जीवां । अव्यक्तिं गति ॥ ७३ ॥
ऐसा ही जन्हीं धिवंसा । बांधौनियां आकाशा ।
झोंबति तरि क्लेशा । पात्र होंती ॥ ७४ ॥

**ये तु सर्वाणि कर्माणि मयि संन्यस्य मत्पराः ।**
**अनन्येनैव योगेन मां ध्यायंत उपासते ॥ ६ ॥**

ह्मणौनि येर तयांची वार्ता । परिसें गा पार्था ।
जे कां भक्तिपंथा । वोटंगले ॥ ७५ ॥
कर्में इंद्रियें सुखें । करीति कर्में अशेषें ।
जियें कां वर्णविशेषें । भोगासि आलीं ॥ ७६ ॥
विधितें पाळीत । निषेधातें गाळीत ।
मज देउनि जाळीत । कर्मफळें ॥ ७७ ॥
ऐसिया परिं पाहिं । अर्जुना माझां ठांइ ।
संन्यासूनि नाहिं । करिति कर्में ॥ ७८ ॥
आणिक जें जें सर्व । काहिं एक मानसीक भाव ।
तेयां मीं वांचूनि धाव । आनौती नाहिं ॥ ७९ ॥

ऐसे जे मत्पर । उपासिति निरंतर ।
ध्यानमीसें घर । माझेंचि जाले ॥ ८० ॥
जेयाचिया आवडी । केली मासिं कुळवाडी ।
भोग मोक्ष बापुडीं । त्यजिलिं कुळें ॥ ८१ ॥
ऐसे अनन्ययोगें । विकले जिवें आंगें ।
तेयां काइयेक सांगें । जें मीं करिं ॥ ८२ ॥
किंबहुना धनुर्धरा । जो मातेचेया ये उदरा ।
तिये मातेचा सवंसारा । केतुला पां ॥ ८३ ॥
तेवि मिं तेयां । जैसे असति तैसेयां ।
कृत तें धनंजया । घेतला पाटा ॥ ८४ ॥
माझेया आणि भक्तां । सवंसारिची चिंता ।
काइ समर्थाची कांता । भूकेतें शोची ॥ ८५ ॥
तैसे ते माझें । कलत्र ऐसें जाणिजे ।
काइसेनि हिं न लजें । तेयाचेनि मीं ॥ ८६ ॥
तेयां जन्ममृत्युचां लाटीं । झलंबली हे सृष्टी ।
देखौनियां पोटीं । ऐसें जालें ॥ ८७ ॥
तरि या सिंधूचेनि माजें । कवणासि धाकु नुपजे ।
येथ झनें माझे । भितिल हान ॥ ८८ ॥
म्हणौनि गा पांडवा । मूर्तिचा मेलावा ।
करूनियां गावां । धावंतु आलों ॥ ८९ ॥
सडे जे देखिले । ते ध्यानाचिये कासे लाविले ।
ग्रुहीं घातले । क्रियांतरिं ॥ ९० ॥
नामाचां सहस्रवेन्हीं । नावा इया अवधारि ।
सज्जूनि सवंसारिं । तारू जालां ॥ ९१ ॥
प्रेमाचि पेटिं । बांधलिं येकाचां पोटिं ।
मग नीणिले तटीं । सायुज्याचां ॥ ९२ ॥

परि भक्तांचेनि नावें । चतुष्पदादीक आघवे ।
वैकुंठिचिये राणिवे । योग्य केले ॥ ९३ ॥

**तेषामहं समुद्धर्ता मृत्युसंसारसागरात् ।**
**भवामि न चिरात्पार्थ मय्यावेशितचेतसां ॥ ७ ॥**

म्हणौनि गा भक्तां । नाहिं येकिही चिंता ।
तेयांतें समुद्धर्ता । मीं सदा आथि ॥ ९४ ॥
आणि जेधवां चि भक्तीं । दीधलिया मज मती ।
तेव्हां चि मज सूती । तेयाचां हितिं ॥ ९५ ॥

**मय्येव मन आधत्स्व मयि बुद्धिं निवेशय ।**
**निवसिष्यसि मय्येव अत ऊर्ध्वं न संशयः ॥ ८ ॥**

एया कारणें तुवां । हा मंत्र धनंजया ।
कीजे जें येया । मार्गा भजिजे ॥ ९६ ॥
तरि मन हें येक । माझां स्वरूपीं वृत्तिक ।
करूनि घालीं आणिक । बुद्धी ही हे ॥ ९७ ॥
इयें दोन्हि सरिसिं । मजमाजि प्रेमेंसिं ।
रिगालीं तरि पावसी । मातें चि तूं गा ॥ ९८ ॥
जरि मनें बुद्धि इहिं । घर केलें माझां ठाइं ।
तरि सांवें मग काइ । तूंपण उरे ॥ ९९ ॥
म्हणौनि दिवा पाल्वे । सवें चि तेज माल्हवे ।
कां रविबिंबासवें । प्रकाशु जाये ॥ १०० ॥
उचलल्या प्राणासरिसिं । इंद्रियें निगति जैसीं ।
तैसा मनबुद्धीपासिं । अहंकारु ये ॥ १ ॥
ह्मणौनि माझां स्वरूपीं । मनबुद्धि हे निक्षेपी ।
एतुलेनि सर्वव्यापीं । मी चि होसि ॥ २ ॥
येया बोला काहिं । अनारिसें नाहिं ।
आपुली आण पाहिं । वांतु असे ॥ ३ ॥

**अथ चित्तं समाधातुं न शक्नोषि मयि स्थिरम् ।**
**अभ्यासयोगेन ततो मामिच्छाप्तुं धनंजय ॥ ९ ॥**

अथवा हें चित्त । मनबुद्धीसहित ।
माझां हातिं अचुंबित । न शकसि देवों ॥ ४ ॥
तरि गा येतुकें करीं । यां आठां पाहारां भीतरी ।
एक निमिषभरी देतु । जाये ॥ ५ ॥
मग जें जें निमिष । देखैल माझें सुख ।
तेतुलालें आरोचक । विषइं येईल ॥ ६ ॥
जैसा शरत्कालु निगे । आणि सरिता वोहटों लागे ।
तैसें काडैल वेगें । प्रपंचौनि ॥ ७ ॥
मग पुनिवेहौनि जैसें । शशिबिंबा दिहें दीसें ।
हारपत अवंसे । नाहिं चि होए ॥ ८ ॥
तैसें भोगाआंतूनि निगतां । चित्त मजमाझि रिगतां ।
हळुहळु पांडुसुता । मी चि होंसि ॥ ९ ॥
आगा अभ्यासयोगु ह्मणिजे । तो हा येकु जाणिजे ।
येणें कांइयेक न निफजे । ऐसें नाहिं ॥ ११० ॥
येयाचेनि बळें । येकां गती अंतराळें ।
व्याघ्रसर्प प्रांजळें । केले एकीं ॥ ११ ॥
विष कि आहारिं पडे । समुद्रीं मध्यें वाट जोडे ।
एकिं वाग्ब्रह्म थोडें । अभ्यासें केळें ॥ १२ ॥
ह्मणौनि अभ्यासासि काहिं । सर्वथा दुष्कर नाहिं ।
यालागि माझां ठांइं । अभ्यासें मीळ ॥ १३ ॥

**अभ्यासेऽप्यसमर्थोऽसि मत्कर्मपरमो भव ।**
**मदर्थमपि कर्माणि कुर्वन् सिद्धिमवाप्स्यसि ॥ १० ॥**

कां अभ्यासाहीलागि । नाहिं कसु तूझां आंगि ।
तरि आहासि जिया भंगीं । तियाचि अस ॥ १४ ॥

इंद्रियें न कोंडि । भोग न तोडि ।
अभिमानु न संडी । स्वजातीचा ॥ १५ ॥
कुळधर्मु चाळिं । विधिनिषेधु पाळिं ।
सुखें तुज सरली । दीन्हली असे ॥ १६ ॥
पण मनें वाचा देहें । जैसा जो व्यापारु होए ।
तो मी करितु आहें । ऐसें न ह्मण ॥ १७ ॥
करणें कां न करणें । आघवें तो चि जाणे ।
विश्व चळिजत असे जेणें । ऐसें जाण ॥ १८ ॥
उणेया पुरेयाचें काहिं । उरों नेदीं आपुलां ठाइं ।
संजात चि करुनि घेइं । जीवित हें ॥ १९ ॥
माळियें जेउतें नेलें । तेउतें निवांत चि गेलें ।
तेया पाणियां ऐसें जालें । नाठवे हें ॥ २० ॥
तें यन्हविं तन्हीं सूभटा । हें उजू कां अन्हांटा ।
या व्यर्थ खटपटा । करित आहे ॥ २१ ॥
तरि प्रवृत्ति आणि निवृत्ति । यियें वोझिं नेघों मती ।
अखंड चित्तवृत्ति । आठवों मी ॥ २२ ॥
आणि जें जें कर्म निफजे । तें थोडें बहूत न ह्मणिजे ।
निवांत चि अर्पिजे । माझां ठांइं ॥ २३ ॥
ऐसिया मद्भावना । तनूत्यागिं अर्जुना ।
तूं सायुज्यसिद्धसदना । त्रिशुद्धी एसी ॥ २४ ॥

**अथैतदप्यशक्तोऽसि कर्तुं मद्योगमाश्रितः ।**
**सर्वकर्मफलत्यागं ततः कुरु यतात्मवान् ॥ ११ ॥**

नातरि हें इं तुज । नेंदवे कर्म सहज ।
तन्हीं गा तूं मज भज । पांडुसुता ॥ २५ ॥
बुद्धीचिये पाठिं पोटिं । कर्मा आदिसेवटीं ।
मातें बांधलें किरीटी । दुआड जरि ॥ २६ ॥

तरि हेंहिं असो । सांडी माझा अतिसो ।
परि संयतिसीं वसो । बुद्धि मार्गीं ॥ २७ ॥
आगा वृक्षा कां वल्ली । लोटति फळें पीकलीं ।
तैसिं सांडिं निफनालिं । कर्में सिद्धें ॥ २८ ॥
परि मातें मनिं धरावें । कां मजउद्देशें करावें ।
हें काहीं चि नोको आघवें । जावों दे शून्य ॥ २९ ॥
खडकिं जैसें वरिषलें । कां अग्नीमाजि पेरिलें ।
कर्म मानीं देखिलें । स्वप्न जैसें ॥ १३० ॥
आगा आत्मजेचां विषिं । जैसा जीउ निराभिलाषी ।
तैसा कर्मिं अशेषिं । निष्कामु होये ॥ ३१ ॥
वान्हिची ज्वाळा जैसी । वायां जाये आकासिं ।
क्रिया जिरों दे तैसी । शून्यामाजि ॥ ३२ ॥
अर्जुना हा फळत्यागु । आवडे कीर आसलगु ।
परि योगामाजि योगु । धूरेचा हा ॥ ३३ ॥
येणें फळत्यागें सांडे । तें तें कर्म न विरुढे ।
येके चि वेळे झाडें । वांझें जैसिं ॥ ३४ ॥
तैसें येणें शरीरें । शरीरा येणें सरे ।
किंबहुना यरिझारे । चीरा पडे ॥ ३५ ॥

**श्रेयो हि ज्ञानमभ्यासाज्ज्ञानाद्ध्यानं विशिष्यते ।**
**ध्यानात्कर्मफलत्यागस्त्यागाच्छान्तिरनन्तरम् ॥ १२ ॥**

पैं अभ्यासाची पाउटीं । करुनि टाकिजे किरीटि ।
ज्ञानें येइजे भेटी । ध्यानाचिये ॥ ३६ ॥
मग ध्यानेंसिं खेवं । देति आघवे चि भाव ।
तेधवां कर्मजात सर्व । दूरि ठाके ॥ ३७ ॥
कर्म जेथ दुरावे । तेथ फळत्यागु संभवे ।
त्यागातव आंगवे । शांति सकळा ॥ ३८ ॥

म्हणौनि यावेया शांती । हा चि क्रमु गा सुभद्रापती ।
अभ्यासू चि प्रस्तुतिं । कारण येथ ॥ ३९ ॥
अभ्यासाहूनु गहन । पार्था मग ज्ञान ।
ज्ञानापासूनि ध्यान । विशेषिजे ॥ १४० ॥
मग कर्मफलत्यागु । तो ध्यानापासौनि चांगु ।
त्यागातव भोगु । शांतिसुखाचा ॥ ४१ ॥
ऐसिया एया वाटा । इहिं चि पेणा सूभटा ।
शांतिचा माजिवटा । टाकिला जेणें ॥ ४२ ॥

**अद्वेष्टा सर्वभूतानां मैत्रः करुण एव च ।**
**निर्ममो निरहंकारः समदुःखसुखः क्षमी ॥ १३ ॥**

जो सर्व भूताचां ठांइं । द्वेषातें नेणे काहिं ।
आप परु नाहिं । चैतन्या जैसा ॥ ४३ ॥
उत्तमातें धरिजे । अधमातें अव्हेरिजे ।
हें कहिं चि नेणिजे । वसुधा जेवि ॥ ४४ ॥
रायाचें देह चाळूं । रंकातें परउतें गाळूं ।
हें नेणे चि कृपाळू । प्राणु पैं गा ॥ ४५ ॥
गाइची तृषा हरुं । व्याघ्रा विष होउनि मारुं ।
हें नेणे चि करुं । तोय जैसें ॥ ४६ ॥
घरिचिया उजियेड करावा । पारखेया आंधारु होआवा ।
हें न म्हणे चि पांडवा । दीपु जैसा ॥ ४७ ॥
ऐसी सर्व भूतमात्रिं । येकपणाची मैत्री ।
कृपेची धात्री । आपण जो ॥ ४८ ॥
आणि मी हे भाष नेणे । माझें काहिं चि न म्हणे ।
सुख दुःख जाणणें । नाहिं जेया ॥ ४९ ॥

**संतुष्टः सततं योगी यतात्मा दृढनिश्चयः ।**
**मय्यर्पितमनोबुद्धिर्यो मद्भक्तः स मे प्रियः ॥ १४ ॥**

तेविं चि क्षमे लागि । पृथ्वीचा पवाडु आंगिं ।
संतोषा उत्संगिं । घर दीन्हले ॥ १५० ॥
वरिषायें वीण सागरु । जळें जैसा निर्भरु ।
तैसा निरउपचारु । संतोषिया जो ॥ ५१ ॥
वाउनि आपुली आण । धरी अंतष्करण ।
निश्चया साचपण । जेयाचेनि ॥ ५२ ॥
जीउ परमात्मा दोन्हीं । वैसौनि एका आसनिं ।
जेयाचां हृदयभुवनीं । विराजति ॥ ५३ ॥
ऐसा योगसमृद्धी । होउनि जो निरवधीं ।
अर्पिति मनोबुद्धि । माझां ठांइं ॥ ५४ ॥
आंतु बाहिरि योगु । निर्वाळला चांगु ।
माझा अनुरागु । सप्रेमु जेया ॥ ५५ ॥
अर्जुना तो चि भक्तु । तो चि योगी मुक्तु ।
तो वल्लभा मी कांतु । ऐसा पढियें ॥ ५६ ॥
हें नां तो आवडे । जीवाचेनि पाडें ।
हें इं येथ थोडें । रूप करणें ॥ ५७ ॥
पढियंतेयाची काहाणी । हे भूलिची भारणी ।
येथौनि बोलणीं । बोलवती ॥ ५८ ॥
ह्मणौनि गा आह्मां । वेगिं आली उपमा ।
यऱ्हविं काइ प्रेमा । उपमा असे ॥ ५९ ॥
आतां असो हें किरीटि । प्रियाचिया गोठी ।
दूणा थाउं ऊटी । आवडि गा ॥ १६० ॥
तेया ही वरि विषायें । प्रेमळ संवादियें होये ।
तरि तिये गोडिये काय आहे । कांटाळें गा ॥ ६१ ॥
ह्मणौनि गा पार्था । तूं चि प्रियु आणि श्रोता ।
वरि प्रियाची वार्त्ता । प्रसंगें आली ॥ ६२ ॥

तरि आतां बोलों । भलेया सुखा मीनलों ।
ऐसें ह्मणौनि डोलों । लागले देउ ॥ ६३ ॥

**यस्मान्नोद्विजते लोको लोकान्नोद्विजते च यः ।**
**हर्षामर्षभयोद्वेगैर्मुक्तो यः स च मे प्रियः ॥ १५ ॥**

मग ह्मणे जाण । तेयाचें लक्षण ।
जेया मीं अंतष्करण । बैसों घाली ॥ ६४ ॥
तरि सिंधूचेनि माजें । जलचरां भय नुपजे ।
आणि जलचारिं नु बुजे । समुद्रु जैसा ॥ ६५ ॥
तेवि उन्मत्तें जगें । जेयासि खंति न लगे ।
आणि जेयाचेनि आंगें । न सिणें लोकु ॥ ६६ ॥
किंबहुना पांडवा । शरीर जैसें अवयवां ।
तैसा नुभगे जीवा । जिवपणें जो ॥ ६७ ॥
हें जग चि देह जालें । म्हणौनि प्रियाप्रीय गेलें ।
हर्षामर्ष ठेले । दूरि जेया ॥ ६८ ॥
ऐसा जो द्वंद्वमुक्तु । भयोद्वेगरहितु ।
एया ही वरि भक्तु । माझां ठांइं ॥ ६९ ॥
तरि तेयाचा गा मज मोहो । काय सांवों तो पढियो ।
हें असो जिवें जीवो । माझेंनि तो ॥ १७० ॥
जो निजानंदें धाला । परिणामां आयुष्य आला ।
पूर्ण तेजाला । वल्लभु तो ॥ ७१ ॥
जेयाचां ठांइं पांडवा । अपेक्षे नाहिं रिगावां ।
सुखासि चढावा । जेयाचें असणें ॥ ७२ ॥
गंगा शुचि होये । पाप ताप जाये ।
परि तेथ आहे । बुडणें येक ॥ ७३ ॥

**अनपेक्षः शुचिर्दक्ष उदासीनो गतव्यथः ।**
**सर्वारंभपरित्यागी यो मद्भक्तः स मे प्रियः ॥ १६ ॥**

मोक्ष देउनि उदार । कासी होये किर सधर ।
पारि वेचावें लागे शरीर । तिये गाविं ॥ ७४ ॥
हिमवंतिं दोष जाये । पारि तेथ जीविताची हाणि होए ।
तैसें सुचित्त नव्हे । सज्जनाचें ॥ ७५ ॥
खोलिये पारु नेणिजे । तन्हीं संतीं न बुडिजे ।
रोकडेया आणि लाहिजे । मोक्षु फुका ॥ ७६ ॥
संतांचेनि आंगलगें । पापातें जिणणें गंगे ।
तेयांचें मिं सांगें । सुचित्व कैसें ॥ ७७ ॥
ह्मणुनु असो जो ऐसा । शुचित्वें तीर्था कुवांसा ।
जेणें लंघविलें दिशा । मनोमल ॥ ७८ ॥
आंतु बाहिरि चोखाळु । सूर्यु जैसा निर्मळु ।
आणि तत्वार्थीचा पायळु । देखणा जो ॥ ७९ ॥
व्यापक आणि उदास । जैसें हें आकाश ।
तैसें जेयाचें मानस । सर्वगत ॥ १८० ॥
जो सवंसारव्यथा फीटला । निरास्यें निवडला ।
फांसाहूनि सूटला । विहंगु जैसा ॥ ८१ ॥
तैसा संततु स्वसुखें । कव्हणी चटवंच ने दखे ।
नेणिजे गतायुष्यें । लज्जा जैसी ॥ ८२ ॥
आणि कर्मारंभा लागि । जेया अहंकृति नाहि आंगिं ।
जैसा निरंधनि विण आगी । विझणें चि उरे ॥ ८३ ॥
तैसा उपशमू चि भागा । जेयासि आला पैं गा ।
जो मोक्षाचिया आंगा । लिहिला जैसा ॥ ८४ ॥
अर्जुना हा ठावो वेन्हीं । सोहंभावसरोवरी ।
द्वैताचां पैली तीरी । उतरों सरला ॥ ८५ ॥
किं भक्तिसुखा लागि । आपण चि जाला दों भागीं ।
वांटूनियां आंगीं । सेवके वाणी ॥ ८६ ॥

येरा नावं मीं ठेंवी । मज भजतेया वोज बरवी ।
न भजतेया दावी । योगियां जो ॥ ८७ ॥
तेया आम्हां वेसन । आमचें तो निधान ।
किंबहुना समाधान । तो मिळे तैं ॥ ८८ ॥
तेया लागि रूपा येणें । तेयाचेनि एथ असणें ।
तेया लोण कीजे प्राणें । ऐसा पढियें ॥ ८९ ॥
जो आत्मलाभा सारिखें । गोमटें काहिं चि ने दखे ।
आणि भोगविशेषें । हरिखैजेना ॥ १९० ॥
आपण चि विश्व जाला । तरि भेदभाउ गेला ।
ह्मणौनि द्वेष दूरि ठेला । जेया पुरुषा ॥ ९१ ॥

**यो न हृष्यति न द्वेष्टि न शोचति न काङ्क्षति ।**
**शुभाशुभपरित्यागी भक्तिमान्यः स मे प्रियः ॥ १७ ॥**

पैं आपुलें जें साचें । तें कल्पांतिं हिं न वचे ।
हें जाणूनि गतांचें । न शोची जो ॥ ९२ ॥
जेया परौतें नाहिं । तें जाला आपुलां ठांइं ।
या लागि काहिं । आकांक्षी ना ॥ ९३ ॥
वोखटें ना गोमटें । या काइसेया ही न भेटे ।
राति देउ न घटे । सूर्यु जैसा ॥ ९४ ॥
ऐसा बोधू चि केवळु । होउनियां निश्चळु ।
यावरि भजनशीळु । माझां ठांइं ॥ ९५ ॥
तरि तेया ऐसें दुसरें । आम्हां पढियंतें सोयरें ।
नाहिं गा साचोकारें । तुझी आण ॥ ९६ ॥

**समः शत्रौ च मित्रे च तथा मानापमानयोः**
**शीतोष्णसुखदुःखेषु समः संगविवर्जितः ॥ १८ ॥**

पार्था जेयाचां ठांइं । वैषम्याची परि नाहिं ।
रिपुमित्रां दोन्हीं । सरिसा पाडु ॥ ९७ ॥

जो खांडावेया घाऊ घाली । कां लावणी जेणें केली ।
या दोघां येकि चि साउली । वृक्ष जैसा ॥ ९८ ॥
नातरि इक्षुदंडु । पालितेया गोडु ।
गालितेया ही तो चि पाडु । येकु चि गा ॥ ९९ ॥
अरिमित्रासि तैसा । अर्जुना जेया भाव ऐसा ।
मानापमानीं सरिसा । होंतु जाए ॥ २०० ॥
साइं रितुं समान । जैसें कां हें गगन ।
तैसें येक जि मान । शीतोष्णीं जेया ॥ १ ॥
दक्षिणोत्तर मारुता । मेरु जैसा पांडुसुता ।
तैसा सुखदु:खां प्राप्तां । मध्यस्तु जो ॥ २ ॥
माधूर्यें चंद्रिका । सरिसी चि राया रंका ।
तैसा जो सकलिकां । भूतां समु ॥ ३ ॥
आघवेयां येक । सेव्य जैसें उदक ।
तैसें जेयातें लोक । आसंसीति ॥ ४ ॥

**तुल्यनिंदास्तुतिर्मौनी संतुष्टो येनकेनचित् ।**
**अनिकेतः स्थिरमतिर्भक्तिमान्मे प्रियो नरः ॥ १९ ॥**

जो सर्वाहीं संगु । सांडूनियां लागु ।
येकाकी असंगु । आंगिं सूनि ॥ ५ ॥
जो निंदेतें नेघे । स्तुतितें न श्लाघे ।
आकाशा न लगे । लेपु जैसा ॥ ६ ॥
तैसा निंदे आणि स्तुती । मानु करुनु येका पांती ।
विचारें प्राणप्रवृत्ती । जनिं मौनीं ॥ ७ ॥
साच लटिकें दोन्हीं । न बोलैल मौनि ।
भोगितां उन्मनीं । आराय ना ॥ ८ ॥
जो यथालाभें तोखे । अलाभें हिं न पारुखे ।
पाउसें विण न सुके । समुद्र जैसा ॥ ९ ॥

आणि वायुसि येके ठांइं । बिढार जैसें नाहिं ।
तैसा न धरी चि केहीं । आश्रयो जो ॥ २१० ॥
हें विश्व चि माझें घर । ऐसी मति जेयाची स्थिर ।
किंबहुना चराचर । आपण जाला ॥ ११ ॥
एया वरि पार्था । माझां भजनीं आस्था ।
तरि तेयातें मीं माथां । मुगुटु करीं ॥ १२ ॥
उत्तमासि मस्तक । खालविजे हें काये कवतिक ।
हा मानु करिति लोक । पायवणियां ॥ १३ ॥
तरि श्रद्धावस्तूसि आदरु । करितां जाणिजे प्रकारु ।
जरि होये श्रीगुरु । सदाशिव ॥ १४ ॥
तरि हें असो आतां । महेशातें वानितां ।
आत्मस्तुति करितां । संचारु असे ॥ १५ ॥
येयालागि हें । म्हणितलें रमानाहें ।
अर्जुना मी वाहें । सिरिं जेयातें ॥ १६ ॥
जो पुरुषार्थसिद्धि चौथी । घेउनि आपुलां हातिं ।
रिगाला भक्तिपंथीं । जगा देंत ॥ १७ ॥
कैवल्याचा अधिकारी । सोडि बांधि मोक्षाची करी ।
किं जळाचिया परीं । तळवट घे ॥ १८ ॥
ह्मणौनि तो नमस्कारुं । तेयातें मुगुट करूं ।
तेयाचे टांक धरूं । कंठिं आह्मि ॥ १९ ॥
तेयाचेया गुणाची लेणीं । लेववुं आपुलां वाणीं ।
तेयाची कीर्ति श्रवणीं । आइकों आह्मीं ॥ २२० ॥
तो पाहावा हे डोहळे । ह्मणूनि अचक्षू मज डोळे ।
हातिचेनि करकमळें । पूजीं जेयातें ॥ २१ ॥
दों वरि दोनि । भुजा आलों घेउनि ।
आलिंगावेया लागौनि । तेयाचें आंग ॥ २२ ॥

तेया संगाचेनि सुरवाडें । आह्मां देहधरणें घडे ।
किंबहुना आवडे । निरोपमु ॥ २३ ॥
तेया आह्मां मैत्र । येथ काइसें पां चित्र ।
परि तेयाचें हिं चरित्र । आयिकति जे ॥ २४ ॥
ते ही प्राणा परौते । आवडति हें निरुतें ।
जे भक्तिचरित्रातें । आसंसीति २५ ॥

**ये तु धर्म्यामृतमिदं यथोक्तं पर्युपासते ।**
**श्रद्दधाना मत्परमा भक्तास्ते तीव मे प्रियाः ॥ २० ॥**

जें हें साद्यंत । सांघितलें तुज प्रस्तुत ।
भक्तियोगसंमत । योगरूप ॥ २६ ॥
मी प्रीतीतें करीं । कां मनीं सिरसा धरीं ।
येवढी थोरी । जेया स्थिती ॥ २७ ॥
ते हे गोठि रम्य । अमृताधारधर्म्ये ।
प्रेरीति प्रतीतिगम्य । आइकौनि जे ॥ २८ ॥
परि निरोपिली जैसी । तिया स्थिति रमत मानसिं ।
मग सुक्षेत्रिं जैसी । पेरणी जाली ॥ २९ ॥
तरि श्रद्धा करुनि आदरें । जेयांचा ठांइं विस्तारे ।
जीविं जेयां थारे । अनुष्ठिती ॥ २३० ॥
पार्था गा जगीं । भक्तु तो चि योगी ।
उत्कंठा तेयां लागि । सदा मज ॥ ३१ ॥
तो तीर्थ तो क्षेत्र । जगीं तो चि पवित्र ।
भक्तिकथेसि मैत्र । जेयां पुरुषां ॥ ३२ ॥
जो सुरसार्हे सील । लोकललनलील ।
प्रणतिप्रतिपाल । खेलु जेयाचा ॥ ३३ ॥
जो भक्तवत्सल । प्रेमलप्रांजल ।
सत्यसेतुसकल । कलानिधी ॥ ३४ ॥

आह्मि करुं तेयाचें ध्यान । तो आमचें देवतार्चन ।
तें वांचूनि आन । गोमटें न मनूं ॥ ३५ ॥
तेया आह्मा वेसन । आमचें तो निधान ।
किंबहुना समाधान । तो मिळे तो ॥ ३६ ॥
प्रेमळाचेया वार्त्ता । जे अनुमोदिती पांडुसुता ।
ते देखों परदेवता । आपुली जैसी ॥ ३७ ॥
ऐसें निजजनानंदें । तेणें जगदादिकंदें ।
बोलिलें मुकुंदें । संजयो ह्मणे ॥ ३८ ॥
राया जो निजनिर्मळु । निष्कळु लोककृपाळु ।
शरणगतां स्नेहाळु । शरण्य जो ॥ ३९ ॥
जो धर्मकीर्त्तिढवळु । अगाध दातृत्वें सरळु ।
अतिबळु प्रबळु । बळिबंधनु ॥ २४० ॥
तो कृष्णुजी वैकुंठीचा । चक्रवर्त्ती निजाचा ।
सांवे एरु दैवांचा । आइकतु असे ॥ ४१ ॥
आतां एया वरी । निरोपिती परी ।
संजयो ह्मणे अवधारी । धृतराष्ट्रातें ॥ ४२ ॥
ते चि रसाळकथा । मऱ्हाटिया प्रतीतीपंथा ।
आणिजैल आस्था । अवधारिजो ॥ ४३ ॥
ज्ञानदेउ ह्मणे तुह्मीं । संत वोळगावेति हें मीं ।
पढविलां स्वामीं । निवृत्तिनाथें ॥ २४४ ॥

ॐ ॥ तत्सदिति श्रीमद्भगवद्गीतासूपनिषत्सु ब्रह्मविद्यायां योगशास्त्रे श्रीकृष्णार्जुनसंवादे भक्तियोगो नाम द्वादशोऽध्यायः ॥१२॥

॥ श्रीकृष्णार्पणमस्तु ॥

# ज्ञानेश्वरी

## अध्याय तेरावा

श्रीगणेशायनमः ॥

केलेयां स्मरण । सकळ विद्यांचें अधिकरण ।
ते वंदूं चरण । श्रीगुरूचे ॥ १ ॥
जेयांचेनि आठवें । शब्दसृष्टि आंगवे ।
सारस्वत आघवें । जीभेसि ये ॥ २ ॥
वक्तृत्व गोडपणें । अमृतातें पारु ह्मणे ।
रस होंति उळगणे । अक्षरांचे ॥ ३ ॥
भावांचें अवतरण । अवतरवीति खुण ।
हाता चढे संपूर्ण । तत्वभेदु ॥ ४ ॥
श्रीगुरूचे पाए । हृदय गवसूनि ठाए ।
तैं एवडें भाग्य होए । उन्मेषासि ॥ ५ ॥

अर्जुन उवाच ॥

प्रकृतिं पुरुषं चैव क्षेत्रं क्षेत्रज्ञमेव च
एतद्वेदितुमिच्छामि ज्ञानं ज्ञेयं च केशव ॥ १ ॥

तेथ अर्जुनु ह्मणे प्रकृतिपुरुष । क्षेत्रज्ञ आणि क्षेत्रविशेष ।
हें तुज पासाव अशेष । इच्छितु असें जाणों ॥ ६ ॥

श्रीभगवानुवाच ॥

इदं शरीरं कौंतेय क्षेत्रमित्यभिधीयते ॥
एतद्यो वेत्ति तं प्राहुः क्षेत्रज्ञमिति तद्विदः॥ २ ॥

तो नमस्कारूं आतां । पितामहाचा पिता ।
लक्ष्मीयेचा भर्त्ता । ऐसें ह्मणे ॥ ७ ॥
पार्था परिसिजे । देह हें क्षेत्र ह्मणिजे ।
हें जाणें तो बोलिजे । क्षेत्रज्ञु गा ॥ ८ ॥

क्षेत्रज्ञं चापि मां विद्धि सर्वक्षेत्रेषु भारत ॥
क्षेत्रक्षेत्रज्ञयो र्ज्ञानं यत्तज्ज्ञानं मतं मम ॥ ३ ॥

तरि क्षेत्रज्ञु येथें । तो मी चि निरुतें ।
जो सर्व क्षेत्रांतें । संगोपुनु असे ॥ ९ ॥
आणि क्षेत्रक्षेत्रज्ञातें । जाणणें जें निरुतें ।
ज्ञान ऐसें तयातें । मानूं आह्मीं ॥ १० ॥

तत्क्षेत्रं यच्च यादृक्च यद्विकारि यतश्च यत् ॥
स च यो यत्प्रभावश्च तत्समासेन मे शृणु ॥ ४ ॥

तरि क्षेत्र एणें नावें । शरीर जेणें भावें ।
ह्मणितलें तें आघवें । सांगों आतां ॥ ११ ॥
हें क्षेत्र कां ह्मणिजे । कैसें हें कें उपजे ।
कवण कवणीं वाहिजे । विकारीं एथ ॥ १२ ॥
हें आंवुठ हात मोटकें । कि केवडें पां केतुकें ।
बरड कि पीकें । कवणाचें हें ॥ १३ ॥
इत्यादि सर्व । जे एयाचे प्रभाव ।
ते बोलिजति सावीव । अवधान दीजो ॥ १४ ॥

ऋषिभि र्बहुधा गीतं छंदोभि र्विविधैः पृथक् ॥
ब्रह्मसूत्रपदैश्चैव हेतुमद्भि र्विनिश्चितैः ॥ ४ ॥

पैं या चि स्थला कारणें । श्रुतीं सदा वोवाणें ।
तर्कु एणें चि ठीकरणें । तोंडौता केला ॥ १५ ॥
चालितां हे चि बोली । दर्शनें सेवटा आलिं ।
तें चि नाहिं बुझावलिं । अझुइं द्वंद्वें ॥ १६ ॥
शास्त्रांचिये सोइरिके । विचारिलीं एणें चि एकें ।
एयाचेनि एकवंकें । जगासि वादू ॥ १७ ॥
तोंडेंसिं तोंडा न पडे । बोलेंसिं बोला न घडे ।
एया गुंती बडवडे । त्राये जाली ॥ १८ ॥
नेणों कोणाचें हें स्थल । परि कैसें अभिलाखाचें बल ।
जें घरोघरीं कपाल । पीटवीतसे ॥ १९ ॥
नास्तिकां देयावेया तोंड । वेदांचें गाढें बंड ।
तें देखौनि पाखंड । आन चि वाजे ॥ २० ॥
ह्मणे तूं निर्मूल । लटकें वाग्जाल ।
ना ह्मणसी तरि पोफल । घातलें असे ॥ २१ ॥
पाखंडाचेया कडे । नागिविं लुंचिति मुंडें ।
नियोजिलीं वितंडें । ताला येंति ॥ २२ ॥
मृत्युबलाचेनि माजें । हें जाइल विण काजें ।
तें देखौनि व्याजें । निगाले योगी ॥ २३ ॥
मृत्यूसिं आवाइलें । तिहिं निरंजन सेविलें ।
यमदमाचे केले । मेले पुरे ॥ २४ ॥
येणें चि क्षेत्राभिमानें । राज्य त्यजिलें ईशानें ।
गूंति जीणौनि स्मशानें । वसों आदरिलीं ॥ २५ ॥
ऐसिया पैजा महेशा । पांगुरणें दाही दिशा ।
पांचवक्त्र ह्मणौनि कोलिसा । कामु केला ॥ २६ ॥
पैं सत्यलोकनाथा । वदनें आलीं बलार्था ।
तऱ्हीं तो सर्वथा । जाणे चि ना ॥ २७ ॥

एक ह्मणति हें स्थळ । जीवाचें चि समूळ ।
मग प्राणु हें कुळ । तेयाचें एथें ॥ २८ ॥
जें प्राणाचां घरिं । आंगें रावते भाऊ च्यारी ।
आणि मना ऐसा आवरी । कुळवाडिकारु ॥ २९ ॥
तेयातें इंद्रियबैलांची पेटी । न ह्मणे अवसिपाहाटि ।
विषयक्षेत्रीं आटि । काढी भली ॥ ३० ॥
मग विधिची वाप चुकवी । अन्याइं विं वाहवी ।
कुकर्माचा करवी । राबु जरि ॥ ३१ ॥
तरि तेया चि सारिखें । असंभड पाप पीके ।
जन्मकोडी दुःखें । भोगवी जीउ ॥ ३२ ॥
नातरि विधिचेये वापे । सत्क्रिया विं आरोपे ।
जन्मशतमापें । सुख चि मविजे ॥ ३३ ॥
तवं एक ह्मणति हें न्हवे । हें जीवाचें न ह्मणावें ।
आमतें पूसावें । क्षेत्राचें इया ॥ ३४ ॥
जीव एथ उखिता । वस्तिकरु वांटे जांता ।
आणि प्राणु हा बळौता । ह्मणौनि जागे ॥ ३५ ॥
अनादि जे प्रकृति । सांख्य जीतें गांति ।
क्षेत्र हे वृत्ति । तियेची जाण ॥ ३६ ॥
आणि तियेतें चि आथवा । आथि घरमेळावा ।
ह्मणौनि वाहिवां । घरीं वाहे ॥ ३७ ॥
बाह्यांचिये राहाटी । मुदळ तीन शृष्टी ।
ते तियेचां पोटीं । जाले गुण ॥ ३८ ॥
रजोगुणु पेरी । तेतुलें सत्व सोंकरी ।
एकलें तम करी । सावगणी ॥ ३९ ॥
रचूनु महत्तत्त्वाचें खळें । मळी एकें चि काळुगेनि पोळें ।
तेथ अव्यक्ताची मिळे । सांज भली ॥ ४० ॥

तवं एकिं मतिवंतीं । या बोलाचिया खंतीं ।
ह्मणितलें एया चांथी । अर्वाचीना ॥ ४१ ॥
हां हो परतत्त्वा आंतु । केउती प्रकृतीची मातु ।
हा क्षेत्रवृत्तांतु । उगेयां आइका ॥ ४२ ॥
शून्यसेजसाळिये । सुलीनतेचिये तूळिये ।
नीद केली होंती बळियें । संकल्पें येणें ॥ ४३ ॥
तो अवसांत चेइला । उद्यमीं सदैउं भला ।
ह्मणौनि ठेवा जोडला । इछे सवें ॥ ४४ ॥
निरालंविची वाडी । त्रिभुवना एवडी ।
हे तियेचिया जोडी । रूपा आली ॥ ४५ ॥
महाभूतांचे एकावट । सैरा वेंटाळु उभाट ।
भूतग्रामाचे आवाट । चिरिले च्यान्ही ॥ ४६ ॥
यावरि आदिं । पंचवटिकांची वांधी ।
बांधली होती प्रमेदिं । पांचभूतिकिं ॥ ४७ ॥
कर्मा अकर्माचे गुंढे । घातले दोहिं कडे ।
नपुंसकें वरडें । रानें केलिं ॥ ४८ ॥
तेथ येरिझारि लागि । जन्ममृत्यूंची सुरंगी ।
सुवाळली चांगी । संकल्पें एगें ॥ ४९ ॥
मग अहंकारेंसिं एकावदी । करूनि जीविता अवधी ।
वाहिलें वुद्धी । चराचर ॥ ५० ॥
इया परिं निराळीं । वाढे संकल्पाची डाळीं ।
ह्मणौनि तो मूळी । प्रपंचा इया ॥ ५१ ॥
ये मतमुगुतकिं । पढिगाइलें आणिकिं ।
ह्मणति हां हो विवेकी । तन्हीं तुह्मि ॥ ५२ ॥
परतत्त्वाचां गावीं । संकल्पाची सेज देखावी ।
तरि कां पां न मनावी । प्रकृति तयाची ॥ ५३ ॥

परि असो हें नव्हे । तुह्मीं येया न लगावें ।
आइकां आघवें । सांगिजैल ॥ ५४ ॥
तरि आकाशिं कवणें । केलिं मेघांचिं भरणें ।
अंतरिक्ष तारागणें । धरी कोण ॥ ५५ ॥
गगनाचा तडवा । उभिला कोणें ह्मणावा ।
वारा हिंडतु असावा । हें कोणाचें मत ॥ ५६ ॥
रुख कवण पेरी । कोण समुद्र भरी ।
पर्जन्याचिया करी । धारा कवण ॥ ५७ ॥
तैसें क्षेत्र हें स्वभावें । अव्हांत्रीक कव्हणाचें न्हवे ।
एथ वाहे तेया फावे । येरा तूटि ॥ ५८ ॥
तवं आणिकें एकें । खोदें ह्मणितलें नीकें ।
तरि भोगिजे एकें । कालें जेवि ॥ ५९ ॥
हें जाणों मृत्यु रागिठा । सिंह्याडेयाचा दरकुटा ।
परि काइ बाजटां । पूरिजतसे ॥ ६० ॥
जऱ्हीं एयाचा मारु । देखताति अनिवारु ।
परि स्वमतिं भरु । अभिमानियां ॥ ६१ ॥
महाकल्पा परौती । कव घाळूनि अवचिती ।
सत्यलोकभद्रजाती । आंगीं वाजे ॥ ६२ ॥
लोकपाल नीचनवे । दिग्गजमेळावे ।
स्वर्गिचिये अडवे । रिगौनि मोडी ॥ ६३ ॥
येरें एयाचेन आंग्वातें । जन्ममृत्यूचिये गर्तें ।
निर्जीवें होउनि भ्रमितें । जीवंमृगें ॥ ६४ ॥
निहाळा पां केवडा । पसरूनियां चवडा ।
करितसे माजिवडा । आकारगजु ॥ ६५ ॥
ह्मणौनि काळाची सत्ता । हा वोलु निरुता ।
ऐससे वादु पांडुसुता । क्षेत्रा लागि ॥ ६६ ॥

हे बहू उखीविखी । रिखीं केली नैमिषिं ।
पुराणें इये विखीं । मतपत्रिका ॥ ६७ ॥
अनुष्टुभादि छंदें । प्रबंधिं जियें विविधें ।
तें पत्रालंबनमदें । करीत आह्मुई ॥ ६८ ॥
वेदिचें ब्रह्मसूत्र । देखणेपणें पवित्र ।
परि तेया ही हें क्षेत्र । नेणवे चि ॥ ६९ ॥
आणिकिं आणिकिं बहुतिं । महाकवी हेतुमंतीं ।
एया लागि मती । वेचिलिया ॥ ७० ॥
परि ऐसें हें एवडें । कां अमुकेयाचें चि फुडें ।
हें कोण्हा हिं वरिपडें । होये चि ना ॥ ७१ ॥
आतां एयावरि जैसें । क्षेत्र हें असे ।
तुज सांगों तैसें । साद्यंत गा ॥ ७२ ॥

**महाभूतान्यहंकारो बुद्धिरव्यक्तमेव च ॥**
**इंद्रियाणि दशैकं च पंच चेंद्रियगोचराः ॥ ५ ॥**

तरि महाभूतपंचकु । आणि अहंकारु एकु ।
बुद्धि अव्यक्त दशकु । इंद्रियांचा ॥ ७३ ॥
आणि मन हिं एकु । विषयांचा दशकु ।
सुखदुःखद्वेखु । संवातु इछा ॥ ७४ ॥
आणि चेतना धृति । एवं क्षेत्रव्यक्ति ।
सांवितली तुज प्रति । आघवी चि हे ॥ ७५ ॥
आतां महाभूतें कवणें । कवण विषय कैसिं करणें ।
हे वेगळालेपणें । एकैक सांघों ॥ ७६ ॥
तरि पृथ्वी आप तेज । वायु व्योम गा बुझ ।
सांघितलें वा तुज । महातत्त्वें ॥ ७७ ॥
आणि जागतिये दशे । स्वप्न लपालें असे ।
नातरि अवंसे । चंद्र गूढ ॥ ७८ ॥

नातरि अप्रौढें बाळकिं । तारुण्य राहे थोकिं ।
कां न फुलतां कळिकिं । आमोदु जैसा ॥ ७९ ॥
किंबहुना काष्टिं । वन्हि जेवि किरीटी ।
तेवि प्रकृतिचां पोटीं । गोप्यु जो असे ॥ ८० ॥
जैसा ज्वरु धातुगतु । कुपथ्याचें मीस पांतु ।
मग जालेयां आंतु । बाहिरि व्यापी ॥ ८१ ॥
तैसी पांचां हिं गांठि पडे । जैं देहाकारु घडे ।
तैं नाचवी चहूंकडे । तो अहंकारु गा ॥ ८२ ॥
आतां बुद्धि जे ह्मणिजे । ते ऐसां चिन्हिं जाणिजे ।
बोलिलें यदुराजें । आइकैं सांगों ॥ ८३ ॥
तरि कंदर्पाचेनि बळें । इंद्रियवृत्तिचेनि मेळें ।
विभांडूनि येंति पाळे । विषयांचे ॥ ८४ ॥
तो सुखदुःखाचा नागोवा । जेथ उगाणों लागे जीवा ।
तेथ दोहींसि बरवा । पाडु जे धरी ॥ ८५ ॥
हें सुख हें दुःख । हें पुण्य हें दोख ।
हें मैळ हें चोख । ऐसें जें निवाडी ॥ ८६ ॥
जिये अधमोत्तम सूजे । सानें थोर बूझे ।
जिया दीठी पारखिजे । विखो जीवें ॥ ८७ ॥
जे तेजतत्वाची वृद्धि । जे सत्वगुणाची निधि ।
जे आत्मेयां जीवाची संधि । वसवीतसे ॥ ८८ ॥
अर्जुना ते जाण । बुद्धि गा संपूर्ण ।
आतां आइक तूं ऽऽलखण । अव्यक्ताचें ॥ ८९ ॥
पैं सांख्याचां सिद्धांतिं । प्रकृति जे महामती ।
ते चि येथ प्रस्तुतिं । अव्यक्त गा ॥ ९० ॥
आणि सांख्ययोगमतें । प्रकृति परिसविली तूतें ।
दोहीं परि ची जेथें । विवंचिली ॥ ९१ ॥

तेथ दूजी जे जीवदशा । तिये नावें वीरेशा ।
येथ अव्यक्त ऐसा । पर्याउ हा ॥ ९२ ॥
तऱ्हीं पाहालेयां रजनी । तारा लोपति गगनीं ।
कां हारपाति अस्तमानीं । भूतक्रिया ॥ ९३ ॥
कां देह गेलेयां पाठिं । देहादिक किरीटी ।
उपाधि लोपे पोटीं । कृतकर्माचां ॥ ९४ ॥
कां बीजमुद्रे आंतु । थोंके तरु समस्तु ।
कां वस्त्रपणें तंतु । दशे राहे ॥ ९५ ॥
तैसं सांडूनु स्थूलधर्म । महाभूतें भूतग्राम ।
ल्या जांति सूक्ष्म । होउनि जेथ ॥ ९६ ॥
अर्जुना तेया नावें । अव्यक्त हें जाणावें ।
आतां आइक आवेवें । इंद्रियभेद ॥ ९७ ॥
तरि श्रवण नयन । त्वचा घ्राण रसन ।
इयें जाणें ज्ञान । करणें पांचै ॥ ९८ ॥
इये तत्वमेळापकिं । सुखदु:खाची उखीविखी ।
बुद्धि करितसे मुखिं । पांचै इहिं ॥ ९९ ॥
मग वाचा आणि कर । चरण अधोद्वार ।
अपायु हे प्रकार । पांचै आणिक ॥ १०० ॥
कर्मेंद्रिय ह्मणिपति । तियें इयें जाणिजति ।
आइकें कैवल्यपति । सांवत असे ॥ १ ॥
पैं प्राणाची आंतौरीं । क्रियाशक्ति जे शरीरीं ।
तियेची रिगिनिगि द्वारीं । पांचै इहीं ॥ २ ॥
एवं दाही करणें । सांवितलीं देउ ह्मणे ।
आतां परियस फुडेपणें । मन तें हें ॥ ३ ॥
जें इंद्रियां आणि बुद्धी । माझारिलिये संधी ।
रजोगुणाचां खांदीं । तरळत असे ॥ ४ ॥

नीलिमा अंबरीं । कां मृगतृष्णालहरी ।
तैसा वायां चि फाउरी । वात्रो जालें ॥ ५ ॥
आणि शुक्रशोणिताचा सांधा । मिळतां पांचाचा बांधा ।
वायुतत्व दशधा । एक चि जालें ॥ ६ ॥
मग तें हीं दाहे भागीं । देहधर्माचां खैवंगीं ।
अधिष्ठिलें आंगीं । आपुलालां ॥ ७ ॥
तेथ चांचल्य निखिल । एकलें ठेलें निढाळ ।
ह्मणौनि रजाचें बळ । धरिलें तेणें ॥ ८ ॥
तेथ बुद्धीसि बाहिरि । अहंकारावरि ।
ऐसां ठांइं माझारि । बळियाविलें ॥ ९ ॥
वायां हें नाव । यऱ्हविं कल्पना हे चि सावेव ।
जेयाचेनि संगें जीव । दशा वस्तू ॥ ११० ॥
जें प्रवृत्तीसि मूळ । कामा जेयाचें बळ ।
जें अखंड सुए सळ । अहंकारासिं ॥ ११ ॥
जें इछेतें वाढवी । आशेतें चडावी ।
जें पाठि पुरवी । जगासि येया ॥ १२ ॥
द्वैत जेणें उठी । अविद्या जेणें लाठी ।
जें इंद्रियांतें लोटी । विषयां माझि ॥ १३ ॥
संकल्पित शृष्टि घडी । सवें चि विकल्पूनि मोडी ।
मनोरथाचिया उतरडी । उतरी रची ॥ १४ ॥
जें भूलिचें कुल्हार । वायुतत्वाचें अंतर ।
बुद्धिचें द्वार । झांकळलें जेणें ॥ १५ ॥
तें गा किरीटी मन । एया वोला नाहिं आन ।
आतां विषयाभिधान । भेदु आइक ॥ १६ ॥
तरि स्परिसु आणि शब्दु । रूप रसु गंधु ।
हा विवेकु पंचविधु । ज्ञानेंद्रियाचा ॥ १७ ॥

इहीं चि पांचैं द्वारीं । ज्ञानासि धावं बाहिरि ।
जैसें कां हिरव चारीं । मांभावे पशु ॥ १८ ॥
मग स्वर वर्ण विसर्गु । अथवा स्वीकारु त्यागु ।
चंक्रमण उत्सर्गु । मलमूत्रांचा ॥ १९ ॥
हे कर्मेंद्रियांचे पाच । विषय गा साच ।
जें बांधौनि मांच । क्रिया जे उठी ॥ १२० ॥

**इच्छा द्वेषः सुखं दुःखं संघातश्चेतना धृतिः ॥**
**एतत्क्षेत्रं समासेन सविकारमुदाहृतं ॥ ६ ॥**

ऐसे हे दाही । विषय इये देहीं ।
आतां इछा ते ही । सांविजैल ॥ २१ ॥
तरि भूतलळें आठवे । कां बोलें कानु झांकवे ।
ऐसिया वरि चेतवे । जे वृत्ति गा ॥ २२ ॥
इंद्रियां विषयांचिये भेटी । सरिसी चि वेगें उठी ।
कामाचिया बाहुटी । धरूनियां ॥ २३ ॥
जियेचेनि उठिलेपणें । मना सैव धावणें ।
ना रिगावें तेथ करणें । तोंडें सूंति ॥ २४ ॥
जिये वृत्तिचिया वाढी । बुद्धि होये वेडी ।
विषइं जेया गोडी । ते हे इछा ॥ २५ ॥
आणि इछिलेया सांगडे । इंद्रियां आमिष न जोडे ।
ऐसेयां डाउ जो पडे । तो चि द्वेषु ॥ २६ ॥
आतां या वरि सुख । तें एवंविध देख ।
जेणें एकें चि अशेख । विसरे जीउ ॥ २७ ॥
मनें वाचा कायें । जें आपुली आण वायें ।
देहस्मृतिची त्राये । मोडित जाये ॥ २८ ॥
जेयाचेनि जालेपणें । पांगुळा होणें प्राणे ।
सात्विकां दुणे । वरि हि लाभु ॥ २९ ॥

आघवियाचि इंद्रियवृत्ती । हृदयाचां एकांतिं ।
थापटूनि सुषुप्ती । आणि जें गा ॥ १३० ॥
किंबहुना सोए । जीउ–आत्मेयांची लाहे ।
तेथ जें होये । तेया नावं सुख ॥ ३१ ॥
आणि ऐसी हे अवस्था । न जोडतां पार्था ।
जीजे तेया नावं सर्वथा । दुःख जाणैं ॥ ३२ ॥
तें मनोरथभंगें होये । येर सिद्धी गेलें जाए ।
हें दोनी चि उपाये । सुखदुःखासि गा ॥ ३३ ॥
आतां असंगा साक्षिभूता । देहिं चैतन्याची सत्ता ।
तिये नावं पांडुसुता । चेतना एथ ॥ ३४ ॥
जे नखौनि केंसवेऱ्हीं । उभी लागे शरीरीं ।
जे तिहिं अवस्थांतरीं । पालटे ना ॥ ३५ ॥
मनबुध्यादि आघवीं । जियेचेनि टवटवी ।
प्रकृतिवनमाधवी । सदा चि जे ॥ ३६ ॥
जडाजडीं अंशीं । जे राहाटि सरिसी ।
ते चेतना गा तुजसीं । लटकें नाहिं ॥ ३७ ॥
पैं राउ परिवाण नेणे । आज्ञा चि परचक्र जीणे ।
कां चंद्राचेनि परिपूर्णे । सिंधु भरति ॥ ३८ ॥
नाना भ्रमकाचेनि सन्निधानें । लोह करी सचेतनें ।
कां सूर्यसंगु जनें । चेष्टिविजे ॥ ३९ ॥
आगा मुखमेळेविण । पीलेयाचें पोखण ।
करी जेवि निरीक्षण । कूर्मिचें ॥ १४० ॥
पार्था तिया परिं । आत्मसंगति इये शरीरीं
सजीवत्वाचा करी । उपेगु जडा ॥ ४१ ॥
मग तियेतें चेतना । ह्मणिपे अर्जुना ।
धृतिची विवंचना । आतां आइक ॥ ४२ ॥

तत्वां परस्परें । उघड जातिवैरें ।
नव्हे पृथिवीयेतें नीरें । निनासिजे ॥ ४३ ॥
नीरातें आटी तेज । तेजा वायुसिं जूझ ।
गगन तवं साहाज । वायु भक्षी ॥ ४४ ॥
तेवि चि कव्हणी वेळे । आपण काइसेया ही न
आंतु रिगौनु वेगळें । आकाश हें ॥ ४५ ॥
ऐसिं पांचै भूतें । न साहांति एकमेकातें ।
किं त्यें हिं ऐक्यातें । देहां येति ॥ ४६ ॥
द्वंद्वाची उखीविखी । सांडूनि वस्ती एकी ।
एकातें पोखी । निजगुणें ॥ ४७ ॥
ऐसें मिलतेयां साजणें । चले धैर्यें जेणें ।
तेया नावं ह्मणे । धृति पैं गा ॥ ४८ ॥
आणि जीवेंसिं पांडवा । यां सतिसां सतिसांचा मेळावा ।
तो पैं येथ,जाणावा । सांघातु गा ॥ ४९ ॥
एवं सतीस भेद । सांवितले तुज विशद ।
एयां एतुलेयांतें प्रसिद्ध । क्षेत्र ह्मणिजे ॥ १५० ॥
रथांगाचा मेळावा । रथु ह्मणिजे पांडवा ।
कां अधोर्ध्व अवयवां । नावं देह ॥ ५१ ॥
करी–चातुरंग–समाजें । सेना नावं निफजे ।
वाक्यें ह्मणिपति पुंजे । अक्षरांचे ॥ ५२ ॥
जलधरांचा मेळा । वाच्य होये अभाळा ।
नाना लोक सकला । नावं जगु ॥ ५३ ॥
कां स्नेह–सूत्र–वन्हि । मेळु एकी स्थानीं ।
धरिजे तो जनीं । दीपु होये ॥ ५४ ॥
तैसिं सतीस हीं तत्वें । मिळति एकत्वें ।
तेणें समूहपरत्वें । क्षेत्र ह्मणिजे ॥ ५५ ॥

आणि वाहंतेनि भौतिकें । पापपुण्य एथ पीके ।
ह्मणौनि आह्मि कवतिकें । क्षेत्र ह्मणों ॥ ५६ ॥
एकाचेनि मतें । देह ह्मणति एयातें ।
परि असो हें अनंतें । नावें एयासि ॥ ५७ ॥
सुरनरउरगीं । घडत आहे योनिविभागिं ।
ते गुणकर्मसंगीं । पडिलें सांतें ॥ ५८ ॥
पैं परतत्वा आरौतें । आणि स्थावरांता आंतौतें ।
जें काहिं होतें जातें । क्षेत्र चि हें ॥ ५९ ॥
हे चि गुणविवंचना । पुढां ह्मणिपैल अर्जुना ।
प्रस्तुत आतां ज्ञाना । रूप दाउं ॥ १६० ॥
क्षेत्र तवं सविस्तर । सांघितलें सविकार ।
ह्मणौनि आतां उदार । ज्ञान आइक ॥ ६१ ॥

**अमानित्वमदंभित्वमहिंसा क्षांतिरार्जवं ॥**
**आचार्योपासनं शौचं स्थैर्यमात्मविनिग्रहः ॥ ७ ॥**

जेया ज्ञाना लागि । गगन गीळिताति योगी ।
स्वर्गिची आडवंगी । उमरुडूनि ॥ ६२ ॥
न करीति सिद्धिचे पाड । न धरीति रिद्धींची भीड ।
योगा ऐसें दुवाड । हेळासति ॥ ६३ ॥
तपोदुर्गें वोळांडिति । ऋतुकोडी वोवांडिति ।
उळथौनि सांडिति । कर्मवेली ॥ ६४ ॥
नाना भजनमार्गिं । धावंतु उघडां आंगीं ।
एक रिगति सुरंगीं । सूक्ष्मतेचिये ॥ ६५ ॥
ऐसी जिये ज्ञानीं । मुनीश्वरां उतान्ही ।
वेदतरुचां पानोवानीं । हींडताति ॥ ६६ ॥
देईल गुरुसेवा । इया बुद्धी पांडवा ।
जन्माचा सांडोवा । टाकिति जे ॥ ६७ ॥

जेयाची रिगवणी । अविद्ये उणें आणी ।
जीवात्मेयां बुझावणी । मांडूनि दे ॥ ६८ ॥
जें इंद्रियांचीं दारें अडी । प्रवृत्तिचे पाये मोडी ।
जें दैन्य चि फेडी । मानसाचें ॥ ६९ ॥
द्वैताचा दुकळु पाहे । साम्याचें सुवाण होये ।
जेया ज्ञानाची सोये । ऐसें करी ॥ १७० ॥
मदाचा ठाउ पूसी । जें महामोहातें गिवसी ।
नेंदी आपपरु ऐसी । भाख उरों ॥ ७१ ॥
जें संसारातें उन्मूळी । संकल्पपंकु पाखाळी ।
अनावरातें वेंटाळी । ज्ञानतेजें ॥ ७२ ॥
जेयाचेनि उजाळें । उघडति बुद्धिचे डोळे ।
जीउ दोंदावरि लोळे । आनंदाचेया ॥ ७३ ॥
ऐसें जें ज्ञान । पवित्रैकनिधान ।
जेथ विटाळलें मन । चोख कीजे ॥ ७४ ॥
आत्मेयां जीवबुद्धि । जे हे लागली क्षयव्याधि ।
ते जेयाचेया सन्निधी । बळि कीजे ॥ ७५ ॥
तें अनिरूप्य किं निरूपिजे । आइकतां बुद्धी आणिजे ।
वांचौनि डोळां देखिजे । ऐसें नाहिं ॥ ७६ ॥
मग एकीं शरीरीं । आपुली प्राप्ती करी ।
तैं इंद्रियां व्यापारीं । दीठी ही दीसे ॥ ७७ ॥
पैं वसंताचें रिगवणें । झाडांचेनि साजेपणें ।
जाणिजे तेवि करणें । सांगति ज्ञान ॥ ७८ ॥
आगा वृक्षासि पाताळीं । जळ सांपडे मुळिं ।
तें शाखांचिया बाहाळीं । दीसे वरि ॥ ७९ ॥
कां भूमिचें मार्दव । सांगे कोंभाची लवलव ।
नाना आचार गौरव । सुकुळीचें ॥ १८० ॥

अथवा संभ्रमाचिया आयती । स्नेहो जैसा ए व्यक्ती ।
कां दर्शनाचिया प्रशस्ती । पुण्यपुरुषु ॥ ८१ ॥
नातरि केळि कापुरु जाला । तो परिमळें जाणों आला ।
कां भिंगारां दीपु ठेविला । बाहिरि फांके ॥ ८२ ॥
तैसिं हृदइंचेनि ज्ञानें । जियें उमटति देहिं चिन्हें ।
तियें सांघों अवधानें । चांगें आइक ॥ ८३ ॥
तरि कव्हणी विखिचे । जीवा साम्य होणें न रुचे ।
संभावितपणाचें । ॐझें जेया ॥ ८४ ॥
आथिले चि गुण वानितां । कां मान्यपणें मानितां ।
योग्यतेचें येतां । रूप आंगा ॥ ८५ ॥
गजबजों लागे कैसा । व्याघ्रें रुंधला मृगु जैसा ।
कां बाहिं उतरलां वळसां । दाटला जेवि ॥ ८६ ॥
पार्था तेणें पाडें । सन्मानें जो सांकडे ।
गरिमेतें आंगा कडे । येॐ नेंदी ॥ ८७ ॥
पूज्यता डोळां नेदखावी । स्वकीर्त्ति कानिं नाइकावी ।
हा अमुका ऐसी न व्हावी । से चि लोका ॥ ८८ ॥
तेथ सत्काराची कें गोठी । कें आदरा होईल भेटि ।
मरणेंसिं साठि । नमस्कारितां ॥ ८९ ॥
वाचस्पतिचेनि पाडें । सर्वज्ञता तरि जोडे ।
परि वेडिवे माजि दडे । महिमे भेण ॥ १९० ॥
चातुर्य लपवी । महत्व हारवी ।
पीसेपण मिरवी । आवडौनि ॥ ९१ ॥
लौकिकाचा उद्वेगु । शास्त्रांवरि उभगु ।
उगेपणिं चांगु । आथि भरु ॥ ९२ ॥
जगें अवज्ञा चि करावी । संबंधि सोये न धरावी ।
ऐसी ऐसी जीविं । चाड बहु ॥ ९३ ॥

तलैटेपण बाणे । आंगीं हीणाऊ खेवणें ।
तें तें चि करणें । बहुतकरुनु ॥ ९४ ॥
हा जीतु ना नव्हे । लोकु कल्पी येणें भावें ।
तैसें जीणें होआवें । ऐसी आश ॥ ९५ ॥
पैल चालत कां आहे । किं वारेनि जांत नोहे ।
जना ऐसा भ्रमु जाए । ऐसेयां होइजे ॥ ९६ ॥
माझें असतेपण लोपो । नामरूप हारपो ।
मज झनें वासिपो । भूतजात ॥ ९७ ॥
ऐसिं जेयाचि नवसियें । एकांता जात जाए ।
नावें चि जो जिये । रानाचेनि ॥ ९८ ॥
वायू आणि जेया पडे । गगनेंसिं बोलों आवडे ।
जीउ प्राणु झाडें । पढियंति गा ॥ ९९ ॥
किंबहुना ऐसिं ऐसिं । चिन्हें जेया देखसी ।
जाण तेया ज्ञानेंसिं । सेस जालें ॥ २०० ॥
पैं अमानित्व पुरुषीं । जाणावें इहिं मिखिं ।
आतां अदंभित्वाचिये ओलखी । सौरसु करूं ॥ १ ॥
तारि अदंभित्व तें ऐसें । लोभियाचें मन जैसें ।
जीउ जाऊ परि नुमसे । ठेविला ठाऊ ॥ २ ॥
तेया परी किरीटी । पडिला ही प्राणसंकटीं ।
पारि सुकृत न प्रकटी । आंगें बोलों ॥ ३ ॥
खडाणे आला पान्हा । पलवी जेवि अर्जुना ।
कां राहे पण्यांगना । वडीलपणें ॥ ४ ॥
आढयु आंतुडे अडवि । मग आढ्यता जेवि हारवी ।
कां कुलवधू लपवी । अवेवांतें ॥ ५ ॥
नाना कृषिवलु आपुलें । पांगुरवी पेरिलें ।
तैसें झांकी निफनलें । दानपुण्य ॥ ६ ॥

वरि देह न पूजी । लोकातें न रंजी ।
स्वधर्मु वाग्बीजिं । बांधों नेणें ॥ ७ ॥
परोपकारु नोबोले । न मिरवी अभ्यासिलें ।
न शके विकूं जोडिलें । स्फीतीसाठिं ॥ ८ ॥
आंगभोगा कडे । पाहातां कृपणु आवडे ।
यऱ्हविं धर्मविखीं थोडें । बहू न ह्मणे ॥ ९ ॥
घरिं दीसैल सांकड । देहिची ही आइति रोड ।
परि दानिं जेया होड । सुरतरूसिं ॥ २१०
किंबहुना धर्मिं थोरु । अवसरिं उदारु ।
आत्मचर्चे चतुरु । यऱ्हविं वेडा ॥ ११ ॥
केळिचें दळवाडें । हळु पोकळ आवडे ।
परि फळौनियां गाढें । रसाळ जैसें ॥ १२ ॥
कां मेघाचें आंगझील । दीसे वारेनि जैसें जाइल ।
परि वरिखती नवल । घनवटीतें ॥ २१३ ॥
तैसा जो पुर्णी । पातां धांति आणी ।
यऱ्हविं तरि वाणी । तो चि ठाऊ ॥ १४ ॥
हें असो एया चिन्हांचा । नडनाचु ठांइं जेयाचा ।
जाण ज्ञान तेयाचा । हातु चढलें ॥ १५ ॥
पैं गा अदंभपण । ह्मणितलें तें हें जाण ।
आतां आइक खूण । अहिंसेची ॥ १६ ॥
तरि अहिंसा बहुवे परीं । बोलिली असे अवधारीं ।
आपुलालां मतांतरिं । निरोपितां ॥ १७ ॥
परि ते ऐसी देखां । जैसिया खांडूनियां शाखा ।
मग तेया चि बुडुखा । कूंपु कीजे ॥ १८ ॥
वाहे तोडूनि विकिजे । मग भूखेची पीडा राखिजे ।
नाना देउलें मोडूनि कीजे । पौळि देवा ॥ १९ ॥

तैसी चि हिंसा करूनि अहिंसा । कर्मकांडिं हा ऐसा ।
पूर्वमीमांसा । निर्णो केला ॥ २२० ॥
जैं अद्दष्टिचेनि उपद्रवें । गादैल विश्व चि आघवें ।
ह्मणौनि पर्जन्ययष्टि करावे । नाना याग ॥ २१ ॥
तिये इष्टिचां बुडीं । पशुहिंसा तवं रोकडी ।
मम अहिंसेची थडी । लेसां दीसे ॥ २२ ॥
पेरिजे तुसदी हिंसा । तेथ आवैल काय अहिंसा ।
परि नवलु बा धिवंसा । याज्ञिकांचा ॥ २३ ॥
आणि आयुर्वेदु ही आघवा । एया चि मोहरा पांडवा ।
जें जीवां कारणें करावा । जीवां घातु ॥ २४ ॥
नव्हे रोगीं आहाललीं । लोलतीं भूतें देखिलीं ।
ते हिंसा निवारावेया केली । चिकित्सिका ॥ २५ ॥
तवं चिकित्सा पहिलें । एकांचे कंद खणविले ।
एकां उपडविलें । समूळांतें ॥ २६ ॥
एकें आडमोडीं केलीं । अजंगमाची खाल काढविली ।
गाभिणीं उकढलीं । पुटां माझि ॥ २७ ॥
अजातशत्रुतरुवरां । सर्वांगिं देवविलिया सिरा ।
ऐसे जीव घेउनि वीरा । कोरडे केले ॥ २८ ॥
आणि जंगमा हिं हात । लाउनि काढिलें पित्त ।
मग राविले सीणत । आणिक जीव ॥ २९ ॥
आहावसुवारें । मोडूनि केले देव्हारे ।
नागवूनु वेव्हारे । गवांदि घातली ॥ २३० ॥
मस्तक पांगुराविलें । तवं तळवटीं उघडें ठेलें ।
मागां मोडूनु केलें । पुढें धड ॥ ३१ ॥
नाना पांगुरणें । जाळूनि जैसें तापणें ।
नातरि जालें आंगधुणें । कुंजराचें ॥ ३२ ॥

बैलु वीकूनि कोठा । पूंस लाउनि गांठा ।
इयें करणी कीं चेष्टा । कायि हांसों ॥ ३३ ॥
एकिं धर्माचिया वाहाणी । गाळूं आदरिलें पाणी ।
तेथ गाळितेयाचिया आहळणी । जीव मेले ॥ ३४ ॥
एक न पचिति चि कण । इये हिंसे चि भेण ।
तेथ कदर्थले प्राण । ते चि हिंसा ॥ ३५ ॥
एवं हिंसा चि अहिंसा । कर्मकांडिं हा ऐसा ।
सिद्धांतु सुमनसा । ऊळख तूं ॥ ३६ ॥
पहिलें अहिंसेचें नावं । केलें आम्हिं जवं ।
तवं स्फूर्त्ति बांधली हावं । इये मतीं ॥ ३७ ॥
तरि कैसेनि इयेतें गाळावें । म्हणौनि पडिलें बोलावें ।
तेविं चि तुवां जाणावें । ऐसा भाऊ ॥ ३८ ॥
बहूकरूनि किरीटी । हा चि विषो इये गोठी ।
यऱ्हविं कां आडवाटीं । धांविजैल ॥ ३९ ॥
आणि स्वमताचिया निर्द्धारा । लागौनियां धनुर्द्धरा ।
प्राप्ता मतांतरा । निर्वचु कीजे ॥ २४० ॥
ऐसी हे अवधारीं । निरोपिती परी ।
आतां यावरी । मुख्य जें गा ॥ ४१ ॥
तें स्वमत बोलिजैल । अहिंसे रूप कीजैल ।
जेया उठविलेयां आंतुल । ज्ञान दीसे ॥ ४२ ॥
परि तें चि अधिष्ठिलेनि आंगें । जाणिजे आचरतेनि बागें ।
जैसी कसवटी सांघे । वानियेतें ॥ ४३ ॥
तैसें ज्ञानामनाचिये भेटी । अहिंसेचें बिंब उठी
तें चि ऐसें किरीटी । परिस आतां ॥ ४४ ॥
तरि तरंग नोलांडितु । लहरी पायें न फेडितु ।
संचळु न मोडितु । पाणियांचा ॥ ४५ ॥

वेगें आणि लेसां । दीठि घालूनि आवेंसा ।
जळिं बकु जैसा । सोंए ॥ ४६ ॥
कां कमळावरि भवर । पाये ठेविति हळुवार ।
कुचुंबैल केसर । इया शंका ॥ ४७ ॥
तैसे परिमाणु पांगुतले । जाणौनि जीउ सानुले ।
कारुण्या माझि पाउलें । लपौनि चाले ॥ ४८ ॥
ते वाट कृपेची करितु । ते दिशा चि स्नेहें भरितु ।
जीवा तळिं आंथुरितु । आपुला जीउ ॥ ४९ ॥
ऐसिया जतना । चालणें जेया अर्जुना ।
हें अनिर्वाच्य परि मना । पुरिजे ना ॥ २५० ॥
पैं मोहाचेनि सांगडें । लांसि पीलें धरी तोंडें ।
तेथ दातांचें आगरडें । जैसें लागे ॥ ५१ ॥
कां स्नेहाळ माए । तान्हेयांची वास पाहे ।
तिये दीठी आहे । हळुवार जें ॥ ५२ ॥
नाना कमळदळें । डोलवीजिजति ढाळें ।
तो जेणें पाडें बुबुळें । वारा घेपे ॥ ५३ ॥
तैसेनि मार्दवें पाए । भूमी ठेवीतु जाये ।
लागति तेथ होये । जना सुख ॥ ५४ ॥
ऐसिया लविमा चालता । क्रिमिकीटक पांडुसुता ।
देखे तरि मागौता । हळू चि निगे ॥ ५५ ॥
ह्मणे पाउ दडफडील । निद्रा स्वामिची मोडैल ।
रचलेपणा पडैल । झोंति हान ॥ ५६
इया काकुळती । वाहाणि घे मागौति ।
कोण्ही हिं व्यक्ती । न वचवे वरि ॥ ५७ ॥
जीवाचेनि नावें । तृण हिं नोलांडावें ।
मग नदेखितां जावें । हें कें गोठि ॥ ५८ ॥

मुंगिये मेरु नोलांडवे । मशका सिंधु नुतरवे ।
तैसें भेटलें न करवे । अतिक्रमूं ॥ ५९ ॥
ऐसी जेयाची चालि । क्रियाफलासि आली ।
देखसी जियाली । दया वाचे ॥ २६० ॥
स्वसणें चि तें सकुमार । मुख मोहाचें माहियेर ।
माधुर्या जाले अंकुर । दशन तैसे ॥ ६१ ॥
पुढां स्नेह पांझरे । मागां चालति अक्षरें ।
शब्दु पाठिं अवतरे । कृपा आधीं ॥ ६२ ॥
तवं बोलणें चि नाहीं । भिये ह्मणे जरी काहिं ।
बोलु कोण्हा हिं । खुपैल कां ॥ ६३ ॥
बोलतां अधिकु ही निगे । तरि कोण्हां वर्मी हान लागे ।
कोण्हासि रिगे । शंका मनीं ॥ ६४ ॥
मांडली गोठि हान मोडैल । वासिपैल कव्हणी उडैल ।
आइकों चि वोवांडिल । कोण्हीं जरी ॥ ६५ ॥
तरि दुवालि कोण्हा न व्हावी । कोण्हाची भंवै नुचलावी ।
ऐसा भाउ जीविं । ह्मणौनि उगा ॥ ६६ ॥
मग प्रार्थिला विपाएं । जरि लोभें बोलों जाए ।
तरि परियस तेयां होए । मायबापु ॥ ६७ ॥
नादब्रह्म मूर्छलें । गंगापय आसललें ।
पतिव्रते आलें । वृद्धाप्य कां ॥ ६८ ॥
तैसी साच आणि मौवाल । सीतुली आणि रसाल ।
बोल जैसे कल्लोल । अमृताचे ॥ ६९ ॥
उरोधु वाडुवलु । प्राणुपापता ढालु ।
उपहासु चालु । वर्मस्पर्शु ॥ २७० ॥
आंतु वेगु विंदाण । आश शंका प्रतारण ।
हे संन्यासिले अवगुण । जेया वाचा ॥ ७१ ॥

आणि तेया चि परी किरीटी । थाउं जियाचिया दीठी ।
सांडिलिया भृकुटी । मोकलिया ॥ ७२ ॥
भूतिं वस्तु आहे । तिये रूपीं सके विपायें ।
ह्मणौनि वास ना पाहे । बहुत करुनि ॥ ७३ ॥
ऐसा ही कोण्ही एकी वेळे । आंतुली कृपेचेनि बळें ।
उचलूनियां डोळे । दीठी घाली ॥ ७४ ॥
तरि चंद्रबिंबौनि धारा । सूटति नव्हंति गोचरा ।
परि एकसरिं चकोरां । निगति दोंदें ॥ ७५ ॥
तैसें प्राणियांसि होए । जरि तो वास पाहे ।
तेया अवलोकनाची सोए । कूर्मी हीं नोहे ॥ ७६ ॥
किंबहुना ऐसी । दीठि जेया भूतांसि ।
कर ही देखसी । तैसे चि गा ॥ ७७ ॥
होउनियां कृतार्थ । राहिले सिद्धांचे मनोरथ ।
तैसे जेयाचे हात । निर्व्यापार ॥ ७८ ॥
अक्षम आणि सन्यासिलें । निरंधन आणि विझालें ।
मूकेनि घेतलें । मौन जैसें ॥ ७९ ॥
तिया परिं कांहिं । जियां करां करणें नाहिं ।
जें अकर्त्तयाचां ठांइं । बैसउं एंती ॥ २८० ॥
आसुडैल हान वारा । नख लागैल अंबरा ।
इया बुद्धी करां । चळों नेंदी ॥ ८१ ॥
तेथ आंगावरिलें उडाविं । कां डोळां रिगतें झाडाविं ।
पशुपक्षां दावावी । त्रासमुद्रा ॥ ८२ ॥
इया केउतिया गोठी । नावडे दंडुकाठी ।
मग शस्त्रांचें किरीटी । बोलणें कें ॥ ८३ ॥
लीलाकमळें खेळणें । पुष्पमाळा झेलणें ।
न करी ह्मणे गोफणें । ऐसें होइल ॥ ८४ ॥

हाल्वती रोमावली । या लागि आंग न कुरवाळी ।
नखांची गुंडाळि । बोटां वरि ॥ ८५ ॥
तवं करणेयांचा चि विपाऊ । जरि ऐसा ही पडे ठाऊ ।
तरि हातां हा चि स्वभाऊ । जें जोडिजति ॥ ८६ ॥
कां नाभिकारा उभिजे । हातु पडिलेयां दीजे ।
आर्तातें परिसिजे । अलुमालु ॥ ८७ ॥
हें इं उपरोधें करणें । आर्त्ति भय हरणें ।
नेणति चंद्रकिरणें । जीवाला तो ॥ ८८ ॥
पाहूनि तो स्पर्शु । मलयानीलु खरपुसु ।
एणें मानें पशु । कुरवाळणें ॥ ८९ ॥
जियें सदा रीतिं पोकळें । जैसिं चंदनांगें शीतळें ।
न फलतां हिं निष्फळें । होंति चि ना ॥ २९० ॥
असो हें वाग्जाल । जाणिजे करतल ।
सज्जनाचें सीतल । स्वभावें जैसें ॥ ९१ ॥
आतां मन तेयाचें । सांघों ह्मणे साचें ।
तरि सांधितलें कोणाचे । विलास हे ॥ ९२ ॥
काइ शाखा नव्हे तरु । जलें विण असे सागरु ।
तेज आणि तेजकरु । सिनानी आथि ॥ ९३ ॥
अवेव आणि शरीर । हें वेगळालें जर ।
किं रसु आणि नीर । सिनानीं आथि ॥ ९४ ॥
ह्मणौनि जे हे सर्व । सांघितले बाह्य भाव ।
तें मन चि गा सावेव । ऐसें जाण ॥ ९५ ॥
जें बिं भुइं खोविलें । तें चि वरि रुंख जाले ।
तैसें इंद्रियद्वारीं फांकलें । अंतरिचें ॥ ९६ ॥
पैं मानीसि जरि । अहिंसेची अवसरी ।
तरि कैंची बाहिरि । बोसंडैल ॥ ९७ ॥

आवडे ते वृत्ति किरीटी । आधिं मनौनि उठी ।
मग वाचे दीठी । करांसि ये ॥ ९८ ॥
वांचूनि मनीं नाहिं । तें आंगिं उमटैल काइ ।
बीजें विण भुइं । अंकुरु असे ॥ ९९ ॥
उगविं चि वालौनि जाए । तें ऍविं कैंचें वाहे ।
जीउ गेलेयां आहे । चेष्टा देहिं ॥ ३०० ॥
तैसें मनपण जैं मोडे । तैं इंद्रियां आधीं चि उबडे ।
सूत्रें विण साईखडें । वाऊ जैसें ॥ १ ॥
ह्मणौनि मन पांडवा । मूळ एयां इंद्रियभावां ।
हें चि राहाटे आघवां । द्वारिं इहिं ॥ २ ॥
परि जिये वेळे जैसें । जें होउनि आतुं असे ।
बाहिरि ये तैसें । व्यापाररूपें ॥ ३ ॥
यालागि साचोकारें । मनीं अहिंसा थावे थोरें ।
पैं कळि जैसी द्वारें । बोबांत निगे ॥ ४ ॥
ह्मणौनि इंद्रियें ते संपदा । वेंचितां हिं उदावादा ।
अहिंसेचा बांधा । करितें आहाति ॥ ५ ॥
समुद्र दाटी भरितें । तैं समुद्र चि करी खारियांतें ।
तैसें स्वसंपत्ति चित्तें । इंद्रियां केलें ॥ ६ ॥
हें बहु असो पंडितु । धरूनु बाळकाचा हातु ।
वोळि लेहे वेगवंतु । आपण चि ॥ ७ ॥
तैसें दयाळुत्व आपुलें । मनें हातां पायां आणिलें ।
मग तेथ उपजविलें । अहिंसेतें ॥ ८ ॥
याकारणें किरीटी । इंद्रियांचिया गोठी ।
मनाचिये चि राहाटी । रूप केलें ॥ ९ ॥
ऐसा मनें देहें वाचा । सर्व संन्यासु दंडाचा ।
जाला ठांइ जेयाचां । देखसील ॥ ३१० ॥

तो जाण वेल्हाळ । ज्ञानाचें वेळाउळ ।
हें असो निखळ । ज्ञान चि तो ॥ ११ ॥
जे अहिंसा कानिं आइकिजे । ग्रंथाधार निरोपिजे ।
ते पाहावी हें उपजे । तैं तो चि पाहावा ॥ १२ ॥
ऐसें ह्मणितलें देवें । तें बोल एकें सांवावें ।
परि फांकला हें उपसाहावें । तुह्मीं मज ॥ १३ ॥
ह्मणाल हिरव चारिवें गोरुं । विसरे मोहर घरुं ।
कां वारेलगें पाखिरुं । गगनीं भरे ॥ १४ ॥
तैसा प्रमेयाचिया स्फूर्त्ती । फावलिया रसवृत्ती ।
वाहविलां मती । अलुमालु ॥ १५ ॥
तरि तैसें नव्हे अवधारां । कारण असे विस्तारा ।
एन्हवि पद तरि अक्षरां । तिहिंचें चि ॥ १६ ॥
अहिंसा ह्मणतां थोडी । परि तैं चि होये उघडी ।
जैं आलोडिजति कोडी । मतांचिया ॥ १७ ॥
यन्हवि प्राप्तें मतांतरें । थाथंबूनि आंगभरें ।
बोलिजैल तें न सरे । तुह्मा पासिं ॥ १८ ॥
रत्नपारिखियाचां गाविं । जाईल गंडी तरि सोडावी ।
काश्मिरीं न करावीं । मढंगणें ॥ १९ ॥
इछा वासु कापुरा । मंद जेथ अवधारां ।
पिठाचा विकिरा । तिये सांते ॥ ३२० ॥
ह्मणौनि इये सभे । बोलिकेपणाचेनि क्षोभें ।
लागसर न लभें । बोलों प्रभू ॥ २१ ॥
सामान्य आणि विशेषा । सकळव कीजैल देखां ।
तरि कानाचेया ही मुखा । कडे नेनां तुह्मीं ॥ २२ ॥
शंकेचेनि गदळपणें । जैं शुद्ध प्रमेय मैळणें ।
मागुत वाउलीं पलवणें । अवधान यंतें ॥ २३ ॥

करूनि बाबुळियेची बूंथि । जळें जियें ठाति ।
तेयांची वांस पाहाती । हंस काई ॥ २४ ॥
कां अभ्रा पैलीकडे । येंत चांदिणें कोंडे ।
तैं चकोर चांचुवडे । पसरीति ना ॥ २५ ॥
तैसें तुह्मि वास न पाहाल । ग्रंथु नेघा वरि कोपाल ।
जरि निर्वेवादां नव्हैल । निरोपण ॥ २६ ॥
न बुझावति मतें । न फीटे आक्षेपाचें लागतें ।
तें वाखाणें जी तुमतें । जोडुनु नेंदीं ॥ २७ ॥
आणि माझें तवं आघवें । ग्रंथार्यंत एणें विभावें ।
जें तुह्मि संति होआवें । सन्मुखां सदा ॥ २८ ॥
यऱ्हवि तऱ्हीं साचोकारें । तुह्मि गीतार्थाचे सोयरे ।
जाणौनि गीता जीवसरें । धरिली मियां ॥ २९ ॥
जें आपुलें सर्वस्व देयाल । मग इयेतें सोडवूनु नेयाल ।
ह्मणौनि ग्रंथु नव्हे बोल । साच चि हे ॥ ३३० ॥
कां सर्वस्वाचा लोभु धरा । बोलेचा अव्हेरु करा ।
तरि गीते मज अवधारां । एकी चि गति ॥ ३१ ॥
किंबहुना मज । तुमचिया कृपा काज ।
तिये लागौनि व्याज । ग्रंथाचें केलें ॥ ३२ ॥
तरि तुह्मां रसिकां जोगें । वाखाण शोधावें लागे ।
ह्मणौनि मतांगें । बोलों ठेलां ॥ ३३ ॥
तवं कथे पसरु जाला । श्लोकार्थु दूरि ठेला ।
कीजो क्षमा या बोला । अपराध मज ॥ ३४ ॥
आणि घांसांतूळु हरळु । फेडितां लागे वेळु ।
तें दूषण नव्हे आडळु । सांडावा कि ॥ ३५ ॥
सवंचोर चूकवितां । दीस लागलेयां माता ।
कोपावें कि जीविता । जींताणें कीजे ॥ ३६ ॥

परि या वरिल हें नव्हे । तुहिं उपसाहिलें तें बरवें ।
आतां अवधारां जी देवें । बोलिलें ऐसें ॥ ३७ ॥
ह्मणे उन्मेखसुलोचना । सावधु होइं अर्जुना ।
करूं तुज ज्ञाना । वोलखि पाडूं ॥ ३८ ॥
परि ज्ञान गा तेथें । वोलख तूं निरुतें ।
आक्रोशें विण जेथें । क्षमा आथि ॥ ३९ ॥
अगाधें सरोवरिं । कमलिनी जेया परीं ।
कां सदैवांचां घरीं । संपती जैसी ॥ ३४० ॥
पार्था तेणें पाडें । क्षमा जेयातें वाढे ।
तें हिं लक्ष फुडें । लक्षण सांघों ॥ ४१ ॥
तरि पढियंतें लेणें । आंगिं भावे जेणें ।
धरिजे तेवि साहाणें । सर्व चि जेया ॥ ४२ ॥
त्रिविध मुख्य आघवे । उपद्रवांचे मेळावे ।
वरिपडिलेयां न्हवे । वांकुडा जो ॥ ४३ ॥
अपेक्षित पावे । तो जेणें तोखें मानवे ।
अनपेक्षिता ही करावें । तो चि मानु ॥ ४४ ॥
जो मानापमानातें साहे । सुखदुःख जेथ मायें ।
निंदास्तुती नोहे । दुखंडु जो ॥ ४५ ॥
उन्हालेनि जो न तपे । हेमवंतीं न कंपे ।
काइसेया ही न वासिपे । पातलेयां ॥ ४६ ॥
स्वशरीराचा भारु । नेणे जैसा मेरु ।
कां धरा इया सूकरू । वोझें न ह्मणे ॥ ४७ ॥
नाना चराचरीं भूतीं । दाटणी नव्हे इये क्षिती ।
तैसा नाना द्वंद्वप्राप्तीं । घामेजे ना ॥ ४८ ॥
घेउनु जळाचे संवाट । आलेयां नदीचे लोट ।
करी वाट पोट । सिंधु जेवि ॥ ४९ ॥

तैसें जेयाचां ठांइं । न साहणें काहीं चि नाहिं ।
आणि सात असे ऐसें हिं । स्मरे ना जो ॥ ३५० ॥
आंगा जें पातलें । तें करूनि घाली आपुलें ।
तेथ साहंतेनि नवलें । घेपिजे ना ॥ ५१ ॥
हे अनाक्रोश क्षमा । जेयातें आथि प्रियोत्तमा ।
जाण तेणें महिमा । ज्ञानासि गा ॥ ५२ ॥
तो पुरुषु पांडवा । ज्ञानाचा ओलावा ।
आतां परियस आर्जवा । रूप करुं ॥ ५३ ॥
तरि आर्जव तें ऐसें । प्राणाचें सौजन्य जैसें ।
आवडतेया हीं दोसें । एक चि गा ॥ ५४ ॥
कां तोंड पाहूनि प्रकाशु । न करी जेवि चंडांशु ।
जगा एकू चि अवकाशु । आकाशातें ॥ ५५ ॥
तैसें जेयाचें मन । मानुषप्रति आनान ।
नाहिं आणि वर्त्तन । ऐसें पैं तें ॥ ५६ ॥
जें जग चि सनोलख । जगेंसिं चि सोयेरिक ।
आपपरु हे भाष । जाणणें चि नाहिं ॥ ५७ ॥
भलेतेणेंसिं मेळु । पाणियां ऐसा ढाळु ।
कोण्ही हि विखीं आडळु । नेघे चित्त ॥ ५८ ॥
वारेयाची धावं । तैसे सरळ भाव ।
शंका आणि हांवं । नाहिं जेया ॥ ५९ ॥
माये पुढां बाळका । रिगतां न पडे चि आवांका ।
तैसें मन देतां लोका । नालोची जो ॥ ३६० ॥
प्रकटलेया इंदीवरा । परिवरु नाहिं धनुर्द्धरा ।
तैसा कोनकोंपरा । नेणे जीउ ॥ ६१ ॥
चोखाळपण रत्नाचें । रत्नावरि नाचे ।
तैसें पुढां मन जेयाचें । करणें पाठिं ॥ ६२ ॥

आंलोंचु जो नेणे । अनभिज्ञु जोगावणें ।
धरी मेळीसि करणें । नाहिं जेया ॥ ६३ ॥
दीठि नोहे मिणधी । देखणा नाहिं संधी ।
कोण्हासि ही बुद्धी । राहाटों नेणे ॥ ६४ ॥
दाही इंद्रियें प्रांजळें । निःप्रपंचें उवळें ।
पांचै पाळव मोकळे । आठै पाहार ॥ ६५ ॥
अमृताची धार । तैसें उजू अंतर ।
किंबहुना माहेर । यां चिन्हांचें ॥ ६६ ॥
तो पुरुषु सूभटा । आर्जवाचा आंगवटा ।
जाण तेथ चि घरटा । ज्ञानें केला ॥ ६७ ॥
आतां या वरि । गुरुभक्तिची परी ।
सांघों अवधारीं । चतुरनाथा ॥ ६८ ॥
आघवेया चि दैवां । जन्मभूमि जे सेवा ।
जे ब्रह्म करी जीवा । शोच्यते ही ॥ ६९ ॥
ते आचार्यउपास्ति । सांविजैळ तुज प्रति ।
बैसो सहस्रा एका ची पांती । अवधानाची ॥ ३७० ॥
तरि सकळजळसमृद्धी । गंगा रिगाली उदधी ।
कां श्रुति हे महापदीं । पैठी जाली ॥ ७१ ॥
नाना वेंटाळूनु जीवितें । गुणावगुण उखिते ।
प्राणनाथा उचितें । दीन्हलें प्रिया ॥ ७२ ॥
तैसें सबाह्य आपुलें । जेणें गुरुभक्ती दीधलें ।
आपणपें केलें । भक्तिचें घर ॥ ७३ ॥
गुरुगृह जिये देशीं । तो देशु चि आहे मानसिं ।
विरहिणी जैसी । वल्लभातें ॥ ७४ ॥
तिये कडौनु येंतु वारा । देखौनु धांवे सामोरा ।
आडपडे ह्मणे घरा । वीजें कीजे ॥ ७५ ॥

साच प्रेमाचिया भूली । तिया दिशा चि वोवाली ।
जीउ थानापति करुनु घाली । गुरुगृहिं जो ॥ ७६ ॥
गुरुआज्ञा धरलें । देह गावि असे एकलें ।
वांसुरुवां लाविलें । दावें जैसें ॥ ७७ ॥
ह्मणे कै हें बिरडें फीटैल । कै तो स्वामि भटैल ।
युगा ही होन वडिल । निमिष मानी ॥ ७८ ॥
ऐसें गुरुग्रामिचें आलें । कां स्वयं गुरु चि धाडिलें ।
तरि गतायुषा जोडलें । आयुष्य जैसें ॥ ७९ ॥
कां सुकतेया अंकुरा । वरि पडिलेयां पीयूखधारा ।
कां निर्जलिचा सागरा । आला मछु ॥ ३८० ॥
नातरि रंकें निधान देखिलें । आंधलेया डोले उघडले ।
भणगाचेया आंगा आलें । इंद्रपद ॥ ८१ ॥
तैसें गुरुकुलिचेनि नावें । महासुखें थोरावे ।
जें कोडिं हिं न पोटलवे । आकाशाचां ॥ ८२ ॥
पैं गुरुकुलिं ऐसी । भक्ति जेया देखसी ।
जाण ज्ञान तेया पासिं । पाइकया असे ॥ ८३ ॥
आणि अभ्यंतरिली कडे । प्रेमाचेनि पवाडें ।
श्रीगुरुचें रूपडें । उपासी ध्यानीं ॥ ८४ ॥
हृदयशुद्धिचां आवारीं । आराध्य तें धूर करी ।
मग सर्वभावेंसिं परिवारीं । आपण होए ॥ ८५ ॥
कां चैतन्याचिया पवली । माझि आनंदाचां राउलिं ।
गुरुलिंगा ढाली । ध्यानामृत ॥ ८६ ॥
उदैजतां बोधार्का । बुद्धिची डाल सात्विका ।
भरौनि दे त्र्यंबका । लाखौली तेया ॥ ८७ ॥
शुद्धि त्रिकालिं । जीवदशा धूपु जाली ।
ज्ञेयदीपें उभ्वाली । निरंतर ॥ ८८ ॥

समरस्याची रससोय । अखंड अर्पीतु जाए ।
आपण भराडा होए । गुरुतें लिंगा ॥ ८९ ॥
नातरि जिवाचिये सेजे । गुरु कांतु करुनु भुंजे ।
ऐसिं प्रेमाचिं भोजें । बुद्धि वाहे ॥ ३९० ॥
कोण्ही एकीं अवसरिं । अनुरागु भरे अंतरीं ।
किं तेया नावें करी । क्षीराब्धि ॥ ९१ ॥
तेथ ध्यान बहुमुख । ते शेष तुळई निर्दोष ।
वरि जलसेनु देख । भावी गुरु ॥ ९२ ॥
वोलगती पाए । लक्ष्मी आपण होए ।
गरुड होउनु राहे । आपण चि ॥ ९३ ॥
नाभीं आपण जन्मे । ऐसी गुरुमूर्त्ति प्रेमें ।
अनुभवी मनोधर्में । ध्यानसुखें ॥ ९४ ॥
एकोधिये वेळे । गुरु माये करी भावबळें ।
मग स्तन्य उत्संगीं लोळे । अंका वरि ॥ ९५ ॥
नातरि गा किरीटी । चैतन्यतरूतळवटीं ।
गुरुधेनु आपण पाठिं । वत्स होए ॥ ९६ ॥
गुरुस्नेहसलीलीं । आपण होये मासली ।
कोण्ही एकी वेळीं । हें चि भावी ॥ ९७ ॥
गुरु आमृताचें वडप । आपण होये लाहालाहात रोप
ऐसेसे संकल्प । वियें मन ॥ ९८ ॥
चक्षुपक्षि विण । पीलु होये आपण ।
ऐसें पैं अपारपण । आवडिचें ॥ ९९ ॥
गुरुतें पक्षिणी करी । चाराचारीं चांचु वेन्हीं ।
गुरु तारुं कास धरी । आपण जळीं ॥ ४०० ॥
ऐसें प्रेमाचेनि थावें । ध्यान चि ध्यानातें प्रसवे ।
पूर्ण सिंधू हेलावे । सूटति जैसे ॥ १ ॥

किंबहुना इया परीं । गुरुमूर्त्ति अंतरीं ।
भोगी आतां अवधारीं । बाह्य सेवा ॥ २ ॥
तरि जीवीं ऐसे आवांके । ह्मणे दास्य करीन नीकें ।
जवं गुरु कवतिकें । माग ह्मणति ॥ ३ ॥
तेसिया साचा उपास्ती । गोसांवि प्रसन्न होंति ।
तेथ मी विनती । ऐसी करीन ॥ ४ ॥
ह्मणौनु तुमचा देवा । परिवारु आघवा ।
तेतुलीं रूपें होआवा । मीं चि एकु ॥ ५ ॥
आणि देव्हाराचिं आपुलीं । उपकरणें जेतुलीं ।
माझि रूपें तेतुलीं । होआवीं जी ॥ ६ ॥
ऐसा मागेन वरु । तेथ हो ह्मणति श्रीगुरु ।
मग तो परिवारु । मीं चि होइन ॥ ७ ॥
उपकरणजात सकळैक । तें हिं होईन एकैक ।
मग उपास्तिचें कवतिक । देखिजैल ॥ ८ ॥
श्रीगुरु बहुतांची माए । परि एकलौती होउनि ठाए ।
तैसें करूनु आण वाए । कृपे तिये ॥ ९ ॥
तेया अनुरागा वेधु लावी । एकपत्नीव्रत घेववी ।
क्षेत्रसन्यासु करवी । लोभा करवि ॥ ४१० ॥
चतुर्दिक्षु वारा । न ल्हाये निगों बाहिरा ।
तसा गुरुकृपे पांजरा । आपण चि होइन ॥ ११ ॥
आपुलेया गुणाचीं लेणीं । करीन गुरुसेवे स्वामिणी ।
हें असो होईन गवसणी । गुरुभगतीसि ॥ १२ ॥
गुरुस्नेहाची वृष्टि । मी पृथ्वी होईन तळवटीं ।
ऐसिया मनोरथांचिया सृष्टी । रची अनंता ॥ १३ ।
ह्मणे श्रीगुरुचें भवन । मी आपण होईन ।
आणिं दासु होउनु करीन । दास्य तेथिचें ॥ १४ ॥

रिगतां निगतां दातारें । ऊलांडिजति उंबरें ।
ते मी होईन आणि द्वारें । द्वारपालु ॥ १५ ॥
मी पाउवा होइन । तेया मीं चि मेळवीन ।
छत्री मी होईन । बारी मी चि ॥ १६ ॥
मी तळु उपरु ह्मणता । चवरधरु हातुदेंता ।
स्वामी पुढां बोलता । होईन मी ॥ १७ ॥
हडपु मीं बोलगैन । उगाळु मी चि घेईन ।
उळिग मी करीन । आंघोळिचें ॥ १८ ॥
होईन गुरुचें आसन । अळंकार परिधान ।
चंदनादि होईन । उपचार मीं ॥ १९ ॥
मी चि होईन सुआरु । वोगरीन उपहारु ।
आपणपें श्रीगुरु । वोवाळिन ॥ ४२० ॥
मग देऊ आरोगिति । तेधवां पांतिकरु पांती ।
मीं चि होईन पुडुतीं । देईन वीडा ॥ २१ ॥
मग मी ताट काढीन । सेज मी झाडीन ।
चरणसेवा करीन । मी चि देखैं ॥ २२ ॥
सिंहासन होईन आपण । वरि श्रीगुरु करिति आरोहण ।
करीन खरेपण । ऊळगेचें ॥ २३ ॥
श्रीगुरुचें मन । जेया देईल अवधान ।
तो मी पुढां होईन । चमत्कारु ॥ २४ ॥
तेया श्रवणाचां आंगणीं । होईन शब्दाचिया क्षोणी ।
स्पर्श होईन घसणी । आंगिचिये ॥ २५ ॥
श्रीगुरुचे डोळे । अवलोकन स्नेहाळें ।
पाहांती तियें सकळें । रूपें होइन ॥ २६ ॥
तिये रसने जो रसु रुचैल । तो आपण चि होइजैल ।
गंधरूपें कीजैळ । घ्राणसेवा ॥ २७ ॥

एवं बाह्यमनोगत । गुरुसेवा समस्त ।
वेंटाळुनु वस्तुजात । होउनियां ॥ २८ ॥
जवं देह असैल । तवं ऐसी सेवा कीजैल ।
मग देहांतिं नवल । बुद्धि असे ॥ २९ ॥
इये शरीरिचीं माती । मेळवीन तिये क्षिती ।
जेथ श्रीचरण ठांति । श्रीगुरुचे ॥ ४३० ॥
माझा स्वामी कवतिकें । स्पर्शैल जियें उदकें ।
तेथ लया नीकें । नेईन आप ॥ ३१ ॥
श्रीगुरु वोवाळिजति । कां भवनीं जिये उजळिजति ।
तेयां दीपाचेया दीप्ती । ठेवीन तेज ॥ ३२ ॥
चवरिं हान वीजणा । तेथ लयो करीन प्राणा ।
मग आंगाचा वीजणा । करीन तेथ ॥ ३३ ॥
जिये जिये अवकाशीं । श्रीगुरु असति परिवारेंसिं ।
आकाश लयाकाशीं । नेईन तिये ॥ ३४ ॥
परि जींतु मेळा न संडीं । निमिषु वायां न धडीं ।
ऐसेन गणाविया कोडी । कल्पांचिया ॥ ३५ ॥
एतुळे वेन्हीं धिवंसा । जेयाचेया मानसा ।
आणि करूनि हीं तैसा । अपारु चि ॥ ३६ ॥
राति दियो नेणे । थोडें बहू न ह्मणे ।
ह्मणियांचेनि दासपणें । साजा होए ॥ ३७ ॥
तो व्यापारु एणें नावें । गगना होउनु थोरावे ।
एकला करी आघवें । एकी चि काळिं ॥ ३८ ॥
हृदयवृत्ती पुढां । आंग चि घे दवडा ।
काज करी होडा । मानसेंसीं ॥ ३९ ॥
एकाधेया वेळा । श्रीगुरुचेया खेळा ।
लोण करी सकळा । जीविताचें ॥ ४४० ॥

गुरुदास्यें कृशु । जो गुरुप्रेमें सपोसु ।
गुरुआज्ञे आवासु । आपण जो ॥ ४१ ॥
जो गुरुकुळें सकुळीनु । जो गुरुबंधुसौजन्यें सौजनु ।
जो गुरुदास्यें सव्यसनु । निरंतर ॥ ४२ ॥
गुरुसंप्रदायधर्म । ते जेया वर्णाश्रम ।
गुरुचर्चा नित्यकर्म । जेयासि गा ॥ ४३ ॥
गुरु क्षेत्र गुरु देवता । गुरु माये गुरु पिता ।
जो गुरु परौता । मार्गु नेणे ॥ ४४ ॥
श्रीगुरुचें द्वार । तें जेया सर्वस्व सार ।
गुरुसेवकां सहोदर । प्रेमें भजे ॥ ४५ ॥
जेयाचें वक्त्र । वाहे गुरुनामाचे मंत्र ।
गुरुवचना वांचूनि शास्त्र । हातिं न शिवे ॥ ४६ ॥
सीतळे गुरुचरणीं । भलेतें जें पाणीं ।
तेया तीर्थें यात्रे आणीं । त्रैलोकिचीं ॥ ४७ ॥
श्रीगुरुचें उसिटें । लाहे जैं अवचटें ।
तैं तेणें लाभें वीटे । समाधीसि ॥ ४८ ॥
कैवल्यसुखा साठिं । परमाणु वे किरीटी ।
उधळति पायां पाठिं । चालतां जे ॥ ४९ ॥
हें असो सांवों केती । नाहिं पार गुरुभक्ती ।
तऱ्हीं गा क्रांतमती । कारण हें ॥ ४५० ॥
जेयां इये भक्ती चाड । जेयां इये चि विखिचें कोड ।
जो सेवे वांचूनु गोड । न मनी काहिं ॥ ५१ ॥
तो तत्वज्ञानासि ठाउ । ज्ञाना तेणें चि आवो ।
हें असो तो देउ । ज्ञानभक्तु ॥ ५२ ॥
हें जाण पां साचोकारें । तेथ ज्ञान उघडेनि द्वारें ।
नांदतसे जगा पुरे । या रीती ॥ ५३ ॥

जिये गुरुसेवा विषीं । माझा जीउ अभिलाखी ।
ह्मणौनि सोये चूकी । बोली केली ॥ ५४ ॥
एऱ्हवीं असतां हातिं खुळा । भजनअवधानीं आंधळा ।
आणि चर्ये लागि पांगुळा । पासौनि मंदु ॥ ५५ ॥
गुरुवर्णानिं मूका । आळसी पोसिजे फुका ।
परि आथि नीका । सानुरागु ॥ ५६ ॥
तेणें चि कारणें । हें स्थूल पोखणें ।
पडिलें मज ह्मणे । ज्ञानदेऊ ॥ ५७ ॥
तरि तो बोलु उपसाहावा । वोळगे अवसरु देयावा ।
आतां ह्मणैन बरवा । ग्रंथार्थु चि ॥ ५८ ॥
तरि परियसां श्रीकृष्णु । जो भूतभारसहिष्णु ।
तो बोलतसे वितृष्णु । पार्थु आइके ॥ ५९ ॥
ह्मणे शुचित्व गा ऐसें । जेया पासिं दीसे ।
आंग मन जैसें । कापुराचें ॥ ६० ॥
कां रत्नाचें दळवाडें । तैसें सबाह्य चोखडें ।
आंतु बाहिरि एकें पाडें । सूर्यु जैसा ॥ ६१ ॥
बाहिरि कर्में क्षाळला । भीतरि ज्ञानें उजळला ।
इहिं दोहिं परिं आला । शुचित्वासि ॥ ६२ ॥
मातिया आणि जळें । बाह्य एणें मेळें ।
निर्मळा होइजे बळें । वेदांचेनि ॥ ६३ ॥
भलें तेथ बुद्धि बळीं । पैं रज आरिसा उजळी ।
सौंदणि फेडी थिगळीं । वस्त्राचिं गा ॥ ६४ ॥
किंबहुना इया परीं । बाह्य चोख अवधारीं ।
ज्ञानदीपु अंतरीं । ह्मणौनि शुद्धु ॥ ६५ ॥
यऱ्हवीं तऱ्हीं पांडुसुता । आंतु शुद्ध नव्हतां ।
बाह्य कर्म तत्वता । विटंबु गा ॥ ६६ ॥

मृत्यु जैसा श्रिंगारिला । गर्दभु तीर्थि न्हाणिला ।
कडू दूधिया माखिला । गुळें जैसा ॥ ६७ ॥
वोसिं तोरण बांधलें । उपवासियें अन्नें माखिलें ।
कुंकुसेंदुर केलें । कांतहीनें ॥ ६८ ॥
कलस ढिवांचे पोकळ । जळो वरिचील झळाळ ।
काइ करिसी चित्रफळ । आंतु सेण ॥ ६९ ॥
तैसें कर्म वरिचिली कडां । न सरे थोर मोला कूडा ।
नव्हे मदिरेचा घडा । पवित्र गंगा ॥ ४७० ॥
ह्मणौनि अंतरिं ज्ञान होआवें । मग बाह्य लाभैल स्वभावें
वारि ज्ञान कर्में संभवे । ऐसें कैं जोडे ॥ ७१ ॥
या लागि बाह्यविभागु । कर्में धूतला चांगु ।
ज्ञानें फेडिला वंगु । अंतरिचा ॥ ७२ ॥
तेथ अंतरबाह्य गेलें । निर्मळत्व एक जालें ।
किंबहुना निर्वाळलें । शुचित्व चि ॥ ७३ ॥
ह्मणौनि सद्भाव जीवगत । बाहिरि दीसताति फांकत ।
स्फटिकगृहिंचे डोलत । दीप जैसे ॥ ७४ ॥
विकल्पु जेणें जेणें उपजे । नाथिली विकृति निफजे ।
अन्यायवृत्तिचीं बीजें । अंकुर घेंति ॥ ७५ ॥
तें आयिके अथवा भेटे । परि मनीं काहिं नुमटे ।
मेघरंगें न घटे । व्योम जैसें ॥ ७६ ॥
यऱ्हवि इंद्रियांचेनि मेळें । विषयां वरि लोळे ।
परि विकाराचेनि विटाळें । सिंपिजे ना ॥ ७७ ॥
भेटलिया नारी । चोखी अथवा माहारी ।
तेथ नातळती परी । राहाटों जाणे ॥ ७८ ॥
कां पति-पुत्रातें आलंगी । एकें चित्तें तन्वंगी ।
तेथ पुत्रभावाचां आंगीं । न लगे चि कामु ॥ ७९ ॥

तैसें हृदय चोख । संकल्पविकल्पीं सनोळख ।
कृत्याकृत्य विशेष । फुडें जेया ॥ ४८० ॥
पाणियें हीं रान भींजे । आधणिं हरळु न सिजे ।
तैसी विकल्पजातीं न सिंपिजे । मनोवृत्ती ॥ ८१ ॥
तेया नावं शुचिपण । पार्था गा संपूर्ण ।
हें देखसी तेथ जाण । ज्ञान असे ॥ ८२ ॥
आणि स्थिरता साचे । घर रिगाली जेयाचें ।
तो पुरुषु ज्ञानाचें । आयुष्य गा ॥ ८३ ॥
देह तरि वरिचिली कडे । आपुलेया परि हींडे ।
परि बैसिक न मोडे । मानसाची ॥ ८४ ॥
वत्सा वरौनि धेनुचें । स्नेह राना न वचे ।
न येंति भोगुं सतियांचें । प्रेमभोग ॥ ८५ ॥
कां लोभिया दूरि जाये । परि जीउ ठेवां चि आहे ।
तैसा देह चालितां नोहे । चळु चित्ता ॥ ८६ ॥
धावंतेया अभ्रा सवें । आकाश जैसें न धवे ।
भ्रमण—चक्रीं न भंवे । जैसा ध्रुवु ॥ ८७ ॥
पथिकांचिया एरिझारा । सवें एणेंजाणें धनुर्द्धरा ।
नाहिं जेवि तरुवरां । पर्थीचियां ॥ ८८ ॥
तैसा चलनवलनात्मकिं । असौनि इये पंचभौतिकिं ।
भूतउर्मी एकी । चाळिजे ना ॥ ८९ ॥
वांहुंटाळिचेनि बळें । पृथ्वी जैसी न ढळे ।
तैसा उपद्रवधुमाळें । न लोटे जो ॥ ९० ॥
दैन्यदुःखें न तपे । भयशोकें न कंपे ।
देहमृत्यू न वासिपे । पातलेंयां ॥ ९१ ॥
आर्तिआशापडिभरें । विविधव्याधिगजरें ।
उजू असतां पाठिमोरें । नव्हे चित्त ॥ ९२ ॥

निंदा निस्तेज दंडीं । कामलोभ वरिपडी ।
लोम नव्हे वांकुडी । मानसाची ॥ ९३ ॥
आकाश हें ओसरो । पृथिवी वर वीरो ।
परि नेणे मोहरों । चित्तवृत्ती ॥ ९४ ॥
हाथि हाला फुलिं । पासिवणें जेवि न घली ।
तैसा नोहोटे दुर्वाक्यसेलीं । सेलिला सांता ॥ ९५ ॥
क्षीरार्णवाचां कल्लोलिं । नाहिं कंपु मंदराचलिं ।
आकाश न जले जालिं । वणवेयाचां ॥ ९६ ॥
तैसा आला गेला उर्मी । नाहिं गजबज मनोधर्मिं ।
किंबहुना धीरु क्षमिं । कल्पांति हिं ॥ ९७ ॥
पैं स्थैर्य ऐसी भाष । बोलिजे सविशेष ।
ते हे दशा देख । देखणेयां ॥ ९८ ॥
हें स्थैर्य निजगडें । जेथ आंगें जीवें जोडे ।
तो ज्ञानाचें उवडें । निधान जाण ॥ ९९ ॥
आणि इसालु जैसा घरा । कां दंदिया हातियरा ।
न विसंबे भांडारा । बद्धकु गा ॥ ५०० ॥
एकलौतेया बालका । वरिपडौनि असे अंबिका ।
कां मधुविषिं मधुमक्षिका । लोभिणि जैसी ॥ १ ॥
अर्जुना तिया परिं । अंतष्करणा जतन करिं ।
नेंदि उभें ठाकों द्वारीं । इंद्रियाचां ॥ २ ॥
ह्मणे कामु हा आइकैल । हे आशसेयाचि देखैल ।
तरि जीवा कडे ढूंकैल । ह्मणुनि भेदु ॥ ३ ॥
बाहिरि थिटे जैसी । दाटुगा पति कलासी ।
करी टेहणी तैसी । प्रवृत्तीसि ॥ ४ ॥
सतेचेनि वाणिपणें । देहा सकट आटणें ।
संयमा वरि करणें । बुजुनु घाली ॥ ५ ॥

मनाचां महाद्वारिं । प्रत्याहाराचे ठाणांतरिं ।
यमदम शरीरीं । जागवी उभे ॥ ६ ॥
आधारिं नाभिकाठिं । बंधत्रयाची घरटी ।
चंद्रसूर्यसंपुटीं । सुये चित्त ॥ ७ ॥
समाधिचिये सेजेपासिं । बांधौनि घाली ध्यानेंसिं ।
समरासिं करणासिं । अंतरातें ॥ ८ ॥
आगा अंतष्करणनिग्रहो जो । तो हा पैं जाणिजो ।
हा आथि तेथ उदोजो । ज्ञानाचा पैं ॥ ९ ॥
जेयाची आज्ञा आपण । सिरिं वाहे अंतष्करण ।
मनुष्याकारें जाण । ज्ञान चि तो ॥ ५१० ॥

**इंद्रियार्थेषु वैराग्यमनहंकार एव च ।**
**जन्ममृत्युजराव्याधिदुःखदोषानुदर्शनं ॥ ८ ॥**

आणि विषयविखिं । वैराग्याची नीकी ।
पुरवणी मानसिकिं । जेयातें आथि ॥ ११ ॥
वमिलेया अन्ना । लाल न घोंटी रसना ।
आंग न सुवे आंलिंगना । प्रेताचिया ॥ १२ ॥
विष खाणें नांगवे । जलतां घरिं न रिगवे ।
व्याघ्रविवरा न वचवे । वस्ती जेवि ॥ १३ ॥
धडाडिते लोहरासिं । उडी न घलवे जैसी ।
न करवे उसिसी । अजगराची ॥ १४ ॥
अर्जुना तेणें पाडें । विषया वार्त्ता नावडे ।
नेंदी इंद्रियांचेनि तोंडें । काहिं चि जाऊं ॥ १५ ॥
जेयाचां मनिं आलस्य । देहिं अतिकार्श्य ।
यमदमेंसिं समरस्य । जेयासि ॥ १६ ॥
तपोव्रतांचा मेलावा । जेयाचां ठांइं पांडवा ।
युगांतु जेया गावां । आंतु एतां ॥ १७ ॥

बहु योगाभ्यासें हावं । राना कडे धाव ।
न साहे जो नावं । सांघाताचें ॥ १८ ॥
नाराजाचिं आंथुरणें । पूयपंकिं लोळणें ।
तैसी लेखी भोगणें । इहिकिचें ॥ १९ ॥
स्वर्गातें मानसें । आइकौनि मानी ऐसें ।
कुहिलें पिशित जैसें । श्वानाचें ॥ ५२० ॥
ह तें विषयवैराग्य । जें आत्मलाभाचें भाग्य ।
येणें ब्रह्मानंदा योग्य । होति जीव ॥ २१ ॥
ऐसा उभयभोगुत्रासु । देखसी जेथ बहुवसु ।
तेथ जाण रहिवांसु । ज्ञानाचा असे ॥ २२ ॥
आणि सचाडाचिया परी । इष्टापूर्त करी ।
परि केलेपण शरीरीं । उरों नेदी ॥ २३ ॥
वर्णाश्रमपोषकें । कर्में नित्यनैमित्यकें ।
तेयां माझि काहिं न ठके । आचरतां ॥ २४ ॥
परि हें मियां केलें । कां हें माझेनि जालें ।
ऐसें नाहिं ठेविलें । वासने माझि ॥ २५ ॥
जैसें अवचितपणें । वायूसि विचरणें ।
निराभिमानीं उदैजणें । सूर्याचें ॥ २६ ॥
कां श्रुति सदा बोले । गंगा काजें विण चाले ।
तैसें अवष्टंभहीन भलें । वर्त्तन जेयाचें ॥ २७ ॥
रुतुकाळि तारि फळति । परि फळलों हें नेणति ।
तेया वृक्षांचिया ऐसी वृत्ती । कर्मि सदा ॥ २८ ॥
एवं मनिं कर्में बोलिलिं । जेथ अहंकारा उखी जाली ।
एकावळिएची काढिली । दोरी जैसी । २९ ॥
संबंधें विण आकाशीं । अभ्रें असति आपैसि ।
देहिं कर्में तैसीं । जेयासि गा ॥ ५३० ॥

मद्यपा आंगिचें वस्त्र । कां लेपा हातिचें शस्त्र ।
नातरि बैला वरि शास्त्र । बांधलें असे ॥ ३१ ॥
तेणें पाडें देहीं । आहें हे से चि नाहिं ।
निरहंकारता पाहिं । तेया नावं ॥ ३२ ॥
हें संपूर्ण जेथ दीसे । तेथ गा ज्ञान असे ।
इये विखिं अनारिसें । बोलों न ये ॥ ३३ ॥
आणि जन्म मृत्यु दुःखें । व्याधि वार्धक्य कलुषें ।
यें आंगा न यंतां देखे । दूरौनि जो ॥ ३४ ॥
साधकु विंवंसिया । कां उपसर्गे योगिया ।
पावे उणेया पुरेयां । वोथंबा जेवि ॥ ३५ ॥
वैर जन्मांतरिचें । सापा मनौनि न वचे ।
तेवि अतीतां जन्मांचें । उणें वाहे ॥ ३६ ॥
डोळां हरळु न थरे । घाइं शास्त्र न जिरे ।
तैसें कालिचें न विसरे । जन्मदुःख ॥ ३७ ॥
ह्मणे पूयगर्त्ते रिगालां । मूत्ररंध्रौनि निगालां ।
कटारे मियां चाटिला । कुचस्वेदु ॥ ३८ ॥
ऐसिया ऐसिया परीं । जन्माचा कांटाळा धरी ।
आतां तें करीं । जेणें नोहे ॥ ३९ ॥
हारि उमचावेया । जुंवारु ये डाया ।
कां वैरा बापिकेया । पुत्र जचे ॥ ५४० ॥
मारिलेयाचेनि रागें । पाठिचा सूड मागे ।
तेणें आक्षेपें लागे । जन्मा पाठिं ॥ ४१ ॥
परि जन्मांतिं जे लाज । न संडी तेयाचें निज ।
संभाविता निस्तेज । न साहे जैसें ॥ ४२ ॥
आणि मृत्यु पुढां आहे । तो चि कल्पांतिं कां पाहे ।
परि आजिचि होये । सावधु जो ॥ ४३ ॥

माझि अथाउं ह्मणतां । थडिये चि पांडुसुता ।
पव्हणारु आइता । काशि जेवि ॥ ४४ ॥
कां न पवतां रणाचा ठाउ । सांभालिजे जैसा आवो ।
वोडण सूयिजे जैसा घावो । न लगतां चि ॥ ४५ ॥
पाहेचा पेणा वाटवंधां । तवं आजि चि होइजे सावधां ।
जीउ न निगतां ओखदा । धांविजे जेवि ॥ ४६ ॥
यऱ्हवि ऐसें केवि घडे । जो जळतां घरिं सांपडे ।
तो न पवाडे । कुहां खणों ॥ ४७ ॥
चोंढिये पाथरु गेला । तैसेनि जो बुडाला ।
तो बोंबे सकट मूकला । कोण सांवे ॥ ४८ ॥
ह्मणुनु समर्थेसिं वैर । जेया पडे हाडकाइर ।
तो जैसा आठै पाहार । परजुनु चि असे ॥ ४९ ॥
नातरि केलवली नोवरी । संन्यासी कां जेया परिं ।
तैसी न मरतां करी । मृत्युसूचना ॥ ५५० ॥
पैं गा जो इया परिं । जन्में चि जन्म निवारी ।
मरणें चि मृत्यु मारी । आपण उरे ॥ ५१ ॥
तेयातें घरिं ज्ञानाचें । सांकडें नाहिं साचें ।
जेया जन्ममृत्युचें । ह्रदइं शल्य ॥ ५२ ॥
आणि तेया चि परीं जरा । न टेंकतां शरीरा ।
तारुण्याचिया भरा । माझि देखे ॥ ५३ ॥
ह्मणे आजिचां अवसरिं । पुष्टि जे हे शरीरिं ।
ते पाहे होईल काचरी । सिजली जैसी ॥ ५४ ॥
निदैवांचे व्यवसाये । तैसे ठाकति हातपाए ।
अमंत्रिया राज्याची परि होये । वलासिया ॥ ५५ ॥
फुलाचेया भोगा । लागि प्रेम दांगा ।
तें कऱ्हेयाचा गुडगा । तैसें होइल ॥ ५६ ॥

बोढालाचां खुरीं । आखर आते बुरी ।
तैसी दशा माथें श्रवण वरि । सत्र लेहें ॥ ५७ ॥
पद्मदलेंसिं इसालें । भांडताति हे डोळे ।
ते होतील पडवळें । पीकलीं तैसीं ॥ ५८ ॥
भवैंचि पडलें । बोमथती सिनसालें ।
उरु कुहिजैल जळें । आंसुवांचेनि ॥ ५९ ॥
जैसें बाबुळेंचें खोड । गिरबडूनि जाति सरड ।
तैसें पिचाडिं तोंड । सरांडैल ॥ ५६० ॥
रांधवण बोलि पुढें । पन्हिवे वाहाति खाताडें ।
तैसिं होति नाकाडें । ब्रिडिबिडितील ॥ ६१ ॥
तांबोलें वोंठ राउं । हांसतां दांत दाउं ।
सनागर मिरउं । बोली जेणें ॥ ६२ ॥
तेयाचिया तोंडा । येर जळंत्राचा लोंढा ।
हरडी उमळैल दाढा । दांतेंसिं जाण ॥ ६३ ॥
कुळवाडि जैसी खेटली । कां वाकडिया ढोरें बैठलि ।
तैसी नूठील काहिं केली । जीभ हें ॥ ६४ ॥
कुसळें कोरडिं । वारेनि जांति बरडी ।
तैसी आपल्य तोंडी । दाढियेसि ॥ ६५ ॥
आशाढिंचेनि जळें । जैसिं झिरपांति मोलें ।
तैसें खांडेहूनि लाळे । पेटति पुर ॥ ६६ ॥
वाचेसि अपवाडु । कानासि अनुघाडु ।
पिंडु गरुवा मांकडु । होईल हा ॥ ६७ ॥
तणाचें बुजवणें । आंदोळे वारे गुणें ।
तैसें येईल कांपणें । सर्वांगासि ॥ ६८ ॥
पायां पडति वेंगडीं । हात होंति मुरकुंडी ।
बरवेपण बागडीं । नाचवील हे ॥ ६९ ॥

मलमूत्रद्वारें । होउनि ठाति खोंकरें ।
नवसियें सूंति येरें । माझां निधनि ॥ ५७० ॥
देखौनि थूंकील जगु । मरणाचा पडैल पांगु ।
सोइरियां उभगु । होईल माझा ॥ ७१ ॥
स्त्रिया ह्मणति विंवसी । बालें जाति मुर्सि ।
किंबहुना चिळसी । पात्र होइन ॥ ७२ ॥
उभळिचा उजगरा । सेजियां साइलेयां घरा ।
सिणवी ह्मांतारा । बहुतांतें हा ॥ ७३ ॥
ऐसी वृद्धाप्याची खोंचणी । आपणेया तरुणपणिं ।
देखों देखों आणि । मग जो वीटे ॥ ७४ ॥
ह्मणे पाहे हें होइल । आतांचि भोगितां जाइल ।
मग काइ उरैल । हितालागि ॥ ७५ ॥
ह्मणुनि नाइकणें पावे । तवं आइकौनि घाली आघवें ।
पंगु नव्हतां जावें । नीकेया स्थाना ७६ ॥
दीठि जवं जाये । तवं पाहावें तेतुलें पाहे ।
मूकत्वा आधिं धाये । सुभाषितिं ॥ ७७ ॥
हात होतील खुळें । हें पुढैल मोटकें कळे ।
तवं करुनि घाली सकळें । दयादिकें ॥ ७८ ॥
मन होइल वेडें । ऐसिये दशे पुढें ।
चिंतौनि ठेवी चोखडें । अदृष्ट जो ॥ ७९ ॥
जैसें चोर पाहे झोंबती । तवं आजी चि रुसिजे संपत्ती ।
झांकाझांकि कीजे वाति । न वचतांचि ॥ ५८० ॥
तैसें वृद्धाप्यें थावें । मग जें वायां जावें ।
तें आपणेयां आघवें । सोवतें करी ॥ ८१ ॥
आतां मोडुनु वसविळिं दुर्गें । कां वळित धरिलें खगें ।
तेथ उफकेन जो रिगे । तो नांगवळा ॥ ८२ ॥

तैसें वृद्धाप्य होये । आलेपणें वायां जाये ।
जें तो शतवृद्ध आहे । नेणों कैंचा ॥ ८३ ॥
झाडिलिं कोलें झाडी । तेया न फले चि जेवि बोंडिं ।
जाला आगि तरि राखौंडी । जालील काइ ॥ ८४ ॥
ह्मणुनि वृद्धाप्याचेनि आठवें । वृद्धाप्यें जो न नगवे ।
तेयाचां ठांइं जाणावें । ज्ञान आहे ॥ ८५ ॥
तैसेचि नाना रोग । पडिघांति पुढां आंग ।
तवं आरोग्यतेचे उपेग । करुनि घाली ॥ ८६ ॥
सांपाचां तोंडिं । जे पडिलें सकूडी ।
ते लाउनियां सांडी । बुद्धिवंत ॥ ८७ ॥
तैसा वियोगु जेणें दुःखें । विपत्ति शोकु पोखे ।
तें स्नेह सांडौनि सुखें । उदासु जो होए ॥ ८८ ॥
आणि जेणें जेणें कडें । दोष सूतील तोंडें ।
तिये कर्मरंध्रीं गुंडे । नियमाचे दाटी ॥ ८९ ॥
ऐसीऐसीया आइती । जेयाची परि असती ।
तो ज्ञानसंपत्ती । गोसांवि गा ॥ ५९० ॥

**असक्तिरनभिष्वंगःपुत्रदारगृहादिषु ।**
**नित्यं च समचित्तत्वमिष्टानिष्टोपपत्तिषु ॥ ९ ॥**

आतां आणिक ही एक । लक्षण अलौलिक ।
सांघैन आइक । धनंजया ॥ ९१ ॥
तरि गृहपरिग्रहावरि । उदासु इया परिं ।
उखिता जैसा बिढारीं । बैसविला असे ॥ ९२ ॥
कां झाडांची साउली । वाटे जांतां मिनली ।
घरावरि तेतुली । आस्था जेया ॥ ९३ ॥
साउली सरिसी चि असे । परि असो हें नेणिजे जैसें ।
स्त्रियेचें तैसें । लागतें जेया ॥ ९४ ॥

आणि प्रजा जे जाली । ते वसती चि कीर आली ।
कां गोरुवें बैसलीं । रुंखातळिं ॥ ९५ ॥
जो संपती माजि असतां । ऐसा गमे पांडुसुता ।
जैसा कां वाटे जाता । साक्षी ठेविला ॥ ९६ ॥
किंबहुना पूंसा । पांजरेया माझि जैसा ।
वेदाज्ञेसि तैसा । भीउनु असे ॥ ९७ ॥
यऱ्हवि दारां गृहपुत्रीं । नाहिं जेयाची मैत्री ।
तो जाण धात्री । ज्ञानाची गा ॥ ९८ ॥
आणि माहासिंधु जैसा । ग्रीष्मवर्षी सरिसा ।
इष्टांनिष्टां तैसां । जेयाचां ठांइं ॥ ९९ ॥
कां तीन्ही काळ होंतां । त्रिधा न्हवे चि सविता ।
तैसा सुखदुःखिं चित्ता । भेदु नाहिं ॥ ६०० ॥
जेथ नभाचेनि पाडें । समत्वा उणें न पडे ।
तेथ गा ज्ञान जोडें । जातखेऊं ॥ १ ॥

**मयि चानन्ययोगेन भक्तिरव्यभिचारिणी ।**
**विविक्तदेशसेवित्वमरतिर्जनसंसदि ॥ १० ॥**

आणि मी वांचुनु काहिं । गोमटें जेया नाहिं ।
ऐसा समो तिहिं । निश्चयाचा केला ॥ २ ॥
शरीर वाचा मानस । पियालीं कृतनिश्चयाचे कोश ।
एक मी वांचूनि वास । न पाहवेया ॥ ३ ॥
किंबहुना निज । जेयाचें जालें मज ।
जेणें आपणेयां आह्मां सेज । येकि केलि ॥ ४ ॥
रिगतां वल्लभापुढें । नाहिं जीविं सांकडें ।
तिये कांतेचेनि पाडें । एकसरे जो ॥ ५ ॥
मिळौनि मिळत चि असे । समुद्रिं गंगापय जैसें ।
मी होउनि मातें तैसें । सर्वस्व दे ॥ ६ ॥

सूर्याचां होणां होइजे । सूर्यसवें जाइजे ।
हें दिकळोण साजे । प्रभे जेवि ॥ ७ ॥
पैं प.णियांचिये भूमिके । पाणी चि तळपे कवतिकें ।
ते ल्हरी ह्मणति लेकिकें । यऱ्हवीं पाणी चि तें ॥ ८ ॥
जो अनन्यु तियापरी । मी जालां हिं मातें वरी ।
तो ते मूर्ति धरीं । ज्ञानाची येथ ॥ ९ ॥
अ.णि तीर्थे तटें । तपोवनें चोखटें ।
आवडति कपाटें । वसों जिया ॥ ६१० ॥
शैलकक्षाचीं कंदरें । जळाशय परिकरें ।
अधिष्ठी जो आदरें । नगरा न ए ॥ ११ ॥
बहू ऐकांतावरि प्रीति । जेया जनपदाची खंती ।
जाण मानुषी मूर्त्ति । ज्ञान चि तो ॥ १२ ॥
आणिक ही पुडुतीं । चिन्ह गा सुमती ।
ज्ञानाचिये निरुती । लागी सांगों ॥ १३ ॥

अध्यात्मज्ञाननित्यत्वं तत्वज्ञानार्थदर्शनं ।
एतज्ज्ञानमिति प्रोक्तमज्ञानं यदतोन्यथा ॥ ११ ॥

तरि परमात्मा ऐसें । जें एकि वस्तु असे ।
तें जेया असे । ज्ञानातव ॥ १४ ॥
तें एक वांचूनि आनें । जियें भवस्वर्गादि ज्ञानें ।
तें अज्ञान ऐसें मनें । निश्चयो करी ॥ १५ ॥
स्वर्गु जीणावा हें सांडी । भवविर्षि काम अडी ।
दे अध्यात्मज्ञानिं बुडी । सद्भावेंसिं ॥ १६ ॥
भंगलिये वाटे । शोधूनियां अऱ्हांटे ।
निगिजे जेवि नीटें । राजपंथें ॥ १७ ॥
तैसें अज्ञानजात करी । पण आववेंचि एकीकडे सारी ।
मग मन बुद्धि मोहरी । अध्यात्मज्ञानिं ॥ १८ ॥

ह्मणे हें चि एक आथि । एर जाणणें ते भ्रांति ।
ऐसा निष्कर्षी मति । मेरु होये ॥ १९ ॥
येवं निश्चयो जेयाचा । द्वारिं अध्यात्मज्ञानाचां ।
ध्रुवो देवो गगनिचा । तैसा राहला ॥ ६२० ॥
तेयाचां ठांइं ज्ञान । या बोला ह्मणसी व्यवधान ।
जें ज्ञानिं बैसलें मन । तेन्हां चि तो तें ॥ २१ ॥
तरि बैसलेपणें जें होये । तें बैसतां चि वेळिं नोहे ।
तन्हीं ज्ञाना तेया आहे । सरिसा पाडु ॥ २२ ॥
आणि तत्वज्ञान निर्मळ । विये जें एक फळ ।
ते ज्ञेय हिं वरि सरळ । दीठि जेयाची ॥ २३ ॥
यन्हविं बोधा आलेनि ज्ञानें । जरि ज्ञेय न दिसे चि मनें ।
तरि ज्ञानलाभु ही न मने । जाला सांता ॥ २४ ॥
आंधळेनि हातिं दिवा । घेउनि काये करावा ।
तैसा ज्ञाननिश्चयो आघवा । वायां जाए ॥ २५ ॥
परि ज्ञानाचेनि प्रकाशें । परतत्विं दीठि जैं बैसे ।
ते स्फूर्त्ति असे । अंध होउनि ॥ २६ ॥
ह्मणुनि ज्ञान जेतुलें दावी । तेतुली वस्तु आघवी ।
देखे ऐसी होआवी । बुद्धि चोख ॥ २७ ॥
या लागि ज्ञानें निर्दोषें । दाविलें ज्ञेय देखे ।
तैसेनि उन्मेखें । आथिला जो ॥ २८ ॥
जेवढी ज्ञानाची उधि । तेव्हडी चि तेयाची बुद्धि ।
तो ज्ञान हे शाद्धि । करणें न लगे ॥ २९ ॥
पैं ज्ञानाचिये प्रभे सवें । जेयाची मति पावे ।
हातधरणियां सीवे । परतत्वातें ॥ ६३० ॥
तो चि ज्ञान हे बोलतां । विस्मो कोणु पांडु सुता ।
कां सवितेयातें सविता । ह्मणावें असें ॥ ३१ ॥

तवं श्रोतां ह्मणितलें असो । न संघैं देवाचा अतिसो ।
ग्रंथउत्कंठे आडसो । घालिसी कां ॥ ३२ ॥
तूझा हा चि आह्मां थोरु । वगतृत्वाचा उपकारु ।
जे ज्ञानविषो फारु । उपदेशिला ॥ ३३ ॥
रसु न व्हावा अतिमात्रु । हा घेतासि केवि मंत्रु ।
तरि अवंतुनु शत्रु । करितासि गा ॥ ३४ ॥
ठांइं बैसतिये वेळे । जे रससोये घेउनि पळे ।
तियेचा येरु वोडौ मिळे । कोणा अर्था ॥ ३५ ॥
आघवा चि विर्षि भादि । परि सांजवणी टेंकों नेंदी ।
ते खुरथोडी नसुधी । पोसी कवण ॥ ३६ ॥
तैसी ज्ञानिं मति न फांके । येरें जल्पति नेणों केतुकें ।
परि तें असो नीके । केलें तुवां ॥ ३७ ॥
जेया ज्ञानलेसादोसें । कीजति योगातिसायासें ।
तें धणिचें आणि तूझेया ऐसें । केलें निरोपण ॥ ३८ ॥
अमृताची सातवाकडी । लागो कां अनुघाडी ।
सुखाचे दीस कोडी । गणिजतु कां ॥ ३९ ॥
पूर्णचंद्रेंसि राति । युग एक असौनि पांति ।
तरि काय पाहातातिं । चकोर ते ॥ ४० ॥
तैसें ज्ञानाचें बाळणें । आणि येणें रसाळपणें ।
आतां पुरे कोण ह्मणे । आकर्णितां ॥ ४१ ॥
आणि सभाग्यु पाहुणा ये । सुभगाची वाढती होये ।
तैं सरों न ये रससोए । ऐसें आथि ॥ ४२ ॥
तैसा घडला प्रसंगु । ज्ञानिं आह्मां लागु ।
आणि तुज ही अनुरागु । आथि येथ ॥ ४३ ॥
ह्मणौनि यया वाखाणा । पाठि सेइली चौगुणा ।
ना ह्मणों न येसि देखणा । होंसि ज्ञानी ॥ ४४ ॥

तरि आतां या वरि । प्रश्नेचा माजु धरिं ।
पद साहसिं करी । निरोपण ॥ ४५ ॥
या संतवाक्या सरिसें । जी ह्मणितलें निवृत्तिदासें ।
माझें हीं जी ऐसें । मनोगत ॥ ४६ ॥
या वरि आतां तुह्मीं । आज्ञापिलां स्वामी ।
तरि वायां चि वाग्मी । वाढों नेंदी ॥ ४७ ॥
एवं यें अवधारा । ज्ञानलक्षणें अठरा ।
श्रीकृष्णें धनुर्द्धरा । निरोपिलिं ॥ ४८ ॥
मग ह्मणे या नावें । ज्ञान येथ जाणावें ।
हें स्वमतें आघवे । ज्ञानिये ह्मणति ॥ ४९ ॥
करतला वरि वाटुला । डोलत देखिजे जेवि आवला ।
तैसें ज्ञानें डोलां । आह्मिं दाविलें तुज ॥ ६५० ॥
आतां जें महामती । अज्ञान ऐसी वदंती ।
ते ही सांघों व्यक्ती । लक्षणीं गा ॥ ५१ ॥
यऱ्हावि ज्ञान फुडें जालेयां । अज्ञान जाणवें धनंजया ।
जें ज्ञान नव्हे तें आपैसेया । अज्ञान चि ॥ ५२ ॥
पाहे पां देऊ आघवा चि भरे । मग रात्री चि वोवि उरे ।
वांचूनु काहिं तिसरें । नाहिं जेवि ॥ ५३ ॥
तैसें ज्ञान जेथ नाहिं । तें चि अज्ञान पाहिं ।
तरि सांघों काहिं काहिं । चिन्हें तियें ॥ ५४ ॥
तरि संभावने जिये । जो मानाची वाट पाहे ।
सत्कारें होये । तोषु जेया ॥ ५५ ॥
गर्वें पर्वताचि सिखरें । तैसा महत्वा वरौनि नुतरे ।
तेयाचां ठांइं पुरें । अज्ञान असे ॥ ५६ ॥
आणि स्वधर्माची मागवेलि । बांधे वाचेचा पिंपलिं ।
उभिला जैसा देउलिं । जाणौनि कुंचां ॥ ५७ ॥

घाली विद्येचा पसारा । सुये सुकृताचा डांगोरा ।
करी तेतुलें मोहरा । स्फीतीचेया ॥ ५८ ॥
आंग वरि चर्ची । जनातें वंची ।
तो जाण अज्ञानाची । खाणी येथ ॥ ५९ ॥
आणि वन्हि वनिं विचरे । तेथ जळति जैसिं स्थावरें ।
तैसें जेयाचेनि आचारें । जगा दुःख ॥ ६६० ॥
कवतिकें जें जल्पे । तें साबळाहुनु रूपे ।
विषाहुनु संकल्पें । मारकु जो ॥ ६१ ॥
तेयातें बहू अज्ञान । अज्ञानाचें चि निधान ।
हिंसेसि आयतन । जेयाचें जीणें ॥ ६२ ॥
आणि फूंके भाति फुगे । रेचिली सवें चि उफगे ।
तैसा संयोगवियोगें । चढे वोहटे ॥ ६३ ॥
पडिली वारेयाचा वळसां । धूळि चढे आकाशा ।
हरिषा वळघे तैसा । स्तुतिवेळे ॥ ६४ ॥
निंदा मोटकी आइके । आणि कपाळ धरूनि ठाके ।
थेंबें विरे वारेनि शोके । चिखलु जैसा ॥ ६५ ॥
तैसा मानापमानिं होये । जो कोण्ही उर्मी न साहे ।
तेयाचां ठांइं आहे । अज्ञान पुरें ॥ ६६ ॥
आणि जेयाचां मनिं गांठि । वरि मोकळी वाचा दीठि ।
आंगें मीतलें जीवें पाठि । भलेतेया दे ॥ ६७ ॥
व्याधाचें चारा घाळणें । तैसें प्रांजळ जोगावणें ।
चांगाचें अंतष्करणें । वीरू करी ॥ ६८ ॥
गार सेवाळें गुंडाळली । कां निंब्रोळी जैसी पीकली ।
तैसी जेयाची भली । बाह्य क्रिया ॥ ६९ ॥
अज्ञान तेयाचां ठांइं । ठेविलें असे पाहिं ।
या बोला आन नाहिं । सत्य माझें ॥ ६७० ॥

आणि गुरुकुळें जो लाजे । गुरुभक्ती उभजे ।
विद्या घेउनु माजे । गुरुसी चि ॥ ७१ ॥
तेयाचें नावं घेणें । तें वाचेसि शूद्रान्न होणें ।
परि घडलें लक्षणें । बोलतां इयें ॥ ७२ ॥
आतां गुरुभक्ताचें नावं घेऊं । तें चि वाचेसि प्रायश्चित्त देऊं ।
गुरुसेवकु पाहों । सूर्यु हा ॥ ७३ ॥
एतुलेनि लागु पापाचा । निस्तरैल हे वाचा ।
जो गुरुलोपकाचा । पापिं वडला ॥ ७४ ॥
हा ठाऊ वरि । तेया नावांचें भय हरी ।
मग ह्मणे अवधारीं । आणिकें चिन्हें ॥ ७५ ॥
आंगें कर्मी ढीला । जो मनें विकल्पें भरला ।
अडविचा अवगलला । कुहा जैसा ॥ ७६ ॥
तेया तोंडिं कांटियडें । आंतु नसुदिं हाडें ।
अशुचि तेणें पाडें । सबाह्य जो ॥ ७७ ॥
जैसें पोट पोसी सुणें । उघडें झांकलें न ह्मणे ।
तैसें आपुलें परावें नेणे । द्रव्या लागि ॥ ७८ ॥
या ग्रामकोलाचां ठाइं । जैसा मिळणी ठाऊ नाहिं ।
तैसा स्त्रीविषइं कांहिं । विचारीना ॥ ७९ ॥
कर्माचा वेळु चूके । कां नित्यनैमित्यक ठाके ।
तें जेया न दूखे । जीवा माझि ॥ ६८० ॥
पापिं जो निसुगु । पुण्यि अति निलागु ।
जेयाचा मनिं वेगु । विकल्पाचा ॥ ८१ ॥
तो जाण निखला । अज्ञानाचा पूतला ।
जो बांधौनि असे डोलां । विन्यासातें ॥ ८२ ॥
आणि स्वार्थें अलुमालें । जो धीरापासौनि चले ।
जैसें तृणबीज बळें । मुंगियेचेनि ॥ ८३ ॥

पावो सूदलेया सर्वे । थिल्लर जैसें कालवे ।
तैसें भयाचेनि नावें । गजबजे जो ८४ ॥
वायुचेनि अनुवायें । धूं दिगंत वेन्हीं जाये ।
दुःखवार्त्ता होये । तैसें जेया ॥ ८५ ॥
मनोरथांचा धारसां । वाहवणें जेयाचेया मानसा ।
पुरीं पडला जैसा । दूधिया कां ॥ ८६ ॥
वाउधणाचिया परी । जो आश्रयो केहीं न धरी ।
क्षेत्रिं तीर्थी पुरीं । थारों नेणे ॥ ८७ ॥
मातलेया सरडा । पुड्डतिं बूढ पुडुतीं सेंडा ।
हिंडणवारा कोरडा । तैसा जेया ॥ ८८ ॥
जैसा रोविलेयां उणें । रांजणु बैसों नेणे ।
तैसा पडे तरि राहाणें । यऱ्हविं हींडे ॥ ८९ ॥
तेयाचां ठांइं उद्दंड । अज्ञान असे उघड ।
जो चांचल्यें भावंड । मर्कटाचें ॥ ६९० ॥
आणि पैं धनुर्द्धरा । जेयाचेया अंतरा ।
नाहिं वोढा वारा । संयमाचा ॥ ९१ ॥
लेंडिये आला लोंढा । न मनी वाळुवेचा वरंडा ।
तैसा निषेधाचेया तोंडा । भिये ना जो ॥ ९२ ॥
व्रतातें आडमोडी । धर्माचे पाये उपडी ।
नियमाची आश तोडी । जेयाची क्रिया ॥ ९३ ॥
नाहिं पापाचा कांटाळा । नेंदी पुण्यासि जीवाळा ।
लाजेचा पेंडवला । खणौनि घाली ॥ ९४ ॥
कुळेंसिं पाठिमोरा । वेदाज्ञेसि दुऱ्हा ।
कृत्याकृत्यव्यापारा । निवाडु नेणे ॥ ९५ ॥
वसो जैसा मोकटु । वारा जैसा अफांटु ।
फुटला जैसा पाटु । निरंजनीं ॥ ९६ ॥

आंधळें हातिरुं मातलें । कां डोंगरीं जैसें पेटलें ।
तैसें विषइं लागलें । चित्त जेयाचें ॥ ९७ ॥
पैं उघडा काय न पडे । मोकाटु कोणा नांतुडे ।
गावंदारिचें आडें । नोलांडी कवण ॥ ९८ ॥
जैसें सत्रीं अन्न जालें । कां सामान्या बीक आलें ।
षाणसिये उभलें । कोण न रिगे ॥ ९९ ॥
तैसें जेयाचें अंतःकरण । तेयाचां ठांइं संपूर्ण ।
अज्ञानाची जाण । रिद्धि असे ॥ ७०० ॥
आणि विषयांची गोडी । जो जींत मेला न संडी ।
स्वर्गिं हिं खावेया जोडि । येथौनि चि ॥ १ ॥
जो अखंड भोगा जचे । जेया व्यसन कामक्रियेचें ।
मुख देखौनि बिरक्ताचें । सचैल करी ॥ २ ॥
विषो शीणौनि जाए । पारि न सिणे सावधु नोहे ।
जेणें कुहिला हातें चि खाये । कोढी जैसा ॥ ३ ॥
खरी टेंकों नेंदी उडे । लातौनि फोडी नाकाडें ।
तऱ्हीं जैसा न कढे । माघौता खरु ॥ ४ ॥
तैसा जो विषयां लागि । घाली जलतिये आगी ।
व्यसनाचिं आंगिं । लेणिं मिरवी ॥ ५ ॥
फूटौनि पडे तवं । मृगु वाढवी हांवं ।
पारि न ह्मणे माव । रोहिणीची ॥ ६ ॥
तैसा जन्मौनि मृत्यु वेऱ्हीं । विषइं त्रासितां बहु इं परीं ।
पारि त्रासु नेवे घरी । अधिक प्रेम ॥ ७ ॥
पाहिलिये बाळदशे । आई बा हें चि पिसें ।
तें सरे मग स्त्रीमांसें । भुलौनि ठाके ॥ ८ ॥
मग स्त्री भोगितां थावों । वृद्धाप्यें लागे नेऊं ।
मग तो चि प्रेमभाऊ । बाळकां आणी ॥ ९ ॥

आंधळें वियालें जैसें । तैसिं बाळकें परिवंसे ।
पारि जिये तवं न त्रासे । विषयांसि जो ॥ ७१० ॥
जाण तेयाचां ठांइं । अज्ञानासि पारु नाहिं ।
आतां आणिकें हिं । चिन्हें सांघों ॥ ११ ॥
तरि देह हें आत्मा । ऐसेया जो मनोधर्मा ।
वळघौनियां कर्मा । रंभ करी ॥ १२ ॥
आणि उणें कां पुरें । जें जें कांहिं आचरे ।
तेयाचेनि आविष्कारें । कुंथों लागे ॥ १३ ॥
डोइये ठेविलेनि भोजें । देवळविंसें फुंजे ।
तैसा विद्यावयमाजें । उताणा चाले ॥ १४ ॥
ह्मणे मीं चि येकु आथि । माझां चि घारिं संपत्ति ।
माझी आचरती रीती । कोण्हासि नाहि ॥ १५ ॥
नाहिं माझेनि पाडें वाडु । मी चि सर्वज्ञ एकु रूढु ।
ऐसा शिवमुष्टिगंडु । घेउनु ठाके ॥ १६ ॥
व्याधिलेया माणसा । न ये भंगु दाखउं जैसा ।
नीके न साहे तैसा । पुढिलाचें ॥ १७ ॥
पैं गुण तेतुला खाए । स्नेहें कि जळतु जाए ।
जेथ ठेविजे तेथ हाए । मसी ऐसा ॥ १८ ॥
जीवनें तिडिपिडि । वांजिला प्राणु फेडी ।
लागला तरि काडी । उरों नेदी ॥ १९ ॥
अल्पमाल्प प्रकाशु करी । तेतुलेनि उबारा धरी ।
तेया दीपाचेया परी । सुविद्यु जो ॥ ७२० ॥
वोखदाचेनि नावें अमृतें । जैसा नवज्वरु आधुथे ।
कां विख चि होउनि परते । सापा दूध ॥ २१ ॥
तैसा सद्गुणीं मत्सरु । विपत्तिअहंकारु ।
तपें ज्ञानें अपारु । ताठा चढे ॥ २२ ॥

अंत्यु राणिवे बैसला । कां आरें धारणु गीलिला ।
तैसा गर्वे फूगला । देखसी जो ॥ २३ ॥
जो लाठी ऐसा न लवे । पाथरु तैसा न द्रवे ।
गुणियांसि नांगवे । फोडसें जेवि ॥ २४ ॥
किंबहुना तेया पासिं । अज्ञान आहे वाढिसिं ।
हें निकरें गा तुजसिं । बोलत असों ॥ २५ ॥
आणि पैं धनंजया । जो देहगेहसामग्रिया ।
नेदखे चि कालिचेया । जन्मातें गा ॥ २६ ॥
कृतघ्ना उपेगु केला । चोरा वेव्हारु दीधला ।
निसुगु अस्ताविला । विसरे जेवि ॥ २७ ॥
वोढालिवां लाइलें । तैसें कान पूंस वोलें ।
पुढुतिं वोढाळ्ं आलें । सुणें जेवि ॥ २८ ॥
बेडुकु सापाचां तोंडिं । जातसे सबडबुडी ।
तो मशकाचिया जोडी । स्मरे चि ना ॥ २९ ॥
तैसीं नवै द्वारें श्रवति । देहाची द्युति जीति ।
जेणें जाली तें चित्तीं । सले ना जेया ॥ ७३० ॥
मातृकोदरकुहरिं । सूनि विष्टिचां दारिं ।
जठरीं नव मास वेन्ही । उकडला जैं ॥ ३१ ॥
ते गर्भिची व्यथा । कां जे जाली उपजतां ।
तें काहिं चि सर्वथा । नाठवी जो ॥ ३२ ॥
मलमूत्रपंकिं । लोलतें बालकें अंकिं ।
देखौनि जो न थूंकी । त्रासु नेघे ॥ ३३ ॥
कले चि ना जन्म गेलें । पाहे चि ना पुढुतिं आलें ।
ऐससें वाटलें । नाहिं जेया ॥ ३४ ॥
आणि पैं तिया चि परी । जीविताची फरारी ।
देखौनि जो न करी । मृत्युचिंता ॥ ३५ ॥

जीणेयाचेनि विश्वासें । मृत्यु येकु असे ।
हें जेयाचेनि मानसें । मानिजे ना ॥ ३६ ॥
अल्पोदकिचा मासा । नाटे ऐसिया आशा ।
न वचे चि कां जैसा । अगाधा डोहा ॥ ३७ ॥
कां गोरिचिया भूली । मृग व्याधा दीठि न घली ।
गलु न पाहतां गीली । उंडी मीनु ॥ ३८ ॥
दीपाचेया झगमगा । जालीळ हें पतंगा ।
नेणवे चि पैं गा । जिया परी ॥ ३९ ॥
कां गांवारु निद्रासुखें । घर जळत नेदखे ।
नेणतां जेवि विषें । रांधिलें अन्न ॥ ७४० ॥
तैसा जीविताचेनि मीसें । हा मृत्यु चि ना आला असे ।
हें नेदखे चि राजसें । सुखें जाणा ॥ ४१ ॥
शरीरिची वाढि । अहोरात्रिची जोडि ।
विषयसुखें प्रौढि । साच चि मानी ॥ ४२ ॥
परि बापुडा ऐसा नेणे । जें वेश्येसि सर्वस्व देणें ।
तें चि नांगवणें । रूप एथ ॥ ४३ ॥
सर्वचोराचें साजणें । तें चि तें प्राणु घेणें ।
लेपासि स्नपन करणें । तो चि नाशु ॥ ४४ ॥
पांडु आंग सूटलें । तेया चि नावं खुंटलें ।
तैसें नेणे जें भूललें । आहारनिद्रा ॥ ४५ ॥
सन्मुखा सूळा । धावंतेया पायला ।
प्रतिपदिं जवळा । मृत्यु जेवि ॥ ४६ ॥
तेवि देहा जवं जवं वाढु । जवं दीसांचा पवाडु ।
जवं जवं सुखाडु । भोगाचा हा ॥ ४७ ॥
तवं तवं अधिकें । मरण आयुष्यातें जींके ।
मीठ जैसें उदकें । ग्रासिजतसें ॥ ४८ ॥

तैसें जीवित जाये । तेया अस्तवे काला पाहे ।
हें हातोहातीं नोहे । ठाउवें जेया ॥ ४९ ॥
किंबहुना पांडवा । हा आंगिचा मृत्यु नीच नवा ।
नेदखे चि जो मावा । जीवितासाया ॥ ७५० ॥
तो अज्ञानदेशिचा राऊ । या बोला महाबाहो ।
न पडे गा वंठाऊ । आणिका हा ॥ ५१ ॥
पैं जीविताचेनि सुखें । जैसा कां मृत्युतें नेदखे ।
तैसा चि तारुण्याचेनि तोषें । जरेतें न गणी ॥ ५२ ॥
कडाडि लोटिला गाडा । शिखरौनि सूटला ढोंडा ।
तैसें नेदखे पुढां । वृद्धाप्य आहे ॥ ५३ ॥
कां आडवोहला पाणी आलें । ह्मैसेयाचें जूझ मातलें ।
तैसें तारुण्याचें चढलें । भुररें जेया ॥ ५४ ॥
पुष्टि लागे विघरों । कांति पाहे निसरों ।
माथा आदरी सिरों । बागीवल ॥ ५५ ॥
दाढी साउल धरी । मान हालउनि वारी ।
तऱ्हीं जो करी । प्रायेचा आवेशु ॥ ५६ ॥
दुढील उरीं आदले । नेदखे जैसें आंधलें ।
कां डोलेया वरिलें निगलें । आलसी तोखे ॥ ५७ ॥
तैसें तरुणेपण आजिचें । भोगितां वृद्धाप्य पाहिचें ।
नेदखे चि तो साचें । अज्ञानु गा ॥ ५८ ॥
देख अक्षमें कुबुजें । किं विपलावों लागे फुंजे ।
परि नेणे पाहे माझे । हे चि भावे ॥ ५९ ॥
आंगि वृद्धाप्याची । संज्ञा एउनि मरावें चि ।
परि जेया तारुण्याची । भूलि न फिटे ॥ ७६० ॥
तो अज्ञानाचें घर । हें साच चि घे उत्तर ।
तेवि चि परियसैं थोर । चिन्ह आणिक ॥ ६१ ॥

तरि वाघाचिये अडवे । येकोल चरौनि आला दैवें ।
तेणें विश्वासें पुडुतिं धांवे । वसो जैसा ॥ ६२ ॥
कां सर्प घरा आंतु । अवचटें देवो गेला स्वस्थु ।
येतुलिया साठिं निश्चंतु । नास्तिकु होए ॥ ६३ ॥
तैसेनि टंवच दियें । येक दोनि चि वेळ लाहे ।
येथ लागु एकु आहे । हें मानी ना जो ॥ ६४ ॥
वैरियां नीद आली । आणि दंदें माझि सरलिं ।
हें मानी तो सपीली । मूकला जेवि ॥ ६५ ॥
तैसी आहारानिद्रेचीं उजिरी । रोग निवांत जवं वेन्हीं ।
तवं जो न करी । व्याधिचिंता ॥ ६६ ॥
आणि स्त्रीपुत्रादिमेळें । संपति जवं फळे ।
तेणें रजें डोळे । जाति जेयाचे ॥ ६७ ॥
सवळे चि वियोगु पडैल । विलौनि विपत्ति होइल ।
हें दुःख पुढैल । नेदखे जो ॥ ६८ ॥
तो अज्ञानु गा पांडवा । तो ही तो चि जाणावा ।
जो इंद्रियें अव्हासव्हा । चारी एथ ॥ ६९ ॥
वयसेचेनि उवायें । संपत्तिचेनि सावायें ।
सेव्यासव्य जाये । सरकटीतु ॥ ७७० ॥
न करावें तें करीं । असंभाव्य मनीं धरी ।
चिंतूं नये तें विवरी । जेयाची मति ॥ ७१ ॥
रिगे तेथ न रिगावें । मागे जें नेघावें ।
स्पर्शें जेथ न लगावें । आंग मन ॥ ७२ ॥
न वचावें तेथ जाये । न पाहावें तें पाहे ।
न खावें तें खाये । तेविं चि तोखे ॥ ७३ ॥
न धरावा तो संगु । न लगावा तेथ लागु ।
न चरावा जो मार्गु । आचरे जो ॥ ७४ ॥

नाइकावें तें आइके । न बोलावें तें भाखे ।
परि दोषु होईल हें नेदखे । प्रवर्त्ततां ॥ ७५ ॥
आंगा मना रुची येयावें । येतुलें कृत्याकृत्य नाठवे ।
जो करणेयांचेनि नावें । भलेतें करी ॥ ७६ ॥
परि पाप मज होईल । कां नरकयातना येइल ।
हें काहिं चि पुढैल । देखे ना जो ॥ ७७ ॥
तेयाचेनि आंगलगें । अज्ञान जगिं दाटुगें ।
जें सज्ञानासि हि संगें । झोंबों शके ॥ ७८ ॥
परि असो हें आइक । अज्ञानचिन्ह आणिक ।
कां तुज सम्यक । जाणवें जें ॥ ७९ ॥
तरि जेयाची प्रीति पुरी । गुंतली देखसी घरिं ।
नवगंधकेसरी । भ्रमरी जैसी ॥ ७८० ॥
साकरेचिये रासी । बैसली नुडे मासी ।
तैसें निषण्ण आवासिं । जेयाचें मन ॥ ८१ ॥
वेलाभेड बेडकु अडिं । मशकु गुंपला सेंबुडीं ।
ढोर सबडबुडी । पंकिं गेला ॥ ८२ ॥
तैसें घरौनि निगणें । नाहिं जीतेनि मरणें ।
जेया सापां होउनि असणें । भाटिं तिये ॥ ८३ ॥
प्रियोत्तमाचां कंठिं । प्रमदा घे आंटी ।
तैसा जीवेंसिं कोंपटी । धरुनि जो ठाके ॥ ८४ ॥
मधुरसादोषें । मधुकरि जचें जैसें ।
गृहसंगोपन तैसें । करी जो गा ॥ ८५ ॥
ह्मांतारपणिं जालें । माणिक एक उपाइलें ।
तेयाचें कां जेतुलें । मातापितरां ॥ ८६ ॥
तेतुलेनि पाडें पार्था । घरिं जेयाची आस्था ।
आणि स्त्री वांचौनि सर्वथा । जाणे ना जो ॥ ८७ ॥

महापुरुषाचें चित्त । जालेयां वस्तुगत ।
ठाके व्यवहारजात । जेया परीं ॥ ८८ ॥
तैसा स्त्रीदेहीं जो जीवें । पडौनियां सर्वभावें ।
कोणु मी काय करावें । हें काहिं नेणे ॥ ८९ ॥
हाणि लाभु नदेखे । लोकापवादु नाइके ।
जेयाचिं इंद्रियें एकमुखें । स्त्रिया केलीं ॥ ७९० ॥
चित्त आराधी स्त्रियेचें । स्त्रियेचेनि छंदें नाचे ।
मर्कट गारुडियाचें । जैसें होए ॥ ९१ ॥
आपण चि पासिं दावी । इष्टा मैत्रा दुरावी ।
मग कवडा चि वाढवी । लोभी जैसा ॥ ९२ ॥
तैसें दानपुण्य खांची । गोत्रकुटुंबा वंचीं ।
परि बायणी स्त्रियेची । उणी हो न ये ॥ ९३ ॥
पूजितें दैवतें जोगावी । गुरुतें बोलें झांकवी ।
मायेबापा दावी । निदारपण ॥ ९४ ॥
स्त्रियेचां तरि विखिं । भोगसंपत्ति अनेकी ।
आणिकि वस्तु नीकी । जे जे देखे ॥ ९५ ॥
प्रेमाथिलेनि भगतें । भजिजे कुळदेवतेतें ।
तैसा एकाग्रचित्तें । स्त्रि जो उपासी ॥ ९६ ॥
इयेतें कोण्ही देखैल । इयेसि वेखासें जाइल ।
तरि युग चि बुडैल । ऐसें जेया ॥ ९७ ॥
साच आणि चोख । तें स्त्रियेसी चि अशेष ।
एरी विषिं जोगावणुक । ते ही नाहिं ॥ ९८ ॥
नाइटेयां भेण । न मोडी नागाची आण ।
तैसी पाळी उणखुण । स्त्रियेची जो ॥ ९९ ॥
किंबहुना धनंजया । स्त्री चि सर्वस्व जेया ।
आणि तियेचेया जाटेया । लागि प्रेम ॥ ८०० ॥

आणिक ही जें समस्त । तेथिचें संपत्तिजात ।
तें जीवाहूनु आत । मानी जो गा ॥ १ ॥
तो अज्ञानासि मूळ । अज्ञाना तेणें बळ ।
हें असो केवळ । तें चि तो रूप ॥ २ ॥
मातलिये सागरिं । फोकिलियां तरि ।
लाटाचां येरझारिं । आंदोळे जेवि ॥ ३ ॥
तैसी प्रिय वस्तु पावे । आणि सुखें जो उंचावे ।
तैसा अप्रिया सवें । तळु खाए ॥ ४ ॥
ऐसी जेयाचां चित्तिं । वैषम्यसाम्याची वोखती ।
वाहे तो महामती । अज्ञानु गा ॥ ५ ॥
आणि माझां ठांइं भगति । फळा लागि जेया आथि ।
धना दोसें विरगति । नटणें जेवि ॥ ६ ॥
कां कांताचां मानसिं । रिगौनु स्वैरिणी जैसी ।
राहाटे आणिकेंसिं । जावेया लागि ॥ ७ ॥
तसें मातें किरीटी । भजती गा पाउटी ।
करूनि जो दीठी । विषो सुये ॥ ८ ॥
आणि भजिन्लेया वरि । तो विषयो न पवे जरि ।
सांडि ह्मणे तरि । आघवें टवाळ हें ॥ ९ ॥
कुणबटु कुलवाडी । तैसा आनु देऊ मांडी ।
आदिलाची पिंडी । करी तेयातें ॥ ८१० ॥
तेया गुरुमार्गा टेंके । जेयाचा सुगुरुत्वां देखे ।
तरि तेयाचा मंत्रु सीखे । एर नेंवे ॥ ११ ॥
प्राणिजातेंसि निष्ठुरु । स्थावरिं बहुत भरु ।
तेवि चि नाहिं एकसरु । निर्वाहो जेया ॥ १२ ॥
माझी मूर्ति आपजवी । घराचां कोनिं बैसवी ।
आणि देवादेवीं । यात्रे जाए ॥ १३ ॥

नीच आराधन माझें । काजीं कुळदेवातें भजे ।
पर्वविशेषें भोजें । पूजा आन ॥ १४ ॥
माझें अधिष्ठान घरीं । आणि वौसे आनाचे करी ।
पितरकार्यअवसरीं । पितरांचा होए ॥ १५ ॥
एकादशिचां दिसिं । जेतुला पाडु आमसिं ।
तेतुला चि नागांसि । पंचमीसि ॥ १६ ॥
चौथि मोटकी पाहे । आणि गणेशाचा चि होए ।
चाउदासिं ह्मणे माए । तूझा चि वो दुर्गे ॥ १७ ॥
नवमीतें मांडी । आणि बैसे नवचंडी ।
आदित्यवारिं वाढी । भैरवां भरीं ॥ १८ ॥
पाठिं सोमवारु पावे । आणि बेलेंसिं लिंगा धांवे ।
ऐसें एकला चि आघवें । जोगावी जो ॥ १९ ॥
अखंड भजन करी । उगा न राहे क्षणभरी ।
आघवेनि गांवंदारी । ऐहेव जैसी ॥ ८२० ॥
तैसेनि जो गा भगतु । वेखासिं सैरा धावंतु ।
जाण अज्ञानाचा मूर्त्तु । अवतारु तो ॥ २१ ॥
आणि एकांतें चोखटें । तपोवनें तीर्थें तटें ।
देखौनि जो वीटे । तो ही तो चि ॥ २२ ॥
आणि आत्मा गोचरु होए । ऐसी जे विद्या आहे ।
तें आइकौनु डौरु वाहे । विद्वांसु जो ॥ २३ ॥
उपनिषदांकडे न वचे । योगशास्त्र न रुचे ।
अध्यात्मज्ञानाचे । मनीं चि नाहिं ॥ २४ ॥
आत्मचर्चा एकि आथि । ऐसिये बुद्धीची भींति ।
पाडूनि जेयाची मति । वोढाळ जाली ॥ २५ ॥
कर्मकांड तरि जाणे । मुखोद्गतें पुराणें ।
ज्योतिषिं तो ह्मणे । तैसे चि होए ॥ २६ ॥

शिल्पि अतिनिपुणु । सूपशास्त्रिं प्रवीणु ।
विधि अथर्वणु । हातिं जेया ॥ २७ ॥
कोकिं नाहिं ठेलें । भरतु करी हाणितलें ।
आगम उपासिले । मूर्त होंति ॥ २८ ॥
नीति सुझे । वैदिक बुझे ।
काव्यनाटकीं दूजें । चतुर नाहिं ॥ २९ ॥
स्मृतिची चर्चा । डंषु जाणे गारुडाचा ।
निघंटु प्रज्ञेचा । पाइकु करी ॥ ८३० ॥
व्याकरणिं चोखडा । तर्की अतिगाढा ।
एकिं अध्यात्मीं चि फुडा । जात्यंधु ॥ ३१ ॥
तें वांचूनु आघवां शास्त्रिं । सिद्धान्तनिर्वाणसूत्री ।
पारि जळो तें नक्षत्री । न पाहे गा ॥ ३२ ॥
मोराचां आंगिं असोसें । पिंसें आहाति डोलसें ।
आणि एकली दीठि नसे । तैसें तें गा ॥ ३३ ॥
जारि परमाणू एवडें । संजीवनीमूळ जोडे ।
तारि बहू गाडे । भरणें केवि ॥ ३४ ॥
तैसें शास्त्रजात जाण । आघवें चि अप्रमाण ।
अध्यात्मज्ञानें विण । एकलेनि ॥ ३५ ॥
या लागि अर्जुना पाहिं । अध्यात्मज्ञानाचां ठांइं ।
जेया निश्चयबुद्धि नाहिं । शास्त्रमूढां ॥ ३६ ॥
तेया शरीर जें जालें । तें अज्ञानाचें बिं विरुढलें ।
जेयाचिये वित्पती गेलें । अज्ञानवेलीं ॥ ३७ ॥
तो जें जें बोले । तें अज्ञान चि फूललें ।
तेयाचें पुण्य तें फळलें । अज्ञान चि ॥ ३८ ॥
अध्यात्मज्ञान कहिं । जेणें मानिलें चि नाहिं ।
तो ज्ञानार्थु न देखे काहीं । हें बोलावें असे ॥ ३९ ॥

ऐली चि थडी न पवतां । पले जो मार्गौता ।
तेया पैली तीरिची वार्ता । केवि जाणवे ॥ ८४० ॥
कां दाखठां चि जेयाचें । पाये बांधले साचे ।
तो केवि परिवारिचें । ठेविलें जाणे ॥ ४१ ॥
तेवि अध्यात्मज्ञान जेया । अनोलख धनंजया ।
तेया ज्ञानार्थु देखावेया । काइ काज ॥ ४२ ॥
ह्मणौनि आतां विशेषें । तो ज्ञानाचें सार न देखे ।
हें सांगावें आंखें लेखें । न लगे तुज ॥ ४३ ॥
जेधवां सगर्भे वाढिलें । तेधवां चि पोटिचें धालें ।
तैसें मागिलें पदें बोलिलें । तें चि होए ॥ ४४ ॥
वांचूनु या वेगलें । रूप करणें हें न मिळे ।
घेइं आवंतिलें आंधलें । तैसें जालें ॥ ४५ ॥
एवं इये उपरती । ज्ञानचिन्हें मार्गौती ।
अमानित्वादिप्रभृती । वाखाणिलीं ॥ ४६ ॥
जियें ज्ञानपदें अठरा । केलियां एरी मोहरा ।
अज्ञान ऐसें आकारा । येथ आहे ॥ ४७ ॥
मागां श्लोकाचेनि अर्द्धार्द्धे । ऐसें सांघितलें मुकुंदें ।
ना उपराठि ज्ञानपदें । तें चि अज्ञान ॥ ४८ ॥
ह्मणौनि इया वाहाणी । मियां केली उपलवणी ।
वांचौनि दूधा मेलउनि पाणी । फार कीजे ॥ ४९ ॥
तैसें जी न बडबडीं । पदाची कोर न संडी ।
मूळध्वनिचिये वाढी । निमित्त जालां ॥ ८५० ॥
तवं श्रोते ह्मणति राहे । कें पारिहारा ठाउ आहे ।
भीसि कां वायां हें । कविपोषका ॥ ५१ ॥
तूतें श्रीमुरारी । ह्मणितलें प्रकटें करीं ।
जे अभिप्राय गव्हरीं । झांकिले आह्मीं ॥ ५२ ॥

तें देवाचें मनोगत । दावितु आह्मासि मूर्त्त ।
हें इं ह्मणतां चित्त । दाटैल तुझें ॥ ५३ ॥
ह्मणौनि असो हें न बोलों । परि सवियां चि गा तोखलों ।
जें लोकत्रया मेळविलों । श्रवणसुखा ॥ ५४ ॥
आतां या वारि । जें तो श्रीहारि ।
बोलिला तें करीं । कथन वेगा ॥ ५५ ॥
या संतवाक्या सरिसें । ह्मणितलें निवृत्तिदासें ।
जी अवधारां ऐसें । बोलिले देउ ॥ ५६ ॥
ह्मणे तुवां पांडवा । हा चिन्हसमुच्चयो आघवा ।
आइकिला तो जाणावा । अज्ञानभागु ॥ ५७ ॥
येया अज्ञानविभागा । पाठि देउनियां पैं गा ।
मग ज्ञानविषिं चांगा । दृढां होइजे ॥ ५८ ॥
मग निर्वाललेनि ज्ञानें । ज्ञेय भेटैल मनें ।
तें जाणावेया अर्जुनें । आश केली ॥ ५९ ॥

**ज्ञेयं यत्तत्प्रवक्ष्यामि यज्ज्ञात्वामृतमश्नुते ॥**
**अनादि मत्परं ब्रह्म न सत्तं नासदुच्यते ॥ १२ ॥**

तवं सवज्ञांचा राउ । ह्मणे जाणौनि तेयाचा भाउ ।
परिसैं गा ज्ञेयअभिप्राउ । सांघों आतां ॥ ८६० ॥
तरि ज्ञेय ऐसें ह्मणणें । वस्तूतें येणें चि कारणें ।
जें ज्ञानें वांचूनि कव्हणें । उपाया न ये ॥ ६१ ॥
आणि जाणितलेया वरौतें । जाणणें नाहिं जेथें ।
जें जाणणें चि तन्मयतें । आणी जेयाचें ॥ ६२ ॥
जें जाणितलेया साठिं । संसारा काढूनि कांठीं ।
जिरौनि जाइजे पोटीं । नित्यानंदाचा ॥ ६३ ॥
तें ज्ञेय गा ऐसें । आदि चि जेया नसे ।
परब्रह्म आपैसें । नावं जेया ॥ ६४ ॥

नाहिं ह्मणों जाइजे । तवं विश्वाकारें देखिजे ।
विश्व ऐसें ह्मणिजे । तरि हे माया ॥ ६५ ॥
रूप वर्णु व्यक्ति । नाहिं दृश्यदृष्टस्थिति ।
तरि कोणें कैसें आथि । ह्मणावें पां ॥ ६६ ॥
आणि साच चि जरि नाहिं । तरि महदादि कवणी ठांइं ।
स्फुरत कैंचें काइ । तेणें विण ॥ ६७ ॥
ह्मणौनि आथि नाहिं हे बोली । जें देखौनि मूकिं जालिं ।
विचाराची मोडली । वाट जेथ ॥ ६८ ॥
भांडघटशरावि । जैसी तदाकार असे पृथवी ।
तैसें सर्व होउनि सर्वी । असे जें वस्तु ॥ ६९ ॥
आघवां चि देशिं कालिं । नोहे चि देशकाला वेगली ।
जे क्रिया स्थूलास्थूलीं । ते चि हात जेया ॥ ८७० ॥

**सर्वतः पाणिपादं तत्सर्वतोक्षिशिरोमुखं ।**
**सर्वतः श्रुतिमल्लोके सर्वमावृत्य तिष्ठति ॥ १३ ॥**

तेयातें एया कारणें । विश्वबाहु हें ह्मणणें ।
जें सर्व चि सर्वपणें । सदा करी ॥ ७१ ॥
आणि समस्ता ही ठाया । एकी चि कालिं धनंजया ।
आलें असे ह्मणौनियां । विश्वांघ्रि नावं ॥ ७२ ॥
पैं सवितेया आंग डोळे । हें नाहिं वेगळवेगळें ।
तैसें सर्वदृष्टें सकळें । स्वरूपें जें ॥ ७३ ॥
ह्मणौनि विश्वतश्चक्षु । हा अचक्षुचा ठांइं पक्षु ।
बोलवेया दक्षु । जाला वेदु ॥ ७४ ॥
पैं गा मूर्त्ति तें चि मुख । हुताशना देख ।
तैसें सर्वत्र अशेष । भोक्तें जें ॥ ७५ ॥
एया लागि तेथ पार्था । विश्वतोमुख हे व्यवस्था ।
आली वाक्पथा । श्रुतीचेया ॥ ७६ ॥

आणि वस्तुमात्रिं गगन । जैसें असे संलग्न ।
तैसें शब्दजातिं कान । सर्वत्र जेया ॥ ७७ ॥
ह्मणौनि आह्मीं तेयातें । ह्मणों सर्वत्र आइकतें ।
एवं जें सर्वांतें । आवरूनि असे ॥ ७८ ॥
यन्हविं तन्हीं महामती । विश्वतश्चक्षु या श्रुती ।
तेयाचिये व्याप्ती । रूप केलें ॥ ७९ ॥
यांचूनि हस्तनेत्रपाए । हे भाक काय तेथ आहे ।
सर्व शून्याचा साहे । निष्कर्ष जें ॥ ८८० ॥
पैं कल्लोळातें कल्लोळें । ग्रासिजतसें ऐसें केलें ।
परि ग्रसितें ग्रासा वेगळें । असे काइ ॥ ८१ ॥
तैसें सर्वादि जें एक । तेथ कें व्याप्यव्यापक ।
परि बोलावेया नावं एक । करावें लागे ॥ ८२ ॥
पैं शून्य जें दावावें जालें । तैं बिंदुलें एक केलें ।
तैसें अद्वैत दावावें बोलें । द्वैत चि कीजे ॥ ८३ ॥
ह्मणौनि गा पार्था । गुरुशिष्यसत्पथा ।
आडळु पडे सर्वथा । बोलु खुंटे ॥ ८४ ॥
ह्मणौनि गा श्रुतीं । द्वैतभावें अद्वैतीं ।
निरोपणा वाहाती । वाट केली ॥ ८५ ॥
तें चि आतां अवधारीं । ये नेत्रगोचरे आकारीं ।
तें ज्ञेय जेया परीं । व्यापूनि असे ॥ ८६ ॥
तरि तें गा ऐसें । अवकाशिं आकाश जैसें ।
पटीं पटु होउनि असे । तंतु जेवि ॥ ८७ ॥
उदक होउनि उदकिं । रसु जैसा अवलोकीं ।
दीपपणें दीपकीं । तेज जैसें ॥ ८८ ॥
कपूरत्वें कापुरीं । सौरभ्य असे जिया परीं ।
शरीर होउनि शरीरीं । कर्म जेवि ॥ ८९ ॥

किंबहुना ऐसें पांडवा । सोनें सोनयांचा रवा ।
तैसें जें या सर्वा । सर्वांगीं असे ॥ ८९० ॥
पारि रवेपणा माझिवडें । तवं रवा ऐसें आवडे ।
वांचूनि सोनें सोनेयां सांगडे । सोनें चि जेवि ९१ ॥
पैं गा वोघू चि वांकुडा । पारि पाणी उजू सुहाडा ।
वन्हि आला लोखंडा । लोह नव्हे ॥ ९२ ॥
घटाकारें वेंटाळलें । तैं नभ गमे वाटुलें ।
मठिं तारि चौफळें । आयें दीसे ॥ ९३ ॥
पारि ते आकार जैसे । नोहिजती चि आकाशें ।
तेवि विकारु होउनि तैसें । विकारी नोहे ॥ ९४ ॥

**सर्वेंद्रियगुणाभासं सर्वेंद्रियविवर्जितं ।**
**असक्तं सर्वभुक्चैव निर्गुणं गुणभोक्तृ च ॥ १४ ॥**

मन मुख्य इंद्रियां । सत्वादि गुणा येया ।
सारिखें ऐसें धनंजया । आवडे कीर ॥ ९५ ॥
पैं गुळाची गोडी । नव्हे बांधेया सांगडी ।
तैसीं गुणेंद्रियें फुडी । नाहिं तेथ ॥ ९६ ॥
आगा क्षीराचिये दशे । घृत चि क्षीराकारें असे ।
पारि क्षीर चि नव्हे जैसें । कपिध्वजा ॥ ९७ ॥
तैसें जें इये विकारिं । विकारु नव्हे अवधारिं ।
पारि आकारु नावं भवंरी । सोनें तें सोनें ॥ ९८ ॥
या उघड मऱ्हाटिया । तें वेगळेपणें धनंजया ।
जाण गुणेंद्रियां । पासौनियां ॥ ९९ ॥
नामरूपसंबंधु । जातिक्रियाभेदु ।
हा आकारासि चि प्रवादु । वस्तुसि नाहिं ॥ ९०० ॥
जें गुण नोहे कहिं । गुणा तेया पाडु नाहिं ।
पारि तेयाचां चि ठांइं । आभासति ॥ १ ॥

एतुलेया साठिं । सभ्रांताचां पोटीं ।
ना, ऐसें गमे किराटी । जें हें धरी ॥ २ ॥
तरि तें गा धरणें ऐसें । अभ्रातें जेवि आकाशें ।
कां प्रतिवदन जैसें । आरिसेनि ॥ ३ ॥
नातरि सूर्यप्रतिमंडल । जैसें धरी सलील ।
रश्मिकरें मृगजल । धरिजे जेवि ॥ ४ ॥
तैसें गा संबंधें विण । यां सर्वांतें निर्गुण ।
परि तें वायां जाण । मिथ्या दृष्टी ॥ ५ ॥
आणि इया परी निर्गुणें । गुणातें भोगणें ।
रंका राज्य करणें । स्वप्निं जेवि ॥ ६ ॥
ह्मणौनि गुणाचा संगु । अथवा गुणभोगु ।
हा निर्गुणिं लागु । बोलों चि न ये ॥ ७ ॥

**बहिरन्तश्च भूतानामचरं चरमेव च ।**
**सूक्ष्मत्वात्तदविज्ञेयं दूरस्थं चांतिके च तत् ॥ १५ ॥**

जें चराचर भूतां । माझि असे पांडुसुता ।
नाना वन्हि उष्णता । अभेद जेवि ॥ ८ ॥
तैसेनि अविनाभावें । सूक्ष्मदशे आघवें ।
व्यापूनि असे तें जाणावें । ज्ञेय एथ ॥ ९ ॥
जें एक आंतु बाहिरि । जें एक जवळें दूरी ।
जें एक वांचूनि परि । दुसरी नाहिं ॥ ९१० ॥

**अविभक्तं च भूतेषु विभक्तमिव च स्थितं ।**
**भूतभर्तृ च तज्ज्ञेयं ग्रसिष्णु प्रभविष्णु च ॥ १६ ॥**

क्षीरसागरिंची गोडी । माजि बहुत थडिये थोडी ।
हें नाहिं तेया परवडी । पूर्ण जें गा ॥ ११ ॥
स्वेदजादिप्रभृती । वेगळालां भूतिं ।
जेयाचिये अनस्यूती । खोमणें नाहिं ॥ १२ ॥

पैं श्रोतेमुखटिळका । घटसहस्रां अनेकां ।
बिंबोनियां चंद्रिका । न भेदे जेवि ॥ १३ ॥
नानां लवणकणाचिया रासी । क्षारता एकि जैसी ।
कां कोडी एके उंसीं । एकु चि रसु ॥ १४ ॥
तैसी अनेकिं भूतजातिं । असे एक चि व्याप्ति ।
विश्वकार्या सुमती । कारण जें ॥ १५ ॥
ह्मणौनि हा भूताकारु । जेथौनि तें चि आधारु ।
कल्लोळिं सागरु । जेया परीं ॥ १६ ॥
पैं बाळादि तिहिं वयसिं । काया एकी चि जैसी ।
तैसें आदिस्थितिग्रासिं । अखंड जें ॥ १७ ॥
सायंप्रातमध्यान्हीं । होंत जांत दिनिदिनीं ।
जैसें कां गगनीं । पाल्टु नाहिं ॥ १८ ॥
आगा श्रृष्टिवेळे प्रियोत्तमा । जेया नावं ब्रह्मा ।
व्याप्ति जें नामा । पात्र जाळें ॥ १९ ॥
मग आकारु हा हारपे । तेधवां रुद्र जें ह्मणिपे ।
तें हिं गुणत्रयलोपे । तै जें शून्य ॥ ९२० ॥

**ज्योतिषामपि तज्ज्योतिस्तमसःपरमुच्यते ।**
**ज्ञानं ज्ञेयं ज्ञानगम्यं हृदि सर्वस्य तिष्ठति ॥ १७ ॥**

जें अग्निचें दीपन । जें चंद्राचें जीवन ।
सूर्याचे नयन । देखति जेणें ॥ २१ ॥
आदीसि जे आदि । जे वृद्धीसि वृद्धि ।
बुद्धिसि बुद्धि । जीवाचा जीउ ॥ २२ ॥
जेयाचेनि उजियेडें । तारागण उघडे ।
महातेज सुरवाडें । जेणें राहाटे ॥ २३ ॥
मनाचें मन । जें नेत्राचे नयन ।
जें घ्राणाचे घ्राण । वाचेची वाचा ॥ २४ ॥

जें प्राणाचे प्राण । जें गतिचे चरण ।
क्रियेसि कर्त्तेपण । जेयाचेनि ॥ २५ ॥
आकारु जेणें आकारे । विस्तारु जेणें विस्तारे ।
संहारु जेणें संहारे । पांडुकुमरा ॥ २६ ॥
जें मेदिनियेची मेदिनी । जें पाणी पीउनि असे पाणी ।
तेजा दिवेलावणी । जेणें तेजें ॥ २७ ॥
जें वायुचा श्वासोश्वासु । जें गगनाचा अवकाशु ।
आघवा चि आभासु । आभासे जेणें ॥ २८ ॥
किंबहुना पांडवा । जें आघवें चि इये आघवां ।
जेथ नाहिं रिगावां । द्वैतभावां ॥ २९ ॥
जें देखिलेया चि सवें । दृष्टादृश्य आघवें ।
एकवाट कालवे । सामरस्यें ॥ ९३० ॥
मग तें चि होये ज्ञान । ज्ञाता ज्ञेय हान ।
ज्ञानें गमिजे स्थान । तें हि तें चि ॥ ३१ ॥
सरलेयां लेख । जैसें आंख होंति एक ।
तैसें साध्यसाधनादिक । ऐक्यते ये ॥ ३२ ॥
अर्जुना जिये ठांइं । सरे द्वैताची लिही ।
हें असो हृदयीं । सर्वांचां असे ॥ ३३ ॥

**इति क्षेत्रं तथा ज्ञानं ज्ञेयं चोक्तं समासतः ।**
**मद्भक्त एतद्विज्ञाय मद्भावायोपपद्यते ॥ १८ ॥**

एवं तुज पुढां । आदि क्षेत्र सुहाडा ।
दाविलें फाडोवाडां । विवंचूनि ॥ ३४ ॥
तैसें चि क्षेत्रपाठिं । जैसें देखिलें दीठी ।
तैसें चि ज्ञान किरीटी । सांघितलें ॥ ३५ ॥
अज्ञाना हिं कथातिकें । रूप केलें नीकें ।
जवं आणि टेंके । पुरे ह्मणसी ॥ ३६ ॥

आणि आतां हें रोकडें । उपपत्तिचेनि सुरवाडें ।
निरोपिलें उघडें । ज्ञेय पैं गा ॥ ३७ ॥
हे आघवी चि विवंचना । बुद्धी भरूनि अर्जुना ।
मग सिद्धिभुवना । माझि येंति ॥ ३८ ॥
देहादि परिग्रहीं । सन्यासु वेऊनि जिहिं ।
जीउ माझां ठांइं । वृत्तिकु केला ॥ ३९ ॥
ते गा माझे किरीटी । हें जाणौनि सेवटीं ।
आपणपेया साठीं । मी चि होंति ॥ ९४० ॥
तरि मी होती परी । हे मुख्य अवधारिं ।
सोहपी सर्वा परीं । रचिली आह्मिं ॥ ४१ ॥
कडां पायेरी कीजे । निरालिं मांचु बांधिजे ।
अथावि सूयिजे । तारितें जेवि ॥ ४२ ॥
यऱ्हविं आघवें चि आत्मां । हें सांघौनु वीरोत्तमा ।
तें तूझेया मनोधर्मा । मीलैल ना ॥ ४३ ॥
ह्मणौनि एक चि संचलें । आह्मिं चतुर्धा केलें ।
जें अदलपण देखिलें । तूझियें प्रज्ञे ॥ ४४ ॥
पैं बालक जैं जेवविजे । तैं घांसु विसें ठांइं कीजे ।
तैसें एक चतुर्व्याजें । कथिलें आह्मिं ॥ ४५ ॥
एक क्षेत्र एक ज्ञान । एक ज्ञेय एक अज्ञान ।
हे भाग केले अवधान । जाणौनि तूझें ॥ ४६ ॥
आणि ऐसेन हिं पार्था । जरि हा अभिप्राऊ तुज होता ।
न ये चि तरि हे वेवस्था । पुड्डतिं सांघों ॥ ४७ ॥
आतां चौं ठांइं न करुं । एक चि ह्मणौनि न सरूं ।
आत्मेयां अनात्मेयां धरूं सरिसा पाडु ॥ ४८ ॥
परि तुवां एतुलें करावें । मागौनि तें आह्मां देयावें ।
जें काना चि नावं ठेवावें । आपणयातें ॥ ४९ ॥

एया श्रीकृष्णाचेया बोला । पार्थु रोमांचितु जाला ।
तेथ देॐ ह्मणाति उगला । उचंबळ ना ॥ ९५० ॥

**प्रकृतिं पुरुषं चैव विध्यनादी उभावपि ।**
**विकारांश्च गुणांश्चैव विद्धि प्रकृतिसंभवान् ॥ १९ ॥**

ऐसेनि तो एता वेगु । धरूनि ह्मणे श्रीरंगु ।
प्रकृतिपुरुषां विभागु । परियस सांघों ॥ ५१ ॥
जेया मार्गातें जगीं । सांख्य ह्मणति योगी ।
जेयाचिये भाटिवे लागि । मी कपिलु जालां ॥ ५२ ॥
तो आइक निर्दोषु । प्रकृतिपुरुषविवेकु ।
ह्मणतसे आदिपुरुखु । अर्जुनातें ॥ ५३ ॥
तरि पुरुषु अनादि आथि । आणि तैं चि लागौनि प्रकृति ।
समरसिं जैसीं दिवोराति । दोन्हीं असति ॥ ५४ ॥
का रूप नव्हे वायां । रूपा लागली छाया ।
निकण वाढे धनंजया । कणेंसिं कोंडा ॥ ५५ ॥
तैसिं जाण लवलटें । दोन्हि जियें एकवटें ।
प्रकृतिपुरुषु प्रकटें । अनादिसिद्धें ॥ ५६ ॥
पैं क्षेत्र एणें नावें । जें सांघितलें आववें ।
तें चि येथ जाणावें । प्रकृति पैं गा ॥ ५७ ॥
क्षेत्रज्ञु ऐसें । जेयातें ह्मणितलें असे ।
तो पुरुषु अनारिसें । न बोलों घेइं ॥ ५८ ॥
इयें अनानें नावें । परि नित्य आन नव्हे ।
हें लक्ष्य न चुकावें । पुडुतिं पुडुतिं ॥ ५९ ॥
तरि केवळ जे सत्ता । तो पुरुषु पांडुसुता ।
प्रकृति ते समस्ता । क्रिये नावं ॥ ९६० ॥
बुद्धि इंद्रियें अंतःकरण । इत्यादि विकारभरण ।
आणि तीन्ही गुण । सत्वादिक ॥ ६१ ॥

हा आघवा चि मेळावा । प्रकृती जाला जाणावा ।
हे चि हेतु संभवा । कर्माचेया ॥ ६२ ॥
तेथ इछा आणि बुद्धि । घडवी अहंकारेंसिं आदी ।
मग तिया लावीति वेधीं । कारणाचा ॥ ६३ ॥
तें चि कारण टाकावेया । जें सूत्र धरणें उपाया ।
तेया नावं धनंजया । कार्यकारण ॥ ६४ ॥

**कार्यकारणकर्तृत्वे हेतुः प्रकृतिरुच्यते ।**
**पुरुषः सुखदुःखानां भोक्तृत्वे हेतुरुच्यते ॥ २० ॥**

आणि इछामदाचां थावें । लागली मनातें उठवी ।
जें इंद्रिय राहाटवी । तें कतृत्व गा ॥ ६५ ॥
ह्मणौनि तीन्ही इयें जाणा । कार्यकर्तृत्वकारणा ।
प्रकृति मूळ हें राणा । सिद्धांचा ह्मणे ॥ ६६ ॥
एवं तिहिंचेनि समवायें । प्रकृति कर्मरूप होये ।
परि जेया गुणां तराये । तेयां चि सारिखें ॥ ६७ ॥
जें सत्वां अधिष्टिजे । तें सत्कर्म ह्मणिजे ।
रजोगुणें निफजे । मध्यम तें ॥ ६८ ॥
केवळ जरि तमें । जियें निफजति कर्में ।
निषिद्धें अधमें । जाणावीं तियें ॥ ६९ ॥
ऐसिं संतासंतें । कर्में प्रकृति होतें ।
तेया तव निफजतें । सुखदुःखें गा ॥ ९७० ॥
असतिं दुःख निफजे । सत्कार्मिं सुख उपजे ।
तेयां दोहिंचा बोलिजे । भोगु पुरुषा ॥ ७१ ॥

**पुरुषः प्रकृतिस्थोहि भुङ्क्ते प्रकृतिजान्गुणान् ।**
**कारणं गुणसंगोस्य सदसद्योनिजन्मसु ॥ २१ ॥**

प्रकृतिपुरुषांची कुळवाडी । सांवतां देखैं असंघडी ।
जे आवुली जोडी । आमुला खाये ॥ ७२ ॥

सुखदुःखें जयं वेन्हीं । निफजति साचोकारिं ।
तवं प्रकृति उद्यमु करी । मग पुरुषु भोगी ॥ ७३ ॥
आमुलेया आबुल्यि । संगति ना सोये ।
कां आबुलि जग विये । चोज आइकां ॥ ७४ ॥
अनंगु हा पेंधा । निकवडा नसुधा ।
जीर्णु अतिवृद्धा । पासौनि वृद्धु ॥ ७५ ॥
तेया अडिनावं पुरुषु । एन्हविं स्त्री ना नपुंसकु ।
हें एक ही न्हवे लोकु । प्रकृती तव ॥ ७६ ॥
अचक्षु अश्रवणु । अहस्तु अचरणु ।
रूप ना वर्णु । नावं आथि ॥ ७७ ॥
आगा जेथ काहिं चि नाहिं । प्रकृतिचा भर्त्ता पाहिं ।
किं भोगणें ऐसेया ही । सुखदुःखाचें ॥ ७८ ॥
तो तरि अकर्त्ता । उदासु अभोक्ता ।
परि इया चि पतिव्रता । भोगविजे ॥ ७९ ॥
जियेतें अलुमालु । रूपागुणाचा ढालु ।
ते भलेतैसा खेलु । लेखा आणी ॥ ९८० ॥
मा इये प्रकृती तव । गुणमई हें चि नावं ।
किंबहुना सावेव । गुण ते चि हे ॥ ८१ ॥
हे प्रकृति क्षणीं नवी । रूपागुणाची आघवी ।
जडातें ही माजवी । इयेचा माजु ॥ ८२ ॥
नावें इया प्रसिद्धें । सन्हेंहें इया सान्निधें ।
इंद्रियें प्रबुद्धें । इयेचेनि ॥ ८३ ॥
काइ मन नपुंसक । किं ते भोगी तीन्ही लोक ।
ऐसेसें अलौलिक । करणें इयेचें ॥ ८४ ॥
हे भ्रमाचें महाद्वीप । हे व्याप्तिचें चि रूप ।
विकार उमप । इया केले ॥ ८५ ॥

हे कामाची मांडवी । मोहवनिची माधवी ।
जे प्रसिद्ध दैवी । माया ऐसी ॥ ८६ ॥
हे वाङ्मयाची वाढि । हे साकारपणा जोडि ।
प्रपंचाची धाडि । अभंग हे ॥ ८७ ॥
कला येथौनि जालिया । विद्या इया चि केलिया ।
इछा ज्ञान क्रिया । वियाली हे ॥ ८८ ॥
हे नादाची टांकसाल । हे चमत्काराचें वेलाउल ।
किंबहुना सकल । खेलु इयेचा ॥ ८९ ॥
हे उत्पत्ति प्रलयो होंत । ते इयेचे सायं प्रात ।
हें असो आतां बहुत । मोहन हे ॥ ९९० ॥
हे अद्वयाचे दूसरें । हे निःसंगाचें सोयरें ।
हे निरालेंसि घरें । नांदति असे ॥ ९१ ॥
इयेतें एतुले वेन्हीं । सौभाग्याची व्याप्ति थोरी ।
ह्मणौनि तेया आवरी । अनावरातें ॥ ९२ ॥
तेयाचां तवं ठांइं । निपटौनि काहिं चि नाहिं ।
किं तेया आववें हिं । आपण होये ॥ ९३ ॥
तेया स्वयंभाची संभूति । तेया अमूर्त्ताची मूर्त्ति ।
आपण होये स्थिति । ठाउ तेया ॥ ९४ ॥
तेया अनर्त्ताची आर्त्ति । तेया पूर्णाची तृप्ति ।
तेया अकुलाची जाति । आपण होये ॥ ९५ ॥
तेया अचर्चाचिन्ह । तेया अपाराचें मान ।
तेया अमनस्थाचें मन । बुद्धि होये ॥ ९६ ॥
तेया निराकाराचा आकारु । तेया निर्व्यापाराचा व्यापारु ।
निरहंकाराचा हंकारु । होउनि ठाके ॥ ९७ ॥
तेया अनामाचें नाम । तेया अजन्माचें जन्म ।
आपण होये कर्म । अक्रिया तेया ॥ ९८ ॥

तेया निर्गुणाचे गुण । तेया अचरणाचे चरण ।
तेया अश्रवणाचे श्रवण । चक्षु ही होये ॥ ९९ ॥
तेया भावातीताचे भाव । तेया निरवयवाचे अवेव ।
किंबहुना होये सर्व । पुरुषाचें हे ॥ १००० ॥
ऐसें इया प्रकृती । आपुलिया सर्वव्याप्ती ।
तेया अविकृतातें विकृती । माजि कीजे ॥ १ ॥
तेथ पुरुषत्व जें असे । तें ये इये प्रकृतिदशे ।
चंद्रमा अवंसे । पडिला जैसा ॥ २ ॥
विदल बहू चोखा । मीनलेया वाला एका ।
कसु होये पांचिका । जिया परीं ॥ ३ ॥
कां साधुतें गोंदलि । संचरौनि सुये मेलि ।
नाना सुदिनाचां आभालिं । दुर्दिनु कीजे ॥ ४ ॥
तेथ पय पशुचां पोटीं । कां वन्हि जैसा काष्टीं ।
गूंडूनि घेतला पटीं । रत्नदीपु ॥ ५ ॥
राजा पराधीनु जाला । सिंहु रोगें रुंधला ।
तैसा पुरुषु प्रकृती आला । स्वतेजा मुके ॥ ६ ॥
जागता नरु सहसा । निद्रा पाडौनि जैसा ।
स्वप्निचिया ही सोसा । वश्यु कीजे ॥ ७ ॥
तैसें प्रकृति जालेपणें । पुरुषा गुण भोगणें ।
उदासु अंतौरिगुणें । आंतुडविजे ॥ ८ ॥
तैसें अजा नित्या होए । आंगिं जन्ममृत्युचे घाए ।
वाजति जैं लाहे । गुणसंगु हा ॥ ९ ॥
पारि तें ऐसें पांडुसुता । तातलें लोह पीटितां ।
जेवि वन्हीसी चि घाता । बोलिजति ॥ १०१० ॥
कां आंदोलेया उदक । प्रतिभा होये अनेक ।
तें नानात्व ह्मणाति लोक । चंद्रि जेवि ॥ ११ ॥

दर्पणाचिया जवळिका । दूजेपण जैसें मुखा ।
कुंकुमें स्फटिका । लोहित्व होए ॥ १२ ॥
तैसा गुणसंगमें । हा अजन्मा जन्मे ।
पावतु ऐसा गमे । यऱ्हवीं नाहिं ॥ १३ ॥
अधमोत्तमा योनी । या ऐसिया मानी ।
जैसा संन्यासी स्वप्नीं । अंत्यु होये ॥ १४ ॥
ह्मणौनि केवळ पुरुषां । नाहिं होणें भोगणें देखां ।
एथ गुणसंगू चि अशेषा । लागां मूळ ॥ १५ ॥

**उपद्रष्टानुमंता च भर्ता भोक्ता महेश्वरः ।**
**परमात्मेति चाप्युक्तो देहेस्मिन्पुरुषः परः ॥ २२ ॥**

हा प्रकृती माझि उभा । परि जुइं जैसा वेथंबा ।
प्रकृति पृथ्वी नभा । तेतुला पाड्ढ ॥ १६ ॥
प्रकृतिर्चा तटीं । मेरु हा किरीटी ।
माजि बिंबे पारि लोटीं । लोटों नेणे ॥ १७ ॥
आणि प्रकृति होये जाये । हा तों असतू चि आहे ।
ह्मणौनि आब्रह्माचें होए । शासन हा ॥ १८ ॥
प्रकृति येणें जिये । या सत्ता जग विये ।
या लागि इये । वरैतु हा ॥ १९ ॥
अनंत काळ किरीटी । जिया मिळति इया शृष्टि ।
तिया रिगति एयाचां पोटिं । कल्पांतसमइं ॥ १०२० ॥
हा महद्ब्रह्मा गोसांवि । हा ब्रह्मगोळ लावी ।
अपारपणें मवी । प्रपंचातें ॥ २१ ॥
पैं या देहा माझारि । परमात्मा ऐसी जे परि ।
बोलिजे ते अवधारिं । एयातें चि ॥ २२ ॥
अगा प्रकृती परौता । एकु आथि पांडुसुता ।
ऐसा प्रवादु तो तत्वता । पुरुषु हा पैं ॥ २३ ॥

**यएवं वेत्ति पुरुषं प्रकृतिं च गुणैः सह ।**
**सर्वथा वर्तमानोपि न स भूयोभिजायते ॥ २३ ॥**

जो निखळपणें येणें । पुरुषा तेया जाणे ।
आणि गुणाचें करणें । प्रकृतिचें जें ॥ २४ ॥
हें रूप हे छाया । पैल जल हे माया ।
ऐसें जो धनंजया । निवाडु करी ॥ २५ ॥
तेणें पाडें अर्जुना । प्रकृतिपुरुषविवंचना ।
जेयाचआ मना । गोचर जाली ॥ २६ ॥
तो शरीराचेनि मेळें । करू कां कर्में सकळें ।
परि आकाश धूमें न मैळे । तैसा असे ॥ २७ ॥
आथिलेनि देहें । नेघेपे देहमोहें ।
देहं गेलेयां नोहे । पुनरपि तो ॥ २८ ॥
ऐसा तेया एकु । उपकारु अलौलिकु ।
प्रकृतिपुरुषविवेकु । करी पैं गा ॥ २९ ॥

**ध्यानेनात्मनि पश्यंति केचिदात्मानमात्मना ।**
**अन्ये सांख्येन योगेन कर्मयोगेन चापरे ॥ २४ ॥**

परि हा चि अंतरिं । विवेकु भानुचिया परी ।
उदैजे ते अवधारीं । उपाये बहुत ॥ १०३० ॥
कोण्ही एक सूभटा । विचाराचां आगिठां ।
आत्मानात्मकीटा । पुट देउनि ॥ ३१ ॥
सतीस ही वानी भेद । तोडूनियां निर्विवाद ।
निवडीति शुद्ध । आत्मतत्व ॥ ३२ ॥
तेया आपणपेयाचां पोटीं । आत्मध्यानाचेया दीठी ।
देखति गा किरीटी । आपणपें ॥ ३३ ॥
आणिक पैं दैववर्गें । देखति सांख्ययोगें ।
एक ते आंगळगें । कर्माचेनि ॥ ३४ ॥

**अन्ये त्वेवमजानंतः श्रुत्वान्येभ्य उपासते ।**
**ते पि चातितरंत्येव मृत्युं श्रुतिपरायणाः ॥ २५॥**

येणें येणें प्रकारें । निस्तरति साचोकारें ।
हें भय भाउरें । आघवें चि ॥ ३५ ॥
परि ते करिति ऐसें । अभिमानु दवडूनि देसें ।
एकांचेया विश्वासें । टेंकति बोला ॥ ३६ ॥
जे हिताहित देखति । हाणि कणवा घेपति ।
पूसौनि सीणु हरिति । देंति सुख ॥ ३७ ॥
तेयांचेनि मुखें निगे । तेतुलें आदरें चांगें ।
आइकौनियां आंगें । मनें होंति ॥ ३८ ॥
तेयां आयिकणेयां चि नावें । ठेविति गा आघवें ।
तेयां आखरांसि जीवें । करिति लोण ॥ ३९ ॥
तेया परीं कपिध्वजा । या मरणार्णवा समजा ।
पासौनि निगति वोजा । गोमटिया ॥ १०४० ॥
ऐसे हे उपाये । बहुवस एथ पाहे ।
जाणावेया होये । एकि वस्तु ॥ ४१ ॥
आतां असो हें बहुत । पैं सर्वार्थाचें मथित ।
सिद्धांतनवनीत । देऊं तुज ॥ ४२ ॥
ऐतुलेनि पांडुसुता । अनुभवु लाहणा आइता ।
येर तवं तुज होंतां । सायास नाहिं ॥ ४३ ॥

**यावत्संजायते किंचित्सत्वं स्थावरजंगमं ।**
**क्षेत्रक्षेत्रज्ञसंयोगात्तद्विद्धि भरतर्षभ ॥ २६ ॥**

ह्मणौनि ते बुद्धि रचूं । मतवाद हे खांचूं ।
सोलीवं निर्वचूं । फलितार्थु चि ॥ ४४ ॥
परि क्षेत्रज्ञु एणें बोलें । तुज आपणपें जें दाखविलें ।
आणि क्षेत्र सांघितलें । आवघें चि ॥ ४५ ॥

तेयां येरयेरांचां मेळीं । होइजे भूतीं सकळिं ।
अनिलसंगें सलीलीं । कल्लोळ जैसे ॥ ४६ ॥
कां तेजा आणि उखरा । भेटि जालेयां वीरा ।
मृगजळाचेया पूरा । रूप होये ॥ ४७ ॥
नाना धाराधरधारीं । झळंबळी वसुंधरी ।
उठी जेवि अंकुरीं । नाना विधीं ॥ ४८ ॥
तैसें चळाचळ आघवें । जें काहिं जीउ नावें ।
तें तो उभययोगें संभवें । ऐसें जाण ॥ ४९ ॥
एया लागि अर्जुना । क्षेत्रज्ञा प्रधाना ।
पासौनि न्हवति भिन्ना । भूतव्यक्ती ॥ १०५० ॥

**समं सर्वेषु भूतेषु तिष्ठंतं परमेश्वरं ।**
**विनश्यत्स्वविनश्यंत यः पश्यति स पश्यति ॥२७॥**

पैं पटुत्व तंतु नोहे । तऱ्हीं तंतुवें चि तें आहे ।
ऐसां खोलिं डोळां पाहे । ऐक्य हें गा ॥ ५१ ॥
भूतें आघविं चि होंति । एकाचिं एकिं आहाति ।
पैं भूतपतीति । वेगळीक असे ॥ ५२ ॥
याचिं नावें आनानें । अनारिसिं वर्त्तनें ।
वेख ही सिनाने । आघवेयांचे ॥ ५३ ॥
ऐसें देखौनि किरीटी । भेदु हान सूंसि पोटीं ।
तरि जन्माचिये आटी । न लाहासि निर्गो ॥ ५४ ॥
पैं नानाप्रयोजनशीलें । दीर्घं वक्रें वर्त्तुळें ।
होंति येकिचियें फळें । तुंबिणिये ॥ ५५ ॥
होंतु कां उजू वांकुडे । परि वेलिचें हें न मोडे ।
तैसिं भूतें अवघडें । वस्तू उजू ॥ ५६ ॥
अंगारकणीं बहुवासिं । उष्णता समान जैसी ।
तैसा जीवराशी । परेशु असे ॥ ५७ ॥

गगनभरिं धारा । परि पाणी एक वीरा ।
तैसा या भूताकारा । सर्वांगीं तो ॥ ५८ ॥
हे भूतग्राम विषम । वस्तु येथ सम ।
घटमठी व्योम । जिया परीं ॥ ५९ ॥
हा नासतां भूताभासु । एथ आत्मा अविनाशु ।
जैसा केयूरादिकिं कसु । सोनेयांचा ॥ १०६० ॥
एवं जीवधर्महीनु । जीवांसि अभिन्नु ।
जो देखे सुनयनु । ज्ञानियां माझि ॥ ६१ ॥
ज्ञानाचां डोळां डोळसां । माझि डोळसु तो वीरेशा ।
हे स्तुति नोहे बहुवसा । भाग्याचा तो ॥ ६२ ॥

**समं पश्यन् हि सर्वत्र समवस्थितमीश्वरं ।**
**न हिनस्त्यात्मनात्मानं ततो याति परां गतिं ॥ २८ ॥**

जें इंद्रियबोकौटी । देहधातुची त्रिकुटी ।
पांचमेळावेयाची वोखटी । दारुण हे ॥ ६३ ॥
हे उघडी पांचवेउली । हे पंचधा आंगिं लागली ।
जीवपंचानना सांपडली । हरिणिकुटी ॥ ६४ ॥
ऐसां असौनि इये शरीरीं । कोणु अनन्यबुद्धीची सूरी ।
अनित्यभावाचां उदरीं । दाटी चि ना ॥ ६५ ॥
परि इये देहीं असतां । तो नैये चि आपणपेयां घाता ।
आणि शेविं पांडुसुता । तेथ मिळे ॥ ६६ ॥
जेथ योगज्ञानाचिया प्रौढी । वोलांडूनि जन्मकोडी ।
न निगों या भाषा बुडी । देंति योगी ॥ ६७ ॥
जें आकाराचें पैल तीर । तुर्येचें माजिघर ।
जे नादाची पैल मेर । परब्रह्म जें ॥ ६८ ॥
मोक्षा सगट गती । जेथें एंति विश्रांती ।
गंगादि अपांपती । सरिता जेवि ॥ ६९ ॥

तें सुख येणें चि देहें । पायें पाखाळणियां लाहे ।
जो भूतवैषम्य नोहे । विषमबुद्धी ॥ १०७० ॥
दीपाचेया कोडी जैसें । एक चि तेज प्रकाशे ।
तैसा जो असतू चि असे । सर्वत्र ईशु ॥ ७१ ॥
तेया समातें पांडुसुता । जीवें जो देखे समता ।
तो मरणा आणि जीविता । नांगवे फुडा ॥ ७२ ॥
ह्मणौनि तो दैवांगला । वानित असो वेळोवेळां ।
साम्यसेजे डोला । लागला जेया ॥ ७३ ॥

**प्रकृत्यैव च कर्माणि क्रियमाणानि सर्वशः ।**
**यः पश्यति तथात्मानमकर्त्तारं स पश्यति ॥ २९ ॥**

आणि मनोबुद्धिप्रमुखें । कर्में जियें अशेखें ।
करी प्रकृति चि जो देखे । साचें जो गा ॥ ७४ ॥
घरिचीं चि राहाटति घरीं । घर कांहिं न करी ।
अभ्र धांवे अंबरीं । अंबर उगें ॥ ७५ ॥
तैसी प्रकृति आत्मप्रभा । खेळे गुणविधा शोभा ।
येथ आत्मा तो वोथंबा । नेणों कोणु ॥ ७६ ॥
ऐसेनि एणें निवाडें । जेयाचां जीविं उजिवडे ।
अकर्त्तेयातें फुडें । देखिलें तेणें ॥ ७७ ॥

**यदा भूतपृथग्भावमेकस्थमनुपश्यति ।**
**तत एव च विस्तारं ब्रह्म संपद्यते तदा ॥ ३० ॥**

यऱ्हविं तैं चि अर्जुना । होइजे ब्रह्मसंपन्ना ।
जैं इया भूताकृती भिन्ना । दीसति एकिं ॥ ७८ ॥
लहरिया जैसिया जाळिं । परमाणु–कणिका स्थळीं ।
रश्मिकर मंडळिं । सूर्याचां ॥ ७९ ॥
नातरि देहिं अवयव । मनिं आघवे भाव ।
विस्फुलिंग सर्व । वन्हि एकि ॥ १०८० ॥

तैसे भूताकार एकाचे । एथ दृष्टि रिगे जै साचें ।
तैं चि ब्रह्मसंपत्तिचें । तारुं लागे ॥ ८१ ॥
मग जिये तिये कडे । ब्रह्माची दृष्टि उघडे ।
किंबहुना जोडे । अपार सुख ॥ ८२ ॥
एतुलेनि तुज पार्था । प्रकृतिपुरुषवेवस्था ।
ठायें ठाउ प्रतीतिपंथा । माजि जाली ॥ ८३ ॥
अमृत जैसें ये चूळा । निधान जैसें देखिजे डोळां ।
तेतुला जीवाळा । मानावा हा ॥ ८४ ॥
वांचूनि जालिये प्रतिती । घर बांधणें चित्तिं ।
तें आतां ना सुभद्रापति । या वरि ॥ ८५ ॥
तरि एक दोनि ते बोल । बोलिजति सखोल ।
देइं मनाची वोल । मग तें घेइं ॥ ८६ ॥
ऐसें देवें ह्मणितलें । मग बोलों आदरिलें ।
तेथ अवधानाचें केलें । सर्वांग एरें ॥ ८७ ॥

**अनादित्वान्निर्गुणत्वात्परमात्मायमव्ययः ।**
**शरीरस्थोऽपि कौंतेय न करोति न लिप्यते ॥ ३१ ॥**

ह्मणे परमात्मा ह्मणिपे । तो ऐसा जाण सरूपें ।
जळिं जळें न सिंपे । सूर्यु जैसा ॥ ८८ ॥
कां जळा आधिं पाठिं । सूर्यु असतू चि किरीटी ।
माजि बिंबे ते दीठी । आणिकाचिये ॥ ८९ ॥
तैसा आत्मा देहिं । आथि ह्मणिपे हें काहिं ।
साचें तरि नाहिं । तो जेथिचा तेथ ॥ ॥ १०९० ॥
आरिसां मुख जैसें । बिंबलेया नावं असे ।
देहिं वसणें तैसें । आत्मतत्व ॥ ९१ ॥
तेया देहा ह्मणति भेटि । हे सपाइ नीजीव गोठि ।
वारेयानि वाळुवे गांठि । केहिं आहे ॥ ९२ ॥

आगि आणि पींसा । दोरा सुयी जैसा ।
केउता सांदा आकाशा । पाखाणेंसिं ॥ ९३ ॥
एक निगे पूर्वा कडे । एक तें पश्चिमें पडे ।
तिये भेटिचेनि पाडें । संबंधु हा ॥ ९४ ॥
उजियडा आंधारेया । जो पाडु मृता उभेया ।
तो चि गा आत्मेयां । देहा जाण ॥ ९५ ॥
रात्रि आणि दिवसा । कनका आणि कापुसा ।
पाडु कां जैसा । तैसा चि हा ॥ ९६ ॥
हें तवं पांचाचें जालें । कर्माचां गुणिं गुंतलें ।
भवंतसे चाकिं सूदलें । जन्ममृत्युचां ॥ ९७ ॥
हे कालानलाचां कुंडीं । घातली लोणियांची उंडी ।
मासी पांख पाखडी । तवं हे सरे ॥ ९८ ॥
हें विपाएं आगी पडे । तरि भस्म होनि उडे ।
जालें श्वाना वरिपडें । तरि ते चि विष्ठा ॥ ९९ ॥
यां चूके दोन्हीं काजां । तरि होये क्रिमिचा पुंजा ।
ऐसा परिणामु कपिध्वजा । कश्मलु गा ॥ ११०० ॥
या देहाची हे दशा । आणि आत्मा तो ऐसा ।
पैं सिद्धु नित्यु आपैसा । अनादिपणें ॥ १ ॥
सकलु ना निष्कलु । अक्रियु ना क्रियाशीलु ।
कृशु ना स्थूलु । निर्गुणपणें ॥ २ ॥
आभासु ना निराभासु । प्रकाशु ना अप्रकाशु ।
अल्पु ना बहुवसु । अरूपपणें ॥ ३ ॥
रीता ना भरितु । रहितु ना सहितु ।
मूर्त्तु ना अमूर्त्तु । शून्यपणें ॥ ४ ॥
आनंदु ना निरानंदु । एकु ना विविधु ।
मोकळा ना बद्धु । आत्मेपणें ॥ ५ ॥

एतुला ना तेतुला । आयिता ना रचला ।
बोलता ना उगला । अलक्षपणें ॥ ६ ॥
सृष्टिचां होणां न रचे । सर्वसंहारें न वेचे ।
आथिनाथि यां दोहींचें । पंचत्व तो ॥ ७ ॥
मवे ना चर्चे । वाढे ना खांचे ।
वीटे ना वेचे । अव्ययपणें ॥ ८ ॥
एवंरूपु पैं आत्मा । देहिं जे ह्मणति प्रियोत्तमा ।
तें मठाकारिं व्योमा । नावं जैसें ॥ ९ ॥
तैसें तियाचिये आनाभूती । होंती जांती देहाकृती ।
तो घे ना सांडी सुमती । जैसा तैसा ॥ ११११० ॥
अहोरात्रें जैसीं । होंति जांति आकाशीं ।
आत्मसत्ते तैसीं । देहें जाण ॥ ११ ॥
ह्मणौनि इये शरीरीं । काहिं करवी नां करी ।
आयितां हि व्यापारिं । सज्जु नोहे ॥ १२ ॥
या लागि स्वरूपें । उणा पुरा नेघेपे ।
हें असो तो न लिंपे । देहीं देहें ॥ १३ ॥

**यथा सर्वगतं सौक्ष्म्यादाकाशं नोपलिप्यते ।**
**सर्वत्रावस्थितो देहे तथात्मा नोपलिप्यते ॥ ३२ ॥**

आगा आकाश कें नाहिं । हें न रिगे चि कव्हणिये ठांइं ।
परि काइसेनि हिं काहिं । गादे चि ना ॥ १४ ॥
तैसा सर्वत्र सर्वदेहीं । आत्मा असतू चि असे पाहीं ।
परि संगदोपें एकें हिं । लितु नोहे ॥ १५ ॥
पुडुतिं पुडुतिं एथें । हें चि लक्षण निरुतें ।
जें जाणावें क्षेत्रज्ञातें । क्षेत्रविहीना ॥ १६ ॥
संसर्गे चेतविजे लोहें । परि लोह चि भ्रामक नोहे ।
क्षेत्रज्ञा आहे । तैसा पाडु ॥ १७ ॥

दीपकाचां अर्ची । राहाटि वाहे घरींची ।
तऱ्हीं वेगळीक कोडीची । दीपा घरा ॥ १८ ॥
असें काष्ठाचां पोटीं । वन्हि जैसा किरीटी ।
काष्ठ नोहे या दीठी । पाहिजे जेवि ॥ १९ ॥
अपाडु नभा आभाळा । रवी आणि मृगजळा ।
तैसा चि हा ई डोळा । देखावा पैं ॥ ११२० ॥

**यथा प्रकाशयत्येकः कृत्स्नं लोकमिमं रविः ॥**
**क्षेत्रं क्षेत्री तथा कृत्स्नं प्रकाशयति भारत ॥ ३३ ॥**

हें आघवें चि असो एकु । गगनौनि जैसा अर्कु ।
प्रकटवी लोकु । नावें नावें ॥ २१ ॥
एथ क्षेत्रज्ञु तैसा । प्रकाशकु क्षेत्राभासा ।
या वरौतें हें न पुसा । शंका नेघां ॥ २२ ॥
शब्दतत्वसारज्ञा । पैं ते चि देखणी प्रज्ञा ।
जे क्षेत्रा क्षेत्रज्ञा । अपाडु देखे ॥ २३ ॥
एयां दोहिंचें अंतर । देखावेया चतुर ।
ज्ञानियांचें दार । आराधिति ॥ २४ ॥
या चि लागि सुमती । जोडीति तपसंपत्ती ।
शास्त्रांचीं दुभतीं । पोसिति घरीं ॥ २५ ॥
योगाचेया आकाशा । वळविजे येवढा धिवंसा ।
याचिया चि आशा । पुरुषासि गा ॥ २६ ॥
शरीरादि समस्त । मानिताति अंतवंत ।
जीव संतांचे करित । वाहाणधर ॥ २७ ॥
ऐसिया ऐसिया परी । ज्ञानाचिया भरोवरी ।
करूनियां अंतरीं । निरुते होंति ॥ २८
मग क्षेत्रक्षेत्रज्ञाचें । ते अंतर देखति साचें ।
ज्ञानें उन्मेष तेयांचे । वोवाळूं आह्मीं ॥ २९ ॥

आणि महाभूतादिकिं । प्रभेदवेलिं अनेकिं ।
पसरली असे लटकी । प्रकृति जे हे ॥ ११३० ॥
ते शुकनलिकान्यायें । न लगती लागली आहे ।
हे जैसी तैसी होए । ठाउवें जेया ॥ ३१ ॥
जैसी माला ते माला । ऐसें चि देखिजे डोलां ।
सर्पबुद्धि तवं टवाला । उखी होउनि ॥ ३२ ॥
कां शुक्तिते शुक्ति । हें साच हे प्रतीति ।
रूपेयाची भ्रांति । जाउनियां ॥ ३३ ॥
तैसी वेगली वेगलेपणें । प्रकृति जे अंतष्करणें ।
देखति ते मी ह्मणें । ब्रह्म होंति ॥ ३४ ॥
जें आकाश होउनि वाड । जें अव्यक्ताची पैली कड ।
जें भेटलेयां आहाडबाहाड । पडों नेंदी । ३५ ॥

**क्षेत्रक्षेत्रज्ञयोरेवमंतरं ज्ञानचक्षुषा ।**
**भूतप्रकृतिमोक्षं च ये विदु र्यांति ते परं ॥ ३४ ॥**

आकारु जेथ सरे । जीवत्व जेथ वीरे ।
द्वैत जेथ नुरे । अद्वय जें ॥ ३६ ॥
तें परत्व पार्था । होंति ते सर्वथा ।
जें आत्मानात्मवेवस्था- । राजहंस ॥ ३७ ॥
ऐसा जी हा आघवा । श्रीकृष्णें तेया पांडवा ।
उगाणा दीधला जीवा । जीवाचेया ॥ ३८ ॥
एरी कलशिचें एरीं । रिचविलें जेया परी ।
आपणपें तेया हरी । दीधलें तैसें ॥ ३९ ॥
आणि कोणा देता कोणु । तो नरु तैसा नारायणु ।
वारे अर्जुनातें कृष्णु । हा मी ह्मणे ॥ ११४० ॥
परि असो हें नाथिलें । न पुसतां कां बोलें ।
किंबहुना दीधलें । सर्वस्व देवें ॥ ४१ ॥

किं तो पार्थु मनीं । आइुइं धणि न मनी ।
अधिकाधिक उतान्ही । वाढवितु असे ॥ ४२ ॥
स्नेहाचिया भरोवरी । आबुथिला दीपु घे थोरी ।
चाड अर्जुनाचां अंतरीं । परिसतां तैसी ॥ ४३ ॥
येथ सुगरणि उदारें । रसज्ञें जेवण्हारें ।
मिळति मग अवतरे । हातु जैसा ॥ ४४ ॥
तैसें जी होंतसे देवा । तेया अवधानाचेया लवलवा ।
वाखाण चढलें थावां । चौगुणे वेन्हीं ॥ ४५ ॥
सुवायें मेघु सांवेरे । जैसा चंद्रें सिंधु भरे ।
तैसा मातला रसु आदरें । श्रोतेयाचेनि ॥ ४६ ॥
आतां आनंदमय आघवें । विश्व चि कीजैल देवें ।
तें रायें परिसावें । संजयो ह्मणे ॥ ४७ ॥
एवं जें महाभारतीं । व्यासें अप्रांतमती ।
भीष्मपर्वी शांतिं । ह्मणितली कथा ॥ ४८ ॥
तो कृष्णार्जुनसंवादु । नागारें बोलिं विशदु ।
सांघों दाउं बंधु । वोवियेचा ॥ ४९ ॥
नसुदी चि शांतीकथा । आणिजैल किर वाक्यपथा ।
परि श्रिंगाराचां माथां । पावो ठेविति ॥ ११९० ॥
दाउं वेल्हाळ देशी नवी । जैसी साहित्यातें वोजावी ।
अमृता ही चूकि ठेवी । गोडिसेपणें ॥ ५१ ॥
बोलु वेल्हावितेनि गुणें । चंद्रासि घे उमाणें ।
रसुभंगु भुलवणें । नादु लोपी ॥ ५२ ॥
खेचरांचेया ही मना । आणि सात्विकाचा पान्हा ।
श्रवणा सवें सुमना । समाधि जोडे ॥ ५३ ॥
तैसा वाग्विलासु विस्तारुं । गीतार्थी विश्व भरुं ।
आनंदाचें आवारुं । मांडू जगा ॥ ५४ ॥

फीटो विवेकाची वाणि । हो काना मना जीणि ।
देखो आवडे ते खाणि । ब्रह्मविद्येची ॥ ५५ ॥
दीसो परतत्व डोळां । पाहो सुखाचा सोहळा ।
रिगो महाबोधु सुकाळा । माजि विश्व ॥ ५६ ॥
हें निफजे आतां आघवें । ऐसें बोलिजैल बरवें ।
जें अधिष्ठली असें परदेवें । निवृत्ती मीं ॥ ५७ ॥
ह्मणौनि आखरीं सुभेदिं । उपमाश्लेषकोंदाकोंदी ।
झाडा देईन प्रतिपदीं । ग्रंथार्थासि ॥ ५८ ॥
हा ठाउ॰ वेरि मातें । पुरतेयां आहे सारस्वतें ।
केलें असे श्रीमंतें । गुरुरायें ॥ ५९ ॥
तेणें जी कृपासावायें । मी बोलें तेतुलें सामाये ।
आणि तुमचिये सभे लाहें । गीतार्थु ह्मणों ॥ ११६० ॥
वरि तुह्मां संतांचे पाये । आजि मी पातलां आहें ।
ह्मणौनि जी नोहे । अटक काहिं ॥ ६१ ॥
प्रभू काश्मिरीं मूकें । नुपजे जी कवतुकें ।
नाहिं गुणिं सामुद्रिकें । लक्ष्मीयेसि ॥ ६२ ॥
तैसी तुह्मां संतां पासिं । अज्ञानाची गोठि काइसी ।
या लागि नवरसिं । वरिखैन मीं ॥ ६३ ॥
किंबहुना आघवां । मज अवसरु देयावा ।
ज्ञानदेउ॰ ह्मणे बरवा । सांघैन ग्रंथु ॥ ६४ ॥

ॐ तत्सदितिश्रीमद्भगवद्गीतासूपनिषत्सु ब्रह्मविद्यायां योगशास्त्रे श्रीकृष्णार्जुनसंवादे क्षेत्रक्षेत्रज्ञयोगो नाम त्रयोदशोध्यायः ॥

॥ सर्वात्मकश्रीकृष्णार्पणमस्तु ॥

# ज्ञानेश्वरी

## अध्याय चौदावा

श्रीगणेशायनमः ॥

जय जय आचार्या । समस्तसुरवर्या ।
प्रज्ञाप्रभातसूर्या । सुखोदया ॥ १ ॥
जय जय सर्वविसांवेया । सोहंभावसुहावेया ।
नानालोकहेलावेया । समुद्रा तूं ॥ २ ॥
आइकैं गा आर्त्तबंधू । निरंतरकरुणासिंधू ।
विशदविद्यावधू–। वल्लभा जी ॥ ३ ॥
तूं जेया प्रतिलपसि । तेया जग हें दाविसि ।
प्रकट तैं करिसी । आघवें तूं ॥ ४ ॥
पुढैलां तरि चोरिजे । हा दृष्टिबंधु निफजे ।
नवल लाघव तूझें । घरिचां घरीं ॥ ५ ॥
जें तूं चि तूं सर्वा एया । कवणा बोधु कवणा माया ।
ऐसें आपें आपु लाघविया । नमो तूज ॥ ६ ॥
जाणों जगीं आप बोलें । हें रस जी तुवां केलें ।
तूझेनि क्षेमत्व आलें । पृथ्वियेसि ॥ ७ ॥
रविचंद्रादिशूक्ति । उदो करितां त्रीजगती ।
तें तूझिया दीप्ती । तेज तेजां ॥ ८ ॥

चलबलिजे अनिलें । तें देविकेनि जी बळें ।
नभ तुज माजि खेळे । लपीं थपीं ॥ ९ ॥
किंबहुना माया असोस । ज्ञान तूझेनि डोळस ।
असो वानणें सायास । श्रुतिसि हे ॥ १० ॥
वेद जें वानूनि चांग । जवं न दिसे तूझें आंग ।
मग आह्मा तेया मूग । एकी पांती ॥ ११ ॥
जी एकार्णवाचां ठांइं । बुडडेयांचा पाडु नाहीं ।
मग महानदी काई । जाणिजती ॥ १२ ॥
कां उदैलेयां भास्वतु । चंद्र जैसा खद्योतु ।
आह्मा श्रुती तुज आंतु । तेतुला पाडु ॥ १३ ॥
आणि दूजेया थाउ मोडे । जेथ परेसिं वैखरी बुडे ।
तो तूं मां कवणें तोंडें । वानावासि ॥ १४ ॥
येया लागि आतां । स्तुति सांडुनि निवांतां ।
चरणीं ठेविजे माथा । हें चि भलें ॥ १५ ॥
तरि तूं जो होसि तेया । नमो श्रीगुरुराया ।
मज ग्रंथउद्यमु फळावेया । वेन्हारा होईं ॥ १६ ॥
आतां कृपाभांडवल सोडीं । भरीं मति माझी पोतडी ।
करीं ज्ञानपदजोडी । थोर मातें ॥ १७ ॥
मी सवंसरेनि तेणें । संतांसि करीं कर्णभूषणें ।
लेववीन सुलक्षणें । विवेकाचीं ॥ १८ ॥
जी गीतार्थुनिधान । काढू माझें मन ।
सुईं स्नेहांजन । आपुलें तूं ॥ १९ ॥
हे वागभृष्टि येकें वेळें । देखति बुद्धीचे डोळे ।
तैसा उदैजो निर्मळें । कारुण्यबिंबें ॥ २० ॥
माझी प्रज्ञावेलिवें वेल्हाळ । काव्यें होंति सुफळ ।
तो वसंतु होईं स्नेहाळ । शिरोमणी ॥ २१ ॥

प्रमेयमहापुरें । हे मतिगंगा भरे ।
तैसा वरिष उदारें । दीठिवेनि ॥ २२ ॥
आगा विश्वैकधामा । तूझा प्रसादु चंद्रमा ।
करू मज पूर्णिमा । स्फूर्तिची जी ॥ २३ ॥
जिया पाहिलें मातें । उन्मेखसागरिचें भरितें ।
वोसंडैल तें । रस–वृत्तिचें ॥ २४ ॥
तवं तोखौनि गुरुराजें । ह्मणितलें विनतिव्याजें ।
मांडिलें देखों दुजें । स्तवुं तुवां ॥ २५ ॥
हें असो आतां वाजटा । तो ज्ञानकर्पूर गोमटा ।
ग्रंथु दावि उत्कंठा । भंगों नेदीं ॥ २६ ॥
हो कां जी जी स्वामी । हें चि पाहांतु असें मीं ।
जें श्रीमुखें ह्मणां तुह्मीं । ग्रंथु सांघैं ॥ २७ ॥
जी दूर्वेचा हीरु । आंगें चि तवं अमरु ।
वरि आला महापूरु । पीयुषाचा ॥ २८ ॥
तरि आतां एणें प्रसादें । विन्यासें विदग्धें ।
मूळशास्त्रपदें । वाखाणीन ॥ २९ ॥
परि जीवा आंतुली कडे । जैसी संदेहडोणी बुडे ।
मग श्रवणचाडे । आवाडि दीसे ॥ ३० ॥
तैसां बोलीं साचारीं । अवतरो माझी माधुरी ।
माळें मागैन घरीं । गुरुकृपेचां ॥ ३१ ॥
तरि मागां त्रयोदशीं । अध्याइं गोठि ऐसी
जें श्रीकृष्णु अर्जुनेंसीं । संवादले ॥ ३२ ॥
जें क्षेत्रक्षेत्रज्ञयोगें । होइजे येणें जगें ।
आत्मा गुणसंगें । संसारिया ॥ ३३ ॥
आणि हा चि प्रकृतिगतु । सुखदुःखभोगीं हेतु ।
अथवा गुणातीतु । केवळु हा ॥ ३४ ॥

तरि कैसा यां असंगा संगु । कोणु तो क्षेत्रक्षेत्रज्ञयोगु ।
सुखदुःखादि भोगु । केवि तेया ॥ ३५ ॥
गुण ते कैसे केती । बाधति कवणां रीती ।
नातरि गुणातीतीं । चिन्हु काई ॥ ३६ ॥
एवं येया आघवेया । अर्था रूप करावेया ।
विषो एथ चौदावेया । अध्यायासि ॥ ३७ ॥
तरि तो चि आतां ऐसा । प्रस्तुतु परियसां ।
अभिप्राउ विश्वेशा । वैकुंठाचा ॥ ३८ ॥

**श्रीभगवानुवाच ॥**

**परं भूयः प्रवक्ष्यामि ज्ञानानां ज्ञानमुत्तमं ॥**
**यज्ज्ञात्वा मुनयः सर्वे परां सिद्धिमितो गताः ॥ १ ॥**

तो ह्मणे गा अर्जुना । अवधानांची सर्व सेना ।
मेळउनियां ज्ञाना । झोंबावें हो ॥ ३९ ॥
आह्मीं मागां बहुतीं । दाविलें तुज उपपत्तीं ।
आझुइं प्रतीती । कुंसि न निगे ॥ ४० ॥
ह्मणौनि गा पुढुतीं । सांघिजैल प्रतिपत्ती ।
परि ह्मणह्मणों श्रुती । डाहारिजे जें ॥ ४१ ॥
एऱ्हवीं ज्ञान हें आपुलें । परि पर हें ऐसें जालें ।
जें अवर घेतलें । स्वर्गादि एणें ॥ ४२ ॥
एणें चि गा कारणें । हें सर्वां उपरि मीं ह्मणें ।
तें वन्हि यें तृणें । एरें ज्ञानें ॥ ४३ ॥
जियें स्वर्गादि तें जाणति । याग चि चांग ह्मणति ।
पारखि फुडी आथि । भेदीं जेयां ॥ ४४ ॥
तियें आघवीं चि ज्ञानें । केलीं एणें स्वप्नें ।
जैसे वातोर्मि गगनें । गीळिले आथि ॥ ४५ ॥

कां उदितें रश्मिराजें । लोपतीं चंद्रादि तेजें ।
नाना प्रलयांबुमाजें । नदीनद ॥ ४६ ॥
तैसें हें पाहालेयां । अज्ञानजात जाये लया ।
ह्मणौनि धनंजया । उत्तम हें ॥ ४७ ॥
अनादि जे मुक्तता । आपुली जे पांडुसुता ।
तो मोक्षु हाताइता । होये जेणें ॥ ४८ ॥
येयाचिया प्रतीती । विचारविरिं समस्तीं ।
नेंदिजे चि संशृती । माथा उधों ॥ ४९ ॥
मनें मन घाल्लनियां मागें । विश्रांति जालेयां आंगें ।
देहीं देहा जोगे । होती चि ना ॥ ५० ॥
मग देहाचें बेलें । उल्लांडूनि येकें वेलें ।
समतूकीं काटालें । मसीं जाले ॥ ५१ ॥

**इदं ज्ञानमुपाश्रित्य मम साधर्म्यमागताः ॥**
**सर्गेपि नोपजायंते प्रलये न व्यथंति च ॥ २ ॥**

जे माझिया नित्यता । नित्य ते पांडुसुता ।
परिपूर्ण पूर्णता । माझिया चि ॥ ५२ ॥
मी जैसा अनंतानंदु । जैसा चि सत्वसिद्धु ।
तैसा चि तेया भेदु । उरे चि ना ॥ ५३ ॥
जें मीं जेवडें जैसें । तें चि ते जाले तैसें ।
घटभंगीं घटाभासें । आकाश जेवि ॥ ५४ ॥
नातरि दिवा मुकुलिकीं । दीपशिखा अनेकीं ।
मीनलेयां अवलोकीं । जैसें होये ॥ ५५ ॥
अर्जुना तिया परीं । सरली द्वैताची वारी ।
नांदो नामार्थ एकाहारी । आह्मीं ते ही ॥ ५६ ॥
एणें चि पैं कारणें । जैं पहिलें शृष्टिजुंपणें ।
तैं तेयां होणें । पडे चिं ना ॥ ५७ ॥

सृष्टिचिये सर्वादी । जेयां देहाची नाहिं बाधी ।
तें कैंचे प्रळयाधी । निमतील पां ॥ ५८ ॥
ह्मणौनि जन्मक्षयां । अतीत ते धनंजया ।
मी जालां ज्ञाना येया । अनुसरौनि ॥ ५९ ॥
ऐसी ज्ञानाची गोडी । वानिली देवें आवडी ।
तेविं चि पार्था सिचडी । लावावेया ॥ ६० ॥
तवं तेया जालें आन । सर्वांगिं निगाले कान ।
सपाई अवधान । पातला तो ॥ ६१ ॥
आतां देवाचेया ऐसें । जाकळिजत वोरसें ।
निरूपण आकाशें । वेंटाळे ना ॥ ६२ ॥

**मम योनिर्महद्ब्रह्म तस्मिन्गर्भं दधाम्यहं ॥**
**संभवः सर्वभूतानां ततो भवति भारत ॥ ३ ॥**

तो ह्मणे गा प्रज्ञाकांता । आजि उजळली वागतृता ।
जें बोला एवडा श्रोता । जोडलासि ॥ ६३ ॥
तरि एकु मीं अनेकीं । गोंविजे देहपाशकीं ।
त्रिगुणलुब्धकीं । कवणी परीं ॥ ६४ ॥
कैसा क्षेत्रयोगें । वियें येणें जगें ।
तें परियस सांघों वेगें । कोण आतां ॥ ६५ ॥
पैं क्षेत्र येणें व्याजें । हें या चि लागि बोलिजे ।
जें मत्संगबीजें । भूतीं पिके ॥ ६६ ॥
आणि महद्ब्रह्म । हें इये ऐसें नाम ।
जें महदादिविश्राम–। शालिका हे ॥ ६७ ॥
विकारां बहुसै थोरी । अर्जुना हे चि करी ।
ह्मणौनि अवधारीं । हें महद्ब्रह्म ॥ ६८ ॥
अव्यक्तवादमतीं । अव्यक्त ऐसी वदंती ।
सांख्याचिया प्रतीती । प्रकृति हे चि ॥ ६९ ॥

वेदांतीं यातें माया । ह्मणिजे प्रज्ञाराया ।
केती बोलों वायां । अज्ञान हें गा ॥ ७० ॥
आपुला आपणेयां । विसरु जो धनंजया ।
तें गा रूप येया । अज्ञानासि ॥ ७१ ॥
आणिक ही येक असे । जें विचारा वेगळें न दिसे ।
वाती पाहातां जैसें । आंधारें कां ॥ ७२ ॥
हाळविळेयां जाये । निश्चळ तरि राहे ।
दूधीं जैसी साये । दूधा चि तत्र ॥ ७३ ॥
पैं जागरु ना स्वप्न । स्वरूप ना अवस्थान ।
ते सुषुप्ति घन । जैसी होये ॥ ७४ ॥
कां न वियतां वायुतें । वांझें आकाश रीतें ।
तेया ऐसें निरुतें । अज्ञान गा ॥ ७५ ॥
पैलु खांबु कां पुरुषु । ऐसा निश्चयो नाहिं येकु ।
काइ नेणों अवलोकु । देखतसे ॥ ७६ ॥
तेवि वस्तु जैसें असे । तैसें किर न दिसे ।
परि काहिं अनारिसें । देखिजे ना ॥ ७७ ॥
नां राति ना तेज । तिये संधी जैसी सांज ।
तेवि विरुद्ध ना नीज । ज्ञाना आथि ॥ ७८ ॥
ऐसी कोण्ही येकि दशा । तिये वादु अज्ञान ऐसा ।
तिया गुंडाळलिया प्रकाशा । क्षेत्रज्ञ नावं ॥ ७९ ॥
अज्ञान थोरिये आणिजे । आपणपें तरि नेणिजे ।
तें रूप जाणिजे । क्षेत्रज्ञाचें ॥ ८० ॥
हा चि उभययोगु । बुझें बाण चांगु ।
सत्तेचा नैसर्गु । स्वभाउ हा ॥ ८१ ॥
आतां अज्ञानां सारिखें । वस्तु आपणपेयातें देखे ।
परि रूपें अनेकें । नेणों कोणें ॥ ८२ ॥

जैसा रंकु भ्रमला। ह्मणे जा रे मी राऊ आलां।
कां मूर्छीतु गेला। स्वर्गलोका ॥ ८३ ॥
तेवि लचकलिया दीठी। देखणें जें जें उठी।
तेयां नावं सृष्टी। मी वियें गा ॥ ८४ ॥
हे चि आनी भ्रांती। प्रमेय उपलउं पुडुतीं।
तरि तूं प्रतीती। इयाचि घेइं ॥ ८५ ॥

**सर्वयोनिषु कौंतेय मूर्त्तयः संभवंति याः॥**
**तासां ब्रह्म महद्योनि रहं बीजप्रदः पिता ॥ ४ ॥**

तरि माझी घरणी। अनादि तरुणी।
अर्वाच्य गुणीं। अविद्या पैं ॥ ८६ ॥
माझेनि चि आंगें। पहुडल्यां हे जागे।
आणि सत्तासंभोगें। गुर्विणी होये ॥ ८७ ॥
महद्ब्रह्मउदरीं। प्राकृतें आठें विकारीं।
गर्भाची करी। पेलेवेली ॥ ८८ ॥
इये नाहिं हें चि रूप। ठाणें हें उमप।
निद्रितां समीप। चेंतां दूरि ॥ ८९ ॥
पैं उभयसंगु पहिलें। बुद्धित्वें उमले।
बुद्धितत्वें भारैलें। होये मन ॥ ९० ॥
तारुण्यता मनाची। अहंकारत्व रची।
तेणें महाभूतांची। अभिव्यक्ति होये ॥ ९१ ॥
आणि विषयइंद्रियां गोसी। स्वभावें तरि भूतांसि।
ह्मणौनि येंति सरिसीं। त्यें हीं रूपा ॥ ९२ ॥
जालेनि विकारक्षोभें। पाठिं गुणाचेनि उभे।
येवं संपूर्ण जे गर्भे। वायें ठाऊ ॥ ९३ ॥
रुंखाचा ये वांका। जैसी कां बीजकणिका।
जीवि बांधे उदका। भेटतखेऊ ॥ ९४ ॥

तैसी माझेनि संगें । अविद्या नाना जगें ।
आरवों लागे । आपणपां चि ॥ ९५ ॥
मग गर्भगोला तेया । कैसी रूपसै ये आया ।
परियसैं राया । सजनाचेया ॥ ९६ ॥
पैं अंडज स्वेदज । जारज उद्बीज ।
उमटति सहजं । अवेव हे ॥ ९७ ॥
व्योमवायुवसें । वांटलेनि गर्भरसें ।
मणिजु उससे । अवेवु तो ॥ ९८ ॥
पोटीं सूनि तमरजें । आगलिका तोय तेजें ।
उठितां निफजे । स्वेदज गा ॥ ९९ ॥
आपपृथ्वीउत्कटें । आणि तमोमात्रें निकृष्टें ।
स्थावरु उमटे । उद्बीजु हा ॥ १०० ॥
पांचां पांच विरजीं । होंति मनबुध्यादि सहजीं ।
आणि इये चि जारजीं । ऐसें जाणैं ॥ १ ॥
ऐसे हे सरल । करचरणतल ।
महाप्रकृति स्थूल । तें चि शिर ॥ २ ॥
प्रवृत्ती पेललें पोट । निवृत्ति ते पाठि नीट ।
सुरयोनि आंगें आठ । ऊर्ध्वाचीं ॥ ३ ॥
कंठु उल्हासता स्वर्गु । मृत्युलोकु मध्यभागु ।
अधोदेशु चांगु । नितंबु तो ॥ ४ ॥
ऐसें लेंकरुं एक । प्रसवली हे देख ।
जेयाचे तीन्ही लोक । बालसें गा ॥ ५ ॥
चौरासी लक्ष योनी । तियें कांडीं पेरी संधानी ।
वाढे प्रतिदीनी । बालक हें ॥ ६ ॥
नाना देह अवेवीं । नामाचीं लेणीं लेववी ।
मोहो स्तनें वाढवी । नीचनवेनि ॥ ७ ॥

सृष्टी वेगळवेगळिया । त्या चि करां आंगुलिया ।
भिन्ना अभिमाना सूदलिया । मुदिया तेथ ॥ ८ ॥
हें एकलौतें चराचर । अविचारतें सुंदर ।
प्रसवौनि थोर । थोरावली ॥ ९ ॥
पैं ब्रह्मा प्रातःकाळु । विष्णु तो मध्यान्हवेळु ।
सदाशिव उवीळु । बालका येया ॥ ११० ॥
महाप्रलयसेजें । खेळौनि आलें नीजे ।
विषमज्ञानें उमजे । कल्पोदईं ॥ ११ ॥
अर्जुना इया परीं । मिथ्यादृष्टिचां घरीं ।
युगावृत्तिचीं करी । चोजवाउलें ॥ १२ ॥
संकल्पु याचा इष्टु । अहंकारु तो नीकटु ।
जैं होये तैं सेवटु । ज्ञानें येया ॥ १३ ॥
आतां असो बहू बोली । ऐसें विश्व माया व्याली ।
तेथ चांग जाली । माझी सत्ता ॥ १४ ॥
येया कारणें मी पिता । महद्ब्रह्म माता ।
अपत्य हा पांडुसुता । जगडंबरु ॥ १५ ॥
आतां शरीरें बहुतें । देखौनि न भेदें हो चित्तें ।
जें मनबुद्धिभूतें । एकें ययां ॥ १६ ॥
हांगा एकी चि देहीं । काइ आनारिसे अवेव नाहिं ।
तेवि विचित्र विश्व पाहीं । एक चि हें ॥ १७ ॥
पैं उंचा नीचा डाहालिया । विषमा वेगळालिया ।
एका चि जेवि जालिया । बीजाचिया ॥ १८ ॥
आणि संबंधु तो ही ऐसा । मृन्मयो घटु कां जैसा ।
कां पटत्व कापुसा । आंतु होये ॥ १९ ॥
नाना कल्लोळपरंपरा । संतति जैसी सागरा ।
आह्मा आणि चराचरां । तैसा पाडु ॥ १२० ॥

ह्मणौनि वन्हि ज्वाल । दोन्ही वन्ही चि केवल ।
तेवि मी गा हें सकल । समंधु वाउगा ॥ २१ ॥
जालेनि जगें मी झांकें । तरि जगत्वें कोणु फांके ।
कीलेवारी माणिकें । लोपिजे काइ ॥ २२ ॥
कां अलंकारत्व आलें । आणि सोनेपण काइ गेलें ।
किं कमलत्व फांकले— । पणें जाये ॥ २३ ॥
सांघ पां धनंजया । अवेवी अवेवीया ।
आछादिजे किं तेया । तें चि रूप ॥ २४ ॥
विरूढलेयां जोन्हला । कणिसांचा निर्वाला ।
वेचला कीं आगला । दीसतसे ॥ २५ ॥
ह्मणौनि जग परौतें । सारूनि पाहिजे मातें ।
तैसा न्हवे उखितें । आघवें चि मीं ॥ २६ ॥
हा तूं साचोकारा । निश्चयाचा खरा ।
गांठि बांध पां वीरा । जीवाचिये ॥ २७ ॥
आतां मियां मज दाविलां । शरीरीं वेगलालां ।
गुणीं मीं चि बांधलां । ऐसा आवडे ॥ २८ ॥
जैसें स्वप्नीं आपण । उठौनि आत्ममरण ।
भोगिजे गा जाण । कपिध्वजा ॥ २९ ॥
कां कवलातें डोले । प्रकाशूनि पीवलें ।
देखति तें हीं कले । तेयांसी चि ॥ १३० ॥
नाना सूर्य प्रकाशें । प्रकटी तें अभ्र भासे ।
तो लोपला हें इं दीसे । सूर्यें चि ॥ ३१ ॥
पैं आपणपेनि जालियां । छाया गा आपुलिया ।
भीउनि भियालियां । आवडिजे ॥ ३२ ॥
तैसीं इयें नाना देहें । दाउनि मीं नाना होयें ।
एथ ऐसा बंध आहे । तें हीं देखें ॥ ३३ ॥

बद्ध कां न बंधिजे । जाणणें मज माझें ।
हें नेणणेनिउपजे । आपुलेनि ॥ १३४ ॥

**सत्वं रजस्तम इति गुणाः प्रकृतिसंभवाः ॥**
**निबध्नंति महाबाहो देहे देहिनमव्ययं ॥ ५ ॥**

तरि कोणें गुणें कैसा । मज चि मीं बद्ध ऐसा ।
आवडे तें परियसां । अर्जुनदेवा ॥ ३५ ॥
गुण ते किंधर्म । काइ येया नाम ।
कें जाले हें वर्म । अवधारिजो ॥ ३६ ॥
तरि सत्वरजतम । तीवांसि हें चि नाम ।
आणि प्रकृति जन्म- । भूमि येयां ॥ ३७ ॥

**तत्र सत्वं निर्मलत्वात्प्रकाशकमनामयं ॥**
**सुखसंगेन बध्नाति ज्ञानसंगेन चानघ ॥ ६ ॥**

तेथ सत्व तें उत्तम । रज तें मध्यम ।
तिहिं माझि तम । सवियां धारें ॥ ३८ ॥
हें एकी चि वृत्तिचां ठाइं । त्रिगुणत्व आलें पाहीं ।
वयसात्रय देहीं । एकिं जेवि ॥ ३९ ॥
कां मीनलेनि कीडें । जवं जवं तूक वाढे ।
तवं तवं सोनें पडे । पांचिकां कसीं ॥ १४० ॥
पैं सावधपणें जैसें । वाहविलें आलसें ।
सुषुप्ति बैसे । घणावौनि ॥ ४१ ॥
तैसी अज्ञानांगिकारें । निगाली वृत्ति विस्तारे ।
तें सत्वरजद्वारें । तम हीं होए ॥ ४२ ॥
अर्जुना गा जाण । येया नावं गुण ।
आतां दाउं खुण । बांधती ते ॥ ४३ ॥
तरि क्षेत्रज्ञदशे । आत्मा मोटका प्रवेशे ।
हें देह मी ऐसें । मुहूर्त्त करी ॥ ४४ ॥

आजन्ममरणांतीं । देहधर्मसमस्तीं ।
ममत्वाची सूती । घे ना जवं ॥ ४५ ॥
जैसें मीनाचां तोंडीं । पडे ना जवं उंडी ।
तवं गलु आसुडी । जलचारधी ॥ ४६ ॥
तेवि सत्वें लुब्धकें । सुखज्ञानाचीं पाशिकें ।
वोढिजतां खुडुकें । जैसा मृगु ॥ ४७ ॥
मग ज्ञानें चडफडी । सुख वरि खुरखोडी ।
स्वयंसुख हें धाडी । हातिचें गा ॥ ४८ ॥
तेव्हलि विद्यामानें तोखे । लाभमात्रें हरिखे ।
मी संतुष्ट हें इं देखे । श्लाघों लागे ॥ ४९ ॥
ह्मणे भाग्य ना माझें । आजि सुखियें नाहिं दूजें ।
विकारें फुंजे । सात्विकाचेनि ॥ १५० ॥
आणि येणें हिं न सरे । लांकण लागे दुसरें ।
जें विद्वत्तेचें भरे । भूत आंगीं ॥ ५१ ॥
आपण चि ज्ञान आहे । तें गेलें हें दुःख नोहे ।
किं विषयज्ञानें होये । गगना एवडा ॥ ५२ ॥
राउ जैसा स्वप्नीं । रंकपणें रिगाला धानी ।
तो गोमटेनि एकें मानी । इंद्र ना मीं ॥ ५३ ॥
तैसें गा देहातीता । जालेयां देहवंतां ।
हों लागे पांडुसुता । बाह्यज्ञानें ॥ ५४ ॥
प्रवृत्तिशास्त्रें बुझे । यज्ञविद्या उमजे ।
किंबहुना सुजे । स्वर्गु वेरीं ॥ ५५ ॥
आणि ह्मणे आजि आन । मी वांचूनि नाहिं सज्ञान ।
चातुर्यचंद्रगगन । माझें चित्त ॥ ५६ ॥
ऐसें सत्व सुखज्ञानीं । जीवासि लाउनि कान्ही ।
बैलाची करी वानी । पांगुळाचेया ॥ ५७ ॥

**रजो रागात्मकं विद्धि तृष्णासंगसमुद्भवं ॥**
**तन्निबध्नाति कौंतेय कर्मसंगेन देहिनं ॥ ७ ॥**

आतां हा चि शरीरीं । रजें जिया परीं ।
बांधिजे तें अवधारीं । सांघिजैल ॥ ५८ ॥
हें जीवीं मोटकें रिगे । आणि कामाचां मार्गीं लागे ।
मग वारेया वळघे । तृष्णेचिया ॥ ५९ ॥
हें रज यया चि कारणें । जें जीवातें रंजौं जाणे ।
अभिलाखाचें तरुणें । सबाह्य गा ॥ १६० ॥
आबुथुनि आगियालें । वज्राग्नीतें सांदुकिलें ।
आतां बहू थेकुलें । आहे तेथ ॥ ६१ ॥
तैसी खवळली चाड । होये दुःखा सकट गोड ।
इंद्रश्री ही सांकड । गमों लागे ॥ ६२ ॥
तिया तृष्णा वाढिनलिया । मेरु ही हाता आलेयां ।
ह्मणे वळघों एकादेया । दारुणा हीं ॥ ६३ ॥
आजि असतें वेचिजैल । तरि पाहे काइ कीजैल ।
ऐसा पांगीं वडील । व्यवसाय गा ॥ ६४ ॥
जीविताची कुरवंडी । वोवाळुं लागे कवडी ।
मानी तृणाचिया जोडी । कृतकृत्यता ॥ ६५ ॥
ह्मणे स्वर्गा हान जावें । तरि काइ तेथ खावें ।
यया लागि धांवे । याग करूं ॥ ६६ ॥
व्रता पाठिं व्रतें । आचरे इष्टापूर्तें ।
काम्यें वांचूनि हातें । सीवे चि ना ॥ ६७ ॥
ग्रीष्मांतिचा वारा । विसवों नेणे वीरा ।
तैसा न ह्मणे व्यापारां । राति दिऊ ॥ ६८ ॥
काइ चंचळु मासा । कामिनीकटाक्षु काइसा ।
वळला होये तैसा । वीजु नाहिं ॥ ६९ ॥

तेतुलेनि गा वेगें । स्वर्गसंसारुपांगें ।
आगी माजि रिगे । क्रियेचिया ॥ १७० ॥
ऐसा देहीं देहा वेगला । ले तृष्णेचिया सांखला ।
टोपु वाहे गलां । व्यापाराचा ॥ ७१ ॥
हें रजोगुणाचें दारुण । देहिं देहियासि धारण ।
परियसां विंदाण । तमाचें तें ॥ ७२ ॥

**तमस्त्वज्ञानजं विद्धि मोहनं सर्वदेहिनां ॥**
**प्रमादालस्यनिद्राभिस्तन्निबध्नाति भारत ॥ ८ ॥**

व्यवहाराचे ही डोले । मंद जेणें पडलें ।
मायारात्रिचें कालें । मेहुडें जें ॥ ७३ ॥
अज्ञानाचें जियालें । जेया येका लागलें ।
जेणें विश्व भुललें । नाचत असे ॥ ७४ ॥
अविवेकमहामंत्र । जें मौढ्यमद्याचें पात्र ।
हें असो मोहनास्त्र । जीवासि जें ॥ ७५ ॥
पार्था तें गा तम । रचूनि ऐसें वर्म ।
चौखुरी देहात्म । मानीयातें ॥ ७६ ॥
हें ये विकारि शरीरीं । माजों लागे चराचरीं ।
आणि तेथ दुसरी । गोठी नाहिं ॥ ७७ ॥
सर्वेंद्रियां जाड्य । मना माझि मौढ्य ।
माल्हांत दार्ढ्य । आलस्याचें ॥ ७८ ॥
आंगमोडामोडी । कार्यजातां अनावडी ।
नुसंते परिवडी । जांभैयांची ॥ ७९ ॥
उघडिया चि दीठी । देखणें नाहि किरीटी ।
नालवितां उठी । ओहा ह्मणौनि ॥ १८० ॥
पडिलिये धोंडी । कोण कानी मुरडी ।
तिया चि परिवडी । टलों नेणें ॥ ८१ ॥

पृथ्वी पाताळा जाऊ । कां आकाश वरि एऊ ।
परि उठावें ऐसा भाऊ । मनी नाहिं ॥ ८२ ॥
उचितानुचित आघवें । ज्ञासुरतां हिं जीवें ।
तेथिचा तेथ लोळावें । ऐसी मेधा ॥ ८३ ॥
उभूनि करतळें । पडिघाये कपोळें ।
पायांचें सिराळें । मांडूं लागे ॥ ८४ ॥
आणि निद्राविषिं चांगु । जीवीं आथि लागु ।
झोंपि जांतां स्वर्गु । वाऊ ह्मणे ॥ ८५ ॥
ब्रह्मायुषां होइजे । मग निजैलेयां चि असिजे ।
हें वांचूनि दूजें । व्यसन नाहीं ॥ ८६ ॥
वाटे जातां वुगें । कल्हातां हीं डोळों लागे ।
अमृत ही परि नेघे । जरि नीद ए ॥ ८७ ॥
तेवि चि आक्रोशबळें । व्यापारें कोण्हीं वेळे ।
तरि निगाळें आंधळें । रोसें जैसें ॥ ८८ ॥
केधवां कैसें राहाटावें । कोणेंसिं काइ बोलावें ।
हें टाकतें किं नांगवे । काहिं चि नेणे ॥ ८९ ॥
वणवा मियां आघवा । पाखें चि पूसूनु नेयावा ।
पतंगु इया हावां । घाली जेवि ॥ १९० ॥
तैसा वळघे सहसा । अकारणीं धिवंसा ।
किंबहुना ऐसा । प्रमादु रुचे ॥ ९१ ॥
एवं निद्राआलस्यप्रमादीं । तम इहिं त्रिविधिं ।
देहिं बांधे निरुपाधी । चोखटातें ॥ ९२ ॥

**सत्वं सुखे संजयति रजः कर्मणि भारत ॥**
**ज्ञानमावृत्य तु तमः प्रमादे संजयत्युत ॥ ९ ॥**

जैसा वन्हि काष्टीं भरे । तैं दीसे काष्टाकारें ।
व्योम घटें आवरे । तें घटाकाश ॥ ९३ ॥

नाना सरोवर भरलें । तेथ चंद्रत्व बिंबलें ।
गुणाभासिं बांधलें । ऐसें गमे ॥-९४ ॥
परिहरौनि कफवात । जैं देहीं आटोपे पित्त ।
तैं करी संतत । देह जेविं ॥ ९५ ॥
कां वर्षाति जैसे । जीणौनि शीत चि दीसे ।
तेव्हलि होये हींवा ऐसें । आकाश हें ॥ ९६ ॥
नाना स्वप्न जाग्रती । लोपूनि ये सुषुप्ती ।
तै क्षणु येकु धृती । तें चि होये ॥ ९७ ॥
तैसीं रजतमें हारवी । जैं सत्व माजु मिरवी ।
तैं जीवा करवि. ह्मणवी । सुखिया नामीं ॥ ९८ ॥
तैसें चि सत्व रज । लोपूनि तमा भोज ।
वळघे तैं सहज । प्रमादिए होए ॥ ९९ ॥

**रजस्तमश्चाभिभूय सत्वं भवति भारत ॥**
**रजस्सत्वंतमश्चैव तमः सत्वं रजस्तथा ॥ १० ॥**

तिया चि गा परिपाटी । सत्वतमातें पोटीं ।
घालूनि जेव्हां उठी । रजोगुणु ॥ २०० ॥
तेव्हलां कर्मे वांचूनि काहीं । आन सौंदर चि नाहीं ।
ऐसें मानी देहीं । देहराजु ॥ १ ॥
पैं रजतमविजैयें । सत्व गा देहीं इये ।
वाढतां चिन्हि तियें । ऐसीं होंति ॥ २ ॥

**सर्वद्वारेषु देहेस्मिन्प्रकाश उपजायते ॥**
**ज्ञानं यदा तदा विद्याद्विवृद्धं सत्वमित्युत ॥ ११ ॥**

जें प्रज्ञा आंतुलीकडे । न समांत वाहिरि बोसंडे ।
वसंतिं पद्मखंडें । द्रुति जेवि ॥ ३ ॥
सर्वेद्रियां आंगणीं । विवेकु करी राबणी ।
साच चि करचरणीं । होंति डोळे ॥ ४ ॥

राजहंसा पुढें । चांचु वेंची आगरडे ।
तोडी जेवि झगडे । क्षीरानिराचे ॥ ५ ॥
तेवि दोषादोषविवेकीं । इंद्रियें चि होंति पारखीं ।
नियमु बा रे पाइकी । उ‍ळगे तैं ॥ ६ ॥
नाइकणें तें कानू चि वाली । न पाहाणें तें दीठी चि गाली ।
अवाच्य तें तें टाली । जीभ चि गा ॥ ७ ॥
वाती पुढां जैसें । पलों लागे कालवखें ।
निषिद्ध इंद्रियां तैसें । समोर नोहे ॥ ८ ॥
धाराधरकालें । महानदी उचंबले ।
तैसी बुद्धि पघले । शास्त्रजातीं ॥ ९ ॥
आगा पूर्णिमेचा दिसिं । चंद्रप्रभा आकाशिं ।
ज्ञानवृत्ति तैसी । फांके सैंव ॥ २१० ॥
वासना एकावटे । प्रवृत्ति वोहटे ।
मन वावटे । सुखा वरि ॥ ११ ॥
एवं सत्व वाढे । तैं हें चिन्ह फुडें ।
आणि निधन हीं घडे । तेव्हलां जरि ॥ १२ ॥
तरि जैं चि घरिं संपत्ति । तैं चि उदार मनोवृत्ति ।
मां परत्र आणि कीर्त्ति । होये पैं गा ॥ १३ ॥
कां पाहालेनि सुयाणें । जालेयां परगुणें ।
पढियंतें ये पाहुणे । स्वर्गौनियां ॥ १४ ॥
मग गोमटेया तेया । जावलि आशे धनंजया ।
तेवि सत्वीं जाणें देहियां । कें आथि गा ॥ १५ ॥
जें परगुणीं उद्भट । घेउनि सत्व चोखट ।
नीगे सांडूनि कोंपट । भोगक्षाम हें ॥ १६ ॥
अवचटें ऐसा जो जाये । तो सत्वाचा चि नवा होये ।
किंबहुना जन्म लाहे । ज्ञानियां माझि ॥ १७ ॥

सांघ पां धनुर्द्धरा । राउ॰ रायेपणें डोंगरा ।
गेलेया अपुरा । होये काइ ॥ १८ ॥
नातरि एथिचा दीवा । नेला सेजेया गावां ।
तो तेथ तरि पांडवा । दीपू चि किं ॥ १९ ॥
तैसी तेथ सत्वशुद्धी । आगलें ज्ञानासि उधी ।
तरंगाउ॰ लागे बुद्धी । विवेका वारि ॥ २२० ॥
पैं महदादिपरिपाटी । विचारूनु सेवटीं ।
विचारा सकट पोटीं । जिरे जेया ॥ २१ ॥
सत्तिसां सत्तिसावें । चोविस पंचविसावें ।
तिहिं पुरौनि स्वभावें । चतुर्थ जें ॥ २२ ॥
ऐसें सर्व जें सर्वोत्तम । जालें असे सुगम ।
तेया सवें निरूपम । लाहे देह ॥ २३ ॥

**लोभः प्रवृत्तिरारंभः कर्मणामशमस्पृहा ॥**
**रजस्येतानि जायंते विवृद्धे भरतर्षभ ॥ १२ ॥**

मग इया चि परीं देख । तमसत्वा अधोमुख ।
बैसौनि जैं आगलीक । धरी रज ॥ २४ ॥
आपुलेया कार्याचा । धुमाडु गाविं देहाचां ।
माजवी तैं चिन्हाचा । उदो ऐसा ॥ २५ ॥
पांजरली कां वाहुटली । करी वेगल वेटाली ।
तैसी विषइं सरली । इंद्रियां होये ॥ २६ ॥
परदारादि करावें पडे । परि विरुद्ध ऐसें नावडे ।
मन सेलियेचेनि तोंडें । सैंघ चारी ॥ २७ ॥
हा ठावो वेन्हीं लोभु । करी स्वैरत्वाचा राबु ।
वेटालितां अलाभु । तें तें उरे ॥ २८ ॥
आणि आड पडिलेयां । उद्यमजातां भलेतेया ।
प्रवृत्ति धनंजया । हातु न कढी ॥ २९ ॥

तेविं चि एकाधा प्रसादु । कां करावा अश्वमेधु ।
ऐसा अचाट्ट चि संदू । घेउनि उठी ॥ २३० ॥
नगरें चि रचावीं । महाव्रतें चि लालावीं ।
जलाशयें निर्मावीं । नानाविधें ॥ ३१ ॥
ऐसेसां अफांटीं कर्मीं । समारंभ-उपक्रमीं ।
आणि दृष्टादृष्टकामीं । पुरें नाहीं ॥ ३२ ॥
सागरु ही सांडी पडे । आगिं न लाहे तीनि कवडे ।
ऐसें अभिलाषीं जोडे । दुर्भरत्व ॥ ३३ ॥
स्पृहा मनां पुढपुढां । आशेचा घे दवडा ।
विश्व घापे चाडा । पायां तलीं ॥ ३४ ॥
इत्यादि वाढतां रजीं । इयें चिन्हें होंति सहजीं ।
आणि ऐसेया माझि । वेचे जरि ॥ ३५ ॥
तरि आघवां इहीं । परिवारला देहीं ।
रिगे परि योनी हीं । मानुषे चि ॥ ३६ ॥
सुखवाडेंसि भिखारी । वसो पां राजपुरीं ।
तऱ्हीं तो काइ अवधारीं । राउ होईल ॥ ३७ ॥
बैलासि कडबाडें । हें न चुके गा फुडें ।
नेइजो पां वऱ्हाडें । भले तैसां ॥ ३८ ॥
म्हणौनि व्यापारा हातीं । उकलु दिहा ना राती ।
तैसेयांचिये पांती । जुंपिजे तो ॥ ३९ ॥
कर्मजडांचां ठांइं । किंबहुना होये देहीं ।
जो रजोवृद्धिचां डोहीं । बुडौनि निमे ॥ २४० ॥

**अप्रकाशो प्रवृत्तिश्च प्रमादो मोह एव च ॥**
**तमस्येतानि जायंते विवृद्धे कुरुनंदन ॥ १३ ॥**

मग तैसा चि पुढुती । रजा सत्ववृत्ती ।
गीळूनि जैं ये उन्नती । तमोगुणु ॥ ४१ ॥

तैं जियें लिंगें । देहाचें सबाह्य सांघे ।
तें परियस चांगें । श्रोत्रबळें ॥ ४२ ॥
तरि ऐसें होये मन । जैसें रविचंद्रें हीन ।
रातिचें गा गगन । अवंसेचिये ॥ ४३ ॥
तैसें अंतर असोस । होये स्फूर्तिहीन उद्वस ।
विचाराची भास । हारपे तैं ॥ ४४ ॥
बुद्धि मेचुवे ना ढोंडी । हा ठाउ० मौवाळै सांडी ।
आठउ देशधडी । जाला दीसे ॥ ४५ ॥
अविवेकाचेनि माजें । सपाई शरीर गाजे ।
एकलेनि घेपे दीजे । मौढ्यें तेथ ॥ ४६ ॥
आचारभंगाचीं हाडें । रूपति इंद्रियां पुढें ।
मरे जरि तेणें कडें । क्रिया जाये ॥ ४७ ॥
पैं आणिक ही एक दीसे । जे दुष्कृतीं चित्त उसासे ।
आंधारीं देखणें जैसें । डुडुळांचें ॥ ४८ ॥
निषिद्धाचेनि नावें । भलेतें हीं भरें हांवे ।
तिये विषिं धावे । घेंति करणें ॥ ४९ ॥
मदिरा नेघतां ढूळे । सन्निपातें विण बोले ।
निःप्रेमें चि भूले । पींसें जैसें ॥ २५० ॥
चित्त तरि गेलें आहे । परि उन्मनी ते नोहे ।
ऐसें माल्हांथिलें मोहें । माजिरेनि ॥ ५१ ॥
किंबहुना ऐसींऐसीं । चिन्हें गा तमा पासीं ।
जैं वाढे आइतिसिं । आपुलिया ॥ ५२ ॥
आणि हें चि वायप्रसंगें । मरणाचें जरि खागें ।
तरि तेतुलेन हीं निगे । तमेंसिं तो ॥ ५३ ॥
राई रायिपण बीजीं । सांटौनि आंग त्यजी ।
मग विरूढे तैं दूजी । गोठि आहे ॥ ५४ ॥

पैं होउनि दीपकलिका । एरु आगि विझो कां ।
ते लागैल तेथ असिका । तो चि आहे ॥ ५५ ॥
ह्मणौनि तमाचिये लोथे । बांधौनियां संकल्पातें ।
देह जाये मागुतें । तमाचें होये ॥ ५६ ॥
आतां काइ येणें बहुवें । तो तमोवृद्धी मृत्यु लाहे ।
तो पशु कां पक्षा होये । झाड क्रिमि ॥ ५७ ॥

**यदा सत्वे प्रवृद्धे तु प्रलयं याति देहभृत् ॥**
**तदोत्तमविदांल्लोकानमलान्प्रतिपद्यते ॥ १४ ॥**

येणें चि कारणें । जें निफजे सत्वगुणें ।
तें सुकृत ऐसें ह्मणे । श्रौतसमो ॥ ५८ ॥
ह्मणौनि तेया निर्मळ । सुखज्ञानीं सरल ।
अपूर्व एक फल । सात्विक तें ॥ ५९ ॥

**रजसि प्रलयं गत्वा कर्मसंगिषु जायते ॥**
**तथा प्रलीनस्तमसि मूढयोनिषु जायते ॥ १५ ॥**

मग राजसा क्रिया । तिया इंद्रावणी सांसिनालिया ।
जें सुखें चितारूनियां । फलति दुःखें ॥ २६० ॥
कां निंबोलियेचें पीक । वरि गोड आंतु विष ।
तैसें राजस देख । क्रियाफल ॥ ६१ ॥
तामस कर्म तेतुकें । अज्ञानफलें चि पीके ।
विषांकुर विषें । जिया परीं ॥ ६२ ॥

**कर्मणः सुकृतस्याहुः सात्विकं निर्मलं फलं ॥**
**रजसस्तु फलं दुःखमज्ञानं तमसः फलं ॥ १६ ॥**

ह्मणौनि बा रे अर्जुना । एथ सत्व चि हेतु ज्ञाना ।
जैसा कां दिना । सूर्यु हा ॥ ६३ ॥
आणि तैसें चि हें जाण । लोभासि रज कारण ।
आपुलें विस्मरण । द्वैता जेवि ॥ ६४ ॥

मोहो अज्ञाना प्रमादा । एयां मिळालेयां दोषवृंदां ।
पुडुतीं पुडुतीं प्रबुद्धा । तम चि मूळ ॥ ६५ ॥
ऐसें विचाराचां डोळां । तीन्हीं गुण हे वेळोवेळां ।
पाहिजे जैसा आंवळा । तळहातिचा ॥ ६६ ॥

**सत्वात्संजायते ज्ञानं रजसो लोभ एव च ॥**
**प्रमादमोहौ तमसो भवतोज्ञानमेवच ॥ १७ ॥**

तवं रजतमें दोन्हीं । देखिलीं प्रौढें पतनीं ।
आणि सत्व वांचूनि नेनीं । ज्ञानाकडे ॥ ६७ ॥
ह्मणौनि सात्विकी चि वृत्तीं । एक जाले जन्मव्रतीं ।
सर्वत्यागें चतुर्थी । भागवत जैसे ॥ ६८ ॥
तैसे सत्वाचेनि नडनाचें । असणें जाणें तेयांचें ।
ते तनूत्यागीं स्वर्गिचे । राये होंति ॥ ६९ ॥
इया चि परी पैं रजें । जिहिं कां जीजे मरिजे ।
तिहिं मनुष्यां होइजे । मृत्युलोकिं ॥ २७० ॥
तेथ सुखदुःखाचें खिचटें । जेविजे येकें चि ताटें ।
जेथ इये मरणवटे । पडिलें नूठी ॥ ७१ ॥
आणि तिया चि स्थिती तमीं । जे वाढौनि मोडौनि क्षमीं ।
ते वेंति नरकभूमी । मूळपत्र ॥ ७२ ॥
एवं वस्तुचिया सत्ता । त्रिगुणासि पांडुसुता ।
दाविली साकार्यता । आघवी चि हे ॥ ७३ ॥

**ऊर्ध्वं गच्छंति सत्वस्था मध्ये तिष्ठंति राजसाः ॥**
**जघन्यगुणवृत्तिस्था अधो गच्छंति तामसाः ॥ १८ ॥**

पैं वस्तु वस्तुत्वें असिकें । तें आपण चि गुणां सारिखें ।
देखौनि कार्यविशेषें । अनुकरे गा ॥ ७४ ॥
जैसें कां स्वप्नीं परिव्राजें । जैं राउ मी हें देखिजे ।
तैं हारि जैत होइजे । आपण चि ॥ ७५ ॥

तैसें मध्य ऊर्ध्व अध । हे जे गुणत्रिभेद ।
ते वृत्ती वांचूनि शुद्ध । वस्तु चि असे ॥ ७६ ॥
पारि हे वाहणी असो । तर्‍हीं तुज आन न दीसो ।
परियसैं ते सांघतसों । मागिलि गोठि ॥ ७७ ॥

**नान्यं गुणेभ्यः कर्त्तारं यदा द्रष्टानुपश्यति ॥**
**गुणेभ्यश्च परं वेत्ति मद्भावं सोऽधिगच्छति ॥ १९ ॥**

तारि ऐसें निजनिजें । सामर्थ्यें तीन्हीं सहजें ।
होंति देहव्याजें । गुण चि हे गा ॥ ७८ ॥
इंधनाचेनि आकारें । अग्नि जैसा अवतरे ।
कां आवगे तरुवरें । भूमिरसु ॥ ७९ ॥
नाना दहियांचेनि मीसें । परिणामे दूध जैसें ।
कां मूर्त्त होये ऊंसें । गोडी जेवि ॥ २८० ॥
तैसें हें सांतष्करण । देह चि होंति गुण ।
ह्मणौनि बंधा कारण । घडे किर ॥ ८१ ॥
पारि चोज हें धनुर्द्धरा । जें येवडां इये गुंपिरां ।
मोक्षाचा सवंसारा । गुणा न्हवे ॥ ८२ ॥
गुण आपुलालेनि धर्में । देहिचें माधुतसाउमें ।
चालितां न खोमे । गुणातीतता ॥ ८३ ॥
ऐसी मुक्ति असे सहज । आतां परियसौं तुज ।
तें तूं ज्ञाना बुझ । द्विरफु किं ॥ ८४ ॥
आणि गुणीं गुणां जोगें । चैतन्य नोहे हें मागें ।
बोलिलें तें खागें । तेवि चि हें ॥ ८५ ॥
तारि पार्थातें ऐसें । बोधलेनि जीवें दीसे ।
स्वप्न कां जैसें । चेइलेनि ॥ ८६ ॥
नातरि आपणपें जलीं । बिंबलें तीरींहुनि कली ।
चलन होंत कल्लोलीं । अनेकधा ॥ ८७ ॥

कां नटलेनि लाघवें । नटु जैसा न झंकवे ।
तैसे गुणजात देखवे । न्हवौनियां ॥ ८८ ॥
रितुत्रय आकाशें । धरुनियां जैसें ।
नेंदिजे चि येऊं वोसें । वेगळेपणें ॥ ८९ ॥
तैसें गुणीं गुणां परौतें । जें आपणपें असे आइतें ।
तिये अहं बैसे अहंते । मूलिके चि जैं ॥ २९० ॥
तैं तेथौनि मग पांतां । ह्मणे साक्षी मी अकर्त्ता ।
हे गुण चि क्रियाजाता । नियोगी ना ॥ ९१ ॥
सत्वरजतमाचां । भेदीं पसरु कर्मांचा ।
होंतसे तो गुणाचा । विकारु हा ॥ ९२ ॥
एया माझि मीं ऐसा । वनीं कां वसंतु जैसा ।
वनलक्ष्मीविलासा । हेतुभूत ॥ ९३ ॥
कां तारागणीं लोपावें । सूर्यकांतें उद्दीपावें ।
कमळीं विकाशावें । जावें तमें ॥ ९४ ॥
इयें कोण्हाचीं काजें कहीं । सविता जैसीं नाहीं ।
तैसा अकर्त्ता मीं देहीं । सत्तारूपु ॥ ९५ ॥
मी दाउनि गुण देखें । गुणता हे मियां पोखे ।
एयाचेनि निःशेषें । उरे तें मीं ॥ ९६ ॥
ऐसेनि विवेकें जेया । उदौ होये धनंजया ।
ये गुणातीतत्व तेया । ऊर्धपंथें ॥ ९७ ॥
आतां निर्गुण असे आणिक । तें तो जाणे हें अचूक ।
जें ज्ञान केलें ठीक । तेया चि वरि ॥ ९८ ॥
किंबहुना पांडुसुता । ऐसा तो माझिया सत्ता ।
पावे जैसी सरिता । सिंधुत्व गा ॥ ९९ ॥
नालिके वरौनु उठिला । जैसा शुकु शाखे बैसला ।
तैसा मूळअहंते ठेला । तो ह्मणौनि ॥ २०० ॥

आगा अज्ञानांचिया नीदा । घोरतु होंता तत्वधा ।
तो सत्वरूपिं प्रबोधा । चेइला किं ॥ १ ॥
पैं बुद्धिभेदाचा आरिसा । तेया हातूनि पडिला वीरेशा ।
ह्मणौनि प्रतिमुखाभासा । मूकला तो ॥ २ ॥
देहाभिमानाचा वारा । आतां वाजों ठेला वीरा ।
तैं एक्यवीचिसागरा । जीवेशा होये ॥ ३ ॥
ह्मणौनि मद्भावेंसिं । पाविजे तेणें सारिसिं ।
वरिषांतिं आकाशीं । घनें जेवि ॥ ४ ॥
तेवि मी होउनि निरुता । मग देहीं चि इये असतां ।
नांगवे देहसंभूतां । गुणासि तो ॥ ५ ॥
जैसा भिंगाचेनि घरें । दीपप्रकाशु नावरे ।
कां न विझे चि सागरें । वडवानलु ॥ ६ ॥
तैसा आलां गेलां गुणांचा । बोधु न मैले तेयाचा ।
तो देहीं जैसा व्योमिचा । चंद्र जलीं ॥ ७ ॥

**गुणानेतानतीत्य त्रीन्देही देहसमुद्भवान् ॥**
**जन्ममृत्युजरादुःखैर्विमुक्तोमृतमश्नुते ॥ २० ॥**

तीन्ही आपुलिया प्रौढी । देह नाचवीति बागडी ।
तो पाहों न धडी । अहंतेतें ॥ ८ ॥
हा ठाउ वेन्हीं । निहटौनि गेला अंतरीं ।
आतां काइ वर्त्ते शरीरीं । कांहीं नेणे ॥ ९ ॥
सांडूनि आंगिची खोली । सर्पु रिगालेयां पातालीं ।
ते त्वचा कोण सांभाली । तैसें जालें ॥ ३१० ॥
कां सौरभ्यजीर्णु जैसा । आमोदु मीलौनियां आकाशा ।
माघारा कमळकोशा । ऐ चि ना ॥ ११ ॥
पैं सत्वरूपसमरसें । तेया ही गा जालें तैसें ।
तेथ किंधर्म हें ऐसें । नेणे देह ॥ १२ ॥

ह्मणौनि जन्मजरामरण । इत्यादि साई गुण ।
ते देहीं चि ठेले कारण । नाहीं तेया ॥ १३ ॥
घटाचिया खापरिया । घटाचां भार्गी फोडिलेयां ।
मा आकाश आपैसेया । जालें चि असे ॥ १४ ॥
तैसी देहबुद्धि जाये । जैं आपणपें आठौ होये ।
तैं आन काहिं आहे । तें वांचूनि ॥ १५ ॥
येणें थोरें बोधलेपणें । तेया गा देहीं असणें ।
ह्मणौनि तो मी ह्मणें । गुणातीतु ॥ १६ ॥
येया देवाचेया बोला । पार्थु अति सुखावला ।
मेघें संबोखिला । मयूरु जैसा ॥ १७ ॥

अर्जुन उवाच ॥

**कैर्लिंगैस्त्रीन्गुणानेतानतीतो भवति प्रभो ॥**
**किमाचारः कथं चैतांस्त्रीन्गुणानतिवर्त्तते ॥ २१ ॥**

तेणें तोषें वीरु पूसे । जी कोणी चिन्हि तो दीसे ।
जेया माझि वसे । ऐसा बोधु ॥ १८ ॥
तो निर्गुणु काइ आचेरे । कैसेनि गुण निस्तरे ।
सांविजो हें माह्येरें । कृपेचेनि ॥ १९ ॥

श्रीभगवानुवाच ॥

**प्रकाशं च प्रवृत्तिं च मोहमेव च पांडव ॥**
**न द्वेष्टि संप्रवृत्तानि न निवृत्तानि कांक्षति ॥ २२ ॥**

येया अर्जुनाचेया प्रश्ना । तो षड्गुणाचा राणा ।
परिहारु आकर्णा । बोल्तु असे ॥ ३२० ॥
ह्मणे हे पार्था तूझी नवाई । येतुलें चि पूससी काई ।
वें नावं चि तेया पाई । साचळ टर्के ॥ २१ ॥

गुणातीतु जेया नावं । तो गुणाधीनु तरि न्हवे ।
मा होये तरि नांगवे । गुणा येयां ॥ ३२ ॥
परि आधीनु कां नांगवे । हें चि कैसेनि जाणावें ।
गुणाचिये उरवरेवे । माझि असतां ॥ ३३ ॥
हा संदेहो जरि वाहांसी । तरि सुखें पूसों लाहासि ।
परियस आतां तेयासि । रूप करुं ॥ ३४ ॥
तरि रजाचेनि माजें । देहिं कर्माचें आणोजें ।
प्रवृत्ती जैं घेइजे । वेंटाळुनि ॥ ३५ ॥
तैं मीं चि ना कर्मठु । ऐसा नैये श्रीमाठु ।
कां दरिद्रबुद्धी वीटु । तो ही नाहिं ॥ ३६ ॥
अथवा सत्वें चि अधिकें । जैं सर्वेंद्रीं ज्ञान फांके ।
तैं सुविद्यता न तोखे । उभजे ही ना ॥ ३७ ॥
कां वाढिनलेनि तमें । गीलिजे मोहभ्रमें ।
तैं अज्ञानत्वें श्रमे । घेणें हिं नाहिं ॥ ३८ ॥
पैं मोहाचां अवसरीं । ज्ञानाची चाड न धरी ।
ज्ञानीं कर्में नादरी । होंतां ना दुःखी ॥ ३९ ॥
सायंप्रातमध्यान्हा । येयां तीहीं काळांची गणना ।
नाहिं जेवि तपना । तैसा असे ॥ ३३० ॥
तेया वेगळें चि काइ प्रकाशे । ज्ञानित्व येयावें असे ।
काइ जळार्णउ पाउसें । साजा होए ॥ ३१ ॥
नां प्रवर्त्तलेनि कर्में । कर्मित्व तेया कां गमे ।
सांघैं हिमवंतु हीमें । कांपे काइ ॥ ३२ ॥
नातरि मोहो आलेयां । काइ पां ग्रसिजैल तेया ।
हांगा आगितें उन्हाळेया । जाळवतसे ॥ ३३ ॥
तैसें गुणकार्य हें । आवर्घे आपण चि आहे ।
म्हणौनि येकैकें नेहे । ताडातोडि ॥ ३४ ॥

येवढिया गा प्रतीती । तो देहा आला असे वस्ती ।
वाटे जातां गुंती । माझि जैसा ॥ ३५ ॥

उदासीनवदासीनो गुणैर्यो न विचाल्यते ॥
गुणा वर्त्तंत इत्येवं योवतिष्ठति नेंगते ॥ २३ ॥

तो जीणता ना हारवी । तैसा गुण न्हवे ना करवी ।
जैसी कां सोणवी । संग्रामीं तैसा ॥ ३६ ॥
आणि गुणाचां यावाजावा । टळे चळे ना पांडवा ।
मृगजळाचा हेलावा । मेरु जैसा ॥ ३७ ॥
हें बहू काइ बोलिजे । व्योमें वारेनि न वचिजे ।
कां सूर्यु न गिळिजे । अंधकारें ॥ ३८ ॥
स्वप्न गा जेया परीं । जागतेयातें न सिंतरी ।
गुणीं तैसा अवधारीं । न चळिजे तो ॥ ३९ ॥
गुणा किर नातुडे । परि दूरौनि पाहे जैं कोडें ।
तैं गुण देखे सांघडे । सभ्यु जैसा ॥ ३४० ॥
सत्वधर्म सात्विकीं । रज तें रजोविशेषीं ।
तम मोहादिकीं । वर्त्तत असे ॥ ४१ ॥
परि माझिया सत्ता । इया गुणक्रिया समस्ता ।
हें फुडें जाणे सविता । लौकिका जेवि ॥ ४२ ॥
समुद्र चि भरति । सोमकांत चि द्रवति ।
कुमुदें पसरति । चंद्रु तो उगा ॥ ४३ ॥
कां वारा चि वाजे वीझे । गगनें निश्चळां असिजे ।
तैसा गुणान्त्रिये गजबजे । डोले ना जो ॥ ४४ ॥

समदुःखसुखः स्वस्थः समलोष्टाश्मकांचनः ॥
तुल्यप्रियाप्रियो धीरस्तुल्यनिंदात्मसंस्तुतिः ॥ २४ ॥

अर्जुना येणें लक्षणें । तो गुणातीतु गा जाणणें ।
परिस आतां आचरणें । तेयाचिं तियें ॥ ४५ ॥

तरि वस्त्रासि पाटीपोटीं । नाहिं सूत वांचूनि किरीटी ।
तैसेनि सुये दीठी । चराचरां ॥ ४६ ॥
म्हणौनि सुखदुःखा सरिसें । कांटाळें आचरे ऐसें ।
रिपुभक्तां जैसें । हरिचें देणें ॥ ४७ ॥
यऱ्हवीं तऱ्हीं साहाजें । सुखदुःख तैं चि व्यंजे ।
देहजळीं होइजे । मासळी जैसी ॥ ४८ ॥
आतां तें तत्वं तेणें सांडिलें । आहे सत्स्वरूपें चि मांडिलें ।
सस्यांतीं निवडिलें । बीज जैसें ॥ ४९ ॥
कां उऽघु सांडूनि गंगा । रिगाली समुद्राचेया आंगा ।
ते निस्तरे लगबगा । खळाळांची ॥ ३५० ॥
तेवि आपणपें चि जेया । वास्ति जाली गा धनंजया ।
तेया देहीं आपैसेया । सुख तैसें दुःख ॥ ५१ ॥
रात्रि तैसें पाहालें । हें धारणा जेवि एक जालें ।
आत्मारामा देहा आलें । द्वंद्व तैसें ॥ ५२ ॥
पैं निद्रिताचेनि आंगेंसिं । सांपु तैसी उर्वशी ।
तेवि स्वरूपस्था सरिसीं । देहीं द्वंद्वें ॥ ५३ ॥
म्हणौनि तेयाचां ठांइं । सेणां सोनेयां विशेषु नाहिं ।
रत्ना गुंडेया काहिं । नेणिजे भेदु ॥ ५४ ॥
घरा येउ पां स्वर्गु । कां वरिपडो वाघु ।
परि आत्मबुद्धिसंभोगु । विरसु नोहे ॥ ५५ ॥
निवटलें नुपङ्डे । जळिनलें न विरुढे ।
साम्यबुद्धि न मोडे । तिया परीं ॥ ५६ ॥
हा ब्रह्म ऐसेनि स्तुतिजो । कां नीचु म्हणौनि निंदिजो ।
परि नेणे जळों विझों । राख जैसी ॥ ५७ ॥
तैसा निंदा आणि स्तुती । नैये कोण्ही चि व्यक्ती ।
नाहिं आंधारेया वाती । सूर्या रूप ॥ ५८ ॥

**मानापमानयोस्तुल्यस्तुल्यो मित्रारिपक्षयोः ॥**
**सर्वारंभपरित्यागी गुणातीतः स उच्यते ॥ २५ ॥**

ईश्वरबुद्धी पूजिला । चोरु ह्मणौनि गाजिला ।
वृषगर्जीं वेढिला । केला राउ ॥ ५९ ॥
सुन्हृद पासिं आले । अथवा वैरी वर जाले ।
परि नेणे रात्रि पाहलें ॥ तेज जेवि ॥ ३६० ॥
षडरितू येतां आकाशें । लिंपिजे चि ना जैसें ।
तेवि वैषम्य मानसें । जाणिजे चि ना ॥ ६१ ॥
आणिकु ही येकु पाहीं । आचारु तेयाचा ठांइ ।
तरि व्यापारां नाहीं । जालें दीसे ॥ ६२ ॥
सर्वारंभा उटकलें । प्रवृत्तिचें तेथ मावले ।
जळति कां कर्मफळें । तें तें चि योजी ॥ ६३ ॥
दृष्टादृष्टाचेनि नावें । भाउ चि जीवि नुगवे ।
सेविजे स्वभावें । पैं तें होये ॥ ६४ ॥
सुखा ना सीणु नेणे । पाखाणु जेणें मानें ।
तैसी सांडिमांडि मनें । वर्जिली असे ॥ ६५ ॥
आतां केती हा चि विस्तारु । जाणे ऐसा आचारु ।
तेयातें तो चि साचारु । गुणातीतु ॥ ६६ ॥
गुणातें अतिक्रमणें । घडे उपायें जेणें ।
तो आतां आइक ह्मणे । कृष्णनाथु ॥ ६७ ॥

**मां च योऽव्यभिचारेण भक्तियोगेन सेवते ॥**
**स गुणान्समतीत्यैतान्ब्रह्मभूयाय कल्पते ॥ २६ ॥**

तरि व्यभिचाररहितें । भक्तियोगें मातें ।
सेवी तो गुणातें । जाकळूं सके ॥ ६८ ॥
परि कोणु मी कैसी भक्ति । व्यभिचारा काइ व्यक्ति ।
हे आवत्री चि निरुति । होआवी लागे ॥ ६९ ॥

तरि पार्थो परियसां । मीं तवं एथ ऐसा ।
रत्नीं कीळाउ जैसा । रत्न चि तो ॥ ३७० ॥
कां द्रवपण चि नीर । अवकाशू चि अंबर ।
गोडी ते चि साकर । दोनि नाहिं ॥ ७१ ॥
वन्हि ते चि जाळ । दळा चि नावं कमळ ।
रूंखु ते चि डाहाळ- । फळादिक ॥ ७२ ॥
आगा हींवं आलिखलें । तें हिमवंतु जेवि जालें ।
नाना दूध मुरालें । दध्याकारें ॥ ७३ ॥
तैसें विश्व एणें नावें । हें मिं चि पैं आघवें ।
आतां चंद्रबिंब सोलावें । न लगे जेवि ॥ ७४ ॥
घृताचें थिनलेपण । न मोडितां घृत चि जाण ।
कां नाटितां कांकण । सोनें चि तें ॥ ७५ ॥
नुकळितां पटु । तंतू चि आहे स्पष्टु ।
नवा विरचता घटु । पृथ्वी न्हवे ॥ ७६ ॥
ह्मणौनि विश्वपण जावें । मग मातें घेयावें ।
तैसा न्हवे आघवें । सकट चि मीं ॥ ७७ ॥
ऐसेनि मातें जाणिजे । तैं जाणीवभक्ति ह्मणिजे ।
एथ भेदु काहिं देखिजे । व्यभिचारु तो ॥ ७८ ॥
येया कारणें भेदातें । सांडूनि अखंडें चित्तें ।
आपणेयां सकट मातें । जाणावें गा ॥ ७९ ॥
पार्था सोनेयां टीक । सोनां चि लागली देख ।
तैसें आपणपें आणिक । मानावें ना ॥ ३८० ॥
तेजाचा तेजौनि निगाळा । परि तेजीं असे लागळा ।
तेया रस्मी ऐसा भला । बोधु होआवा ॥ ८१ ॥
पैं परिमाणु भूतळीं । हिमकणु हिमाचळीं ।
मज माझि निहाळीं । आहे तैसें ॥ ८२ ॥

हो कां तरंगु लाहानु । परि सिंधुसिं नाहिं भिन्नु ।
तैसा ईश्वरीं मीं आनु । नोहें चि नां ॥ ८३ ॥
ऐसेनि गा समरसें । दृष्टि जैं उल्हासे ।
ते पैं भक्ति ऐसें । आम्हि ह्मणों ॥ ८४ ॥
आणि ज्ञानाचें चांगावें । इये चि दृष्टी नावें ।
योगाचें हिं आघवें । सर्वस्व हें ॥ ८५ ॥
सिंधू आणि जलधरा । माझि लागलिया जेवि धारा ।
तैसी वृत्ति वीरा । प्रवर्त्ते ते ॥ ८६ ॥
कां कुहेंसिं आकाशा । तोंडिं सांदा नाहिं जैसा ।
तो परमरसु तैसा । एकवटे ॥ ८७ ॥
पैं प्रतिबिंबौनि बिंब वेरीं । प्रभेची जैसी उजिरी ।
ते सोहंवृत्ति अवधारीं । तैसी होये ॥ ८८ ॥
ऐसेनि मग परस्परें । ते सोहंदृष्टि जैं अवतरे ।
तैं तिये ही सकट सरे । आपैसेया ॥ ८९ ॥
जैसा सैंधवाचा रवा । सिंधू माझि पांडवा ।
विरालेयां विरावा । हें इं ठाके ॥ ३९० ॥
नातरि जाळूनि तृण । वन्हि वीझे आपण ।
तैसें भेदु नासूनि जाण । ज्ञान घडे ॥ ९१ ॥
माझें पैलपण जाये । भक्तु हें अइळ ठाए ॥
अनादि ऐक्य जें आहे । तें चि निवडे ॥ ९२ ॥
आतां गुणातीतु तें किरीटी । जाण इया न्हवंति गोठी ।
जें एकपणा ही मीठी । पडों सरली ॥ ९३ ॥
किंबहुना ऐसी दशा । तें ब्रह्मत्व गा सुदंसा ।
हें तो पावे जो ऐसा । मातें भजे ॥ ९४ ॥
पुढुतीं इहीं लिंगीं । भक्तु जो माझा जगीं ।
हे ब्रह्मता तेया लागिं । पतिव्रता ॥ ९५ ॥

जैसें गंगेचेनि उन्वें । ढळमळीत जें निगे ।
सिंधुपद तेया जोगें । आन नाहीं ॥ ९६ ॥
तैसा ज्ञानाचिये दीठी । जो मातें सेवी किरीटी ।
इये ब्रह्मतेचां मुगुटीं । चूडारत्न तो ॥ ९७ ॥
येया ब्रह्मत्वासी चि पार्था । सायुज्य ऐसी व्यवस्था ।
येया चि नावं चौथा । पुरुषार्थु गा ॥ ९८ ॥
परि माझें आराधन । ब्रह्मत्वीं होये सोपान ।
येथ मीं ह्मन साधन । गमैल हें ॥ ९९ ॥

**ब्रह्मणो हि प्रतिष्ठाहममृतस्याव्ययस्य च ॥**
**शाश्वतस्य च धर्मस्य सुखस्यैकांतिकस्य च ॥ २७ ॥**

तरि झनें ऐसें । तूझां चित्तीं प्रवेशे ।
पैं ब्रह्म आन असे । मीं वांचूनि ॥ ४०० ॥
पैं मंडळ आणि चंद्रमा । दोनि न्हवति सुवर्मा ।
तैसा मज आणि ब्रह्मा । भेदु नाहीं ॥ १ ॥
आगा नित्य जें निष्कंप । अनव्रत धर्मरूप ।
सुख जें उमप । अद्वैत जें ॥ २ ॥
विवेकु आपुलें काम । सांडूनि ठाकिजे धाम ।
तें निकर्षाचें निःसीम । किंबहुना मीं ॥ ३ ॥
ऐसेंऐसें हें अवधारां । अनन्याचा तो सोयरा ।
सांघतसे धनुर्द्धरा । पार्थासि ॥ ४ ॥
तेथ धृतराष्ट्रु ह्मणे । संजया हें तूतें कवणें ।
पूसिलें पैं वायाणें । कां गा बोलिलासि ॥ ५ ॥
माझी अवसरचिंता फेडीं । सांघें विजयाची गुढी ।
तवं येरु ह्मणे सांडीं । हे गोठि आतां ॥ ६ ॥
संजया विस्मयो मानसीं । मग आहा करुनि स्वशरीरेंसीं ।
ह्मणे कैसा पैं देवेंसीं । द्वेषु एया ॥ ७ ॥

तऱ्हीं कृपाळु तो तुष्टो । विवेकु यया घोंटो ।
मोहाचा फीटो । माहारोगु ॥ ८ ॥
संजया ऐसें चिंतितां । संवादु तो चि भावितां ।
हर्षाचा येंतु चित्ता । महापूरु ॥ ९ ॥
ह्मणौनि आतां तेणें । उत्साहाचेनि अवतरणें ।
श्रीकृष्णाचें बोलणें । सांघिजैल तेया ॥ ४१० ॥
तेयां अक्षरां आंतूलु भाउ । पाववीन मी तुमचा ठाउ ।
आइकां ह्मणे ज्ञानदेउ । निवृत्तिचा ॥ ४११ ॥

ॐ तत्सदिति श्रीमद्भगवद्गीतासूपनिषत्सु ब्रह्मविद्यायां योगशास्त्रे श्रीकृष्णार्जुनसंवादे **गुणत्रयविभागयोगो** नाम चतुर्दशोध्यायः ।

श्रीकृष्णे सर्वात्मनीश्वरेर्पणमस्तु ॥

# ज्ञानेश्वरी

## अध्याय पंधरावा

श्रीगणेशायनमः ॥

आतां हृदय हें आपुलें । चौफळौनि भलें ।
वरि बैसउं पाउलें । श्रीगुरुचीं ॥ १ ॥
ऐक्यभावाची आंजुळि । सर्वेंद्रियकुड्मळि ।
भरौनि पुष्पांजळि । अर्घ्यु देउं ॥ २ ॥
अनन्योदकधुवट । वासना जे तन्निष्ठ ।
तें लागलेंसे अवीट । चंदनाचें ॥ ३ ॥
प्रेमाचेनि भांगारें । निर्वाळुनि नेपुरें ।
लेवउं सुकुमारें । पदें तियें ॥ ४ ॥
घनावळि आवडी । अव्यभिचारें चोखडीं ।
तियें घालूं जोडीं । आंगुळिया ॥ ५ ॥
आनंदमोदबहळ । सात्विकाचें मुकुळ ।
तें उमळलें अष्टदळ । ठेउं वरि ॥ ६ ॥
तेथ अहंधूपु जाळूं । सोहंतेजें ओवाळूं ।
सामरस्य पोटाळूं । निरंतर ॥ ७ ॥
माझि तनु आणि प्राण । इया दोन्ही पाउवां लेवउं श्रीचरण ।
करूं भोगमोक्षीं निंबलोण । पायां तेयां ॥ ८ ॥

इया गुरुचरणसेवा । हों पात्र तेया दैवा ।
जें सकलार्थाचा मेळावा । पाटु बांधों ॥ ९ ॥
अह्मिचें विसवणें वेन्हीं । उन्मेखु लाहे उजरि ।
जें वाचेतें इयें करि । सुधासिंधु ॥ १० ॥
पूर्णचंद्राचां कोडि । वक्तृत्वा घापे कुरौंडी ।
तैसी आणी गोडी । अक्षरांतें ॥ ११ ॥
सूर्यें अधिष्ठिली प्राची । जगा राणिवं दे प्रकाशाची ।
तैसी वाचा श्रोतेयां ज्ञानाची । दिवाळि करी ॥ १२ ॥
नादब्रह्म खुजें । कैवल्य हिं तैसें न सजे ।
ऐसा बोलु देखिजे । जेणें दैवें ॥ १३ ॥
श्रवणसुखाचां मांडवि । विश्व भोगवी माधवी ।
तैसी सांसिनली बरवी । वाचावेली ॥ १४ ॥
ठाऊ न पवतां जेयाचा । मनेंसिं मुरडली वाचा ।
तो देऊ होये शब्दाचा । चमत्कारु ॥ १५ ॥
जें ज्ञानासि न चोजवें । ध्यानासि हिं नागवे ।
तें अगोचर फांवे । वोवी माझि ॥ १६ ॥
एन्हडें एक सौभग । बळघे वाचेचें आंग ।
गुरुपदपद्मपराग । लाहे जैं कां ॥ १७ ॥
तरि बहू बोलों काइ । आजि तें अना ठांइं ।
मातें वांचूनि नाहिं । ज्ञानदेऊ ह्मणे ॥ १८ ॥
जें तान्हेनि मियां अपलें । आणि माझें गुरु एकलौतें ।
ह्मणौनि कृपेसिं एकहातें । जालें तिये ॥ १९ ॥
पाहा पां भरोवरी आघवी । मेहु चातकासि रिचवी ।
मज लागि गोसांवीं । तैसें केलें ॥ २० ॥
ह्मणौनि रिकामें तोंड । करुं गेलें बडबड ।
किं गीता ऐसें गोड । आंतुडलें ॥ २१ ॥

होए अदृष्ट आपैतें । तैं वाद्व चि रत्नें परौतें ।
उजू आउख तैं मारितें । लोभु करी ॥ २२ ॥
आधणिं घातले हरल । होंति अमृताचे तांदुल ।
जरि भुकेची राखे वेल । जगन्नाथु ॥ २३ ॥
तिया परी गुरु । करिति जैं अंगीकारु ।
तैं होउनि ठाके सर्वसारु । मोक्षमयु ॥ २४ ॥
पाहा पां काइ नारायणें । तेयां पांडवांचें ऊणें ।
कीजे चि ना पुराणें । विश्ववंद्यें ॥ २५ ॥
तैसें श्रीनिवृत्तिराजें । अज्ञानपण हें माझें ।
आणिलें वोजे । ज्ञानाचिये ॥ २६ ॥
पारि असो हें आतां । प्रेम रुलतसे बोलतां ।
कें गुरुगौरवु वर्णितां । उन्मेखु आथि ॥ २७ ॥
आतां तेणें चि पसायें । तुह्मां संताचे पाये ।
वोलगैन मीं अभिप्रायें । गीतेचेनि ॥ २८ ॥
तरि तो चि प्रस्तुतिं । चौदावेया अध्यायाचां अंतीं ।
निर्णयो कैवल्यपती । ऐसा केला ॥ २९ ॥
जें ज्ञान जेयाचां हातिं । तो चि समर्थु मुक्ती ।
जैसा शतमखु संपत्ती । स्वर्गीचिये ॥ ३० ॥
कां शत एक जन्मां । जो जन्मौनि बाह्यकर्मा ।
करी तो चि ब्रह्मा । आनु नोहे ॥ ३१ ॥
नाना सूर्याचा प्रकाशु । लाहे जेविं डोलसु ।
तैं ज्ञानें चि सौरसु । मोक्षाचा तो ॥ ३२ ॥
तरि यया चि ज्ञाना लागि । कव्हणी पां योग्यता आंगिं ।
हें पांतां जगिं । देखिला एकु ॥ ३३ ॥
जेविं पातालिचें धन । दावी किर अंजन ।
परि होआवे लोचन । पायलाचे ॥ ३४ ॥

तैसें मोक्षु देईल ज्ञान । एथ किर नाहिं आन ।
पारि तें चि थारे ऐसें मन । शुद्ध होआवें ॥ ३५ ॥
तारि विरक्तु वांचूनि कें हीं । ज्ञानासि तगणें नाहिं ।
हें विचारुनि ठांइं । ठेविलें देवें ॥ ३६ ॥
आतां विरक्तिची कव्हणी परी । जे एउनि मनातें वरी ।
हें इं सर्वज्ञें श्रीहरी । देखिलें असे ॥ ३७ ॥
जैं विषें रांधिली रसोये । जेवणारा ठाउवें होए ।
तें ताट सांडूनि जाए । जिया परी ॥ ३८ ॥
तैसी संसारा एया समस्ता । जाणवे जैं अनित्यता ।
तैं वैराग्य दवडितां । पाठी लागे ॥ ३९ ॥
आतां अनित्यत्व कैसें । तें चि रुखाकारें मिसें ।
साधिजत असे विश्वेशें । पंचदर्शी ॥ ४० ॥

श्रीभगवानुवाच ॥

**ऊर्ध्वमूलमधः शाखमश्वत्थं प्राहुरव्ययं ॥**
**छंदांसि यस्य पर्णानि यस्तं वेद स सर्ववित ॥ १ ॥**

उपडिलें कवतिकें । झाड येरी मोहरा ठाके ।
तें वेगें जैसें सूके । तैसें हें न्हवे ॥ ४१ ॥
इया एकी परी । रूपकाचिया कुसरी ।
सारितसे वारी । संसाराची ॥ ४२ ॥
करुनु संसारु वाऊ । स्वरूपिं अहंते ठाऊ ।
होआवेआ अध्यायो । पंधरावा हा ॥ ४३ ॥
आतां हें चि आघवें । ग्रंथगर्भिचें सांघावें ।
उपळविलें जीवें । आकर्णिजो ॥ ४४ ॥
तन्हि महानंदसमुद्रु । जो पूर्णु पूर्णिमाचंद्रु ।
तो द्वारकेचा नरेंद्रु । ऐसें ह्मणे ॥ ४५ ॥

आगा पैं पांडुकुवंरा । एतां स्वरूपाचआ घरा ।
करीतुसे आडवारा । विश्वाभासु जो ॥ ४६ ॥
तो हा जगडंबरु । न्हवे एथ सवंसारु ।
हा जाणैं महातरु । थांवला असे ॥ ४७ ॥
परि एरां सुखां सारिखा । तळिं मूळें वरि शाखा ।
तैसा न्हवे ह्मणौनु लेखा । नैए कव्हणा ॥ ४८ ॥
आगी कां कुऱ्हाडी । होए रिगावा जरि बुडिं ।
तरि हो कां भले तेव्हडी । वरिचिली वाढि ॥ ४९ ॥
जे तूटलेया मूळा पासिं । उलंडैल शाकांसिं ।
तरि तैसी गोठि काइसी । हा सोहपा नोहे ॥ ५० ॥
अर्जुना हें कवतिक । सांघतां असे अलौलिक ।
जें वाढि अधोमुख । रुखा एया ॥ ५१ ॥
जैसा भानु उंची नेणों कें । रश्मिजाळ तळिं फांके ।
सवंसारु हें कावरुखें । झाड तैसें ॥ ५२ ॥
आणि आथिनाथि तेतुकें । रुंधलें एणें चि एकें ।
कल्पान्तिचेन उदकें । व्योम जैसें ॥ ५३ ॥
कां रविचां अस्तमानीं । अंधारेन कोंदें रजनी ।
तैसा हा चि गगनीं । मांडला असे ॥ ५४ ॥
एया फळ ना चुंबितां । फुळ ना तुरुंबितां ।
जें काहिं पांडुसुता । तें रुख चि हा ॥ ५५ ॥
हा ऊर्ध्वमूळ आहे । परि उन्मळला नोहे ।
एणें चि हा होये । शाड्वळु गा ॥ ५६ ॥
आणि ऊर्ध्वमूळ ऐसें । निगदिलें कीरु असे ।
परि अधिं हीं असोसें । मूळ यया ॥ ५७ ॥
पैं बल्बचेन महामारी । पिंपळावडाचिया परी ।
जेवि पारंबियां माझारें । डाहाळिया ॥ ५८ ॥

तेवि गा धनंजया । संसारतरू यया ।
अधीं चि आथि खांदिया । हें इं नाहिं ॥ ५९ ॥
तरि ऊर्ध्वा हि कडे । शाखांचे मांदोडे ।
दीसताति अपाडें । सांसिनले ॥ ६० ॥
जालें गगन चि पां वेलिये । कां वारा मांडला रुखाचेनि आयें ।
नाना अवस्थे त्राये । उदैला असे ॥ ६१ ॥
ऐसा हा एकु । विश्वाकारु विटंकु ।
उदैला जाणैं रूखु । उर्धमूळु ॥ ६२ ॥
आतां उर्ध येया कोण । तेथ मूळ तें किंलक्षण ।
कां अधोमुखपणेन । शाखा कैसिया ॥ ६३ ॥
अथवा द्रुमा एया । अधिं जिया मूळिया ।
तिया कोण्ही कैसिया । उर्ध शाखा ॥ ६४ ॥
आणि अश्वत्थु ऐसी । प्रसिद्धि काइसी ।
आत्मविद्विलासीं । निर्णो केला ॥ ६५ ॥
हें आघवें चि बरवें । तूझिये प्रतीती फावें ।
तैसेनि सांघों सोलिवें । विन्यासें गा ॥ ६६ ॥
पारि आइकैं सूभगा । हा प्रसंगु तुज चि जोगा ।
कान चि करीं सर्वांगां । हियें आथिलेयां ॥ ६७ ॥
ऐसें प्रेमरसें सुरफुरें । बोलिलें जवं यादवेश्वरें ।
तवं अवधान अर्जुनाकारें । मूर्त जालें ॥ ६८ ॥
देउ॰ निरोपीति तें थेकुलें । येसणें श्रोतेपण फांकलें ।
जैसें आकाशें खेंव पसरिलें । दाहिं दिशिं ॥ ६९ ॥
श्रीकृष्णसूक्तिसागरा । तो अगस्ति चि पां दूसरा ।
ह्मणौनि घोंटु भरुं पाहे एकसरा । आवत्रेयाचा ॥ ७० ॥
ऐसी सोये संडौनु खवलली । आवडि अर्जुनिं देवें देखिली ।
तेथ जालेन मुखें केली । कुरौंडि तेया ॥ ७१ ॥

मग ह्मणे धनंजया । तें उर्ध गा तरु येया ।
येणें रुखें चि कां जेया । ऊर्ध्वत्व गमे ॥ ७२ ॥
यऱ्हविं मध्योर्धअध । हे नाहिं जेथ भेद ।
अद्वयेंसिं एकवद । जिये ठांइं ॥ ७३ ॥
जो नाइकिजता नादु । जो असौरभ्यमकरंदु ।
जो आंगाथिला आनंदु । सुरतें विण ॥ ७४ ॥
जेया जें अऱ्हां परौतें । जेया जें पुढां माघौतें ।
दिसतेन विण दिसतें । अदृश्य जें ॥ ७५ ॥
उपाधिचा दूसरा । घालितां ॐपासिरा ।
नावां रूपा सवंसारा । नां होए जेया ॥ ७६ ॥
ज्ञातृज्ञेयविहीन । नसुधें चि जें ज्ञान ।
सुखा भरलें गगन । गांळिवं जें ॥ ७७ ॥
ऐसी वस्तु जे साचे । ते उर्ध गा एया तरुचें ।
तेथें आर घेणें मूळाचें । तें ऐसें असे ॥ ७८ ॥
तऱ्हीं माया ऐसी ख्याति । नसती च यया आथि ।
कां वांझेची संतती । वानों ए जैसी ॥ ७९ ॥
तैसी संत ना असंत होए । जे विचाराचें नावं न साहे ।
ऐसिया परी आहे । अनादि ह्मणति ॥ ८० ॥
जे भवद्रुमबीजिका । प्रपंचाची भूमिका ।
विपरीतज्ञानदीपिका । सांचली जे ॥ ८१ ॥
जे नानाशशक्तिची मांदुस । जे जगद्भ्रमाचें आकाश ।
जे आकारजाताचें दुस । घेडी केळी ॥ ८२ ॥
ते माया वस्तुचां ठांइं । असे जैसेनि नाहिं ।
मग वस्तुप्रभा चि पाहिं । प्रकट होए ॥ ८३ ॥
जेव्हाळिं आपणयां आली नीद । करी आपणपें जेवि मुग्ध ।
कां काजळि आणि मंद । प्रभा दिवें ॥ ८४ ॥

स्वप्निं प्रिया पुढां तरुणांगी । निदैली चेवउनि वेगें ।
आलंगितेन विण अलंगी । सकाम करीं ॥ ८५ ॥
तैसी स्वरूपिं जाली माया । आणि स्वरूप नेणणें धनंजया ।
ते चि तरु यया । मूळ पहिलें ॥ ८६ ॥
वस्तूसि आपुला जो अबोधु । तो उर्धि आळुलैजे कंदु ।
वेदांतिं हिं हा प्रसिद्धु । बीजभाऊ ॥ ८७ ॥
घन अज्ञान सुषुप्ति । तो बीजांकुरभाऊ ह्मणति ।
एर स्वप्न हान जागृति । फळभावो तेयाचा ॥ ८८ ॥
ऐसिया इया वेदांतिं । निरूपणभाषाप्रतीति ।
परि ते असो प्रस्तुतिं । अज्ञान मूळ ॥ ८९ ॥
तें ऊर्द्धि आत्मा निर्मळें । अधोर्द्ध सूचीति मूळें ।
बळिया बांधौनि आलें । मायायोगाचे ॥ ९० ॥
मग अधमूळासि देहांतरें । उठति जियें अपारें ।
तें चौपासिं घेउनु अगारें । खाळाविति ॥ ९१ ॥
ऐसें भवद्रुमाचें मूळ । हें ऊर्द्धि करी बळ ।
मग अणियांचे बेंबळ । अधीं चि दावी ॥ ९२ ॥
तेथ चिद्वृत्ति पहिलें । महातत्व उमललें ।
तें मान वाल्हेंदुल्हें । एक निगे ॥ ९३ ॥
मग सत्वरजतमात्मकु । त्रिविधु अहंकारु जो एकु ।
तो तिवना अधोमुखु । डिरु फुटे ॥ ९४ ॥
तो बुद्धिची घेउनि आगारी । भेदाची वृत्ति करी ।
तेथ मनाची डाळ धरी । साजेपणें ॥ ९५ ॥
ऐसा मूळाचिया गाढिका । विकल्परस कोंवळिका ।
चित्तचतुष्टय डाहाळिका । कोंभैजे बो ॥ ९६ ॥
मग आकाश वायु द्योतक । आप पृथ्वी हे पांचै फोंक ।
महाभूतांचें सारोक । सरले होंति ॥ ९७ ॥

तैसीं चि श्रोत्रादितन्मात्रें । तियें आंगवसा गर्भपत्रें ।
लुललुलितें विचित्रें । उमलती गा ॥ ९८ ॥
तेथ शद्बांकुर वरिपडी । श्रोत्रां वाढि देव्हडि ।
होंता करिती कांडीं । आकांक्षेची ॥ ९९ ॥
आंगत्वचेचे वेलपालव । स्पर्शांकुरिं घेंति धांव ।
तेथ बांब्ल पडे अभिनव । विकाराचें ॥ १०० ॥
पाठिं रूपपत्रपेलोवेल्हिं । चक्षु लांब तें कांडें बुद्धि घाली ।
तेव्हलिं व्यामोहता भली । पाल्हेली जाए ॥ १ ॥
आणि रसाचे आंगवसे । वाढतां वेगें बहुवसें ।
जिव्हे आर्तिचीं असोसें । निगति बेचें ॥ २ ॥
तैसिं चि कोंभैलेन गंधें । घ्राणाची डिरि थांउं बांधे ।
तेथ तलु घे सानंदें । प्रलोभाचा ॥ ३ ॥
एवं महदहंबुद्धि । मनें महाभूतसमृद्धि ।
इया संसाराचिया अवधी । सासन जें ॥ ४ ॥
किंबहुना इहिं आठें । आंगिं अधिक हा फांटे ।
परि सिंपी चि एव्हडें उमटे । रूपें जेवि ॥ ५ ॥
कां समुद्राचेनि पैसारें । वरि तरंगता आसारे ।
तैसें ब्रह्म चि होये वृक्षाकारें । अज्ञानमूल ॥ ६ ॥
आतां ययाचा हा विस्तारु । हा चि यया पैसारु ।
जैसा आपणपें स्वप्निं परिवारु । ऐकाकिया ॥ ७ ॥
परि तें असो हें ऐसें । कावरें झाड उससे ।
यया महदादि हे आरवसें । अधोशाखा ॥ ८ ॥
आणि अश्वत्थु ऐसें ययातें । ह्मणति जे जाणते ।
तें हिं परिस हो येथें । सांविजैल ॥ ९ ॥
तरि अश्वत्थु ह्मणिजे उखा । तवं वरि एकसारिखा ।
नाहिं निर्वाहो यया रुखा । प्रपंचरूपासि ॥ ११० ॥

जैसा न लोटतां क्षणु । मेघु होए नानावर्णु ।
कां विजु नसे संपूर्णु । निमेषु भरि ॥ ११ ॥
ना कांपतेया पद्मदला । वरिला बैसका नाहिं जला ।
कां चित्त जैसें व्याकुला । माणुसाचें ॥ १२ ॥
तैसी ययाची स्थिती । नासत जाये क्षणा प्रति ।
ह्मणौनि ययातें ह्मणति । अश्वत्थु गा ॥ १३ ॥
आणि अश्वत्थु एणें नावें । पिंपलु ह्मणति स्वभावें ।
परि तो अभिप्राउ नोहे । श्रीहरिचा ॥ १४ ॥
यऱ्हविं पिंपलु घडतां विखिं । मियां गति देखिली नीकी ।
परि तें असो काइ लौकिकिं । हेतु काज ॥ १५ ॥
ह्मणौनु हा प्रस्तुतु । अलौकिकु परियसां ग्रंथु ।
तरि क्षणिकत्वें चि अश्वत्थु । बोलिजे हा ॥ १६ ॥
आणिक हिं एकु थोरु । यया अव्ययत्वाचा डगरु ।
आथि परि तो भीतरु । ऐसा असे ॥ १७ ॥
जैसा मेघांचेनिं तोंडें । सिंधु एकें आंगें धढे ॥
आणि नदी एरी कडे । भरती चि असती ॥ १८ ॥
एथ वोहटे ना चढे । ऐसा परिपूर्णु चि आवडे ।
परि तें फुली जवं नुघडे । मेघांनदींचि ॥ १९ ॥
तैसें यया रुंखाचें होणें जाणें । तर्के होंतेनि वहिलेपणें ।
ह्मणौनि लोकु ययातें ह्मणे । अव्ययो हा ॥ १२० ॥
यऱ्हविं दानसीलु पुरुषु । वेचकपणें संचकु ।
तैसा व्ययें चि हा रुंखु । अव्ययो हा ॥ २१ ॥
जांतां वेगें बहुवसें । न वचे कां भुइं रुतलें असे ।
तें रथाचें चक्र दीसे । जिया परी ॥ २२ ॥
तैसें कालातिक्रमीं जे वाले । ते भूतशाखा जेथ गले ।
तेथ कोडि वारि उमाले । उठिति आणिक ॥ २३ ॥

परि एकि केधवां गेली । शाखाकोडि केधवां जाली ।
हें नेणवे जेविं उमलली । आखाडअभ्रें ॥ २४ ॥
महाकल्पाचां सेवटिं । प्रकटिया उमलती सृष्टि ।
तैसें चि आणिकिचें दांग उठि । सांसीनलें ॥ २५ ॥
संहारवातें प्रचंडें । पडति प्रलयांतिचिं सालडें ।
तवं कल्पादिचिं ज़ुंबाडें । पाल्हैजति ॥ २६ ॥
रिगे मन्वंतर मनू पुढें । वंशा वरि वंशाचे मांडें ।
जैसी इक्षुवृद्धि कांडेनकांडें । जींके जेवि ॥ २७ ॥
कलियुगांतीं कोरडीं । चहुं युगांचीं डालें सांडी ।
तवं कृतयुगाची पेली देव्हडी । पडे पुडुतीं ॥ २८ ॥
वर्त्ततें वरिष जाए । तें पुढिलां मुल्हारि होए ।
जैसा दिवसु जांतु किं एतु आहे । हें चोजवे नां ॥ २९ ॥
जैसिया वारियाचिया झुलुका । सांदा ठाउवा नव्हे देखां ।
तैसिया उठिति पडति शाखा । नेणों केति ॥ १३० ॥
एकी देहाची डिरी तुटे । तवं देहांकुरि बहुविं फुटे ।
ऐसेन भवतरु हा वाटे । अव्ययो ऐसा ॥ ३१ ॥
जैसें वाहातें पाणीं जाए वेगें । तैसें चि आणिक मिले मार्गे ।
तेविं असंत चि असिजे जगें । मानिजे ते ॥ ३२ ॥
कां लागौनि डोला उघडे । तवं कोडि वरि घडे मोडे ।
तें नेणतियां तरंगु आवडे । नित्य ऐसा ॥ ३३ ॥
वायसा एकें बुबुलें दोहिं कडे । डोला चालितां अपाडें ।
दोन्हि आथि ऐसा पडे । भ्रमु जेवि ॥ ३४ ॥
परि भिंगोरि निधिये पडिली । गमे भूमीसि जडली ।
ऐसा वेगातिसो भुली । हेतु होए ॥ ३५ ॥
हें बहू असो झडती । आंधारिं भवंडितां कोलिती ।
ते दीसे जैसी आइती । रेख सैंभ ॥ ३६ ॥

हा संसारवृक्ष तैसा । मोडतु मांडतु सहसा ।
नेदखौनि लोकु पींसा । अव्ययो मानी ॥ ३७ ॥

परि एयाचा वेगु देखे । जो हा क्षणिकु ऐसा वोळखे ।
जाणे कोडि वेळ निमिखें । होंतु जांतु ॥ ३८ ॥

नाहिं अज्ञान वांचूनि मूळ । एयाचें असिलेपण हें टवाळ ।
ऐसें झाड चि सीनसाळ । देखिले जेणें ॥ ३९ ॥

तेयातें गा पांडुसुता । मी सर्वज्ञु हिं ह्मणे जाणता ।
पैं वाग्ब्रह्मसिद्धांता । वेद्य तो चि ॥ १४० ॥

योगजाताचें जोडलें । तेया एकासि चि उपेगा गेलें ।
किंबहुना जिआलें । ज्ञान हिं तेणें ॥ ४१ ॥

असो हें बहू बोलणें । वानिजैल तो कवणें ।
जें भवरुंखु हा जाणे । उशि ऐसी ॥ ४२ ॥

**अधश्चोर्ध्वं प्रसृतास्तस्य शाखाः । गुणप्रवृद्धा विषयप्रवालाः ॥**
**अधश्च मूलान्यनुसंततानि । कर्मानुबंधीनि मनुष्यलोके ॥ २ ॥**

मग यया चि प्रपंचरूपा । अधःशाखिया पादपा ।
डाहालिया जांती उमपा । ऊर्ध्वा हिं उजू ॥ ४३ ॥

आणि अधिं फांकलीं डाळे । ऊर्धिं हिं तिष्टति मूळें ।
तेया तळिं पघळे । वेलु पालों ॥ ४४ ॥

ऐसें जें आह्मीं । ह्मणितलें उपक्रमीं ।
तें परियसैं सुगमीं । बोलिं सांघों ॥ ४५ ॥

तरि बद्धमूळें अज्ञानें । महदादिर्कि सासनें ।
वेदाचिं थोरवणें । वेउनियां ॥ ४६ ॥

परि आधिं तवं स्वेदज । जारजें उद्भिज मणिज ।
हे बुढौनि महाभुज । उठिति च्याऱ्हि ॥ ४७ ॥

एया एकएकांचेन अनगटें । चोरासी लक्ष धाकुटे ।
तेव्हळिं जीवशाखीं फांटे । सैंघ चि होंति ॥ ४८ ॥
प्रसवतु शाखा सरळिया । नानासृष्टि डाहाळिया ।
आडफांटाति माळिया । जातींचिया ॥ ४९ ॥
स्त्रीपुरुषनपुंसकें । हे व्यक्तिभेदांचे टके ।
आंदोळति आंगिकें । विकारभारें ॥ १५० ॥
जैसा वर्षाकाळु गगनीं । पल्हैजे नवघनीं ।
तैसें आकारजात अज्ञानीं । वेळिं जाए ॥ ५१ ॥
मग शाखांचेनि आंगभरें । ल्वौनि गुंपति परस्परें ।
गुणक्षोभाचें वारें । उदैजति ॥ ५२ ॥
तेथ तेणें अचाटें । तिहिं ठांइं हा फांटे ।
गुणाचेन झडझडाटें । ऊर्ध्वमूळु ॥ ५३ ॥
ऐसा रजाचिया झुळुका । झडाडितां आगळिका ।
मनुष्यजातिशाखा । थोरावति ॥ ५४ ॥
तिया ऊर्ध ना अधिं । माझारि चि कोंदाकोंदि ।
आंडफांटति खांदि । चतुर्वर्णांचां ॥ ५५ ॥
तेथ विधिनिषेधीं सपलव । वेदवाक्यांचे अभिनव ।
पाल्व डोलति बरव । आणिति तियां ॥ ५६ ॥
अर्थकामपसरें । अग्रवणें येंति थोरें ।
तेथ क्षणिकें पदांतरें । इहभोगाची ॥ ५७ ॥
तेथ प्रवृत्तिचेनि वृद्धिलोभें । खांखरैजति शुभाशुभें ।
नाना कर्मांचे खांबे । नेणों केती ॥ ५८ ॥
तेवि चि क्षणे भोग मागिलें । पडति देहांची बुडसलें ।
तवं पुढां वाढ पेले । नवेयां देहांचा ॥ ५९ ॥
आणि शब्दादिक सुहावे । साहाजें रंगें हवावें ।
विषयपल्लव नवे । नीच होंति ॥ १६० ॥

ऐसें रजोवातप्रचंडे । मनुष्यशाखांचे मांदोडे ।
वाढति तो एथ रूढे । मनुष्यलोकु ॥ ६१ ॥
तैसा रजाचा तो वारा । नावेक धरी वोसरा ।
मग वाजों लागे घोरा । तमाचा जो ॥ ६२ ॥
तेधवां इया चि मनुष्यशाखा । नीच वासना अधि देखां ।
पाल्हैजति डाळुका । कुकर्मांचिया ॥ ६३ ॥
अप्रवृत्तिचें खनुवाळे । फोंक निगति सरळे ।
घेंत पान पाळव डाळें । प्रमादिचीं ॥ ६४ ॥
बोलति निषेध नियमें । जिया ऋग्यजुःसामे ।
तो पाला तेयां घुमे । टकेयां वरि ॥ ६५ ॥
प्रतिपादिति अभिचार । आगम जे परमार ।
ते हिं पानि घेंति पसर । वासनावेलि ॥ ६६ ॥
तवं तवं होंति थोरांडें । अकर्माची तळबुडें ।
आणि जन्मशाखा पुढपुढें । घेंति धांवा ॥ ६७ ॥
तेथ चांडाळादि निकृष्टां । दोषजातींचा थोर फांटा ।
जाल पडों लागे कर्मभ्रष्टां । भुलौनियां ॥ ६८ ॥
पशु पक्षी शूकर । व्याघ्र वृश्चिक विखार ।
हे आडशाखानिकर । थोरावती ॥ ६९ ॥
परि ऐसिया शाखा पांडवा । सर्वांगिं हिं नीच नवा ।
नरकभोगु यावा । फळाचा तो ॥ १७० ॥
आणि हिंसाविषय पुढारिं । कुकर्मसंगें धुरु धरी ।
जन्म वरि अगारीं । वाढती चि असे ॥ ७१ ॥
ऐसीं होंति तरु तृणें । लोह लोष्ट पाखाणें ।
इया खांदिया तेथि जाणैं । फळें हें चि ॥ ७२ ॥
अर्जुना गा इया परीं । मनुष्यां लागौनि अवधारीं ।
इहि स्थावरान्त वेन्हीं । अधोशाखांची ॥ ७३ ॥

ह्मणौनु जें माणुसें डाळें । इयें चि जाणें अधीं मूळें ।
एथौनि मग पघळे । संसारतरू ॥ ७४ ॥
यऱ्हवीं उर्धिचें पार्था । मुदल मूळ पांतां ।
आधिचिया मध्यस्था । शाखा इया ॥ ७५ ॥
परि तामसीसात्विकीं । सुकृतदुष्कृतात्मकिं ।
विरूढति इया शाखिं । अधोर्धींचां ॥ ७६ ॥
आणि वेदत्रयीचेया पाना । नैए अन्यत्र ळागौं अर्जुना ।
जे मनुष्यें वांचौनु विधाना । विषो नाहिं ॥ ७७ ॥
ह्मणौनि तनुमानुषां । इया उर्धमूळौनि शाखा ।
तन्हि कर्मवृद्धिसि देखां । इया चि मूळें ॥ ७८ ॥
आणि आणिकां हिं झाडिं । शाखा वाढतां मूळें गाढिं ।
मूळें गाढें तवं वाढि । पैसु आधि ॥ ७९ ॥
तैसें चि यया शरीरा । कर्मे देहसंसारा ।
आणि देह तवं व्यापारा । नां ह्मणों नैए ॥ १८० ॥
ह्मणौनि देहें मानुषें । इयें मूळें होंति न चुके ।
ऐसें जगज्जनकें । बोलिलें तेणें ॥ ८१ ॥
मग तमाचें तें दारुण । थिरावलेयां वाउधाण ।
सत्वाची सूटे सत्राण । वाहुटळी ॥ ८२ ॥
तें इया मनुष्याकारा । मूळिं सुवासना निगति आरा ।
धेउनि सूटति कोंभारा । सुकृतांकुरीं ॥ ८३ ॥
उकळतेन उन्मेखें । प्रज्ञाकुशळतेचां तिखें ।
डिरिया रिगति निमिखें । बांबळैजौनि ॥ ८४ ॥
तेथ मेधारसें सगर्भ । आस्थापत्रिं सवांब ।
सरळे निगति कोंभ । सद्वृत्तिचे ॥ ८५ ॥
सदाचारांचिया सहसा । टके उठिती बहुवसा ।
धुमधुमिति घोसां । वेदपक्षांचां ॥ ८६ ॥

शिष्टागमनविधानें । विविधयागवितानें ।
तियें पाना वरि पानें । पांजरति ॥ ८७ ॥
ऐसां यमदमिं घोंसालियां । उठिति तपाचिया डाहालिया ।
देंति वैराग्यशाखा कोंवलिया । वेल्हाळपणें ॥ ८८ ॥
विशिष्टां व्रतांचे फोंक । धीराचां अणगटिं तीख ।
जन्मवेगें उर्धमुख । उंचावती ॥ ८९ ॥
माजि वेदांचा पाला दाट । तो करी विद्यांचा झडझडाट ।
जवं वाजे अचाट । सत्वानिळु तो ॥ १९० ॥
तेथ धर्मडाहालबाहालिं । दीसति जन्मशाखा पालवी ।
तिया आडफुटती फळीं । स्वर्गादिकिं ॥ ९१ ॥
पुढां उपरतिरागें लोहिविं । धर्ममोक्षाची शाखा सरली ।
लाहातलाहात नीच नवी । वाढती चि असे ॥ ९२ ॥
पैं रविचंद्रादि ग्रहवर । पितृ ऋषि विद्याधर ।
हे आडशाखाप्रसर । पैसु घेंति ॥ ९३ ॥
एया हि हूनि उंचपडे । गूढले फळाचेनि बुडें ।
इंद्रादिक ते मांदोडे । थोर शाखांचे ॥ ९४ ॥
मग तेया हिं उपरि डाहालिया । तपोज्ञानिं उंचावलिया ।
मरीचिकश्यपादिया । उपरिशाखा ॥ ९५ ॥
एवं पालोवालिं उत्तरोत्तरु । उर्धशाखांचा हा पैसारु ।
बुडिं साना अग्रिं थोरु । फळाढ्यपणें ॥ ९६ ॥
वरि उपरिशाखा हिं पाठीं । एंति फळभार जे किरीटी ।
ते ब्रह्मेशान्तअणगटिं । कोंभ निगति ॥ ९७ ॥
फळाचेनि अव्हाळपणें । ऊर्ध्व अव्हांडैल दूणें ।
जवं माघौतें वैसणें । मूळिं चि होए ॥ ९८ ॥
प्राकृतां तऱ्हीं रुखां । जे फळें दाटिली होये शाखा
ते अव्हांडिली देखां । बूढाति ए ॥ ९९ ॥

तरि जेथौनि हा आघवा । संसारतरुचा उठावा ।
तियें मूळिं टेंकति पांडवा । वाढतीं ज्ञानें ॥ २०० ॥
ह्मणौनि ब्रह्मेशाना परौतें । वाढणें नाहिं जीवातें ।
तेथौनि मग वरौतें । ब्रह्म चि किं ॥ १ ॥
परि हें असो ऐसें । ब्रह्मादिक तें आंगवसें ।
उर्धमूळा सरिसे । न तूकति गा ॥ २ ॥
आणिक हिं शाखा उपरता । जिया सनकादि नामें विख्याता ।
तिया फाळिं मूळिं नाडळतां । भरलिया ब्रह्मिं ॥ ३ ॥
ऐसीं मनुष्या लागौनि जाणावी । उर्ध्व ब्रह्मादि शेष पाल्वी ।
शाखांची वाढि बरवी । उंचावे पैं ॥ ४ ॥
पार्था उर्धिचेया ब्रह्मादि । मनुष्यत्व चि होए आदिं ।
ह्मणौनि इयें अधिं । ह्मणितलीं मूळें ॥ ५ ॥

**न रूपमस्येह तथोपलभ्यते । नान्तो न चादि र्न च संप्रतिष्ठः ॥**
**अश्वत्थमेनं सुविरूढमूलं । असंगशस्त्रेण दृढेन छित्वा ॥ ३ ॥**

एवं तुज अलौलिकु । हा अधोर्धशाखु ।
सांघितला भवरुंखु । उर्धमूळ ॥ ६ ॥
आणि अधिचीं हीं मूळें । उपरातिं दाविलीं सविवळें ।
आतां परियसैं उन्मूळे । कैसेनि हा ॥ ७ ॥
पारे तूझा हान पोटिं । ऐसें गमैल किरीटी ।
जे एवडें झाड उत्पाटी । ऐसें काइ असे ॥ ८ ॥
कें ब्रह्माचआ सेवट वेर्‍हीं । उर्ध शाखांची थोरी ।
आणि मूळें तवं निराकारिं । उर्धि असे ॥ ९ ॥
हा स्थावरां हिं तळिं । फांकतसे अधिचा डाळिं ।
माजि धांवतसे दूजां मूळिं । मनुष्यरूपिं ॥ २१० ॥
ऐसा गाढा आणि अफांटु । कोण करी यया सेवटु ।
तरि ज्ञनें हा हलवटु । धरिसी भाऊ ॥ ११ ॥

पैं हा उन्मळावेया दोखें । सायास चि काइसे ।
काइ बाळा बागुलु देशें । देव्हडा वाहे ॥ १२ ॥
गंधर्वदुर्ग कां न पाडावे । काइ शशविषाण मोडावें ।
होआवें मग तोडावें । खपुष्प किं ॥ १३ ॥
तैसा संसारु हा वीरा । रुंखु नाहिं साचोकारा ।
मा उन्मूळनिं दरारा । काइसा तऱ्हीं ॥ १४ ॥
आह्मीं सांवितली जे परी । मूळडाहाळांची उजिरी ।
ते वांझेचें घर भारें । लेंकुरुवें जैसीं ॥ १५ ॥
कां कीजति चेइलेपणीं । स्वप्निंचि तियें बोलणीं ।
जैसी जाण ते काहाणी । दुब्रळेयाची ॥ १६ ॥
ह्मणौनु पैं धनंजया । आह्मीं वानिली ते रूपगाया ।
कासविएचेनि तूपें राया । उञगरिलें ॥ १७ ॥
मूळ अज्ञान तें चि लटिकें । मा तयाचें काज केतुकें ।
ह्मणौनु संसाररुंखु सतिकें । वाउ चि पैं ॥ १८ ॥
आणि अंतु यया नाहिं । ऐसें वाखाणिजे जें काहिं ।
ते हिं साच चि पाहिं । परी एकी ॥ १९ ॥
तरि प्रबोध जवं नोहे । तवं नीदे काइ अंतु आहे ।
किं राति सरैळ पाहे । तेया आरौतें ॥ २२० ॥
तेविं जवं पार्था । विवेकु नुधवी माथा ।
तवं अंतु नाहिं अश्वत्था । भवरूपा एया ॥ २१ ॥
तैसें चि हा अनादि । ऐसी आहे शाब्दी ।
ते आलुकी नोहे नुरोधिं । बोलातें एया ॥ २२ ॥
जन्मे ना होए । ऐसेयां सांचों कव्हणी माए ।
एया लागि नाहिंपणें आहे । अनादि हा ॥ २३ ॥
आदि ना अंतु स्थिति । ना रूप ययासि आथि ।
काइसी कुंथाकुंथी । उन्मूळनीं गा ॥ २४ ॥

आपुलेया अज्ञाना साठिं । नव्हतां थांवला किरीटी ।
तरि आत्मज्ञानाचेनि लोटिं । खाडेनि गा ॥ २५ ॥
वांचौनि ज्ञानेन विण एकें । उपायें कारिसि तेतुके ।
तिहिं गुंपसि आविकें । रुखिं इयें ॥ २६ ॥
मग केतिकां खांदोखांदिं । येया हिंडावें उर्धि अधिं ।
ह्मणौनि मूळ चि अज्ञान छेदीं । सम्यग्ज्ञानें ॥ २७ ॥
यऱ्हविं दोरिएचेया उरगा । डांगा मेळवितां पैं गा ।
तो वाऊ चि फारु गा । केला होए ॥ २८ ॥
तरावेया मृगजळाची गंगा । डोणी लागि धांवतां दांगा ।
माजि वाहलें बुडिजे पैं गा । साचें जेविं ॥ २९ ॥
तेविं नाथिलेयां संसारा । उपाइं जाचतेया वीरा ।
आपणपें लोपें वारा । विकोपिं जाए ॥ २३० ॥
ह्मणौनि स्वप्निचेया घाया । ऊखदें चेऊ धनंजया ।
तेविं अज्ञानमूळा यया । ज्ञान चि खड्ग ॥ ३१ ॥
परि तें चि लीला परजवें । तैसें वैराग्याचें नीच नवें ।
अभंग बळ होआवें । बुद्धीसि गा ॥ ३२ ॥
उठिलेनि वैराग्यें एणें । त्रिवर्गु हा कैसा संडणें ।
जैसें वमौनियां सुणें । आतां चि गेलें ॥ ३३ ॥
हा ठाऊ पांडवा । पदार्थजातीं आघवा ।
विटंबी तो होआवा । वैराग्यलोटु ॥ ३४ ॥
मग देहअहंतेचें दळें । सांडुनि एकें वेळें ।
प्रत्यग्बुद्धिकरवाळें । हातवसावें ॥ ३५ ॥
निसले विवेकुसाहाणें । जें ब्रह्मास्मिबोधें सणाणे ।
मग पुरतेन बोधें उटणें । एकलें चि ॥ ३६ ॥
परि निश्चयाचिये मुठी बळ । होआवेया एकि दोनि वेळ ।
मग तुळावें अतिचोखाळ । मनन वेऱ्हीं ॥ ३७ ॥

पाठिं हातियरां आपणेयां । निदिध्यासें एक जालेयां ।
पुढां नुरैल घाया । पुरतें गा ॥ ३८ ॥
तें आत्मज्ञानाचें खांडें । अद्वैतप्रभेचेनि वाढें ।
नेंदील उरों कव्हणी कडे । भवरुंखासि ॥ ३९ ॥
तेव्हाळिं उर्ध कां उर्धि मूळ । ना अधिचें हान शाखाजाळ ।
तें कहीं चि न दीसे मृगजळ । चांदिणां जेवि ॥ २४० ॥
ऐसेन गा वीरनाथा । आत्मज्ञानाचिया खड्गलता ।
छेदौनियां भवाश्वत्था । उर्धमूळातें ॥ ४१ ॥
मग इदंतेसि वाळलें । मीपणें विण डाहारलें ।
तें रूप पाहिजे आपुलें । आपण चि ॥ ४२ ॥
पारि दर्पणाचेनि आधारें । एक चि करुनि दूसरें ।
मुख पांति गावारें । तैसें नका हो ॥ ४३ ॥
आपण चि आपणेयातें । पाहिजे जें अद्वैतें ।
तें ऐसें होए निरुतें । बोलिजतु असे ॥ ४४ ॥

**ततः पदं तत्परिमार्गितव्यं । यस्मिन्गता न निवर्त्तन्ति भूयः ॥**
**तमेवचाद्यं पुरुषं प्रपद्ये । यतः प्रवृत्तिः प्रसृता पुराणी ॥ ४ ॥**

जें पाहिजेतेन विण पाहिजे । कांहिं नेणतां चि जाणिजे ।
आद्यपुरुखु ह्मणिजे । जेया ठायातें ॥ ४५ ॥
तेथ उपाधिचा वोथंबा । घेउनि श्रुती धांवति जीभा ।
मग नावारूपाचां वडंबा । करिती वायां ॥ ४६ ॥
पैं भवस्वर्गा उबगले । मुमुक्षु योगज्ञान वळघले ।
पुडुतीं नैयों इया निगाले । पैजा जेथ ॥ ४७ ॥
संसाराचेयां पायां पुढां । पळती वीतराग होडां ।
ओलंडौनि ब्रह्मपदाचा कर्मकडा । घाळति मागां ॥ ४८ ॥
अहंतादिभावां आपुळेयां । झाडा देउनि आघवेयां ।
पत्र घेंति ज्ञानिये जेया । मूळघरासि ॥ ४९ ॥

जिये कां वस्तुचें नेणणें । आणिलें जगा थोर जाणणें ।
नाहिं तें चि नांदविलें जेणें । मी तूं जगिं ॥ २५० ॥
पैं जेथौनि हे एव्हडी । विश्वपरंपरेची वेलांडी ।
वाढती आस जैसी कोरडी । निदैवाची ॥ ५१ ॥
पार्था तें वस्तु पहिलें । आपणपें पैं आपुलें ।
पाहिजे जैसें हिवंलें । हिवं हिवें ॥ ५२ ॥
आणिक हिं एक तेया । उ॰लखणें असे धनंजया ।
तरि जेया कां भेटलेयां । एणें चि नाहिं ॥ ५३ ॥
परि तेया भेटति ऐसें । जें ज्ञानें सर्वत्र सरिसें ।
महाप्रळयांबुचें जैसें । भरलेपण ॥ ५४ ॥

**निर्मानमोहाजितसंगदोषा अध्यात्मनित्या विनिवृत्तकामाः ॥**
**द्वंद्वै विंमुक्ताः सुखदुःखसंगै गंछंत्यमूढाः पदमव्ययं तत् ॥ ५ ॥**

जेयां पुरुषांचें मन । संडौनि गेलें मोहमान ।
वरिखा अंतिं जैसे घन । आकाशातें ॥ ५५ ॥
निकवडेया निष्ठुरा । उबगिजे जेविं सोइरा ।
तैसे नांगवति विकारां । वेटाळों जे ॥ ५६ ॥
फळती केळि उन्मळे । तैसी आत्मलाभें प्रबळें ।
तेयांची क्रिया ढाळें ढाळें । गळती आहे ॥ ५७ ॥
आगि लागलेयां रुंखिं । देखौनि सैरा पळति पक्षी ।
तैसें सांडिलें असेखिं । विकल्पि जे ॥ ५८ ॥
आईकें सकलदोषतृणीं । अंकुरैजति मेदिनी ।
तिये भेदबुद्धिची काहाणी । नाहिं जेयांतें ॥ ५९ ॥
सूर्योदया सरिसी । राति पळौनि जाए आपैसी ।
गेली देहाहंता तैसी । अविद्येसवें ॥ २६० ॥
आयुष्यहीना जीवातें । देह संडी जेविं अवचितें ।
तेवि निदसुरें द्वैतें । संडिलें जे ॥ ६१ ॥

लोहाचें सांकडें परिसा । न जोडे आंधारु रवि जैसा ।
द्वैतबुद्धिचा तैसा । जेयां दुकलु ॥ ६२ ॥
आगा सुखदुःखाकारें । द्वंद्वें देहियां जियें गोचरें ।
तियें जेयां समोहरें । होंति चि ना ॥ ६३ ॥
स्वप्निचेया राज्य कां मरण । नोहे हर्षशोकासि कारण ।
प्रबोधलेयां जाण । जिया परी ॥ ६४ ॥
तैसें सुखदुःखरूपिं । दंदिं जे पुण्यपापिं ।
नेघपिजति सर्पिं । गरुडु जैसा ॥ ६५ ॥
आणि अनात्मवर्गु नीर । सांडूनि आत्मरसाचें क्षीर ।
चरताति जे सविचार । राजहंस ॥ ६६ ॥
जैसा वारिखौतु भूतळिं । आपुला रसु अंशुमाळी ।
माघुता आणी रश्मिजाळिं । बिंबासि चि ॥ ६७ ॥
तैसें आत्मभ्रांति साटिं । वस्तु विखुरली वारें वाटिं ।
ते एकवटिति आत्मदृष्टि । अखंड जे ॥ ६८ ॥
किंबहुना आत्मेयाचां निर्द्धारिं । जेयां विवेकु शुद्ध अंतरिं ।
गंगेचा ओघ सागरिं । बुडाला जैसा ॥ ६९ ॥
पैं आघवें चि जालेपणें । नुरे चि जेयां अभिलाखणें ।
जैसें एथौनि पऱ्हां जाणें । नाहिं आकाशासि ॥ २७० ॥
जैसा आगिचा डोंगरु । नेवे कोण्हीं बीजें अंकुरु ।
तैसा मनिं जेयां विकारु । उदैजे नां ॥ ७१ ॥
हें केती बोलों असंवडें । जेविं परमाणु नुरे वायू पडें ।
तैसें विषयांचें नावडे । नावं जेयां ॥ ७२ ॥
एवं जे जे कोण्हीं ऐसे । केले ज्ञानहुताशें ।
तेथ मिळति ते तैसे । हेमिं हेम ॥ ७३ ॥
तेथ ह्मणिजे कोण्हीं टांइं । ऐसें पूसशील जऱ्हि काहिं ।
तऱ्हि तें तें पद नाहिं । वेचु जेया ॥ ७४ ॥

दृश्यपणें देखिजे । कां ज्ञेयत्वें जाणिजे ।
अमुकें ऐसें ह्मणिजे । तें जें नोहे ॥ ७५ ॥
पैं दीवेयांचेयां वंबाळिं । कां चांदु हान उजळी ।
हें काइ बोलों अंशुमाली । प्रकाशी जें ॥ ७६ ॥
तें आववें चि दीसणें । जेयातें कां नेदखणें ।
विश्व आभासतसे जेणें । लपालेनि ॥ ७७ ॥
जैसें सिंपीपण हारपे । तवं तवं खरें होए रूपें ।
कां दोरी लोपतां सांपे । फारां होइजे ॥ ७८ ॥

**न तद्भासयते सूर्यो न शशांको न च पावकः ॥**
**यद्गत्वा न निवर्त्तते तद्धाम परमं मम ॥ ६ ॥**

तैसिं चंद्रसूर्यादि थोरें । इयें तेजें जियें फारें ।
तियें जेयाचेनि आधारें । प्रकाशति ॥ ७९ ॥
ते वस्तु किं तेजोराशि । सर्वभूतात्मक सरिसी ।
चंद्रसूर्याचां मानसीं । प्रकाशे जे ॥ २८० ॥
ह्मणौनि चंद्रसूर्य कडवसां । पडति वस्तुचेया प्रकाशा ।
यया लागि तेज जें तेजसां । तें वस्तुचें आंग ॥ ८१ ॥
आणि जेयाचेयां प्रकाशिं । जग हारपे चंद्रार्केसिं ।
चांदिं ऋखें जैसिं । दिनोदइं ॥ ८२ ॥
नातरि प्रबोधलिए वेळे । स्वप्नडिंब माळवे ।
कां नुरे चि सांजोळे । मृगतृष्णिका ॥ ८३ ॥
तैसा जेया वस्तुचां ठांइं । कोण्ही चि कां आभासु नाहिं ।
तें माझें निजधाम पाईं । पाटाचें गा ॥ ८४ ॥
पुडुतीं जेथ गेले । नेघति चि कां माघौतीं बाउलें ।
महोदधी मीनले । स्रोत जैसे ॥ ८५ ॥
कां ल्वणाची कुंजरी । सूदली सानी सागरीं ।
होए ना माघारी । परतोनु गा ॥ ८६ ॥

नाना गेलिया अंतराळां । न एंति चि वन्हिज्वाळा ।
नाहिं तप्तलोहौनि जळा । निगणें जैसें ॥ ८७ ॥
तेविं मजसि एकवट । जालेन ज्ञानें चोखट ।
तेयां पुनरावृत्तिची वाट । मोडोनु ठेली ॥ ८८ ॥
एथ प्रज्ञापृथिवियेचा राउ । पार्थु ह्मणे जी जी पसाउ ।
विनतिए एकिए देउ । चित्त देंतु ॥ ८९ ॥
तरि देवेंसिं स्वयें एक होंति । मावौतें जे नेयंति ।
ते देवेंसिं भिन्न आथि । अभिन्न वा ॥ २९० ॥
जन्हीं भिन्न चि अनादिसिद्ध । तन्हि नेयंति हें असंबद्ध ।
जे फुलीं लागले षड्पद । काइ फुलें चि होंतु ॥ ९१ ॥
पैं लक्ष्याहूनि अनारिसे । बाण लक्ष्य सिवौनि जैसे ।
मावौतें पडति तैसे । एंति चिं ते पैं ॥ ९२ ॥
ना तरि तूं चि ते स्वभावें । तरि कन्हणें कन्हणासिं मिळावें ।
आपणेयांसिं चि रूपावें । शस्त्रें केविं ॥ ९३ ॥
ह्मणौनि तुजसिं अभिन्नां जीवां । तूझा संयोगु वियोगु देवा ।
नेए बोलों अवेवां । शरीरेंसिं ॥ ९४ ॥
आणि जे सदा वेगळे तुजसिं । तेयां मिळणें नाहिं कोण्हे देशिं ।
मा यंति नयंति हे कायिसी । वाया बुद्धि ॥ ९५ ॥
तरि कोण गा ते तूतें । पावौनि नेएंति मावौतें ।
हें विश्वतोमुखा मातें । बुझावि जी ॥ ९६ ॥
एंसां आक्षेपीं अर्जुनाचां । तो शिरोमणि सर्वज्ञांचा ।
तोखला बोधु शिष्याचा । देखौनियां ॥ ९७ ॥
मग ह्मणे गा महामती । मातें पावौनि नेयंति पुडुतीं ।
ते भिन्न अभिन्न पैं रीती । दोनी आहाति ॥ ९८ ॥
जे विवेकें खोलें पाहिजे । तरि मीं चि ते साहाजें ।
ना आहाचवाहाच दूजे ॥ ऐसे गमति ॥ ९९ ॥

जैसे पाणियां हिं वेगळे । आपजतां दीसति कल्लोळे ।
यऱ्हवीं तरि निखळें । पाणीं चि तें ॥ ३०० ॥
कां सुवर्णा होउनि आनें । लेणीं गमति भिन्नें ।
मग पाहिजे तवं सोनें । आघवें चि तें ॥ १ ॥
तैसें ज्ञानाचिये दीठी । माझि अभिन्न चि ते किरीटी ।
एर भिन्नपणें ते उठी । अज्ञाना तव ॥ २ ॥
साचोकारेनि वस्तुविचारें । कैंचें एकासिं मज दूसरें ।
जें भिन्नाभिन्नव्यवहारें । उमसिजैल ॥ ३ ॥
आघवें चि आकाश सूनि पोटिं । बिंब चि जैं आते खोटी ।
तैं प्रतिबिंब कैं उठी । कें रश्मि सिरे ॥ ४ ॥
कां कल्पांतिचेया पाणियां । काइ ऊन्त भरतााति धनंजया ।
ह्मणौनि कैंचे अंश अविक्रिया । एका मज ॥ ५ ॥
परि ऊघाचेनि मेळें । पाणीं उजू परि वांकुडें जालें ।
खी दूजेपण आलें । तोयबगें ॥ ६ ॥
व्योम किं चौफळ वाटौळें । हें ऐसें काइसेया हिं मिळे ।
परि घटमठिं वेंटाळलें । तैसें हिं आथि ॥ ७ ॥
हांगा नीदेचेनि आधारें । काइ एकलेनि जग न भरे ।
स्वप्निचेनि जैं अवतरे । रायेपणें ॥ ८ ॥
कां मीनलेनि कीडाळें । वानिभेदासि ए सोळें ।
तैसा स्वमाया वेटाळें । शुद्ध जै मीं ॥ ९ ॥
तैं अज्ञान हें रूढे । तेणें कोहंविकल्पाचें मांडे ।
मग विवरौनि कीजे फुडें । देहो मीं ऐसें ॥ ३१० ॥

**ममैवांशो जीवलोके जीवभूतः सनातनः ॥**
**मनःषष्ठानींद्रियाणि प्रकृतिस्थानि कर्षति ॥ ७ ॥**

ऐसें शरीरा चि एवडें । आत्मज्ञान वेगळें पडे ।
तो माझा अंशु ऐसें आवडे । थोडेपणें ॥ ११ ॥

समुद्र कां वायुवसें । तरंगाकारु उल्हासे ।
तो समुद्रांशु ऐसा दीसे । सानिवां जेविं ॥ १२ ॥
तेविं जडातें जीवविता । देहअहंता उपजविता ।
मीं जीउ गमे पांडुसुता । जीवलोकिं ॥ १३ ॥
पैं जीवाचेया बोधा । गोचरु हा धांधा ।
तो जीवलोकुशब्दा । अभिप्राउ ॥ १४ ॥
आगा उपजणें निमणें । हें साच काइ मानणें ।
तो जीवलोकु मीं ह्मणें । संसारु हान ॥ १५ ॥
एवंविधि जीवलोकिं । तूं मातें ऐसेयां अवलोकिं ।
जैसा चांदु कां उदाकिं । उदकातीतु ॥ १६ ॥
पैं काश्मिरीचा रवा । कुंकुमा वारि पांडवा ।
आणिकां गमे लोहिवां । तो तरि नव्हे ॥ १७ ॥
तैसें अनादिपणें नोमोडे । माजि अक्रियत्व न खांडे ।
पारि कारिता भोक्ता आवडे । ते जाण गा भ्रांत ॥ १८ ॥
किंबहुना आत्मा चोखटु । होउनि प्रकृतिसिं एकवटु ।
बांधे प्रकृतिधर्माचा पाटु । आपणपेयां ॥ १९ ॥
पैं मनादि साहीं इंद्रियें । श्रोत्रादि प्रकृतिकार्यें ।
तियें माझीं ह्मणौनि होए । व्यापारिं रूढ ॥ ३२० ॥
जैसें स्वप्निं परिव्राजें । आपणपेयां कुटुंब होइजे ।
मग तेयाचेनि धांविजे । मोहें सैरा ॥ २१ ॥
तैसें आपुलिया विस्मृती । आत्मा आपण चि प्रकृती ।
सारिसा गमौनि पुडुतीं । तिसिं चि भजे ॥ २२ ॥
मनाचां रथिं वळघे । श्रवणाचेनि द्वारें निगे ।
मग शब्दाचेया रिगे । राना माजि ॥ २३ ॥
तो प्रकृतिचा वागौरा । करी त्वचेचिया मोहरा ।
आणि स्पर्शाचेया घोरा । वना जाए ॥ २४ ॥

कोणिह एकिं अवसरिं । निगौनि नेत्रांचां द्वारिं ।
रूपाचां डोंगरिं । हिंडतु असे ॥ २५ ॥
कां रसनेचिया वाटा । निगौनि गा सूभटा ।
रसाचा दारकुटा । भरौनि ठाके ॥ २६ ॥
नातरि एणें चि घ्राणें । हा मदंशु करी निगवणें ।
मग गंधाचिं दारुणें । आडवें लंघी ॥ २७ ॥
ऐसें देहेंद्रियनायकें । धरुनु मन जावळिके ।
भोगिजति शब्दादिकें । विखाभरणें ॥ २८ ॥

**शरीरं यदवाप्नोति यच्चाप्युत्क्रामतीश्वरः ॥**
**गृहीत्वैतानि संयाति वायुर्गंधानिवाशयात् ॥ ८ ॥**

परि करिता भोक्ता ऐसें । हें जीवाचें तैं चि दीसे ।
जैं शरीरिं पैसें । एकाधिए ॥ २९ ॥
जैसा आथिला आणि विलासिया । तैं चि ओळखों ए धनंजया ।
जैं राज्यसेव्या ठाया । वस्तिसि ए ॥ ३३० ॥
तैसा अहंकर्तृत्वाचा वाडु । विषयेंद्रियांचा धुमाडु ।
हा जाणिजे तैं निवाडु । जैं देहो पावे ॥ ३१ ॥
अथवा शरीरातें संडी । तऱ्हीं चिचइंद्रियांची तांडी ।
आपणपेया सवें काढि । घेउनि जाए ॥ ३२ ॥
जैसा अपमानिला अतिथि । ने सुकृताची संपति ।
कां साएखेडेयाची गति । सूत्रतंतु ॥ ३३ ॥
नाना माळवतेनि तपनें । नेइजति लोकाचिं दर्शनें ।
हें असो द्रुति पवनें । नेइजे जैसी ॥ ३४ ॥

**श्रोत्रं चक्षुः स्पर्शनं च रसनं घ्राणमेव च ॥**
**अधिष्ठाय मनश्चायं विषयानुपसेवते ॥ ९ ॥**

तेविं मनःषष्ठां एयां । इंद्रियांतें धनंजया ।
देहराजु ने देहा । पासौनु घाला ॥ ३५ ॥

मग एथ अथवा स्वर्गीं । जेथ देह अपंगी ।
तेथ तैसिं चि पुडुतीं पार्गीं । मनादिक ॥ ३६ ॥
जैसा माल्हवलेयां दिवा । प्रभेसिं जाए पांडवा ।
मग उजळिजे तेथ तेव्हां । तैसा चि फांके ॥ ३७ ॥
परि ऐसिया इया राहाटी । अविवेकियाचिये दीठी ।
एतुलें हें किरीटी । गमे चि गा ॥ ३८ ॥
जें आत्मा देहा आला । आणि विखो एणें चि भोगिला ।
अथवा देहौनु गेला । हें साच चि नां ॥ ३९ ॥
यऱ्हवीं एणें जाणें । करणें हान भोगणें ।
हें प्रकृतिचें तेणें । मानियलें ॥ ३४० ॥
परि देहाचें मोटकें उभें । चेतना तेथ उपलभे ।
तिये चळवळेचेनि मोहें । आला ह्मणति ॥ ४१ ॥

**उत्क्रामंतं स्थितं वापि भुंजानं वा गुणान्वितं ।**
**विमूढा नानुपश्यंति पश्यंति ज्ञानचक्षुषा ॥ १० ॥**

तैसीं चि तिया संगति । इंद्रियें आपुलालां अर्थीं ।
वर्त्तति तेया नावं सुभद्रापति । भोगणें जेया ॥ ४२ ॥
पाठिं भोगक्षई आपैसें । देह गेलेयां तें न दीसे ।
एथ तवं गेला ऐसें । बोभाति गा ॥ ४३ ॥
पैं रुंखु डोळतु देखावा । तरि वारा वाजतु मानावा ।
रुंखु नसे तेथ पांडवा । नाहिं चि काइ ॥ ४४ ॥
कां आरिसा संमोहर ठेविजे । आणि आपणपें तेथ देखिजे ।
तरि तेव्हां चि जाला मानिजे । काइ आदिं नाहिं ॥ ४५ ॥
कां तो परौता केला आरिसा । लोपु जाला तेया आभासा ।
तरि आपणपें नाहिं ऐसा । निश्चो करावा ॥ ४६ ॥
सादु तरि आकाशाचा । परि कपाळिं पीटे मेघांचा ।
कां चांदिं वेगु अभ्राचा । आरोपिजे ॥ ४७ ॥

तैसें होइजे जाइजे देहें । तें आत्मसत्ते अविक्रिये ।
निष्टंकिति मोहें । आंधळे ते गा ॥ ४८ ॥
एथ आत्मा आत्मेयाचे ठांइं । देखिजे देहाचा धर्म देहिं ।
ऐसें देखणे ते पाहिं । आन आहाति ॥ ४९ ॥
ज्ञानें कां जेयाचे डोळे । देखौनि नन्हांति देहिचे खोळे ।
सूर्यरश्मि आणियाळें । ग्रीष्मि जैसें ॥ ३५० ॥
तैसें विवेकाचेनि पैसें । जेयाची स्फूर्ति स्वरूपिं बैसे ।
ते ज्ञानिये देखति ऐसें । आत्मेयातें ॥ ५१ ॥
जैसें तारांगण भरलें । गगनसमुद्रिं बिंबलें ।
परि हें तूटौनि नाहिं पडिलें । ऐसें निवडे ॥ ५२ ॥
गगन गगन चि आहे । हें आभासतसे तें वायें ।
तैसा आत्मा देखति देहें । गंवसिला हिं ॥ ५३ ॥
खलालांचेयां लगबगि । फेडौनि खलालांचेयां भागिं ।
देखिजे चंद्रिका ते उगी । चंद्रिं जेविं ॥ ५४ ॥
कां थिलर सोखे जैसें । सूर्यो जैसा तैसा असे ।
देह होंता जांता तैसें । देखति मातें ॥ ५५ ॥
घटमठ घडले । ते चि पाठिं मोडले ।
परि आकाश तें संचलें । असत चि असे ॥ ५६ ॥
तैसीं अखंडे आत्मसत्ते । अज्ञानदृष्टिकल्पितें ।
इयें देहें चि होंतें जांतें । जाणति फुडें ॥ ५७ ॥

यतंतो योगिनश्चैनं पश्यंत्यात्मन्यवस्थितं ॥
यतंतोप्यकृतात्मानो नैनं पश्यंत्यचेतसः ॥ ११ ॥

चैतन्य चढे ना उन्हटे । चेष्टवी ना चेष्टे ।
ऐसेनि आत्मज्ञानें चोखटें । जाणति ते ॥ ५८ ॥
आणि ज्ञान हिं आपैतें होइल । प्रज्ञा परिमाणु हिं उगाणा घेइल ।
सकळ शास्त्रां एइल । सर्वस्व हातां ॥ ५९ ॥

परि ते व्युत्पत्ति ऐसी । विरक्ति न रिगे मानसीं ।
तरि सर्वात्मका मजसिं । नोहे भेटि ॥ ३६० ॥
पैं तोंड भरो कां विचारा । आणि अंतष्करण विषयांसिं थारा ।
तरि नातुडे धनुर्द्धरा । विशुद्धि मीं ॥ ६१ ॥
हांगा उन्सणातियांचां ग्रंथि । काइ तूटति संसारगुंति ।
किं परिवसिलियां पोथि । वाचिली होए ॥ ६२ ॥
नाना बांधौनियां डोळे । घ्राणिं लाविजति मुक्ताफळें ।
तरि तेयांचें काइ केलें । मोलमान ॥ ६३ ॥
तैसा चित्तिं अहंते ठाउ । आणि जीभे सकळशास्त्रांचा सराउ ।
ऐसेनि कोडी एकी जन्म जाउ । परि न पविजे मातें ॥६४॥
जो एकु मीं कां समस्तिं । व्यापकु असे भूतजातिं ।
आइकें तिये व्यक्ती । रूप करुं ॥ ६५ ॥

**यदादित्यगतं तेजो जगद्भासयतेखिलं ॥**
**यच्चंद्रमसि यच्चाग्नौ तत्तेजो विद्धि मामकं ॥ १२ ॥**

तरि सूर्या सकट आघवी । हे विश्वरचना जे दावी ।
ते दीप्ति माझी जाणावी । आद्यंन्ति हे ॥ ६६ ॥
जळ सोखुनु गेलेयां सविता । उल्हासु पुरवितसे माघौता ।
ते चांदिं पांडुसुता । ज्योत्स्ना माझी ॥ ६७ ॥
आणि दहन पचन सिद्धि । करितसे जे निरवधि ।
ते हुताशिं तेजोवृद्धि । माझी चि गा ॥ ६८ ॥

**गामाविश्य च भूतानि धारयाम्यहमोजसा ॥**
**पुष्णामि चोषधीः सर्वाः सोमो भूत्वा रसात्मकः ॥१३॥**

मीं रिगाला असे भूतळिं । ह्मणौनि समुद्रमहाजळिं ।
ई पांसूची ढेंपुळी । वीरे चि नां ॥ ६९ ॥
आणि भूतें हिं चराचरें । हे धरीतसे अपारें ।
तें मीं चि धरिं धरें । रिगौनियां ॥ ३७० ॥

गगनिं मीं पांडुसुता । चंद्राचेन मीसें अमृता ।
भरला जालां चालता । सरोवरु ॥ ७१ ॥
तेथौनि फांकति रश्मिकर । ते पाट पेलौनि अपार ।
सर्वौषधींचे आगर । भरीतुसें मीं ॥ ७२ ॥
ऐसेनि सस्यादि सकळा । करीं धान्यजाति रसाळा ।
दें अन्नद्वारा जिव्हाळा । भूतजातां ॥ ७३ ॥

**अहं वैश्वानरो भूत्वा प्राणिनां देहमाश्रितः ॥**
**प्राणापानसमायुक्तः पचाम्यन्नं चतुर्विधं ॥ १४ ॥**

आणि निफजविलेयां अन्न । तरि तैसें कैंचें पां दीपन ।
जेणें जिरौनि समाधान । भोगिति जीव ॥ ७४ ॥
ह्मणौनि प्राणिजाताचां घटिं । करुनि कंदा वरि आगिठी ।
दीति जठरिं किरीटी । मीं चि जालां ॥ ७५ ॥
प्राणापानाचां जोडभातीं । फुंकफुंकौनियां अहोराती ।
आटितसे नेणों केती । उदरा माजि ॥ ७६ ॥
शुष्कें अथवा स्निग्धें । सुपक्कें कां विदग्धें ।
परि मीं चि गा चतुर्विधें । अन्नें पचीं ॥ ७७ ॥
एवं मीं चि आघवें जन । जना मीं चि जीवन ।
जीवना मुख्य साधन । वन्हि मीं चि ॥ ७८ ॥
आतां ऐसेया वरि काइ । सांघों व्यातिची नवाई ।
एथ दूजें नाहिं चि घेइं । सर्वत्र मीं ॥ ७९ ॥
तरि कैसेन पां वेखें । सदा सुखियें मानुषें ।
एक आक्रांत दुःखें । भूतजात ॥ ३८० ॥
जैसें सगळिए पाटणीं । एकें चि दीपें दिवेलावणी ।
जाळियां का नेदखणीं । उरलीं एकें ॥ ८१ ॥
ऐसी हान उखिविखि । करितु आहासि मानसिकी ।
तरि ते हिं परियस नीकी । शंका फेडूं ॥ ८२ ॥

पैं आघवा चि मीं असें । एथ नाहिं किं अनारिसें ।
परि प्राणियांचां ठांइं उल्हसे । बुद्धि ऐसी ॥ ८३ ॥
जैसें एका चि आकाशध्वनिं । वाद्येंविशेषिं अनानीं ।
वाजावें पडे भिन्नि । नादांतारिं ॥ ८४ ॥
कां लोकचेष्टिं वेगळाला । जो हा एकु चि भानु उदैला ।
तो अनाना परि गेला । उपेगासि ॥ ८५ ॥
नाना बीजधर्मा अनुरूप । झाडिं उभविलें आप ।
तैसें परिणमलें रूप । माझें जीवां ॥ ८६ ॥
आगा नेणा आणि चउरा । पुढां निळेयाचा दूसरा ।
नेणा सर्पत्वें जाला एरा । सुखा लागि ॥ ८७ ॥
हें असो स्वातिचें उदक । शुक्ति मोतिएं विआलीं विख ।
तैसें सज्ञानासिं मीं सुख । दुःख तें अज्ञानासिं ॥ ८८ ॥

**सर्वस्यचाहं हृदि सन्निविष्टो मत्तः स्मृति र्ज्ञानमपोहनं च ॥**
**वेदैश्च सर्वै रहमेव वेद्यो वेदांतकृद्वेदविदेव चाहं ॥ १५ ॥**

पार्था सर्वांचां हृदयेदेशिं । अमुका हे स्फूर्त्ति ऐसी ।
जे स्फुरत अहिर्णिशिं । ते वस्तु गा मीं ॥ ८९ ॥
परि संतां सवें वसतां । योगज्ञानिं पैसतां ।
गुरुचरण उपासितां । वैराग्येंसिं ॥ ३९० ॥
एणें चि सत्कर्में । अशेष हिं अज्ञान विरमे ।
जेयाचें अहं विश्रमे । आत्मरूपिं ॥ ९१ ॥
तें आपें आपु देखौनि देखिं । मियां आत्मेन सदा सुखी ।
एथ मीं वांचौनि अवलोकिं । आन हेतु असे ॥ ९२ ॥
आगा सूर्योदयो जालेयां । सूर्यो सूर्यें चि पाहावा धनंजया ।
तेविं मातें मीं जाणावेया । मीं चि हेतु ॥ ९३ ॥
ना शरीरप्रियातें सेवितां । संसारगौरव आइकतां ।
देहिं जेयाची अहंता । बुडौनि ठेली ॥ ९४ ॥

ते स्वर्गसंसारा लागि । धांवता कर्माचेयां मार्गि ।
दुःखाचां सेलभागिं । भागीन होंति ॥ ९५ ॥
परि हें इं होणें अज्ञ नां । मज चि तव तेया अर्जुना ।
जैसी जागृती चि हेतु स्वप्ना । निद्रिता होए ॥ ९६ ॥
पैं अभ्रें दिवसु हारतला । तो हिं तेणें चि जाणों आला ।
तेविं मीं नेणौनि विखो देखिला । मज चि तव भूतिं ॥ ९७ ॥
एवं नींदे कां जागणेया । प्रबोधु हेतु धनंजया ।
तेविं ज्ञानाज्ञानां जीवाचेया । मीं चि मूळ ॥ ९८ ॥
ह्मणौनु जैसा असें तैसेया । मातें नेणौनि धनंजया ।
वेदु जाणों गेला तवं तेया । जालिया शाखा ॥ ९९ ॥
तऱ्हि तिन्हीं शाखाभेदिं । मीं चि जाणिजे त्रिशुद्धि ।
जैसा पूर्वापरां नदीं । समुद्रु चि ठी ॥ ४०० ॥
आणि महासिद्धांतापासिं । श्रुती हारपती शब्देंसिं ।
जैसिया सगंधा आकाशीं । वातलहरिया ॥ १ ॥
तैसें समग्र हिं श्रुतिजात । ठाके लाजिलें ऐसें निवांत ।
तें मीं चि करीं यथावत । प्रकटौनियां ॥ २ ॥
पाठिं श्रुतिसहित अशेख । जग हारपे जेथ निशेख ।
तें निजज्ञान हिं चोख । जाणता मीं ॥ ३ ॥
जैसें निदेलेयां जागिजे । तेव्हां स्वप्निचें किर नाहिं दूजें ।
परि एकत्व हिं देखों पाविजे । आपुलें चि ॥ ४ ॥
तैसें आपुलें अद्वयपण । मीं जाणतु असें दूजेन विण ।
तेया हिं बोधा कारण । जाणता मीं चि ॥ ५ ॥
तरि आगि लागलेया कापुरा । काजळी ना वैश्वानरा ।
उरणें नाहिं वीरा । जिया परी ॥ ६ ॥
तेविं समूळ अविद्या खाए । तें ज्ञान हि जैं बुडौनि जाए ।
तैं जें नाहिं किर नोहे । आणि असे हि नां ॥ ७ ॥

पैं विश्व घेउनि गेला मागेंसि । तेया चोरातें कृष्ण गिवंसी ।
जे कोण्ही एकी दशा ऐसी । शुद्धा ते मीं ॥ ८ ॥
ऐसी जडाजडें व्याप्ति । रूप करितां कैवल्यपती ।
ठी केली निरुपहितीं । आपुलां रूपिं ॥ ९ ॥
तो आघवा चि बोधु सहसा । अर्जुनिं उमटला कैसा ।
व्योमिचा चंद्रोदयो जैसा । क्षीरार्णविं ॥ ४१० ॥
कां प्रतिभींती चोखटे । समोरिला चित्र उमटे ।
तैसा अर्जुने आणि वैकुंठें । नांदतुसे बोधु ॥ ११ ॥
तर्‍हि बापु वस्तुस्वभाउ । फांवे तवं तवं गोडिये थाउ ।
ह्मणौनि अनुभवियांचा राउ । अर्जुनु ह्मणे ॥ १२ ॥
जी व्यापकपण बोलतां । निरुपाधिक जें अनंता ।
स्वरूप प्रसंगता । बोलिले देउ ॥ १३ ॥
तें एकु वेलु अवेंगवाणें । कीजो कां मज सांघणें ।
एथ द्वारकानाथु ह्मणे । भलें केलें ॥ १४ ॥
पैं आह्मांसि हें कोडें । अखंड बोलों आवडे ।
परि काइ किजे न जोडे । पूसतें तैसें ॥ १५ ॥
आजि मनोरथासि फल । जोडलासि तूं केवल ।
जैं तोंड भरुनि निखल । आलासि पूसों ॥ १६ ॥
जें अद्वैता वरि भोगिजे । तिये अनुभविचें तूं विरजें ।
पूसौनि मज माझें । देंतासि सुख ॥ १७ ॥
जैसा आरिसा आलेयां जवलां । दीसे आपणपेयां आपुला डोला ।
तैसा संवादियां तूं निर्मला । शिरोमणि ॥ १८ ॥
तुवां नेणौनि पुसावें । मग आह्मिं परिसौनि बैसावें ।
तो पाडु एथ न मिरवे । सोइरेया ॥ १९ ॥
ऐसें ह्मणौनि आलंगिलें । कृपादृष्टी अवलोकिलें ।
मग मावौतें आदरिलें । बोलों अर्जुनेंसिं ॥ ४२० ॥

दों हांटिं एक बोलणें । दोहिं चरणिं एक चालणें ।
तैसें पूसणें सांघणें । तूझें माझें ॥ २१ ॥
एवं आह्मि तुह्मि बो एथें । देखावे एकार्थाथें ।
सांघतें पूसतें तेथें । दोन्हीं एक ॥ २२ ॥
ऐसा भूलला मोहें । देउ आलंगिला न्हाए ठायें ।
मग बिहाला ह्मणे नोहे । आवडी अर्जुनेंसि ॥ २३ ॥
जालें इक्षुरसाचें डाल । तऱ्हि लवण देणें किडाल ।
जें संवादसुधाचें रसाल । नासैल थितें ॥ २४ ॥
आदिं चि आह्मां यया काहिं । नरनारायणा सीनें नाहिं ।
परि आतां जिरों माझां ठांइं । वेगु माझा ॥ २५ ॥
इया बुद्धी सहसा । श्रीकृष्णु ह्मणे वीरेशा ।
पैं गा तो तुवां कैसा । प्रष्णु केला ॥ २६ ॥
जो अर्जुनु कृष्णिं विरत होता । तो परतौनियां मावौता ।
प्रश्नावलिची कथा । आइकों धांवला ॥ २७ ॥
एथ सगद्गदें बोलें । अर्जुनें जी ह्मणितलें ।
निरुपाधिक आपुलें । स्वरूप सांघां ॥ २८ ॥
एया बोला तो शांर्ङ्गि । तें चि सांघावेया लागि ।
उपाधि दोहिं भागिं । निरूपितु असे ॥ २९ ॥
पूसलेयां निरुपहित । उपाधि कां सांघे प्रस्तुत ।
हें कोण्हां हिं एथ । गमे जरि ॥ ४३० ॥
तरि ताकाचे अंश फेडणें । यया चि नावं लोणीं काढणें ।
चोखाचिये शुद्धि तोडणें । कीड चि जेविं ॥ ३१ ॥
बाबुलि साराची हातें । परि पाणीं असे आइतें ।
अभ्र गेलेयां गगन तें । सिद्ध चि किं ॥ ३२ ॥
वरिलु कोंडेयाचा गुंडाला । संडुनु केलेयां वेगला ।
कणु घेतां विरंगुला । असे काहिं ॥ ३३ ॥

तैसा उपाधि उपहिता । सेवटु जेथ विचारितां ।
तें कोण्हां हिं न पूसतां । निरुपाधिक ॥ ३४ ॥
जैसें न संवर्णे वरि । बाला पतिसि रूप करी ।
बोलु निमालेपणें विखरी । अचर्च्यातें ॥ ३५ ॥
पां सांघणेया जोगें नव्हे । तेथिचें सांघणें ऐसें आहे ।
ह्मणौनि उपाधि लक्ष्मीनाहें । बोलिजे आदिं ॥ ३६ ॥
पाडिवेयाची चंद्ररेखा । निरुता दावावेया शाखा ।
दाविजे तेविं औपाधिका । बोली इया ॥ ३७ ॥
मग ह्मणे गा सव्यसाची । पैं इयें संसारपाटणिची ।
वस्ति सवियां टांची । दुपुरुखीं ॥ ३८ ॥

**द्वाविमौ पुरुषौ लोके क्षरश्चाक्षर एव च ॥**
**क्षरः सर्वाणि भूतानि कूटस्थोक्षर उच्यते ॥ १६ ॥**

जैसिं आवघां चि गगनिं । नांदतें दिवोराती दोनी ।
तैसे संसारराजधानिं । दोन्ही चि हे ॥ ३९ ॥
आणीकु हिं तीजा पुरुखु आहे । परि एयां दोहिंचें नावं न साहे ।
जो उदैला गांवेंसिं खाए । दोन्हितें ययां ॥ ४४० ॥
परि ते तवं गोठि असो । आदिं दोनी चि हे परियसों ।
जे संसारग्रामु वसों । आले असति ॥ ४१ ॥
एकु आंधला वेडा पंगु । एकु सर्वांगिं पुरता चांगु ।
पारि ग्रामगुणें संगु । घडला दोघां ॥ ४२ ॥
तेयां माजि एका नावं क्षरु । एरातें ह्मणिजे अक्षरु ।
इहिं दोहिं चि पारि संसारु । कोंदला असे ॥ ४३ ॥
आतां क्षरु तो कवणु । अक्षरु किंलक्षणु ।
हा अभिप्राउ संपूर्णु । विवंचूं गा ॥ ४४ ॥
तरि महदहंकारा । लागौनि धनुर्द्धरा ।
तृणांतिचा पांगोरा । वेन्हि पैं गा ॥ ४५ ॥

जें काहिं साने थोर । चालतें अथवा थिर ।
किंबहुना गोचर । मनबुद्धिसि ॥ ४६ ॥
जेतुलें पांचभौतिक घडतें । जें जें नावंरूपा सांपडतें ।
गुणत्रयाचां पडतें । कामठां जें ॥ ४७ ॥
भूताकृतिचें नाणें । घडत भांगारें जेणें ।
काळासिं जुं खेळणें । जिहिं कवडा ॥ ४८ ॥
जाणणेनि चि विपरीतें । जें जें काहिं जाणिजतें ।
तें प्रतिक्षणिं निमतें । होउनियां ॥ ४९ ॥
आगा काढौनि भ्रांतिचे दांग । उभवी स्रिष्टिचे आंग ।
हें असो बहू जग । जेया नावं ॥ ४५० ॥
पैं अष्टधा भिन्न ऐसें । जें दाविलें प्रकृतिमीसें ।
जें क्षेत्रद्वारें सतिसें । भागिं केलें ॥ ५१ ॥
हें मागिलें सांघों केती । आगा आतां चि जें प्रस्तुतिं ।
रुखाकाररूपकरीती । निरूपिलें ॥ ५२ ॥
तें आघवें चि साकारें । कल्पौनि आपणापेयां पूरें ।
जाळें असे तदनुसारें । चैतन्य चि ॥ ५३ ॥
जैसा कुहां आपण चि बिंबे । सींह्र प्रतिबिंब पांतां खोभे ।
खोभला समारंभे । घली तेथ ॥ ५४ ॥
कां सलिलिं असत चि असे । व्योमा वारे व्योम बिंबे जैसें ।
अद्वैत होउनि तैसें । द्वैतें घेपें ॥ ५५ ॥
अर्जुना गा यया परी । साकारु कल्पौनि पुरी ।
आत्मा विस्मृतिची करी । नीद तेथ ॥ ५६ ॥
पैं स्वप्नि सेजारु देखिजे । मग पहुडणें जैसें कीजे ।
तैसें पूरि शयन जाणिजे । आत्मेयासि ॥ ५७ ॥
पाठिं तिये नीदेचेनि भरें । मिं सुखी दुःखी ह्मणतु घोरें ।
अहंममाधिचेन थोरें । असणाए साद्दु ॥ ५८ ॥

हा जनकु हे माता । हा मीं गौरु हीनु पुरता ।
पुत्र वित्त कांता । माझी हे नां ॥ ५९ ॥
ऐसेया वेंघौनि स्वप्ना । धांवतु भवस्वर्गाचिया राना ।
तेया चैतन्या नावं अर्जुना । क्षरु पुरुखु गा ॥ ४६० ॥
आतां क्षेत्रज्ञु नावें एणें । जेयातें बोलणें ।
जगिं जीउ ह्मणणें । जिये दशेतें ॥ ६१ ॥
जो आपुलेन विसरें । सर्व भूतत्वें अनुकरे ।
तो आत्मा बोलिजे क्षरें । पुरुखु नावें ॥ ६२ ॥
जो वस्तुस्थिती पुरता । ह्मणौनि आली पुरुषता ।
वरि देहपुरीं निदैजता । पुरुषु नावें ॥ ६३ ॥
आणि क्षरपणाचा नाथिला । आलु यया ऐसेनि आला ।
तिये उपाधी आतला । ह्मणौनियां ॥ ६४ ॥
जैसी खळाळिचेया उदका । सरिसीं उदले चंद्रिका ।
तैसा विकारां औपाधिकां । ऐसा चि गमे ॥ ६५ ॥
कां खळाळ मोटका सोसे । आणि चंद्रिका तैसी चि भ्रंशे ।
तैसा उपाधिनाशिं न दीसे । औपाधिकु फुरे ॥ ६६ ॥
ऐसें उपाधिचेनि पाडें । क्षणिकत्व यया जोडे ।
तेणें खोंकरपणें घडे । क्षरु नावं ॥ ६७ ॥
एवं जीवचैतन्य आघवें । हें क्षरु पुरुखु जाणावें ।
आतां रूप करुं बरवें । अक्षरासि ॥ ६८ ॥
तरि अक्षरु जो दूसरा । पुरुषु पैं धनंजया ।
तो मध्यस्थु गा गिरिवरा । मेरु जैसा ॥ ६९ ॥
जें तो पृथ्विपातालस्वार्गिं । इहिं न भेदे तिहिं भागिं ।
तैसा ज्ञानाज्ञानांगिं । पडे ना जो ॥ ४७० ॥
नां यथार्थज्ञानें एक होणें । ना अन्यार्थत्वें दूजें घेणें ।
ऐसें देहिं निखळ जें नेणणें । तें तें चि रूप ॥ ७१ ॥

पांसुता निःशेष जाए । नां घटभांडादिकिं होए ।
तेयां मृत्पिंडा ऐसें आहे । मध्यस्थु जो ॥ ७२ ॥
पैं आटौनि गेलेयां सागर । मग तरंग ना नीर ।
तया ऐसिया अनाकार । जे कां दशा ॥ ७३ ॥
पार्था जागणें तरि बुडे । परि स्वप्नाचें कांहिं न मांडे ।
तैसीये नीदे सांकडें । निहालिजे ॥ ७४ ॥
विश्व आघवें मावळें । आणि आत्मबोधु नुजळे ।
तिये अज्ञानदशे केवळे । अक्षरु नावं ॥ ७५ ॥
सर्वां कळि संडिलें जैसें । चांदपण उरलें अवंसें ।
रूप जाणें तैसें असे । अक्षराचें ॥ ७६ ॥
पैं सर्वोपाधिविनासें । हे जीवदशा जेथ पैसे ।
फळपाकिं तैसें । झाड बाजि ॥ ७७ ॥
तैसें उपाधिसिं उपहित । थोकौनि ठाके जेथ ।
तेयातें अव्यक्त । बोलति गा ॥ ७८ ॥
जेयासि गा बीजभाउ । वेदान्तिं केला ऐसा आहो ।
तो तेया पुरुषा ठाउ । अक्षराचा ॥ ७९ ॥
जेथौनि अन्यथा ज्ञान । फांकौनि जागृति स्वप्न ।
नानाबुद्धिचें रान । रिगालें असे ॥ ४८० ॥
जीवत्व जेथौनि किरीटी । विश्व उठवित चि उठी ।
ते उभयबुद्धिची मीठी । अक्षरु पुरुषु ॥ ८१ ॥
एरु क्षरु पुरुषु कां जनिं । जिहिं खेळे जागृतिस्वप्निं ॥
तिया अवस्था जिया दोन्हिं । वियाला गा ॥ ८२ ॥
पैं अज्ञान घनसुषुप्ति ॥ ऐसैसी जे ख्याति ।
इया उणिवे प्राप्ति । ब्रह्माची जे ॥ ८३ ॥
साच चि पुढुतीं वीरा । जरि नेयंता स्वप्नजागरा ।
तरि ब्रह्मभाउ साचोकारा । ह्मणों यंता ॥ ८४ ॥

परि प्रकृतिपुरुषें दोन्हि । अभ्रें जालिं जियें गगनिं ।
क्षेत्रक्षेत्रज्ञु स्वप्निं । देखिलीं जियें ॥ ८५ ॥
हे असो अधोशाखा । यया संसाररूपा रुखा ।
मूल तें पुरुखा । अक्षराचें ॥ ८६ ॥
हा पुरुषु कां ह्मणिजे । जें पूर्णपणें चि निजें ।
पैं मायापुरिं पहुडिजे । तेणें हिं बोलें ॥ ८७ ॥
आणि विकारांची जे वारी । ते विपरीतज्ञानाची परी ।
नेणिजे तिये माझारिं । ते सुषुप्ति हा ॥ ८८ ॥
ह्मणौनियां आपैसें । क्षरणें यया नसे ।
आणि कहीं चि हा न नसे । ज्ञाना उणें ॥ ८९ ॥
यया लागि हा अक्षरु । ऐसा वेदांतिं डौरु ।
केला देशिं थोरु । सिद्धांतांचां ॥ ४९० ॥
ऐसें जीवकार्यकारणें । जेया मायासंगु चि लक्षणें ।
अक्षरु पुरुषु जाणें । चैतन्य तें ॥ ९१ ॥
आतां अन्यथाज्ञानिं । दोनी अवस्था जिया जनिं ।
तिया हारपति घनिं । अज्ञानतत्विं ॥ ९२ ॥
तें अज्ञान ज्ञानिं बुडालेयां । ज्ञानें कीर्तिमुखत्व केलेयां ।
जैसा वन्हि काष्ठ जालौनियां । स्वयें जलें ॥ ९३ ॥
तैसें अज्ञान ज्ञानें नेलें । आपण वस्तु होउनु ठेलें ।
ऐसें जाणणेन विण उरलें । जाणतें जें ॥ ९४ ॥

**उत्तमः पुरुषस्त्वन्यः परमात्मेत्युदाहृतः ॥**
**यो लोकत्रयमाविश्य बिभर्त्यव्यय ईश्वरः ॥ १७ ॥**

आगा तो उत्तमु पुरुखु । जो तृतीयु कां निष्कर्षु ।
दोहीं इं हुनु आणिकु । आदिलां जो ॥ ९५ ॥
सुषुप्ती आणि स्वप्ना । पासौनु बहू अर्जुना ।
जागणें जैसें आना । बोधाचें चि ॥ ९६ ॥

कां रश्मि हान मृगजला । पासौनि अर्कमंडला ।
अफाटु तैसा वेगला । उत्तमु गा ॥ ९७ ॥
नातरि काष्टिचा काष्टाहूनि । अनारिसा जैसा वन्हि ।
तैसा क्षराक्षरा पासौनि । आनु चि तो ॥ ९८ ॥
पैं ग्रसौनि आपुलिया मर्यादा । एक करीतु नदीनदां ।
उठिला कल्पांतिचा उदावादा । एकार्णवाचा ॥ ९९ ॥
तैसें स्वप्न ना सुषुप्ति । जागराची गोठि चि नाथि ।
जैसी गलिली दिवोराती । प्रळयतेजें ॥ ५०० ॥
मग आपण ना दुजें । असे नसे हें नेणिजे ।
अनुभौ निर्बुजें । बुडाला जेथ ॥ १ ॥
ऐसैसें आथि काहिं । तें तो उत्तमु पुरुषु पाहिं ।
जें परमात्मा इहिं । बोलिजे नामीं ॥ २ ॥
तें हिं एथ न मिसलतां । बोलिलें जीवत्वें पांडुसुता ।
जैसी बुडणेयाची वार्त्ता । थडिए किजे ॥ ३ ॥
तैसें विवेकाचिये कांठिं । उभें केलेयां किरीटी ।
पारावाराचिया गोठि । करणें वेदां ॥ ४ ॥

**यस्मात्क्षरमतीतोहमक्षरादपि चोत्तमः ॥**
**अतोस्मि लोके वेदे च प्रथितः पुरुषोत्तमः ॥ १८ ॥**

ह्मणौनि पुरुष क्षराक्षर । दोन्हि देखौनि अनावर ।
ययातें ह्मणति पर- । आत्मरूप ॥ ५ ॥
अर्जुना ऐसिये परी । परमात्माशब्द वेन्हि ।
सूचिजे गा अवधारिं । पुरुषोत्तमु ॥ ६ ॥
यन्हवि नबोलणेन बोलणें । जेथिचें सर्व नेणिवां जाणणें ।
काहिं चि नहोउनि होणें । जें वस्तु गा ॥ ७ ॥
सोहं तें हिं अस्तवलें । जेथ सांघणें चि मूकावलें ।
दृष्टत्वेंसिं विरालें । दृश्य जेथ ॥ ८ ॥

आतां बिंबा आणि प्रतिबिंबा । माजि कैंची ही ह्मणों नेए प्रभा ।
जन्हि कैसेन हिं लाभा । जाए चि ना ।। ९ ।।
कां घ्राणा आणि फुला दोहिं । वृत्ति असे माझारिलां ठांइं ।
न दीसे तन्हि नाहिं । बोलों नेए ।। ५१० ।।
तैसें द्रष्टा दृश्य हें जाए । मग कोणु ह्मणे काइ आहे ।
हें अनुभवें चि पाहे । रूप जेया ।। ११ ।।
जो प्रकाश्यें विण प्रकाशु । जो ईशितव्यें विण ईशु ।
आपणेन चि अवकाशु । वसवितु असे ।। १२ ।।
जो नादें आइकिजता नादु । स्वादें चाखविजता स्वादु ।
जो भोगिजतु असे आनंदु । आनंदें चि ।। १३ ।।
सुखासि सुख जोडलें । जें तेज तेजासि सांपडलें ।
शून्य हिं बुडालें । शून्यि जियें ।। १४ ।।
तो पूर्णतेचा परिणामु । पुरुषु गा सर्वोत्तमु ।
विश्रांतिचा विश्रामु । विराला जेथ ।। १५ ।।
जो आकाशा हि वारि उरता । ग्रासातें हिं ग्रसुनि पुरता ।
जो बहुतें पाडें बहुता । पासौनि बहु ।। १६ ।।
पैं नेणतेया प्रती । रूपेपणाची प्रतीती ।
रूपें नोहौनि शुक्ति । दावी जेविं ।। १७ ।।
कां नाना अलंकारदसे । सोनें न लपतां आलें असे ।
विश्व नोहौनि तैसें । विश्व जो धरी ।। १८ ।।
हें असो जळ तरंगा । नाहिं सिनानेपण जेविं गा ।
तेविं सत्ताप्रकाशु जगा । आपण चि जो ।। १९ ।।
आपुलेयां संकोचविकासा । आपण चि रूप वीरेशा।
हा जळिं चांदु हान जैसा । समूठ गा ।। ५२० ।।
तैसा विश्वपणें काहिं होए । नां विश्वलोपि कें हि जाए ।
जैसा रात्रीदिहो नोहे । द्विधा रवि ।। २१ ।।

तैसा काहिं चि कोण्ही कडे । काइसेन हि वेचिं न पडे ।
जेयाचें सांकडें । जेयासि चि ॥ २२ ॥
जो आपणपें चि आपणेयां । प्रकाशितुसे धनंजया ।
काइ बहु बोलों जेया । नाहिं दूजें ॥ २३ ॥
तो गा मीं निरुपाधिकु । क्षराक्षरोत्तमु एकु ।
ह्मणौनु ह्मणे वेदलोकु । पुरुषोत्तमु ॥ २४ ॥

**यो मामेवमसंमूढो जानाति पुरुषोत्तमं ॥**
**स सर्वविद्भजति मां सर्वभावेन भारत ॥ १९ ॥**

परि असो ऐसेया । मज पुरुषोत्तमातें धनंजया ।
जाणे जो पाहालेयां । ज्ञानमित्रें ॥ २५ ॥
चेइलेयां आपुलें ज्ञान । जैसें नाहिं चि होए स्वप्न ।
तैसें फुरतें जेया त्रिभुवन । वाॐ जालें ॥ २६ ॥
कां हातिं घेतली माला । फीटे सर्पाभासाचा कांटाला ।
तैसें माझेन बोधें टवाला । नांगवे जो ॥ २७ ॥
लेणें सोनें चि जो जाणे । तो लेणेपण तें वाॐ ह्मणे ।
तेविं जाणौनि जेणें । वालिला भेदु ॥ २८ ॥
मग सर्वत्र सच्चिदानंदु । मीं चि एकु स्वतःसिद्धु ।
जो आपणेनसिं भेदु । नेणौनि जाणे ॥ २९ ॥
तैसें चि सर्व जाणितलें । हें इं ह्मणणें थेकुलें ।
जें तेया सर्व उरलें । द्वैत नाहिं ॥ ५३० ॥
ह्मणौनि माझेया भजना । उचित तो चि अर्जुना ।
गगन जैसें आलंगना । गगनाचेया ॥ ३१ ॥
क्षीरसागरा परगुणें । किजे क्षीरसागरपणें ।
कां अमृत चि होउनि मिलणें । अमृतिं जेविं ॥ ३२ ॥
साडपन्हरां मिसलावें । तारे पन्हरें चि जेविं होआवें ।
तेविं मीं जालेयां संभवे । भक्ति माझी ॥ ३३ ॥

हांगा सिंधुसि आनी होंति । तरि गंगा कैसेन फिरे माघौती ।
ह्मणौनि मीं नोहतां भक्ति । अन्वयो आहे ॥ ३४ ॥
ऐसेया लागि सर्वि प्रकारिं । जैसा कल्लोलु अनन्यु सागरिं ।
तैसा मातें अवधारीं । भजिनला तो ॥ ३५ ॥
सूर्या आणि प्रभे । एकवंके जेणें लोभें ।
तो पाडु मातुं लाभे । भजना तेया ॥ ३६ ॥
एवं कथिलेयादारम्य । जें हें सर्वशास्त्रैकलभ्य ।
उपनिषदां सौरभ्य । दशदलांचें ॥ ३७ ॥
हें जें ब्रह्माचेनि नवनीतें । व्यासुप्रज्ञेचेनि हातें ।
मथुनि काढिलें आइतें । सार आंजि ॥ ३८ ॥

**इति गुह्यतमं शास्त्रमिदमुक्तं मयानघ ॥**
**एतद्बुद्ध्वा बुद्धिमान्स्यात्कृतकृत्यश्च भारत ॥ २० ॥**

जे ज्ञानामृताची जान्हवी । जे आनंदचंद्रिची सतरावी ।
विचारक्षीरार्णविची नवी । लक्ष्मी जे हे ॥ ३९ ॥
ह्मणौनि आपुलेनि पदें वर्णें । अर्थाचेनि जीवें प्राणें ।
मीं वांचौनि होऊं नेणें । आन काहिं ॥ ५४० ॥
क्षराक्षरत्वें संमोहर जालें । तें पुरुषत्वें वाळिलें ।
मग मज सर्वस्व दीधलें । पुरुषोत्तमिं ॥ ४१ ॥
ह्मणौनि जागिं गीता । मियां आत्मेन पतिव्रता ।
जे हे प्रस्तुतिं आतां । तुवां आकर्णिली ॥ ४२ ॥
साच चि बोलाचें नोहे शास्त्र । पैं संसारु जीणतें हें शस्त्र ।
आत्मा अवतराविते मंत्र । अक्षरें इयें ॥ ४३ ॥
परि तुज पुढां सांघितलें । तें अर्जुना ऐसें जालें ।
गोप्य धन काढिलें । माझें आजि ॥ ४४ ॥
मज चैतन्यशंभुचां माथां । जो निक्षेपु होता पार्था ।
तेया गौतमु जालासि आस्था । निधि तुं गा ॥ ४५ ॥

चोखटिवां आपुलिया । पुढिला उगाणा घेयावेया ।
तेया दर्पणाची परी धनंजया । केली आह्मां ॥ ४६ ॥
कां भरलें चंद्रतारांगाणिं । नभ सिंधु आपणेयां आणी ।
तैसा गीतेसिं मीं अंतष्कराणिं । सूदला तुवां ॥ ४७ ॥
जें त्रिविधमलकटां । संडिलासि सूभटा ।
ह्मणौनि गीतेसिं मज वसैठा । जालासि गा ॥ ४८ ॥
परि हें काइ बोलों गीता । जे हे माझी उन्मेखलता ।
जाणे तो समस्तां । मोहां मूके ॥ ४९ ॥
सेविली अमृतसरिता । रोगु दवडुनि पांडुसुता ।
अमरपण उचिता । देउनि घली ॥ ५५० ॥
तैसी गीता हे जाणितलियां । काइ विस्मो मोहो जावेया ।
परि आत्मज्ञानें आपणपेयां । गीलिजे एथ ॥ ५१ ॥
जेया आत्मज्ञानाचां ठांइं । कर्म आपुलेया जीविता पाईं ।
होउनियां उतराई । लया जाए ॥ ५२ ॥
हारपलें दाउनि जैसा । मागु सरे वीरविलासा ।
ज्ञानें कलसु वलवे तैसा । कर्मप्रासादा ॥ ५३ ॥
ह्मणौनि ज्ञानियां पुरुखां । कृत्य करुं सरलें देखां ।
ऐसा अनाथाचा सखा । बोलिला तो ॥ ५४ ॥
तें श्रीकृष्णवदनामृत । पार्थु भरुनि असे ॐसंडत ।
तवं व्यासकृपा एंत । संजयासि ॥ ५५ ॥
तो धृतराष्ट्रा राया । सूत असे पान करावेया ।
ह्मणौनि जीवितांतु तेया । नव्हे चि भारी ॥ ५६ ॥
यन्हविं गीताश्रवणअवसरिं । आवडों लागतां अनधिकारी ।
पारि सेखिं ते चि उजिरी । पांति लाभली ॥ ५७ ॥
जेधवां द्राक्षिं दूध घातलें । तेधवां वायां गेलें गमलें ।
पारि फलपाकिं दूणावलें । देखिलें जेविं ॥ ५८ ॥

तैसिं हरिविक्रिचीं आखरें । संजयें सांघितलिं आदरें ।
तिहिं अंधु तो अवसरें । सुखिया जाला ॥ ५९ ॥
तें चि मन्हाटेनि विन्यासें । मियां उन्मेखें ठसेंठोमसें ।
जाणों नेणों तैसें । निरोपिलें ॥ ५६० ॥
सेवंतिए अरसिकां हिं । आंग पांतां विशेषु नाहिं ।
परि सौरभ्य नेलें तिहिं । भ्रमरिं जाणिजे ॥ ६१ ॥
तैसें घड तें प्रमेय घेइजे । न्यून तें तें मज देइजे ।
जें नेणणें हें साहाजें । रूप किं बाळा ॥ ६२ ॥
परि नेणतें जन्हि होए । तन्हि देखौनि बापु कि माए ।
हरिखु कें हिं न माए । चोज करिति ॥ ६३ ॥
तैसें संत माहिएर माझें । तुम्हि मीनलेयां मीं लाडैजे ।
तें चि ग्रंथाचेनि व्याजें । जाणिजो जी ॥ ६४ ॥
आतां विश्वात्मकु माझा । स्वामी श्रीनिवृत्तिराजा ।
तो अवधारु वाक्यपूजा । ज्ञानदेॐ ह्मणे ॥ ६५ ॥

इति श्रीमद्भगवद्गीतासूपनिषत्सु ब्रह्मविद्यायां योगशास्त्रे श्रीकृष्णार्जुनसंवादे **पुरुषोत्तमयोगो** नाम पंचदशोध्यायः ।

॥ श्रीकृष्णार्पणमस्तु ॥

# ज्ञानेश्वरी

## अध्याय सोळावा

श्रीकृष्णाय नमः ॥

मावळवितु विश्वाभासु । उवल उदैजेला चंडांशु ।
अद्वयाअब्जिनीविकाशु । वंदूं आतां ॥ १ ॥
जो अविद्ये राती रुसौनियां । गिळी ज्ञानअज्ञानाचिया चांदणियां ।
जो सुदीनु करी ज्ञानियां । स्वबोधाचा ॥ २ ॥
जेणें विवळतिये सवळे । लाहूनि आत्मज्ञानाचे डोळे ।
सांडीति देहअहंतेचें आंविंसाळें । जीवपक्षी ॥ ३ ॥
लिंगदेहकमळाचां । पोटिं वेचतेया चिद्भ्रमराचां ।
बंदिं मोक्षु जेयाचां । उदैला होये ॥ ४ ॥
शब्दाचिया अशंकडी । भेदनदिचां दोहीं थडीं ।
अरडांतें विरहवेडी । बुद्धि बोधीं ॥ ५ ॥
तें याचकाचें मिथुन । समरस्याचें समाधान ।
भोगवि जो चिद्गगन । भवनदिवा ॥ ६ ॥
जेणें पहालेनि पाहाटे । भेदाची चोखेळ फीटे ।
रीगति आत्मानुभववाटे । पंथिक योगी ॥ ७ ॥
जेयाचेनि विवेकाकिरणसंगें । उन्मेखसूर्यकांत-स्फुलिंगें ।
दीव्ळे जाळीति दांगें । संसाराचीं ॥ ८ ॥

तैसिं हरिविक्रिचीं आखरें । संजयें सांघितलिं आदरें ।
तिहिं अंधु तो अवसरें । सुखिया जाला ॥ ५९ ॥
तें चि मन्हाटेनि विन्यासें । मियां उन्मेखें ठसेंठोमसें ।
जाणों नेणों तैसें । निरोपिलें ॥ ५६० ॥
सेवंतिए अरसिकां हिं । आंग पांतां विशेषु नाहिं ।
परि सौरभ्य नेलें तिहिं । भ्रमरिं जाणिजे ॥ ६१ ॥
तैसें घड तें प्रमेय घेइजे । न्यून तें तें मज देइजे ।
जें नेणणें हें साहाजें । रूप किं बाला ॥ ६२ ॥
परि नेणतें जन्हि होए । तन्हि देखौनि बापु किं माए ।
हरिखु कें हिं न माए । चोज करिति ॥ ६३ ॥
तैसें संत माहिएर माझें । तुम्हि मीनलेयां मीं लाडैजे ।
तें चि ग्रंथाचेनि व्याजें । जाणिजो जी ॥ ६४ ॥
आतां विश्वात्मकु माझा । स्वामी श्रीनिवृत्तिराजा ।
तो अवधारु वाक्यपूजा । ज्ञानदेओ ह्मणे ॥ ६५ ॥

इति श्रीमद्भगवद्गीतासूपनिषत्सु ब्रह्मविद्यायां योगशास्त्रे
श्रीकृष्णार्जुनसंवादे **पुरुषोत्तमयोगो**
नाम पंचदशोध्यायः ।

॥ श्रीकृष्णार्पणमस्तु ॥

पारी रंकें अमृतसागरु । देखिलेयां पडे उचिताचा विसरु ।
मग करुं धांवे पाहुणेरु । शाकांचा तेया ॥ २२ ॥
तेथ शाकु किरू बहुतु ह्मणावा । तेयाचा हर्षवेगू चि तो घेयावा ।
उजळूं दिव्यतेजा हाथिवा । ते भक्ति पावी ॥ २३ ॥
बाळा उचित जाणणें होये । तरि बाळपण चि कें आहे ।
परि साच चि एरि माए । ह्मणौनि तोषे ॥ २४ ॥
हां गा गावंरसेया भरलें । पाणी पाये देंत वरि आलें ।
तें गंगा काइ देखिलें । आनी दीठी ॥ २५ ॥
जी चांगु कैसा अपकारु । किं तो मानूनि प्रियउपकारु ।
तोषे चि ना सारंगधरु । पूतनेसि ॥ २६ ॥
कां आंधारेनि खतैलें अंबर । जालेयां दिवसनाथा समोर ।
तेणें तें परतें सर । ह्मणितलें कायी ॥ २७ ॥
तेवि भेदबुद्धिचिये तुलें । घालूनि सूर्यश्लेषाचें कांटालें ।
तूकिलासि तें अल्हें । पुरें करीं जी ॥ २८ ॥
जिहीं ध्यानाचां डोलां पाहिलासि । वेदादिवाचा वानिलासि ।
जें उपसांहिलें तेयांसि । तें आह्मां करीं ॥ २९ ॥
पीर आजि मीं तूझा गुणीं । लांचवलां अपराधु न गणीं ।
भलेतें करीं आधधणी । नूठिं कदां ॥ ३० ॥
मियां गीता येणें नावें । तूझें यश हें अमृत सुहावें ।
वानुं लाधलेति तें दूणेनि थावें । दैवलदैवें ॥ ३१ ॥
माझिया सत्यवाचा तप । केलें बहुत कल्प ।
तेया फलाचें हें महाद्वीप । पातली प्रभू ॥ ३२ ॥
पुण्यें पोसिलिं असाधारणें । तियें तुझे गुण वानणें ।
देउनि मज उरिणें । जालिं आजि ॥ ३३ ॥
जी जीविताचां आडवीं । आंतुडलेयां मरणगावीं ।
ते अवदशा चि आघवी । फीटली हे ॥ ३४ ॥

जे गीतापणें नावणिगी । जे अविद्या जीणौनि दाटुगी ।
ते कीर्ति तूझी आह्मां जोगी । वानावेया जाली ॥ ३५ ॥
पैं निर्धनां घरीं वानवसें । महालक्ष्मी एउनि बैसे ।
तेया ही वरतें निर्द्धन ऐसें । ह्मणों ए कायि ॥ ३६ ॥
अंधकाराचेया ठाया । दैवें सूर्यो आलेयां ।
तैं आंधारु चि जगा येया । प्रकाशु नोहे ॥ ३७ ॥
जेया देवाची पाहातां थोरी । विश्व परमाणु हिं दशा न धरी ।
तो भक्ताचेया सरोभरी । नव्हे चि कायि ॥ ३८ ॥
तैसें मीं गीता वाखाणीं । ये खपुष्पाची किर तुरंबणी ।
परि समर्थें तुवां सिरियाणीं । फेडिली ते ॥ ३९ ॥
ह्मणौनि तूझेनि प्रसादें । मी गीता पद्यें अगाधें ।
निरोपीन जी विशदें । ज्ञानदेउ ह्मणे ॥ ४० ॥
तरि अध्यायिं पन्हरावां । श्रीकृष्णें तेया पांडवा ।
शास्त्रसिद्धांतु आघवा । उगाणिला ॥ ४१ ॥
जें वृक्षरूप परिभाषा । केलें उपाधिरूप अशेषा ।
सद्वैद्यें जैसें दोषां । आंगलीनां ॥ ४२ ॥
आणि कूटस्थु जो अक्षरु । दाविला पुरुषाकारु ।
तेणें उपहिता ही आकारु । चैतन्या केला ॥ ४३ ॥
पाठिं उत्तमु पुरुषु । शब्दाचें करुनि मीषु ।
दाविलें चोख । आत्मतत्वीं ॥ ४४ ॥
आत्मविषयीं आंतुवट । साधन गा आंगदट ।
ज्ञान होये हें इं स्पष्ट । चावललां ॥ ४५ ॥
ह्मणौनि ये अध्याइं । निरूप्य नुरे चि काहीं ।
आतां गुरुशिष्यां दोहीं । स्नेहो लाहाणां ॥ ४६ ॥
एवं ये विशिं किर । तेयातें बुझाविलें अपार ।
परि मुमुक्षु इतर । साकांक्ष जाले ॥ ४७ ॥

जे मज पुरुषोत्तमा । ज्ञानें भेटे सुवर्मा ।
तो सर्वज्ञ ते चि सीमा । भक्तिची ही ॥ ४८ ॥
ऐसें जें त्रैलोक्यनायकें । बोलिलें अध्यायांतश्लोकें ।
तेथ ज्ञान चि बहू येकें । तोषें वानिलें ॥ ४९ ॥
भरुनु प्रपंचा घोंटु । कीजे देखतां चि देखतेया द्रष्टु ।
आनंदसाम्राज्यीं पाटु । बांधिजे जीवा ॥ ५० ॥
एवढेया लाभाचा उपावो । आनु नाहिं चि ह्मणे देऊ ।
सम्यग्ज्ञाना हो राऊ । उपाया पुढुतीं ॥ ५१ ॥
ऐसे आत्मजिज्ञास जे होंते । तोखलेनि चित्तें ।
आदरें तेया ज्ञानातें । वोत्रालिलें जीवें ॥ ५२ ॥
आर्ता आवडि जेथ पडे । तेयाची अवसरी पुढें पुढें ।
रिगो लागे हें घडे । प्रेम ऐसें ॥ ५३ ॥
ह्मणौनि जिज्ञासुचां पैकीं । ज्ञानीं प्रीति होये नां जवं नीती ।
तवं योगक्षेमु ज्ञानविषिं । स्फुरला चि ॥ ५४ ॥
ह्मणौनि तें चि सम्यग्ज्ञान । कैसेनि होये स्वाधीन ।
जालेयां वाडजतन । केवि निफजे ॥ ५५ ॥
कां उपजों चि जेणें न लाहे । जें उत्पन्न हीं अन्हांटा सुये ।
तें ज्ञान काइ वोखटें आहे । हें जाणावें ॥ ५६ ॥
मग जाणों तेयाचें वीरुं । तेया ही वाटवाहाणी विचारुं ।
ज्ञाना हित तें चि करुं । सर्वभावें ॥ ५७ ॥
ऐसा जिज्ञासु तुह्मीं समस्तीं । भावो जो धरिला असे चित्तीं ।
तो पुरवावेया लक्ष्मीपती । बोलिजैल ॥ ५८ ॥
ज्ञानासि पुनर्जन्म जोडे । आपुली विश्रांति ही वारि वाढे ।
जिया संपत्ती तें पत्राडे । सांवैल दैवी ॥ ५९ ॥
साहाजें इष्टानिष्टकरणीं । दोघी चि या कवतिकिणी ।
हे नवमाध्यायीं उद्याणीं । केली होंतीं ॥ ६० ॥

श्रीभगवानुवाच ॥

अभयं सत्वसंशुद्धिर्ज्ञानयोगव्यवस्थितिः॥
दानं दमश्च यज्ञश्च स्वाध्यायस्तप आर्जवम् ॥ १ ॥

तेथ साउमा घेआवा उवाचो । तवं मांडला आनु प्रस्ताओ ।
तरि त्या प्रसंगें देवो । निरोपितसे ॥ ६१ ॥
तेया निरोपणाचेनि नावें । अध्यायपद सोळावें ।
ळावर्णी पाहातां जाणावें । मागिला वरि ॥ ६२ ॥
तरि हें असो प्रस्तुतीं । ज्ञानाचां हिताहितीं ।
समर्थो या संपत्ती । दोन्हीं गा ॥ ६३ ॥
जे जे मुमुक्षां मार्ग बोळावी । मोहोरात्रिची धर्मदिवी ।
ते आदि तवं दैवी । संपत्ति आइक ॥ ६४ ॥
एथ एकु एकातें पोखी । ऐसे बहुत पदार्थ एकिं ।
संपजति ते लोकीं । संपत्ति ह्मणिपे ॥ ६५ ॥
दैव–सुखसंभवी । येथ दैवगुण–येकोपजीवी ।
जाली ह्मणौनि जाण दैवी । संपत्ति हे ॥ ६६ ॥
आतां तेया चि दैवगुणां । माझि धूरेचा बैसणां ।
बैसे तो आकर्णा । अभय ऐसे ॥ ६७ ॥
तरि न घलुनि महापुरीं । नेघे बुडणेयांची सियारी ।
रोगु न गणिजे धारें । पथ्याचिया ॥ ६८ ॥
तैसा कर्माअकर्माचेया मोहरा । उठूं नेदूनि अहंकारा ।
संसाराचा दरारा । सांडणें कां ॥ ६९ ॥
अथवा अन्ययभावनेचेनि पैसें । दूजें मानुनु आत्मा ऐसें ।
भववार्त्ता देशें दिसें । दवडणें जें ॥ ७० ॥
पाणी बुडऊं ये मीठातें । तवं मीठ चि पाणी आते ।
तेवि आपण जालेनि द्वैतें । नासे भय ॥ ७१ ॥

आगा अभय येणें नावें । बोलिजे तें हें जाणावें ।
सम्यग्ज्ञानाचें आघवें । भावणें हें ॥ ७२ ॥
आतां सत्वशुद्धि ह्मणिजे । ते पैं ऐसी जाणिजे ।
तरि जळे ना विझे । वन्हि जैसा ॥ ७३ ॥
कां पाडिवां वाढि न मगे । अवंसा तूटि सांडूनि मागे ।
माझि हरिणु चंद्र आंगें । जैसा राहे ॥ ७४ ॥
ना तरि वार्षिया सांडिली । ग्रीष्में नाहिं मांडिली ।
ते नदी जैसी निवडली । निजरूपें ॥ ७५ ॥
तैसी संकल्पविकल्पाची वोढी । सांडूनि रजतमाची कावडी ।
भोगीति निजधामाची आवडि । बुद्धि उरे ॥ ७६ ॥
इंद्रियवर्गें दाखविलेयां । विरुद्धा अथवा भलेया ।
विस्मो कांहिं केलेयां । नुठी चित्तीं ॥ ७७ ॥
गावां गेलेयां वल्लभु । पतिव्रतेचा विरहक्षोभु ।
भलेतैसा हानिलाभु । न मनी जेवि ॥ ७८ ॥
तेवि स्वरूप रुचलेपणें । बुद्धि जे ऐसें होणें ।
ते सत्वशुद्धि ह्मणे । कंसहंता ॥ ७९ ॥
आतां आत्मलाभविखिं । ज्ञानयोगा माझि येकीं ।
जे आपुलिया टाकी । हांवे भरे ॥ ८० ॥
तेथ सगळिये चित्तवृत्ती । त्यागु करणें या रीती ।
निष्कामीं कां पूर्णाहुति । हुताशीं जैसी ॥ ८१ ॥
कां स्कुलिनें आपुली । आत्मजा कुळिची दीधली ।
हे असो लक्ष्मी राहिली । मुकुंदिं जेवि ॥ ८२ ॥
तैसे नविकलेपणें । संयमाग्नीचा वृत्तिकां होणें ।
तो तीजा गुणु ह्मणे । कृष्णनाथु ॥ ८३ ॥
आतां देहें वाचा चित्तें । यथासंपन्नें वित्तें ।
परि जालेया आर्तातें । न वंचणें जें कां ॥ ८४ ॥

फूलीं फलीं छाया । मूळीं पत्रीं हीं धनंजया ।
वाटेचा न वंचे आलेयां । रुंखु जैसा ॥ ८५ ॥
तैसें मानौनि धन वेन्हीं । विद्यमानें आपुलां अवसरीं ।
श्रांताचेया मनोहारी । उपेगा जाए ॥ ८६ ॥
तेया नावें जाण दान । जें मोक्षनिधानिचें अंजन ।
हें असो आइक चिन्ह । दमाचें जें ॥ ८७ ॥
तरि विषयां इंद्रियांचे मिळणीं । जो उदैजत सुये विभुटणी ।
तोडिजे खडुपाणी । पारकेयां ॥ ८८ ॥
तैसा विषयजाताचा वारा । वाजों नेदीं इंद्रियां द्वारां ।
यमें बांधौनि प्रत्याहारा । वोपिजति ॥ ८९ ॥
आंतुला चित्ताचें आंग वेन्हीं । प्रवृत्ति पलौनि माघारी ।
आगि सुइजे दाहें द्वारीं । वैराग्याची ॥ ९० ॥
श्वासोश्वासा होउनि बहुवसें । कृच्छ्रादि व्रतें खरपुसें ।
उसांतितां रातिदिवसें । नाराणुक जें ॥ ९१ ॥
पैं दमु ऐसें ह्मणिपे । तो हा जाण स्वरूपें ।
यज्ञार्थु ही संक्षेपें । सांवों आतां ॥ ९२ ॥
तरि ब्राह्मण करूनि धूरे । क्रियादिक पैली मेरे ।
माझारि अधिकारें । आपुलालेनि ॥ ९३ ॥
जेया जें सर्वोत्तम । भजनीय देवताधाम ।
तें तेणें यथागम— । विधी यजिजे ॥ ९४ ॥
जैसे द्विजु षट्कर्में करी । शूद्र तेयातें नमस्कारी ।
किं दोघां सरोभरी । निफजे यागु ॥ ९५ ॥
तैसें अधिकारपर्यालोचें । हें यज्ञकरणें सर्वांचें ।
विषयफल आशेचें । नेघपे माजि ॥ ९६ ॥
आणि मी करिता हा भावो । नेदिजे देहाचेनि द्वारें जाओं ।
नां वेदाज्ञेसि तरि ठावो । होइजे स्वयं ॥ ९७ ॥

अर्जुना एवंसंज्ञ । सर्वत्र जाण यज्ञ ।
कैवल्यमार्गीचा अभियज्ञ । सांवति हा ॥ ९८ ॥
आतां चेंडुवें भुइं हाणिजे । हें नोहे तो हाता आणिजे ।
कां सेतीं बीं विखुरिजे । परि पीकीं लक्ष ॥ ९९ ॥
ना तरि ठेविलें देखावेया । आदरु कीजे दंवेया ।
कां शाखा फळावेया । सिंपिजे मूळ ॥ १०० ॥
हें असो बहू आरिसा । आपणपेयां दिसावेया जैसा ।
पुडुतीं पुडुतीं बहुवसा । प्रीती पाहिजे ॥ १ ॥
तैसा प्रतिपाद्यु जो ईश्वरु । तो होआवेया लागि गोचरु ।
श्रुतींचा निरंतरु । अभ्यासु करणें ॥ २ ॥
तेवि द्विजांसि ब्रह्मसूत्र । येरां स्तोत्र कां नाममंत्र ।
आवर्त्तवणें पवित्र । पावेया तत्व ॥ ३ ॥
पार्था गा स्वाध्यायो । बोलिजे तो हा ह्मणे देवो ।
तपशद्वा अभिप्रावो । आइक सांघों ॥ ४ ॥
ज्ञानें सर्वस्व जाणे । परि रक्षणें मरणा येणें ।
कां फलौनि शुष्कां होणें । ओषधींचे ॥ ५ ॥
नाना धूपाचा अग्निप्रवेशु । कनका तूका तूंकाचा नाशु ।
पितृपक्षु पोखतां भ्रंशु । चंद्रा जैसा ॥ ६ ॥
तैसे सर्वधर्मांचेया प्रसरा । लागि प्राणें हीं या शरीरा ।
आटणी करणें जें वीरा । तें चि तप ॥ ७ ॥
अथवा अनारिसें । तपाचें रूप असे ।
तरि सूदली दूधीं हंसें । चांचु जैसी ॥ ८ ॥
तैसे देहजीवाचिये मिळणीं । जो उदैजत सुवे पाणीं ।
तो विवेकु अंतष्करणीं । जागविजे ॥ ९ ॥
पांतां आत्मेया कडे । परबुद्धिचा पैसु सांकडे ।
सनिद्रा स्वप्न बुडे । जागणां जैसें ॥ ११० ॥

तैसां आत्मपर्यालोचु । प्रवर्ते तो साचु ।
तपाचा निर्वचु । धनुर्द्धरा ॥ ११ ॥
आतां बाळाचां हिं चित्तिं स्तन्य । जैसे नाना दृष्टिचां चैतन्य ।
तैसे प्राणिमात्रीं सौजन्य । आर्जव तें ॥ १२ ॥

**अहिंसा सत्यमक्रोधस्त्यागः शांतिरपैशुनम् ॥**
**दया भूतेष्वलोलुप्त्वं मार्दवं ऱ्हीरचापलम् ॥ २ ॥**

आणि जगाचेया सुखा चि दोसें । शरीरें वाचा मानसें ।
राहाटणें तें अहिंसे । रूप जाण ॥ १३ ॥
आतां चोख होउनि मौवाळ । जैसे जातिचें मुकुळ ।
कां तेज परि शीतळ । शशांकाचें ॥ १४ ॥
शके दाविलें चि रोगु फेडूं । आणि जीभे तरि नव्हे कडू ।
तें वोषध नाहिं पाडु । उपमां केवि ॥ १५ ॥
तऱ्हीं मौपणें बुबुळें । झगटितां हीं परि नाडळे ।
यऱ्हवीं फोडी कराळें । पाणी जैसें ॥ १६ ॥
तैसें तोडावेया संदेह । तीख जैसें काळ लोह ।
स्राव्यत्वें तरि माधुर्य । पाहिं घाली ॥ १७ ॥
आयिकों ठांतां कयतिकें । कानातें करी मूकें ।
ना साचारैवें मीखें । ब्रह्म हीं भेदी ॥ १८ ॥
किंबहुना प्रियपणें । कोण्हातें हिं झांकउं नेणे ।
यथार्थु तऱ्हीं खुपणें । नाहिं कव्हणां ॥ १९ ॥
यऱ्हविं गोरी किर गायन गोड । परि साचाचां पाखाळीं कीड ।
आगिचें करणें उघड । पारि जळो तें साच ॥ १२० ॥
कां जीभे लगतां महुर । अर्थे विभांडी जिव्हार ।
ते वाचा नव्हंति सुंदर । लावां चि कां तिया ॥ २१ ॥
परि अहितिं कोपैनि सोफ । लाउनीं मौ जैसें पुष्प ।
तिये मातेचें स्वरूप । जैसें होये ॥ २२ ॥

जैसें श्रवणसुख चतुर । परिणामौनि साचार ।
बोलणें अविचार । सत्य येथें ॥ २३ ॥
आतां लाविलेयां हिं पाणीं । जैसा पाखाणु नेघे आणी ।
कां मथिलेयां हिं लोण्यीं । कांजी नेदी ॥ २४ ॥
त्वचा पाये चीरी । आलेयां हिं फडे न करी ।
सेवंते हीयारी । नोहंति फुलें ॥ २५ ॥
नाना रंभेचेनि हिं रूपें । शुकिं नुठिजे चि कंदर्पें ।
कां भस्मीं वन्हि नाटोपे । घृतें हिं जेवि ॥ २६ ॥
तेवि कुमारु क्रोधु भरे । तैसेयां मंत्रांचि बीजाक्षरें ।
तियें निमित्यें हीं अपारें । मीनलेयां ॥ २७ ॥
परि धाता ही पायां पडतां । नूठी गतायु पांडुसुता ।
तैसा नुपजे उपजवितां । क्रोधोर्मि तो ॥ २८ ॥
अक्रोधत्व ऐसें । नावं तिये दशे ।
ऐसें श्रीनिवासें । ह्मणितलें तेथ ॥ २९ ॥
आतां मृत्तिकात्यागें घटु । तंतुत्यागें पटु ।
त्यजिजे जेवि वटु । बीजत्यागें ॥ १३० ॥
कां त्यजूनि भींतिमात्र । त्याजिजे आघवें चित्र ।
निजत्यागें विचित्र । स्वप्नजाल तें ॥ ३१ ॥
नाना जलत्यागें तरंग । वरिषात्यागें मेघ ।
त्यजिजति जेवि भोग । दानत्यागें ॥ ३२ ॥
तेवि बुद्धिमंतीं देहीं । अहंता सांडौनि पाहीं ।
सांडिजे अशेष हीं । संसारजात ॥ ३३ ॥
तेया नावं त्यागु । ह्मणे तो यज्ञांगु ।
हें मानुनि सुभगु । पार्थु पूसे ॥ ३४ ॥
आतां शांतिचें जी लिंग । व्यक्त मज सांग ।
देवो ह्मणति चांग । अवधान दे ॥ ३५ ॥

तरि गीळूनि ज्ञेयातें । ज्ञान ज्ञाता चि माघौतें ।
हारपे तें निरुतें । शांति पैं गा ॥ ३६ ॥
जैसा प्रळयांबुचा उभडु । बुडवूनि विश्वाचा पवाडु ।
हें आपणपां निवाडु । आपणपां चि ॥ ३७ ॥
मग उगमुं वोघ सिंधू । हा नुरे व्यवहारभेदु ।
परि जळवाच्यबोधु । तो ही कैंचा ॥ ३८ ॥
तैसी ज्ञेया देतां मीठी । ज्ञातृत्व पडे पुटीं ।
मग उरे तें चि किरीटी । शांति पुडुतीं ॥ ३९ ॥
आतां कदर्थत व्याधी । बळीकरणेयांचिया आधी ।
आपु पर न शोधी । सद्वैद्यु जैसा ॥ १४० ॥
कां चिखलीं रुपली गाए । धड भाखड न पाहे ।
जो तियेचिया ग्लानीं होये । कालाबुला ॥ ४१ ॥
नाना बुडतेयातें सकरुणु । न पुसे उत्तमहीनु ।
काढी राखे प्राणु । हें चि जाणे ॥ ४२ ॥
पैं माहेवणी निदैवें । उघडी केली विपायें ।
ते सलज्जु न पाहे । न पांघुरवितां ॥ ४३ ॥
तैसें अज्ञानप्रमदादिकिं । कां प्राक्तनीं हीं सदोषीं ।
निंदित्वाचा साविखिं । देखिलें जें ॥ ४४ ॥
तेया अंगिक आपुलें । देउनियां भलें ।
विसरविजति सलें । सलतीं तियें ॥ ४५ ॥
आगा पुढिलाचा दोखु । करूनि आपुलिया दीठी चोखु ।
मग घेपे अवलोकु । तेया वरि ॥ ४६ ॥
जैसा पुजुनि देउ पाहिजे । पेरुनि सेता जाइजे ।
तोखौनि आशिर्वादु घइजे । अतिथिचा ॥ ४७ ॥
तैसें आपुलेनि गुणें । पुढिलाचें उणें ।
फेडूनियां पाहाणें । तेया कडे ॥ ४८ ॥

वांचूनि न विंधिजे वर्मी । नांतुडविजे कर्मी ।
न बोलाविजे नामी । सदोषें तिहिं ॥ ४९ ॥
वरि कोण्हें येकें उपायें । पडिलें उभें होये ।
तें चि कीजे घाये । न घलावें वर्मी ॥ १५० ॥
पैं उत्तमाचिया साठीं । पावलेयां तें किरीटी ।
देतां जाइ दीठी । दोषु न घेपे ॥ ५१ ॥
आगा अपैशून्याचें लक्षण । अर्जुना हें फुडें जाण ।
मोक्षा यंतें सोखासन । मुख्य हें गा ॥ ५२ ॥
आतां तेया शशी । अर्जुना जाण आपैसी ।
निवडितां न कडसी । सानेंथोरें ॥ ५३ ॥
तैसें दुःखिताचें सीणणें । हिरतां सकणवपणें ।
उत्तमाधम नेणें । विवंचूं गा ॥ ५४ ॥
पैं सर्व जीवना सारिखें । वस्तु आंगें वर उपखे ।
परि जांतें जीवित राखे । तृणाचें हिं ॥ ५५ ॥
तैसें पुढिलाचेनि तापें । कलवलैलिये कृपे ।
दीधलें हिं आपणपें । थोडें चि गमे ॥ ५६ ॥
निम्न भरलेयां उणें । तें पाणी ढळें चि नेणे ।
तेवि अनतोखौनि जाणे । सामोरे यां ॥ ५७ ॥
पैं पाइं कांटा निहटे । तवं व्यथा जीवीं उमटे ।
तैसा पोळे संकष्टें । पुढिलाचेनि ॥ ५८ ॥
कां पावो सीतळ लाहे । किं तें डोळेयां चि लागि होये ।
तैसा परसुखें जाये । सुखावतु ॥ ५९ ॥
किंबहुना आर्त्ता चि लागि । पाणीं आराइलें असे जगीं ।
तैसें दुःखिताचां भागीं । जीणें जेयाचें ॥ १६० ॥
तो पुरुषु वीरराया । मूर्त्त जाण दया ।
मीं उदैजत तेया । रिणियां कीजे ॥ ६१ ॥

आतां सूर्यासि जीवें । अनुसरलीं राजिवें ।
परि तो लें न सिवे । सौरभ्य जैसें ॥ ६२ ॥
कां वसंताचिया वाहाणी । आलेयां वना अक्षौणी ।
न करीतु घेणीं । निगाला तो ॥ ६३ ॥
हें असो महासिद्धिसिं । लक्ष्मी आलेयां पासिं ।
परि महाविष्णु जैसी । गणी चि ना ॥ ६४ ॥
तैसें इहिक कां स्वर्गिचे । भोग पाइक आलेयां इछेचे ।
परि भोगावें हें न रुचे । मना माजि ॥ ६५ ॥
बहुवे काइ कवतिकिं । जीउ नोहे विषयविषिं ।
अलौल्य सदा ठाउकी । जाण ते हे ॥ ६६ ॥
आतां जैसें कां मौवाल । जलचरांसि जल ।
कां पक्षांसि अंतराल । मोकलें हें ॥ ६७ ॥
नातरि बालका दोसें । मातेचें स्नेह जैसें ।
कां वसंतिचा स्पर्शे । मारुतु मौ ॥ ६८ ॥
डोलेयां प्रियाचिये भेटी । पीलेयां कूर्माची दीठी ।
तैसी भूतमात्रिं राहाटी । मौवाल ते ॥ ६९ ॥
स्पर्सिं अतिमृदु । मुखिं घातलेयां स्वादु ।
घ्राणासि सुगंधु । उजलु आंगें ॥ १७० ॥
तो आवडे तवं घेतां । विरुद्ध जरि नव्हंता ।
तरि उपमे येंता । कापुरु किर ॥ ७१ ॥
परि महाभूतें पोटीं वाहे । आणि परमाणू माजि माए ।
तेया विश्वानुसार होये । गगना ऐसा ॥ ७२ ॥
कायि सांवों ऐसें जीणें । जें जगाचें चि जीवें प्राणें ।
तेया नावं ह्मणें । मार्दव मी ॥ ७३ ॥
आतां पराजयें राजा । जैसा कदर्थिजे लाजा ।
कां मानिया निस्तेजा । निकृष्टा तव ॥ ७४ ॥

नाना चांडाल स्त्रीमंदिरोसिं । आलेयां संन्यास्या पासि ।
मग लाज जैसी । उत्तमां तेया ॥ ७५ ॥
क्षत्रिया पलौनि जीणें । तें कोण साहे लाजीरवाणें ।
कां वैधव्यें वेलु नेणे । महासती जैसी ॥ ७६ ॥
रूपसा उदैलें कुष्ट । संभाविता कूटिचें बोट ।
तेया लाजा प्राणसंकट । होये जैसें ॥ ७७ ॥
तैसें आउठहातेपणें । हें शव होउनि जीणें ।
उपजों उपजों मरणें । नावां नावां ॥ ७८ ॥
तिये गर्भमेदमूसे । रक्तमूत्ररसे ।
वोतिवां होउनि तैसें । लाजणें जें ॥ ७९ ॥
बहू असो देहपणें । नावां रूपासि येणें ।
नाहिं लाजीरवाणें । या ही हुनु ॥ १८० ॥
ऐसीया इया अवकला । घेपे शरीराचा कांटाला ।
ते लाज पैं गा निर्मला । निसुगै एरि ॥ ८१ ॥
आतां सूत्रतंतु तूटलेयां । चल्ल चि ठाके साइखेडेया ।
कां प्राणु गेलेया कर्मइंद्रियां । खुंटे गति ॥ ८२ ॥
किं मावललेयां दिनकरु । सरे किरणाचा पसरु ।
तैसा मनोजयें प्रचारु । बुद्धिइंद्रियां ॥ ८३ ॥
एवं मनपवननियमें । होंति दाही इंद्रियें अक्षमें ।
तें अचापल्यधर्में । येणें जाणें ॥ ८४ ॥

**तेजः क्षमा धृतिः शौचमद्रोहो नातिमानिता ॥**
**भवंति संपदं दैवीमभिजातस्य भारत ॥ ३ ॥**

वोखटें मरणाऐसें । तें हिं आलें अग्निप्रवेशें ।
परि प्राणेश्वरा दोसें । न गणी सती ॥ ८५ ॥
तैसी आत्मनाथाचिया आधी । लालनि विषयविषाचां बांधि ।
धावों आवडे पाणधी । शून्याचिया ॥ ८६ ॥

न ठके निषेधु आड । न पडे विधिची भीड ।
नुपजे जिवि कोड । महासिद्धिचें ॥ ८७ ॥
ऐसें ईश्वरा कडे निज । धांवे आपैसेया साहाज ।
तेया नावं गा तेज । आध्यात्मिक तें ॥ ८८ ॥
आतां सर्वें साहांतिया गरिमा । गर्वा नेये चि ते क्षमा ।
जैसें देह वाहूनि रोमा । वाहणें नेणे ॥ ८९ ॥
आणि मातलेयां इंद्रियांचे वेग । कां प्राचीने खवळले रोग ।
अथवा योगवियोग । प्रियाअप्रियाचे ॥ १९० ॥
यां आघवेयांचा चि थोरु । एकें वेळें आलेयां पूरु ।
अगस्ति होउनि कां धीरु । उभा ठाके ॥ ९१ ॥
आकासीं धूमाची रेखा । उठिली बहुवा आगलिका ।
ते गीळी जेवि झुलुका । वारेयाचिया ॥ ९२ ॥
तैसें अधिभूतां आधिदैवां । अध्यात्मकीं उपद्रवां ।
पातलेयां ते पांडवा । पीउनि घाली ॥ ९३ ॥
आतां निर्वाळुनि कनकें । भरिला गंगापीयूखें ।
तेया कळशाचें सारिखें । शौचासि गा ॥ ९४ ॥
जें आंगिं निष्कामु आचारु । जीविं विवेकु साचारु ।
सबाह्य जाण आकारु । शुचित्वाचा ॥ ९५ ॥
जैसें चित्तक्षोभाचां अवसरीं । उचळुनि धैर्या चांगावें करी ।
धृति ह्मणिपे अवधारीं । तेयातें गा ॥ ९६ ॥
फेडीति पापें ताप । पोसीति क्षितीचे पादप ।
समुद्रा जाये आप । गांगेय जैसें ॥ ९७ ॥
जगाचें आंध्य फेडितु । श्रियेचिं राउळें उघडितु ।
निगे जैसा भास्वतु । प्रदक्षिणे ॥ ९८ ॥
तैसि बांधलें सोडितां । बुडालीं कढितां ।
सांकडी फेडितां । आर्त्ताचिया ॥ ९९ ॥

किंबहुना दिवसें राती । पुढिलाचें चि सुख उन्नती ।
आणितआणितां स्वार्थी । प्रवेसिजे ॥ २०० ॥
वांचौनि आपुलेया काजा लागि । प्राणिजाताचां हितभागीं ।
संकल्पाची ही आडवंगी । न करणें जें ॥ १ ॥
पैं अद्रोहत्व ऐसिया गोठी । आइकसि जिया किरीटी ।
तें सांघितलें हें दीठी । पाहों ए तैसें ॥ २ ॥
आणि गंगा शंभूचां माथां । संकोचली जेवि पार्था ।
तेवि मान्यपदें सर्वथा । लाजणें जें ॥ ३ ॥
हें पुडतपुडुतीं । अमानित्व जाण सुमती ।
मागां सांघितलेंसे केती । तें चि बोलों ॥ ४ ॥
एवं यें हिं सविसें । ब्रह्मगुणि हे वसतसे ।
मोक्षचक्रवर्त्तिचें तैसें । अग्राहार ॥ ५ ॥
नाना हे संपत्ति दैवी । या गुणतीर्थांची नवी ।
निर्विषसागरिची दैवी । गंगा आली ॥ ६ ॥
किं गुणकुसुमाची माला । हे घेंउनि मुगुतीबाला ।
वैराग्यभाग्या गला । गिवसीतसे ॥ ७ ॥
किं सविसें गुणज्योतीं । इहीं उजळूनि हे आरती ।
गीता आत्मेयां निजपती । नीराजना आली ॥ ८ ॥
उगलिती निर्मलें । गुणमय मुक्ताफलें ।
दैवी सुक्ति कले । गीतार्णविची ॥ ९ ॥
काइ बहू वानूं ऐसी । अभिव्यक्त ये पैसेंसीं ।
केली दैवी गणराशी । शांतिरूप ॥ २१० ॥

दंभो दर्पोऽभिमानश्च क्रोधः पारुष्यमेव च ॥
अज्ञानं चाभिजातस्य पार्थ संपदमासुरीम् ॥ ४ ॥

आतां दुःखाची अतूट वेली । देखां काळलोहाची भाली ।
तऱ्हीं निजावधानीं घाली । आसुरी ते ॥ ११ ॥

पैं त्याज्य त्यजावेया लागी । जाणावें जन्हीं अनुपयोगी ।
ह्मणोनि आइक तें चांगीं । श्रोत्रशक्ती ॥ १२ ॥
तरि नरकव्यथा थोरी । आणावेया दोखीं अघोरीं ।
मेळु केला ते आसुरी । संपत्ति हे ॥ १३ ॥
विषवर्गु एकवटु । तेया नावं जैसा बासटु ।
आसुर संपति हा खोटु । दोखांचा तैसा ॥ १४ ॥
तरि तेयां चि आसुरां । दोखां माजि जेयां वीरा ।
याडपणाचा गारा । तो दंभु ऐसा ॥ १५ ॥
जैसी आपुली जननी । नग्न दाविलेयां जनीं ।
तरि तीर्थ परि पतनीं । कारण होए ॥ १६ ॥
कां विद्या गुरूपदिष्टा । बोबाइलेयां चौहटां ।
तरि इष्टदा चि अनिष्टा । हेतु होंति ॥ १७ ॥
पैं आंगें दाटली पुरी । जे तारी पैल तीरीं ।
ते नाव चि बांधलयां सिरीं । बुडली जैसी ॥ १८ ॥
कारण जें जीविता । तें वानिलें जरि सेवितां ।
तरि अन्न चि पांडुसुता । होये विष ॥ १९ ॥
तैसा दृष्टाअदृष्टाचा सखा । धर्मु जाला फोकरिजे देखां ।
तरि तारिता तो चि दोखां । लागि होये ॥ २२० ॥
ह्मणौनि वाचेचां चौबारां । घातलेयां धर्मांचा पसारा
धर्मु अधर्मु होये तो वीरा । दंभु जाण ॥ २१ ॥
आतां मूर्खांचिये जीभे । आखरांचे आबुखे शुभे ।
आणि तो ब्रह्मसभे । न रिझे जैसा ॥ २२ ॥
कां मांदुरी लोकाचां घोडां । गजपति महिमे थोडा ।
कां कांटिये वरिला सरडा । व्योम नीच ॥ २३ ॥
तृणांचेनि इंधनें । आगि धांवे गगनें ।
थिलरबळें मीनें । न गणिजे सिंधु ॥ २४ ॥

तैसा माजे स्त्रिया धनें । विद्या स्तुति बहूमानें ।
एकी दीचेनि परान्नें । अल्पकु जैसा ॥ २५ ॥
घनछायेचिया जोडी । निदैवुं घर मोडी ।
मृगांभ देखौनि फोडी । पाणियड मूर्ख ॥ २६ ॥
किंबहुना ऐसैसें । माजणें जें संपत्तिमीसें ।
तो दर्पु गा अनारिसें । न बोलों घेइं ॥ २७ ॥
आणि जगा वेदीं विश्वासु । जगा पूज्यु ईशु ।
जगीं एकु तेजसु । सूर्यो हा ॥ २८ ॥
जगस्पृहे आस्पद । एक सार्वभौमपद ।
न मरणें निर्विवाद । जगा पढिये ॥ २९ ॥
ह्मणौनि जरि उत्साहें । यातें वानूं जाये ।
किं आइकौनि मत्सरु वाहे । एयां लागि ॥ २३० ॥
ह्मणे ईश्वरातें खाए । तेया वेदा कायि विष सुए ।
गोखा माजि त्राये । भंगितसे ॥ ३१ ॥
पतंगा नावडे वाति । खद्योता भानुची खंति ।
टिटिभें अपांपती । वैरी केला ॥ ३२ ॥
तैसा अहंमानाचेनि मोहें । ईश्वराचें हिं नावं न साहे ।
वेदांतें हिं ह्मणे मज हे । सवति जाली ॥ ३३ ॥
ऐसा मानितेचा गंडु । तो अभिमानु जाणैं कुडु ।
रौरवाचा रूढु । मार्गु हा ॥ ३४ ॥
आणि पुढिलाचें सुख । देखणेयांचें होये मीख ।
चढे क्रोधाग्निचें विष । मनोवृत्ती ॥ ३५ ॥
सितलाचिये भेटी । तातलां तेलिं आगि उठी ।
चंद्र देखौनि पोटीं । जळे कोल्हा जैसा ॥ ३६ ॥
विश्वाचें आयुष्य सगळें । सूर्यु उदैला देखौनि सवळे ।
पापियां फुटति डोळे । डुडुळांचे ॥ ३७ ॥

जगाची सुखपाहाट । चोरां मरणांहुनु कष्ट ।
दूधाचें कालकूट । होये व्यालां ॥ ३८ ॥
अगाधें समुद्रजलें । पींतां अधिकु जलें ।
वडवानलु न मिले । शांति कहीं ॥ ३९ ॥
तैसा विद्याविनोदविभवें । देखे पुढिलाची दैवें ।
तवं तवं रोखु दुणावे । क्रोधु तो जाण ॥ २४० ॥
आणि मनसर्पाची सृष्टी । डोले नाराजांची सूटी ।
बोले ते वृष्टि । इंगलांची ॥ ४१ ॥
येर जें क्रियाजात । तें तिखेयाचें करवत ।
ऐसें सबाह्य घसासित । तेयाचें गा ॥ ४२ ॥
तो मनुष्य अधमु जाण । पारुष्य अवतरण ।
आतां आइकें खुण । अज्ञानाची ॥ ४३ ॥
तरि शीतोष्णस्पर्शा । निवाडु नेणे पाखाणु जैसा ।
कां रात्रि आणि दिवसा । जात्यंधु तो ॥ ४४ ॥
आगि उठिला आरोगणे । जैसा खाद्याखाद्य नेणे ।
कां पीरसु पाडु न ह्मणे । सोनेयां लोहाचा ॥ ४५ ॥
नातरि नानारसीं । रिघौनि दर्वी जैसी ।
अभिज्ञ मीठासि । नव्हे चि तिये ॥ ४६ ॥
कां वारा जैसा पारखी । नव्हे चि गा मार्गामार्गविशेषीं ।
तैसें कृत्याकृत्यविवेकीं । अधमपण जें ॥ ४७ ॥
हें चोख हें मैल । ऐसें नेणौनि बाल ।
देखिलें तें केवल । मुखीं चि घाली ॥ ४८ ॥
तैसें पापपुण्याचें खिचटें । करूनि खांतां बुद्धिचेष्टे ।
कडू मधुर न वटे । ऐसी जे दशा ॥ ४९ ॥
तिये नावं अज्ञान । या बोला नाहिं आन ।
एवं साई दोषांचें चिन्ह । सांवितलें ॥ २५० ॥

इहिं साई दोषांगिं । हे आसुरी संपत्ति दाटुगी ।
जैसें थोर विष भूवंगीं । आंग सानें ॥ ५१ ॥
कां तीघां वन्हि पांती । पांतां धाकुटी चि मीति ।
परि विश्वाची ही आहुती । करुं न पुरे ॥ ५२ ॥
धात्रेया ही गेलेयां शरण । त्रिदोषिं न चुके मरण ।
तेया तिहींची हे दूण । लागली आहे ॥ ५३ ॥
जैं साहिं दोषिं संपूर्णी । जाली इहिं चि उभारणी ।
ह्मणौनि आसुरी उणी । संपदा नोहे ॥ ५४ ॥
क्रूरग्रहांची जैसी । मांदी मिळे येकी राशी ।
कां येंति निंदका पासिं । अशेषें पापें ॥ ५५ ॥
मरुणारुवाचें आंग । पडिघांति आघवे रोग ।
कां कुमुहूर्त्तिं दुर्योग । एकवटति ॥ ५६ ॥
कां आयुष्य जांतिये वेळे । सेलिए सातवेउली मिळे ।
तैसे साई दोष सगळे । जोडति तेथें ॥ ५७ ॥
आंतुडलेया चोरा । सीणला सुइजे पुरां ।
तैसें दोषिं इहिं नरां । कीजे तेयां ॥ ५८ ॥
जेया मोक्षमार्गा कडे । यावेया आबुरवा पडे ।
न निगे ह्मणौनि बुडे । सवंसारिं जो ॥ ५९ ॥
अधमा योनिचा पाउटीं । उतरतु जो किरीटी ।
स्थावरां हिं तळवटीं । बैसणें घे ॥ २६० ॥
हें असो तेयाचां ठांइं । मिळौनि साई दोषिं इहीं ।
आसुरी संपत्ति पाहीं । वाटवीजे ॥ ६१ ॥

**दैवी संपद्विमोक्षाय निबंधायासुरी मता ॥**
**मा शुचः संपदं दैवीमभिजातोऽसि पांडव ॥ ५ ॥**

ऐसिया दोन्हीं । संपत्ती प्रसिद्धा जनिं ।
सांघितलिया चिन्हीं । वेगळाला ॥ ६२ ॥

यां दोहिं माजि पहिली । दैवी जे ह्मणितली ।
ते मोक्षसुखा पाहाली । उखा जाण ॥ ६३ ॥
परि जे दुसरी । संपत्ति कां आसुरी ।
लोभमोहाची खरी । सांखळ जीवां ॥ ६४ ॥
परि हें आइकौनि झनें । कदरसी हो मनें ।
कायि रात्रि चांदिणें । धाकु धरिजे ॥ ६५ ॥
हे आसुरी संपत्ति तेया । बंधा लागि धनंजया ।
जो साहि दोषां ययां । आश्रो होए ॥ ६६ ॥
तूं तवं पांडवा । सांवितलेयां दैवां ।
गुणाचा वोलावा । जन्मलासि ॥ ६७ ॥
ह्मणौनि पार्था तुवां । दैवसंपत्तिस्वामियां ।
होउनि यावें उवाया । कैवल्याचा ॥ ६८ ॥

**द्वौ भूतसर्गौ लोकेस्मिन् दैवआसुर एव च ॥**
**दैवो विस्तरशः प्रोक्त आसुरं पार्थ मे शृणु ॥ ६ ॥**

आणि दैवां आसुरां । संपत्तिवंतां नरां ।
अनादिसिद्ध उजरा । राहाटिचा आहे ॥ ६९ ॥
जैसें रात्रिचां अवसरीं । व्योम व्यापिजे निशाचरीं ।
दिसां सुव्यापारीं । मनुष्यादिकिं ॥ २७० ॥
तैसिया आपुलिया राहाटी । वर्त्तति दोन्हीं सृष्टी ।
दैवी आणि किरीटी । आसुरी एथ ॥ ७१ ॥
तेविं चि विस्तारुनि दैवी । ज्ञानकथनादिप्रस्तावि ।
मागिलें ग्रंथें बरवी । सांघितली ॥ ७२ ॥
आतां आसुरी सृष्टी । तेथिची उपलउं गोठी ।
अवधानाची दीठी । दे पां नीकी ॥ ७३ ॥

**प्रवृत्तिं च निवृत्तिं च जना न विदुरासुरा ॥**
**न शौचं नापि चाचारो न सत्यं तेषु विद्यते ॥ ७ ॥**

तरि वाद्यें विण नादु । दूजेन विण शद्बु ।
कां अपुष्प मकरंदु । न लभे जैसा ॥ ७४ ॥
तैसी प्रकृति हे आसुर । येकली नव्हे गोचर ।
जवं येकाधें शरीर । लाहे ना ॥ ७५ ॥
मग आविष्कारला लाकुडें । पावकु जैसा जोडे ।
तैसी प्राणिदेहीं सांपडे । आटोपली हे ॥ ७६ ॥
तेधवां वाढि जे उंसा । ते चि आंतुला रसा ।
देहाकारु होये तैसा । प्राणियांचा ॥ ७७ ॥
आतां तेयां चि प्राणियां । रूप करुं धनंजया ।
घडिलें जें जें आसुरिया । दोष रिद्धी ॥ ७८ ॥
तरि पुण्या लागि प्रवृत्ति । पापा लागि निवृत्ति ।
या जाणणेयांची राति । तेयाचां मनीं ॥ ७९ ॥
निगणेयां आणि प्रवेशा । चित्त नेंदितु आविसा ।
कोशकारु जैसा । जाचिनला ॥ २८० ॥
कां दीधलें मावौतें येइल । किं न ये हें पुढिल ।
न पांतां दे भांडवल । मूर्खु चोरा ॥ ८१ ॥
तैसिया प्रवृत्तिनिवृत्ति दोन्हीं । नेणिजति आसुरीं जनीं ।
आणि शौच तें स्वप्नीं । नेदखति ते ॥ ८२ ॥
काळिमा सांडील कोळिसा । वर चोखि होईल वायसा ।
राक्षसु ही मांसा । विटों सके ॥ ८३ ॥
परि आसुरा प्राणियां । शूचि नाहिं धनंजया ।
पवित्रत्व जेवि भांडेया । मद्याचआ ॥ ८४ ॥
आणि वाढवितां विधिचीं आश । कां पाहांतां वडिलांची वास ।
आचरिजे हे भास । नेणति ते ॥ ८५ ॥
जैसें चरणें सेळियेचें । कां धावणें वारेयाचें ।
जळणें आगिचें । भले तेउतें ॥ ८६ ॥

तैसें पुढां सूनि शरीर । आचरति ते आसुर ।
सत्येंसि कीर वैर । सदा चि तेयां ॥ ८७ ॥
नांगिया आपुलिया । विंचू करी गुतकुलिया ।
तरि साच बोलिया । बोलति ते ॥ ८८ ॥
अपानाचेनि तोंडें । जरि सुगंधा येणें घडे ।
तरि सत्य तेयां जोडे । आसुरांतें ॥ ८९ ॥

**असत्यमप्रतिष्ठंते जगदाहुरनीश्वरम् ॥**
**अपरस्परसंभूतं किमन्यत्कामहैतुकम् ॥ ८ ॥**

ऐसें ते न करितां काहिं । आंगिं चि वोखटें पाहिं ।
आतां बोलती ते नवाई । सांघिजैल ॥ २९० ॥
यऱ्हविं कऱ्हेयाचा खांदु चांग । मग येर काइ आंग ।
परिस जो प्रसंग । प्राप्ती कीं ॥ ९१ ॥
उधविचें तोंड । उगलीत धूमाचे उभड ।
हें जाणिजे तऱ्हीं उघड । सांघों ते बोल ॥ ९२ ॥
तरि विश्व हा अनादि ठावो । एथ नियंता ईश्वरु राउ ।
चाउडिये न्यायान्याउ । निवडी वेदु ॥ ९३ ॥
वेदें अन्यायीं पडे । तें निरयभोगें दंडे ।
सन्यायी तो सुखाडे । स्वर्गीं जिये ॥ ९४ ॥
ऐसी विश्ववेवस्था । अनादि जे पार्था ।
ते ह्मणति तें वृथा । आघवें हें ॥ ९५ ॥
यज्ञमूढ मुसिले यागीं । देवपिसे प्रतिमे लागि ।
नागविले भगवे योगी । समाधिभ्रमें ॥ ९६ ॥
एथ आपुलेनि बळें । भोगिजे जें वेगळें ।
हें वांचौनि नीकें आगळें । शून्य आहे ॥ ९७ ॥
ना असक्तपणें अंगिकें । वेगळ वेंटाळी न टके ।
ऐसा गादिजे दुःखें । तें चि पाप ॥ ९८ ॥

प्राण घेति संपन्नाचे । तें पाप जरि साचें ।
तरि सर्वस्व तेयाचें । हें पुण्यफल किं ॥ ९९ ॥
बली अबलातें खाये । हें चि बाधितें होये ।
तरि मासेया कां नोहे । निसंतान ॥ २०० ॥
कुळें शोधूनि दोन्हि । कुमारें चि सुलग्नीं ।
मेळविलीं प्रजासाधनीं । हेतु जरि ॥ १ ॥
तरि पशुपक्षादि जाती । तेयां मीति नाहिं संतता ।
तेयां कोणीं प्रतिपत्ती । विवाह केले ॥ २ ॥
चोरियेचें धन आलें । तें कोणासि विष जालें ।
वालभाचिये रती जालें । कोढी कोण ॥ ३ ॥
ह्मणौनि देवो गोसांवि । तो धर्माधर्म भोगवी ।
आणि परत्राचां गांविं । करि तो भोगी ॥ ४ ॥
तरि परत्र ना देवो । न दिसति ह्मणौनि वावो ।
आणि करितां निमे ठावो । मा भोगी कोणु ॥ ५ ॥
येथ उर्वसिया इंद्र सुखी । जैसा कां स्वर्गलोकीं ।
तैसा क्रिमि नरकीं । लोलतु श्लाघ्यें ॥ ६ ॥
ह्मणौनि नरकु स्वर्गु । नोहे पुण्यपापभागु ।
जें दों ठांइं भोगु । कामा चि तव ॥ ७ ॥
या कारणें कामें । स्त्रीपुरुषयुग्में ।
मिळति तेथ जन्मे । आघवें जग ॥ ८ ॥
आणि निजें अभिलाखें । स्वार्था लागलें हें पोखे ।
पाठिं परस्परद्वेषें । कामु चि नाशी ॥ ९ ॥
एवं कामु वांचूनि काहीं । जगा मूळ चि आन नाहिं ।
ऐसें बोलति ते पाहीं । आसुर गा ॥ २१० ॥
आतां असो हें कीडाळ । बोलिं न करुं पवळ ।
सांघतां चि सपोळ । होतसे वाचा ॥ ११ ॥

आणि ईश्वराचिया खंती । नसुदिया करिति चांथी ।
हें इं नाहिं चित्तीं । हा चि निश्चयो ॥ १२ ॥
किंबहुना उघड । आंगीं भरूनि पाखांड ।
नास्तिपणाचें हाड । रोविलें जीभे ॥ १३ ॥
तेधवां स्वर्गा लागि आदरु । कां नरकाचा अडदरु ।
ये वासनेचा अंकुरु । जळौनि गेला ॥ १४ ॥

**एतां दृष्टिमवष्टभ्य नष्टात्मानोल्पबुद्धयः ॥**
**प्रभवंत्युग्रकर्माणः क्षयाय जगतोहिताः ॥ ९ ॥**

मग केवळ ये खोडां । अमेध्योदकाचा बुडडा ।
विषइं चि सुहाडा । बुडाले गा ॥ १५ ॥
जैं आटावे जळचर । तैं डोहिं मिळति ढिवर ।
कां पडावें शरीर । तैं रोगां उदयो ॥ १६ ॥
उदैलें केतुचें जैसें । विश्वा अनिष्टा चि दोसें ।
ते जन्मति ते तैसे । लोकां आटु ॥ १७ ॥
विरूढलेयां अशुभ । फूटति ते चि कोंभ ।
पापाचे कीर्तिस्तंभ । चालते ते ॥ १८ ॥
आणि मागां पुढां जाळणें । वांचूनि आगि आंन नेणे ।
तैसें विरु चि करणें । आथि तेयां ॥ १९ ॥
परि तें चि गा करणें । आदरीति संभ्रमें जेणें ।
तो आइक पार्था ह्मणे । श्रीनिवासु ॥ ३२० ॥
तरि जाळ पाणियें न भरे । इंधनीं आगि न पुरे ।
तेया दुर्भर चि धूरे । मुख जालें ॥ २१ ॥

**काममाश्रित्य दुष्पूरं दंभमानमदान्विताः ॥**
**मोहाद्गृहीत्वासद्ग्राहान्प्रवर्त्तंते शुचिव्रताः ॥ १० ॥**

तैं या कामाचा अल्लावा । जीविं धरुनि पांडवा ।
दंभमानाचा मेळावा । मेळवीति ॥ २२ ॥

मातलेया कुंजरा । आंगली जाली मदिरा ।
तैसा मदाचा तवं जरा । चढत आंगीं ॥ २३ ॥
आणि आग्रया तो चि ठाउ । वरि मौढ्य ऐसा सावाउ ।
मग काइ वानूं निर्वाहो । निश्चयाचा ॥ २४ ॥
जिहिं परोपतापु घडे । परावा जीउ रगडे ।
तिहिं कर्मिं होउनि गाढे । जन्मव्रती ॥ २५ ॥
आपुलें केलें फोकारिति । जगातें धिक्कारिति ।
दाहें दिशीं पसरिति । स्पृहाजाळ ॥ २६ ॥
ऐसेनि गा आटोपें । थोरिये आणिति पापें ।
धर्मधेनु खुरपें । सूटलें जैसें ॥ २७ ॥

**चिंतामपरिमेयां च प्रलयांतामुपाश्रिताः ॥**
**कामोपभोगपरमा एतावदिति निश्चिताः ॥ ११ ॥**

इया एकी आइती । तेयाचिया कर्मप्रवृत्ती ।
आणि जीणेयां परौती । वाहाति चिंता ॥ २८ ॥
पाताळ होंनि निम्न । जिये उंचिये सानें गगन ।
जें पाहांतां त्रिभुवन । अणु हीं नोहे ॥ २९ ॥
ते योगपटाची मवणी । जीविं अनियम चिंतवणी ।
जें सांडूं नेणे मरणीं । वल्लभा जैसी ॥ ३३० ॥
तैसी चिंता अपार । वाढवीति निरंतर ।
दीठि सूनि असार । विषयादिक ॥ ३१ ॥
स्त्रिया गाइलें आइकावें । स्त्रीरूप डोळां देखावें ।
सर्वेंद्रियें हिं आश्लेषावें । स्त्रियातें चि ॥ ३२ ॥
कुरवंडी कीजे अमृतें । ऐसें सुख स्त्रिये परौतें ।
नाहिं चि ह्मणौनि चित्तें । निश्चित जालें ॥ ३३ ॥
मग तेया चि स्त्रीभोगा । लागि पाताळस्वर्गा ।
धावंति दिग्विभागा । परौतें हीं ॥ ३४ ॥

आशापाशशतैर्बद्धाः कामक्रोधपरायणाः ॥
ईहंते कामभोगार्थमन्यायेनार्थसंचयान् ॥ १२ ॥

एकु कवलु बहुतीं मासां । तोडुनु नेयिजे जैसा ।
तैसें चि कीजे विषयाशा । तेयासि चि गा ॥ ३५ ॥
वांछित तवं न पवति । मा रोकडी चि आशसंतति ।
वाढौ वाढों होंति । कोशकीट ॥ ३६ ॥
आणि पसरला अभिलाखु । अपूर्ण तो चि होये द्वेखु ।
एवं कामक्रोधांचा अधिकु । पुरुषार्थु नाहीं ॥ ३७ ॥
दिहा खोलणें रात्रीं जागोवा । ठाणांतरिया जैसा पांडवा ।
अहोरात्रिं विसांवां । भेटे चि ना ॥ ३८ ॥
तैसें उंचौनि लोटिलें कामें । नेहटित क्रोधाचिये द्रुमे ।
तेथ रागद्वेष प्रेमें । न माति केहीं ॥ ३९ ॥
तेवि चि जीविचेया हांवां । विषयवासनांचा मेळावा ।
केला परि तो भोगावा । अर्थें किं ना ॥ ३४० ॥
ह्मणौनि भोगावेया जोगा । पूर्ता अर्थु पैं गा ।
आणावेया जगा । झोंबति सैरा ॥ ४१ ॥
एकातें सावधां मारीति । एकांचीं सर्वस्वें हरीति ।
एकां लागि उभारिति । अपाययंत्रें ॥ ४२ ॥
पाशिकें पोतीं वागुरा । सूणे ससाणे काठी सोंचारा ।
घेउनि निगति डोंगरा । पारधी जैसे ॥ ४३ ॥
तें पोसावेया हें पोट । मारुनि प्राणियांचे संवाट ।
आणिति ऐसें निकृष्ट । तें हिं करिति ॥ ४४ ॥
परप्राणघातें । मेळवीति वित्तें ।
मिळलेयां चित्तें । तोखणें कैसें ॥ ४५ ॥

इदमद्य मया लब्धमिमं प्राप्स्ये मनोरथम् ॥
इदमस्तीदमपि मे भविष्यति पुनर्द्धनं ॥ १३ ॥

ह्मणे आजि मियां । संपत्ति बहुतां एकाचिया ।
आपुलिया होंतिया केलिया । धन्यु ना मीं ॥ ४६ ॥
ऐसा श्लाघों जवं जाये । तवं मन आणिका हिं वाहे ।
सवें चि ह्मणे पाहे । बहू चि आणूं ॥ ४७ ॥
हें जेतुलें असे जोडलें । तेयाचेनि भांडवलें ।
लाभा येईन उरलें । चराचर ॥ ४८ ॥
ऐसेनि धनें विश्वाचेयां । मीं चि होईन स्वामियां ।
मग दीठि पडे तेयां । उरों नेदी ॥ ४९ ॥

**असौ मया हतः शत्रुर्हनिष्ये चापरानपि ।**
**ईश्वरोहमहं भोगी सिद्धोहम् बलवान्सुखी ॥ १४ ॥**

हे मारिले ते थोडे । आणिक ही साधीन गाढे ।
मग नांदैन पवाडें । एकला चि ॥ ३५० ॥
माझीं होंति कामारीं । तियें वांचौनि येरें मारीं ।
किंबहुना चराचरीं । ईश्वरु मीं ॥ ५१ ॥
मीं भोगभूमीचा राउ । आजि सर्व सुखांसि ठाउ ।
ह्मणौनि इंद्र वावो । मातें पाउनि ॥ ५२ ॥
मीं मनें वाचा देहें । करि तें कें नोहे ।
मज वांचूनि आहे । आनु आज्ञासिद्धु ॥ ५३ ॥
तवं चि बलिया कालु । न दिसें जवं मीं अतुलु ।
सुखाचा किर निखलु । राशी चि मीं ॥ ५४ ॥

**आढ्योभिजनवानस्मि कोन्योस्ति सदृशो मया ॥**
**यक्ष्ये दास्यामि मोदिष्य इत्यज्ञानविमोहिताः ॥ १५ ॥**

कुबेरु आथिला होए । परि तो नेणे चि माझी सोये ।
संपत्ति मासीं नोहे । श्रीनिवासु ॥ ५५ ॥
माझेया कुलाचा उजालु । कां ज्ञातिगोत्राचा मेलु ।
पाहांतां ब्रह्मा हिं अव्हु । उणा चि दीसे ॥ ५६ ॥

ह्मणौनि मिरवति नावें । नाहिं मजसिं सरि पावे ।
वायां ईश्वरादिकें सावें । तैसें कोण्हीं ॥ ५७ ॥
आतां लोपला अभिचारु । तेया करीन जीर्णोद्धारु ।
प्रतिष्ठीन मरमारु । याग वरि ॥ ५८ ॥
मातें गांती वानिती । नाचें नटें रिझविती ।
तेयां देईन मागती । ते ते वस्तु ॥ ५९ ॥
माजिरां अन्नपाणीं । प्रमदाचां आलिंगनीं ।
होईन मीं त्रिभुवनीं । आनंदकरु ॥ ३६० ॥
कायि बहू सांघों ऐसे । ते आसुर प्रकृतिपींसे ।
तुरंब्रित असौसें । गगनौलेयां ॥ ६१ ॥

अनेकचित्तविभ्रांता मोहजालसमावृताः ॥
प्रसक्ताः कामभोगेषु पतंति नरकेशुचौ ॥ १६ ॥

अज्ञानें आंतलें धूलि । ह्मणौनि आशा वाहुंटली ।
भवंडित अंतराळीं । मनोरथाचां ॥ ६२ ॥
जराचेनि आटोपें । रोगी भलेतैसें जल्पे ।
चंवलित संकल्पें । जाण तैसें ॥ ६३ ॥
अनिम आखाडमेघ । कां समुद्रोर्मि अभंग ।
तैसे कामीति अनेग । अखंड हे ॥ ६४ ॥
मग पैं कामना तिया । जिवीं जाले वेलरिया ।
वोरपिलीं कांटिया । कमलें जैसीं ॥ ६५ ॥
कां पाखाणाचां माथां । हांडी फूटली पार्था ।
जीविं तैसे सर्वथा । कूट जाले ॥ ६६ ॥
तेन्हां चडतिये रयणीं । तमाची होये पुरवणी ।
तैसा मोहो अंतष्करणीं । वाढों लागे ॥ ६७ ॥
आणि वाढे जत्रं मोहो । तत्रं तत्रं विषइं रोहो ।
विषय तेथ ठावो । पातकांसि ॥ ६८ ॥

पापें आपुलेन थावें । करिति जन्ममेळावे ।
तवं जितां चि आघवे । यंति नरका ॥ ६९ ॥
ह्मणौनि गा सुमती । हे कुमनोरथ पाळिति ।
ते आसुर जांति । तेया ठाया ॥ ३७० ॥
जेथ असीपत्र तरुवर । खदिरांगाराचे डोंगर ।
तातलां तेलीं सागर । उतताति ॥ ७१ ॥
जेथ यातनेची श्रेणी । ये तरि जांत वैतरणी ।
पडति तिये दारुणीं । नरकलोकीं ॥ ७२ ॥
ऐसे नरकाचिये सेले । भागीन जे जन्मले ।
ते ही देखों भूलले । जैत यागीं ॥ ७३ ॥

**आत्मसंभाविता स्तब्धा धनमानमदान्विताः ॥**
**यजंते नाम यज्ञैस्ते दंभेनाविधिपूर्वकम् ॥ १७ ॥**

यऱ्हविं यागादिकीं क्रिया । आहाण ते चि धनंजया ।
परि विपलांति आचरौनियां । नाटकी जैसे ॥ ७४ ॥
वाळभाचिया उजरिया । आपणेयां प्रति कुस्त्रिया ।
जोडूनि तोखविति जैसिया । ऐहेवपणे ॥ ७५ ॥
तैसे आपणेयां आपण । मानितां महंतपण ।
फुगे असाधारण । गर्वें तेणें ॥ ७६ ॥
मग ळवों नेणति कैसे । आटिवं लोहखांब जैसे ।
कां उधवली आकाशें । शिळाराशि ॥ ७७ ॥
तैसें आपुलिये बरवे । आपण चि रिझति जीवें ।
तृणाहूनि आघवें । मानिति नीच ॥ ७८ ॥
वारि धनाचिया मदिरा । माजौनि धनुर्द्धरा ।
कृत्याकृत्यविसरा । सवते केले ॥ ७९ ॥
जें आंगि आइति ऐसी । तेथ यज्ञाची गोठि कायिसी ।
तऱ्हीं काइ काइ पीसीं । न करिति गा ॥ ३८० ॥

ह्मणौनि कोण्हें येकें वेळें । मौढ्यमदाचेनि वळें ।
यागाचें हिं टवाळें । आदरीति ॥ ८१ ॥
ना कुंडें मंडप वेदी । कां उचितसाधनसमृद्धी ।
आणि तेयांसी चि तवं विधि । दंद चि किर ॥ ८२ ॥
देवांब्राह्मणाचेनि नावें । तेउते वारेन हीं नोहावे ।
ऐसें तेथ देयावें । लागैल कवणां ॥ ८३ ॥
पैं वांसुरुवांचा भोकसा । गायी पुढां ठेउनि जैसा ।
उगाणा घेंति क्षीररसा । बुद्धिमंत ॥ ८४ ॥
तैसें यागाचेनि नावें । जगा वाउनि हांवे ।
नागवीति आघवें । ऐहेरा वाऱ्हीं ॥ ८५ ॥
ऐसा काहिं आपुलिया । होमीति जे उजरिया ।
तेणें कामिति प्राणियां । सर्वनाशु ॥ ८६ ॥

**अहंकारं बलं दर्पं कामं क्रोधं च संश्रिताः ॥**
**मामात्म परदेहेषु प्रद्विषंतोभ्यसूयकाः ॥ १८ ॥**

मग पुढां भेरी निसाण । लाउनि तैं दीक्षितपण ।
जगीं फोकरीति आग । वायों वायों ॥ ८७ ॥
तेधवां महत्वें तेणें अधमां । तेयां सगरवां हिं चढे महिमा ।
जैसे लेवे दीधले तमा । काजळाचे ॥ ८८ ॥
तैसे मौढ्य घणावे । अहंकारु दुणावे ।
औद्धत्वें उंचावे । अहंभाउ ॥ ८९ ॥
मग दुजेयाची भाक । नुरावेया निःशेष ।
बळियेपणें आणिक । होये बळ ॥ ३९० ॥
ऐसा अहंकारा बळा । जालेयां एकवळा ।
दर्पसागरु वेळा । सांडुनि उते ॥ ९१ ॥
मग बोसंडलेनि दर्पें । कामां हिं पीत्त कुरुपे ।
तेया धगी सैव पळिपे । क्रोधाग्निची ॥ ९२ ॥

तेथ उन्हाला आगि पुरा । तेलातूपाचेया घठारा ।
लागला आणि वारा । सूटला जैसा ॥ ९३ ॥
तैसा अहंकारु आलाबेला । दर्पु कामक्रोधीं रूढला ।
एयां दोहींचा मेला । जेयाचां ठांइं ॥ ९४ ॥
तो आपुलिया स्वैछा । मग कोणी कोणीं ठांइं हिंसा ।
यां प्राणियांतें वीरेषा । न सधीति गा ॥ ९५ ॥
पहिलें तवं धनुर्द्धरा । आपुलिया मांसा रुधिरा ।
वेचु करिति अभिचारा । लागौनियां ॥ ९६ ॥
तेथ जालितु तियें देहें । तेयां माझि मीं आहें ।
तेया आत्मेयां मज घाए । वाजति ते ॥ ९७ ॥
आणि अभिचारिकिं तिहीं । उपद्रवीति जेतुलें काहीं ।
चैतन्य मीं चि पाहिं । सीणु पावें ॥ ९८ ॥
ऐसें अभिचारा वेगलें । विपायें जें अवगळे ।
ते टाकीति एटालें । पैशून्याचिं ॥ ९९ ॥
सतिया संतपुरुष । दानशील याज्ञिक ।
तपस्वी अलौलिक । सन्यासी जे ॥ ४०० ॥
कां भक्त ज्ञान महात्म्ये । तियें माझीं निजधामें ।
निर्वाळलीं होमें धर्में । श्रौतादिकीं ॥ १ ॥
तेया द्वेषाचेनि काळकूटें । बासटूनि तीखटें ।
कुबोलाचिं सदटें । सिंधिति कांडें ॥ २ ॥

**तानहं द्विषतः क्रूरान्संसारेषु नराधमान् ॥**
**क्षिपाम्यजस्रमशुभानासुरीष्वेवयोनिषु ॥ १९ ॥**

ऐसें आघवेया चि परीं । प्रवर्त्तले माझां वैरीं ।
तेयां पापियां मीं करी । तें आइक पां ॥ ३ ॥
तरि मनुष्यदेहाचा तागा । घेउनि रुसति जगा ।
ते पदवी हिरौनि पैं गा । ऐसे टेवीं ॥ ४ ॥

क्लेशगावींचां उकरडां । भवपुरिचां पाणवाडां ।
ते तमोयोनि तेयां कुडां । वृत्ति मीं दें ॥ ५ ॥
मग आहाराचेनि नावें । तृण हीं जेथ नुगवे ।
ते व्याघ्र वृक अडवे । तैसियां करिं ॥ ६ ॥
तेथ क्षुधादुःखें बहुतें । तोडुनि खांतां आपणपेयांतें ।
मरों मरों मागौते । होंते चि असति ॥ ७ ॥
कां आपुलां गरलज्वालीं । जालीं तेयां आंगाचिं पेंदलीं ।
ते सर्प चि करीं बिलीं । निरुंधलां ॥ ८ ॥
परि घेउनि श्वासु घापे । येतुलेन हिं मापें ।
विसांवां तेयां लिपे । अर्जुना गा ॥ ९ ॥
ऐसेनि कल्पांचिया कोडी । गणितां हीं संख्या थोडी ।
तेतुला वेलु न कढीं । क्लेशौनि तेयां ॥ ४१० ॥
तन्हीं तेयां जेथ जाणें । तेथिचें हें पहिलें पेणें ।
ते पाहुनु यें दारुणें । नव्हंति दुःखें ॥ ११ ॥

**आसुरीं योनिमापन्ना मूढा जन्मनि जन्मनि ॥**
**मामप्राप्यैव कौंतेय ततो यांत्यधमां गतिम् ॥ २० ॥**

हा ठाउ॰ वेन्हीं वरीं । संपत्ति ते आसुरी ।
अधोगति अवधारिं । जोडिली तिहीं ॥ १२ ॥
पाठिं व्याघ्रादि तामसा । योनि तो अलुमालु ऐसा ।
देहाधाराचा उसासा । आथि जो हा ॥ १३ ॥
तो ही मीं वोलावा हिरें । मग तम चि होंति यकसरें ।
तेथ गेलें आंधारें । कालवंडिजे ॥ १४ ॥
जेयाचिया चिलसी । नरक घेंति विवसी ।
सीणु जाये मूर्सी । साणे जेणें ॥ १५ ॥
मलु जेणें मैले । तापु जेणें पोले ।
जेयाचेनि नावें सले । महाभय ॥ १६ ॥

ऐसे विश्वाचेया खटेया । अधम जे धनंजया ।
ते ते होंति भोगावेया । तामसा योनी ॥ १७ ॥
आहा सांघतां वाचा रडे । आठवितां मन खिरडे ।
कट रे मूर्खि केवडें । जोडिलें होणें ॥ १८ ॥
काइसेया ते आसुर । संपत्ति जोडावी वाउर ।
जिया दीधलें थोर । पतन ऐसें ॥ १९ ॥
ह्मणौनि तुवां धनुर्द्धरा । न व्हावें गा तिया मोहरा ।
जेउता वासु असुरा । संपत्तिवंतां ॥ ४२० ॥

**त्रिविधं नरकस्येदं द्वारं नाशनमात्मनः ॥**
**कामः क्रोधस्तथा लोभस्तस्मादेतत्त्रयं त्यजेत् ॥२१॥**

आणि दंभादि दोष साई । हे संपूर्ण जेयाचां ठांइं ।
ते त्यजावें हें चि काई । ह्मणों किर ॥ २१ ॥
परि काम क्रोध लोभ । येयां तिहींचें बिंब ।
थांवे तेथ अशुभ । प्रकाशलें जाण ॥ २२ ॥
सर्वदुःखा आपुलेया । दर्शन धनंजया ।
पाढाउ भलेया । दिधलें आथि ॥ २३ ॥
कां पापिया नरकभोगीं । सुवावेया लागि जगीं ।
पातकांची दाटुगी । सभा चि हे ॥ २४ ॥
ते रौरव गा तवं वेरि । आइकिजति गा अपटांतरीं ।
जवं तीन्हीं अंतरीं । उठीति नां हे ॥ २५ ॥
अपायें येणें आसलग । यातना इहिं सवंघ ।
हाणि हाणि नोहे तीव । हे चि हाणी ॥ २६ ॥
काइ बहू बोलों सूभटा । सांवितलेयां निकृष्टां ।
नरकाचा दारवठा । त्रिसांकु हा ॥ २७ ॥
ययां कामक्रोधां लोभां । माजि जीवें जो होये उभा ।
तो निरयपुरिची सभा । पातला जाण ॥ २८ ॥

म्हणौनि पुढुतीं किरीटी । हे कामादिदोषत्रिपुटी ।
त्यजावी गा चोखटी । आघवां विखीं ॥ २९ ॥

**एतैर्विमुक्तः कौंतेय तमोद्वारैस्त्रिभिर्नरः ॥**
**आचरत्यात्मनः श्रेयस्ततो याति परां गतिम् ॥ २२ ॥**

धर्मादिक चहुं आंतु । पुरुषार्थांची तैं चि मातु ।
करावी जैं सांघातु । सांडील हा ॥ ४३० ॥
हे तीन्ही जिवीं जागती । आणि निकेयाचि प्राप्ति ।
हे माझे कान नाइकती । देवो म्हणे ॥ ३१ ॥
जें आपणपें पढिये । आत्मनाशा जो भिये ।
ते तेणें न धरावी सोये । निश्चयेंसीं ॥ ३२ ॥
पोटीं बांधौनि पाखाण । समुद्रिं बाहिं आंगवण ।
कां जियावेया जेवण । कालकूटाचें ॥ ३३ ॥
इहीं कामक्रोधलोभेंसीं । कार्यें सिद्धति तैसीं ।
म्हणौनि ठावो चि पूसीं । येयांचा गा ॥ ३४ ॥
जैं काहीं अवचटें । हे तिकडी सांखळ फीटे ।
तैं सुखें आपुलिये वाटे । चालों लाभे ॥ ३५ ॥
त्रिदोषीं सांडिलें शरीर । त्रिकुटी फीटलेयां नगर ।
त्रिदाघ निमालेयां अंतर । जैसें होए ॥ ३६ ॥
तैसा कामादिकिं तिघीं । सांडिला सुखा पावे जगीं ।
संगु लाहे मोक्षमार्गीं । सज्जनाचां ॥ ३७ ॥
मग सत्संगें प्रबळें । सत्शास्त्राचेनि बळें ।
जन्ममृत्युचिं निमाळें । निस्तरे रानें ॥ ३८ ॥
तेव्हां आत्मानंदें आघवे । जे सदा वसतें बरवें ।
तें तैसें चि पाटण पावे । गुरुकृपेचें ॥ ३९ ॥
तेथ प्रियाची पैली सीमा । ते भेटे माउली आत्मा ।
तिये क्षेवीं खाटे डिंडिमा । संसारिक हे ॥ ४४० ॥

जो कामक्रोधलोभां । झाडि करुनि ठाके उभा ।
तो एवडेया येया लाभा । गोसांवि होए ॥ ४१ ॥

**यः शास्त्रविधिमुत्सृज्य वर्तते कामकारतः ॥**
**न स सिद्धिमवाप्नोति न सुखं न परां गतिम् ॥ २३ ॥**

ना हें नावडौनि काहीं । कामादिकाचां ठाइं ।
दाटिलें जेणें डोई । आत्मचोरें ॥ ४२ ॥
जो जगीं समान सकृपु । हिताहितु दाविता दीपु ।
तो अमान्यु केला बापु । वेदु जेणें ॥ ४३ ॥
न धरी चि विधिची भीड । न करि चि आपुली चाड ।
वाढवीतु गेला कोड । इंद्रियांचें ॥ ४४ ॥
कामक्रोधलोभाची कास । न सोडी चि पालिली भास ।
स्वैराचाराचें असोस । रान रिगाला ॥ ४५ ॥
संसारबंधु जाये ! हें किर तेयाचें कें आहे ।
परि तो इहिकीं न लाहे । विषय भोगूं ॥ ४६ ॥
ते सूटिकेचिया वाहाणी । मग पियों न लाहे पाणी ।
स्वप्नीं हीं ते काहाणीं । दूरी चि तेया ॥ ४७ ॥
तरि मांसा लागि भूलला । ब्राह्मणु पाणवाडां रिगाला ।
किं तेव्हां चि तेथ लागला । आगि जैसा ॥ ४८ ॥
तैसें विषयांचेनि कोडें । जेणें परत्रा केलें उबडें ।
तवं तो चि आनी कडे । मरणें नेला ॥ ४९ ॥
एवं परत्र ना स्वर्गु । इहिक ना विषयभोगु ।
तेथ केउता प्रसंगु । मोक्षाचा तो ॥ ४५० ॥
ह्मणौनि कामाचेनि बळें । विषयो चरों पाहे ढाळें ।
तेया विषयो ना स्वर्गु मिळे । ना उद्धरे तो ॥ ५१ ॥

**तस्मात् शास्त्रं प्रमाणं ते कार्याकार्यव्यवस्थितौ ॥**
**ज्ञात्वा शास्त्रं विधानोक्तं कर्म कर्तुमिहार्हसि ॥ २४ ॥**

या कारणें पैं बापा । जेया आपुली आथि कृपा ।
तेणें वेदांचेया निरोपा । आन न कीजे ॥ ५२ ॥
पतिचेया व्रता । अनुसरे पतिव्रता ।
अनायासें आत्महिता । भेटे जेवि ॥ ५३ ॥
नातरि श्रीगुरुवचना । दीठि देंतु जतना ।
शिष्यु आत्मभवना । माझि पैसे ॥ ५४ ॥
हें असो आपुला ठेवा । जरि हाता आथि यावा ।
तरि आदरें जेवि दीवा । पुढां कीजे ॥ ५५ ॥
तैसा अशेषां पुरुषार्थां । जो गोसांवि हों ह्मणे पार्था ।
तेणें श्रुती स्मृती माथा । वैसों घापे ॥ ५६ ॥
शास्त्र ह्मणैल सांडावें । तें राज्य ही तृण मानावें ।
जें घेववि तें न मनावें । विष ही वीरु ॥ ५७ ॥
ऐसी वेदैक निष्ठा । जालेयां सूभटा ।
तरि कें आहे अनिष्टां । भेटणें गा ॥ ५८ ॥
पैं अहिता पासौनि काढिती । हित देउनि वाढविती ।
नाहिं श्रुती परौती । माउली जगीं ॥ ५९ ॥
ह्मणौनि ब्रह्मेंसि मेळवी । तवं हे कोण्हीं न संडावी ।
अगा तुलां ऐसां भजावीं । विशेषेंसीं ॥ ४६० ॥
जें आजि तूं अर्जुना एथें । करावेया शास्त्रें सार्थें ।
जन्मलासि वलार्थें । धर्माचेनि ॥ ६१ ॥
आणि धर्मा अनुज हि ऐसें । हें बोधें चि आलें पैसें ।
ह्मणौनि अनारिसें । करुं न ये ॥ ६२ ॥
कार्याकार्यविवेकीं । शास्त्रें चि करावी पारखी ।
अकृत्यत्व तें कुडें लोकीं । वाळावें गा ॥ ६३ ॥
मग कृत्यपणें खरें निगे । ते तुवां आपुलेनि आंगें ।
आचरौनि आदरें चांगें । सारावें चि ॥ ६४ ॥

जे विश्वप्रमाणिची मुदी । आजि तूझां हातीं सुबुद्धी ।
लोकसंग्रहाची त्रिशुद्धी । योग्यु होसी ॥ ६५ ॥
एवं आसुरवर्गु आघवा । सांघौनि तेथिचा निगावां ।
तो ही देवें पांडवा । निरोपिला ॥ ६६ ॥
या वरि तो पांडुचा । कुमरु भाऊ जीवाचा ।
पूसैल तें चैतन्याचां । कानीं आइकां ॥ ६७ ॥
संजयें व्यासाचेया निरोपा । तो वेलु फेडिला तेया नृपा ।
तैसा मी हीं निवृत्तिकृपा । सांघैन तुह्मां ॥ ६८ ॥
तुह्मीं संत माझिया कडा । दीठिचा कराल बहु वाडा ।
तरि तुह्मां मानें येवढा । होईन मीं ॥ ६९ ॥
ह्मणौनि निज अवधान । मज ऊलगे पसायदान ।
दीजो जी क्षमीं होईन । ज्ञानदेऊ ह्मणे ॥ ४७० ॥

ॐ तत्सदिति श्रीमद्भगवद्गीतासूपनिषत्सु ब्रह्मविद्यायां योगशास्त्रे श्रीकृष्णार्जुनसंवादे दैवासुरविभागयोगो नाम षोडशाध्यायः ।

श्रीकृष्णार्पणमस्तु ॥ छ ॥

# ज्ञानेश्वरी

## अध्याय सतरावा

श्रीगणनाथायनमः ॥

विश्वविकासिनी मुद्रा । जेया सांडे तूझी निद्रा ।
तेया नमो जी गणेंद्रा । गुरु तुज ॥ १ ॥
त्रिगुणत्रिपुरीं वेढिला । जीवत्वदुर्गें अडिला ।
तो आत्माशंभु सोडिला । तूझिया स्मृती ॥ २ ॥
ह्मणौनि शिवेंसिं कांटाला । गुरुत्वें तूं चि आगला ।
तऱ्हीं हलु मायाजाला । माजि तारिता ॥ ३ ॥
जे तूझां विषीं मूढ । तेयां लागि तुं वक्रतुंडु ।
ज्ञानियां तरि अखंडु । उजु चि असिसि ॥ ४ ॥
दैविकी दीठि पांतां सानीं । तऱ्हीं निमिलोन्मीलनीं ।
जगा आदि प्रलयो दोन्हीं । लीला चि करिसी ॥ ५ ॥
प्रवृत्तिकरणाचां चालीं । उठिलीं मदाचां गंधानीलीं ।
पूजिजसि नीलोत्पलीं । जीवभृंगाचां ॥ ६ ॥
पाठिं निवृत्तिकर्णतालें । अहलि तें पूजा विधुले ।
तेव्हॅं मिरविसि मोकलें । आंगाचें लेणें ॥ ७ ॥
वामांगिचा लास्यविलासु । जो हा जगद्रूपु आभासु ।
तो तांडवमीषें कलासु । दाविसी तूं ॥ ८ ॥

हें असो विस्मो दातारा । तूं होंसि जेयांचा सोयरा ।
सोइरिकेचिया वेव्हारा । मूंके चि तो ॥ ९ ॥
फेडितां बंधनाचा ठाउ । तूं जगद्बंधु ऐसा आहो ।
धरूं बोलगे उवाउ । तूझां चि आंगीं ॥ १० ॥
दूजेयाचेनि नावें तेया । देह ही नूरे चि राया ।
जाणों आपणपेयां । केलासि दूजा ॥ ११ ॥
तूतें करुनि पुढें । जे उपायें घेंति दवडे ।
तेयां ठाकसि बहुवें पाडें । मागां चि तूं ॥ १२ ॥
जो ध्यानें सुये मानसीं । तेया लागि तूं नाहिं देशीं ।
ध्यानें चि सरे तेणेंसीं । वालभ तुज ॥ १३ ॥
तूतें सावध चि जो नेणे । तो नांदे सर्वज्ञपणें ।
वेदां हिं येवडें बोलणें । नेवसि कानीं ॥ १४ ॥
मौन गा तूझें राशिनावं । आतां स्तोत्रिं कें भांजे हावं ।
दीससि तेतुली माव । भजों कायि ॥ १५ ॥
दैविकें सेवक होँ पाहों । तरि भेदितां द्रोहो लाहों ।
ह्मणौनि आतां काहिं चि नोहों । तुज लागि जी ॥ १६ ॥
जें सर्वथा सर्व ही नोहिजे । तें अद्वया तूतें लागिजे ।
हें जाणें मीं वर्म तूझें । आराध्यलिंगा ॥ १७ ॥
तरि नूरौनि वेगलेपण । रसिं भजिनलें लवण ।
तैसे नमन माझें जाण । बहू कायि बोलों ॥ १८ ॥
आतां रीता समुद्रीं रिगे । तो उचंबळतु कुंभु निगे ।
कां दसी दीपा संगें । दीपू चि होए ॥ १९ ॥
तैसा तूझेया परिणती । मीं पूर्णु जालां श्रीनिवृत्ती ।
आतां आणीन व्यक्ती । गीतार्थु तो ॥ २० ॥
तरि षोडशाध्याइं शेखीं । तिये समाप्तिचां श्लोकीं ।
जो ऐसा निर्णयो निष्टकीं । केला देवें ॥ २१ ॥

जें कृत्याकृत्यव्यवस्था । अनुष्ठावेया पार्था ।
शास्त्र चि एक सर्वथा । प्रमाण तुज ॥ २२ ॥
तेथ अर्जुनु ह्मणे मानसें । हें ऐसें कैसें ।
जें शास्त्रें विण नसे । सूटिका मां ॥ २३ ॥
तरि तक्षकाची फडे । टाकूनि कें तें माणिक काढे ।
कें नाकिचा केंसु जोडे । सिंहाचिये ॥ २४ ॥
मग तेणें तो वोविजे । तरी चि लेणें पाविजे ।
यऱ्हविं काइ असिजे । रिक्तकंठां ॥ २५ ॥
तैसि या शास्त्रां मोकली । इया कैं वेंटाली ।
जे येकवाक्यतेचां फळीं । पैसिजे कैं ॥ २६ ॥
जालेयां हिं येकवाक्यता । कां लाभे वेळु अनुष्ठितां ।
कैंचा पैसार जीविता । एतुलालेया ॥ २७ ॥
आणि शास्त्रें अर्थें देशें काळें । इंहिं चौंहिं एक जें फळे ।
तें वावो किं कामिळें । आघवें चि ॥ २८ ॥
ह्मणौनि शास्त्राचें घडतें । नोहे प्रकारें बहुतें ।
तरि मूर्खां मुमुक्षां एथें । काइ गति ॥ २९ ॥
हा पूसावेया अभिप्राउ । अर्जुनु करील प्रस्ताउ ।
तो सतरावेया ठाउ । अध्याया येथ ॥ ३० ॥

## अर्जुन उवाच ॥

**ये शास्त्रविधिमुत्सृज्य यजंते श्रद्धयान्विताः ॥**
**तेषां निष्ठा तु का कृष्ण सत्वमाहो रजस्तमः ॥ १ ॥**

तरि सर्वविषयीं वितृष्णु । जो सकलकळिं सतृष्णु ।
कृष्णा हिं नवल कृष्णु । अर्जुनत्वें जो ॥ ३१ ॥
शौर्यें जोडिला आधारु । जो सोमवंसिचा शृंगारु ।
सुखादिउपचारु । जेयाची लीळा ॥ ३२ ॥

जो प्रशेसि प्रियोत्तमु । विद्यांचा विश्रामु ।
सहचरु मनोधर्मु । देवांचा जो ॥ ३३ ॥
तो ह्मणे गा तमालश्यामा । इंद्रियां फावलेयां ब्रह्मा ।
तूझा बोलु येकु आह्मां । साकांक्षु पैं जी ॥ ३४ ॥
जे शास्त्रें वांचौनि आणिकें । प्राणियां स्वमोक्षु न देखे ।
ऐसें जें कैपक्षें । बोलिलें देवें ॥ ३५ ॥
तरि न मिळे चि तो देशु । नोहे चि काळा अवकाशु ।
जो करवि शास्त्राभ्यासु । तो ही दूरि ॥ ३६ ॥
अभ्यासीं विरजिया । होंति जिया सामग्रिया ।
तेया ही नाहिं आपैतिया । तेणें वेळें ॥ ३७ ॥
उजू नोहे चि प्राचीन । नेंदी चि प्रज्ञा संवाहन ।
ऐसें ठेलें आपादान । शास्त्रांचें जेया ॥ ३८ ॥
किंबहुना शास्त्रविखिं । एकि ही न लाहांती चि नाखी ।
ह्मणौनि उखीविखी । सांडिली जिहिं ॥ ३९ ॥
परि निर्द्धारुनि शास्त्रें । अर्थानुष्टानें पवित्रें ।
नांदताति परत्रें । आचारें जे ॥ ४० ॥
तेयां ऐसें आह्मि होआवें । ऐसी चाड बांधौनि जीवें ।
घेंति तेयाचे मागावे । आचरावेया ॥ ४१ ॥
धडेयांचेयां आखरा । तळिं बाळ लिहे दातारा ।
कां पुढां सूनि काठिकारा । अक्षमु चाले ॥ ४२ ॥
तेसें सर्वशास्त्रनिपुण । तेयांचें जें आचरण ।
तें चि करीति प्रमाण । आपुलिये श्रद्धे ॥ ४३ ॥
मग शिवादिकें पूजनें । भूम्यादिकें महादानें ।
अग्निहोत्रादि यजनें । करीति जे श्रद्धा ॥ ४४ ॥
तरि तिया सत्वरजतमां । माजि कोणि पुरुषोत्तमा ।
गति होये ते आह्मां । सांविजो जी ॥ ४५ ॥

श्रीभगवानुवाच ॥

**त्रिविधा भवति श्रद्धा देहिनां सा स्वभावजा ॥**
**सात्विकी राजसी चैव तामसी चेति तां शृणु ॥ २ ॥**

जो निगमपद्माचें पराग । जो वैकुंठपीठिचें लिंग ।
जिये जेयाचिया जग । अंगछाया ॥ ४६ ॥
काळु सवियां चि वाडु । लोकोत्तरु प्रौढु ।
अद्वितीयु गूढु । आनंदवनु ॥ ४७ ॥
इयें श्लाघ्यजती जेणें बीकें । जेयाचेनि आकाशअंग असिकें ।
तो श्रीकृष्णु स्वमुखें । बोलतुसे ॥ ४८ ॥
ह्मणे पार्था तूझा अतिसो । घेइं गा आह्मि जाणतसों ।
शास्त्रअभ्यासाचा आडसो । मानितोसि किं ॥ ४९ ॥
नसुदिया चि श्रद्धा । झोंबों पाहासि परमपदा ।
तरि तैसें हें प्रबुद्धा । सोहपें नोहे ॥ ५० ॥
श्रद्धा ह्मणितलेया चि साठीं । पातिजों न ये किरीटी ।
कायि द्विजु अंत्यजुवृष्टी । अंत्यजु नोहे ॥ ५१ ॥
गंगोदक जऱ्हीं जालें । तऱ्हीं मद्यभांडां आलें ।
घेऊं ये काहिं केलें । विचारि पां ॥ ५२ ॥
चंदनु होये शीतळु । परि अग्निसिं पात्रे मेळु ।
तो हातिं धरिलेयां जाळूं । न शके काई ॥ ५३ ॥
कां कीडाचिये पुटीं । पडिलें सोनें किरीटी ।
घेतलेयां सोळें साठिं । नागवी नां ॥ ५४ ॥
तैसें श्रद्धेचें दळवाडे । आंगें किर चोखडें ।
परि प्राणियां चांपडे । विभागें जैं ॥ ५५ ॥
आणि प्राणिये तवं स्वभावें । अनादिमायाप्रभवें ।
गुणाचे चि आवे । वळिले आथि ॥ ५६ ॥

तेथ ही दोनि गुण खंचति । मग एकु धरी उन्नती ।
तैं तैसी चि होति वृत्ति । जीवांचिया ॥ ५७ ॥
वृत्ती ऐसें मनीं धरिति । मना ये ऐसी क्रिया करिति ।
केलेयां ऐसें वरीति । मरौनि देह ॥ ५८ ॥
बीज मोडे झाड होये । झाड सुकलें बिजि माये ।
ऐसेनि कल्पकोडी जाये । जाति न नशे ॥ ५९ ॥
तिया परि इयें अपारें । होंत जांत जन्मांतरें ।
त्रिगुणत्व न व्यभिचरे । प्राणियांचें ॥ ६० ॥
ह्मणौनि प्राणियांचां पैकीं । पडिली श्रद्धा अवलोकिं ।
होये गुणा सारिखी । तिहिं येयां ॥ ६१ ॥
विपायें वाढे सत्व शुद्ध । जेधवां ज्ञान चि करी साध ।
परि येका दोनि वोखद । येर आहाति ॥ ६२ ॥
सत्वाचेनि आंगलगें । ते श्रद्धा मोक्षफला रिगे ।
तवं रजतम उगे । कां पां राहाति ॥ ६३ ॥
मोडूनि सत्वाची त्राये । रजोगुणु आकाशें जाये ।
तेव्हां ते चि श्रद्धा होये । कर्माची सुणी ॥ ६४ ॥
मग तमाची उठी आगि । तेधवां ते चि श्रद्धाभंगी ।
हों लागे भोगा लागि । भलेतेया ॥ ६५ ॥
एवं सत्वरजतमां । वेगळाली श्रद्धा सुवर्मा ।
नाहिं भूतग्रामां । माजि येयां ॥ ६६ ॥
ह्मणौनि श्रद्धा स्वाभाविक । असे गुणत्रयात्मक ।
रज तम सात्विक । भेदिं इहिं ॥ ६७ ॥
जैसें जीवन चि उदक । परि विशिं होये मारक ।
कां मिरियां माजि तीख । उंसिं गोड ॥ ६८ ॥
तैसा बहुवसें तमें । जो सदा होये निमे ।
तेथ श्रद्धा परिणमे । तें चि होउनि ॥ ६९ ॥

मग काजळा आणि मसि । न दिसे विवंचना जैसी ।
ते चि श्रद्धा तामसी । सिनानी नाहिं ॥ ७० ॥
तैसी चि राजसी जीविं । रजोमय जाणावी ।
सात्विकिं आघवी । सत्वाचि चि ॥ ७१ ॥
ऐसेनि हा सकळु । जगडंबरु निखळु ।
श्रद्धेचा चि केवळु । वोतिला असे ॥ ७२ ॥
परि गुणत्रयवसें । त्रिविधपणांचें लासें ।
श्रद्धे जें उठिलें असे । तें चि वोळख ॥ ७३ ॥
तरि जाणिजे झाड फूलें । मानस जाणिजे बोलें ।
भोगें जाणिजें केलें । पूर्वजन्मिचें ॥ ७४ ॥
तैसिं जिहिं जिहिं चिन्हि । श्रद्धेचीं रूपें तिन्हीं ।
देखति ते वानी । अवधारि पां ॥ ७५ ॥

**सत्वानुरूपा सर्वस्य श्रद्धा भवति भारत ॥**
**श्रद्धामयो यं पुरुषे यो यच्छ्रद्धः स एव सः ॥ ३ ॥**

तरि सात्विकी श्रद्धा । जेयांचा होये बांधा ।
तेया बहू करुनु मेधा । स्वर्गिंची आथि ॥ ७६ ॥

**यजंते सात्विका देवान्यक्षरक्षांसि राजसाः ॥**
**प्रेतान्भूतगणां श्चान्ये यजंते तामसा जनाः ॥ ४ ॥**

ते विद्याजात पढति । यज्ञक्रिया निवडिति ।
किंबहुना पडति । देवपैकिं ते ॥ ७७ ॥
आणि श्रद्धा राजसां । घडिजे वीरेशा ।
ते भजति राक्षसां । खेचरां हान ॥ ७८ ॥
जीववधें साधूनि बळि । भूतप्रेतकुळें मौळी ।
श्मशानीं संध्याकाळीं । पूजिति जे ॥ ७९ ॥
ते तमोगुणाचें सार । काढूनि निर्मिळे नर ।
जाण तामसियेचें घर । श्रद्धेचें तिये ॥ ८० ॥

ऐसां इहिं तिहिं लिंगिं । त्रिविध श्रद्धा जगिं ।
पैं हें इं यया लागि । सांघतसें ॥ ८१ ॥
जे हे सात्विक श्रद्धा । जतना धरावी प्रबुद्धा ।
येरी दोन्हीं विरुद्धा । सांडाविया ॥ ८२ ॥
हे सात्विकी श्रद्धा जेया । निर्वाहाती होये धनंजया ।
बागुल्ल नाहिं तेया । कैवल्य तें ॥ ८३ ॥
तो न पढो कां ब्रह्मसूत्र । नाळेडू सर्वशास्त्र ।
सिद्धांतु नव्हंतु सतंत । तेयाचां हातीं ॥ ८४ ॥
परि श्रुतिस्मृतिचे अर्थ । जे आपण होउनि मूर्त्त ।
अनुष्ठानें जगा देंत । वडिल जे गा ॥ ८५ ॥
तेयांचि आंचरातिं पाउलें । पाहुनि सात्विक श्रद्धा चाले ।
तो तें चि फल ठेविलें । ऐसें पावे ॥ ८६ ॥
पैं येकुं दीपुं लावी सायासें । आणिकु फांकावेया तेथ बैसे ।
तरि काइ प्रकाशें । वंचिजे गा ॥ ८७ ॥
कां येकें मोल अपार । वेचुनु बांधलें ढवलार ।
तो सुरवाडु वस्तिकर । न भोगि काइ ॥ ८८ ॥
हें असो जो तलें करी । तेयाची चि तृषा हरी ।
तें सर्वां आन करी । हें विचारि पां ॥ ८९ ॥
हें बहू काइ बोलों पैं गा । एका गौतमासी चि गंगा ।
एरां समस्तां काइ गा । वोहल जाली ॥ ९० ॥
ह्मणौनि आपुलिया परी । शास्त्र अनुष्टिति कुसरी ।
तेयांतें श्रद्धालु जो वरी । तो मूर्खु ही तरे ॥ ९१ ॥

अशास्त्रविहितं घोरं तप्यंते ये तपो जनाः ॥
दंभाहंकारसंयुक्ताः कामरागबलान्विताः ॥ ५ ॥

ना शास्त्राचेन किर नावें । खांकरुं हिं न ये थावें ।
परि शास्त्रज्ञा हिं सींवे । ठेंकों नेदी ॥ ९२ ॥

वडिलांचिया क्रिया । छांदसत्वें वांकुलिया ।
दावीति डाकुलिया । वाजवीति ॥ ९३ ॥
आपुलेनी चि आटोपें । धनत्वाचेनि दर्पें ।
साचाचि खंडित तपें । आदरिलीं ॥ ९४ ॥
आपुलिया पुढिलाचेया । आंगा घालूनि कातिया ।
रक्ता मांसा प्राणितिया । भरू भरू देंती ॥ ९५ ॥
रिचवीति जळतां कुंडीं । लावीति चेडेयाचां तोंडीं ।
नवसिये देंत उंडी । बाळकांची ॥ ९६ ॥
आग्रहाचिया उजिरिया । क्षुद्रदेवतां वऱ्हींयां ।
अन्नत्यागें सातरिया । टाकिति एक ॥ ९७ ॥
आगा आत्मपरपीडा । वीज तमक्षेत्रीं सुहाडा ।
पेरीति मग पुढां । तें चि पीके ॥ ९८ ॥
बांहि नांहि जोडि आपुलेया । आंगें न्हवती चि धनंजया ।
मग चिंति तें तेयां । होये कां ऐसे ॥ ९९ ॥
वैद्यातें करीति साला । रसु घाली पांउखला ।
तो रोगिया विव्हळा । सोवता होये ॥ १०० ॥
नाना पढिकराचेनि सलें । काढी आपुले डोळे ।
ते वोणवां चाले आंधळें । जैसें ठाके ॥ १ ॥
तैसें तेयां तामसां होये । जें निंदूनि शास्त्रांची सोये ।
सैघ धांवति मोहें । आडाइलें ॥ २ ॥
कामु करवी तें करिति । क्रोधु मारवी तें मारीति ।
किंबहुना मातें दुखविति । दुःखाचां गुंडां ॥ ३ ॥

**कर्षयंतः शरीरस्थं भूतग्राममचेतसः ॥**
**मां चैवांतःशरीरस्थं तान्विध्यासुरनिश्चयान् ॥ ६ ॥**

आपुलां परावां देहीं । जें वीरुं करिति कांहिं ।
तें मज आत्मेयां पांहिं । होये सीणु ॥ ४ ॥

पैं वाचेचेनि पाळवें । पापिया तेयां नातळवें ।
परि पडिलें सांघावें । त्यजावेया ॥ ५ ॥
प्रेत बाहिरें घालिजे । कां अंत्यु जैसा भखलिजे ।
हें असो हातें क्षालिजे । कष्मळातें ॥ ६ ॥
तेथ शुद्धिचेया आशा । तो लेपु न मनावा जैसा ।
तेयातें सांडावेया तैसा । अनुवादु हा ॥ ७ ॥
परि अर्जुना तूं तेयातें । देखसी तैं स्मर हो मातें ।
जें आन प्रायश्चित्त येथें । मानैल ना ॥ ८ ॥

**आहारस्त्वपि सर्वस्य त्रिविधो भवति प्रियः ॥**
**यज्ञस्तपस्तथा दानं तेषां भेदमिमं शृणु ॥ ७ ॥**

ह्मणौनि श्रद्धा जे सात्विकी । पुडुतिं तिये चि पैं एकी ।
जतन करावी नीकी । सर्वां परीं ॥ ९ ॥
धरावा तैसा संगु । जेणें पोखे सात्विक लागु ।
सत्ववृद्धिचा भागु । आहारु घेपे ॥ ११० ॥
यऱ्हविं तऱ्हीं पाहिं । स्वभावो वृद्धिचां ठांइं ।
आहारु वांचौनि नाहिं । बळि हेतु ॥ ११ ॥
प्रत्यक्ष पाहे पां वीरा । जो सावधु घे मदिरा ।
तो होउनि ठाके माजिरा । तिये चि क्षणीं ॥ १२ ॥
कां जो सर्वान्नरस सेवी । तो व्यापिजे वायुस्वभावीं ।
दाहक जाली निववी । पथ्यादिक ॥ १३ ॥
नातरि अमृत जेया परीं । घेतलें अमरां करी ।
कां आपुलेया ऐसें करी । सेविलें विष ॥ १४ ॥
तेवि घेपे जैसा आहारु । धातू तैसा चि होये आकारु ।
धातू ऐसा अंतरु । भावो पोखे ॥ १५ ॥
जैसें भांडेयाचेनि तापें । आंतुल उदक तापे ।
तैसी धातुवर्से आटोपे । चित्तवृत्ती ॥ १६ ॥

ह्मणौनि सात्विकु रसु सेविजे । तैं सत्वाची वाढि पाविजे ।
राजसां तामसां होइजे । येरिं रसिं ॥ १७ ॥
तरि सात्विकु कोणु आहारु । राजसा तामसा काइ आकारु ।
हें सांघों करीं आदरु । आकर्णनीं ॥ १८ ॥
आणि येकसरेया आहारा । कैसेनि तिनि मोहरा ।
जालिया तें हिं वीरा । रोकडें दाउं ॥ १९ ॥
तरि जेव्हणाराचिया रुची । निष्पत्ति कीं बोनेयांची ।
आणि जेवितां तवं गुणाची । दासि होये ॥ १२० ॥
जो जीउ कर्त्ता भोक्ता । तो गुणा तव स्वभावता ।
पावौनियां त्रिविधता । चेष्टे त्रिधा ॥ २१ ॥
ह्मणौनि त्रिविध आहार । यज्ञ हिं किर त्रिप्रकार ।
देणें दान व्यापार । त्रिविध चिं तें ॥ २२ ॥

**आयुःसत्वबलारोग्यसुखप्रीतिविवर्धनाः ॥**
**रस्याः स्निग्धाः स्थिरा हृद्या आहाराः सात्विकप्रियाः ॥ ८ ॥**

परि आहारलक्षण पहिलें । सांघों जें ह्मणितलें ।
तें आइक भलें । रूप करुं ॥ २३ ॥
तरि सत्वगुणा कडे । जैं दैवें भोक्ता पडे ।
तैं मधुरिं रसिं घडे । मेचु तेया ॥ २४ ॥
आंगें चि द्रव्यें सुरसें । जें आंगें चि पदार्थ गोडिसे ।
आंगें चि स्नेह बहुवसें । सुपक्कें जियें ॥ २५ ॥
आकारें नव्हंति डगळें । स्पर्शिं अति मौवाळें ।
जीभे लागलीं स्नेहाळें । स्वादीं जियें ॥ २६ ॥
रसें गाढिं वरि ढिलीं । द्रव भावें आथिलीं ।
ठायें ठाउ सांडिलीं । अग्नितापें ॥ २७ ॥
आंगां सानें परिणामें थोर । जैसें गुरुमुखिचें अक्षर ।
तैसे अल्पें जन्हीं आहार । तृप्ति राहे ॥ २८ ॥

आणि मुखिं जैसिं गोडें । तैसीं देहा आंतुली कडे ।
तिहिं अन्नीं प्रीति वाढे । सात्विकाची ॥ २९ ॥
एवंगुणलक्षण । सात्विक भोग्य जाण ।
आयुष्याचें त्राण । नीच नवें ॥ १३० ॥
येणें सात्विकें रसें । जवं देहिं मेहो वरिसे ।
तवं आयुष्यनदी उससे । देहाची देहा ॥ ३१ ॥
सत्वाची किर पाळती । करणें हें चि सुमती ।
दिवसाचिये उन्नती । भानु जैसा ॥ ३२ ॥
कां शरीरा आणि मानसा । बळाचा पैंकु वांसा ।
हा आहारु तैं दशा । कैंची रोगां ॥ ३३ ॥
हा सात्विकु होये भोग्य । तैं भोगावें आरोग्य ।
शरीरा भाग्य । उदैलें जाणों ॥ ३४ ॥
आणि सुखाचें घेणेंदेणें । नीकें उवायाये येणें ।
हें असो वाढे साजणें । आनंदेंसीं ॥ ३५ ॥
ऐसा सात्विकु आहारु । परिणमला थोरु ।
करी उपकारु । सबाह्यासि ॥ ३६ ॥

कट्वम्ललवणात्युष्ण तीक्ष्णरूक्षविदाहिनः ॥
आहारा राजसस्येष्टा दुःखशोकामयप्रदाः ॥ ९ ॥

आतां राजसासि प्रीति । जिहिं रसिं आथि ।
करुं तेया ही व्यक्ती । प्रसंगें गा ॥ ३७ ॥
तारि मारें उणें काळकूट । तेणें मानें कडुवट ।
कां चूनेयांहुनु दासट । अम्लीं हान ॥ ३८ ॥
कणिकेतें जैसें पाणी । तैसें मीठ वांधेयातें आणीं ।
तेतुली चि मेळवणी । रसांतराची ॥ ३९ ॥
ऐसें खार अपाडें । राजसा तेया आवडे ।
उन्हाचेन मीखें तोंडें । अग्नी चि रिगो पां ॥ १४० ॥

वाफेचिये सांगे । वाति ही लागे ।
तैसें उन्ह मागे । राजसु तो ॥ ४१ ॥
वावंदणें पाडुनु पाए । सबलु डाहारला ठाये ।
तैसें तिखट खाये । जें घायें विण लागे ॥ ४२ ॥
आणि राखेहूनु कोरडें । आंतु बाहिरि पांकि जे पोपडे ।
तो जिव्हाडंसु आवडे । बहू तेया ॥ ४३ ॥
परस्परें दांतां । आडलु होये खातां ।
तो गा तोंडि घेंतां । तोखों लागे ॥ ४४ ॥
आधि चि द्रव्यें चुरुमुरीं । वरि परिवंडिलीं महुरीं ।
जिये घेंतां होंये धुवारी । नाकतोंडाची ॥ ४५ ॥
हें असो उगें आगितें । ह्मणे तैसें राइतें ।
पढिये प्राणा परौतें । राजसासि गा ॥ ४६ ॥
ऐसा न पुरौनि तोंडा । जीभा केला वेडा ।
अन्नमीखें भडभडां । आगी चि खाए ॥ ४७ ॥
तैसा चि लवंघा सूटे । मग भुयिं ना सेजे सांटे ।
पाणियांचें न फिटे । तोंडूनि पात्र ॥ ४८ ॥
ते आहार नव्हंति घेतले । व्याधिव्याल सुतले ।
ते चेववावेया घातले । पोटा माझि ॥ ४९ ॥
तैसें येकमेकां सलें । रोग उठिति एकें वेळें ।
ऐसा राजसु फळे । केवल दुःखें ॥ १५० ॥
एवं राजसा आहारा । रूप केलें धनुर्द्धरा ।
परिणामाचा ही विसुरा । सांघितला ॥ ५१ ॥

**यातयामं गतरसं पूतिपर्युषितं च यत् ॥**
**उच्छिष्टमपि चामेध्यं भोजनं तामसप्रियम् ॥ १० ॥**

आतां तेया तामसा । आवडि आहारिं परियसां ।
तें हिं सांघों चिळसा । झनें तुह्मीं ॥ ५२ ॥

तरि कुहिलें उसिटें खातां । न मनी काहिं अनहिता ।
कां साजुका नासका । ह्मैसि जैसी ॥ ५३ ॥
निफजलें अन्न तैसें । दुपाहारी कां दिवसें ।
अतिक्रें तैं तामसें । घेइजे तें ॥ ५४ ॥
नातरि अधोकढीं ठेलें । कां निऱ्हां करपौनि गेलें ।
तैसिं हिं खाये चूकलें । रसा जें येवों ॥ ५५ ॥
जेया कां आथि निष्पत्ति । जेथ रसु धरी व्यक्ती ।
तें अन्न ऐसें प्रतीती । तामसा नाहिं ॥ ५६ ॥
ऐसेन कहिं विपायें । सदन्ना वरिपडा होये ।
तरि घाणि सूटे तवं राहे । व्याघ्रु जैसा ॥ ५७ ॥
किं बौहुवि दिसिं वोळांडिलें । सुरसपणें सांडिलें ।
शुष्क अथवा सडिलें । गाभिणें हिं हो ॥ ५८ ॥
तें हिं बाळांचे हात वेन्हीं । चिवडिली जैसी घारी ।
कां सर्वे बैसौनि नारी । आधैलें करी ॥ ५९ ॥
ऐसेनि करमलें जैं खाए । तैं तेया जेविलें ऐसें होये ।
परि एणें हिं न धाए । पापिया तो ॥ ६० ॥
मग चमतिकारु देखां । निषेधाचा आंबुखा ।
जेया कां सदोषा । कुद्रव्यांसि ॥ ६१ ॥
तेयां अपेयाचां पानीं । अखाद्याचां भोजनीं ।
वाढविजे उतान्ही । तामसें तेणें ॥ ६२ ॥
एवं तामसा जेव्हणारा । ऐसी चि मेचु वीरा ।
याचें फळ दुसरां। क्षणि नाहिं ॥ ६३ ॥
जें जेव्हां चि अपवित्र । सेवी तेयाचें वक्त्र ।
तेव्हां चि पापा पात्र । जाला किं तो ॥ ६४ ॥
एया परौतें जेवी । ते जेविती वोज न ह्मणावी ।
पोटीं भरती जाणावी । यातना ते ॥ ६५ ॥

शिरछेदें काइ होये । कां आगी रिघतां कैसें आहे ।
हें जाणावें काइ पाहे । वरि साहातु असे जो ॥ ६६ ॥
ह्मणौनि तामसा अन्ना । परिणामु गा सिना ।
न संघों चि गा अर्जुना । देवो ह्मणे ॥ ६७ ॥

**अफलाकांक्षिभिर्यज्ञो विधिदृष्टो य इज्यते ॥**
**यष्टव्यमेवेति मनः समाधाय स सात्विकः ॥ ११ ॥**

आतां एया वरि । आहाराचिया परी ।
यज्ञु हिं अवधारिं । त्रिधा असे ॥ ६८ ॥
परि तिं माजि प्रथम । सात्विक यज्ञाचें वर्म ।
आइक पां सुवर्म । शिरोमणी ॥ ६९ ॥
तरि येकु प्रियोत्तमु । वांचुनु वाढों नेंदी कामु ।
जैसा कां मनोधर्मु । पतिव्रतेचा ॥ १७० ॥
ना सिंधुतें टाकुनि गंगा । पुढां न करी चि निगा ।
कां आत्मा देखौनि उगा । वेदु ठेला ॥ ७१ ॥
तैसें जें आपुला विहितिं । वेचौनियां चित्तवृत्ती ।
नुरती चि अहंकृती । फला लागि ॥ ७२ ॥
पांतलेयां झांडांचें मूळ । माघौतें सरों नेणिजे चि जळ ।
जिरालें चि कां केवळ । तेयाचां आंगीं ॥ ७३ ॥
तैसें देह मनें दोहीं । निश्चयाचां ठांइं ।
हारपौनि जें काहिं । इछीति ना ॥ ७४ ॥
तें हिं फलवांछात्यागीं । स्वधर्मु वांचौनि विरागीं ।
कीजे जो यज्ञु सर्वांगीं । अलंकृतु ॥ ७५ ॥
परि आरिसा आपणपें । डोळां जैं वेपे ।
कां तळहातिचेनि दीपें । रत्न पाहिजे ॥ ७६ ॥
नाना उदितें दिवाकरें । गमावा मार्गु दीठी भरें ।
तैसा वेदनिर्द्धारें । देखौनियां ॥ ७७ ॥

तियें कुंडमंडपवेदी । आणिक ही संभारसमृद्धी ।
ते मेळवणी जैसी विधी । आपण केली ॥ ७८ ॥
सकलअवयवउचितें । लेणिं पातलिं जैसीं आंगातें ।
तैसे पदार्थ जेथिचा तेथें । विनियोगुनि ॥ ७९ ॥
काइ वानूं बहुतिं बोलिं । जैसी सर्वाभरणीं भरली ।
यज्ञविद्या चि रूपा आली । यजनमीसें ॥ १८० ॥
ऐसा सांगोपांगु । निफजे जो यागु ।
नुरौनियां लागु । मंहत्वाचा ॥ ८१ ॥
प्रतिपालु तरि याचा । चौपाटी कीजे तुळसिचा ।
परि फळफूलछायेचा । आश्रयो नाहिं ॥ ८२ ॥
किंबहुना फळाशें विण । ऐसिया निगुतिया निर्माण ।
होये तो यज्ञु जाण । सात्विकु गा ॥ ८३ ॥

अभिसंधाय तु फलं दंभार्थमपि चैव यत् ॥
इज्यते भरतश्रेष्ठ तं यज्ञं विद्धि राजसम् ॥ १२ ॥

आतां यज्ञु कीर वीरेशा । करी या चि ऐसा ।
परि श्राद्धा लागि जैसा । आवंतिला राउ ॥ ८४ ॥
जें राजा जरि घरासि ए । तरि बहुतु उपेगु होये ।
आणि कीर्त्ति ही होए । श्रद्धा न ठके ॥ ८५ ॥
तैसा धरुनि आवांका । ह्मणे स्वर्गु जोडैल असिका ।
दीक्षितु होईन नीका । घडैल यागु ॥ ८६ ॥
ऐसी केवळ फळा लागि । महत्व फोकरावेया जगीं ।
पार्था निफज चि जे यागीं । राजस पैं ते ॥ ८७ ॥

विधिहीनमसृष्टान्नं मंत्रहीनमदक्षिणं ॥
श्रद्धाविरहितं यज्ञं तामसं परिचक्षते ॥ १३ ॥

आणि पशुपक्षीं विवाहीं । जोईस कामा परौता नाहिं ।
तैसा तामसा यज्ञा पाहिं । आग्रहो चि मूळ ॥ ८८ ॥

वारेया ऐसा अवाटु होये । कां मरणा मुहूर्त पाहे ।
कां निषिद्धासि न भिये । आगि जैसी ॥ ८९ ॥
तरि तामसांचिया आचारा । विधिचा आथि वोढा वारा ।
ह्मणौनि तो धनुर्द्धरा । उत्संकु खलु ॥ ९० ॥
नाहिं वेदाची चाडा । नैये मंत्रादिक तेया कडा ।
अन्न तें न सुटे तोंडा । मासियेचेया ॥ ९१ ॥
वैराचा बोधु ब्राह्मणां । तेथ कें रिघैल दक्षिणा ।
संतु जाला वाउधणा । वरिपडा जैसा ॥ ९२ ॥
तैसें वायां चि सर्व ही वेचे । मुख नेदखतां श्रद्धेचें ।
नागविलें निपुत्रिकाचें । जैसें घर ॥ ९३ ॥
ऐसा जो यज्ञभासु । जेया नावं यागु तामसु ।
आइकैं ह्मणे निवासु । श्रियेचा तो ॥ ९४ ॥

**देवद्विजगुरुप्राज्ञपूजनं शौचमार्जवं ॥**
**ब्रह्मचर्यमहिंसा च शारीरं तप उच्यते ॥ १४ ॥**

आतां गंगेचे एक पाणीं । परि नेलें आनानीं वर्णीं ।
एक मैली एक आणी । शुद्धत्व जैसें ॥ ९५ ॥
तैसें तिहिं गुणिं तप । तेथ जालें असे त्रिरूप ।
तें एक दे पाप । उद्धरी एक ॥ ९६ ॥
तरि तें चि तिहिं भेदीं । केसेनि पां ह्मणो सुबुद्धी ।
जाणों पाहांसि तरि आदीं । तप चि जाण ॥ ९७ ॥
एथ तप ह्मणिपे तें काइ । तें स्वरूप दाउं पाहीं ।
मग भेदिलें गुणिं तिहिं । तें पाठिं बोलों ॥ ९८ ॥
तरि तप जें कां समैक । तें हिं त्रिविध आइक ।
शारीर मानसीक । शाद्बीक गा ॥ ९९ ॥
आतां यां तिहिं माझारि । शारीर तवं अवधारिं ।
तरि शंभु कां श्रीहरी । पढियंतें होए ॥ २०० ॥

तेया प्रिया देवतालया । यात्रादिकें करावेया ।
आठ पाहारिं एयां पायां । उलिग घापे ॥ १ ॥
प्रांगण मिरवणियां । आंगोपचार पुरवणियां ।
करावेया ह्मणियां । शोभति हात ॥ २ ॥
लिंग कां प्रतिमा दीठी । देखत खेळे आंगयुष्टी ।
लुंठवीत काठी । पडिली जैसी ॥ ३ ॥
आणि विद्याविनयादिकिं । गुणिं जे वडिल लोकिं ।
तेयां ब्रह्मणांची नीकी । पाइकै कीजे ॥ ४ ॥
अथवा प्रवासें कां पीडां । सीणलें जें सांकडां ।
ते जीव सुरवाडा । आणिजति ॥ ५ ॥
सकलां तीर्थांचिये धूरे । जियें कां मातापितरें ।
तियें सेवे किर शरीरें । लोण कीजे ॥ ६ ॥
आणि संसारा ऐसा दारुणु । जो भेटलेयां हरे सीणु ।
तो ज्ञानदानें सकरुणु । भजिजे गुरु ॥ ७ ॥
आणि स्वधर्माचां आगिठां । देह जाड्याचिया कीटा ।
आवृत्तिपुटीं सुभटा । झाडि कीजे ॥ ८ ॥
देह भूतमात्रीं नमिजे । परोपकारिं व्यामिजे ।
स्त्रीविषिं नेमिजे । नावां नावां ॥ ९ ॥
जाततेन प्रसंगें । स्त्रीदेह सिवणें आंगें ।
तेथौनि देह आववें । अबोटी कीजे ॥ २१० ॥
भूतमात्राचेनि नावें । तृण हिं नासुडावें ।
किंवहुना सांडावे । छेदभेद ॥ ११ ॥
ऐसीसी जे शरीरीं । राहाटिची पडे उजिरी ।
तें शारीरतप घुमरी । आलें जाण ॥ १२ ॥
पार्था समस्त ही हें करणें । देहाचेनि प्रधानपणें ।
ह्मणौनि मीं एयातें ह्मणें । शारीर तप ॥ १३ ॥

**अनुद्वेगकरं वाक्यं सत्यं प्रियहितं च यत् ॥**
**स्वाध्यायाभ्यसनं चैव वाङ्मयं तप उच्यते ॥ १५ ॥**

येवं शारीर जे तप । तेयाचें दाविलें रूप ।
आतां आइक निष्पाप । वाङ्मय तें ॥ १४ ॥
तरि लोहें आंगतुंक । न तोडितां चि कनक ।
केलें जैसें देख । परिसें तेणें ॥ १५ ॥
तैसें न दुखवितें जें । जवळिलां सुख निफजे ।
ऐसें साधुत्व देखिजे । बोलणां जिये ॥ १६ ॥
पाणी मुदला झाडा जाए । तृण तें प्रसंगें जीहे ।
तैसें येकां बोलिलें होये । सर्वां हीं हित ॥ १७ ॥
जोडे अमृताची सुसरी । ते प्राणातें अमरां करी ।
स्नानें पापताप निवारी । गोडी ही दे ॥ १८ ॥
तैसा अविवेकु ही फीटे । आपुलें अनादित्व भेटे ।
परि आइकतां रुचि न विटे । पीयूषि जैसी ॥ १९ ॥
जारि कोण्हीं करी पूसणें । तरि ऐसें होआवें बोलणें ।
नातरि आवर्तणें । निगमाचलीं ॥ २२० ॥
ऋग्वेदादि तीन्हीं । प्रतिष्ठिजति वाग्भुवनीं ।
केली जैसी वदनीं । ब्रह्मशाला ॥ २१ ॥
नातरि येकाधें नावं । तें चि शैव कां वैष्णव ।
वाचे वसतें वाग्भव । तप जाणावें ॥ २२ ॥

**मनः प्रसादः सौम्यत्वं मौनमात्मविनिग्रहः ।**
**भावसंशुद्धिरित्येतत्तपो मानसमुच्यते ॥ १६ ॥**

आतां तप जे मानसीक । तें हीं सांघों आइक ।
ह्मणे लोकनायक— । नायकु तो ॥ २३ ॥
तरि सरोवर तरंगीं । सांडिलें आकाश मेघीं ।
कां चंदनाचें उरगीं । उद्यान जैसें ॥ २२४ ॥

नाना कलावैषम्यें चंद्रु । कां सांडिला आधी नरेंद्रु ।
नातरि क्षीरसमुद्रु । मंदराचलें ॥ २५ ॥
ऐसें नानाविकल्पजाल । सांडूनु गेलेयां सकळ ।
मन राहे केवळ । स्वरूपीं जें ॥ २६ ॥
तपनें विण प्रकाशु । जाड्यें विण रसु ।
पोकळी विण आकाश । होये जैसें ॥ २७ ॥
तैसी आपुली सोये देखे । आणि आपुलेया स्वभावा मूके ।
हींवली जैसी अंगिकें । हिंवों नेंदी ॥ २८ ॥
मग नवल तें कळंकें विण । शशिबिंब जैसें पार्वण ।
तैसें चोखिसि थारपण । मनाचें जें ॥ २९ ॥
बुडालें वैराग्याचें तप । जिराली मनाचीं धाप ।
तेथ कां होईल वाप । येरीं वृत्तीं ॥ २३० ॥
ह्मणोनि विचारावेया शास्त्र । राहाटवावें जें वक्त्र ।
तें वाचेचें हीं सूत्र । हातीं न धरी ॥ ३१ ॥
तें स्वभावें लोभलेपणें । मनपण हिं वरुं नेणें ।
सीतळें जैसें लवणें । आपुलें निज ॥ ३२ ॥
तेथ कें उठिति ते भाव । जिहिं इंद्रियमार्गि धांवं ।
घेउनि टाकावेया गावं । विषयांचें गा ॥ ३३ ॥
ह्मणोनि तिये मानसिं । भावशुद्धी चि असे आपैसी ।
रोमशुद्धि जैसी । तळहातासि ॥ ३४ ॥
काइ बहू बोलों अर्जुना । जैं हे दशा ये मना ।
तैं मनो तपाभिधाना । पात्र होए ॥ ३५ ॥
परि तें असो हें जाण । मानसतपाचें लक्षण ।
देवो ह्मणे संपूर्ण । सांवितलें ॥ ३६ ॥
एवं देहें वाचा चित्तें । जें पातलें त्रिविधत्वातें ।
तें साम्यतप तूतें । परिसविलें गा ॥ ३७ ॥

**श्रद्धया परया तप्तं तपस्तत्त्रिविधैर्नरैः ॥**
**अफलाकांक्षिभिर्युक्तैः सात्त्विकं परिचक्षते ॥ १७ ॥**

आतां गुणत्रयसंगें । हें चि विशेष त्रिविध्य रिगे ।
तें हीं आइक चांगें । प्रज्ञाबळें ॥ ३८ ॥
तरि हें चि तप पैं त्रिविध । जें दाविलें तुज विषद ।
तें चि करीं प्रसिद्ध । सांडूनि फळीं ॥ ३९ ॥
जें पुरतिया सत्वशुद्धी । आचरिजे आस्तिकबुद्धी ।
तेयातें चि गा प्रबुद्धीं । सात्विक ह्मणिपे ॥ २४० ॥
नां तपियेपणां लागि । दूजी त्राये जोडुनु जगीं ।
महत्वादिकिचां शृंगीं । बैसावेया ॥ ४१ ॥

**सत्कारमानपूजार्थं तपो दंभेन चैव यत् ॥**
**क्रियते तदिह प्रोक्तं राजसं चलमध्रुवम् ॥ १८ ॥**

त्रिभुवनिचेया सन्माना । न वचावेया ठाया आनां ।
धूरेचिया आसनां । भोजना लागी ॥ ४२ ॥
विश्विचेया स्तोत्रा । आपण होआवें पात्रां ।
विश्व आपुलिया यात्रा । करावेया ॥ ४३ ॥
लोकांचिया विविधा पूजा । आश्रयो धरावेया दूजा ।
भोग भोगावेया वोजा । महत्वाचिया ॥ ४४ ॥
आंगा वोळ माखुनु तपें । विकावेया आपणपें ।
अंगना हीन पडपें । जिया परीं ॥ ४५ ॥
हें असो धनमानीं आश । बांधौनि तपें कीजे सायास ।
तैं तें चि तप राजस । बोलिजे गा ॥ ४६ ॥
परि पहुरणीं जें दुहिले । तें गोरुं न दुभे वियालें ।
कां उभें सेत चारिलें । पीकावेया नुरे ॥ ४७ ॥
तसें फोंकारितां तप । कीजे जें साक्षेप ।
तें फळि तवं सोफ । निम्हां जाये ॥ ४८ ॥

ऐसें निष्फळ देखौनि करितां । माझारि सांडी पांडुसुता ।
ह्मणौनि नाहिं स्थिरता । तपा तेया ॥ ४९ ॥
यन्हवि तन्हि आकाशमांडिं । जो गाजौनि ब्रह्मांड फोडी ।
तो अकाळमेघु काइ घडी । राहांतु असे ॥ २५० ॥
तैसें राजस तप जें होए । तें फळीं किर वांझ जाये ।
परि आचरणीं हीं नोहे । निर्वाहो तेया ॥ ५१ ॥

**मूढग्राहेणात्मनो यत्पीडया क्रियते तपः ॥**
**परस्योत्सादनार्थं वा तत्तामसमुदाहृतम् ॥ १९ ॥**

आतां तें चि तप पुढुतीं । तामसैयेचिया रीती ।
तें परत्रा आणि कीर्त्ती । रुसौनि कीजे ॥ ५२ ॥
केवळ मूर्खपणाचा वारा । जीवीं घेउनि धनुर्द्धरा ।
नावं ठेविजे शरीरा । वैरियांचें ॥ ५३ ॥
पंचाग्निचिं हडगीं । खोळविजति शरीरा लागि ।
किं इंधन कीजे आगि । आंतुल चि ॥ ५४ ॥
नाना जाळिति गुगुळु । आंगीं आकिजति गळु ।
[illegible] दांविजति जाळु । आत्मघातें चि ॥ ५५ ॥
दवडौनि श्वसोश्वास । कीजति वायां चि उपवास ।
कां घेइजति धूमाचे घांस । अधोमुखें ॥ ५६ ॥
हिमोदकें आकंठें । खडकिळां सेविजति तटें ।
जितिया मासाचे चिमुटे । तोडिति जेथ ॥ ५७ ॥
ऐसे नाना परीं हे काया । घाये सूति धनंजया ।
तप कीजे नाशावेया । पुढिलांतें ॥ ५८ ॥
आंगभारें सूटला धोंडा । आपा नूकौनियां खांडा ।
वरिपडिलेयां रगडा । करी जैसा ॥ ५९ ॥
किंबहुना हे वोखटी । घेउनि क्लेशाची हातवटी ।
तप निफजे किरीटी । तामस होए ॥ २६० ॥

तेवि आपुलिया आटणियां । सुखें असतिया प्राणियां ।
जियाविया ही सिराणियां । करिति गा ॥ ६१ ॥
एवं सत्वादिकाचां आंगीं । पडिलें तपभागीं ।
जालें तें तुज चांगी । दाविलें व्यक्ती ॥ ६२ ॥

**दातव्यमिति यद्दानं दीयते नुपकारिणे ॥**
**देशे काले च पात्रे च तद्दानं सात्विकं स्मृतं ॥ २० ॥**

आतां बोलतां प्रसंगा । आलें ह्मणौनि पैं गा ।
करुं रूप दानलिंगा । त्रिविधा तेया ॥ ६३ ॥
तेथ गुणाचेनि बोलें । दान हिं त्रिविध असे जालें ।
तें चि आइक पहिलें । सात्विक ऐसें ॥ ६४ ॥
तरि स्वधर्मा आंतौतें । जें मीले आपणपेयांतें ।
तें देइजे बहुतें । संमानयोगें ॥
जालेयां सुबीजप्रसंगु । पडे क्षेत्रा वापेचा पांगु ।
तैसा चि दानाचा हा लागु । देखतसों ॥ ६६ ॥
अनर्घ्य रत्न हातु चढे । तैं भांगाराची वोढि पडे ।
दोन्हीं जालीं तरि न जोडे । लेतें आंग ॥ ६७ ॥
परि सणु सुहृदु संपति । यें तिन्हि येकें मिळति ।
जैं भाग्य धरी उन्नती । आपुलां विर्पि ॥ ६८ ॥
तैसें निफजवावेया दान । जैं सत्व सुये संवाहन ।
तैं देशु काळ भाजन । द्रव्य ही मिळे ॥ ६९ ॥
तन्हि आधिं तवं प्रयत्नेंसिं । होआवें कुरुक्षेत्र कां कासी ।
नातरि तूके जो इंहिंसिं । तो ही देशु हो ॥ २७० ॥
तेथ रवि–चंद्रा राहु–मेळु । होंता पाहावा पुण्यकाळु ।
कां तेया सारिखा निर्मळु । आणिकु ही हो ॥ ७१ ॥
तैसां काळिं तिये दिसिं । होआवी पात्रसंपति ऐसी ।
मूर्ति धरिली आहे जैसी । शुचित्वें चि कां ॥ ७२ ॥

आचाराचें मूळपीठ । वेदाची उत्तरवेंठ ।
तैसें द्विजरत्न चोखट । पाहुनियां ॥ ७३ ॥
मा तेयाचां ठांइं चिंता । निवर्तावी स्वसत्ता ।
परि प्रिया पुढें कांता । रिगे तैसेनि ॥ ७४ ॥
कां जेयाचें ठेविलें तेया । देउनि होइजे उतरायियां ।
नाना हडपें विडा राया । दीधला जैसा ॥ ७५ ॥
तैसेनि निष्कामें जीवें । भूत्यादिभावें ।
किंबहुना हांवे । नेदावें उठूं ॥ ७६ ॥
आणि दान जेया देयावें । तेयातें ऐसेयां पावें ।
जें घेतलेयां नुमचवे । काइसेन हीं ॥ ७७ ॥
सादु घातलेयां आकाशा । देंदी प्रतिशद्बु जैसा ।
कां पाहिला आरिसा । येरीकडे ॥ ७८ ॥
उदकाचिये भूमिके । आफळिलेन कुंदुकें ।
उफळौनि माघौतें । नैयेजे हाता ॥ ७९ ॥
नाना वसोवा घातला चारु । माथां तुरंबिला बूरु ।
न करी प्रत्योपकारु । जेया परी ॥ २८० ॥
तैसें दीधलें दान तेयाचें । जें कोण्ही आंगें नुमुचे ।
अर्पिलेयां श्लाघ्य तेयाचें । कीजे पैं गा ॥ ८१ ॥
ऐसिया सामग्रिया । दान निफजे वीरराया ।
तें सात्विक दानवरिया । सर्वां हि जाण ॥ ८२ ॥

यत्तु प्रत्युपकारार्थं फलमुद्दिश्य वा पुनः ॥
दीयते च परिक्लिष्टं तद्राजसमुदाहृतम् ॥ २१ ॥

आणि तो चि देशु काळु । घडे तैसा चि पात्रमेळु ।
दानभागु ही निर्मळु । न्यायगतु ॥ ८३ ॥
परि मनीं धरूनि दुभतें । चारीजे जेवि गाइतें ।
कां पेवं करुनि आइतें । पेरुं जाइजे ॥ ८४ ॥

नाना दीठि घाढूनि ऐहेरा । आवंतु जाइजे सोइरा ।
वाण धाडिजे घरा । वोउसेयाचेया ॥ ८५ ॥
पैं कलांतरा गांठि बांधिजे । मग पुढिलाचें काज कीजे ।
पूजा घेउनि रसु दीजे । पीडितासि ॥ ८६ ॥
तैसें जेया जें दान देणें । तो तेणें चि गा जीवणें ।
भुजावा भावें येणें । दीजे जें गा ॥ ८७ ॥
अथवा कोण्हीं एकु वाटे जांता । घेतलें उमचों न सकतां ।
मीळे जारि पांडुसुता । द्विजोत्तमु ॥ ८८ ॥
तरि कवडेया एका साठिं । अशेष गोत्राचें किरीटी ।
सर्व प्रायश्चित्त सुवे मुठी । तेयाचिये ॥ ८९ ॥
तेवि चि पारलौकिकें । फळें वांछिजति अनेकें ।
नांदिजे तें भूकें । एक ही नोहे ॥ २९० ॥
तें हिं ब्राह्मण नेवों सरे । शेर्शीं हाणिचेनि सीणे झांमुरे ।
सर्वस्व जैसें चोरें । नागवुनि नेलें ॥ ९१ ॥
काय बहु सांगों सुमती । जें दीजे का नवोकी ।
तें दान गा त्रिजगती । राजस पैं ॥ ९२ ॥

**अदेशकाले यद्दानमपात्रेभ्यश्च दीयते ॥**
**असत्कृतमवज्ञातं तत्तामसमुदाहृतम् ॥ २२ ॥**

मग म्लेंछांचें वसैठे । दांगाणें हान कैकटें ।
कां सिहवीरें चौव्हटे । नगरिचें तें ॥ ९३ ॥
तिहीं तिहिं ठाइं मीळनीं । समो सांजवेळ कां रजनी ।
तेव्हळिं उदारां होणें धेनीं । चोरियेचां ॥ ९४ ॥
पात्रें भाट नागारी । सामान्या स्त्रिया जुवारी ।
जियें मूर्त्तिवंतें भुररीं । भूलवेया ॥ ९५ ॥
रूपनृत्याची पुरवणी । तेयां पुढें डोळेभारणीं ।
गीत भाटीवं श्रवणीं । कर्णजपु ॥ ९६ ॥

तेया ही वरि अलुमालु । घे फूलागंधाचा परिमलु ।
तवं भ्रमांचा तो वेतालु । अवतरे चि ॥ ९७ ॥
येयां ऐसेन जें जें देणें । तें तामस दान मीं ह्मणें ।
आणि घडे दैंवगुणें । आणिक ही एक ॥ ९८ ॥
विपायें धुणाक्षर उमडे । टालिये काउला सांपडे ।
तैसें तामसा पर्व पडे । पुण्यदेशीं ॥ ९९ ॥
तेथ देखौनि तो आथिला । योग्यु मार्गों हीं आला ।
तो ही द्रव्या चाडेला । भाले जरि ॥ ३०० ॥
तरि श्रद्धा न करी जीवीं । तेया माथा न खलवी ।
स्वयं न करी ना करवी । अर्घ्यादीक ॥ १ ॥
आलेयां न घली बैसों । तेथ गंधाक्षतांचा अतिसो ।
हा प्रसंगु किर असो । तामसिये नरीं ॥ २ ॥
पैं बोलाविजे रिणायितु । तैसा झांकवी तेयाचा हातु ।
तूंकरणेयांचा बहुतु । प्रयोगु तेथ ॥ ३ ॥
आणि जेया जें दे किरीटी । तेयातें उमाणीं तेया साठिं ।
मग कुबोलें कां लोटी । अवज्ञेचां ॥ ४ ॥
हें असो इया परीं । मोल वेचणें जें अवधारीं ।
तेया नावं चराचरीं । तामस दान ॥ ५ ॥
एथ मिं जाणतसें । विपायें तूं गा ऐसें ।
न कल्पीसि मानसें । विचक्षणां ॥ ६ ॥
ऐसिं आपुलालां चिन्हीं । अलंकृतें तीन्हीं ।
दानें दाविलिं अवधानिं । राजतनया ॥ ७ ॥
जें भवबंधमोचक । एकलें कर्म सात्विक ।
तरि कां वेखासें सदोष । येर बोलों ॥ ८ ॥
परि नुसंतितां विवसी । भेटि नाहिं निविसि ।
कां धूं न सांतां जैसी । वाति न लगे ॥ ९ ॥

तैसें सुधा सत्वा आड । आहे रजतमाचें कवाड ।
त्रिभुवनीं तें कीड । ह्मणावें गा ॥ ३१० ॥
आह्मी श्रद्धादिदानांत । जें समस्त ही क्रियाजात ।
सांघितलें गा व्यक्त । तिहिं गुणीं ॥ ११ ॥
तेथ भरवसेन तीन्हीं । न संघों चि ऐसें मानीं ।
सत्व दावावेया दोन्हीं । बोलिलों येरें ॥ १२ ॥
जें दोहिं माजि तीजें असे । तें दोन्हि सांडितां चि दीसे ।
अहोरात्रत्यागें जैसें । संध्यारूप ॥ १३ ॥
तैसें रजतमविनाशें । तीजें जैं उरत दीसे ।
तें सत्व हें आपैसें । फावासि ये ॥ १४ ॥
एवं दावावेया सत्व तुज । निरोपिलें तमरज ।
तें सांडूनि सत्वें काज । साधीं आपुलें ॥ १५ ॥
सत्वें चि येणें चोखाळें । करिं यज्ञादिकें सकळें ।
पावसी तें करतळें । आपुलें निज ॥ १६ ॥
सूर्यें दाखविलें सांतें । काइ एक न दिसे एथें ।
तेवि सत्वें केलें फळातें । काइ नेंदी ॥ १७ ॥

ॐतत्सदितिनिर्देशो ब्रह्मणस्त्रिविधः स्मृतः ॥
ब्राह्मणास्तेन वेदाश्च यज्ञाश्च विहिताः पुरा ॥ २३ ॥

हें किर आवडतां विषिं । रीति सत्वीं आथि नीकी ।
परि मोक्षेंसीं एकीं । आथि मिळणें ॥ १८ ॥
तें येक अगाध चि आहे । तेयाचा सावाऊ जैं लाहे ।
तें मोक्षाचां ही होये । गावीं सरतां ॥ १९ ॥
पैं भांगार जऱ्हीं पऱ्हरें । तऱ्हीं राजवळिंचि आखरें ।
लाहे तैं सरे । जिया परीं ॥ ३२० ॥
स्वछें शीतळें सुगंधें । जळें होंति सुखपदें ।
परि पवित्र तें संबंधें । तीर्थाचेनि ॥ २१ ॥

न यों कां भलेतैसी थोरी । परि गंगा जैसी तैसी तिये सागरीं ।
विश्वातें उद्धरी । दर्शनमात्रें ॥ २२ ॥
तैसें सात्विका कर्मा किरीटी । यंतां मोक्षाचिये भेटी ।
न पडे आडकाठी । त्रिशुद्धी गा ॥ २३ ॥
हा बोलु आयिकत खेवीं । अर्जुना आधी न माये जीविं ।
ह्मणे देवें कृपा करावी । सांघावें तें ॥ २४ ॥
तेथ कृपालु चक्रवर्ती । ह्मणे आयिक तेयाची व्यक्ति ।
जे सात्विक शुक्ति । रत्नीं पघले ॥ २५ ॥
तरि अनादि परब्रह्म । जें जगदादिकंदाचें धाम ।
तेयाचें एक नाम । त्रिधा पैं असे ॥ २६ ॥
तें किर अनाम अजाति । परि अविद्यागर्वाचिये राती ।
माजि वोलखावेया श्रुती । खुण केली ॥ २७ ॥
कटले संसारसीणें । जें देवों एंति गान्हाणें ।
तेयां वो दे नामें जेणें । तो संकेतु हा ॥ २८ ॥
ब्रह्माचा अबोला फीटावा । अद्वैतु द्वैतत्वें भेटावा ।
ऐसा मंत्र देखिला कणवा । वेदें बापें ॥ २९ ॥
मग दाविलेनि जेणें एकें । ब्रह्म आलविलें कवतिकें ।
मागां असतां ठाकें । पुढां उभें ॥ ३३० ॥
परि निगमाचलशिखरीं । उपनिषदार्थनगरीं ।
आहाति ब्रह्माचां जे एकहारीं । तेयांसी चि ॥ ३१ ॥
हें इं असो प्रजापति । शक्ति जे सृष्टि करिति ।
तें जेया एका आवृत्ती । नावांचिया ॥ ३२ ॥
पैं सृष्टिचेया उपक्रमा । पूर्वी गा धीरोत्तमा ।
वेडा ऐसा ब्रह्मा । एकला होंता ॥ ३३ ॥
मग ईश्वरातें नेदखे । ना सृष्टि करुं न शके ।
तो एकु थोरु केला एकें । नावें जेणें ॥ ३४ ॥

जेयाचा अर्थु जीविं ध्यातां । जें वर्णत्रय जपतां ।
विश्वसृजना योग्यता । आली तेया ॥ ३५ ॥
तेधवां रचिले ब्रह्मजन । तेयां वेद दीधले सासान ।
यज्ञा ऐसें वर्त्तन । जीवें केलें ॥ ३६ ॥
पाठिं नेणों केती एर । मीनले लोक अपार ।
जालें ब्रह्मदत्त अग्रार । त्रिभुवन ॥ ३३७ ॥
ऐसें नाममात्रें जेणें । धात्रेया अढंच करणें ।
तेयाचें रूप आयिक ह्मणे । श्रीकांतु तो ॥ ३८ ॥
तरि सर्व मंत्रांचा राजा । तो प्रणउ आदिवर्णु बुझा ।
तत्कारु दूजा । तीजा सत्कारु ॥ ३९ ॥
एवं ॐतत्सदाकार । ब्रह्मनाम तें त्रिप्रकार ।
हें फूल तुरंबी सुंदर । उपनिषदार्ते ॥ ३४० ॥
येणेंसिं होउनि येक । जैं निर्वाललें कर्म सात्विक ।
तैं कैवल्यातें पाइक । घरिचें करी ॥ ४१ ॥
यन्हविं कापुराचें थलिवं । आणुनि दइजैल दैवं ।
घेॐ जाणणें चि अडवं । तेथ असे बाण ॥ ४२ ॥
तैसें आदरिजैल सत्कर्म । उच्चरिजैल हिं ब्रह्म नाम ।
परि नेणिजे जरि वर्म । विनियोगाचें ॥ ४३ ॥
तरि महंतांचिया कोडी । घरा आणिलेयां हिं वोढि ।
मानु नेणती परिवडी । मुद्दल तूटे ॥ ४४ ॥
कां लेयावेया चोखट । टीक भांगार एकवट ।
घाल्लनु बांधली मोट । गलां जेवि ॥ ४५ ॥
तैसें तोंडिं ब्रह्मनाम । हातिं तें सात्विक कर्म ।
विनियोगें विण काम । निष्फल होए ॥ ४६ ॥
आगा अन्न आणि भूख । पासिं असे परि देख ।
जेउं नेणतां बालक । लंवे चि तें ॥ ४७ ॥

कीं स्नेहा सूत्रा वैश्वानरा । जालेयां जन्हीं सवंसारा ।
हातवटी नेणतां वीरा । प्रकाशु नोहे ॥ ४८ ॥
तैसें वेळे कृत्य पावे । तेथिचा मंत्रु ही आठवे ।
परि वेर्थ तें आघवें । विनियोगें विण ॥ ४९ ॥
ह्मणौनि वर्णत्रयात्मक । जें हें ब्रह्मनाम एक ।
विनियोगु तूं आयिक । येयाचा आतां ॥ ३५० ॥

**तस्मादोमित्युदाहृत्य यज्ञदानतपःक्रियाः ॥**
**प्रवर्त्तंते विधानोक्ताः सततं ब्रह्मवादिनां ॥ २४ ॥**

तरि नामिं चि आखरें तीन्हीं । कर्मा आदि मध्यें निदानीं ।
प्रयुंजावि पैं स्थानीं । इहिं तीन्हीं ॥ ५१ ॥
हे चि एकी हातवटी । घडिली लोकिं किरीटी ।
आले ब्रह्मविद भेटी । ब्रह्माचिये ॥ ५२ ॥
ब्रह्मासि होआवेया येकिं । ते वेंचति यज्ञादिकिं ।
जे चावळले वोळखी । शास्त्रांचिया ॥ ५३ ॥
तें आदि तवं ॐकारु । ध्यानें करिति गोचरु ।
पाठिं आणिति उच्चरु । वाचे ही तो ॥ ५४ ॥
तेणें ध्यानें प्रकटें । प्रणवोच्चारें स्पष्टें ।
लागति मग वाटे । क्रियांचिये ॥ ५५ ॥
आंधारिं अभंगु दिवा । अडविं समर्थु बोळावा ।
तैसा प्रणवु जाणावा । कर्मारंभीं ॥ ५६ ॥
उचितदेवउद्देशें । सुद्रव्यें धर्म्यें बहुवसें ।
द्विजद्वारा हवन हुताशें । त्याजिति पैं ते ॥ ५७ ॥
आहवनीयआदि वन्ही । निक्षेपरूपहवनिं ।
वेचिति पैं निधानीं । फुडे होउनि ॥ ५८ ॥
किंवहुना नाना याग । निष्पत्तिचें घेउनि आंग ।
करिति नावडतेयां त्याग । उपाधिचे ॥ ५९ ॥

कां न्यायें जोडला पवित्रिं । भूमादिकिं स्वतंत्रीं ।
देशकाळशुद्धपात्रिं । देंति दानें ॥ ६० ॥
अथवा एकांतरा कृच्छ्रीं । चांद्रायणें मासोपवासिं ।
शोखुनु गा धातुराशी । करीति तपें ॥ ६१ ॥
येवं यज्ञदानतपें । जियें गाजंति बंधरूपें ।
तें तें चि होये सोहपें । मोक्षाचें तेयां ॥ ६२ ॥
स्थळिं नावा जिया दाटिजे । जळिं तिया चि जेविं तरिजे ।
तेवि बंधकिं कर्मीं सूटिजे । नावें येणें ॥ ६३ ॥
परि हें असो ऐसिया । यज्ञदानादिक्रिया ।
ॐकारें सावाइलिया । प्रवर्त्तती ॥ ६४ ॥

**तदित्यनभिसंधाय फलं यज्ञतपःक्रियाः ॥**
**दानक्रियाश्च विविधाः क्रियंते मोक्षकांक्षिभिः ॥ २५ ॥**

तिया मोटकिया जेथ फळिं । रिगों पांति जिये काळिं ।
प्रयुंजीति तिये काळीं । तत्छब्दु हा ॥ ६५ ॥
जें सर्व ही जगा परौतें । जें एक सर्व ही देखतें ।
जें तत्छब्दें बोलिजे तें । पैल वस्तु ॥ ६६ ॥
तें सर्वादिकत्वें चित्तीं । तद्रूप ध्याउनि सुमती ।
उच्चारें हिं व्यक्ती । आणीति पुडुतीं ॥ ६७ ॥
ह्मणति तद्रूप ब्रह्म तिया । फळिं येंति क्रिया ।
होंतु आह्मां भोगावेया । कांहिं चि नुरो ॥ ६८ ॥
ऐसें तदात्मक ब्रह्म । तेथ उगाणूनु कर्म ।
आंग झाडीति न मम । एणें बोलें ॥ ६९ ॥
आतां ॐकारें आदारिलें । तत्कारें समर्पिलें ।
इया रीतिं जेया आलें । ब्रह्मत्व कर्मीं ॥ ३७० ॥
तें कर्म किर ब्रह्माकारें । जालें तेणें हिं ?सरे ।
जें करितेनासि दुसरें । आहे ह्मणौनि ॥ ७१ ॥

मीठ आंगें जळिं विरे । परि क्षारता वेगळी उरे ।
तैसें कर्म ब्रह्माकारें । जाण तें द्वैत ॥ ७२ ॥
आणि दुजें जवं घडे । तवं संसारभय जोडे ।
हें देऊ आपुलेन तोंडें । बोलति वेदें ॥ ७३ ॥
ह्मणौनि परतत्वें ब्रह्म असे । तें आत्मत्वें परिवसे ।
सच्छब्दु रिणा दोसें । ठेविला देवें ॥ ७४ ॥
तरि ॐकारु तत्कारीं । जें जालें ब्रह्मकर्म शरीरीं ।
जें प्रशस्तादि बोल वरी । वाखाणिले ॥ ७५ ॥

**सद्भावे साधुभावे च सदित्येतत्प्रयुज्यते ॥**
**प्रशस्ते कर्मणि तथा सच्छब्दः पार्थ युज्यते ॥ २६ ॥**

प्रशस्ते कर्मिं तिये । सच्छब्दु विनियोगु आहे ।
तो चि आइकां होये । तैसा सांघों ॥ ७६ ॥
तरि सच्छब्दें एणें । आटूनि असंताचें नाणें ।
दाविजे अव्यंगवाणें । सत्तेचें रूप ॥ ७७ ॥
जें सत्तेचें काळें देशें । हों नेणे चि अनारिसें ।
आपणपां आपण असे । अखंडीत ॥ ७८ ॥
हें दीसत जेतुलें आहे । तें असंतपणें जें नोहे ।
देखतां रूपिं सोये । लाभे जेयाची ॥ ७९ ॥
तेणेंसिं प्रशस्त तें कर्म । जें जालें सर्वात्मक ब्रह्म ।
देखिजे करुनि सम । ऐक्यबोधें ॥ ८० ॥
तेथ ॐकारु तत्कारें । जें कर्म दाविलें ब्रह्माकारें ।
तें गीळुनु होइजे एकसरें । चिन्मात्र चि ॥ ८१ ॥
ऐसा हा अंतरंगु । सच्छब्दाचा विनियोगु ।
जाण ह्मणे श्रीरंगु । मी न ह्मणें हो ॥ ८२ ॥
ना मी चि जरि ह्मणें । तरि श्रीरंगें दूजें हें उणें ।
ह्मणौनि हें बोलणें । देवाचें चि ॥ ८३ ॥

**यज्ञे तपसि दाने च स्थितिः सदिति चोच्यते ॥**
**कर्म चैव तदर्थीयं सदित्येवाभिधीयते ॥ २७ ॥**

आतां आणिकी ही परी । सच्छब्दु हा अवधारीं ।
सात्विका कर्मा करी । उपकारु जो ॥ ८४ ॥
तरि संतें चि कर्में चांगें । चालिलिं अधिकारबगें ।
परि एकाधेनि अंगें । हीणावति जैं ॥ ८५ ॥
तैं उणें एक अवेवें । शरीर ठाके आघवें ।
कां अनेग हान भावे । राभस्याची गती ॥ ८६ ॥
तैसें एकें चि गुणें विण । संत चि परि असंतपण ।
कर्म करि गा जाण । जिये वेळे ॥ ८७ ॥
तेधवां ॐकारु तत्कारीं । सावायिला चांगी परी ।
सच्छब्द कर्मा करी । जीर्णोद्धारु ॥ ८८ ॥
तें असंतपण फेडी । आणि सद्भावाचिये रूढी ।
निज सत्वाचिया प्रौढी । सच्छब्दु हा ॥ ८९ ॥
वोषध जैसें रोगिया । कां सावाॐ ये भंगलेया ।
सच्छब्दु कर्मा वेंगलेयां । तैसा जाण ॥ ३९० ॥
अथवा काहिं प्रमादें । कर्म आपुलिये मर्यादे ।
चूकौनि पडे निषिद्धें । वाटे हान ॥ ९१ ॥
चालतेया मार्गु सांडे । पारखियासि अखेरें पडे ।
राहाटी माजि न घडे । काइ काइ ॥ ९२ ॥
ह्मणौनि तैसी कर्मा । राभस्यें सांडे सीमा ।
असाधुत्वाचेया दुर्नामा । येत्रों पाहे जैं ॥ ९३ ॥
तेथ हा गा सच्छब्दु । येरिं दो प्रबुद्धु ।
प्रयुंजिला करी साधु । कर्मातें तेया ॥ ९४ ॥
लोहापरिसाची घृष्टि । वोहळागंगेची भेटि ।
मृत्या जैसी वृष्टि । पीयुषाची ॥ ९५ ॥

पैं असाधु कर्मी तैसा । सद्भु वीरेषा ।
हें असो गौरवु चि ऐसा । नामाचा येया ॥ ९६ ॥
घेउनि येथिचें वर्म । जैं विचारीसि हें नाम ।
तें केवळ हें चि ब्रह्म । जाणसी तूं ॥ ९७ ॥
पाहे पां ॐतत्सत् ऐसें । हें बोलणें तेथ नेत असे ।
जेथौनि कां प्रकाशे । दृश्यजात ॥ ९८ ॥
तें तवं निर्विशिष्ट । परब्रह्म चोखट ।
तेयाचें हें आंतुवट । व्यंजक नाम ॥ ९९ ॥
परि तो आश्रयो आकाशा । आकाश चि कां जैसा ।
येया नामा नामियां तैसा । अभेदु असे ॥ ४०० ॥
उदैला आकाशीं । रवी चि रवीतें प्रकाशी ।
हे नामव्यक्ति तैसी । ब्रह्मा करी ॥ १ ॥
ह्मणौनि त्र्यक्षर हें नाम । नव्हे जाणं केवळ ब्रह्म ।
या ही लागि कर्म । जें जें कीजे ॥ २ ॥
ते याग अथवा दानें । तपादिकें हिं गहनें ।
तियें निफजति कां न्यूनें । होउनि ठांतु ॥ ३ ॥
परिसाचां वोरकलीं । नाहिं चोखाकीडाची बोली ।
तैसिं ब्रह्मिं अर्पितां केलीं । ब्रह्म चि होति ॥ ४ ॥
उणेयापुरेयाचिया परी । नुरती चि तेथ अवधारिं ।
निवडूं न यंति सागरीं । जैसिया नदी ॥ ५ ॥
एवं पार्था तुज प्रति । ब्रह्मनामाची हे शक्ति ।
सांवितली उपपत्ती । डोलसा गा ॥ ६ ॥
आणि एका एका ही आखरा । वेगळवेगला वीरा ।
विनियोगु नागरा । बोलिलों रीती ॥ ७ ॥
आतां एवं सुमहिम । ह्मणौनि हें ब्रह्मनाम ।
जाणितलें किं सुवर्म । राया तुवां ॥ ८ ॥

तरि येथौनि याची श्रद्धा । उपलविली हो सर्वदा ।
जेयाचें जालें बंधा । उरों नेंदी ॥ ९ ॥
जिये कर्मि हा प्रयोगु । अनुष्ठिजे सविनियोगु ।
तेथ अनुष्ठिला होये सांगु । वेदु चि तो ॥ ४१० ॥

**अश्रद्धया हुतं दत्तं तपस्तप्तं कृतं च यत् ॥**
**असदित्युच्यते पार्थ न च तत्प्रेत्य नो इह ॥ २८ ॥**

सांडूनि हे सोए । मोडूनि श्रद्धेची बाहे ।
दुराग्रहाची चि त्राये । वाढउनियां ॥ ११ ॥
मग अश्वमेधां कोडी कीजे । रत्ना भरूनि पृथिवी दीजे ।
एकांगुष्ठि हीं तपिजे । तपसहस्त्रीं ॥ १२ ॥
जलाशयाचेन नावें । समुद्र ही कीजतु नवे ।
परि किंबहुना आघवे । वृथा चि तें ॥ १३ ॥
पाषाणा वरि वर्षलें । जैसें भस्मीं हवन केलें ।
कां खेवं दीधलें । साउलिये ॥ १४ ॥
नातरि जैसें चडकणां । गगन हाणितलें अर्जुना ।
तैसा सामारंभु सुना । गेला चि तो ॥ १५ ॥
घाणा गालिले खडे । तेल ना पेंडि जोडे ।
तैसें दलिद्र तेवडें । ठेलें चि आंगि ॥ १६ ॥
गांठि बांधली खापरी । एथ अथवा पैली तीरीं ।
न सरौनि जैसी मारी । उपवासिं गा ॥ १७ ॥
तैसें कर्मजातें तेणें । नाहिं इहिकिचें भोगणें ।
तेथ परत्र कें कवणें । आक्षेपावें ॥ १८ ॥
ह्मणौनि ब्रह्मनामश्रद्धा । सांडूनि कीजे तो धांधा ।
हें असो सीनु नसुदा । दृष्टादृष्टीं ॥ १९ ॥
ऐसें कलुषकरींकेसरी । त्रितापतिमिरतमोरी ।
श्रीवीरवरनरहरी । बोलिलें तेणें ॥ ४२० ॥

तेथ निजानंद—बहुवसा । माजि अर्जुनु तो सहसा ।
हारतला चंद्रु जैसा । चांदिणेन ॥ २१ ॥
आहो संग्रामु हा वाणियां । मापें नाराजांचिया अणियां ।
सूनि मांस वे मवणियां । जीवितेंसि ॥ २२ ॥
ऐसेयांचां हिं घरिं कर्कसें । भोगिजत स्वानंदराज्य कैसें ।
आजि भाग्यउदो ह्मा असे । आनी ठांइं ॥ २३ ॥
संजयो ह्मणे कौरवराया । गुणा रिझों ये रिपुचेया ।
आणि गुरु ही हा आमचेया । सुखाचा स्वामि ॥ २४ ॥
हा न पुसता हे गोठि । तरि देवो सोडिते कां गांठि ।
तरि कैसेनि आह्मां भेटि । परमार्थेंसिं ॥ २५ ॥
होंतों अज्ञानाचा आंधारां । वोसंतीत जन्म वारा ।
तें अत्मप्रकाशमंदिरा । आंतु आणिलों ॥ २६ ॥
येवडा आह्मां तुह्मां थोरु । केला एणें उपकारु ।
ह्मणौनि हा व्याससहोदरु । गुरुत्वें होए ॥ २७ ॥
तेविं चि संजयो ह्मणे चित्तीं । हा अतिसो या नृपतीं ।
खुपैल ह्मणौनि केती । बोलों असो ॥ २८ ॥
ऐसी बोली सांडिली । मग येरीची गोठि आदारिली ।
जे पार्थे कां पूसिली । श्रीकृष्णातें ॥ २९ ॥
तें चि जैसें जाणणें । तैसें मीं हीं करीन बोलणें ।
आइकिजो ज्ञानदेऊ ह्मणे । निवृत्तिचा ॥ ४३० ॥

ॐ तत्सदिति श्रीमद्भगवद्गीतासूपनिषत्सु ब्रह्मविद्यायां योगशास्त्रे श्रीकृष्णार्जुनसंवादे **श्रद्धात्रयविभागयोगो** नाम सप्तदशोध्यायः ।

# ज्ञानेश्वरी

## अध्याय अठरावा

श्रीगणेशायनमः ॥

जय जय देव निर्मला । निजजनाखिलमंगला ।
जन्मजराजलदजाला । प्रभंजना ॥ १ ॥
जय जय देव प्रबला । विदलितामंगलकुला ।
निगमागमद्रुमफला । फलप्रदा ॥ २ ॥
जय जय देव सकला । विगतविषयवत्सला ।
कलितकालकौतूहला । कलातीता ॥ ३ ॥
जय जय देव निश्चला । चलचित्तपानतुंडिला ।
जगदुन्मीलनाविरला । केलिप्रिया ॥ ४ ॥
जय जय देव निष्कला । स्फुरदमंदानंदबहुला ।
निरस्ताखिलामंगला । मूलभूता ॥ ५ ॥
जय जय देव स्वप्रभ । जगदंबुदगर्भनभ ।
भवनोद्भवारंभस्तंभ । भवध्वंस ॥ ६ ॥
जय जय देव शुद्ध । विदुदयोद्यानद्विरद ।
शमदममदनमदभेद । दयार्णव ॥ ७ ॥
जय जय देवैकरूप । अतिकृतकंदर्पसर्पदर्प ।
भक्तभावभुवनदीप । तापापह ॥ ८ ॥

जय जय देव अद्वितीय । परिणतोपरमैकप्रिय ।
निजजयजितभजनीय । मायागम्य ॥ ९ ॥
जय जय देव श्रीगुरो । अकल्पनाप्यकल्पतरो ।
स्वसंविद्रुमबीजप्ररो—। हणावनी ॥ १० ॥
हें एकैक ऐसें । नाना परिं भाषावसें ।
स्तोत्र करुनि तुज दोसें । निर्विशेषा ॥ ११ ॥
जिहिं विशेषणीं विशेषिजे । तें दृश्य नव्हे रूप तूझें ।
हें जाणें ह्मणौनि मी लाजें । वानणां इहीं ॥ १२ ॥
परि मर्यादेचा सागरु । हा तवं तेया डगरु ।
जवं नेदखे सुधाकरु । उदया आला ॥ १३ ॥
सोमकांतु निज निर्झरीं । चंद्रा अर्घ्यादीक न करी ।
तें तो चि अवधारीं । करवी कीं जी ॥ १४ ॥
नेणों कैसें वसंतसंगें । अवचितिं झाडांचि आंगें ।
फूटति तें तेया ही जोगें । धरणें नोहे ॥ १५ ॥
पद्मिनी रविकिरण । लाहे मग लाजे कवण ।
कां जळें सीतळें लवण । आंग भूले ॥ १६ ॥
तैसा तूतें मीं जेथ स्मरें । तेथ मालातिलें जें विसरें ।
मग जाकलिला ढेंकरें । तृप्तु जैसा ॥ १७ ॥
मज तुवां जी केलें तैसें । माझें मीपण दवडूनि देशें ।
स्तुतिमीसें पांचपीसें । बांधाळिं वाचे ॥ १८ ॥
ना यऱ्हविं तऱ्हि आठवीं । राहुनि स्तुति जैं करावी ।
तैं गुणां गुणियां धरावी । सरोभरी ॥ १९ ॥
तरि एकरसाचें जी तूं लिंग । केवि करुं गुणागुणिं भाग ।
मोति फोडुनु सांवितां चांग । कि तैसें चि भलें ॥ २० ॥
जी जालेनि पाइकें आलें । तें गोसांविपण केवि बोलें ।
ऐसा उपावि उसिटिलें । काइ वानूं ॥ २१ ॥

आणि बापु तूं माए । इहिं बोलिं ना स्तुति होये ।
तरि डिंभोपाधिकु आहे । विडाल्दु तेथ ॥ २२ ॥
तरि आत्मा तूं यकसरा । हें ह्मणों जांतां दातारा ।
आंतौनि बाहिरां । घापतासि ॥ २३ ॥
ह्मणौनि साच तुज लागि । स्तुति नेदखें जगीं ।
मौन वांचौनि लेणें आंगिं । सूंसि नामा ॥ २४ ॥
स्तुति काहिं न बोलणें । पूजा काहिं न करणें ।
संनिधि केहीं न होणें । तूझां ठांइं ॥ २५ ॥
तऱ्हीं जींतलें जैसें भूली । पिसे आलव घाली ।
तैसें वानूं तें माउली । उपसाहे तूं ॥ २६ ॥
आतां गीतार्थाची मुदी । लावीं माझिये वाग्रिद्धी ।
जियां माने सभासदिं । सज्जनांसि ॥ २७ ॥
तवं ह्मणितलें श्रीनिवृत्ती । नको हें पुडुतीं पुडुतीं ।
परिसिं लोहघृष्टी केती । वेळा कीजे गा ॥ २८ ॥
तवं विनवीतु ज्ञानदेउ । ह्मणे हो कां जी पसावो ।
तरि अवधान देंतु देउ । ग्रंथा आतां २९ ॥
जी गीतारत्नप्रासादाचा । कल्शु अर्थाचिंतामणिचा ।
सर्वगीतादर्शनाचा । पाढावो जो ॥ ३० ॥
लोकिं तऱ्हीं आथि ऐसें । जें दूरौनि कल्शु दीसे ।
भेटी चि हातवसे । देवतेचिये ॥ ३१ ॥
तैसें चि एथ आहे । जें एकें चि एणें अध्यायें ।
आघवा चि दृष्टु होए । गीतागमु हा ॥ ३२ ॥
मी कल्शु या कारणें । अठरावां अध्याउ ह्मणें ।
वाइला बादरायणें । गीताप्रसादासि ॥ ३३ ॥
नाहिं कल्शा परौतें काहिं । प्रासादिं काम नाहिं ।
ते सांघतसे गीता ही । संपलेपणें ॥ ३४ ॥

व्यासु साहाजें सूत्रीं बळी । तेणें निगमरत्नाचळें ।
उपनिषदाची माळी । माजि खांडिली ॥ ३५ ॥
तेथ त्रिवर्गाचा अणुआरु । आड निगाला जो अपारु ।
तें महाभारतप्राकारु । भवंता केला ॥ ३६ ॥
माजि आत्मज्ञानाचें एकवट । दळवाडें झाडूनु चोखट ।
घडिलें पार्थवैकुंठ– । संवादकुसरी ॥ ३७ ॥
निवृत्तिसूत्रसोडवणियां । सर्वशास्त्रपुरवणियां ।
आवो सांधिला मांडणियां । मोक्षरेखेचा ॥ ३८ ॥
ऐसेन करितां उभारा । पन्हरा अध्याय ते पन्हरा ।
भूमि निर्वाळलेया पुरा । प्रासादु जाला ॥ ३९ ॥
उपरि सोळावां अध्याउ । तो ग्रीवेघंटेचा आउ ।
सप्तदशु तो ठाउ । पडिघाणिये ॥ ४० ॥
तेया ही वरि अष्टादशु । तो आपैसेया मांडला कळशु ।
उपरि गीतादिकिं व्यासु । ध्वजे लागला ॥ ४१ ॥
ह्मणौनि मागील अध्याये । जे चढतेयां भूमीचे आये ।
तेयांचें पुरें दावितु आहे । आपुलां आंगीं ॥ ४२ ॥
जालेया कामा नाहिं चोरी । ते कळशें होये उजिरी ।
तेवि अष्टादशु विवरीं । साद्यंत गीता ॥ ४३ ॥
ऐसा व्यासें विंदाणियें । गीताप्रासादु सोडवणियें ।
आणूनि रक्षिले प्राणिये । नाना परीं ॥ ४४ ॥
एक प्रदक्षिणा जपाचिया । बाहिरौनि करिति एया ।
एक श्रवणमीसें छाया । सेविति येयाची ॥ ४५ ॥
एक अवधानाचा पुरा । विडा पाउड भितरां ।
देउनि रिगति गाभारां । अर्थज्ञानाचां ॥ ४६ ॥
ते निजबोधें उराउरी । भेटति आत्मेयां श्रीहरी ।
परि मोक्षप्रासादिं सरी । सर्वां हीं आथि ॥ ४७ ॥

ऐसा गीतावैष्णवप्रासादु । अठरावां कळशु विशदु ।
मियां ह्मणितला हा भेदु । जाणौनियां ॥ ४८ ॥
आतां सप्तदशा पाठिं । अध्याउ कैसेनि उठी ।
तो संबंधु सांघों दीठी । दीसे तैसा ॥ ४९ ॥
न मोडतां दोन्हीं आकार । वडलें एक शरीर ।
हें अर्धनारीनटेश्वर । पूरें दीसे ॥ ५० ॥
कां गंगायमुनाउदक । वोघवळें वेगळीक ।
दावी होउनि एक । पाणीपणें ॥ ५१ ॥
नाना वांटली दिवसें । कळा बिंबिं बैसे ।
परि वेगळें जैसें । चंद्रिं नाहिं ॥ ५२ ॥
तैसीं सिनानीं च्यान्ही पदें । श्लोकु श्लोकावबोधें ।
अध्यायो अध्यायभेदें । गमे किर ॥ ५३ ॥
परि प्रमेयाची उजिरी । आनान रूप न धरी ।
नाना रत्नें मणी दोरी । एकी चि जैसी ॥ ५४ ॥
मोतियें मेळउनि वहुवें । एकावळिचा पाडु आहे ।
परि शोभे रूप होये । एक चि जेथि ॥ ५५ ॥
फूलां फुलसरा लेख चढे । द्रुति दूजी आंगुळी न पडे ।
श्लोक अध्याय तेणें पाडें । जाणावे हे ॥ ५६ ॥
सातें शतें श्लोक । अध्यायां अठरांचें लेख ।
परि देउ बोलिले एक । जें दुजें नाहिं ॥ ५७ ॥
मिया हिं न संडूनि ते सोए । ग्रंथा व्यक्ति केली आहे ।
प्रस्तुत ही तेणें निर्वाहें । निरूपण आइकां ॥ ५८ ॥
तरि सतरावां अध्याउ । पावतां पुरता ठाउ ।
संपतां श्लोकिं देउ । ऐसें बोलिले ॥ ५९ ॥
अर्जुना ब्रह्मनामाचां विपिं । बुद्धि सांडुनि आस्तिकी ।
कर्मे कीजति जेतुकिं । असंतें होंति ॥ ६० ॥

हा आइकौनि देवाचा बोलु । अर्जुना आला डोलु ।
ह्मणे कर्मनिष्ठा मूलु । ठेला देखों ॥ ६१ ॥
तो अज्ञानांधु बापुडा ईश्वरू चि नेदखे एवडा ।
तेथ नावं एक पुढां । कां सुझे तेया ॥ ६२ ॥
आणि रजतमें दोन्हीं । गेलेयां सात्वीक श्रद्धा सानीं ।
ते कां लागे अभिधानीं । ब्रह्माचिये ॥ ६३ ॥
मग कोंतां खेवं देणें । वार्त्ते वरिल धावणें ।
संडीं फडे खेलवणें । नागिणिएचीं ॥ ६४ ॥
तेंसि कर्मे दुवाडें । तेयां हिं जन्मांतराचि कडे ।
दुर्मेलवे यऱ्हडे । कर्मा माझि ॥ ६५ ॥
ना विपायें उजू होए । तरि ज्ञानाची योग्यता लाहे ।
यऱ्हविं येणें चि जाये । निरयासि ॥ ६६ ॥
कर्मि हा ठाव्रो वेऱ्हीं ।.आहाति बहुवा अवसरी ।
आतां कर्मठा कैंची वारी । मोक्षाची एथ ॥ ६७ ॥
तरि फीटो कर्माचा पांगु । कां जो आघवा चि त्यागु ।
आदरिजो अव्यंगु । संन्यासु तो ॥ ६८ ॥
कर्मबाधाची कांहिं । जेथ भयाची गोठि नाहिं ।
तें आत्मज्ञान जिहीं । स्वाधीन केलें ॥ ६९ ॥
ज्ञानाचे आव्हान मंत्र । जें ज्ञान पीकतें सुक्षेत्र ।
ज्ञान आकर्षिते सूत्र । तंतु जे कां॥ ७० ॥
दोन्हीं संन्यास त्याग । अनुष्टूनि सूटो जग ।
तरि आतां हे चि चांग । व्यक्ति पूसों ॥ ७१ ॥
ऐसें ह्मणौनि पार्थे । त्यागसंन्यासव्यवस्थे ।
रूप होआवेया जेथें । प्रश्नु केला ॥ ७२ ॥
तथ प्रत्युत्तरें बोलि । श्रीकृष्णें जे सांवितली ।
तेया व्यक्ति जाली । अष्टादशो ॥ ७३ ॥

एवं जन्यजनकभावें । अध्यावो अध्यायातें प्रसवे ।
आतां आइकां ब्रवें । पुसिलें तें ॥ ७४ ॥
तरि पांडुकुमरें तेणें । देवाचें सरतें बोलणें ।
जाणौनि अंतष्करणें । काणि घेतली ॥ ७५ ॥
यऱ्हविं तत्वविषिं भला । तो निश्चितु किर आहे जाला ।
परि देउ राहे उगला । हें साहावे ना ॥ ७६ ॥
वत्स धालेयां हिं वरि । धेनु न वचावी दूरि ।
अनन्य प्रीतिची परि । ऐसी चि असे ॥ ७७ ॥
तेणें काजें विण बोलावें । तें देखिलें तऱ्हीं पाहावें ।
भोगितां चाड दूणावे । पढियंतां ठांइं ॥ ७८ ॥
ऐसीं प्रेमाची जाति । पार्थु तवं ते चि मूर्त्ति ।
ह्मणौनि करुं लाहे खंति । उगेपणाची ॥ ७९ ॥
आणि संवादाचेनि मीसें । जें अव्यवहारी वस्तु असे ।
तें चि भोगिजे जैसें । आरिसां रूप ॥ ८० ॥
मग संवादु तो चि पारुखे । तरि भोगणें भोगीं थोके ।
हें कां साहावैल सुखें । लांचावलेयां ॥ ८१ ॥
या लागि त्याग संन्यास । पुसावेयाचें घेउनि मीस ।
उपरतविलें दूस । गीतेचें तें ॥ ८२ ॥
अठरावा अध्याउ हा नोहे । हे एकाध्याई गीता चि आहे ।
जैं वांसुरुं चि गाये दुहे । तैं वेळ काइसी ॥ ८३ ॥
तैसें संपतां हिं अवसरिं । गीता आदरविली माघारी ।
स्वामिभृत्याचा न करी । संवादु काई ॥ ८४ ॥

## अर्जुन उवाच ॥

**संन्यासस्य महाबाहो तत्वमिछामि वेदितुं ॥**
**त्यागस्य च हृषीकेश पृथक्केशिनिषूदन ॥ १ ॥**

परि हें असो ऐसें । अर्जुनें पुसिजत असे ।
ह्मणे विनती विश्वेशें । अवधारिजो ॥ ८५ ॥
हां जी संन्यासु आणि त्यागु । यां दोहिं एकि अर्थि लागु ।
जैसा सांघातु आणि संगु । संगातें बोलिजे ॥ ८६ ॥
तैसें त्यागें आणि संन्यासें । त्यागू चि बोलिजत असे ।
अमचेनि तवं मानसें । ऐसें जाणिजे ॥ ८७ ॥
ना काहिं आथि अर्थभेदु । तो देवो करीतु विशदु ।
एथ ह्मणे मुकुंदु । भिन्न चि पैं ॥ ८८ ॥

**श्रीभगवानुवाच ॥**

**काम्यानां कर्मणां न्यासं संन्यासं कवयो विदुः ॥**
**सर्वकर्मफलत्यागं प्राहुस्त्यागं विचक्षणाः ॥ २ ॥**

यऱ्हवीं अर्जुना तूझां मनिं । त्याग संन्यास दोन्हीं ।
एकार्थ गमले हें मानी । मीं ही साच ॥ ८९ ॥
किर दोहिं इहिं शद्विं । त्यागु चि बोलिजे त्रिशुद्धी ।
परि कारण एथ भेदीं । एतुलें चि ॥ ९० ॥
जें निपटौनि कर्म सांडिजे । तें सांडणें संन्यासु ह्मणिजे ।
आणि फलमात्र कां तेजिजे । त्याग तो गा ॥ ९१ ॥
परि कोणा कर्माचें फल । सांडिजे कोण वर्म केवल ।
हें इं सांघों विमल । चित्त दे पां ॥ ९२ ॥
तरि आपैसेया दांगें डोंगर । झाडलीं वीति असार ।
तैसे लांबे राजागर । नुठिति ते ॥ ९३ ॥
न पेरितां सैव तृणें । उठिति तैसें सालिचें होणें ।
नाहिं गा राबाउणें । जेया परीं ॥ ९४ ॥
कां आंग जालें साहाजे । परि लेणें उद्यमें कीजे ।
नई आपैसी आपादिजे । विहिर जेवि ॥ ९५ ॥

तैसें नित्यनैमित्तिक । कर्म होये स्वाभाविक ।
परि न कामितां कामिक । न निफजे जें ॥ ९६ ॥
कामनेचें दलवाडें । जें उभावेया घडे ।
अश्वमेधादिक फुडे । याग जेथ ॥ ९७ ॥
वापी कूप आराम । अग्रहारें हान ग्राम ।
आणिक ही संभ्रम । व्रतांचे जे ॥ ९८ ॥
ऐसें इष्टापूर्त्त सकळ । जेया कामना एकि मूळ ।
जें केलें भोगवी फळ । बांधौनियां ॥ ९९ ॥
देहाचेया गावां आलेयां । जन्ममृत्युचेया सोहळेया ।
ना ह्मणों नैए धनंजया । जेया परीं ॥ १०० ॥
कां ललाटिचें लिहिलें । न मोडे काहिं केलें ।
काळे—गोरेपण धूतलें । फीटों नेणे ॥ १ ॥
केलें काम्य कर्म तैसें । फळभोगाचें धरणें बैसै ।
न फेडिता रिण जैसें । वोसंडी ना ॥ २ ॥
कां कामना हिं न करितां । अवसांत घडे पांडुसुता ।
परि वायकांड न जुझतां । लागे जैसें ॥ ३ ॥
गुळ नेणतां तोंडीं । घातला दे चि गोडी ।
अग्नि नेणोनि राखौंडी । चेंपिलें पोळी ॥ ४ ॥
काम्य कर्माचें हें एक । सामर्थ्य असे स्वभाविक ।
ह्मणौनि नको कवतिक । मुमुक्षुं एथ ॥ ५ ॥
किंबहुना पार्था ऐसें । जें काम्य कर्म गा असे ।
तें तेजिजें विष जैसें । वोकुनियां ॥ ६ ॥
मग तेया त्यागातें जगीं । संन्यासु ऐसेया भंगी ।
बोलिजे अंतरंगीं । सर्वद्रष्टां ॥ ७ ॥
हें काम्य कर्म सांडणें । तें कामनेतें चि उपडणें ।
धनत्यागें दवडणें । जैसें भय ॥ ८ ॥

सोमसूर्यग्रहणें । एउनि करिति पार्वणें ।
कां मातापितरमरणें । अंकितें जें दीस ॥ ९ ॥
अथवा अतिथी हान पावे । ऐसां पडें जें करावें ।
तें तें कर्म जाणावें । नैमित्तिक गा ॥ ११० ॥
वारिपिया क्षोभे गगन । वसंतें दुणावे वन ।
देहशृंगारीं यौवन । दशा जैसी ॥ ११ ॥
कां सोमकांतु सोमें पाल्हाले । सूर्ये फाकति कमलें ।
एथ असे तें चि पघलें । आन नेए ॥ १२ ॥
तैसें नित्य जें कां कर्म । तें नैमित्तिकाचें लाहे नियम ।
एथ उंचावें तेणें नाम । नैमित्तिक होए ॥ १३ ॥
आणि सायंप्रातर्मध्यानीं । जें करणीय प्रतिदिन्हीं ।
परि दृष्टि जैसी लोचनीं । अधिक नोहे ॥ १४ ॥
कां नापादितां गति । चरणीं जैसी आथि ।
नातरि दीप्ति । दीपबिंबीं ॥ १५ ॥
वासु नेंदितां जैसें । चंदनीं सुगंधत्व असे ।
अधिकाराचे तैसें । रूप चि जें ॥ १६ ॥
नित्य कर्म ऐसें जनीं । पार्था बोलिजे तें हें मानीं ।
एवं नित्यनैमित्तिकें दोन्हीं । दाविलिं तुज ॥ १७ ॥
हें नित्यनैमित्तिक । अनुष्ठितां आवश्यक ।
म्हणौनि म्हणों पांति एक । वांझ ययातें ॥ १८ ॥
परि भोजनीं जैसें होए । तृप्तिलाभें भूक जाए ।
तैसें नित्यनैमित्तिक आहे । सर्वांगिं फल ॥ १९ ॥
कीड आगिटां पडे । मल तूटे वानीं चढे ।
या कर्मा तेया सांगडें । फल जाणावें ॥ १२० ॥
जें प्रत्यवावो तवं गले । स्वाधिकारु बहुवें उजले ।
तेथ हातोफाटिया मिले । सद्गतीसिं ॥ २१ ॥

एवडें वेरी ढिसाळ । नित्यनैमित्तिकिं आहे फळ ।
पारि त्यजिजे मूळ । नक्षत्रीं जैसें ॥ २२ ॥
लता पीके आघवी । तवं चूतु बांधे पालवी ।
मग हातु न लवीं माधवी । सांडुनि घाली ॥ २३ ॥
तैसी नोळंडितां रेखा । चित्त दीजे नित्यनैमित्तिका ।
पाठिं फळा कीजे अशेषा । वांतिची वानी ॥ २४ ॥
एया कर्मफळत्यागातें । त्यागु पैं ह्मणति जाणते ।
एवं संन्यास त्याग तूतें । परिसविले ॥ २५ ॥
हा संन्यासु जैं संभवे । तैं काम्यबाधु न पवे ।
निषिद्ध तवं स्वभावें । निषिद्धें गेलें ॥ २६ ॥
आणि नित्यादिक असे । तें एणें फळत्यागें नासे ।
शिर लोटिलेयां जैसें । एर आंग ॥ २७ ॥
मग सस्य फळपाकांत । तैसें निमालेयां कर्मजात ।
आत्मज्ञान गिवसीत । आपैसें ए ॥ २८ ॥
एसिया निगुती दोन्हीं । त्यागसंन्यासअनुष्ठानीं ।
पडिले गा आत्मज्ञानीं । बांधति पाटु ॥ २९ ॥

**त्याज्यं दोषवदित्येके कर्म प्राहुर्मनीषिणः ॥**
**यज्ञदानतपःकर्म न त्याज्यमिति चापरे ॥ ३ ॥**

नातरि हे निगुति चूके । मग त्यागु कीजे हाततूकें ।
तैं काहिं न त्यजे अधिकें । गोवी चि पडे ॥ १३० ॥
जें अ्खद व्याधी अनोळख । तें घेतलेयां परते चि विष ।
कां जें अन्न न मनीं भूक । तें मारी ना काई ॥ ३१ ॥
ह्मणौनि त्याज्य जें नोहे । तेथ त्यागातें न सुआवें ।
त्याज्या लागि नोहावें । लोभापरां ॥ ३२ ॥
चूकलेयां त्यागाचें बेझें । केला सर्वत्यागु हो वोझें ।
निषिद्धेंसिं सर्वत्र जूझें । वीतरागां ॥ ३३ ॥

एकां फलत्यागु न टके । ते कर्मातें ह्मणति बंधकें ।
जैसें आपण नग्न भांडुकें । जगातें ह्मणे ॥ ३४ ॥
कां जिव्हालंपटु रोगिया । अन्नें दुखीं धनंजया ।
नातरि आंगें नरु कुष्ठिया । मासियां कोपे ॥ ३५ ॥
तैसें फलकामिं दुर्बळ । ह्मणति कर्म कीडाळ ।
मग निर्णयो देंति केवळ । त्यजावें ऐसा ॥ ३६ ॥
एक ह्मणति यागादिक । करावें आवश्यक ।
हें वांचौनि शोधक । आन नाहिं ॥ ३७ ॥
मनशुद्धिचां मार्गि । जें विजैयां होआवें जगीं ।
तैं कर्मसंबंधा लागि । आलसु न कीजे ॥ ३८ ॥
भांगार आथि शोधावें । तरि आगी जेवि नुभगावें ।
कां आरिसेया लागि सांचावें । अधिकें रजें ॥ ३९ ॥
ना लुगडीं चोखें होआविं । ऐसें जरि आथि जीविं ।
तरि सवंदणि न मनावी । मलीन ऐसी ॥ १४० ॥
तैसिं कर्में क्लेशाकारें । ह्मणौनि ने नाविं अव्हेरें ।
कां अन्न लाभे अरुवारें । रांधितिए उणे ॥ ४१ ॥
तारि इहिं गा शद्वीं । एक कर्म बांधति बुद्धी ।
ऐसा त्यागु विसंवादीं । पडौनि ठेला ॥ ४२ ॥
पारि आतां विसंवादु तो फीटे । हा त्यागाचा निश्चयो भेटे ।
तैसें बोलों गोमटें । अवधान देइं ॥ ४३ ॥

**निश्चयं शृणु मे तत्र त्यागे भरतसत्तम ॥**
**त्यागो हि पुरुषव्याघ्र त्रिविधः संप्रकीर्त्तितः ॥ ४ ॥**

तरि त्यागु एथ पांडवा । त्रिविधु पैं जाणावा ।
तेया ही त्रिविधा बरवा । निवाडु सांघों ॥ ४४ ॥
त्यागिचे तीन्ही प्रकार । कीजति जन्हीं गोचर ।
तन्हीं इत्यर्थाचें सार । एतुलें एथ ॥ ४५ ॥

मज सर्वज्ञाचिये बोधीं । जें अलोट मानें त्रिशुद्धी ।
तें निश्चित तवं आधीं । विचारि पां ॥ ४६ ॥

यज्ञदानतपःकर्म न त्याज्यं कार्यमेव तत् ॥
यज्ञो दानं तपश्चैव पावनानि मनीषिणां ॥ ५ ॥

तरि आपुलिये सोडवणे । जो मुमुक्षु जागों ह्मणे ।
तेया सर्वस्वें करणें । हें चि एक ॥ ४७ ॥
जियें यज्ञदानतपादिकें । यें कर्मे आवश्यकें ।
तियें न संडावि पांथिकें । पाउलें जैसीं ॥ ४८ ॥
हारतलें न देखिजे । तवं मागु न संडिजे ।
कां न घांतां न लोटिजे । भाणें जेवि ॥ ४९ ॥
नाव थडी न पवतां । न संडिजे केळि न फळतां ।
कां ठेविलें न दिसतां । दीपु जैसा ॥ १५० ॥
तैसी आत्मज्ञानविषिं । जवं निश्चिति नाहिं नीकी ।
तवं न व्हावें यागादिकिं । उदासीनां ॥ ५१ ॥
पैं स्वाधिकारानुरूपें । तियें दानयागतपें ।
अनुष्ठावीं आक्षेपें । अधिकें वर ॥ ५२ ॥
जें चालणें वेगावत जाए । तो वेगु बैसावेया चि होये ।
तैसा कर्मा अतिसो आहे । निष्कर्मा लागि ॥ ५३ ॥
अधिकिं जवं जवं ऊखदीं । सेवनेची मांडे वांधी ।
तवं तवं मूंकिजे व्याधी । तेयाचिया ॥ ५४ ॥
तैसिं कर्मे हातोपातीं । पैं कीजति यथानिगुती ।
तैं रजतमें झडती । दोन्हीं एथ ॥ ५५ ॥
मग पाठिचां वाटीं पुटें । भांगारा देणें घटे ।
तैं कीड झडकारि तूटे । निर्व्याज होए ॥ ५६ ॥
तैसें निष्ठा केलें कर्म । सांडूनि रजतम ।
सत्वशुद्धिचें धाम । डोलां दावी ॥ ५७ ॥

म्हणौनि गा धनंजया । सत्वशुद्धि गिंवसी तेया ।
तीर्थें यें सावाया । आलिं कर्मे ॥ ५८ ॥
तृषार्त्ता मरुत देसीं । म्हले अमृतें वोलली जैसी ।
कां अंधा लागि डोळांसिं । सूर्यो आला ॥ ५९ ॥
बुडतेया नइ चि धांविनली । पडतेया पृथ्वी कलवलली ।
मरतेया मृत्यू दीधली । आयुष्यरिद्वी ॥ १६० ॥
तैसें कर्मि बांधतां । मुमुक्ष सूटले पांडुसुता ।
जैसा रसरीती मरता । राखिला त्रिखें ॥ ६१ ॥
तैसिं येकी हातवटिया । कर्मे केलीं धनंजया ।
बंधकें चि सोडावेया । मुख्य होंति ॥ ६२ ॥

**एतान्यपि तु कर्माणि संगं त्यक्त्वा फलानि च ॥**
**कर्तव्यानीति मे पार्थ निश्चितं मतमुत्तमं ॥ ६ ॥**

आतां ते चि हातवटी । तुज ही सांघों गोमटी ।
जेया कर्मासि किरीटी । कर्म चि रूसे ॥ ६३ ॥
तरि महायागप्रमुखें । कर्मे निफजति अचुकें ।
कर्तेपणाचें न टके । फुंजणें आंगीं ॥ ६४ ॥
जो मोलें तीर्था जाये । तेयासि यात्रा करीतु आहें ॥
ऐसिया श्लाघ्यता नोहे । तोखु जिवीं ॥ ६५ ॥
कां मुद्रा समर्थाचिया । एकटु म्हौंवे राया ।
तो मीं जीणतसें येया । न ये जेवि गर्वा ॥ ६६ ॥
जो कासे लागौनि तरे । तेया पव्हती उर्मि नुरे ।
पुरोहितु नाविष्करे । दातेपणें ॥ ६७ ॥
तैसें कर्तुत्व अहंकारें । नेघौनि यथावसरें ।
कृत्यजाताचें मोहिरें । सारिजति ॥ ६८ ॥
आणि केलें कर्म पांडवा । जो आथि फळाचा यावा ।
तेया मोहरा न व्हावा । मनोरथु ॥ ६९ ॥

आदिं चि फळिं आसतूटिया । कर्मे आरंभावीं धनंजया ।
परावें बाळ धाया । पाहिजे जैसें ॥ १७० ॥
पिंपरुवांचेया आशा । न सिंपिजे पिंपळु जैसा ।
तैसिया फळनिराशा । कीजति कर्मे ॥ ७१ ॥
सांडूनि दूधाची टकुळी । गोवारी गावंधणें वेंटाळी ।
किंबहुना कर्मफळीं । तैसें कीजे ॥ ७२ ॥
ऐसी हे हातवटी । घेउनि क्रिया जे उठी ।
आपुलिया आपण गांठी । लाहे चि तो ॥ ७३ ॥
ह्मणौनि फळिं लागु । सांडौनि देहिं संगु ।
कर्मे करावि हा चांगु । निरोपु माझा ॥ ७४ ॥
जो जीवबंधें सीणला । सूटिकिं जचे आपुलां ।
तेणें पुडुतीं या बोला । आन न कीजे ॥ ७५ ॥

**नियतस्य तु संन्यासः कर्मणो नोपपद्यते ॥**
**मोहात्तस्य परित्यागस्तामसः परिकीर्त्तितः ॥ ७ ॥**

ना आंधाराचेनि रोखें । जैसीं डोळां रोविजति नाखें ।
तैसें कर्मद्वेखें असिकें । कर्म चि सांडी ॥ ७६ ॥
तेयाचें कर्म सांडणें । तें तामस पैं मीं ह्मणें ।
सिसाराचां रागीं लाणें । सीस चि जैसें ॥ ७७ ॥
हांगा मार्गु दोवाडु होए । तऱ्हीं निस्तरतील पाए ।
किं ते चि खांडणें आहे । मार्गापराधें ॥ ७८ ॥
भूकैलेया पुढील अन्न । हो कां भलेतैसें उन्ह ।
तऱ्हीं बुद्धी नेघतां लंवन । कां निवारे गा ॥ ७९ ॥
तैसा कर्माचा बाधु कर्मे । नितारिजैल कारितेन वर्मे ।
हें तामसु नेणे भ्रम । माजविला ॥ १८० ॥
किं स्वभावें आलें विभागा । तें कर्म चि वोसंडी पैं गा ।
परि ह्मनें आतळा त्यागा । तामसा तेया ॥ ८१ ॥

दुःखमित्येव यत्कर्म कायक्लेशभयात्त्यजेत् ॥
स कृत्वा राजसं त्यागं नैव त्यागफलं लभेत् ॥ ८ ॥

अथवा स्वाधिकारु बूझे । आपुलें विहित ही सूझे ।
पारि कारितेया उभजे । निबरपणां ॥ ८२ ॥
जें कर्म आरंभाची कड । नावं एक होये दुवाड ।
वाहांतिये वेळे जड । सिदोरी जैसी ॥ ८३ ॥
निंबु जिव्हे कडुवटु । हिरडा पहिलें तूरटु ।
तैसा कर्मा सेवटु । खणुवाला होए ॥ ८४ ॥
गाई दोवाड सिंग । सेवंतिये अडव आंग ।
भोजनसुख महाग । रांधितां ठांई ॥ ८५ ॥
तैसें पुडुतिं पुडुतिं कर्म । आरंभीं चि अतिविषम ।
ह्मणौनि ते ते श्रम । कारितां मानीं ॥ ८६ ॥
एऱ्हवि विहितत्वें मांडी । परि घालितां असुरवाडी ।
एथ पोळलें ऐसें सांडी । आदरिलें ही ॥ ८७ ॥
ह्मणे वस्तु देहा सारिखी । आली बहुवि भाग्यविशेषिं ।
मा जाचुकां कर्मादिकिं । पापिया जैसा ॥ ८८ ॥
केलां कर्मिं जें देयावें । तें ह्मनें मज होआवें ।
आजि भोगूं ना बरवें । हातिचे भोग ॥ ८९ ॥
ऐसा शरीराचेया क्लेशा । भेण कर्मे वीरेशा ।
सांडी तो परियसां । राजस त्यागी ॥ १९० ॥
यऱ्हवि तेथ ही कर्म सांडे । परि त्यागफल न जोडे ।
जैसें उतलें आगी पडे । पारि होमीं न लगे ॥ ९१ ॥
कां बुडौनि प्राण गेले । ते अर्घोदकीं निमाले ।
हें ह्मणों न ए जालें । दुर्मरण चि ॥ ९२ ॥
तैसें देहाचेनि लोभें । जेणें कर्मा पाणी सुभे ।
साच तेणें न लभे । त्यागाचें फल ॥ ९३ ॥

किंबहुना आपुलें । जैं ज्ञान होये उदया आलें ।
तैं नक्षात्रांतें पाहलें । गिळी जैसें ॥ ९४ ॥
तैसिया सकारणा क्रिया । हारपती धनंजया ।
तो कर्मत्याग ये जेया । मोक्षफळासि ॥ ९५ ॥
तें मोक्षफळ अज्ञाना । त्यागिया नाहिं अर्जुना ।
म्हणौनि तो त्यागु न मना । राजसै ते ॥ ९६ ॥

**कार्यमित्येव यत्कर्म नियतं क्रियतेऽर्जुन ॥**
**संगं त्यक्त्वा फलं चैव स त्यागः सात्त्विको मतः॥९॥**

तरि कोणें पां एथ त्यागें । मोक्षफळ घर रिगे ।
तें हिं आइक प्रसंगें । बोलिजैल ॥ ९७ ॥
तरि स्वाधिकाराचेनि नावें । जें वांटे आलें स्वभावें ।
तें आचरिजे गौरवें । शृंगारुनि ॥ ९८ ॥
परि हें मि करीतु असें । ऐसा आठौ त्यजी मानसें ।
तैसें चि पाणी दे आसे । फळाचिये ॥ ९९ ॥
पैं अवज्ञा आणि कामना । मातेचां ठांइं अर्जुना ।
केलीं दोन्हीं पतना । हेतु होंति ॥ २०० ॥
तरि दोन्हि इयें त्यजावीं । मग माता चि भजावी ।
वांचौनि मुखा लागि वाळावी । गाय चि सळगी ॥ १ ॥
आवडतिये ही फळीं । असारें साळि आठोळी ।
तेया साठिं अव्हगाळी । फळातें कोण्हीं ॥ २ ॥
तैसा कर्तृत्वाचा मदु । आणि कर्मफळिचा आस्वादु ।
ययां दोहिं चि नावं बंधु । कर्माचा कि ॥ ३ ॥
तरि यां दोहींचां विखीं । जैसा वापु नातळे लेंकी ।
तैसा होये ना दुःखी । विहितक्रिया ॥ ४ ॥
हा तो त्याग तरुवरु । जो मोक्षफळीं ए थोरु ।
सात्विक ऐसा डगरु । एयासी चि जगीं ॥ ५ ॥

बिं जाळूनि चि जैसें । झाड कीजे निर्वंसें ।
फळ त्यजूनि कर्म तैसें । त्यजिलें जेणें ॥ ६ ॥

**न द्वेष्ट्यकुशलं कर्म कुशले नानुषज्जते ॥**
**त्यागी सत्वसमाविष्टो मेधावी छिन्नसंशयः ॥ १० ॥**

तेया लागत खेऊ परिसिं । धातुची गंधिकालिमा जैसी ।
जाये रजतमें तैसीं । तूटलीं दोन्हीं ॥ ७ ॥
मग सत्वें तेणें चोखाळें । उघडति आत्मबोधाचे डोळे ।
तेथ मृगांभ सांजवेळे । होये जैसें ॥ ८ ॥
तैसा बुध्यादिकां पुढां । असतु विश्वाभासु एवडा ।
तो नेदखे कव्हणी कडां । आकाश जैसें ॥ ९ ॥
ह्मणौनि प्राचीनाचेनि बळें । आलिं कृत्यें कुशलाकुशलें ।
तियें व्योमाचां आंगिं अभाळें । जिराली जैसीं ॥ २१० ॥
तैसीं तेयाचिया दृष्टी । कर्में द्रिष्टी चि जाली किरीटी ।
ह्मणौनि सुखदुःखीं तुटी । पडे ना जो ॥ ११ ॥
तेणें शुभ कर्म जाणावें । मग तें हर्षें करावें ।
कां अशुभा लागि होआवें । द्वेषिया नां ॥ १२ ॥
तरि ये विषिचा काहिं । तेया एकु ही संदेहो नाहिं ।
जैसा स्वप्नाचा कां ठांइं । जागिनलेयां ॥ १३ ॥
ह्मणौनि कर्म आणि करिता । यां द्वैतभावांची वार्ता ।
नेणे तो पांडुसुता । सात्विक त्यागीं ॥ १४ ॥

**न हि देहभृता शक्यं त्यक्तुं कर्माण्यशेषतः ॥**
**यस्तु कर्मफलत्यागी स त्यागीत्यभिधीयते ॥ ११ ॥**

ऐसेनि कर्में पार्था । त्यजिलीं त्यजीति सर्वथा ।
अधिकें बांधिजति अन्यथा । सांडिलीं तरि ॥ १५ ॥
हां गा सव्यसाची । मूर्त्ति होउनि देहाची ।
खंति करीति कर्मांची । गावंढीं नां ॥ १६ ॥

मातिएचा वीटु । घेउनि काइ करी घटु ।
केउते तांथू पटु । सांडितील ते ॥ १७ ॥
तेवि चि वन्हित्व आंगीं । आणि ऊबे उबगणें आगी ।
तो दीपु प्रभे लागि । द्वेषु करी काई ॥ १८ ॥
हींगु त्रासला पां घाणीं । तरि सुगंधत्व कैंचें आणी ।
द्रवपण सांडूनि पाणीं । कें राहे तें ॥ १९ ॥
तैसा शरीराचेनि आभासें । नांदतु जवं असे ।
तवं कर्मत्यागाचें पीसें । काइसें तन्हीं ॥ २२० ॥
आपण लाविजे टीला । ह्मणौनि पुसूं ये अवलीला ।
मा घालि फेडि निडला । कां करुं ए गा ॥ २१ ॥
तैसें विहित स्वयें आदरिलें । ह्मणौनि त्यजूं ये त्यजिलें ।
परि कर्म चि देह आतलें । तें कां गा सांडे ॥ २२ ॥
जें श्वासोश्वास वेरि । होंत निदेलेया ही वारि ।
कांहिं न करणें चि परि । होंति जेयाची ॥ २३ ॥
एया शरीराचेनि मीखें । कर्म चि लागले असिके ।
जीतां मेलेयां न टके । इया रीती ॥ २४ ॥
एयातें सांडिती एथ परी । एकी चि ते अवधारीं ।
करितां जाइंजे हारि । फळासेचि ॥ २५ ॥
कर्मफळ ईश्वरीं अर्पे । तत्प्रसादें बोधु उद्दीपे ।
तेथ रज्जुज्ञानें लोपे । व्यालशंका ॥ २६ ॥
तेणें आत्मबोधें तैसें । अविद्यासि कर्म नासे ।
पार्था त्यजिजे जैं ऐसें । त्यजिलें होए ॥ २७ ॥
ह्मणौनि इया परीं जगीं । कर्म त्यजी तो महात्यागी ।
एरु मूर्छने नावं रोगीं । विसांवा जैसा ॥ २८ ॥
तैसा सीणे कर्मी एकीं । विसांवा पाहे आणिकिं ।
खांदियांचे घाये बुकिं । धाडणें जैसें ॥ २९ ॥

पारे हें असो पुढुतीं । तो चि त्यागी त्रिजगती ।
जेणें फलत्यागें निष्कृती । नेलें कर्म ॥ २३० ॥

**अनिष्टमिष्टं मिश्रं च त्रिविधं कर्मणः फलं ।**
**भवत्यत्यागिनां प्रेत्य न तु संन्यासिनां क्वचित् ॥ १२ ॥**

यन्हवीं तन्हीं धनंजया । त्रिविधा फळा गा इया ।
समर्थ तें किं भोगावेया ॥ जें सांडी चि नां ३१ ॥
आपण चि वीउनि दुहिता । न मम ह्मणे पिता ।
किं तो सुटे येरु घेंता । जावाई सिरके ॥ ३२ ॥
विखाचे ही आगर वाहांती । ते वीकितां तूटळे जींति ।
परि निमाळे जे घेंति । वणिजूनि मोलें ॥ ३३ ॥
तैसें कारितां कर्म करू । अकर्त्ता फळआशे न धरू ।
तेथ न शके आवरूं । दोघां तें हिं कर्म्म ॥ ३४ ॥
वाटे पीकलेया रुंखाचें । फळ आपेक्षी तेयाचें ।
तेवि साधारण कर्माचें । फळ घे तेया ॥ ३५ ॥
परि करूनि फळ नेघे । तो जगाचां कर्मि न रिघे ।
जें त्रिविध जग आघवें । कर्मफळ हें ३६ ॥
देव मनुष्य स्थावर । या नावं किं जगडंबर ।
तरि हें तवं त्रिप्रकार । कर्मफळ पैं ॥ ३७ ॥
तें चि एक गा अनिष्ट । एक तें केवळ इष्ट ।
आणि एक इष्टानिष्ट । त्रिविध ऐसें ॥ ३८ ॥
परि विषमता बुद्धी । आगिं सूनि अविधी ।
प्रवर्त्तिजे निषेधीं । कुव्यापारिं ॥ ३९ ॥
तेथ क्रिमि कीटक लोष्ट । हे देहलाभ होंति निकृष्ट ।
तेया नावं तें अनिष्ट । क्रियाफळ ॥ २४० ॥
कां स्वधर्मा मानु देंतां । स्वाधिकारु पुढें सूतां ।
सुकृत कीजे पूसतां । आम्नायातें ॥ ४१ ॥

तैं इंद्रादिकां देवांचीं । देहें लाहिजति सव्यसाची ।
तेया कर्मफलइष्टाची । प्रसिद्धि गा ॥ ४२ ॥
आणि गोड आंबड मिळे । तेथ रसांतर फरसाळें ।
उठी दोहिं वेगळें । दोहीं जीणतें ॥ ४३ ॥
रेचक चि योगवसें । होये स्तंभावेया दोसें ।
तेवि सत्यासत्यसमरसें । असत्य जिणिजे ॥ ४४ ॥
ह्मणौनि समभागें शुभाशुभें । मिळौनि अनुष्ठानानें उभे ।
तेणें मनुष्यत्व लाभे । तैं मिश्र फल ॥ ४५ ॥
एवं त्रिविध या भंगीं । फल मांडले असे जगीं ।
हें न संडे तेया भोगीं । सूदलें आशा ॥ ४६ ॥
एथ जीभेचा हातु फांटे । तवं जेवितां गमे गोमटें ।
परिणामिं सेवटें । विपायें मरण ॥ ४७ ॥
सवंचोरां मैत्री चांग । जवं न पविजे तें दांग ।
सामान्या भली जवं आंग । न सिवे तवं ॥ ४८ ॥
तैसीं कर्मे करितां शरीरीं । लाहांति महत्वाची फरारी ।
पाठिं निधनीं एकसरीं । पावति फळें ॥ ४९ ॥
समर्थु कां रिणियां । मागों आला बाइणियां ।
न लोटे तैसा प्राणियां । पडे तो भोगु ॥ २५० ॥
मग कणिसौनि कणु झडे । तो विरूढला कणिसा चढे ।
पुडुतीं भुइं पडे । पुडुतीं उठी ॥ ५१ ॥
तैसें भोगिं जें फल होए । तें फलांतरें वीत जाये ।
चालतां पावो पायें । जीणिजे जैसा ॥ ५२ ॥
उताराचिये सांगडी । ठाके ते ऐली चि थडी ।
तेवि न मुकति वोढी । भोग्याचिये ॥ ५३ ॥
पैं साध्यसाधनप्रकारें । फलभोगु तो गा पसरे ।
एवं गोविले सवंसारें । अत्यागि ते ॥ ५४ ॥

यऱ्हवि जाईचेया फुला फांकणें । तेया चि नावं सूकणें ।
तैसें कर्ममीखें न करणें । केलें जिहीं ॥ ५५ ॥
जैं बीं चि वरोसी वेचे । तैं वाढती कुळवाडि खांचे ।
तेवि फळत्यागिं कर्माचें । सारिलें काम ॥ ५६ ॥
तेया सत्वशुद्धिसहकारें । गुरुकृपामृततुषारें ।
सांसिनलेनि बोधें ऊसरे । द्वैतदैन्य ॥ ५७ ॥
तेधवां जगदाभासमीषें । स्फुरतें त्रिविध फळ नासे ।
तेथ भोक्ताभोग्य आपैसें । निमालें होए ॥ ५८ ॥
घडे ज्ञानप्रधानु ऐसा । संन्यासु जेयां वीरेशा ।
ते चि फळभोग हीं सोसा । मूकले गा ॥ ५९ ॥
आणि एणें किर संन्यासें । जैं आत्मरूपिं दीठि पैसे ।
तैं कर्म एक ऐसें । देखणें आहे ॥ २६० ॥
पडौनि ठेलेयां भींति । चित्राची कीजतसे चांथी ।
पाहालेयां राती । आंधारें उरे ॥ ६१ ॥
जैं रूप चि नाहिं उभें । तैं साउली काह्याची शोभे ।
आरिसेन विण बिंबे । वदन कें पां ॥ ६२ ॥
फीटलेयां निद्रेचा ठाऊ । कैंचा स्वप्नासि प्रस्थाऊ ।
मग तें साच कां वावो । हें कोण ह्मणे । ६३ ॥
तैसें गा संन्यासें एणें । तवं अविद्येसी चि नाहीं जीणें ।
मां तियेचें कार्य कोणे । घेपे दीजे कर्म ॥ ६४ ॥
ह्मणौनि संन्यासिं इए पाइं । कर्माची मातु कीजैल काइ ।
पारि अविद्या आपुलां देहीं । आहे जैसी कां ॥ ६५ ॥
जैं कर्तेपणाचेनि थावें । आत्मा शुभाशुभीं धांवे ।
द्रिष्टि भेदाचिये राणिवे । बैसली जैसी ॥ ६६ ॥
तैं तऱ्हीं गा सुवर्मा । वेगळी आत्मेया कर्मा ।
अपाडें जैसी पश्चिमा । पूर्वेसिं कां ॥ ६७ ॥

नातरि आकाशा आणि अभाला । सूर्या आणि मृगजला ।
वेगळीक भूतला । वायुसीं जैसी ॥ ६८ ॥
पांगुरौनि नेचें उदक । असे ने चि माजि खडक ।
परि जाणसि कि वेगळीक । कोडिची तेया ॥ ६९ ॥
हो कां पाणियां जवळी । परि सिनीं चि ते बाबुळी ।
काइ संगा तव काजळी । दीपु ह्मणों ए ॥ २७० ॥
जऱ्हीं चंद्रीं जाला कलंकु । तऱ्हीं चंद्रेंसि न्हवे कि एकु ।
आहे द्रिष्टी डोळेयां विशेकु । अगाडु जैसा ॥ ७१ ॥
नाना वाटे वाटे जांतिया । वोघा वोघीं वाहांतेया ।
आरिसा आरिसेया पाहांतेया । अपाडु जेतुला ॥ ७२ ॥
पार्था गा तेतुलेनि मानें । आत्मेनसि कर्म सीनें ।
परि घेवविजे अज्ञानें । तें किर असो ॥ ७३ ॥

**पंचैतानि महाबाहो कारणानि निबोध मे ॥**
**सांख्ये कृतांते प्रोक्तानि सिद्धये सर्वकर्मणां ॥ १३ ॥**

विकासें रवितें उपजवी । द्रुति अलीं करवि भोगवी ।
ते सरोवरीं कां वरवी । अब्जिनी जैसी ॥ ७४ ॥
पुडुतीं आत्मक्रिया । अन्यकारणका चि तैसिया ।
करूं पांचां हिं तेया । कारणा रूप ॥ ७५ ॥
आणि पांचै कारणें तियें । तूं हीं जाणसील विपायें ।
जें शास्त्रें उभूनि बाहे । बोलती तेयांतें ॥ ७६ ॥
वेदरायाचियें राजधानीं । सांख्यवेदांताचां भुवनीं ।
निरूपणाचां निसाणध्वनीं । गाजति तियें ॥ ७७ ॥
जें सर्वकर्मसिद्धी लागि । इयें चि मुदलें हो जगीं ।
एथ न सुआवा अभंगीं । आत्मराजु ॥ ७८ ॥
एया बोलाचिया डांगुरटी । तियें प्रसिद्धि आलीं किरीटी ।
ह्मणौनि तूझा कर्णपुटीं । वसौ काज ॥ ७९ ॥

आनी मुखांतरिं आइकिजे । ऐसें काइसें हें वोझें ।
मीं चिंतारत्न तूझें । असैतां हातीं ॥ २८० ॥
आरिसा पुढां मांडिलेयां । लोकाचेया डोलेयां ।
मानु देयावा पावेया । आपुलें नीकें ॥ ८१ ॥
भक्तु जेथ जैसेनि पाहे । तेथ तें तें चि होंत जाएं ।
तो मीं तूझें जालां आहें । खेळणें आजि ॥ ८२ ॥
ऐसेनि प्रीतिचेनि वेगें । देवो बोलतां से नेघे ।
तवं आनंदा माझि आंगें । विरत एरु ॥ ८३ ॥
चांदिणेयांचा पडिभरु । जालेयां सोमकांताचा डोंगरु ।
विघरौनि सरोवरु । हों पाहे जैसा ॥ ८४ ॥
ऐसें सुख आणि अनुभूती । या भावाची मोडौनि भींती ।
आतैल अर्जुना कृती । सुख चि जेथ ॥ ८५ ॥
तेथ समर्थु ह्मणौनि देवा । अवकाशु जाला आठवा ।
मग बुडतेया धावा । जीवें केला ॥ ८६ ॥
अर्जुना एसणें ढेंढें । प्रज्ञा पसरोंसिं बुडे ।
आलें भरितें एवडें । तें काढुनि पुडुतीं ॥ ८७ ॥
देवो ह्मणे हां गा पार्था । तूं आपणपें देख सर्वथा ।
तवं श्वासौनि एरें माथा । तुकविला ॥ ८८ ॥
ह्मणे तूं हीं जाणासि दातारा । मीं तुसीं व्यक्तिसेजारा ।
उभगलां आदी चि एकाहारा । एउं पाहें ॥ ८९ ॥
तेया ही हा ऐसैसा । लोभें देया जारि लालसा ।
तरि कां हो घालितसा । आडाड जिवा ॥ २९० ॥
एथ श्रीकृष्णु ह्मणे मीकें । आझुइं नव्हे मा ठाउकें ।
वेडेया चंद्रा चंद्रिके । निमलणें आहे ॥ ९१ ॥
आणि हा इं बोलौनि भाउ । तुज दाउनि आह्मीं बेहों ।
जें रुसतां वांधे टांवों । तें प्रेम गा हें ॥ ९२ ॥

एथ एकमेकाचिये खूणे । विसंवादु तवं जीणे ।
ह्मणौनि असो हें बोलणें । इये विषिचें ॥ ९३ ॥
मग कैसी कैसी ते आतां । बोलत होंतों पांडुसुता ।
सर्वकर्मभिन्नता । आत्मेनसीं ॥ ९४ ॥
तवं अर्जुनु ह्मणे देवें । माझिये मनिचें चि स्वभावें ।
प्रस्ताविलें बरवें । प्रमेय तें चि ॥ ९५ ॥
जें सकळ कर्माचें बीज । कारणपंचक तुज ।
सांघैन ऐसी पैंज । घेतली कां ॥ ९६ ॥
आणि आत्मेयां एथ काहिं । सर्वथा लागु नाहिं ।
हें पुढारलासि तें देइं । लाहाणें माझें ॥ ९७ ॥
ऐया बोला विश्वेशें । ह्मणितलें तोखें बहुवसें ।
इये विषीं धरणें बैसे । ऐसें कें जोडे ॥ ९८ ॥
तरि अर्जुना निरूपिजैल । तें किर भाषे चि आंतुल ।
परि मेचु इये होइजैल । रिणियां तुज ॥ ९९ ॥
तवं अर्जुनु ह्मणे देउ । काइ विसरलेति मागील भाउ ।
हे गोठी कीं राखत आहों । मीतूंपण चि ॥ ३०० ॥
एथ श्रीकृष्णु ह्मणति हो कां । आतां अवधाना पसरु नीका ।
करूनि तुह्मीं आइकां । पुढारलों तें ॥ १ ॥
तरि साच चि धनुर्द्धरा । सर्व कर्माचा उभारा ।
होये बाहिरिबाहिरा । कारणीं पांचें ॥ २ ॥
आणि पंचकारणदळवाडें । जेहीं कर्माकार मांडे ।
ते हेतु ही सवंवडे । पांच आथि ॥ ३ ॥
येर आत्मतत्व उदासीन । तें हेतु ना उपादान ।
ना आंगें करी संवाहन । कर्मसिद्धीचें ॥ ४ ॥
तेथ शुभाशुभीं अंशीं । निफजतां कर्मे ऐसीं ।
रात्रिदिउ कां आकाशीं । जिया परीं ॥ ५ ॥

कां तोय तेज धूमु । एयां वायुसि समागमु ।
जालेयां होये अभ्रागमु । व्योम तें नेणे ॥ ६ ॥
नाना काष्टि नाव मिळे । ते नावोडेनि चळे ।
चालिजे अनिळें । उदक साक्षी ॥ ७ ॥
कां कोण्हें एकें पिंडें । वेचतां अवतरे भांडें ।
तें भवंडिजे दंडें । भ्रमे चक्र ॥ ८ ॥
आणि कर्तुत्व कुलालाचें । तेथ काइ पृथ्वियेचें ।
आधारु वांचौनि वेचे । विचारिं पां ॥ ९ ॥
इयें असो लोकाचिया । राहाटी होंतु आघविया ।
कोण काम सवितेया । आंगा आलें ॥ १० ॥
तैसी पंचहेतुमिळणीं । पांचें चि इहिं करणिं ।
कीजे कर्मलतांची लावणी । आत्मा सिनां ॥ ११ ॥
आतां इयें चि वेगळालीं । पांचै विवंचूं गा भलीं ।
तूंकूनि घेतलीं । मोतियें जैसीं ॥ १२ ॥

**अधिष्ठानं तथा कर्त्ता करणं च पृथग्विधं ॥**
**विविधाश्च पृथक्चेष्टा दैवं चैवात्र पंचमं ॥ १४ ॥**

तैसि यथालक्षणें । आइका पां कर्मकारणें ।
तरि देह हें मीं ह्मणें । पहिलें एथ ॥ १३ ॥
ययातें अधिष्टान ऐसें । ह्मणिजे तें यया दोसें ।
जें स्वभोग्येंसीं वसे । भोक्ता एथ ॥ १४ ॥
इंद्रियांचा दाहिं हातिं । जचौनि दिवसें राती ।
सुखदुःखें प्रकृती । जोडिजति जियें ॥ १५ ॥
तियें भोगावेया पुरुषा । आनु ठावो नाहिं चि देखां ।
ह्मणौनि अनुष्टानभाषा । बोलिजे देह ॥ १६ ॥
हें चोवीसां हिं तत्वांचें । कुटुंबघर वसतिचें ।
तूटे बंधमोक्षाचें । गूंतलें एथ ॥ १७ ॥

किंबहुना अवस्थात्रया । अधिष्ठान धनंजया ।
ह्मणौनि देहा एया । हें चि नावं ॥ १८ ॥
आणि कर्त्ता जें दूजें । कर्माचें कारण जाणिजे ।
प्रतिबिंब ह्मणिजे । चैतन्याचें जें ॥ १९ ॥
आकाश चि वरिखे नीर । तेथ तळहाटीं बांधे नाडर ।
मग बिंबौनि तदाकार । होये जेवि ॥ ३२० ॥
कां निद्राभरें बहुवें । राया आपणपें ठाउवें नव्हे ।
मग स्वप्निचां माये । रंकपणीं कां ॥ २१ ॥
तैसें आपुलेनि विसरें । चैतन्य चि देहाकारें ।
आभासौनि आविष्करे । देहपणें जें ॥ २२ ॥
जेया विचाराचां देशीं । प्रसिद्धी गा जीउ ऐसी ।
जेणें भाक केली देहेंसीं । आघवां विषीं ॥ २३ ॥
पैं प्रकृति करी कर्मे । तो मियां केलीं ह्मणे भ्रमें ।
एथ कर्त्ता एणें नामें । बोलिजे जीउ ॥ २४ ॥
मग पातेयाचां केंसीं । एकी चि उठी दीठि जैसी ।
मोकळी चवरी ऐसी । चिरिवं गमे ॥ २५ ॥
कां घरा आंतु एकु । दीपाचा अवलोकु ।
गवाक्षी भेदें अनेकु । आवडे जेवि ॥ २६ ॥
तेवि बुद्धिचें एक जाणणें । श्रोत्रादिभेदें एणें ।
बाहिरि इंद्रियपणें । फांके जें कां ॥ २७ ॥
तें पृथग्विध करण । कर्माचें यया कारण ।
तिसरें गा जाण । नृपनंदना ॥ २८ ॥
आणि पूर्वपश्चिमवाहाणी । निगालेयां वोवांचिया मिळणीं ।
होये नदीनदपाणी । एक चि जेवि ॥ २९ ॥
कां एकाएकू चि पुरुषु जैसा । अनुव्रत नवां रसां ।
नवविधु ऐसा । आवडों लागे ३३० ॥

तैसी चि क्रियाशक्ति पवनीं । असे जे अनुपायनी ।
ते पडिली नाना स्थानीं । नाना होए ॥ ३१ ॥
जैं वाचे करी एणें । तैं तें चि होये बोलणें ।
हाता आली घेणें । देणें होए ॥ ३२ ॥
आगा चरणाचां ठांइं । तरि गति ते चि पाइं ।
अधोद्वारीं दोहीं । क्षरण ते चि ॥ ३३ ॥
कंदौनि कां हृदय वेऱ्हीं । प्राणायामाचीं उजिरी ।
करितां ते चि शरीरीं । प्राणु ह्मणिपे ॥ ३४ ॥
मग ऊर्ध्वचिया रिगिनिगा । पुडुतीं ते चि शक्ति पैं गा ।
उदानु ऐसिया लिंगा । पात्र जाली ॥ ३५ ॥
अधोरंध्राचेनि वाहें । अपानु हें नावं लाहे ।
व्यापकपणें होये । व्यानु ते चि ॥ ३६ ॥
आरोगिलेन रसें । शरीर भरी सरिसें ।
नाभि न संडितां असे । सर्वसंधी ॥ ३७ ॥
ऐसिया इया राहाटी । मग ते चि क्रिया पाठीं ।
समानु ऐसें किरीटी । बोलिजे गा ॥ ३८ ॥
आणि जांभे सींक ढेंकरु । ऐसैसा होंत व्यापारु ।
नाग कूर्मु कृकरु । इत्यादि होए ॥ ३९ ॥
एवं वायुची हे चेष्टा । एकी चि परीं सूभटा ।
वर्त्तता पालटा । एंतसे जे ॥ ४० ॥
ते भेदली वृत्तिपंथें । वायुक्रिया गा एथें ।
कर्मकारण चौथें । ऐसें जाण ॥ ४१ ॥
आणि ऋतु बरवा शारदु । शारदिं पुडुतीं चंद्रु ।
चंद्रि जैसा संबंधु । पूर्णिमेचा तो ॥ ४२ ॥
कां वसंतिं बरवा आरामु । आरामिं प्रियसंगमु ।
संगमिं आगमु । उपचारांचा ॥ ४३ ॥

नाना कमळीं पांडवा । विकाशु जैसा बरवा ।
विकाशीं यावा । परागांचा ॥ ४४ ॥
वाचे बरवें कवित्व । कवित्वीं बरवें रसिकत्व ।
रसिकत्वीं हि परतत्व । स्पर्श जैसा ॥ ४५ ॥
तैसी सर्ववृत्तिवैभवीं । बुद्धी चि येकली बरवी ।
बुद्धि ही बरव नवी । इंद्रियप्रौढी ॥ ४६ ॥
इंद्रियप्रौढीमंडळा । शृंगारु एकु चि लीळा ।
जें अधिष्ठात्रियांचा मेळा । देवांचा जो ॥ ४७ ॥
ह्मणौनि चक्षुरादिकिं दाहें । इंद्रियपीठीं सानुग्रहें ।
सूर्यादिकां कां आहे । सुरांचे वृंद ॥ ४८ ॥
तें देववृंद बरवें । कर्मकारण पांचवें ।
अर्जुना एथ जाणावें । देवो ह्मणति ॥ ४९ ॥
एवं माने तूझी आयणि । तैसी कर्मजातांचि हे खाणी ।
पंचविध आकरणीं । निरोपिली ॥ ३५० ॥

**शरीरवाङ्मनोभिर्यत्कर्म प्रारभते नरः ॥**
**न्याय्यं वा विपरीतं वा पंचैते तस्य हेतवः ॥ १५ ॥**

आतां हे चि खाणि वाढे । मग कर्मांची सृष्टि घडे ।
जिहिं ते हेतु उघडे । दाउं पांचें ॥ ५१ ॥
तरि अवसांत आली माधवी । हेतु होये नवी पालवीं ।
पालवीं पुष्पपुंजु दावी । पुष्प फळातें ॥ ५२ ॥
कां वारिषिया आणिजे मेघु । मेघीं वृष्टिप्रसंगु ।
वृष्टी तव भोगु । सस्यसुखाचा ॥ ५३ ॥
नाना प्राची अरुणातें विये । अरुणें सूर्योदयो होये ।
सूर्यें सकळ पाहे । दिवो जैसा ॥ ५४ ॥
तैसें मन हेतु पांडवा । होये कर्मसंकल्पभावा ।
तो संकल्पु लावी दीवा । वाचेचा गा ॥ ५५ ॥

मग वाचेचा तो दिवटा । दावी कृत्यजाताचिया वाटा ।
तेव्हां कर्त्ता रिगे कामठां । कर्तृत्वाचां ॥ ५६ ॥
तेथ शरीरादिदळवाडें । शरीरादिहेतु घडे ।
जैसें लोहकर्म लोखंडें । निर्वाळिजे ॥ ५७ ॥
कां तांथुवाचा ताणा । तांथु घालितां वोइरणा ।
तंतुमय चि विचक्षणा । होये पटु ॥ ५८ ॥
तैसें मनावाचे देहाचें । कर्म मनादि हेतु रचे ।
रत्नीं घडे रत्नाचें । दळवाडें जेवि ॥ ५९ ॥
एथ शरीरादिकें कारणें । तें चि हेतु केवि हें कोणें ।
आक्षेपिजे तरि तेणें । अवधारिजो ॥ ३६० ॥
आइकें सूर्याचेया प्रकाशा । हेतुकारण सूर्यो चि जैसा ।
कां ऊंसाचें कांडें ऊंसा । वाढी हेतू ॥ ६१ ॥
नाना वाग्देवता वानावी । तैं वाचा चि लागे कामवावी ।
कां वेदा वेदें चि बोलावी । प्रतिष्ठा जे ॥ ६२ ॥
तैसि कर्मा शरीरादिकें । कारण हें किर ठाउकें ।
परि हें चि हेतु न चुके । हें इं एथ ॥ ६३ ॥
आणि देहादिकिं कारणिं । देहादिहेतु मिळणीं ।
होये जेयां उभारणीं । कर्मजातां ॥ ६४ ॥
तें शास्त्रार्थे मानिलेयां । मार्गानुसारें धनंजया ।
तरि न्याओ तो न्याया । हेतु होए ॥ ६५ ॥
जैसा पर्जन्योदकाचा लोटु । विपायें धरी साळिचा पाटु ।
जन्हि जिरे परि अचाटु । उपेगु आथि ॥ ६६ ॥
कां रोसें निगालें अवचटें । पडिलें द्वारकेचिये वाटे ।
तें सीणे तऱ्हीं सुनाटें । न वचती पदें ॥ ६७ ॥
तैसें हेतुकारण मेळें । उठी कर्म आंधळें ।
तें शास्त्रांचे लाहे डोळे । तैं न्याय ह्मणिपे ॥ ६८ ॥

ना दूध वाढिता ठाउ न पवे । तवं उलंडौनि जाये स्वभावें ।
तो ही वेचु पारि नोहे । वेचलें तें ॥ ६९ ॥
तैसें शास्त्रसाह्यें विण । केलें नोहे अकारण ।
तरि लंगो पां नागवण । दानलेखिं ॥ ३७० ॥
आगा बावना वर्णां परौता । कोण्हीं मंत्रु आहे पांडुसुता ।
कां बावना हिं नुचारितां । जीउ आथि ॥ ७१ ॥
परि मंत्राची कडसणी । जवं नेणिजे कोदंडपाणी ।
तवं उच्चारफल वाणी । न पवे जेवि ॥ ७२ ॥
तेवि कारणहेतुयोगें । जें बीसाट कर्म निगे ।
तें शास्त्रांचिये न लगे । कसे जवं ॥ ७३ ॥
कर्म होंतसे तेव्हां इं । परि होणे नव्हे पाहिं ।
तो अन्याउ गा अन्याइं । हेतु जाणावा ॥ ७४ ॥
एवं पंचकारणका कर्मा । पांच ही हेतु हे सुवर्मा ।
आतां पाहे पां आत्मा । सांपडला असे ॥ ७५ ॥

**तत्रैवं सति कर्तारमात्मानं केवलं तु यः ॥**
**पश्यत्यकृतबुद्धित्वान्न स पश्यति दुर्म्मतिः ॥ १६ ॥**

भानु नोहुनि रूपें जैसीं । चक्षुरूपातें कां प्रकाशी ।
आत्मा नोहूनि कर्में तैसीं । प्रकटित असे ॥ ७६ ॥
पैं प्रतिबिंब आरिसा । दोन्हीं नोहुनि वीरेषा ।
दोहींतें प्रकाशी जैसा । निहालिता तो ॥ ७७ ॥
कां अहोरात्र हें सविता । नोहुनि करी पांडुसुता ।
तैसा आत्मा कर्मकर्त्ता । नोहोंतु दीवी ॥ ७८ ॥
तरि देहाअहंमानभूली । जेयाची बुद्धि देह आतली ।
जेया आत्मविषीं जाली । मध्यमरात्रि ॥ ७९ ॥
जेणें चैतन्या ईश्वरा ब्रह्मा । देह चि केलें परम सीमा ।
तेया आत्मा कर्त्ता हे प्रेमा । आलोट उपजे ॥ ३८० ॥

जें आत्मा मी कर्मातीतु । सर्वकर्मा साक्षिभूतु ।
हे आपुली कहीं मातु । नाइके चि ॥ ८१ ॥
ह्मणौनि उमपा आत्मेयांतें । देह वरि मवी येथें ।
विचित्र काइ रात्रि देहातें । डुडुळ करी ॥ ८२ ॥
पैं जेणें आकाशाचा कहिं । साच सूर्यो देखिला नाहिं ।
तो थिलरिचें बिंब काई । मानूं न ल्हाए ॥ ८३ ॥
थिलराचेनि जालेपणें । सूर्यासि आणी होणें ।
तेयाचां नासिं नासणें । कंपें कंपु ॥ ८४ ॥
आगा निद्रिता चेऊं न ये । तवं स्वप्न साच हों ल्हाए ।
दोरी नेणतां सर्पे बिहे । विस्मो कवणु ॥ ८५ ॥
जवं कवलु आथि डोलां । तवं चंद्रु देखावा पीवला ।
काइ मृगीं हीं मृगजला । भावावें ना ॥ ८६ ॥
तैसें शास्त्रागुरूचेनि नावें । जो वारा ही टेंकों नेंदी सींवे ।
केवल मौढ्याचेनि जीवें । जियाला जो ॥ ८७ ॥
तेणें देहात्मदृष्टिमूलें । आत्मेयां घापे देहाचें जालें ।
जैसा अभ्रिचा वेगु कोल्हें । चंद्रीं मानी ॥ ८८ ॥
मग तेया मानणेयां साठिं । देहबंदिसाले किरीटी ।
कर्माचां वज्रगांठीं । कालासे तो ॥ ८९ ॥
पाहे पां बंधभावना दृढा । नलिये वरि तो बापुडा ।
काइ मोकलां हिं चवडां । न ठके चि पूंसा ॥ ३९० ॥
ह्मणौनि निर्मले आत्मरूपीं । जो प्रकृतिचें केलें आरोपी ।
तो कल्पकोडिचां मापीं । मवी कर्मे ॥ ९१ ॥

**यस्य नाहंकृतो भावो बुद्धिर्यस्य न लिप्यते ॥**
**हत्वापि स इमां लोकान्नहंति न निबध्यते ॥ १७ ॥**

आतां कर्मा माझि असे । परि तेयातें कर्म न स्पर्शे ।
वडवानलातें जैसें । समुद्रोदक ॥ ९२ ॥

तैसें वेगळेपणें । जेयाचें कर्मिं असणें ।
तो किर जाणावा कवणें । तर्‍हीं काहिं सांघों ॥ ९३ ॥
जें मुक्ततें निर्द्धारितां । लाभे आपुली चि मुक्तता ।
जैसें दीसे दीपु पांतां । आपुली वस्तु ॥ ९४ ॥
नाना आरिसा जवं उटिजे । तवं आपणेयां आपण भेटिजे ।
कां पाणी पांतां पाणीं होइजे । लवणें जेवि ॥ ९५ ॥
हें असो परतौनि मावौतें । प्रतिबिंब पाहे बिंबातें ।
तवं पाहाणें जाउनि आइतें । बिंब चि उरे ॥ ९६ ॥
तैसें हारतलें आपण पावें । तैं संतातें पांतां गिवसावें ।
ह्मणौनि वानावे आइकावे । ते चि सदा ॥ ९७ ॥
तरि कर्मिं असौनि कर्में । जो नावरे समविषमें ।
चर्मचक्षूचेनि चर्में । दीठि जैसी ॥ ९८ ॥
तैसा सोडिला जो आहे । तेयाचें रूप आतां पाहे ।
उपपत्तिची बाहे । उभूनि सांवों ॥ ९९ ॥
तरि अविद्येचिया नीदा । विश्वस्वप्नाचा हा धांधा ।
भोगित होंता प्रबुद्धा । अनादि जो ॥ ४०० ॥
तो महावाक्याचेनि नावें । गुरुकृपेचेनि थावें ।
माथां हातु ठेवणें नोहे । थापटिला जैसा ॥ १ ॥
तैसी विश्वस्वप्नेंसि माया । नीद सांडौनि धनंजया ।
सहसा चेइला अद्वया—। नंदपणें जो ॥ २ ॥
तेधवां मृगजळाचे पूर । दीसति एक निरंतर ।
हारपति कां चंद्रकर । फांकतां जैसे ॥ ३ ॥
कां बालकत्व निगौनि जाए । तैं बागुला नाहिं त्राए ।
पैं जळालेयां इंधन नोहे । इंधन जेवि ॥ ४ ॥
नाना चेउनि आलेयां पाठीं । तें स्वप्न न दिसे दीठी ।
तैसें अहंमम ना किरीटी । नुरे चि तेया ॥ ५ ॥

मग सूर्यु आंधारा लागि । रिगो पां भलेतिये सुरंगीं ।
पारि तो तेयाचां भागीं । नाहीं चि जैसा ॥ ६ ॥
तैसा आत्मतत्वें वेंठला होए । तो जेया जेया दृश्यातें पाहे ।
तें दृश्य द्रष्टेनसिं होंत जाये । तेयाचें चि रूप ॥ ७ ॥
जैसा वन्हि जेया लागे । तें वन्ही चि जालें आंगें ।
दाह्यदाहकविभागें । सांडिजे तें ॥ ८ ॥
तैसा कर्माकारा दूजेया । तो करितेपणांचा आत्मेया ।
अवल्हाउ ये तो गेलेयां । काहिं उरे ॥ ९ ॥
तिये आत्मस्थितिचा जो राउ । तो मग जाणे देहिं इये ठावो ।
काइ प्रलयांबुचा उमाहो । वोघु मानी ॥ ४१० ॥
तैसी ते पूर्णा अहंता । कां देहपणें पांडुसुता ।
आवरे काइ सविता । बिंबें धरिला ॥ ११ ॥
पैं मथूनि लोणीं घेपे । तें मावौतें ताकीं घापे ।
तरि तेयाचें पण सिंपे । तेणें चि काइ ॥ १२ ॥
नाना काष्टौनि वीरेषा । वेगळविलेयां हुताशा ।
राहे काष्टाचेया मांदुसा । कोंडलेपणें ॥ १३ ॥
कां रात्रिचेया पोटा आंतु । रिगाला जो कां भास्वतु ।
तो रात्रि ऐसी मातु । आइके काइ ॥ १४ ॥
तैसें वेद्यवेदकपणेंसिं । पडिलें जेयाचां ग्रासिं ।
तेया देह मीं हे ऐसी । अहंता कैंची ॥ १५ ॥
आणि आकाशें जेथजेथौनि । जावें तेथ असे भरौनि ।
ह्मणौनि ठेलें कां अडौनि । आपें आप ॥ १६ ॥
तैसें जें तेणें करावें । तें तो चि आहे स्वभावें ।
मा कोण्हीं कर्मि वेंठावें । कर्त्तेपणें ॥ १७ ॥
नूरे चि गगनाचा ठाउ । नव्हे चि समुद्रीं वाहो ।
नूठी चि ध्रुवा जावो । तैसें जालें ॥ १८ ॥

ऐसेनि अहंकृतीभावो । जेयाचां बोधि जाला वाऊ ।
तऱ्हीं देहा जवं निर्वाहो । तवं आथि कर्म ॥ १९ ॥
आगा वारा जऱ्हीं वाजों सरे । तऱ्हीं तो डोलु रूखीं उरे ।
कां सेंदे द्रुति राहे कापुरें । वेचलेनि हीं ॥ ४२० ॥
सरलेयां गीताचा समारंभु । न वचे राहलेपणाचा सोभु ।
भुइं लोलौनि गेलें अंभु । वोल थारे ॥ २१ ॥
आगा मावळलें हीं अर्कें । संध्येचिये भूमिके ।
ज्योति दीप्ति कवतिकें । दीसे जेवि ॥ २२ ॥
पैं लक्ष भेदिलयां हिं वरि । सरु धांवे चि तवं वेऱ्हीं ।
जवं आहे उजिरी । बळाची ते ॥ २३ ॥
नाना चांकिं भांडें जालें । तें कुंभारें परौतें नेलें ।
तऱ्हीं भवे चि तें मागिलें । भवंडिलेपणें ॥ २४ ॥
तैसा देहाभिमानु गेलेयां । देह जेणें स्वभावें धनंजया ।
जालें तो आपैसेया । चेष्टवी चि तें ॥ २५ ॥
संकल्पें विण स्वप्न । न लवितां दांगिचें वन ।
न रचितां गंधर्वभुवन । उठी जैसें ॥ २६ ॥
आत्मेयांचेन उद्यमें विण । तैसें देहादिपंचकारण ।
होये आपणेयां आपण । क्रियाजात ॥ २७ ॥
पैं प्राचीनसंस्कारशेषें । पांचै कारणें सहेतुकें ।
कामविजति गा अनेकें । कर्माकारें ॥ २८ ॥
तेया कर्मां माझि मग । संहारो आघवें जग ।
अथवा नवें चांग । आन करवो ॥ २९ ॥
परि कुमुद कैसें सूके । कैसें तें कमळ फांके ।
यें दोन्हीं रवी न देखे । जिया परीं ॥ ४३० ॥
कां वीजु वरिखौनि अभाळ । ठिकारिया आंतौनि भुतळ ।
अथवा करू साङ्ग्ल । प्रसन्ना वृष्टी ॥ ३१ ॥

परि तेयां दोहींतें जैसें । नेणिजे कां आकाशें ।
तैसा चि देहीं जो असे । विदेहदृष्टी ॥ ३२ ॥
तो देहादिकिं चेष्टीं । घडतां मोडतां हिं सृष्टी ।
न देखे स्वप्न किरीटी । चेइला जैसा ॥ ३३ ॥
यऱ्हवीं चामाचे डोळे वेऱ्हीं । जे देखति देहधारी ।
तें किर तो व्यापारीं । ऐसें चि मानीति ॥ ३४ ॥
काइ तणाचा बाउला । जो आगरा मेरे ठेविला ।
तो साचू चि राखता कोल्हां । मानिजे नां ॥ ३५ ॥
पिसेया नेसलें नागिवें । हें लोकिं येउनि जाणावें ।
टाणौरियाचे मवावे । आणिकिं घाये ॥ ३६ ॥
कां महासतीयेचे भोग । देखे किर आघवें जग ।
परि ते आगि ना आंग । ना लोकु देखे ॥ ३७ ॥
तैसा स्वस्वरूपें उठिला । जो दृश्येंसिं द्रष्टा आटला ।
तो नेणे काइ राहाटला । इंद्रियग्रामु ॥ ३८ ॥
आगा थोरीं कल्लोलीं साने । लोपतां तिरिचेनि जनें ।
एकिं एक गीळिलें हें मनें । मानिजे जऱ्हीं ॥ ३९ ॥
तऱ्हीं पाणियां कडे पाहिं । कोण्हीं गीळिजतसे काइ ।
तैसें पूर्णा दूजे नाहिं । जें तो मारी ॥ ४४० ॥
सोनेयांची कां चंद्रिका । सुवर्णसूळें चि देखां ।
सोनेयांचिया महिषा । नाशु केला ॥ ४१ ॥
तो देवलविसेंया कडां । व्यवहारु गमला फुडा ।
वांचौनि सूळु महिषु चामुंडा । सोनें चि असे ॥ ४२ ॥
पैं चित्रिचें पाणी हुताशु । तो दीटी चि भागु आभासु ।
पटिं आगि ना वोल्हासु । दोन्ही नाहिं ॥ ४३ ॥
मुक्ताचें देह तैसें । हालत संस्कारवसें ।
देखौनि लोक पींसे । कर्त्ता ह्मणती ॥ ४४ ॥

आणि तेया करणेयां आंतु । घडे तिहिं लोकां घातु ।
परि तेणें केला हे मातु । बोलों नेए ॥ ४५ ॥
तवं आंधारु चि देखावा तेजें । मा तें फेडि हें केवि बोलिजे ।
तैसें ज्ञानियां नाहिं दूजें । करील काई ॥ ४६ ॥
ह्मणौनि तेयाची बुद्धि । नेणे पापपुण्याची गंधि ।
गंगा मीनलेयां नदी । विटाळु जैसा ॥ ४७ ॥
आगी आगि लागलेयां । काहिं पोळे धनंजया ।
किं शस्त्र रूपें आपणेयां । आपणचि काइ ॥ ४८ ॥
तैसें आपणपेयां परौतें । जो नेणे क्रियाजातातें ।
तेथ काइ लिंपवी बुद्धितें । तेयाचिये ॥ ४९ ॥
ह्मणौनि कार्यकर्त्ताक्रिया । हें स्वरूप चि जालें जेया ।
नाहिं शरीरादिकिं तेया । कर्मबंधु ॥ ४५० ॥
जें कर्त्ता जीउ विंदाणीं । काढौनि पांचै खाणी ।
घडीत आहे करणीं । आउतीं दाहें ॥ ५१ ॥
तेथ न्याउ आणि अन्याउ । हा द्विविधु साधूनि आवो ।
उभितां न लवी ठेउ । कर्मभुवनें ॥ ५२ ॥
या थोराडा किर कामां । विरजा नोहे का आत्मां ।
परि ह्मणसी हान उपक्रमां । हातु लावी ॥ ५३ ॥
तो साक्षी चिद्रूपु । कर्मप्रवृत्तिचा संकल्पु ।
उठी तो कां निरोपु । आपण चि दे ॥ ५४ ॥
तरि कर्मप्रवृत्ती ही लागि । तेया आयासु नाहिं आगीं ।
जे प्रवृत्तिचे उलगीं । लोक चि आथि ॥ ५५ ॥
ह्मणौनि आत्मेयाचें केवळ । जो रूप चि जाला निर्मळ ।
तेया नाहिं बंदिसाळ । कर्माची हे ॥ ५६ ॥

**ज्ञानं ज्ञेयं परिज्ञाता त्रिविधा कर्मचोदना ॥**
**करणं कर्म कर्त्तेति त्रिविधः कर्मसंग्रहः ॥ १८ ॥**

परि अज्ञानाचां पटीं । अन्यथाज्ञानाचें चित्र उठी ।
तेथ चि तारणी हे त्रिपुटी । प्रसिद्ध जे ॥ ५७ ॥
तें चि ज्ञाताज्ञानज्ञेय । हें जें जगाचें बीजत्रय ।
तें कर्मा चि निसंदेह । प्रवृत्ति जाण ॥ ५८ ॥
आतां या चि गा त्रया । व्यक्ती वेगळालिया ।
आइकें धनंजया । करूं रूप ॥ ५९ ॥
तरि जीवसूर्यबिंबिचे । जे रश्मि श्रोत्रादिकिं पांचें ।
धावौनि विषयपद्माचे । फोडिति मढ ॥ ४६० ॥
कां जीवनृपाचे उपलाणे । घेउनि इंद्रियांचिं केंकाणें ।
विषयदेशिचिये नागवणे । आणिती जे ॥ ६१ ॥
हें असो इंद्रिय राहाटे । जें सुखदुःखासीं जीवा भेटे ।
ते सुषुप्तिकाळीं वावाटे । जेथ ज्ञान ॥ ६२ ॥
तेया जीवा नावं ज्ञाता । आणि हें जें सांघितलें आतां ।
तें चि एथ पांडुसुता । ज्ञान जाण ॥ ६३ ॥
जें अविद्येचिये पोटीं । उपजत खेऊ किरीटी ।
आपणेयांतें वांटी । तिहिं ठांइं ॥ ६४ ॥
आपुलिये धांवे पुढां । घालूनि ज्ञेयाचा गुढा ।
उभारी मागिला कडां । ज्ञातृत्वातें ॥ ६५ ॥
ज्ञातेया ज्ञेया दोघां । तो नांदुणुकेचा बगा ।
माजि जालेनि पैं गा । व्राहे जेणें ॥ ६६ ॥
टाकूनि ज्ञेयाची सीवं । पुरे जेयाची धावं ।
सकळपदार्थां नावं । सूंतसे जें ॥ ६७ ॥
तें गा सामान्यज्ञान । एथ नाहिं आन ।
ज्ञेयाचें हिं चिन्ह । आइक आतां ॥ ६८ ॥
तरि शब्दस्पर्शु । रूपगंधरसु ।
हा पंचविध आभासु । ज्ञेयाचा जो ॥ ६९ ॥

जैसें एकें चि चुतफळें । इंद्रियां वेगळवेगळें ।
रसें वर्णें परिमळें । भेटिजे स्पर्शें ॥ ४७० ॥
तैसें ज्ञेय तरि एकसरें । परि ज्ञान इंद्रियद्वारें ।
घे ह्मणौनि प्रकारें । पांचें जालें ॥ ७१ ॥
आणि समुद्रीं वोघांचें जाणें । सरे लाणी पासिं धावणें ।
कां फळिं सरे वाढणें । सस्याचें जेवि ॥ ७२ ॥
तेवि इंद्रियांचां वाटीं । धावं तेया ज्ञानासि जेथ ठी ।
होये तें गा किरीटी । विषयज्ञेय ॥ ७३ ॥
एवं ज्ञातेया ज्ञाना ज्ञेया । तिंहिं रूप केलें धनंजया ।
ते हे त्रिविध सर्वक्रिया— । प्रवृत्ति जाण ॥ ७४ ॥
जें शद्बादिविषय । हें पंचविध ज्ञेय ।
तें चि प्रिय कां अप्रिय । एकी परिचें ॥ ७५ ॥
ज्ञान मोटकें ज्ञातेया । डावी ना जवं धनंजया ।
तवं स्वीकारा कां त्यजावेया । प्रवर्ते चि तो ॥ ७६ ॥
परि मीनातें देखौनि बकु । जैसा निधानातें रंकु ।
कां स्त्री देखौनि कामिकु । प्रवृत्ति धरी ॥ ७७ ॥
जैसें खोलां धांवे पाणी । भवंरु फुलाचिये वाहाणी ।
नाना सूटला सांजवणी । वत्सू चि पां ॥ ७८ ॥
आगा स्वर्गिची उर्वशी । आइकौनि जेवि माणुसिं ।
वरता लागति आकाशीं । यागाचिया ॥ ७९ ॥
पैं पारिवा जैसा किरीटी । चडला नभाचिये पोटीं ।
पारिवी देखौनि लोटी । आंग सगळें ॥ ४८० ॥
हें ना घनगर्जिता सरिसा । मोरु वोवांडे आकाशा ।
ज्ञाता ज्ञेय देखौनि तैसा । धावं चि घे ॥ ८१ ॥
ह्मणौनि ज्ञानज्ञेयज्ञाता । हें त्रिविध गा पांडुसुता ।
होये चि कर्मा समस्तां । प्रवृत्ति एथ ॥ ८२ ॥

तरि तें चि ज्ञेय विषयें । जरि ज्ञातेयाचें प्रिय होये ।
तरि भोगावेया न साहे । क्षणु हिं भरि ॥ ८३ ॥
नातरि अवचटे । तें वीरू होउनि भेटे ।
तरि युगांत वाटे । सोडावेया ॥ ८४ ॥
व्याला कां हारा । वरिपडा जालेयां नरा ।
हरिखु आणि दरारा । सरिसा चि उठी ॥ ८५ ॥
तैसें ज्ञेयें प्रियाप्रियें । देखौनि ज्ञातेया होये ।
मग त्याग स्वीकारीं वाहे । व्यापारातें ॥ ८६ ॥
तेथ रागीं प्रतिमल्लाचां । गोसांवि सर्वदलाचा ।
रथु सांडूनि पायांचा । होये जैसा ॥ ८७ ॥
तैसें ज्ञातेपण जें असे । तें ए कर्त्ता ऐसिये दशे ।
जेवितें बैठलें जैसें । रंधन करु ॥ ८८ ॥
कां भवरें चि केला मला । वोरकलू चि जाला आंकसाला ।
नाना देउ रिगाला देउला— । चेया कामां ॥ ८९ ॥
तैसा ज्ञेयाचिया हावां । ज्ञाता इंद्रियांचा मेळावा ।
राहाटवी तेथ पांडवा । कर्त्ता होए ॥ ४९० ॥
आणि आपण चि होउनि कर्त्ता । ज्ञाना आणी करणता ।
तेथ ज्ञेय चि स्वभावता । कार्य होये ॥ ९१ ॥
ऐसा ज्ञानाचिया युगुती । पालटु पडे गा सुमती ।
डोलेयांची शोभा राती । पालटे जैसी ॥ ९२ ॥
कां अदृष्ट जालेयां उदासु । पालटे श्रीमंतांचा उल्हासु ।
पुनिवे पाठीं शीतांशु । पालटे जैसा ॥ ९३ ॥
तैसें चालितां करणें । ज्ञाता वेंठिजे कर्त्तेपणें ।
तेथिचीं हीं लक्षणें । आइक आतां ॥ ९४ ॥
तरि बुद्धि आणि मन । चित्त अहंकारु हान ।
हें चतुर्विध चिन्ह । अंतष्करणाचें ॥ ९५ ॥

बाहीरिं त्वचा श्रवण । चक्षु रसना घ्राण ।
हें पंचविध जाण । ज्ञानेंद्रिय गा ॥ ९६ ॥
तेथ आंतुलें तवं करणें । कर्त्ता कर्त्तव्या घे उमाणें ।
मग तें चि जरि जाणे । सुखा येतां ॥ ९७ ॥
तरि बाहिरिलें तियें हीं । चक्षुरादिकें दाही ।
उठूनियां लवलाहीं । व्यापारा सुए ॥ ९८ ॥
मग तो इंद्रियकदंबु । करविजे तवं रावु ।
जवं कर्त्तव्याचा लाभु । हातासि ए ॥ ९९ ॥
नातरि कर्त्तव्य जरि दुःखें । फळैल हान ऐसें देखे ।
तरि लावी त्यागमुखें । तियें चि दाही ॥ ५०० ॥
मग फीटे दुःखाचा ठाउ । तवं राहाटवी रातिदिउ ।
विकणु आर्ते राउ । जिया परीं ॥ १ ॥
तैसेनि त्यागस्वीकारीं । वाहातां इंद्रियाचां धुरीं ।
ज्ञातेयातें अवधारीं । कर्त्ता ह्मणिपे ॥ २ ॥
आणि कर्त्तयाचां सर्वकर्मीं । आउतांचिया परी क्षमी ।
ह्मणौनि इंद्रियांतें आह्मीं । करणें ह्मणों ॥ ३ ॥
आणि हें चि करण वेरी । कर्त्ता क्रिया जे उभारी ।
तिया व्यापे तें अवधारीं । कर्म एथ ॥ ४ ॥
सोनाराचिया बुद्धी लेणें । व्यापे चंद्रकरीं चांदिणें ।
कां वेल्हाळपणें । वेलि जैसी ॥ ५ ॥
नाना प्रभा व्यापे प्रकाशु । गोडिया इक्षुरसु ।
हें असो अवकाशु । आकाशें जैसा ॥ ६ ॥
तैसें कर्त्तयाचिया क्रिया । व्यापलें जें धनंजया ।
तें कर्म गा बोलावेया । नाहीं आन ॥ ७ ॥
एवं कर्त्ताकर्मकरण । इयां तिहींचें हें लक्षण ।
दाविलें तुज विचक्षण— । शिरोमणी ॥ ८ ॥

ज्ञानं कर्म च कर्त्ता च त्रिधैव गुणभेदतः ॥
प्रोच्यते गुणसंख्याने यथावच्छृणु तान्यपि ॥

एथ ज्ञाताज्ञानज्ञेय । हें कर्माचें प्रवृत्तित्रय ।
तैसें चि कर्त्ताकरणकार्य । हा कर्मसंचयो ॥ ९ ॥
तिहिं वेठला ऐसा धर्मु । आथि बीजिं जेवि द्रुमु ।
कां मनीं जोडे कामु । सदा जैसा ॥ ५१० ॥
तैसें कर्त्ताक्रियाकरणीं । कर्माचें असे जितवणी ।
सोनें जैसें खाणी । सोनेयांचिये ॥ ११ ॥
ह्मणौनि हें कार्य मीं कर्त्ता । ऐसें आथि जेथ पांडुसुता ।
तेथ आत्मा दूरिं समस्तां । क्रियां पासीं ॥ १२ ॥
या लागि पुडुतीं । आत्मा वेगळा चि सुमती ।
आणि असो हें केती । जाणतासि तूं ॥ १३ ॥
परि सांघितलें जें ज्ञान । कर्म हें कर्त्ता हान ।
तें तिहिं ठांइ भिन्न । गुणीं आथि ॥ १४ ॥
ह्मणौनि ज्ञानकर्मकर्त्तेया । पांती एउ न ये धनंजया ।
जें दोनि बांधति सोडावेया । एक चि प्रौढ ॥ १५ ॥
तें सात्विक होआवें ठाउवें । गुणभेदु सांघों पाहे ।
जो सांख्यशास्त्रिं आहे । उवाइला ॥ १६ ॥
जें विचारा क्षीरसमुद्रु । स्वबोधकुमुदिनीचंद्रु ।
ज्ञानडोळसां नरेंद्रु । शास्त्रांचें जें ॥ १७ ॥
किं प्रकृतिपुरुषें दोन्हीं । मिसळीं दिवोरजनी ।
तियें निवडितां त्रिभुवनीं । मार्तंड जें ॥ १८ ॥
जेथ अपारमोहरासी । तत्वाचां मापीं चौविसीं ।
उमाणें घेउनि परेसीं । सुखाडिजे ॥ १९ ॥
अर्जुना तें सांख्यशास्त्र । पढे जेयाचें स्तोत्र ।
तें गुणभेदविचित्र । ऐसें आहे ॥ ५२० ॥

जें आपुलेनि अंगिकें । त्रिविधपणाचेनि अंकें
दृश्यजात तेतुकें । अंकित केलें ॥ २१ ॥
एयां सत्वरजतमां । तिहिं एवडी असे महिमा ।
जें त्रिविध आदिब्रह्मा । अतिक्रमीं ॥ २२ ॥
परि विश्विची आघवी मांदी । जेणें भेदलेनि गुणभेदीं ।
पडिली तें तवं आदीं । ज्ञान सांघों ॥ २३ ॥
जें दीठी जरि चोख कीजे । तरि भलेतें चोख चि सुझे ।
तैसें ज्ञानें शुद्धें लाहिजे । सवें शुद्ध ॥ २४ ॥
ह्मणौनि तें सात्विकज्ञान । आतां सांघों दे अवधान ।
कैवल्यगुणनिधान । श्रीकृष्णु ह्मणे ॥ २५ ॥

**सर्वभूतेषु येनैकं भावमव्ययमीक्षते ॥**
**अविभक्तं विभक्तेषु तज्ज्ञानं विद्धि सात्विकं ॥ २० ॥**

तरि अर्जुना गा तें फुडें । सात्विकज्ञान चोखडें ।
जेयाचां उदईं ज्ञेय बुडे । ज्ञातेनसिं ॥ २६ ॥
जैसा सूर्यो नेदखे आंधारें । सरिता नेणिजति सागरें ।
कां कवलियां न धरे । आत्मछाया ॥ २७ ॥
तिया परीं जिया ज्ञाना । शिवादि तृणावसाना ।
इया भूतव्यक्ती भिन्ना । नाडळति ॥ २८ ॥
जैसें हातें चित्र पांतां । होये पाणियें मीठ धूंतां ।
कां चेउनि स्वप्ना येंतां । जैसें होये ॥ २९ ॥
तैसें ज्ञानें एणें । करितां ज्ञातव्याचें पाहाणें ।
न जाणतां न जाणणें । जाणावें उरे ॥ ५३० ॥
पैं सोनें आटौनि लेणीं । न कढीति आपुलेया आणी ।
कां तरंग न घेपति पाणीं । गाळुनि जैसें ॥ ३१ ॥
तैसी ज्ञेयाज्ञानाचेया हाता । न लगे हे दृश्यपथा ।
तें ज्ञान जाण सर्वथा । सात्वीक गा ॥ ३२ ॥

आरिसा पाउं जातां कोडें । जैसें पातें चि रिघे पुढें ।
तैसें ज्ञेय लोटूनि पडे । ज्ञाता चि जें ॥ ३३ ॥
पुढती तें चि सात्विकज्ञान । जें मोक्षलक्ष्मीचें भुवन ।
हें असो आइकें चिन्ह । राजसाचें ॥ ३४ ॥

**पृथक्त्वेन तु यद्ज्ञानं नानाभावान्पृथग्विधान् ॥**
**वेत्ति सर्वेषु भूतेषु तद्ज्ञानं विद्धि राजसं ॥ २१ ॥**

परि पार्था परियस । तें ज्ञान राजस ।
जें भेदाची कास । धरूनि चाले ॥ ३५ ॥
विचित्रता भूतांचिया । आपण आंतूनि टीकरीया ।
बहुचकें ज्ञातेया । आणिली जेणें ॥ ३६ ॥
जैसें साचा रूपा आड । घालूनि विसराचें कवाड ।
मग स्वप्निचें काबाड । वोइरी निद्रा ॥ ३७ ॥
तैसें स्वज्ञानाचिये पौली । बाहिरि मिथ्याचां महाखेलीं ।
तिहिं अवस्थांचिया बाहाली । दावी जें जीवा ॥ ३८ ॥
अलंकारपणें झांकलें । वोला सोनें कां वायां गेलें ।
तैसें नामरूपिं दुराविलें । अद्वैत जेया ॥ ३९ ॥
अवतरली गाडुवां घडां । पृथ्वी अनोलख जाली मूढां ।
वन्हि होउनि ठेला कानवडा । दीपा साठिं ॥ ५४० ॥
कां वस्त्रपणाचेनि आटोपें । मूर्खा प्रति तंतु हारपे ।
नाना मुग्धां पटु लपे । दाउनि चित्र ॥ ४१ ॥
तैसी जेया ज्ञाना । जाणौ भूतव्यक्ती भिन्ना ।
ऐक्यबोधाची वासना । निमौनि गेली ॥ ४२ ॥
मग इंधनीं भेदला अनलु । फुला वरि परिमलु ।
कां जलभेदें सकलु । चंद्रु जैसा ॥ ४३ ॥
तैसे पदार्थभेद बहुवस । जाणों लाहान वेस ।
आंतलें तें राजस । ज्ञान एथ ॥ ४४ ॥

पदत्कृत्स्नवदेकस्मिन्कार्ये सक्तमहैतुकं ॥
अतत्वार्थवदल्पं च तत्तामसमुदाहृतम् ॥ २२ ॥

आतां तामसाचें लिंग । सांघेन उ्लख चांग ।
डावलावेया मातंग– । सदनु जैसें ॥ ४५ ॥
तरि किरीटी जें ज्ञान । हिंडे विधीचेनि वस्त्रें हीन ।
श्रुति पाठिमोरी नग्न । ह्मणौनि तेया ॥ ४६ ॥
येरें ही शास्त्रबहिकरीं । जें निंदेचे इटाल वेन्हीं ।
बोलविलेंसे डोंगरीं । म्लेंछधर्माचां ॥ ४७ ॥
जें गा ज्ञान ऐसें । गुणाग्रहें तामसें ।
घेतलें भवे पींसें । होउनियां ४८ ॥
जें सोइरीके बंधु नेणे । पदार्थी निषेध न ह्मणे ।
निरोविलें जैसें सुणें । सुना गावीं ॥ ४९ ॥
तेया तोंडि जें नाडले । कां खांतां जेणें पोले ।
तें चि एक वाले । एर घे चि ॥ ५५० ॥
पैं सोनें चोरितां उंदिरु । न ह्मणे थरुविथरु ।
नेणे मांसखाइरु । कालें गोरें ॥ ५१ ॥
नाना वना माझि वोहिरी । कडसणी जेवि न करी ।
कां जींत मेलें न विचारी । वैसतां मासी ॥ ५२ ॥
आगा वांती वाढलेया । साजुकां कां सडिलेयां ।
विवेकु काउलेया । नाहिं जैसा ॥ ५३ ॥
तैसें निषिद्ध सांडूनि जावें । कां विहित आदरें घेयावें ।
हें विषयांचेनि नावें । नेणे चि जें ॥ ५४ ॥
जेतुलें आड पडे दीठीं । तेतुलें वे विषयां साठीं ।
मग स्त्री द्रव्य वांटी । सिष्णोदरीं ॥ ५५ ॥
तीर्थ अतीर्थ हे भाषा । उदकिं ना सनोलख ।
ताहान बोळे तें सुख । वांचूनियां ॥ ५६ ॥

तेया चि परीं खाद्याखाद्य । ना न ह्मणे निंद्यानिंद्य ।
तोंडा आवडे तें मेध्य । ऐसा बोधु ॥ ५७ ॥
आणि स्त्रीजात जेतुकें । त्वगिंद्रिय चि ओळखे ।
तिये विखिं सोइरिकें । एकु चि बंधु ॥ ५८ ॥
पैं स्वार्थी जें उपकरे । तेया चि नात्रं सोयरें ।
देहसंबंधु न सरे । जिये ज्ञानिं ॥ ५९ ॥
मृत्युचें आवत्रें चिन्ह । आघवें चि आगी इंधन ।
तैसें जग चि आपुलें धन । तामसाज्ञानां ॥ ५६० ॥
ऐसेनि विश्व सकळ । जें विखा आंतुलें केवळ ।
तेया एकें जाणे फळ । देहभरण ॥ ६१ ॥
आकाशपतिता नीरा । जैसा सिंधू चि एकु थारा ।
तैसें कृत्यजाता उदरा । लागि चि बुझे ६२ ॥
वांचूनि स्वर्ग नरक आथि । तेया हेतू प्रवृत्तिनिवृत्ति ।
इये अघवियें चि राती । जाणीवेचि ते ॥ ६३ ॥
देहखंडा नात्रं आत्मा । ईश्वरु पाखाणप्रतिमां ।
इया परौता प्रेमा । वाढों नेणे ॥ ६४ ॥
ह्मणौनि पडिलेनि शरीरें । केलेनसिं आत्मा चि सरे ।
मा भोगावेया उरे । कोणें वेखें ॥ ६५ ॥
ना ईश्वरु पांतां आहे । तो भोगवी हें जरि होए ।
तरि देव चि खाए । विकूनियां ॥ ६६ ॥
गाविंचे देउळेश्वर । न्यामक चि होंति जर ।
तरि देशिचे डोंगर । उगे असति ॥ ६७ ॥
ऐसा विपायें देओ मानिजे । तरि पाखाणमात्र चि जाणिजे ।
आणि आत्मा तत्रं ह्मणिजे । देहासी चि ॥ ६८ ॥
एरें पापपुण्यादिकें । तें आवत्रें चि करूनि लटिकें ।
हित मानी अग्निमुखें । आचरण जें कां ॥ ६९ ॥

जें चामल डोळे वानिती । जें इंद्रियें गोडी लाविती ।
तें चि साच हे प्रतीती । फुडी जेथ ॥ ५७० ॥
किंबहुना ऐसी पार्था । वाढती देखसी आस्था ।
धूवांचि बोलि वृथा । आकाशीं जैसी ॥ ७१ ॥
कोरडा ना वोला । उपेगा आथि गेला ।
तो वाढौनि मोडला । भेंडु जैसा ॥ ७२ ॥
नाना कां उंसाचीं कणिसें । कां नपुंसकें माणसें ।
वन लागलें जैसें । सावरीचें ॥ ७३ ॥
नातरि बाळकाचें मन । कां चोरावरिचें धन ।
अथवा गळां स्तन । सेळियेचे ॥ ७४ ॥
तैसें जें वायाणें । वोसळ दीसे जाणणें ।
तेयातें मीं ह्मणें । तामसज्ञान ॥ ७५ ॥
तें हिं ज्ञान इया भासा । बोलिजे तो भाऊ ऐसा ।
जात्यंधाचा कां जैसा । डोळा वाडु ॥ ७६ ॥
कां बधिराचे नीट कान । अपेया नावं पान ।
तैसें अडिनावं ज्ञान । तमासि तेया ॥ ७७ ॥
हें असो केतीं बोलावें । तऱ्हीं हें ऐसें देखावें ।
ते ज्ञान नव्हे जाणावें । डोळस तम ॥ ७८ ॥
एवं तीन्हीं गुणीं । भेदिलें यथालक्षणीं ।
ज्ञान श्रोतेशिरोमणी । दाविलें तुज ॥ ७९ ॥

**नियतं संगरहितमरागद्वेषतः कृतं ॥**
**अफलप्रेप्सुना कर्म यत्तत्सात्विकमुच्यते ॥ २३ ॥**

आतां या चि त्रिप्रकारा । ज्ञानाचेनि धनुर्द्धरा ।
प्राकाशें होंति गोचरा । कर्त्तेया क्रिया ॥ ५८० ॥
ह्मणौनि कर्म पैं गा । अनुसरे तिभागा ।
मोहोरे जालेयां वोघा । पाणी जैसें ॥ ८१ ॥

तें चि ज्ञानत्रयवशें । त्रिविध कर्म जें असे ।
तेथ सात्विक तवं ऐसें । परियस आदिं ॥ ८२ ॥
तरि स्वाधिकाराचेनि मार्गें । आलें जें मानिलें आंगें ।
पतिव्रतेचेनि परिष्वंगें । प्रियातें जैसें ॥ ८३ ॥
सावळेया आंगा चंदन । प्रमदालोचनीं अंजन ।
तैसें अधिकारासि मंडन । नित्यपणें जें ॥ ८४ ॥
तें नित्यकर्म भलें । होये निमित्तिकें सावाइलें
सोनेयांसि जोडलें । सौरभ्य जैसें ॥ ८५ ॥
आणि आंगा जीवाची संपत्ति । वेचूनि बाळाची करी पाळति ।
परि जीवनाची खंति । न पाहे माए ॥ ८६ ॥
तैसें सर्वस्वें कर्म अनुष्ठी । परि फळ न सूए दृष्टी ।
उखिती क्रिया पैठी । ब्रह्मीं करी ॥ ८७ ॥
आणि प्रिया आलेयां धावें । संबंधा उरों ठाकों जावें ।
तैसें संतप्रसंगें करावें । पारुखे जरि ॥ ८८ ॥
तरि अकरणाचेनि खेदें । द्वेषातें जीविं न बंधें ।
जालेयाचेनि आनंदें । फुंज नेए ॥ ८९ ॥
ऐसिया हातवटिया । कर्म निफजे जें धनंजया ।
जाण सात्विक तेया । गुण नाम गा ॥ ५९० ॥
या वरि राजसाचें । लक्षण सांविजैल साचें ।
न करिं अवधानाचें । वाणेपण गा ॥ ९१ ॥

**यत्तु कामेप्सुना कर्म साहंकारेण वा पुनः ॥**
**क्रियते बहुलायासं तद्राजसमुदाहृतं ॥ २४ ॥**

तरि घरिं मातापितरां । धडा बोला नाहिं सर्वसारा ।
एर विश्व भरी आदरां । मूर्खु जैसा ॥ ९२ ॥
कां तुळसीचेया झाडा । दूरौनि घाली सींतोडा ।
द्राक्षीचेया तरि बुढा । दूध चि लाविजे ॥ ९३ ॥

तैसें नित्यनैमित्यकें । कर्मे जियें आवश्यकें ।
तेयांचां विखिं न शके । बैसला उठूं ॥ ९४ ॥
येरां काम्याचेनि नावें । देहसर्वस्व आघवें ।
अर्जवितां हिं न मनवे । बहू ऐसें ॥ ९५ ॥
आगा देव्हडी वाढिया लाहिजे । तेथ मोल देतां न धाइजे ।
पेरितां पुरे न ह्मणिजे । बियां जेवि ॥ ९६ ॥
कां परिसु जालेयां हातिं । लोहा लागि सर्व संपत्ति ।
वेचु करितां उन्नती । साधकु जैसा ॥ ९७ ॥
तैसीं फळें देखौनि पुढें । काम्य कर्मे दुआडें ।
करी परि तें थोडें । केलें मानीं ॥ ९८ ॥
तेणें फलकामुकें । यथाविधि नेटकें ।
काम्य कीजे जेतुकें । क्रियाजात ॥ ९९ ॥
आणि तेया ही केलेयाचें । तोंडीं लावी डौंडिचें ।
कर्मि या नावें पाटाचें । आंक जैसें ॥ ६०० ॥
तैसा भरे कर्मा अहंकारु । मग पिता अथवा गुरु ।
तें न मनी कालज्वरु । ओषध जैसें ॥ १ ॥
तैसेनि साहंकारें । फळ अभिलाखियें नरें ।
कीजे गा आदरें । जें जें काहिं ॥ २ ॥
पारि तें करणें बहुवसा । वलघौनि करी आयासा ।
जीवनउपाओ कां जैसा । कोल्हांटियाचा ॥ ३ ॥
एका कणा लागि उंदिरु । असिका उसपे डोंगरु ।
कां सेवाळा दोसें दर्दुरु । समुद्र डहुळी ॥ ४ ॥
पैं भीके परौतें न लाए । तन्हीं गारुडी सर्प वाहे ।
काइ कीजे सीणु होये । गोडु ये कां ॥ ५ ॥
हें असो परिमाणुचेनि लाभें । पाताल लंघीति ओलिंबे ।
तैसें स्वर्गसुखलोभें । विचंवणें जें ॥ ६ ॥

तें काम्य कर्म सक्लेश । जाणावें एथ राजस ।
आतां चिन्ह परियस । तामसाचें ॥ ७ ॥

अनुबंधं क्षयं हिंसामनपेक्ष्य च पौरुषं ॥
मोहादारभ्यते कर्म यत्तत्तामसमुच्यते ॥ २५ ॥

तरि तें गा तामस कर्म । जें निंदेचें काळें धाम ।
निषेधाचें जन्म । साचें जेणें ॥ ८ ॥
जें निफजविलेया पाठिं । काहिं चि फळ न दिसे दीठी ।
रेघ काढिलेयां पोटीं । तोयाचां जेवि ॥ ९ ॥
कां कांजी गुसळलेयां । सारकतु फुंकिलेयां ।
काहिं न दिसे गाळिलेयां । वाळुवेचा घाणा ॥ ६१० ॥
नाना उपणिलेयां भूस । विंधलेयां आकाश ।
मांडिलेयां पाश । वारेयासि ॥ ११ ॥
हें आघवें चि जैसें । वांझे होउनि नाशे ।
जें केलेयां पाठिं तैसें । वायां चि जाए ॥ १२ ॥
यऱ्हविं नरदेहा एवढें । धन आटाणिये पडे ।
जें निफजवितां मोडे । जगाचें सुख ॥ १३ ॥
जैसा कमळवनीं फांसु । काढिलेयां कांटसु ।
आपण झिजे नाशु । कमळां करी ॥ १४ ॥
कां आपण आंगें जळे । आणि नागवी जगाचे डोळे ।
पतंगु जैसा सळे । दीपाचेनि ॥ १५ ॥
तैसें सर्वस्व वायां जाओ । वरि देहासि हो घाओ ।
परि पुढिला अपाओ । निफजे जेणें ॥ १६ ॥
मासी आपणेयातें गिळवी । परि पुढिलातें वांती सीणवी ।
तें कश्मळ आठवी । आचरण जें ॥ १७ ॥
तें हि करावेया दोसें । मज सामर्थ्य असे ।
किं नाहिं हें ऐसें । न पांत करी ॥ १८ ॥

केवढा माझा उपाऊ । करितां कोणु प्रस्ताऊ ।
केलेयां आऊ । काइ एथ ॥ १९ ॥
इये जाणिवेची सोए । अविवेकाचेनि पाएं ।
पूसूनियां होए । साटोपु कर्मी ॥ ६२० ॥
आपुला वसैठा जालुनि । बिसाटे जैसा वन्हि ।
कां स्वमर्यादा गीलुनि । सिंधु उठी ॥ २१ ॥
मग नेणे बहू थोडें । न पाहे मागें पुढें ।
मार्गामार्ग एकीवडे । करीतु चाले ॥ २२ ॥
तैसें कृत्याकृत्यें सरकटित । आपु पर न विचारित ।
कर्म होये तें निश्चित । तामस जाण ॥ २३ ॥
ऐसें गुणत्रयें भिन्ना । कर्मासि गा अर्जुना ।
हे केली विवंचना । उपपत्तिसिं ॥ २४ ॥

**मुक्तसंगोऽनहंवादी धृत्युत्साहसमन्वितः ॥**
**सिध्यसिध्योर्निर्विकारः कर्त्ता सात्विक उच्यते ॥ २६ ॥**

आतां या चि कर्मा भजतां । कर्माभिमानियां कर्त्ता ।
तो जीउ ही त्रिविधता । पातला असे ॥ २५ ॥
चतुराश्रमवशें । पुरुषु चतुर्द्धा दीसे ।
कर्त्तेया त्रिविध तैसें । कर्मभेदें ॥ २६ ॥
परि तेयां तिहिं आंतु । सात्विक तवं प्रस्तूतु ।
सांघैन दत्तचित्तु । आकर्णि तूं ॥ २७ ॥
तरि फलउद्देशें सांडिलिया । वाढति जेवि सरलिया ।
शाखा कां चंदनाचेया । बावनेयां ॥ २८ ॥
कां न फलतां हिं सार्थका । जैसिया नागवालिका ।
तैसिया करी नित्यादिका । क्रिया जो गा ॥ २९ ॥
परि फलशून्यता । नाहिं तेया विफलता ।
पैं फलासी चि पांडुसुता । फल काइसें ॥ ६३० ॥

आणि कृत्यादिकें करी बहुवसें । परि कर्ता मी हें नुमसे ।
वर्षाकाळिचे जैसे । मेघवृंद ॥ ३१ ॥
तेंवि चि परमात्मलिंगा । समर्पावेया जोगा ।
कर्मकलापु पैं गा । निफजावेया ॥ ३२ ॥
तेया काळातें न लंघणें । देशशुद्धि हान साजणें ।
कां शास्त्राचां वाति पाहाणें । क्रियानिर्णयो ॥ ३३ ॥
वृत्ती करणें येकवळा । चित्त जावों नेंदणें फळा ।
नियमाचिया साखळा । वाहाणें हान ॥ ३४ ॥
हा निरोधु साहावेया लागि । धैर्याचिया चांगाचांगी ।
चिंतवणी जिंतिया आंगीं । वाहे जो कां ॥ ३५ ॥
आणि आत्मेयांचिया आवडी । कर्म करितां सुखाडीं ।
देहसुखाचिये परिवडी । येवों न ल्हाये ॥ ३६ ॥
ऐसां निद्रा दुरावे । क्षुधा न बगवे ।
सुखाडु न पवे । आंगाचा ठाउ ॥ ३७ ॥
तवं अधिकाअधिक । उत्साहो धरी आगळिक ।
सोनें जैसें पुटीं तूंक । तूटलेयां ॥ ३८ ॥
जरि आवडि आथि साच । तरि जीवित्व ही सलंछ ।
आगि घालितां रोमांच । देखिजति ॥ ३९ ॥
मा आत्मेयां एवढिया प्रिया । वालभैला जो धनंजया ।
देहाची सिद्धता तेया । खेदु होइल ॥ ६४० ॥
ह्मणौनि सुखाडू तूटे । जवं हें देह आटे ।
तवं आनंदु दुणावटे । कर्मि जेया ॥ ४१ ॥
ऐसेन जो कर्म करी । आणि कोण्हीं एकिं अवसरीं ।
आलें तें कर्म ठाके ऐसी सरी । वाहे जरि ॥ ४२ ॥
तरि कडाडि मोडे जो गाडा । तो आपणपेयां न मनी अवघडा ।
तैसा ठाकलेनि थोडा । न्हवे चि जो कां ॥ ४३ ॥

नातरि आदरिलें । अव्यंग सिद्धी गेलें ।
तरि तें हिं जींतलें । मिरौं नेणे ॥ ४४ ॥
इया खुणा कर्म करितां । देखिजे जो पांडुसुता ।
तेयातें ह्मणिजे तत्वता । सात्विकु कर्त्ता ॥ ४५ ॥

**रागी कर्मफलप्रेप्सुर्लुब्धो हिंसात्मको शुचिः ॥**
**हर्षशोकान्वितः कर्त्ता राजसः परिकीर्त्तितः ॥ २७ ॥**

आतां राजसा कर्त्तेया । वोलखण हे धनंजया ।
जें अभिलाखा जगिचेया । वसैठा तो ॥ ४६ ॥
जैसा गांविंचेया कश्मला । उकरडां एकवला ।
कां श्मसानीं अमंगला । आवघेयांसि ॥ ४७ ॥
तिया परीं जो अशेषां । त्रिश्विचेयां अभिलाखां ।
पाये पाखालणियां दोषां । घरटा जाला ॥ ४८ ॥
ह्मणौनि फलाचा लागु । देखे जो आसलगु ।
तिये कर्मि चांगु । रोहो मांडी ॥ ४९ ॥
आणि आपजळिये जोडी । उपखों नेंदी काडी ।
आणि क्षणीं क्षणीं कुरवंडी । जीवाची करी ॥ ६५० ॥
कृपणु ठेवां आपुला । तैसा दक्षु परावेया मोला ।
बकु जैसा खुतला । मासेयांसि ॥ ५१ ॥
आणि गोवि केलेयां जवलि । झगटलियां आंग फाली ।
फलें आंतु पोली । बोरांटी जैसी ॥ ५२ ॥
तैसा मनें वाचा कायें । भलेतेया दुःख जाये ।
स्वार्थु साधितां न पाहे । परावें हित ॥ ५३ ॥
तेविं चि आंगें कर्मीं । आचरणें न्हवे क्षमी ।
निगे मनोधर्मि । अरोचक ॥ ५४ ॥
कनकाचेया फला । आंतु माजु बाहिरी मैला ।
तैसा सबाह्यें दुवला । शुचित्वें जो ॥ ५५ ॥

आणि कर्मजात केलेयां । फल लाहे जरि धनंजया ।
तरि हरिखें जगा येया । वांकुलिया वाए ॥ ५६ ॥
अथवा तें आदरिलें । हीन फल जरि गेलें ।
तरि शोकें तेणें जियालें । धिक्करुं लागे ॥ ५७ ॥
कर्मि राहाटि ऐसी । जेयातें गा देखसी ।
तो जाण त्रिशुद्धिसीं । राजसु कर्त्ता ॥ ५८ ॥

**अयुक्तः प्राकृतः स्तब्धः शठो नैष्कृतिकोलसः ।**
**विषादी दीर्घसूत्री च कर्त्ता तामस उच्यते ॥ २८ ॥**

आतां येया पाठिं येरु । कुकर्माचा आगरु ।
तो ही करुं गोचरु । तामसु कर्त्ता ५९ ॥
तरि मीं लागलेयां कैसें । पुढील जलत असे ।
हें नेणिजे हुताशें । जिया परीं ॥ ६६० ॥
पैं शस्त्रें मियां तीखटें । नेणे कैसें निवटें ।
कां नेणिजे कालकूटें । आपुलें केलें ॥ ६१ ॥
तैसा पुढिला आपणपेया । घाये करीतु धनंजया ।
आदरी ॲखटिया । क्रिया जिया कां ॥ ६२ ॥
तिया करितां वेलीं । काइ जालें हें न संभाली ।
चलला वायु वाहुटली । चेष्टे जैसा ॥ ६३ ॥
पैं करणेयां आणि जेया । मेलु नाहिं धनंजया ।
तो पाहुनि पिसेया । कैंचीं त्राये ॥ ६४ ॥
आणि इंद्रियांचें वोइरिलें । चरौनि राखे जो जियालें ।
वैला तलिं वर्त्तलें । पोसणें जैसें ॥ ६५ ॥
कां हांसेया रुदना वेल । नेणतां आदरी बाल ।
राहाटे उछंखल । तिया परी ॥ ६६ ॥
जो प्रकृति आतलेपणें । कृत्याकृत्यसवादु नेणे ।
फुगे केरें धालेपणें । उकरडें जैसें ॥ ६७ ॥

ह्मणौनि मान्याचेनि नावें । ईश्वरा हि परि न लवे ।
स्तब्धपणें न मनवे । डोंगरासि ॥ ६८ ॥
आणि मन जेयाचें कालवि । राहाटि फुडी चोरिली ।
दीठि ते किर वोली । पण्यांगनांची ॥ ६९ ॥
किंबहुना कपटिचें । देह चि वलिलें तेयाचें ।
तें जीणें कीं जुवांरांचें । टिंटघर ॥ ६७० ॥
न्हवे तेयाचा प्रादुर्भावो । तो साभिलाख भिल्लांचा गावों ।
ह्मणौनि न ये येवों जावों । तिया वाटा ॥ ७१ ॥
आणि आणिकाचें नीकें केलें । तें वीरुं होये जेया आलें ।
जैसें पय मीनलें । लवण करी ॥ ७२ ॥
कांहिं विरुढे ऐसा पदार्थु । घातला आगी आंतु ।
तिये चि क्षणीं धडाडितु । आगि होए ॥ ७३ ॥
नाना सुद्रव्यें गोमटीं । जालेयां शरीरा पैठीं ।
होउनि ठाकति किरीटी । मलु चि जेवि ॥ ७४ ॥
तैसें पुढिलाचें बरवें । जेयाचा भितरु पावे ।
आणि विरुद्ध चि आघवें । होये चि गा ॥ ७५ ॥
जो गुण घे दे दोष । अमृताचें करी विख ।
दूध पाजिला देख । व्यालु जैसा ॥ ७६ ॥
आणि इहिकीं जियावें । जेणें परत्रां साचा होआवें ।
तें उचित कृत्य पावे । अवसरीं जिये ॥ ७७ ॥
तेधवां जेया आपैसी । नीद ये ठेविली ऐसी ।
दुहवेवारी जैसी । विटाळे लोटे ॥ ७८ ॥
पैं द्राक्षरस कां उसा । वेळे तोंड सडे वायसा ।
कां डोळे फूटति दिवसा । डुडुळांचें ॥ ७९ ॥
तैसा कल्याणु कालु पाहे । तैं तेया आलसु खाए ।
ना प्रमादीं तरि होए । तो ह्मणे तैं ॥ ६८० ॥

तेवीं चि सागराचां पोटीं । जळे अखंड आगिठी ।
तैसा विषादु वाहे पोटीं । जिवाचिये ॥ ८१ ॥
आगी धूवां एकावधी । कां अपाना आणि दुर्गंधि ।
तैसा जो जीविता अवधी । विषादें केला ॥ ८२ ॥
आणि कल्पांताचिया पारा । वेगळेया ही जो वीरा ।
सूत्र धरी व्यापारा । साभिलाखें ॥ ८३ ॥
अगा जगा ही परौती । सुचावा हे पैं चित्तीं ।
करितां विषिं हाति । तृण हिं न लगे ॥ ८४ ॥
ऐसा जो लोका आंतु । पापपुंजु मूर्त्तु ।
देखिजे तो अव्याहतु । तामसु कर्त्ता ॥ ८५ ॥
एवं कर्म कर्त्ता ज्ञान । यां तिहिंचें त्रिधा चिन्ह ।
दाविलें तुज सुजन— । चक्रवर्त्ती ॥ ८६ ॥

**बुद्धेर्भेदं धृतेश्चैव गुणतस्त्रिविधं शृणु ॥**
**प्रोच्यमानमशेषेण । पृथक्त्वेन धनंजय ॥ २९ ॥**

आतां अविद्येचां गावीं । मोहाची वेढूनि मदवी ।
संदेहाचिं आघवीं । लेउनि लेणीं ॥ ८७ ॥
आत्मनिश्चयाची बरव । जिये आरिसां पाहे सावेव ।
तिये बुद्धिची ही धांव । त्रिधा चि असे ॥ ८८ ॥
अगा सत्वादिगुणिं इहिं । काई एक तिहिं ठांइं ।
न कीजे चि एथ पाईं । जगा माझि ॥ ८९ ॥
आगि नसतां पोटीं । कोठें काष्ठ असे सृष्टी ।
तैसें तें कैंचें दृश्य किरीटी । त्रिधा जें नोहे ॥ ६९० ॥
ह्मणौनि तिहिं गुणिं । बुद्धि केली त्रिगुणीं ।
धृतिसि ही वाटणी । तैसी चि असे ॥ ९१ ॥
तें चि एकैक वेगळालें । एथ चिन्ह अलंकारलें ।
सांगिजैल उपाइलें । भेदलेपणें ॥ ९२ ॥

पारि बुद्धिधृति एयां । दोहिं भागां माझि धनंजया ।
आदि रूप बुद्धिचेया । भेदासि करूं ॥ ९३ ॥
तरि उत्तममध्यमनिकृष्टा । संसारासि गा सूभटा ।
प्राणियां यंतिया वाटा । तीनि आथि ॥ ९४ ॥
जे सात्विकराजसतामसनिबद्ध । हे ते मार्ग प्रसिद्ध ।
संसारभयसंबंध । जीवां येयां ॥ ९५ ॥

**प्रवृत्तिं च निवृत्तिं च कार्याकार्ये भयाभये ॥**
**बंधमोक्षं च या वेत्ति बुद्धिः सा पार्थ सात्विकी ॥३०॥**

ह्मणौनि अधिकारें मानलें । जें विधिचेनि उंघें आलें ।
तें एथ चि एक भलें । नित्यकर्म ॥ ९६ ॥
तें चि आत्मप्राप्तिफळ । दीठि सूनि केवळ ।
कीजे जैसें कां जळ । सेविजत ताहानें ॥ ९७ ॥
येतुलेनि तें कर्म । सांडी भयजन्म विषम ।
करूनि दे सुगम । मोक्षसिद्धी ॥ ९८ ॥
तें कर्म करी तो भला । संसारभयें सांडिला ।
करणीयत्वें आला । मुमुक्षभागा ॥ ९९ ॥
तेथ जो बुद्धी ऐसा । बळीं बांधे भरंवसा ।
मोक्षु ठेविला ऐसा । जोडैल एथ ॥ ७०० ॥
ह्मणौनि निवृत्तिची मांडली । सूनि प्रवृत्ती तळिं ।
ए कामिं बुडकली । द्यावी किं नां ॥ १ ॥
तृषार्त्ता पाणियें जीणें । कां पुरीं पडिलेयां प्रवाहणें ।
अंध कूपिं गति किरणें । सूर्याचेनि ॥ २ ॥
नाना पथ्येंसि उंखद लाहे । तरि रोगें दाटिला ही जिये ।
कां मीना जीवाळा होए । जळाचा जरि ॥ ३ ॥
तरि तेया जीविता । नाहिं जैसें अन्यथा ।
तैसें कर्मा येया प्रवर्त्ततां । जोडे चि मोक्षु ॥ ४ ॥

हें किर जेयाचिये कडे । जें ज्ञान आधि चोखडें ।
आणि करणीं फुडें । ऐसें जाणे ॥ ५ ॥
जियें तिहिं काम्यादिकें । संसारभयदायकें ।
अकृत्यपणाचे आबुखे । पडिले जेयां ॥ ६ ॥
तिये कार्मिं अकार्यिं । जन्ममरणसभयीं ।
प्रवृत्तिफलें विपायीं । मागिलीं चि ॥ ७ ॥
पैं गा आगी माझि न रिगवे । अथावि न घलवे ।
धगधगीत नांगवे । शूल जेवि ॥ ८ ॥
कां कालियाणा धुधुवांतु । देखौनि न पसरवे हातु ।
न वचवे खोंपे आंतु । वाघाचिये ॥ ९ ॥
तैसें कर्म अकरणिय । देखौनि महाभय ।
उपजे निःसंदेह । बुद्धि जेया ॥ ७१० ॥
वाढिलें रांधौनि विखें । तेथ जाणिजे मृत्यु न चुके ।
तेवि निषेधि कें देखे । बंधातें जो ॥ ११ ॥
मग बंधुभयभारीतिं । तिये निषेधीं प्राप्तिं ।
विनियोगु जाणे निवृत्ती । कर्माचिये ॥ १२ ॥
ऐसें कार्याकार्यविवेकीं । जे प्रवृत्तिनिवृत्तिमापकीं ।
खराकुडापारखी । जिया परीं ॥ १३ ॥
तैसी कृत्याकृत्यशुद्धी । बुझे जें निरवधी ।
सात्विक ह्मणिपे बुद्धी । ते गा जाण ॥ १४ ॥

**यया धर्ममधर्मं च कार्यं चाकार्यमेव च ॥**
**अयथावत्प्रजानाति बुद्धिः सा पार्थ राजसी ॥ ३१ ॥**

आणि बकाचां गावीं । घेपे क्षीरनीर सकलवी ।
कां अहोरात्राची गोवी । आंधलें नेणे ॥ १५ ॥
जेया फुलाचें गोमटें फावे । तो किं काष्टें कोरूं धांवे ।
परि भ्रमरपण नव्हे । अंव्हा जेवि ॥ १६ ॥

तैसि इयें कार्याकार्यें । धर्माधर्मरूपें इयें ।
तियें न सुहतां जियें । जाणती जे कां ॥ १७ ॥
आगा डोळां विण मोतियें । घेतां पाडु मिळे विपायें ।
न मिळणें तें आहे । ठेविलें तेथ ॥ १८ ॥
तैसें अकरणीय अवचटें । नोडवे तरी चि लोटे ।
यऱ्हवि जाणे एकवटें । दोन्हीं जे कां ॥ १९ ॥
ते गा बुद्धि ऐसी । जाण एथ राजसी ।
आखत टाकिली जैसी । मांदिएसी ॥ ७२० ॥

**अधर्मं धर्ममिति या मन्यते तमसावृता ॥**
**सर्वार्थान्विपरीतांश्च बुद्धिः सा पार्थ तामसी ॥ ३२ ॥**

आणि राजा जिया वाटा जाए । तें चोरांसि अडवंतावो होये ।
कां राक्षसांसि दिवो पाहे । राति होउनि ॥ २१ ॥
नानां निधान चि निदैवां । होये कोलिसेयाचा उडवा ।
पैं असतां आपणपें जीवा । नाहिं जालें ॥ २२ ॥
तैसें धर्मजात जेतुकें । जिये बुद्धीसि पातकें ।
साच तें लटकें । ऐसें बुझे ॥ २३ ॥
हे आघवे चि अर्थ । ते करुनि घाली अनर्थ ।
गुणातें व्यवस्थित । दोष मानी ॥ २४ ॥
किंबहुना श्रुतिजातें । प्रतिष्ठौनि केलें सरतें ।
तेतुलें हिं उपरतें । जाणे जे बुद्धी ॥ २५ ॥
ते कोण्हातें हिं न पुसतां । तामसी जाणावी पांडुसुता ।
रात्रि काइ धर्मार्था । साच करावी ॥ २६ ॥
एवं बुद्धीचे भेद । तीन्ही तुज विशद ।
सांघितले स्वयंबोध । कुमुदचंद्रा ॥ २७ ॥

**धृत्या यया धारयते मनःप्राणेंद्रियक्रियाः ॥**
**योगेनाव्यभिचारिण्या धृतिः सा पार्थ सात्विकी ॥३३॥**

आतां इया चि बुद्धिवृत्ति । निष्टंकिली कर्मजातीं ।
बोधु मांडिजे धृती । त्रिविधा जिया ॥ २८ ॥
तियेचे ही विभाग । तीनि यथालिंग ।
सांविजती चांग । अवधान दे ॥ २९ ॥
तरि उदैला दिनकरु । चोरीसि थोंके अंधकारु ।
कां राजाज्ञा अव्यवहारु । कुंठवी जेवि ॥ ७३० ॥
नाना पवनाचा साटु । उचललेयां नीटु ।
आंगेंसिं बोभाटु । सांडिती मेघ ॥ ३१ ॥
कां अगस्तिचेनि दर्शनें । सिंधु घेउनि ठांति मौनें ।
चंद्रोदइं कमळवनें । मीठी देंती ॥ ३२ ॥
हें असो पा॰ उचालिला । मदमुखु न ठेवी चि खालां ।
गाजौनि पुढां जाला । सिंहु जरि ॥ ३३ ॥
तैसा जो धीरु । उठिलेयां अंतरु ।
मनादिकें व्यापारु । सांडिति उगीं ॥ ३४ ॥
इंद्रियां विषयांची गांठि । आपैसेया गळति किरीटी ।
मना मायेचां पोटीं । रिगति दाही ॥ ३५ ॥
अधऊर्ध्वं गुढें काढी । प्राणु नवां पेंढी ।
बांधौनि घाली उंडी । मध्यमे माझि ॥ ३६ ॥
संकल्पविकल्पाचें लुगडें । सांडूनि मन उघडें ।
बुद्धि ही मागिलीं कडे । उगें बैसे ॥ ३७ ॥
ऐसें धैर्यराजें जेणें । मनप्राणकरणें ।
स्वचेष्टा संभाषणें । सांडिवीजती ॥ ३८ ॥
मग आघवीं चि संडीं । ध्यानाचां आंतुलीं मढीं ।
कोंडिजति निरवढी । योगाचिया ॥ ३९ ॥
पारे परमात्मेयां चक्रवर्ती । उगाणीति जवं हातीं ।
तवं लांचु नेघतां धृती । धरिजति जिया ॥ ७४० ॥

ते गा धृति एथें । सात्विक हें निरुतें ।
आइक अर्जुनातें । श्रीकांतु ह्मणे ॥ ४१ ॥
आणि होउनियां शरीरी । स्वर्गसंसाराचां दोहीं घरीं ।
नांदे जो पोटभरी । त्रिवर्गोपायें ॥ ४२ ॥

**यया तु धर्मकामार्थान् धृत्या धारयतेऽर्जुन ॥**
**प्रसंगेन फलाकांक्षी धृतिः सा पार्थ राजसी ॥ ३४ ॥**

तो मनोरथाचां सागरीं । धर्मार्थकामाचें तारुं भरी ।
जेणें धैर्यबळें करी । क्रियावाणिज ॥ ४३ ॥
जें कर्मभांडवळा सुए । तेयाची चौगुणां येंतीं पाहे ।
एवडें सायासें हें साहे । जेया धृति ॥ ४४ ॥
ते गा धृति राजस । पार्था एथ परियस ।
आतां आइकें तामस । तिसरी जे ॥ ४५ ॥

**यया स्वप्नं भयं शोकं विषादं मदमेव च ॥**
**न विमुंचति दुर्मेधा धृतिः सा पार्थ तामसी ॥ ३५ ॥**

तरि सर्व अधमें गुणें । जेयाचें कां रूपा एणें ।
कोळिसा काळेपणें । घडिला जैसा ॥ ४६ ॥
आहो प्राकृतु आणि हीनु । तेया ही किं गुणसत्वाचा मानु ।
पारि न ह्मणिजे पुण्यजनु । राक्षसु काइ ॥ ४७ ॥
कां ग्रहां माझि इंगळु । तेयातें ह्मणिजे मंगळु ।
तैसा तमिं धसाळु । गुणसंबंधु हा ॥ ४८ ॥
तैसा सर्वदोषांचा वसैठा । तम चि कामौनि सूभटा ।
उभारिला आंगवटा । जेया नराचा ॥ ४९ ॥
तो आळसु सूनि असे काखे । ह्मणौनि निद्रे कहीं न मूंके ।
पापें पोसितां दुःखें । न संडिजे जेवि ॥ ७५० ॥
आणि देहाधनाचिया आवडी । सदा भयातें न संडी ।
विसंभों न शके दोंढी । काठिन्य जैसें ॥ ५१ ॥

आणि पदार्थजाती स्नेहो । बांधे ह्मणौनि तो शोका ठाउं ।
केला न पाप जाउं । कृतघ्नु जैसा ॥ ५२ ॥
आणि असंतोखु जीवेसीं । धरूनि ठेला अहर्निशीं ।
ह्मणौनि मैत्र तेणेंसीं । विशादें केलें ॥ ५३ ॥
लसणातें न संडी गंधि । कां अपथ्यशीलातें व्याधि ।
तैसी केली मरणा अवधी । विशादें तेया ॥ ५४ ॥
आणि वयसा वित्तकामु । येयांचा वाढवी संभ्रमु ।
ह्मणौनि मदें आश्रमु । बंधला तेथ ॥ ५५ ॥
आगितें न संडी तापु । सलाते जातिचा सापु ।
कां जगाचा वैरी वासिपु । अखंड जैसा ॥ ५६ ॥
नातरि शरीरातें काळु । न विसंभे कवण्ही वेळु ।
तैसा आथि अढळु । तामसिं मदु ॥ ५७ ॥
एवं पांचै हे निद्रादिक । तामसाचां ठांइं दोष ।
जिया धृती देख । धरिले असति ॥ ५८ ॥
तिये धृती नावें । तामसी एथ हें जाणावें ।
ह्मणितले तेणें देवें । जगाचेनि ॥ ५९ ॥
एवं त्रिविधा जो बुद्धी । कीजे कर्मनिश्चयो आदीं ।
तो धृती इया सिद्धी । नेइजे एथ ॥ ७६० ॥
सूर्यें मार्गु गोचरु होए । आणि तो चाळति किर पाए ।
परि चालणें तें आहे । धैर्यें जेवि ॥ ६१ ॥
तैसी बुद्धि कर्मातें दावी । तें करणसामग्र निफजवी ।
परि निफजावेया होआवी । धीरता जे ॥ ६२ ॥
ते हे गा तुज प्रति । सांघितली त्रिविध धृति ।
येया कर्मत्रया निष्पत्ति । जालेयां मग ॥ ६३ ॥

सुखं त्विदानीं त्रिविधं शृणु मे भरतर्षभ ॥
अभ्यासाद्रमते यत्र दुःखांतं च निगच्छति ॥ ३६ ॥

येथ फल येक जें निफजे । सुख जेयातें ह्मणिजे ।
तें हिं त्रिविध जाणिजे । कर्मवशें ॥ ६४ ॥
तरि फलरूप तें सुख । त्रिगुणिं भेदलें देख ।
विवंचूं आतां चोख । चोखीं बोलीं ॥ ६५ ॥
चोखी ते कैसी सांघें । पैं घेॐ जांतां बोलबगे ।
कानिचिये ही लागे । हातिचा मलु ॥ ६६
ह्मणौनि जेयाचेनि अव्हेरें । अवधान होये बाहिरें ।
तें आइक हो अंतरें । जिवाचेनि जीवें ॥ ६७ ॥
ऐसें ह्मणौनि देॐ । त्रिविधा सुखाचा प्रस्ताॐ ।
मांडिला तो निर्वाहो । निरोपित असे ॥ ६८ ॥
ह्मणे सुखत्रया संज्ञा । सांघों ह्मणौनि प्रतिज्ञा ।
बोलिजे तें प्राज्ञा । आइक आतां ॥ ६९ ॥
तरि सुख तें गा किरीटी । दाविजैल तुज दीठी ।
जेणे आत्मेनसीं भेटि । जीवासि होए ॥ ७७० ॥
परि मात्रेचेनि मापें । दिव्योषध जैसें घेपे ।
कां कथिलाचें कीजे रूपें । रसभावनीं ॥ ७१ ॥
नाना लवणाचे जल । होआवेया दोनि च्यारि वेल ।
देउनि सांडिजति ढाल । तोयाचे चि जेवि ॥ ७२ ॥
तेवि जालेनि सुखलेशें । जीउ भाविलेयां अभ्यासें ।
जीवपणाचें नाशे । दुःख जेथ ॥ ७३ ॥
तें येथ आत्मसुख । जालें असे त्रिगुणात्मक ।
तें हिं सांघों येकैक । रूप आतां ॥ ७४ ॥

**यत्तदग्रे विषमिव परिणामे मृतोपमम् ॥**
**तत्सुखं सात्विकं प्रोक्तमात्मबुद्धिप्रसादजम् ॥ ३७ ॥**

तरि चंदनाचें बुढ । सर्पि जैसें दुवाड ।
कां निधानाचें तोंड । विवंसीतें ही ॥ ७५ ॥

आगा स्वर्गिचें गोमटें । अडव यागसंकटें ।
कां बापपण दासटें । त्रासकाळें ॥ ७६ ॥
ह असो दीपाचिये सिद्धी । अवघड धूं आधिं ।
नातरि तो वोषधी । जीभेचा ठाउ ॥ ७७ ॥
तिया परीं पांडवा । जेया सुखाचा रिगावां ।
विषमु तेया मेळावा । यमदमाचा ॥ ७८ ॥
देंत सर्वस्नेहा मीठीं । आंगीं ऐसें वैराग्य उठी ।
स्वर्गसंसाराकांटी । काढित चि ॥ ७९ ॥
विवेकश्रवणें खरपुसें । जेथ व्रताचरणें कर्कसें ।
करितां जांति भोकसे । बुद्धयादिकांचे ॥ ७८० ॥
सुषुम्नेचेनि तोंडें । गीळिजे प्राणापानाचे लोंढे ।
बोहणीए चि एवडें । भारी जेथ ॥ ८१ ॥
तें सारसां हिं विघडतां । वोहांहूनि वत्स काढितां ।
नव्हे भणग दवडितां । भाणेया वरौनि ॥ ८२ ॥
पैं गा माये पुढौनि बाळक । काळें नेंतां जें एक ।
होये कां उदक । तूटतां मीनां ॥ ८३ ॥
तैसें विषयांचें घर । इंद्रियां सांडितां थोर ।
युगांत होये तें वीर । वीतराग साहांति ॥ ८४ ॥
ऐसा जेया सुखिचा आरंभु । दावी काठिण्याचा क्षोभु ।
मग क्षीराब्धिलाभु । अमृताचा जैसा ॥ ८५ ॥
पहिलेया वैराग्यगरळा । धैर्यशंभु वोडविला गळा ।
तरि ज्ञानामृतें सोहळा । पाहे जेथ ॥ ८६ ॥
पैं कोळिता ही हूनु वहुवसें । द्राक्षाचें हिरवेपण असे ।
तें परिपाकीं कां जैसें । माधुर्य होए ॥ ८७ ॥
तें वैराग्यादिक तैसें । पीकलें आत्मप्रकाशें ।
मग वैराग्येंसीं हीं नासे । अविद्याजात ॥ ८८ ॥

तेधवां सागरीं गंगा जैसी । आत्मा मीनलेयां बुद्धि तैसी ।
अद्वयआनंदाची आपैसी । खाणि उवडे ॥ ८९ ॥
ऐसें स्वानुभवविश्रामें । वैराग्यमूळ जें परिणमे ।
तें सात्विक एणें नांवें । बोलिजे सुख ॥ ७९० ॥

**विषयेंद्रियसंयोगाद्यत्तदग्रेऽमृतोपमम् ॥**
**परिणामे विषमिव तत्सुखं राजसं स्मृतं ॥ ३८ ॥**

आणि विषयइंद्रियां । मेळु होंतां धनंजया ।
तें सुख जाये थडिया । सांडौनि दोन्हीं ॥ ९१ ॥
अधिकारिया रिगतां गावों । जाला जैसा उत्सावो ।
कां रिणावरि विवाहो । विस्तारिला ॥ ९२ ॥
नाना रोगीं जीभे पासिं । केळें गोडें होंति साखरेसीं ।
कां वत्सनागा जैसी । मद्दुळळे ते ॥ ९३ ॥
पहिले सवंचोरां मैत्र । भेटिहाटिचें कळत्र ।
कां लाघविचे विचित्र । विनोद ते ॥ ९४ ॥
तैसें विषयेंद्रियदोखीं । जें सुख जीवातें पोखी ।
मग उपटला खडकीं । राजहंसु जैसा ॥ ९५ ॥
तैसी जोडि आघवी आटे । जीविताचा ठाउ फीटे ।
सुकृताचेया ही सुटे । धनाची गांठि ॥ ९६ ॥
आणि भोगिलें जें काहिं । स्वप्न जैसें होये नाहिं ।
मग हाणिचां चि घाइं । लोळावें उरे ॥ ९७ ॥
ऐसें पाहांतिं जें सुख । इहिंकिं परिणामे देख ।
परत्रीं किर विष । होउनि परते ॥ ९८ ॥
जें इंद्रियजाता ळळा । दीधलेयां धर्माचा मळा ।
जाळुनि भोगिजे सोहळा । विषयांचा जेथ ॥ ९९ ॥
तेथ पातकें मांधति थाउ । तियें नरकीं देंति ठाउ ।
जेणें सुखें अपाउ । परत्रीं ऐसा ॥ ८०० ॥

पैं नार्वे विष महुरें । परि मारूनि अतिखरें ।
तैसें आदि जें गोडिरें । अंतीं कडू ॥ १ ॥
पार्था तें सुख साचें । वळिलें आहे रजाचें ।
ह्मणौनि न सीवें तेयाचें । आंग कहीं ॥ २ ॥

**यदग्रे चानुबंधे च सुखं मोहनमात्मनः ॥**
**निद्रालस्यप्रमदोत्थं तत्तामसमुदाहृतं ॥ ३९ ॥**

आणि अपेयाचेनि पानें । अखाद्याचेनि भोजनें ।
स्वैरस्त्रीसंनिधानें । होये जें सुख ॥ ३ ॥
कां पुढिलाचेनि मारें । नातरि पशुप्रहारें ।
जें सुख अवतरे । भांडाचां बोलीं ॥ ४ ॥
जें आलस वारि पोखिजे । निद्रे माझि देखिजे ।
जेयाचां आदीं अंतीं भूलिजे । आपुली वाट ॥ ५ ॥
तें गा सुख पार्था । तामस जाण सर्वथा ।
हें न संगों चि जें कथा । असंभाव्य हे ॥ ६ ॥

**न तदस्ति पृथिव्यां वा दिवि देवेषु वा पुनः ॥**
**सत्वं प्रकृतिजैर्मुक्तं यदेभिः स्यात्त्रिभिर्गुणैः ॥ ४० ॥**

ऐसें कर्मभेदें मुदलें । फळसुख ही त्रिधा जालें ।
तें हें एथ मियां केलें । गोचर तुज ॥ ७ ॥
तें कर्त्ता कर्म फळ । हे त्रिकुटी एकि केवळ ।
वांचूनि कहीं चि असे स्थूळ । सूक्ष्मादि ॥ ८ ॥
आणि हे तवं त्रिकुटी । तिहिं गुणिं किरीटी ।
गुंथिली आहे पटीं । तांथुवीं जैसी ॥ ९ ॥
ह्मणौनि प्रकृतिचां लोकीं । न वंचिजे सत्वादिकीं ।
तैसी स्वर्गी नां मृत्युलोकीं । आथि वस्तु ॥ ८१० ॥
कैंचा लोंवे विण कांबळा । मातिये विण मोदळा ।
कां जळें विण कल्लोळां । होणें आहे ॥ ११ ॥

तैसें नोहोनि गुणागुणाचे । त्रिष्टिचां रचलां रचे ।
ऐसें नाहिं गा साचें । प्राणिजातां ॥ १२ ॥
या लागि हें सकळ । तिहिं गुणाचें केवळ ।
घडिलें आहे निखळ । ऐसें जाण ॥ १३ ॥

**ब्राह्मणक्षत्रियविशां शूद्राणां च परंतप ॥**
**कर्माणि प्रविभक्तानि स्वभावप्रभवैर्गुणैः ॥ ४१ ॥**

गुणीं देवत्रई मेळविली । लोकिं त्रिकुटी पाडिली ।
चतुर्वर्णा घातली । सिनानिं ढलिंगें ॥ १४ ॥
ते चि च्यान्ही वर्ण । जरि पूससी कोण ।
तरि ब्राह्मण । मुख्य जे कां ॥ १५ ॥
एर क्षत्री वैश्य दोन्हीं । ते ही ब्राह्मणाचां चि मानीं ।
जें ते वैदिके विधानीं । योग्य ह्मणौनि ॥ १६ ॥
चौथा शूद्रु जो धनंजया । वेदीं लागु किर नाहीं तेया ।
तन्हीं वृत्ति वर्णत्रया । आधीन तेयाची ॥ १७ ॥
तिये वृत्तिचिया जवळिका । वर्णा ब्राह्मणादिकां ।
आहो शूद्रु ही देखां । चौथा जाला ॥ १८ ॥
जैसा फुलाचेनि सांघातें । तांथू तुरंबिजे श्रीमंतें ।
तैसें द्विजसंगें शूद्रातें । स्वीकारीति श्रुती ॥ १९ ॥
ऐसीसी गा पार्था । चतुर्वर्णव्यवस्था ।
करूं आतां कर्मपंथा । ययाचेया रूप ॥ ८२० ॥
जे हीं ते वर्ण च्यान्ही । ये जन्ममृत्युची कातरी ।
तूकौनियां ईश्वरीं । पैठे होंति ॥ २१ ॥
जिये आत्मप्रवृत्तिचां इहीं । गुणिं सत्वादिकीं तिहीं ।
कर्मे चौघां चौं ठांइं । वांटिलीं वर्णा ॥ २२ ॥
जैसें बापें जोडिलें लेंका । वांटे सूर्य मार्ग पथिकां ।
नाना व्यापार सेवकां । स्वामि जैसा ॥ २३ ॥

तैसें प्रकृतिचां गुणीं । जेया कर्माची वेन्हाणी ।
केली आहे वर्णीं । चौं हीं इहीं ॥ २४ ॥
ते सत्वें आपुलां आंगीं । समुनिनिमुनि भागीं ।
दोघे केले नियोगी । ब्राह्मणक्षत्री ॥ २५ ॥
आणि रज परि सात्विक । तेया ठेविले वैश्य लोक ।
रज चि तमें भेसक । तेथ शूद्रु जाला ॥ २६ ॥
ऐसा एका चि प्राणिवृंदा । भेदु वर्णा चतुर्धा ।
गुणीं चि इहीं प्रबुधा । केला जाण ॥ २७ ॥
मग आपुलें ठेविलें जैसें । आइतें चि दीपें दीसे ।
गुणभिन्न कर्म तैसें । शास्त्र दावी ॥ २८ ॥
ते चि आतां कोण कोण । वर्णविहिताचें लक्षण ।
हें सांघों आइक श्रवण । सौभाग्यनिधी ॥ २९ ॥

**शमो दमस्तपः शौचं क्षांतिरार्जवमेव च ॥**
**ज्ञानं विज्ञानमास्तिक्यं ब्रह्मकर्म स्वभावजम् ॥ ४२ ॥**

तरि सर्व इंद्रियांची वृत्ति । घेउनि आपुलां हातीं ।
बुद्धि आत्मेयां मिळे एकांतिं । प्रिया जैसी ॥ ८३० ॥
ऐसा बुद्धिचा उपरमु । तेया नावं ह्मणिपे शमु ।
तो गुणु गा उपक्रमु । जेया कर्माचा ॥ ३१ ॥
आणि बाह्यइंद्रियांचें धांडें । पीटुनि विधिचेनि दंडें ।
नेंदिजे अधर्मा कडे । कहीं चि जाऊं ॥ ३२ ॥
तो पैं गा शमा विरजा । दमगुणु जेथ दूजा ।
आणी स्वधर्माचिया वोजा । जीर्णे जें कां ॥ ३३ ॥
तेवि चि सटिवियेचिये राती । न विसंभिजे जेवि वाती ।
तैसा ईश्वरनिर्णयो चित्तीं । वाहाणे जें गा ॥ ३४ ॥
तेया नावं तप । हें तीजेया गुणाचे रूप ।
आणि शौच ही निष्पाप । द्विविध जेथ ॥ ३५ ॥

मन भावशुद्धी भरलें । आंग क्रिया आलंकरलें ।
ऐसें सबाह्य जियालें । साजिरें जें कां ॥ ३६ ॥
तेया नावं शौच पार्था । तो कर्मि गुणु चौथा ।
आणि पृथ्वीचेया परी सर्वथा । सर्व जें साहाणें ॥ ३७ ॥
ते गा क्षमा पांडवा । गुणु जेथ पांचवां ।
स्वरां माझि सोहावा । पंचमु जैसा ॥ ३८ ॥
आणि वांकुडेनि वोघेंसि । गंगा हे उजू चि जैसी ।
कां पुटीं वळलां उंसीं । गोडी जेवि ॥ ३९ ॥
तैसा विषमा हिं जीवां । लागि उजुकारु होआवा ।
तें आर्जव गा सावां । तेथिचा गुणु ॥ ८४० ॥
आणि पाणियें प्रयत्नें माळी । अखंड जचे झाडां मुळीं ।
परि तें आघवें चि फळीं । जाणे जेवि ॥ ४१ ॥
तैसें शास्त्राधारें तेणें । ईश्वरू चि एकु पावणें ।
हें फुडें जें कां जाणणें । तें एथ ज्ञान ॥ ४२ ॥
ते गा कर्मि जिये । सातवां गुणु होये ।
आणि विज्ञान हें पाहे । एवंरूप ॥ ४३ ॥
तरि सत्वशुद्धिचिये वेळे । शास्त्रें कां ध्यानबळें ।
ईश्वरतत्वीं चि मिळे । निष्टंकबुद्धी ॥ ४४ ॥
हें विज्ञान बरवें । तें गुणें जें आठवें ।
आणि आस्तिक्य जाणावें । नववा गुणु ॥ ४५ ॥
पैं राजमुद्रा आथिलेया । प्रजा भजे भलेतेया ।
तेवि शास्त्रें स्वीकारिलेयां । मार्गमात्रातें ॥ ४६ ॥
आदरें कां वर्त्तणें । तें आस्तिकत्व मी ह्मणें ।
तो नववा गुणु जेणें । कर्म साच ॥ ४७ ॥
एवं नवे शमादिक । गुण जेथ निर्दोख ।
तें कर्म जाण स्वाभाविक । ब्राह्मणाचें ॥ ४८ ॥

तो नवगुणरत्नाकरु । ययां नवां रत्नांचा हारु ।
न फेडित ले दिनकरु । प्रकाशु जैसा ॥ ४९ ॥
नाना चांपाचां पौळीं पूजिला । चंद्रु चंद्रिका धवलिला ।
कां चंदनु निजें चर्चिला । सौरभ्यें जेवि ॥ ८५० ॥
तेवि नव गुण टिकलग । लेणें ब्राह्मणाचें हें अव्यंग ।
कहीं चि न संडी आंग । ब्राह्मणाचें ॥ ५१ ॥

**शौर्यं तेजो धृतिर्दाक्ष्यं युद्धे चाप्यपलायनं ॥**
**दानमीश्वरभावश्च क्षात्रं कर्म स्वभावजं ॥ ४३ ॥**

आतां उचित जें क्षत्रियां । तें हिं कर्म धनंजया ।
सांघों आइक प्रज्ञेचिया । भरोवरी ॥ ५२ ॥
तरि हा भानु तेजें । नापेक्षी जेवि विरजें ।
कां सिंहें न पाहिजे । जावलिया ॥ ५३ ॥
ऐसा स्वयंभु जो जीव लाटु । सावायें विण उद्भटु ।
तो शौर्य गा श्रेष्ठु । पहिला गुणु ॥ ५४ ॥
आणि सूर्याचेनि प्रतापें । कोडि ही नक्षत्रें हारपे ।
ना तो तन्हीं न लोपे । सचंद्रीं तिहीं ॥ ५५ ॥
तैसा आपुलेनि प्रौढ गुणें । जगासि विस्मयो देणें ।
आपण तरि न क्षोभणें । काइसेनि हीं ॥ ५६ ॥
तें प्रागल्भ्य रूप तेजा । जिये कामीं गुणु दूजा ।
आणि धीरु तो तीजा । तेथिचा गुणु ॥ ५७ ॥
वरिपडिलेयां आकाश । बुद्धिचे डोले मानस ।
झांकी ना तें साहस । धैर्य जेथ ॥ ५८ ॥
आणि पाणी होये भलेतेतुकें । पारि तें जीणौनि पद्म फांके ।
कां आकाश ऊंचिया जींके । आवडेतेया ॥ ५९ ॥
तेवि विविधा अवस्था । पातलिया जीणौनि पार्था ।
प्रज्ञाफलतेया अर्था । वेद्म देणें जें ॥ ८६० ॥

तें दक्षत्व गा चोख । जेथ चौथा गुणु देख ।
आणि जूझ अलौकीक । पांचवां गुणु ॥ ६१ ॥
आदित्याचिं झाडें । ठाकति रविबिंबा कडे ।
तेवि समोर शत्रू पुढें । होणें जें कां ॥ ६२ ॥
माहेवणी प्रयत्नेंसिं । चुकविजे सेजे जैसी ।
रिपू पाठि नेंदिजे तैसी । रणांगणीं ॥ ६३ ॥
हा क्षत्रियांचां आचारीं । पांचवां गुणेंद्रु अवधारीं ।
चौं हीं पुरुषार्थां शिरीं । भगाति जैसी ॥ ६४ ॥
आणि जालेनि फुलें फलें । शाखिये जैसे मोकले ।
कां उदार परिमलें । पद्मकर ॥ ६५ ॥
नाना आवडिचेनि मापें । चांदिणें भलेतेणें घेपे ।
पुढिलाचेनि संकल्पें । तैसें जें देणें ॥ ६६ ॥
तें उमप गा दान । जेथ सावें गुणरत्न ।
आणि आज्ञे एकायतन । होये जेणें कां ॥ ६७ ॥
पोखुनि अवेव आपुले । करविजति मानविलें ।
तेवि पालणें लोभविलें । जग जें भोगी ॥ ६८ ॥
तेया नावं ईश्वरभावो । जो सर्व सामग्रियेचा ठावो ।
तो गुणा माझि राउ । सातवां जेथ ॥ ६९ ॥
ऐसे जे शौर्यादिकीं । इहिं सातवां गुणीं विशेषिं ।
अलंकृत सप्तरुषीं । आकाश जैसें ॥ ८७० ॥
तैसें सप्तगुणिं विचित्र । कर्म जें जगीं पवित्र ।
तें साहाजें जाण क्षात्र । क्षत्रियांचें ॥ ७१ ॥
नाना क्षत्री नव्हे नरु । तो सत्वसोनेयांचा चि मेरु ।
ह्मणौनि गुणस्वर्गां आधारु । सातां इयां ॥ ७२ ॥
नाना सप्तगुणार्णवि । परिवारली बरवी ।
हे क्रिया नव्हे पृथिवी । भोगीतसे तो ॥ ७३ ॥

कां गुणां सातें वोधीं । हे क्रिया ते गंगा जगीं ।
तेया महोदधीचां आंगीं । विलसत जैसी ॥ ७४
हे परी बहुवस देख । शौर्यादिगुणात्मक ।
कर्म गा नैसर्गिक । क्षत्रियजातीसि ॥ ७५ ॥

**कृषिगोरक्ष्यवाणिज्यं वैश्यकर्म स्वभावजं ॥**
**परिचर्यात्मकं कर्म शूद्रस्यापि स्वभावजं ॥ ४४ ॥**

आतां वैश्याचिये जाती । उचित जें महामती ।
तें आइक निरुती । क्रिया सांगों ॥ ७६ ॥
तरि भूमि बीज नांगरु । या भांडवलाचा आधारु ।
घेउनि लाभु अपारु । मेलवणें जें ॥ ७७ ॥
किंबहुना कृषि जीणें । गोधनें राखौनि वर्त्तणें ।
कां सवंगाची वीकणें । महर्गि वस्तु ॥ ७८ ॥
आणि वैश्यक्षत्रियब्राह्मण । हे द्विजन्मे तीन्ही वर्ण ।
यांचें जें सुश्रूषण । तें शूद्रकर्म ॥ ७९ ॥
पैं द्विजसेवे परौतें । धावणें नाहिं शूद्रातें ।
एवं चतुर्वर्णाचिं उचितें । दाविलिं कर्मे ॥ ८८० ॥

**स्वे स्वे कर्मण्यभिरतः संसिद्धिं लभते नरः ॥**
**स्वकर्मनिरतः सिद्धिं यथा विंदति तच्छृणु ॥ ४५ ॥**

आतां यें चि गा विचक्षणा । वेगलालेया वर्णा ।
उचित जैसें करणां । शब्दादिक ॥ ८१ ॥
नातरि जलदच्युता । पाणियां उचित सरिता ।
सरितेसि पांडुसुता । सिंधु उचितु ॥ ८२ ॥
तैसें वर्णाश्रमवशें । जें करणें आलें असे ।
गोरेया आंगा जैसें । गोरेपण ॥ ८३ ॥
तेया स्वभावविहिता कर्मा । शास्त्राचेनि मुखें वीरोत्तमां ।
प्रवर्त्तावेया लागि प्रेमा । अढळ कीजे ॥ ८४ ॥

पैं आपुलें चि रत्न थीतें । घेपे पारखियाचेनि हातें ।
तैसें स्वकर्म आपैतें । शास्त्रें करावें ॥ ८५ ॥
जैसी दीठि असे आपुलां ठांइं । परि दीपें विण भोगु नाहिं ।
मार्गु न ल्हांतां काहिं पाइं । असतां होए ॥ ८६ ॥
ह्मणौनि जातिवशें साचारु । सहजु असे जो अधिकारु ।
तो आपुलां शास्त्रिं गोचरु । आपणपेयां कीजे ॥ ८७ ॥
मग घरिचा चि ठेवा । आणि डोलां दावी दीवा ।
तरि काइ घेतां पांडवा । आलसु असे ॥ ८८ ॥
तैसें स्वभावें भागा आलें । वरि शास्त्रें खरें केलें ।
तें विहित जो आपुलें । आचरे गा ॥ ८९ ॥
परि आलसु सांडौनि । फलकामु दवडौनि ।
आंगें जीवें मोडैनि । तेथ चि भरु ॥ ८९० ॥
वोघीं पडिलेयां पाणीं । नेणें आनानीं वाहाणीं ।
तैसा जिये आचरणीं । व्यवस्थौनि ॥ ९१ ॥
अर्जुना जें इया परीं । तें विहित कर्म करी ।
तो मोक्षाचां ऐलीं द्वारीं । पैठा होए ॥ ९२ ॥
जें अकरणां आणि निषिद्धा । न वचे चि काहीं संबंधा ।
ह्मणौनि भावा विरुद्धा । मूकला तो ॥ ९३ ॥
आणि काम्यकर्मा कडे । न परते चि तेकडे ।
तेथ चंदनाचे खोडे । न ले चि तो ॥ ९४ ॥
येर नित्य कर्म तवं । फलत्यागें वेचलें सर्व ।
ह्मणौनि मोक्षाची सींवं । टाकूं लाहे ॥ ९५ ॥
ऐसेनि शुभाशुभीं संसारीं । सांडिला तो अवधारीं ।
वैराग्यमोक्षद्वारीं । उभा ठाके ॥ ९६ ॥
जे सकलभाग्याची सीमां । मोक्षलाभाची प्रमां ।
नाना कर्ममार्गश्रमा । सेवटु जेथ ॥ ९७ ॥

मोक्षफळें दीधली वोल । जें सुकृततरूचें फूल ।
तिये वैरागीं ठेवी पाउल । भवरु जैसा ॥ ९८ ॥
पैं आत्मज्ञानसुदिनांचा । वाधावा सांघेतेया अरुणाचा ।
उदो तेया वैराग्याचा । ठावो पावे ॥ ९९ ॥
किंवहुना आत्मज्ञान । जेणें हाता ए निधान ।
तें वैराग्य दिव्यांजन । जीवें ले तो ॥ ९०० ॥
ऐसी मोक्षाची योग्यता । सिद्धी जाये पांडुसुता ।
अनुसरौनि विहिता । कर्मा येया ॥ १ ॥
विहित कर्म पांडवा । आपुला अनन्यु वोलवावा ।
आणि हे चि प्रेमसेवा । सर्वात्मकाची ॥ २ ॥
पैं आघवां चि भोगेंसिं । पतिव्रता क्रीडे प्रियेंसिं ।
किं तेया चि नावं जैसीं । तपें तिया केलीं ॥ ३ ॥
कां बालका एकि माए । वांचौनि जीणें काइ आहे ।
ह्मणौनि सेवा कीं तो होए । पाटाचा धर्मु ॥ ४ ॥
नाना पाणी ह्मणौनि मासा । गंगा न संडीतु जैसा ।
सर्वतीर्थसंवासा । वरिपडा जाला ॥ ५ ॥
तैसा आपुलिया विहिता । उपाऊ असे न विसंबता ।
ऐसा कीजे किं जगन्नाथा । आभारु पडे ॥ ६ ॥
आगा जेया जें विहित । तें ईश्वराचें मनोगत ।
ह्मणौनि केलेया निभ्रांत । परितोखु पावे ॥ ७ ॥
पैं जीवाचां कसीं उतरली । ते दासि किं गोसांविणि जाली ।
तैसी सेवेची तेयां माउली । विहित जेवि ॥ ८ ॥
तैसें ते स्वामिचेया मनोभावा । न चूकिजे हे चि सेवा ।
एरें ते पांडवा । वणिज करणें ॥ ९ ॥

**यतः प्रवृत्तिर्भूतानां येन सर्वमिदं ततं ॥**
**स्वकर्मणा तमभ्यर्च्य सिद्धिं विंदति मानवः ॥ ४६ ॥**

ह्मणौनि विहितक्रिया केली । नव्हे तेयाची खूण पाळिली ।
जेया पासौनि कां आली । आकार भूतें ॥ ९१० ॥
जो अविद्येचिया चिंधिया । गुंडाळूनि जीव बाउलिया ।
खेळवीतसे गुणियां । अहंकाररज्जु ॥ ११ ॥
जेणें जग हें समस्त । आंतु बाहिरि भरित ।
जालें आहे दीपजात । तेजें जैसें ॥ १२ ॥
तेया सर्वात्मका ईश्वरा । स्वकर्मकुसुमाची वीरा ।
पूजा केली होये अपारा । तोखा लागि ॥ १३ ॥
ह्मणौनि तिये पूजे । रिझलेनि आत्मराजें ।
वैराग्यसिद्धि दीजे । पसाया तेया ॥ १४ ॥
जैं वैराग्यदशे । ईश्वराचेनि वेधवसें ।
हें सर्व ही नावडे जैसें । वांत होणें ॥ १५ ॥
प्राणनाथाचिये आधी । विरहिणीतें जीणें बाधी ।
तैसें सुखजात त्रिशुद्धी । दुःखा चि लागि ॥ १६ ॥
सम्यग्ज्ञाना उदैजतां । वेधें चि तन्मयता ।
उपजे ऐसी योग्यता । बोधाची लाहे ॥ १७ ॥
ह्मणौनि मोक्षलाभा लागि । जो व्रतें वाहांतसे आंगीं ।
तेणें स्वधर्मु चांगीं । अधिष्ठावा ॥ १८ ॥

**श्रेयान्स्वधर्मो विगुणः परधर्मात्स्वनुष्ठितात् ॥**
**स्वभावनियतं कर्म कुर्वन्नाप्नोति किल्बिषं ॥ ४७ ॥**

आगा आपुला हा स्वधर्मु । आचरणें जऱ्हीं विषमु ।
तऱ्हीं पाहावा तो परिणामु । फळेल जेणें ॥ १९ ॥
जैं सुखा लागि आपणपेयां । निंब चि आथि धनंजया ।
तें कडुवटपण तेया । भोगिजे ना ॥ ९२० ॥
फळणेयां ऐली कडे । केळि तें पाहांतां आशा मोडे ।
ऐसें त्यजिलें तरि जोडे । तैसें कें गोमटें ॥ २१ ॥

तेवि स्वधर्मु सांकडु । देखौनि केला जरि कीडु ।
तरि मोक्षसुखाडु । अंतरला ॥ २२ ॥
आणि आपुली माए । कुब्ज जऱ्हीं आहे ।
तऱ्हीं जीणें जीजे तें नोहे । स्नेह कुऱ्हें कीं ॥ २३ ॥
एरी जिया पराविया । रंभेहूनि बरविया ।
तिया काइ कराविया । बाळकें तेणें ॥ २४ ॥
आगा पाणियांहूनि बोहें । तूपीं गुणु कीरु आहे ।
परि मीनां काइ होए । असणें तेथ ॥ २५ ॥
पैं आघवियां जगीं जें विष । तें कीडेयाचें पीयूष ।
आणि जगा गूळ देख । तेथ मरण तेया ॥ २६ ॥
ह्मणौनि विहित जें जेया जीणें । फीटे संसाराचें धरणें ।
क्रिया कठोर तऱ्हीं तेणें । तें चि करावें ॥ २७ ॥
एरा पराचारा बरविया । ऐसें होईल टेंकलेयां ।
पायांचें चालणें डोया । केलें जैसें ॥ २८ ॥
पया लागि कर्म आपुलें । जें जातिस्वभावेंसि आलें ।
तें करी तेणें जींतलें । कर्मबंधातें ॥ २९ ॥

**सहजं कर्म कौंतेय सदोषमपि न त्यजेत् ॥**
**सर्वारंभा हि दोषेण धूमेनाग्निरिवावृताः ॥ ४८ ॥**

आणि स्वधर्मू चि पाळावा । परधर्मु तो गाळावा ।
हा नियमु हीं पांडवा । न कीजे चि पां ॥ ३० ॥
तऱ्हीं आत्मा दृष्ट नोहे । तवं कर्म करणें कां ठाए ।
आणि करणें तेथ आहे । आयासु आधीं ॥ ३१ ॥
ह्मणौनि भलेतिये कर्मीं । आयासु जरि उपक्रमीं ।
तरि काइ स्वधर्मीं । दोषु सांगें ॥ ३२ ॥
अगा उजू वाटा चालावें । तऱ्हीं पायें चि सीणवावें ।
ना आडरानें धावावें । तऱ्हीं तें चि ॥ ३३ ॥

पैं शिळा कां सिधोरिया । दाटणें एक धनंजया ।
परि जें वाहांतां विसावेया । मिळैल तें घेपे ॥ ३४ ॥
यन्हवि कणा भूसा । कांडितां हिं सोसु सरिसा ।
जें चि रांधणें माणुसा । तें चि हवि ॥ ३५ ॥
परि धर्मपत्नी कां धांगडि । पोसितां जरि एकि वोढि ।
तरि कां अपखडि । आणात्री आंगां ॥ ३६ ॥
दधिजळाचेया गुसळणां । व्यापार सारिखा विचक्षणां ।
वाळुवे तिळां घाणा । गाळणें एक ॥ ३७ ॥
आगा पाठीं लागतां घाइं । मरण न चुके चि पाहीं ।
तरि समोरिलां काई । आगळें कीजे ॥ ३८ ॥
कुलस्त्री दांडेयांचे घाए । निगाली ही जरि साहे ।
तरि स्वपतितें वायें । साडिलें कीं ॥ ३९ ॥
तैसें आवडतें हिं करणें । न निफजे सीणलेयां हिं उणें ।
तरि विहित वा कोणें । बोलें भारी ॥ ९४० ॥
वरि थोडें चि अमृत घेंतां । सर्वस्व वेचो कां पांडुसुता ।
जेणें जोडे जीविता । अक्षयत्व ॥ ४१ ॥
एर काह्या मोलें पुरुनु । विष पियावें घेउनु ।
आत्महत्यासीं निमौनु । जाइजे जेणें ॥ ४२ ॥
तैसिं जाचूनियां इंद्रियें । वेचौनियां आयुष्याचेनि दियें ।
सांचिलीं पापियें आन आहे । दुःख वांचौनि ॥ ४३ ॥
ह्मणौनि करावा चि स्वधर्मु । जो करितां हीरौनि श्रमु ।
उचित देईल परमु । पुरुषार्थराजु ॥ ४४ ॥
या कारणें किरीटी । स्वधर्माची राहाटी ।
न विसंबिजे संकटीं । सिद्धमंत्रु जैसा ॥ ४५ ॥
कां नावेसि जैसें उदधीं । महारोगीं दिव्योषधी ।
न विसंभिजे तेया बुद्धी । स्वकर्म एथ ॥ ४६ ॥

**असक्तबुद्धिः सर्वत्र जितात्मा विगतस्पृहः ।**
**नैष्कर्म्यसिद्धिं परमां संन्यासेनाधिगच्छति ॥ ४९ ॥**

मग इया चि गा कपिध्वजा । स्वकर्मांचिया महापूजा ।
तोखला ईशु तमरजां । झाडि करुनि ॥ ४७ ॥
सुधासत्वाचिया वाटा । आणि आपुली उत्कंठा ।
भवस्वर्गा कालकूटा । ऐसें दावी ॥ ४८ ॥
जियें वैराग्य एणें बोलें । मागां संसिद्धी रूप केलें ।
किंबहुना तें आपुलें । मेळवी खागें ॥ ४९ ॥
मग जींतलेयां हें भोए । पुरुषु सर्वत्र जैसा आहे ।
कां जाला ही जें लाहे । तें आतां सांगों ॥ ९९० ॥
तरि दाहीक हें संसारें । सर्वे मांडिलेंसे जे गुंपिरें ।
तेथ नांतुडे वागुरे । वारा जैसा ॥ ९१ ॥
पैं परिपाकाचिये वेळे । फळ देंटें ना देठु फळें ।
तैसें स्नेह खुळें । सर्वत्र होए ॥ ९२ ॥
पुत्रवित्तकलत्र । हें जालेयां हिं स्वतंत्र ।
माझें न ह्मणे पात्र । विष चि जैसें ॥ ९३ ॥
ऐसा हे विषयजातीं । बुद्धि पोळिली जैसी माघुती ।
पाउलें घेंति एकांतीं । हृदइं चि रिगे ॥ ९४ ॥
ऐसेया अंतष्करण । बाहियें येंतां तयाची आण ।
न मोडी समर्था भेण । दासि जैसी ॥ ९५ ॥
तैसी ऐक्याचिये मुठी । माझिवडें चित्त किरीटी ।
करूनि वेधी निहटी । आत्मेयाचां ॥ ९६ ॥
तेधवां दृष्टादृष्टस्पृहे । निमांतें जालें चि आहे ।
आगि दडपिलेयां धूंवें । न्हाइजे काइ ॥ ९७ ॥
ह्मणौनि निर्मळे मानासिं । स्पृहा नाशौनि जाये आपैसी ।
किंबहुना तो ऐसी । भूमिका पावे ॥ ९८ ॥

पैं अन्यथाबोधु आवबा । मावळौनि तेया पांडवा ।
बोधमात्रीं चि जीवा । ठावो होए ॥ ५९ ॥
धारवणी वेचें सरे । तैसें भोगें प्राचीन पुरे ।
नवें तवं नुपकरे । काहिं चि करुं ॥ ६६० ॥
तैसी कर्मसाम्यदशा । होये तेथ वीरेशा ।
श्रीगुरु आपैसा । भेटे चि गा ॥ ६१ ॥
रातिची चौपाहारी । वेचलेयां अवधारीं ।
डोळेयां तमोरीं । मिळे जैसा ॥ ६२ ॥
कां एउनु फळाचा घडु । पारुखवी केळिचा वाढु
गुरु भेटौनि करी पाडु । मुमुक्षा तैसा ॥ ६३ ॥
मग आळंगिला पूर्णिमां । उणीव सांडी चंद्रमा ।
तैसें होये वीरोत्तमा । गुरुकृपा तेया ॥ ६४ ॥
तेथवां अबोध मात्र असे । तें तवं तेया कृपा नासे ।
तेथ रात्रीसवें जाये आपैसें । आंधारें जैसें ॥ ६५ ॥
तैसें अबोधनासा सवें । नासे क्रियाजात आघवें ।
ऐसा समूळु संभवे । संन्यासु हा ॥ ६६ ॥
एणें समूळज्ञानसंन्यासें । दृश्याचा ठाउ जेथ पुसे ।
तेथ बुझावें तें आपैसें । तो चि आहे ॥ ६७ ॥
चेइलेयां वरि पाहिं । स्वप्निचां तिये डोहीं ।
आपणेयांतें काई । काढूं जाइजे ॥ ६८ ॥
तें मीं नेगें आतां जाणैन । हें सरलें तेया स्वप्न ।
जाला ज्ञातृज्ञेया विहीन । चिदाकाश जो ॥ ६९ ॥
मुखाभासें आरिसा । परौता नेलेयां वीरेषा ।
पांतेपणें विण जैसा । पांत ठाके ॥ ९७० ॥
तैसें नेणणें जें गेलें । तेणें जाणणें हीं नेलें ।
मग निष्क्रिय उरलें । चिन्मात्र चि ॥ ७१ ॥

तेथ स्वभावें धनंजया । नाहिं कोण्हीं चि क्रिया ।
ह्मणौनि प्रवादु तेया । निष्कर्म्य ऐसा ॥ ७२ ॥
तें आपुलें आपणपें । असतू चि होउनि आरोपे ।
तरंगु कां वायुलोपें । समुद्रु जैसा ॥ ७३ ॥
तैसें न होणें निफजे । नैष्कर्म्यसिद्धि ह्मणिजे ।
सर्वा हीं सिद्धी साह्राजें । प्रेम हें चि ॥ ७४ ॥
देउळिचिया कामा कळशु । परमु गंगे सिंधुप्रवेशु ।
कां सुवर्णशुद्धी कसु । सोळावां जैसा ॥ ७५ ॥
तैसें आपुलें नेणणें । फेडिजे कां जाणणें ।
तें हिं गीळुनि जें असणें । ऐसी जे दशा ॥ ७६ ॥
तिये परौतें काहिं । निफजणें एथ नाहिं ।
ह्मणौनि ह्मणिपे पाहीं । परमसिद्धि ते ॥ ७७ ॥

**सिद्धिं प्राप्तो यथा ब्रह्म तथाप्नोति निबोध मे ॥**
**समासेनैव कौंतेय निष्ठा ज्ञानस्य या परा ॥ ५० ॥**

परि हे चि आत्मसिद्धि । जो कोणु भाग्यनिधि ।
श्रीगुरुकृपालब्धीं । काळिं पावे ॥ ७८ ॥
उदैजतां दिनकरु । प्रकाशु आते आंधारु ।
कां दीपा संगें दीपाकारु । होये तंतु ॥ ७९ ॥
ते लवणांची कणिका । मिळत खेळे उदका ।
उदक चि होउनि देखां । ठाके जेवि ॥ ९८० ॥
कां निद्रितु चेवविलेयां । स्वप्नेंसीं नीदे वायां ।
जाउनि आपणपेयां । मिळे जैसा ॥ ८१ ॥
तैसि जियां कोण्हाचीं दैवें । गुरुवाक्यश्रवणां चि सवें ।
द्वैत गीळुनि विसंवे । आपणपेयां वृत्ति ॥ ८२ ॥
तेयासि मन करणें । हें बोलिजैल चि कवणें ॥
आकाशा एणें जाणें । होयें काइ ॥ ८३ ॥

ह्मणौनि तेयासि काहिं । त्रिशुद्धी करणें नाहि ।
परि ऐसें हें जरि काहिं । नोहे जेया ॥ ८४ ॥
कानावचनाचिये भेटी । सरिसा चि पैं किरिटी ।
वस्तु होउनि उठी । कव्हणी एकु जो ॥ ८५ ॥
यन्हवि स्वकर्माचिया वन्ही । काम्यनिषेधाचां इंधनीं ।
रजतमें किर दोन्हीं । जालिलीं आधीं ॥ ८६ ॥
पुत्र वित्त परलोकु । ययां तिहींचा अभिलाखु ।
घरिं होये पाइकु । हें इं जालें ॥ ८७ ॥
इंद्रियें सदा पदार्थी । रिगतां विटाळलीं होतीं ।
तियें प्रत्याहारतीर्थी । नाहाणिलिं कीर ॥ ८८ ॥
आणि स्वधर्माचें फळ । ईश्वरीं अर्पौनि केवळ ।
घेउनि केलें अढळ । वैराग्यपद ॥ ८९ ॥
ऐसी आत्मसाक्षात्कारीं । लाभे ज्ञानाची उजिरी ।
ते सामग्री किर पुरी । मेळविली ॥ ९९० ॥
आणि तिये चि समइं । सद्गुरु भेटले पाहीं ।
तेविं चि तिहीं । राहिजे ना ॥ ९१ ॥
पारे औषध घेंत खेऊं । काइ लाभे आपुला थाऊं ।
किं उदैजतां चि दीऊं । मध्यान होए ॥ ९२ ॥
सुक्षेत्रिं आणि वोलटें । बिं पेरिलें गोमटें ।
परि अलोट फळ भेटे । परि वेळे पैं गा ॥ ९३ ॥
जोडला मार्गु प्रांजळु । मीनला सुसंगाचा मेळु ।
तरि पाविजे वांचौनि वेळु । लागे चि किं ॥ ९४ ॥
तैसा वैराग्यलाभु जाला । वरि सद्गुरु भेटला ।
जीवा अंकुरु फूटला । विवेकाचा ॥ ९५ ॥
तेणें ब्रह्म एक आथि । एर आघवी चि भ्रांति ।
हे हीं किर प्रतीति । गाढी केली ॥ ९६ ॥

परि तें चि जें परब्रह्म । सर्वात्म सर्वोत्तम ॥
मोक्षाचें हीं काम । सरे जेथ ॥ ९७ ॥
इया तीन्हीं अवस्था पोटीं । जिरविजें कां किरीटी ।
तेया ज्ञानासि ही मीठी । दे जे वस्तु ॥ ९८ ॥
ऐक्याचें ऐक्यपण सरे । जेथ अद्वयकणु हीं विरे ।
काहिं चि नुरौनि उरे । जें कां हिं गा ॥ ९९ ॥
तिये ब्रह्मीं एकपणें । ब्रह्म चि होउनि असणें ।
तें काम चि वाहनि तेणें । पाविजे पैं ॥ १००० ॥
भूकैलेया पासीं । उग्गारिलें षड्रसीं ।
तो तृप्ति ग्रासीं । लाहे जेवि ॥ १ ॥
तैसा वैराग्याचा उन्लावा । विचाराचा तो दिवा ।
आंबुथितां आत्मठेवा । काढी चि तो ॥ २ ॥
तरि भोगिजे आत्मरिद्धि । यवडी योग्यतेची सिद्धि ।
जेया आंगिं निरवधी । लेणें जाली ॥ ३ ॥
तो जेणें क्रमें ब्रह्म । होणें करी कां सुगम ।
तेया क्रमाचें आतां वर्म । आइक सांगों ॥ ४ ॥

**बुध्द्या विशुद्धया युक्तो धृत्यात्मानं नियम्य च ।**
**शब्दादीन्विषयांस्त्यक्त्वा रागद्वेषौ व्युदस्य च ॥ ५१ ॥**

तरि गुरु दाविलेया वाटा । एउनि विवेकतीर्थतटा ।
धूनियां मलकटा । बुद्धिचा तेणें ॥ ५ ॥
मग राहूनि उगलिली । प्रभा चंद्रें आलंगिली ।
तैसी शुद्धी ते जडली । आपणपां बुद्धि ॥ ६ ॥
सांडौनि कुळें दोन्हीं । क्रिया अनुसरे कामिनी ।
द्वंदत्यागें स्वचिंतनीं । पडिली तैसी ॥ ७ ॥
आणि ज्ञान ऐसें जिन्हार । नेवों नेंति निरंतर ।
इंद्रियें पोकेलें थोर । शब्दादिक जें ॥ ८ ॥

तें रश्मिजाल काढिलेयां । मृगजल जाये लया ।
तैसें धृतिरोखें तेया । पांचां हिं केलें ॥ ९ ॥
नेणतां अधमाचें अन्न । खादलेयां कीजे वमन ।
तैसीं वोकविलीं सत्रासन । इंद्रियें विषयीं ॥ १०१० ॥
मग प्रत्यक्प्रवृत्ति चोखटे । गंगेचेनि लाविलीं तटें ।
ऐसी प्रायश्चित्तें धोवटें । केलीं एणें ॥ ११ ॥
पाठिं सात्विकें धीरें तेणें । शोधारिलीं तियें करणें ।
मनेंसिं योगधारणें । मेळविलीं ॥ १२ ॥
तेविं चि प्राचीन इष्टानिष्टें । भोगेंसिं येउनि भेटे ।
तेथ देखिलेयां हिं वोखटें । द्वेषु न करी ॥ १३ ॥
ना गोमटें चि विपायें । तें आणूनि पुढां सुवे ।
तरि तेया लागि नोहे । साभिलाखु ॥ १४ ॥

**विविक्तसेवी लघ्वाशी यतवाक्कायमानसः ॥**
**ध्यानयोगपरो नित्यं वैराग्यं समुपाश्रितः ॥ ५२ ॥**

इया परीं इष्टानिष्टीं । रागद्वेष किरीटी ।
त्यजूनि गिरिकपाटीं । निकुंजीं वसे ॥ १५ ॥
गजबज सांडिलिया । वसत्री वनस्थलिया ।
आंगाचिया मांदिया । एकलिया ॥ १६ ॥
शमदमादिकिं खेळे । न बोलणेंनि चावळे ।
गुरुवाक्याचेनि मेळें । नेणे वेळु ॥ १७ ॥
आणि आंगा बळ यावें । नातरि क्षुधा जावें ।
कां जीभेचे पुरवावे । मनोरथ ॥ १८ ॥
भोजन करितां विषीं । यां तिहींतें हीं न लेखी ।
आहारें मीति संतोषीं । माप सुये ॥ १९ ॥
आसनाचेनि पावकें । हुरपतां प्राणु पोखे ।
येया चि लागि मोटकें । अशन करी ॥ १०२० ॥

आणि परपुरुषें कामिली । कुलवधू आंग न घली ।
निद्रालय न मेकली । आसन तैसें ॥ २१ ॥
दंडवताचेनि प्रसंगें । भुइं हान आंग लागे ।
वांचौनि एर नेघे । राभस्य जेथें ॥ २२ ॥
देहनिर्वाहा पुरतें । राहाटवी हातपायांतें ।
किंबहुना आपैतें । सबाह्य केलें ॥ २३ ॥
आणि मनाचा उंबरा । वृत्तीसि देखों नेदी वीरा ।
तेथ कें वाग्व्यापारा । अवकाशु असे ॥ २४ ॥
ऐसेन देहवाचामानस । हें जीणौनि बाह्य प्रदेश ।
आकोलिलें आकाश । ध्यानाचें तेणें ॥ २५ ॥
गुरुवाक्यें उठिला । बोधाचा निश्चयो आपुला ।
नेहालीं हातीं घेतला । आरिसा जैसा ॥ २६ ॥
पैं ध्याता आपणपें चि परी । ध्यानरूपें वृत्ती माझारीं ।
ध्येयत्वें हे अवधारीं । ध्यानरूढि गा ॥ २७ ॥
तेथ ध्यानध्येयध्याता । यां तिहिं एकरूपता ।
होये तवं पांडुसुता । कीजे तें गा ॥ २८ ॥
ह्मणौनि तो मुमुक्षु । आत्मज्ञानीं जाला दक्षु ॥
परि पुढां सूनि पक्षु । योगाभ्यासाचा ॥ २९ ॥
अपानरंध्रद्वया । माझारि धनंजया ।
पार्ष्णी पीडूनियां । कांवरूमूला ॥ १०३० ॥
आकुंचूनु अध । देउनि तीन्हीं बंध ।
करूनि एकवद शुद्ध । वायुभेद ॥ ३१ ॥
कुंडलिणी जागौनि । मध्यमा विकासौनि ।
आधारादि भेदुनि । आज्ञा वेन्हीं ॥ ३२ ॥
सहस्रदलाचा मेघु । पीयूखु वरिखौनि चांगु ।
तो मूल वेन्हीं ओघु । आणूनियां ॥ ३३ ॥

नाचतेया पुण्यगिरि । चिद्भैरवाचां खापरीं ।
मनपवनाचां खीचु करी । वाढूनियां ॥ ३४ ॥
जालेयां योगाचा गाढा । मेळावा सूनि हा पुढां ।
ध्याना मागिली कडां । स्वयंभ केलें ॥ ३५ ॥
आणि ध्यानयोग दोन्हीं । इयें आत्मतत्वज्ञानीं ।
पैठि होआवेया निर्विघ्नीं । आदीं चि तेणें ॥ ३६ ॥
वीतराग तेया सारिखा । जोडूनि ठेविला सखा ।
तो आघविया चि भूमिका । सवें चाले ॥ ३७ ॥
पांवें तें दीसे तवं वेन्हीं । दीठितें न संडी दीपु जारि ।
तारि कें असे अवसरी । देखावेया ॥ ३८ ॥
तैसें मोक्षीं प्रवर्त्तलेयां । वृत्ति ब्रह्मीं जाये लया ।
तवं वैराग्य आथि तेया । भंगु कैंचा ॥ ३९ ॥
ह्मणौनि सवैराग्यु । ज्ञानाभ्यासु तो सभाग्यु ।
करूनि जाला योग्यु । आत्मलाभा ॥ १०४० ॥
ऐसी वैराग्याची आंगीं । बाणूनियां वज्रांगी ।
राजयोगुतुरंगीं । आरूढला ॥ ४१ ॥
वारिपडिलें दीठी । सानें थोर ही निवटी ।
ते बळी विवेकमूठी । ध्यानांचे खांडे ॥ ४२ ॥
ऐसेनि संसाररणा आंतु । आंधारीं सूर्यु तैसा असे जांतु ।
मोक्षविजयश्रिये वरैतु । होआवेया ॥ ४३ ॥

**अहंकारं बलं दर्पं कामं क्रोधं परिग्रहं ॥**
**विमुच्य निर्ममः शांतो ब्रह्मभूयाय कल्पते ॥ ५३ ॥**

तेथ आडवैरें चि आले । दोषवैरी जे धोपटिले ।
तेयां माझि पहिलें । देहीं अहंकारु ॥ ४४ ॥
जो न मोकली मारुनि । जिवों नेंदी उपजौनि ।
विचंबी खोडां घालुनि । हाडाचां इये ॥ ४५ ॥

तेयाचा देह हा थारा । मोडूनि घेतला वीरा ।
आणि बल हा दुसरा । मारिला वैरी ॥ ४६ ॥
जें विषयांचेनि नावें । चौगुणें हीं परि ठावें ।
जीणें मृतावस्था धांवे । सर्वत्र जगा ॥ ४७ ॥
तो विषयविषिचा थावो । आवघेयां दोषांचा रावो ।
ध्यानखड्गाचा घाओ । साहील कैंचा ॥ ४८ ॥
आणि प्रियप्राप्ती । करी जेया सुखाची व्यक्ती ।
तेयाची घालूनि बूंथि । आंगीं जो वाजे ॥ ४९ ॥
जो सन्मार्ग भुलवी । मग अधर्माचां अडवीं ।
सूनि वाघां सांपडवीं । नरकादिकां ॥ १०५० ॥
तो विश्वासें मारितां रिपु । निवटूनि घातला दर्पु ।
आणि जेयाचा आहा कंपु । तापसांसि ॥ ५१ ॥
क्रोधा ऐसा हा महादोखु । देख पां जेयाचा परिपाकु ।
भरिजे तवं अधिकु । रिता होये जो ॥ ५२ ॥
तो कामु कोण्हीं चि ठांइं । नसे ऐसें केलें पाहीं ।
किं तें चि क्रोधा ही । साहाजें जालें ॥ ५३ ॥
मूलाचें तोडणें जैसें । होये कां शाखा दोसें ।
कामें नासिलेनि नासे । तैसा क्रोधु ॥ ५४ ॥
ह्मणौनि कामु वैरी । जाला जेथ ठाणौरी ।
तेथ सरली वारी । क्रोधाची ही ॥ ५५ ॥
समर्थु आपुला खोडा । सीसें वाहावी जैसा होडा ।
तसा भुंजौनि गाढा । परिग्रहो ॥ ५६ ॥
जो माथा चि पालाणवी । आंगा आवगु घालवी ।
ममत्वाची घेववी । जिये दांडी ॥ ५७ ॥
शिष्यशास्त्रादिविलासें । मठामुद्राचेनि मीसें ।
घातले आहाति पांसें । निसंगां जेणें ५८ ॥

घरीं कुटंबपणें सरे । तरि वनीं वनत्वें अवतरे ।
नागिवेया ही शरीरें । लागला आहे ॥ ५९ ॥
ऐसा दुर्जयो परिग्रहो । तेयाचा फेडूनि ठाउ ।
भवविजयाचा उत्साहो । भोगीतु असे तो ॥ १०६० ॥
तेथ अमानित्वादि आघवे । ज्ञानगुणाचे जे मेळावे ।
ते कैवल्यदेशिचे आवते । राय जैसे आले ॥ ६१ ॥
नव्हे सम्यग्ज्ञानाचिया । राणिवा उगाणूनि तेया ।
परिवारु होउनियां । राहांति आपण ॥ ६२ ॥
प्रवृत्तीचिये राजवीदी । अवस्थाभेदप्रमदीं ।
कीजताये प्रतिपदीं । सुखाचें लोण ॥ ६३ ॥
पुढां बोधाचिये कांवि वेन्हीं । विवेकु दर्याची मांदी सारी ।
योगभूमि आरतीकरी । यति जैसिया ॥ ६४ ॥
तेथ रिद्धीसिद्धीचीं अनेकें । वृंदें मिळतें प्रसंगें ।
तिये पुष्पवर्षी आंगें । नाहांतसे तो ॥ ६५ ॥
ऐसें ब्रह्मैक्या सारिखें । स्वराज्य यंतां जवळिके ।
झलंबित आहे हरिखें । तीन्ही लोक ॥ ६६ ॥
तेथवां वैरी कां मैत्रिया । तेयासि माझें ह्मणावेया ।
सन्माना धनंजया । उरे चि ना ॥ ६७ ॥
हें ना भलेतेणें व्याजें । जो जेयातें ह्मणे माझें ।
तें नोडवे चि मां दूजें । अद्वितीयु जाला ॥ ६८ ॥
पैं आपुलिया ऐकी सत्ता । सर्वै कवळूनि पांडुसुता ।
कहिं न लगती ममता । धाडिली तेणें ॥ ६९ ॥
ऐसा जींतलेयां रिपुवर्गु । आपु मानलेयां हा जगु ।
आपैसेया योगतुरंगु । थीरु जाला ॥ १०७० ॥
वैराग्याचें गाढलें । आंगीं त्राण होतें उभलें ।
तें हिं नावेक ढिलें । केलें तेथवां ॥ ७१ ॥

आणि लोटी ध्यानाचें खांडें । तें दूजें नाहिं फुडें ।
ह्मणौनि हातु आखुडे । वृत्तिचा ही ॥ ७२ ॥
जैसें रसौषध खरें । आपुलें काज करूनि पुरें ।
आपण हिं उतरे । तैसें होतें ॥ ७३ ॥
देखौनि टाकिता ठावो । धांवतां थिरावे पाउ ।
तैसा ब्रह्मसामीप्यें थांवों । अभ्यासु सांडी ॥ ७४ ॥
घडतां महोदधीसीं । गंगा वेगें सांडिजे जैसी ।
कां कामिनी कांया पासीं । मंथर होए ॥ ७५ ॥
नाना फलतिए वेले । केलिची वाढि मांडुले ।
कां गावां पुढें वाले । मार्गु जैसा ॥ ७६ ॥
तैसा आत्मसाक्षात्कारु । होइल देखों गोचरु ।
ऐसा साधनहातियेरु । खलु चि ठेवी ॥ ७७ ॥
ह्मणौनि ब्रह्मेंसिं तेया । ऐक्याचा समयो धनंजया ।
होंतसे तैं उपाया । ऊहटु पडिला ॥ ७८ ॥
मग वैराग्याची गोधुलुक । जें ज्ञानअभ्यासाचें वार्द्धक ।
योगफलाची ही परीपाक- । दशा जे कां ॥ ७९ ॥
ते शांति पैं गा सुभगा । संपूर्ण ये तेयाचिया आंगा ।
तैं ब्रह्म होआवेया जोगा । होये तो पुरुषु ॥ १०८० ॥
पुनिवेहूनि चाउदसीं । जेतुलें उणेपण शशी ।
कां सोलें पाहूनि जैसी । पन्हरावी वानी ॥ ८१ ॥
सागरीं हीं पाणि वेगें । संचरे तें रूप गंगे ।
येर निश्चल जें उगें । तें समुद्रु जैसा ॥ ८२ ॥
ब्रह्म आणि ब्रह्महोंतिये । योग्यते तैसा पाडु आहे ।
तें चि शांतिचेनि लाहें । होतें तो गा ॥ ८३ ॥
पैं तें चि होणेन विण । प्रतीती आलें ब्रह्मपण ।
ते ब्रह्म होती जाण । योग्यता एथ ॥ ८४ ॥

ब्रह्मभूतः प्रसन्नात्मा न शोचति न कांक्षति ॥
समः सर्वेषु भूतेषु मद्भक्तिं लभते परां ॥ ५४ ॥

ते ब्रह्मभावयोग्यता । पुरुषु मग तो पांडुसुता ।
आत्मबोधप्रसन्नता— । पदीं बैसे ॥ ८५ ॥
जेणें निफजे रसखोर । तो तापु ही जैं जाए ।
तैं ते कां होए । प्रसन्न जैसी ॥ ८६ ॥
नाना भरतिया लगबगा । शरत्कालिं सांडिजे गंगा ।
कां गीत राहातां उपांगा । ऱ्हट्टु पडे ॥ ८७ ॥
तैसा आत्मबोधीं उद्यमु । करितां होये जो श्रमु ।
तो ही जेथ समु । होउनि जाए ॥ ८८ ॥
आत्मबोधप्रशस्ती । हे तिये दशेची क्षिति ।
ते भोगितसे महामती । योग्यु तो गा ॥ ८९ ॥
तेधवां अप्राप्तें शोचावें । काहिं कामावेया कामावें ।
हें सरलें समभावें । भरतेया तेया ॥ १०९० ॥
उदया यंतां गभस्ती । नानानक्षत्रव्यक्ती ।
हारविजति दीप्ती । आंगिका जेवि ॥ ९१ ॥
तेवि उठितिया आत्मप्रथा । हे भूतभेदव्यवस्था ।
मोडितमोडितां पार्था । वास पाए तो ॥ ९२ ॥
पाटेया वरिलें आखरें । जैसि पूसतें यंति करें ।
तैसीं हरपति भेदांतरें । तेयाचिया दीठी ॥ ९३ ॥
ऐसेनि अन्यथाज्ञानें । जियें घेपति जागरस्वप्नें ।
तियें दोन्हीं केलीं लीनें । अव्यक्ता माझि ॥ ९४ ॥
मग तें हिं अव्यक्त । बोधु वाढतां झिजत ।
पूर्णबोधीं समस्त । बुडौनि जाए ॥ ९५ ॥
नाना चालिचिया वाटी । वाट होंत थोडी ।
पातलां ठांइं बुडी । देउनि रिगे ॥ ९६ ॥

जैसी भोजनव्यापारीं । क्षुधा जिरत अवधारीं ।
तृप्तिचां अवसरीं । नाहिं होए ॥ ९७ ॥
कां जागृति जवं उद्दीपे । तवं तवं नीद हारपे ।
मग जागिनलेयां स्वरूपें । नसे चि गा ॥ ९८ ॥
हें ना आपुलें पूर्णत्व भेटे । जेथ चंद्रासि वाढि कुंठे ।
तेथ शुक्लपक्षु आटे । निशेषु जैसा ॥ ९९ ॥
तैसें बोध्यजात गीळितु । बोध बोधें ये मज आंतु ।
मिसळला तेथ सांघातु । अबोधु गेला ॥ ११०० ॥
तेधवां कल्पांतिचिये वेळे । नदी सिंधुचे पेंडवळे ।
मोडौनि भरे जळें । आब्रह्म जैसें ॥ १ ॥
नाना गेलेयां घटमठ । आकाश ठाके एकवट ।
कां जळौनि काष्टें काष्ट । वन्ही चि होए ॥ २ ॥
नातरि लेणेयांचे ठसे । आटौनि गेलेयां मूसे ।
नामरूपभेदें तैसें । सांडिलें सोनें ॥ ३ ॥
हें हीं असो चेइलेयां । तें स्वप्न नाहिं जालेयां ।
आपण चि कां आपणेयां । उरिजे जैसें ॥ ४ ॥
तैसा मी एकु वांचौनि काहिं । तेया तेया ही सकट नाहिं ।
हे चौथी भक्ति पाहीं । माझी तो लाहे ॥ ५ ॥

**भक्त्या मामभिजानाति यावान्यश्चास्मि तत्वतः ॥**
**ततो मां तत्वतो ज्ञात्वा विशते तदनंतरं ॥ ५५ ॥**

येर आर्त्त जिज्ञासु अर्थी । हे भक्ति जिहीं पंथीं ।
ते तीन्ही पावौनि चौथी । ह्मणत आहों ॥ ६ ॥
यर्‍हविं तीजी नां चौथी । हे पहिली नां सरती ।
पैं माझी सहजस्थिति । भक्ति नावं ॥ ७ ॥
जें नेणतें माझें प्रकाशूनि । अन्यथात्वें मातें दाउनि ।
सर्व ही सर्वीं भजौनि । बुझावितसे ॥ ८ ॥

जो जेथ जैसें पाउँ बैसे । तिया तेथ तैसें चि असे ।
हें उजिवडें कां दीसे । अखंडें जेणें ॥ ९ ॥
स्वप्निचें दीसणें न दिसणें । जैसें आपुलेनि असिलेपणें ।
विश्वाचें आहे नाहीं जेणें । प्रकाशे जैसें ॥ १११० ॥
ऐसा सहजु माझा । प्रकाशु जो कपिध्वजा ।
तो भक्ति या उँजा । बोलिजे गा ॥ ११ ॥
ह्मणौनि आर्त्तांचां ठांइं । हे आर्त्ति होउनि पाहीं ।
अपेक्षणीय जें कांहिं । तें मीं केलां ॥ १२ ॥
जिज्ञासु पुढां वीरेषा । हे चि होउनि जिज्ञासा ।
मी जिज्ञासु ऐसा । दाखविला ॥ १३ ॥
हे चि होउनि अर्थना । मी चि माझां अर्थी अर्जुना ।
करूनि अर्थाभिधाना । आणी मातें ॥ १४ ॥
अथवा घेउनि अज्ञानातें । माझिया भक्ती जैं हें वर्त्ते ।
तैं दावी मज द्रष्टेयातें । दृश्य करुनि ॥ १५ ॥
एथ मुख चि दीसे मुखें । या बोला कांहिं न चुके ।
परि दूजेपण हें लटकें । आरिसा करी ॥ १६ ॥
दीठी चंद्रू चि घे साचें । परि येतुलें हें तिमिराचें ।
जें एक चि असे तेयाचें । दोनि दावी ॥ १७ ॥
तैसें सर्वत्र मीं चि मियां । देखतसें भक्ती इया ।
परि दृश्यत्व हें वायां । अज्ञानवसें ॥ १८ ॥
तें अज्ञान आतां फीटलें । माझें दृष्टत्व मज भेटलें ।
निजबिंबिं एकवटलें । प्रतिबिंब जैसें ॥ १९ ॥
पैं जेधवां इं असे कीडाळ । तेधवां इं सोनें चि अढळ ।
परि तें गेलेयां केवळ । उरे जैसें ॥ ११२० ॥
हो कां पुनिवे आदिं कांहिं । चांद्रि सांधा चि नाहिं ।
परि तिये दीं भेटे पाहीं । पूर्णता तेया ॥ २१ ॥

तैसा मी चि अज्ञानद्वारें । दीसें परि हस्तांतरें ।
मग दृश्य तें सरे । मियां चि मीं लाभें ॥ २२ ॥
ह्मणौनि दृश्य पंथा । अतीतु माझा पार्था ।
भक्तियोगु चौथा । ह्मणितला गा ॥ २३ ॥
येया ज्ञानभक्ती सहज । भक्तु एकवटला मज ।
तो मी चि केवळ तुज । श्रुत ही आहे ॥ २४ ॥
जें उभूनियां भुजा । ज्ञानियां आत्मा माझा ।
हें बोलिलों कपिध्वजा । सप्तमाध्याइं ॥ २५ ॥
ते हे कल्पादिभक्ति मियां । भागवतमीषें ब्रह्मेयां ।
उत्तम ह्मणौनियां । उपदेशिली ॥ २६ ॥
ज्ञानिये इयेतें स्वसंवित्ति । ह्मणति शैव शक्ति ।
आह्मीं परमभक्ति । आपुली ह्मणों गा ॥ २७ ॥
हे मज मिळतिये वेळे । तेयां क्रमयोगियां फळे ।
मग समस्त ही निखळें । मियां चि भरे ॥ २८ ॥
तेथ वैराग्य विवेकेंसीं । आटे बंधु मोक्षेंसी ।
वृत्ति तिया आवृत्तिसीं । बुडौनि जाए ॥ २९ ॥
घेउनि ऐलपणातें । परत्व हारपे जेथें ।
गीळुनि च्यान्ही भूतें । आकाश जैसें ॥ ११३० ॥
तेया परीं साध्य– । साधनातीत शुद्ध ।
तें मीं होउनि एकवद । भोगी तो माझें ॥ ३१ ॥
घडौनि सिंधुचेया आंगा । सिंधु वरि तळपे गंगा ।
तैसा पाडु तेया भोगा । अवधारिजो ॥ ३२ ॥
कां आरिसेयासि आरिसा । उटूनि दाविला जैसा ।
देखणां अतिसो तैसा । भोगणां तिये ॥ ३३ ॥
चेइलेयां स्वप्न नासे । आपुलें ऐक्य चि दीसे ।
तें दूजेन विण जैसें । भोगिजे कां ॥ ३४ ॥

हें असो दर्पणु नेलेयां । तो मुखबोधु ही गेलेयां ।
देखिलेपण एकलेयां । आस्वादिजे जेवि ॥ ३५ ॥
तो चि जालेयां भोगु तेयाचा । न घडे हा भावो जेयांचा ।
तें हि बोलें किर बोलाचा । उच्चारु कीजे ॥ ३६ ॥
तेयाचां नेणों गावीं । रवि प्रकाशे हान दिवीं ।
किं व्योमा लागि पडवी । उभिली तिहिं ॥ ३७ ॥
हांगा राज्ञत्व नव्हतां आंगिं । रावो आपण काइ भोगी ।
किं आंधारु हान आलंगी । दिनकरातें ॥ ३८ ॥
आणि आकाश जें नव्हे । तें आकाश काइ जाणावें ।
रत्नाचां रूपिं मिरवे । गुंजांचें लेणें ॥ ३९ ॥
ह्मणौनि मी होणें नाहिं । तेया मीं आहें कें हीं ।
मग भजैल हें काइ । बोलों किर ॥ ११४० ॥
यया लागि तो क्रमयोगी । मी जाला चि मातें भोगी ।
तारुण्य कां तरुणांगी । जिया परीं ॥ ४१ ॥
तरंगु सर्वांगिं तोय चुंबी । प्रभा सर्वत्र विलसे बिंबिं ।
नाना अवकाशु नभीं । लुंठतु जैसा ॥ ४२ ॥
तैसा रूप होउनि माझें । मातें क्रिया विण तो भजे ।
घनाकारु कां साहाजें । सोनेयांतें जेवि ॥ ४३ ॥
चंदनाची द्रुति जैसी । चंदनीं असे आपैसी ।
कां एकत्र गर्भशशी । चंद्रिका ते ॥ ४४ ॥
तैसी क्रिया किर न साहे । तऱ्हीं अद्वैतीं भक्ति आहे ।
हें अनुभवा जोगें नोहे । बोला ऐसें ॥ ४५ ॥
तेथवां पूर्वसंस्कारसंदें । जें कांहिं तो अनुवादे ।
तेणें आलविलेनि वो दें । बोलता मीं चि ॥ ४६ ॥
बोलतेया बोलता चि भेटे । तेथ बोलिलें हें न घटे ।
तें मौन तवं गोमटें । स्तवन माझें ॥ ४७ ॥

ह्मणौनि तेया बोलतां । बोलीं बोलता मीं भेटतां ।
मौन होये तेणें तत्वता । स्तवी तो मातें ॥ ४८ ॥
तैसें चि बुद्धीं कां दीठी । जें देखों जाये तो किरीटी ।
तें देखणेयां दृश्य लोटी । देखतें चि दावी ॥ ४९ ॥
आरिसेया·आदी जैसें । देखतें चि मुख दीसे ।
तेया तें देखणें तैसें । मेळवी द्रष्टें ॥ ११५० ॥
दृश्य जाउनियां दृष्टें । द्रष्टेयासी चि जें भेटे ।
तैं एकलेपण न घटे । द्रष्टेपण हि ॥ ५१ ॥
तेथ स्वप्निचिया प्रिया । चेउनि झोंबों गेलेयां ।
ठाइजे दोन्हीं होउनियां । आपण चि जैसें ॥ ५२ ॥
कां दोन्ही काष्टांचिया घृष्टी । माझि वन्हि जो एकु उठी ।
तो दोनि हे भाष आटी । आपण चि होए ॥ ५३ ॥
नाना प्रतिबिंब हातिं । घेऊं गेलेयां गभस्ती ।
बिंबता ही थिती । जाये जैसी ॥ ५४ ॥
तैसा मी होउनि देखतें । तो घेऊं जाये दृश्यातें ।
तेथ दृश्य नेथिलें तें । दृष्टत्व ही ॥ ५५ ॥
रवी आंधारु प्रकाशितां । नुरे चि जेवि प्रकाश्यता ।
तेवि दृश्य नाहिं दृष्टता । मी जालेयां ॥ ५६ ॥
मग देखिजे कां नेदखिजे । ऐसी जे दशा निफजे ।
तें तें दर्शन माझें । साचोकारें ॥ ५७ ॥
तें भलेतेया किरीटी । पदार्थाचिया भेटी ।
दृश्यादृश्यातीता दृष्टी । भोगी तो सदा ॥ ५८ ॥
आणि आकाश हें आकारें । दाटलें न ढळे जैसें ।
मियां आपणपेनि तैसें । जालें तेया ॥ ५९ ॥
कल्पांतिं उदक उदकें । रुंधलेयां वाहो ठाके ।
तैसें आत्मेनि मियां एकें । कोंदला तो ॥ ११६० ॥

पाउ आपणपेयां वळघे । केवि वन्हि आपणपेयां लागे ।
आपणपेयां पाणी रिगे । गंगे स्नाना केवि ॥ ६१ ॥
ह्मणौनि सर्व मी जालेपणें । ठेलें तेया एणें जाणें ।
हें चि गा यात्रा करणें । अद्वया मज ॥ ६२ ॥
पैं जळा वरिलु तरंगु । जऱ्हीं धांविनला सवेगु ।
तऱ्हीं नाहिं भूमीभागु । क्रमिला जैसा ॥ ६३ ॥
जें सांडावें कां ठेवावें । चाळणें जें चालावें ।
तें तो चि एक आघवें । ह्मणौनियां ॥ ६४ ॥
गेलेयां भलेतेउता । उदकपणें पांडुसुता ।
तरंगाची कां निश्चळता । न मोडे चि जेवि ॥ ६५ ॥
तैसा मीपणें हालों ठेला । तो आघवेया चि मज आला ।
इया यात्रा होये भला । कापडी माझा ॥ ६६ ॥
आणि शरीरस्वभाववसें । काहिं एक करूं बैसे ।
तरि मीं चि तेवि तेणें मीसें । नटें तेया ॥ ६७ ॥
तेथ कर्म आणि कर्त्ता । हें जाउनियां पांडुसुता ।
मी आत्मेनि मातें पांतां । मीं चि होयें ॥ ६८ ॥
पैं दर्पणातें दर्पणें । पाहिलेयां होये न पाणें ।
सोनें झांकिलेयां सुवर्णें । न झंके जेवि ॥ ६९ ॥
दीपातें दीपें प्रकाशिजे । तें न प्रकाशणें चि निफजे ।
तैसें कर्म मियां कीजे । तैं करणें कैंचें ॥ ११७० ॥
तें होंत चि आहे । जैं करावें भाष जाए ।
ऐसें न करणें चि होए । तेयाचें केलें ॥ ७१ ॥
क्रियाजात मियां जालेपणें । घडे काहिं चि न करणें ।
तेया चि नावं पूजणें । खुणेचें माझें ॥ ७२ ॥
ह्मणौनि करितिया वोजा । न करणें कपिध्वजा ।
निफजे तेया महापूजा । पूजि तो मातें ॥ ७३ ॥

येवं तो बोले तें स्तवन । तो देखे तें दर्शन ।
अद्वया मज गमन । तो चाले तें चि ॥ ७४ ॥
तो करी तेतुली पूजा । तो कल्पी तो जपु माझा ।
तो असे ते चि कपिध्वजा । समाधि माझी ॥ ७५ ॥
जैसें कनकेंसिं कांकणें । आसिजे अनन्यपणें ।
तो भक्तियोगें एणें । मासिं तैसा ॥ ७६ ॥
किंबहुना तंतुसिं पटु । कां मृत्तिकेसीं घटु ।
तैसा तो एकवटु । मजसिं माझा ॥ ७७ ॥
उदकिं कल्लोलु । कापुरिं परिमलु ।
रत्निं उजालु । अनन्यु जैसा ॥ ७८ ॥
इया अनन्यभक्ती । इयें आघवीं चि दृश्य जातीं ।
मज आपणपेयां सुमती । द्रष्टेयातें जाणें ॥ ७९ ॥
तिहिं अवस्थांचेनि द्वारें । उपाधि उपहिताकारें ।
भावाभावरूप स्फुरे । दृश्य जें हें ॥ ११८० ॥
तें हें आघवें चि द्रष्टा । ऐसां बोधाचां माजिवठां ।
अनुभवाचा सुभटा । ढेंढा तो नाचे ॥ ८१ ॥
रज्जु जालेयां गोचरु । आभासता तो व्यालाकारु ।
रज्जू चि ऐसा निर्धारु । होये जेवि ॥ ८२ ॥
भांगारा परौतें कांहीं । लेणें गुंज भरि ही नाहिं ।
हें आटूनि पाइं । कीजे जैसें ॥ ८३ ॥
उदका एका परौतें । तरंग नाहिं चि हें निरुतें ।
जाणौनि तेया आकारातें । नेणपे जेवि ॥ ८४ ॥
कां स्वप्नविस्तारा समस्तां । चेउनियां उमाणें घेतां ।
आपणपेयां परौता । न दिसे जैसा ॥ ८५ ॥
तैसी जे कांहिं आथिनाथि— । पणें जे होये स्फूर्त्ति ।
ते ज्ञाता चि मीं हे प्रतीति । होउनि तो भोगी ॥ ८६ ॥

जाणें अजु मीं अजरु । अक्षय मीं अक्षरु ।
अपूरु मीं अपारु । आनंदु मीं ॥ ८७ ॥
अचलु मीं अच्युतु । अनंतु मीं अद्वैतु ।
आद्यु मीं अव्यक्तु । व्यक्तु ही मीं ॥ ८८ ॥
ईशु मीं ईश्वरु । अनादि मीं अमरु ।
अभय मीं आधारु । आधेय मीं ॥ ८९ ॥
स्वामि मीं सदोदितु । सहजु मीं सतंतु ।
सर्व मी सर्वगतु । सर्वातीतु मीं ॥ ११९० ॥
नवा मी पुराणु । शून्य मीं संपूर्णु ।
अस्थूलु मी अणणू । जें काहिं तें मीं ॥ ९१ ॥
अक्रियु मीं एकु । असंगु मी अशोकु ।
व्याप्य मी व्यापकु । पुरुषोत्तमु मीं ॥ ९२ ॥
अशब्दु मीं अश्रोतृ । अरूपु मीं अगोत्रु ।
समु मीं स्वतंत्रु । ब्रह्म मीं पर ॥ ९३ ॥
ऐसें आत्मत्वें एका मातें । इया भक्ती जाणे विरुतें ।
आणि इया बोधा जाणणें तें । तें ही मीं चि जाणें ॥ ९४ ॥
पैं चेइलेया नंतरें । आपलें एकपण उरे ।
तें हीं तें वारि स्फुरे । तेयासि जैसें ॥ ९५ ॥
कां प्रकाशतां अर्कु । तो चि होये प्रकाशकु ।
तेया ही अभेदा द्योतकु । तो चि जैसा ॥ ९६ ॥
तैसा वेद्याचां विलइं । केवळ वेदकु उरे पाहीं ।
तेणें जाणिवे तेया तो ही । हें इ जें जाणे ॥ ९७ ॥
तेणें अद्वय आपणां आपलेया । जाणति ज्ञप्ति जे धनंजया ।
ते ईश्वरू चि मीं तेया । बोधासि एं ॥ ९८ ॥
मग अद्वैतातीत । मी चि आत्मा एकु निभ्रांत ।
हें जाणौनि जाणणें जेथ । अनुभवि रिगे ॥ ९९ ॥

तेथ चेइलेयां एकपण । दीसे जें आपणेयां आपण ।
तें हिं जांतां नेणों कोण । होइज जेवि ॥ १२०० ॥
कां डोला देंतिये क्षणीं । सरूपपण सुनर्णीं ।
आटौनि होये आटणी । घनाकाराची ही ॥ १ ॥
नाना लवण तोय होए । मग क्षारता तोयत्वें राहे ।
तें किं जिरतां जें जाए । जालेपण तें ॥ २ ॥
तैसा मीं तो हें जें असें । ते स्वानंदानुभवरसें ।
कालवौनि प्रवेशे । मज चि माझि ॥ ३ ॥
आणि तो हे भाष तेथ जाए । तेथ मीं कोणासिं आहें ।
ऐसा मीं नां तो तिये सामाए । माझां चि रूपीं ॥ ४ ॥
जेधवां कापुरु जलों सरे । तेया चि नावं आगि पुरे ।
मग उभयातीत उरे । आकाश जेवि ॥ ५ ॥
कां गेलेयां एकाएकु । वाढे तो शून्यविशेखु ।
तैसा आहेनाहींचा शोखु । मीं चि मग आथि ॥ ६ ॥
तेथ ब्रह्म आत्मा ईशु । या बोला मोडे सौरसु ।
न बोलणेयां हिं पैसु । नाहिं जेथ ॥ ७ ॥
न बोलणें हिं न बोलौनि । तें बोलिजे तोंड भरूनि ।
जाणिवे नेणिव नेणौनि । जाणिजे तो ॥ ८ ॥
तेथ बोधिजे बोधु बोधें । आनंदु घेपे आनंदें ।
सुख वरि नसुदें । सुख भोगिजे ॥ ९ ॥
तेथ लाभु जोडला लाभा । प्रभा आलिंगिली प्रभा ।
विस्मयो बुडाला उभा । विस्मया माझि ॥ १२१० ॥
समु तो सामाविला । विश्रामु विश्रांती आला ।
अनुभवु ही वेडावला । अनुभूतीपणें ॥ ११ ॥
किंबहुना ऐसें निखल । मीपणें जोडे तेया एक फल ।
सेउनि वेल्हाल । क्रमयोगाची ते ॥ १२ ॥

पैं क्रमयोगा किरीटी । चक्रवर्त्तिचां मुगुटीं ।
मी चिद्रत्न ते साटोवाटी । होये तो माझा ॥ १३ ॥
किं क्रमयोगप्रसादाचा । कळशु जो हा मोक्षाचा ।
तेया वरिला आकाशाचा । उवाऊ जाला तो ॥ १४ ॥
नाना संसारअडवीं । क्रमयोगु वाट बरवी ।
जोडलियां मदैक्यगावीं । पैठा जाला ॥ १५ ॥
ऐसा क्रमयोगु ऊर्वे । तेणें भक्तिचित्तगंगें ।
मी स्वानंदोदधि वेगें । टाकिलां गा ॥ १६ ॥
हा ठाऊ वेरीं सुवर्मा । क्रमयोगी आहे महिमा ।
ह्मणौनि वेळोवेळां तुझां । सांघों तें आह्मीं ॥ १७ ॥
पैं देशे काळे पदार्थे । साधुनि घेइ मातें ।
तैसा नव्हे मी आइतें । सर्वांचें सर्व ॥ १८ ॥
एकु शिष्यु एकु गुरु । हा रूढला साचु वेव्हारु ।
तो मत्प्राप्तिप्रकारु । जाणावेया ॥ १९ ॥
ह्मणौनि माझां ठांइं । जचावें न लगे काहिं ।
मी लाभें ये उपाइं । जचिजे चि गा ॥ १२२० ॥
अगा वसुधेचां पोटीं । निधान सिद्ध किरीटी ।
वन्हि सिद्धु काष्टीं । वोहां दूध ॥ २१ ॥
परि लाभे तें असतें । तेया कीजे उपायातें ।
एर सिद्ध तैसा येथें । उपायें मीं ॥ २२ ॥
हा फळ ही वरि उपाऊ । कां प्रस्तावितसे देवो ।
हें पूसा तरि अभिप्राऊ । एथिचा ऐसा ॥ २३ ॥
जें गीतार्थाचें चांगावें । मोक्षउपाय परि आघवें ।
आणि शास्त्रउपाय किं न्हवे । प्रमाणसिद्धी ॥ २४ ॥
वारा अभाळ चि फेडी । वांचौनि सूर्यातें न घडी ।
कां हातु बाबुळी धाडी । तोय न करी ॥ २५ ॥

तैसा आत्मदर्शनीं आडलु । असे जो अविद्येचा मल्लु ।
तो शास्त्र नासी एरु निर्मलु । प्रकाशें स्वयें ॥ २६ ॥
म्हणौनि आघवीं चि शास्त्रें । अविद्याविनाशिचीं पात्रें ।
वांचौनि नव्हंति स्वतंत्रें । आत्मबोधीं ॥ २७ ॥
तेया आत्मबोधा शास्त्रांसि । जें साचपणांचीये पूसि ।
तें एइजे जेया ठायासि । ते हे गीता ॥ २८ ॥
भानुभूषिता प्राचिया । येरी सतेजा दिशा आघविया ।
तैसी असे सर्वा गीता येया । सनाथें शास्त्रें ॥ २९ ॥
हें असो एणें शास्त्रेश्वरें । मागां उपावो बहुवें विस्तारें ।
सांघितला असे जो निकरें । घेऊं ये आत्मा ॥ १२३० ॥
परि प्रथमा श्रवणा सवें । अर्जुना विपायें फावे ।
हा भाऊ सकणवे । धरुनि श्रीहरी ॥ ३१ ॥
तें चि प्रमेय येकोल । शिष्यें होआवें अढल ।
सांघिजतसे मुकुल—। मुद्रा आतां ॥ ३२ ॥
आणि प्रसंगें गीता । हा ठावो ही संपता ।
म्हणौनि दावी आयंता । एकार्थत्वें ॥ ३३ ॥
जें ग्रंथाचां मध्यभागीं । नाना अधिकारप्रसंगीं ।
निरूपण अनेगीं । सिद्धांतीं केलें ॥ ३४ ॥
तरि तेतुले ही सिद्धांत । इये शास्त्रीं प्रस्तुत ।
हें पूर्वापर नेणत । कोण्ही जैं मानीनां ॥ ३५ ॥
तें महासिद्धांचा एवाका । सिद्धांतकक्षा अनेका ।
भिडुनि आरंभें देखां । संपवितसें ॥ ३६ ॥
एथ अविद्यानाशु हें स्थल । तेणें मोक्षोपादान फल ।
येयां दोहीं केवल । साधन ज्ञान ॥ ३७ ॥
हें एतुलें चि नाना परीं । निरोपिलें ग्रंथविस्तारीं ।
तें आतां दों आखरीं । अनुवादावें ॥ ३८ ॥

ह्मणौनि उपेय ही हातीं । जालेयां उपायस्थिति ।
देउ॰ प्रवर्त्तलें पुडुतीं । एणें चि भावें ॥ ३९ ॥

सर्वकर्माण्यपि सदा कुर्वाणो मद्व्यपाश्रयः
मत्प्रसादादवाप्नोति शाश्वतं पदमव्ययं ॥ ५६ ॥

मग ह्मणे गा सूभटा । तो क्रमयोगि इया निष्ठा ।
मी होउनि होये पैठा । माझां रूपीं ॥ १२४० ॥
स्वकर्माचां लाखौलीं । मज पूजा करुनि भली ।
तेणें प्रसादें आकली । ज्ञाननिष्ठेतें ॥ ४१ ॥
ते निष्ठा जेथ हातवसे । तेथ भक्ति माझी उल्हासे ।
तेया मजसीं समरसें । सुखिया होए ॥ ४२ ॥
आणि विश्वप्रकाशितेया । आत्मेयां मज आपुलेया ।
अनुसरे जो मज करुनिया । सर्वत्रताहं ॥ ४३ ॥
सांडूनि आपुला आडळु । लवण आश्राये जळु ।
कां हींडौं राहे निश्चळु । वायु व्योमीं ॥ ४४
तैसा बुद्धी वाचा कार्यें । जो मातें आश्राउनि ठाए ।
तो निषिद्धें हीं विपायें । कर्में करू ॥ ४५ ॥
पारि गंगेचां संबंधीं । वोदी आणि महानदी ।
ऐक्य तेवि माझां बोधीं । शुभाशुभांसि ॥ ४६ ॥
कां बावनेयां आणि धूरें । हा निवाडु तवं चि सरे ।
जवं नेघपति वैश्वानरें । कवळूनि दोन्हीं ॥ ४७ ॥
नाना पांचिकें आणि सोलें । हें सोनेयां तवं चि आलें ।
जवं परिसु आंगमेळें । एकवटी नां ॥ ४८ ॥
तेवि शुभाशुभें ऐसें । हें तवं चि वेन्हीं आभासे ।
जवं एकु न प्रकाशे । सर्वत्र मी ॥ ४९ ॥
आगा रात्रि आणि दीवो । हा तवं चि द्वैतभाउ॰ ।
जवं न रिगिजे गाउ॰ । गभस्तीचा ॥ ५० ॥

ह्मणौनि माझिया भेटी । तेयाचीं सर्व कर्मे किरीटी ।
जाउनि बैसे तो पाटीं । सायुज्याचां ॥ ५१ ॥
देशें कालें स्वभावें । वेचु जेया न संभवे ।
तें पद माझें पावे । अविनाश तें ॥ ५२ ॥

**चेतसा सर्वकर्माणि मयि संन्यस्य मत्परः ॥**
**बुद्धियोगमुपाश्रित्य मच्चित्तः सततं भव ॥ ५७ ॥**

किंबहुना पांडुसुता । मज आत्मेयाची प्रसन्नता ।
लाहे तेणें न पविजता । लाभु कवणु असे ॥ ५३ ॥
या कारणें गा तुयां । सर्वकर्मी आपुलेयां ।
माझां रूपिं धनंजया । संन्यासु कीजे ॥ ५४ ॥
परि तो चि संन्यासु वीरा । करणीयेचा झनें करा ।
आत्मविवेकीं धरा । चित्तवृत्ति हे ॥ ५५ ॥
मग तेणें विवेकबलें । आपणपें कर्मा वेगलें ।
माझां स्वरूपीं निर्मले । देखिजैल ॥ ५६ ॥
आणि कर्माची जन्म भोए । ये प्रकृती जे कांहीं आहे ।
ते आपणेयांहूनि बहुवें । देखसी दुरि ॥ ५७ ॥
तेथ प्रकृति आपणयां । वेगली नुरे धनंजया ।
रूपें विण छाया । जिया परीं ॥ ५८ ॥
ऐसेनि प्रकृतीनाशु । जालेयां कर्मसंन्यासु ।
निफजैल अनायासु । सकारणु ॥ ५९ ॥
मग कर्मजात गेलेयां । आत्मा मी उरें आपणपेयां ।
बुद्धि घापे करूनियां । पतिव्रता ॥ १२६० ॥
बुद्धी अनन्य एणें योगें । मज माझि जैं रिगे ।
तैं चित्त चैत्यत्यागें । मातें चि भजे ॥ ६१ ॥
ऐसें चइत्य जातें सांडिलें । चित्त माझां ठांइं जडलें ।
ठाके तैसें वहिलें । सर्वदा करी ॥ ६२ ॥

**मच्चित्तः सर्वकर्माणि मत्प्रसादात्तरिष्यसि ।**
**अथ चेत्त्वमहंकारान्न श्रोष्यसि विनंक्ष्यसि ॥ ५८ ॥**

मग अभिन्ना इया सेवा । चित्त मियां चि भरे जेधवां ।
माझा प्रसादु जाण तेधवां । संपूर्ण जाला ॥ ६३ ॥
तेथ सकळदुःखधामे । भुंजिजति जियें मृत्युजन्में ।
तियें दुर्गमें चि सुगमें । होंती तुज ॥ ६४ ॥
सूर्याचेनि सावायें । डोळा सावाइला होए ।
तैं आंधाराचा आहे । पाडु तेया ६५ ॥
तैसा माझेनि प्रसादें । जीवकणु जेयाचा मर्दे ।
तो संसाराचेनि बंधें । बांधला केवि ॥ ६६ ॥
ह्मणौनि धनंजया । संसारदुर्गती इया ।
तरसील माझिया । प्रसादा तव ॥ ६७ ॥
अथवा हान अहंभावें । माझें बोलणें हें आघवें ।
कानामनाचिये सींवे । नेदीसि टेंकों ॥ ६८ ॥
जेया देहसंबंधा आंतु । प्रतिपदीं आत्मघातु ।
भुंजतां उसंतु । कहीं चि नाहिं ॥ ६९ ॥

**यदहंकारमाश्रित्य न योत्स्य इति मन्यसे ॥**
**मिथ्यैष व्यवसायस्ते प्रकृतिस्त्वां नियोक्ष्यति ॥ ५९ ॥**

येवडेनि दारुणें । निमणें न निमणें ।
पडैल जारि बोलणें । न घेसी माझें ॥ १२७० ॥
पथ्यद्वेषिया पोसी ज्वरु । कां दीपद्वेषिया आंधारु ।
विवेकद्वेषें अहंकारु । पोसुनि तैसा ॥ ७१ ॥
स्वदेहा नावं अर्जुनु । परदेहा नावं स्वजनु ।
संग्रामा नावं मळिनु । पापाचारु ॥ ७२ ॥
ये मती आपुलेया । तीघां तीनि नावें इयां ।
ठेउनि धनंजया । न जुझें ह्मणसी ॥ ७३ ॥

जीवा माझि निष्टंकु । करीसि जो अत्यंतिकु ।
तो वायां धाडी वेलु नैसर्गिकु । स्वभाउ तूझा ॥ ७४ ॥
आणि मीं अर्जुनु हें आत्मक । इयां वधु करणें हें पातक ।
हें माया वांचौनि तात्विक । कांहि आहे ॥ ७५ ॥
आदिं तूंतें जूझ होआवें । मग जूझा शस्त्र घेयावें ।
कां न जुझावेया करावें । देवांगण ॥ ७६ ॥
ह्मणौनि न जूझणें । ह्मणसी तें वायागें ।
ना मानूं लोकपणें । लोक दृष्टिसि इहिं ॥ ७७ ॥
तऱ्हि न जुझें ऐसें । निष्टंकीसि जें मानसें ।
ते प्रकृति अनारिसें । करिल चि ॥ ७८ ॥
पैं पूर्वे वाहांत पाणी । पऱ्हिजे पश्चिमिली वाहाणी ।
तरि आग्रहो चि उरे तें आणी । आपुलिया लेखा ॥ ७९ ॥
कां सालिचा कणु ह्मणे । मीं नुगवें सालिपणें ।
तऱ्हीं आन न करणें । स्वभावासि ॥ १२८० ॥
तैसा क्षत्रिया संस्कारसिद्धा । प्रकृती घडिलासि प्रबुद्धा ।
आतां नुठिं ह्मणसि हा धांधा । उठविजसी चि ॥ ८१ ॥
शौर्य तेज दक्ष्यता । एवमादिक पांडुसुता ।
गुण दीधले नियता । प्रकृति तुज ॥ ८२ ॥

**स्वभावेन कौंतेय निबद्धः स्वेन कर्मणा ॥**
**कर्त्तुं नेच्छसि यन्मोहात्करिष्यस्यवशोपि तत् ॥ ६० ॥**

तरि तेयांचेया समवाया । आन रूप धनंजया ।
न करितां उगलेयां । न येईल ऐसें ॥ ८३ ॥
ह्मणौनि तिहिं गुणिं । बांधलासि तूं कोदंडपाणी ।
त्रिशुद्धी निगसी वाहाणी । क्षात्राचिया ॥ ८४ ॥
नां हें आपुलें जन्ममूळ । न विचारीसि तूं केवळ ।
न जुझें ऐसें अढळ । व्रत जरि वेंसी ॥ ८५ ॥

तरि बांधौनि हातपाए । जो रथीं घातला आये ।
तो न चले तऱ्हीं जाये । दिगंता जेवि ॥ ८६ ॥
तेसा तूं आपुलेया कडौनि । मीं काहिं चि न करिं ह्मणौनि ।
ठांसी परि भरवसेनि । तें चि करीसी ॥ ८७ ॥

**ईश्वरः सर्वभूतानां हृद्देशेऽर्जुन तिष्ठति ॥**
**भ्रामयन्सर्वभूतानि यंत्रारूढानि मायया ॥ ६१ ॥**

हांगा रोगु काइ रोगिया । आवडे दरिद्र दरिद्रिया ।
परि भोगविजे बळिया । अदृष्टें जेणें ॥ ८८ ॥
तें अदृष्ट अनारिसें । न करील ईश्वरवसें ।
तो ईश्वरु ही असे । जवळिके चि ॥ ८९ ॥
सर्वभूतांचां अंतरीं । हृदयमहाअंबरीं ।
चिद्वृत्तिचां सहस्रकरीं । उदैला असे जो ॥ १२९० ॥
अवस्थात्रया तीन्हीं लोक । नव्हे प्रकाशूनि अशेष ।
अन्यथादृष्टी पथीक । चेवविले ॥ ९१ ॥
वेद्योदकाचां सरोवरीं । फांकति विषयकल्हारीं ।
इंद्रियषट्पदाचारी । जीवभवंरांतें ॥ ९२ ॥
असो रूपक हें तो ईश्वरु । सकल भूतांचा अहंकारु ।
पांगुरौनि निरंतरु । उल्हासतसे ॥ ९३ ॥
स्वमायेचें आडवस्त्र । लेउनि एकला खेळवी सूत्र ।
बाहिरि नटि छायाचित्र । चौरासी लक्ष ॥ ९४ ॥
तेया ब्रह्मादिकीटांतां । अशेषां हिं भूतजातां ।
देहाकारें योग्यता । पाउनि दावी ॥ ९५ ॥
तेथ हें देह तेयां पुढें । अनुरूपपणें मांडे ।
तें भूत तिये आरूढे । हें मीं ह्मणौनि ॥ ९६ ॥
सूत सूतें गुंतलें । तृण तृणें बांधलें ।
कां आत्मबिंब घातलें । बाळकें जळीं ॥ ९७ ॥

तेया परीं देहाकारें । आपणपें चि दुसरें ।
देखौनि जीउ आविष्करे । आत्मबुद्धी ॥ ९८ ॥
ऐसें शरीराकारिं । यंत्रीं भूतें अवधारीं ।
वाउनि हाल्वी दोरी । प्राचीनांची ॥ ९९ ॥
तेथ जेया जें कर्मसूत्र । मांडूनि ठेविलें स्वतंत्र ।
तें तिये गती पात्र । हों चि लागे ॥ १३०० ॥
किंबहुना धनुर्द्धरा । भूतांतें स्वर्गसंसारा ।
माजि भवंडी तृणें वारा । आकाशीं जैसा ॥ १ ॥
भ्रामकाचेनि संगें । जैसें लोह चि वेढां रिगे ।
तैसीं ईश्वरसत्तायोगें । चेष्टती भूतें ॥ २ ॥
जैसें चष्टा आपुलालिया । समुद्रादिक धनंजया ।
चेष्टति चंद्राचिया । संनिधी एकी ॥ ३ ॥
तेयां सिंधू भरितें दाटे । सोमकांता पाझरु फूटे ।
कुमुदचकोरां फीटे । संकोचु तो ॥ ४ ॥
तैसीं बीजप्रकृतिवसें । अनेकें भूतें एकें ईसें ।
चेष्टविजे तो असे । तूझां हृदइं ॥ ५ ॥
अर्जुनपण नेघतां । मी ऐसें पांडुसुता ।
उठितसे तें तत्वता । तेयाचें रूप ॥ ६ ॥
यया लागि तो प्रकृतितें । प्रवर्त्तवील हें निरुतें ।
आणि तें जूझवील तूतें । न जुझसि तऱ्हीं ॥ ७ ॥

**तमेव शरणं गच्छ सर्वभावेन भारत ।**
**तत्प्रसादात्परां शांतिं स्थानं प्राप्स्यसि शाश्वतं ॥ ६२ ॥**

ह्मणौनि ईश्वरु गोसांवि । तेणें प्रकृति हे नियमावी ।
तिया सुखें राहाटवावि । इंद्रियें आपुलीं ॥ ८ ॥
तूं करणें न करणें दोन्हीं । लाउनि प्रकृतिचां मानीं ।
प्रकृति ही कां आधीनि । हृदयस्था जेया ॥ ९ ॥

तेया अहं वाचा आंग । देउनि शरण रीग ।
महोदधी कां गांग । रिगालें जैसें ॥ १३१० ॥
मग तेयाचेनि प्रसादें । सर्वोपशांतिप्रमदें ।
कांतु होउनि स्वानंदें । स्वरूपें रमसी ॥ ११ ॥
संभूति जेणें संभवे । विश्रांति जेथ विसंवे ।
अनुभूतीं अनुभवे । अनुभउ जेया ॥ १२ ॥
तिये निजात्मपदिंचा राउ । होउनि ठांसी अव्ययो ।
ह्मणे लक्ष्मीयेचा नाहो । पार्था तूं गा ॥ १३ ॥

**इति ते ज्ञानमाख्यातं गुह्याद्गुह्यतरं मया ।**
**विमृश्यैतदशेषेण यथेच्छसि तथा कुरु ॥ ६३ ॥**

हे गीता नावें विख्यात । सर्ववाङ्मयाचें मथित ।
आत्मा जेणें हस्तगत । रत्न होए ॥ १४ ॥
ज्ञानी ऐसिया रूढी । वेदांतिं जेयाची प्रौढि ।
वानितां कीर्त्ति चोखडी । पातली जगीं ॥ १५ ॥
बुध्यादिकें डोलसें । हे जेयाचे कां कडवसे ।
मी सर्वद्रिष्टी ही दीसें । पाहों जिया ॥ १६ ॥
तें हें गा आत्मज्ञान । मज गोप्याचें हि गुपित धन ।
परि तूं ह्मणौनि आन । केवि करूं ॥ १७ ॥
येया कारणें गा पांडवा । आह्मि आपुला हा ठेवा ।
तुज दीधला कणवा । जाकळिलेपणें ॥ १८ ॥
परि भूलली वोरसें । माये बोले बालका दोसें ।
प्रीति ही परि तैसें । न करुं चि हो ॥ १९ ॥
एथ आकाश आणि गालिजे । अमृता ही झारि फेडिजे ।
कां दिव्या करविजे । दिव्य जैसें ॥ १३२० ॥
जेयाचेनि अंगप्रकाशें । पातालिचा परिमाणु दीसे ।
तेया सूर्या ही कां जैसें । अंजन सूदलें ॥ २१ ॥

तैसें सर्वज्ञें ही मियां । सर्व ही निर्द्धारूनियां ।
नीकें होये तें धनंजया । सांवितलें तुज ॥ २२ ॥
आतां तूं यया वरी । नीकें हें निर्द्धारीं ।
मग निर्द्धारूनि करीं । आवडे जैसें ॥ २३ ॥
येया देवाचेया बोला । अर्जुनु उगा चि ठेला ।
तेथ देउ म्हणे भला । अवंचकु होसी ॥ २४ ॥
वाढितेया पुढां भूकैला । उपरोधें म्हणे धालां ।
तैं तो चि पीडे आपुला । दोखु ही तेया ॥ २५ ॥
तैसा सर्वज्ञ श्रीगुरु । भेटलेयां आत्मनिर्द्धारु ।
न पुसे जैसा भारु । धरुनियां ॥ २६ ॥
तैं आपण चि वंचे । आणि पाप ही तेया वंचनाचें ।
आपणेयां चि तें साचें । चुकविलें तुवां ॥ २७ ॥
पैं उगेपणां तूझेया । अभिप्राउ हा चि धनंजया ।
जें एकोल एक वंकौनियां । सांघावें ज्ञान ॥ २८ ॥
एथ पार्थु म्हणे दातारा । भलें जाणसि माझेया अंतरा ।
हें म्हणों तरि दुसरा । जाणता असे काइ ॥ २९ ॥
परि ज्ञेय जी हें आघवें । तूं ज्ञाता एकू चि स्वभावें ।
मा सूर्यो म्हणौनि वानावें । सूर्यातें काइ ॥ १३३० ॥
यया बोला श्रीकृष्णें । म्हणितलें काइ एणें ।
हें चि थोडें गा वानणें । जें बुझतासि तूं ॥ ३१ ॥

**सर्वगुह्यतमं भूयः श्रुणु मे परमं वचः ।**
**इष्टोऽसि मे दृढमिति ततो वक्ष्यामि ते हितं ॥ ६४ ॥**

तरि अवधान प्रबळ । करूनि एकोल ।
वाक्य माझें निर्मळ । अवधारि पां ॥ ३२ ॥
हें वाच्य म्हणौनि बोलिजे । कां अवागमें आइकिजे ।
तैसें नव्हे परि तूझें । भाग्य बरवें ॥ ३३ ॥

कूर्मिचेया पीलिया । दृष्टि पान्हा ये धनंजया ।
आकाश वाहे बापैया । घरिचें पाणी ॥ ३४ ॥
जो व्यवहारु ही जेथें न घडे । तेयातें फल चि तेथ जोडे ।
काइ दैवें न संपडे । सानुकूलें ॥ ३५ ॥
यऱ्हवीं द्वैताची वारि । सारूनि ऐक्याचां परिवरीं ।
भोगिजे तें अवधारीं । रहस्य हें । ३६ ॥
आणिं निरूपचारा प्रेमा । विषो होये जें वीरोत्तमा ।
तें दूजें नोहे किं आत्मा । ऐसें चि जाणावें ॥ ३७ ॥
आरिसेयाचें देखिलेयां । गोमटें कीजे धनंजया ।
तें तेया नव्हे आपणेयां । लागि जैसें ॥ ३८ ॥
तैसें पार्था तूझेनि मिसें । मी बोलें आपणपेया चि दोसें ।
माझां तूझां ठांइं असे । मीतूंपण गा ॥ ३९ ॥
ह्मणौनि जिव्हारिचें गुज । सांघतसें जीवितासी चि तुज ।
अनन्यगतिचें मज । आथि व्यसन ॥ १३४० ॥
पैं जला आपणपेया देंतां । लवण भूललें पांडुसुता ।
किं आघवें तेयाचें होंतां । न लजे चि तें ॥ ४१ ॥
तैसा तूं माझां ठांइं । राखों नेणसी चि कांहिं ।
तरि आतां तुज मी काई । गोप्य करीं ॥ ४२ ॥
ह्मणौनि आघवीं चि गुढें । जें पाउनि अति उघडें ।
तें गोप्य माझें चोखडें । वाक्य आइक ॥ ४३ ॥

**मन्मना भव मद्भक्तो मद्याजी मां नमस्कुरु ॥**
**मामेवैष्यसि सत्यं ते प्रतिजाने प्रियोसि मे ॥ ६५ ॥**

तरि बाह्यांतरा । आपुलेया सर्वव्यापारां ।
मज व्यापकातें वीरा । विषो करीं ॥ ४४ ॥
आघवां आंगिं जैसा । वायु मिलौनि आकाशा ।
तूं सर्वकामिं तैसा । मासीं चि अस ॥ ४५ ॥

किंबहुना आपुलें मन । करीं माझें एकायतन ।
माझेनि श्रवणें कान । भरूनि घालीं ॥ ४६ ॥
आत्मज्ञानें चोखडीं । संत जे माझिं रूपडीं ।
तेथ दृष्टि पडो आवडी । कामिनी जैसी ॥ ४७ ॥
मज सर्ववसतिचें वसैठें । माझिं नामें जियें चोखटें ।
तें जिव्हा येयावेया वाटे । वाचेचिये लावीं ॥ ४८ ॥
हातांचें करणें । पायांचें चालणें ।
तें होये मज कारणें । ऐसें करीं ॥ ४९ ॥
आपुलां अथवां परावां । ठांइं उपकरिसि पांडवा ।
तेणें यज्ञें होये बरवा । याज्ञिकु माझा ॥ १३५० ॥
हें येकैक सिकउं काई । पैं सेवकै आपुलां ठांइं ।
उरौनि एर सर्व ही । मी सेव्यु चि करीं ॥ ५१ ॥
तेथ जाउनि भूतद्वेषु । सर्वत्र नमवीन मीं चि एकु ।
ऐसेनि आश्रयो अत्यंतिकु । लहांसील तूं माझा ॥ ५२ ॥
मग भरलेया जगा आंतु । जाउनि तिजेयाची मातु ।
होउनि टाईल एकांतु । आह्मां तुह्मां ॥ ५३ ॥
तेधवां भलेतिये अवस्थे । मी तूंतें तूं मातें ।
भोगीसि ऐसें ऐक्य तें । वाढैल सुख ॥ ५४ ॥
आणि तीजें आडळु करितें । निमाळें अर्जुना जेथें ।
तें मीं तूं चि ह्मणौनि मातें । पावसि सेखीं ॥ ५५ ॥
जळिचीं प्रतिभा । जळनाशीं बिंबा ।
यंतां गाभागोभा । कांहिं असो ॥ ५६ ॥
पैं पवनु अंबरा । कां कल्लोळु सागरा ।
भीळतां आडवारा । कोणाचा गा ॥ ५७ ॥
ह्मणौनि तूं आणि आह्मीं । हें दीसतसे देहधर्मीं ।
मग याचां विरामीं । मी चि होसी ॥ ५८ ॥

एया बोला माझारि । होये नव्हे हें झनें करीं ।
एथ आन आथि तरि । तूझी आण ॥ ५९ ॥
पैं तूझी आण वाणें । हें आत्मलिंगातें सिवणें ।
प्रीतिची जाति लाजणें । आठवों नेदी ॥ १३६० ॥
यऱ्हवीं वेदुनि प्रपंचु । जेणें विश्वाभासु हा साचु ।
आज्ञेचा नडनाचु । कालातें जिणें ॥ ६१ ॥
तो देउ मी सत्यसंकल्पु । आणि जगाचा ही बापु ।
मा आणेचा आक्षेपु । कां करावा ॥ ६२ ॥
पैं अर्जुना तूझेनि वेधें । मियां देवपणाचिं ब्रिदें ।
सांडिलीं गा मी हें आधें । सगळें तुवां ॥ ६३ ॥
पैं काजा आपुलिया । रावो आपुली आपणेयां ।
आण वाये धनंजया । तैसें हें चि ॥ ६४ ॥
येथ अर्जुनु ह्मणे देवें । अचाट् हें न बोलावें ।
जी आमचें काज नावें । तूझेनि होये ॥ ६५ ॥
यया वरि सांघों बैससी । कां सांघतां भाष हीं देसी ।
यया तूझेया विनोदासि । पार असे जी ॥ ६६ ॥
कमलवनिं विकाशु । करी रवीचा एकु अंशु ।
किं तेथ आघवा चि प्रकाशु । नीच देतो ॥ ६७ ॥
पृथिवी निवौनि सागर । भरिजति एवडे थोर ।
वरिषे तेथ मिषांतर । चातकु कीजे ॥ ६८ ॥
ह्मणौनि औदार्या तूझेया । मज निमित्त ना ह्मणावेया ।
प्राप्ति असे दानिराया । कृपानिधी ॥ ६९ ॥
तवं देउ ह्मणति राहें । यया बोलाचा प्रस्ताउ नोहे ।
पैं मातें पावसी उपायें । साच चि एणें ॥ १३७० ॥
सैंधव सिंधू पडिलेयां । जो क्षणु एकु धनंजया ।
तेणें विरे चि किं उरावेया । कारण कवण ॥ ७१ ॥

तैसें सर्वत्र मातें भजतां । सर्व मी होतां जातां ।
शेष जाउनि तत्वता । मी चि होसि ॥ ७२ ॥
एवं माझी प्राप्ति वेऱ्हीं । कर्मा लागौनि अवधारिं ।
दाविली तुज उजिरी । उपायाची ॥ ७३ ॥
जें आधिं तवं पांडुसुता । सर्व कर्म मज अर्पितां ।
सर्वत्र प्रसन्नता । लाहिजे माझी ॥ ७४ ॥
पाठिं माझां तिये प्रसादीं । माझें ज्ञान जाये सिद्धी ।
तेणें मिसळिजे त्रिशुद्धी । स्वरूपिं माझां ॥ ७५ ॥
मग पार्था तिये ठांइं । साध्यसाधना होये नाहिं ।
किंबहुना तुज काहिं । उरे चि ना ॥ ७६ ॥
तरि सर्व कर्में आपुलीं । तुवां मज अर्पिलीं ।
तेणें प्रसन्नता लाधली । आजि हे माझी ॥ ७७ ॥
ह्मणौनि एणें प्रसादबळें । नोहे जूझाचेनि आडलें ।
न ठकें चि एकें वेळें । भाललां तुज ॥ ७८ ॥
जें सप्रपंच अज्ञान जाये । जेणें एकु मी गोचरु होयें ।
तें उपपत्तिचेनि उवायें । गीतारूप हें ॥ ७९ ॥
मियां ज्ञान तुज आपुलें । नाना परिं उपदेशिलें ।
एणें अज्ञान सांडी विआलें । धर्माधर्म जें ॥ १३८० ॥

**सर्वधर्मान्परित्यज्य मामेकं शरणं व्रज ॥**
**अहं त्वां सर्वपापेभ्यो मोक्षयिष्यामि मा शुच ॥ ६६ ॥**

आशा जैसी दुःखातें । व्याली निंदा दुरितें ।
हें असो जैसें दैन्यातें । दुर्भरत्व ॥ ८१ ॥
तैसें स्वर्गनरकसूचक । अज्ञान वियालें धर्मादिक ।
तें सांडूनि घालीं अशेख । ज्ञानें एणें ॥ ८२ ॥
हातिं घेउनि तो दोरु । सांडिजे जैसा सर्पाकारु ।
कां निद्रात्यागें घराचारु । स्वप्निचा जैसा ॥ ८३ ॥

नाना सांडिलेनि कवळें । चंद्राचें लोपे पीवळें ।
व्याधित्यागें कडुवाळे— । पण मुखाचें ॥ ८४ ॥
आगा दिवसा पाठि देउनि । मृगजळ घापे त्यजूनि ।
कां काष्ठत्यागें वन्हि । त्याजिजे जैसा ॥ ८५ ॥
तैसें धर्मअधर्माचें टवाळ । दावी अज्ञाना कां जें मूळ ।
तें त्यजूनि त्यजीं सकळ । धर्मजात ॥ ८६ ॥
मग अज्ञान निमालेयां । मी चि एकु असें आपैसेया ।
सनिद्र स्वप्न गेलेयां । आपणपें जैसें ॥ ८७ ॥
तैसा एकु मी वांचौनि काहिं । मग भिन्नाभिन्न आन नाहिं ।
स्वयंबोधें तेयाचां ठांइं । अनन्यु होयें ॥ ८८ ॥
पैं आपुलेनि भेदें विण । माझें जाणिजे एकपण ।
त्या चि नावें शरण । मज एणें गा ॥ ८९ ॥
ह्मणौनि घटाचेनि नासें । गगन चि गगनीं असे ।
मज शरण एणें तैसें । ऐक्यें करीं ॥ १३९० ॥
सुवर्णमणि सोनेयां । ए कल्लोलु जैसा पाणियां ।
तैसा मज धनंजया । ए शरण तूं ॥ ९१ ॥
वांचौनि सागराचां पोटीं । वडवानल शरण किरीटी ।
जाळों न ठाके तिया गोठी । जाळी देख पां ॥ ९२ ॥
मज शरण रिगिजे । आणि जीवत्वें असिजे ।
धिगी बोलिया या न लजे । प्रज्ञा केवि ॥ ९३ ॥
आगा प्राकृतां ही राया । आंगि पडे जें धनंजया ।
तें दासिरुं हिं कि तेया । मान्य होये ॥ ९४ ॥
मा मीं विश्वेश्वर भेटें । आणि जीवग्रंथि न सुटे ।
हे बोल नको उखटे । कानीं लाउं ॥ ९५ ॥
ह्मणौनि मी होउनि मातें । सेवणें असे आइतें ।
तरि करीं ह्मताइलें । ज्ञानें एणें ॥ ९६ ॥

मग ताकौनियां काढिलें । लोणि ताकिं माघौतें घातलें ।
परि नेघपे चि काहिं केलें । ताकें जेवि ॥ ९७ ॥
लोह उभें खाये माती । तें परिसाचेया संगती ।
सोनें जालेयां पुडुतीं । न लिंपिजे मळीं ॥ ९८ ॥
हें असो काष्टा पासौनि । मथूनि घेतलेयां वन्हि ।
मग काष्टें हिं कोंडौनि । न ठके जैसा ॥ ९९ ॥
तैसें अद्वैतत्वें मज । शरण रिगालेयां तुज ।
धर्माधर्म हे साहाज । लागतील नां ॥ १४०० ॥
अर्जुना काइ दिनकरु । देखतसे अंधकारु ।
किं प्रबोधां होये गोचरु । स्वप्नसंभ्रमु ॥ १ ॥
तैसें मजसिं एकवटलेयां । मी सर्व रूप वांचौनियां ।
आन काहिं उरावेया । कारण असे गा ॥ २ ॥
म्हणौनि तेयाचें काहिं । न चिंतीं आपुलां ठांइं ।
तूझें पापपुण्य पाहिं । मी चि होइन ॥ ३ ॥
जळिं पडिलेयां लवण । सर्वैं जल चि होये विचक्षण ।
तुज मी अनन्यशरण । होईन तैसा ॥ ४ ॥
तेथ सर्वबंधलक्षणें । पापें उरावें दूजेपणें ।
तें माझे बोधि वायाणें । होउनि जाइल ॥ ५ ॥
एतुलेनि आपैसेया । सूटला चि असषि धनंजया ।
घेइं मी प्रकाशूनियां । सोडवीन तूतें ॥ ६ ॥
यया कारणें पुडुतीं । हें आधीं न व्हाये चित्तीं ।
मज एकासि ए सुमती । जाणौनि शरण ॥ ७ ॥
ऐसें सर्वरूपें रूपसें । सर्वदृष्टी डोलसें ।
सर्वदेवनिवासें । बोलिलें कृष्णें ॥ ८ ॥
मग सावला सकंकणु । बाहु पसरूनि दक्षणु ।
आलंगिला स्वशरणु । भगवराजु तो ॥ ९ ॥

तन्मयता जेयातें । काखे सूनि बुद्धितें ।
बोलणें माघौतें । उऽसरलें ॥ १४१० ॥
ऐसें जें काहिं एक । बोला बुद्धी ही अटक ।
तें देयावेया मीख । क्षेमाचें केलें ॥ ११ ॥
दीपें दीपु लाविला । तैसा परिससंगु तो जाला ।
द्वैत न मोडितां केला । आपणपें पार्थु ॥ १२ ॥
तेधवां सुखाचा मग तेया । पुरु आला जो धनंजया ।
तेथ वाडु तऱ्हीं बुडौनियां । ठेला देऊ ॥ १३ ॥
सिंधु सिंधुतें पाऊ जाए । तें पाहणें ठाकणें दूण होए ।
वरि रिगे पुरवणिये । आकाश ही ॥ १४ ॥
तैसें दोहिंचें तेयां मीळणें । दोघां नावरे जाणावें कवणें ।
किंबहुना नारायणें । विश्व कोंदलें ॥ १५ ॥
एवं वेदाचें मूलसूत्र । सर्वाधिकारैकपवित्र ।
श्रीकृष्णें गीताशास्त्र । प्रकट केलें ॥ १६ ॥
एथ गीता मूल वेदां । ऐसें केवि आलें पां बोधा ।
हें ह्मणा तरि प्रसिद्धा । उपपत्ती सांघों ॥ १७ ॥
तरि जेयाचेनि श्वासीं । जन्म जालें शद्वराशी ।
तो सत्यप्रज्ञु पैजेसीं । बोलिला हे ॥ १८ ॥
ह्मणौनि वेदा मूलभूत । गीता ह्मणों हें होये उचित ।
आणिकि ही एकि एथ । उपपत्ति असे ॥ १९ ॥
जें न नसत स्वरूपें । जेयाचा विस्तारु जेथ लपे ।
तें तेयाचें ह्मणिपे । बीज जगीं ॥ १४२० ॥
तरि कांडत्रयात्मकु । शद्वराशि अशेखु ।
गीते माझि असे रूखु । बीजीं जैसा ॥ २१ ॥
ह्मणौनि वेदांचें बीज । श्रीगीता होये हें मज ।
गमे आणि साहाज । दीसत ही असे ॥ २२ ॥

जें वेदांचे तीन्ही भाग । गीते उमटले असति चांग ।
भूषणरत्निं सर्वांग । आपुलें जैसें ॥ २३ ॥
तियें चि कर्मादिकें तीन्हीं । कांडें कोणी कोणी स्थानीं ।
गीते असति तियें नयनीं । दाखउं आइकां ॥ २४ ॥
तरि पहिला जो अध्याउ । तो शास्त्रप्रवृत्तिप्रस्ताउ ।
द्वितीये सांख्यसद्भाउ । प्रकाशिला ॥ २५ ॥
मोक्षदानिं स्वतंत्र । ज्ञानप्रधान हें शास्त्र ।
येतुलालें दूजां सूत्र । उभारिलें ॥ २६ ॥
मग अज्ञानें बांधलेयां । मोक्षपदिं बैसावेया ।
साधनां आरंभु तो तृतीया । अध्याइं बोलिला ॥ २७ ॥
जें देहाभिमानबंधें । सांडूनि काम्यें निषिद्धें ।
विहित परि अप्रमादें । अनुष्ठावें ॥ २८ ॥
ऐसेनि कर्म करावें । हा तीजां अध्याइं जो देवें ।
निर्णयो केला तो जाणावें । कर्मकांड एथ ॥ २९ ॥
आणि तें चि नित्यादिक । अज्ञानाचें आवश्यक ।
आचरतां मोचक । केवि होये पां ॥ १४३० ॥
ऐसी अपेक्षा जालेयां । बद्धु मुमुक्षते आलेयां ।
देवें ब्रह्मार्पणक्रिया । सांघीतली ॥ ३१ ॥
जें देहवाचामानसें । विहित निफजे जैसें ।
तें एका चि ईश्वरोद्देशें । कीजे ह्मणितलें ॥ ३२ ॥
हें चि ईश्वरीं कर्मयोगें । भजनकथनाचेनि खागें ।
आदरिलें शेषभागें । चतुर्थाचेनि ॥ ३३ ॥
तें विश्वरूप अकरावा । अध्याउ संपे जेथ आघवा ।
तवं कर्मी ईशु भजावा । हें जें बोलिलें ॥ ३४ ॥
तें अष्टाध्याइं उघड । जाणा एथ देवताकांड ।
शास्त्र सांघतसे आड । मोडूनि बोलें ॥ ३५ ॥

आणि तेणें चि ईशप्रसादें । श्रीगुरुसंप्रदायलब्धें ।
साच ज्ञान उद्बोधें । कोंवळें जें ॥ ३६ ॥
तें अद्वेष्टादिप्रभृतिकीं । अथवा अमानित्वादिकिं ।
वाढविजे ह्मणौनि लेखीं । बारावां गुणु ॥ ३७ ॥
तो बारावां अध्याउ आधीं । आणि पन्हरावा अवधि ।
ज्ञानफलसिद्धी । निरूपणांसी ॥ ३८ ॥
ह्मणौनि चहूं इहीं । ऊर्ध्वमूलांतीं अध्यायिं ।
ज्ञानकांड इये ठांइं । निरूपिजे ॥ ३९ ॥
एवं कांडत्रयनिरूपणी । श्रुति हे कोडीसवाणी ।
गीतापदरत्नांचिं लेणिं । लेइली असे ॥ १४४० ॥
हें असो कांडत्रयात्मक । श्रुति मोक्षरूप फल एक ।
बोबाये जें आवश्यक । टाकावेया ह्मणौनि ॥ ४१ ॥
तेयाचेनि साधनें ज्ञानेंसिं । वैर कारि जो प्रतिदिवसीं ।
तो अज्ञान वर्गु षोडशीं । प्रतिपादिजे ॥ ४२ ॥
तो चि शास्त्रउलाना । घेउनि वैरी जीणावा ।
हा निर्णयो तो सतरावां । अध्याउ एथ ॥ ४३ ॥
ऐसा प्रथमा लागौनि । सतरावां लाणि करूनि ।
आत्मनिश्वास विवरूनि । दाविला देवें ॥ ४४ ॥
तेयां अर्थजातां अशेषा । केला तात्पर्याचा एवांका ।
तो अठरावां देखां । कलशाध्याउ ॥ ४५ ॥
एवं सकलसांख्यसिंधु । श्रीभगवद्गीता प्रबंधु ।
हा औदार्यें आगला वेदु । मूर्त्तु जाणा ॥ ४६ ॥
वेदु संपन्न होये ठांइं । परि कृपणु आन नाहीं ।
जें कानिं लागला तिहिं । वर्णांचां चि ॥ ४७ ॥
एरां भवव्यथा ठेलेयां । स्त्रीशूद्रादिकां प्राणियां ।
अनवसरु मांडूनियां । असे नव्हे ॥ ४८ ॥

तरि गज पांतां तें उणें । फेडावेया गीतापणें ।
वेदु वेठला भलेतेणें । सेव्यु होआवेया ॥ ४९ ॥
नव्हे अर्थे रिगौनि मनिं । श्रवणें लागौनि कानीं ।
जपमीखें वदनीं । वसौनियां ॥ १४५० ॥
गीतेचा पाठु जाणे । तयाचेनि सांघातीपणें ।
गीता लीहुनु वाहाणें । पुस्तकमीखें ॥ ५१ ॥
ऐसैसां मीसकटां । संसाराचां चौहटां ।
गवांदि घातली चोखटा । मोक्षसुखाची ॥ ५२ ॥
पारे आकाशिं वसावेया । पृथ्वी वरि बैसावेया ।
रविदीप्ति राहाटावेया । आवारु जैसें ॥ ५३ ॥
तेवि उत्तम अधम ऐसें । सेवितां कव्हणातें हिं न पुसे ।
कैवल्यदानें जैसें । निववी जग ॥ ५४ ॥
इया लागि मागिली कूटी । बिहाला वेदु गीतेचां पोटीं ।
रिगाला आतां गोमटी । कीर्ति पातला ॥ ५५ ॥
ह्मणौनि वेदांची सुसेव्यता । ते हे मूर्त्ति जाणा गीता ।
श्रीकृष्णें पांडुसुता । उपदेशिली ॥ ५६ ॥
परि वछाचेनि वोरसें । दुभतें होये घरा दोसें ।
जालें पांडवाचेनि मीसें । तैसें विश्वा ॥ ५७ ॥
चातकाचिये कणवे । मेघु पाणियेंसिं धांवे ।
तेथ चराचर आघवें । निवालें जेवि ॥ ५८ ॥
कां अनन्यगती कमळां । लागि सूर्यु ए वेळोवेळां ।
किं सुखिया होइजे डोळां । त्रिभुवनाचेया ॥ ५९ ॥
तैसें अर्जुनाचेनि व्याजें । गीता प्रकाशूनि श्रीराजें ।
संसारा एसणें थोर वोझें । फेडिलें जगाचें ॥ १४६० ॥
सर्वशास्त्रा रत्नदीप्ती । उजळिता हा त्रीजगती ।
सूर्यु नव्हे लक्ष्मीपती । वक्त्राकाशिचा ॥ ६१ ॥

बापु कुळ तें पवित्र । जेथिचा पार्थु येया पात्र ।
जेणें गीता केलें शास्त्र । आवारं जगा ॥ ६२ ॥

**इदं ते नातपस्काय नाभक्ताय कदाचन ॥**
**न चाशुश्रूषवे वाच्यं न च मां योऽभ्यसूयति ॥ ६७ ॥**

हें असो मग तेणें । सद्गुरुश्रीकृष्णें ।
पार्थाचें मिसळणें । आणिलें द्वैता ॥ ६३ ॥
पाठिं ह्मणतसे पांडवा । शास्त्र हें मानलें कीं जीवा ।
तेथ येरु ह्मणे देवा । आपुलीया कृपा ॥ ६४ ॥
तरि निधान जोडावेया । भाग्य घडे गा धनंजया ।
परि जोडलें भोगावेया । विपायें होये ॥ ६५ ॥
पैं क्षीरसागरा एवढें । अविरजीं दूधाचें भांडें ।
सुरां असुरां केवडें । मथितां जालें ॥ ६६ ॥
ते सायास ही फळा आले । जें अमृत डोळां देखिलें ।
परि वरिचिली चूकले । जतनें तिए ॥ ६७ ॥
जेथ अमरत्वा उन्गरिलें । तें मरणा चि लागि जालें ।
भोगु नेणतां जोडलें । ऐसें असे ॥ ६८ ॥
नहुषु स्वर्गप्राप्ति जाला । परि राहाटी भांभावला ।
तो भुजंगत्व पातला । नेणसि काई ॥ ६९ ॥
ह्मणौनि बहू पुण्य तुआं । केलें धनंजया ।
आजि शास्त्रराजा येया । जालासि विषो ॥ १४७० ॥
तरि येया चि शास्त्रचेनि । संप्रदायें पांगुरौनि ।
शास्त्रार्थु हा नीकेनि । अनुष्ठीं हो ॥ ७१ ॥
यन्हविं अमृतमथनां । सारिखें होईल अर्जुना ।
जरि रिगसी अनुष्ठाना । संप्रदायें विण ॥ ७२ ॥
गाये धड जोडे गोमटी । ते तैं चि पियों ये किरीटी ।
जैं जाणिजे हातवटी । सांजवणिची ॥ ७३ ॥

तैसा गुरु प्रसन्न होए । शिश्यु विद्या ही किर लाहे ।
परि ते फळे संप्रदायें । उपासिली ॥ ७४ ॥
ह्मणौनि शास्त्रिं जो इये । उचित संप्रदाउ आहे ।
तो तो आइक बहुवें । आदरेंसीं ॥ ७५ ॥
तरि जें हें तुवां पार्था । गीताशास्त्र लाधलें आस्था ।
तें तपोहीना सर्वथा । सांघावें ना ॥ ७६ ॥
अथवा तापसु ही जाला । परि गुरुभक्ती जो भीला ।
तो वेदुं अंत्यु वाळिला । तैसा वाळीं हो ॥ ७७ ॥
नातरि पुरोडासु जैसा । नेवेपे वृद्धु तऱ्हीं वायंसा ।
गीता नेदीं तैसी तापसा । गुरुभक्ती हीनां ॥ ७८ ॥
कां तप ही जोडे देहीं । भजे गुरुदेवाचां ठांइं ।
परि आकर्णानिं नाहिं । चाड जरि ॥ ७९ ॥
तरि तो मागिलीं दोहिं आंगिं । उत्तमु होये किर जगिं ।
परि येया श्रवणा लागि । योग्यु नोहे ॥ १४८० ॥
मुक्ताफळ भलेतैसें । होये परि मुख नसे ।
तवं गुणु प्रवेशे । तेथ काइ ॥ ८१ ॥
सागरु गंभीरु होए । हें कोण ना ह्मणत आहे ।
परि वृष्टि वायां जाए । जाली तेथ ॥ ८२ ॥
धालेया दिव्यान्न सोआवें । मग जें वायां धाडावें ।
तें आर्त्ती कां न करावें । उदारपण ॥ ८३ ॥
ह्मणौनि योग्या भलेतैसें । होंतु परि चाड नसे ।
तरि झनें वानवसें । देंसी हें तेया ॥ ८४ ॥
रूपाचा सुजाणु डोळा । वोडौं ये काइ परिमळा ।
जेथ जें मानें तें फळा । तेथ चि ये गा ॥ ८५ ॥
ह्मणौनि तपीं भक्ती । पाहा ते सुभद्रापती ।
शास्त्रश्रवणिं अनाकृती । वाळावे चि ते ॥ ८६ ॥

नातरि तप भक्ति । होउनि श्रवणीं आर्त्ति ।
आथि ऐसी आइती । देखसी जऱ्हीं ॥ ८७ ॥
तऱ्हीं गीताशास्त्रनिर्मिता । जो मीं सकललोकु शास्ता ।
तेया मातें सामान्यता । बोलैल जो ॥ ८८ ॥
माझा सज्जनीं मातें । पैशून्याचेनि अव्हातें ।
एकाहाथी तेयातें । योग्यु न ह्मण ॥ ८९ ॥
तेयाची परि आघवी । सामग्री ऐसी जाणावी ।
दीपें विण ठाणवी । रात्रिची जैसी ॥ १४९० ॥
आगा गोरें आणि तरुणें । वरि लेइलें असे भूषणें ।
परि एकलेनि प्राणें । सांडिलें जेवि ॥ ९१ ॥
सोनेयाचें सुंदर । निर्वाळलें होये घर ।
परि सर्पांगना द्वार । रुंधलें असे ॥ ९२ ॥
निफजे दिव्यान्न चोखट । परि माझि असे कालकूट ।
हें असो मैत्री कपट— । गुर्विणी जैसी ॥ ९३ ॥
तैसिं तपभक्तिमेधा । तेयाचिं जाण प्रबुद्धा ।
जो माझेयाची कां निंदा । माझी चि करी ॥ ९४ ॥
येया कारणें धनंजया । तो भक्तु मेधावी तपिया ।
तऱ्हीं नको बापा शास्त्रा इया । आतलों देवों ॥ ९५ ॥
काइ बोलों निंदका । योग्या स्रष्टेया ही एका ।
गीता हे कवतिका । लागि ही नेदों ॥ ९६ ॥
ह्मणौनि तपाचा धनुर्द्धरा । तळीं दाटौनि गाडौरा ।
वरि गुरुभक्तिचा पुरा । प्रासादु जो जाला ॥ ९७ ॥
आणि श्रवणाचा पुढां । दारवठा सदा उघडा ।
वरि कलसु चोखडा । अनिंदरत्नाचा ॥ ९८ ॥
ऐसां भक्तालइं चोखटीं । गीतारत्नेश्वर हा प्रतिष्ठीं ।
मग माझिया सवंसाठीं । तूकसी जगीं ॥ ९९ ॥

**य इमं परमं गुह्यं मद्भक्तेष्वभिधास्यति ॥**
**भक्तिं मयि परां कृत्वा मामेवैष्यत्यसंशय ॥ ६८ ॥**

कां जें एकाक्षरपणेंसिं । त्रिमातृकेचिये कूंसी ।
प्रणवु होंता गर्भवासीं । सांकडला जो ॥ १५०० ॥
तो गीतेचिया बाहालीं । वेदबीज गेलें पाहालीं ।
किं गायत्री फुलीं फलीं । श्लोकाचां आली ॥ १ ॥
तें हें मंत्ररहस्य गीता । मेलवी माझेयां जो भक्तां ।
अनन्यजीविता माता । बालका जैसी ॥ २ ॥
तैसी भक्तां गीतेसिं । भेटि करी जो आदरेंसीं ।
तो देहा पाठिं मजसीं । एक चि होए ॥ ३ ॥

**न च तस्मान्मनुष्येषु कश्चिन्मे प्रियकृत्तमः ॥**
**भविता न च मे तस्मादन्यः प्रियतरो भुवि ॥ ६९ ॥**

आणि देहाचें हिं लेणें । लेउनि वेगलेपणें ।
असे तवं जीवें प्राणें । तो चि पढियें ॥ ४ ॥
ज्ञानियां कर्मठां तापसां । इयां खूणेचियां माणुसां ।
माझि तो एकु ऐसा । पढियें मज ॥ ५ ॥
तैसा भूतलिं अघवा । आनु नेदखें पांडवा ।
जो गीता सांघे मेलावा । भक्तजनाचां ॥ ६ ॥

**अध्येष्यते च य इमं धर्म्यं संवादमावयोः ॥**
**ज्ञानयज्ञेन तेनाहमिष्टः स्यामिति मे मतिः ॥ ७० ॥**

मज ईश्वराचेनि लोभें । हें गीता पढतां अक्षोभें ।
जो मंडण होये सभे । संतांचिये ॥ ७ ॥
नवां पल्लविं रोमांचितु । मंदानीलें कंपवितु ।
आनंदजलें अल्लववितु । फलाचे डोले ॥ ८ ॥
कोकिलां कलरवाचेनि मीसें । सद्गद बोलवित जैसें ।
वसंतु कां प्रवेशे । आरामा माझि ॥ ९ ॥

कां जन्माचें फल चकोरां । होंतु चंद्रु ये अंबरा ।
नाना नवा मेघु मयूरां । वो देंतु पावे ॥ १५१० ॥
तैसा सज्जनाचां मेळापिं । गीतापद्यरत्नीं उमपीं ।
वर्षे जो माझां रूपीं । हेतु ठेउनि ॥ ११ ॥
मग तेयाचेनि पाडें । पढियंतें मज फुडें ।
नाहिं चि मागें पुढें । निहाळितां ॥ १२ ॥
अर्जुना हा ठावो वेन्हीं । मीं तेयांतें सुवें जिव्हारीं ।
जो गीतार्थाचें करी । परगुणें संतां ॥ १३ ॥
पैं माझिया तूझिया मिळणी । वाढिनली जे हें काहाणी ।
मोक्षुधर्मु कां जीणी । आला असे जेथ ॥ १४ ॥
तो हा सकलार्थप्रसादु । आह्मां दोघांचा संवादु ।
न करितां पदभेदु । पाठें जो पढे ॥ १५ ॥
तेणें ज्ञानानळिं प्रदीप्तीं । मूल अविद्येचिया आहुती ।
तोखविला होये सुमती । परमात्मा मीं ॥ १६ ॥
५ानि गीतार्थो उगाणा । ज्ञानिये जेवि विचक्षणां ।
टाकिति तें गाणांवाणां । गीतेचां तो लाहे ॥ १७ ॥
गीतापाठकासि एसें । फल अर्थज्ञाना चि सरिसें ।
गीतामाउलीसि नसे । जानेंतानें ॥ १८ ॥

**श्रद्धावाननुसूयश्च शृणुयादपि यो नरः ॥**
**सोपि मुक्तः शुभांल्लोकान्प्राप्नुयात्पुण्यकर्मणां ॥ ७१ ॥**

आणि सर्वमार्गीं निंदा । सांडूनि आस्था शुद्धा ।
गीताश्रवणीं श्रद्धा । उभारी जो ॥ १९ ॥
तेयाचां श्रवणसंपुटीं । गीतेचिं अक्षरें पैठीं ।
होंति ना तवं उठाउठी । पळे चि पाप ॥ १५२० ॥
अटविये माझि जैसा । वन्हि रिगतां सहसा ।
लंघीति कां दिशा । वनौकें तियें ॥ २१ ॥

कां उदयाचळा कुळीं । झळकतां अंशुमाळी ।
तिमिरें अंतराळीं । हारपती ॥ २२ ॥
तैसा कानाचां महाद्वारीं । गीता जपु जेथ करी ।
तेथ श्रिष्टि आदि वेरी । जळे चि कलुष ॥ २३ ॥
ऐसी जन्मवेलि धोवट । होये पुण्यरूप चोखट ।
यया ही वरि अचाट । फळ लाहे ॥ २४ ॥
जो इये गीतेचिं अक्षरें । जेतुलीं कर्णद्वारें ।
घे तेतुलीं होंती पुरे । अश्वमेध कि ॥ २५ ॥
ह्मणौनि श्रवणें पापें जांती । आणि धर्मु धरी उन्नती ।
तेणें स्वर्गराज्यसंपती । लाहे चि शेषीं ॥ २६ ॥
तो पैं मज येयावेया लागि । पहिलें पेणें करि स्वर्गीं ।
मग आवडे तवं भोगी । पाठीं ए चि तो ॥ २७ ॥
ऐसी गीता धनंजया । आइकतेया पढतेया ।
फळे महानंदें मियां । वहुत काइ बोलों ॥ २८ ॥

**कच्चिदेतच्छ्रुतंपार्थ त्वयैकाग्रेण चेतसा ।**
**कच्चिदज्ञानसंमोहः प्रनष्टस्ते धनंजय ॥ ७२ ॥**

एया कारणें असो । जेया लागि शास्त्रअतिसो ।
केला तें तवं तूतें पूसों । काज तूझें ॥ २९ ॥
तरि सांघ पां पांडवा । हा शास्त्रसिद्धांतु आवत्रा ।
तुज एकचित्तें फावा । गेला आहे ॥ १५३० ॥
आह्मि जैसें हें जिया रीती । उगाणिलें कानाचां हातीं ।
इहिं तैसें तूझां चित्तीं । पैठें केलें कि ॥ ३१ ॥
हांगा स्वज्ञानजनितें । मागिलें मोहें तूतें ।
भुलविलें तो एथें । असे कीं ना ॥ ३२ ॥
हें बहू पूसों काइ । सांवैं तूं आपुलां ठांइं ।
कर्माकर्म काहीं । देखतु आहासि ॥ ३३ ॥

पार्थु स्वानंदैकरसें । विरैल ऐसा भेददशे ।
आणिला एणें मीसें । प्रश्णाचेनि ॥ ३४ ॥
यऱ्हविं आपुलें करणें । सर्वज्ञ काइ तो नेणें ।
परि केलें पूसणें । या चि लागि ॥ ३५ ॥

अर्जुन उवाच ॥

**नष्टो मोहः स्मृतिर्लब्धा त्वत्प्रसादान्मयाच्युत ।**
**स्थितोऽस्मि गतसंदेहः करिष्ये वचनं तव ॥ ७३ ॥**

मग क्षीराब्धितें सांडितु । गगनीं पूंजा मंडितु ।
निवडे जैसा न निवडितू । पूर्णचंद्रु ॥ ३६ ॥
तैसा ब्रह्म हें मीं विसरें । तेथ जग चि ब्रह्में भरे ।
हें इं सांडे तरि विरे । ब्रह्मपण हीं ॥ ३७ ॥
दुःखें देहाचिये सीमे । मी अर्जुनु एणें नामें ।
मोडतु मांडतु ब्रह्में । उभा ठेला ॥ ३८ ॥
मग कांपतां करतळीं । दडपौनि रोमावळी ।
पुलकस्वेदजळीं । विरोनियां ॥ ३९ ॥
प्राणुक्षोभें डोलतेया । आंगा आंग टेंकतेया ।
सुनि स्तंभुचालेया । भुलौनियां ॥ १९४० ॥
नेत्रयुगुळिचेनि उर्ते । आनंदामृताचें भरितें ।
उसंडत तें माघौतें । काढौनियां ॥ ४१ ॥
विविधा औत्सुक्याची दाटि । चीप आतलि होंती कंठिं ।
ते करूनियां पैठी । हृदया माझि ॥ ४२ ॥
वाचेचें वितुळणें । सांवरौनि प्राणें ।
अक्रमाचें स्वसणें । ठेउनि ठांइं ॥ ४३ ॥
मग ह्मणे काइ देउ । पूसताति आवडे मोहो ।
तो सकु गेला जी ठाउ । घेउनि आपुला ॥ ४४ ॥

पासिं एउनि दिनकरें । डोळेयांतें आंधारें ।
पूसिजे हें काइ सरे । कोणी ठांइं ॥ ४५ ॥
तैसा तूं श्रीकृष्णा राया । आमचेयां इयां डोळेयां ।
गोचरु हें चि काइसेया । न पुरे तवं ॥ ४६ ॥
वारि लोभें माए पासौनि । तें सांवसि तोंड भरूनि ।
जें काइसेनि हिं करुनि । जाणों नेए ॥ ४७ ॥
आतां मोहो असे किं नाहिं । हें ऐसें पूससी काई ।
कृतकृत्य जालां पाहीं । तूझेपणें ॥ ४८ ॥
मी तूझेनि प्रसादें । लाधलेनि आत्मबोधें ।
मोहाचे तेया कांदे । नेंदिसी चि उरों ॥ ४९ ॥
आतां करणें न करणें । हें उठी जेणें दूजेपणें ।
तें तूं वांचौनि नेणें । सर्वत्र गा ॥ १५५० ॥
इये विखिं माझां ठांइं । संदेहाचें नूरे चि काहिं ।
त्रिशुद्धी कर्म जेथ नाहिं । तें मिं जालां ॥ ५१ ॥
ह्मणौनि मी एक पाहुनि । कृत्य गेलें निपटौनि ।
परि आज्ञा हे वांचौनि । तूझी प्रभू ॥ ५२ ॥
कां जें दृश्यातें नासी । जें दूजें दूजेयातें ग्रासी ।
जें एक परि सर्वदेशीं । वसवी सदा ॥ ५३ ॥
जेयाचेनि संबंधें बंधु फीटे । जेयाचिया आशा आश तूटे ।
जें भेटलेयां सर्व भेटे । आपणपां चि ॥ ५४ ॥
तें तूं गुरुलिंग जी माझें । एकलेपणिचें विरजें ।
जेया लागि उल्लंडिजे । अद्वैतबोधु ॥ ५५ ॥
आपण चि होउनि ब्रह्म । सारिजे कृत्याकृत्याचें काम ।
मग कीजे कां निःसीम । सेवा जेयाची ॥ ५६ ॥
तें मां तूं निरुपचारु । सेव्य सकळां दातारु ।
मीं ब्रह्मतेचा उपकारु । हा चि मानीं ॥ ५७ ॥

जें मज तुह्मां आड । होतें भेदाचें कवाड ।
तें फेडूनि केलें सुआड । तुवां जी देवा ॥ ५८ ॥
तरि आतां तूझी आज्ञा । सकळदेवराज्ञा ।
करीन देइं अनुज्ञा । भलेतिये विषीं ॥ ५९ ॥
येया अर्जुनाचेया बोला । दे० डोलों लागला ।
ह्मणे विश्वफला जाला । लाभु हा मज ॥ १५६० ॥
उणेनि उमचला सुधाकरु । देखौनि आपुला कुमरु ।
मर्यादा क्षीरसागरु । विसरे चि ना ॥ ६१ ॥
ऐसें संवादाचा बाउलां । लग्न दोघांचेयां आंतुलां ।
लागलें देखौनि जाला । निर्भरु संजयो ॥ ६२ ॥

## संजय उवाच ॥

इत्यहं वासुदेवस्य पार्थस्य च महात्मनः ॥
संवादमिममश्रौषमद्भुतं रोमहर्षणं ॥ ७४ ॥

तेणें उचंबळलेपणें । मग धृतराष्ट्रें ह्मणे ।
जी कैसें बादरायणें । रक्षिलों दोघे ॥ ६३ ॥
आजि तुमतें अवधारां । चर्मचक्षु ही सर्वसारा ।
किं ज्ञानदृष्टी व्यवहारा । आणिलेति ॥ ६४ ॥
आणि रथिचिये राहाटी । घेइजे घोडेयां साठीं ।
तेया आह्मां इया गोठी । गोचरा होति ॥ ६५ ॥
वरि जूझाचें निर्वाण । मांडलें असे दारुण ।
दोघीसि हारि आपण । हारविजे ऐसें ॥ ६६ ॥
एवडां इये सांकडां । कैसा अनुग्रहो पैं गाढा ।
जे ब्रह्मानंदु उघडा । भोगवीतसे ॥ ६७ ॥
ऐसें संजयो बोलिला । परि न द्रवे एरु उगला ।
चंद्रकिरणीं सीतळा । पाखाणु जैसा ॥ ६८ ॥

हे देखौनि तेयाची दशा । मग कारि चि ना वारिषा ।
परि सुखें जाला पींसा । बोलतु असे ॥ ६९ ॥
भुलविला हर्षवेगें । ह्मणौनि धृतराष्ट्र सांघे ।
यन्हविं नोहे तेया जोगें । हें किर जाणे ॥ १५७० ॥
मग ह्मणे पैं कुरुराजा । ऐसें भ्रातृपुत्र तो तूझा ।
बोलिला तें अधोक्षजा । गोड जालें ॥ ७१ ॥
आगा पूर्वापरसागर । इया नावांचा सिनार ।
येर आघवें चि नीर । एक जैसें ॥ ७२ ॥
तैसा श्रीकृष्णु पार्थु ऐसें । हें आंगा चि पासीं दीसे ।
मग संवादीं जी नसे । काहीं चि भेदू ॥ ७३ ॥
दर्पणा हिं हूनि चोखें । दोन्हि होंति संमुखें ।
तेथ एरीं एर देखे । आपणपें जैसें ॥ ७४ ॥
तैसा देवेंसिं पांडुसुतु । आपणपें देविं देखतु ।
पांडवेंसिं देखे अनंतु । आपणपें पार्थीं ॥ ७५ ॥
देउ देवा भक्ता लागि । जिये विवरु नेदखे आंगिं ।
येरु ही तिए चि भागीं । दोन्हीं देखे ॥ ७६ ॥
आणिक काहिं चि नाहिं । ह्मणौनि करिती काई ।
दोघै एकपणें पाहीं । नांदत आहाति ॥ ७७ ॥
आतां भेदु जरि मोडे । तरि प्रश्णोत्तर कां घडे ।
ना भेदू चि तरि जोडे । संवादसुख कां ॥ ७८ ॥
ऐसें बोलतां दूजेपणें । संवादें द्वैत जें गीळणें ।
तें आइकिलें बोलणें । दोघांचें मियां ॥ ७९ ॥
उटूनि दोन्हीं आरिसे । वोडविलेयां सरिसे ।
कोण कोणां पाहांतसे । जाणवे ना ॥ १५८० ॥
कां दीपा सदमुखु । ठेविलेयां दीपकु ।
कोणु कोणा अधिकु । कोणु जाणे ॥ ८१ ॥

हें निद्रांहि जातां फुडें । निद्रांरासि ठक पडे ।
ते दोघे जाले एवडे । संवादें सरिसे ॥ ८२ ॥
तैसे श्रीकृष्ण ते दोन्हीं । संवादले तें मनीं ।
धरितां मज ही वानीं । ते चि हों पांतसे ॥ ८३ ॥
ऐसें ह्मणे ना मोटकें । तंव हीरौनि सात्विकें ।
आठौ नेला नेणों कें । संजयपणांचा ॥ ८४ ॥
रोमांच जंव फरके । तंव तंव आंग सुरके ।
स्तंभस्वेदातें जीके । एकला कंपु ॥ ८५ ॥
अद्वयानंदपरिसें । दृष्टि रसमय जाली असे ।
ते अश्रु नव्हंति जैसे । द्रवत्व चि ॥ ८६ ॥
नेणों काइ न माये पोटीं । काइ नेणों गुंपे कंठिं ।
व्यग्रता पडे मिठी । उससाचिया ॥ ८७ ॥
किंबहुना सात्विकां आठां । चाचरु मांडतां उमेठा ।
संजय जाला असे चौहटा । भावभवनिचा ॥ ८८ ॥
तेया सुखाची ऐसी जाति । जें आपणपां चि धरी शांति ।
मग पुडुतीं देहस्मृति । लाधली तेणें ॥ ८९ ॥

**व्यासप्रसादाछृतवानेतद्गुह्यमहं परं ॥**
**योगं योगेश्वरात्कृष्णात्साक्षात्कथयतः स्वयं ॥ ७५ ॥**

तेधवां बैसतेन आनंदें । ह्मणे जी जें उपनिषदें ।
नेणति तें व्यासप्रसादें । आइकिलें मियां ॥ १५९० ॥
हे आघवे चि योग । जेया ठाया यंति मार्ग ।
तेयाचें वाक्य समर्घ । केलें व्यासें ॥ ९१ ॥
आहो अर्जुनाचेनि मीसें । आपणपें चि दूजें ऐसें ।
नटूनि आपणेयां दोसें । बोलिले जें देवो ॥ ९२ ॥
तेथ किं माझे श्रोत्र । पाठाचें जालें पात्र ।
काइ वानूं स्वतंत्र । सामर्थ्य गुरुचें ॥ ९३ ॥

**राजन्संस्मृत्य संस्मृत्य संवादमिममद्भुतं ॥**
**केशवार्जुनयोः पुण्यं हृष्यामि च मुहुर्मुहुः ॥ ७६ ॥**

हें बोलतां कां राउ होए। तेणें चि मोडवला ठाए।
रत्न कां रत्नकीळा ए। झांकोलें जैसें ॥ ९४ ॥
हिमवंतिचिं सरोवरें। चंद्रोदइं होंति काश्मिरें।
मग सूर्यागमीं माघारें। द्रवत्व ए ॥ ९५ ॥
तैसा शरीराचेया स्मृती। तो संवादु संजयो चित्तीं।
धरुनि आणि पुडुतीं। तें चि होए ॥ ९६ ॥

**तच्च संस्मृत्य संस्मृत्य रूपमत्यद्भुतं हरेः ॥**
**विस्मयो मे महान्राजन्हृष्यामि च पुनः पुनः ॥ ७७ ॥**

मग उठूनि ह्मणे नृपा। श्रीहरिचेया विश्वरूपा।
भेटलेयां उगा पां। काइ असिजे ॥ ९७ ॥
नेदखणेन जें दीसे। नाहिंपण चि जें असे।
विसरें आठवे तें कैसें। चुकौं आतां ॥ ९८ ॥
देखौनि चमत्कारु। कीजे तो नाहिं पैसारु।
मजै सवंट हा पूरु। नेंत असे ॥ ९९ ॥
ऐसा श्रीकृष्णार्जुन— । संवादसंगमिं स्नान।
करूनि देंतसें दान। अहंतेचें ॥ १६०० ॥
तेथ असंवरें आनंदें। अलौकिक ही स्पदें।
श्रीकृष्णु ह्मणे सद्गदें। वेलवेलां ॥ १ ॥
इया अवस्थांची काहीं। कौरवांतें परि नाहिं।
ह्मणौनि राया तें काहिं। कल्पावें जवं ॥ २ ॥
तवं जाला सुखलाभु। आपणपां करुनि स्वयंभु।
बुझविला अवष्टंभु। संजयें तेणें ॥ ३ ॥
एथ कोण्हीं एकि अवसरि। होवावी ते करूनि दूरि।
रावो ह्मणे संजया परि। कैसी तूझी गा ॥ ४ ॥

तेणें तूंतें एथ व्यासें । वैसविलें काइसेया दोसें ।
अप्रसंगा माजि ऐसें । बोलसी काइ ॥ ५ ॥
रानिचें राउला नेलेयां । दाही दिशा मानी सुनियां ।
कां रात्रि होये पाहालेयां । निशाचरां ॥ ६ ॥
जो जेथिचें गौरव नेणे । तेयातें भिंगुलवाणें ।
ह्मणौनि अप्रसंगु तेणें । ह्मगावा किं तो ॥ ७ ॥
मग ह्मणे सांवें प्रस्तुत । उदैलें असे जें हें उत्कलित ।
तें कोणासि रे बा जैत । देईल शेषीं ॥ ८ ॥
यन्हवीं विश्वे बहुत एक । आमचें ऐसें मानसिक ।
जें दुर्योधनाचे अधिक । प्रताप सदा ॥ ९ ॥
आणि एरांचेनि पाडें । दल ही तें देवडें ।
ह्मणौनि जैत फुडें । आणील तो तें ॥ १६१० ॥
आह्मा तवं गमे ऐसें । मां तूझें जोईस कैसें ।
तें नेणों संजया असे । तैसें सांघ पां ॥ ११ ॥

**यत्र योगीश्वरः कृष्णो यत्र पार्थो धनुर्द्धरः ॥**
**तत्र श्रीर्विजयो भूतिर्ध्रुवा नीतिर्मतिर्मम ॥ ७८ ॥**

यया बोला संजयो ह्मणे । जी येरायेरांचें मीं नेणें ।
परि आयुष्य तेथ जीणें । हें फुडें गा ॥ १२ ॥
चंद्रु तेथ चंद्रिका । शंभु तेथ अंबिका ।
संत तेथ विवेका । असणें कीं जी ॥ १३ ॥
रावो तेथ कटक । सौजन्य तेथ सोइरिक ।
वन्हि तेथ दाहक । सामर्थ्यता ॥ १४ ॥
दया तेथ धर्मु । धर्मु तेथ सुखागमु ।
सुखीं पुरुषोत्तमु । असे जैसा ॥ १५ ॥
वसंतु तेथ वनें । वनें तेथ सुमनें ।
सुमनीं पाळेगनें । सारंगांचिं ॥ १६ ॥

गुरु तेथ ज्ञान । ज्ञानें आत्मदर्शन ।
दर्शनीं समाधान । आथि जैसें ॥ १७ ॥
भाग्य तेथ विलासु । सुख तेथ उल्हासु ।
हें असो तेथ प्रकाशु । सूर्यो जेथें ॥ १८ ॥
तैसे सकळ पुरुषार्थ । जेणें स्वामी कां सनाथ ।
तो श्रीकृष्णराउ जेथ । तेथ लक्ष्मी ॥ १९ ॥
आणि आपुलेनि कांतेंसिं । ते जगदंबा जया पासिं ।
अणिमादिकी दासी । नो होंतु तेयातें ॥ १६२० ॥
तेयांचिये देशिचां झाडिं । कल्पतरुतें होडीं ।
न जीणावें काइ थोडीं । मायबापें ॥ २१ ॥
ते पाषाण हिं आववे । चिंतारत्नीं कां नोहावें ।
तिये भूमी कां नैयावें । सुवर्णत्व ॥ २२ ॥
तेयांचिये गाविंचिया । नदी अमृतें वाहाविया ।
नवल काइ राया । विचारि पां ॥ २३ ॥
तेयांचे विसाट शद्ब । सुखां ह्मणों यंति वेद ।
सदेह सचिदानंद । कां न व्हावे ते ॥ २४ ॥
पैं स्वर्गापवर्ग दोन्हीं । इयें पदें तियां आधिनि ।
श्रीकृष्णु बापु जननी । कमला जेयां ॥ २५ ॥
ह्मणौनि जिये बाहे उभा । तो लक्ष्मीयेचा वालभा ।
तेथ सर्वसिद्धी स्वयंभा । एर नेणों ॥ २६ ॥
आणि समुद्रा मेघु । उपेगें तेया ही हुनि चांगु ।
तैसा पार्थीं आजि लागु । असे तिये ॥ २७ ॥
कनकत्वदीक्षागुरु । लोहा परिसु होये कीरु ।
परि जगा पोसिता व्यवहारु । तें चि जाणे ॥ २८ ॥
एथ गुरू यंतसे उणें । ऐसें झनें हें कोण्हीं ह्मणे ।
वन्हि प्रकाशु दीपपणें । प्रकाशी आपुलां ॥ २९ ॥

तैसा देवाचिया शक्ती । पार्थु देवासी चि वहुती ।
परी मानें इये स्तुती । गौरव असे ॥ १६३० ॥
आणि पुत्रें मी सर्वगुणिं । जीणांवा हे बापु श्रियाणी ।
करी तैसा सारंगपाणी । फला आला ॥ ३१ ॥
किंबहुना ऐसा नृपा । पार्थु जाला असे कृष्णकृपा ।
तो जिया कडे साक्षेपा । रिती पाहे ॥ ३२ ॥
तो चि गा विजयासि ठावो । एथ कोणु तुज संदेहो ।
तेथ न ए तरि वावो । विजयो चि होये ॥ ३३ ॥
ह्मणौनि जेथ श्रीमंतु । आणि जेथ पांडुचा सुतु ।
तेथ विजयो समस्तु । अभ्युदयो तेथ ॥ ३४ ॥
जरि व्यासाचेनि साचें । मानी मन तुमचें ।
तरि या बोलाचें । ध्रुव चि माना ॥ ३५ ॥
जेथ तो श्रीवल्लभु । जेथ तो भक्तकदंबु ।
जेथ सुखें तेथ लाभु । मंगलांचा ॥ ३६ ॥
या बोला आन होये । तरि व्यासाचा अंकु न व्हाए ।
ऐसें गाजौनि बाहे । उभिली तेणें ॥ ३७ ॥
एवं भारताचा एवांका । आणूनि अक्षरा एका ।
संजयें कुरुनायका । दीधला हातिं ॥ ३८ ॥
जैसा नेणों केवडा वन्हि । कां पारि गुणाग्रिं ठेउनि ।
आणिजे सूर्याची हाणी । निस्तरावेया ॥ ३९ ॥
तैसें शब्दब्रह्म अनंत । जालें सवा लक्षु भारत ।
भारताचें सतें सात । सर्वस्व गीता ॥ १६४० ॥
तेयां हिं सातां शतांचा । इत्यर्थु हा श्लोकु शेषिचा ।
व्यासशिष्यसंजयाचा । पूर्णोद्गारु हा ॥ ४१ ॥
एणें एकें चि श्लोकें । राहे तेणें अतिकें ।
अविद्याजाताचें नीकें । जींतलें होए ॥ ४२ ॥

ऐसेयां श्लोकां सें सात । गीतेचिं पदें आंगें वाहात ।
पदें ह्मणों किं अमृत । गीताकाशिचें ॥ ४३ ॥
किं आत्मराजाचिये सभे । गीते उभडविले खांबे ।
मज श्लोक प्रतिभे । ऐसे एंती ॥ ४४ ॥
किं गीता हे सप्तशती — । मंत्रप्रतिपाद्य भगवती ।
मोहमहिषमुक्ती । आनंदली असे ॥ ४५ ॥
ह्मणौनि मनें कानें वाचा । जो सेवकु होईल इयेचा ।
तो स्वानंदसाम्राज्यींचा । चक्रवर्ति करी ॥ ४६ ॥
किं अविद्यातिमिररोखें । श्लोक सूर्याचें साबाइकें ।
खेळविलें गीतामिखें । रायें श्रीकृष्णें ॥ ४७ ॥
किं श्लोकाक्षरद्राक्षलता । मांडौ जाली आहे गीता ।
संसारपथश्रांता । विसावांवेया ॥ ४८ ॥
किं सभाग्यसंतीं भ्रमरीं । केले ते श्लोक कल्हारीं ।
श्रीकृष्णास्यसरोवरीं । सांसिनली हे ॥ ४९ ॥
किं श्लोक नव्हंति आन । गमे गीतेचें महिमान ।
वाखाणिते बंदिजन । उदंड जैसे ॥ १६५० ॥
किं श्लोकांचेया आवरां । सात से करूनि सौंदरा ।
सर्वागम गीतापुरा । वसों आले ॥ ५१ ॥
कां निजकांता आत्मेयां । आवडि गीता मिळावेया ।
श्लोक नव्हंति बाह्या । पसरु कां जो ॥ ५२ ॥
किं गीता कमळिचे भृंग । किं गीतासागरतरंग ।
किं हरिचे हे तुरंग । गीतारथिचे ॥ ५३ ॥
किं श्लोक-सर्वतीर्थांतु । आली गीता गंगा अद्भुत ।
जें अर्जुनु जाला सिंहस्थु । ह्मणौनियां ॥ ५४ ॥
किं नव्हे हे श्लोकश्रेणी । सतंत जाली चिंतामणी ।
किं निर्विकल्पपल्लवणी । कल्पतरूची हे ॥ ५५ ॥

ऐसेयां सें सात श्लोकां । परि आगला एकु एका ।
आतां कोणु वेगलिका । वानावा पां ॥ ५६ ॥
दीपा आदीलु मागीलु । सूर्यासि धाकुटा वडीलु ।
अमृतसिंधु खोलु । उतलु काइसा ॥ ५७ ॥
तानी आणि पारिठी । इया कामधेनूतें दीठी ।
सूनि जैसिया गोठी । कीजति नां ॥ ५८ ॥
तैसे पहिले आणि सरते । श्लोक न ह्मणावे गीते ।
जूनि नवि पारिजातें । असति काइ ॥ ५९ ॥
आणि श्लोकां पाडु नाहिं । हें किर समर्थु काइ ।
एथ वाच्यवाचक हिं । भागु न धरी ॥ १६६० ॥
जे इये शास्त्रि एकु । श्रीकृष्णु चि वाच्यवाचकु ।
हें प्रसिद्धी जाणे लोकु । भलेतो ही ॥ ६१ ॥
एथ अर्थे तें चि पाठें । जोडे एवडेनि धटें ।
वाच्यवाचकें एकवटें । साधीति शास्त्रें ॥ ६२ ॥
ह्मणौनि मज काहिं । समर्थनीं आतां विषो नाहिं ।
गीता जाणा हे वाङ्मई । श्रीमूर्त्ति प्रभूची ॥ ६३ ॥
शास्त्र वाच्यें अर्थे फळे । मग आपण मावळे ।
तैसें हें नव्हे समूळें । परमतत्व चि ॥ ६४ ॥
कैसा विश्वाचिया कृपा । करूनि महाआनंदु सोहपा ।
अर्जुना व्याजें रूपा । आणिला देवें ॥ ६५ ॥
चकोरांचेनि निमित्तें । तीन्हीं भुवनें संतप्तें ।
निवविलिं कळावंतें । जिया परीं ॥ ६६ ॥
तैसें हें गीतेचें दुभतें । वत्स करूनि पार्थातें ।
दुभिनली पुरतें । श्रीकृष्णु गाए ॥ ६७ ॥
कां गौतमाचेनि मीसें । कलिकाळुज्वरितादोसें ।
पाणिढाळु गिरीशें । गंगेचा केला ॥ ६८ ॥

एथ जंव जरि नाहाल । तरि हें चि कीरु होआल ।
ना पाठमीखें तीमाळ । जीभ पैं जरि ॥ ६९ ॥
तऱ्हीं लोह हें एकें अंशें । झगटिले होये परिसें ।
तरि एकी कडे आपैसें । सुवर्ण होए ॥ १६७० ॥
तैसी पाठाची ते वाटी । लाविजे ना जवं वोंठीं ।
तवं ब्रह्मतेची पुष्टी । एईल आंगा ॥ ७१ ॥
नां येणेंसि तोंड वांकुडें । करूनु ठाकाल कोनवडें ।
तरि कानें हिं घेंति पडे । तें चि लेख ॥ ७२ ॥
कां जें श्रवणें पाठें अर्थे । गीता नेंदी मोक्षा आरौतें ।
स्थूल दाता कि कोण्हातें । नास्ति न ह्मणैल ॥ ७३ ॥
ह्मणौनि जिया तिया सवा । गीता चि येकि सेवा ।
काइ कराल आघवां । शास्त्रिं एरिं ॥ ७४ ॥
आणि कृष्णार्जुनिं मोकळीं । गोठि केली निराळीं ।
ते व्यासें दाविली करतळीं । वेॐ ये ऐसी ॥ ७५ ॥
बाळकातें वोरसें । माये जेवऊं बैसे ।
तेव्हळि तेया ठाकति तैसें । घांस करी ॥ ७६ ॥
कां अफांटा समीरणा । आपैतेपणेंसिं आणा ।
केलें जैसें वीजणा । निर्मूनियां ॥ ७७ ॥
तैसें शद्बें जें न लभे । तें घडूनु अनुष्टुभें ।
स्त्रीशूद्रादिप्रतिभे । सामविलें ॥ ७८ ॥
स्वातींचेनि पाणियें । न्हवंति जरि मोतियें ।
तरि आंगीं सौंदरांचियें । कां शोभती तियें ॥ ७९ ॥
नादु वाद्या नेयंता । तरि कां गोचरु होंता ।
फुलें नव्हतां घेयता । आमोदु केवि ॥ १६८० ॥
गोडें नव्हंति पक्कान्नें । तरि कां फावती रसनें ।
दर्पणें विण नयनें । नयनु कां दीसे ॥ ८१ ॥

द्रष्टा श्रीगुरुमूर्त्ति । न रिगतां दृश्यपंथीं ।
तरि काह्या उपास्ती । आकलता तो ॥ ८२ ॥
तैसें वस्तु जें असंख्यात । तेया संख्या इयें शतें सात ।
नव्हंति तरि कोण एथ । लागों ये तें ॥ ८३ ॥
मेघु सिंधुचें पाणी वाहे । तऱ्हीं जग तेयातें चि पाहे ।
कां जें उमप तें नोहे । टाकतें कोण्हां ॥ ८४ ॥
आणि वाचा जें न पवे । तें श्लोक न्हवंति बरवें ।
तरि कानें मुखें फावे । ऐसें कां होंतें ॥ ८५ ॥
ह्मणौनि व्यासाचा हा थोरु । विश्वा जाला उपकारु ।
श्रीकृष्णउक्ति आकारु । ग्रंथाचा केला ॥ ८६ ॥
आणि तो मियां हा आतां । व्यासाचिं पदें पाहातपाहातां ।
आणिला श्रवणपथा । मऱ्हाटिया ॥ ८७ ॥
व्यासादिकांचे उन्मेष । राहाटति जेथ साशंक ।
तेथ मी रंक एक । वाचाळै करीं ॥ ८८ ॥
परि गीता ईश्वरु भोळा । ले व्यासोक्तिकुसुममाळा ।
परि माझेया दूर्वादळा । ना न ह्मणे ॥ ८९ ॥
आणि जेया सिंधुतटा । पाणियां येंति गजघंटा ।
तरि काइ मुरकुटां । वारिजतसे ॥ १६९० ॥
पांखिकुटें पांखिरुं । गगनीं नुडे तरि काइ करुं ।
नभ क्रमूनि थोरु । गरुडु देखैं ॥ ९१ ॥
राजहंसाचें चालणें । भूतळिं चालावें कवणें ।
तरि आणिकिं ही कुंटेपणें । चालावें लागे ॥ ९२ ॥
जी आपुलेनि अवकाशें । अगाध घेपे कलशें ।
चूळु चूळु पाणी ऐसें । वेउनि निगे ॥ ९३ ॥
दिवियेचां आंगि थोरी । तरि ते बहुतां तेजातें करी ।
वाति आपुलिया परी । आणीकीं ना ॥ ९४ ॥

जी समुद्राचेनि पैसें । समुद्रीं आकाशें आभासे ।
थिलरीं थिलरा ऐसें । बिंबें चि पैं ॥ ९५ ॥
तेवि व्यासादिमहामती । वावरों ये इये ग्रंथीं ।
मां आह्मी टाकों हें युगुति । निमले चि कीर ॥ ९६ ॥
जिये सागरीं जळचरें । संचरति मंदराकारें ।
तेथ काइ सफरें । पव्हों न ल्हांति ॥ ९७ ॥
अरुणु आंगा जवळिके । ह्मणौनि सूर्यातें तो देखे ।
मा भूतळिं चि नेदखे । मुंगी काई ॥ ९८ ॥
इया लागि आह्मां प्राकृतां । देशिकारें बांधों गीता ।
ह्मणणें हें अनुचिता । कारण नव्हे ॥ ९९ ॥
आणि वापु पुढां जाये । देखां उचलता पायें ।
आणि बालक हळु हळु ये । तरि तें न पवों काइ ॥ १७०० ॥
तैसा व्यासाचा मागोवा घेंतू । भाष्यकारांतें पूसतु ।
अयोग्यु ही मी न पवतु । कें जाइन ॥ १ ॥
आणि पृथ्वी जेया क्षेमा । नुभगे स्थावरजंगमा ।
जेयाचेनि अमृतें चंद्रमा । निववी जग ॥ २ ॥
जेयाचें आंगें असिकें । तेज लाहूनि अर्कें ।
आंधाराचें सावाइकें । लोटिजतसे ॥ ३ ॥
समुद्रा जेयाचें तोए । तोया जेयाचें माधुर्य ।
माधूर्या सौंदर्य । जेयाचे होतें ॥ ४ ॥
पवना जेयाचें बळ । आकाश जेणें पवळ ।
ज्ञान जेणें उजळ । चक्रवर्ती ॥ ५ ॥
वेद जेणें सुभास । सुख जेणें सोल्लास ।
हें असो रूपस । विश्व जेणें ॥ ६ ॥
तो सर्वोपकारी समर्थु । सद्गुरु श्रीनिवृत्तिनाथु ।
राहाटतसे मज आंतु । रिगौनियां ॥ ७ ॥

आतां आइती गीता जगीं । मीं सांवें मऱ्हाटिया भंगीं ।
एथ कैंचा विस्मया लागि । ठाउ असे ॥ ८ ॥
श्रीगुरुचेनि नावें माती । डोंगरीं जेया पासिं होंती ।
तेणें कोळियें त्रिजगती । एकावद केली ॥ ९ ॥
चंदनें वेधिलीं झाडें । जालिं चंदनाचेनि पाडें ।
वसिष्ठें मानिली कीं भांडे । भानुसीं पाठी ॥ १७१० ॥
मा मी तवं चित्ताथिला । आणि श्रीगुरु ऐसा दादुला ।
जो दीठिवेनि आपुलां । वैसवी पदीं ॥ ११ ॥
आधीं चि देखणी दीठि । वरि सूर्यु पुरवी पाठि ।
तैं न दिसे ऐसी गोठि । कोठें असे ॥ १२ ॥
ह्मणौनि माझे नीच नवे । श्वास ही प्रबंध होआवे ।
गुरुकृपा काइ न्हवे । ज्ञानदेउ ह्मणे ॥ १३ ॥
या कारणें मियां । गीतार्थु मऱ्हाटिया ।
केला लोका लागिया । दीठिचा विखो ॥ १४ ॥
परि मऱ्हाटे बोल रंगें । कवलितां जैं गीतांगें ।
तैं गा तेयाचेनि पांगें । एकावट जाले ॥ १५ ॥
ह्मणौनि गातां गाउ ह्मणे । तैं गाणिवे होये नेणें ।
ना मोळें तरि उणें । गीता ही न आणिती ॥ १६ ॥
सुंदर आंगिं लेणें न सूए । तैं तो मोकला श्रिंगारु होये ।
ना लेइलें तरि आहे । तैसें कें उचित ॥ १७ ॥
कां मोतियांची जैसी जाति । सोनेयां हिं मानु देंति ।
ना यऱ्हवीं तऱ्हीं मानवति । आंगें चि गुणु ॥ १८ ॥
नाना गुंफिलीं कां मोकलीं । उणीं न्हवंति परिमळीं ।
वसंतागमिचिं वाटौलीं । मोगारिं जैसिं ॥ १९ ॥
तैसी गाणीव तें मिरवी । गीतें विण रंगु दावी ।
ते लोभाचां बंधु उवी । केली मियां ॥ १७२० ॥

तेणें आबालसुबोधें । ओवियेचेनि वंधें ।
ब्रह्मरसुस्वादें । आखरें गुंफिलीं ॥ २१ ॥
आतां चंदनाचां सेजारीं । परिमळा लागि निमिष भरी ।
पारुखणें जिया परीं । न लगे तेथ ॥ २२ ॥
तैसा प्रबंधु हा श्रवणीं । लागत खेओ समाधी आणी ।
आइकिलेयां वाखाणी । व्यसन न लवी ॥ २३ ॥
पाकु करिति व्याजें । पांडिलें एथ वेखजें ।
तें अमृतातें नेणिजे । पातलेयां ॥ २४ ॥
तैसेनि आइतेपणें । कवित्व जालें उभणें ।
मननिदिध्यासश्रवणें । जींतलें आतां ॥ २५ ॥
हें स्वआनंदभोगाची सेल । भलेतेयासी चि देइल ।
सर्वेंद्रियें पोसवील । श्रवणा करवीं ॥ २६ ॥
चंद्रातें आंगवणें । भोगुनि चकोर सिहाणे ।
तऱ्हीं फावे जैसें चांदिणें । भलेतेया ॥ २७ ॥
तैसें आध्यात्मशास्त्रीं इये । एक अंतरंग चि अधिकारिये ।
येरि लोक वाक्चातुर्यें । होईल सुखिया ॥ २८ ॥
ऐसें श्रीनिवृत्तिनाथाचें । गौरव असें जी साचें ।
ग्रंथु नव्हे मुक्तपेचें । वैभव तियें ॥ २९ ॥
क्षीरसिंधुपरिसरीं । शक्तिचां कर्णकुहरीं ।
तेणें कैं श्रीत्रिपुरारी । सांघितलें जें ॥ १७३० ॥
तें क्षीरकल्लोळा आंतु । मकरोदरीं गुपितु ।
होंता तेयाचा हातु । पैठें जालें ॥ ३१ ॥
तो मछप्रसवसृंगी । भग्नावयव चौरंगी ।
भेटला तो सर्वांगिं । संपूर्ण जाला ॥ ३२ ॥
मग समाधि अव्यया इया । भोगाचा वास नां इया ।
ते मुद्रा श्रीगोरखराया । दिधली मीनीं ॥ ३३ ॥

तेणें योगाब्जिनीसरोवरू । विषयविध्वंसैकवीरु ।
तिये पदीं कां सर्वेश्वरु । अभिषेकिला ॥ ३४ ॥
मग तेहीं तें शांभव । अद्वयानंदवैभव ।
संपादिलें सप्रभाव । श्रीगायणिनाथीं ॥ ३५ ॥
तेणें कलिकलितभूतां । आला देखौनि निरुता ।
आज्ञा श्रीनिवृत्तिनाथा । दीधली ऐसी ॥ ३६ ॥
अनादिगुरुशंकरा । पासौनि शिष्यपरंपरा ।
बोधाचा हा सवंसारा । जाला आमतें ॥ ३७ ॥
तो हा घेउनि आवघा । कलिगीलितेयां जीवां ।
सर्वप्रकारिं धावा । करि पां वेगां ॥ ३८ ॥
आधि तो तवं कृपालु । वरि गुरुआज्ञेचा बोलु ।
जाला जैसा वरिषाकालु । खवणलें मेघां ॥ ३९ ॥
मग आर्त्ताचेन उर्भ्रसें । गीतार्थग्रथनमिसें ।
वरिखला शांतरसें । तो हा ग्रंथू ॥ १७४० ॥
तेथ पुढां मी बापिया । मांडलां आर्त्ती आपुलेया ।
कीं यया साठिं यवडेया । आणिलां यशा ॥ ४१ ॥
एवं गुरुक्रमें लाधलें । समाधिधन जें आपुलें ।
तें ग्रंथिं बांधौनि दीधलें । गोसांवीं मज ॥ ४२ ॥
वांचौनि पढें ना वाचीं । ना सेवा ही जाणें स्वामिची ।
ऐसेया मज ग्रंथाची । योग्यता कें असे ॥ ४३ ॥
परि साच चि गुरुनाथें । निमित्य करुनि मातें ।
प्रबंधव्याजें जगातें । रक्षिलें जाणा ॥ ४४ ॥
तऱ्हि पुरोहितगुणें । मी बोलिलां पुरें उणें ।
तें तुह्मीं माउलीपणें । उपसाहिजो जी ॥ ४५ ॥
शद्बु कैसा वडिजे । प्रमेय कैसेयां चढिजे ।
अलंकारु ह्मणिजे । काइ तें नेणें ॥ ४६ ॥

साएखेडाचें बाउलें । चाळवीतेया सूत्राचेनि चाळे ।
तैसा मातें दावीति बोलें । स्वामि तो माझा ॥ ४७ ॥
या लागि मी गुणदोष । विषीं क्षमात्रि ना विशेष ।
जें संजात मी ग्रंथिलों देख । आचार्यं कीं जी ॥ ४८ ॥
आणि तुह्मां संतांचिये सभे । जें उणीवांसि ठाके उभें ।
तें पूर्ण नोहे तैं लाभे । तुह्मा कोपों ॥ ४९ ॥
सितलेयां हि परिसें । लोहत्वाचिए अवदशे ।
न मूकिजे चि आयसें । तो कोणां बोलु ॥ १७५० ॥
वोहळें हें चि करावें । जें गंगेचें आंग टाकावें ।
मग ही गंगा नोहे । तैं तो काइ करी ॥ ५१ ॥
ह्मणौनि भाग्ययोगें बहुतें । तुह्मां संतांचे मी पाए ।
पातलां आतां कें आहे । उणें जगीं ॥ ५२ ॥
आहो जी माझेनि स्वामीं । मज संत जोडुनु तुह्मीं ।
दीधलेति सर्वकामीं । संपूर्णु जालां ॥ ५३ ॥
पाहे पां मातें तुह्मां सांगडें । माहेर तेणें सुरवाडें ।
ग्रंथाचें हें आळियाडें । सिद्धी गेलें ॥ ५४ ॥
जी कनकाचें निखळ । उभूं येईळ भूतळ ।
चिंतारत्नीं कुळाचळ । निर्मूं एंती ॥ ५५ ॥
सातां हि सागरातें । सोहपें भरितां अमृतें ।
दुवाड नोहे तारातें । चंद्रु करितां ॥ ५६ ॥
कल्पतरूंचे आराम । लावितां नाहिं विषम ।
परि गीतार्थाचें वर्म । निवडीं नेए ॥ ५७ ॥
तें मीं एकु सर्व मूका । बोलौनि मऱ्हाटिया चोखा ।
करिं डोळे वरि लोकां । घेऊं ए ऐसें ॥ ५८ ॥
हा ग्रंथसागरु एवडा । उतरौनि पैलीकडां ।
कीर्तिविजयाचा ढेंढा । नाचे जे कां ॥ ५९ ॥

गीतार्थिचा अरुवारु । कळशेंसि महामेरु ।
रचूनि माझी श्रीगुरु– । लिंग जें पूजी ॥ १७६० ॥
गीता निष्कपट माए । चूकौनि हींडिजे वाएं ।
ते माये पूतां भेटि होए । हा धर्मु तुमचा ॥ ६१ ॥
तुह्मा सज्जनाचें केलें । आकळूनि जी मीं बोलें ।
ज्ञानदेउ ह्मणे ठेंकुलें । तैसें हें नोहे ॥ ६२ ॥
काइ बहू बोलों सकळां । मेळविलां जन्मफळा ।
ग्रंथसिद्धिचा सोहळा । दाविला जो हा ॥ ६३ ॥
मियां जैसीजैसिया आशा । केला तुमचा भरवसा ।
तो पुरौनि जी बहुवसा । आणिलां सुखा ॥ ६४ ॥
जी मज लागि ग्रंथाची स्वामी । दूजी सृष्टि केली तुह्मीं ।
तें पाहूनि हांसों आह्मि । विश्वामित्रातें ॥ ६५ ॥
जें असौनि त्रिशंकुदोसें । धात्रेया ही आणावें वोसें ।
तैं नासतें कीजे किं ऐसें । निर्मावें ना हीं ॥ ६६ ॥
शंभु उपमन्युचेनि मोहें । क्षीरसागरु केला आहे ।
एथ तो ही उपमो नोहे । जें विषगर्भ किं ॥ ६७ ॥
अंधकारा निशाचरां । गीळितां सूर्ये चराचरा ।
धावा केला तऱ्हीं खरा । ताउनि तो ॥ ६८ ॥
तातलेया जगा कारणें । चंद्रें हिं वेचिलें चांदिणें ।
तेया सदोषा केवि ह्मणें । सारिखें हें ॥ ६९ ॥
ह्मणौनि तुह्मीं मज संतीं । ग्रंथरूपु जो हा त्रीजगतीं ।
उपेगु केला तो हा पुडुतीं । निरूपमु जी ॥ १७७० ॥
किंबहुना तुमचें केलें । धर्मकीर्त्तन सिद्धी गेलें ।
एथ माझें जी उरलें । पाइकपण ॥ ७१ ॥
आतां विश्वात्मकें देवें । एणें वाग्यज्ञें तोषावें ।
तोखौनि मज देयावें । पसायदान हें ॥ ७२ ॥

जें खळांची वांकुडे मोडे । तेयां सत्संगीं रति वाढे ।
भूतां परस्परें पडे । मैत्र जीवाचें ॥ ७३ ॥
दुरिताचें तिमिर जाउ । विश्वा स्वधर्मसूर्यो पाहो ।
वांछिल तें तें लाहो । प्राणिजात ॥ ७४ ॥
वर्षतें सर्वमंगळीं । इश्वरनिष्ठांची मांदियळी ।
अनवरत भूतळीं । भेटोतु भूतां ॥ ७५ ॥
चलां कल्पतरूचे आरव । चेतनाचिंतामणिचे गावं ।
बोलते पां अर्णव । पीयूखांचे ॥ ७६ ॥
चंद्रमे जे आलंछन । मार्त्तंड जे तपहीन ।
ते सर्वां हीं सदा सज्जन । सोयरे होंतु ॥ ७७ ॥
किंबहुना सर्वसुखीं । पूर्ण होउनि तिहिं लोकिं ।
भजिजो आदिपुरुषीं । अखंडित ॥ ७८ ॥
आणि ग्रंथोपजीवियें । विशेषें लोकीं इयें ।
दृष्टादृष्टविजयें । होआवें जी ॥ ७९ ॥
एथ ह्मणे विश्वेसरु राउ । हा होईल दाओ पसाउ ।
ऐणें वचनें ज्ञानदेउ । सुखिया जाला ॥ १७८० ॥
ऐसें युगीं वरि कली । आणि महाराष्ट्रमंडळीं ।
श्री गोदावरिचां कुळीं । दक्षिणिलीं ॥ ८१ ॥
तेथ भुवनैकपवित्र । अनादिपंचक्रोशक्षेत्र ।
जगाचें जीवनसूत्र । जेथ श्रीमहालसा ॥ ८२ ॥
तेथ इंदुवंशविलासु । जो सकलकलां निवासु ।
न्यायातें पोखीत क्षितीशु । श्रीरामचंद्रु ॥ ८३ ॥
तैं माहेशान्वयसंभूतें । श्रीनिवृत्तिनाथसुतें ।
केलें ज्ञानदेवें गीते । देशीकार लेणें ॥ ८४ ॥
एवं भारताचां गावीं । भीष्मनामीं प्रसिद्धपर्वीं ।
श्रीकृष्णार्जुनीं बरवी । जे गोष्टि केली ॥ ८५ ॥

जें उपनिषदाचें सार । सर्वशास्त्राचें माहिएर ।
परमहंसीं सरोवर । सेविजे जें ॥ ८६ ॥
तिये गीतेचा कळशु । संपूर्ण हा अष्टादशु ।
ह्मणे निवृत्तिदासु । ज्ञानदेवो ॥ ८७ ॥
पुडुतीं पुडुतीं पुडुतीं । इया ग्रंथा पुण्यसंपत्ती ।
सर्वसुखीं सर्वभूतीं । संपूर्ण होइजो ॥ ८८ ॥

ॐ तत्सदितिश्रीमद्भगवद्गीतासूपनिषत्सु ब्रह्मविद्यायां योगशास्त्रे श्रीकृष्णार्जुनसंवादे **मोक्षयोगो** नाम अष्टादशोध्यायः ॥
हिरण्य । श्रीकृष्णार्पणमस्तु ॥ १८ ॥
लेखनं श्रीकृष्णार्पणमस्तु ॥
श्री + + + + साम्राज्यलक्ष्मीस्वरूपीश्वरा
गुरुकृपालुनारायण पातु मां ॥

शकें बारा शतें बारोत्तरें । तैं टीका केली ज्ञानेश्वरें ।
सच्चिदानंदबाबा आदरें । लेखक जाला ॥ ९२ ॥

हें पुस्तक विश्वनाथु कोनेर धोलरदेवनुरकर

**श्रीसद्गुरुमुकुंदेन दत्ता ज्ञानेश्वरी शुभा ॥**
**विद्याधराय शिष्याय स्वीए स्वत्वं न शोभते ॥ १ ॥**

# प्राचीन शब्दकोश

प्रस्तुत लहान कोशांत कांहीं ठळक ठळक प्राचीन शब्दांचे अर्थ दिले आहेत. दुसऱ्या खंडांत ज्ञानेश्वरींतील एकोनएक शब्दांची बृहत्सूचि द्यावयाची आहे, त्यांत अठराहि अध्यायांतील शब्दांचे अर्थ स्पष्ट होतील.

## अ

अगत्या–निरुपायानें.
अगाधपण–अमेयत्व, गूढत्व.
अघ–पाप, दुःख.
अचल–स्थिर, पर्वत.
अचुंबित–अस्पृष्ट, अतर्कित.
अझुइंवरि–अद्यापपर्यंत.
अडदर–भय.
अडव–रान.
अडिनांव–अयथार्थनाम.
अडे–सांठवे.
अढंचें–वरचें.
अणुसुट–अनुच्छिष्ट.
अतिसो–अतिशय.
अथव, अथाव,–ठव, ठाव नाहीं असा जलसंचय.
अध्वर–यज्ञ, याग.
अनकलित–समग्र.
अनव्रत–निरंतर, नियत, व्रतबद्ध.
अनस्यूत–अखंड ओंवलेलें.
अनारिसें–भिन्न, भलतें.
अनावर–आवरण्यास अशक्य.
अनुकार–अनुकरण.
अनुघाड–उघाड नाहीं तें, गुप्तपणा, कोंडणी.
अनुपरोध–रूपोपरोधरहित, यथार्थ.
अनुभौ–अनुभव.
अनुसंग-संगति, संबंध, विश्वास.
अनेग–एकाहून अधिक.
अपभ्रंश–नाश, अपशब्द.
अपाड–सामर्थ्यरहित, अशक्य, सत्वर.
अपार–अपरिमित.
अपावृत–उघडले, प्रकटले.
अपांपरि–दुर्दशा, भिन्न रीति.
अभोल–भोळा नव्हे तो, प्रबुद्ध.
अर्चिरामार्ग–सूर्यकिरणमार्ग.
अरौतें–अलिकडचें.
अलिउलें–भुंग्यांचे थवे.
अलुकी–व्यसन, क्षुधा, आसक्ति.
अलौकिका–अलौकिकवान्, लोकांना सोडून वागणारा.

अवगाळ–गाळ.
अवष्टंभ–अहंकार, आश्रय, धैर्य.
अवसरीं–मोहें, समयीं.
अवसात–अकस्मात्.
अव्हाटां–आडवाट.
अविद्या–माया.
अविट, अवीट–अलिप्त, शुद्ध, सरळ,
अविनाभाव–व्याप्तिमत्व, अविलगपणा
असकरणें–धिक्कारणें.
असका–अवघा, समग्र.
अस्तोव्यस्त–अस्ताव्यस्त
असमसाहस–ज्याचे साहसास साम्य नाहीं असा, अमर्याद.
असमाई–न समावणारी, न राहणारी
असंघडे–विघडे.
अक्षौहिणी–रथ व हत्ती २१८७०, घोडे ६५६१०, पदाति १०९३५०
अंगस्तिगौवण–अंग आच्छादणारी पिशवी

## आ

आउठावियें–साडेतिसऱ्या.
आंकण–बंदी, प्रतिरोध.
आंकला–अंकित.
आंकूनि–मुद्रा ठोकून.
आखलिचे–दुष्टपणाचे.
आखर–अक्षर.
आगरीं–खाण, शेत, मळा.
आंगलगें–समागमें.
आगलिक–आधिक्य.
आगलें–अन्य, भिन्न.
आंगवटा–अंतरंग, जातिस्वभाव.
आंगवणें–मानवणें.
आंगवखां–अंगप्रदेशांत.
आगसे–डाहाळ्याचे शेंडे.
आगा–अरे, रे, अहो.
आगियल–आगीचा डोंब.
आचरणें–करणें, अनुष्ठिणें.
आचरतेनि–आचरणाऱ्यांनीं.
आझुंई–अद्यापि.
आझूं–अद्यापि.
आटलिजों–आळावयास.
आंटी–गांठ, मिठी.
आटोपे–डौल, महत्व, व्यापकता.
आठमुठी–अज्ञपणानें व मुग्धपणानें
आंठूइ–श्रमून.
आठौ–स्मृति.
आडकंठ–अलीकडला कांठ.
आडदरु–प्रतिभय.
आडालिजे–अडखळावें.
आडवंकी–खीळ.
आंडें–आणि, अथवा, कां.
आणी–आणतो.
आणि, णी–अग्र, महत्व.
आंतर–अंतःकरण.
आत्राटणें–थापटणें.
आंतुवटपणा–बलिष्ठता.
आते–पावे.

आंतौतें-फार आंत.
आथि-आहे.
आथिला-संपन्न.
आथुधुरे-सदसत्पणें.
आदिल-प्रारंभीचें.
आधपलिपि-ततझालेली.
आधव- आसक्ति.
आधाडा-मध्यभाग, आर्धाकडा, उदकाचा उगम अथवा मध्य.
आधिका-बलवत्तर.
आधिली-अर्धी.
आनौति-अन्य.
आपणपें-आत्मत्व.
आपादिलें-प्रतिपादिलें.
आपु-प्राप्त.
आपेसिं-अपयशें.
आवुथिलीं-अभ्युत्थान झालीं, उठलीं.
आम्नाय-वेद.
आय-वश, लाभ, आकार, ठिकाण.
आयणी-सामर्थ्य, इच्छा, प्रसर, रीति, तत्वनिर्णय.
आयतन-विश्रांतिस्थान.
आजें-मिळें.
आडि-दरड, खोल विवरें.
आर्त-इच्छा.
आरणीं-रक्षणकर्म, सेना.
आरंभरंभा-कदली, अप्सरोविशेष.
आराइले-वोपिले, अनुसरले.
आराणुक-विश्रांति.
आराय-सुख, समाधान, हर्ष.
आरौत-अलिकडील, अपकृष्ट.
आलवणें-बोलणें.
आलविलें-बोललें.
आलुकैलें-भुकेले.
आलोडावें-घुसळणें.
अवगाणिचें-अलिकडचें.
आंवगे-स्वीकारी, पावे.
आवडतें-हवें तें, इष्ट.
आवडे-वाटे. [अवच्छिन्न होणें.
आवरणें-पसरणें, विस्तरणें, आकारानें
आवसिक-अल्प वसती आहे जेथें.
आव्हासु-आभासु.
आवाळुवें-ओष्ठ प्रांत.
आविस-अमिष.
आवेंगवाणें-व्यंगरहित.
आशतुटि-निराश होऊन.
आसलगपणा-सोपेपणा, गोडी.
आसंसीति-वर्णन करतात.
आहाच-उथळ, सामान्य.
आहाचवाहाच-वरवर.
आहाणा-दृष्टान्त.
आहाति,ती-आहेत.
आहो-प्रतिष्ठा, आकार.
आक्षादिजे-आच्छादिजे.

## इ, ई

इतुले वेऱ्हीं-इतक्यापर्यंत इतकें.
इयेतव-इच्याकारणें.

इं-देखील.
ईभ-हत्ती.

## उ, ऊ

उक्ता-सांगितल्या.
उकलियां-समविषमता.
उखितें-एकसरें, आगंतुक.
उगाणां, उगाणे-झाडा, उपदेश, सांगण, समर्पण.
उगेयां-स्वस्थ.
उगंडू-सुटका, बहिर्गमन.
उजगरा-जागृति.
उजरी, उजिरी-ऋजुता, रीति, स्वछता सरिसेपण, विस्तार.
उजळाचें-चकाकणारें.
उजीवडें-प्रकाश.
उजू-नीट.
उजुकारें-नीट प्रकारें.
उतत-बाहेर पडत.
उत्पवन-उडणें.
उते-बाहेर सांडणें,
उदका-उदकानीं.
उद्दंडीं-अत्युत्सुक होत्सात्यांनीं.
उदाणें-बाग, वर येणें, प्रादुर्भाव.
उदिपे-उद्दीपन होई.
उदो-उदय, प्रादुर्भाव.
उधवला-उसळला.
उन्मेखु सूक्ष्मेक्षणु-अवधान हाच सूक्ष्म [नेत्र ज्याचा.
उनींदा-जागृत.
उपखा, खे-उपसा, व्यर्थत्व, वेच.
उपणितां-सुपानें झडपलें असतां.
उपरोधी-भीड, अडचण.
उपलवला-दृढ धरिला.
उपहतु-हानि पावलेला, येळिल.
उपादेय-ग्राह्य.
उपायिलें-प्राप्त झालें, विस्तारलें, प्रसिद्ध
उपास्ति-भक्ति.
उपासन-भक्ति.
उपेग-उपयोग.
उभगला-कंटाळा धरिला.
उभडा, डें-लोंढा, भडका.
उमपें-मोजण्यास अशक्य, अमूप,
उमाणितें-मोजितें.
उमेठें-मेळावा.
उराउरी-झडकर.
उरयें-श्रेष्ठ.
उरोधु-प्रतिबंध, भीड.
उल्ब-गर्भाची पिशवी
उल्हाटे-हटून पळे.
उलिगे-चोकऱ्या नोकऱ्या, विगार, वेठ.
उवाउं-उत्साह.
उवायिला-बोधिला.
उवेढा-वेढा दूर करणें.
उसिटा-उच्छिष्ट.
उहरविलीं-उद्धरिलीं.
उहीपुहीं-भवति नभवति.
ऊठि-बाकी.

## ए, ऐ.

ए-येतें, येई.

एकतुकें-एकमापाचें.

एकनिष्ठ-दृढश्रद्ध.

एकवंकैयेचा-सारखेपणाचा.

एकाधें-एखादें.

एकोल-एकवेळ.

एषा-ईर्षा, बरोबरी.

एसणें-असलें.

एंति-येतात.

ऐसा-असा.

## ओ.

ओइचिलें-अत्यंत अल्प.

ओगरा-वाढणें.

ओडवला-पातला.

ओतपली-दीप्ति.

ओथिजलें-पातळ केलें.

ओभाणें-पूर, वेग.

ओलांतरला-उशीर झाल्यामुळें फसला,

ओलावणी-शांति.

ओलिवटा-येण्याजाण्याचा मार्ग.

ओवंडति-घडघडतात.

ओवरां-खोलींत, वोवरींत.

ओसंडूनि-सोडून, टाकून.

ओसणतां-वरळतां.

ओसाणें-केर, कसपट.

ओहिरी-खोली.

## क.

ककारांत-सुषुम्ना.

कटारे-शस्त्रविशेष.

कडवसा-कांहीं आधार, प्रडसावली.

कडसणी-कढ, मंथन, कसणें, सावध करणें, विचार करणें, यथाक्रम उच्चारणें.

कडसावें-परीक्षावें.

कडेलग-शेवटाजवळ

कडौनि-कडून.

कणव-दया.

कपोलें-गालानें.

कऱ्हें-उंट.

करांडी-कुरतुडी.

कल्पिति-मायारूप, मानींव.

कलिया-वळ.

कव्हणी-कोणी.

कव्हाल-कवच.

कविलासु-कैलास.

कस-परीक्षा.

कसु-सामर्थ्य, बळ, परीक्षा.

कलभा-झगडा.

काचें-कचें.

काचेयां-कच्चा लोकांस.

काज-काय!

कांटाले-तराजू, रोमांच.

काढ-वेगानें वहाणारे.
काढत-धावत, लावित.
कांतले-झुंपिले.
कांबि-तिरकामट्याची कांब.
काभिजे-इच्छावें.
कालवखें-काळोख, अप्रकाश, आ-
लस्य.
कालासला, कळासति-बांधिला, न्या-
हाळिला.
कालौनियां-विचारणा करून.
कासी-वाराणसी.
काह्या-कसा.
क्रान्तदर्शी-ज्ञानी.
कीजतासि-केला जात आहेस.
कीड-हीण, वाईट.
कीडरु-सर्प.
कीडाल-खोटें, फटकळ.
कीरु-खरें पाहिलें तर.
कुडें-खोटें, लटकें, फटकाळ.
कुरुठा-शहाणा, गांव्याळ, खजाना.
कुरौंडी-ओंवाळणी.
कुलकेणी-कुशलता.
कुलवाडी-संतति, रयतावा.
कुलैवा-कुलदीपक
कुवाड-दुर्घट.
कुवांसा-आश्रय, साहाय्य.
कुहां-कूप, विहीर
कूटि-निंदा, अपवाद.
कृदांतु-यमधर्म, मृत्यु.

कें-कोठें.
केणी-प्रकार वस्तु.
केणें-वस्त्राच्या घडीभोंवती बांधलेली
दोरी
केती-किती.
केरु-नाश
केव्हांलि-कोणत्या वेळीं ही.
कोठली-कुजकी घाण.
कोंडा-भूस.
कोंडणी-कोंडून टाकणें.
कोडें-सहज, कौतुक, प्रीति, संकट.
कोंढ-गावकुसूं.
कोंधाटें-व्यापे, भरे.
कोलु-हटी.
कोल्हैरी-शाला, मंडप.
कोवलिक-कोंवळेपणा.

## ख

खडुलें-गढूळ पाणी, गाळ.
खरपें-रुक्षपणा, कठिणपणा, नीरस-
पणा.
खराटे-फांका, अप्राप्ति.
खलन-स्खलन.
खवलें-खपली.
खपणेंयाचा-नग्न, नागा, बौद्ध.
खांखांते-कर्कश.
खांचे-दमें, श्रम पावे.
खाजें-खाद्य.
खाल-कातडी, साल.

खालतिले-खालच्या, अधोभागीच्या.
खिरडला-मागें सरला, हटला.
खीचु-खिचडी,
खेओ-बरोबर, समवेत.
खेलतां-लीलेनें.
खेवणिलें-कोंदिलें.
खेवणें-कोंदण.
खेवां-बरोबर, समवेत.
खोंकरें-फुटकें
खोटि-गोळा, आंटीव सोनें.
खोले-वस्त्राची खोळ.

## ग

गगनखलिचें-आकाशाच्या क्षेत्रांत वावरणारें.
गजघंटा-गजसमुदाय.
गडदे-अंधकार, निबिड.
गंधिकालिक-काळा मळ.
गमिजे-मिळविलें जातें.
ग्रंथुगरुवतिचा-ग्रंथगौरवाचा.
गवसणि-पिशवी.
गवे-सांपडे
गहीरु-गंभीर.
गाज्याबज्य-गजबज.
गाढिका-दृढता.
गावाई-विनोद.
गिवसावा-शोधावा, आच्छादावा.
गुतकुलिया-गुदगुल्या.
गुंपौनि-गुंतून.
गैसासै-नेणतेपणें.
गोखां-मध्यवर्त्ती लोकांस.
गोरि-व्याध, पारधी.
गोसांविं-धन्यानीं.
गोसांवीं-धनी.
गौल्य-माधुर्य.
गहिंसासा-निवांत असा.

## घ

घणवट-परिपूर्ण, भारी.
घरडहुली-घरझाडा.
घराणीं-विरटीं.
घली-काढी.
घसणी-घसट.
घाउस-ग्रहण करण्यास उत्सुक.
घांघवसितां-शोधितां ( frequentative of गवसणें. )
घातेचिये-संकटाचे.
घापत-सांपडत.
घारले-प्याले, खारट, व्यापिले.
घेतें-अंतःकरण.
घेपे-घेतलें जातें, घेइजे.
घोकरि-चटकन्.
घोवे-घोघो करीत जाणारे पाण्याचे लोट, जलद जाणारें.

## च

चटवंच-चटका व फसगत.
चडत-चढत.

चढावा—उत्कर्ष.
चलिया—क्षोभ, चांचल्य.
चवक—वचक, भय.
चवरें—शेवट, चामर, अंगण.
चांग—चांगले.
चांचोड—चोंच.
चाडे—श्रीं पेरावयाचें यंत्र.
चीरा पडे—नाश होई.
चुभळूनि—बुचकळून.
चुलकिं—मस्तकीं.
चेइरें—जागृति.
चेउनिया—जागृत होऊन.
चेंति—जागे होत.
चेंपणें—पुट घालणें.
चोजें—कौतुक, आवड, नवल.
चोंढा—गर्त्ता, विवर.
चोपि—घडी.
चोबारा—चवाठा.
चोहट, चौहटां—चवाठा.
चौपाहारी—चार प्रहर.
चौफेरि—चोहों बाजूनें.

## ज

जन्मौनि—जन्मापासून.
जमाधरि—यमावर.
जरंगा—जाळें.
जलसेन—जलशयन, महाविष्णु.
जवनीक—पडदा.
जवला—संनिध.
जवळिक—सान्निध्य.
जाकळूनि—व्यापून, ग्रासून.
जागेश्वरा—यागेश्वर, यज्ञेश्वर.
जाड—पचंग, बळ, थोर.
जाणतेन—ज्ञानी जो त्याणें.
जांपाणि जांपाणीं—लपतछपत.
जालीलीया—जाळल्या.
जियालें—जिणें.
जिव्हार—जीवनकला, मर्म.
जीणिजे—जिंकावें.
जींताणें—वाचणें, कुरवंडी.
जींति, जींथि—जीवन.
जींपे—जिंकवे.
जुतीस्वरूप—उक्तिरूप.
जूंतलेयां—जुंपलेल्यांना.
जें—यत्, यस्मात्, ज्या अर्थी.
जेउति—जितकी.
जेहाचें—ज्याचें.
जैं—जेव्हां.
जैत—जय.
जोगे—पोषक, समर्थक.
जोजारु—दुःख, कष्ट, संकट.
जौहर—अग्नि, विवर.

## झ

झकवलपणें—फसवणुकीनें.
झनें—नकारार्थी, निश्चयार्थी, कादा-
चित्कत्वार्थी.
झांक—उडी.

झाकरी—झटकर.
झांकवति—फसवितात, ठकवितात.
झांकोले—आच्छादितहोई.
झांटी—गर्दी, फळी, समुदाय, झाडी,
झावळें—अस्पष्ट, ना उजेड ना अंधार.
झांपकणे—फसलें जाणें, फसणें.
झुलुआ—झोके.
झोलु—पदर, मिथ्या, असार.

## ट

टकति—सुटतात.
टाकी—पावे, येई, प्राप्त होई.
टांक—टसे.
टांचें—लहान.
टिटियांतु—पायांच्या तिकटांत.
टीविला—चर्मवाद्यविशेष.

## ठ

ठक—तटस्थ, तिऱ्हाईत.
ठाउनि—आसनावरून, स्थानावरून.
ठाणा दिवी—दिवली ठेवण्याची बैठक.
ठावावेऱ्हीं—हा काळपर्यंत.
ठी—स्थिति.

## ड

डंसु—दंश.
डहुलतें—घुसळतें.

डाखले—दंश करण्याचे दांत.
डालें—फुलेंफळें घालावयाची पाटी.
डावली—दूर करी, परिहरी.
डावा—दूर.
डोंड—मोठे चिरे.
डौंडी—दवंडी, डांगोरा.
डौरां—गोंधळ्याचें वाद्य, उपहास
डौंले—डोहाळे.

## ढ

ढवललें—शुभ्र झालें.
ढाली—हालवी, घाली.
ढिसाल—थोर.
ढेंढें—सूप.
ढोंढी—वाटोळा आकार, फुगारा
ढंकु—कोटाची भिंत.

## त

तंडों—भांडों.
तण्हरे—गवताची झोपडी.
त्राय—सत्ता, रक्षण, ठाव.
त्राये—रक्षण, आश्रय, बळ, सत्ता, ठाव.
त्रिमालिकें—तीन मजली.
त्रैधातुक—वातपित्तकफत्व.
तळगे—पिलीं.
तल्हातिचेनि—तळहातच्या.
तव—मुळें, कारणें.

तवकें—धैर्य.
ताउवा—उघड, प्रकाशित.
तागा—नाव ढकलावयाचा वेळू, आधार.
तातलें—तापलें.
तास—नांगरचची रेघ.
तीमे—भिजे.
तुगुटी—त्रिकुटी, ज्ञातृज्ञानज्ञेयादि-प्रपंचरचना.
तुलिगासवें—प्रतिध्वनीबरोबर.
तुषान्न—कोंड्याचें अन्न.
तुहतें— तुला.
तूक, तूंक—महत्व, वजन, हीण.
तूकलें—वजन केलें, सारखें झालें, डोललें, हालविलें.
तेउती—तितकी.
तेया—त्या.
तेसणा—त्याप्रकारचा.
तैसा—तसा.
तोंडागलें—मुखर.

## थ

थाउं—ठिकाण, तळ.
थाटी—झाडी.
थाया—मोह.
थारे—स्थिर होई.
थावली—स्थिर झाली, बळावली.
थावें—बळ, उथळ, आश्रय, प्रांत.
थिनलें—छिन्न होणें.
थीतें—स्थित, सुस्थित, स्थिर.
थीलरातें—डबक्यास, पल्वलास.
थेंकुलें—थोडें.
थोकडें—थोडकें.

## द

दटिजे—श्रमावें, दमावें, संकोच-पावावें.
दरकुटें—पर्वत तट.
दलवाडें—समुदाय, घनवट, मोठा दगड, आकार.
दलवैपणाचा—सेनापतित्वाचा.
दांग—वन.
दाघु—दाह.
दांडेवारें—काठीनें.
दादुला—पति, धनी, थोर पुरुष.
दायाद—दाईज.
दारवठेकारु—उंबरठा झिझविणारा.
दासट—दाहक, नाशक, पीडक.
दियां—दिवसां.
दिहबलें—उजेडाच्या साहाय्यानें.
दिहा, हें—दिवसां.
दिहेंदीसें—दिवसेंदिवस.
दी—दिवस.
दीठे—दृष्ट, अनुभूत.
दुपाउली—दोन पावलांत.
दुबला—दुर्बल.

दुर्भर–भरण्यास कठिण.
दुराशे–दुराशेनें.
दुरिकें–लांब.
दुवाडपण–दुस्तरत्व.
दूण-दुपटी.
देखी–रीति, दीक्षा, दंडक.
देवढे–तिढे, वक्र.

## ध

धटे-निश्चयाने.
धडसा–धड असा, अव्यंग असा.
धडेयावरि–हातोळ्यावर (हातोळा=हस्तावलि)
धडौता-सांग.
धणि–पूर्ति, इच्छा.
धवड–मोठा दगड (धावड=कठिण लोखंडाच्या दगडावर काम करणारा.)
ध्वनित–व्यंगोक्ति, सूचना.
ध्वनिते–व्यंगोक्तीनें, सूचनेनें.
धसाल–स्थूलदृष्टीचा, अविचाराचा.
धाकडांसि–वळकट, धीट.
धायेपण–दायीचें काम, संगोपन.
धारणीं–इच्छा, खांव.
धारसे–मध्यप्रवाह.
धावेया–हांकेसरसें.
धीटीवं–धीटपणा.
धूरे–अग्रभागीं.
धोंधा, दा–वर्षाव.
धोरणु–धोपटमार्ग.

## न

नडनाचें–नटाच्या नाचण्यानें.
नवानिसितिं–नव्यानें पाजळलेल्या तीक्ष्ण.
नव्हाली–तकतकी, नवाई.
न्यसावी–ठेवावी, घालावी.
नां–नकारर्थी अथवा, नाथवा.
नाइकें–कान न देई.
नाखि–टांकी.
नागर–राजस, चतुर, नगरवासी, लिपिविशेष.
नागरपणें–संभावितपणें, चातुर्यानें.
नांगवे–न सांपडे.
नाडले–आढळेना.
नाथिलि–नसली.
नादिचे–श्रवण सुखाचे.
नाना–अथवा.
नापूवे–न बुडे.
नांभरि–क्षणभर.
नाराणुक–असमाधान.
नाव, वं–क्षण (?)
नावांनावां–क्षणक्षणां.
नावेक–क्षणैक.
नाशिली–नष्ट.
निगदु–शपथ.
निचाड–निष्काम, चाड नाहीं असा.

निजाचा-मनाचा, आत्मस्वरूपाचा.
निडलीं-कपाळीं.
निडार-एकदशा, समता.
निफनलिं-निष्पन्न झालीं.
निमथा-माथा.
नियता-नियमनशील पुरुषांनीं.
निर्गुडु-जेथें उचनीच दगडधोंड नाहींत असा.
निरतां-निरतिवान्, मग्न.
निर्लाग-निराश्रय, लाग नाहीं जेथें.
निरविडी-निश्चयानें अनुरूप.
निरालीं-अंतराळीं.
निराश-आशारहित पुरुष.
निरोललें-व्यवस्थित रचना केले गेले, निर्मळ केले गेले.
निरोलिलिये-निर्मळ केले गेलेल्या.
निरुता-निश्चयानें, खरा.
निलेयाचा-इंद्रनीळरत्नाचा.
निवाडु-निर्णय, भेद.
निशाण-नगारा.
निष्ठा-स्थिती, श्रद्धा.
निषण्ण-शांत बसलेले, निवांत, निश्चल स्थिर.
निस्तरैल-तरून जाईल.
निसिं-तीक्ष्ण.
निसुगै-निर्लज्जपणा.
निहिटिला-दडपिला, जडला.
नीक, का, केनी-चांगलें, खरें, बरें, हिताचें.
नीकें-खरें, चांगलें.
नीगिलें-नेले, मेळविले.
नीरु ताउनि-पाणी स्पष्ट तपासून.
नुभगिजे-दमूं भागूं नये, त्रासूं नये.
नेदखति-पाहत नाहींत.
नेवाणें-तिरस्काराचें पात्र.
नैए-येत नाहीं.
नैयंतां-न येतां.
नैयेइल-न येईल.
नोंकिलीं-निंदिलीं, चुकविलीं, लपविलीं
नोडवेचि-पुढें न करणें, पुढें न येणें, प्राप्त न होणें, न ओढवे.

## प

पडप-प्रतिष्ठा, महत्व, शृंगार.
पडिभरें-आधिक्य, भर, अतिशय.
पडिसादा-प्रतिध्वनि.
पडिहासे-भासे, प्रतिभासे.
पढियंता-आवडता.
पढियें-प्रीतिपात्र.
पतिकरु-रचिलें ! संजोगिलें, अंगीकार
पन्नासिलें-रचिलें, संजोगिलें.
पन्हरें-पुतळीचें सोनें.
परउतें-पलीकडे, वेगळें.
परगुणें-पक्कान्न.
परमार्थ-महतत्त्व.
परवाली-प्रक्षाळलेले, धुतलेले, स्वच्छ
पऱ्हौतीं, पऱ्हौतें-पलीकडें.

परावा-परकी.
परि-प्रकार, रीति.
परिसावेया-ऐकण्यास.
परिहसें, परिहसैं, परियसें-लीलेनें, विनोदानें.
परिहसैं-विनोदानें किंवा लिलेनें बोल शील तर,
परौता-दुसरा, वेगळा, पलीकडे.
पलति-दूर जातात, पळतात.
पल्हातां-विस्तारानें विवेचन करतां.
पलिपे-पेटे.
पलिपलीं-पेटलीं.
पवडला-प्रवेशला.
पवले-प्रकर्षानें वळतो, जातो.
पव्हणा-पोहण्याजोग्या पाण्याचा डोह.
प्रतिपदी-विवेचन करी.
प्रतिस्फलें-उलट फलद्रूप होतें, परत उत्पन्न होतें.
प्रभवे-सामर्थ्य असतें.
प्लव-ताप, नौका.
पाइं-पाही, अवलोकी.
पाइकु, पाइक-सेवक, पदाति.
पाउखौनिया-फिरवून.
पाउटीं-पायरीनें.
पाउडु-दक्षणा, पैसासुपारी.
पाउसीं-प्रावट्कालीं.
पाएं-पायानें.
पाएरवें-वरदळीनें.
पाखर-आश्रय,
पांगु-गरज, अपेक्षा, ओशाळगत, हीनत्व, पराधीनत्व, एकदेशित्व, दुर्लभत्व, राबणें.
पांगुतलीसे-आच्छादिली असे.
पांगूळ-पंगु, व्यंगावयव.
पांचवनेया-पंचवन्हींच्या समुदायाच्या.
पांचाखरी-पंचाक्षरी, मांत्रिक.
पांजरा-प्रतिबंध.
पांजला-व्यापला.
पाझडीं-दाट झुडपें.
पाटा-आडपडदा.
पाटाऊ-वस्त्र.
पाटु-पट्टा.
पाड, पाडु-साम्य, योग्यता, वेगळेपण, मान, किंमत.
पाडि-डोंगर, टेंकाड.
पाणिवलें-पाण्यातील केरकचरा.
पांत-पावत.
पातलें-प्राप्त झालें.
पांतां-पाहातां.
पानियेडें-तळें, जळपात्र.
पांपरा-लाथ.
पायली-तुच्छ, नश्वर.
पायळू-पायाकडून उपजलेला, पायाळु
पारुखति-न राहती, न घडती, बंद होती, रुसती.
पालवे-पदर.
पाल्हाळु-विस्तार, गावाळ, पाझर.
पालिंगणें-पंक्ति.

पालूविला-परजिला.
पावी-पाहावी, अवलोकावी.
पासवणें-फांस, बंधन.
पासिक-फांस.
पाहला-पातला, आला.
पाहांती-प्रकाश पावणारी,
पाहारु-प्रहर.
पाहाले-उजाडलें, प्रातःकाळ.
पाहिचा-उदयिकचा.
पाहूती-पायरी.
प्राकृतीं-अनधिकाऱ्यांनीं.
प्रांजल-सुगम, सोपें.
पींशि-पितात.
पुडुति-पुनः.
पुढिल, पुढैल-जवळचा, दुसरा.
पुणु-पुनः, पण, परंतु.
पुरुता-पुर्ता, पूर्ण.
पूंसा-पक्षी, पोपट.
पेंठा-आडरस्ता.
पेणा-मुक्काम, टप्पा, मजल.
पेलावा-ढकलावा, प्रेरावा.
पेलिला, पेलुनि-ढकलिला, ढकलून.
पैकु-समुदाय.
पैंज-प्रतिज्ञा ( पइज्जा. )
पैयारें-पाहिरी.
पैसारु-मार्ग, ( पादसार. )
पैसु, सें-मार्ग.
पोखलें-पोषलें.
पोटळूनियां-पोटाशीं धरून.
पोतासाची-भीमसेनी कापूर.
पौलि-प्रकार, सभोंवतालील भिंत.

## फ

फटिकु-स्फटिक.
फली-समुदाय, रांग, पक्ष.
फाडेवरि-वेगळे करीपर्यंत
फावले-प्राप्त झालें.
फावा-प्राप्ती, लाभ.
फुडें-खरें, बरें, स्पष्ट.
फूटति-स्पष्ट, घड.
फूटावें-दूर व्हावें.
फूटी-विकास, प्रकटता.
फेडणें-घालवणें, नाहींसा करणें, पुसणें, सोडणें.

## ब

बग-मार्ग, योग, देखावा, संबंध.
बनकरु-माळी.
बरटेनि-चिखलानें.
बरडी-माळजमीन.
बरल-भ्रांत, अस्वस्थ, एकाचें एक बोलणार, दुर्मार्गप्रवृत्त.
बरवते-चांगलें.
बरवा-चांगला.
बलियावीलें-बळकट केले.
बहुते ( येकु )-फार, पुष्कळ.
बांधे-आकार.

बापु-वडिल, मान्य, संन्मान्य.
बापिकें-वडिलार्जित.
बाबुली-शेवाळ, गोंडाळ.
बाहाकातें-फाकणारीं.
बाहुडे, बहुडे-जाई, पाठवी, निरोप देई.
बाहिरसवडिआ-बहिरोष्टानें, स्पष्टपणानें.
बिरिदांचे-बाणेदार, प्रतिज्ञावंत, थोर
बिवडु-बीजपोषक जमीन.
बीक-आधिक्य, आवड, शोभा, बडिवार.
बुडडा-बुडबुडा.
बूंथि, बुंथी-बुरखा, आच्छादन.
बेगें-खिडकी.
बेठा-बसलेला
बेंथु-दांडगा.
बैसणें-आसन.
बोधला-ज्ञानसंपन्न, कळला.
बोंबलें-लिंपले, सारवले.
बोबांतां-हाक मारतां, पुकारतां.
बोलावें-वक्तव्य.
बोलती-बोलणारी, अभिप्राय स्पष्ट करणारी
बोलिजत-बोलिलें जात.
बोहिलीं-भस्म केलीं.
बौहसपणें, बौहस-फार, अत्यंत.
बौहे-फार, पुष्कळ.

भ

भडसे-पूर, महत्व, लोट, आधिक्य.
भंगी-रीति, प्रकार.
भरवसेनि-भरवश्यानें.
भरितु-पूर्ण, भरलेला.
भरें-पूर्ण, अशयित.
भले-श्वेतसे, चांगले.
भ्रमातुकातें-गरगर फिरणारे.
भांगार-सोनें.
भांजे-भग्न होई, तुटे.
भाडिचा-बीभत्स व्यवहार व भाषण करणाऱ्या स्त्रीशीं व्यवहार ठेवणारा.
भाणें-ताट, पात्र.
भातें-मजूरी, पोटगी.
भांभ, भा-भ्रांति, शोभा, सौंदर्य.
भारणी-वशीकरण.
भांसललें-भ्रंशलेलें.
भितिल-भितील.
भुरुहिं-वनस्पति.
भूतला-झालेला, अनुभवलेला.
भूतखिचा-भूतरूप खिचडी.
भूवंग-सर्प.
भोंकसा-सगळें चर्म, मृत जनावराचें गवत वगैरे भरून ठेवलेलें सबंद कातडे.
भोंज-संतोष, महत्त्व, सोंग, स्वेच्छा, कौतुक,

म

मगावासि-शोध केला जावास.
मऱ्हाटा-उघडा, प्राकृत, सुगम, मराठी भाषेंतील, भाषेनें.

मवलां-मोजक्या.
मवावा-मोजावा.
महाकाव्यारा७-महाकाव्यांचा राजा.
महारिखीचें-महर्षीचें.
महुर-मधुर.
ह्मणिपती-ह्मटले जातात, ह्मणवितात.
ह्मणियागत-आज्ञाधारक.
मांगल-मंगळ, पवित्र.
मागीलकी-पूर्वीची.
मांजवण-कैफाचे पदार्थ.
मांजिठे-तांबडें वस्त्र.
माजिवटा-मध्यें.
माझारि-मध्यें.
माझिवडे-मध्यें, मध्यवाटेंत.
मांट-फिर्र, निबिड.
माथुला--लहान रवि.
मांदल-वाद्यविशेष.
मांदोडा-फळांचा घड, बाहुल्य.
माधवी-वसंत.
मानेयाचे-अहंतावान पुरुषाचे.
मालें-राव, काकवी.
माल्हवे-विझे.
मासिं-मजशीं.
माह्येर-मायघर.
मिरवणियां-मिरविलेलीं रूपें.
मिळणीसमें-संयोगाबरोबर, प्राप्तिबरो-
बर.
मीति-गणनां.
मीनले-मिळाला, भेटले, एकत्र झाले.

मुगतु-मुक्त.
मुगुतें-सायुज्य.
मुळीं-तळवटीं.
मेकली-घट्ट बांधलेली.
मेघौडें-लहान मेघ.
मेरे-मर्यादेस.
मेल्हावणें-संयोग.
मेहुडें-लहान मेघ.
मैले-योगानें, प्राप्तीनें.
मोगर-निवडक लोक.
मोटका-थोडकें, इवलेसें.
मोडौनियेणें-भरानें येणें,मोडून येणें.
मोहरे-सन्मार्गी.
मोहलले-भ्रांत झाले.
मोहोर-सन्मार्ग, दिशा, अभिमुखता.
मोआलें-मवाळ, नरम.

## य

यकवंकी-एकाकार.
यज्ञभावितीं-यज्ञानें पूजिलेल्या.
यंत्रवराचि मार-गोलंदाज.
येकोळ-येकवेळ.
येतुलां इतका, एवढा.
योगानिक--योगाग्नि ज्यानें ठेवला तो.

## र

रंगाथिलें-रंगविलेलें.
रमानाहें-रमानाथानें.

रलीं-विनोदानें.
रसवृत्ति-शृंगारादिरसांची प्रकटता.
रसोयें-पाक.
रहवरु-रथश्रेष्ठ.
राउवें-पोपट.
राउनि-निश्चल करून, स्थिर करून, स्तब्ध करून, एकान्त करून.
राउलीं-राजवाड्यांत, महालांत.
राजवटा-राजमार्ग.
राणिव-राजपण.
राभस्य-त्वरा, सामर्थ्य, बलात्कार.
राल-आसक्ति.
रावित-रंगवीत, रांपवीत.
रासौभा-पखलण.
राहांत-स्तब्धता, लोप.
राहांतें-स्तब्धता.
ऱ्हाय-राही.
रितु-ऋतूंच्या.
रितुपति-वसंत.
रूढ-प्रसिद्ध, लोकमान्य.
रेखा-काव्य रचना, अक्षरपंक्ति.
रेवले-बुजालें, सांचलें, रुतलें.
रेवा-रुतण्याजोगी मऊ वाळू.
रोसें-राग, क्रोध.

## ल

लंहिदवडी-लगबग, गडबड.
लाग-संबंध.
लागणेयां-लागट करणारा जो तो लागणा, त्याला.

लागु-संबंध.
लाटीं-वीचि.
लाठेपण—बलिष्ठता.
लाणि—प्राप्ति, गोळा करणें, मर्यादा.
लादु—लभ्य.
लांबा—पर्जन्य पडून भातगोट्याचें दुसऱ्यांदा उगवणारें रोप.
लाहा—अतिशयित इच्छा.
लिंगभेदु—शिष्यत्वादिचिन्हनाश.
लिंगु—चिन्ह, दैवत, लक्षण, मर्यादाचिन्ह:
लूसिली—खुडली, मोडली.
लेख—गणना, आकार.
लेप—दोष, मळ, चित्र, वर्णलेप.
लेवां—बरे रीतीनें.
लो—लय.

## व

वंगु—कलंक, डाग.
वचिजे—जावें.
वज्रयोगें—हठयोग.
वडपें—वृष्टि.
वणवला—वणव्यानें व्यापिला.
वणिजे—उदिमास.
वणेसाठीं—व्यापाराकरतां, उदिमाकरितां.
वरगण—वांटणी.
वरचिलि, वरिचील—वरकड, वरील.
वरपडा, वरिपडा—स्वाधीन, प्रडता.

वरिवें—शोभा, उत्कृष्टपणा.
वरिवावें—वर जावें, उलट जावें, चढून जावें.
वर्षु—पाऊस, वृष्टि.
वलघलेयां—उल्लंघल्यास.
वसें—वशें.
वसैठ—वासस्थिति, वासस्थान.
वसैठा—वासस्थानक.
वहिला—सत्वर.
वहिवटीं—शेतें वाहणाऱ्यां लोकांच्या नावाचा पट्ट ह्मणजे याद.
वाइलें—वाहिलें, पेरिलें.
वाउनि—वाहून.
वाउर—वाईट.
वाउलीं—व्यर्थपणें, रिकामा.
वाखारी—वखार.
वाखोरां—हृदयरूप कपाटांत, छातीच्या कपाटांत.
वागारे—घोड्याचे दोर.
वागुर, वागूर—जाळें.
वांझौलें—वांझ फुलें.
वाटवंधे—वाटमार.
वाटवधेया—वाट मारणारातें.
वांठिवांविण—पुरुषार्थाविण.
वाणि—कमताई, वाचा.
वाणिये—प्रकारें, तऱ्हेनें.
वांत—वाहत.
वानिया—प्रकार, इयत्ता.
वानिवस—स्वेच्छा, कौतुक, दैवगती, मध्यगृह.
वानी—पर्ण, कस, सारखें.
वापसा—बीं पेरावयाचा समय.
वायकांडें—व्यर्थ बाण.
वायाणें, णी—व्यर्थ, निष्फळ.
वारिक—घोडे.
वारुक—घोडे.
वारुनि—सांगून, बजावून, निवडून, घालवून.
वालभाचें—प्रेम, आवड.
वालीप—गंवसणी.
वावटे—विश्रांति पावे.
वाव्टेलें—विश्रांत.
वावडी—दुर्घट, कठिण, घातक.
वाविं—चार हातांनीं.
वास—वाट.
वासिपे, पु—भय पावे, नाश पावे.
वाहर—पीडा, वोहे, कास.
वाहातवणा—मार्गस्थ.
वाहो—कृषिकर्म.
व्याजें—निमित्त, रूप.
विकडी—चातुर्य.
विकरविला—विकार पावविला.
विकरे—क्षोभे.
विखें—विषयीं.
विखोंचे—भोंसकलें जाई.
विचंवे—श्रमे, कष्टे, उपद्रवे.
विणवणि—विणकर.

विंदाणें—निग्रह, कौतुक, दगाबाजी, येणें.
विनट—रंग, चिन्ह, खेळगडी.
विपाइलेया—एखादा, विरळा.
विपायें—कदाचित्, प्रसंगें.
विरगतां—विरक्तां.
विरजा—सहाय, व्यापक, दुसरा.
विरजेयाचेनि--सहायकर्त्याच्यानें.
विरुं--विरोध.
विरुढि—अंकुर, पालवी.
विलग--उपद्रव.
विवळलें—प्रभात जालें, प्रकाशित झालें.
विवसी—पिशाची, डांकीण, त्रास.
विशेषिति—विशेष वर्णन करतात.
विश्वे--सर्वतोपरी.
विषैं--विषयीं.
विस--असंभाव्य गोष्ट, विषम गोष्ट.
विसकुसे--विषमत्वें, वैषम्यानें, दुःखानें, गोंधळून.
विसणैले--वोसणेले, विषाद पावलेले.
विसंभति--सोडिती, मोकळिती.
विसंवादु--विरोध, भिन्नपणा.
विसुरा, रें--विस्मय, भ्रम, स्वरूप, चित्र.
विहिला--नियमिला, सांगितला.
वीकेति--विकति.
वीजे--उत्पन्न होतो, निष्पन्न होतो.
वीपे--जाय.
वेखासें--श्रम, वाईट, व्यर्थ.
वेधवतियें--पृथ्वीला.
वेऱ्हीं, रि, ऱ्ही--पर्यंत.
वेल--काळ, विलंब, समय.
वेल्हाल--विलासी, विस्तृत.
वेल्हावणें--भोग घेणें, विस्तरणें.
वेसजें—कम
वेसन--जनावराच्या नाकांत घालतात दोरी ती, श्रोतृव्याख्यातृसंबंध, आसक्ति.
वैल्हे--सत्वर
वोज, वौजें-- चांगलें, प्रकार.
वोडण-- ढाल
वोतपली--कोंवळे ऊन, दीप्ति.
वोलिंबा--उभय, वाळवी
वोंवरा--खोलींत
वोहटावाहिला--मौन्य धरिलें

## श

शयानु--निजलेला.
श्रद्धासूं--श्रद्धावंतांनीं.
शास्ति—नियमन, शास्त्र.
श्रावली--संतृत.
शिखराश्रिलेयां--सानुमंत, पर्वत.
श्रिष्टि—सृष्टि.
श्येया—शंभरास.

## ष

षडा—खडा.

षडाडितां—खडाडिता.
षूणे—खुणें.

## स

सकतीसवें-शक्तीबरोबर.
संकुल-व्याप्त, गर्द.
सकें-डाकलग.
संघे-जोडी, लावी.
संचकाची-चिक्कु, कृपण.
संजात-सार्थक.
सडिया आइती-केवळ देहमात्र सामग्रीनें.
सडेआ-एकट्याला, केवळ.
सणाणे-तीक्ष्ण.
सदमुखपण-सन्मुखता.
संदु-छंद.
सधर-बळकट, समर्थ.
सपिलें-समग्र दूध पिणारीं वत्सें.
सपुर-संपूर्ण, भरपूर.
सम-अविषम.
समस्या-शंका.
समात-समावत.
संयती-इंद्रिय नियमन.
सर-शर, बाण.
सरतें-ग्राह्य, मान्य, संपता.
सरली-मोकळीक.
सरलें—संपलें.
सरिपाडु—सोंगट्या.
सरिसे--सारखे, व्यापक.
सरौनि—संपून.
सली--छळी, क्षोभी.
संवचोर, संवियां—सगतीचा चोर, सोबतीचा चोर.
सवडी--ओठ.
सवंतारेनि—स्थिर आश्रयानें, ध्रुव जाग्याच्या आश्रयानें.
संवरे---सांवरतां येई, आटोपे.
संवसारा--पसारा, विस्तार, अनुसरणें, लाभ, दर्शनयोग्य.
सवा--बरोबर, समवेत, सह.
संवादियें--प्रश्नोत्तर करणारा.
सवियां--स्वतः
संहारवाहारे--संहाररूप उत्पात.
स्वसुखिचेनि--आत्मसुखाच्या ठायीं असणाऱ्या.
साइ-साहीं.
साइखेडेनि-सुत्रबाहुलीनें.
साउनि-सहन करून.
सांकडा-कठिण, संकटमय.
साकडु-कठिण.
साकें-डाकलग.
सांघडे-आचरण्यास सारखे.
सांचलु-चाहूल, जाग.
साचोकारें-यथार्थत्वें.
साजणें-सख्य, सज्ज होणें.
सांटपा-साठवण, ब्रह्म.
सांटोवा-संग्रह.
साटोवाटी—अदलाबदल.
सांडले--सुटले.

सांता--अस् धातुचें वर्तमानकालवाचक पुल्लिंगी एकवचन.
सांते--अस् धातुचें वर्तमानकालवाचक धातुसाधित अनेकवचन संतः, त्याचें मराठी सांते (पु. अ.)
साद--शब्द.
सांदुकला-पेटला.
साधिति-मारिति, सिद्धीस नेणें, अनुकूल करणें.
सांधुक्षणें-पेटणें.
साना-लहान.
सान्हाउ-कवच, चिलखत.
सानीव-लहानपण.
सांपडे-संपात होतो, गोंधळ होतो.
सांपें, पु-सांप्रत.
सांपेचा-सांप्रतचा.
साबरें-अंगण.
साबेरी-सावरीचें झाड.
सामधेनिआ-समधातपणें.
सामान्यत्वें-नीचपणानें.
सारिखे-योग्य.
सावाइं-मदतीच्याकामीं, स्वेच्छेनें.
सावाऊं, ओ-सहाय, वृद्धि.
साव्हाउ-सहाय, उत्तेजक.
साव्हिआं, साविंयां-बरोबर, समवेत, तत्काळ.
सावेसा--स्वेच्छा, अभिलाष.
सांसिनले-विस्तारले, भरले, साजे, जाहाले.
साहाजें-लिलीनें.
स्वाराज्य-स्वराज्याचा भाव.
सिकिलेयां--भिजविण्यांत, सिंचण्यांत
सिघ, सीघ--शेंडा, अग्रभाग.
सिठी--सृष्टि.
सिंपे--लिप्त होई.
सिरे, रें--क्षरे, खरें, कमी होई.
सिंविजे--स्पर्शिजे.
सिहाणें--शिक्षाज्ञ, शहाणें, सुज्ञ.
सियाणी--प्राप्ति, लब्धि.
सीग--शेंडा.
सीतले--शिवला.
सील--उद्युक्त.
सुअणी--मजली, टप्पे.
सुकतेया--सुकणाऱ्या.
सुखाडले--सुख जाले.
सुखाडें--आनंदलेल्या.
सुडसु--मर्मज्ञ.
सुडावणी--एकाकारता.
सुंदु--सुवासिक.
सुभति--पडल्ये, घातली जाते.
सुमथितु--चांगला घुसळलेला.
सुयाण--सुकाळ, घालणें.
सुये--घाली.
सुरसाह्यें--देवांच्या साहाय्याच्या कामीं.
सुवट--सुरूप, छानदार, वेश.
सुवण--जन्म.
सुवर्णवाइ--सोनपण.
सुवर्म--मार्मिक.

सुसडा--चांगलें सडीक.
सुहडा--चांगला योद्धा, राजा.
सुहाडा--आनंदयुक्त, मनोरम.
सूची--चिंती.
सूटिका--पडणें, सर.
सूतला--निजला.
सूती--वास करणें.
सूनु--घालून.
सूनि--घालून.
सूषाचें--सुखाचें.
से--स्मृति
सेखामृत--शेषामृत
सेयारी--डाकीण, भय, पिशाची.
सेल--उत्तम वांटा
सेलत--हातानें पाणी तोडीत
सेलवांटा--उत्तम शेलक्या वाटा
सेवडी--चर्म
सेविती--भजणाऱ्यांत
सेस--नवरानवरीस सोयऱ्यांनीं अक्षतां ठेवणें, उरलें.
सैघ--समूह, केवळ
स्थैर्यताअनुजिनी--स्थैर्याची धाकटी बहीण.
सोआंगें--सोंगें
सोंके--दुःख, असंतुष्ट होई.
सोय--स्वरूप, ओळख, मार्ग.
सोरसें--प्रसाद, गोडी, अभिप्राय.
सोसु--शोष, तृष्णा.

### ह

हकरे-टकरा.
हरैला-हरविला, घालविला.
हलुवट-हलकें.
हलुवारणें-हलकें केले, झाले.
हलुवारपण-मार्दव.
हलरु-एकप्रकारचें गाणें, पाळणा हालवितांना गावयाचें गाणें.
हवाव-शोभा, सुखी होणें.
हांगा-अंग, अरे.
हातुकें-तर्क, अदमास.
हातबोने-हातांतले भक्ष्य.
हातासनें-मिषें.
हाथिवेनि-काडवातीनें.
हान-मग, कीं, जें, कांहीं, हा, ही, कदाचित्, का, पा, मा.
हारतला-हरविला.
हालासि-हाणिला गेलास, मारिला गेलास.
ऱ्हातेआतें-राहाणाऱ्यास.
हियें-हृदय.
हीतलें-दूर नेणें, हिरून नेणें.
हींव-हिम.
हुडा-समय, उत्सव, सुकाळ.
हुडे-बुरुज.
हेंकाडु-अडाणी.
हेंट-येथें, खाली.
हेय-निषिद्ध.
हेला-वेळा.
होडा-पैज.
होनि-होऊन.

### क्ष

क्षपिलें-काढून टाकले.
क्षीररें-खिल्लार.
क्षेत्रीं-शेतांत.

# प्राचीन शब्दकोश

ह्या खंडांत ज्ञानेश्वरींतील एकोनएक शद्बांची बृहत्सूचि द्यावयाचा विचार होता. पण ती फारच व्यापक होत असल्यामुळें तो विचार तूर्त तहकूब केला आहे. या ठिकाणीं अध्याय १३ ते १८ यांतील ठळक शद्बांचे अर्थ दिले आहेत. पहिल्या बारा अध्यायांतील शद्ब पहिल्या खंडांत दिलेच आहेत.

### अ.

अगारीं-अग्रीं, अंकुरीं.
अगारे-अग्राच्या अऱ्या, शेंडे, अंकुर.
अडवंतावो-अडथळा.
अडी-रोधी.
अणगटीं-मुळांचे ठायीं, शरीरीं.
अणुआरु-बारीक चुरा.
अतिकरे-उशीरानें.
अतूट-सबंद, बळकट.
अदलपण-झेंपण्याचें असामर्थ्य.
अभिचार-मंत्रप्रयोग.
अनावरातें-जें आवरण्यास कठिण त्यास
अनुघडु-उघाड नसलेला.
अनुपायनी-सहज.
अनुभौ-अनुभव.
अपखडी-निंदा.
अपटांतरी-पडद्याच्या आंत, परोक्ष.
अपवाडु-उमट नसलेला.
अपाडु-अप्रतिबंध.
अबोट-अखंडित लेप.
अभियत्न-जवळ नेणारा प्रयत्न.
अरडांते-आरडणाऱ्याला.
अरुवारें-सुकुमार, मृदु.
अल्हें-लवकर, एकदम.
अलू-लघू, लहान.
अवगलला-ढासळलेला, गाळानें भरलेला.
अवर-अपर, खालचे, कनिष्ट.
अवल्हाॐ-अपलाभ, अनिष्ट लाभ.
अवष्टंभ-ऊर्मि.
अवागमें-अशास्त्रानें.
अवाटु-वाटेची गरज नसलेला, आडमार्गानें जाणारा.
अव्हातें-दुष्ट पक्षानें.
अव्हांत्रिक-भलत्याच्या मालकीचें.
अविनाभावें-व्याप्तीनें.
अवेंगवाणें-अव्यंग.
अव्यंकडी-विसंगतपणा.
असंघाडि-असंघटित.
असंभड-असंबद्ध.
असंवरे-सांवरण्यास कठिण.
असिकें-अशेष, समग्र, सर्व.
अहलि-जमली.
अक्षौणी-सैन्य.

## आ.

आइती-विस्तार, ऐट.

आउख-आयुष्य.

आउतिं-बैलांच्या मेळयांत, नांगराच्या जुवांत.

आकर्णा-ऐका.

आकसाला-पारख.

आखरु-अक्षर.

आंखें-अंकानें.

आंगझील-वरची चकाकी, आंगची साल.

आंगदट-आंगानें दट, बळकट.

आगरा-क्षेत्रास.

आगलिक-आधिक्य.

आगलें-अन्य, भिन्न.

आंगवसें-स्वरूपतः.

आगारी-डिरी.

आगिठां-शेगडीवर.

आंगोपचार-अवयवांचे उपचार.

आग्रया-आग्रहास.

आघाट-भाग.

आटणियां-क्लेश.

आंटि-टु-मिठी, श्रम.

आठुलैजे-घट्ट होइजे, बांधिजे, निबर होइजे.

आडमोडी-प्रतिबंधाचा नाश.

आडवंगी-खीळ.

आडवारा-अटकाव.

आडसो-अडथळा.

आडें-दादरा, अडसर, प्रतिबंध.

आढंच-वर.

आणी-अग्र, टोंक आयणी.

आणोजें-अंकुर.

आते-पावे, होई, प्राप्त होई.

आंतौते-आंतील.

आधघणी-अर्धवट तृप्त, अर्धपोटी.

आंध्य-आंधळेपणा.

आधाइलें-भ्यालें.

आधेलें-अर्ध्या ताटांत जेवणें.

आनाभूती-नाना भूतांच्या रूपानें.

आनु-दुसरा.

आपजलिये-उत्पन्न झालेल्या.

आपैतिया-स्वाधीन.

आंबुखे-शिंतोडे.

आब्रुथे-विपरीत होय.

आबुली-प्रिय पत्नी, स्त्री.

आमुला-प्रिय पती, नवरा.

आयें-आकार, प्रमाण, लाभ.

आर-अंकुर.

आरवसें-अंकुराच्या योगानें.

आरा-अंकुर.

आरौतें-अलीकडील.

आलव-आलाप.

आलावला-बळास आला.

आलिखलें-गोंठलें, घट्ट झालें.

आलोचु-विचार.

आवगु-घोड्याच्या काढाडण्या.

आवगे-स्वीकारला जाई.
आवांके-धैर्य धरी.
आवासु-स्थान.
आविष्कारें-प्राकट्यें, बळें.
आंविसा-आमिषास.
आंविसाले-आमिषाचें स्थान.
आंतु-ऊर्मि, वाचेची निष्ठुरता, प्रतिष्ठा.
आंवुट-साडे तीन.
आवैल-येईल, उगवेल.
आशसेया-आशारूपी डांकीण.
आसतूटिया-निरपेक्षेनें.
आसलग-सोपा, गोड.
आसललें-मंद गतीनें वाहणारें.
आहाच वाहाच-वरवर.
आहाड बाहाड-विस्ताराविस्तार.
आहाण-सर्व.
आहावसुवारे-अद्भुत राजवाडे.

## इ.

इदंतेसि-हें म्हणून बुद्धि तीस.
इटाल-धोंडमार.
इसालु-ईर्ष्यालु, कामुक.

## उ.

उखरा-वालुकामय अरण्य.
उखरेवे-जमलेल्या रेतीच्या ढिगांत.
उखि-ऊहा, अनित्यत्व.
उखिता-एकसरा, आगंतुक.
उखिविखी-उहापोह, होयनव्हे.

उगाणा-झाडा, उपदेश.
उजगरा-जागृती.
उजरि-ऋजुता, विस्तार इ. इ.
उजिरिया-उदय, महत्व, उत्कर्ष.
उजिवडे-प्रकाश.
उटकलें-वेगळें झालें.
उठविजसी-उठवितोस.
उडवा-रचिलेली राशि.
उंडी-ग्रास, बली.
उणखुण-कमी अधीक, कामना.
उणेनि-उण्यानें.
उतान्ही-थान सोडलेलीं बाळें, तृष्णा.
उदले-उधळे, वर येई.
उद्याणी-मांडणी, सांगण, उद्घाटण.
उदावादा-परिपूर्णत्व.
उधि-निर्गम.
उपखे-कमी होई, खर्च होई, नाश पावे
उपखो-कमी होऊं देणें, खर्च करणें.
उपरतविलें-उफराटें फिरविलें.
उपलवणी-दृढीकरण.
उपलाणें-जिनावेगळें घोडें.
उपेगु-उपयोग.
उफकेन-उपेक्षेनें.
उबडे-पालथें, कललेलें.
उभगु-कंटाळा.
उभजे-त्रासे, कंटाळा करी.
उभडु-लोट, झरा.
उभणें-उभारणें, रचना.
उभलिचा-खोकल्याची ढास.

उभाट-उद्भट, विशाल, मोठें.
उमचला-सुटला.
उमचावेया-उगविण्यास.
उमडे-उमटे.
उमप-अमूप, पुष्कळ.
उमसिजैल-सांगितलें जाईल.
उमरुडूनि-मुरडून.
उमार्णी-मोजी.
उमाणें-माप.
उमाहो-पूर.
उमेठा-मेळावा.
उरिणें-ऋणमुक्तता.
उरोधु-अवरोध,प्रतिबंध,आग्रह,भीड.
उलिंग-चाकऱ्या नोकऱ्या,बिगार, वेठ
उलिंगें-वेठ, काम, बिगार.
उवलें-प्रसन्न, शुद्ध.
उवाय-सुख, आनंद.
उवावो-उत्साह, अवकाश.
उवीलु-अतिक्रांत वेळ, सायंकाळ.
उसटिलें-उच्छिष्ट झालेलें.
उससे-प्रकट होय.

## ए.

एकलौते—एक्या लेंकराच्या मायेस.
एकवंके—सारखेपणा.
एकवंकौनिया—समग्र व सरळ करून.
एकावट—एक झालेले.
एकावदी—ऐक्य.
एकाहाथी—एक आहेत.
एकोविये-एखादे.
एटालें-विटाळीं.

## ऐ.

ऐहेरा-अहेर.
ऐहेव-सुवासिनी.

## ॐ.

ॐझीलपणें-भार, वजन.
ॐपासिरा-संबंध.
ॐलगणें-आश्रय, सेवा, रक्षण.
ॐवांडैल-लवेल.

## क.

कटा रे-हाय रे.
कटले-श्रमी झाले.
कडा-बाजूनें.
कणवा-दयेनें.
कंथा-झोळी.
कदर्थत-कष्टी करीत.
कदरसि-भय घेसि.
कऱ्हेयाचा-उंटाचा.
कलासी-कौशल्य.
कल्हातां-कलत असतां.
कव-कवटाळणें.
कश्मलु-मळ, दोष.
कांटसु-कांटेरी.
कांटियडे-कांट्याची जाळी.

क़ांडें–भाग, टिपरें.
काणि–सूचना.
कांदे–कंद.
कामठां–कारखाना, टांकसाळ.
काललो–पायरवानें काळी झालेली.
कालाबुला–कासावीस.
कालासे–बांधिला जाई.
कालियाणा–कृष्णसर्प.
कालुग–काळा.
कावडी–कावड.
कावरुखें–क्षणभंगुर, अदृष्टपूर्व.
कांवरूमूल–वायुनिरोधनस्थानविशेष.
कावरें–भ्रांत.
काशि–माजबंधीं, कमरेस.
कुटि–स्थान, कपट, निंदा.
कुड्मल–कळी.
कुबुजे–कुबडे.
कुबोल–अपशब्द.
कुरौंडी–वोवाळणें.
कुसलें–गवताच्या अणकुच्या.
कुंसि–कुक्षिंत.
कुहा–विहीर.
कुहिलें–कुजलेलें.
कूटिचें–निंदेचें.
केंकाणें–खोगीर.
केलवलि–प्रौढ झाली.
कैंकटे–कैकाड्यांचा देश.
कोडी–कौतुक, आवड.
कोढी–कुष्टरोगी.
कौंता–शस्त्रविशेष.
कोंपट–झोंपडी.
कोंपटि–लहान झोंपडी, कोंप.
कोंभारा–कोंब.
कोलें–तिलादिकांचीं काष्टें.
क्रांतमति–व्यापकबुद्धि.

## ख.

खटेया–वाईटाला.
खडकिलां–खडकाचे कपरे असलेले.
खडाणें–अदृष्ट गाईस.
खडुपाणी–खड्गपाणि.
खणुवाला–गोड, सरळ.
खतैलें–लिप्त
खनुवाले–सरळ
खवणलें–कंडू, उत्कंठा.
खांकरूं–फलोन्मुख होऊं, उसत्र होऊं, गळा साफ करतां.
खांखरैजति–गळा साफ करतात, उसन्न होतात, फलोन्मुख होतात.
खागें–अंत्यस्थल, विषय.
खांची–दमे, कमी होई.
खांडेहूनि–खड्गाहून.
खाताडें–खरकटें.
खिरडें–मागें सरें.
खुडुके–अडके.
खुरखोडी–लाथाळ गुरूं.

खुरथोडी-दुष्ट गाई.
खुरपें-शस्त्रविशेष.
खुरीं-खुराच्या ठाइं.
खेटली-गर्दीनें ज़मली.
खेवणें-कोंदणें.
खैवंगी-अंश.
खोंकरपणें-विनाशिता.
खोंचणी-भोसकणें.
खोटी-गोळा.
खोडां-लाकडाचें अडकण.
खोदें-नाशबुद्धीनें.
खोमणें-लवणें, वक्र होणें, हानि.
खोमे-लवे, वक्र होई.
खोलणें-पुढें चालणें, फिरणें.
खोलविजति-सापडविती.

## ग.

गंडु-दर्प, गर्व.
गंडी-दगडविशेष.
गदलपणे-केरपणानें.
गरुवा-मोठा.
गव्हरीं-गुहेंत.
गवांदि-अन्नसत्र.
गाडारा-पाया.
गाणांवाणां-गाण्यावाण्यानें.
गादे-पीडा पावे.
गाभागोभा-प्रतिबंध.
गाली-टाकी, सांडी.
गावंधणें-गांवचीं गुरें.
गांवरसेया-गांवांतल्या मोरीचें पाणी.
गावारु-गव्हार, अडाणी.
गुडगा-अवयव विशेष.
गुंडे-दगड.
गुंढा-गुंडा, दगड.
गोख-मध्यवर्त्ति लोक.
गोंदली-पिशाची, कैकाडी.
गोधुलुक-गाईच्या पायाची धूळ. सूर्य-अस्तमानसमय.
गोरी-पारधी.
गोरुवें-गुरें.
गोवारी-गुराखी, गुरुसाख.
गोवी-गुंतागुंत.
गोसी-परस्पर आकर्षण, भांडवल.
ग्रामकोल-गावांतील कोल लोक.

## घ.

घनावलि-घट्ट झालेली, मेघपंक्ति.
घाइं-घावाचे ठाईं.
घामेजे-श्रमी होई.
घुमरी-भरास.
घुमे-घुम् शब्द करणें, हाले.
घुरें-खोटें सोनें.
घेणी-स्वीकार, मान.

## च.

चउर-चतुर.
चवलित-बडबडत.

चंक्रमण-सातत्यानें गमन.
चांगावेया-चांगुलपणास.
चाडा-इच्छा, आवड.
चाडैला-आसक्त.
चांथी-बडबड.
चांपडे-फासे.
चिरींव-चिरलेली.
चूकी-चूक, प्रमाद.
चोखटिवां-चांगुलपणास.
चोखेल-उत्तम, स्पष्ट, सस्ता.
चोज-कौतुक.
चोंढि-गर्त्ता.
चौखुरी-व्याज.
चौबारा-चवाठ्यावर.

## छ.

छांदसत्वें-लडिवाळपणें.

## ज.

जचे-पीडे.
जाकलिजत-व्यात होत असे.
जाततेन-जन्मल्या.
जानेतानें-तान्हें वासरूं.
जाल-जाळें.
जाली-दहन करी.
जालेन-झालेल्या.
जावलि-सान्निध्य, सादृश्य.
जीणि-वांघणें, जिंकणें.



जिवितांतु-जीवितांतून.
जुझं-युद्ध.
जुंबाडे-समुदाय.
जुवारुं-द्यूत.
जेविति-जेवण्याची.
जोईस-ज्योतिषी.
जोगावणें-निर्वाह करणें, पोसणें, प्रगटणें, समजावणें.

## झ.

झारि-क्षार.
झांसुरे-आळस येई, वोसणे, भोंका धरी.
झोति-विक्षेप.

## ट.

टकुली-आशा, उत्कट इच्छा, हपाप.
टकें-सुटलेलें, सत्यापासून सुटलेलें.
टवच-दुःख, दुख.
टांची-अल्प, लहान.
टालिये-टाळाला, हाताच्या टाळीला.
टिकलग-शोभिवंत, जडित.
टिटंघर-तिट्यावरचें घर.
टेकें-टेकतो.
टेहणी-निर्बंध.
टोपु-फुगवटा, फुगारा, सूज.

## ठ.

ठके-कमी पडे, बंद होई.

ठसेंठोमसें-मोठें धाटें.
ठाणें-स्वरूप, आकार.
ठाणौरियाचें-ठार पडलेल्याचे.
ठांसी-स्वस्थ बससी.
ठिकरिया-टुकडे.
ठी-स्थिति.
ठीक-जड, मोत्यांचा झुबका.
ठीकरणें-निश्चय करणें, स्थैर्य करणें.

## ड.

डगरु-प्रसिद्धि.
डगलें-स्थूल.
डाऊ-प्रसंग.
डाकुलिया-चुटक्या.
डांगुरुटी-डांगोरा.
डाल-शाखा, डाहाळी.
डाली-फुलेंफळें घालावयाची पाटी.
डालुका-लहान डाहाळी.
डावी-दूर करी, परिहार करी.
डाहारिजे-भागिजे, प्रकाशिजे, प्रसिद्ध करिजे.
डिंडिमा-वाद्य विशेष, गजर.
डुडुल-वोखिटें पाखरूं, घुबड.
डैंडि-डांगोरा.
डौरु-थट्टा करी, उपहास करी.

## ढ

ढाल-स्वभाव, घर्षण.
ढिवांचे-मुलाम्याचे.
ढूमे-डगर, डोंगर, टेकडी.
ढेंढें-सूप, धेंड, प्रस्थ.
ढेंपुली-ढेंकूळ.
ढोंडी-धोंड, डगर, दगड, आकार.

## त.

तडवा-छत, तलवा.
तणाचें-गवताचें, पेंढ्याचें.
तलबुडे-खालचा बुंधा, बुड.
तलहाटीं-अधोभागीं.
तलौटेपण-सपाटपण, नीचपण, नम्रता.
तांडी-कळप.
तांतला-तापलेल्या.
ताला-तळ, खाल, जमिनीची सपाटी.
तिखें-तीक्ष्ण, तिखट, अणकुचीदार.
तीघ-तीन.
तीमाल-भिजवाल.
तुंडिल-दोंद आलेला.
तुलई-गादी.
तूलियें-गादीवर, कापसाच्या गादीवर.
तोंडौता-वाचाळ.
तोयबगें-पाण्याच्या उपाधीनें, देखाव्यानें.
त्राय-रक्षण.
त्राये-सत्ता, रक्षण, ठाव.

## थ.

[ लपि ] थपिं-लपंडाव.
थरुविथरु-चोखटाविखट.

थलिवं-स्वर्णकारनिर्मित वस्तुविशेष.
थाउं, अ. थाॐ-बळ, उथळ, आश्रय, प्रांत.
थाथंबूनि-थांबवून, निरसून.
थावें-तळ, ठिकाण.
थेंकुले-ठेंगणें.
थोरांडें-मोठें.

## द.

दंदिया-वैरी, द्वंद्व करणारा.
दलवाडें-समुदाय, स्वरूप.
दवडा-पळ, धांव.
दाखठा-उंबरठा.
दाटणी-गर्दी,भरताड.
दाटुगा-दांडगा.
दांग-वन, अरण्य.
दाग्रिरू-बटिक.
दासट-दाहक, पीडक.
दिये-दिवस.
दीपले-मशाली.
दुकलु-मोडकळलेली स्थिति.
दुमेलावे-दुःखसमुदाय.
दुवालि-क्लेश.
दुहवेवारी-वाईट कर्माची.
दुहिलें-दूध काढलें.
दूण-दुप्पट.
दूस-वस्त्र, तंबू, प्रमेय.
देवपैकीं-देवसमुदायांत.
देवलविंसें-पुजाऱ्याचे आंगांत येणें.
देवांगण-निश्चय.
दैवलदैवं-पुजाऱ्याचें ऊर्फ गुरवाचें दैव

## ध.

धर्डी-दवडीन, घालवीन.
धाडी-हल्ला, अभिक्रम.
धांडे-हल्ले, अभिक्रम.
धानी-धान्याची रास किंवा ढीग, धान्य ठेवण्याचा ठोकळा, गृह.
धांधा-व्यापार.
धाप-धग, ताप.
धुमाडु-धामधूम, गडबड, आधिक्य, योग.
धारें-धाकटें.
धिटे-स्वैरिणी स्त्रीस.
धुवारी-धूमाची आकुलता.

## न

नई-नदी.
नडनाचु-नटाचा नाच.
नाखी-टाकी, प्राप्ति, समुपगम.
नागारी-नाग धरणारे गारुडी.
नागोवा-नागवण.
नाडर-थिल्लर, डबकें.
नावणिगी-यथार्थकथनीं.
निगलें-धुरानें, झांपडेनें.
निगावों-सुटका.
निगुतिया-युक्त्या.
निजगडे-स्वतःचे ठायीं बळकट, आत्मनिष्ठ.
निधनिं-अंतकाळ, मृत्यु.

निधिये-सम तोलांत, भ्रमणांत.
निमांते-लय पावणारे.
निरुते-खरे, निश्चित.
निरुपहिर्ति-निरुपाधिक.
निर्बुजें-गोंधळानें.
निर्वचु-निराकरण.
निर्वाललेनि-शुद्ध, धूत, निष्कलंक.
निऱ्हां-अगदीं, केवळ.
निळगु-निराश्रित.
निलेयाचा-इंद्रनीळाचा.
निष्टकी-निश्चित.
निष्टंकिति-निश्चयानें चिकटवितात.
निसले-पाजलें जाई.
निसुगु-निर्लज्ज, ओंगळ.
निस्तरे-तरून जाई.
नुधवी-वर काढीत नाहीं.
नुमचवे-प्रत्युपकार न करवे.
नुरोधीं-प्रतिबंध करूं नकोस.
नुसंतितां-उत्सादन केल्यावांचून.
नूकौनियां-पराभव करून,दुःख देऊन.
नेना-नेत नाहीं, जाणत नाहीं.
न्यामक-नियामक.

## प.

पडप-प्रतिष्ठा, महत्व.
पडिघांति-मारती, आदळती.
पढिगाइलें-मोजून पाहिलें, धरलें.
पढिये-अति प्रिय.
पढिकर-रोग बरा करणारा वैद्य, साहाय्यक.
परगुणे-पक्वान्न.
परमार-शत्रूंचा उच्छेद करणारे.
परवडि-रीती, प्रकार.
परिवाण-भाषा, शब्द, बोलणें.
परिवरिचें-घरचें, गुप्तस्थानचें.
पऱ्हिवे-मोरीस.
पलिपे-पेटे.
पवली-महामार्ग, राजमार्ग.
पसाव-प्रसाद, उपकार.
पहुरणीं-ओढाळ, भटकणारी.
पक्षु-आरोप.
पांउखला-लाथेनें.
पाउटी-पाहिरी.
पाउड-पैसासुपारी, दक्षणा.
पाउवा-पादुका.
पांकी-पातळ पदार्थ, पक्व अन्न.
पाखाणी-प्रक्षाळी,धुवून टाकी.
पाखालणियां-धुण्यानें.
पाखाली-प्रक्षाळी, धुई.
पांगुतले-अडकलेले, आच्छादिलेले.
पांगे-अधीनत्वानें.
पांगोरा-सूक्ष्म भाग, अंत.
पांचवेउली-पांच नांग्यांची इंगळी.
पांचिका-हीण सोन्यास.
पांजरा-पंजर, पिंजरा.
पाट-पदवी, आसन, अधिकार.
पाटाचें-अधिकार, आसन, पदवी.
पाढाउ-पढविणारा,मार्गदर्शक,साधक
पाणधी-दोन कुंपणामधील वाट.
पाणवाडा-मोरी.

पाणियड-तळें, जळपात्र.
पाणियांचा-पाण्याचा.
पांति-पावतात.
पातिजों-विश्वास ठेवों.
पापता-पापत्व.
पारकेयां-शत्रूस.
पालति-रक्षण.
पालव-इंद्रियवृत्ति.
पाल्हालें-विस्तारें, गाबाळानें.
पालें-कटकें.
पालों-विस्तारून.
पावे-पोहोंचे.
पासाव-पासून.
पासिं-जवळ.
पासिवणें-पायमाघार.
पाहिचे-उद्यांचे.
पाहेचा-उद्यांचा.
पिचडीं-थुकीनें.
पिडि-पाया.
पिंडु-अहंपदविशिष्ट जीव.
पिशित-मांस.
पीसा-वेडा, पिच्छ.
पीसेया-वेड्यास, वेडास.
पुटीं-मूस, पुडा, सुवर्णशोधन.
पुढारलों-पुढें झालों, कबूल झालों, बोलिलों.
पुरवणिया-सिद्धि.
पूंस-राघूं, पारव्याचा भेद.
पेटी-जोडी.
पेंडवला-बांध.
पेंढी-जुडी.
पेणा-मजल, टप्पा, मुक्काम.
पेंदलीं-वेंटाळें.
पेंधा-गोळा.
पेले-लोटणें, संभाळून धरणें.
पेलेवेलीं-प्रतिदिन वृद्धि.
पैठी-प्रविष्ट.
पैसार-मार्ग, पसारा, विस्तार.
पैसिजे-प्रवेश करी.
पैसें-योगानें, मार्गानें.
पोटलवे-पोटाशीं धरवे, आलिंगवे.
पोटाळूं-पोटाशीं धरूं.
पोफल-प्रतिज्ञा, पैज.
पोतीं-तागाचीं पोतीं.
पोली-आवार, भोंवतालची भिंत.
पौली-महामार्ग, राजमार्ग.
प्रतिमल्ल-शत्रू, सामनेवाला.
प्रतिलपसि-अनुलक्षून बोलतोस.
प्रत्यवावो-दोष.
प्रांगण-ताशे, नगारे.
प्राची-उदय.
प्रायेचा-पूर्वीचा, पूर्ववयाचा.

## फ.

फरसालें-भिन्न स्वादें.
फरारी-ध्वज, निशाण.
फाउरी-आभास.
फाडोवाडा-वेगळें करून.
फारां-पुष्कळ.
फारु-पुष्कळ.

फाली-फाडी, चिरी.
फुंजे-गर्वानें.
फुडी-स्पष्ट, खरी.
फुलिं-फुलांनीं.
फूटौनि-दमून.
फोकरिजे-वाचेनें उच्चारिजे.
फोकिलियां-वाऱ्यानें ओढून नेलेल्या, वाऱ्यानें फुंकून नेलेल्या.
फोडसें-फुरसें.

## ब

बगें-देखावा, आकार, मार्ग, संबंध.
बणवे-प्रतीतीस येई.
बडंबा-गडबड, कोलाहल.
बल्बचेन-सैराट उगवणारे गवताच्या.
बहिकरि-बहिष्कार घालून.
बहुचकै-अनेकता.
बहुवसा-फार, पुष्कळ.
बागडी-मर्कटादि नाचविणार.
बागीवल-कंप.
बाधकां-दोषांस.
बांधी-बंधन, नियम, समुदित आकार, दोहीकडील कूप.
बायणी-वायदा.
बायिणियां-वायदे.
बासढु-बहुविध.
बाहाली-विस्तार, वेडा.
बाहिरिवाहिरा-परभारें.
बीक-बळ, तेज.
बीजे कीजे-गमन केलें पाहिजे, आलें पाहिजे.
बुकी-मुष्टि, मूठ.
बुडकली-बुडी.
बुडलूं-बुडवूं.
बुडसले-शुष्क काष्ट.
बुबुलें-अवयव विशेष.
बुरी-कूज, रोग विशेष.
बूरु-वेडा.
बेचें-कोंभ.
बेझें-युक्ति.
बेंबल-विव्हल.
बेलें-कुंपणाचा आडा, डेळकें.
बैसणां-बैठक, आसन.
बोकौटी-झोळी.
बोबाणें-हाक मारी.
बोबांत-हाक मारीत.
बोंबे-आरोळीच्या.
बोल-भाषण, शब्द.
बोहणीए-मोलापैकीं प्रथम, आरंभ, सुरवात.
बोहिरि-वणवा.

## भ.

भंगी-रीति, प्रकार.
भराडा-पूजक.
भरोवरी-साधनातिशय.
भवैचिं-भिवयांची, भ्रुकुटीची.
भ्रमक-लोहचुंबक.

भाउरें-भ्रमणारें.
भाखे-भाषेस.
भांगारें-सोनें.
भांजे-भग्न होई.
भाटिं-निकृष्ट जमीनींत, स्तुतिपाठक.
भाटिव-स्तुति, पराक्रम.
भांडुके-भांडखोर.
भाणें-ताट, पात्र.
भादि-भली गाय.
भाली-शस्त्र विशेष.
भिंगारा-भिंगाचें घर, कंदील.
भिंगोरि-भोंवरा.
भीला-पराङ्मुख.
भुरेरे-वेड, पिसें.
भुरुरी-वेड, पिसें.
भूवंगीं-सर्पाचे ठाईं.
भोकसा-सगळें चर्म.
भोजे-संतोष, आवड, सोंग, महत्व.

म.

मगे-शोधी.
मटंगणे-स्तोत्र, उपहास.
मढ-मठ.
मणिजु-अंडज.
मदवी-वस्त्र विशेष.
मरमारु-प्राणान्त करणारें.
मरुणारुवाचें-मरणाऱ्याचें.
मवणें-मोजणें.
माघुतसाउमे-मागलेंपुढलें.
मांच-आश्रय, अंतराळीं केलेला मार्ग.
माजिरां-मत्त.
माजिवडा-झिवडा-मध्यें.
मांदिएसी-समुदायास, मंडळीस.
मांदुरी-चाबुकस्वार.
मांदोडा-फळांचा घड, बाहुल्य.
मांधति-रजतात, काढतात.
मालातिलें-अंगीकारिलें, आश्रयिलें.
माल्हांत-अंगीकारीत.
माहेवणी-कुलीन, गर्भार.
मिणधी-कपटी.
मिरवणियां-मिरवणुकी, शोभा.
मीकें-संशयानें.
मीतलें-मिळालें.
मुगुतकीं-मोतीं.
मुगुतिबाला-मुक्ति हीच कोणी मुलगी.
मुदी-मुद्रा.
मुल्हारी-मूळ ऊर्फ आमंत्रण घेऊन जाणारें.
मुखिं-ओठ्यांत, पदरांत.
मुसिले-फसले.
मूंके-नुगवायाचें.
मूग-मौन.
मेचवे-आटोपे, मृदु करवे.
मेचु-प्रीति, आवड.
मेळापकिं-विषयग्राहक, समुदाय.
मेळे-ळें-योग, संयोग, संयोगानें.
मेळीसी-योगास, संयोगास, एकवटतेस.
मेर-रे-मर्यादा, अवधि ( संस्कृत मीर=मर्यादा ).

मेहो-मेघ.
मोहर-मार्ग, दिशा.

## य.

यंते—येणारें.
यावा—आगमन, प्राप्ति.
युगावृत्ति—कृतयुगादींची आवृत्ति.
येकोल—एक वेळ.

## र.

रंधन—पाक.
रयणीं—रात्रीं.
राजवळिं—राजाचें हस्ताक्षर, राजमुद्रा.
राजागर—राजांच्या बागा.
रांधवण—स्वयंपाकांतलें पाणी, आचारीण.
राबाउणें—राबाच्या विना.
राविले—रंगविले.
रिगिनिगि—प्रवेशनिर्गम.
रोहो—अंकुर, आरंभ, वाढ.

## ल.

लंघे—ओलांडणें, उपवास करणें.
लचकणें—तरळणें, चळणें.
लवंघा—लवंग.
लवलवां—अति त्वरेनें.
लाइलें—हकालिलें.
लांकण—बंधन.
लागां—संबंधीं.
लागु—संबंध.
लाटु—बळकट.
लाठी—दांडगी, मोठी.
लाणें—अवधि, शेवट, प्राप्ति, गोळा करणें.
लांब—भातगोट्याचें रोप.
लांबिजे—लांब उभे टांगणें.
लावणी—गणना, नेमावणी.
लांवा—व्याघ्रस्त्री.
लांसे—चिन्ह.
लाहाणा—प्राप्त होणारा.
लाहालाहात—अत्युत्कंठित.
लुंचिति—वपन करिती, काढिती.
लूंति—त्वग्रोग.
लेखे—गणनेस.
लेंडिये—अमंगळ ओहळास.
लेप—चित्र, दोष.
लेवे—लेप.
लेसां—बऱ्या बोलानें.
लेहें—चाटी.
लोटी—ढकलणें, दूर करणें, मारणें.
लोथ—मोट.
लोलैनि—लोळून.
लोंवे—लोंकरी.

## व.

वंगु—कलंक.
वचवे—जावे.
वंठाऊ—न्यूनत्व.

वडप—तृष्टि.
वत्सनाग—वचनाग.
वन्हिया—इष्ट.
वरिषा—पाऊसाळा.
वरैतु-भर्ता, नवरा, पति.
वरोसी-नित्यकृत्याची सामग्री.
वलसा-वळण, फेरा, भोवरा.
वलित-छेदनायोग्यता.
वसो-बैल, वसू.
वसोवा-बैलास.
वाउधाण-वादळ.
वाउर-वाईट.
वाउली-पाउलीं.
वाकडिया-पावसाची झड. कडाक्याची थंडी.
वाखाण-व्याख्यान.
वाखाणा-व्याख्यानां.
वागतृता-वक्तृत्व.
वागोरा-वाखदोर.
वाजटा-व्यर्थ.
वाटबंधा-वाटमाऱ्या.
वाटवीजे-मार्ग काढते.
वाडजतन-फार तत्परता.
वाडु-फार.
वाडुवडु-महा भयंकर.
वाणसिये-वेश्येचे.
वाणि-तोटा, कमीपणा, वाचा.
वाति-दिवा.
वाधावा-येतें चिन्ह, पूर्वसूचना, वार्ता.
वानी-कस, मासला.
वायप्रसंगें-अनुद्दिष्ट प्रसंगानें.
वायें-वाहणें, दाखवणें.
वार्तेवरिल-दोरावरील.
वालभ-वात्सल्य.
वाला-वजन विशेष.

वाली-त्यागी, टाकी.
वालें-कृष होई.
वाल्हें दुल्हें-अति प्रीतीचें, अपूर्व.
वावंदणे-दगड, खडक.
वावाटें-ओहोटे.
वासिपैल-वचकेल.
वासिपो-वचकूं, भिऊं.
वास्ति-रहाण्याचें ठिकाण.
वाहाणधर-जोडे उचलणार.
वाहाती-मळलेली.
विकणु-फोल.
विकिरा-विक्री.
विखाभरणें-विषयांचे अलंकार.
विटंकु-मोठे, घनदाट, निबिड.
विटालें-दोष.
विडा-तांबुल.
विडालु-दोष.
विदल-द्विजातीय, डांक.
विंदाण-कौशल्य, कळसूत्र.
विंदाणिये-कुशल.
विधुले-विसकटे, नाश पावे.
विन्यासाते-प्रतिपादनास, निरूपणास.
विपाउ-कादाचित्कत्व.
विभांडी-पराभवी, फोडी,
विभुटणी-वियोग.
विरगति-विरक्ति.
विरंगुला-अडथळा.
विवलतिये-प्रकाशणाऱ्या.
विवसी-डाकीण, भूत.
विशेकु-ज्ञान.
विसंवणें-विश्रांति पावणें.
विहिं-विधींत.
वीति-उत्पन्न करतात, प्रसवतात.
वृत्तिकां-वतनदार.

वेख-वेष.
वेखजें-व्यवहार.
वेखासें-विरुद्ध.
वेगल-भिन्न, निरनिराळे.
वेगु-त्वरा.
वेचिं-खर्चांत, क्षयांत.
वेझ-सुईचा डोळा, भोंक.
वेझिला-वेढिला.
वेंटाळु-गोळा.
वेटाळों-गळा करतां.
वेंठ-पेठ.
वेठला-वेष्टला.
वेंठावें-वेष्टावें, आच्छादावें.
वेलरिया-वेली.
वेलाउल-लतामंडप, धूर.
वेलांडी-विस्तार.
वेलाभेड-समुद्राच्या लाटांना भिणारा.
वेव्हारु-व्यवहार.
वेव्हारे-व्यापारी.
वोइरणा-आडवेपण.
वोइरिलें-आडवें झालें.
वोइरी-आडवी.
वोउसेयाचेया-व्रत करणाऱ्याच्या.
वोखती-चिंता.
वोज-रीति, चांगुलपण, प्रभा.
वोजावी-रीति दाखवी, शिकवी.
वोडण-ढाल.
वोडौ-आदर.
वोढालाचा-उनाडाचा.
वोढालिवा-चोरी करणाऱ्या.
वोथंबा-गवंड्यांचा लंबक, आश्रयस्तंभ
वोरकली-सोनें कसायाचा पाषाण.
वोरकलू-सोनें कसायाचा पाषाण.
वोरसें-पान्हा, प्रीति.
वोलाटे-ओल्या जमिनी.
वोली-गहाण.
वोवांडे-उलटे, ओलांडे, पडे.
वोवी-बंध.
वोसें-मिथ्यात्व, न्यूनता.
वोह-कांस, आंचळ.
वौसें-व्रत.
व्यंजे-व्यक्त होतें.
व्यामिजे-उद्योगीं लावणें.

## श.

शराव-परळ.
शाड्वलु-हिरवेंगार.
शालिका-स्थान, भूमि.
शिवमुष्टिगंडु-अभिमानाचा पण, पैज.
शोच्यतें-दैन्यास.
शोधारिलीं-शुद्ध केलीं.
श्रीमाडु-संपत्तीचा मद.

## स.

सकलव-मिश्रित.
सकु-सत्ता.
सकुडि-सशरीर.
सचकु-संग्रही.
सणाणें-तीक्ष्ण.
सत्राण-बळकट.
सदटें-सदृढ, बळकट.
संदु-छंद.
संदे-छंदानें.
संपजति-संपद्यमान होतात.
सपाई-संपूर्ण.
सपोल-व्यर्थ, निष्फळ.
सबडबुडी-गुडुप.
समूळ-संपूर्ण.

समैक–समयिक.
समोरिला–पुढील.
संमोहरें–प्रत्यक्ष.
सर्वज्ञ–सर्व जाणणारा.
सरांडैल–लिडबिडेल.
सरोभरी–तुलना, साम्य.
सव–शिरकाव.
सवंदणी–परटाचें तादण.
सवले–उद्यां, प्रात:कालीं.
सवांब–सुशोभित.
सविया–स्वत:.
सविकॊं–सविस्तर.
साइलेयां–शेजारच्या.
साउमा–प्रत्यक्ष, पुढलें, समोरचें, तेव्हांच.
साचल–चाहूल, जागें.
साजणे–सख्य.
सांजवणी–धार.
साजा–तयार.
साजीव–ताजें, तीक्ष्ण, जिवंत.
साटु–चाबूक, प्रतोद.
साडुवल–हिरवें गवत.
साणें–सहन करणें.
सात–सोशीत.
सातरिया–सप्ताह, सप्तक.
सातवेउली–सात नांग्यांची इंगळी.
सांते–बाजारीं.
सादु–शब्द.
साध–इच्छा.
सांपु–सर्प.
साबलाहुनु–शस्त्राहून, पहारेहून.
सामाये–समावे.
सारकतु–विझालेला कोळसा.
सारिसिं–सारखी.
सारोक–चांगलें.
साल–कातडें.
सालडें–कातडें.
सालिये–संपन्न.
सावगणी–कापणी.
सांवरे–भरे.
सावाऊं–साहाय्य, साम्य.
सावाय–साहाय्यानें.
सावें–अवघें.
सासन–शासन.
सासान–अंदण.
सासिंनलिया–विस्तारल्यास, धरल्यास.
साहांतिया–सोसणाऱ्या.
सिचडी–कंडू.
सिंतरी–फसवी.
सिंथिति–फेंकती, निपजविती, बाहेर काढती.
सिनानीं–निराळीं, भिन्न.
सिनार–निराळें, भिन्न.
सिनीं–वेगळीं, निराळीं.
सियारी–डाकीण.
सिरके–प्रवेश करी.
सिरालें–उसें.
सिरीयाणी–आवड, इच्छा.
सिसार–शिरोरोगी.
सिहबीरें–छावणी.
सींग–अग्रभाग.
सींनसाल–छिन्न साल आहे ज्याची, क्षणभंगुर.
सीनें–वेगळें, निराळें.
सुआरु–पाककर्ता.
सुइजे–घालिजे.
सुजे–सूजे–सुचे.
सुझे–सुचे.

सुणी-झाडणारी, घालवणारी.
सुयाणें-सुकाळ.
सुरंगी-वाट, भुयार.
सुरफुरे-पातळ.
सुरवाडें-सुख, अनुकूल, मर्जी, सुकाळ
सुवर्मा-अत्यंत मार्मिकास.
सुवाण-चंगळ.
सुवायें-चांगल्या वाऱ्यानें.
सुवाळली-चांगली, सुखाची.
सुवे-घाली.
सुहाडा-मनोरमा.
सुहावें-सेवावें.
सुहावेया-प्रापक.
सूटिका-मुक्ति, सोडवण.
सूंति-निघतात.
सूंतील-घालतील, काढतील.
सूसि-घालिसी.
सेजेयां-शेजारच्या.
सेंदे-करंड्याचे ठाई.
सेलिला-तरंगला.
सेलिए-उत्तम वाटा.
सेस-नवरानवरीस अक्षता, शेष.
सैघ-अनेक, सर्व.
सोआवें-घालावें, वाढावें.
सोंए-निजे.
सोंकरी-पांखरे हाकी.
सोंचरा-शस्त्रविशेष.
सोणवी-पृथ्वी.
सोफ-लटकें, फोल.
सोभु-ऊर्मि तरंग.
सोये-आधार, आश्रय.
सोलें-उत्तम सोनें.
सोवता-वरपडा.
सोवतें- सार्थक.
सोहळेया- सुख, चैन, सोहळा.'
सौंदणी-परटाचें तादण.
स्फीति-प्रतिष्ठा, मोठेपणा.
स्फीतीचेया-कीर्तीच्या, प्रतिष्ठेच्या.
स्वसणें-श्वास टाकणें.

## ह.

हडगीं-हटसाधनें.
हडपु-डबा.
हवावे-शोभा.
हाडाकाइर-हाडें खाणार.
हाणि-तोटा.
हातधरणियां-हात धरण्यानें.
हातवसावें-हातीं धरावें.
हातोफलिया-हां हां ह्मणतां.
हाथि-गज, हस्ती.
हाथैवा-काडवात.
हालाफुलीं-तत्काळ, हां हां ह्मणतां.
हियें-हृदय
हिरतां-हिरोन घेतां.
हिरें-हिरोन घेई.
हीयारी-थंडीच्या दिवसांत.
हुरपतां-धग लागतां, होरपळतां.
हेलासति-तुच्छ मानिती.
होणां- होण्यानें.

सुणी-झाडणारी, घालवणारी.
सुयाणें-सुकाळ.
सुरंगी-वाट, भुयार.
सुरफुरे-पातळ.
सुरवाडें-सुख, अनुकूल, मर्जी, सुकाळ
सुवर्मा-अत्यंत मार्मिकास.
सुवाण-चंगळ.
सुवायें-चांगल्या वाऱ्यानें.
सुवालली-चांगली, सुखाची.
सुवे-घाली.
सुहाडा-मनोरमा.
सुहावें-सेवावें.
सुहावेया-प्रापक.
सूटिका-मुक्ति, सोडवण.
सूंति-निघतात.
सूंतील-घालतील, काढतील.
सूंसि-घालिसी.
सेजेयां-शेजारच्या.
सेंदे-करंड्याचे ठाई.
सेलिला-तरंगला.
सेलिए-उत्तम वाटा.
सेस-नवरानवरीस अक्षता, शेष.
सैघ-अनेक, सर्व.
सोआवें-घालावें, वाढावें.
सोंए-निजे.
सोंकरी-पांखरे हाकी.
सोंचरा-शस्त्रविशेष.
सोणवी-पृथ्वी.
सोफ-लटकें, फोल.
सोभु-ऊर्मि तरंग.

सोये-आधार, आश्रय.
सोलें-उत्तम सोनें.
सोवता-वरपडा.
सोवतें- सार्थक.
सोहलेया- सुख, चैन, सोहळा.
सौंदणी-परटाचें तादण.
स्फीति-प्रतिष्ठा, मोठेपणा.
स्फीतीचेया-कीर्तीच्या, प्रतिष्ठेच्या.
स्वसणें-श्वास टाकणें.

## ह.

हडगीं-हटसाधनें.
हडपु-डबा.
हवावे-शोभा.
हाडाकाइर-हाडें खाणार.
हाणि-तोटा.
हातधरणियां-हात धरण्यानें.
हातवसावें-हातीं धरावें.
हातोफलिया-हां हां ह्मणतां.
हाथि-गज, हस्ती.
हाथैवा-काडवात.
हालाफुलीं-तत्काळ, हां हां ह्मणतां.
हियें-हृदय
हिरतां-हिरोन घेतां.
हिरें-हिरोन घेई.
हीयारी-थंडीच्या दिवसांत.
हुरपतां-धग लागतां, होरपळतां.
हेलासति-तुच्छ मानिती.
होणां- होण्यानें.

सुणी- झाडणारी, घालवणारी.
सुयाणें-सुकाळ.
सुरंगी-वाट, भुयार.
सुरफुरे-पातळ.
सुरवाडें-सुख, अनुकूल, मर्जी, सुकाळ
सुवर्मा-अत्यंत मार्मिकास.
सुवाण-चंगळ.
सुवायें-चांगल्या वाऱ्यानें.
सुवालली-चांगली, सुखाची.
सुवे-घाली.
सुहाडा-मनोरमा.
सुहावें-सेवावें.
सुहावेया-प्रापक.
सूटिका-मुक्ति, सोडवण.
सूंति-निघतात.
सूंतील-घालतील, काढतील.
सूसि-घालिसी.
सेजेयां-शेजारच्या.
सेंदे-करंड्याचे ठाई.
सेलिला-तरंगला.
सेलिए-उत्तम वाटा.
सेस-नवरानवरीस अक्षता, शेष.
सैघ-अनेक, सर्व.
सोआवें-घालावें, वाढावें.
सोंए-निजे.
सोंकरी-पांखरे हाकीं.
सोंचरा-शस्त्रविशेष.
सोणवी-पृथ्वी.
सोफ-लटकें, फोल.
सोभु-ऊर्मि तरंग.
सोये-आधार, आश्रय.
सोलें-उत्तम सोनें.
सोवता-वरपडा.
सोवतें- सार्थक.
सोहलेया- सुख, चैन, सोहळा.'
सौंदणी-परटाचें तादण.
स्फीति-प्रतिष्ठा, मोठेपणा.
स्फीतीचेया-कीर्तीच्या, प्रतिष्ठेच्या.
स्वसणें-श्वास टाकणें.

## ह.

हडगीं-हटसाधनें.
हडपु-डबा.
हवावे-शोभा.
हाडाकाइर-हाडें खाणार.
हाणि-तोटा.
हातधरणियां-हात धरण्यानें.
हातवसावें-हातीं धरावें.
हातोफलिया-हां हां ह्मणतां.
हाथि-गज, हस्ती.
हाथैवा-काडवात.
हालाफुलीं-तत्काळ, हां हां ह्मणतां.
हियें-हृदय
हिरतां-हिरोन घेतां.
हिरें-हिरोन घेई.
हीयारी-थंडीच्या दिवसांत.
हुरपतां-धग लागतां, होरपळतां.
हेलासति-तुच्छ मानिती.
होणां- होण्यानें.

सुणी- झाडणारी, घालवणारी.
सुयाणें-सुकाळ.
सुरंगी-वाट, भुयार.
सुरफुरे-पातळ.
सुरवाडें-सुख, अनुकूल, मर्जी, सुकाळ
सुवर्मा-अत्यंत मार्मिकास.
सुवाण-चंगळ.
सुवायें-चांगल्या वाऱ्यानें.
सुवालली-चांगली, सुखाची.
सुवे-घाली.
सुहाडा-मनोरमा.
सुहावें-सेवावें.
सुहावेया-प्रापक.
सूटिका-मुक्ति, सोडवण.
सूंति-निघतात.
सूंतील-घालतील, काढतील.
सूसि-घालिसी.
सेजेयां-शेजारच्या.
सेंदे-करंड्याचे ठाई.
सेलिला-तरंगला.
सेलिए-उत्तम वाटा.
सेस-नवरानवरीस अक्षता, शेष.
सैघ-अनेक, सर्व.
सोआवें-घालावें, वाढावें.
सोंए-निजे.
सोंकरी-पांखरे हाकीं.
सोंचरा-शस्त्रविशेष.
सोणवी-पृथ्वी.
सोफ-लटकें, फोल.
सोभु-ऊर्मि तरंग.
सोये-आधार, आश्रय.
सोलें-उत्तम सोनें.
सोवता-वरपडा.
सोवतें- सार्थक.
सोहळेया- सुख, चैन, सोहळा.
सौंदणी-परटाचें तादण.
स्फीति-प्रतिष्ठा, मोठेपणा.
स्फीतीचेया-कीर्तीच्या, प्रतिष्ठेच्या.
स्वसणें-श्वास टाकणें.

## ह.

हडगीं-हटसाधनें.
हडपु-डबा.
हवावे-शोभा.
हाडाकाइर-हाडें खाणार.
हाणि-तोटा.
हातधरणियां-हात धरण्यानें.
हातवसावें-हातीं धरावें.
हातोफलिया-हां हां ह्मणतां.
हाथि-गज, हस्ती.
हाथैवा-काडवात.
हालाफुलीं-तत्काळ, हां हां ह्मणतां.
हियें-हृदय
हिरतां-हिरोन घेतां.
हिरें-हिरोन घेई.
हीयारी-थंडीच्या दिवसांत.
हुरपतां-धग लागतां, होरपळतां.
हेलासति-तुच्छ मानिती.
होणां- होण्यानें.

सुणी-झाडणारी, घालवणारी.
सुयाणें-सुकाळ.
सुरंगी-वाट, भुयार.
सुरफुरे-पातळ.
सुरवाडें-सुख, अनुकूल, मर्जी, सुकाळ
सुवर्मा-अत्यंत मार्मिकास.
सुवाण-चंगळ.
सुवायें-चांगल्या वाऱ्यानें.
सुवालली-चांगली, सुखाची.
सुवे-घाली.
सुहाडा-मनोरमा.
सुहावें-सेवावें.
सुहावेया-प्रापक.
सूटिका-मुक्ति, सोडवण.
सूंति-निघतात.
सूंतील-घालतील, काढतील.
सूसि-घालिसी.
सेजेयां-शेजारच्या.
सेंदे-करंड्याचे ठाईं.
सेलिला-तरंगला.
सेलिए-उत्तम वाटा.
सेस-नवरानवरीस अक्षता, शेष.
सैघ-अनेक, सर्व.
सोआवें-घालावें, वाढावें.
सोंए-निजे.
सोंकरी-पांखरे हाकीं.
सोंचरा-शस्त्रविशेष.
सोणवी-पृथ्वी.
सोफ-लटकें, फोल.
सोभु-ऊर्मि तरंग.
सोये-आधार, आश्रय.
सोलें-उत्तम सोनें.
सोवता-वरपडा.
सोवतें- सार्थक.
सोह्ळेया- सुख, चैन, सोह्ळा.'
सौंदणी-परटाचें तादण.
स्फीति-प्रतिष्ठा, मोठेपणा.
स्फीतीचेया-कीर्तीच्या, प्रतिष्ठेच्या.
स्वसणें-श्वास टाकणें.

## ह.

हडर्गी-हटसाधनें.
हडपु-डबा.
हवावे-शोभा.
हाडाकाइर-हाडें खाणार.
हाणि-तोटा.
हातधरणियां-हात धरण्यानें.
हातवसावें-हातीं धरावें.
हातोफलिया-हां हां म्हणतां.
हाथि-गज, हस्ती.
हाथैवा-काडवात.
हालाफुलीं-तत्काळ, हां हां म्हणतां.
हियें-हृदय
हिरतां-हिरोन घेतां.
हिरें-हिरोन घेई.
हीयारी-थंडीच्या दिवसांत.
हुरपतां-धग लागतां, होरपळतां.
हेलासति-तुच्छ मानिती.
होणां- होण्यानें.

सुणी-झाडणारी, घालवणारी.
सुयाणें-सुकाळ.
सुरंगी-वाट, भुयार.
सुरफुरे-पातळ.
सुरवाडें-सुख, अनुकूल, मर्जी, सुकाळ
सुवर्मा-अत्यंत मार्मिकास.
सुवाण-चंगळ.
सुवायें-चांगल्या वाऱ्यानें.
सुवालली-चांगली, सुखाची.
सुवे-घाली.
सुहाडा-मनोरमा.
सुहावें-सेवावें.
सुहावेया-प्रापक.
सूटिका-मुक्ति, सोडवण.
सूंति-निघतात.
सूंतील-घालतील, काढतील.
सूसि-घालिसी.
सेजेयां-शेजारच्या.
सेंदे-करंड्याचे ठाई.
सेलिला-तरंगला.
सेलिए-उत्तम वाटा.
सेस-नवरानवरीस अक्षता, शेष.
सैघ-अनेक, सर्व.
सोआवें-घालावें, वाढावें.
सोंए-निजे.
सोंकरी-पांखरे हाकीं.
सोंचरा-शस्त्रविशेष.
सोणवी-पृथ्वी.
सोफ-लटकें, फोल.
सोभु-ऊर्मि तरंग.
सोये-आधार, आश्रय.
सोलें-उत्तम सोनें.
सोवता-वरपडा.
सोवतें- सार्थक.
सोह्ळेया- सुख, चैन, सोह्ळा.
सौंदणी-परटाचें तादण.
स्फीति-प्रतिष्ठा, मोठेपणा.
स्फीतीचेया-कीर्तीच्या, प्रतिष्ठेच्या.
स्वसणें-श्वास टाकणें.

## ह.

हडगीं-हटसाधनें.
हडपु-डबा.
हवावे-शोभा.
हाडाकाइर-हाडें खाणार.
हाणि-तोटा.
हातधरणियां-हात धरण्यानें.
हातवसावें-हातीं धरावें.
हातोफलिया-हां हां ह्मणतां.
हाथि-गज, हस्ती.
हाथैवा-काडवात.
हालाफुलीं-तत्काळ, हां हां ह्मणतां.
हियें-हृदय
हिरतां-हिरोन घेतां.
हिरें-हिरोन घेई.
हीयारी-थंडीच्या दिवसांत.
हुरपतां-धग लागतां, होरपळतां.
हेलासति-तुच्छ मानिती.
होणां- होण्यानें.